
१५



# यशवंतराव
# इतिहासाचें एक पान

रामभाऊ जोशी

Y.C.P
923.60954/JOS
G04266
LIBRARY

यशवंतराव : इतिहासाचें एक पान

प्रकाशक व मुद्रक

ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणें ४११०३०

चित्रकार

मुखपृष्ठ आणि
आंतील चित्रांची सजावट
अनंत सालकर

© १९७६
रामभाऊ जोशी

# यशवंतराव :

मूल्य २३ रुपये

Y. B. CHAVAN LIBRARY
- MUMBAI -
CA...
A... NO.: G04266
DATE: 6/6/2015

# इतिहासाचें एक पान

रामभाऊ जोशी

केसरी प्रकाशन, पुणें

# प्रकाशकाची भूमिका

महाराष्ट्रांत आधुनिक नेत्यांच्या मालिकेंत श्री. यशवंतराव चव्हाण यांना खूप वरचें स्थान द्यावें लागेल. किंबहुना नेहरू-युगांतील मराठी नेत्यांत ते अग्रगण्यच होत. कोणी बुद्धीने श्रेष्ठ असतील, कोणी शक्तीने श्रेष्ठ असतील, परंतु शक्ति-युक्ति ज्यांच्या ठायीं एकत्र आहे आणि ज्यांनी या शक्ति-युक्तीचा उपयोग कालिदासाने रघुवंशांत सांगितल्याप्रमाणे परप्रयोजनासाठी केला असे यशवंतराव होत. म्हणून ते लोकनेते ठरले.

बुद्धिवादी महाराष्ट्रांत नेतृत्व करणें ही सोपी गोष्ट नाही. येथे सारेच मानदंड उंचावलेले. त्यामुळे महाराष्ट्राचें नेतृत्व ते करीत आहेत यांतच त्यांच्या सर्वांगीण कर्तृत्वाची साक्ष मिळते.

यशवंतरावांना मी विशेषत्वाने ओळखूं लागलों संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळी-पासून. मी संयुक्त महाराष्ट्र समितीचा खजिनदार व ते कॉंग्रेस-पक्षाचे निष्ठावंत नेते; त्यामुळे स्वाभाविकच आम्ही विरोधांत उभे होतो. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत अनेक किल्मिषांवर मात झाली; त्यांत जातीयतेवरहि झाली असे कांही काळ भासलें; परंतु कांहीजण कृष्णा व कोयनेंत स्नान करूनहि कोरडेच राहिले. या काळांत महाराष्ट्रांतील अनेक पुढारी फार जवळून पहातां आले. दुरून जे साजरे दिसले होते ते जवळ जातांच पोकळ ठरले. जे लहान वाटत होते ते मनाने फार मोठे आहेत असें आढळलें. त्या वेळींच यशवंतरावांच्यांतील माणुसकीच्या गहिवराने माझ्यावर छाप पाडली. महाराष्ट्राला हा माणूस एकत्र बांधून प्रगतिपथावर नेण्यास समर्थ आहे असें वाटलें.

महाराष्ट्राच्या प्रगतींतील सर्वांत मोठा अडथळा त्याचा फुटिरपणा ! 'महाराष्ट्रीय मत्सरग्रस्त' हे कल्हणाने म्हटलें याच्या बुडाशींहि हा जातीय फुटिरपणाच कारणीभूत आहे. या फुटिरपणाच्या प्रवृत्तीने सामाजिक सत्य-शोधनासहि जातीयतेने माखलें. या प्रवृत्तीशीं यशवंतरावांनी मुकाबला केला. एवढेंच नव्हे तर, आपल्या नेतृत्वाखाली सान्यांना न्याय देण्याचा सतत प्रयत्न करून महाराष्ट्रास एकसंध व एकात्म बनवण्या-साठी ते झटले. यशवंतरावांचें मोठेंपण खरें त्यांत आहे.

याचें एक उदाहरणच देतों. यशवंतराव हे द्वैभाषिकाचे मुख्य मंत्री होते. मी विधानसभेचा सभासद होतों. विधानसभा चालू असतांनाच केसरीच्या दिल्लीच्या वार्ता-हरांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र प्रस्थापनेची पंडितजींची घोषणा मला मुंबईस तात्रडतोब कळविली. त्याबद्दल आनंद व्यक्त करणारी चिठ्ठी ट्रेझरी बेंचवर मुख्य मंत्र्यांच्या जागीं बसलेल्या यशवंतरावांकडे मी पाठविली व त्यांतच विनंती केली, या आनंदाच्या घोषणेच्या वेळीं, गांधीहत्त्या-प्रकरणीं जाळपोळ झालेल्यांना पुनर्वसनासाठी जी कर्जें दिलीं आहेत तीं माफ करावीं. यशवंतरावांनी ती सूचना लगेच उचलून धरली आणि संयुक्त

महाराष्ट्राचें एक नवें पर्व जुनी जळमटें झटकून सुरू केलें. अनेक सार्वजनिक संस्थांना त्यांचा आधार मिळाला. केवळ प्रगत समाजासच नव्हे, तर नवबौद्धांनाहि अनेक सोयी-सवलती आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत उपलब्ध करून देऊन त्यांच्या प्रगतीच्या वाटा मोकळ्या करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

ॲग्रो-इंडस्ट्रीजची घोषणा करून बहुजन-समाजाच्या संपत्तींत तर त्यांनी भर घातलीच, पण पर्यायाने त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक विकासास मोठी गति दिली. सहकारी क्षेत्रास त्यांनी दिलेल्या उठावामुळे पश्चिम महाराष्ट्राच्या किती तरी भागाचें आज नंदनवन झालेलें दिसतें. प्रगतिशील शेतकरी, सहकार-महर्षि, साखर-कारखानदार या साऱ्या नामाभिधानांचें श्रेय केवळ यशवंतरावांच्या दूरदृष्टींत आहे. यशवंतराव हे एकच असे नेते असतील की, साऱ्या जाति-जमातींचे लोक त्यांना मानतात – त्यांच्याबद्दल प्रेम बाळगतात.

कै. तात्यासाहेब केळकर यांनी एका व्याख्यानांत सांगितल्याप्रमाणे कीर्ति ही समुद्राच्या लाटांसारखी आहे. एका लाटेंतून दुसरी उठते, दुसरींतून तिसरी उठते व पसरत जाते. महाराष्ट्रांत यशवंतरावांच्या कर्तृत्वाची उठलेली लाट पुढे हळूहळू देशांत पसरत गेली. पण या साऱ्या राजकीय जीवनांत एक सुसंगतपणा कायम राहिला. शक्ति-युक्तीचा वापर लोकहितासाठी करण्याचें ध्येय कायम राहिलें. पुरोगामित्वाच्या आकर्षणापायी लोकसंग्रह सुटला नाही. राजकारण आणि टीका जुळ्या बहिणी होत. निंदकाचे घर राजकीय नेत्याच्या पाठीशीं असतें. यशवंतरावहि त्यांतून मुक्त नाहीत. परंतु स्थिर व सम्यक्‌बुद्धीचा माणूस शेवटीं हेंच म्हणेल की, या नेत्याने आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्र-समाजास एकात्म व प्रगत बनविण्याचा सतत प्रयत्न केला. त्यांची ही देणगी इतिहासाच्या सोनेरी पानावर नोंदली गेली आहे.

यासाठीच मित्रवर्य श्री. रामभाऊ जोशी यांचा हा ग्रंथ आम्ही महाराष्ट्रांतील भावी पिढीसाठी प्रसिद्ध करीत आहों.

पुणें
दि. ३१ मे १९७६

ज. श्री. टिळक

# पुरस्कार

ज्यांच्या जीवनाचा शोध घ्यावा, महत्ता अजमावण्याचा प्रयत्न करावा अशा, आधुनिक भारतांत निरनिराळ्या प्रदेशांत राष्ट्रीय जीवनांत वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालेल्या, अनेक व्यक्ति आहेत; त्यांपैकी कांही थोड्या व्यक्ति अशा आहेत की, त्यांच्या जीवनांत वर्तमान युगाचा गर्भितार्थ सूचित होतो; वर्तमान युगाच्या प्रेरणा, ध्येयवाद, स्थित्यंतरें आणि महत्त्वाच्या घडामोडी यांचा ध्वन्यर्थ उमटलेला असतो; अशा थोड्या व्यक्तींपैकीच यशवंतराव चव्हाण हे होत.

भारताचीं गेलीं दीडशें-दोनशे वर्षें हें एक महत्त्वाचें युग आहे. पूर्वीच्या अनेक शतकांच्या किंवा सहस्रकांच्या इतिहासापेक्षा भारतांत संपूर्णपणें वेगळ्या युगाचा उदय या दीडशे-दोनशे वर्षांत झालेला आहे. अस्तित्व किंवा जीवन हें नित्य परिवर्तनशील असतें. जग म्हणजे नित्य बदलणारें अस्तित्व. एका घटनेपाठीमागून दुसरी घटना होत जाणें, हेंच जीवनाचें स्वरूप असतें. ही गोष्ट वैयक्तिक जीवनाप्रमाणे सामाजिक वा राष्ट्रीय जीवनालाहि लागू आहे; परंतु एका घटनेपाठीमागून दुसरी घटना होणें म्हणजे इतिहास नव्हे. कांही विशिष्ट घटना किंवा विशिष्ट घटनांच्या मालिकाच इतिहास या संज्ञेस प्राप्त होतात. कांही घटना ऐतिहासिक महत्त्वाच्या असतात, कांही नसतात. समाजांत किंवा राष्ट्रांत गुणात्मक, अर्थपूर्ण वैशिष्ट्ययुक्त होणारा बदल म्हणजेच इतिहास होय. इतिहास घडतो, असें जे म्हणतात, तो अशा घटनांच्या मालिकांमुळेच.

या दृष्टीने या चरित्रविषयक पुस्तकाचे अभिधान ' यशवंतराव – इतिहासाचें एक पान ' हें अत्यंत अर्थपूर्ण आहे, असें म्हणतां येतें. मात्र एक पान की अनेक पानें, हें भावी इतिहासच ठरवील. सर्वांगीण ऐतिहासिक परिवर्तनें हीं भारताच्या या दीडशे-दोनशे वर्षांच्या नव्या युगाचा गाभा आहे. त्यामुळेच हा कालखंड युग या संज्ञेसच प्राप्त होतो. निराळेंच युगचैतन्य यांत क्रमाक्रमाने प्रगट होऊं लागलें आहे. हें युगचैतन्य चव्हाणांच्या जीवनयात्रेंत प्रतिबिंबित झालेलें दिसतें. हें प्रतिबिंब म्हणजे अत्यंत स्वच्छ बिलोरी आरशांतील परावर्तित झालेला प्रकाश आहे. हें केवळ प्रतिबिंब नाही. त्यांत कारकशक्तीहि आहे. प्रकाश, बिंब की प्रतिबिंब, कसाहि असो, त्यांत कारकशक्ति असते.

सामाजिक वा राष्ट्रीय जीवनांत नेहमींच कांही तरी अत्यंत मूलगामी समस्या निर्माण झालेल्या असतात. जेव्हा अशा समस्या सोडविण्याचा प्रयत्न शिथिल होतो, मंद होतो किंवा प्रयत्नच होत नसतो, तेव्हा समाज किंवा राष्ट्र हें अगतिकतेच्या पाशांत बद्ध होऊन कुंठित स्थितींत अडकून पडलेलें असतें. भारताचा इतिहास पाहिला तर, अशी कुंठित अवस्था अनेक शतकें आणि अनेक युगें चालली होती. गतानुगतिक परंपरेंत अवरुद्ध होऊन भारत व भारताची संस्कृति पडली होती. रवींद्रनाथ टागोर यांनी म्हटल्याप्रमाणे निर्विकल्प योगसमाधींत गढलेला अस्थिपंजरावशेष असा हा योगी होता. या योग्याच्या योगनिद्रेचा भंग नवयौवनसंपन्न अशा पश्चिमी

संस्कृतीच्या गोऱ्या, बूट घातलेल्या पुरुषाने एका लाथेच्या तडाख्याने केला. कठीण समस्यांचें पाश योग्याला एकदम डोळे उघडल्याबरोबर दिसले. अशा समस्या सोडविण्याकरिता हा योगी उभा राहून कटिबद्ध झाला. समस्या सोडविण्यानेच किंवा समस्यांचा मुकाबला केल्यानेच इतिहास घडूं लागतो. राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक अनवस्था व दुरवस्था यांचें खरेखुरें, विषादकारक व निराशजनक चित्र हें भारतीय ग्रामीण जीवनामध्ये अधिक खोल व स्पष्ट दिसत होतें. ग्रामीण जीवन खुरटलेलें; त्यांतील माणसांची मनें जन्मभर मुकुलित स्थितींत कायम राहिलेलीं, इतिहास घडत नव्हता म्हणून विकासाचा स्पर्श कोठेहि नव्हता; अशाच ग्रामीण जीवनांत श्री. यशवंतराव चव्हाण यांचें कुटुंब पिढ्यान् पिढ्या कठीण जीवन कंठीत होतें.

समस्यांचें आव्हान स्वीकारणें व त्या समस्या सोडविणें यांचा अव्याहत क्रम म्हणजेच जीवनविकास होय. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनामध्ये जन्मापासून एकापाठीमागून एक अशा कठीण समस्यांची मालिका लागलेली दिसते व त्या समस्यांचे बंध सुटण्याचीहि मालिका सापडते. प्रस्तुक पुस्तकांत लेखकमहाशयांनी यशवंतरावांच्या जन्माची कथा दिली आहे. यशवंतरावांच्या मातुश्री विठाबाई यांच्या जीवनमरणाचा झगडा म्हणजेच यशवंतरावांच्या जन्माची कथा होय. विठोबाईची सुटका लवकर झाली नाही. कारण माहीत नाही. माझा कयास असा; बालकाचें डोकें फार मोठें होतें. हें असें मोठें डोकेंच मातेच्या व स्वतःच्या जिवाला कित्येकदा जन्मकाळीं धोका पोंचवितें. त्या धोक्यांतून योगायोगाने सुटका झाली. हें डोकें मोठें असल्यामुळेच आतापर्यंतच्या विलक्षण कठीण समस्यांचा मुकाबला यशवंतराव करूं शकले. दुसरी मोठी समस्या; ती म्हणजे साठ वर्षांपूर्वीच्या नागरी जीवनापासून दुरावलेलें यशवंतरावांचें जन्मगाव होय. कै. बळवंतराव यांना परिस्थितीने नागरी जीवनाचा आश्रय अपरिहार्य रीतीने करावा लागला. कराड येथे बेलिफाची नोकरी कै. बळवंतरावांनी पतकरली. अगणित ग्रामीण व्यक्तींना खेडें सोडून शहरांत पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता यावें लागतें; परंतु नागरी संस्कृतीचा लाभ बहुधा घेतां येत नाही. आधुनिक नागरीक संस्कृतीचा वरदहस्त प्राप्त झाला म्हणजे जीवनविकासाच्या वाटा दिसूं लागतात. भारतीय ग्रामीण जीवनाला नागर बनविणें, संपूर्णपणें नागरी संस्कृतीचा लाभ करून देणें, हें स्वतंत्र भारताचें एक उच्च उद्दिष्ट होय. हें केल्यानेच आधुनिक भारत आधुनिक विकसित राष्ट्रांच्या मालिकेंत विराजमान होऊं शकेल. त्याचें मर्यादित स्वरूपांतील प्रत्यंतर श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या आयुष्यक्रमांत मिळतें. आधुनिक इंग्रजी शिक्षणाचा लाभ यशवंतरावांना त्यांच्या बंधूंच्या – कै. गणपतरावांच्या आधुनिक जीवनदृष्टीमुळे झाला. हें मात्र योगायोगाने घडलें नाही. त्यांचे बंधू ज्योतिराव फुल्यांच्या सामाजिक क्रांतीच्या ध्येयवादाने भारले होते. त्यांच्या बंधूंना नव्या इंग्रजी शिक्षणाचें रहस्य उमगलें होतें. अठरा विश्वें दारिद्र्याने कुटुंब जर्जर झालेलें असतांनाहि यशवंतरावांच्या बंधूंनी यशवंतरावांना नव्या शिक्षणाचा मार्ग दाखविला. यशवंतरावांनीहि या उपकाराची फेड नंतर मोठ्या कृतज्ञतेने केली.

ग्रामीण जीवनाला त्या वेळीं अस्पष्ट अशी आत्मसंवेदना प्राप्त होऊं लागली होती. मोठा सामाजिक परिवर्तनाचा आदेश सत्यशोधक समाजाच्या दणदणीत प्रचाराने महाराष्ट्राच्या ग्रामीण जगांत दुमदुमूं लागला होता. पुणें, सातारा, कोल्हापूर या जिल्ह्यांमधील ग्रामीण जीवनामध्ये या प्रचाराला प्रखर स्वरूप प्रांप्त झालें होतें. सामाजिक विषमतेपेक्षा राजकीय पारतंत्र्याच्या विरुद्ध उत्पन्न झालेली आंदोलनेंहि येथील लहान-मोठ्या नगरांना वेढून ग्रामीण भागामध्येहि पसरत होतीं. वैचारिक द्वंद्वें आणि वैचारिक संघर्ष यांचे पडसाद वारंवार उमटत होते. त्यांचाहि परिणाम यशवंतराव चव्हाण यांच्या तरल व प्रत्ययशील बुद्धीवर होत होता. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली या देशांत परकीय पारतंत्र्याविरुद्ध तीन मोठीं देशव्यापी वादळें दहा-बारा वर्षांच्या अंतरांनी निर्माण झालीं. शेवटच्या वादळाचें फळ ब्रिटिश साम्राज्यशाहीचा अंत ! पहिलें वादळ असहकारितेचें; ते १९२२-२३ च्या सुमारास शांत झालें. १९३० सालीं दुसरें अधिक मोठें सविनय कायदेभंगाच्या आंदोलनाचें वादळ उठलें. त्यांनी देश व्यापला. वादळी शक्तीमध्ये श्री. यशवंतराव चव्हाण सामील झाले. त्या वेळीं ते यौवनाच्या पहिल्या उन्मेषांत होते. भारतीय राष्ट्रवाद त्यांच्या जीवनाचा कायमचा मार्गदर्शक तेव्हाच ठरला. मनाचीं कवाडें खुलीं ठेवल्यामुळे इकडे विद्यालयीन पुस्तकी शिक्षण चालू असतांनाच भोवतालचें राष्ट्रीय जीवन आणि जागतिक उलाढाली यांचेहि पडसाद त्यांच्या बुद्धींत उमटूं लागले. भोवतालची वैचारिक आंदोलनेंहि त्यांच्या बुद्धीला शिकवत होतीं; असें फार थोड्यांच्या बाबतींत घडतें. १९३० ते १९४५ या कालखंडांतील भारत म्हणजे यशवंतरावांचें वाच्यार्थानें विश्वविद्यालयच बनलें. अभ्यासाने त्यांची बुद्धि व विचार संपन्न व समर्थ बनले. लो. टिळक, म. गांधी, पंडित नेहरू, एम्. एन्. रॉय इत्यादिकांचे परिशीलन त्यांनी मोठ्या आस्थेने केलें. त्याबरोबरच पश्चिमेकडील क्रांत्यांच्या मुळाशी असलेली सिद्धान्तसरणीहि तुलनात्मक रीतीने अभ्यासली. प्रत्यक्ष राजकीय आंदोलनांत भाग घेतल्यामुळे पुस्तकी अध्ययनाला मर्यादा पडल्या; परंतु भारतीय वस्तुस्थिति, राजकीय वा सामाजिक वस्तुस्थिति आणि ध्येयवादी तत्त्वज्ञानें यांच्या तुलनात्मक परिशीलनांतून वस्तुवादी दृष्टिकोण प्राप्त झाला. तत्त्वांशीं तडजोड करणें प्राप्त झालें तरी, ध्येयवादाच्या प्रकाशापासून हा वस्तुवाद दूर, बाजूला विशेष पडणार नाही, याचीहि काळजी त्यांनी घेण्याचा प्रयत्न चालविला असें दिसतें. स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनांत त्यांनी निष्ठेने जें अनुयायित्व पत्करलें, त्यातच त्यांच्या नेतृत्वाचें बीज रोवलें गेलें. या आंदोलनांत विचारांबरोबर वक्तृत्वाची कलाहि त्यांना संपादन करतां आली. त्यांची भाषणशैली अगदी अलग आहे. तिचें एक खास वैशिष्ट्य आहे. मातेचें वात्सल्य त्यांना जसें दीर्घकाल लाभलें, माता अपार कष्ट सोसत आहे व अपार मायाहि करीत आहे, हें जसें त्यांनी अनुभवलें, तसेंच सामान्य जनता अपार कष्ट सोसत आहे, त्याप्रमाणे अथांग प्रेमहि करीत आहे, हेंहि त्यांनी अनुभविलें. त्यांच्या वक्तृत्वकलेला या जनतेच्या प्रेमाने अगदी वेगळा असा आकृतिबंध दिला. आपल्या माणसांशीं आपण तन्मय होतों,

आपलें हृद्गत सांगतों, हितगुज बोलतों, भावुकतेने आत्मनिवेदन करतों; अशा प्रकारचें त्यांचें वक्तृत्व असतें, जिव्हाळ्याच्या आप्तेष्टांशीं बोलणाऱ्याची रीति त्यांत असते. जनतेपेक्षा वेगळा असलेला, जनतेच्या उद्धाराचा बाणा बाळगणारा, तडफदार वक्ता म्हणजे यशवंतराव नव्हे. त्यांना फड जिंकायचा नसतो; जनतेला मोहिनी टाकून कोठे तरी वाहवत न्यावयाचें नसतें; जनतेची फसवणूक करून जनतेला नादी लावावयाचें नसतें. फड जिंकूं पाहणारा व मोहिनी टाकणारा वक्ता लोकशाहीची निष्ठा अखंड ठेवूं शकत नाही; यशवंतरावांना लोकशाहीची जोपासना करावयाची आहे, त्यामुळे त्यांची वक्तृत्वकल्पनाहि निराळ्या प्रकारची झाली आहे. त्यांना पक्कें माहीत आहे की, लोकशाहीचा नेता लोकशिक्षक असावा लागतो. या लोकशिक्षकाची मुख्य जबाबदारी म्हणजे लोकांना विचार देऊन मार्गदर्शन करणें होय.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळांत थोड्याच अवधींत त्यांना नेतृत्वहि लाभलें. नेतृत्वांतून सत्ताहि त्यांच्याकडे चालून आली. संयुक्त महाराष्ट्राची प्रचंड चळवळ म्हणजे महान् दिव्यच होतें. जनक्षोभाच्या दाहक ज्वाळा आकाशाला भिडत होत्या. भाषिक राज्य न दिलेल्या भाषिक प्रदेशांतील जनता, विरुद्ध भारतीय काँग्रेसची केंद्रवर्ती सत्ता असा तो विलक्षण संग्राम होता. त्यांत यशवंतरावांसारख्या भाषिक प्रांतवादी काँग्रेस-पक्षीय व्यक्तींना अंतर्विरोधामुळे विलक्षण मानसिक यातना सोसाव्या लागल्या. हा भाषिक प्रांतवाद विरुद्ध केंद्रसत्ता यांचा विग्रह या पुस्तकांत विस्तारानें व तपशीलवार रीतीने मांडलेला आहे. हा विस्तार व तपशील कांही बाबतींत अपुरा असला व मतभेदाचा विषय होण्याची शक्यता असली, तरी त्यांत वर्णिलेलें स्वतः यशवंतरावांचें स्थान काय होतें, याबद्दल फारसा वाद होण्याचें कारण नाही. खवळलेल्या समुद्रांत सापडलेल्या प्रचंड नौकेसारखी महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसची अवस्था झाली होती. या दुस्तर स्थितींतून उलट्यासुलट्या मार्गांनी श्री. यशवंतरावांनी महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसला वादळांतून सुरक्षित स्थानीं नेऊन पोंचविलें. त्यांतच त्यांचें नेतृत्व पणास लागलें व अखेरीस स्थिरहि झालें.

व्यक्ति मोठ्या सत्तेवरून उतरली की ती जनमानसांतूनहि बहुधाउतरते व बहुशः थोड्या अवधींत विस्मृतिपथांतहि जाते. यशवंतराव चव्हाण १९६२ सालीं महाराष्ट्र प्रदेश राज्याची धुरा आपल्या खांद्यावरून खाली ठेवून, केंद्रसत्तेंत गेले. तेव्हाच एका अर्थी ते सत्तास्थानावरून खाली उतरले; परंतु सत्तेवरून उतरले तें अधिक उच्च कर्तव्याच्या हाकेमुळे! केंद्रसत्तेंतील एकमेव अद्वितीय नेते कै. पंडित जवाहरलाल नेहरू, त्यांचे सहकारी मंत्री आणि लोकसभेचे व राज्यसभेचे भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांतून निर्वाचित होऊन आलेले सदस्य यांनी भारत-चीन संग्राम-प्रसंगीं त्यांना हाक दिली. हा एक विलक्षण, राष्ट्रीय निष्ठेची कसोटी पाहणारा क्षण होता. महाराष्ट्रांतील जनतेला यशवंतरावांचें प्रादेशिक नेतृत्व, लोभनीय व अमोल वाटत होतें. फार मोठ्या आशा-आकांक्षा यशवंतरावांमुळेच सफल होतील अशी बळकट श्रद्धा महाराष्ट्रीय जनतेच्या ठिकाणीं त्या वेळीं होती. अशाच वेळीं यशवंतरावांनी ती विलक्षण

मोहिनी बाजूस सारून अलिप्तपणें, अनासक्तीने केंद्रसत्तेच्या आवाहनाबरोबर क्षणाचाहि विलंब न करतां, मागे न पाहतां दिल्लीस प्रयाण केलें. प्रदेशाचे मुख्य मंत्री व केंद्राचे प्रधान मंत्री हीच खरीखुरी सत्तास्थानें होत. म्हणूनच असें म्हणतां येतें की, कर्तव्याच्या हाकेसरशी त्यांनी सत्तेकडे पाठ फिरवली; परंतु महाराष्ट्रांतील जनमनांत त्यांची प्रतिमा जी रुजली ती कायम. आता सोळा वर्षें झालीं, तरी महाराष्ट्राच्या अंतरंगांत ती प्रतिमा सतत उज्ज्वल राहिली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत महाराष्ट्रांतील राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, साहित्यिक इत्यादि सर्व क्षेत्रांतील मोठमोठ्या व्यक्ति मोठ्या संख्येने संयुक्त महाराष्ट्र समितीच्या परिवारांत सामील झाल्या होत्या. ते सगळे यशवंतरावांच्या विरोधी होते; परंतु ते मोठमोठे विरोधी लोक, राजकीय कार्यकर्ते, विद्यापीठीय प्रशासक, प्राचार्य, प्राध्यापक, साहित्यकार, कलाकार, पत्रकार आज यशवंतरावांचे मित्र व सुहृद बनलेले दिसतात. महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत आज यशवंतरावांना अजातशत्रुपद प्राप्त झालें आहे; याचें निदर्शन कराड येथील गतवर्षी भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य-संमेलनांत मिळालें. त्या वेळीं यशवंतरावांचें मन साहित्यकारांतील व पत्रकारांतील अस्वस्थता व क्षोभ पाहून चिंताग्रस्त झालें होतें; परंतु संमेलनांतील स्वागताध्यक्षीय अखेरच्या भाषणाने त्यांनी साहित्यकारांचा आणि पत्रकारांचा एकदम विश्वास संपादन केला. पेंचप्रसंग व शृंगापत्ति यांमधून त्यांना या वेळींहि वाट सापडली.

आंतरराष्ट्रीय राजकारणांत मोठमोठ्या विकसित किंवा विकसनशील राष्ट्रांमधील अग्रेसर व्यक्तींना श्री. यशवंतराव चव्हाण यांचें सात्त्विक व गंभीर व्यक्तिमत्त्व ताबडतोब पटतें. संरक्षण, अर्थ व विदेश-व्यवहार या विषयांत मंत्रिपदावरून आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्य करतांना जगांतील मुत्सद्दी, राजकीय प्रज्ञावंत, अर्थशास्त्रज्ञ, राजकीय सत्ताधारी इत्यादिकांमध्ये त्यांचें व्यक्तिमत्त्व खुलून दिसतें. त्यांच्यांतील समतोल विचारवंत व व्यवहारी प्रज्ञावंत झळकल्याशिवाय राहत नाही.

या ग्रंथाचे लेखक श्री. रामभाऊ जोशी यांनी या चरित्र-ग्रंथामध्ये यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाचा फार मोठा सविस्तर परामर्श घेतला आहे. ग्रंथासाठी त्यांनी फार परिश्रमपूर्वक माहिती जमा केलेली आहे. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीने या माहितीचा वर्तमान महाराष्ट्राच्या इतिहासकाराला फार मोठा उपयोग होईल यांत शंका नाही. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनाचा हा जो सविस्तर परामर्श आहे तो वर्तमान महाराष्ट्राच्या इतिहासाचाच केंद्रीभूत भाग आहे. अशा या चरित्र-लेखनाबद्दल माझे मित्र श्री. रामभाऊ जोशी यांना मी मनःपूर्वक धन्यवाद देतों.

मराठी वाचक या ग्रंथाचा आदरच करतील असा मला विश्वास आहे.

वाई
अक्षय्यतृतीया, शके १८९८ लक्ष्मणशास्त्री जोशी
दि. २ मे १९७६

# शकुनाचा श्रीकार

भारतीय गणराज्याचे सुविख्यात परराष्ट्रमंत्री माननीय श्री. यशवंतरावजी चव्हाण हे एक असाधारण व्यक्तिमत्त्व आहे. महाराष्ट्रांतील एका आडवळणी खेड्यांत त्यांचा जन्म झाला. त्यांचे जन्मदातेहि कुणी नामांकित नव्हते. भारतांतले करोडो शेतकरी अज्ञान आणि दारिद्र्य यांच्या संगतींत काळ कंठीत होते, त्यांतीलच तेहि एक.

बालवयांत श्री. यशवंतरावांना कुणी द्रष्टा मार्गदर्शक लाभला आणि त्याने त्यांचा आजच्या पदापर्यंतचा मार्ग अचूकपणें आखून दिला असेंहि नाही.

यशवंतराव अंगच्या वाढीने वाढले. देशकाल-परिस्थिति घडवील तसे ते घडले गेले. स्वतःच्या पायांनी चालू लागले. मागे उमटलेल्या पदचिन्हांच्या पाऊलवाटा झाल्या. त्यांच्या चालणाऱ्या पायांतूनच जणू त्या वाटांचे उगम झाले. त्या अनुसरत चालणारे असंख्य अनुयायी त्यांना लाभले. यशवंतरावांना नेतेपणाचा लाभ झाला. तें नेतृत्वहि त्यांनी निभविलें, पेललें. आपला तोल जाऊं दिला नाही. अनुयायांना अनुचित दिशा दाखविली नाहीं. आपणाहून मोठे मानले. त्यांना अडचणींत आणलें नाही.

वैयक्तिक संधि आणि सन्मान त्यांच्याकडे चालतच आले. हव्यास त्यांना करावाच लागला नाही. महाराष्ट्रासारख्या प्रगमनशील राज्याचा मुख्य मंत्री म्हणून त्यांनी कामगिरी केली. खरोखरीच एका कल्याणकारी लोकराज्याचा पाया त्यांनी भरभक्कम केला.

एका लहानशा खेड्यांत जन्मलेला हा एका श्रमिकाचा मुलगा. या खंडतुल्य देशाचा संरक्षणमंत्री झाला. गृहमंत्री म्हणून गाजला. अर्थमंत्री म्हणून वाखाणला गेला. आज परराष्ट्रमंत्री म्हणून यशस्वीपणें वावरतो आहे, ही सारी नवलकथाच आहे. त्यांच्या चरित्रांतील ओळी ओळी वाचतांना, वाचक आपली एकाग्रता रतिमात्र ढळूं देणार नाहीत हें निश्चित.

त्या मानाने, यशवंतरावांविषयी त्यांच्या मायबोलींतहि फार थोडें लिहिलें गेलें आहे. अन्य भाषांविषयी मला नेमकें माहीत नाही; पण इंग्रजी-मराठींत तरी त्यांच्याविषयी प्रकाशनें झालीं ती फार थोडीं. कृ. भा. बाबर, बाबूराव काळे, द्वा. भ. कर्णिक, शहा, टी. व्ही. कुन्ही कृष्णन् अशा अगदी थोड्या लेखकांनी त्यांच्याविषयी थोडेंफार लिहिलें. कोणी एका विशिष्ट घटनेशीं येऊन विसावलें. कोणी एखादा विशिष्ट कालखंडच वर्ज्य मानला. त्यांचें समग्र चरित्र असें कधी वाचकांसमोर आलेंच नाही.

त्यांचें स्वतःचें आत्मपर लिखाण सीमेचें रसाळ उतरतें; पण समग्र आत्मचरित्र लिहिण्याइतका अवसर त्यांना मिळणार केव्हा? अद्यापपर्यंत तरी त्यांना तो मिळालेला नाही.

तो मिळेल तेव्हा मिळो. सांप्रत माझे मित्र श्री. रामभाऊ जोशी यांनी त्यांच्या चरित्र-लेखनाचे काम नेटकेंपणे बजावलें आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद दिले पाहिजेत.

– इतिहासाचें एक पान । अकरा

श्री. रामभाऊ जोशी व्यवसायाने पत्रकार. वार्ता लिहिणें आणि ग्रंथ लिहिणें यांत केवढी तफावत; पण रामभाऊंनी या एकाच ग्रंथाच्या लेखनाने आपलें नांव ग्रंथ-कारांच्या ओळींत ओवून दिलें आहे.

चिठ्ठ्या-चपाट्या तपासून, भेटी-मुलाखती यांचा खटाटोप करून, संदर्भांच्या भरोशांवर लिहिलेलें चरित्र आणि प्रस्तुत चरित्र यांत अंतर आहे.

पहिली गोष्ट, चरित्र-लेखक हा चरित्रनायकाचा चिरपरिचित आहे, निकटवर्ती आहे. नायकाविषयी त्याच्या मनीं-मानसीं जवळिक आहे, जिव्हाळा आहे, जिज्ञासाहि आहे. कुणालाच ज्ञात नसलेल्या गोष्टी हा चरित्रकार त्याच बळावर मिळवूं शकला आहे. या ग्रंथांत त्या सम्मीलित करूं शकला आहे.

कथनाला आरंभ करतांनाच रामभाऊंनी एखाद्या कादंबरीकाराच्या शैलीने सागरेश्वर-देवराष्ट्र याचा परिसर वाचकांसमोर उभा केला आहे.

यशवंतरावांचें बाल्य, पोरकेंपण, मातुःश्री, भावंडें यांच्या प्रेमाची पाखर इत्यादीं-विषयी लिहीत लिहीत त्यांनी देशकाल-परिस्थितीचा विशाल फलक चित्रित केला आहे. त्यांतले कुठचे रंग यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वांत मिसळले, त्याचा मागोवा घेतला आहे. हळूहळू त्यांनी ' नवोदित नेतृत्व ' या स्वरूपांत यशवंतरावांच्या मुद्रेचें समीप-दृश्य साकार केलें आहे. कथनाचा प्रवाह मुळीच न अडवितां, आपलें स्वतःचें भाष्य करण्याची संधीहि त्यांनी सोडलेली नाही.

देवराष्ट्र येथील मामाचें घर, मुंबईचा मुख्य मंत्री-निवास 'सह्याद्रि' आणि दिल्ली येथील १ रेसकोर्स रोड हा बंगला, या तीन वास्तूंना जोडणारें यशवंतरावांचें आयुष्य त्यांनी सम्यक् पद्धतीने चितारलें आहे. सारे बारकावे टिपून रंगविलें आहे.

राजकारणांत वेळोवेळीं त्यांनी घेतलेले पवित्रे, मांडलेले विचार आणि प्रत्यक्षांत आणलेली कार्यवाही या सर्वांचा समाचार घेतांनाहि लेखकाने कोठेहि आपल्या कथन-शक्तीचा पान्हा चोरलेला नाही.

'व्यक्तिदर्शना'च्या निमित्ताने त्यांनी लिहिलेलीं पन्नासएक पानें तर वाचकाला बांधून ठेवतील. त्यांच्या पापण्यांच्या कडा ओल्या करून सोडतील.

यशवंतराव या व्यक्तीचें दर्शन ते समग्रपणें घडवितातच, पण त्यांच्या परिवारांतील कांही जवळचीं व्यक्तिचित्रें रंगवितांनाहि त्यांच्या लेखणीला कुंचल्याचें सामर्थ्य येतें. शब्दांना आकार साधतात. रंग भरणें जमून जातें.

यशवंतरावांच्या मातुःश्री तीर्थस्वरूप अक्का हें एक असेंच थोर अलौकिक आणि विलोभनीय व्यक्तिचित्र. यशवंतरावांच्या पोरक्या बालपणांतील त्या अज्ञान स्त्रीची जयशालिनी जिद्द, आणि पुढे यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्य मंत्री झाल्यावर, राज्य-पालांना दिलेली अघेली ... मनाला वेडें करून टाकतें अक्कांचें हें शब्दचित्र. अक्कांसारखेंच आणखी एक अनोळी रंगाचें व्यक्तिचित्र वेणूताई.

परीक्षण-कर्त्याला गवसणार नाही, पण वाचकाला मंत्रमुग्ध करून टाकील असें हें एका सुगृहिणीचें चित्र श्री. रामभाऊ यांनी फारच समर्थपणें उभें केलें आहे.

मा. यशवंतरावांचे एक बंधु गणपतराव. मोठा जिद्दीचा माणूस. यशवंतरावांच्या जडण-घडणींत त्यांचा हिस्सा मोठा. हें व्यक्तिचित्र प्रकाशांत आणून श्री. रामभाऊंनी बरंच कांही साधलंय.

पहिल्यांदा टायपिस्ट म्हणून सेवेला आलेले श्री. डोंगरे पुढें यशवंतरावांचे अत्यंत आवडते स्वीय सचिव होतात. एवढेच नव्हे तर, 'ते मला सख्या भावाहून अधिक आहेत' असे भावपूर्ण उद्‌गार स्वतः यशवंतरावच त्यांच्याविषयी काढतात, ती सारी हकीगतहि वाचनीय आहे.

यशवंतरावांचा दिल्लींतील दैनंदिन कार्यक्रम, त्यांचे दिल्लींतील घर आणि त्यांना येणारीं पत्रें ... माहिती अगदी खास आहे. त्यांतील काव्योपहार – ही सारी माहिती नवी आहे. आगळी वेगळी आहे.

माझें हें लिहिणें ना प्रस्तावना ना परीक्षण अशा जातींतले आहे. हा केवळ शकुनाचा एक श्रीकार. रामभाऊंसारखाच मीहि यशवंतरावांचा एक चहाता. ते भारताचे परराष्ट्रमंत्री आहेत. मी कोणीच नाही. त्यांचे-माझे बाल्य एका परिसरांत गेलें. देवराष्ट्र-सागरेश्वर-कुंडल. सागरेश्वरांतील तीन महादेव चुकून कुंडलला आले आहेत. त्यांचीं तीन देवळें कुंडलमध्ये आहेत. त्या कुंडलमध्ये मी शिकलों, वागडलों. रामभाऊ जोशीहि साताऱ्याचे. यशवंतरावांच्या स्नेहाचा लाभ हे त्यांचेंहि भाग्य.

एका पत्रकार स्नेह्याने, परिश्रमपूर्वक सिद्ध केलेलें हें एका थोर मित्राचें चरित्र – त्या दोघांविषयी मनःपूर्वक प्रेम बाळगणारा मी एक वाचक. एवढाच माझा अधिकार.

मा. यशवंतरावांच्या कार्याविषयी, जीवनाविषयी, विचारांविषयी आणखी किती तरी ग्रंथ प्रसिद्ध होतील. होणें अपरिहार्यच आहे.

एक खरे की, यापुढे कुणालाहि 'यशवंतराव चव्हाण' यांच्याविषयी लिहायचें असेल तर, त्याला 'रामजोशीयाते वाट पुसितु'च प्रस्थान ठेवलें पाहिजे. फार काय, स्वतः यशवंतरावांना आत्मचरित्र लिहावेसें वाटलें तरी, त्यांना हें 'इतिहासाचें एक पान' आधी नजरेखाली घालावें लागेल.

'पंचवटी'
मुंबई रस्ता, पुणें ३ — ग. दि. माडगूळकर
दि. २५ मे १९७६

# कृ त ज्ञ ता

संकल्प करत रहाणं हा मनुष्याचा स्वभाव असतो. मीहि असाच एक संकल्प केला. दहा-पंधरा वर्षे झालीं. परंतु तो संकल्प तसाच राहिला होता. श्री. यशवंतराव चव्हाण यांचं चरित्र लिहावं असा तो संकल्प होता.

त्यांचा-माझा परिचय तसा जुना; परंतु यशवंतरावांची धांवपळ आणि माझा तो संकल्प यांची गाठ-भेट घडणं मुष्किल ठरलं. मुलाखतीसाठी, लेखांसाठी मी त्यांना भेटत होतों, चर्चा करत होतों, त्यांचं व्यक्तिमत्त्व, विचार, तत्त्वज्ञान समजून घेण्याची तपश्चर्या सुरू होती. तरी पण संकल्प पूर्ण होत नव्हता हें मात्र खरं. एक तपाबरचा काळ असाच गेला. 'केसरी'चे संपादक व विश्वस्त श्री. जयंतराव टिळक हे त्यासंबंधी वारंवार स्मरण करून देत होते. तरी पण चरित्र लिहायचं तर यशवंतरावांचं बहुरंगी व्यक्तिमत्त्व शब्दांच्या संपुटांत साठवणं बरंच बिकट कार्य आहे, असं मला एकसारखं वाटत होतं. वर्षे उलटत चाललीं तसं तें अधिक बिकट वाटूं लागलं. कारण दिवसेंदिवस त्यांचं व्यक्तिमत्त्व फुलत होतं, माझ्या विचारावर पुटं चढत होतीं, भाव-भावनेचे वळसे वाढत होते. चरित्र लिहिण्याचे विचार मात्र प्रखर बनत होते.

चरित्र-लेखन लांबणीवर पडत होतं याचं एक कारण होतं. चरित्र लिहितांना मला जबाबदारीची जाणीव ठेवावी लागणार होती. या जबाबदारीच्या कसोटीला उतरायचं, तर आपला अभ्यास, अवलोकन, चिंतन पुरं व्हायचंय् याची मनांत रुखरुख होती. चरित्र लिहिण्याची कल्पना, संकल्प हें सारं मनांत ठेवून मी वावरत होतों; परंतु कधी तरी कल्पनेचीं पाखरं कागदावर स्थिर करावीं लागणारच होतीं. संकल्प-सिद्धीचा तो योग आज आला आहे.

यशवंतरावांचं चरित्र त्यांच्या हजारो चाहत्यांना सादर केल्यानंतरहि माझ्या मनांत कुठे तरी अतृप्ततेचा सल सलत आहे. कारण सागरांतील बर्फाच्या कड्याप्रमाणे त्यांच्या चरित्राचा हा व्यक्त भाग त्यांच्या चरित्राच्या अव्यक्त भागापेक्षा पुष्कळच अल्प आहे याची जाणीव मला आहे. तथापि प्रत्येकाच्या शक्तीला कांही मर्यादा या असतातच.

यशवंतरावांचा प्रदीर्घ सहवास योगायोगानं घडला, त्यांच्याशीं संवाद करतां आला, चरित्राची घडण न्याहाळतां आली आणि त्यांतूनच त्यांच्या चरित्राचीं हीं पानं रेखाटतां आलीं. यशवंतराव ही व्यक्ति इतिहासाचं एक पान आहे असं मानलं, तर मी लिहिलेलं त्यांचं हें चरित्र म्हणजे एक शब्द आहे, एवढं श्रेय जरी मला मिळालं तरी मी संतुष्ट आहे.

हा संकल्प पूर्ण करण्याच्या कामीं अनेक सुहृदांचं सहकार्य लाभलं. श्री. जयंतराव टिळक यांनी प्रेरणा दिली, संधि निर्माण करून दिली; साहित्यिक मित्रवर्य श्री. भा. द. खेर

आणि जुन्या पिढींतील प्रथितयश साहित्यिक श्री. द. र. ऊर्फ काकासाहेब कवठेकर यांनी मूळ हस्तलिखित वाचलं, उपयुक्त सूचना केल्या. श्री. खेर यांनी तर मुद्रितं तपासून ग्रंथ पुरा होईपर्यंत संगत राखली. केसरी-मराठा संस्थेनं हा ग्रंथ प्रकाशित केला. केसरीचे व्यवस्थापक श्री. ब. ल. वष्ट आणि चिटणीस श्री. शशिकांत राशिनकर यांनी प्रोत्साहन देऊन कामाला गति प्राप्त करून दिली. त्याचप्रमाणे श्री. भास्करराव कुलकर्णी यांचं साहाय्य आणि मुद्रणालयांतील या संबंधांतील मंडळींचंहि सहकार्य लाभलं. त्यामुळेच हा ग्रंथ अपेक्षित वेळेमध्ये पूर्ण करतां आला. चित्रकार श्री. अनंत सालकर यांनी मुखपृष्ठ व आंतील चित्रांची मांडणी केली. या ग्रंथासाठी दर्जेदार कागद उपलब्ध होण्याची आवश्यकता होती. सेंट्रल पल्प आणि पेपर मिल्चे श्री. बाबूराव पारखे यांनी तो कागद उपलब्ध करून दिला.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि कविराज श्री. ग. दि. माडगूळकर यांच्या-बद्दलची कृतज्ञता कोणत्या शब्दांत आणि कशी व्यक्त करावी! तर्कतीर्थांनी, गेल्या पन्नास वर्षांतलं राजकारण आणि ते करणाऱ्या व्यक्ति जवळून पाहिल्या आहेत, अभ्यासल्या आहेत. यशवंतराव, तर्कतीर्थ आणि माडगूळकर हे सर्व सातारा जिल्ह्यांतले. यशवंतरावांची जडण-घडण झाली त्या सर्व काळांतले ते जागरूक साक्षीदार आहेत. यशवंतरावांच्या चरित्राचं हस्तलिखित तर्कतीर्थांनी वाचावं आणि मार्गदर्शन करावं अशी अपेक्षा बाळगून मी त्यांच्या वाई येथील निवासस्थानी पोंचलों. तेव्हा चरित्र-ग्रंथ प्रसिद्ध करण्यास त्यांनी अनुमति तर प्रथमदर्शनींच दिली आणि हस्तलिखितांतील कांही भाग ऐकून उपयुक्त मार्गदर्शनहि केलं. त्यामुळे सुरुवातीच्या काळांत यशवंतराव जसे होते, जसे घडले आणि जसे वाढले, त्या क्रमानं चरित्र-ग्रंथाची सिद्धता करण्यास मला मोलाची मदत झाली; 'यशवंत'पासून 'यशवंतरावां'पर्यंतची क्रमानं मांडणी करतां आली. चरित्र-ग्रंथ सिद्ध झाल्यावर त्यांनी त्यासाठी पुरस्कार लिहून दिला आणि ग. दि. मा.नी 'शकुनाचा श्रीकार' देऊन कळस चढविला. या दोघा ज्येष्ठांनी मला निरंतरचं उपकृत केलं आहे.

माझे कुटुंबीय आणि यशवंतरावांचे स्वीय सचिव श्री. श्रीपाद डोंगरे यांच्या-बद्दल मला कृतज्ञतेचा उल्लेख आवर्जून केला पाहिजे. संकल्प-सिद्धींत यांचा फार मोलाचा वांटा आहे. वाचकांचा लोभ हा मी गृहीत धरलाच आहे. सत्यसंकल्पाचा दाता अखेरीस जनतारूपी परमेश्वरच आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

पुणें
दि. ४ जून १९७६

रामभाऊ जोशी
(रा. आ. जोशी)

कै. ती. अण्णा
कै. ती. सौ. ताई
तुमच्यासाठी
तुम्हालाच

— राम





श्री. यशवंतराव आणि सौ. वेणूताई

# १

सूर्यास्ताची वेळ. अजून कडूसं पडलं नव्हतं. सागरोबाच्या शिखरावर सूर्याचीं किरणं रेंगाळत होतीं. सागरोबाच्या मंदिरांतली घंटा मधून मधून घणाणत होती. शिरस्त्याप्रमाणे सायंकाळच्या दर्शनासाठी सागरोबाच्या – शंभुमहादेवाच्या मंदिरांत लोक यायचे. ' ॐ नमः शिवाय 'चा नाद अशा वेळीं मंदिराच्या गाभाऱ्यांतून दऱ्या-खोऱ्यांत पसरूं लागायचा. त्या लहरी मग गावापर्यंत पोंचत. गावाच्या पलीकडे झुळझुळणारा 'सोनहिरा' ओलांडून त्या लहरी पलीकडे जात. रानांत चरायला गेलेलीं जनावरं सोनहिराच्या वाळवंटांत हुंदडत असायचीं. गुराख्याच्या हातांतल्या काठीवरील घुंगरांचा आवाज ऐकला की मग वाळवंट सोडून गावांतल्या गोठ्याकडे जातांना रस्त्यावर त्यांची गर्दी होऊं लागे. अशाच एका संध्याकाळीं 'यशवंत' या बालकाचा देवराष्ट्र येथे जन्म झाला – १२ मार्च १९१४ या दिवशीं !

देवराष्ट्र हें पौराणिक काळांतलं ऋषि-मुनींचं गाव. सोनहिराच्या परिसरांत, सागरोबाच्या सान्निध्यांत असलेलं एक पवित्र स्थान. खानापूर तालुक्यांतलं हें गाव. गावच्या वायव्येस दोन मैलांवर महादेवाचीं मंदिरं. सर्वांत जुनं मंदिर समुद्रेश्वर-महादेवाचं. टेकड्यांमध्ये ऋषि-मुनींच्या गुहा. मंदिरालगतच, पिछाडीस समुद्रेश्वर नांवाचं तीर्थकुंड. यांतलं पाणी गुणकारी. सोरटी-सोमनाथाचा आणि समुद्रेश्वर-मंदिराचा संबंध पूर्वजांनी जोडलेला आहे. हिंगणदेवराजानं इथल्या गुहा बांधल्या असं इतिहास सांगतो. म्हसूर्णें किंवा हिंगणखाडींत याच राजानं विहिरी बांधल्या. राजाचं नांव गावाला देण्याची प्रथा जुनी. जवळच्या खेड्याला असंच 'हिंगणगड' नांव मिळालं. या राजाची राजधानी-कौंडिण्यपूर. पंतप्रतिनिधींचं 'कुंडल' तें हेंच.

देवराष्ट्र हें आजचं खेडेगाव. पण शके २७२ च्या सुमारास दक्षिणा-पथांतील – देवराष्ट्र – हा देश होता. शकपूर्व तिसऱ्या शतकापासून शकोत्तर तेराव्या शतका-पर्यंतच्या सोळाशे वर्षांतले शिलालेख, ताम्रपट उपलब्ध आहेत. नाणीं सापडलीं आहेत.

त्यांत देवराष्ट्र या देशाचा उल्लेख आहे. शके २७२ च्या (सन ३५०) अलाहाबाद यथील समुद्रगुप्ताच्या शिलालेखांतहि देवराष्ट्र देशाचा उल्लेख आहे. दक्षिणा-पथांतले अनेक राजे समुद्रगुप्तानं जिंकले. त्या देशांच्या नामावळींत देवराष्ट्र देशाचं नांव नमूद आहे. नागपूर तें म्हैसूरपर्यंतच्या आजच्या प्रदेशांत मधेच हें देवराष्ट्र होतं. कुंडलच्या पूर्वेला दोन-तीन मैलांवर तेंच देवराष्ट्र गाव आज उभं आहे. पूर्वीच्या राजधानीचं हेंच शहर. सातारा ते कोल्हापूर आणि अरबी समुद्र तें पंढरपूर या भागावर त्या वेळीं पसरलेलं हें राज्य. शके २७२ मध्ये तिथे कुबेरराजा राज्य करीत होता. त्याच्या आश्रयानं या राज्यांत जे ब्राह्मण रहात ते देवराष्ट्र – देवराष्ट्रीय – देवरुखे ब्राह्मण. इतिहासाचार्य राजवाडे यांचाच तसा शोध आहे. शके २३० ते ४४० या काळांत महाराष्ट्रांत अनेक लहानमोठीं राज्यं आणि राजे उदयाला आले. देवराष्ट्राचं राज्य हें त्यांपैकीच. शके ४७८ मध्ये तें चालुक्याच्या अंकित झालं अन् पुढे थोड्याच काळांत नष्टहि झालं. आता उरलं आहे तें एक लहानसं खेडं. सागरोबा – समुद्रेश्वर, समुद्रेश्वर तीर्थकुंड, सोनहिरा हीं ठिकाणं होतीं तिथेच आहेत. राज्यांचं, राजांचं, बहरलेलं झाड वठून गेलं. मूळ कायम राहिलं.

चंदन ही एक अशी वनस्पति असते की, पाला निघून गेल्यावरहि जमिनींत दडून बसलेलं त्याचं मूळ वर्षानुवर्षं टिकून रहातं. तें अधिकच सुगंधित बनतं. या सुगंधाला मग सारेच वश होतात. सागरोबाच्या कुशींत पूर्वीं चंदनाचे, बेलाचे वृक्ष होतेच. सागरोबाच्या पूजेची ती नैसर्गिक व्यवस्था असावी. सागरोबाचं शिवार ही देव-देवेन्द्रांची स्वप्नभूमि. सिद्धांच्या भाव-परिमलानं भरलेली, भारलेली. देवपण घेऊन जन्माला आलेला हा आसमंत. या आनंदवनांत धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चारहि पुरुषार्थ उभे. इथलीं माणसं आणि त्यांचीं मनं सकस. इथल्या मनोभूमींत पूर्वी अनेक माणसं मोठीं झालीं. इतिहासाचा विषय ठरलीं. इतिहासाला प्रसंगीं त्यांनी आव्हानं दिलीं. माणूस इतिहास घडवतो हें तर खरंच; पण इतिहास माणसाला घडवतो हें त्यापेक्षा अधिक खरं. माणसाला घडवण्याचीं इतिहासाचीं हत्यारंहि ठरलेलीं असतात. माणूस स्वस्थानीं बसून सुखाचा विचार करतो, सुखाचा इतिहास घडवण्याचे बेत आखतो, एक-दोन धुळाक्षरंहि काढतो, इतिहासाचा श्रीगणेशा सुरू करतो अन् त्याच वेळीं इतिहासाची अदृष्टांत खूण होते. इतिहासाचा खेळ मग सुरू होतो. माणसांच्या भोवतीं संकटांचं रिंगण पडतं. हा खेळ नेहमीच चालतो. ज्याला घडवायचा त्याला तो यांतूनच घडवतो आणि ज्याला घडायचं त्याला, या आयुधांचा मारा खातच घडवून घ्यावं लागतं. इतिहास ज्याला ताब्यांत घेतो त्याच्या ललाटावर नियति हें सारं अगोदर लिहीत असली पाहिजे. सागरोबाच्या कुशींत दडलेल्या चंदनाला असंच केव्हा तरी पान फुटतं. इतिहास त्याच्याकडे पहातो आणि दोघेहि मग परस्परांचा ताबा घेतात. इतिहास घडतो म्हणतात तो असाच कांही तरी!

थंडीचा मोसम संपत आला. नवी पालवी वसंतागमन सुचवीत होती. माळरानं तापूं लागलीं. पिकं निघालीं. मोकळ्या बैलगाड्यांत कधी कडबा, भुस्कट असायचं. धान्य

अगोदरच कणगींत आलं होतं. रानांतलीं कामं संपलीं होतीं. गावालगतच्या माळावर पोरांचे खेळाचे डाव आता सुरू असत. सायंकाळीं गावांतल्या देवळासमोरच्या पारावर तंबाखूचे अड्डे जमायचा हा मोसम. या अड्ड्यांत मग अनेक बेत ठरायचे. देवराष्ट्र गाव तसं लहान; इथे कुणी मोठा जमीनदार नाही, कुणी सावकार नाही, मध्यमवर्गीहि नाही. सारे शेतकरी, सारे गरीब, काबाडकष्ट करून जगणारे !

दाजीबा घाडगे हे गावांतले असेच एक शेतकरी. पारावरच्या अड्ड्यावर ते असायचेच. डोईला फेटा, अंगांत पैरण, उंचापुरा, नाकेला, शरीरानं भरलेला – असे दाजीबा. पारावर दररोजचा अड्डा बसला. चिलमींतून धूर निघूं लागला. गप्पा इकडल्या तिकडल्याच; कोणाची कुचाळकी नाही... पण अशा गप्पा सुरूच होत्या. शिमग्याला कुणाचा तमाशा आणायचा, जत्रेला फड कुणाचा, या गप्पा तर व्हायच्याच. जोडीला, गावांत कुणी कुणाची कुरापत काढली असेल, धनगरांनी कुणाच्या शेतांतलं झाड मेंढरांसाठी खडसलं असेल किंवा कुणाच्या शेतांत कट्टे काढायचं काम, विहिरीचं काम व्हायचं असेल, ताली धरायच्या असतील तर त्याचाहि हिशेब इथेच व्हायचा. कडूसं पडल्यानंतर जमणारी मंडळी जेवणवेळेपर्यंत गप्पा करीत, अन् जेवायला घरीं जात. कारण देवळांत भजनाचा किंवा भेदिक लावण्यांचा फड जमायच्या वेळीं त्यांना परत यायचं असे.

रात्रीं जेवणवेळ टळून गेल्यावर देवळांत भजनाचा फड जमला, पण या कशांतच दाजीबा घाडगे नव्हते. त्यांच्या घरांतलंहि कुणी नव्हतं. दाजीबा घाडग्यांच्या घरांत आज वेगळीच धांदल उडाली होती.

दाजीबा घाडग्यांची बहीण विठाबाई ही बळवंतराव चव्हाण यांना दिली होती. शेतकऱ्याच्या घरांतली मुलगी दुसऱ्या शेतकऱ्याच्या घरांत गेली होती. बळवंतराव चव्हाण हे मूळचे भाळवणी गावचे. खानापूर तालुक्यांतीलच हें गाव. विटें गावापासून पांच-सहा मैलांवरील एक खेडं. भाळवणी, कळंबी, ढवळेश्वर, आळसुंद अशी ही विट्या-भोवतालची पंचक्रोशी. बळवंतरावांचे आजोबा विट्याला स्थायिक झाले होते. विट्याला त्यांची तीन-चार एकर शेती होती. जमीन कोरडवाहू, जेमतेम दोन-पांच पोतीं धान्य देणारी. बळवंतराव अन् विठाई तसेच दिवस ढकलत होते. विठाई आता तीन मुलांची माता होती. पहिला ज्ञानोबा, दुसरी मुलगी राधाबाई आणि नंतरचा गणपत. विठाई आता चौथ्या बालकाला जन्म देणार होती. दाजीबा जरा बऱ्या स्थितींतले. बाळंतपणा-साठी म्हणूनच ती माहेरीं देवराष्ट्राला आली होती. अक्काचं बाळंतपण घरीं होतंय याचा घाडग्यांच्या घरांतल्या सगळ्यांनाच आनंद होता. विठाईच्या आईची गडबड उडाली होती.

अक्काचीं पहिलीं तीन बाळंतपणं सुखरूप झालीं होतीं. आता चौथं. पण या वेळीं अचानक परिस्थिति वेगळी बनली. त्या दिवशीं संध्याकाळपासूनच घरांत गडबड सुरू झाली होती. विठाईची आई धीराची. मनांत काळजी ठेवून विठाईला धीर देण्याचं काम आईला करायचं होतं, तें सुरू होतं. पण वेळ अधिक पुढे सरकत राहिला तसा आईचा

धीर सुटूं लागला. अक्काची तर घालमेल सुरू झाली. बाळंतपण जोखमीचं ठरलं. गाव खेडं, दवापाण्याची सोय नाही. तालुक्याच्या गावीं पोंचण्याची तातडी करावी तर बैलगाडीशिवाय वाहन नाही. जेवणवेळ टळली तेव्हा अक्काची शुद्ध हरपली होती. आईच्या जिवाला घोर लागला. सर्वच घाबरले. अक्कावरचं प्राणसंकट टळायला हवं होतं. बेचैनी क्षणाक्षणाला वाढूं लागली. आईनं नेहमीचं दवापाणी केलं. गावांतल्या म्हाताऱ्या अनुभवी बाया जमल्या. त्यांच्यांतल्या कांहीजणींजवळ, प्रसूतीचे हमखास उपाय होते. सर्व उपाय झाले, पण प्रसूतीचं चिन्ह दिसेना. खेडेगावांत अशा वेळीं एकच उपाय शिल्लक उरतो. देवाचा धावा. देवाला साकडं घालायचं, नवस बोलायचे, अंगारा लावायचा, देवाला कळवळून साद घालायची. सांगायचं, या जिवाला जगव. काकुळती करायची. घाडग्यांच्या घरांत हीच वेळ आता आली होती. सर्व उपाय थकले. तसे आईचे अनुभवी हात ढिले पडले. थरथरते हात मग एकत्र आले. आईनं सागरोबाला हात जोडले. काकुळतीनं विनवलं. अक्काला जगव, माझ्या हाताला यश दे, तुझी आठवण घरांत कायम ठेवीन.

१२ मार्च १९१४. परमेश्वराचा, नियतीचा अनुग्रह विचित्र असतो. अव्यक्त रूपानं तो कृपा करतो. आईच्या मनांत सागरोबाचं प्रेम अपार. निष्ठा निस्सीम. रात्रीच्या वेळीं, त्या अंधारांत, नीरव शांततेंत आईनं सागरोबाला घातलेली साद सागरोबापर्यंत पोंचली ! सागरोबा हाकेला धावला. आईच्या हाताला त्यानं यश दिलं. देवळांत अभंग सुरू होता 'हेचि दान देगा देवा' – घाडग्यांच्या घरांत त्याच वेळीं बालक जन्मलं. अक्काची सुखरूप सुटका झाली होती. आईच्या डोळ्यांत आनंदाश्रु दाटले. अक्का किलकिल्या डोळ्यांनी आसपास पाहूं लागली होती. चिमणीच्या उजेडांत तिला कांही दिसत नव्हतं, पण बालकाचा आवाज कानांत शिरत होता. बरं वाटत होतं. बाळ-बाळंतीण सुखरूप. दाजीबांनी सुटकेचा निःश्वास सोडला. त्यांच्या घरांत एका जिवाची श्रीमंती वाढली होती. तोच एक आनंद.

बळवंतराव चव्हाणांचं कुटुंब त्यांच्या आजोबांच्या वेळीं भाळवणी गाव सोडून विटें गावांत स्थायिक झालं होतं. कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यासाठी त्यांना गाव सोडावं लागलं. पांच-सहा माणसांची गुजराण होईल एवढं शेतीचं उत्पन्न नव्हतं. विटें गाव त्यांतल्या त्यांत मोठं. तालुक्याच्या सरकारी कचेऱ्या-कोर्ट याच गावांत. आठवड्याचा बाजार भरायचा तो विट्यालाच. शेतींत मिळेल त्या उत्पन्नावर बळवंतराव संसाराचा गाडा रेटीत होते; परंतु खाणारीं माणसं वाढलीं अन् गाडा रेटणं कठीण होऊं लागलं. आईवडिलांनी एक वेळच्या जेवणावर थांबावं, पण मुलांना तें झेपणारं नव्हतं. बळवंतरावांचा, अक्काचा जीव मुलांकडे पाहिलं की कळवळायचा, पण इलाज सापडत नव्हता. सारेच गरीब. दोस्तीहि गरिबांचीच. एकाची अडचण तीच दुसऱ्याची. प्रत्येकाची कथा गरिबीची, व्यथाहि गरिबीची. फुटकळ खर्चाची वाण. दिवसभर दोघांनी कष्ट उपसले तरी सायंकाळीं सर्वांना पोटभर खातां येईल एवढी मिळकत क्वचितच! बळवंतराव शेतांत खपत होते,

थोडंफार धान्य घरीं आणत होते, पण जें मिळत होतं तें कांही दिवसांपुरतं. गरिबाच्या घरांत उन्हाळा कायमचाच. बळवंतराव, विठाई उन्हाळ्यांतच करपत होतीं. स्वतःच्या शेतीच्या जोडीला दुसऱ्याची शेती वांट्यानं करून ते संसाराचा गाडा रेटूं पहात होते. त्यांना कष्टाची फिकीर नव्हती.

शेतकरी असो, शेत-मजूर असो, खेड्यांतला माणूस एखादं जनावर आपल्या दावणीला बांधायच्या प्रयत्नांत असतोच. दुभतं जनावर त्याच्या संसाराला मदतहि करतं. जमलं तर गाय, म्हैस किमान एखादी शेळी. त्याचं दूधदुभतं घरांतल्या मुलांना मिळत असतं. दुधाचा रतीब लावून तो आपली फुटकळ खर्चाची सोय करतो. चटणी-मिठाला तेवढाच आधार. शेतकऱ्याच्या दावणीला शेतीसाठी बैल असलाच पाहिजे. बळवंतरावांनी मोठ्या कष्टानं एक बैल पैदा केला होता. बैलांची उसनवारी करून, वांट्यानं गरीब शेतकरी शेतीचं काम करीत रहातो. बळवंतराव तेच करत होते. त्याच्या जोडीला एक दुभतं जनावरहि त्यांनी दावणीला आणलेलं होतं. फुटकळ खर्चाची ओढाताण होतीच. त्यासाठी त्यांनी एका घरीं रतीब जोडला.

विटें गावीं त्या वेळीं एक सब्जज होते. मोठा भला माणूस होता. बळवंतरावांना योगायोगानं त्यांच्या घरचाच रतीब मिळाला. शेतांत कष्ट करावेत, जनावरं सांभाळावींत, तुटपुंज्या पैशांत बायको-मुलांचा सांभाळ करावा आणि उद्याची चिंता उशाशीं ठेवून रात्र काढावी हें बळवंतरावांचं जीवन. संसाराच्या काळजीनं आणि जबाबदारीच्या कष्टाच्या ओझ्यानं वांकून गेलेला हा माणूस – सामान्य शेतकरी. खर्चाच्या पैशासाठी अंतराळांत बघत, जीवन जगणं क्रमप्राप्तच होतं. चव्हाण-कुटुंबाला शिक्षणाची ओळख नव्हती. मुलांना निसर्ग वाढवत होता. बळवंतराव आणि विठाई यांच्या मनांत मात्र काळजी वाढत होती. गरिबीचं संकट घरांत कायमचंच मुक्कामाला होतं. बळवंतरावांची संसारांतील ताणाताण सब्जज पहात होते. त्यांना सहानुभूति होती. पण त्यांनाहि कांही उपाय सुचत नव्हता. बळवंतराव आणि विठाई यांच्या जीवनांतील काळजीच्या बेरजेचं अंकगणित रोज सुरू होतं. फक्त धडपड होती – जगण्याची आणि बायको-मुलांना जगवण्याची ! त्या धडपडण्याला कुणी जिद्द म्हणत असतील, परंतु तो अर्थ माहिती असतो फक्त सुखाचा घास खाणाऱ्यांना. जीवनाचा अन्वयार्थ लावण्याइतकी गरिबांना सवडच नसते. त्यांचा आधार जमीन आणि पांघरूण आकाश. त्यांच्याकडे पाहून प्रेमाचा, आपुलकीचा शब्द खर्च करायला कुणाला फुरसत नसते.

आशेच्या मागे चालत रहायचा सराव बळवंतरावांना झालेला होता. असेच एक दिवस बळवंतरावांचे पाय रतीबवाल्या सब्जजांच्या घराकडे वळले. रतिबाच्या दुधाचे पैसे घण्यासाठी त्यांचा उंबरठा त्यांनी अनेकदा ओलांडला होता. बाजारच्या दिवशीं या घराकडे जायची सवय त्यांना होतीच. परंतु आजचं त्यांचं जाणं कांही वेगळं होतं. एका वेगळ्या आशेचं बोट धरून ते वाड्यांत पोंचले होते. शेती करून, कष्ट करून पोट भरत नाही तेव्हा आता एखादी नोकरी करावी असं त्यांना अलीकडे वाटूं लागलं होतं.

चार-दोन ठिकाणीं त्यांनी प्रयत्नहि केले. पण शिक्षण नाही – अडाण्याला नोकरी कोण देणार! तरीहि नोकरीच्या आशेनं ते सब्जज्जांकडे आले होते. एक अडाणी शेतकरी, तोंडानं विनंती हाच त्याचा अर्ज. सब्जज्जांची तोंडदेख होतांच त्यांनी अर्ज पेश केला. सब्जज्जांनी यापूर्वी अनेक गुंतागुंतीच्या अर्जांचा निकाल दिला होता; परंतु बळवंतरावांचीं चांगदेवाच्या कोऱ्या कागदावरील अक्षरं वाचून निकाल देण्याचं काम आयुष्यांत त्यांना प्रथमच करावं लागणार होतं. या जाणिवेमुळेच एक दिवस सब्जज्जांनी निकाल दिला. हा निकाल अर्थातच बळवंतरावांना अनुकूल असा होता. सब्जज्जांनी बळवंतरावांना नोकरी देऊ केली होती. तीहि सरकारी – बेलिफाची. अन् त्या निकालासरशी बळवंतराव एक दिवस विट्याच्या कोर्टातील बेलिफ म्हणून रुजू झाले. चव्हाण-कुटुंबाच्या जीवनाचा एक नवा अध्याय सुरू झाला.

बळवंतरावांचं कुटुंब आता सहा माणसांचं झालं होतं. थोरला ज्ञानोबा, मुलगी राधाबाई, तिसरा गणपत आणि चौथा यशवंत. यशवंताच्या जन्माच्या वेळीं, विठाईच्या आईनं सागरोबाला सांकडं घातलं होतं. "हाताला यश दे, घरांत तुझी आठवण ठेवीन" अशी काकुळती केली होती. आईच्या हाताला सागरोबानं यश दिलं आणि मग विठाईच्या आईनं आपल्या नातवाचं नांव यशवंत असंच ठेवलं होतं – घरांत कायमची आठवण म्हणून! भावंडांबरोबर यशवंत आता विट्यांत वाढत होता. बेलिफाच्या नोकरीच्या पगारांत आणि शेतींतून मिळणाऱ्या तोकड्या धान्यांत कुटुंबाचं पोषण होऊं लागलं. तीन-चार वर्षे अशींच गेलीं. कुटुंब हळूहळू आकार धरूं लागलं. कष्ट कमी झालेले नव्हते, परंतु उपाशी रहावं लागत नव्हतं.

अन् एक दिवस विटें सोडून कऱ्हाडला जाण्याचा हुकूम बळवंतरावांना मिळाला. सरकारी नोकराला नेहमीच आपलं बिऱ्हाड पाठीवर बांधून ठेवावं लागतं. नोकरींत रुजू होतांना गाव सोडावं लागेल याची बळवंतरावांना कल्पना नव्हती; परंतु न्यायखात्यानं तो प्रसंग निर्माण केला. बळवंतराव मुळांतच गोगलगायीच्या पंथांतले. कुणाचा धक्का लागण्यापूर्वीच, धक्का लागेल या धास्तीनं, पोटांत पाय घेऊन, स्वतःच्याभोवतीं गुंडाळी करून बसणारे! त्यांच्यावर आता बिऱ्हाड हालवण्याची वेळ नोकरीनं आणली होती. विचाराला वेळ नव्हता आणि विचार करून उपयोगहि नव्हता. नोकरी सोडून केवळ शेतीवर भागणारं नव्हतं. नोकरी हाच मोठा आधार ठरला होता. म्हणून एक दिवस ते सारेजण कराडांत दाखल झाले. विट्यांतला दुधाचा रतीब संपला.

नवं गाव, नवे न्यायाधीश, नवं वातावरण अशी कालक्रमणा आता कराडांत सुरू झाली. बेलिफ म्हणून पगार मिळत असला, चार पैसे हातांत येत असले तरी कराडला आल्यामुळे बळवंतरावांचा शेतीचा संबंध संपला. शेतीच्या उत्पन्नाची निश्चिति अगोदरहि नव्हती. भाऊबंदांवर अवलंबून राहून त्याचा कांही उपयोग होणार नव्हता. त्यामुळे बेलिफ म्हणून मिळणारा पगार एवढाच संसाराचा आता आधार उरला. परंतु हळूहळू तेवढ्या तुटपुंजा पगारांत सहाजणांचा संसार चालविणं कठीण आहे असं

अनुभवाला येऊं लागलं. यांतून कांही तरी मार्ग काढणं आवश्यकच होतं. बळवंतराव आणि विठाई यांनी त्यांतून मग तोड काढली. विठाईच्या घरची – दाजीबा घाडगे यांची स्थिति त्यांतल्या त्यांत बरी. शेतीचं थोडं-फार उत्पन्न मिळत होतं. म्हणून मग एका मुलाला आजोळीं पाठविण्याचा मनसुबा ठरला. ज्ञानोबा, राधाबाई, गणपत कराडला आणि यशवंत देवराष्ट्र इथे – आजोळीं, अशी वांटणी झाली.

विटें ते कराड अशी नोकरीसाठी बळवंतरावांची बदली झालेली असली तरी, नियतीची आज्ञा कांही वेगळीच होती. घडल्यानंतर उमजतो तो निर्णय नियतीचा. नियतीचे नियम डोळ्याला कधी कुणाला दिसलेले नाहीत. पण कुठे तरी ते असतातच! अंधार जसा कधी येत नाही आणि जात नाही, प्रकाशांत त्याचा अभाव असतो आणि प्रकाश जातांच प्रतीत होतो तसंच नियतीचं असलं पाहिजे. ती असतेहि आणि नसतेहि. प्रतीत मात्र होते. बळवंतरावांच्या डोळ्यापुढे विश्वांत सुरुवातीला अंधारच होता. बेलिफाच्या नोकरीच्या प्रकाशांत कांही काळ त्याचा अभाव निर्माण झाला. त्या प्रकाशांत वाट चालतच ते कराडला पोंचले. अंधार आपला पाठलाग करत आहे याची जाणीवहि त्यांना नसावी.

पहिलं महायुद्ध उतरणीला लागलेला १९१७–१८ चा तो काळ. युद्ध संपत आलं होतं. अन् त्याच वेळीं हिंदुस्थानांतील जनता प्लेगसारख्या महाभयंकर सांथीशीं सामना करीत होती. प्लेगनं जिकडे-तिकडे कहर माजविला. कुटुंबंच्या कुटुंबं नामशेष झालीं. कराडलाहि प्लेगचं थैमान सुरू झालं. ते दिवस सुगीचे होते. गावांत प्लेग शिरल्यानं गाव बाहेर पडूं लागलं. बळवंतरावांनाहि गावाबाहेर पडणं आवश्यकच होतं. म्हणून त्यांनी विठाई व मुलं यांची माहेरीं – देवराष्ट्र गावाला रवानगी केली. स्वतः कराडांतच राहिले. नोकरीचं बंधन होतं. त्यासाठी त्यांना गावांत रहावंच लागलं. दिवस चालले होते. या ना त्या कुटुंबावर प्लेगची स्वारी रोज सुरू होती. हाहाकार उडत होता. बळवंतराव तें दुःख पहात होते. नोकरी करत होते. मधून मधून देवराष्ट्राला जाऊन मुलांना पाहून येत होते.

एक दिवस अशीच सवड काढून पत्नीला आणि मुलांना पहाण्यासाठी ते देव-राष्ट्राला गेले. मोटारीची सोय तेव्हा नव्हतीच. कराडहून रेल्वेनं ताकारी स्टेशन आणि तेथून पायपीट करीत देवराष्ट्र, असा प्रवास करावा लागे. देवराष्ट्र गाव लहान. गावांत येण्याचा रस्ता ठरलेला. बळवंतराव गावांत पोंचले त्या वेळीं मुलं रस्त्यावर खेळत होतीं. लहानग्या यशवंतानं लांबूनच वडिलांना येतांना पाहिलं आणि त्यांच्या रोखानं धूम ठोकली. मातींत खेळून मातीनं भरलेला यशवंता धांवत धांवत वडिलांपर्यंत गेला आणि त्यानं त्यांच्या पायाला मिठी मारली. पण बळवंतरावांनी नेहमीसारखं त्याला वरच्यावर उचलून पोटाशीं धरलं नाही. संथपणानं ते चालत येत होते, तसंच यशवंताला घेऊन ते घरीं पोचले. विठाई घरींच होत्या. बळवंतराव थकलेले दिसत होते. आवाज खोल गेला होता. त्यांनी प्यायला पाणी मागितलं, ताप आलाय म्हणाले. आवाज आणखी खोल गेला.

ताप आलाय् म्हटलं की त्या वेळीं घरांतल्या माणसांच्या मनांत चर्रर्र होत असे. प्लेग सुरू होता. त्यामुळे ताप आलाय् म्हणजे घरांत प्लेग आलाय् याचीच ती खूण असायची. बळवंतरावांचा खोल गेलेला आवाज, त्यांना चढलेला ताप, विठाईच्या काळजाचं पाणी पाणी झालं. प्लेगनं त्यांच्या सौभाग्यालाच आव्हान दिलं होतं. प्लेगनं उद्ध्वस्त केलेले संसार त्यांच्या समोरून सरकूं लागले. बळवंतराव धीराचे. त्यांनी विश्रांति घेतल्यासारखं दाखवलं, परंतु ताप वाढत राहिला होता. तो तसला ताप अंगावर घेऊनच त्यांनी ताकारी तें देवराष्ट्र असा पायीं पल्ला गाठला होता. एकेक दिवस पुढे सरकूं लागला, पण ताप कमी होण्याचं लक्षण दिसेना. असेच चार-पांच दिवस गेले आणि मग सारंच थंड झालं. देवराष्ट्राला चालत आलेले बळवंतराव सरळ देवाघरीं चालत गेले. विट्याहून निवाल्यापासून त्यांचा पाठलाग करत आलेला अंधार अखेर त्यांना आपल्या साम्राज्यांत घेऊन गेला. घडल्यानंतर उमजलेला हा नियतीचा निर्णय! पळत जाऊन पायाला मिठी मारली ती यशवंताची वडिलांशीं झालेली अखेरची भेट! कायम लक्षांत रहावी अशी! बळवंतरावांचा तो आजारहि शेवटचा आणि लहानग्याशीं झालेली त्यांची भेटहि शेवटचीच. चार वर्षांच्या यशवंताला, वडिलांना पाहिल्याचं स्मरतं तें तेवढंच!

बळवंतराव देवाघरीं गेले; मुलांना मिळणारी पित्याची सावली गेली. विठाईचं सौभाग्य हरवलं. चव्हाण-कुटुंबाचा आधारवृक्षच उन्मळून पडला. थोरला मुलगा ज्ञानोबा सोळा-सतरा वर्षांचा, गणपतराव दहा वर्षांचा आणि यशवंता चार वर्षांचा. पालनकर्ताच गेला. कुटुंब संपल्यासारखीच अवस्था. मागे राहिली विठाई आणि चार लहानगीं. यशवंताच्या पाठीवर विठाईनं आणखी एका बालकाला जन्म दिला, पण तें लहानगं लहानपणींच निघून गेलं होतं. गरीब कुटुंब आणखी गरीब बनलं होतं.

घराचा आधार गेल्याच्या दुःखानं सारींच होरपळलीं. विठाईच्या मनाला गरिबीच्या डागण्या दैनंदिन जीवनांत हैराण करूं लागल्या. पति-निधनानंतरचे दिवस उलटत राहिले. महिना-दीड महिना असाच गेला. विठाईला आता स्वतःला विचार करावा लागणार होता. सासरचं, पतीचं उरलंसुरलं सुखहि संपलं होतं आणि माहेरीं राह्यचं तर साऱ्यांनाच अडचणींत ढकलावं लागणार होतं. घाडगे-कुटुंब खाऊन-पिऊन सुखी असेलहि, परंतु तेंहि एका सामान्य शेतकऱ्याचंच कुटुंब होतं. सधन शेतकऱ्याचं नव्हे. चार मुलांसह विठाईनं तिथेच मुक्काम करणं घाडगे-कुटुंबाला झेपणारं नाही याची त्या बिचारीला जाणीव होती. त्याच घरांत ती लहानाची मोठी झालेली असली तरी, आपल्या पोटच्या लहानग्यांना मोठं करण्यासाठी तिला आता बाहेरचा रस्ता धरणं क्रमप्राप्त होतं. विचार करण्यांत दिवस चालले होते अन् मग एक दिवस कुणाचाच आधार नसलेलं हें कुटुंब – आई आणि चार मुलं देवराष्ट्र सोडून निघालीं. बळवंतराव कराडांतून उठून देवराष्ट्राला आणि तिथून सरळ देवाघरीं गेले होते. बळवंत-रावांच्या कराडांतल्या उजाड घरांत, देव नसलेल्या देव्हाऱ्यांत, पोंचण्याचा विचार विठाईनं केला होता. चार मुलांना संगती घेऊन विठाई मग कराडला पोंचली.

हातावर पोट भरणारांची दाटी कराडांत झालेलीच होती. विठाईचं कुटुंब त्यांतलंच एक बनलं. सारेच गरीब. तुलनेला तिथे अवसरच नव्हता. गावांत आणि आवती-भोवतीं इंग्रजांच्या कृपेनं बनलेले रावसाहेब, रावबहादूर, वतनदार, जहागीरदार, अशा नव्या शिष्टवर्गाचा जमाना वाढत होता आणि सरकारी नोकरींत शिरलेला पांढरपेशावर्ग बाळसं धरूं लागला होता. परंतु उघड्यावर पडलेल्या चव्हाण-कुटुंबाकडे, निराधार मुलांकडे पहाणारे त्यांच्यांत कुणी नव्हते. गरिबीनं गांजलेल्यांना कामाला जुंपून त्यांना आणखी पिळणं, गुलाम म्हणून त्यांना राबवणं हीच सरसकट वृत्ति. विठाईची हृदयद्रावक कहाणी ऐकून कांहीजण पाझरल्यागत करीत, पण तें तितकंच! नुसता कोरडा जिव्हाळा!

घरांत मुलांकडे पहात बसण्यापेक्षा विठाईला आता त्यांच्यासाठी कांही करावं लागणार होतं. करावे लागतील तेवढे स्वतःच कष्ट करणं हेंच नशिबीं होतं. गरिबांच्या-साठी, भुकेल्या पोटासाठी ब्रिटिश सरकार कांहीच करीत नव्हतं.

त्या अवस्थेंत बडे जमीनदार, नोकरदार किंवा पांढरपेशे यांनाच जगतां येणं शक्य होतं. तेवढाच वर्ग जिवंत होता. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणारांनी कष्ट करायचे आणि मरण येत नाही म्हणून जगायचं. त्यांना कुणी वाली उरला नव्हता. विठाई रोजगार करत होती, परंतु ती मिळकत एक वेळचं पोट भरण्यासहि अपुरी होती.

परंतु कधी कधी असेंहि घडतं की, उजाड वाळवंटांत एखादा पाण्याचा झरा दिसतो. हिरवळ आढळते. मृगजळाच्या मागे धांवणारे मग त्या रोखानं वाळू तुडवूं लागतात. चोंच दिली त्यानं चाऱ्याचीहि व्यवस्था केलेली असते म्हणतात! त्या वैराण भूमींत विठाईला असाच एक झरा दिसला.

विठाईचा मोठा मुलगा ज्ञानोबा. बळवंतरावांच्या पश्चात् ज्ञानोबाचाच तिला आधार वाटत होता. ज्ञानोबा आता मोठा झाला होता. बळवंतराव होते तोंपर्यंत विट्याच्या शेतींतलं शेर-पायली धान्य आणण्याची व्यवस्था होती. परंतु मागे लहान मुलं राहिल्यामुळे भाऊबंद आणि वांटेकरी यांना या लहान मुलांना कांही आधार द्यावा अशी जाणीव उरली नव्हती. विठाईच्या रोजगारांत मुलांचं पोट भरत नव्हतं. त्यामुळे आपल्याबरोबर ज्ञानोबालाहि रोजगारीवर नेण्याशिवाय तिला गत्यंतर उरलं नव्हतं. ज्ञानोबा लहान, तो कष्ट ते काय करणार, त्याला कष्टाला जुंपावं तर विठाईच्या मनाच्या यातना आणखीच वाढणार होत्या. पण इलाज नव्हता. सल्लामसलत करण्यासहि कुणी जवळ उरलं नव्हतं. आपल्याच मनाला आपलं दुःख सांगण्याचं आता विठाईच्या अंगवळणीं पडलं होतं. या दुःखाचा कधी डोळ्यावाटे स्फोटहि व्हायचा, पण तें सुद्धा मुलं घरांत नसतांना – एकटीच असतांना! अर्धपोटीं मुलं आणखी करपून जाऊं नयेत याचीहि विठाईला काळजी होती.

हिरमुसल्या मनानं काळजीची बेरीज करीत विठाई एक एक दिवस मागे सारीत होती. अशांतच एक दिवस, ज्ञानोबाला नोकरीला लावण्याच्या विचाराची मनांत

जुळणी झाली. त्यासाठी प्रयत्नहि सुरू केला. परंतु त्या काळांत नोकरीसाठी पांढरपेशा-वर्गाची मक्तेदारी बनली होती. दैवजात दुःखी असलेल्या समाजांतील वर्गाला पराधीनतेचं जीवन जगण्याशिवाय गत्यंतर उरलेलं नव्हतं. ज्ञानोबाच्या नोकरीची जुळणी मनांत झालेली असली तरी, त्यासाठी प्रत्यक्षांत मार्ग सापडत नव्हता. अन् एक दिवस, त्या बैराण वाळवंटांतील झऱ्याच्या काठावरच आपण पोंचलों आहोंत असं विठाईच्या अनुभवाला आलं. ज्ञानोबानं बेलिफ व्हावं, बळवंतरावांच्या जागेवरच रुजूं व्हावं, असं कुणीं तरी सुचविलं होतं. बळवंतराव कराडच्या कोर्टात बेलिफ होते तेव्हा ते ज्यांच्या हाताखाली काम करीत होते त्याच न्यायाधिशांना भेटावं आणि ज्ञानोबाला मार्गी लावावं, असा हा विचार होता. या विचारासरशी विठाईनं आपली कुटुंब-कहाणी त्या न्यायाधिशांपर्यंत पोंचविली. बळवंतरावांच्या मोठ्या मुलाला बेलिफाच्या नोकरींत रुजूं करून घेण्यासाठी मग खटपट सुरू झाली. न्यायाधीशहि भला माणूस. चव्हाण-कुटुंबाची कहाणी ऐकून त्याचं मन द्रवलं. पण तेवढ्यानं भागणारं नव्हतं. नोकरींत रुजूं करून घेणं हें प्रत्यक्ष त्याच्या स्वाधीन नव्हतं. त्यासाठी जिल्हा-न्यायाधिशांची अनुमति आणवावी लागणार होती. त्या न्यायाधिशांनी मग ही अडचण पुढे केली आणि विठाईला सातारा येथे जिल्हा-न्यायाधिशांपर्यंत पोंचण्याचा सल्लाहि दिला.

विठाईला आता त्यासाठी साताऱ्याला जावं लागणार होतं. माऊलीनं मग तोहि हिय्या केला. मुलांना धीर दिला आणि एक दिवस साताऱ्याला जाण्यासाठी प्रस्थान ठेवलं. त्या काळांत कराडहून साताऱ्याला पोंचायचं तर रेल्वेनं कोरेगावपर्यंत आणि तिथून अकरा मैलांवर बैलगाडीनं साताऱ्याला यावं लागत असे. एक दिवस हें कुटुंब कराडहून निघालं आणि छकड्यानं साताऱ्यांत दाखल झालं. ज्ञानोबा आणि तीन लहानगींहि विठाईनं बरोबर आणलीं होतीं. योगायोग असा की, कऱ्हाडचे न्यायाधीशहि त्या दिवशीं जिल्हा-न्यायालयांत आलेले होते. त्यांनीच मग जिल्हा न्यायाधिशांना चव्हाण-कुटुंबाची कहाणी सांगितली आणि विठाईसह तें सारं कुटुंबच त्यांच्यासमोर उभं केलं. एवढं घडतांच त्याचा इष्ट तो परिणाम झाला. जिल्हा-न्यायाधिशांनी दिलासा दिला आणि पुढील आठच दिवसांत ज्ञानोबा कराडच्या कोर्टात बेलिफ म्हणून रुजूं झाला. निराधार कुटुंबाचे पाय पुन्हा जमिनीला लागले, आधार मिळाला. हा आधार अर्थातच तुटपुंजा होता. बळवंतरावांच्या शेतींतला धान्याचा किंचितसा आधार पूर्वीच संपला होता. त्यामुळे ज्ञानोबाचा पगार आणि विठाईच्या कष्टाची मजुरी यावरच कुटुंबाचा निर्वाह करावा लागणार होता. कराडसारख्या गावांत हें सारं अपुरं होतं, सर्वांनाच अर्धपोटीं ठेवणारं होतं. विठाईला या वेळीं माहेरची याद आली. एका मुलाचा सांभाळ दाजीबा करतील तर विठाईला तो दिलासा मिळणार होता. विठाईनं भावाकडे तसा सांगावा पाठविला आणि भावानं – दाजीबांनीहि त्याला कबुली दिली. एका मुलाला देवराष्ट्राला, आजोळीं पाठवण्याचं ठरलं आणि त्यासाठी निवड झाली ती यशवंताची – पांच वर्षांच्या मुलाची!

यशवंताचा जन्म देवराष्ट्रांतच झाला होता आणि आता पांच वर्षांनी जगण्यासाठी यावं लागलं तेंहि आजोळींच. जन्म आणि बालपण, सागरोबाच्या, सोनहिराच्या संगतींत घडावं असाच जणू संकेत असावा. यशवंत देवराष्ट्राला पोचला आणि दाजीबांनी मग त्याला तिथल्या प्राथमिक शाळेंत दाखल केलं. मराठी चौथीपर्यंतचं यशवंताचं शिक्षण आजोळींच, देवराष्ट्रास झालं. देवराष्ट्रांतील प्राथमिक शाळेंत यशवंता दाखल झालेला असला तरी ज्ञानोबाची इच्छा मात्र यशवंतानं कराडांत शिक्षण घ्यावं, इंग्रजी शिकावं अशी होती. यशवंता सातवीपर्यंत शिकला तर त्याला कुठे तरी नोकरी मिळेल अशी विठाईला आशा होती. त्या काळांत सातवी शिकलेल्याला, व्ह. फा. झालेल्याला शिक्षकाची नोकरी हमखास मिळत असे. यशवंता चौथी इयत्ता उत्तीर्ण होतांच ज्ञानोबानं त्यास कराडला आणलं. कराडांतच यशवंता व्ह. फा. झाला. पण गुरुजी बनण्याचं मात्र राहून गेलं. त्यानं इंग्रजी शिकावं असा ज्ञानोबाचा आणि दुसरा भाऊ गणपत यांचा सल्ला होता. त्यामुळे यशवंतानं मास्तर व्हावं आणि संसाराला हातभार लावावा ही इच्छा विठाईला पूर्ण करतां आली नाही. कराडलाच यशवंताला टिळक हायस्कूलमध्ये दाखल करण्यांत आलं – १९२७ सालीं !

यशवंता टिळक हायस्कूलमध्ये दाखल झाला त्याच वेळीं मधला भाऊ गणपत हाहि हायस्कूलमध्ये शिकत होता. ज्ञानोबा नोकरींत रुजूं झाला होता. गरिबी चोहो बाजूनं वेढलेलीच होती. शाळेची फी त्या काळांत जुजबी होती, पण एका तांबड्या पैशाला किंमत असलेला तो काळ. पांढरपेशा, श्रीमंत वर्गातल्या मुलांच्यापुढे शिक्षणाच्या खर्चाचा प्रश्न नसायचा. परंतु या दोघा भावांना महिन्याची शाळेची जुजबी फी देण्यासाठीहि घरांत पैसा शिल्लक रहात नव्हता. गरिबांच्या मुलांनी गुरं राखावींत, शेणगोठा करावा, शेतीची राखण करावी अशीच सुखवस्तु समजल्या जाणाऱ्या वर्गाची धारणा असे. या मुलांच्या कष्टाच्या बदल्यांत उरलेलं शिळं अन्न त्यांना देण्याचा मोठेपणा ते दाखवीत. हेटाळणी ही तर गरिबांच्या मुलांना ऐकावी लागेच. गरिबाचा कुणी मुलगा शिकत असला तर त्याला फीसाठी जुजबी मदत करण्याचे तर राहोच, नादारीसाठी एखाद्यानं समाजांतल्या प्रतिष्ठिताला गरिबीचं शिफारसपत्र मागितलं तरी त्याची बोळवण हेटाळणीनंच होत असे.

टिळक हायस्कूलमध्ये शिकणारा यशवंताहि या प्रकारच्या हेटाळणींतून सुटला नाही. त्या काळांत शाळेंत नादारी मिळवायची तर एखाद्या प्रतिष्ठितांकडून विद्यार्थी गरीब असल्याबद्दलचं शिफारसपत्र घ्यावं लागे. शाळांचा तसा नियम असायचा. गावांतल्या एका घरंदाज श्रीमंताकडे विद्यार्थी यशवंता असाच एक दिवस शिफारसपत्राची मागणी करण्यासाठी गेला. चव्हाण-कुटुंब हें गरिबींत दिवस घालवीत आहे हें त्या प्रतिष्ठिताला माहीत होतं. परंतु गरिबीचं शिफारसपत्र देण्याचं तर त्यांनी नाकारलंच शिवाय तुच्छतेचे शब्दहि ऐकविले. एक लहानशी घटना, परंतु या घटनेनं विद्यार्थी यशवंताचा स्वाभिमान दुखावला गेला होता. गरिबांना स्वाभिमान नसतो अशीच त्या प्रतिष्ठित गृहस्थांची

भावना असावी. यशवंताला दुःख होतं तें शिफारसपत्र मिळालं नाही यापेक्षाहि त्या तुच्छ शब्दांचं ! यशवंताच्या मनाला ही घटना बोचली. परंतु हें शल्य या विद्यार्थ्यानं मनाच्या एका कोपऱ्यांत ठेवलं आणि तो तिथून चालता झाला. मनांत प्रतिज्ञा मात्र केली की, अतःपर शिक्षणाच्या मदतीसाठी कुणा थोरामोठ्यांची याचना करायची नाही, असेल त्या आणि जमेल त्या परिस्थितींतच शिक्षण चालू ठेवायचं. भाऊबंद होते, पण ते कडेला उभे राहून पहात होते. पुढच्या काळांत, महाविद्यालयीन शिक्षणाच्या वेळीं सुद्धा, कुणाकडे याचना करायची नाही अशी प्रतिज्ञा त्यानं कटाक्षानं पाळली; परंतु मित्र मदतीसाठी तयार होते. यशवंतानं शिकावं अशी कांही मित्रांची इच्छा होतीच. त्यांतल्या सुखवस्तु मित्रानं यशवंताच्या उच्च शिक्षणाची जबाबदारी स्वतःहून स्वीकारली. प्रारंभींच्या काळांत शिक्षणांत अडथळे आले ते गरिबीचे तर होतेच शिवाय हिंदुस्थानांतल्या त्या काळांतल्या राजकीय परिस्थितीचे, चळवळीचे आणि त्यासाठी तारुण्यसुलभ झेप घेण्याच्या यशवंताच्या मनाचेहि होते.

# १

यशवंतरावांचा जन्म झाला त्या अगोदरची पंचवीस-पन्नास वर्षे आणि त्यांचं शिक्षण सुरू होतं तो सर्वच काळ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील मोठा धामधुमीचा होता. भारतीय स्वातंत्र्याच्या ऐतिहासिक लढ्याच्या कथेची देदीप्यमान अशीं प्रकरणं याच काळांत तयार झालेलीं आढळतात. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात ब्रिटिश राज्यकर्ते आणि भारतीय जनता यांच्या परस्पर हितसंबंधांच्या संघर्षातून सतत लढा सुरू राहिला तो प्रामुख्यानं याच काळांत! भारतीय जनतेंत राष्ट्रीय भावना जागृत झालेली होती आणि बलशाली राष्ट्रीय आंदोलन निर्माण होण्याला पोषक अशी आर्थिक, नैतिक, बौद्धिक, राजकीय परिस्थिति त्यामुळे देशांत तयार झाली होती. यांतूनच साम्राज्यवादाच्या विरुद्ध आंदोलनानं जन्म घेतला. जनतेमध्ये एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. कारण राज्यकर्त्यांच्या धोरणाचा देशांतील शेती, शेतकरी, व्यापार, उद्योग, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्र या सर्वांवरच अनिष्ट परिणाम घडत राहिला होता. ब्रिटिशांचं शेतीविषयक धोरण तर कमालीचं जुलमी होतं. शेतीला तें धोरण मारक होतं. त्या तसल्या धोरणामुळे सावकारीचं पेव फुटलं. कर वसूल करणाऱ्या मध्यस्थांचा एक दुय्यम सरंजामदारी वर्ग तयार झाला. समाजांत नवे वर्ग वरच्या आणि खालच्या वर्गांत निर्माण झाले. वरच्या थरांत जमीनदार, मध्यस्थ व सावकार आणि खालच्या थरांत कुळं. वांट्यानं शेती करणारे वांटेकरी आणि शेत-मजूर अशीं हीं छकलं पडलीं. वसाहतवादाचं हें देशाला घडलेलं एक नवं दर्शन होतं. परिणामीं शेतीचं उत्पन्न कमालीचं घटलं आणि मुळांतला दरिद्री शेतकरी दारिद्र्याच्या खोल गर्तेत जाऊन पडला. राज्यकर्त्यांनी व्यापाराचीहि हीच गत करून ठेवली होती. स्वदेशी धंदे मोडकळीला आले. नवे कामधंदे दिसेनासे झाले. त्यामुळे उद्योगधंद्यांतील लाखो कारागीर शेतीच्या मागे लागले आणि शेतीवरील लोकसंख्येचा ताण किती तरी पटींनी वाढण्यांतच त्याचा परिणाम झाला. खेडीं मोडकळीस आलीं.

देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनांत आधुनिक पाश्चात्त्य शिक्षणामुळे नवविचारांचे नवे अंकुर फुटूं लागले होते. पश्चिम-युरोपांत उदयास आलेले आधुनिक विचारप्रवाह भारतांत शिरूं लागले होते; आणि येथील बौद्धिक जीवनांत क्रांतीनं मूळ धरलं होतं. लोकशाही जनतेचं सार्वभौमत्व, बुद्धिवाद, मानवतावाद या कल्पना भारतीयांच्या मनांत रुजूं लागल्या होत्या. त्यांतून देशांतल्या अर्थव्यवस्थेकडे, समाज-जीवनाकडे आणि विशेषतः शासनसंस्थेकडे चिकित्सेनं पहाण्याचं काम सुरू झालं. अर्थात् हे नवे विचार, नवं आर्थिक व राजकीय जीवन आणि ब्रिटिशांचा राज्यकारभार याचा परिणाम शहरी भागावर प्रथम झाला आणि हळूहळू तो ग्रामीण भागांत पसरला.

महाराष्ट्रांत न्या. महादेव गोविंद रानडे, गणेश वासुदेव जोशी, सीतारामपंत चिपळूणकर आदि कार्यकर्त्यांनी १८७० मध्ये पुण्यांत 'सार्वजनिक सभा' स्थापन केली आणि लोकांना राजकीय शिक्षण देण्याचं काम आरंभलं. याच वर्षी देशांत सर्वप्रथम स्वदेशीचा उच्चार झाला. ब्रिटिश गिरण्यांच्या हल्ल्यापासून देशी गिरण्यांना वांचवण्याचा उपाय म्हणून या तत्त्वाचा प्रचार सुरू झाला होता. भारतीय तरुणांमध्ये या काळांत नवीन राजकीय वारे वाहूं लागले होते. बंगालमध्ये त्याचा पहिला आविष्कार झाला. तिथल्या नव्या मध्यमवर्गीयांना ब्रिटिश इंडिया असोशिएशनचं जमीनदार-धार्जिणं जुनाट धोरण मंजूर नव्हतं. हा नवा मध्यमवर्ग आणि बुद्धिवादी यांचा 'आम्हीच जनतेचे नेते आहोंत, जमीनदार नव्हत' असा आग्रह होता. आनंद मोहन बसू व सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी १८७६ च्या जुलैमध्ये 'इंडियन असोशिएशन'ची स्थापना केली आणि सनदी नोकरांच्या परीक्षा-पद्धतींत सुधारणा या विषयावर चळवळ आरंभली. सुरेंद्रनाथांना त्यांनी चळवळीच्या प्रचारार्थ आणि पाठिंबा मिळवण्यासाठी देशाच्या अन्य भागांत पाठवलं. सामान्य जनतेला आपल्या राजकीय चळवळींत सामावून घेण्यासाठी तिथे त्यांनी कुळांच्या आणि शेत-मजुरांच्या हक्कासाठी चळवळ सुरू केली.

देशाच्या निरनिराळ्या भागांतील तरुणवर्ग जागृत बनला होता. १८८४ सालीं सी. राघवाचारी, जी. सुब्रह्मण्यम् अय्यर, आनंद चार्लू इत्यादि तरुणांनी मद्रास येथे 'महाजन-सभा' स्थापन केली आणि १८८५ सालीं सर फिरोजशहा मेहता, न्यायमूर्ति तेलंग प्रभृति कार्यकर्त्यांनी मुंबई इथें 'बॉम्बे प्रेसिडेन्सी असोसिएशन' स्थापन केली. राजकीय जाण आता पसरत चालली होती आणि अखिल भारतीय संघटनेची निकड सर्वांनाच जाणवूं लागली होती.

१८८५ च्या डिसेंबरमध्ये देशांतील सर्व राजकीय पुढाऱ्यांनी मुंबईस एक बैठक घेतली. या बैठकीसाठी सेवानिवृत्त इंग्रज सनदी अधिकारी ए. ओ. ह्यूम यांचें सहकार्य मिळवलं आणि सर्व पुढाऱ्यांनी मिळून 'भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस' स्थापन करण्याचा निर्णय केला. पहिले अध्यक्ष म्हणून डब्ल्यू. सी. बानर्जी यांची निवडहि केली. राष्ट्रीय कॉंग्रेसची चळवळ सुरू झाल्यानंतर कांही वर्षांनी ब्रिटिशांची वृत्ति मात्र पार बदलली. भारतांतील आपले हितसंबंध सुरक्षित राखण्यासाठी, राजकीय हेतूनं, त्यांचे डावपेच मग

सुरू झाले. राष्ट्रीय चळवळीचा जोर वाढूं लागला आणि भारतीय जनता साम्राज्य-सत्तेला धोक्यांत आणण्याचा संभव वाढत रहातांच ब्रिटिशांनी क्रमाक्रमानं 'फोडा व झोडा' अशा भेदनीतीनं राज्यशकट चालू ठेवण्याचा मनस्वी प्रयत्न सुरू केला.

यशवंतराव बाल्पणांतून पुढे सरकत होते त्या काळांत राष्ट्रीय जीवनांत अनेक उलथापालथी घडत राहिल्या होत्या. १९१४ सालीं यशवंतरावांचा जन्म झाला त्या काळांत ग्रेट ब्रिटननं जर्मनीशीं युद्ध पुकारलं होतं. त्यामुळे भारतहि युद्धांत ओढला गेला होता. लो. टिळक मंडालें येथील सहा वर्षांची शिक्षा संपवून याच सालीं परतले होते. इंग्रज सरकारविरुद्ध देशांत सर्वत्र असंतोष धुमसत होता. राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होऊनहि आता दोन तपांचा काळ उलटला होता आणि हिंदुस्थानांतील निरनिराळ्या शहरी काँग्रेसचीं अधिवेशनं भरविण्यांत येत होतीं. १९१४ च्या पहिल्या महायुद्धाच्या प्रारंभीं, भारतीय पुढाऱ्यांनी ब्रिटनला आपली सहानुभूति व पाठिंबा व्यक्त केला, परंतु यामागे निश्चित हेतु होता. ब्रिटिशांची बाजू घेतल्याच्या बदल्यांत भारताला राजकीय सुधारणा मिळाल्या पाहिजेत, अशी मागणीच काँग्रेसनं उघडपणें केली. परंतु भारतानं दिलेल्या सहकार्याबद्दल, भारताला राजकीय सुधारणा दिल्या जाण्याचं चिन्ह पुढच्या काळांत दिसेना, तेव्हा भारतीयांचा पहिला उत्साह मावळला.

याच वेळीं सर फिरोजशहा मेहता आणि गोपाळ कृष्ण गोखले यांचं निधन झालं. लो. टिळक मंडाल्याहून परत आलेच होते. या दोन घटनांमुळे काँग्रेसमधील मवाळ – नेमस्त आणि जहाल एकत्र आले आणि १९१५ सालीं मुंबईच्या काँग्रेस-अधिवेशनांत श्रीमती ॲनी बेझंट यांच्या सूचनेवरून, जहालांना सभासदत्व खुलं केलं. भारताला पूर्ण स्वराज्य मिळवून देणं हें ॲनी बेझंट यांचं राजकीय उद्दिष्ट होतं. आयर्लंडमधील बंडापासून स्फूर्ति घेऊन त्यांनीच पुढे १९१६ सालीं सप्टेंबर महिन्यांत भारतांत 'होमरूल लीग'ची (स्वराज्य-संघ) स्थापना केली. लो. टिळकांनीहि स्वतःची होमरूल लीग काढली आणि राजकीय आखाड्यांत पुन्हा उडी घेतली. 'केसरीं'तून मर्मभेदक लेख लिहून व भाषणं करून त्यांनी पुन्हा राष्ट्रप्रेम, निर्भयता व त्याग या गुणांची शिकवण सुरू केली. महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या भागांत त्या वेळीं त्यांनी प्रामुख्यानं काम केलं. महायुद्धामुळे करांचं ओझं डोईजड झालं होतं. महागाई सतत वाढत होती आणि गरिबांना जगणं कठीण होऊं लागलं होतं. युद्धामुळे काँग्रेसला एकीकडे बळ चढूं लागलं असतांनाच क्रांतिकारकांनी त्याच वेळीं जर्मनीच्या मदतीनं परिस्थितीचा फायदा घेण्याचं ठरवलं. त्यांनी आपली जुळवाजुळव सुरू केली. परदेशांत वास्तव्य करीत असलेल्या भारतीय क्रांतिकारकांशीं सांधा जुळवला गेला. साम्राज्यवाद्यांच्या गोटांत जो संघर्ष चालला होता त्याचा आपल्या देशासाठी लाभ घेण्याचा यामागचा हेतु होता. क्रांतिकारकांनी, ब्रिटिशांविरुद्ध जर्मन शस्त्रांच्या साहाय्यानं युद्ध पुकारण्यापर्यंतहि योजनेची आखणी केली; परंतु पहिल्या महायुद्धाच्या काळांतील क्रांतिकारकांची ही चळवळ कामाच्या

सुसूत्रतेच्या अभावीं फसली. मात्र या सर्व धामधुमीमुळे ब्रिटिशांवर परिस्थितीचं कमालीचं दडपण वाढलं होतं. सरकारची दृष्टीहि त्यामुळे जरा बदलूं लागली.

यशवंत चव्हाण हा लहान विद्यार्थी कराडच्या टिळक हायस्कूलमध्ये शिकत होता त्या काळांत 'सामाजिक सुधारणा अगोदर की राजकीय स्वातंत्र्य अगोदर' यासारखे आगरकर-टिळक यांच्यामधील महाराष्ट्रांतील वाद बाजूला पडून राजकारणाची गति पुष्कळच पुढे गेलेली होती. तरी पण या महत्त्वाच्या वादांतून निर्माण झालेल्या निष्कर्षांची चर्चा समाजांत सुरू राहिली होती. इंग्रज सरकार हीच हिंदुस्थानच्या अभ्युदयाच्या मार्गांतील सर्वांत मोठी धोंड असल्यामुळे अवांतर गोष्टींवर सांप्रत शक्ति वेचण्यापेक्षा लोकांची प्रतिकार-बुद्धि जागृत करण्यावर लो. टिळकांनी भर दिलेला होता. आगरकर हे सामाजिक सुधारणावादाचा आग्रह धरून होते. न्या. रानडे यांनी बुद्धिनिष्ठा, व्यक्तिस्वातंत्र्य, समता व उदारता हीं मूल्यं येथील लोकव्यवहारांत रुजविण्याचा प्रयत्न सुरू ठेवला होता. याउलट टिळकांनी राजकारणाला समाज-जीवनांत अग्रस्थान दिलं आणि राजकीय उपयुक्ततेची कसोटी लावूनच त्यांनी सुधारणांची क्रमवारी सांगितली. पाश्चात्त्य विचारवंतांचं, व्यक्तिवादाचं व बुद्धिवादाचं तत्त्वज्ञान स्वीकारून आगरकर हे सामाजिक सुधारणांचा आग्रह धरून राहिले, पण महाराष्ट्रांतील आणि देशांतील ज्या समाजाला हें तत्त्वज्ञान आगरकर शिकवूं पहात होते, त्यांच्यामध्ये तें पेलण्याची आणि पचवण्याची शक्ति नव्हती. पाश्चात्त्य राष्ट्रांप्रमाणे हिंदुस्थानांतला समाज तळापासून हालला नव्हता. एका बाजूला पुरोहित आणि सरंजामदार यांचं वर्चस्व आणि त्यांना हटवून राजकीय व आर्थिक सत्ता काबीज करण्याचा व्यापारीवर्गाचा प्रयत्न सुरू होता. जुना वर्ग परंपरा आणि संस्कार यांच्याच ताब्यांत अडकून पडला होता. या परिस्थितींतून समाजाला बाहेर काढण्यासाठी आगरकरप्रणीत सामाजिक सुधारणेला विरोध करीत असतांना टिळक हे जनतेमध्ये स्वाभिमान निर्माण करून लोकांनी लढण्यासाठी सिद्ध व्हावं यासाठी प्रयत्न करीत होते. सुधारणेचा वाद लढवीत असतांनाच टिळकांनी आपलं खरं लक्ष राष्ट्रीय चळवळ जोपासण्यावर आणि वाढवण्यावर ठेवलं. मूठभर सुशिक्षितांवर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा महाराष्ट्रांत व देशांत पसरलेला अफाट बहुसंख्य शेतकरी समाज, गरीब निर्धन समाज, यांस राजकीय चळवळींत सामील करण्यावर त्यांनी भर दिला. यासाठी त्यांनी प्रांतिक सभेंत शेतकऱ्यांनाहि आणलं. ज्यांच्या दुःखाबद्दल सरकारकडे दाद मागायची त्यांनी तें ऐकावं हा त्यामागे स्वच्छ हेतु होता. त्याचा इष्ट असा परिणाम घडत राहिला. हिंदुस्थानांत इंग्रज सरकारविरुद्ध असंतोष धुमसत रहाण्यास या धोरणाची मदत झाली.

याच काळांत समाजाच्या उद्धाराचा झेंडा घेऊन म. ज्योतीराव फुले पुढे सरसावले; समाजोद्धाराची त्यांची तळमळ प्रचंड होती. आपल्या कांही ब्राह्मण मित्रांच्या साहाय्यानंच त्यांनी समाजोद्धाराचे प्रयोग प्रारंभीं सुरू केले आणि त्यांत ते कांही प्रमाणांत यशस्वीहि झाले. अज्ञान, दारिद्र्य, रूढींत रुतलेल्या अशा हिंदु समाजाला

ज्योतिबांनी अंतर्मुख बनवण्याची मोठी कामगिरी केली. 'सत्यशोधक-समाज' स्थापन करून महाराष्ट्रांत त्यांनी एक वेगळाच, आपला असा संप्रदाय निर्माण केला. महाराष्ट्र-समाजांत कसलाहि एकोपा नव्हता. जातिभेदानं समाजरचना पोखरून गेली होती. आनुवंशिक उच्चनीचतेच्या कल्पनांनी लोक पछाडलेले होते. ब्राह्मण आपलं पिढीजात श्रेष्ठत्व कवटाळून बसलेले, तर मराठा आणि तत्सम शेतकरी समाज, अस्पृश्यांना विशेषतः महारांना दूर ठेवण्यांत गुंतलेला! ज्योतिबांनी या साऱ्यांच्या मनोवृत्तीवर प्रहार लगावण्यास सुरुवात करतांच समाज खडबडून जागा झाला.

रानडे, लोकहितवादी हे समाज-सुधारकच होते आणि म. ज्योतिबा फुले हेहि समाज-सुधारकच होते. पण म. फुले यांची झेप मोठी. विचार आणि आचार त्यांनी एकत्र केला, प्रत्यक्ष आचार करतांना असामान्य धैर्य दाखवलं. चातुर्वर्ण्य, अस्पृश्यता, जातिभेद, उच्चनीचता हे ज्यावर आधारलेले होते त्या हिंदुधर्मशास्त्रावरच त्यांनी जोराचा हल्ला चढवला आणि ब्राह्मणवर्गाच्या वर्तनावर, आचरल्या जाणाऱ्या विषमतेवर, अन्याय आणि जुलमावर विदारक टीका केली. हें करीत असतांना, ज्योतिबांनी अनेक संकटांना तोंड दिलं. त्यांच्यावर प्राणसंकटहि आलं, पण ते कचरले नाहीत. दलित जनतेच्या उद्धाराचं, गरिबांना माणुसकी मिळवून देण्याचं कार्य त्यांनी धडाक्यानं सुरूच ठेवलं. ब्राह्मणांच्या सत्तेपासून दलितांचं संरक्षण व्हावं यासाठी त्यांनी त्या काळांतल्या इंग्रज सरकारकडेहि आशेनं पाहिलं. ज्योतिबांनी लढा केला तो ब्राह्मणांच्या अहंकाराविरुद्ध, सनातन हिंदु-धर्मशास्त्राविरुद्ध, मूर्तिपूजेविरुद्ध, स्त्री-दास्याविरुद्ध. पण ब्राह्मणेतर समाजाला ज्योतिबांचं खरं तत्त्वज्ञान आत्मसात करतां आलं नाही, पचवतां आलं नाही. त्यांच्या सत्यशोधक चळवळींतून ब्राह्मणेतरांनी फक्त ब्राह्मण-द्वेषच उचलला. त्यांनी आपल्यांतले जातिभेद, जातीय उच्चनीच भाव कायमच ठेवला. त्यामुळे जातिभेद, चातुर्वर्ण्य समूळ उपटून टाकण्याचं ज्योतिबांचं कार्य पूर्ण होऊं शकलं नाही. त्यांच्यानंतर महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांनीहि ज्योतिबांच्या कार्यालाच वाहून घेतलं. पण त्यांच्याकडूनहि फांद्या तोडण्याचं काम झालं. मूळ कायमच राहिलं. महारांची सेवा करतात म्हणून ब्राह्मणेतरवर्गानं महर्षि विठ्ठल रामजींना बहिष्कृत केलं. त्या काळांत तरी बहुजन-समाजांत, आपण आपला उद्धार करणार आहोंत ही भावना निर्माण होऊं शकली नाही, मूळ धरूं शकली नाही. ज्योतिबांचं कार्यक्षेत्र होतं पुणें-कोल्हापूर. शाहू महाराजांनीहि ज्योतिबांचा समाज-सुधारणेचा कार्यक्रम प्रत्यक्षांत उतरविण्यासाठी सक्रिय नेट धरला होता. या आंदोलनाच्या लाटा जिल्ह्या-जिल्ह्यांत पसरत राहिल्या. कोल्हापूर, सातारा आणि साधारणतः दक्षिण महाराष्ट्र या नव्या विचारानं त्या वेळीं भारावला होता.

राजकीयदृष्ट्या सातारा जिल्हा प्रथमपासूनच जागृत राहिलेला जिल्हा. कॉंग्रेसचं लोण ह्या काळांत सातारा जिल्ह्यांत पसरलं होतंच. सातारा जिल्हा तसा प्रागतिक विचाराचा. पण या प्रागतिक विचारवंतांमध्ये सुखवस्तु वर्गांतील लोकच रस घेत होते. बहुजन-समाजांतल्या खास उल्लेखनीय व्यक्ति कॉंग्रेसच्या स्वराज्याच्या

चळवळींत त्या काळांत विशेषत्वानं सामील झालेल्या नव्हत्या. कोल्हापूरच्या छत्रपति शाहूमहाराजांनी सामाजिक समानतेच्या प्रश्नाला उठाव दिल्यानंतर मात्र १९१०–११ मध्ये सातारा जिल्ह्यांत बहुजन-समाजांत त्याचे पडसाद उमटूं लागले. भास्करराव जाधवांसारख्या मंडळींनी सातारा जिल्ह्यांत येऊन जोमानं कामाला प्रारंभ करतांच या लाटा तालुके आणि खेड्यांपर्यंत पसरल्या. खेड्यांतील विद्यार्थ्यांसाठी मग भराभर शाळा निघूं लागल्या. कर्मवीर भाऊराव पाटील हे भास्करराव जाधव यांच्या पुढारीपणाखाली चाललेल्या सत्यशोधक-समाजाच्या चळवळींत प्रथम उदयास आले. ही सत्यशोधक-चळवळ रुंदावत चालली, परंतु त्यांतून ग्रामीण जनतेच्या शिक्षणाचं एक आंदोलन निर्माण झालं. त्या आंदोलनाचं नेतृत्व भाऊराव पाटील यांनी अखेरपर्यंत केलं. त्याकरिता त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापिली. त्यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या कामालाहि चांगलीच चालना मिळाली आणि लहान-मोठ्या गावीं सर्वत्र शाळा दिसूं लागल्या. बहुजन-समाजाला माणुसकीचे हक्क मिळवून देण्यासाठी सत्य-समाजाची ही चळवळ सुरू झाली होती. ज्योतिबा फुले यांचं मूळ गाव सातारा जिल्ह्यांतीलच कटगुण हें होय. परंतु ते होते पुण्यांत; आणि प्रारंभींची कर्तबगारी पुण्यांतच झाली. त्यांनी उद्घोषिलेली सत्य-समाजाची चळवळ सातारा जिल्ह्यांत कोल्हापूरमार्गे पोंचल्यानंतर ब्राह्मणांचं वर्चस्व फेकून देण्याच्या नादांत कांही विकृत गोष्टी घडूं लागल्या, कांही ठिकाणीं अत्याचार घडले. कॉंग्रेसची चळवळ आणि अन्य चळवळी या ब्राह्मणांसाठी चाललेल्या चळवळी असल्याचा जावई-शोध सत्य-समाजी लावूं लागले. वस्तुतः शेतकऱ्यांच्या आणि बहुजन-समाजाच्या हिताची जपणूक करण्याकडे सातारा जिल्ह्यानं प्रत्येक चळवळींत कटाक्षानं लक्ष पुरवलं होतं; पण सत्य-समाजीयांनी त्याचा विपर्यास केला. तथापि या जिल्ह्यांतील एकोपा भंग पावला नाही. राष्ट्रीय हिताच्या कामांत समंजसपणानं सामील व्हायचं हा या जिल्ह्यानं सांभाळलेला शिरस्ता आहे. टिळकांच्या देहावसानानंतर, १९२० च्या पुढे म. गांधी-युग अवतरलं तेव्हापासून तर सातारा जिल्ह्यांतल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला अधिकच जोर आला.

कॉंग्रेसच्या प्रारंभापासून सातारा जिल्हा अखिल भारतीय प्रयत्नांशीं, विचारांशीं सहभागी झालेला आहे. या जिल्ह्याचे प्रनिनिधि प्रतिवर्षी कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनास उपस्थित रहात आणि सभेचा संदेश, आपल्या जिल्ह्यांत गावोगाव पोंचविण्याचं कार्य पुढे सातत्यानं सुरू ठेवत असत. कॉंग्रेसचं कार्य व धोरण बहुजन-समाजापर्यंत पोंचवण्याची या जिल्ह्याची जुनी परंपरा आहे. हिंदुस्थानांत त्या काळांत ज्या ज्या वेळीं जें इष्ट घडलं त्याला सातारा जिल्ह्यानं जागरुकतेनं उत्कट प्रतिसाद दिला आहे.

वडील बळवंतराव निवर्तल्यानंतर यशवंत चव्हाण देवराष्ट्र येथील शाळेंतील प्राथमिक शिक्षण संपवून कराडला पुढच्या शिक्षणासाठी दाखल झाला तो १९२१–२२ चा काळ हा असा स्वातंत्र्य-चळवळीनं, विचारानं भारलेला आणि भरलेला होता. अवतीं-भवतीं चळवळच दिसत होती आणि ऐकायला मिळत होती.

यशवंतरावांच्या जन्मानंतरचीं १९१४ तें २० हीं सहा वर्षे महाराष्ट्राच्या दृष्टीनं मोठीं अर्थपूर्ण ठरतात. पहिलं महायुद्ध तेव्हाच सुरू झालं. लो. टिळक सहा वर्षांची शिक्षा भोगून मंडालेहून गीतारहस्याचा – कर्मयोगाचा – संदेश देण्यासाठी मायभूमीस परतले. होमरूल लीगची – हिंदी स्वराज्य-संघाची – स्थापना करून याच काळांत त्यांनी चळवळीला तेज प्राप्त करून दिलं. राष्ट्रीय पक्ष निःसत्व आणि विस्कळित बनला होता. टिळकांच्या अनुपस्थितींत मवाळांनी कॉंग्रेसवर कबजा करून तिला निस्तेज करून सोडली होती. मायभूमींत परतल्यावर पुढच्याच वर्षी टिळक आपल्या अनुयायांसह कॉंग्रेसच्या मंडपांत दाखल झाले व तिच्यावर त्यांनी आपलं वर्चस्व प्रस्थापित केलं. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व मी तें मिळवीनच' हा मंत्र टिळकांनी याच काळांत उच्चारला आणि हिंदुस्थानला जबाबदारीचं स्वराज्य देऊन साम्राज्यांतील एक भागीदार करणं हें ब्रिटिश सरकारचं धोरण आहे, असा ब्रिटिश सरकारचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला तोहि याच काळांत ! ब्रिटिश सरकारचा हा जाहीरनामा प्रसिद्ध झाला होता तरी रौलट-बिलं पास करून हिंदुस्थान सरकारनं दपडशाही आरंभली होती आणि त्यांतूनच 'जालियनवालाबागेचं' रक्तरंगण घडलं होतं. त्या दशकाची अखेर लो. टिळकांच्या निधनानं झाली. महाराष्ट्र एका महापुरुषाला मुकला. महात्माजींचा उदय झाला आणि लोकमान्यांच्या निधनानं उघड्या पडलेल्या राजकीय सिंहासनाला समर्थ वारसदार मिळाला तोहि याच काळांत. देशांतील नेतृत्व जहालांनी आपल्या हातीं घेतलं होतं आणि या वेळीं महात्मा गांधी भारतांत आले होते. दक्षिण आफ्रिकेंतील भारतीयांसाठी त्यांनी जो लढा दिला आणि सत्याग्रहाचं नवं तंत्र तिथे वापरलं त्याबद्दल कॉंग्रेस-धुरीणांमध्ये गांधींच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल व संघटना-कौशल्याबद्दल चांगलं मत झालेलं होतं. सत्याग्रहाला ते बलिष्ठांचं शस्त्र म्हणत असत. सत्याग्रहाचं हें शस्त्र घेऊन गांधीजी १९१८ मध्येच खेड्डुतांपर्यंत पोंचले. भारतीयांच्या विरोधाला न मानतां, सरकारनं रौलट-विधेयक कायदेमंडळांत संमत करून घेतलं तेव्हा गांधींची सहनशक्ति संपली आणि सरकारच्या धोरणाला त्यांनी सत्याग्रहानं विरोध करण्याचं ठरवलं. दडपशाहीचे कायदे तोडण्यासाठी त्यांनी सभांतून लोकांना आवाहन केलं आणि ६ एप्रिल १९१९ सालीं देशभर सार्वत्रिक हरताळ पुकारून तो यशस्वी केला. याच महिन्यांत गव्हर्नर ओडवायरनं जालियनवालाबागेंत १३ एप्रिलला हत्याकांड घडवलं. पंजाबच्या या हत्याकांडानं गांधीजींना भारतीय राजकारणाच्या आघाडीवर आणलं. नेमस्त कॉंग्रेसवालेहि गांधीजींना येऊन मिळाले. याच वर्षी नोव्हेंबरमध्ये जी खिलाफत-परिषद झाली तिच्या अध्यक्षपदीं गांधींनाच निवडलं गेलं. मित्रराष्ट्रांच्या विजयानिमित्त होणाऱ्या उत्सवांत मुसलमानांनी भाग घेऊं नये असा परिषदेनं आदेश दिला आणि ब्रिटिशांनी तुर्कस्थानला न्याय दिला नाही, तर बहिष्कार व असहकार पुकारण्याची धमकी दिली. अमृतसर कॉंग्रेस-अधिवेशनानं आणि मुस्लिम लीगनंहि खिलाफत-चळवळीला पाठिंबा दिला. परंतु या संदर्भात ब्रिटिशांकडून अनुकूल प्रतिसाद

मिळाला नाही तेव्हा खिलाफतीच्या मुद्द्यावर गांधींनी चळवळ सुरू करण्याचं ठरवलं आणि त्यानुसार १ ऑगस्टला ही असहकाराची मोहीम सुरू झाली.

दशकाचा प्रारंभ 'भो भो' पंचम जॉर्जच्या राज्यारोहणानं झाला होता. सत्तेचं सिंहासन कलकत्त्याहून निघून दिल्लीला नेण्यांत आलं होतं. ईस्ट इंडिया कंपनीचीं जहाजं आता भारतीय शेतींत उत्पादन होणाऱ्या मालानं भरून, कच्चा माल म्हणून इंग्लंडच्या रोखानं समुद्रांतून तरंगत चाललीं होतीं आणि इथले शेतकरी, शेत-मजूर, मध्यमवर्ग यांना जगण्याची भ्रांत निर्माण झाली होती. जित राष्ट्राचीं – इंग्रजांचीं पावलं – हिंदुस्थानांत अधिकाधिक भक्कम करण्यासाठी आणि सारा देश कायमचा मांडलिक बनवण्यासाठी क्रूरतेनं, कठोरतेनं पडूं लागलीं होतीं. संकटाच्या वेळीं आपल्या बाजूनं खडे होतील अशा लोकांना, निरनिराळ्या जातींना आपल्या कच्छपीं लावण्याचे डावहि सुरू झाले होते. देशांतले अनेक बुद्धिवादी त्यांचं भक्ष्य बनले होते. हिंदुस्थानची जी अवस्था निर्माण होत आहे, आर्थिकदृष्ट्या तो किती रसातळाला जात आहे याची फिकीर त्यांना उरली नव्हती. इंग्रज लोक भारतवासियांना पूर्णपणें लुटत तर होतेच, पण स्थानिक उच्चवर्गीयांनाहि स्वबांधवांना लुटण्याची संधि निर्माण करून देत होते. लोकांनी जास्तींत जास्त अडाणी, अशिक्षित रहावं, गुलामी वृत्तीनं वागावं यासाठीच उच्चवर्गीय, आपली बुद्धि इंग्रजाकडे गहाण टाकून आचार करूं लागले होते. उच्चवर्गीय, व्यापारी आणि सत्ता हस्तगत केलेल्या भारतांतील नव्या सरदारांची इंग्लंडमधल्या प्रतिगाम्यांशीं हात-मिळवणी घडून गेल्यानं हिंदुस्थानांतल्या शेतकऱ्यांचं, शेत-मजुरांचं आणि सर्वसामान्य गरिबांचं कंबरडं मोडून गेलं. इंग्रजांच्या आणि स्थानिक फितुरांच्या कात्रींत त्यांचं जीवन सापडलं. त्यांतून बाहेर पडण्यासाठी त्यांना कुणी मार्ग दाखवीत नव्हतं. यशवंतरावांचे वडील बळवंतराव यांचं सारं जीवन याच कात्रींत कातरलं गेलं होतं.

बहुसंख्य समाज हा खेड्यापाड्यांतून विखुरलेला, अशिक्षित, गरीब, अडाणी समाजाच्या दुसऱ्या थरांत असलेला असा होता. शहरवासीय सुशिक्षित किंवा बहु-जनसमाजांतील जातकुळी उच्च मानणारे, हे या वर्गाची पिळवणूक करण्यांत गुंतलेले असत. त्यामुळे या दोन थरांमध्ये कायमचंच अविश्वासाचं वातावरण निर्माण झालेलं असे. संकटकाळीं किंवा जमिनीचा कबजा वगैरे प्रश्न निर्माण होतांच सारा गाव एक होत असे. त्यांच्यांतील श्रीमंत, सरदार, वतनदार हे कांहीहि म्हणोत, त्यांच्याविरुद्ध गावाचा एक आवाज असायचा. गाव करील तें राव काय करील, अशी स्थिति निर्माण होत असे. या खेडूत मंडळींना, इंग्रज लोक काय करतात, राज्य कुणाचं आहे, स्वातंत्र्य, समता, लोकशाहीचं मूल्य म्हणजे काय, वगैरेबाबत सुरू असणाऱ्या चर्चेची क्वचितच गंधवार्ता असे. त्यांच्यांत जागृति करण्यासाठी म्हणून जे येत तेहि परिस्थितीनं किंवा जात-पोटजातीनं वरच्या थरांतीलच असल्यानं, या दोघांमधील दुरावा कायमच राहिला. सर्वसामान्यांना देशनिष्ठेपेक्षा ग्रामनिष्ठाच अधिक अभिप्रेत होती. नेत्यांच्या निर्णयापेक्षा गाव-पंचांचा निर्णय मान्य करण्याची व तसं वागण्याची त्यांची परंपरागत वृत्ति होती.

इंग्रजी शिक्षण हें सर्वांसाठी खुलं होतं, पण तें त्या वेळीं संपादन केलं ब्राह्मण व कांही पांढरपेशा उच्च म्हणणाऱ्या जातींनी. बहुजन-समाजांतील उच्च कुळींतल्या सरदारांना तें शिक्षण आपल्या समाजांतील तरुणांना उपलब्ध करून देतां येणं सहज शक्य होतं. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. त्यामुळे ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांच्यांतील दरी रुंदावतच राहिली. सरकारी नोकरींतल्या बहुतेक प्रतिष्ठेच्या जागा, सुशिक्षित ब्राह्मण तरुणांनीच व्यापल्या आणि गरीब, खेडूत समाजाची उपेक्षा होत राहिली. पिळवणुकीचं तें भक्ष्य ठरल्यानं या दोन वर्गांतलं वैर वाढलं. इंग्रजांच्या कच्छपीं असणारांनी मराठा व मराठेतर असा भेदहि आपल्या वागण्यांत ठेवल्यानं, साऱ्या समाज-जीवनाच्याच चिंध्या झाल्या. हिंदु समाजापुरतंच हें मर्यादित होतं असं नव्हे. मुसलमान समाजांतहि हेंच दृश्य होतं. या जातींतला बहुसंख्य समाज हा मुल्ला-मौलवींच्या शिकवणुकीनं चालणारा, धर्मनिष्ठ असा होता. तो सारा गरीब होता. या जातींतले जे आंग्ल-विद्याविभूषित होते त्यांनीहि आपली सद्दी कायम टिकवण्यासाठी, मुसलमान समाजांतील बहुसंख्याकांना, अशिक्षित, अडाणी आणि गरीबच राहूं दिलं. त्यांच्यांतील कडव्या धार्मिकतेचा लाभ घ्यायचा तर त्यांना तसं राहूं देण्यांतच त्यांच्यांतील उच्चभ्रूंचा स्वार्थ कदाचित् लपलेला असावा. पारशी, मुसलमान, ब्राह्मण आणि मराठा यांच्यांतील जे उच्चभ्रू, ते राजकीय किंवा सामाजिक चळवळींत आणि उर्वरित सारा समाज हा त्यांच्यापासून अलग, परिस्थितीनं गांजलेला, अशीच एकूण त्या काळांतली परिस्थिति होती.

यशवंतराव कराडांत टिळक हायस्कूलमध्ये शिकत होते त्या वेळच्या समाजाची ही स्थिति ते पहात होते. ते जें अखंड वाचन, मनन, चिंतन करीत त्यांतून मग त्यांच्या मनाची एक वेगळी घडण होऊं लागली. मराठा समाजांतीलच खानदानी, कोणत्याहि कारणानं का असेना, पण गरिबीचं शिफारसपत्रहि गरीब विद्यार्थ्यांना देण्याइतपत फुकाचा मनाचा मोठेपणा दाखवूं शकत नाहीत, हा अनुभव त्यांच्या संग्रहीं होताच. स्वातंत्र्या-साठी देशांत चळवळ सुरू आहे, म. गांधींसारखे नेते त्यासाठी आवाहन करत आहेत, पण बहुजन-समाज हा थंड आहे हेंहि ते अनुभवत होते. यशवंतरावांचा मूळ पिंड खेड्यांतला. खेड्यांतच तो वाढला. परंतु बुद्धि-शक्तीनं अंकुरला तो कराडांत टिळक हायस्कूलमध्ये शिकत असतांना – पुढे महाविद्यालयांतल्या शिक्षणाच्या वेळीं कांही निवडक व्यक्तींच्या आणि ग्रंथांच्या साहचर्यानं, विचारांच्या सोबतीनं! बहुजन-समाजांतला मध्यमवर्ग आणि जीवनाच्या दृष्टीनं स्थिर बनलेली मंडळी स्वतः देश-कारणांत येऊन आपल्या समाजाला राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थिति बदलण्यासाठी प्रेरित न करतां त्यांना आहे त्या स्थितींतच राहूं देण्यांत समाधान कां मानतात, हें त्यांना त्या वेळीं उमजत नव्हतं. इंग्रजी शिक्षण संपादन केल्यानं यशवंतराव हे स्वतःहि आता मध्यमवर्गांत जमा होऊं लागले होते. पण त्याच वेळीं त्यांचं मन त्यांना बजावत होतं की, आपण स्वतःच बहुजन-समाजांत जाऊन, त्यांना त्यांच्या भाषेंत सर्व समजावून सांगितलं पाहिजे आणि स्वातंत्र्य-चळवळीचा प्रवाह वाढण्यासाठी बहुजन-समाजाच्या

प्रचंड शक्तीचा संगम या चळवळीच्या उद्दिष्टांशीं घडविला पाहिजे. आणि पुढे १९३० च्या म. गांधींनी सुरू केलेल्या असहकाराच्या चळवळीनं यशवंतरावांना ती संधि चालून आली. आधी केलं मग सांगितलं, याच तत्त्वाचं पालन करण्याचं त्यांनीं ठरवलं आणि १९३० च्या चळवळींत स्वतःच एक सत्याग्रही म्हणून प्रथम उडी घेतली. त्याच वेळीं पुण्याच्या सत्यशोधक-समाजाचे नेते केशवराव जेधे आणि अनेक तपं दलितांच्या सेवेंत जीवन घालविलेले विठ्ठल रामजी शिंदे हे या चळवळींत सामील झाले.

सातारा जिल्हा हा संस्थानिक, सरंजामदार, जहागीरदार, वतनदार यांनी त्या काळांत वेढलेला जिल्हा. जातीयतेचं पीक सर्वत्र फोफावलेलं. ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वादाचीं वेटोळीं सर्वत्र निर्माण झालेलीं. सामान्यांची शेती निकृष्ट आणि उपासमारींत ठेवणारी. अज्ञान सर्वत्र पसरलेलं. राजकीयदृष्टया जागरूक, परंतु ही जागरुकता विशिष्ट वर्गांत अडकून पडलेली. पण याहि परिस्थितींत यशवंतराव म. गांधींचे सत्याग्रही म्हणून तुरुंगांत गेले त्या वेळीं बहुजन-समाजांतील हजारोंचीं मनं त्यांनी खेचून घेतलीं. शिकलेला, आपल्यांतला एक तरुण, पुढारी झाल्याचा तो आनंद होता, समाधान होतं. या एका लहानशा घटनेनं गांधींची काँग्रेस या लोकांच्या अंतःकरणापर्यंत पोंचली. यशवंतराव हे साताराच्या मातींतले. कठीण परिस्थितीशीं सामना करून शिक्षण घेणारे. त्या काळांत निवडक लोकांच्या पंक्तींत सामील होऊनहि ते केवळ त्यांचेच बनले नव्हते, तर सामान्य समाजासमोर जाऊन ते उभे राहिले आणि त्या समाजाला बरोबर घेऊन पुढच्या पल्ल्याला निघाले. प्रारंभींच्या काळांत त्यांनीं सामान्य समाजांतल्या शिक्षितांमध्यें जागृति केली. सामाजिक कामासाठीं त्यांना प्रवृत्त केलं. त्यांच्यासाठीं गणेशोत्सव व शिवजयंति-उत्सव सुरू केले. त्याची अनुकूल प्रतिक्रिया उमटली. परिस्थिति अनुकूल होती. पण सर्व समाजच बुद्धीनं, गुणानं, कर्तृत्वानं आणि परिस्थितीनं मोठा व्हावा, ही तळमळ मनांत होती. त्यामुळे पुढारीपणाची एक पायरी वर चढून जाण्याची संधि मिळतांच, इतरांनाहि वर चढण्यास हात देण्यासाठीं ते मागे वळत राहिले आणि एकेकाला वर घेऊन जिल्ह्यांत त्यांनी पुढाऱ्यांचा आणि कार्यकर्त्यांचा एक संच तयार केला.

स्वस्थ चित्तानं, अवधानपूर्ण राहून यशवंतराव अवतीं-भवतीं पहात होते. परिस्थिति जाणून घेत होते. कुठलीहि मोठी परंपरा त्यांच्या पाठीशीं नव्हती. तशा घरांत त्यांचा जन्महि झालेला नव्हता; घराच्या मोठेपणाचं श्रेय त्यांना प्राप्त होणारं नव्हतं. पण ज्यानं जिथे जन्म घेऊन कुळाची कीर्ति वाढवली तोच जन्म श्रेष्ठ मानला जातो असं इतिहासाच्या वाचनानं त्यांना ज्ञात होऊं लागलं. मोठेपण प्राप्त झालं, कर्तृत्वानं मोठेपण मिळाल तरी विवेकानं रहावं आणि वर्तावं असं भूगोलाच्या वाचनानं, गंगौघाच्या वर्तनानं त्यांच्या मनांत मूळ धरूं लागलं. हिमालयासारखी उत्तुंग प्रतिष्ठा लाभलेली आणि सागराप्रमाणे विशाल, गंभीर असणारी गंगा विवेकी आहे हा संस्कारहि वडत राहिला. वडील परलोकवासी झालेले. त्यांच्या मायेची छाया यशवंतरावांना मिळालीच नाही. मातेच्या दुधांतून मात्र त्यांना अनेक गुण मिळाले. शील,

विवेक हे गुण त्यांना आईपासून मिळाले. चारित्र्य, सद्गुण, स्वभाव, मन या गोष्टी मातेच्या दुधांतूनच मिळतात. गुरुकडून नंतर मिळणारं ज्ञान या गुणांना संवर्धित करतं. माताच मुलाला आत्मनिष्ठासंपन्न करूं शकते.

यशवंतरावांच्या मातोश्री विठाई म्हणजे करुणेची नदी होती. स्वभावानं शांत, उदार आणि धर्माचरणी. लोककल्याणांत स्वाभाविक रुचि. विठाईला पतीचा आधार नव्हता – कुणाचाच नव्हता. पण या मातेच्या मनांत प्रभु-प्रेम अपार होतं. तोच आधार होता. मुलांच्या अभ्युदयासाठी शारीरिक, मानसिक खस्ता तिनं त्याच आधारावर काढल्या. मुलं लहान आहेत, पण हीं अंजिराचीं झाडं मोठीं होतील, फुलतील, त्यांच्या कर्तृत्वाला गोजिरवाणीं मधुर फळं येतील हें त्या माऊलीचं स्वप्न. आई हीच चव्हाण-कुटुंबाची श्रीमंती होती. वय वाढत असतांना आपण एका सामान्य कुटुंबांतील आहोंत याची जाणीव करून देणाऱ्या घटना यशवंतरावांच्या अवतीं-भवतीं घडतच होत्या. जाणिवेनं ते सर्व न्याहाळीतहि होते, पण त्याची खंत त्यांच्या मनाला कधी शिवली नाही. आईनं निर्माण केलेल्या प्रेमाच्या वातावरणाचा कोश भेदून सामान्यपणाच्या जाणिवा मनापर्यंत कधी पोंचल्या नाहीत. यशवंतरावांची आई अशिक्षित – खेड्यांत वाढलेली. पण मनाचा आणि कर्तृत्वाचा पल्ला दांडगा. देवराष्ट्राच्या सगुण मातीचे गुण विठाई-माऊलीच्या रोमरोमांत होते. आयुष्यांत तिनं कुणाचा राग केला नाही, द्वेष केला नाही. मनानं धार्मिक आणि वृत्तीनं सरळ. आयुष्यांत या माऊलीच्या वांट्याला दुःखा-मागून दुःखं आलीं, पण तिचा सोशिकपणा कायम राहिला. आपली संस्कारांची श्रीमंती विठाईनं मुलापर्यंत पोंचवली आणि जीवनभर संकटाशीं सामना करण्यासाठी त्यांना हिंमतवान बनविलं. ' नका बाळांनो डगमगूं। चंद्र-सूर्यावरील जाईल ढगू ॥ ' या त्यांनी स्वतःच रचलेल्या ओवींतून मुलांना उपदेश मिळत होता. परिस्थितीचे ढग जमले असले तरी, आज ना उद्या ते जातीलच. चंद्राला आणि सूर्याला ढगांनी झाकण्याचं शौर्य दाखवलं, तरी तें क्षणकाल टिकणारं असतं. ढग आपल्या वाटेनं निघून जातात आणि चंद्र-सूर्याची प्रभा स्थिर रहाते. व्यावहारिक जगांत वावरतांना चव्हाण-कुटुंबावर संकटं कोसळत राहिलीं. घाबरून, गांगरून जावं अशीं तीं संकटं होतीं. विठाईसारखी निराधार माता त्या संकटानं घाबरणं, गांगरणं स्वाभाविक असलं तरी एखाद्या असामान्य स्त्रीप्रमाणे स्वतःला आणि मुलांनाहि सावरायचं, हाच आदर्श तिनं निर्माण केला. वर्षानुवर्षे दुःखाशीं सोबत करूनहि दिलाचा दिलदारपणा रहाणं हें देणं देवाचं असावं लागतं. विठाईला आणि यशवंतरावांनाहि तें देणं जन्मजातच मिळालं असावं. परिस्थितीच्या चक्रव्यूहांतून हळुवारपणें बाहेर पडणं त्यामुळेच यशवंतरावांना साधतां आलं.

मातेकडून मिळलेल्या सर्व गुणांचं संवर्धन यशवंतरावांच्या शालेय जीवनांत घडत राहिलं. देवराष्ट्राच्या प्राथमिक शाळेंत बंडूमास्तरांचे – गोवंडे गुरुजींचे संस्कार बाल्यपणांत त्यांना लाभले आणि तिथून कराडला टिळक हायस्कूलमध्ये आल्यानंतर दत्तोपंत पाठक,

शेणोलीकर, हायस्कूलचे हेडमास्तर द्विवेदी आदि गुरुजनांकडून धडे मिळत राहिले. हे गुरुजन नमुनेदार शिक्षण तर देत होतेच, शिवाय यशवंत चव्हाण या विद्यार्थ्याबद्दल त्यांना जिव्हाळा होता. वैयक्तिक संबंध ठेवून ते लक्ष देत होते. यशवंतराव खेड्यांतून आले होते, पण ते तसे खेडवळ राहिलेले नव्हते. शाळेंतल्या अभ्यासाबरोबर, त्या चार भिंतींच्या पलीकडल्या जगांत घडणाऱ्या घटना हाहि त्यांच्या अभ्यासाचा विषय होता. विविध विषयांवरील पुस्तकांचं वाचन सुरू होतं. त्यांचे मधले बंधु गणपतराव, त्यांना परिस्थितीमुळे फार शिक्षण घेतां आलं नाही; पण यशवंतानं खूप शिकावं असा त्यांचा प्रयत्न होता. ज्ञानोबा हे थोरले बंधु. कुटुंबाचे पालनकर्ते तेच होते. तुटपुंजा पगारांत यशवंतासाठी होईल तेवढं साहाय्य ते करीत राहिले.

मधले बंधु गणपतराव यांचं मात्र आपल्या धाकट्या भावाकडे बारकाईनं लक्ष असे. गणपतराव हा एक उमदा माणूस होता. शरीरयष्टि मजबूत. कुस्त्यांचा लहानपणापासून नाद. गणपतराव मोठे कर्तबगार आणि महत्त्वाकांक्षी होते. परिस्थितीमुळे त्यांना आपलं शिक्षण पूर्ण करतां आलं नाहीं, मॅट्रिकपर्यंतच ते शिकले; पण यशवंतानं खूप शिकावं, कर्तृत्ववान् व्हावं ही त्यांची दांडगी इच्छा. त्यांना स्वतःला शिक्षण सोडावं लागलं असलं तरी अन्य कांहीं कर्तबगारी करावी, आपली गरिबीची परिस्थिति बदलून टाकावी यासाठी कांहीं ना कांही त्यांचे उद्योग सुरू असत. ते मोठे हिकमती होते. चलाखपणामुळे तर भल्या भल्या पहिलवानांना माती चारीत. गणपतराव आणि यशवंत यांच्या वयांत फार मोठं अंतर नव्हतं. ते दोघे बरोबरीनंच वागत असत. गणपतरावांबरोबर यशवंतहि लहानपणीं तालीम करूं लागला आणि कुस्त्या खेळूं लागला. गणपतरावांचा पेहराव खास सातारी. डोईवर फेटा हा असायचाच. यशवंताहि फेटा बांधून भावाबरोबर पहिलवानी थाटांत हिंडत असे. यशवंत अभ्यासांत जसा हुषार आणि तल्लख बुद्धीचा, तसाच कुस्ती करण्यांत चलाख. शाळेमध्ये त्यानं अनेकदा कुस्तीचे फड जिंकले.

थोरले बंधु ज्ञानोबा हे नोकरीचं चाकोरीचं जीवन जगणारे होते, पण गणपतरावांचं तसं नव्हतं. अवतीं-भवतीं घडणाऱ्या घटनांचं त्यांना आकर्षण असे. आपला समाज गरीब, अडाणी, मागासलेला आहे, शिक्षण नसल्यामुळे त्यांना नोकऱ्यांत संधि नाहीं हें त्यांना समजत होतं. नोकऱ्यांची आणि मोठेपणाची मक्तेदारी एका विशिष्ट वर्गानं स्वतःकडे घेतली आहे आणि हा वर्ग गरिबांच्या गरिबीचा फायदा घेऊन त्याची पिळवणूक करतो याबद्दल त्यांच्या मनाला यातना होत असत. शहरांतल्या बहुजनसमाजापेक्षाहि खेड्यांतल्या समाजाचं जीवन पूर्णपणें निस्तेज होतं. महात्मा फुले यांची सत्यशोधक-समाजाची चळवळ त्या काळांत सुरू होती. या चळवळीनं गणपतरावांच्या मनाची पकड घेतली आणि ते या चळवळीचे प्रभावी कार्यकर्तेच बनले. जेधे, जवळकर, भास्करराव जाधव हे या चळवळीच्या आघाडीवर होते. कराडमध्ये त्या काळांत श्री. कळंबे गुरुजी हे चळवळीचं काम मोठ्या जोमानं करीत असत. गणपतराव हे त्यांचे शिष्यच बनले. या चळवळीचा प्रचार आणि प्रसार करण्याचं काम त्यांनी धडाक्यानं केलं.

यशवंतरावांनी या चळवळींत आघाडीवर राहून काम करावं असा गणपतरावांचा प्रयत्न असे. पण यशवंतराव हे अभ्यास आणि अभ्यासाव्यतिरिक्त अन्य वाचन यांत गढलेले असत. लहानपणीं वाचत बसण्याशिवाय यशवंतरावांनी घरांतलं अन्य काम असं कांही कधी केलं नाही. सत्यशोधक-चळवळीचं वाङ्मय त्या काळांत प्रसृत होत असे. इतर कुठले तरी ग्रंथ वाचण्यापेक्षा या चळवळीचीं पुस्तकं वाच असा गणपतरावांचा यशवंतरावांच्यामागे लकडा असे; पण यशवंतराव त्याकडे दुर्लक्ष करीत. घरांत आणि अवतीं-भवतीं सत्य-समाजाची चळवळ वाढत होती, पण यशवंतरावांना तिचं कधी आकर्षणच वाटलं नाही. गणपतरावांच्या आग्रहाखातर त्यांनी मग, श्री. पंढरीनाथ पाटील यांनी त्या वेळीं लिहिलेल्या, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या चरित्राचं वाचन केलं. सत्य-समाजाच्या सभा जिथे होत, तिथल्या कांही सभांना उपस्थित राहून, सभेंतलीं भाषणंहि त्यांनी ऐकलीं. या भाषणांतून ब्राह्मण-समाजावर कडक, प्रसंगीं निरर्गल टीका असायची. या भाषणांनंतर मग दोघा बंधूंमध्ये वाद होत असत. यशवंतरावांचं म्हणणं केवळ टीका करण्यानं आणि अद्वातद्वा बोलण्यानं समाजाची सुधारणा होणार नाही. त्याकरिता प्रत्यक्ष शिक्षणाचं बोट धरलं पाहिजे. समाजानं शहाणं बनलं पाहिजे. सत्य-समाजाच्या लोकांनी विधायक दृष्टिकोनांतूनच समाजांत जागृति करणं शेवटीं समाजाच्या कल्याणाचं ठरणार आहे, असे वाद नेहमीच घडत; पण यशवंतरावांना सत्य-समाजाच्या दावणीला बांधण्यांत गणपतरावांना यश कांही आलं नाही.

सत्य-समाजाच्या चळवळीमुळे गणपतरावांना जी नवी दृष्टि प्राप्त झाली, त्यामुळे आपण आपली परिस्थिति बदलण्यासाठी कांही तरी करावं या त्यांच्या पूर्वीच्या विचाराला बाळसं प्राप्त झालं. त्यांचे एक मित्र होते श्री. बाबूराव डुबल. त्यांच्याशीं त्यांनी याबाबत चर्चा केली आणि निष्कर्ष असा ठरला की, मध्यप्रदेशांत पडीक जमीन बरीच आहे, तिथे जाऊन आपण उत्तम शेती करावी. जमीन लागवडीखाली आणावी. विचार पक्का झाल्यानंतर तयारी सुरू झाली आणि श्री. डुबल यांनी पैशाची जमवाजमव करून निघण्याचं निश्चित झालं. त्याप्रमाणे डुबल व गणपतराव पडीक जमिनीच्या शोधांत निघाले. मध्यप्रदेशांत इंदूर राज्यांतील गरोठ या गावीं अशी जमीन त्यांना शोधाअंतीं सापडली व मग तिथे दोघांनी मिळून शेतीचा व्यवसाय आरंभिला. ठरलं होतं तें असं की, डुबल यांनीं भांडवल-गुंतवणूक करायची, गणपतरावांनी कष्ट करायचे व त्याच्या मोबल्यांत त्यांना उत्पन्नाचा चौथा हिस्सा द्यायचा. काम सुरू झालं, जमीन लागवडीखालीहि आली; परंतु सात-आठ महिन्यांनंतर एक दिवस डुबल हे गरोठ येथून बाहेर पडले. ते महाराष्ट्रांत आले आणि सरळ लष्करी नोकरींत दाखल झाले. गणपतराव तिथे एकटेच राहिले. पैशाचं पाठबळ नाहीं, परका प्रांत, अशा अवस्थेंतहि गणपतराव दिवसामागून दिवस ढकलत तिथेच राहिले. इकडे कराडांत, कुटुंबांतील लोकांना त्यांची कांहीच माहिती कळेनाशी झाल्यानं सर्वजण चिंतेंत पडले. दरम्यान गणपतराव तिथे एकटेच असून आजारी असल्याचं कळतांच, कराडच्या लोकांनीं त्यांना

परत बोलावलं आणि एक दिवस जमिनीचा लोभ सोडून गणपतरावहि तिथून बाहेर पडले. गरोठला ते मलेरियानं आजारी पडले होते आणि त्यामुळे त्यांना कमालीचा अशक्तपणा आला होता. त्या अवस्थेंतच ते घरीं येण्यासाठी निघाले. कराडांत घरीं पोंचले तेव्हा अतिशय खंगलेले, अंगावर धड कपडा नाही अशा अगदी विपन्नावस्थेंत त्यांना आलेलं पाहून यशवंराव कळवळले. कांही दिवस प्रकृति सुधारण्यांत गेल्यावर, गणपतराव मग नोकरीच्या मागे लागले. इस्लामपूर येथे त्यांना अखेर नोकरी मिळाली. दरम्यान ज्ञानोबांची, थोरल्या बंधूंची नोकरी संपली होती. त्यामुळे यशवंताच्या शिक्षणाची जबाबदारी गणपतरावांनाच सांभाळावी लागली. कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्यासाठीं मग ते कराडला आले आणि एक-दोन वर्षे जकात-नाक्यावर आणि नंतर लँड मॉर्गेज बँकेंत कारकुनाची नोकरी करीत राहिले.

कराडांत असतांना गणपतराव सामाजिक कार्यांत भाग घेऊं लागले होते. गणपतराव आणि यशवंतराव यांचा राजकीय तत्त्वज्ञानाच्या बाबतींत क्वचितच सख्य जमलं. कराडांत सार्वजनिक कामांत भाग घेऊं लागल्यानंतर गणपतरावांनीं एकदा म्युनिसिपालिटीची निवडणूक लढवण्याचं ठरविलं. योगायोग असा की, काँग्रेस-उमेदवाराच्या बाजूनं यशवंतरावांचा प्रचार आणि गणपतराव हे काँग्रेस-विरोधांतील उमेदवार असं चित्र निर्माण झालं. दोघांनींहि कसोशीनं प्रचार केला; परंतु निवडणुकीचा जो निकाल जाहीर झाला त्यामध्ये गणपतराव पराभूत झाले होते. काँग्रेसनिष्ठेनं यशवंतरावांनी आपल्या सख्ख्या भावासच, प्रभावी प्रचारानं पराभूत केलं होतं. निकाल जाहीर झाल्यानंतर मात्र यशवंतराव मनांतून हबकले. भावाचा पराभव केल्यानंतर त्यांना तोंड दाखवावं कसं! मनाच्या उद्विग्न अवस्थेंत ते बाहेरच फिरत राहिले. निकाल ऐकून गणपतराव घरीं गेले होते. रात्रीं जेवणवेळ टळून गेली तरी यशवंता घरीं फिरकला नाही तेव्हा गणपतरावहि अस्वस्थ झाले आणि त्याच्या शोधासाठी बाहेर पडले. हिंडतां हिंडतां, एका ठिकाणीं आपला भाऊ विमनस्क मनानं बसून राहिल्याचं त्यांनी पाहिलं आणि स्वतः त्याला घरीं आणून मग दोघांनी एकत्र भोजन केलं. आपल्या पराभवानं खचून गेलेल्या यशवंताला त्यांनी दोष मात्र दिला नाही. उलट जिद्दीनं विजय संपादन करणाऱ्या आपल्या भावाबद्दल त्यांना अभिमान वाटत होता. यशवंताला त्यांनी शाबासकीच दिली. आईची आणि त्या खालोखाल गणपतरावांची प्रतिमा यशवंतरावांच्या मनावर कोरली गेलेली आहे. गणपतराव हे मनानं उमदे होते. महत्त्वाकांक्षी होते. यशवंतानं मोठं व्हावं हा त्यांचा ध्यास असे. काँग्रेसच्या विरोधांत असतांना, ज्या भावानं पराभूत केलं त्यालाच त्यांनी असेंब्लीच्या निवडणुकीसाठी काँग्रेसतर्फे उभं राहिलंच पाहिजे अशी प्रेमाची सक्ती पुढच्या काळांत केली आणि यशवंतरावांना विधायक राजकारणाचा रस्ता मिळवून दिला. १९४१ पर्यंत, म्हणजे यशवंतराव वकिलीची परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत गणपतराव नोकरी करीत राहिले. त्यांच्या शिक्षणाला मदत केली. यशवंतराव वकील झाले असले तरी, वकिलीच्या व्यवसायाकडे त्यांचं लक्ष

नव्हतं. मागोमाग बेचाळीसचं 'चले जाव' आंदोलन सुरू झालं आणि यशवंतराव त्या वेळीं भूमिगत झाले.

सरकारचा ससेमिरा मग यशवंतरावांच्या कुटुंबियांच्या मागे लागला आणि त्यांतच गणपतराव स्थानबद्धतेंत अडकले. त्याच वेळीं ज्ञानोबाचं निधन झालं आणि गणपरावांना क्षयानं पछाडलं. औषधासाठी मग त्यांना, मिरजेच्या दवाखान्यांत ठेवण्यांत आलं. १९४५–४६ चा तो काळ. असेंब्लीच्या पहिल्या निवडणुकीचे नगारे वाजूं लागले होते. ही निवडणूक यशवंतरावांनी लढवावी असा मित्रांचा आग्रह होता; परंतु गणपतराव आजारी, स्वतःची पत्नी आजारी, आर्थिक ओढाताण, अशा परिस्थितींत यशवंतराव निवडणुकीपासून दूर होते. पण त्या आजारीपणांतहि, अंथरुणावरून गणपतरावांनी आपली इच्छा सांगितली, किंबहुना आदेशच दिला. त्यामुळे यशवंतरावांना निवडणुकीला उभं रहावं लागलं. या पहिल्याच निवडणुकींत ते यशस्वीहि झाले. गणपतरावांना कमालीचं समाधान झालं आणि त्या आजारी अवस्थेंत मोठा झालेला यशवंतराव त्यांना दिसूं लागला. मनाशीं ते कांही जुळणी करात होते, पण पुढचं खरं मोठेंपण पहाण्याचं, आपली महत्त्वाकांक्षा पूर्ण झाल्याचं समाधान गणपतरावांना मिळवून देण्याचं नियतीच्या मनांत नव्हतं. निवडणूक झाली, यशवंतराव विजयी झाले, नुकतंच कुठे पुढचं पाऊल टाकतात न टाकतात तोंच गणपतरावांच्या आजारानं उचल खाल्ली आणि १९४७ मध्ये ते इहलोक सोडून गेले. मागे राहिली त्यांची चार मुलं. अशोक, दादा आणि विक्रम हे तीन मुलगे आणि एक मुलगी. श्री. बाबूराव काळे यांची पत्नी सौ. लीला ही गणपतरावांची मुलगी. या मुलांचं संगोपन, शिक्षण करण्याची जबाबदारी मग यशवंतरावांच्याकडेच आली. मातोश्री विठाई आणि यशवंतरावांच्या पत्नी सौ. वेणूबाई यांनी स्वतःच्या मुलांप्रमाणे या लहानग्यांचा सांभाळ केला, शिक्षण दिलं, मोठं केलं. गणपतरावांचा सर्वांत धाकटा मुलगा राजा (विक्रम), एम्. बी. बी. एस्. ची परीक्षा उत्तीर्ण होऊन ज्या दिवशीं डॉक्टर झाला त्या दिवशीं आनंद व्यक्त करण्यासाठी गणपतराव आपल्यांत नाहीत याची तीव्रतेनं जाणीव होऊन यशवंतरावांच्या काळजांत कालवाकालव झाली. डोळ्यांत पाणी उभं राहिलं. गणपतरावांच्या कर्तृत्वाचा, निर्भेळ प्रेमाचा आणि वडीलकीचा ठसा यशवंतरावांच्या मनावर निरंतरचाच कोरलेला आहे. बळवंतरावांच्या अकालीं निधनानंतर, वडील भावाचा – गणपतरावांचा त्यांना मोठाच आधार होता. गणपरावांनीहि त्यांना कधी वडिलांची ताटातूट झाल्याचं भासूं दिलं नव्हतं. परंतु एकमेकांचं सुख एकमेकांनी पहावं असं दोघांच्याहि दैवांत नव्हतं. गणपतरावांच्या निधनानं विठाईवर तर आकाशच कोसळलं. थोरला मुलगा ज्ञानोबा, त्यापूर्वींच काळानं ओढून नेला होता आणि आता दुसरा मुलगा गणपतराव! विठाईनं अनेक संकटांशीं आजवर सामना केला, पण गणपतराव गेल्याच्या दुःखानं या माउलीचं मन फाटून गेलं. विठाईला यशवंत आणि यशवंताला विठाई असंच त्या कुटुंबांत आता राहिलं होतं. या मुलांच्या

लहानपणीं आपलीं हीं तिन्ही बाळं, अंजिराचीं लहान झाडं, तीं मोठीं होतील, त्यांना मधुर फळं येतील अशीं स्वप्नं या माउलीनं पाहिलीं होतीं. यांतलीं दोन झाडं आता उन्मळून पडलीं होतीं आणि यशवंताच्या रूपानं एकमेव झाड या माउलीसमोर उभं होतं. यशवंता शिकला, वकील झाला, निवडणुकींत विजयी झाला, मोठा झाला हें सुखाचं वातावरण पसरलं होतं, पण त्याच वेळीं दाराबाहेर उभं असलेलं दुःख घरांत आलं होतं. बाहेर सुख तेव्हा घरांत दुःख आणि घरांत सुख तेव्हा बाहेर दुःख, हें चव्हाणांच्या घरांतलं रहाटगाडगं असंच फिरत राहिलं.

# ३

मनाच्या कोंडवाड्यांतून बाहेर पडून कांही तरी करावं असं यशवंतरावांचं मन हुंकार देत होतं. सभोवतीं सुरू असलेल्या राजकीय, सामाजिक चळवळीचा वेध ते घेतहि होते. परंतु परिस्थितीचं कुंपण तोडून बाहेर पडावं लागणार होतं. त्यासाठी प्रसंगीं अंग रक्तबंबाळ होणार होतं. बाहेरचं सामाजिक वातावरण स्वच्छ, शुद्ध राहिलेलं नव्हतं. राजकीय चळवळीनं जागृत झालेला सातारा जिल्हा आता वेगळ्याच दिशेनं धांव घेऊं लागला होता. ब्राह्मणेतर-चळवळीची वावटळ तिथे उठली होती. तिचा एकांगी प्रचार झपाट्यानं वाढत होता. समाजासमोर जे विचार व्यक्त केले जात होते त्यामुळे मोठाच वैचारिक गोंधळ निर्माण झाला. ही चळवळ जोमांत असतांनाच लो. टिळकांच्याविरोधी बोलणं, लिहिणं हे उद्योग जाणतीं समजलीं जाणारीं माणसं करत होतीं. यशवंतरावांचं वाचन सुरू होतं. वस्तुतः हिंदुस्थानसमोर त्या वेळीं अनेक महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले होते. म. गांधी स्वातंत्र्यासाठीं सत्याग्रह व चळवळ पुकारत होते. क्रांतिकारक क्रांतीचा वणवा पेटवत होते. इंग्रज लोक देशभक्तांना तुरुंगांत बंद करत होते. या घटनांकडे जाणतीं माणसं लक्ष कां देत नाहींत याची हुरहुर तरुण यशवंतरावांच्या मनांत होती. त्यामुळेच सत्यशोधक-समाजाची चळवळ घरांत आणि अवतीं-भवतीं वाढत असूनहि स्वतः यशवंतराव त्यांत गुरफटले गेले नाहीत. ब्राह्मणेतर-चळवळीचं आकर्षण त्यांच्या मनांत कधीच निर्माण झालेलं नव्हतं, उलट क्रांतिकारकांचं क्रांतिकार्य, राष्ट्र-पुरुषांचीं चरित्रं, लोकमान्यांचं राजकारण, कॉंग्रेसच्या नेत्यांची शिकवण इत्यादींच्या गंभीर वाचनानं त्यांच्या मनाला विचाराची बैठक प्राप्त झाली आणि आपण कांही तरी करावं ही मनांतली हुरहूर वाढण्यांतच त्याचा परिणाम झाला.

देशांत असहकाराची चळवळ १९२१ पासूनच सुरू झालेली होती. नागपूरच्या अधिवेशनानं कॉंग्रेसची नवी घटना मंजूर करून कॉंग्रेसच्या रचनेंत क्रांति केल्यानंतर कॉंग्रेस एक आटोपशीर व प्रभावी संघटना बनली. जिल्हे, शहर, तालुके व खेडीं अशा

पातळीपर्यंत काँग्रेस पोंचावी हा या नव्या रचनेचा हेतु होता. या नव्या रचनेमुळे काँग्रेसला अधिक प्रातिनिधिक स्वरूप आलं आणि सभासद-संख्या वेगानं वाढूं लागली. त्या काळांत सभासदत्वाची वर्गणी चार आणे ठेवली होती, पण ती सक्तीची नव्हती. काँग्रेसचीं उद्दिष्टं मान्य करणं आणि तिचीं तत्त्वं पाळणं एवढी पात्रता सभासद होण्यास पुरेशी होती. याचा परिणाम काँग्रेस कोट्यवधि गरीब जनतेपर्यंत पोंचण्यांत झाला. आणि हळूहळू काँग्रेस ही राजकारणाला समाजकारण बनवण्याचं साधन बनली. कांही विधायक उपक्रमहि काँग्रेसनं हातीं घेतले. टिळक-स्वराज्य-निधि सुरू करण्यांत आला व या निधींत सहा महिन्यांच्या आंत एक कोटि रुपये जमा झाले. त्यामुळे सांपत्तिक स्थिति सुरक्षित बनली. गांधींच्या नेतृत्वाखाली एका अभिनव शस्त्रानं साम्राज्यशाहीशीं लढा देण्याचा चंग आता काँग्रेसनं बांधला होता.

त्यांतूनच मग सर्वत्र बहिष्काराची लाट उसळली. ग्रामीण भागांत तर नव्या उत्साहानं चैतन्य खेळूं लागलं. देशाच्या कांही भागांत कर-बंदीची चळवळ सुरू झाली, तर कांही भागांत कामगारांनी संपाचं हत्यार उपसलं. विलायती कापडावर बहिष्कार घालण्यांत येऊन दारूची विक्री बंद करण्यांत आली; परंतु या सर्वांपेक्षांहि देशाच्या सर्व भागांत जनता खडबडून जागी झाली आहे हेंच सरकारला भयावह वाटत होतं. इंग्लंडचे युवराज प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या भारत-भेटीवर काँग्रेसनं बहिष्कार घातला तेव्हा तर असहकाराच्या चळवळीचं यश उठून दिसूं लागलं. मुंबईत आणि कलकत्त्यांत सार्वजनिक हरताळ पडले आणि मुंबईच्या सभेंत, चौपाटीवर स्वतः गांधींनीच विलायती कपड्यांची होळी केली. लोकांनी गोऱ्या लोकांवर हल्लेहि केले आणि सर्वत्र दंगा सुरू होतांच पोलिसांनी गोळीबार करून अनेकांना यमसदनास पाठवलं. दडपशाहीचे उपाय योजून चळवळ मोडून काढण्यासाठी सरकारनं सर्व प्रकारच्या अमानुषतेचा अवलंब केला.

१९२१ च्या अखेरीपर्यंत गांधीजींखेरीज सर्व मोठे पुढारी तुरुंगांत गेले होते. काँग्रेसनं या वेळीं कांही अटींवर सविनय कायदेभंगाची मोहीम चालवण्यास अनुमति दिलेली होती; परंतु मोपल्यांचं बंड आणि मुंबईतील दंगे पाहून गांधींनी चळवळीचा वेग कमी करण्याचं ठरविलं. शहरांतील चळवळीला हिंसेचं गालबोट लागत राहिल्यानं त्यांनी ही चळवळ खेड्यांत नेण्याचं ठरवलं. अहमदाबादच्या काँग्रेस-अधिवेशनानंहि व्यक्तिशः किंवा सामूहिक सविनय कायदेभंगाला संमति दिली आणि गांधींनी १ फेब्रुवारी १९२२ला व्हाइसरॉयला निर्वाणीचा संदेश पाठवून "भाषण-स्वातंत्र्य, संघटन-स्वातंत्र्य व वृत्तपत्र-स्वातंत्र्य यांसारख्या प्राथमिक हक्कांसकट इतर सर्वच मागण्या अमलांत आणण्यासाठी अहिंसक मार्गानं चळवळ करण्याखेरीज देशाला गत्यंतर उरलेलं नाही," असं कळवलं आणि स्वतः गुजरातच्या बार्डोली तालुक्यांत प्रयोग करण्याचं ठरवलं. परंतु याच वेळीं चौरीचौरा येथील हिंसक प्रकार घडल्यामुळे गांधींनी सविनय कायदेभंगाची मोहीम सोडून विधायक कार्यक्रम हातीं घेण्याचा निर्णय केला. गांधींचा बार्डोलीचा हा निर्णय ऐकून मात्र अनेक राष्ट्रीय पुढाऱ्यांना धक्का बसला. सुभाषबाबूंनी त्याचं वर्णन

'राष्ट्रीय आपत्ति' असं केलं. मानवेंद्रनाथ रॉय यांनी जनतेला आणि नेतृत्वाला दुबळं ठरवणारा गांधींचा हा निर्णय असल्याचं सांगितलं. गांधी हे जनतेचा उत्साह मारून टाकत आहेत असा इतरांनी आरोप केला आणि जवाहरलाल नेहरू हेहि आश्चर्यचकित व दिङ्मूढ बनले. जवाहरलालांनी आपल्या आत्मचरित्रांतच पुढे तसं नमूद करून ठेवलं आहे. हिंसा-अहिंसेचा वाद मग सुरू झाला आणि चळवळीची लाट ओसरली.

ब्रिटिश सरकार मात्र चळवळीची लाट ओसरण्याची वाटच पहात होतं. गांधींना अटक करण्यासाठी सरकार थांबलं होतं आणि त्याचसाठी चळवळीची लाट ओसरण्याची ते वाट पहात असलं पाहिजे. कारण १० मार्च १९२२ ला सरकारनं गांधींवर सरकारविरुद्ध असंतोष पसरविण्याचा आरोप ठेवून त्यांना अटक केली. गांधींवर याबाबत सरकारनं जो खटला भरला त्यांत त्यांना सहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यांत आली. १९०८ सालीं लो. टिळकांना हीच शिक्षा देण्यांत आली होती. हिंसा-अहिंसेचा वाद आणि बहुतेक पुढारी तुरुंगात गेलेले, यामुळे संघटनेंत मात्र विस्कळितपणा निर्माण झाला. १९२३ साल असंतसंच गेलं. पुढे ५ फेब्रुवारी १९२४ ला, गांधींची प्रकृति बरी नसल्यामुळे त्यांची तुरुंगांतून सुटका झाली. तुरुंगांतून सुटका होतांच जातीयवादाचं विष फैलावूं नये म्हणून आणि जातीय दंग्यांत जे अत्याचार झाले होते त्यांबद्दल प्रायश्चित्त घेण्यासाठी १९२४ च्या सप्टेंबरांत त्यांनी २१ दिवसांचं उपोषण केलं. गांधींच्या या उपोषणाचा परिणाम मात्र फारसा झाला नाही. उपोषणामुळे हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी परिषद घेतली गेली, पण या दोन जमातींत सलोखा निर्माण झाला नाही; आणि त्यापुढच्या दोन वर्षांत तर जातीयतेचं विष आणखीच फैलावलं. १९२२ ते १९२७ या काळांत जे ११२ जातीय दंगे झाले, त्यांत ४५० लोक ठार आणि ५ हजार जखमी झाले असल्याची नोंद आहे. जातीय राजकारणापासून अलिप्त रहाण्याचा उपदेश मोतीलाल नेहरू आणि मौलाना आझाद यांनी पुष्कळ केला, परंतु त्यांच्या प्रयत्नाला यश आलं नाही. १९२७ साल नैराश्यांतच गेलं.

१९२८ पर्यंत राष्ट्रीय स्वातंत्र्य-लढ्याला एक वेगळीच नवी अवस्था प्राप्त झाली होती. सोविएट रशियानं १९२७ मध्ये आपला दहावा वाढदिवस साजरा केला आणि त्यांचे साम्यवादाचे विचार तरुणांमध्ये आणि शहरांतील कामगारांमध्ये पसरवण्याचं काम या वेळीं सुरू झालं होतं. महाराष्ट्रांतील कामगारांपर्यंत या विचाराची लाट पोंचली होती. मध्यमवर्गाकडे अधिक वळलेल्या काँग्रेसनं अधिक मूलगामी स्वरूपाचा राजकीय कार्यक्रम हातीं घ्यावा अशी कामगारांची इच्छा होती.

दरम्यानच्या काळांत सुधारणांचं नवं आश्वासन देण्याच्या मिषानं लंडनहून ब्रिटिश मंत्रिमंडळानं एक घोषणा १९२७ च्या नोव्हेंबरमध्ये केली होती की, "भारतांत संसदीय लोकशाही किती प्रमाणांत विस्तारता येईल व आणखी राजकीय सुधारणा राबवण्यास भारत कितपत लायक झाला आहे, ह्याचा विचार करण्यासाठी,

ठरलेल्या मुदतीच्या दोन वर्षे आधीच, ब्रिटनच्या सम्राटातर्फे एक मंडळ नेमण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे." सर जॉन सायमन हे ब्रिटिश मुत्सद्दी या मंडळाचे अध्यक्ष होते. 'सायमन कमिशन' या नांवानंच हें मंडळ पुढे प्रसिद्धि पावलं. या कमिशनच्या नियुक्तीमुळे हिंदुस्थानांतील राष्ट्रीय चळवळीला आळा बसेल, जोम ओसरेल अशी साम्राज्य सरकारची अपेक्षा होती. परंतु मद्रास येथील १९२७ च्या काँग्रेस-अधिवेशनांत अध्यक्ष एम्. ए. अन्सारी यांनी सायमन कमिशनच्या कामकाजावर काँग्रेस बहिष्कार टाकील असं जाहीर करतांच साम्राज्य सरकारची अपेक्षा धुळीस मिळाली. या कमिशनविरुद्ध देशांत सर्वत्र संतापाची लाट उसळली आणि पुढच्या काळांत सायमन कमिशन हिंदुस्थानांत ज्या ज्या ठिकाणीं गेलं त्या प्रत्येक ठिकाणीं 'परत जा' हेंच त्याला ऐकावं लागलं. ३ फेब्रुवारी १९२८ रोजीं कमिशन मुंबईत आलं तेव्हा तर काळे झेंडे घेतलेल्या हजारो लोकांचे मोर्चे त्यांना पहावे लागले. चौपाटीवरील ५० हजार लोकांच्या सभेंत वेगवेगळ्या पक्षांच्या नेत्यांनी ब्रिटिश मंत्रिमंडळाच्या या निर्णयाचा धिक्कारच केला. समाजवादी विचारसरणीकडे वळलेल्या डाव्या गटाच्या कामगारांचा आणि त्यांच्या पुढाऱ्यांचा सायमन कमिशनवर बहिष्कार घालण्यास पाठिंबाच होता. परिणामीं १९२८ व १९२९ सालीं बहिष्काराच्या मोहिमेंत कामगारवर्ग सामील झाला व त्यामुळे जनतेच्या चळवळीला वेगळीच बळकटी प्राप्त झाली.

'साम्राज्यांतर्गत स्वराज्या'च्या कल्पनेवर या काळांत उलटसुलट टीका सुरू होती हें खरं; परंतु १९२९ च्या लाहोर येथील काँग्रेस-अधिवेशनांत काँग्रेसनं संपूर्ण स्वातंत्र्याची बिनतोड मागणी करण्यास स्वतःला निश्चितपणें बांधून घेतलं आणि 'साम्राज्यांतर्गत स्वराज्या'ची कल्पना त्याज्य ठरविली. राजकीय सुधारणांचा पाठपुरावा करण्याचंहि सोडून दिलं. ३१ डिसेंबर १९२९ ला बरोबर मध्यरात्रीं, नवं वर्ष सुरू होतांच रावी नदीच्या तीरावर जवाहरलाल नेहरू यांनी काँग्रेसचा तिरंगी ध्वज फडकवला आणि "ब्रिटिश राजवटीपुढे नमणं हें इतःपर मानवतेचा व परमेश्वराचा अपराध करण्यासारखं ठरेल," अशी गंभीर घोषणा केली. विशाल जनसमुदाय या वेळीं उपस्थित होता. जवाहरलाल नेहरूंची गर्जना होतांच सर्वत्र नवं चैतन्य खेळूं लागलं आणि स्वातंत्र्यासाठी लढा करण्याच्या निर्धारानं सारं वातावरण दुमदुमून गेलं.

१९३० चा जानेवारी महिना हा सबंध देशांत उत्साहाचा महिना ठरला. विसाव्या शतकांतील तिसऱ्या दशकाची अखेरी सविनय कायदेभंगाच्या अस्सल शस्त्राच्या मोहिमेनं होणार हें आता स्पष्ट दिसूं लागलं. स्वातंत्र्य-लढ्यानं आता बरीच मजल मारली होती. दहशतवादी क्रांतिकारकांच्या हालचाली सर्वदूर पसरल्या होत्या. सायमन कमिशनला लाहोर इथे विरोध करणारे पंजाबचे मुरब्बी नेते लाला लजपतराय यांच्या मिरवणुकीवर पोलिसांनी लाठीहल्ला करून, लालाजींचा त्यांत बळी घेतला होता. लाठी-माराचा हुकूम देणाऱ्या पोलिस-सुपरिंटेंडेंट सॉंडर्सला भगतसिंगानं गोळी घालून ठार केलं होतं. सरकारनं या प्रकरणीं पुढे भगतसिंग, राजगुरु आणि त्यांचे सहकारी यांच्यावर

खटला भरून त्यांना फाशीं दिलं. याच काळांत म्हणजे १३ सप्टेंबर १९२९ ला लाहोरच्या तुरुंगांत बंगालचे सुप्रसिद्ध क्रांतिकारक जतिनदास यांनी उपोषण करून आपल्या प्राणाची आहुति दिली होती.

जतिनदासांच्या उपोषणानं देशांतील साऱ्या तरुणांचं लक्ष त्या वेळीं खेचून घेतलं होतं. तरुण मनाला खेचून घेणारी अशीच ती घटना होती. टिळक हायस्कूलमध्ये यशवंतराव शिकत होते त्या काळांत सर्व देशांत आणि जिल्हा-तालुका-खेड्यापर्यंत स्वातंत्र्यलढ्याचं वारं एकसारखं संचारत राहिलं होतं. तरुण मनं बेभान बनवणारा असाच तो काळ होता. सातारा जिल्ह्यांतील लक्ष्मणशास्त्र्यांसारखे कांही कार्यकर्ते १९२१ च्या चळवळीपासूनच तुरुंगाच्या वाऱ्या करूं लागले होते. गावोगाव त्यांतून चर्चा घडत होत्या. कराड गाव आणि तिथले तरुण या वातावरणापासून दूर राहिलेले नव्हते. जतिनदासांच्या तुरुंगांतील प्राणाहुतीनं तर सारा तरुणवर्गच बेचैन झाला.

सातारा जिल्ह्यांत त्या वेळीं सत्यशोधक सत्याचा शोध करत होते, पण स्वातंत्र्याचा शोध हाच सत्याचा शोध असू शकतो या निर्णयाप्रत, त्या घटनेनं यशवंतरावांना खेचलं. क्रांतिकारकांच्या उठावणीचा तो काळ. साऱ्या हिंदुस्थानचं लक्ष लाहोर-कटाच्या खटल्याकडे लागलं होतं. क्रांतिकारकांना तुरुंगांत डांबून इंग्रज अधिकारी त्यांचा अनन्वित छळ करत होते. बंगालचे प्रसिद्ध क्रांतिकारक श्री. जतिनदास हे एक त्यामध्ये अडकले होते. लाहोरच्या कटाशीं त्यांचा कांही संबंध आहे हें सिद्ध झालेलं नव्हतं, परंतु तरीहि इंग्रजांच्या अत्याचाराचे ते बळी ठरले. १९२० सालीं असहकाराची चळवळ सुरू झाली आणि तेव्हापासूनच जतिनदास हे इंग्रज सरकारच्या डोळ्यांत सलत होते. नंतरच्या पांच वर्षांत त्यांना चार वेळा तुरुंगाची हवा खावी लागली. चौथ्या वेळीं ते मैमनसिंगच्या तुरुंगांत असतांना त्यांचा भयानक छळ करण्यांत आला. इतका की, एक दिवस त्यांना त्याबद्दल जेल-सुपरिंटेंडेंटशीं मारामारी करावी लागली; परंतु तो आणखी एक भयंकर गुन्हा धरला जाऊन त्यांना अंधारकोठडीची शिक्षा देण्यांत आली. अंधारकोठडींत डांबतांच जतिनदासांनी तिथे उपोषण सुरू केलं आणि तेवीस दिवस त्यांना अन्नपाण्यावांचून ठेवल्यानंतर त्यांच्या तक्रारीची दाद घेण्यांत आली. लाहोर-कटांत त्यांना गुंतविल्यानंतरहि असाच प्रसंग उद्भवला. राजकीय कैद्यांना तिथे सराईत, निढविलेल्या गुन्हेगारांप्रमाणे वागवलं जात असे. त्यामुळे संतापानं जतिनदासांनी तुरुंगांत उपोषण सुरू केलं. सरदार भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांनी राजकीय कैद्यांना कांही विशिष्ट सवलती मिळाव्यात म्हणून अगोदरच उपोषण सुरू केलं होतं. त्याला एक महिना उलटला तरी नोकरशहांना घाम फुटला नाही. तेव्हा अन्य कैद्यांनी अन्नसत्याग्रह पुकारला. जतिनदासहि त्यांत सामील झाले. तिथून पुढचा प्रत्येक दिवस भीषण ठरत चालला. भगतसिंग आणि बटुकेश्वर दत्त यांची तर उपासमारीनं सर्व शक्ति क्षीण झाली आणि जतिनदासांना प्रेतकळा प्राप्त झाली. वर्तमानपत्रांतून या सर्व भीषण स्थितीचीं वर्णनं येत असत. कराडला त्या वेळीं केसरी, ज्ञानप्रकाश, नवाकाळ एवढींच वर्तमानपत्रं विवक्षित ठिकाणीं

येत असत. विद्यार्थी यशवंतराव हीं वर्तमानपत्रं मिळवून रोज वाचत होते. पंधरा-सोळा वर्षांचं तेव्हा त्यांचं वय! कराडला त्या वेळींहि प्लेगनं थैमान घातलं होतं आणि कराड गाव सभोवतालच्या शेतांतून पसरलं होतं. जतिनदास शेवटच्या घटका मोजण्याच्या अवस्थेंत पोंचले तेव्हा सरकार त्यांना जामिनावर सोडण्यास तयार झालं. जामिनाची अट मात्र अपमानास्पद होती. ही अट स्वतः जतिनदासांनी व त्यांच्या भावानं नाकारली आणि अखेर ६२ व्या दिवशीं जतिनदासांनी स्वदेशासाठी प्राणाची आहुति दिली.

जतिनदासांनी देशासाठी प्राण दिला या घटनेनं सारा देश बेचैन झाला. तरुण यशवंतराव तर ते वाचून भांबावून गेले – बेचैन झाले. जतिनदासांच्या देहांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याचं प्रखर वलय तरुण यशवंताचं अंतःकरण छेदून गेलं आणि या एका घटनेनं त्याच्या चित्तवृत्तींत कायमचा बदल झाला. कराडचे त्या वेळचे नेते श्री. बाबूराव गोखले, अळतेकर पिता-पुत्र आणि टिळक हायस्कूलमधील राष्ट्रीय वृत्तीच्या शिक्षकांच्या शिकवणुकीचा यशवंताच्या समोर आदर्श होताच. त्या संस्काराचे परिणाम मनाला चिकटून होते. ही घटना, मनावर झालेले संस्कार आणि सभोवतालचं वातावरण यांतून मग या तरुणाची राजकीय आंदोलनांत स्वतःला झोकून देण्याची कठीण राजकीय तपश्चर्या सुरू झाली. संवेदनाक्षम बनलेल्या मनानं झेंप घेतली. सविनय कायदेभंगाची मोहीम देशांत सुरू झालीच होती आणि गावोगाव पोंचली होती. यशवंत चव्हाण या विद्यार्थ्यानं टिळक हायस्कूलमध्ये झेंडावंदन करून या आंदोलनांत उडी घेतली ती १९३० मध्ये! त्या वेळीं ते सहाव्या इयत्तेंत होते. परंतु त्यापूर्वी दोन वर्षांपासून म्हणजे १९२७–२८ पासूनच त्यांनी सार्वजनिक कामाला वाहून घेतलं होतं. शिवजयंत्युत्सव, गणेशोत्सव यांत प्रमुखपणानं भाग घेणं, अशी कामं सुरू करून सार्वजनिक कामाचे अनेक व्याप वाढवत ठेवले होते. चळवळी कराव्यात, सार्वजनिक कामं करावींत ही हौस त्यांनी आपल्याला त्या वेळींच लावून घेतली. तरुण विद्यार्थ्यांना गोळा करावं, कांही काम करावं यांतच ते रममाण होत. दहा-वीस मुलांचे म्होरके ते बनले होते. १९३० सालीं चळवळींत प्रत्यक्ष भाग घेण्याचं ठरवून, त्याचा प्रारंभ त्यांनी टिळक हायस्कूलमधल्या लिंबाच्या झाडावर झेंडा लावून झेंडावंदनाच्या कार्यक्रमापासून सुरू केला. हे म्होरके असल्यानं बरोबर कांही मित्रहि असत. यशवंतरावांचे हे उद्योग वाढत चालले तसं शिक्षणखातं जागं झालं. एक दिवस शिक्षणाधिकाऱ्यांनी यशवंताला या झेंडावंदनाच्या उपक्रमाबद्दल जाब विचारला. "कुणाच्या परवानगीनं झेंडावंदन करतोस?" या शिक्षणाधिकाऱ्याच्या प्रश्नाला विद्यार्थी यशवंतानं, स्वयंस्फूर्तीनं करतो असं चोख उत्तर दिलं. हायस्कूलचे हेडमास्तर द्विवेदी हे राष्ट्रीय वृत्तीचे होते आणि त्यांची या उपक्रमास गुप्त संमतीहि होती. शिक्षणाधिकाऱ्यांना यशवंताच्या तोंडून द्विवेदींचं नांवच वदवायचं होतं. पण तसं घडलं असतं तर, टिळक हायस्कूलला टाळा लागणार होता. सरकारधार्जिण्या शिक्षणाधिकाऱ्याचा तोच हेतु होता. परंतु यशवंतानं ती तोहमत धैर्यानं स्वतःवर घेतल्यानं, शिक्षणाधिकाऱ्याचा मुखभंग झाला आणि त्याचबरोबर टिळक

हायस्कूलवरील संकटहि टळलं; परंतु या गंभीर घटनेनं विद्यार्थी यशवंताला मात्र तुरुंगाची वाट धरावी लागली.

१९३०–३२चा काळ हा चळवळीचाच काळ होता. शाळेंत शिकत असतांनाच एक दिवस या तरुणांनी कराड म्युनिसिपालिटीवर राष्ट्रीय झेंडा लावायचा आणि गावांत चळवळीचीं पत्रकं चिकटवायचीं, असा बेत ठरवला. त्याचं पुढारीपण अर्थातच तरुण यशवंताकडे होतं. बेत पक्का झाला, आखणी झाली आणि एके दिवशीं 'वंदे मातरम्'च्या घोषणा करीत म्युनिसिपालिटीवर त्यांनी राष्ट्रीय झेंडा फडकवला. हें घडतांच गावांत खळबळ उडाली. चळवळीचा जोर सर्वत्र वाढलेला असल्यानं ब्रिटिश सरकार खवळलं होतं. म्युनिसिपालिटीवर राष्ट्रीय झेंडा आणि गावांत सर्वत्र चळवळीला प्रेरणा देणारीं पत्रकं पसरतांच नोकरशाहीनं दडपशाही सुरू केली. सर्वत्र धरपकड करण्याला त्वरेनं प्रारंभ झाला. त्यांमध्ये तरुण यशवंताचाहि क्रमांक लागला आणि परिणामीं शिक्षाहि ठोठावण्यांत आली. शाळेंतल्या विद्यार्थ्यांस शिक्षा सांगितली जातांच शिक्षकवर्गहि गडबडला. कारण त्या वेळीं कुणावर तोहमत येईल याची कांहीच शाश्वति नव्हती. शिक्षा सांगण्यांत आली त्यानंतरचा तिसरा दिवस. शिक्षा झालेल्यांची रवानगी पुण्याला येरवडा तुरुंगांत व्हायची होती. यशवंताला भली अठरा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यांत आली होती. त्या वेळीं शाळेंतले एक शिक्षक यशवंताच्या घरीं गेले आणि मुलाला भेटण्यासाठी विठाईला घेऊन आले. फौजदारसाहेबांनी मग पोलिस-पहाऱ्यांत त्या मायलेकरांची भेट घडवली. यशवंताला पहातांच माउलीचे डोळे पाण्यानं भरले. लहान पोर आणि अठरा महिन्यांची शिक्षा—आईचं मन पिळवटून निघालं. मग मास्तर त्यांचं सांत्वन करूं लागले; आणि यशवंताकडे बघून म्हणाले, "हें पहा, फौजदारसाहेब दयाळु आहेत, माफी मागितली तर सोडून देऊं म्हणतात."

मास्तरांच्या तोंडचे माफीचे शब्द ऐकले मात्र; विठाईच्या डोळयांतील अश्रु कुठल्या कुठे गेले. "काय बोलतां मास्तर, माफी मागायची ?" त्या माउलीनं मास्तरांना तिथल्या तिथे फटकारलं आणि मुलाला म्हणाली, "माफी मागायचं कारण नाही. तब्बेतीची काळजी घे म्हणजे झालं. परमेश्वर आपल्या पाठीशीं आहे." आणि माउली उठून निघूनहि गेली. तरुण यशवंताच्या आयुष्यांतला हा एकच क्षण, लहानशीच घटना. मास्तरांच्या सल्ल्याप्रमाणे माफी मागून हा तरुण चळवळ्या सुटलाहि असता, पण भावी आयुष्यांत मग कुठे तरी फेकला गेला असता आणि जन्मभर माफीच मागत रहावी लागली असती. आईचा स्वाभिमान मनांत बाळगूनच तरुण यशवंतानं येरवड्याचा उंबरा ओलांडला आणि त्याच स्वाभिमानानं शिक्षा भोगून परत आला. तुरुंगांत शिक्षा भोगून हा तरुण परतला तेव्हा साऱ्या कराडची छाती अभिमानानं फुगली होती. पण याचं खरं श्रेय होतं विठाईला. आईच्या खंबीर मनाला. पुत्र-प्रेमाच्या जाळ्यांत अडकवून ठेवून तें माफीचं नाटक पूर्ण झालं असतं तर यशवंताची राष्ट्रभक्ति, चळवळ आणि पुढारीपण कदाचित् तिथेच खुरटलं असतं. पण तसं घडायचं नव्हतं. मातेच्या हातून तसं घडावं असा

संकेत नव्हता. कधीहि न पुसल्या जाणाऱ्या या आठवणींतूनच तरुण यशवंताचं राजकीय चरित्र आणि राजकीय चारित्र्य पुढे घडत राहिलं. १९३२ सालची ही घटना. देशासाठी त्याग करण्याचा पहिला धडा, मातेकडूनच त्यांना या प्रसंगानं मिळाला. स्वतःच्या-मनाची तयारी करूनच, विद्यार्थिदशेंत असतांना त्यांनी देशसेवेचं व्रत मान्य केलं होतं. केवळ भावनेला बळी पडून बुलेटिन्स वांटण्याच्या किंवा झेंडा लावण्याच्या कामास ते प्रवृत्त झालेले नव्हते. त्यामागे एक निश्चित तात्त्विक बैठक होती; आणि त्यासाठी मातेचा आशीर्वादहि आता लाभला होता. देशांतल्या स्वातंत्र्यलढ्याच्या वातावरणानं, गांधी-नेहरूंच्या विचारानं त्यांना खेचलं होतं. सामाजिक परिस्थितीचं आव्हान तर समोर होतंच.

# ४

१९३० च्या असहकारितेच्या चळवळींत भाग घेऊन यशवंतराव तुरुंगांत गेले त्या वेळीं ते मॅट्रिकच्या वर्गांत होते. अठरा वर्षांचं वय, सत्याग्रह, प्रभातफेऱ्या यांनी वातावरण भारावून गेलेलं होतं. म. गांधींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय चळवळीला उधाण आलं होतं. काँग्रेसमध्ये सातारा जिल्ह्यांत त्या वेळीं जे नेते होते त्यांच्यासमोर ब्रिटिशांचं राज्य देशांतून नष्ट करणं ही एकमेव भावना होती. काँग्रेसच्या वरिष्ठ गोटांत देशाच्या पातळीवरहि याच विचारांचा पगडा होता. परंतु त्याच वेळीं सामान्य माणसाच्या जीवनांत आणि आर्थिक परिस्थितींत क्रांति घडवण्याचा, राजकीय स्वातंत्र्याचा खोल आशय या चळवळींत निर्माण करण्याचा विचार काँग्रेसमधील तरुणवर्गांत बळावत राहिला होता. हा नवा विचार हृदयांत बाळगणाऱ्यांचा गट तसा लहानच होता. यशवंतराव हे या नव्या विचाराचा आशय मनांत बाळगणाऱ्यांमध्ये होते. सामान्य लोकांचं जीवन त्यांच्यासमोर होतं. त्यांनी तें जन्मापासून अनुभवलेलं होतं. तें जीवन अधिकाधिक गर्तेत जात होतं. या लोकांच्यासाठी, त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी, कांही तरी केलं पाहिजे या विचाराचा पगडा त्यांच्या मनावर होता आणि त्यांतूनच त्यांचीं पावलं शाळेकडे जाण्याऐवजी प्रभातफेरीकडे वळलीं. त्यांतूनच त्यांना पहिली शिक्षा फर्मावली गेली आणि शिक्षणाच्या मार्गानं धांवणाऱ्या जीवनाचा सांधाच बदलला. ही शिक्षा भोगून बाहेर येण्यास १९३१ साल उजाडलं. तुरुंगांतून मुक्त झाल्यानंतर वस्तुतः पुन्हा शालेय जीवन सुरू व्हायचं; पण तुरुंगांतून बाहेर येतांना चळवळीच्या विचाराचा पगडा मनावर कायमचाच राहिला. किंबहुना ते विचार अधिक जोरानं वाहूं लागले आणि त्यांतूनच १९३२ सालीं म्युनिसिपालिटीवरील झेंडावंदन आणि बुलेटिन्स वांटणं यांत आघाडीवर राहून पुन्हा तुरुंगाची वारी करण्याचा प्रसंग आला. मॅट्रिकची परीक्षा तेव्हाहि हुकली. सहावी इयत्तेची परीक्षा त्यांनी दिली होती आणि उत्तीर्णहि झाले होते, परंतु मॅट्रिकला बसून ती परीक्षा पदरांत पाडून घेण्यांत नंतरचीं दोन-तीन वर्षे तुरुंगाच्या

वाऱ्यांमुळे हातची गेलीं. दुसरी शिक्षा संपवून ते बाहेर आले तेव्हा १९३३ साल अर्धं संपलं होतं. तरी पण सहावी इयत्ता झालेली असल्यामुळे वर्षाच्या मध्यावर येऊनहि शिक्षकांनी त्यांना मॅट्रिकच्या वर्गात दाखल केलं; आणि मग अभ्यासाला सुरुवात झाली. मॅट्रिकला बसून, ते परीक्षा उत्तीर्ण झाले तेव्हा १९३४ साल उजाडलं होतं.

मॅट्रिक होण्यासाठी १९३० ते १९३३ अशीं तीन वर्षं गेलीं, पण हीं तीन वर्षं यशवंतरावांच्या दृष्टीनं वाया गेलेलीं नव्हतीं. मॅट्रिक उत्तीर्ण होण्यास वयाचीं २१ वर्षे झालीं, पण राजकीय विचारबंधाच्या दृष्टीनं हा काळ अतिशय महत्त्वाचा ठरला. तुरुंगांत असतांना अनेक ज्येष्ठ नेत्यांच्या गाठीभेटी झाल्या. त्यांच्या संगतींत विविध राजकीय प्रवाहांचं वाचनहि घडलं. काँग्रेस-अंतर्गत समाजवादाचे विचार त्या काळांत जोर धरून उठले होते. १९३३ सालीं यशवंतराव तुरुंगांतून सुटून आले आणि १९३४ सालीं मॅट्रिक झाले त्या वेळीं तर समाजवादी पक्षाची स्थापना करण्याची चर्चाच सर्वत्र चालली होती. काँग्रेसमधील उजव्या गटांतील नेत्यांच्या धोरणांतील प्रतिगामी प्रवृत्तींना विरोध करण्यासाठी म्हणून काँग्रेसशीं निगडित असलेला एक गट त्यांतून तयार झाला होता.

राष्ट्रीय पातळीवर जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्रदेव, युसुफ मेहेरअल्ली, अच्युतराव पटवर्धन, एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे आदि मंडळींनी समाजवादी पक्षाला निश्चित बैठक तयार केली होती. काँग्रेसचे हे सर्व निष्ठावंत कार्यकर्ते होते आणि राष्ट्रीय चळवळींत भाग घेणारे होते. त्यांनी दीर्घकाळ तुरुंगवासहि भोगला होता. जनमानसांत त्यांचं विशिष्ट असं प्रतिबिंबहि तयार झालं होतं आणि यांतील महाराष्ट्रीय कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र-काँग्रेसमध्ये, आपली प्रतिष्ठा निर्माण केली होती. श्री. एस्. एम्. जोशी, गोरे, शिरूभाऊ लिमये हे त्यांतील प्रमुख होते. काँग्रेसमधील कांहीजण या डाव्या विचारसरणीकडे झुकले, त्यांनी तें ध्येय मानलं, पण त्याचबरोबर फक्त 'भारतीय स्वातंत्र्य' या विचारावर आणि ध्येयावर स्थिर झालेले निर्भेळ गांधीवादीहि काँग्रेस-मध्ये बहुसंख्येनं होते. महात्माजींनी त्यांना भारतीय स्वातंत्र्याच्या ध्येयाशीं जखडून ठेवलं होतं. स्वातंत्र्याशिवाय अन्य कोणत्याहि गोष्टीचा विचार त्यांच्यासमोर नव्हता. अशा प्रकारे त्या काळांत स्वातंत्र्याच्या ध्येयाप्रत जाण्यासाठी कोणत्या मार्गानं जायचं याबाबत वैचारिक मतभेद निर्माण होत राहिले.

कराडच्या कृष्णाकाठावरील वाळवंटांत होणाऱ्या सभा यशवंतराव ऐकत होते. विद्यार्थिदशेंत असलेलं त्यांचं त्या वेळचं वय. सभेंत व्यक्त होणारे विचार समजून घेत असतांनाच, सामाजिक परिस्थिति बदलण्याच्या भावनेशीं त्याची सांगड कशी घालावी याचं चिंतनहि सुरू राहिलं. राजकीय स्वातंत्र्य तर आवश्यकच होतं, पण सामान्य जनतेला जरुरी होती आर्थिकदृष्ट्या बंधमुक्त होण्याची. काँग्रेस-अंतर्गत निर्माण होणाऱ्या डाव्या विचारसरणीनं, त्यांचं लक्ष त्यामुळेच वेधून घेतलं. समाजवादी पक्षाच्या स्थापनेच्या कामांत प्रारंभींच्या काळांत ते सहभागी झाले ते यामुळेच होय.

१९३४ सालीं मॅट्रिक झाल्यापासून तो १९३८–३९ पर्यंतचा म्हणजे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून पदवीधर बनण्यापर्यंतचा यशवंतरावांचा काळ हा मोठाच वैचारिक संघर्षाचा आणि धामधुमीचा काळ आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत अनेक घटना घडत राहिल्यानं त्यांचा अन्वयार्थ लावण्यांतच त्यांचा हा काळ गेला. महाविद्यालयीन शिक्षण सुरू होतं, जिल्ह्यांत कॉंग्रेस-पक्ष-बांधणीचं कामहि सुरू होतं आणि राजकीय वैचारिक घडणहि सुरु राहिली होती. १९३४ ते ३७ हीं तीन वर्षे सार्वजनिक आणि शैक्षणिक कामांतलीं त्या दृष्टीनं त्यांच्या जीवनांतलीं महत्त्वाचीं वर्षे ठरलीं. १९३२ सालीं तुरुंगांत आणि बाहेर आल्यावर मनावर समाजवादी संस्कार घडले होते. वाचन वाढलं होतं. निरनिराळ्या नेत्यांशीं आणि सभोवतालच्या लोकांशीं संबंध वाढले होते आणि कराडची मर्यादा ओलांडून त्यांचं कार्यक्षेत्र हें सातारा जिल्हा बनलं होतं. वाचनाला आणि विचाराला अनुभवांचं कोंदण लाभलं होतं. विचाराला रेखीवपणा प्राप्त होऊं लागला होता.

राजकीय चळवळीच्या दृष्टीनं यशवंतराव वैचारिक संघर्षातून जात असतांनाच त्यांचे मित्र त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेण्याचा आग्रह करत होते. खरं म्हणजे १९३३ मध्ये ते तुरुंगांतून बाहेर आले तेव्हा आपली राजकीय वाटचाल मनाशीं निश्चित करूनच ते आले होते. एका निश्चित ध्येयासाठी आयुष्य अर्पण करायचं हा विचार मनांत पक्का रुजला होता. मित्रांचा आग्रह तर महाविद्यालयीन शिक्षण घ्यावं असा होता. त्यामुळे मग महाविद्यालयीन शिक्षण तर घ्यायचं आणि तें करतांना मूळ ध्येय कायम ठेवून, त्या ध्येयाकरिताच शिक्षण पूर्ण करायचं असा निर्णय त्यांतून घडला. मित्रांच्याच साहाय्यानं ते अखेर महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापूरला दाखल झाले. कोल्हापूरचं वातावरण त्या वेळीं शैक्षणिकदृष्ट्या भारलेलं होतं. राजर्षि शाहूमहाराज यांची शिक्षणाविषयीची विशिष्ट दृष्टि होती. विशेषतः समाजांतल्या दुर्बळ घटकांसाठी त्यांनी कोल्हापूरला शैक्षणिक क्षेत्र उपलब्ध करून दिल्यानं, त्या काळांत अनेक तरुणांना त्याचा लाभ झाला. यशवंतरावांना हें माहीत होतं, परंतु मन राजकीय चळवळीच्या क्षेत्राकडे ओढ घेत असल्यामुळे, कॉलेजमध्ये जावं आणि शिकून मोठं व्हावं, असं प्रलोभन राहिलं नव्हतं. कोल्हापूरला कॉलेजमध्ये जाण्यांत प्रामुख्यानं आर्थिक अडचण जाणवतच होती; परंतु यशवंतरावांच्या आयुष्यांत योगायोगाचे अनेक क्षण आले. ज्या घटनांचे संदर्भ सामान्यतः जुळवतां येत नाहीत, अशा अनेक घटना त्यांच्या जीवनांत घडून गेल्या आहेत. हे योगायोग ऊन-पावसाचे आहेत. त्यांच्याकडे नंतरच्या काळांत पहातांना, पहाणाराला तो ऊन-पावसाचा खेळ रम्य वाटतो. पण त्या विशिष्ट वेळीं जो प्रत्यक्षांत उन्हानं होरपळत असतो त्यालाच त्या संकटाची चव कळत असते. अदृष्टांतील शक्ति माणसाचं जीवन असंच मागेपुढे खेचत असते ही वस्तुस्थिति निर्विवाद मानावीच लागते. कॉलेजमध्ये दाखल होण्याबद्दल त्यांचं मन हेलखावे खात होतं. मन चळवळीकडे ओढलं जात होतं आणि मित्रांची इच्छा त्यांनी

शिक्षणासाठी कोल्हापूरला जावं अशी होती. अन् एक दिवस त्यांचे एक मित्र श्री. गौरीहर सिंहासने घरीं आले ते यशवंतरावांना कोल्हापूरला नेण्याच्या तयारीनंच. त्यांच्याबरोबर यशवंतरावांना मुकाट्यानं जावं लागलं. मग कोल्हापुरांत फी, पुस्तकं आणि इतर खर्च या सर्वांची मित्रांनी तरतूद केली. कॉलेजमध्ये दाखल होण्याचा तो क्षण यशवंतरावांच्या मनांत कायमचा कोरला गेला आहे. मनुष्याच्या ठिकाणीं कृतज्ञता-बुद्धि निर्माण होते आणि मनांत कायमची रहाते ती अशा एखाद्या सजीव क्षणामुळेच! कर्तृत्वानं, कीर्तीनं कितीहि तो मोठा झाला तरी ज्या दरवाज्यांतून तो प्रथम आंत शिरला, त्याला तो विसरूं शकत नाही. मनांतून कधीहि न पुसला जाणारा कृतज्ञतेचा धडा त्या एका क्षणानं यशवंतरावांना शिकवला तो निरंतरचा!

शिक्षणासाठी यशवंतराव शरीरानं कोल्हापुरांत राहिले, तरी मनानं सातारा जिल्ह्यांतच वावरत होते. शिक्षण कोल्हापुरांत आणि राजकीय जागृतीचं काम सातारा जिल्ह्यांत, असं त्या वेळीं सुरू राहिलं. सातारा जिल्हा राजकीयदृष्ट्या अतिशय जागृत बनला होता. १९३० सालच्या चळवळीपासून स्वातंत्र्य-चळवळीचं लोण शेतकऱ्यांच्या झोपड्यांपर्यंत पोंचल्यानंतर बहुजन-समाजांतील तरुण कॉंग्रेसच्या राजकीय प्रवाहांत येऊन सामील होऊं लागले. हा प्रवाह वाढून विधायक कामासाठी त्याचा उपयोग व्हावा यासाठी, नव्या पिढींतल्या तरुणांनी यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली सातारा जिल्हा-कॅंग्रेसची आखणी सुरू केली. कार्यकर्त्यांसमवेत पायीं, सायकलीनं रानोमाळ हिंडावं, तरुण जमवावेत, त्यांना देशांत काय चाललं आहे, आपण काय करायला पाहिजे हें समजावून सांगावं आणि दुसरं गाव गाठावं, असं सुरू होतं. बोरगाव हें त्या वेळीं या कार्यकर्त्यांचं एक मोठं केंद्र बनलं होतं. आत्माराम पाटील हे बोरगावचे. ते या सर्वांचे पुढारी. बोरगावच्या अड्डयांत सातारा जिल्हा-कॉंग्रेसच्या आखणीच्या, संघटना वाढवण्याबद्दलच्या चर्चा होऊं लागल्या. स्वातंत्र्य-चळवळींत सहभागी होऊं लागलेली ग्रामीण भागांतील ही सर्व तरुण मंडळी होती. जिल्हा-कॉंग्रेस ही तरुणांची संघटना बनली होती. चळवळीमध्ये ग्रामीण भागांतल्या जनतेचं मोठं सामर्थ्य त्यांनी त्या वेळीं उभं केलं. जिल्ह्यांतल्या कार्यकर्त्यांची माहिती घेणं, त्यांच्याशीं स्नेह वाढवणं, असा यशवंतरावांचा उपक्रम सातत्यानं सुरू राहिल्यामुळे, त्यांतून जिल्ह्यामध्ये सर्वत्र त्यांच्याबद्दल बंधुभाव वाढला. सबंध जिल्हा हा यशवंतरावांना घरासारखाच बनला. बोरगावच्या बैठकींत ज्या चर्चा होत त्यांमध्ये देशांतल्या राजकारणाची चर्चा असेच, पण त्याहीपेक्षा सातारा जिल्हा हा महाराष्ट्राच्या राजकारणांत आघाडीवर कसा राहील, किंबहुना तसा तो राहिला पाहिजे, या संदर्भांत चर्चा होत असत. राजकारणांत या जिल्ह्यानं आपलं स्वतःचं असं स्थान निर्माण केलं पाहिजे, स्वतःच्या विचारानं चाललं पाहिजे ही चर्चा घडवण्याइतके हे कार्यकर्ते जागृत होते. कौन्सिलच्या निवडणुका जेव्हा होतील त्या वेळीं, स्वातंत्र्य-चळवळींतून पुढे आलेला पुढारी आत्माराम पाटील हा आपला उमेदवार असावा, अशी त्यांच्या

मनांत जुळणी सुरू होती. बोरगावच्या भेटी-गाठी आणि चर्चा हाहि त्या योजनेचा एक भाग होता. त्या निवडणुकीच्या दृष्टीनं संघटनेंतील लोकांचा उपयोग करण्याचे बेतहि तिथे ठरत असत. निवडणुकीकरिता जो संघर्ष करावा लागेल त्याचं साधन म्हणून संघटना भक्कम बनवण्याचा तो प्रयत्न होता.

ब्रिटिश सरकारशीं संघर्ष करण्यासाठी काँग्रेसची बांधणी करण्याचं काम जिल्ह्यामध्ये करीत असतांनाच, निवडणुकांद्वारे उपलब्ध होणाऱ्या सत्तेमधूनहि शक्ति वाढवण्याचा हा विचार होता. सत्ता हें संघटनेचं साधन बनणार असेल, तर सत्तेवर बहिष्कार न टाकतां, सत्ता ही संघर्षासाठी वापरतां यावी आणि सत्तेचं तें साधन उपलब्ध करावं, असाच विचार या तरुणांच्या मनानं स्वीकारला. हे सर्वच कार्यकर्ते आपल्या मनाची सर्वांगीण मशागत करण्यांत गुंतले होते. संघर्षासाठी आणि सत्तेसाठी संघटनेची बांधणी करण्याचा गोफ गुंफतांना आपलं वैचारिक सामर्थ्य कमी पडणार नाही याची दक्षता घेतली जाणं आवश्यकच होतं. त्या दृष्टीनं राजकारणावरील ग्रंथांचं वाचन, मनन, चिंतन असा एक कार्यक्रम असे. नमुन्यादाखल एक आठवण ते सांगतात की, त्याच काळांत पं. जवाहरलाल नेहरू यांचं आत्मचरित्र ग्रंथ-रूपानं प्रसिद्ध झालं होतं. महत्प्रयासानं या कार्यकर्त्यांनी आत्मचरित्राच्या मूळ इंग्रजी ग्रंथाची ताजी प्रत मिळवली आणि त्याचं सामुदायिक वाचन केलं. कराडांत तीन-चार दिवस हा उपक्रम सुरू राहिला होता. एकानं वाचायचं व इतरांनी ऐकायचं असं सुरू होतं. एक दमला की दुसऱ्यानं वाचन सुरू करायचं.

यशवंतराव कोल्हापूरच्या कॉलेजमध्ये होते, परंतु आठवड्यांतले तीन दिवस ते सातारा जिल्ह्यांतच संघटनेच्या कामासाठी खर्च करत राहिले. कोल्हापूरच्या त्यांच्या अनुपस्थितींत त्यांचे एक वर्ग-मित्र श्री. आयाचित हे त्यांची कॉलेजमधली हजेरी लावत असत. परिस्थितीच्या दृष्टीनं कोल्हापुरांत चार दिवस खानावळींत जेवण्यापेक्षा भाड्यासाठी एक रुपया खर्चून सातारा जिल्ह्यांत रहाणं हें त्यांना परवडणारं होतं. मुख्य म्हणजे एक विचारवंत कार्यकर्ता म्हणून सातारा जिल्ह्यानं त्यांना मानलं होतं, स्वीकारलं होतं. यशवंतरावांच्या संग्रहीं सांगण्यासारखं बरंच कांही आहे, असा त्या सर्वांचा दृढ विश्वास होता. त्याचा अनेक दृष्टीनं फायदा झाला. संघटना मजबूत करण्याच्या कामाला त्यामुळे गति मिळाली. लहान-मोठ्या गावांतून हिंडतांना अनेकांचे परिचय झाले. माणसं पारखण्याचं शिक्षण त्यांना या भ्रमंतींतून मिळत रहाण्याचा फार मोठा फायदा झाला. कॉलेजच्या वर्षांतील सात-आठ महिने राजकीय जागृतीचं काम खेड्यापाड्यांतून बहुजन-समाजांत हिंडून करायचं आणि परीक्षेच्या अगोदरचे शेवटचे दोन महिने अभ्यास करून परीक्षा द्यायची, अशा क्रमानंच १९३८ मध्ये त्यांनी अखेर बी. ए. पदवी संपादन केली.

कॉलेजमध्ये यशवंतरावांनी इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय घेतले होते. राजाराम कॉलेजमध्ये त्या वेळीं प्रो. ना. सी. फडके, डॉ. बाळकृष्ण असे एकापेक्षा एक

सरस अध्यापक होते. प्रो. फडके हे 'लॉजिक' शिकवत असत. यशवंतराव हे डॉ. बाळकृष्ण यांचे आवडते विद्यार्थी. आपला विद्यार्थी राष्ट्रीय चळवळींतहि आघाडी-वर आहे याबद्दल त्यांना समाधान होतं. अभ्यासाकडे या विद्यार्थ्यानं लक्ष दिलं पाहिजे असा मात्र त्यांचा कटाक्ष असे. यशवंतराव इंटरला असतांना आजारी झाले. त्यामुळे कॉलेजचे दिवस पूर्ण भरले गेले नाहीत. तरी पण डॉ. बाळकृष्ण यांनी टर्म भरून घेऊन त्यांना परीक्षेला बसण्यास परवानगी दिली आणि त्यांत ते उत्तीर्णहि झाले. परीक्षा उत्तीर्ण होणं हेंच अंतिम ध्येय, असं त्यांनी शाळेंत किंवा कॉलेजमध्ये असतांना कधीच मानलं नव्हतं. व्यावहारिक जगासाठी परीक्षा दिल्या पाहिजेत याची जाणीव मात्र त्यांना होती, पण त्याहीपेक्षा ज्ञानार्जन हा या शिक्षणामागचा प्रमुख हेतु होता. त्यामुळे स्वतंत्र-बुद्धीनं अभ्यास करण्याची सवय त्यांनी प्रथमपासूनच आत्मसात केली. घोकंपट्टी करून परीक्षा पास होणं हा एक मार्ग असतो; परंतु वाचन करायचं, जें काय वाचलं त्याचं मनन करायचं आणि त्यांतून विचाराचा धागा धरून त्याच्याशीं एकजीव होऊन मत बनवा-यचं ही जी अभ्यासाची पद्धत, तिचाच अवलंब यशवंतराव करत राहिले. त्यामुळे त्यांचं मन चिकित्सक बनलं. उपजत-बुद्धि संवर्धित होत राहिली. मन आणि मत बनवतांना, पुढच्या काळांतहि त्यांना या सवयीचा लाभ झाला. नेमकं वाचावं आणि मनानं पचवलेलंच नेमकं बोलावं हा त्यामुळेच त्यांचा गुण ठरला. प्रारंभींच्या काळांतच मनो-भूमींत पडलेलं विचारांचं बीं रुजलं, अंकुरलं, वाढत राहिलं आणि फोफावलं तें त्यामुळेच !

महाविद्यालयीन पदवी संपादन केल्यानंतर माध्यमिक विद्यालयांतील दहा-बीस तरुणांचा त्या काळांतला म्होरक्या आता सातारा जिल्ह्यांतील तरुणांनी आपला पुढारी बनवला होता. ज्या समाजाला वर्षानुवर्षे अक्षर-ओळख झालेली नाही आणि अज्ञानाच्या, दारिद्र्याच्या खोल गर्तेत जो अडकून पडला आहे, त्याला वर काढण्याची ईर्षा बाळगणारा, त्यांच्या मनांत स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारा, असा त्यांच्यांतलाच पुढारी त्यांना आता मिळाला होता. लो. टिळकांचं नांव शिरोधार्य ठेवून राष्ट्रीय शिक्षणाचं अमृत, टिळक हायस्कूलमध्ये सेवन केलेल्या विद्यार्थ्यानं उच्च शिक्षणाचा एक टप्पा पूर्ण केला होता; आणि आता समाजाला शिक्षण देण्यासाठी तो समाज-शिक्षक बनल्याचं पाहून गुरुजनांनाहि समाधान लाभलं. आचार्य-ऋणांतून मुक्त होण्याचा मार्ग यशवंतरावांनी तरुणपणींच चोखाळला.

राजकीयदृष्ट्या जागृत बनलेल्या सातारा जिल्ह्यांत सभा, परिषदा, जनता-संपर्क, परस्पर-मैत्री, सौहार्द, संघटनेची बांधणी अशा कामाचा धूमधडाका सुरू राहिला. जेवण मिळालं न मिळालं याची पर्वा नव्हती. कुणाहि कार्यकर्त्याकडे, शेतकऱ्याच्या घरीं जाऊन असेल त्या चटणी-भाकरीनं भूक भागवावी आणि पुढचा रस्ता धरावा. या गावाहून त्या गावाला, पायीं, बैलगाडीनं, सायकलीनं, अशी भ्रमंती सुरू राहिली असतांनाच १९३७ मध्ये असेंब्लीच्या निवडणुकीचे वारे वाहूं लागले. सातारा जिल्ह्यांत त्या काळांत भाऊसाहेब सोमण, बाबूराव गोखले, अळतेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी,

ह. रा. महाजनी, काशीनाथ देशमुख, राधुअण्णा लिमये, आत्माराम पाटील, दामुअण्णा एकबोटे, किसन वीर, इंदुलीकर अशी किती तरी मंडळी निरनिराळ्या तालुक्यांत काम करत होती. पण त्याचबरोबर विशी-तिशीच्या दरम्यानच्या तडफदार तरुण मंडळींनी आपला एक प्रभाव सातारा जिल्ह्याच्या राजकारणांत निर्माण केला होता. हे तरुण वयानं लहान असले तरी मनानं प्रौढ होते. उमेद दांडगी होती. यशवंतराव या सर्वांमध्ये आघाडीवर होते, उठून दिसत होते. जहाल विचाराच्या या मंडळींनी जिल्हा-काँग्रेसचा कब्जाहि मिळवला होता. पण यामुळे जिल्ह्यांतले परंपरावादी नेते सचिंत बनले. जिल्हा-काँग्रेस आपल्या ताब्यांत असावी हा त्यांचा दृष्टिकोन. उजव्या गटाचं नेतृत्व श्री. भाऊसाहेब सोमण यांच्याकडे होतं व त्यांच्या बरोबरची मंडळी जिल्हा-काँग्रेसवर ताबा मिळवण्याच्या कामीं त्यांची सहकारी बनली होती. जिल्हा-काँग्रेस-अंतर्गत असे दोन प्रवाह निर्माण झालेले असतांनाच जिल्हा-काँग्रेसच्या अध्यक्षीय निवडणुकीचा प्रश्न पुढे आला.

जिल्हा-काँग्रेसवर ताबा मिळवण्याच्या दृष्टीनं श्री. भाऊसाहेब सोमण यांनी आपला एक माणूस ठरवला होता; परंतु यशवंतराव वगैरे कराड भागांतील तरुणांनी आपल्या एका तरुण कार्यकर्त्याबद्दल आग्रह धरला. काँग्रेस ही सामान्य शेतकऱ्यांची असावी असा या गटाचा आग्रह असून, त्या दृष्टीनं त्यांनी येडें-निपाणी गावचे पांडु मास्तर यांचं नांव अध्यक्षपदासाठी निश्चित केलं. ही निवडणूक कराडला व्हायची होती. कोयनेच्या काठावरील एक निवान्त जागा त्यासाठी ठरवण्यांत आली. निवडणुकीच्या निमित्तानं जिल्हा-काँग्रेसमध्ये वैचारिकदृष्ट्या, धोरणात्मक स्वरूपाचे दोन गट निर्माण झाल्यानं आणि तडफदार तरुण या निवडणुकीच्या रिंगणांत उतरून जिद्दीनं काम करूं लागल्यानं जिल्ह्यांत कांहीसं चिंतेचं वातावरण निर्माण झालं. निवडणूक सुरळीत पार पडेल की नाही, अशी शंका कांहीजण व्यक्त करूं लागले. विशेषतः साताऱ्यांतील नेत्यांना या शंकेनं अधिक घेरलं. पण ठरल्याप्रमाणे सभा झाली आणि ती सुरळीत पार पडली. या सभेंत भाऊसाहेब सोमणांचे उमेदवार श्री. व्यंकटराव पवार हे निवडून आले. श्री. नाना पाटील यांचा भाऊसाहेब सोमण यांना पाठिंबा होता. त्यांनी आपली शक्ति श्री. व्यंकटराव पवार यांच्या पाठीशीं उभी केली. कराडच्या मंडळींना आणि स्वतः यशवंतरावांनाहि हें अनपेक्षित होतं; पण सभेचा निर्णय त्यांनी मान्य केला आणि जिल्हा-काँग्रेसचं दप्तर श्री. पवार यांच्या स्वाधीन केलं. त्या तरुण वयांतहि पक्षाची शिस्त पाळण्याचा आदर्शच त्यांनी या निमित्तानं आपल्या सर्व सहकाऱ्यांसमोर ठेवला. स्वतः अवमानित झालेले असतांहि काँग्रेस-पक्षाचं प्रेम आणि शिस्त पाळायची हा त्यांचा शिरस्ता तेव्हापासूनचा आहे.

पराभूत झालेल्या गटानं शिस्तीनं पराभव पचवला, कोणत्याहि प्रकारे हलकल्लोळ माजवला नाही, हें पाहून सातारकर मंडळीहि आश्चर्यचकित झाली. कराडची मंडळी संघटनेची शिस्त इतकी पवित्र मानतात, हा अनुभव त्यांना नवीन होता. अनुभवांतून

अंगीं समंजसपणा निर्माण झाल्याचीं उदाहरणं असूं शकतात; परंतु यशस्वी राजकारण करण्यासाठी सातारकरांना उपजत समंजसपणाची प्रचीति यशवंतरावांनी या निमित्तानं आणून दिली.

जिल्हा-कॉंग्रेसचं दप्तर तरुण गटाच्या स्वाधीन होतं तें हातांतून गेलं तरी कुणी निराश बनले नाहीत किंवा कॉंग्रेसच्या कामापासून यत्किंचितहि ढळले नाहीत. याचा प्रत्यय कायदेमंडळाच्या निवडणुकीच्या वेळीं आला. कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवार ठरवतांनाहि जिल्ह्यांत कांहीसा संघर्ष निर्माण झाला. कॉंग्रेस-संघटनेवर त्या काळांत उच्चभ्रू मंडळी अधिकार सांगत असत आणि अधिकार गाजवत असत. निवडणुकीची संधि येतांच जिल्ह्यांतल्या मान्यवरांनी उमेदवार हा सुशिक्षित, शक्य तर वकीलवर्गांतील असावा, असा विचारप्रवाह सोडून दिला. पण जिल्ह्यांतल्या तरुण-वर्गाचंहि एक मत होतं. उमेदवार हा तरुण, १९३० च्या प्रत्यक्ष चळवळींतून आलेला असावा, असं तरुणांचं मत होतं. त्यामागे सबळ कारणहि होतं. निवडणुकांचा फायदा प्रतिक्रियावादी लोकांनी घ्यायचा, त्याचा उपयोग करून घ्यायचा, हें त्या काळांत घडत असे. रावसाहेब, रावबहादूर, सरकारी नोकरदारवर्ग असा जो प्रतिगामीवर्ग स्वातंत्र्य-चळवळीच्या बाजूनं कधी उभा नसायचा, तो अशा निवडणुकांच्या वेळीं आघाडीवर राहून सत्ता ताब्यांत ठेवण्याचा लाभ उठवत असे. ही प्रथा नाहीशी व्हावी आणि चळवळींत जे प्रत्यक्ष उडी घेतात, काम करतात, हालअपेष्टा भोगतात, त्यांना कामाची वेगळ्या प्रकारची आणखी संधि मिळावी आणि मिळणाऱ्या सत्तेचा उपयोग सामान्य माणसाचं जीवन सुधारण्यासाठी व्हावा, तो मार्ग मोकळा व्हावा असं तरुण गटाला वाटत होतं. दुसऱ्या मताच्या या कार्यकर्त्यांनी आपला दृष्टिकोन जिल्ह्यांतल्या मान्यवरांना पटवून देण्याचा परोपरीनं प्रयत्न केला; परंतु तरुणांनी सुचवलेले उमेदवार श्री. आत्माराम पाटील यांना उमेदवार म्हणून स्वीकारण्यास मान्यवरांचं मन तयार नव्हतं. किंबहुना उमेदवार कोण असावा हा प्रश्न त्यांनी प्रतिष्ठेचा बनविला आणि त्यांतून मग अंतर्गत संघर्ष वाढत राहिला.

जिल्हा-पातळीवर या वादाचा निर्णय होत नाही असं जेव्हा निश्चित झालं, तेव्हा ज्येष्ठ कॉंग्रेस-नेत्यांपर्यंत हें गाऱ्हाणं न्यावं आणि आपला दृष्टिकोन स्पष्ट करून त्याला मान्यता मिळवावी असा विचार तरुण गटामध्ये बळावला. १९३० नंतरच्या काळांत आत्माराम पाटील हे बहुजन-समाजाचे प्रतिनिधि म्हणून नेतृत्व करीत होते. या आपल्या प्रतिनिधीला जिल्ह्याचा प्रमुख पुढारी बनवला पाहिजे अशी महत्त्वाकांक्षा तरुण गटांत निर्माण झालेली होती. यशवंतराव हे त्यांचे सहकारी, त्यांच्या बरोबरीनं सर्व कामांत भाग घेत होते. आत्माराम पाटील यांच्या पुढारीपणावर, कायदेमंडळाच्या निवडणुकांच्या निमित्तानं शिक्कामोर्तब करण्याची संधि आलेली असतांना, जिल्ह्याचं परंपरावादी मान्यवर नेतृत्व मात्र ते मान्य करण्यास तयार नव्हते. अखेर स्थानिक स्वरूपाच्या वाटाघाटीमध्ये निराशा प्राप्त झाल्यानं, कॉंग्रेस-श्रेष्ठांसमोर जाऊन, त्यांना

वस्तुस्थिति सांगावी आणि न्याय मिळवावा ही कामगिरी यशवंतरावांकडे सोपवण्यांत आली. ठरल्याप्रमाणे एक दिवस यशवंतराव पुण्यास दाखल झाले आणि महाराष्ट्र-कॉंग्रेसचे नेते श्री. शंकरराव देव यांच्याशीं त्यांनी चर्चा केली. श्री. केशवराव जेधे यांच्यासमोरहि बाजू मांडली. कार्यकर्त्यांचा दृष्टिकोन निवेदन केला, इच्छा सांगितली. ज्येष्ठांनी ऐकून घेतलं; श्री. जेधे कांहीसे अनुकूलहि दिसले, पण निर्णय कुणीच दिला नाही. श्री. शंकरराव देव आणि सातारा जिल्ह्यांतील मान्यवर नेते मंडळी यांचा घनिष्ठ संबंध होता. राष्ट्रीय चळवळींतले प्रारंभापासूनचे नेते असलेल्या मंडळींचा विचार घेणं त्यांना आवश्यक वाटलं असावं. त्यामुळे निर्णय कांही होऊं शकला नाही आणि यशवंतरावांना दुखऱ्या मनानंच सातारला परतावं लागलं. जिल्ह्यांत पोंचल्यावर पुन्हा चर्चा सुरू झाली. कार्यकर्ते स्वस्थ रहाण्यास व घडेल तसं पहात बसण्यास तयार नव्हते. खल सुरू राहिला आणि त्यांतून यशवंतरावांनी मुंबईला जावं, सरदार पटेल यांना भेटावं आणि कार्यकर्त्यांची भावना सांगावी असा विचार ठरला. मुंबईपर्यंतच्या खर्चाची जमवाजमव मग करण्यांत आली आणि न्याय मिळवून घेण्याच्या कामगिरीवर यशवंतरावांची रवानगी पुन्हा करण्यांत आली.

सरदार पटेल हे त्या वेळीं मुंबईस आपल्या मुलाच्याच घरीं रहात असत. एवढ्या मोठ्या पुढाऱ्यास भेटावं कसं आणि बोलावं कसं, या विवंचनेंतच अखेर यशवंतराव भेटीसाठी म्हणून चिठ्ठीद्वारें सरदारांपर्यंत पोंचले. यशवंतराव त्या वेळीं बी. ए. च्या वर्गातले विद्यार्थी होते. ज्येष्ठ-श्रेष्ठ नेत्यांना भेटण्याचा आणि चर्चा करण्याचा अनुभव संग्रहीं नव्हता, पण कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे मुंबईला येण्याचं धाडस तर केलं होतं. भेटीसाठी चिठ्ठी आंत गेली पण कांही हालचाल दिसेना. असा बराच वेळ गेला. सरदारांशीं भेट होऊन चर्चा घडण्याचं लक्षण दिसेना. तरी पण मनाचा हिय्या करून तिथेच बसून रहाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. असा बराच वेळ गेला आणि मग पटेलांनी बोलावलं. कुठले, कोण, कशासाठी आलांत वगैरे चौकशी त्यांनी केली. भीड चेपून जेवढं सांगतां येणं शक्य होतं तेवढं यशवंतरावांनी सांगितलं. आपण एक बहुजन-समाजांतील कार्यकर्ते असून कॉलेजमधील विद्यार्थी आहोंत हेंहि त्यांनी सांगितलं. सरदारांनी सर्व ऐकलं. पटेल हे गंभीर स्वभावाचे आणि चेहऱ्याचे नेते. कुणाची बाजू ऐकतांना त्यांच्या चेहऱ्यावरील गांभीर्य आणखीनच वाढत असे. गंभीरपणानं सातारच्या या तरुणाचं म्हणणं त्यांनी ऐकलं. पण निर्णय, हो नाही अन् नाही असाहि नाही. नेत्यांच्या मनाचा थांगपत्ता क्वचितच लागतो. त्यांतून सरदार तर मोठे मुत्सद्दी. सरदारांच्या मनाचा आणि निर्णयाचा थांगपत्ता यशवंतरावांना लागणं शक्यच नव्हतं. भेटलों आणि बोललों एवढंच समाधान मिळवून यशवंतरावांना सातारला परत फिरावं लागलं.

यशवंतराव सातारला परतले तेव्हा उमेदवारांचीं नांवं अधिकृतपणें जाहीर होण्यास थोडे दिवस उरले होते. प्रयत्न करूनहि हुकमी यश न मिळाल्यानं कार्यकर्ते निराश बनले होते. काय करावं हें कुणाळाच कांहीं सुचत नव्हतं. पण आश्चर्य असं

की, पुढच्या चार-पांच दिवसांत अधिकृत उमेदवारांचीं जीं नांवं जाहीर झालीं त्यामध्ये आत्माराम पाटील यांचं नांव झळकलं. कार्यकर्त्यांनीं पहिली फेरी तर जिंकली. पण खरा प्रश्न निर्माण झाला तो आत्माराम पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतरच !

कॉंग्रेसमध्ये त्या काळांत सुख-स्वास्थ्य लाभलेले लोकच राजकारण करत असत. तेच आघाडीवर असत. सातारा जिल्ह्यांतहि असे लोक बरेच होते. कॉंग्रेस-विरोधी-पक्षांत ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी होते. कूपर हे त्या वेळीं जिल्ह्यांतलं एक बडं प्रस्थ होतं. आत्माराम पाटील हे सरंजामदार, सरदार या वर्गातले नव्हते; पण त्यांनाच उमेदवार म्हणून निवडणुकींत यशस्वी करायचं होतं. जिल्ह्यांतले मान्यवर नेते आपापल्या ठिकाणीं स्वस्थ होते. त्यांच्या हातांतून तरुणांनी उमेदवारी हिसकावून घेतली होती. साहजिकच ते दुखावले होते. यशवंतरावांचा आणि बरोबरच्या तरुणांचा एवढ्या मोठ्या निवडणुकीचा तो पहिलाच अनुभव. प्रचाराचं रान उठवायचं होतं, पण पैसा नव्हता. साधनं अपुरीं होतीं. होते फक्त कार्यकर्ते. या कार्यकर्त्यांची जिद्द दांडगी होती. मिळेल त्या साधनानं सारा जिल्हा प्रचारकार्यानं त्यांनी दणाणून सोडला. सर्वत्र जम बसवला, आपुलकी निर्माण केली आणि बहुजन-समाजांत तळापासून जागृति केली. परिणाम असा झाला की, आत्माराम पाटील यांच्यावर मतदारांनी मतांचा पाऊस पाडला. सातारा जिल्ह्यांत त्या वेळीं जे उमेदवार निवडणुकीला उभे केले होते, त्या सर्वांमध्ये आत्माराम पाटील यांना अधिक मतं तर मिळालींच, शिवाय महाराष्ट्रांतहि सर्वाधिक मतं मिळवणारे ते मानकरी ठरले. संघटना-कौशल्य, राजकीय धोरणीपणा आणि समयोचित वक्तृत्व याबाबत यशवंतरावांची त्या वेळीं कसोटीच लागून गेली. त्यांच्या चातुर्यामुळे यश हस्तगत करणं शक्य झालं. यशवंतरावांच्या सामाजिक आणि राजकीय कर्तृत्वाची भविष्यवाणीच या यशानं सातारा जिल्ह्याला ऐकवली. जिल्ह्यांतल्या मान्यवर नेत्यांनाहि याची जाणीव झाली असावी. उमेदवारीच्या संघर्षावरून एकमेकांचीं मनं फाटलीं होतीं. विजयामुळे कार्यकर्ते बेभान होण्याचा प्रसंग होता. तसं घडलं असतं तर जिल्ह्यांतल्या संघटनेच्या चिरफळ्या होऊन त्या सांधण्यांतच पुढचीं कांही वर्षं खर्ची पडलीं असतीं. परंतु तसं घडलं नाही. आत्माराम पाटील यांच्या विजयाचं महत्त्व जिल्ह्यांतल्या धुरिणांनीं जोखलं. राष्ट्रीय चळवळीची आणि कॉंग्रेसची शक्ति बहुजन-समाजांत तळापर्यंत पोंचली आहे आणि तें कार्य तरुणांनी केलं आहे याचा साक्षात्कार या निवडणुकीनं त्यांना घडविला होता. त्यामुळे त्यांनी स्वतःला सावरलं आणि सारे कार्यकर्तेहि सावरले गेले. भाऊसाहेब सोमणांसारख्या मुत्सद्यानं तर कार्यकर्त्यांच्या पाठीशीं आपला आशीर्वाद उभा केला. निवडणूक आणि नंतरची दुसरी फेरीहि यशवंतरावांनी अशा प्रकारे जिंकली.

हें सारं सुरू होतं, निवडणूक जिंकली होती, तरी यशवंतरावांच्या मनांतली राजकीय विचारांची खळखळ थांबलेली नव्हती. १९३४ मध्ये कॉंग्रेस समाजवादी-पक्ष स्थापन झाला त्या वेळीं त्याकडे ते सुरुवातीला आकर्षिले गेले होते. या पक्षांत अच्युतराव पटवर्धन, एस. एम्. जोशी, ना. ग. गोरे अशीं कर्तीं माणसं होतीं. त्यांच्याबद्दल यशवंत-

रावांच्या मनांत आदरहि होता. परंतु त्या पक्षाची कामाची पद्धत, तऱ्हा पाहिल्यानंतर ते तिथे फार काळ रमले नाहीत. समाजवादाच्या चळवळीबद्दल यशवंतरावांनी आपल्या मनांत विचारांची कांही जुळणी केली होती. समाजवादाची चळवळ ही समतेची चळवळ म्हणून सुरू होत आहे, हें त्यांना उमजलं होतं. स्वातंत्र्याची चळवळ ही इंग्रजांचं राज्य घालवण्यापुरती मर्यादित नाही, समाजांतील विषमता दूर केली पाहिजे, समता निर्माण केली पाहिजे, नवीन समाज-रचना आणली पाहिजे हा चळवळीसंबंधीचा मनांत पक्का विचार झाला होता. पं. जवाहरलाल नेहरू यांनी फैजपूर कॉंग्रेसमध्ये आणि आत्म-चरित्रांतहि समाजवादाचा विचार स्पष्टपणें मांडला असल्यानं पंडितजींच्या नेतृत्वाचा ठसा यशवंतरावांच्या मनावर टिकून राहिला होता.

पं. नेहरूंनी स्वातंत्र्याच्या चळवळीचं विश्लेषण ऐतिहासिक संदर्भात केलं होतं. समाजवादाचा, धर्म-निरपेक्षतेचा ( सेक्युलॅरिझम ) विचारहि त्यांनी स्पष्ट मांडला होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची चळवळ ही केवळ स्वातंत्र्याची चळवळ नाही, तर इतिहासांत साम्राज्यशाहीवादी दृष्टि आहे आणि त्याचा फायदा घेऊन जी आर्थिक कुरघोडी केली जात आहे, आर्थिक शोषण घडत आहे, सामाजिक शोषण होत आहे, त्यांतून बाहेर पडायचं तर स्वातंत्र्य मिळवलं पाहिजे; एका अर्थानं साम्राज्यवादाविरुद्ध जो लढा आहे त्याचा एक भाग म्हणून हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा लढा आहे हें पंडितजींचं विश्लेषण त्यांच्यासमोर होतं. कॉंग्रेसच्या चळवळीचं आकर्षण त्यांच्या मनाला निरंतरचं चिकटून राहिलं तें त्यामुळेच.

समाजवादाच्या चळवळींत ते टिकले नाहीत हें खरं, पण १९३६–३७–३८ च्या सुमारास एम्. एन्. रॉय यांच्या विचारांनी त्यांच्या मनाची पकड घेतली आणि रॉय यांच्या रॅडिकल कॉंग्रेस-जनांच्या मेळाव्यांत यशवंतराव कांही काळ दाखल झाले. एम्. एन्. रॉय हे प्रदीर्घ तुरुंगवासाची शिक्षा भोगून १९३६ च्या अखेरीला बाहेर आले होते. रॉय हे मूळचे आंतरराष्ट्रीय कम्युनिझमचे बोट धरून त्या धोरणानं चालणारे. परंतु कम्युनिस्टांची अति डावेपणाची प्रवृत्ति पुढे पुढे रॉय यांना मानवेनाशी झाली. हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध कॉंग्रेस-संघटना ही म. गांधींच्या नेतृत्वाखाली जागरूकपणें चळवळ करीत होती आणि हिंदुस्थानांतील जनता या चळवळीच्या पाठीशीं प्रचंड शक्तीनं उभी आहे याची जाणीव रॉयना होती. साम्राज्यवादाविरुद्ध सुरू असलेल्या या चळवळीनं विश्वरूप धारण करायचं, तर कॉंग्रेसमध्ये त्यासाठी पर्यायी नेतृत्व असलं पाहिजे, तसं नेतृत्व निर्माण झालं पाहिजे, यावर त्यांचा भर होता. असं नेतृत्व, कॉंग्रेस-अंतर्गतच निर्माण झालं, तर म. गांधींचं नेतृत्व बाजूला पडेल आणि मग ब्रिटिश सरकारवर संघटितपणें निकराचा हल्ला करणं शक्य होईल; इतकंच नव्हे तर, सरकारच्या कच्छपीं असलेल्या वर्गालाहि मग त्राही भगवन् करण्याचा, वठणीवर आणण्याचा हेतु साध्य होईल, अशी त्यांची धारणा होती. समाजांतील विषमता दूर करणं हेंहि त्यांना या चळवळीद्वारे अभिप्रेत होतं. तुरुंगांतून सुटल्यानंतर हें ध्येय समोर ठेवूनच रॉय हे कॉंग्रेसमध्ये दाखल झाले.

काँग्रेसची चळवळ ही एका विशिष्ट दिशेनंच पुढे रेटत न्यायची या हेतूनंच ते त्यांत दाखल झालेले असल्यानं, त्यांनी कांही योजना निश्चित केल्या आणि त्या योजनांच्या पूर्ततेसाठी काँग्रेसांतर्गतच एक वेगळा गट स्थापन केला. रॅडिकल काँग्रेस-जन या नांवानं हा गट स्थापन झाला होता.

यशवंतरावांना या नव्या गटाचं आकर्षण निर्माण झालं. घडलं तें असं की, यशवंतराव हे कायदेमंडळाच्या निवडणुकीसाठी, त्यांचे उमेदवार आत्माराम पाटील यांच्या प्रचारासाठी, गावोगाव दौरा करत होते. काँग्रेसच्या निवडणूक-प्रचारासाठी श्री. एम्. एन्. रॉय हेहि हिंदुस्थानचा दौरा करत होते. रॉय हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असतांनाच यशवंतरावांची व त्यांची भेट घडून आली. पुढे सातारा येथे रॉय आणि चव्हाण यांच्यांत, ध्येय-धोरणाच्या संदर्भात, सखोल चर्चा झाली. महाराष्ट्रांत रॉय यांच्या विचाराचा झेंडा खांद्यावर घेतलेल्यांचा गट निर्माण झालेला होताच. साताऱ्याच्या भेटीमध्ये तरुण यशवंतरावांचे विचार आणि संघटनेंतील कामाचे अनुभव रॉय यांनी शांतपणें, काळजीपूर्वक ऐकून घेतले. बहुजन-समाजाच्या परिस्थितीचा सखोल अभ्यास, संघटनेद्वारे त्यांच्यांत जागृति करण्याचा प्रयत्न, चळवळीच्या प्रवाहांत प्रत्यक्ष सामील करून घेण्याचा उपक्रम आणि पुढेमागे, या समाजाला सत्तेच्या केंद्रस्थानीं जाण्यासाठी संधि उपलब्ध करून देण्याची जिद्द या संबंधांतील या तरुणाचे निर्भेळ विचार आणि बिनतोड युक्तिवाद ऐकल्यानंतर रॉय प्रभावित झाले. फैजपूर काँग्रेस-अधिवेशनांत रॉय यांनी स्वतःच या विचाराचा प्रबंध मांडला होता. रॉय आणि यशवंतराव यांचा सांधा या चर्चेतून जमून गेला. सामाजिक क्रांतींतील शेतकरीवर्गाचं स्थान आणि राजकीय क्रांतीचं तंत्र या संदर्भांतहि सविस्तर चर्चा झाली होती आणि यशवंतरावांनीं आपली भूमिका स्पष्टपणें सांगितली होती.

रॉय यांच्या नेतृत्वाखालीं निश्चित स्वरूपाचा सामाजिक क्रांतीचा कार्यक्रम यशवंतरावांच्या मनांत तयार होत होता. त्याच वेळीं या दोघांची तासगाव येथे आयोजित करण्यांत आलेल्या रॉय गटाच्या परिषदेंत १९३८ मध्ये भेट झाली. किंबहुना यशवंतरावांनीच या परिषदेचा पुढाकार घेतला होता. मार्क्सवादावर आधारलेल्या एम्. एन्. रॉय यांच्या मानवतावादाचा अभ्यास त्यांनी पूर्वीच केला होता. या अभ्यासामुळे सामाजिक व राजकीय प्रश्नांची मीमांसा करण्याची शक्ति त्यांना पुढच्या काळांत प्राप्त झाली. मार्क्सवाद हा कांही ठोकळेबाज सिद्धान्त नसून वेगवेगळ्या सामाजिक, आर्थिक प्रश्नांचा शास्त्रीय अभ्यास करण्याची मार्क्सवाद ही एक पद्धति व तत्त्वज्ञान आहे; या दृष्टिकोनांतून रॉय हे साम्यवादाकडे पहात होते. बहुजन-समाजांत जन्मलेले यशवंतराव जन-जीवनाशीं एकरूप झाले होते. शिक्षणामुळे, वाचनामुळे, तुरुंगांत निरनिराळ्या नेत्यांशीं झालेल्या चर्चेमुळे, जीवनाचा अन्वयार्थ लावण्याची योग्यता त्यांच्यांत निर्माण झाली होती. रॉय यांच्या सामाजिक क्रांतीच्या विचारानं त्यामुळेच त्यांना खेचून घेतलं.

तासगावला रॉय यांची परिषद झाली त्या वेळीं रॉय यांनी काँग्रेसमधील पर्यायी क्रांतिकारी नेतृत्वाचं मूळ धरलं होतं. गांधीप्रणित मार्गापेक्षां त्यांचे चळवळीचे मार्ग आणि ध्येय वेगळीं होतीं, पण रॉय यांचं प्रस्थ वाढत राहिलेलं पाहून महाराष्ट्र-काँग्रेस अस्वस्थ बनली. म. गांधींच्या नेतृत्वाच्या मुळावर हे रॉयवादी आणि त्यांची चळवळ आली आहे असं लक्षांत येतांच त्यांनी तासगावची परिषद उधळून लावण्याचे बेत रचले; आणि परिणामीं तासगावच्या परिषदेंत गोंधळ उडवून दिला. काँग्रेसमधील उजव्या गटाच्या मंडळींनी नाना पाटील आणि त्यांचेच साथीदार त्यासाठी हाताशीं धरले आणि त्यांनी नेमून दिलेली कामगिरी यथासांग पार पाडली. परिषद उधळली गेली तरी रॉय डगमगले नाहीत. त्यांनी त्याच दिवशीं, कार्यकर्त्यांची एक खाजगी बैठक घेतली आणि सविस्तर चर्चा केली. यशवंतराव या खाजगी बैठकीला उपस्थित होते आणि त्यांनी चर्चेत भाग घेऊन आपली भूमिका सांगितली.

रॉय यांनी कार्यकर्त्यांपुढे संघटनेचं जें चित्र उभं केलं तें मोठं आकर्षक होतं. म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्या कार्याचं, व्यक्तिमत्त्वाचं व विचारांचं आकर्षण तर यशवंतरावांना होतंच, पण रॉय यांची प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वी त्यांचे लेख, त्यांचे विचार हेहि त्यांनी वाचलेले असल्यामुळे रॉय यांच्यासंबंधी त्यांच्या मनांत अलीकडे स्थान निर्माण झालं होतं. रॉय हे लेनिनवादी होते, प्रत्यक्ष क्रांतीच्या लढ्यांतलं त्यांचं जीवन होतं आणि काँग्रेसमार्फतच काम करायचं म्हणून ते काँग्रेसमध्ये आले होते. श्री. ह. रा. महाजनी हे त्या वेळीं जिल्हा-काँग्रेसचे चिटणीस होते व ते रॉयवादी बनले होते. काशीनाथ देशमुख, लक्ष्मणशास्त्री जोशी, आत्माराम पाटील, भय्याशास्त्री वाटवे, राघु-अण्णा लिमये, वामनराव कुलकर्णी, असा हा सर्व मित्र-परिवार होता. यांच्यापैकी राघुअण्णा लिमये रॉयवादी बनले नाहीत. श्री. देशमुख कट्टर गांधीवादीच राहिले. ते काँग्रेस सोशालिस्ट झाले. असें असलें तरी, त्यामुळे या मंडळींच्या कामांत आणि मैत्रींत कधी बाध आला नाही. रॉय यांच्याशीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रश्नांबाबत जेव्हा चर्चा होत त्या वेळीं रॉय यांच्याकडून व्यक्त होणारीं मतं त्यांना अधिक योग्य वाटत असत. स्वातंत्र्यलढ्याबद्दलहि चर्चा होत असे. आपण चळवळ करतों, सत्याग्रह करतों, तुरुंगांत जातों, पण शेवटीं हा लढा आपण जिंकणार कसा, असा या तरुण मंडळींचा रॉय यांना सवाल असे. स्वातंत्र्याचा लढा वाढणार कसा, याचं व्यावहारिक उत्तर रॉय यांच्याकडून त्यांना हवं होतं. या प्रश्नाचं उत्तर म्हणून स्वातंत्र्याच्या चळवळीचं जें चित्र या तरुणांसमोर रॉय यांनी मांडलं त्यानं या मंडळींना आकर्षून घेतलं. रॉय यांचं म्हणणं असं की, आपली स्वातंत्र्याची चळवळ म्हणजे कॉन्स्टिटयूशन असेंब्लीची रचना बनली पाहिजे. कामगारांची संघटना, शेतकऱ्यांची संघटना, प्रत्येक गावाची संघटना, असं हें वाढत राहिलं पाहिजे. संघटना अशी प्रभावी बनली पाहिजे की, प्रत्येक गाव म्हणजे कॉन्स्टिटयूशन असेंब्लीचं एक घटक बनलं पाहिजे. हें गाव इतकं समर्थ होईल आणि तें स्वतःच म्हणेल की, आम्हीच सरकार आहोंत. रॉय यांचे क्रांतिकारी

विचार आणि रशियन राज्यक्रांतीच्या इतिहासांतील अशा प्रकारच्या स्वातंत्र्याच्या क्रांतीचा संदर्भ, यामुळे ही मंडळी भारावून गेली.

रॉय आणि त्यांच्या भोंवतीं निर्माण झालेली गोतावळ काँग्रेसमध्ये राहूनच या विचारांचा पाठपुरावा करत होती. आपल्या ध्येयपूर्तीसाठी काँग्रेस-संघटनेचाच उपयोग होईल या भावनेनं ते काँग्रेसला धरून होते. परंतु स्वतः यशवंतरावांची भूमिका वेगळी होती. ते खऱ्या अर्थानं काँग्रेसचे होते. काँग्रेस-संघटनेला त्यांच्या मनांत पहिल्या क्रमांकाचं स्थान होतं. रॉय यांच्या आकर्षक विचारसरणीनं ते भारावले होते आणि सामाजिक क्रांतीचा विचार काँग्रेसनं टोकाला जाऊन स्वीकारला असता, तर त्याचं कदाचित् त्यांनी स्वागतहि केलं असतं; परंतु लो. टिळक, म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरू यांनी दाखविलेल्या दिशेनं वाटचाल करीत ते काँग्रेसच्या चळवळींत दाखल झाले होते आणि या नेत्यांनी स्वातंत्र्यलढ्याला समाजवादाच्या दृष्टीनं मार्गदर्शन करून, लढ्याचा पाया अधिक विस्तृत बनवला होता. साम्राज्यवादीविरोधी चळवळीचं स्वरूप या लढ्याला प्राप्त झालं होतं आणि यशवंतरावांनी सर्व सामर्थ्यानिशी त्यांत स्वतःला झोकून दिलं होतं. त्यामुळे रॉय यांचं व्यक्तिमत्त्व आणि विचार याचं त्यांच्या मनांत जरी आकर्षण निर्माण झालं तरी म. गांधी आणि पं. नेहरू यांच्या व्यक्तिमत्त्वाचा पगडा कमी झाला नव्हताच. त्या दृष्टीनं १९३० ते १९४१ हा त्यांच्या जीवनांतील काळ हा वैचारिक अंतर्विरोधाचा ठरला. मनासमोर अनेक प्रश्न निर्माण होत होते आणि समाधान कशांतच मिळत नव्हतं.

याच वेळीं दुसरं महायुद्ध सुरू झालं होतं. रॉय यांनी महायुद्धविषयक धोरणासंबंधी जे विचार व्यक्त केले त्यांतून रॅडिकल काँग्रेस-जनांमध्ये मतभेद वाढूं लागले. रॉय यांचा काँग्रेसशींहि धोरणात्मक मतभेद झाला. राष्ट्रवादी भावना ज्यांच्या मनांत ठाम होत्या त्यांचे आणि रॉय यांचे वैचारिक मतभेद सुरू झाले. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध सुरू असलेला हिंदुस्थानांतील लढा हा युद्धकाळांत चालू ठेवणं योग्य नव्हे असं रॉय यांचं सांगणं असे. त्यांचं म्हणणं असं की, जागतिक लोकशाहीचं संरक्षण झालं तरच वसाहतींचा आणि भारताच्या स्वातंत्र्याचा लढा यशस्वी होईल. हिटलरनं हुकूमशाहीसाठी सुरू केलेल्या युद्धामुळे जागतिक लोकशाही संकटांत सापडली आहे आणि या युद्धाच्या शेवटीं ब्रिटिश साम्राज्यशाहीचा आर्थिक पायाच ढासळून जाईल म्हणून दोस्तांना विजय मिळाला तरी साम्राज्यशाही विलयासच जाईल. अशा स्थितींत भारतीय स्वातंत्र्यलढा हा महत्त्वाचा राहिला नाही. तो जिंकण्यासाठी प्रथम जागतिक लोकशाहीचा लढा जिंकला पाहिजे अशी रॉय यांनी भूमिका मांडण्यास प्रारंभ केला. ब्रिटिशांविरुद्ध, ते केवळ महायुद्धांत अडकलेले आहेत म्हणून, त्यांच्याविरुद्ध हिंदुस्थानांत उठाव करायचा नाही, या श्री. रॉय यांच्या मताबद्दल बरेच मतभेद निर्माण झाले. रॉय हे आत्मविश्वासानं सांगत होते, पण त्यांची मीमांसा सर्वांनाच मान्य होत नव्हती. ज्यांना हा विचार पटला ते त्यांच्याबरोबर राहिले. ज्यांचा मतभेद होता ते रॉय यांच्यापासून बाजूला झाले.

ब्रिटिशांविरुद्ध उठावणी न करण्याच्या विचारांशीं यशवंतराव अनुकूल नव्हते. भारतीय कॉंग्रेसच्या नेतृत्वालाहि रॉय यांचा हा विचार मान्य नव्हता. ब्रिटिशांशीं असहकार पुकारण्यांत कॉंग्रेसचा, हिटलरला आणि त्याच्या हुकूमशाहीला – फॅसिझमला – पाठिंबा होता असं मुळीच नव्हतं. कॉंग्रेसला ही हुकूमशाही अमान्यच होती. हिटलरची हुकूमशाही ही लोकशाही विचार आणि मानवता यांवर एक भयंकर संकट तर खरंच, परंतु दुसऱ्या बाजूला ब्रिटिशांचा वसाहतवाद आणि हिटलरची हुकूमशाही यांत फरक करणंहि कठीण होतं. अशा स्थितींत ब्रिटिशांना त्या युद्धांत साहाय्य करावं असं म्हणत रहाणं ही एक बौद्धिक कसरत होती. यशवंतरावांनी या निष्कर्षाबद्दल अनेकांशीं चर्चा केली, विचारविनिमय केला. इतरांनीहि रॉय यांचीच भूमिका कशी योग्य आहे हें पटवण्याचा प्रयत्न केला. समाजवादी पक्षाच्या विचारानंतर यशवंतराव आता दुसऱ्यांदा वैचारिक द्वंद्वांत सापडले होते. परंतु अखेरीस कॉंग्रेस-संघटनेचे विचार आणि कॉंग्रेसवरील विश्वास याचाच विजय झाला आणि राजकीय विचारप्रणालीचं रॉय यांचं धरलेलं बोट सुटलं.

यशवंतराव यांनी मुळांतच रॉय यांच्या विचारांची सोबत कां धरली हा एक संशोधनाचा विषय होऊं शकेल. पण त्याचं उत्तर यशवंतराव हे समाजांतल्या ज्या थरांत जन्माला आले, वाढले आणि त्यांनी जें अनुभवलं त्याच्या विश्लेषणांतून मिळूं शकतं. नागरी विभागांतील सरंजामदार आणि ग्रामीण भागांतील सरंजामदार यांच्या मनोवृत्तींत त्यांना कांहीं फरक आढळून येत नव्हता. बहुजनवर्गाकडे पहाण्याची आणि त्याच्याशीं वागण्याची दोघांची वृत्ति एकच होती. समाजांतल्या या परस्पर-हितसंबंधी वर्गाविरुद्ध सामान्य जनतेनं संघटित होऊन मुकाबला करावा या विचाराशीं ते सहमत होते. पण कॉंग्रेसचे त्या काळांतले जे नेते किंवा प्रारंभींच्या काळांत होऊन गेले होते ते नेते, या सर्व व्यक्ति समाजाच्या विशिष्ट थरांतील, वरच्या वर्गांतील, सुखासीन वर्गांतीलच होत्या; उलट रॉय हे रशियन क्रांतीचा वसा घेऊन आलेले होते. त्यागमय असं त्यांचं जीवन होतं.

१९३० नंतर रॉय यांचं मूळचं रशियन क्रांतीचं तत्त्वज्ञान मात्र उरलं नव्हतं. प्रारंभींच्याच कार्याशीं तें सुसंगत राहिलं असतं, तर त्या वेळच्या हिंदुस्थानांतील तरुण वर्गाची साथ त्यांना अधिक प्रमाणांत मिळण्याची शक्यता होती. कारण बहुजन-समाजांतला हा तरुण वर्ग परिस्थितीनं पिचलेला होता आणि बांध फोडून बाहेर पडण्याची आवश्यकता त्याला पटली होती. परिस्थितीचं आव्हान स्वीकारण्याच्या मनःस्थितीपर्यंत तो पोंचला होता. टिळकांच्या नंतर गांधींनीं या वर्गाला आवाहन करून, ध्येयाकडे जाण्याचा जो मार्ग दाखवला, तो मार्ग बहुजन-समाजाला, आपल्या ध्येयाकडे नेणारा मार्ग आहे असंच वाटलं असलं पाहिजे. गांधी हे धार्मिक प्रवृत्तीचंच पुनरुज्जीवन करीत आहेत अशी रॉय यांची टीका असे. पण त्याचबरोबर गांधी हे समाजांतल्या प्रस्थापितांविरुद्ध वातावरण निर्माण करतील आणि ही चळवळ, हा दृष्टिकोन, समाजांत वाढत राहील आणि त्यांतून असा एक क्षण निर्माण होईल की, समाजाच्या उद्धाराला अडथळा करणाऱ्या सर्वांचा त्यांत चक्काचूर होऊन जाईल, अशी तरुणांची भावना होती. अर्थातच ही मार्क्सप्रणीत विचारसरणी

आहे. समाजांत स्वतःच्या वर्गाबद्दल जागृत असलेला गट, हा नेहमीच धोरणानं वागणारा असतो. सामाजिक क्रांतीच्या ज्वाला भडकण्यास सुरुवात झाली आणि त्यामध्ये आपल्या हितसंबंधाला आता फार मोठा धक्का पोंचणार आहे अशी जाणीव ज्या क्षणाला या वर्गाला होते त्या क्षणाला लगेच तो मिळतं-जुळतं घेण्यासाठी तयार होत असतो. यशवंतरावांच्या संग्रहीं असे कांही अनुभव जमा झालेले होतेच. लहानपणापासून त्यांची वाटचाल, असे अनुभव घेत घेत सुरू राहिली होती. त्यामुळे रॉय यांचं तत्त्वज्ञान आणि कृति यांबद्दल त्यांच्या मनांत आकर्षण निर्माण होणं शक्य होतं. तरी पण यशवंतराव हे त्या वेळीं वैचारिक द्वंद्वांत सापडलेले आढळतात. टिळक, गांधी, नेहरू, मार्क्स, रॉय, म. फुले, शाहूमहाराज या सर्वांच्या राजकीय आणि सामाजिक विचारांचा संयोग त्यांच्या मनांत झालेला होता. ब्रिटिशांविरुद्ध देशांत निरनिराळ्या प्रांतांत जे सशस्त्र उठाव सुरू झाले होते, त्याचाहि परिणाम यशवंतरावांच्या तरुण मनावर झालेला असल्यास नवल नाही. श्री. तात्याराव सावरकर यांचं 'माझी जन्मठेप' हें पुस्तक त्यांनी वाचलं होतं. सावरकरांच्या सशस्त्र क्रांतीच्या विचारसरणीबाबत त्यांच्या मनांत आदर होता. हा आदर मनांत बाळगूनच १९३० सालीं यशवंतराव हे आपले एक मित्र श्री. राघुअण्णा लिमये यांच्या समवेत सावरकरांना भेटण्यासाठी रत्नागिरीलाहि गेले होते. १९२० नंतर कॉंग्रेसला जें नवं स्वरूप प्राप्त झालं होतं त्यामध्ये ते स्वतः कार्य करत होते. श्रीमंत आणि सुशिक्षित वर्गापुरत्या मर्यादित असलेल्या लोकशाहीवादी कॉंग्रेसमध्ये आता गांधींच्या प्रेरणेनं शेतकरी, मजूर आदि बहुसंख्येनं आले होते आणि संघटना मजबूत होऊं लागली होती. 'आहे रे' आणि 'नाही रे' या वर्गांतल्या 'नाही रे' वर्गाला शाहूमहाराजांच्या विचारसरणीचा आणि त्यांना प्रत्यक्ष संधि मिळवून देण्याच्या कृतीचा आधार लाभला होता. एका दृष्टीनं यशवंतराव ज्या सामाजिक आणि राजकीय क्रांतीचा विचार मनांत बाळगून होते त्याला अनुकूल वातावरण निर्माण होण्याला गति मिळाली होती. अशा परिस्थितींत, निश्चित ध्येय गाठण्यासाठी रॉय यांच्या मार्गानं झेप घ्यायची की गांधी-नेहरूंच्या मार्गानं झेप घ्यायची, अशा प्रकारच्या मनाच्या द्विधा अवस्थेच्या टोकावर ते आता उभे होते. कोणत्या मार्गानं सामाजिक हित अधिक साध्य होऊं शकेल याचा विचार मनाशीं चालला होता, पण मनानं गांधी-नेहरूंच्या वाटेनं जाण्याचाच कौल दिला.

यशवंतरावांच्या मनांत समाजवादाचं, लेनिनवादाचं आकर्षण निर्माण झालं होतं. त्यांचे एक कम्युनिस्ट मित्र श्री. विष्णुपंत चितळे यांच्याशीं रात्र-रात्र चर्चा करून त्यांनी मार्क्स समजावून घेतलेला होता. परंतु यशवंतरावांच्या स्वभावाची घडण अशी की, त्यांनी आपलीं मतं कधी एकांगीं बनवलीं नाहीत. अमका एक कांही म्हणतोय् म्हणून त्याच्यामागे जायचं अशी सवय आपल्या मनाला त्यांनी लावून घेतलेली नसल्यानं, एखाद्या व्यक्तीला बांधून घेऊन ते कधी चाललेले नाहीत. राजकारणांत त्यांना कुणी गुरुपद चिकटवण्याचा, ते अमक्यातमक्याच्या सल्ल्यानं राजकारणांतले निर्णय करतात असं

भासवण्याचा प्रयत्न होत असतो, पण ते स्वतः याच्याशीं सहमत नाहीत. अमके गुरु आणि आपण त्यांचे शिष्य, असं त्यांनी कधी मानलेलं नाही. प्रत्येक प्रश्न आणि त्या वेळची परिस्थिति यांचा मेळ घालूनच निकाल घ्यायचा अशी त्यांची पद्धत. रॉय यांच्या विचारांचं आकर्षण त्यांना होतं; परंतु प्रत्यक्ष लढा सुरू झाला, युद्ध सुरू झालं त्या वेळीं रॉय हे त्यांच्या मनांतल्या क्रांतीच्या कल्पनेची अंमलबजावणी करण्याऐवजी ब्रिटिशांना सहकार्य केलं पाहिजे असं म्हणूं लागले. रॉय यांचं म्हणणं असं होतं की, फॅसिझम हें मुख्यतः कम्युनिझम गाडण्यासाठी उगारलेलं अस्त्र आहे आणि इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी यांच्यांतील युद्ध म्हणजे इतिहासांतील एक अपघात आहे. याचा परिपाक, जर्मनीला केव्हा ना केव्हा कम्युनिझमविरुद्ध हल्ला करावा लागणारच आहे. वस्तुतः फॅसिझम विरुद्ध लोकशाही असाच लढा होण्याची गरज आहे. म्हणून लोकशाहीच्या बाजूला म्हणजेच ब्रिटिशांच्या बाजूला आपण असलं पाहिजे. रॉय यांची तात्त्विक बाजू ही अशी होती. आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात तें बरोबर होतं हें पुढच्या काळांत सिद्ध झालंहि. कारण पुढे जर्मनीनं रशियाविरुद्ध आक्रमण केलंच. यशवंतराव आणि त्यांच्या-बरोबरचे कार्यकर्ते विचार करत होते तो वेगळा होता. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यलढ्याच्या संदर्भात यशवंतराव त्याचा अर्थ लावत होते; कारण या लढ्यांतले ते शिपाई होते. त्यामुळे ज्या विचाराकरिता यशवंतरावांना रॉय यांचं आकर्षण होतं त्याला रॉय यांच्या ब्रिटिशधार्जिण्या विचारानं धक्का दिला व त्यांतूनच त्यांनी रॉय यांच्याबरोबर रहायचं नाही असा निर्णय केला. संघर्ष झाला तो विचारांचा आणि रॉय यांनी पाय मागे घेतला म्हणून! रॉय यांच्या विचाराला घाबरल्यामुळे यशवंतराव त्यांच्यापासून दूर झाले असं नव्हे. ज्या विचारांच्या आकर्षणानं ते रॉय यांच्या गोटांत सामील झाले होते, त्या विचारांची अंमलबजावणी करण्याची वेळ आली असतांना, त्याला बाध आला, रॉय हे केवळ बुद्धिवादी विचारमंथन करत राहिले म्हणून!

या दोघांचे मार्ग वेगळे झाले तरी लक्ष्मणशास्त्री जोशी, ह. रा. महाजनी, वामनराव कुलकर्णी, व. भ. कर्णिक, आत्माराम पाटील, अनंतराव भोसले अशी कांही मंडळी रॉय यांच्याबरोबरच राहिली. रॉय हे आपल्या विचाराशीं घट्ट होते. त्यांतून त्यांनी पुढे रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष जन्मास घातला. या पक्षातर्फे पुढे प्रांतीय व केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निवडणुकीसाठी उमेदवारहि उभे केले; पण त्यांत त्यांना यश आलं नाही. सातारा जिल्ह्यांत रॉय यांचा हा नवा पक्ष रुजला नाही. स्वातंत्र्यापर्यंत निष्क्रिय अवस्थेंत कसा तरी तो टिकून राहिला आणि स्वातंत्र्यानंतर १९४८ सालांत अखेर हा पक्ष विसर्जित झाला. राहिले फक्त रॉयवादी – चिकित्सक पद्धतीनं केवळ विचार करणारे.

# ६

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सहवासाचा यशवंतराव यांच्या मनावर व स्वभावावर परिणाम मात्र एका विशिष्ट दृष्टीनं निश्चित झाला. समाजवादाचा विचार त्यांच्या मनांत अगोदरपासूनच होता. रॉय यांच्या सहवासामुळे त्याला शास्त्रशुद्ध, अभ्यासू आणि सखोल अशी बैठक प्राप्त झाली. १९३० नंतरच्या पुढच्या दशकांत सर्व जगांतच, विचारी तरुणांना समाजवादाचं आकर्षण वाटत होतं. त्या काळांतील जागतिक परिस्थितीहि त्याला बऱ्याच अंशीं कारणीभूत होती. जागतिक मंदीमुळे भांडवलशाही अर्थव्यवस्थेला हादरे बसत होते. युरोपमध्ये हुकूमशाहीच्या उदयामुळे लोकशाहीचा पराभव होत राहिला होता. रशियांत मात्र साम्यवादी अर्थव्यवस्था निर्माण झाल्यानं तिथे प्रगति सुरू झाली होती. त्यामुळे हिंदुस्थानांतील, त्या काळांतील तरुणांनाहि मार्क्सवादाचं आकर्षण निर्माण झालं. लेनिनप्रणीत मार्क्सवादानं शास्त्रीय पद्धतीनं ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या आर्थिक पायाचे बुरखे फाडल्यानंतर हें आकर्षण अधिकच वाढीला लागलं.

यशवंतरावांनी बी. ए. पदवी संपादन केली होती. १९३७ सालीं कायदेमंडळाच्या निवडणुकींत आत्माराम पाटील यांना विजयी करून ती निवडणूकहि जिंकली होती. रॉय यांचा पक्ष बुद्धिवादी विचार-मंथन करण्यांत गुंतला होता. पं. नेहरू चीनमध्ये होते. फॅसिझमविरुद्ध उभं रहायचं की कम्युनिझमविरुद्ध, ब्रिटिशांविरुद्ध – वसाहतवादाविरुद्ध सुरू केलेल्या लढ्याचं काय, अशा प्रश्नांच्या चर्चा सुरू होत्या. त्याच वेळीं अखिल भारतीय कॉंग्रेसची बैठक पुण्यांत झाली. राजाजी, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित पंत आदि आघाडीचे नेते बैठकीस उपस्थित होते. तिथेहि चर्चा झाली, परंतु कसलाच निश्चित निर्णय होत नाहीं अशी यशवंतरावांच्या मनाची अवस्था होती. सातारा आणि कोल्हापूर जिल्हा हें त्यांचं कार्यक्षेत्र, पण तेंहि आता अपुरं वाटूं लागलं. मोठ्या क्षेत्रांत झेप घ्यायची तर त्या काळाला अनुलक्षून बी. ए. नंतरची उच्च शिक्षणाची

आणखी एक पायरी अगोदर ओलांडावी असेंहि विचार मनांत जमा होत राहिले. अर्थात् हे विचार वकिलीची परीक्षा देण्याचे होते. त्यासाठी त्यांना पुण्याला यावं लागणार होतं. पुणें शहराचं आकर्षण तर होतंच. पुणें हें शिक्षणाचं, विद्वानांचं माहेर. लो. टिळकांनी पुण्याला राजकीयदृष्ट्या साऱ्या देशांत एक प्रतिष्ठेचं स्थान प्राप्त करून दिलेलं होतं. पुण्यांत येण्यामुळे अभ्यासाचं, अनुभवाचं, ज्ञानाचं क्षेत्र रुंदावणार होतं. हे सर्व विचार मनांत होते, पण पुण्यास जावं कसं आणि रहायचं कुठे,- हा प्रश्नहि भेडसावत होता. पण योगायोग असा की, आत्माराम पाटील हे त्या वेळीं पुण्याला होते. यशवंतरावांनी आत्माराम पाटलांकडेच जायचं ठरवलं आणि एक दिवस ते पुण्यांत येऊन दाखल झाले. बाडबिस्तारा आत्माराम पाटलांकडेच ठेवला आणि वकील बनण्यासाठी पुण्याच्या लॉ-कॉलेजमध्ये नांव दाखल केलं.

वकील बनण्यासाठी यशवंतराव १९३९ मध्ये पुण्यांत आले खरे, पण संघर्षानं त्यांची पाठ सोडली नव्हती. मॅट्रिक होण्यांत त्यांची १९३० ते १९३३ अशीं तीन वर्षं खर्चीं पडलीं होतीं. राजकीय काम करतां करतांच त्यांना बी. ए. व्हावं लागलं होतं. अन् वकिलीचा अभ्यास करायला निघाले त्या वेळीं आपण आता कम्युनिस्ट व्हावं या विचारानं त्यांना घेरलं. युद्ध सुरू होतं, रॉय यांचं बोट सुटलं होतं, वसाहतवादाविरुद्धच्या लढ्यासाठी काँग्रेस निश्चित स्वरूपाचं असं कांही करत नव्हती आणि सर्वत्र केवळ चर्चा सुरू राहिल्या होत्या. या परिस्थितीनं यशवंतरावांच्या मनाचा कोंडमारा केला. कांही तरी करण्यासाठी मन धडपडत होतं, पण कुणी कांही करीत नव्हतं आणि करूंहि देत नव्हतं. या कुचंबलेल्या अवस्थेंतून बाहेर पडण्यासाठी त्यांना मार्ग दिसला तो कम्युनिस्ट बनण्याचा. कारण कम्युनिस्ट कांही वेगळं बोलत होते. अर्थात् त्यांचा खरा राग होता हिटलरवर, त्याच्या हुकूमशाहीवर. देशांतले कम्युनिस्ट त्या रोखानं भडक बोलत होते. करत मात्र नव्हतं कुणीच कांही! यशवंतरावांच्या मनाची अस्वस्थता त्यामुळे अधिकच वाढली. कम्युनिष्टांच्या भडक घोषणांचं आकर्षण त्यांच्या तरुण मनांत निर्माण झालं असावं. त्यामुळे अभ्यासावरील लक्ष उडालं. त्यांतून मग त्यांनी ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या परीक्षेला बसायचं नाही असा निर्णय केला. त्यांचे मित्र आत्माराम पाटील, ह. रा. महाजनी वगैरेंनी काँग्रेस सोडलीच होती. त्यासंबंधांतहि विचार करणं सुरूच होतं आणि त्यांतूनच एक दिवस युद्धविरोधी कार्यक्रमाच्या आखाड्यांत उतरलेल्या कम्युनिस्ट पक्षाबरोबर कां जाऊं नये, असा त्यांनी विचार केला.

मनाचा कौल झाला खरा, पण कम्युनिस्ट पक्षाची दोरी प्रत्यक्ष गळ्यांत अडकवण्यापूर्वी, आणि लाल तारा डोक्यावर धरण्यापूर्वी, रात्रंदिवस ज्यांच्या बरोबर काँग्रेसचं काम केलं, त्यांच्याशीं चर्चा करून, त्यांना विश्वासांत घेऊन, मगच कम्युनिस्टांचं सहकार्य घ्यावं, असं दुसरं मन आंतून सांगूं लागलं. आणि तेंहि खरंच होतं. कम्युनिस्ट बनायचं तें देशाचं काम करण्यासाठी. परंतु एकट्यानं करण्याचं हें काम नव्हतं. त्यासाठी साथीदार हे असलेच पाहिजेत. साथीदार नसतील तर कम्युनिस्ट बनल्याचं समाधान

मनाला झालं तरी कामाचं समाधान मिळणार नव्हतं. परिणामीं पहिलं समाधानहि टिकणार नव्हतं अशा चक्रांत मन सापडल्यानं साथीदार, मित्र, कार्यकर्ते यांच्याशीं चर्चा करण्यासाठी आणि कम्युनिस्ट बनण्याचा विचार त्यांच्याहि मनांत उतरवण्यासाठी यशवंतराव साताऱ्याला दाखल झाले. सातारा आणि वाई येथे या विषयावर मग तीन दिवस अहोरात्र चर्चा झाली. पण या चर्चेतून अनुकूल असं कांही निष्पन्न झालं नाही. कम्युनिस्ट म्हणून आम्हांला साथ देतां येणार नाही अशी मित्रांनी आपली भूमिका स्पष्ट शब्दांत सांगितली. त्यांच्या दृष्टीनं त्यांनी सल्ला दिला. स्वातंत्र्यासाठीच कॉंग्रेस झगडत होती. कोणत्या वेळीं नेमकं काय करायचं याचा निर्णय प्रमुख नेत्यांनी करायचा असून गांधी-नेहरू त्या दृष्टीनं निर्णय करतीलच, असं मित्रांनी सांगितलं. अशा स्थितींत कॉंग्रेसबरोबर राहूनच स्वातंत्र्यलढा लढायचा या मित्रांच्या मतांशीं जुळतं घेऊन आणि कॉंग्रेसमध्ये राहूनच स्वातंत्र्याची चळवळ करत रहायचं असा मनाशीं निर्णय करून यशवंतराव पुण्याला परतले.

या पुढच्या काळानंहि यशवंतरावांनी केलेला निर्णय योग्य होता अशीच ग्वाही दिली. कारण पुढे १९४० मध्ये कॉंग्रेसनं वैयक्तिक सत्याग्रहाचा निर्णय केला आणि त्यामुळे देशांतलं वातावरण बदललं. कॉंग्रेसनं सत्याग्रहाचा आदेश देतांच सरकारी यंत्रणा, विशेषतः गुप्त पोलिसखातं मात्र सज्ज झालं आणि कॉंग्रेस-कार्यकर्त्यांच्या नि नेत्यांच्या हालचालींची नोंद सुरू झाली. पुण्याच्या कॉंग्रेस-हाऊसवर, कार्यकर्त्यांची आणि गुप्त पोलिसांचीहि वर्दळ सुरू झाली. सत्याग्रह्यांच्या याद्या सुरू झाल्या. सत्याग्रहांत भाग घेण्याची संधि मिळण्यासाठी कार्यकर्ते कॉंग्रेस-हाऊसवर येऊन, त्यांच्या नांवांची नोंदणी करूं लागले. श्री. काकासाहेब गाडगीळ हे त्यांना मार्गदर्शन करत होते. काकासाहेब गाडगीळ व केशवराव जेधे यांनी तर सत्याग्रह करण्याचा दिवसहि पक्का केला. या सत्याग्रह-मोहिमेमध्ये लोकांमध्ये उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होऊं लागल्या. सत्याग्रह कशासाठी, त्यामागचा दृष्टिकोन कोणता याची जनतेला नीट कल्पना आलेली नव्हती. पण त्या वेळीं सुरू असलेल्या महायुद्धाला मदत करायची नाही आणि युद्धासाठी लष्करांत भरती व्हायचं नाहीं, ब्रिटिशांना एकहि माणूस मिळूं द्यायचा नाही, अशा घोषणा सुरू झाल्या. या घोषणा जे करतील ते सत्याग्रही म्हणून पकडले जाऊन तुरुंग भरूं लागले. सरदार पटेल, पं. पंत, सुभाषबाबू, मौलाना आझाद, शंकरराव देव आदि नेत्यांना सरकारनं पकडलं आणि मागोमाग सत्याग्रह्यांच्या तुकड्या तुरुंगांत दाखल होऊं लागल्या. देशांतलं वातावरण पुन्हा एकदा जिवंत बनलं. येरवड्याच्या तुरुंगांत गाडगीळ, जेधे, शंकरराव मोरे, तात्या देशपांडे, बापूसाहेब व नानासाहेब गुप्ते, बाळासाहेब खेर, मंगलदास पक्कासा, सरदार पटेल, कन्हय्यालाल मुन्शी आदि नेते डांबले गेले. नाशिक, ठाणें येथील तुरुंगहि भरले. अ, ब, क अशा वर्गवारीनं तुरुंगाच्या कोठड्या सत्याग्रह्यांनी भरून गेल्या. सर्वच प्रांतांत सत्याग्रहाची लाट उसळली तेव्हा अनेक व्यक्ति व गट राजकीय तडजोडीची भाषा बोलूं लागले. ही चळवळ मूठभर कॉंग्रेसवाल्यांची आहे; एरवी

भारतीय लोकांचा ब्रिटनवर विश्वास आहे असं भारतमंत्री अमेरी सांगूं लागला. तेजबहादूर सप्रूंसारखे नेते उभय पक्षांनी मिटवावं अशी विनंती करूं लागले. त्यांनी तसं एक निवेदनहि काढलं. रॉय यांनी नवा पक्ष स्थापन केला होता. युद्ध जिंकलंच पाहिजे अशा त्यांच्या घोषणा होत राहिल्या. दरम्यान सप्रूंनी सर्वपक्षीय परिषद आयोजित केली आणि या परिषदेंत तात्पुरतं, पण राष्ट्रीय सरकार स्थापन करावं असा ठराव केला. या परिषदेंत मुस्लिम लीग सहभागी झाली नाही; उलट भारताचीं दोन राज्यं करूनच भारताला स्वातंत्र्य मिळेल अन्यथा मिळणार नाही, असं जीनांनी स्पष्ट केलं. ब्रिटिशांनी दोन्ही डगरीवर हात ठेवून राजकारण सुरू ठेवलं होतं. जीनांना आंतून पाठिंबा द्यायचा आणि काँग्रेसशीं चर्चा करत रहायचं अशी त्यांची राजकारणाची नीति होती. ब्रिटिश पार्लमेंटच्या कांही सभासदांनीहि एक निवेदन काढून प्रश्न मिटवावा असं आवाहन केल्यानंतर अमेरीसाहेब पुढे आले आणि त्यांनी युद्ध संपतांच, हिंदु-मुसलमानांची एकी होतांच, भारताला स्वराज्य मिळेल अशी घोषणा केली. या सर्व गदारोळानंतर गांधींनी सद्भावना निर्माण होण्यासाठी म्हणून सत्याग्रह स्थगित केला. १९४० साल संपलं तेव्हां देशांत सर्वत्र अनिश्चिततेचंच वातावरण निर्माण झालं होतं. चळवळीचं वातावरण कांही संस्थानांमध्येहि जरी पोंचलं होतं तरी प्रतिगामी संस्थानिक काँग्रेसला विरोध करत असत. युद्धविरोधी सत्याग्रह संस्थानी भागांतहि सुरू झाला होता. गांधींनी तो सत्याग्रह थांबवला आणि अन्न-सत्याग्रहाला मोकळीक दिली. 'सरकारला मदत करा' ही लाट उत्तर-भारतांत पसरली होती, तर सैनिकीकरणाला उत्तम संधि मिळाली म्हणून वीर सावरकर सरकारचं अभिनंदन करूं लागले. जाति-जातींत वैमनस्य वाढवून, अविश्वास निर्माण करण्याचे पवित्रे ब्रिटिश सरकार टाकत होतंच. वर्ष संपलं, पण अनिश्चितता संपत नव्हती.

सत्याग्रह सुरू झाल्यानंतर देशांत कांही तरी घडूं लागलं आहे एवढं समाधान यशवंतरावांना मिळालं आणि कांही तरी करण्यासाठी इकडे-तिकडे धांवणारं मन स्थिर बनलं. मनाच्या त्या अवस्थेंतच परीक्षेला बसायचं ठरलं आणि १९४० सालीं फर्स्ट एल्एल्. बी. एकदा पदरांत पडली. पुढे सेकंड एल्एल्. बी.चा विचार सुरू झाला असतांनाच, पुन्हा सातान्यानं मनाला खेचलं. सातारा जिल्हा-काँग्रेसच्या अध्यक्ष-पदाचीं सूत्रं यशवंतरावांनी सांभाळावींत असा कार्यकर्त्यांचा आग्रह सुरू झाला. त्यांनी ती जबाबदारी स्वीकारली आणि जबाबदारी सांभाळतां सांभाळतांच त्यांना सेकंड एल्एल्. बी.ची परीक्षा पूर्ण करावी लागली. यशवंतराव वकील झाले ते १९४१ सालांत!

१९४१ साल हें राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत अनेक उलथापालथींनी भरलेलं वर्ष आहे. १९४० च्या अखेरीस काँग्रेसनं सत्याग्रह स्थगित केला होता, तरी १९४१ च्या प्रारंभापासून पुन्हा सत्याग्रहाचा डोंब उसळला. मौ. आझाद यांना पकडल्यापासून त्याची सुरुवात झाली. त्यांना अठरा महिन्यांची शिक्षा सुनावण्यांत आली. या वर्षाच्या प्रारंभालाच मुसलमान पुढाऱ्यांना कंठ फुटला आणि सर्व प्रांतांत व केंद्रांत संमिश्र

मंत्रिमंडळं असावींत असा बूट त्यांनी काढला. इंग्रजहि तेंच बोलूं लागले. जीना मुत्सद्दे-गिरीचीं दुटप्पी निवेदनं करूं लागले. समाजवादी पक्ष सत्याग्रहापासून दूर राहिला. रॉय यांचा पक्ष सरकारचा पुरस्कार करूं लागल्यानं युद्ध-समितींतल्या अनेक जागा त्यांच्या पदरांत पडल्या. सुभाषबाबूंना तुरुंगांत डांबलं होतं. त्यांची जामिनावर सुटका होतांच ते घरांतून गुप्त झाले. सुभाषबाबूंचा तपास हाच एक विषय त्या काळांत इंग्रजांना डोकेंदुखीचा ठरला. मॅजिस्ट्रेटनं त्यांना पकडण्याचं वॉरंट काढलं, पण वॉरंट बजावण्या-साठी सुभाषबाबू त्या वेळीं कधींच कुणाला दिसले नाहीत. नंतरहि दिसले नाहीत. पुढे एका वर्षानं, १९४२ मध्ये जर्मनींतून लोकांनी त्यांचा आवाज रेडिओवरून ऐकला. ब्रिटिश सरकार आपली सारी यंत्रणा युद्धासाठी राबवण्यास सर्व प्रकारचा आटापिटा करूं लागलं होतं. संरक्षण-खर्चात कित्येक कोटींची वाढ झाली आणि सैन्य-संख्या पांच लाखांवर पोंचली. इकडे सरकारनं गांधींची सर्व बाजूंनी कोंडी केली होती. हरिजन बंद पडल्यानं प्रचाराचं साधन संपलं होतं. त्यांच्या निवेदनांना अन्य वृत्तपत्रं थारा देत नव्हतीं. जीना आपली पाकिस्तानची मागणी मुसलमान समाजांत खालपर्यंत पोंचविण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. हिंदुमहासभेचे नेते त्याविरुद्ध गंभीर आवाज उठवत राहिले. दरम्यान जागतिक युद्धाचा परिसर आफ्रिकेपर्यंत येऊन पोंचला. त्यामुळे साम्राज्याच्या रक्षणासाठी हिंदी फौजा ब्रिटिशांनी मध्यपूर्वेत रवाना केल्या. तिथल्या लढाईत अनेक हिंदी जवानांनी रक्त सांडलं, पण त्याच्या बदल्यांत अमेरीनं फक्त भारतांतल्या संस्थानिकांची पाठ थोपटली. सत्याग्रह सुरू होता, पण कांही ठिकाणीं सत्याग्रह्यांना न पकडण्याची युक्ति अवलंबण्यांत येऊं लागली. तडजोडीला कुठे अवसर मिळत नव्हता; उलट जीनासाहेबांच्या धोरणामुळे तडजोड दूर जात होती. इंग्रजांनाहि तेंच हवं होतं. अगोदर पाकिस्तान आणि मग स्वातंत्र्य हा जीनांचा ध्यास होता. श्यामाप्रसाद मुखर्जींनी त्याला कणखर विरोध दर्शविला, पण उपयोग झाला नाही. बादशहा गफारखान यांनींहि पाकिस्तानची कल्पना राष्ट्रद्रोही असल्याचं सांगून दोन्ही जमातींनी एकत्र यावं असं आवाहन केलं तें फुकट गेलं.

हिंदुस्थानांत राजकीय क्षेत्रांत हा बेबनाव निर्माण झालेला असतांनाच तिकडे युद्धाचं स्वरूप घनघोर बनलं होतं. इथल्या तुरुंगांतले सत्याग्रही खितपत पडलेले आणि बाहेर कसला उठाव नाही, चैतन्य नाही, अशी सर्वत्र धुकं पसरल्यासारखी अवस्था निर्माण झाली होती. कम्युनिस्ट फक्त क्रांतीची भाषा बोलत होते, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हिंदूंच्या संस्कृतीचं संघ-शाखेवर संरक्षण करत राहिला होता. तिकडे युद्धांत फ्रान्स संपला होता आणि जर्मनी पोलंडवर चालून गेला होता. एक वर्षाच्या आंत सर्व युरोपमध्ये त्यानं वर्चस्व प्रस्थापित केलं आणि १९४१ च्या मध्यावर जर्मनीनं रशियावर तोफा डागल्या. इंग्लंड मग रशियाच्या मदतीला धांवलं. या परस्पर-सहकार्याबाबतच राजकीय विचारवंतांत वादळ निर्माण झालं आणि त्याचा अन्वयार्थ लावण्यांत देशो-देशींच्या बुद्धिमंतांच्या बुद्धीला चालना मिळाली. दरम्यान जपान व रशिया यांच्यांत

तटस्थतेचा करार बद्धून आला होता. आणि साम्राज्यशाहीच्या विरोधांत जपानचं आरमार पॅसिफिक समुद्रांत उतरलं. अमेरिका तटस्थ होती, पण जर्मनीनं उत्तर-समुद्रांत पाय ठेवतांच अमेरिका सावध झाली. हिटलरच्या अमलाखाली सारा युरोप आल्यानं अमेरिकेचा व्यापार बुडाला होता. त्या संदर्भात मग अमेरिका भारताकडे पाहूं लागली. चर्चिल-रूझवेल्ट यांनी एकत्र बसून जगांतील स्वातंत्र्य व लोकशाही याबद्दल एक सनद जाहीर केली, पण ही सनद भारताला लागू नाही, हें मुत्सद्दी चर्चिलच्या मुखांतून मागोमाग बाहेर पडलं. परंतु भारताचा प्रश्न जागतिक स्तरावर पोंचला असून, त्या पातळीवरूनच आता तो सोडवला जाईल अशी आशा भारतीय मनाला वाटण्यास या सनदेचा आणि एकूण युद्ध-परिस्थितीचा लाभ झाला.

भारतांत त्या काळीं पक्षोपपक्षांच्या आणि ज्येष्ठ समजल्या जाणाऱ्या व्यक्तींच्या वेळीं-अवेळीं होणाऱ्या घोषणांनी राजकारणांत बेदिली निर्माण झाली होती. इंग्रज इथून जावा ही सर्वांचीच इच्छा, पण त्याला घालवण्याचे प्रत्येकाचे मार्ग मात्र वेगळे. युक्तिवादाला बहर आला आणि इंग्रज सर्वांचीच उपेक्षा करून त्यांना अपयशाचे धनी ठरवूं लागले. त्याच वेळीं सुभाषबाबू जर्मनींतून उठाव करणार असल्याचं वृत्त हिंदुस्थानांत पोंचतांच देशांत टवटवी निर्माण झाली. परंतु हिंदुस्थानपासून दूर असलेलं युद्ध आता हिंदुस्थानांत येणार अशी चर्चा सुरू झाली आणि ज्यांतून इंग्रज जाऊन हिटलर येईल, पुन्हा आपण पारतंत्र्यांतच राहूं असे निष्कर्ष निघूं लागले. असे निष्कर्ष काढत असतांनाच भारतीय नेते परस्पर-विरोधी घोषणा करून, माझंच कसं बरोबर हें पटवण्याच्या प्रयत्नांत गुंतले होते. भारतासाठी प्राणाचं मोल द्यावं लागेल ही भाषा सर्वांचीच होती. इंग्रज या सर्वांचे प्राण घेण्यासाठी टपून होते. काँग्रेसचा युद्ध-प्रयत्नांशीं असहकार, सावरकरांचा सैनिकीकरणावर भर, अपक्ष विद्वानांचा समेटवादी सूर, जीनासाहेबांची फाळणीची दमबाजी, असं एकूण वातावरण निर्माण झालं असतांनाच, इंग्रजांनी इथल्या केंद्रीय कार्यकारी मंडळांत बदल करून व त्यांत कांही नवे चेहरे आणून त्यांत वाढ करण्याची मुत्सद्देगिरी केली. पण त्याचाहि इंग्रजांना अपेक्षित असा इष्ट परिणाम झाला नाही. राजकारण मागेपुढे हेलकावे खात राहिलं असतांना आणि पुढारी घोषणांमध्ये बुडाले असतांना, सरकार कांही सत्याग्रह्यांना तुरुंगांतून बाहेर काढत होतं. बाहेरचा सत्याग्रह संपवावा असा सल्ला काँग्रेसला देण्यांत येत होताच. अहिंसेच्या तत्त्वाप्रमाणे चळवळीचा वेग वाढेलच, असं गांधी समजावत होते. त्यांतच जपान आणि अमेरिका यांच्यांत युद्धाला तोंड लागलं. त्याबरोबर जगांतील सगळीं हुकूमशाही राष्ट्रं एक झालीं. जपाननं चीनला वेढा घातलाच होता. त्यांतून सुटण्यासाठी भारताच्या भूमीचा उपयोग करतां यावा यासाठी अमेरिकेचे प्रेसिडेंट रूझवेल्ट यांच्या सल्ल्यानुसार चीनचे चँग-कै-शेक हे भारतांत दाखल झाले. चीन व हिंदुस्थान यांनी एकत्र येऊन स्वातंत्र्याचं रक्षण कां केलं पाहिजे याबाबत त्यांनी इथे एक निवेदन केलं. ब्रिटननं भारताला तावडतोब सत्तादान करावं म्हणजे भारत युद्धांत साहाय्य करील व दोस्त-राष्ट्रांना जय मिळेल. त्याचबरोबर

भारताचंहि सर्वार्थानं कल्याण होईल असाहि सल्ला त्यांनी ब्रिटनला दिला. परंतु भारताचा प्रश्न हा इंग्लंडचा आहे, त्यांत इतरांनी लुडबूड करूं नये, असं चर्चिलनं उत्तर देऊन चँग-कै-शेकच्या उत्साहावर पाणी ओतलं. चँग-कै-शेक यांनी गांधी-नेहरू यांच्याबरोबरहि चर्चा केली, पण शेवटीं रिकाम्या हातानं ते परतले.

दरम्यान जपाननं पूर्वेकडील राष्ट्रं वशांत टाकून तें ब्रह्मदेशाकडे वळलं. युद्धाचा व्याप वाढत राहिल्यानं इंग्लंडला मग भारताच्या संदर्भांत तडजोडीची आवश्यकता वाटूं लागली आणि त्यांतूनच क्रिप्स-योजना घेऊन चर्चिलनं क्रिप्सला हिंदुस्थानांत पाठवलं. १९४३ च्या मार्चमध्ये क्रिप्स हिंदुस्थानांत पोंचले. त्यांनी आपली पांच-कलमी घोषणा इथे जाहीर केली. क्रिप्ससाहेबाची सारी योजना युद्धोत्तर अमलांत यावयाची होती. सध्याच्या संकट-काळांत घटना-समिति निवडणं अगर सर्व सत्ता देणं योग्य होणार नाही, हें त्यांनी स्पष्टच केलं होतं. घटना तयार होईपर्यंत अस्तित्वांत असलेली परिस्थिति राहील आणि संरक्षणावर नियंत्रण ब्रिटनचं राहील, अशीहि खोच त्यांत होती. या योजनेवर विचार करण्यासाठी मग काँग्रेस-कार्यकारिणीची बैठक लगेच झाली आणि ही योजना अमान्य करण्यांत आली. क्रिप्स भारतांत दोन आठवडे राहिला. योजनेवर त्यानं पुष्कळ काथ्याकूट केला आणि जाण्यापूर्वी, ताबडतोब घटना बदलून सर्व सत्ता भारताला देतां देणं शक्य नाहीं असं सांगून निघून गेला. क्रिप्सची योजना आणि त्याचा झालेला निर्णय यांचे पडसाद नंतर अमेरिकेंत व ब्रिटनमध्येहि उमटले. हा प्रश्न राज्यकर्त्यांनी नीट हाताळला नाही, असा ब्रिटनमध्ये सूर उमटला आणि अमेरिकेचंहि ब्रिटनबद्दलचं मत पूर्वीप्रमाणे राहिलं नाही. या वेळपर्यंत ब्रह्मदेश व पूर्वेकडील प्रदेशां-वरून जपाननं ब्रिटिशांना उठविलं होतं. या ना त्या कारणासाठी तिथल्या जनतेंत ब्रिटिश-विरोध चांगलाच वाढला होता. क्रिप्सची योजना व त्याची लागलेली वासलात याबाबत इंग्लंडांत आणि भारतीय पुढाऱ्यांत वादावादी सुरू असतांनाच, ब्रिटिशांनी हिंदुस्थानांत दडपशाहीला सुरुवात केली. दरम्यान मद्रासवर जपानी जहाजांचा किरकोळ स्वरूपाचा हल्ला होतांच लोक हवालदिल झाले. ब्रिटिशांविरुद्धचा द्वेष वाढलाच होता. त्यांतच स्थावर-जंगम, स्थिर-अस्थिर, नावा-होड्या, अशी कुठलीहि संपत्ति ताबडतोब घेण्याचा अधिकार सरकारनं आपल्याकडे घेतल्यानं लोक अधिकच प्रक्षुब्ध झाले. पण कुणीच कांही करूं शकत नव्हतं. त्यानंतर काँग्रेसची अखिल भारतीय बैठक होऊन क्रिप्सच्या योजने-वरील चर्चा आणि अन्य विषयांवर जे ठराव समोर आले त्यामुळे देशांत अधिकच गोंधळ उडाला. लीगची फाळणीची मागणी तत्त्वतः मान्य करून राष्ट्रीय सरकारची मागणी एकमुखानं करावी, असा ठराव संतानम् यांचा होता. राजाजींच्या प्रेरणेनं मद्रास विधिमंडळ काँग्रेस-पक्षानंहि पूर्वी असाच ठराव केला होता. हा ठराव राजाजीं-मार्फत बैठकीसमोर येतांच त्यावर तासन् तास खडाजंगीची चर्चा झाली आणि राजाजींचा ठराव नामंजूर करण्यांत आला. त्याचबरोबर देशाचं विभाजन करणारी कोणतीच योजना काँग्रेसनं मान्य करूं नये हा बाबू जगतनारायणलाल यांचा ठराव संमत करण्यांत आला.

या ठरावामुळे देशांत गोंधळ माजलाच, पण त्याचबरोबर जीना आणि सरकार यांचं फावलं. सरकारला संघटित विरोध करण्याच्या हेतूस राजाजींच्या तात्त्विक ठरावाच्या भाषेनंहि बाध आला. याचा उपयोग मुस्लिम नेत्यांनी आपल्या गोटांत आणखी कांही नेते ओढण्यासाठी केला, तर हिंदूंमध्ये फूट पडत राहिली. सरकार मात्र विविध प्रकारचीं बंधनं घालून लोकांना जखडून टाकण्यांत दंग होतं.

# ६

१९४२ चे पहिले चार महिने राजकीय वातावरणाच्या दृष्टीनं असेतसेच गेले. वातावरण वरवर शांत होतं. पण युद्धाच्या संदर्भांत मात्र तें तापत होतं. पूर्वेकडील इंग्रजांचीं सारीं ठाणीं जपानच्या हातांत गेलीं होतीं. सिलोनजवळ तर इंग्लंडचं सारं आरमार बुडवलं गेलं. सुभाषबाबू बाहेर देशांतून रेडिओवरून गर्जत होते. कॉंग्रेस-नेते आणि कार्यकर्ते यांना आपापसांत चर्चा करत रहाणं एवढाच उद्योग उरला होता. दरम्यान या वर्षाच्या जुलैच्या पहिल्या आठवड्यांत – दि. ६ जुलैला वर्धा इथे कॉंग्रेस-कार्यकारिणीची सभा सुरू झाली. या सभेंत नऊ दिवस चर्चा होऊन एक ठराव तयार करण्यांत आला. ज्या ठरावानं ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीला हादरा दिला आणि 'चले जाव' चळवळीचं यज्ञकुंड धगधगून इंग्रजांच्या हिंदुस्थानवरील सत्तेची अखेरी झाली आणि दिल्लीच्या लाल किल्ल्यावर तिरंगा फडकला, हाच तो ऐतिहासिक ठराव !

वर्ध्याला नऊ दिवस चर्चा झाली आणि एक ठराव तयार करण्यांत आला. त्यांत असं स्पष्ट केलं गेलं, "कॉंग्रेसनं आपलं धोरण आतापर्यंत ब्रिटिश सत्तेला न छळण्याचं ठेवलं होतं. पण ब्रिटिशांनी त्याची कदर केली नाही. क्रिप्स-योजनाहि संपुष्टांत आली. याचा अर्थच असा की, ब्रिटिश सत्तेला कांहीहि करायचं नव्हतं. परिणामीं लोकांमध्ये विफलता वाढली आणि लोक ठाम सरकारविरोधी बनले आहेत. बर्मा, मलाया, सिंगापूर इथे जें घडलं तें हिंदुस्थानांत घडूं नये यासाठी, व भारतांत संरक्षणाची नीट तयारी व्हावी म्हणून, कॉंग्रेसनं आपल्या सूचना मांडल्या. हिंदुस्थानांतील जनतेची द्वेषभावना दूर करायची, तर त्या जनतेला स्वातंत्र्य मिळालं आहे व त्या स्वातंत्र्याचं संरक्षण करायचं आहे ही भावना जनतेच्या मनांत प्रोत्साहित करणं हाच मार्ग आहे. परकी सत्ता नाहीशी झाल्याशिवाय जातीय तेढ अगर संघर्ष जाणं किंवा कमी होणं अशक्य आहे. यासाठी ब्रिटिशांनी भारतांतून निघून जाणं ही पहिली गरज आहे. याचा अर्थ भारताचे नागरिक म्हणून जे रहातील त्यांना इथून हाकलावं असा नाही; पण त्यांनी समानतेनं वागलं पाहिजे.

ब्रिटिश हे स्वतःच राजीखुषीनं भारत सोडतील, तर स्थिर असं तात्पुरतं सरकार ताबडतोब निर्माण करतां येणं शक्य आहे. हें सरकार संयुक्त राष्ट्रांशीं सहकार करून चीनला मदत करील, हुकूमशाही-राष्ट्राला विरोध करील. मात्र काँग्रेस घाईघाईनं साहाय्य करणार नाही. ब्रिटिश सरकारनं याचा विचार करावा. सद्यःस्थिति चालू ठेवणं हें काँग्रेसच्या मतें धोक्याचं आहे. त्यामुळे आक्रमकाला विरोध करण्याची इच्छा व ताकत कमी होईल. लोकांची हिंमत खचेल. युद्ध होऊं नये म्हणून काँग्रेस आपली अहिंसात्मक शक्ति उपयोगांत आणील. १९२० पासून तिची वाढ झालेली आहे व त्या वेळेपासून या शक्तीचा उपयोग स्वातंत्र्यलढ्यासाठी करण्यांत येत आहे. लढा अपरिहार्य झाला तर त्याचं नेतृत्व गांधीजी करतील."

मुंबईला अखिल भारतीय काँग्रेस-कमिटीच्या अधिवेशनांत ऑगस्टच्या ७ व ८ तारखेला हा ठराव औपचारिकरीत्या मांडला जाईल असंहि या बैठकींत ठरलं; आणि त्याप्रमाणे तो ठराव मांडण्यांत आला. वर्धा इथे ठराव झाला तेव्हापासूनच ब्रिटिश सरकार अस्वस्थ बनलं आणि त्यानं कारवाईची आखणी सुरू केली. युद्ध संपेपर्यंत कांहीहि करायचं नाही हें सरकारनं निरनिराळ्या प्रसंगीं सांगितलंच होतं. तथापि अंतिम इशारा देऊन, अंतिम लढा पुकारण्याचा काँग्रेसचा मनसुबा जाहीर होताच, युद्ध संपेपर्यंत काँग्रेसला गुंडाळून ठेवण्याच्या दृष्टीनं कारवाईचीं चक्रं फिरूं लागलीं. मुंबईत ऑगस्टमध्ये, काँग्रेसच्या अधिवेशनासमोर हा ठराव चर्चेला येण्याच्या मध्यंतरींच्या काळांत सरकारनं काँग्रेसला चिरडण्याची सारी आखणी पूर्ण करून ठेवली. एका बाजूनं ब्रिटिशांची ही चिरडून टाकण्याची जय्यत तयारी, तर दुसऱ्या बाजूला हिंदुस्थानांत या ठरावांतून निरनिराळे अर्थ काढण्याची आणि ते जाहीर करण्याची अहमहमिका लागली होती. कांहींचा असा समज होता की, वर्धा इथे जो ठराव झाला त्या संदर्भात भेटी-गाठी, चर्चा, तडजोड यांचे प्रयत्न होतील आणि गोष्टी टोकाला पोंचणार नाहीत. या अंदाजानुसार गांधींनी तसे प्रयत्न केले, व्हाइसरॉयची भेट मागितली, पण ती नाकारण्यांत आली. देशांतील कांही पुढारी या वेळीं गांधींनीच सबुरीनं वागावं असा सल्ला देत होते, तर काँग्रेसमधले सरदार पटेल यांच्यासारखे नेते, हा शेवटचा लढा असून यांत ब्रिटिशांचा शेवट किंवा काँग्रेसचा शेवट होईल, असं कार्यकर्त्यांना सांगत होते. स्वातंत्र्यासाठी आता तडजोड नाही या थरापर्यंत गोष्टी पोंचल्या. यांतून अराजक निर्माण होईल अशी भीतीहि व्यक्त होत राहिली, परंतु गुलाम म्हणून जगण्यापेक्षा अराजक झालं तरी चालेल, त्यांतून स्वातंत्र्यच जन्माला येईल, असं उत्तर दिलं जात होतं. युद्धकाळांत इंग्लंडचं नेतृत्व बदललं होतं याचाहि अनुकूल अर्थ लावला जात होता.

आता साऱ्यांचं लक्ष ७ ऑगस्टला, मुंबईत होणारं अधिवेशन आणि त्यांतून निर्माण होणारं आव्हान याकडे लागलं. ब्रिटिश सत्तेला ग्रहण लागण्याची वेळ समीप आली होती. ग्रहणापूर्वीचा वेध लागला होता. सरकारनं सगळीकडे हेरगिरीचं जाळं विणलं आणि धरपकडीची तयारी करून कुणाला कुठे बंद करायचं याचेहि निर्णय तयार

करून ठेवले. पोलिसखात्यांत दोन्ही प्रकारचे लोक होते. काँग्रेस-कार्यकर्त्यांशीं दोस्ती करून माहिती काढणारे जसे होते, तसे सरकारी पातळीवर सुरू झालेल्या हालचालींची जाणीव देणारेहि होते. सरकारनं मात्र काँग्रेसशीं लढा देऊन चिरडून टाकण्याची जय्यत तयारी केलेली असतांनाच, काँग्रेस-कार्यकारिणीच्या ठरावांत बदल होणार नाही आणि काँग्रेसहि चिरडली जाणार नाही, असं गांधींनी 'हरिजन'मधून जनतेला आणि सरकारलाहि निवेदन केलं.

अखिल भारतीय काँग्रेसचं अधिवेशन ऑगस्टच्या ७ तारखेला मुंबईत सुरू व्हायचं होतं, तर क्रिप्ससाहेबांनी त्याच्या आदल्या दिवशीं ६ तारखेलाच पुन्हा एकदा घोषणा केली कीं, "युद्ध संपतांच भारतांत स्वराज्य स्थापन होईल. याबाबत ब्रिटिश सरकारचा निर्णय कायम स्वरूपाचा आहे." याचबरोबर काँग्रेस दडपली जाईल यासाठी जीनाहि सरकारला आंतून साहाय्य करत राहिले. बहुमताच्या जोरावर काँग्रेसला हिंदु राज्य स्थापन करायचं आहे असं विष त्यांनी पसरवलं.

अशा वादळी वातावरणांतच काँग्रेसचं तें ऐतिहासिक अधिवेशन ७ ऑगस्टला मुंबईत सुरू झालं. त्याच्या अगोदर अनेक काँग्रेस-पुढारी आपापसांत चर्चा करत होते.

१९४१ ला वकिलीची सेकंड एलूएल्. बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर यशवंतराव कराडला परतले होते. वकिली सुरू करण्याच्या इराद्यानं ते आता कराडांत दाखल झाले; पण वकिलींत लक्ष नव्हतं. घोडेस्वारासारखं त्यांचं आयुष्य सुरू होतं. पूर्वीचीच धांवपळ सुरू होती. सातारा जिल्ह्यांतल्या प्रमुखांपैकी ते बनले होते. जिल्ह्यानं त्यांना नेता म्हणून मान्य केलं होतं. त्यामुळे गावोगाव रपेटी सुरू होत्या. आजवर संकटांशिवाय वांट्याला कांही आलं नव्हतं तरी पण कामाचं समाधान होतं. त्या जोरा-वरच संकटाचा डोंगर, दऱ्या पार करून, चढउतारावरून धांवाधांव करून, ते सुखरूप राहिले होते. वकील होऊन परतले तेव्हा घरची काळजी वाढलेली होती. आजवर कुटुंबाकडे लक्ष दिलेलं नव्हतं. आता लक्ष द्यावं लागणार होतं. यशवंतरावांनी वकिली करून कांही मिळवावं अशी घरच्या लोकांची स्वाभाविक अपेक्षा होती. मुलगा वकील होऊन आला याचं विठाईला आणि बंधूंना फार मोठं समाधान मिळालं होतं. त्यांतूनच यशवंतरावांच्या विवाहाचे विचार घरांत सुरू झाले.

यशवंतरावांचं मन मात्र दुसराच शोध घेत राहिलं. त्यांच्या एका हातांत होता राष्ट्रीय झेंडा आणि दुसऱ्या हातांत होती वकिलीची सनद. वकिली करून कांही अर्थार्जन तर करणं आवश्यकच होतं, परंतु देशांत जें घडत होतं त्याकडे सातारा जिल्ह्यांतला नेता या दृष्टीनं अधिक लक्ष द्यावं लागत होतं. वर्धा इथे काँग्रेस-कार्यकारिणीनं केलेला ठराव, मुंबईचं अधिवेशन आणि त्यांतून निर्माण होणारी परिस्थिति यांचा विचार प्रमुख बनला होता. काँग्रेसशीं त्यांचं लहान वयांतच लग्न लागलं होतं. विठाईचं मन मात्र यश-वंताला संसाराच्या बोहल्यावर चढवण्यासाठी आतुर बनलं होतं. त्यामुळे वकील मुलासाठी वधूची निवड हाच त्यांचा ध्यास राहिला. सूनमुख पहाण्याइतकं मातेच्या मनाला अन्य

सुख तें कोणतं असणार! अन् एक दिवस तो योग जमला. फलटणच्या मोरे-घराण्याला कराडच्या चव्हाणांच्या स्थळाची माहिती मिळाली होती. मोरे यांना चार मुली व एक मुलगा. दोघींचे विवाह झालेले होते आणि तिसरी कन्या वेणू हिचा विवाह व्हायचा होता. मोरे हे बडोदें संस्थानांत खाजगीकडे नोकरी करत होते; परंतु नुकतेच ते निवर्तले होते. त्यांच्या पत्नीहि निवर्तल्या होत्या. चार बहिणी आणि एक भाऊ, असा मोरे-घराण्यांतला परिवार. वेणूबाईंचे मेव्हणे श्री. निकम यांच्याकडून चव्हाणांच्या स्थळाची माहिती त्यांना समजली होती. नवरदेव हे वकील आहेत, उमदे आहेत त्याचबरोबर राजकीय चळवळे आहेत, पुढारी आहेत परंतु घरची परिस्थिति बेताची आहे, ही सर्व माहिती श्री. निकम यांनी सांगितली होतीच. अर्थात् विवाहाच्या गाठी प्रत्येकाच्या जन्मवेळींच बांधलेल्या असतात, त्याप्रमाणेच घडतं. परिस्थिति ही दुय्यम ठरते. एक दिवस वधू पहाण्याचा कार्यक्रम निश्चित झाला. हा कार्यक्रम झाला सातार्‍यांत. चव्हाण-कुटुंब वधू पहाण्यासाठी सातारला पोंचलं. यशवंतरावांचे मित्र कै. के. डी. पाटील हे बरोबर होते. मुलगी पाहिली. मुलीला प्रश्न विचारण्याचं काम के. डी. पाटील यांनीच केलं. नवरदेव वकील बनले होते, पण त्यांनी उलट-तपासणी घेतली नाही. वेणूबाई दिसायला सोज्वळ, नीटनेटक्या, रूपानं सुरेख, वडिलांची रहाणी संस्थानांत झाल्यानं खानदानी ढंग. याच बैठकींत मुलीची पसंती झाली अन् विवाह निश्चित झाला. २ जून १९४२ ही विवाहाची तिथीहि निश्चित झाली. विवाह-स्थळ कराड ठरलं आणि ठरल्याप्रमाणे कराडला विवाह-सोहळा पार पडला. यशवंताचे दोनाचे चार हात झाले. सूनमुख पाहिलं याचा विठाईला परमानंद झाला. कराडांत हा विवाह मोठ्या थाटानं झाला. शेकडो लोक त्यासाठी उपस्थित राहिले. एवढा मोठा विवाह-सोहळा त्या काळांत कराडांत प्रथमच झाला. कु. वेणूबाई मोरे माप ओलांडून सौ. वेणूबाई चव्हाण बनून चव्हाणांच्या घरांत दाखल झाल्या. वकील झालेले यशवंतराव आता संसारी झाले आणि चव्हाणांचं घर सुखावलं.

२ जूनला यशवंतराव विवाहबद्ध झाले त्या वेळीं, नजीकच्या काळांत कांही दिव्य घडणार आहे याची चव्हाण-कुटुंबाला कल्पना नव्हती. नव-वधूला तर नव्हतीच नव्हती. विवाह होऊन महिना-दोन महिने होतात तोंवर राजकीय प्रांगणांत परिस्थितीचे ढग जमा होऊं लागले. जूनमध्ये विवाह झाल्यानंतर यशवंतराव संसार आणि वकिली यांमध्ये स्थिर होण्याचा विचार करत असतांनाच, पुढच्याच महिन्यांत, जुलैंत वर्धा इथें कॉंग्रेस-कार्यकारिणीनं ब्रिटिशांना अखेरचं आव्हान देणारा ठराव केला आणि मुंबई-अधिवेशनाचं प्रस्थान ठेवलं. त्याबरोबर यशवंतरावांनाहि मुंबईच्या अधिवेशनासाठी प्रस्थान ठेवणं क्रमप्राप्तच होतं. त्या दृष्टीनं कार्यकर्त्यांची तयारी सुरू झाली. विवाह-बंधनानं यशवंतरावांच्या जीवनाचा नवा अध्याय सुरू झाला होता; पण मन स्थिर नव्हतं. तें पुढंच कुठे तरी धांवत होतं. क्षणांत आनंद, क्षणांत खिन्न, तर क्षणांत विमनस्क, अशी मनाची विलक्षण घालमेल उडाली होती. कांही तरी करावं लागेल याची मात्र मनांत निश्चिति होती. त्या अवस्थेंतच ते मुंबईला अधिवेशनासाठी

पोंचले. काशीनाथ देशमुख, चंद्रोजी पाटील, वसंतराव पाटील, वि. स. पागे, स्वामी रामानंद असे किती तरी कार्यकर्ते मुंबईला या अधिवेशनासाठी रवाना झाले.

मुंबईतलं हें ऐतिहासिक अधिवेशन गोवालिया टँकच्या मैदानांत झालं. पहिली काँग्रेस मुंबईला १८८५ सालीं याच मैदानांत भरली होती. अधिवेशनांत पहिल्याच दिवशीं ७ ऑगस्टला वर्ध्याच्या बैठकींत संमत झालेला ठराव, चर्चेसाठी ठेवण्यांत आला. पं. जवाहरलाल नेहरू यांनी हा ठराव मांडला आणि ठरावाची पार्श्वभूमि सविस्तर सांगितली. ठरावामागे संकुचित राष्ट्रवादाची भूमिका नसून त्याची पार्श्वभूमि आंतरराष्ट्रीय आहे; ही मागणी मान्य केल्यास सारं आंतरराष्ट्रीय राजकारणच बदलेल असं त्यांनी स्पष्ट केलं. ब्रिटिशांचा भारताला विरोध हा ब्रिटिश जनतेच्या हिताविरुद्ध असून, इंग्लंडचं मंत्रिमंडळ विपरीत बुद्धीनं विचार करत आहे. इंग्लंडनं १९३९ मध्येच आमच्या मागणीचा विचार केला असता, तर आज त्यांच्यावर जी आपत्ति आली आहे ती आली नसती. अदूरदृष्टि आणि नालायकी इंग्लंडइतकी कुणीं दाखविली नसेल. भारत दारिद्र्यांत खितपत आहे आणि तो आता जागृत झाला आहे. चीनहि आता जागृत झाला आहे. आम्ही आता लढणार आहोंत. हा लढा निकाली लढा असून अखेरच्या श्वासापर्यंत चालेल, असंहि नेहरूंनी ठामपणें सांगितलं. ठरावाची जी भाषा आहे, शब्द आहेत, त्यापेक्षा लोकांच्या भावना शतपटीनं अधिक तीव्र आहेत अशीहि जाणीव त्यांनी दिली. मौलाना आझाद, म. गांधी यांच्या भाषणांपेक्षा नेहरूंच्या भाषणानं वातावरण गंभीर बनलं असतांनाच सरदार पटेल यांनी ठरावाला दुजोरा देणारं भाषण केलं आणि ब्रिटिशांच्या राजकीय नीतीवर सडेतोड प्रहार केला. या ठरावावर अधिवेशनांत चर्चा सुरू होण्यापूर्वी गांधींनी आणखी कांही गोष्टी स्पष्ट केल्या. या लढ्या-बद्दलची भूमिका त्यांनी सांगितली आणि जी विफलता निर्माण झाली आहे त्यावर 'छोडो भारत' हाच एकमेव उपाय आहे अशी गर्जना त्यांनी केली. नेत्यांचीं भाषणं संपल्यानंतर पहिल्या दिवशींचं अधिवेशन तहकूब झालं. दुसऱ्या दिवशीं ठरावावर पुन्हा चर्चा झाली. अच्युतराव पटवर्धन, आचार्य नरेंद्र देव, डॉ. लोहिया, सरदार प्रतापसिंग आदींनी ठरावाला भरघोस पाठिंबा दिला. पं. जवाहरलाल नेहरू यांचं उत्तराचं भाषण झालं आणि ८ ऑगस्टला हा ऐतिहासिक ठराव अधिवेशनानं संमत केला. गांधींनी या लढ्याचं नेतृत्व 'मी घेत आहें' असं सांगितलं आणि मीं काँग्रेसला प्रतिज्ञाबद्ध केली आहे, 'करूं अगर मरूं' ही ती प्रतिज्ञा आहे, असा गांधींनी पुनः पुन्हा प्रतिज्ञेचा उच्चार केला. अधिवेशन रात्रीं दहाला संपलं आणि 'करेंगे या मरेंगे', 'चले जाव' अशा घोषणा मनाशीं घोळवत सर्वजण अधिवेशनाच्या मंडपांतून बाहेर पडले.

स्वातंत्र्याचा लढा आता निकराचा बनला. १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धानंतर, हिंदुस्थाननं स्वातंत्र्यासाठी एवढं रौद्र स्वरूप प्रथमच धारण केलं होतं. इंग्रज त्या वेळीं तलवार, बंदुका, तोफा यांनी लढले होते, तर आताची लढण्याची त्यांची तयारी वेगळी होती. अधिवेशन संपल्याच्या दुसऱ्याच दिवशीं सरकारनं गांधी, नेहरू, पटेल, मौलाना

असे पहिल्या रांगेचे पुढारी उचलले. साऱ्या देशांतच धरपकड झाली. अधिवेशनास गेलेले कार्यकर्ते गावोगाव परततील तेव्हा त्यांना शक्य तर रस्त्यांतच किंवा ते आपल्या गावीं पोंचतांक्षणींच अटक करण्याची तयारी सर्वत्र झाली होती. 'करेंगे या मरेंगे' असं गांधींनी सांगितलं होतं त्यामुळे ठिकठिकाणीं चढाईचं धोरण स्वीकारायचं अशीच जिद्द लोकांमध्ये निर्माण झाली होती. पहिल्या रांगेचे पुढारी उचलल्यानं या निकराच्या लढ्याचं नेतृत्व जनतेनं आपल्याकडेच घेतलं.

अधिवेशनासाठी सातारा जिल्ह्यांतली कांही मंडळी मुंबईला गेलेलीच होती. इकडे साताऱ्यांत भाऊसाहेब सोमण, गणपतराव अळतेकर, राघुअण्णा लिमये, आचार्य जावडेकर, शंकरराव साठे, गणपतराव तपासे आदि दहा-पंधरा पुढाऱ्यांना ९ तारखेलाच अटक होऊन त्यांची येरवडा तुरुंगांत रवानगी झाली. यशवंतराव प्रभृति मंडळी कराडला पोंचली की त्या सर्वांना उचलण्याची पोलिसांनी तयारी करून ठेवली होती. सर्वत्र अवस्थता निर्माण झाली होती. पहिल्या रांगेतल्या नेत्यांना आणि मागोमाग जिल्हा-पातळीवरील पुढाऱ्यांना अटक करण्याचं सत्र सुरू झाल्यानं सर्वत्र हरताळ सुरू झाले. कराडला बाबूराव गोखले यांनी विद्यार्थ्यांसमोर भाषण करतांच त्यांनाहि पकडण्यांत आलं. जिल्ह्यांत सर्वच ठिकाणीं अशांततेचं वातावरण निर्माण झालं आणि पुढील मार्गदर्शनासाठी मुंबईला गेलेली मंडळी कधी परत येतात याकडे सर्वांचं लक्ष खिळून राहिलं.

मुंबईत सातारकर मंडळींचा मात्र वेगळाच व्यूह ठरला. 'करेंगे या मरेंगे' हा आदेश मिळाल्यानंतर आपणांला मरावं लागेल एवढाच विचार या नेत्यांच्या समोर होता. पण स्वातंत्र्यासाठी मरतांना ब्रिटिश सत्ता खिळखिळी करून मगच तशी वेळ आल्यास प्राणाची आहुति द्यायची, असं मुंबईच्या बैठकींत ठरवण्यांत आलं. ही बैठक रात्रीं झाली मुंबईतील पान-बाजारांतील एका चाळींत. यशवंतरावांचं तें निवासस्थान होतं. अधिवेशन संपलं आणि धरपकड सुरू होतांच ही बैठक झाली होती. त्या वेळीं काशीनाथ देशमुख, के. डी. पाटील, शांताराम इनामदार, तात्यासाहेब कोरे वगैरे ३०० कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकींत असं ठरलं की, आपण स्वतःला अटक करून घ्यायची नाही, तुरुंगांत जायचं नाही. बाहेर राहूनच लढत रहायचं. कॉंग्रेसच्या वरिष्ठांकडून जसे आदेश येतील त्याप्रमाणे आपण वागावं, असं यशवंतरावांनी सर्वांना सांगितलं आणि देशांत एकसूत्री चळवळ होत रहावी यासाठी सर्वांनी तें मान्य केलं. पुढच्या कामासाठी जिल्ह्यांत कसं गुप्तपणानं पोंचायचं याचाहि बेत ठरला आणि पुढच्या दोन दिवसांतच मग ही मंडळी जिल्ह्यांत पोंचण्यासाठी मुंबईतून गुप्तपणें पांगली.

सर्वजण जिल्ह्यांत सुखरूप परतले आहेत अशी खात्री करून घेऊन पुढे दोन दिवसांनी यशवंतरावांनी मुंबईहून परतलेल्या सर्वांची एक बैठक कराडला जमवली आणि या बैठकींत चळवळीच्या कामाचा तात्पुरता आराखडा ठरवला. त्यामध्ये, उघड सत्याग्रह करणारांची एक व भूमिगत होऊन काम करणारांची एक, अशा दोन संघटना

बांधण्याचं निश्चित झालं. ही आखणी होतांच सभा-बैठका घेऊन सबंध जिल्ह्यांत 'चले जाव 'ची हवा निर्माण करण्याचा उद्योग सुरू झाला. सदाशिव पेंढरकर, लक्ष्मणराव कासेगावकर, किसन वीर, डॉ. सोवनी, काशीनाथ देशमुख आदि कार्यकर्ते जिल्ह्यांत होते ते सर्व या मंडळींना येऊन मिळाले, त्याचबरोबर नव्या पिढींतले कार्यकर्ते गोळा झाले आणि हां हां म्हणतां सर्व जिल्हाभर उमद्या कार्यकर्त्यांचा एक नवा संच तयार झाला. कार्यकर्त्यांची या निमित्तानं एक नवी पिढीच तयार झाली.

सर्वत्र सभा सुरू करून वातावरण तयार करण्यांत पहिले पंधरा-वीस दिवस गेले. जाहीरपणानंच सभा होत राहिल्या. यशवंतरावांनी वाई तालुक्यांत कवठें इथे एक सभा घेतली. श्री. किसन वीर हे त्या वेळीं हजर होते. या सभेंत भूमिगत अवस्थेंत राहून काय करायचं याचे आराखडे तयार झाले. त्या पहिल्या दोन आठवड्यांत कराड, सातारा, वाई, कोरेगाव, तासगाव, खानापूर, खटाव, पाटण, वाळवें, शिराळें, अशा सर्व तालुक्यांत मिळून जवळ जवळ दीडशे सभा झाल्या. या सर्व सभांना ग्रामस्थांची चांगली गर्दी असे. चळवळीला हळूहळू उठाव मिळूं लागला. निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या कामांची तयारी, आखणी करत गुप्तपणें हिंडत रहाणं हाच यशवंतरावांचा कार्यक्रम सुरू झाला. ज्येष्ठ नेते तुरुंगांत गेले होते. यशवंतरावांसमोरहि निश्चित कार्यक्रम असा नव्हता. पण लोकांमध्ये अमाप उत्साह निर्माण झाला होता. त्यांतूनच मग सत्ता काबीज करण्याचा प्रतिकात्मक कार्यक्रम सुरू करण्याचं ठरलं. प्रतिकात्मक कार्यक्रम म्हणून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणीं मामलेदार-कचेरीवर मोर्चा न्यायचा आणि मामलेदार-कचेरीवर झेंडा लावून तिचा ताबा घ्यायचा असा हा कार्यक्रम होता. जनतेनं सत्ता काबीज केली आहे याची प्रचीति सरकारला आणून देणं हा यामागे उद्देश होता. त्यानुसार कराड, पाटण, तासगाव आदि गावांतून हजारो लोकांनी संघटित मोर्चे काढले. तासगावला तर मामलेदारांना गांधी-टोपी घालून झेंडावंदन करायला लावलं. वि. स. पागे, डॉ. सोवनी, चिंतोपंत काळे, कृष्णराव कऱ्हाडे, नाना पाटील इत्यादि कार्यकर्ते या मोर्चांत होते. तीन हजार शेतकरी, कामगार या मोर्चांत सामील झाले. मोर्चांतील प्रमुखांची धरपकड करण्यासाठी पोलिसांच्या पलटणी मामलेदार-कचेरीवर सज्ज असत. तिथे झटापट घडतांच, लाठीहल्ले, दगडफेक हे प्रकार घडूं लागले. मामलेदार-कचेरीप्रमाणेच गावोगावीं पाटलांच्या चावडीवरहि झेंडा फडकवण्याची लाट उसळली. 'चले जाव', 'महात्मा गांधी की जय' अशा घोषणांनी प्रत्येक लहानमोठं गाव त्या काळांत दुमदुमून गेलं.

सप्टेंबर महिन्यांत तर मोर्चांनी कहर केला. यांतील कांही मोर्चांतील घटना यशवंतरावांच्या मनांत जन्मभर रहाव्यात अशा घडल्या. वडूज-कचेरीवरील मोर्चा हा एक त्यांपैकी आहे. खटाव-वडूजचा मोर्चा संघटित करण्यासाठी यशवंतराव जयराम-स्वामींच्या वडगावला गेले. ९ सप्टेंबरला हा मोर्चा वडूजच्या कचेरीवर नेण्याचा बेत नक्की झाला. या मोर्चाचं नेतृत्व परशुराम घाटगे पहिलवान यांनी करायचं ठरलं. गौरिहर

सिंहासने, रामभाऊ नलावडे, माणिकचंद दोशी, बंडोपंत लोमटे, बापूसाहेब कचरे, परशुराम घाटगे आदींनी त्या भागांत प्रचार करून मोर्चाची तयारी केली होती. मोर्चा संघटित होऊन कचेरीवर जाण्यास निघाला तेव्हा यशवंतरावांनी मोर्चेवाल्यांना निरोप दिला. मोर्चेवाले पुढे निघाले तेव्हा त्यांनी यशवंतरावांना गुप्त होण्यास सांगितलं. त्याप्रमाणे यशवंतराव मोर्चेवाल्यांपासून निघून गेले आणि आसपासच दहा-पंधरा मैलांच्या क्षेत्रांत एका संकेत स्थळीं जाऊन थांबले.

हा मोर्चा वडूजच्या कचेरीसमोर आला तेव्हा पोलिस-फौजदारानं मोर्चाला एका विशिष्ट अंतरावर थांबण्याचा इशारा केला. त्यावर परशुराम घाटगे यांनी सभा घेऊन झेंडावंदन करणं एवढाच कार्यक्रम असल्याचं फौजदाराला सांगितलं आणि एक पाऊल पुढे टाकलं. त्याबरोबर मोर्चातले लोकहि पुढे जाऊं लागले. परंतु मोर्चा पुढे सरकत आहे असं दिसतांच मामलेदारानं गोळीबाराची आज्ञा केली. त्याबरोबर फडाफड गोळ्या सुटल्या. मोर्चाचे पुढारी परशुराम घाटगे यांना टिपून छातीवर गोळी झाडण्यांत आली. त्यासरशी ते कोसळले आणि ठार झाले. परशुरामानं आपल्या अंगावर सहा गोळ्या झेलल्या, पण हातांतलं निशाण सोडलं नाही. मोर्चातील इतर कार्यकर्त्यांनाहि गोळ्या लागून ते जखमी झाले. लोक आडवे पडले तरी पोलिस गोळ्या झाडीतच होते. कचेरीसमोर रक्ताचं थारोळं साठलं. परशुराम घाटगे पहिलवानाबरोबर या मोर्चात एकूण सात हुतात्मे झाले आणि शेकडो जखमी झाले. हवालदिल झालेले लोक, इतकं घडतांच पांगले. वडूजचा मोर्चा यशवंरावांच्या कायमच्याच स्मरणांत राहिला. परशुराम घाटगे पहिलवानास निरोप दिला त्या वेळचा त्याचा उत्साह आणि अंगावर सहा गोळ्या झेलून हातांतलं निशाण अखेरपर्यंत घट्ट धरून ठेवण्याची त्याची जिद्द अतुलनीय अशी होती. एक तडफदार, जिद्दीचा कार्यकर्ता प्राणास मुकला हें दुःख यशवंतरावांच्या मनांत कायमचंच राहिलं. परशुरामाच्या घरींच आदल्या रात्रीं ते जेवले होते, चर्चा केल्या होत्या, पहाटेपर्यंत थांबले होते आणि सकाळीं परशुराम निघून गेला! हें दुःख कधीच भरून निघालं नाही.

वडूजच्या मोर्चाच्या वेळीं यशवंतरावांच्याबरोबर त्यांचा लहान भाचा गेला होता. बाबूराव कोतवाल हा यशवंतरावांचा भाचा. राधाबाईचा मुलगा. बाबू हा लहानपणापासूनच चळवळ्या मुलगा. वडील रामचंद्रराव निधन पावले त्या वेळीं बाबू अडीच वर्षांचा आणि त्याचा धाकटा भाऊ दिनकर तीन दिवसांचा होता. कोतवाल हे मूळचे कराडचे. बेलिफ म्हणून बळवंतराव कराडला रुजू झाल्यावर डुबल गल्लींतल्या एका माळवदी घरांतील खोलींत त्यांनी संसार थाटला होता. कराडला कोतवाल यांच्या घरासमोर रहिमतुल्ला मुजावर हा बळवंतरावांचा एक जिवलग मित्र रहात असे. या मित्राच्या मध्यस्थीनंच बळवंतरावांनी आपली मुलगी राधा हिचा विवाह रामचंद्र कोतवाल यांच्याशीं ठरवला होता.

रामचंद्ररावांचे अकालीं निधन झाल्यानं बाबू, दिनकर, त्यांची एक बहीण असे सर्वजण चव्हाण-कुटुंबांतच एकत्र राहूं लागले. ज्ञानोबा त्या वेळीं मोठे होते. बाबू,

चव्हाण-कुटुंबांत वाढत असतांना वयाच्या नऊ-दहा वर्षांपासूनच कॉंग्रेस-सेवादलांत जाऊं लागला होता. यशवंतराव हे राजकीय कार्यकर्ते म्हणून काम करूं लागले होतेच. राघुअण्णा लिमये, आत्माराम पाटील, ह. रा. महाजनी, लक्ष्मणशास्त्री जोशी यांची वारंवार ये-जा असे. चर्चा होत असत. सेवादलांतला एक नियमित सैनिक म्हणून बाबू काम करत होता. सभासद-नोंदणीचं काम त्यानं आपल्याकडे घेतलं होतं. आपले मामा कांही तरी मोठं काम करताहेत, तेव्हा ते सांगतील त्याप्रमाणे आपण काम करायचं एवढंच बाबूला समजत होतं. चळवळ्या मुलगा म्हणून तो आता ओळखला जाऊं लागला होता.

या चळवळ्या मुलानं, १९४२ चं स्वातंत्र्य-आंदोलन सुरू झालं त्या वेळीं त्यांत भाग घ्यायचं ठरवलं. तरुण मुलांचा एक गट त्यानं तयार केलेलाच होता. परंतु मामा – यशवंतराव – भूमिगत झालेले असल्यानं, या चळवळींत नेमकं काय करायचं हें बाबूला उमगत नव्हतं. कांही तरी करायचं एवढीच तळमळ होती. त्यांतच एक दिवस मामा गुप्तपणानं येत आहेत म्हणून सुगावा लागल्यानं त्यांना भेटण्यासाठी कराडनजीकच्या शिरोडें स्टेशनवर बाबू गेला. मामांच्या भेटीनंतर बाळनाथबुवांच्या मठामध्ये त्या वेळीं एक गुप्त बैठक झाली. मामांनी तिथे जमलेल्या तरुणांना चळवळीची दिशा समजून सांगितली. बाबूच्या मनांत चळवळीचे विचार घट्ट होते. मामांचं मार्गदर्शन मिळतांच बाबूनं शाळा सोडली अन् चळवळीला वाहून घेतलं. मामांचा चिटणीस म्हणूनच जणू कांही तो काम करूं लागला.

या चळवळींत बाबूला १ जानेवारी १९४३ ला अटक झाली. पण अटक होईपर्यंत बाबूनं अनेक धाडशी उद्योग केले होते. रात्री-अपरात्रीं हिंडत राहून गुप्तपणानं चळवळींतली कामगिरी करण्यांत बाबूचा पुढाकार असे. वडूजच्या मोर्चाला जाण्यासाठी मामा-भाच्यानं असंच एक धाडस केलं. कराडहून रात्रीं रेल्वेनं एका संकेतस्थळीं जायचं ठरलं होतं. बाबू नेहमीप्रमाणे एक प्रवासी म्हणून कराड-स्टेशनवर गाडींत चढला आणि त्याच वेळीं फलाटाच्या विरुद्ध दिशेनं यशवंतराव डब्यांत शिरले. डब्यांत शिरल्यानंतर यशवंतराव सरळ बाकाखाली जाऊन झोपून राहिले आणि बाबू पाळत ठेवत राहिला. रहिमतपूर स्टेशन येतांच दोघेहि गाडींतून उतरले. त्यांना पुढे औंधला आणि तिथून पुढे वडूजच्या बाजूला जायचं होतं. त्या काळांत प्रत्येक रेल्वेस्टेशनवर पोलिसपहारा असे आणि येणाऱ्या-जाणाऱ्यांवर त्यांची पाळत असे. रेनकोट, बॅग, कपडे वगैरेसह हे दोन प्रवासी स्टेशनवर उतरले तेव्हा पोलिस तिथे हजरच होते. परंतु यशवंतरावांचं धाडस असं कीं, पोलिस उभे होते तिथेच जाऊन त्यांनी रेनकोट अंथरला आणि मामा-भाचे, पोलिसांच्या पहाऱ्याजवळच झोपले. बिचारे पोलिस! या प्रवाशांना कुठे तरी खेड्यांत जायचं असेल अन् उजाडल्यावर ते जाणार असा विचार करून पहाऱ्यावरील पोलिसांनी या प्रवाशांची विशेष दखल घेतली नाही. मात्र पहाटेच ही दुकल उठली आणि पोलिसांच्या हातावर तुरी देऊन औंधला निघून गेली. तिथे बापूराव शेंडे

यांच्याकडे सकाळीं न्याहारी वगैरे करून पुढे वडूजच्या मोर्चाच्या आखणीसाठी सर्वजण सुखरूप स्थळीं पोंचले.

शिरोडें-स्टेशन-जळित-प्रकरणांतहि बाबूनं जबाबदारीनं कामगिरी बजावली होती. बैलगाडींतून, कधी पायीं चालत, असा रात्रीच्या वेळीं बाबूचा संचार कराडच्या पंचक्रोशींत सुरू असायचा. अशा धामधुमींतच बाबू एक दिवस पकडला गेला. चव्हाण-कुटुंबापैकी गणपतरावांना पकडलंच होतं. सौ. वेणूबाईनाहि तुरुंगाची वारी करावी लागली होती आणि आता बाबूहि पोलिसांना सापडला. स्वतः यशवंतराव भूमिगत राहून काम करत होते. सबंध चव्हाण-कुटुंबच चळवळींत सामील झालेलं होतं. त्यांच्या नात्यांतलीं अन्य माणसं मात्र धास्तावलीं होतीं. त्या काळांत चव्हाणांच्या घराकडे कुणी पाहुणा फिरकत नसे.

बाबूला पकडल्यानंतर यशवतरावांचा पत्ता समजून घेण्यासाठी पोलिसांनी त्याला पुष्कळ छळलं. मारहाण केली. यशवंतरावांची माहिती बाबूकडून कळेल असं पोलिसांना कुणी तरी सांगितलं होतं. त्यासाठी मग सत्तावीस दिवस बाबूनं छळ सोसला. नग्न करून त्याला अमानुष मारझोड करण्यांत आली, परंतु अखेरपर्यंत बाबूच्या तोंडून पोलिसांना भूमिगत यशवंतरावांचा ठावठिकाणा समजूं शकला नाहीं. तुरुंगांत बाबूला दोन वर्षं रहावं लागलं आणि १९४५ च्या जानेवारींत त्याची सुटका झाली. त्या काळांत चव्हाण-कुटुंबाला आणि कोतवालांना आधार फक्त आक्कांचा – विठाईचाच राहिला होता. सौ. वेणूबाई आणि गणपतराव यांच्याकडूनहि पोलिसांनी छळ करून, आमिषं दाखवून यशवंतरावांचा सुगावा लावण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यांत त्यांना यश आलं नव्हतं. बाबूनंहि तेंच अपयश पोलिसांच्या पदरीं बांधलं.

इस्लामपूरचा मोर्चाहि असाच संस्मरणीय ठरला. १० सप्टेंबरला इस्लामपूरच्या मामलेदार-कचेरीवर मोर्चा नेण्याचं ठरलं होतं. हा मोर्चा संघटित करण्यासाठी यशवंतराव दाखल झाले होते. के. डी. पाटील, चंद्रोजी पाटील, पांडू मास्तर, वसंतराव पाटील आदींनी वाळवें तालुका प्रचारानं तापवला होता. मल्लिकार्जुन डोंगरावर हजारावर शस्त्रधारी कार्यकर्ते व यशवंतराव एकत्र आले. ती रात्र त्यांनी किर्लोस्करवाडी इथे काढली. कामेरी भागांतूनहि कांही सत्याग्रही निघावयाचे होते. कामेरीकडून आलेला मोर्चा सरळ कचेरीवर गेला. या मोर्चामध्ये किर्लोस्करवाडीचा एक तरुण इंजिनियर उमाशंकर पंड्या हा होता. पंड्या हा या चळवळीच्या वातावरणानं नादावला होता. मोर्चात जाण्याचा आग्रह धरतांच यशवंतरावांनी त्याला चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. पण तो मागे हटण्यास तयार नव्हता. सकाळीं यशवंतराव मोटार-सायकलनं कामेरीकडे रवाना झाले आणि नंतर इस्लामपुराजवळ तीन-चार मैलांवर थांबले. या मोर्चावरहि गोळीबार झाला आणि त्यांत पंड्या ठार झाला! कामेरीचा एक मुलगा विष्णु बारवटे हाहि हुतात्मा झाला. मोर्चा मार्गस्थ करण्यापूर्वी रात्रीं पंड्याबरोबर झालेलं बोलणं आणि मागोमाग त्याचा पडलेला बळी कायम लक्षांत रहावी अशीच ही घटना ठरली.

किर्लोस्करवाडींत सदाशिव पेंढरकर हा एक मोठा उमदा कार्यकर्ता होता. रात्रीं त्याच्या घरीं जेव्हा चर्चा होत त्या वेळीं हा पंड्या येऊन बसत असे. त्या चर्चा ऐकून तो चांगलाच नादावला. तो मोर्चांत जाणार म्हणाला, पण प्रत्यक्ष गेला की नाही हें यशवंतरावांना माहीत नव्हतं. पण तो ठार झाल्याचं कळलं तेव्हा त्यांना धक्का बसला.

मुंबईतल्या बैठकींत भूमिगत रहायचं ठरलं तेव्हा सौ. वेणूबाई या फलटणला होत्या. त्यांना यशवंतरावांनी पत्र पाठवून त्यांनी कराडला सासरीं येऊन रहावं असं कळवलं होतं. त्याप्रमाणे त्या कराडला घरीं परतल्या होत्या. यशवंतराव आणि त्यांच्या-बरोबरचे कार्यकर्ते म्हणजे वारं प्यालेलीं माणसं होतीं. या गावाहून त्या गावाला, डोंगरांत, दऱ्याखोऱ्यांत, अंधारांत गुप्तपणानं फिरत रहायचं आणि लोकांना चळवळीसाठी उत्तेजित करायचं हेंच काम चाललं होतं. यशवंतराव वकील झाले होते, प्रतिष्ठा मिळाली होती, पण वकिलीचं काम करून अर्थार्जन करण्याकडे लक्षच नव्हतं. कराडांत या वेळीं ते शुक्रवार पेठेंत रहात असत. आठ-पंधरा दिवसांनी केव्हा तरी अवचित घरीं येऊन भेटून जाण्याचा मात्र परिपाठ सुरू होता. यशवंतरावांच्या हालचाली आईला – विठाईला मात्र बिनचूक कळत असत. त्या मोठ्या धोरणी. त्यांना यशवंतरावांची तर काळजी होतीच, जास्त काळजी होती नव्या सुनेची! लग्नानंतर दीड-दोन महिन्यांतच यशवंतराव भूमिगत झाले होते. विठाईनं यशवंतरावांना त्याबद्दल कधी बोल लावला नाही, पण सुनेसाठी मात्र त्या मनांतून कष्टी झाल्या. यशवतरावांसाठी आईनं सारं सहन केलं. दुःख पचवलं. सुनेला पोटाशीं धरून आला दिवस गेला हें पहात रहाणं एवढंच त्यांच्या हातीं राहिलं होतं. लाठीहल्ले, रोज होणारे गोळीबार यांच्या कथा ऐकतांना यशवंताची मूर्ति मनासमोर येई अन् त्यांच्या काळजांत धस्स होई.

चळवळीनं विराट् रूप धारण केलं आणि जिल्ह्यांतल्या हजारावर चळवळ्यांना पोलिसांनी गजांआड केलं, तरी पण चळवळ शमत नाही, उलट अधिकच तीव्र बनत आहे असं पाहून पोलिसांनी भूमिगतांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. वस्तुतः भूमिगत कार्यकर्ते हे कायद्याच्या भाषेंत भूमिगत होते. अन्यथा त्यांचा उघडपणें संचार सुरू असे. कोणत्याहि गावांत गेलं तरी त्या गावच्या लोकांचा सर्व प्रकारचा पाठिंबा असायचा. चळवळीचे बेत आखायचे आणि ते पार पाडायचे म्हणजे गावांतील शे-दोनशे लोकांचं सहकार्य आवश्यकच होतं. असं सहकार्य देण्यास तर लोकांची तयारी असेच; पण हे सर्व गुप्त ठेवण्याची दक्षताहि लोक पाळत असत. त्यामुळे पोलिसांच्या हातावर तुरी देऊन निसटणं भूमिगतांना शक्य होत असे. पोलिसांनी मग चळवळीच्या प्रमुखांना पकडण्यासाठी अन्य मार्गांचा अवलंब सुरू केला. ज्यांना स्थानबद्ध केलं होतं त्यांचे नातेवाईक घाबरलेल्या मनःस्थितींत असत. सरकारी नोकर निरनिराळीं आमिषं दाखवून, दमदाटी करून त्यांच्याकडून पैसे उकळत राहिले. तरीहि त्यांच्याकडून 'गुप्त' असलेल्यांचा ठावठिकाणा समजेना तेव्हा मग सरकारनं भूमिगतांना पकडून देण्याबद्दल हजार रुपयांचं बक्षीस जाहीर केलं. यशवंतराव चव्हाण, पांडू मास्तर, बाबूराव चरणकर, नाना पाटील,

गौरीहर सिंहासने, काशीनाथ देशमुख, बिळासकर पाटील आदि भूमिगतांना पकडून देण्यासाठी हें बक्षीस होतं. कांहींची मालमत्ताहि सरकारनं जप्त केली; परंतु भूमिगतांची माहिती मिळाली नाही. उलट भूमिगतांनी चळवळीला आणखी उठाव आणण्यासाठी, एकेकाच्या नेतृत्वाखाली तुकड्या तयार केल्या आणि त्यांतील प्रत्येकानं कामं वांटून घेतलीं. यशवंतरावांची तुकडी सर्वांत मोठी म्हणजे ७५ माणसांची होती. या तुकड्यांनी तारा तोडणं, पूल पाडणं, सरकारी इमारतींना आगी लावणं, टपाल-पेट्या लुटणं, रेल्वे-स्टेशनं जाळणं, गाड्या पाडणं, पोलिसांना बदडून त्यांच्या बंदुका पळवणं, असा सर्वत्र आगडोंब उसळवला व पोलिसांना पळता भुई थोडं करून सोडलं.

यशवंतराव हे जिल्ह्याचे व चळवळीचे नेते. त्यामुळे त्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी खूपच धांवपळ सुरू केली. अनेकांना आमिषं दाखवलीं, परंतु ते हाताला लागत नाहीत असं पाहून अखेर त्यांच्या कुटुंबियांकडे पोलिसांनी मोर्चा वळवला. यशवंतरावांचा नुकताच विवाह झाला होता. तेव्हा यशवंतरावांचा ठावठिकाणा मिळवण्यासाठी पोलिसांनी यशवंतरावांच्या नूतन पत्नीला – सौ. वेणूबाईनाच अटक केली. ते घरच्या लोकांना गुप्तपणानं भेटण्यासाठी येत असत आणि जात असत. पोलिसांना मात्र समजत नव्हतं. पण कुटुंबियांचा छळ होत आहे असं दिसतांच ते प्रगट होतील अशी पोलिस-अधिकाऱ्यांची समजूत झाली असावी.

पोलिसांनी सौ. वेणूबाईना पकडलं तें त्या वर्षीच्या संक्रांतीच्या मुहूर्तावर. घरांत नवी सून आलेली. तिची पहिली संक्रांत म्हणून सासूबाई – विठाई – यांनी संक्रांतीची सर्व तयारी चालवली होती. पण संक्रांतीच्या आदल्या दिवशीं एक गुप्त-पोलिस घरीं दाखल झाला. त्या वेळीं घरांत सौ. वेणूबाई एकट्याच होत्या. आक्का आणि मोठे दीर हे संक्रांतीची साडी खरेदी करण्यासाठी बाजारांत गेले होते. बाहेर गेलेली मंडळी घरीं परत येण्याची वेळ आणि गुप्त-पोलिस दाखल होण्याची वेळ एकच आली. पोलिस घरीं आला आहे आणि आपल्या सुनेला कांही विचारत आहे असं दिसतांच आक्का संतापल्या आणि त्यांनी त्या पोलिसाची कानउघाडणी सुरू केली. सौ. वेणूबाईचे मोठे दीर गणपतराव, त्या वेळीं तिथे पोंचले नव्हते. पण त्यांना दुकानांत जेव्हा हें समजलं तेव्हा ते तातडीनं घराकडे धांवले. एकूण परिस्थितीची कल्पना येतांच त्यांनी आक्कांना शांत केलं, पोलिसांनी मग आपलं काम केलं. सौ. वेणूबाईना पकडून पोलिसांनी त्यांना कराडच्या पोलिस-चौकींत नेलं आणि आवश्यक तें वॉरंट मिळवून त्यांना तुरुंगांत डांबण्यांत आलं. सौ. वेणूबाईची पहिली संक्रांत तुरुंगांत अशा तऱ्हेनं साजरी झाली. यजमान राजकीय चळवळे होते, नेते होते, आसपास काय घडत आहे हें त्यांना समजत होतं, पण स्वतः त्यांच्यावर हें सर्व भोगण्याचा आणि सहन करण्याचा प्रसंग प्रथमच निर्माण झाला होता. वडील बडोदें संस्थानांतले खाजगीकडील नोकर. त्या वातावरणांतच त्या वाढलेल्या. विवाहापूर्वी यजमानांच्या चळवळ्या वृत्तीबद्दल आणि

कार्याबद्दल त्यांनी ऐकलं होतं. पण ऐकणं आणि प्रत्यक्ष प्रसंग येणं यांतला फरक आता त्यांना उमजला.

कराडच्या तुरुंगांत पोलिसांनी त्यांना पांच-सहा दिवस ठेवलं, पण लोकांमध्ये कुजबूज सुरू झाल्यानं नंतर सौ. वेणूबाईंची रवानगी इस्लामपूरच्या तुरुंगांत करण्यांत आली. देशमुख आडनांवाचे एक पोलिस-अधिकारी रोज सकाळीं अकरा वाजण्याच्या सुमारास सौ. चव्हाण यांच्याशीं बोलण्यासाठी येत असत. ते बोलायचे मोठे गोड. हिताच्या गोष्टीहि सांगायचे आणि सर्व बोलणं झाल्यावर त्यांचा एक प्रश्न ठरलेला असे – 'यशवंतराव कुठे आहेत ?' सौ. वेणूबाईंचं उत्तरहि ठरलेलं असे – 'मला कांहीच माहिती नाही.' तें खरंहि होतं. यशवंतराव अचानक केव्हा तरी घरीं येत असत. आई, पत्नी, बंधु यांना भेटत आणि निघून जात. नेमके कुठे जाणार आणि कुठे रहाणार हें त्यांनाच माहिती नसायचं. अशा स्थितींत त्यांच्या पत्नीला तरी त्यांचा नेमका ठावठिकाणा कसा माहिती असणार! पण पोलिसांनी पंधरा दिवस सौ. वेणूबाईंचा पिच्छा पुरवला. मधून मधून दमदाटीहि करून पाहिली. पण लाघवी बोलणं किंवा दमदाटी, यांपैकी कोणतीच मात्रा लागू पडली नाही आणि शेवटीं कंटाळून, दीड महिन्यानंतर, सौ. वेणूबाईंची तुरुंगांतून मुक्तता झाली. या भूमिगत चळवळीनं सौ. वेणूबाईंना तुरुंगवास घडवून देशभक्तीची पुण्याई संपादन करून दिली ती अशी!

सौ. वेणूबाईंची तुरुंगांतून मुक्तता झाली, पण पोलिसांनी यशवंतरावांचे बंधु गणपतराव यांना स्थानबद्धतेंत अडकवून विजापूरच्या तुरुंगांत पाठवलं. यशवंतरावांचा ठावठिकाणा त्यांच्या कुटुंबियांनीच सांगावा हा पोलिसांचा अट्टाहास होता. त्या दृष्टीनं त्यांचा आटापिटा चालला होता. संकट संपतां संपत नव्हतं!

# ७

चव्हाण-कुटुंबाभोवतीं पुन्हा संकटांचा वेढा पडला. काबाडकष्ट करून, सुक्याचं ओलं करून विठाईनं आणि ज्ञानोबा, गणपतराव यांनी यशवंतरावांना शिकवलं, ते मोठे झाले, वकील बनले, संसारी बनले हें पाहून विठाईनं मनांत केवढे तरी मनोरे रचले होते पण ललाटावरील रेषा अजूनहि अंधुकच होती. थोरले पुत्र ज्ञानोबा निर्वतलेले, दुसरा मुलगा गणपतराव तुरुंगांत, यशवंतराव भूमिगत, सून तुरुंगांत – ती लहान. लग्न होऊन नवा संसार सुरू करीत असतांनाच तुरुंगाचं संकट कोसळल्यानं तिच्या मनाला धक्का बसलेला! संकटांच्या परमावधीचा तो काळ. मायेचीं माणसं घरीं यायचीं-जायचीं पण ते सुद्धा मागेपुढे पहात. चव्हाणांच्या घरीं गेलों हें पोलिसांना समजलं तर तोहमत यायची ही प्रत्येकाच्या मनांत भीति असे. विठाईनं तें वर्ष-दीड वर्ष खंबीरपणानं रेटलं. घरांत कर्तेसवरते कुणीच नव्हते. सासूबाई आणि तीन सुना अशा चौघीच आणि चार नातवंडं.

नंतरच्या काळांत यशवंतरावांना पुष्पहार घालण्यासाठी जे धांवत होते त्यांच्यांतील त्या वेळच्या प्रसंगांत कुणी नव्हतं. घरीं कुणी येत नव्हतं. माणुसकीची कसोटी लावून जाणारा असाच एक प्रसंग त्या काळांत घडला. यशवंतरावांच्या एका खेड्यांतल्या मित्रानं जोंधळ्याचीं चार पोतीं त्यांच्या घरीं पाठवायचं ठरवलं. बैलगाडींत त्यानं तीं पोतीं घातलीं आणि कराडला यशवंतरावांच्या घरीं आणलीं. गाडी घरासमोर आली आणि उभी राहिली; पण गाडींतलीं जोंधळ्याचीं पोतीं उचलून घरांत ठेवण्यासाठी कुणी माणूस मिळेना! विठाई एकटी होती. कशाला आणलीस पोतीं म्हणून तिनं गाडीवानासच दटावलं आणि ठेव तिथेच रस्त्यावर असं त्याला सांगितलं. गाडीवान हा एक कार्यकर्ता मुलगा होता. मोठ्या कष्टानं मग त्यानं ते जोंधळे घरांत नेले आणि निघून गेला. यशवंतराव साऱ्या जिल्ह्याचे नेते. कराड गाव सारं त्यांचंच, पण हें सर्व बाहेर; राजकारणांत, भूमिगत

अवस्थेंत असतांना घरांतलं चित्र वेगळंच बनलं होतं. 'सारा गाव व्यापला पण कुणी नाही आपला' अशीच घरची स्थिति बनली होती.

दिवस पुढे सरकत होते आणि चले जाव चळवळ अधिक उग्र बनत होती. बँका लुटल्या जात होत्या, सरकारी दप्तरांची ठिकठिकाणीं होळी होत होती आणि गावांतल्या टग्यांचा, दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याचं कामहि गुप्त-मंडळींनी सुरू केलं होतं. किसन वीर व पांडू मास्तरांना पकडून पोलिसांनी त्यांना तुरुंगांत पाठवलं होतं, पण तुरुंग फोडून हे दोघेहि फरारी झाले तेव्हा मात्र त्यांना पुन्हा पकडण्यासाठी जिल्ह्यांत सर्वत्र धरपकड आणि झडत्या सुरू झाल्या. दिसेल त्याला पकडणं एवढाच पोलिसांचा उद्योग होता. कांही अट्टल गुन्हेगारांना पकडूनहि पोलिसांनी काँग्रेसवाले पकडल्याचा डांगोरा पिटला. सरकारची इभ्रतच पणाला लागली होती. भयंकर दडपशाही आणि मारहाण करून पोलिसांनी त्या वेळीं कित्येकांना आयुष्यांतून उठवलं. कांहींच्या घरच्या मुलाबाळांसह सर्वांनाच तुरुंगांत डांबलं, पण भूमिगत चळवळे हातीं लागले नाहीत. पोलिसांनी मग परंपरागत फितुरीचे प्रयोग सुरू केले आणि फितुरांमार्फत चळवळ्यांचा ठावठिकाणा, त्यांचे बेत यांची माहिती मिळवण्याचा प्रयत्न सुरू झाला.

पोलिसांची ही हिकमत भूमिगतांच्या लक्षांत येण्यास वेळ लागला नाही. भूमिगतांनी निरनिराळ्या कामाच्या तुकड्या तयार केलेल्याच होत्या आणि सर्व जिल्ह्यांत आणि जिल्ह्याच्या बाहेर खानदेशापर्यंत त्यांनी आपली दहशत निर्माण केली होती. राष्ट्रकार्यासाठी लागणारा पैसा, हत्यारं, दारूगोळा मिळवण्यासाठी या तुकड्यांनी अनेक मार्गांचा अवलंब केला. पण त्या वेळीं भूमिगतांच्या नांवाखाली आणि चळवळीचं निमित्त करून गावकऱ्यांना छळणाऱ्यांचा वर्ग, आपले उद्योग करीत असल्याचं पाहून, कार्यकर्त्यांनी त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी हत्यार उपसलं. सातारा जिल्ह्याचं पत्री सरकार म्हणून त्या काळांत सबंध हिंदुस्थानांत जें गाजलं त्याचा उगम याच्यांतूनच झाला. पण तें होतं प्रति-सरकार.

पत्री सरकार असं नामाभिधान जें प्राप्त झालं त्याचं कारण असं की, सरकार-पक्षाचीं जीं माणसं गावाला छळत असत, चहाड्या करत असत त्यांना गाठून त्यांना मार देण्यांत येत असे. फितुराला किंवा चहाडखोराला असा मारायचा की, तो पंगु बनला पाहिजे. त्यासाठी त्याच्या तळपायावर मार देत असत. बैलाच्या पायावर जशा पत्र्या ठोकतात त्या पद्धतीनं या गावगुंडांचे, फितुरांचे पाय सडकून काढले जात; इतके की, त्याला चालणंहि मुष्किल होत असे. असा मार देण्यासाठी चहाडखोर आणि सरकार-पक्षाचीं माणसं तर हुडकून काढलीं जात होतींच, शिवाय सावकारी करून शेतकऱ्यांची पिळवणूक करणारे, शेतकऱ्यांच्या घरादारावर नांगर फिरवणारे, तसेच गुंडगिरी करणारे दरोडेखोर यांनाहि हा प्रसाद मिळे. कारण या सर्वांकडून चळवळीला उपद्रव सुरू झाला होता. पत्री सरकारनं अशा प्रकारें दहशत निर्माण करून हे सर्व गैर-प्रकार बंद केले. कांही दरोडेखोरांनी भूमिगतांमध्ये घुसून धुमाकूळ घालण्यास सुरुवात

केली होती. त्यांनी कांहींचे खून पाडले, तर कांहींच्याकडे रकमेच्या मागण्या केल्या. दरोडेखोरांना साहाय्य करणारे कांही गावकरी असत. अशा गावकऱ्यांना या गुप्त-मंडळींकडून उचल्यावर, चावडीसमोर आणून बडवलं जाऊं लागलं. परंतु यामुळे भूमिगत असलेली मंडळी दरोडेखोरांचा, दारुड्यांचा बंदोबस्त करतात याबद्दल लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला आणि गुप्तपणें हिंडणाऱ्यांची दहशतहि कमालीची वाढली.

या पत्री सरकारचे प्रमुख नाना पाटील हे होते आणि त्यांचं केंद्र कुंडल हें बनलं होतं. नाना पाटलांचं त्या काळांत मोठंच प्रभुत्व निर्माण झालं, ती एक मोठी शक्ति ठरली. दरोडेखोरांच्या बंदोबस्तामुळे गुप्त-मंडळींबद्दल व एकूणच कॉंग्रेसबद्दलची निष्ठा वाढलेली पाहून पोलिस-अधिकाऱ्यांनीच मग दरोडेखोरांचा बंदोबस्त करण्याचं काम सुरू केलं. परंतु यामुळे भूमिगतांचा मार्ग आणखी मोकळा झाला. पत्री सरकारनं आपल्या कामाची जी आखणी केली होती ती मोठी नमुनेदार होती. गावगुंडाची कायदेशीर चौकशी करणं व त्याला गुंडगिरीपासून परावृत्त करणं, सार्वजनिक कामाचा पैसा कुणीं बळकावला असेल, तर तो वसूल करून पंचायतींत ठेवणं, गावांतल्या चोऱ्या, मारामाऱ्या यांची चौकशी करून न्याय देणं व कोणत्याहि कारणासाठी तें प्रकरण कोर्टात जाऊं न देणं, अनाथ महिलांचे प्रश्न, तसंच दत्तक-प्रकरणं यांचा निकाल लावणं, फसवाफसवीचीं प्रकरणं उजेडांत आणून, त्यांचा बंदोबस्त करणं अशा प्रकारच्या ग्रामीण जीवनांत दैनंदिन निर्माण होणाऱ्या व गावकऱ्यांना उपद्रवकारक ठरणाऱ्या गोष्टींचाच बंदोबस्त करण्याचं काम ही मंडळी करूं लागली. त्यांतून अनेकांना न्याय मिळाला आणि अनेकांचा कायमचा बंदोबस्त झाला. हें करत असतांना कांही जणांकडून कांही ठिकाणीं अनुचित प्रकारहि घडले. तरी पण तुलनेनं प्रति-सरकारनं लोकसुधारणेचींच कामं अधिक केल्यानं भूमिगतांबद्दल लोकांमध्ये जिव्हाळा निर्माण झाला. याचा परिणाम असा झाला की, या जिल्ह्यांतल्या कांही तालुक्यांतील गावांमधून इंग्रज सरकारच्या राज्याचा कांही महिनेपर्यंत मागमूसहि नव्हता. 'इमानी' सरकारी नोकरांनी मात्र संधीचा फायदा घेऊन अनेक गावांवर दंड बसवले व अन्यायानं हजारो रुपये वसूल करून सरकारी खजिन्याची भर केली. असं असलं तरी, सत्ता काबीज करण्याचे प्रतिकात्मक प्रयोग करण्याचं मुंबईच्या बैठकींत जें ठरलं होतं, तें या जिल्ह्यानं हरेक मार्गांनी तडीस नेलं. या सर्वच कारभाराला ग्राम-राज्याचं स्वरूप प्राप्त झालं होतं.

१९४३ मार्चअखेरपर्यंत यशवंतराव जिल्ह्याचं सर्व काम पहात होते. अखिल भारतीय संघटनेच्या आदेशाप्रमाणेच सातारा जिल्ह्यांतील चळवळीचे कार्यक्रम सुरू होते. मुंबईस एक ऑफिस होतं. जिल्ह्यांतले कार्यकर्ते मुंबईस जाऊन तिथे अच्युतराव पटवर्धन, जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली, एस्. एम्. जोशी, शिरूभाऊ लिमये वगैरेंशीं सल्लामसलत करत असत. चळवळीसंबंधी जीं बुलेटिन्स प्रसृत केलीं जात त्यांतील मार्ग-दर्शन लक्षांत घेऊन व प्रत्यक्ष सल्लामसलत करून चळवळीचे आराखडे तयार होत असत.

१९४२ अखेर आणि १९४३ च्या मध्यापर्यंत चळवळ सातत्यानं वाढतच राहिल्यानं सरकारची दडपशाही मात्र अतिशय वाढली.

सातारा जिल्ह्यांत सर्वत्र संघटनेचं जाळं पसरलं होतंच, पण त्याची खात्री करून घेण्यासाठी, एकाच वेळीं एक विशिष्ट कार्यक्रम घडवून आणण्याचा बेत ठरला आणि त्यानुसार जिल्ह्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत एकाच दिवशीं चाळीस ठिकाणीं दोन हजार तारा तोडण्यांत आल्या. जिल्ह्याचं संघटन किती मजबूत आहे याची प्रचीति चळवळीच्या प्रमुखांना तर यामुळे मिळालीच, शिवाय एकाच दिवशीं, एकाच वेळीं संबंध जिल्ह्यांत तारा तुटल्याचं पाहून सरकारी अधिकाऱ्यांना मोठाच अचंबा वाटला. दरम्यान मुंबईहून चळवळ थांबविण्याचा निरोप पोचला होता. त्यानुसार पोलिसांसमोर हजर होण्याचे निरोप गेले आणि के. डी. पाटील, गौरीहर सिंहासने, शांताराम इनामदार, भिकू पाटील, व्यंकटराव चरेगावकर, बाबूराव नलावडे, कोणेगावकर आणि मंडळी पोलिसांसमोर हजर झाली.

१९४३ च्या सुरुवातीपासूनच सरकारनं भयंकर दडपशाही सुरू केली तेव्हा चळवळ्यांना, विशेषतः भूमिगतांना जिल्ह्यांत निरनिराळ्या ठिकाणीं पांगावं लागलं. कांहीजण जिल्ह्याबाहेर गेले व तिथून सूत्रं हलवूं लागले. मार्च-एप्रिलनंतर यशवंतरावहि जिल्ह्यांतून बाहेर पडले. त्यांना पकडण्यासाठी पोलिसांचा ससेमिरा लागला होता. त्याच वेळीं चव्हाण-कुटुंबावर एक भयंकर संकट कोसळलं. सौ. वेणूबाई तुरुंगांतील यातना सहन करून परतल्या होत्या, तर गणपतराव विजापूरच्या तुरुंगांत स्थानबद्धतेंत अडकून पडले होते. घरांत फक्त विठाई होत्या. कशाच्या आधारावर जगायचं असा प्रश्न कुटुंबापुढे निर्माण झाला असतांनाच, त्याच काळांत यशवंतरावांचे सर्वांत थोरले बंधु, ज्ञानोबा यांचं १९४३ मध्ये निधन झालं. चव्हाण-कुटुंबावर आकाशच कोसळलं.

सौ. वेणूबाईंनी स्वतःच्या तुरुंगवासाचा आणि दिराच्या स्थानबद्धतेचा धक्का कसा तरी सहन केला होता; परंतु ज्ञानोबांच्या मृत्यूनं त्यांना जबरदस्त धक्का बसला. यशवंतराव सातारा जिल्ह्यांत होते तोंपर्यंत मधून मधून घरीं येऊन जात असत, पण त्यांनी जिल्हा सोडल्यानं आता घरीं येणं बंद झालं होतं. जिवाला बेचैन करणाऱ्या गोळीबाराच्या बातम्या रोज येत होत्या. यामुळे मानसिक ताण वाढत राहिला आणि त्या धक्क्यानं सौ. वेणूबाई आजारी झाल्या. त्या आजारीपणांत प्रकृति अधिकच ढासळत आहे असं दिसतांच माहेरच्या लोकांनी सौ. वेणूबाईंना फलटणला नेऊन औषधपाणी करण्याचं ठरवलं. चळवळ सुरू झाली तेव्हा यशवंतरावांनी सौ. वेणूबाईंना पत्र पाठवून, कराडला आपल्या घरींच रहावं असं कळवलं होतं, त्याप्रमाणे त्या राहिल्याहि होत्या, पण आताची स्थिति वेगळी होती. आजार इतका गंभीर होता की, चांगली औषध-योजना करावीच लागणार होती. माहेरची मंडळी फलटणला नेण्यासाठी आल्यानंतर सासूबाईंच्या सल्ल्यानं मग त्या फलटणला गेल्या. तिथे उपाययोजना सुरू होती, पण प्रकृति अधिकच ढासळत गेली आणि एक दिवस तर अतिशय गंभीर बनली.

यशवंतराव त्या वेळीं पुणें भागांत होते. पत्नी मरणोन्मुख अवस्थेंत फलटणला आहे असा त्यांना निरोप मिळाला आणि पतीला अखेरचं पहावं अशी सौ. वेणूबाईंची इच्छाहि समजली. हा निरोप मिळतांच मग यशवंतरावांनी फलटणला जाण्याचं ठरवलं आणि पुण्याहून निघून रात्रीच्या वेळीं एक दिवस ते फलटणला पोंचले. पत्नीला भेटायचं आणि बाहेर पडायचं असा बेत होता.

त्या रात्रीं सौ. वेणूबाई अधिकच अत्यवस्थ झाल्यानं, ती रात्र तिथेंच काढावी असा घरांतल्या लोकांचा आग्रह झाला. एक रात्र तिथे काढली तर वेणूबाईंच्या प्रकृतीला उतार पडेल, असंहि त्यांना सांगण्यांत आलं. तसा आग्रहहि झाला. त्यामुळे मन द्विधा अवस्थेंत पडलं. पण अखेर हिय्या करून त्यांनी तिथे रात्रीं थांबण्याचं ठरवलं अन् नेमका इथेंच घोटाळा झाला. रात्र सरली आणि पहाटेच दारावर थाप पडली. एक पोलिस-अधिकारी पकडण्याच्या तयारीनिशी आले होते. भूमिगत अवस्थेंत राहून चळवळ्यांना मार्गदर्शन करणारे, चळवळीची आखणी करणारे यशवंतराव विश्वासघातानं पकडले गेले. बक्षिसाच्या आशेनं त्यांच्याच एका नातेवाईक पोलिस-अधिकाऱ्यानंच त्यांना हा दगा दिला होता. १९४३ च्या मे महिन्यांत यशवंतराव गजाआड गेले. सौ. वेणूबाईंना अत्यावस्थेंत ठेवूनच त्यांना तुरुंगाची वाट चालावी लागली.

फितुरी हा हिंदुस्थानला मिळालेला शापच आहे. हिंदुस्थानला अशी फितुरी जागोजाग नडली आहे. १८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धांत फितुरी झाशीच्या किल्ल्याच्या बुरुजावर पोंचली आणि झाशीचा बुरुज ढासळला. त्याच इंग्रजांनी तिला पुण्यांतल्या शनिवारवाड्यावर पाठवली अन् वाडा कोसळला. फितुरीनं घात केला नाही असा लढा हिंदुस्थानांत झाला नसेल. तीच फितुरी आता बेचाळीसच्या स्वातंत्र्यलढ्यांत फलटणला पोंचली. तिनं यशवंतरावांचा घात केला. त्यांच्या एका नातेवाइकानंच ही पुण्याई पदरीं बांधावी हें त्यांतलं आणखी एक दुर्दैव! पूर्वी किती तरी फितुरांचा कडेलोट झाला असेल, त्यांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आलं असेल, हत्तीच्या पायाखाली चिरडलं असेल किंवा हातपाय तोडून, डोळे फोडून हालहाल केले असतील, पण हरळीच्या मुळीप्रमाणे फितुरीची मुळी जिवंतच राहिली आहे. थोडा ओलावा मिळाला की तिला कोंब फुटतो. आजअखेर हें सुरूच आहे. मोठ्या माणसांचे मार्ग फितुरीच्या काट्यांनी भरलेलेच असतात. काटा काढायचा आणि पुढे जायचं असाच हा प्रवास सुरू रहातो. समाजांतल्या फितुरांचा बंदोबस्त करण्यांत सातारा जिल्ह्यांतले कार्यकर्ते तिकडे दहशतीच्या मार्गाचा अवलंब करत होते आणि त्याच वेळीं खाल्लेल्या अन्नाला जागणारे सरकारी नोकर स्वतःची तुंबडी भरण्यासाठी देशाला सुळावर चढवण्याचं शौर्य प्रगट करत होते. पण चळवळ्यांना त्याची फिकीर नव्हती. आपणाला मरावं लागेल एवढाच विचार करून चळवळीसाठी ते सिद्ध झालेले होते. यशवंतरावांना तुरुंगांत घालून पोलिसांनी आता चव्हाण-कुटुंबांतील तुरुंगभरतीचं चक्र पूर्ण केलं. सौ. वेणूबाईंना पूर्वीच अटक झाली होती. बंधु गणपतराव तुरुंगांतच होते आणि यशवंतरावांचा सोळा वर्षे वयाचा भाचा,

बाबू कोतवाल यासहि पोलिसांनी पकडलं होतं. पत्नी, भाऊ आणि भाचा तुरुंगांत असतांना कुटुंबांतल्या लोकांना धीर देण्याचं काम यशवंतराव भूमिगत राहून अधूनमधून करत होते आणि आता तेहि गजाआड गेले.

१९४२ ते १९४७ सालापर्यंत चव्हाण-कुटुंबांत हा ऊन-पावसाचा खेळ सुरू होता. १९४३ मध्ये स्थानबद्धतेंत ठेवलेल्या गणपतरावांना १९४४ सालांत मुक्त करण्यांत आलं. त्यांना अटक झाली त्या वेळीं ते कराड-नगरपालिकेचे सभासद होते. तुरुंगांतून सुटका होतांच त्यांनी पुन्हा सार्वजनिक कामांत स्वतःला गुंतविलं. यशवंतराव तुरुंगांत होते, सौ. वेणूबाईची प्रकृति यथातथाच होती, घरांत फक्त चार लहान मुलं. प्रपंचाची ओढाताण सुरूच होती आणि याच वेळीं गणपतरावांना क्षयानं पछाडलं. मध्यप्रदेशांत शेती करण्यासाठी गणपतराव गेले ते आजारी होऊनच परत आले होते. विजापूरच्या तुरुंगांतहि नोकरशाहीनं त्यांचे हाल केले आणि त्याचा प्रकृतीवर गंभीर परिणाम झाला. क्षयाची बाधा झाल्यानं औषधासाठी त्यांना मिरजेच्या दवाखान्यांत ठेवण्यांत आलं, पण प्रकृति अधिकच ढासळत गेली. यशवंतराव तुरुंगांत गेले तेव्हा सौ. वेणूबाई आजारीच होत्या. त्या चिंतेंत ते असतांनाच गणपतरावांची प्रकृति ढासळल्याचं, त्यांना क्षयाची बाधा झाल्याचं यशवंतरावांना समजलं तेव्हा मग कुटुंबाच्या काळजीनं ते १९४५ मध्ये पॅरोलवर सुटून बाहेर आले.

तुरुंगांतून ते बाहेर आले तेव्हा चळवळ संपलेली नव्हती. परंतु बंधु आजारी असल्यानं त्या वेळीं त्यांच्या मनाचा ओढा कुटुंबाचं स्वास्थ्य पहाण्याकडे राहिला. कुटुंबांतील वाढत्या जबाबदारीमुळे अर्थार्जन करणं आता आवश्यकच होतं. त्यामुळे त्यांनी कराडांत वकिली सुरू करण्याचं ठरवलं. कुटुंबाला आता त्यांचाच आधार होता. आतापर्यंत कुटुंबाच्या स्वास्थ्याकडे लक्ष दिलं नव्हतं त्याची मनाला खंत होती. वर्ष-दीड वर्ष घराकडे लक्ष देणं क्रमप्राप्तच होतं. त्यामुळे राजकारणांतले प्रश्न जबाबदारीनं आपल्याकडे घ्यायचे नाहीत असं त्या काळांत त्यांनी मनाशीं ठरवलं. असं ठरवलं तरी त्यांना राजकारणापासून दूर ठेवण्यास लोकांची तयारी नव्हती. या ना त्या कारणासाठी त्यांना राजकारण करावंच लागलं. शरीरानं ते कराडला, पण मन मात्र मिरजेला बंधूंच्या आजाराकडे, असा हा काळ गेला. आठवड्यांतून दोन दिवस त्यांना मिरजेला जावं लागत असे. कराडांत सार्वजनिक काम सुरूच होतं. श्री. शंकरराव करंबेळकर यांनी याच काळांत कराडांत शिवाजी एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. यशवंतरावांनाहि त्यांनी बरोबरीनं कामास घेतलं. त्यामुळे सोसायटी, सोसायटीचं हायस्कूल, हायस्कूलसाठी इमारत—असं एक नवं व्यवधान सुरू झालं. महाराष्ट्र-कॉंग्रेसच्या बैठकी पुणें-मुंबईला होत असत; त्यासाठीहि पुणें-मुंबईला जावं लागे. त्यामुळे कुटुंबाकडे लक्ष देत असतांनाहि त्यांचा राजकीय कार्याशीं संपर्क कायमच राहिला.

यशवंतरावांचा विवाह १९४२ च्या जूनमध्ये झाला होता. पण तेव्हापासून एकसारखी धांवपळच सुरू होती. तसं पाहिलं तर यशवंतरावांनी १९४५ ते १९४६ असा

एक वर्षभरच संसार केलेला दिसतो. त्या वेळीं त्यांची वकिलीहि सुरू होती आणि कुटुंबाकडेहि ते लक्ष देऊं लागले होते. याच वर्षांत त्यांना एक अपत्य झालं. सौ. वेणूबाईंनी कन्येला जन्म दिला. परंतु परमेश्वरानं या उभयतांना तेंहि समाधान फार काळ लाभूं दिलं नाही. दहा दिवसांच्या आंतच ही कन्या अनामिक अवस्थेंत देवाघरीं गेली. उभयतां पति-पत्नींच्या मनावर या घटनेचा फार मोठा आघात झाला. वकील झालेला मुलगा घरचं पहायला लागला, सुनेला दिवस गेले याचं विठाईला समाधान मिळतं न मिळतं तोंच नात देवाघरीं निघून गेली. संकटाचा ससेमिरा कायमच राहिला. काळजीनं आणि मानसिक यातनेनं विठाई आता थकल्या, पण सारं दुःख पोटांत ठेवून उभं रहावं लागलं. मुलगा मिरजेला क्षयानं आजारी होता आणि धाकटीं नातवंडं, सूनबाई यांना सांभाळायचं होतं. कष्टाचं जीवन मग तसंच पुढे सुरू राहिलं. सारं कुटुंब विठाईनं आतापर्यंत सर्व प्रकारचे कष्ट करून सांभाळलंच होतं. आता पुन्हा तेंच करावं लागत होतं. गणपतरावांनी व्यापारधंद्यांत थोडंफार लक्ष घातलं, नगरपालिकेचे अध्यक्षहि झाले आणि एकूण परिस्थितीला कलाटणी मिळण्यास नुकती कुठे सुरुवात झाली होती तोंच त्यांना क्षयाची बाधा झाली. यशवंतराव वकिली करायला लागले, पण राजकीय आणि सार्वजनिक कामांतून वेळ मिळेल तेवढीच वकिली असं त्यांच्या व्यवसायाचं स्वरूप होतं. कोर्टांत ते फौजदारीच्या बाजूचीं कामं घेत असत. पण वकील वेळेवर भेटतील आणि कामासाठी कोर्टांत हजर रहातील अशी अशिलांना खात्री असेल, तरच अशिलं येतात. राजकीय कामासाठी अन्यत्र आणि भावासाठी मिरजेला जाणं-येणं, अशी या वकिलांची भ्रमंती सुरू असे. त्यामुळे वकिलीचा व्यवसाय यथातथाच होत राहिला. वकिलीला पूर्णपणानं यशवंतरावांनी कधी बांधून घेतलंच नाही. त्यामुळे कौटुंबिक परिस्थिति सुधारण्याच्या कामांत दोन पावलं पुढे आणि चार पावलं मागे, असाच त्यांचा जीवनक्रम सुरू होता.

कुटुंबांत संकटामागून संकटं आणि व्याप असा वाढला असतांनाच १९४६ मध्ये असेंब्लीच्या निवडणुकीचे वारे वाहूं लागले. बंधूंचा आजार आणि कुटुंबाची जबाबदारी यामुळे यशवंतराव या निवडणुकीपासून दूर होते. परंतु उमेदवार निश्चित होण्याची वेळ आली तेव्हा यशवंतरावांना कार्यकर्त्यांचा आग्रह सुरू झाला. त्यावर उमेदवारी स्वीकारण्यास त्यांनी प्रारंभींच साफ नकार दिला. गणपतराव आजारी असून त्यांची काळजी घेतली पाहिजे, कुटुंबाकडे लक्ष दिलं पाहिजे असं यशवंतरावांनी मित्रांना सांगितलं आणि त्यांना परत पाठवलं; परंतु मित्रांचा आणि कार्यकर्त्यांचा आग्रह कायम होता. १९३० सालांतल्या चळवळीपासून सुरू झालेलं कार्य, आत्माराम पाटील यांची निवडणूक, बेचाळीसची 'चले जाव'ची चळवळ आणि जिल्ह्यांतली काँग्रेस-संघटनेची बांधणी या सर्व ठिकाणीं आघाडीवर असलेले पुढारी हेच असेंब्लीच्या निवडणुकीचे उमेदवार असले पाहिजेत हा कार्यकर्त्यांचा आणि मित्रांचा दृष्टिकोनहि योग्यच होता. हा आग्रह मान्य करण्याच्या मनःस्थितींत स्वतः यशवंतराव मात्र नव्हते. त्यांना काळजी होती गणपतरावांची आणि जबाबदारी होती सर्व कुटुंबाची. त्यामुळे ते एकसारखा नकार देत राहिले.

कार्यकर्त्यांनी अखेर मिरजेला धांव घेतली. गणपतरावांचा सल्ला यशवंतराव मान्य करतील अशी त्यांना खात्री होती. याच हेतूनं सर्व मंडळी मिरजेच्या दवाखान्यांत दाखल झाली. यशवंतराव तिथे होतेच. गणपतरावांच्या खोलीच्या बाहेर बसून मग पुन्हा चर्चा सुरू झाली. यशवंतरावांचा नकार कायम होता; इतकेंच नव्हे तर, गणपतरावांना सल्ला विचारूं नये, असंहि त्यांनी सांगितलं. आजारी अवस्थेंत गणपतराव खोलींतून ही चर्चा ऐकतच होते. अखेर त्यांनीच सर्वांना बोलावलं आणि आपला सल्ला दिला. यशवंतरावांनी निवडणूक लढवलीच पाहिजे असं त्यांचं मत होतं. यशवंतरावांना हा सल्ला म्हणजे आज्ञाच होती. उमेदवारी निश्चित करूनच कार्यकर्ते परत फिरले. प्रारब्ध हें अनाकलनीय असतं हेंच खरं. भविष्यकाळांतील नेत्याला तें पुढे ढकलत असावं. उमेदवारी निश्चित होण्याच्या वेळीं असंच घडलं आणि निवडणुकीनंतरहि नियतीचा वरदहस्त कायम राहिला.

सातारा जिल्हा दक्षिण-मतदार-संघांतून निवडणुकीला यशवंतराव चव्हाण, बाबूराव गोखले, व्यंकटराव पवार आणि कारभारी के. डी. पाटील हे चार उमेदवार कॉंग्रेसनं निश्चित केले होते. हे चारहि उमेदवार प्रचंड मतांनी यशस्वी झाले. कराड, पाटण, वाळवें, खानापूर, शिराळा, तासगाव असा यशवंतरावांचा मतदार-संघ होता. विरोधी बाजूनंहि उमेदवार उभे होते, पण त्यांच्यांत कांही जोम नव्हता. जनतेचा पाठिंबा कॉंग्रेसच्या उमेदवारांनाच असायचा. कॉंग्रेसतर्फे जे निवडणूक लढवत होते त्यांच्यांत फक्त अधिक मतें कोणाला मिळतात एवढाच प्रश्न होता. त्या काळांत निवडणूक ही खर्चिक बाब नव्हती. स्वतः यशवंतरावांना या पहिल्या निवडणुकीसाठी अवघे १५० रुपये खर्च करावे लागले. त्या वेळीं ते मिळवते होते, थोडीफार वकिली सुरू होती, त्या मिळकतींतूनच स्वतः-साठी त्यांनी हा खर्च केला. जिल्हा-कॉंग्रेसनं कांही खर्च केला असेलहि. पण उमेदवार या नात्यानं १५० रुपयांत असेंब्लीची ही पहिली निवडणूक झाली आणि यशवंतराव त्यांत यशस्वी झाले. सातारा जिल्ह्यांतील त्यांचं नेतृत्व त्यामुळे मुंबईत पोंचलं.

# ८

निवडणुका संपल्या आणि पुन्हा काँग्रेसचीं मंत्रिमंडळं देशांत अधिकारावर आलीं. बाळासाहेब खेर हे मुंबई राज्याचे त्या वेळीं नेते होते. त्यांनी आपलं मंत्रिमंडळ तयार केलं आणि त्यांत मोरारजी देसाई, जिवराज मेहता अशांसारख्या ज्येष्ठांचा समावेश केला. यशवंतराव हे सातारा जिल्ह्याचे नेते. जिल्ह्याच्या बाहेरहि त्यांचं नेतृत्व आता पोंचलं होतं. निरनिराळ्या ठिकाणांहून त्यांना भाषणासाठी आमंत्रणं दिलीं जात होतीं. वस्तुतः खेर-मंत्रिमंडळांत यशवंतरावांना मंत्रिपद लाभेल, अशीच सातारा जिल्ह्याची अपेक्षा होती. मंत्रिमंडळांत त्यांचा समावेश झाल्याचं पहाण्यासाठी जिल्हा आतुर झाला होता; परंतु बाळासाहेब खेर यांनी सातारा जिल्ह्याच्या भावनेची कदर केली नाही. लोक भेटले, चर्चा झाल्या, परंतु खेर यांनी अनुकूल प्रतिसाद दिला नाही.

पुष्कळ चर्चा झाल्या. अखेर यशवंतरावांना त्यांनी पार्लमेंटरी सेक्रेटरीपद देण्याचं तेवढं मान्य केलं. खेरांची ही मेहरबानी मान्य करण्यास यशवंतरावांचं मन मात्र तयार नव्हतं. पार्लमेंटरी सेक्रेटरीपद दिल्यानं त्यांचा हिरमोड झाला होता. या संदर्भात पुढे पंधरा दिवस चर्चा सुरू होत्या. यशवंतरावांनी पार्लमेंटरी सेक्रेटरीपद स्वीकारावं असा मित्रांचा सल्ला होता. त्यांनी तो आग्रहच सुरू ठेवला आणि मित्रांच्या आग्रहाखातर पंधरा दिवसांनंतर त्यांनी त्याला होकार दिला. यशवंतरावांनी मंत्रिमंडळाशीं या ना त्या संदर्भात संबंधित असणं सातारा जिल्ह्याच्या दृष्टीनं आवश्यक आहे, अशी त्यांच्या सल्लागारांची भूमिका होती.

वस्तुतः त्यांना मंत्रिपदाची आसक्ति अशी नव्हतीच. जनतेंत राहून काम करण्याचा त्यांचा पिंड असल्यानं मंत्रिपदाच्या बहुमानामागे धांवण्याची त्यांची प्रवृत्ति नव्हती. परंतु सातारा जिल्ह्यांतील बेचाळीसची चळवळ, त्या चळवळींतून निर्माण झालेलं प्रति-सरकार, आणि इंग्रज सरकारची दडपशाही यांतून अनेक प्रश्न निर्माण झालेले होते. अनेकांविरुद्ध वॉरंटं होतीं. खटले सुरू होते. अनेकांना पूर्वीच शिक्षा झाल्या होत्या. हा सर्वच प्रश्न

आपुलकीनं आणि कौशल्यानं हाताळील असा आपला माणूस मंत्रिमंडळांत असावा, ही सातारा जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांची स्वाभाविक इच्छा. त्याचसाठी यशवंतरावांना मंत्रिपद बहाल करावं असा आग्रह श्री. बाळासाहेब खेर यांना केला जात होता. पण तें घडत नाही असं पाहिल्यावर, पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून का असेना, पण त्यांनी मंत्रि-मंडळाशीं संबंधित असलं पाहिजे, मुंबईत असलं पाहिजे, या भूमिकेंतून यशवंतरावांना खेर यांनी देऊं केलेली जागा स्वीकारण्यास भाग पाडलं. सर्वसाधारणतः विचार करून यशवंतरावांनीहि तें मान्य केलं. लोकसेवेसाठी मिळेल तें स्वीकारून अधिक मिळवण्या-साठी प्रयत्नशील रहाण्याचा लोकमान्य टिळकांचा आदर्श त्यांच्यासमोर होताच. त्याच भूमिकेंतून ते मुंबईच्या सचिवालयांत १९४६ ला एक दिवस दाखल झाले.

यशवंतरावांनी नव्या जागेचीं सूत्रं स्वीकारलीं तो दिवसहि मोठा भाग्याचा म्हणावा लागेल. १४ एप्रिल हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्मदिन. सातारा जिल्ह्याच्या क्षेत्रांतून निघून मुंबई राज्याच्या व्यापक क्षेत्रांत चव्हाण दाखल झाले ते याच दिवशीं! प्रारब्धानंच हा योग जुळवून आणला असला पाहिजे. अन्यथा पंधरा दिवस चर्चेंत खर्च झाले नसते. या दिवसानं यशवंतरावांच्या भवितव्याचा मार्ग खुला केला आणि डॉ. आंबेडकरांची पाठराखण करीत याच दिवसानं त्यांना दिल्लींत पुढच्या काळांत दाखल केलं असलं पाहिजे.

यशवंतरावांच्या सार्वजनिक आणि राजकीय कार्याचा अनुभव जमेस धरतां त्यांना मंत्रिमंडळांतच समाविष्ट करून घेतलं जाणं वाजवी ठरलं असतं. पार्लमेंटरी सेक्रेटरी या नात्यानं त्यांनी आणखी उमेदवारी करावी आणि शिकावं याची वस्तुतः आवश्यकता नव्हती. पण बाळासाहेब खेर यांचा ढाचा वेगळा. सरदार पटेल यांच्या मुशींत ते तयार झालेले होते. खेर राजकारणी नेते होते, पण त्यांचा खरा पिंड सॉलि-सिटरचा – कायदेशीरपणानं काम करण्याचा असे. व्यावसायिक हितसंबंधांचं रक्षण करण्यावरच त्यांची मिळकत आणि जीवन अवलंबून असल्यानं त्या संबंधांत त्यांना प्रामाणिक रहाणं क्रमप्राप्तच होतं. कॉंग्रेसच्या ध्येय-धोरणाला त्यांनी स्वतःला वाहून घेतलं होतं हें खरं, पण ते स्वतः नागरी भागांतील बुद्धिवादी होते. ग्रामीण भागांतील जीवनाचा अनुभव त्यांच्या संग्रहीं कमी. त्यामुळे खेड्यांतील लोक-जीवनाच्या प्रश्नासाठी खऱ्या अर्थानं त्यांनी तळमळ बाळगावी अशी अपेक्षा त्यांच्याकडून करतां येण्यासारखी नव्हती.

यशवंतरावांचा मंत्रिमंडळांत समावेश कां असावा यासंबंधांतील ग्रामीण भागांतील जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावना या वेगळ्या होत्या; आणि त्या भावनांची खेर यांनी कदर करावी, असा त्यांचा आग्रह होता. परंतु खेरांची राज्यकारभाराची पठडी वेगळी. मागणीचा आदर करायचा म्हणून केवळ त्यांनी चव्हाणांना एक मामुली जागा दिली इतकंच. ही जागा स्वीकारल्यानं किंवा अव्हेरल्यानं यशवंतरावांच्या मनः-स्थितींत आणि परिस्थितींत कांही बदल घडून येणारा नव्हता. परंतु यशवंतराव हे

ऐतिहासिक घटनांवरून बोध घेणारे, व्यवहारवादी. राजकारणांत गुंतागुंतीचे डाव खेळत रहाण्याची नेत्यांची चाल त्यांच्या परिचयाची होती. खेर यांनी आपल्यासाठी एक सामान्य जागा देऊं केली आहे यामागील डावाची जाणीव त्यांना झाली असली पाहिजे. कारण ती जागा देऊन खेरांनी आपली सुटका करून घेतली होती. देऊं केलेली जागा चव्हाणांनी स्वीकारली तर ठीकच, न स्वीकारली तर, मीं व्यवस्था केली होती, पण चव्हाणांनीच ती नाकारली, असं सांगण्यास त्याना संधि मिळणार होती. त्या दृष्टीनं यशवंतरावांनी शासनाच्या मुख्य प्रवाहांत, एक सामान्य जागा असली तरी आंत रहाण्याचा निर्णय केला हें योग्यच झालं. राजकारणाच्या आणि राजकीय क्षेत्रांतील भावी वाटचालीच्या दृष्टीनं यशवंतरावांनी केलेला युक्तीचा वापर शंभर टक्के बरोबरच होता असं ऐतिहासिक घटनांवरून सिद्ध झालं.

खेर-मंत्रिमंडळांत मोरारजी देसाई हे गृहमंत्री होते. यशवंतरावांची नेमणूक मोरारजींच्या खात्याकडे झाली. मोरारजी हे त्यांचे साहेब.

मोरारजींकडील त्यांची नेमणुकीची घटना ही एक योगायोगाची घटना म्हणावी लागेल. खेर यांनी भेटीला बोलावलं होतं म्हणून ते त्यांच्या कार्यालयांत उपस्थित झाले होते. परंतु त्या वेळीं खेरांच्याकडे आणखी कोणी मंडळी भेटीसाठी आली होती त्यामुळे यशवंतरावांना बसून रहाणं भाग पडलं. असा बराच वेळ गेला. दरम्यान मोरारजींची भेट घ्यावी म्हणून सहज ते त्यांच्या कार्यालयांत गेले. यशवंतरावांना पहातांच मोरारजींनी आपुलकीनं विचारपूस केली आणि पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून, गृहखात्याकडेच दाखल कां होत नाही, असं विचारलं. चव्हाण यांना पार्लमेंटरी सेक्रेटरीपद देण्यासंबंधांत खेर-मोरारजी यांच्यांत अगोदर चर्चा झाली असली पाहिजे. मोरारजींनी चव्हाणांना गृहखात्याकडे दाखल होण्याचा सल्ला दिला त्यांतूनहि तेंच सिद्ध झालं. मोरारजींच्या म्हणण्याला यशवंतरावांनी तिथेच होकार दिला आणि अशा प्रकारे मुख्य मंत्री खेर यांच्या कार्यालयांत दाखल होण्यासाठी आलेले चव्हाण हे मोरारजींच्या खात्यांत पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून रुजू झाले.

मोरारजी आणि यशवंतरावांचे संबंध चांगले होते. साहेब आणि त्यांचे नोकर यांच्यांतील त्या काळांतील संबंधासारखे ते नव्हते. मोरारजी हे ब्रिटिश अमदानींतील साहेब. साहेबीपणाची, 'बॉस' म्हणून वागण्याची, ब्रिटिश अमदानींत विशिष्ट पद्धत असे. नोकराकडे पहाण्याची विशिष्ट दृष्टि असे. वागण्याची वृत्तीहि वेगळी असे. पण हे संबंध तसे नव्हते. मोरारजींनी यशवंतरावांना राज्यकारभार कसा पहावा याचे कांही धडे देण्याचा मनाचा मोठेपणा दाखविला असं नव्हे. मोरारजी हे स्वतः राज्यकारभारनिपुण होते; परंतु यशवंतरावांनी तें नैपुण्य अशा पद्धतीनं संपादन केलं की, मोरारजींनाहि त्याची जाणीव होऊं दिली नाही. राजकारणांतले हे दोन लढवय्ये एकमेकांचा अंदाज मात्र घेत होते. यशवंतरावांनी सातारा जिल्ह्याच्या राजकारणांत अनेक कुस्त्या जिंकल्या होत्या. डावाप्रमाणेच प्रतिडावाचं कसबहि त्यांना अवगत होतं. मोरारजींच्या तालमींत, डाव

आणि प्रतिडाव घटवण्यास आणि त्यांत तरबेज होण्यास त्यांना चांगलीच संधि मिळाली. हें सर्व परस्पर-मैत्रीचे, शहाणपणाचे, समाधानाचे संबंध शाबूत राखून बिनबोभाट सुरू राहिलं.

मोरारजी आणि यशवंतराव यांच्यामध्ये त्या वेळीं तुलनाच होऊं शकत नव्हती. मोरारजी हे राज्यकारभारांतील मुरब्बी, तर यशवंतराव तिथे नव्यानं दाखल झालेले. पण यशवंतराव हे आपल्या वांट्याला आलेलं काम कर्तव्य-बुद्धीनं पार पाडत असल्यानं मोरारजींचा त्यांनी थोड्या अवधींतच विश्वास संपादन करण्यांत यश मिळवलं. प्रत्येकजण प्रत्येकाला वापरून घेत होतं, पण तें दोघांपैकी कुणालाहि कधी खटकलं नाही. वस्तुतः नवा शिकाऊ मनुष्य जास्तींत जास्त शिकून घेण्यासाठी धडपडत असतो आणि त्याच वेळीं तो ज्याच्या हाताखाली काम करतो तो मुरब्बी, तुसडेपणानं त्याला दूर ठेवण्याचा कटाक्षानं प्रयत्न करीत असतो. सरकारी किंवा खाजगी, सर्वच क्षेत्रांतील नवीनांना या अनुभवांतून जावं लागतं. पण इथे कांही वेगळं घडत होतं. मोरारजींच्या कारकीर्दीत यशवंतरावांना नमुनेदार राज्यकारभाराचे धडे मात्र मिळाले. राज्यकारभाराचा नव्यानं अनुभव घेणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांच्या दृष्टीनं या अनुभवाचं मोल मोठं होतं. पोलिस-यंत्रणा, नागरी-पुरवठा, वन-खातं, होमगार्ड इत्यादि खात्यांच्या कारभारांतील बारकावे यशवंतरावांनी या काळांत सूक्ष्मपणानं अवगत करून घेतले.

महाराष्ट्रांत होमगार्ड-संघटना बांधण्याचं सर्व श्रेय चव्हाण यांनाच आहे. १९४८–४९ सालांत हिंदु-मुसलमानांचे दंगे सुरू झाले होते. त्या वेळीं नागरी संरक्षणाच्या कामांत नागरिकांना सामील करून घेण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. यशवंतरावांनी त्या कामाकडे लक्ष द्यायचं ठरवून होमगार्ड-संघटनेची योजना तयार केली. न्या. गजेंद्रगडकर यांचे बंधु आणि माणेकशा यांचं त्यांनी या कामीं साहाय्य घेतलं आणि संपूर्ण मुंबई राज्याच्या पातळीवर होमगार्ड-संघटना तयार केली. या संघटनेचा पुढच्या काळांत मोठा विस्तार होऊन पोलिसांच्या बरोबरीनं या संघटनेनं नागरी संरक्षणांतील आपला वांटा, राज्याच्या आणि देशाच्या प्रत्येक संकटाच्या वेळीं उचलला, संरक्षणसिद्ध अशी नागरिकांची एक पलटणच त्यांतून तयार झाली. या यशाचं श्रेय चव्हाणांकडे जातं.

यशवंतरावांनी त्या काळांत महाराष्ट्रांतील तमाशा या लोक-कलेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचं आणि ही कला संवर्धित करण्याचं असंच एक मोठं ऐतिहासिक कार्य केलं. तमाशा-कलेकडे सोवळेपणानं पहाण्याची शहरी वृत्ति असे. तमासगीर या शब्दाचा उपयोग शिवी म्हणूनच करण्यांत भूषण मानलं जात असे. पण तमाशा या लोक-कलेबद्दल चव्हाण यांनी एक सविस्तर अशी 'नोट' तयार केली आणि तमाशाला लोक-कला म्हणून सरकारनं मान्यता देणं कसं योग्य ठरेल यासंबंधी त्या टिपणामध्ये विश्लेषण केलं. हस्तलिखित तयार झाल्यावर तें टाइप करून घेण्यासाठी मोरारजींकडे एका टायपिस्टची मागणी केली. मोरारजींनी तेव्हा श्रीपाद डोंगरे यांची त्या कामासाठी तरतूद

केली. यशवंतरावांचे आणि सर्वच चव्हाण-कुटुंबाचे विश्वासू खाजगी सचिव म्हणून, पुढे मुंबईपासून दिल्लीपर्यंत काम करत राहिलेले डोंगरे यांची आणि चव्हाणांची पहिली भेट अशा एका प्रसंगानं, योगायोगानं झाली. 'नोट' टाइप झाल्यावर यशवंतरावांनी ती मोरारजींकडे व त्यांच्यामार्फत मुख्य मंत्री बाळासाहेब खेर यांच्याकडे रवाना केली.

तमाशा या कलेला लोक-कला म्हणून सरकारनं मान्यता द्यावी हें सुचवणारी ती 'नोट' होती. परंतु बाळासाहेब खेर यांनी ती वाचली आणि त्यावर 'एक्सलंट' असा मोठ्या अक्षरांत शेरा मारून परत पाठवली. शिक्षकानं एखाद्या विद्यार्थ्याचा पेपर तपासावा आणि त्यावर 'सुरेख' असा शेरा मारावा, असा तो प्रकार होता. तमाशाला लोक-कला म्हणून मान्यता देणं शक्य आहे की नाही याचा कांहीच खुलासा नाही, अशा स्थितींत ती 'नोट' परत आलेली आढळतांच यशवंतरावांनी तें प्रकरण मग मोरारजींकडे तपशिलासाठी दिलं. त्यांच्याशीं चर्चा केली आणि मोरारजींनी अखेर त्यावर निर्णय दिला. महाराष्ट्रांत 'तमाशा-बोर्ड' स्थापन झालं तें त्यामुळेच होय. पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मोरारजींनी चव्हाणांकडे मोठ्या जबाबदाऱ्या कधी सोपवल्या नाहीत. तरी पण त्या जागेचा उपयोग करून यशवंतरावांनी सार्वजनिक स्वरूपाचीं अनेक महत्वाचीं कामें केलीं आणि पुढच्या काळांत तीं महत्त्वाचीं ठरलीं.

पार्लमेंटरी सेक्रेटरीपद स्वीकारल्यानंतर यशवंतरावांच्या टेबलावर पहिलं काम आलं तें सरकारनं बंदी घातलेल्या पुस्तकांच्या संबंधांत! त्याबाबत आपलं मत देण्याचं – निर्णय करण्याचं! त्या वेळीं बंदी घालण्यांत आलेल्या सर्व पुस्तकांचं त्यांनी वाचन केलं आणि आपला निर्णयहि दिला. पार्लमेंटरी सेक्रेटरीपदाच्या कामाचा प्रारंभ पुस्तकं वाचण्याच्या कामापासूनच झाला.

पार्लमेंटरी सेक्रेटरीपदावर राहून यशवंतराव मुंबईत काम करत होते, पण शरीर मुंबईत आणि मन घरांत कराडला, अशीच कौटुंबिक स्थिति होती. निवडणुकीपूर्वीच बंधु गणपतराव यांना क्षयाची बाधा झाली होती आणि रोग बळावत चालला होता. मिरजे-च्या दवाखान्यांत औषधोपचार झाले, परंतु रोग हटला नव्हता. त्यामुळे यशवंतरावांनी त्यांच्यावर पुण्याचे डॉ. भरूचा यांच्यामार्फत औषधोपचाराची व्यवस्था केली. कांही काळ मुंबईतहि उपचार केले, परंतु प्रकृति सुधारण्याचं चिन्ह दिसेना. गणपतरावांची सर्व शुश्रूषा घरीं त्यांच्या पत्नी स्वतःच पहात असत. एखाद्या सॅनिटोरियममध्ये ठेवणं आर्थिकदृष्ट्या झेपणारं नव्हतं. क्षयविरोधी स्ट्रेप्टोमायसीनसारखीं औषधंहि त्या काळांत मुबलक प्रमाणांत उपलब्ध नव्हतीं. जीं औषधं होतीं तीं अतिशय महाग असल्यानं माफक प्रमाणांतच त्यांचा वापर करणं क्रमप्राप्त होतं. आर्थिक स्थिति ओढगस्तीची होती. गणपतरावांच्या पत्नी त्यांची सेवा-शुश्रूषा करीत होत्या. परिणामीं त्यांनाहि क्षयानं पछाडलं. १९४७ चं संपूर्ण वर्ष गणपतराव यातना सहन करत होते. अखेर त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्यांत त्यांना मृत्यूनं गाठलं. गणपतराव गेले आणि चव्हाण-कुटुंबाचा आधारच गेला.

विठाबाईवर तर दुःखाचा आणखी एक डोंगर कोसळला. ज्ञानोबा गेलेच होते. आता गणपतरावहि गेले.

गणपतरावांचं निधन झालं त्या वेळीं त्यांचा सर्वांत धाकटा मुलगा राजा हा दीड वर्षांचा होता. लहानपणींच वडील गेल्यामुळे चव्हाण-बंधु पोरके झाले होते. आता त्यांचीं मुलंहि तशींच पोरकीं झालीं. या मुलांचं संगोपन त्या परिस्थितींत आजीला – विठाबाईंनाच करावं लागलं. कारण या मुलांची आई – गणपतरावांच्या पत्नी याहि क्षयानं आजारी झाल्या होत्या. त्यांचा आजार हा १९५१ पर्यंत वाढत राहिला आणि त्या आजारानं या मुलांच्या आईलाहि इहलोकांतून उचललं.

पार्लमेंटरी सेक्रेटरी होण्याच्या अगोदरपासूनच यशवंतरावांच्या पाठीशीं ही कौटुंबिक व्यथा सुरू झाली होती. १९५१ पर्यंत बंधु आणि भावजय हे घरांतले जवळचे दोन जीव उडून गेले. तरीहि व्यथेचा शेवट अजून झाला नव्हता. 'चले जाव चळवळीं'तला सौ. वेणूबाईंचा तुरुंगवास आणि ज्ञानोबांचा मृत्यु या धक्क्यानं सौ. वेणूबाईंची प्रकृति ढासळलीच होती. मनाला बसलेल्या धक्क्यानं त्यांना अलीकडे फीटस् येत होत्या. त्यांतच घरांत थोरले दीर आणि जाऊबाई हे क्षयानं आजारी झाल्यानंतर त्यांची सेवा-शुश्रूषाहि त्यांना करावी लागली. याचा परिणाम असा झाला की, अगोदरच अशक्त बनलेल्या सौ. वेणूबाईंनाच क्षयानं गाठलं. यशवंतरावांवर ही आणखी एक आपत्ति आली.

सौ. वेणूबाई त्या वेळीं कराडलाच होत्या. त्यांचा आजार इतक्या झपाट्यानं बळावला की, शरीराचा केवळ हाडांचा सापळा बनला. त्यांनाहि मग मिरजेचाच रस्ता धरावा लागला. यशवंतराव मुंबईत आणि पत्नी अत्यवस्थ स्थितींत कराडांत, अशी अवस्था होती. घरांत विठाई आणि सर्व लहान मुलं. अशा स्थितींतच सौ. वेणूबाईंना मिरजेला दवाखान्यांत नेण्याचा प्रश्न निर्माण झाला. विठाईचा लहान भाचा शामराव पवार त्या वेळीं कराडांत होता. अखेर ती कामगिरी त्यानंच पार पाडली. शामरावचं वय अवघं सोळा-सतरा वर्षांचं होतं. त्यानं एका मोटारीची व्यवस्था केली; पण घरांतून स्वतःच्या पायानं चालत येऊन मोटारींत बसण्याइतकीहि शक्ति वेणूबाईंच्या शरीरांत उरली नव्हती. शामनंच मग त्यांना उचलून मोटारींत ठेवलं. सोळा-सतरा वर्षांच्या मुलानं उचलून मोटारींत नेऊन ठेवावं, इतक्या सौ. वेणूबाई विकलांग झाल्या होत्या.

मिरजेच्या मिशन हॉस्पिटलमध्ये त्या वेळीं डॉ. जॉन्सन या नांवाचे तज्ज्ञ डॉक्टर होते. सौ. वेणूबाईंना मिरजेला त्यांच्याकडे औषधोपचारासाठी दाखल करतांच यशवंतराव हे मिरजेला गेले. १९४९–५० सालांतली ही घटना. पत्नी आणि वहिनी दोघीहि क्षयानं आजारी ! पण डॉ. जॉन्सन यांनी धीर दिला; आणि औषधोपचार सुरू झाला. वेणूबाईंना खडखडीत बरी करतों अशी डॉक्टरांनी खात्री दिली. त्या वेळीं क्षयप्रतिबंधक औषधं उपलब्ध होऊं लागलीं होतीं. मिशनरी डॉक्टर हे सेवावृत्तीचे ! त्यांनी वेणूबाईंची सेवा सुरू केली. डॉ. जॉन्सन पराकाष्ठा करीत होते. औषधं सुरूच होतीं.

पण असा एक क्षण निर्माण झाला की, त्या वेळीं रुग्णाला रक्त देण्याची गरज भासली. रक्तपुरवठ्यासाठी मग योग्य अशा रक्ताची शोधाशोध सुरू झाली. मुंबईला त्या वेळीं आवश्यक त्या नमुन्याचं रक्त मिळत असे; पण मुंबईतील रक्तपेढींतून तें रक्त बाहेर काढल्यानंतर कांही तासांतच मिरजेला पोंचवायचं तर जलदगतीच्या वाहनाची व्यवस्था आवश्यक होती आणि परिस्थिति तर त्या दृष्टीनं अनुकूल नव्हती. त्यामुळे विशिष्ट नमुन्याचं रक्त मिरजेंतच उपलब्ध व्हावं यासाठी निरनिराळ्या व्यक्तींचं रक्त तपासण्याचा उपक्रम डॉ. जॉन्सन यांनी सुरू केला. अनेकांचं रक्त तपासल्यानंतर अखेर शाम पवार या मुलाचंच रक्त जुळत असल्याचं आढळून आलं. वेणूबाईंना रक्त-पुरवठा मिळाला तो शामच्याच रक्ताचा! वेणूबाईंचीं दोन्ही बाजूंचीं फुफ्फुसं रोगानं व्यापलीं होतीं. परंतु डॉ. जॉन्सन यांची चिकाटी दांडगी. 'आय विल् बिल्ड हर अप्' अशी खात्री त्यांनी यशवंतरावांना दिली होती. त्याप्रमाणे सहा-सात महिने सतत प्रयत्न करून डॉक्टरांनी आपला शब्द खरा केला. रोगाचा निचरा केला आणि त्यानंतरच वेणूबाईंना मुंबईला नेतां येणं शक्य झालं. मुंबईत पोंचल्यावरहि औषधोपचार सुरू ठेवणं आवश्यकच होतं. पुढच्या काळांतहि प्रकृति आणि औषधं यांनी त्यांची कायमच सोबत ठेवली.

पत्नी रोगाच्या संकटांतून बचावली तरी यशवंतरावांसमोर गणपतरावांच्या लहान मुलांचा सांभाळ, शिक्षण हे प्रश्न होतेच. मुलं लहान होतीं आणि आजी त्यांचं संगोपन करत होती. कराडांतच मुलांचं प्राथमिक शिक्षण सुरू होतं. यशवंतराव – काका – हा त्या मुलांचा आधार. १९५६ मध्ये त्यांतील दोन मुलांना, दादा आणि राजा यांना त्यांनी पुण्याला आणलं आणि पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलच्या वसतिगृहांत त्यांची व्यवस्था केली. थोरला मुलगा अशोक याला ठाणें जिल्ह्यांत बोर्डी येथील आचार्य भिसे यांच्या शारदाश्रमांत दाखल केलं. दोघांचं माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर पुढच्या काळांत त्यांनी चरितार्थाच्या दृष्टीनं विविध व्यवसाय पत्करले आणि धाकटा विक्रम ऊर्फ राजा महाविद्यालयांत दाखल झाला. वैद्यकीय शाखेचं शिक्षण पूर्ण करून त्यानं डॉक्टरची पदवीहि संपादन केली. या तिन्ही मुलांचे विवाह करून त्यांचे संसार उभे करण्यापर्यंत यशवंतराव आणि सौ. वेणूबाई यांना सर्वच करावं लागलं. गणपतरावांच्या मुलांना जीवनांत स्वतःच्या पायावर उभं करतां आलं याचं फार मोठं समाधान दोघांना मिळालं.

१९१९ मध्ये बळवंतरावांच्या निधनापासून चव्हाण-कुटुंब परिस्थितीच्या आणि संकटांच्या फेऱ्यांत सापडलं त्यांतून बाहेर पडायला पुढचीं पन्नास वर्षं खर्ची पडलीं. चव्हाण-कुटुंबाइतकी कठोर परीक्षा घेण्यासाठी नियतीनं क्वचितच अन्य एखाद्याची निवड केली असेल! नियतीच्या शाळेंत पन्नास वर्षं दुःखाचे आणि संकटांचे धडे घेतलेल्या यशवंतरावांना म्हणूनच 'परदुःख शीतल' असं कधी वाटलं नाही.

यशवंतरावांच्या खिशांत वकिलीची सनद होती. खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करून कायद्याच्या साहाय्यानं अमाप पैसा मिळवण्यास सर्व न्यायालयं त्यांच्यासाठी

खुर्ली होतींच. ब्रिटिशांनी केलेल्या कायद्याचे सोयिस्कर अर्थ लावून वकील धनवान बनून नशिबवान ठरत आहेत, हें त्यांना आसपास दिसत होतं. खिशांत असलेल्या सनदेच्या आधारानं यशवंतरावांनाहि यशस्वी वकील म्हणून आपल्या कुटुंबाची आर्थिक स्थिति बदलतां येणं शक्य होतं. कांही वर्षे वकिली करून, न्यायाधिशाची खुर्ची मिळवण्याची महत्त्वाकांक्षा धरली असती, तर तेंहि त्या काळांत कठीण नव्हतं. तसं झालं असतं, तर कोर्टात ज्यांचे वडील आणि ज्येष्ठ बंधु एक सामान्य बेलिफ म्हणून काम करत होते, अशा एका बेलिफाचा मुलगा आणि भाऊ न्यायाधीश झाल्याची नोंदहि न्यायालयाच्या इतिहासांत झाली असती. न्यायाधिशाच्या खुर्चीचा स्वीकार न करतांहि यशस्वी वकील म्हणून ते जरी राजकारणांत उतरले असते, तरी त्यासाठीहि संधि होती. कारण त्या काळांत वकिलाचा, डॉक्टरचा पेशा व्यवस्थित सांभाळणारेच बव्हंशीं राजकारणी पुढारी म्हणून समाजासमोर असत. राजकारणाचा भक्कम आधार घेऊन यशस्वी वकील बनणारेहि होते. परंतु यशवंतरावांनी आपली वाटचाल लहानपणापासूनच काँग्रेस कार्यकर्ता म्हणून सुरू केली होती. वकिलीची सनद खिशांत आल्यानंतरहि पैसा मिळवून स्वतःचं आणि कुटुंबाचं नशीब उजळण्यापेक्षा, जनतेची वकिली करण्याचाच पेशा अखंडपणें पत्करला.

राजकीय क्षेत्रांत, वरकरणी किंवा दिखाऊ क्रांतिकारकांचा, कंठाळी पुढाऱ्यांचा एक वर्ग असतोच. हीच खरी देशभक्ति अशी त्यांची सोयिस्कर समजूत असते. प्रवाहाविरुद्ध पोहत राहून, पुरांतून पार होणारा विरळा; यशवंतरावांनी बुद्धिपुरस्सर याच मार्गानं जाण्याचं ठरवलं आणि त्याच वाटेनं ते निघाले. कुटुंबांत उपासमार सुरू होती, एका भावाला शिक्षण मिळावं म्हणून दुसरा भाऊ बेलिफाची नोकरी करूं लागला होता. एक भाऊ स्वतः शिक्षणाला वंचित झाला होता. वृद्ध आई हाच ज्यांच्या कुटुंबाचा आधार, आणि जीव घेऊन जाणाऱ्या आजाराचीं संकटं घरांत मुक्कामाला आलेलीं, अशा कुटुंबांतला, कर्ता, सुशिक्षित तरुण, सुखानं कालक्रमणा करण्याचा मार्ग सोडून काटेरी मार्ग पत्करतो यापरतं त्यागाचं जीवन तें कोणतं! पुढच्या काळांत यशवंतरावांवर संधिसाधूपणाचा आरोप करण्यास अनेकजण पुढे सरसावले. माणसाच्या एकूण प्रवृत्तीला तें शोभणारं असलं तरी बुद्धिवादी असा टिळा धारण करून मतलबी राजकारण करणाऱ्या वर्गाला यशवंतरावांच्या या आदर्शानं धक्का पोंचणं स्वाभाविकच ठरतं. समाजजीवनांत आणि राजकारणांत बेदिली माजवायची आणि विशिष्ट वर्गाचं हित साध्य करायचं, तर यशवंतरावांना संधिसाधूपणाचा आरोप चिकटवण्याशिवाय या वर्गाला गत्यंतरच उरत नाही. काँग्रेसचा कार्यकर्ता आणि पुढारी बनणं म्हणजे दारिद्र्य, यातना आणि सुळावरची पोळी अशी ज्या काळांत परिस्थिति होती त्या काळांत यशवंतरावांनी स्वतःच्या आणि कुटुंबाच्या स्वास्थ्याचा स्वार्थ बाजूला ठेवून, लोकसेवेचं सतीचं वाण पत्करलं. जीवनाच्या या कालखंडांत टाकीचे घाव सहन करण्याची त्यांची कसोटी लागून गेली आणि त्यांतूनच व्यक्तिमत्त्व घडत राहिलं.

काँग्रेसचा पुढारी बनणं म्हणजे सत्ता, संपत्ति, प्रतिष्ठा यांसाठी सुवर्णसंधि होय, असा काळ काँग्रेसच्या वाटचालींत पुढे निर्माण झाल्यानंतर या काळाला अनुलक्षून यशवंतरावांना तसल्या त्या तथाकथित पुढाऱ्यांच्या रांगेंत उभे करण्याचा प्रयत्न कांही बुद्धिवादी म्हणवणाऱ्यांनीं केला. त्यांतून त्यांचा बुद्धिविलास जरी प्रगट होत असला, तरी यशवंतरावांच्या जीवन-इतिहासाशीं मात्र तें सुसंगत नव्हतं. ही विसंगती ऐकूनहि स्वतः यशवंतराव मात्र त्या बाबतींत नेहमी अबोलच राहिले. महाराष्ट्राच्या मनोवृत्तीशीं अर्थातच हें साजेसं नव्हे असं कोणी म्हणतील. कारण जो तो बुद्धीच सांगे ही वस्तुतः महाराष्ट्राची परंपरा; पण आश्चर्य हें आहे की, महाराष्ट्रांत जन्म घेऊनहि यशवंतरावांमध्ये महाराष्ट्राचे ते उपजत गुण संवर्धित झालेले आढळत नाहीत. महाराष्ट्रांतील अव्वल दर्जाच्या बुद्धिमंतांच्या आणि कर्तृत्ववान् पुरुषांच्या वैचारिक संगतींतच यशवंतरावांचा वैचारिक पिंड बनला आहे. हंसक्षीर-न्याय त्यांनी त्यांतून आत्मसात् केला.

स्वातंत्र्याच्या चळवळींत काम करतांना, स्वातंत्र्य कशासाठी याचा अभ्यास, तुरुंगवासाच्या काळांत मोठमोठ्या पुढाऱ्यांच्या संगतींत त्यांना करतां आला. याचा परिणाम असा झाला की, स्वातंत्र्यपूर्व काळांत चळवळींत असतांना किंवा स्वातंत्र्योत्तर काळांत सत्ता-संपादनानंतरहि स्वातंत्र्य कशासाठी, यासंबंधीचं त्यांचं अवधान कधी सुटलं नाही. त्यांनी आपला असा स्वतंत्र 'इझम' वगैरे देशासमोर ठेवला काय, यापेक्षाहि त्यांनी आपल्या जीवनांत पवित्र राष्ट्रीय विचाराचं जें मूलभूत मूल्य जोपासलं तें सर्वश्रेष्ठ असंच ठरलं. नेतृत्व संपन्न बनायचं आणि याचा लाभ राष्ट्राला व्हायचा, तर या पायाभूत मूल्याचं महत्त्व अधिक आहे. वैयक्तिक जीवनांत किंवा राष्ट्राच्या जीवनांत जेव्हा संकट उभं रहातं आणि निर्णय करण्याचा प्रसंग येतो त्या वेळीं अशा नेत्याकडून केले जाणारे निर्णय हे स्वतःला आणि राष्ट्रालाहि तारून नेणारेच ठरतात. यशवंतरावांच्या जीवनांत असे व्यक्तिगत आणि राष्ट्राच्या जीवनासंबंधीचे निर्णय करण्याचे प्रसंग पुढच्या काळांत सततच येत राहिले. त्यांनी तसे निर्णय अनेक प्रसंगीं केले आणि केलेले निर्णयच योग्य होते, अशी इतिहासाची साक्ष नोंदली गेली आहे.

बाळासाहेब खेरांच्या राजवटींतच यशवंतरावांची कसोटी या दृष्टीनं प्रथम लागली. समाजांतील आर्थिक विषमता नाहीशी करून व बहुजन-समाजाचं आर्थिक शोषण ज्या परिस्थितीमुळे होत आहे ती बदलून सामाजिक स्वास्थ्य निर्माण करणं व देश सर्वार्थानं संपन्न बनविणं हें स्वराज्याचं ध्येय होतं. लोकमान्य टिळक, गांधीजी, नेहरू यांनी ही प्रतिज्ञाच उच्चारली होती. पं. नेहरूंनी समाजवादाच्या ध्येयाचा पुकारा करून काँग्रेसचं ध्येय-धोरणहि सांगितलं होतं. काँग्रेसप्रणीत समाजवादाचे यशवंतराव हे तर पुरस्कर्तेच होते. सत्ता मिळवण्यासाठी संघर्ष आणि समाजवादासाठी सत्ता वापरण्याचा संघर्ष त्यांना अभिप्रेत होताच. आत्माराम पाटील यांना कायदेमंडळाच्या निवडणुकीस त्याचसाठी त्यांनी उभं केलं होतं. स्वतः असेंब्लीची निवडणूक लढवतांना त्यांच्यासमोर हेंच ध्येय होतं. परंतु निवडणुकीनंतर बाळासाहेब खेर यांच्या एकूण धोरणामुळे त्यांना

त्यांच्या ध्येयपूर्तीचा मार्ग मुक्त करून मिळत नाही, असं अनुभवास येऊं लागलं. खेर हे संकुचित जातीय दृष्टिकोन बाळगणारे नेते नव्हते हें खरं, परंतु त्यांची जवळीक शहरी बुद्धिजीवी वर्गाशीं अधिक होती. ते स्वतःहि त्याच वर्गातले होते. मोरारजी देसाई, जिवराज मेहता आदि त्यांचे प्रमुख सहकारीहि त्याच वर्गाचे प्रतिनिधि. सातारा जिल्ह्यासाठी मंत्रिमंडळांत जें प्रतिनिधित्व त्यांनी दिलं तें फलटणचे मालोजीराजे निंबाळकर आणि दुसरे गणपतराव तपासे या दोघांना! मालोजीराजे यांनी मंत्रिमंडळांत आणि बाहेरहि जें प्रतिनिधित्व केलं तें फक्त मोरारजी देसाई यांच्यापुरतं मर्यादित होतं. मोरारजी हेच त्यांचे नेते आणि तेच त्यांचं सर्वस्व. गणपतराव तपासे हे समाजांतल्या खालच्या थरांतले होते, परंतु ते सातारा जिल्ह्याचे मान्य नेते नव्हते. मंत्रिमंडळांतील त्यांची तरतूद ही एक तडजोड होती. खेर यांनी मंत्रिमंडळांत, बहुजन-समाजांतील कर्तबगार आणि खऱ्या अर्थानं बुद्धिवादी अशा नेत्यांचा समावेश केलाच नव्हता. शंकरराव मोरे, केशवराव जेधे यांच्यासारखे नेते दूर ठेवण्यांत आले आणि ल. मा. पाटील, गोविंदराव वर्तक ( हरिभाऊ वर्तक यांचे वडील ), बी. डी. देशमुख, तपासे यांचा प्रांतिक काँग्रेसचे प्रतिनिधि म्हणून मंत्रिमंडळांत समावेश करण्यांत आला. प्रांतिक-काँग्रेसनं यशवंतरावांसाठी जोरदार शिफारस केलेली असूनहि त्यांना मंत्रिमंडळापासून दूर ठेवण्यांत आलं आणि पार्लमेंटरी सेक्रेटरीपदाची जागा देण्यांत आली. खेर यांच्या या निर्णयानं बहुजन-समाजांतील मोरे, जेधे, काकासाहेब वाघ आदि नेते अस्वस्थ बनले.

या नेत्यांची अस्वस्थता आणखी वाढण्यास खेर यांचा एक निर्णय विशेष कारणीभूत झाला. हा निर्णय होता शिक्षणक्रमांतून इंग्रजीला हद्दपार करण्याचा! प्रतिगामी वृत्तीच्या लोकांच्या प्रेरणेनं खेर यांनी मातृभाषा ही शिक्षणाचं माध्यम असावं, अशा आशयाचं एक विधेयक असेंब्लींत सादर केलं. मातृभाषेचा अभिमान असणं हें योग्यच होतं. परंतु मातृभाषा हेंच केवळ शिक्षणाचं माध्यम केल्यानं पुढच्या अनेक पिढ्या ज्ञानाच्या दृष्टीनं बरबाद होणार आहेत हा दृष्टिकोन खेर यांनी सोयिस्कर-रीत्या बाजूला ठेवला.

धार्मिक श्रद्धेचं पुनरुज्जीवन करणं हा प्रतिगाम्यांचा हेतु होता. त्याच दृष्टीनं समाजांतील फार मोठा भाग इंग्रजीपासून दूर ठेवण्यांत या वर्गानं खेर यांच्या सहकार्यानं यश मिळवलं. मोरारजी हे या बाबतींत खेरांचे साथीदार. मोरारजी हे नोकरशहांच्या वृत्तीचे, उच्च घराण्यांतून आलेले होते. गोरगरीब, सामान्य जनता, ग्रामीण जीवन यांच्याशीं त्यांचा सुतराम् संबंध नव्हता. मंत्रिमंडळांत स्थान प्राप्त झाल्यानं त्यांना देशभक्तीचं एक वेगळं सामर्थ्य मात्र प्राप्त झालं होतं. ते स्वतः कठोर नोकरशहा तर होतेच, शिवाय हाताखालच्या लोकांनाहि चाप लावून, सत्तेची दोरी आपल्या हातांत मजबूत ठेवण्यांत ते वाकबगार होते. शहाणपणाचा सारा मक्ता हा आपला, हीच अशा लोकांची भूमिका असते. हाताखालचा माणूस हा जर अशा नोकरशहाच्या जातीपेक्षा

खालच्या जातींतला असेल तर तो त्यांच्या दृष्टीनं निर्बुद्ध असतो. हिंदुस्थानांत ब्रिटिशांचं राज्य सुरू झाल्यानंतर प्रथम ज्यांनी इंग्रजी भाषा आत्मसात् केली आणि त्या भांडवलावर नोकरींत रुजू झाले, त्या मंडळींचा सर्वसामान्य समाजाकडे पहाण्याचा साचा ठरून गेलेला असायचा. मोरारजी तर या सर्वांचे बादशहा शोभावेत असे होते. खेर-मंत्रिमंडळाचा शिक्षणविषयक निर्णय कृतींत उतरवण्यासाठी मोरारजींनी आपली सर्व शक्ति त्या काळांत कामाला लावली.

खेर-मंत्रिमंडळाचे शैक्षणिक सल्लागार म्हणून त्या वेळीं गुलाम सय्यद्दीन हे होते. डॉ. झकिर हुसेन यांच्यापासून खेर यांनी ही स्फूर्ति घेतली होती म्हणतात; परंतु खेर-प्रणित या शैक्षणिक सुधारणेमुळे घड्याळाचे काटे उलटे फिरवले गेले आणि महाराष्ट्रांतल्या तरुणांच्या पिढ्यामागून पिढ्या इंग्रजी ज्ञानाला वंचित झाल्या. विशेषतः ग्रामीण भागां-तल्या किंवा शहरी भागांतल्याहि गरीब वर्गांतील मुलांपासून इंग्रजी शिक्षण कित्येक योजनं दूर गेलं. समाजांतला सुस्थितींतला वर्ग आणि सरकारी नोकर आपल्या मुलांना कॉन्व्हेंट स्कूलमध्ये पाठवून त्यांना इंग्रजीचं ज्ञान देत राहिला. इंग्रजी माध्यम असलेल्या कॉन्व्हेंट स्कूलचा खर्च सामान्य लोकांना कधीच आर्थिकदृष्ट्या झेपणारा नसतो. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थिवर्ग शैक्षणिकदृष्ट्या उपाशी राहिला. उच्च शिक्षणापासून बहुजन-समाजाला चार हात दूर ठेवावं, असा खेर यांचा मूळ हेतु नसेलहि, पण त्यांच्या शैक्षणिक सुधारणेचा परिणाम मात्र तोच झाला. सरकारचे वैचारिक धोरणात्मक दारिद्र्यच यांतून स्पष्ट झालं. सरकारनं केलेलं धाडस हें सामाजिक हिताच्या दृष्टीनं बौद्धिक अभावाचंच द्योतक ठरलं.

यशवंतराव हे अशा बौद्धिक दारिद्र्याचे भागीदार रहाण्याची सुतराम् शक्यता नव्हती. समाजाच्या ज्या थरांत ते वाढले आणि शैक्षणिक काळांत अनुभव घेतले, त्या बहुजन-समाजाचे किती तरी महत्त्वाचे प्रश्न त्यांच्यासमोर होते. बहुजन-समाजांतील सर्वच विचारवंत नेत्यांसमोर ते प्रश्न होते. शेतकऱ्यांची शेती सुधारावी, पाटबंधाऱ्यांच्या कांही योजना कार्यान्वित कराव्यात, आर्थिक विषमता दूर करावी, अशा मागण्या ही नेते-मंडळी खेर-मंत्रिमंडळाकडे करत होती. पण खेर-मंत्रिमंडळ मात्र, मातृभाषेचं महत्त्व पटवण्यांत आणि दारूबंदीचे पोवाडे लोकांना ऐकवण्यांतच सर्वस्व मानीत होतं. दारूबंदीचं महत्त्व पटवण्यासाठी त्यांनी हजारो रुपये खर्च केले. किती तरी कार्यकर्त्यांना आणि शाहिरांना दारूबंदीच्या कामासाठी त्या काळांत त्यांनी पैसे दिले.

महाराष्ट्राचें सामाजिक प्रबोधन करण्यासाठी टिळक, गोखले, रानडे, आगरकर, फुले यांनी इंग्रजी शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था उभारल्या, हायस्कूलं आणि महाविद्यालयं स्थापन केलीं, त्याच महाराष्ट्रामध्ये स्वातंत्र्य मिळतांच, तथाकथित बुद्धिवादी मंडळींनी इंग्रजीला बंदी घालून प्रबोधनाचा पायाच उखडून काढण्याचा दुर्दैवी चंग बांधला. समाजांतल्या सामान्य वर्गाचं, दलितांचं जें शोषण सुरू होतं, तें थांबायचं तर खालच्या वर्गापर्यंत ज्ञानाची गंगा पोंचली पाहिजे अशी टिळक, गोखले, फुले यांची तळमळ होती. लोक

प्रगमनशील विचाराचे व्हायचे तर इंग्रजीच्या माध्यमांतूनच त्यांना तसं बनवतां येईल ही त्यांची धारणा. खेर-मंत्रिमंडळानं या मूलभूत विचारालाच सुरुंग लावल्यानं ग्रामीण भागांतल्या लोकांमध्ये अशी भावना वाढीस लागली की, सरकारी नोकरीपासून आणि वरिष्ठ जागांपासून, बहुजन-समाजाला दूर ठेवण्यासाठीच खेर-मंत्रिमंडळाचा हा डाव आहे; इतकंच नव्हे तर, सरकारी नोकरीचं कुरण हें समाजांतल्या एका विशिष्ट वर्गासाठीच राखून ठेवण्याचा यामागे हेतु असला पाहिजे !

सर्वसामान्य लोकांची ही प्रतिक्रिया, तर बहुजन-समाजांतल्या राजकीय नेत्यांची प्रतिक्रिया वेगळीच निर्माण झाली. त्यांना असं वाटूं लागलं की, ग्रामीण भागांतून जें नेतृत्व निर्माण होत आहे, तें काँग्रेसमधील असो अगर अन्य असो, तें आपल्यापेक्षा गुणानं आणि बुद्धीनं लोकशाही स्वराज्य प्रस्थापित करण्याच्या दृष्टीनं सरस ठरेल याच्या धास्तीमुळेच खेर-मंत्रिमंडळानं हा निर्णय केला असला पाहिजे. इंग्रजी शिक्षणाची दारं या हेतूनंच सर्वसामान्यांसाठी बंद करण्यांत आलीं आहेत. खेर, मोरारजी, जिवराज मेहता यांना समाजांतील प्रस्थापितांच्या हिताचं रक्षण केल्याचं समाधान, तर जेधे, मोरे, चव्हाण, भाऊसाहेब हिरे इत्यादींना बहुजन-समाजाला शे-दीडशे वर्षांपूर्वीच्या काळांत ढकललं गेल्याचं दुःख, अशी वस्तुस्थिति निर्माण झाली. काँग्रेस-अंतर्गत पुरोगामी विचाराच्या नेत्यांमध्ये त्या काळांत हा एक चर्चेचा विषय झाला. त्याच वेळीं 'टेनन्सी लॉ' अमलांत आला. त्याचीहि चर्चा सुरू होती. ग्रामीण प्रश्नांना प्राधान्य मिळण्याची आवश्यकता असून खेर-मंत्रिमंडळानं आपल्या धोरणांत आणि दृष्टिकोनांत बदल केला पाहिजे, अशी या गटाची मागणी सुरू झाली. खेर-मंत्रिमंडळाची सत्ता ही सांस्कृतिक हितसंबंधांची जपणूक करणारी शहरी राजसत्ता असल्याचा आरोप उघड उघड केला जाऊं लागला. वस्तुस्थिति कांहीशी तशीच होती.

खेर-मंत्रिमंडळाच्या धोरणासंबंधांतच वाद सुरू झाल्यानं त्याचा विचार करण्यासाठी काँग्रेस-अंतर्गत एक स्वतंत्र गट त्या वेळीं एकत्र आला. या गटामध्ये दत्ता देशमुख, पी. के. सावंत, भाऊसाहेब राऊत, शंकरराव मोरे, केशवराव जेधे, तुळशीदास जाधव असे सर्व एकत्र आले आणि त्यांच्या बैठकी सुरू होऊन चर्चा होऊं लागल्या. यशवंतराव चव्हाण हेहि त्यांच्याबरोबर होते. शेतीच्या व अन्य ग्रामीण प्रश्नांना प्राधान्य मिळण्यासाठी उपाययोजना काय करावी, याची चर्चा या बैठकींतून होत राहिली. खेर-मोरारजींच्या धोरणांत ग्रामीण रचनेला कांहीच प्राधान्य नसल्यानं काँग्रेस-पक्षाचं ग्रामीण भागांतील महत्त्व कमी होऊं लागलं होतं. एक-दोघांना हाताशीं धरून काम करण्याची खेर-मोरारजी यांची प्रथा होती. त्या वेळच्या महाराष्ट्रांतील म्हणजे मुंबई राज्याच्या बारा जिल्ह्यांतील जनतेचं दैनंदिन जीवन सुधारण्याचा प्रश्न तीव्र असतांना, खेर-मोरारजी मात्र मानवाचं आंतरिक जीवन सुधारण्याची चिंता करत राहिले; आणि त्यांतून व्यक्तीचा मानसिक पालट घडवायचा, की साऱ्या समाज-जीवनाचा कायापालट घडवून आणायचा, असा मूलभूत प्रश्न निर्माण झाला. 'टेनन्सी लॉ'च्या संदर्भात शेत-जमिनीची

मालकी कोणाची असावी हा प्रश्न ग्रामीण भागाच्या दृष्टीनं महत्त्वाचा होता. नेतृत्वाच्या आणि पक्षाच्या धोरणाबद्दल तर वाद होतेच; पण त्याचबरोबर समाज-जीवन सुधारण्याच्या दृष्टिकोनांतील फरक हाहि वादाचा फार मोठा भाग होता.

या सर्व प्रश्नांची तड लावण्यासाठी कॉंग्रेस-अंतर्गत तयार झालेल्या गटामध्ये चर्चा होत असत. गट म्हणून सर्वांनी एकत्र राहून काम करावं अशी प्रारंभींची कल्पना होती. या गटाच्या हालचाली सुरू होतांच महाराष्ट्रांतील शेतकरीवर्गांत समाधान निर्माण झालं. तुळशीदास जाधव वगैरे मंडळी शेतकऱ्यांच्या जाहीर सभांतून, त्यांच्या भाषेंत जें बोलत असत त्यानं शेतकरीवर्गाला चांगलंच आकर्षून घेतलं. राजकारणाच्या आणि धोरणाच्या संदर्भांत ते शेटजी-भटजी या भाषेंतच बोलत असत. मोरे-जेधे यांचं विश्लेषण आणखी वेगळं असे. शंकरराव मोरे हे जात्याच हुषार, त्यांचं व्यक्तित्वहि आकर्षक, वक्रोक्तीनं बोलण्याची त्यांची पद्धत. समाज-मनावर त्यांनी आपली प्रतिमा चांगलीच उमटवली होती. त्यांतून महाराष्ट्राच्या राजकारणांत एक वेगळंच वातावरण निर्माण झालं.

समाज-मन अनुकूल आहे असं आढळतांच, या गटानं वेगळ्या हालचाली सुरू केल्या. शेतकरी आणि कामकरी यांच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी 'शेतकरी-कामकरी-पक्ष' या नांवाचा एक वेगळा पक्षच स्थापन करण्याला या गटांतील मोरे-जेधे आदि मंडळींनी चालना दिली. त्या दृष्टीनं मग चर्चा सुरू झाल्या. १९४८ च्या जानेवारींत म. गांधी यांची हत्या होतांच महाराष्ट्रांतील ग्रामीण आणि शहरी भागांत एक वेगळी लाट उसळली होती. ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वादाचे थंडे झालेले ताबूत पुन्हा एकदा या निमित्तानं रस्त्यावर आले आणि सारं समाजजीवनच ढवळून निघालं. खेर-मोरारजींच्या शहरी सत्तेच्या राजकारणाचा राग मनांत होताच. त्यांत गांधी-हत्येमुळे आणखी एका भक्कम कारणाची भर पडल्यानं त्यांतून मग दहशत, जाळपोळ, लुटालूट आदि मार्गांनी राग, चीड व्यक्त करण्यास अवसर मिळाला. राष्ट्रपित्याची हत्या हा समाज-मनाला मोठा धक्का होता. त्या धक्क्यानं बेफाम बनलेल्या मनांनी सुक्याबरोबर ओल्याचाहि निकाल लावला. समाजधुरीण आणि राजकारणी-धुरंधर यांच्यासमोर त्यामुळे मोठंच प्रश्नचिन्ह उभं राहिलं.

याच काळांत मुंबईत भाऊसाहेब राऊत यांच्या निवासस्थानीं, कॉंग्रेस-अंतर्गत खेर-मोरारजी-विरोधी गटाची बैठक झाली. ही बैठक शेतकरी-कामकरी-पक्षाला जन्म देण्यासाठी म्हणून आयोजित केली होती. या बैठकीला इतर सर्व कार्यकर्त्यांबरोबर यशवंतराव चव्हाण, पी. के. सावंत हेहि हजर राहिले. र. के. खाडिलकर, आचार्य अत्रे हेहि तिथे होते. नवीन पक्ष स्थापन करण्याचा निर्णय या बैठकींत करायचा असल्यानं त्या अनुषंगानंच बैठकींत चर्चा सुरू झाली. यशवंतरावांनीं नव्या पक्ष-स्थापनेस मान्यता देण्याचा प्रश्नहि निर्माण झाला. पक्षाच्या पूर्वतयारीची ही बैठक असल्यानं यशवंतरावांनी त्या संबंधांत मत व्यक्त करणं महत्वाचं होतं; परंतु त्या

संदर्भांत त्यांनी आपले विचार ऐकवले मात्र, बैठकींतलं सारं वातावरणच बदललं. बैठकीला उपस्थित असलेल्यांमध्ये चुळबूळ सुरू झाली. कारण यशवंतरावांनी व्यक्त केलेल्या विचारांशीं बरेचजण अनुकूल होते.

शेतकरी-कामकरी पक्ष या नांवानं वेगळा पक्ष स्थापन करायचा आणि काँग्रेस-पासून फुटून बाजूला व्हायचं, याला चव्हाणांनी बैठकींत सक्त विरोध दर्शवला. त्यांचं म्हणणं असं की, काँग्रेस-अंतर्गत एक गट म्हणून राहून, ग्रामीण रचनेच्या संदर्भांत अनुकूल काम करण्यासाठी आपण एकत्र आलों आहोंत. अशा परिस्थितींत त्या कामा-साठी आपण मंडळी आम्हांस काँग्रेसपासून बाजूला काढतां आहांत हें बरोबर नाही. नवा पक्ष काढण्याच्या या विचारानं आमच्यासमोर पक्ष-निष्ठेचा मूलभूत प्रश्नच निर्माण झाला आहे. नव्या पक्षाचं स्वरूपहि महाराष्ट्रापुरतं, म्हणजे बारा जिल्ह्यांपुरतंच मर्यादित आहे. काँग्रेस-पक्ष हा अखिल भारतीय पक्ष आहे. देशांतला राजकारणाचा तो मुख्य प्रवाह आहे. नवीन पक्ष सुरू करणं म्हणजे या मुख्य प्रवाहापासून बाजूला होणं आहे. पं. नेहरूंसारखे, काँग्रेस-समाजवादाचा दृष्टिकोन स्वीकारलेले नेते काँग्रेसच्या शिरोभागीं असतांना, सामाजिक विषमता नाहीशी करण्यासाठी, आपण काँग्रेसमध्ये राहूनच त्यांचे साथीदार बनलं पाहिजे. या नव्या पक्षाला जातीयतेचा वास येत आहे असं लोक बोलत आहेत, त्याचाहि विचार करण्याची गरज आहे.

नव्यानं स्थापन होणाऱ्या शेतकरी-कामकरी पक्षाला जातीयतेचा वास येत आहे असं यशवंतरावांनी सांगतांच आचार्य अत्रे यांनी तें खोडून काढण्याचा प्रयत्न केला. "मी या पक्षांत आहे ना, मग जातीयतेचा वास कसा येईल," असा अत्रे यांचा दावा ! या नव्या पक्षाच्या बांधणींत अत्रे यांचं स्थान नेमकं कोणतं रहाणार होतं हें अजून गुलदस्तांत होतं; परंतु आपली पक्षांतली उपस्थिति हीच केवळ तो पक्ष जातीयवादी नाही हें सिद्ध करण्यास पुरेशी ठरते असं त्यांचं मत होतं. मोरे, जेधे, जाधव, राऊत आदि मंडळी अर्थातच अत्रे यांच्या मतावर खूष होतीं. परंतु "तुम्ही आहांत, पण तुम्ही या पक्षात नेमके कुठे आहांत, हें कांही मला माहिती नाही," असं अत्रे यांना उद्देशून यशवंतरावांनी स्पष्ट केलं. काँग्रेसमधून फुटून निघून नवीन पक्ष स्थापन करण्यास यशवंतरावांनी उघडपणें विरोध करतांच हा विचार मान्य असलेले आणखी कांहीजण त्यांच्या मदतीस आले. सावंत वगैरेंनीहि आपलं मत व्यक्त करून यशवंतरावांच्या मताला दुजोरा दिला. बैठकींत मग उलटसुलट चर्चा होत राहिली आणि राऊत यांच्या घरीं झालेली ही बैठक अंतिम निर्णय न होतांच संपली.

यशवंतरावांच्या राजकीय जीवनांत काँग्रेसपासून अलग होण्याचा हा तिसरा प्रसंग निर्माण झाला होता. काँग्रेस-समाजवादी पक्षाच्या स्थापनेच्या वेळीं तत्त्व मान्य पण कामाची तऱ्हा अमान्य, असं घडलं. पुढे रॉयवादी गटांत असतांनाहि रॉय यांचे विचार मान्य, पण काँग्रेसमधून बाजूला होऊन दुसरा पक्ष स्थापन करण्याचा त्यांचा हेतु अमान्य, असा निर्णय त्यांना करावा लागला आणि शेतकरी-कामकरी पक्ष म्हणून

वेगळा पक्ष स्थापन करण्याच्या वेळींहि वैचारिक द्वंद्वांत न सांपडतां त्यांनी निर्भेळ दृष्टिकोनच स्वीकारला. महाराष्ट्रांतल्या बारा जिल्ह्यांसाठी स्थापन होणारा पक्ष हा अखिल भारतीय कॉंग्रेसला पर्यायी पक्ष ठरूं शकत नाही हेंच या वेळीं त्यांनी प्रभावीपणें प्रतिपादन केलं. खेर यांच्या धोरणाबद्दल मतभेद आहेत, नाराजी आहे हें त्यांना मान्य होतं पण त्यासाठी मुख्य प्रवाहापासून अलग होण्याच्या विचाराला त्यांनी या वेळीं बैठकींत ठामपणानं विरोध केला. पक्ष-स्थापनेसाठी बोलावलेल्या बैठकीला त्यामुळे निश्चित असा निर्णय त्या वेळीं करतां आला नाही. कारण यशवंतरावांचा विचार मान्य असलेले कांही आमदारहि त्यांत होते. या बैठकीनंतर मोरे-जेधे गट आणि चव्हाण-गट असे आमदारांमध्ये दोन गट निर्माण झाले आणि मोरे-जेधे गटानं त्यापुढच्या बैठकीला चव्हाणांना निमंत्रित करण्याचंच टाळलं. यशवंतरावांचा आपल्याला कांही उपयोग नाही, असाच विचार त्यांनी केला असावा. यामुळे दोन्ही गटांच्या स्वतंत्र बैठकी पुढच्या काळांत सुरू झाल्या. यशवंतरावांनी नव्या पक्षामध्ये महत्त्वाचं स्थान स्वीकारावं असा प्रयत्नहि झाला, परंतु यशवंतरावांनी तें मानलं नाही. त्यांच्यापुढे प्रश्न कोणा एका व्यक्तीच्या मोठेपणाचा किंवा मानमरातबाचा नव्हता. प्रश्न होता मूलभूत ध्येयाशीं प्रामाणिक रहाण्याचा. १९३० मध्ये त्यांनी कॉंग्रेसचं बोट, मनांत एक निश्चित ध्येय ठेवून आणि कार्यक्रमाची आखणी करूनच धरलं होतं. स्वातंत्र्य कशासाठी यासंबंधांतहि त्यांचे विचार पक्के होते. कॉंग्रेसमध्ये राहून जे लढे केले त्याच्या बऱ्यावाईट परिणामाची कदर त्यांनी कधी केली नव्हती. खेर यांचं धोरण त्यांना मान्य नव्हतं, मनांत नाराजी होती, पण ती नाराजी व्यक्त करण्यासाठी, लोकशाही पद्धतीनं काम करणाऱ्या कॉंग्रेस पक्षावरील विश्वासालाच तडा जाऊं द्यावयाचा काय, हा त्यांच्यासमोर प्रश्न होता.

खेर यांच्या कामाच्या पद्धतींत बदल घडवायचा तर कॉंग्रेसमध्ये राहूनच आणि समर्थपणानं तो बदल घडवून आणतां येईल याची त्यांना खात्री होती. कारण बदल घडवावा या विचाराचे आमदार बहुसंख्येनं होते. या शक्तीचा विधायक मार्गानं उपयोग करतां येणं शक्य आहे, अशी खात्री ते देत होते. शंकरराव मोरे यांना ही भूमिका कांही अंशीं मान्यहि होती; परंतु मंत्रिमंडळांतील गुजराती मंत्री आणि गुजराती आमदार यांच्याबद्दल त्यांना विश्वास नव्हता. त्यामुळे यशवंतरावांची भावना मान्य असली तरी राजकारणांत केवळ सद्भावनेची कास धरूनच विचार करावा यासाठी त्यांचं मन तयार नव्हतं. मोरे यांचा स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास दांडगा, व्यासंग मोठा होता. कॉंग्रेसची सत्ता उच्च आणि बुरसटलेल्या, प्रतिगामी लोकांच्या हातांत केंद्रित झालेली आहे याचा ते अनुभव घेत होते; आणि त्यामुळेच अशा लोकांची संगत सोडून बहुजन-समाजाच्या कल्याणासाठी, बहुजन-समाजांतील नेत्यांनीच उठाव करून एकत्र आलं पाहिजे या विचाराशीं ते केंद्रित झाले होते. याउलट कॉंग्रेसच्या ध्येय-धोरणांत आणि प्रत्यक्ष कृतींत बदल घडवायचा तर बहुजन-समाजांतल्याच लोकांनी मोठ्या संख्येनं

काँग्रेसमध्ये प्रवेश करणं हाच उपाय आहे, असा यशवंतरावांचा दावा होता. खेर-मोरारजी-प्रणित विचाराला तिथे अवसरच रहाणार नाही अशी परिस्थिति निर्माण करायची तर लोकशाहीच्या मार्गानं तें घडवतां येईल, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

१९४८ च्या जानेवारींत म. गांधींचा वध झाला त्या वेळीं काँग्रेसचीं मंत्रिमंडळं निरनिराळ्या राज्यांत स्थापन झालीं होतीं. महाराष्ट्रांतील काँग्रेस-पक्ष त्यापूर्वी अभेद्य होता. श्री. केशवराव जेधे हे प्रांतिकचे अध्यक्ष होते. मुख्य मंत्री होते बाळासाहेब खेर. प्रांताध्यक्ष आणि मुख्य मंत्री हे दोघे एकविचाराचे असतील, तर पक्षाची संघटना मजबूत रहाते. दुर्दैवानं महाराष्ट्रांत या दोन प्रमुखांमध्ये मतभेद सुरू झाले होते. या परिस्थितीचा आणि महाराष्ट्रांतील एकूण काँग्रेस-संघटनेचा विचार करावा अशीच परिस्थिति त्या वेळीं निर्माण झाली होती. कारण शेतकरी-कामकरी पक्ष या नव्यानं जन्मास आलेल्या पक्षाकडे आणि समाजवादी पक्षाकडे, काँग्रेसमधील कांही प्रमुख नेते व कार्यकर्ते आकर्षिले गेले होते. काँग्रेसचं ऐक्य कायम रहायचं तर या दोन्ही पक्षांना शह देण्याचा विचार करणं जरूर होतं आणि याच प्रमुख उद्देशानं ३० मार्च १९४८ ला मुंबईला तांबे यांच्या आरोग्यभवनांत महाराष्ट्रांतील काँग्रेस-जनांची एक बैठक आयोजित करण्यांत आली. काँग्रेसचे आमदार व कार्यकर्ते मिळून सुमारे ७५ निमंत्रित या बैठकीला उपस्थित होते.

या बैठकींत महाराष्ट्र-काँग्रेसचा एक धोरणात्मक मसुदा मान्य करण्यांत आला. बैठकीच्या निमित्तानं जें पत्रक तयार करण्यांत आलं होतं त्यावर यशवंतराव चव्हाण, स्वामी सहजानंद भारती, बाबासाहेब शिंदे, वामनराव पाटील, बाबासाहेब घोरपडे, शि. रं. राणे, डॉ. कृ. भि. अंत्रोळीकर, अमृतराव रणखांबे इत्यादींच्या सह्या होत्या. यशवंतराव चव्हाण हे त्या वेळीं मुंबईत 'मरीन ड्राइव्ह' भागांत रहात होते. महाराष्ट्रांतील ज्या काँग्रेस-कार्यकर्त्यांना हें पत्रक मान्य असेल त्यांनी आपली मान्यता यशवंतरावांच्या पत्त्यावर कळवावी असंहि सुचवलं होतं. पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, पुणें, सातारा, कराड, सांगली, अहमदनगर, रत्नागिरी, सोलापूर, पंढरपूर, धुळें, मुंबई, अकलूज, जळगाव, नाशिक, पनवेल, ठाणें इत्यादि भागांतील कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित राहिले आणि त्यांनी या पत्रकावर मान्यतादर्शक सह्याहि केल्या.

ही बैठक आयोजित करण्यामागील पार्श्वभूमि लक्षांत घेतली, तर असं आढळतं की, म. गांधींच्या वधाची प्रतिक्रिया महाराष्ट्राच्या या भागांत तेव्हा अतिशय तीव्रतेनं उमटली होती. जातीयवादी व अराष्ट्रीय वृत्ति उफाळल्या होत्या. एकीकडे हिंदुसभा आणि रा. स्व. संघ या संस्थांनी वेगळ्या पद्धतीनं डोकं वर काढलं होतं आणि पुणें, सातारा, सांगली, मिरज इत्यादि भागांत म. गांधींच्या वधामुळे निर्माण झालेल्या प्रक्षोभाचा फायदा गुंडगिरी, अत्याचार यासाठी घेतला जात होता. बहुजन-समाजांत काँग्रेसची वाढलेली शक्ति खची करण्यासाठी शेतकरी-कामकरी पक्ष जातीयतेच्या आधारानं पुढे सरकण्याचा प्रयत्न करीत असतांना काँग्रेसमधल्याच कांही प्रमुख व्यक्ति

त्याला साहाय्य करत राहिल्या होत्या. वर्गीय व जातीय द्वेष जागृत करण्याचे प्रयत्न सर्रास सुरू होते.

महाराष्ट्रांतील कॉंग्रेस-संघटनेसमोर हें आव्हान उभं होतं तर पाकिस्तानच्या निर्मिती-मुळे हजारो निर्वासितांची व्यवस्था करण्याचा नव्यानं स्वतंत्र झालेल्या भारतासमोर प्रश्न उभा होता. काश्मीरचा प्रश्न भेडसावत होता, तर हैदराबादच्या प्रश्नाची वेगळीच डोकें-दुखी सुरू होऊं पहात होती. राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि अन्नविषयक प्रश्नांची सोडवणूक कशी करावी या विवंचनेंत कॉंग्रेस वर्किंग कमिटी आणि भारत सरकार गुंतलेलीं असतांनाच म. गांधींचा वध झाला होता. या साऱ्या पार्श्वभूमीवर तांबे-भवना-मधील बैठक झाली. या सर्व प्रश्नांचा विचार तर करायचा होताच, पण प्रमुख प्रश्न होता शेतकरी-कामकरी पक्षाच्या आव्हानाचा! कॉंग्रेसचं खच्चीकरण होऊं घातलं होतं आणि तें आव्हान यशवंतरावांनी पुढे होऊन स्वीकारलं होतं.

तांबे-भवनामधील बैठकींत ज्या पत्रकावर विचार करण्यांत आला आणि धोरणावर शिक्कामोर्तब करण्यांत आलं त्यांत असं नमूद करण्यांत आलं होतं– "सत्तासंक्रमणानंतर जनतेच्या आशा-आकांक्षा वाढतात, वाढवल्या जातात. त्या फलद्रूप होण्यासाठी कॉंग्रेस-पक्ष सामर्थ्यवान् व शिस्तबद्ध बनणं हाच एक उपाय आहे. कॉंग्रेसला शेतकरी व कामकरी यांचं राज्य स्थापायचं आहे; भांडवलशाही वृत्तीचा बीमोड करून शोषणरहित समाज निर्माण करायचा आहे. हे बदल चुटकीसरशी होणं शक्य नाही व दांडगाईनं करणं इष्ट नाही. देशांतील उत्पादन वाढवल्याशिवाय, देश स्वावलंबी व स्वयंपूर्ण होणार नाही, अशी म. गांधींची आदर्श स्वराज्याची कल्पना होती. आमची संस्कृति, नीतिमत्ता आणि जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन हा विशिष्ट प्रकारचा आहे. स्वातंत्र्य हें नुसत्या भौतिक शक्तीवर उभारतां येत नाही, टिकवतां येत नाही, जनतेच्या नैतिक शक्तीवरच स्वातंत्र्य टिकवतां येतं. म्हणून आदर्श लोकशाहीप्रधान सत्तेमार्फत राजकारणांत, समाजकारणांत अगर अर्थकारणांत जे जे बदल घडवून आणायचे आहेत, ते कॉंग्रेसला आपल्या प्रवृत्तीला अनुसरूनच आणायचे आहेत. याच पद्धतीनं घडलेले बदल हे चिरस्थायी होतील व राष्ट्राची शक्ति वाढवतील.

देशांत निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या फुटीर प्रवृत्तींना आपण आपल्या तात्त्विक भूमिकेवरून विरोध केला पाहिजे व या प्रसंगीं धैर्यानं, प्रसंगीं निश्चयानं व आत्म-विश्वासानं पुढे पाऊल टाकलं पाहिजे. कोणत्याहि कारणानं आपण कॉंग्रेसला व आपल्या सरकारला कमजोर होण्यास प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष मदत करूं, तर आपण आपलं स्वातंत्र्य धोक्यांत आणूं. म्हणून जातीयतेचं उच्चाटन करण्याकरिता, आर्थिक समता स्थापन करण्याकरिता व उत्पादन वाढवण्याकरिता कॉंग्रेस-संघटना मजबूत केली पाहिजे, सरकारच्यामागे जनशक्ति उभी केली पाहिजे. महाराष्ट्रांत बुद्धिभेद करण्याचे जे निर-निराळे प्रयत्न चालू आहेत त्यांपासून जनतेनं सावध राहिलं पाहिजे. कारण हे प्रयत्न देशाचा घात केल्याशिवाय रहाणार नाहींत.

महाराष्ट्रांत कुणी अराजक माजवण्याचा, बेशिस्त वर्तन करण्याचा, जातिभेद अगर वर्णद्वेष फुलवण्याचा प्रयत्न केला, तर त्याला उघडपणानं विरोध करण्याची वेळ आता आली आहे. महाराष्ट्रांतील कुठल्याहि पक्षोपपक्षांशीं द्वेष-बुद्धीनं अगर वैरभावानं वागण्याचा कॉंग्रेसचा केव्हाहि हेतु नव्हता व नाही. कॉंग्रेसशीं निष्ठावंत राहून कॉंग्रेसच्या शिस्तीप्रमाणे कॉंग्रेस-जनांनी वागावं असं आमचं आवाहन आहे. कॉंग्रेसबद्दल ते अनुदारपणा, अप्रीति निर्माण करतील अगर बाहेरून किंवा आंतून कॉंग्रेस-संघटना दुर्बल करण्याचा प्रयत्न करतील त्यांच्या प्रयत्नांना विरोध करणं हें हिंदी स्वातंत्र्याच्या दृष्टीनं आमचं कर्तव्य होईल."

तांबे-भवनांतील ही सभा त्या काळांत चांगलीच गाजली. या पत्रकावर ज्यांच्या सह्या होत्या ते सारे महाराष्ट्रांतील वजनदार कॉंग्रेस-कार्यकर्ते होते. ही सभा आणि पत्रक पाहून केशवराव जेधे बरेच रागावले. शेतकरी-कामकरी पक्षाशीं त्यांची आंतून जवळीक झालेली होतीच; पुढे तर त्यांनी प्रांतिकच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि शेतकरी-कामकरी पक्षांत उघडपणें ते दाखल झाले. कॉंग्रेस-संघटनेच्या प्रमुख प्रवाहापासून फुटून बाहेर निघण्यास यशवंतरावांनी भाऊसाहेब राऊत यांच्या निवास-स्थानीं झालेल्या बैठकींत एकाकी विरोध केला होताच; या बैठकीनं त्यांनी आपल्या विचाराच्या साथीदारांची एक भक्कम फळी महाराष्ट्रांत कॉंग्रेस-अंतर्गत उभी केली आणि पुढच्या काळात शेतकरी-कामकरी पक्षाबरोबर जाहीरपणानं सामना दिला, कॉंग्रेस-संघटने-विषयीचं इमान त्यांच्या ठिकाणीं कसं उत्कटतेनं वसत होतं याचा पडताळा त्या काळांत या निमित्तानं येऊन गेला.

त्या काळांत महाराष्ट्रांत कॉंग्रेस तरली ती यशवंतरावांच्या विधायक विचारामुळेच तरली हा इतिहास आहे. मोरे यांच्या आवाहनाप्रमाणे, यच्चयावत् बहुजन-समाजानं कॉंग्रेसशीं काडीमोड घेतली असती, तर कुणी सांगावं, कदाचित् महाराष्ट्राच्या समाज-मनांतून तेव्हाच कॉंग्रेस उखडली गेली असती! ग्रामीण भागांतल्या, बहुजन-समाजांतल्या सुशिक्षितांना ती किमया करून दाखवतां येणं शक्यहि होतं; पण कॉंग्रेसच्या, देशाच्या भल्यासाठी असं कांही घडूं नये असाच संकेत असावा. नव्या पक्षांत सामील होऊन या पक्षाचा प्रमुख बनण्याची संधि यशवंतरावांच्या राजकीय आयुष्यांत नियतीनं हिसका-वून घेतली ती त्यामुळेच! यशवंतराव यांचा मूलगामी विचार कसा वास्तव होता, हें पुढच्या काळांत म्हणजे १९६० मध्ये, शेतकरी-कामकरी पक्षांतले बहुसंख्य कार्यकर्ते जेव्हा चव्हाणांच्या नेतृत्वाखाली भराभर कॉंग्रेसमध्ये दाखल झाले त्या वेळीं सिद्ध झालं.

यशवंतरावांना वगळून १९४९ च्या दरम्यान महाराष्ट्रांत शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना म्हणजे येथील कॉंग्रेस-पक्षाला आव्हान ठरलं. बहुजन-समाजांतले मुरब्बी नेते बाजूला गेले. मोरे-जेधे आदींनी रागावून कॉंग्रेसचा त्याग केला. महाराष्ट्र-कॉंग्रेसचे नेते शंकरराव देव हे त्या वेळीं दिल्लींत घटना-समितीच्या कामांत मग्न होते. दुसरे नेते

काकासाहेब गाडगीळ हे केंद्रीय मंत्री या नात्यानं दिल्लींतच होते. दत्ता देशमुख, मोरे, जेधे, तुळशीदास जाधव, र. के. खाडिलकर हे सारे एक झाले आणि या सर्वांनी काँग्रेसला आव्हान दिलं. मोरारजीभाई आणि दत्ता देशमुख यांच्यामध्ये पुढे कांही चर्चा झाल्या, परंतु मोरारजीभाई यांनी दत्ता देशमुख यांना साथ दिली नाही. उलट त्यांना दुखवलं. त्यामुळे रागावून ते कम्युनिस्ट पक्षांत दाखल झाले. नाना पाटीलहि त्यांनाच येऊन मिळाले. अशी सर्वत्र फाटाफूट निर्माण झाली.

शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना होतांच मराठा-समाजांतली कुलवंत मंडळी या पक्षाच्या आश्रयाला गेली. यशवंतराव चव्हाण यांना आणि त्यांच्या काँग्रेस-पक्षाला हें आव्हान मिळतांच त्यांनीहि काँग्रेस पक्षाला सावरण्याची जय्यत तयारी सुरू केली. काँग्रेस-पक्षाला निश्चित असं रूप देण्याच्या दृष्टीनं त्यांना साधनं उपलब्ध होतीं. विचार पक्का होता. त्यांना पाठिंबा देणारे कार्यकर्ते होते. त्या साधन-सामग्रीच्या आधारानं यशवंतरावांनी मग संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करून जनतेला वस्तुस्थिति समजावून सांगण्याचं काम सुरू केलं. जिल्ह्या-जिल्ह्यांतले प्रश्न उभे करून विधानसभेंत ते प्रश्न सादर करूं लागले. निरनिराळ्या जिल्ह्याच्या राजकारणाशीं, तेथील प्रश्नांशीं त्यांचा सतत संपर्क होतांच, त्याचा या दौऱ्यांत त्यांना फायदा घेतां आला.

शेतकरी-कामकरी पक्षाचा प्रयत्न सर्व शेतकरीवर्गाला आणि त्याच्याहि खालच्या कामकरी वर्गाला संघटित करण्याचा होता. अशी संघटना तयार करणं हीच त्यांची शक्ति होती. बहुजन-समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी या शक्तीला संघटित करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शंकरराव मोरे यांनी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केलेला असल्यानं त्यांना कष्टकरी समाजाची संघटना बांधण्याची कल्पना सुचली. ग्रामीण भागांतल्या शेतकऱ्यांची आणि कष्टकऱ्यांची संघटना तयार केल्यानं त्यांच्या समस्यांना संघटनेमार्फत वाचा फोडतां येणं शक्य होतं; परंतु त्या वर्गाची परिस्थिति प्रत्यक्षांत सुधारायची, त्यांना वेगळ्या जीवनाच्या आनंदाची अनुभूति मिळवून द्यायची, तर ज्यामुळे हा बदल घडून येईल अशा विधायक मार्गाचा अवलंब करणं आवश्यक ठरतं. काँग्रेस-पक्षाजवळ तो मार्ग होता. तो दृष्टिकोन होता. त्याची अंमलबजावणी होण्यासाठी सर्वांनी एकत्र रहाण्याची आणि तें घडवण्याची जरुरी होती. जिल्ह्या-जिल्ह्यांतून दौरा करतांना यशवंतरावांनी जनतेला त्यासाठी आवाहन केलं. चव्हाण, कुंटे आणि त्यांचा कार्यकर्त्यांचा ताफा यांनी सर्व मुंबई राज्यांत त्या वेळीं हिंडून काँग्रेसची भूमिका लोकांपर्यंत पोंचविली आणि त्याचा इष्ट परिणाम घडून आला.

१९५२ च्या, भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकींत महाराष्ट्रांत काँग्रेस विरुद्ध शेतकरी-कामकरी पक्ष असा निकाराचा सामना होऊनहि त्यामध्ये जेधे-मोरे यांचा नवा पक्ष भुईसपाट झाला तो त्यामुळेच होय. डाव्या विचाराच्या सर्व शक्तींनी काँग्रेसमध्ये मोकळेपणानं दाखल होऊन, हितसंबंधी प्रवृत्तीच्या लोकांना धडा शिकवावा हें यशवंतरावांचं आवाहन त्या वेळेपासूनचं आहे. शेतकरी-कामकरी पक्षाच्या नेत्यांना त्या वेळीं

हें उमजलं नाही. जेधे, मोरे, तुळशीदास जाधव, खाडिलकर यांना कालांतरानं उमजलं आणि ते सर्वजण कॉंग्रेसमध्ये दाखलहि झाले. नंतरच्या काळांतहि या पक्षाला सर्व शेतकरी आणि कष्टकरी वर्गाला संघटित करण्यांत यश कधी आलं नाही. शेतकऱ्यांचं नांव पुढे करून जरी या पक्षाला जन्माला घालण्यांत आलं होतं तरी मराठा समाजांतील कुळाचं श्रेष्ठत्व मानणाऱ्यांच्या हातांतच पक्षाचीं सूत्रं राहिलीं आणि ग्रामीण भागांतला बहुसंख्य कुणबी-समाज, माळी-समाज, लोहार-कुंभार, शिंपी आदि बलुतेदार हा वर्ग या पक्षाच्या आश्रयाला बहुसंख्येनं आला नाही. बहुजन-समाजांतल्याच भिन्न भिन्न जातींमध्ये एकोपा साधण्याचं कामहि या पक्षाला करतां आलं नाही. तरी पण राजकीयदृष्ट्या या सर्वांची भक्कम संघटना उभारण्याची आशा हा पक्ष बाळगून राहिला. ध्येय-धोरणाच्या बाबतींत तारेवरची कसरत करत राहिल्यानं ग्रामीण भागांतल्या प्रतिष्ठितांचंहि धड प्रतिनिधित्व नाही आणि उठावदारपणें सामान्य शेतकरी-कामकऱ्यांचंहि प्रतिनिधित्व नाही अशा स्थितींत हा पक्ष चाचपडत राहिला. बदलत्या परिस्थितींत जातीयवादाचं बोट धरून वाटचाल करणं राजकीय पक्षांना अशक्य ठरतांच हा पक्ष दिवसेंदिवस अशक्त बनत राहिला.

या पक्षाचे प्रमुख शंकरराव मोरे यांनी नंतरच्या काळांत, पक्षाच्या अधिवेशनांत जो एक प्रबंध सादर केला आणि दाभाडीचा प्रबंध म्हणून जो प्रसिद्धि पावला या प्रबंधांतील विचारानं तर पक्षाच्या चिरफळ्या उडाल्या. मोरे आणि त्यांचे सहकारी जेधे यांच्यांतच पुढे कलागत सुरू झाली आणि परिणामीं जेधे यांनी आपला पक्षाचा पाठिंबा आस्ते कदम काढून घेण्यास प्रारंभ करतांच पक्ष घसरणीला लागला. तरी पण ही परिस्थिति निर्माण होईपर्यंत शेतकरी-कामकरी पक्षानं कॉंग्रेसला शर्थीनं विरोध करण्याचं काम केलं ही वस्तुस्थिति मान्य करावी लागेल.

सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळावा ही या पक्षाची भूमिका रास्तच होती. ज्या ध्येयासाठी कॉंग्रेस लढली त्याचं प्रतिबिंब स्वातंत्र्यानंतर सुरू झालेल्या महाराष्ट्राच्या राजवटींत उमटत नव्हतं आणि त्यामुळे कार्यकर्ते अस्वस्थ बनणं स्वाभाविकच होतं. समाजवादी विचाराची मंडळी अगोदरच कॉंग्रेसबाहेर गेलेली होती आणि उर्वरित कॉंग्रेस-नेत्यांमधले बहुजन-समाजांतील प्रमुख पुढारीहि आता कॉंग्रेसबाहेर गेल्यानं त्या काळांत महाराष्ट्र-कॉंग्रेस दुबळी बनली होती. यशवंतराव हे त्या वेळीं महाराष्ट्र-कॉंग्रेसचे चिटणीस होते. त्यांना जनतेसमोर जाऊन कॉंग्रेसची बाजू भक्कम करायची होती, पण ग्रामीण भागांतून निर्माण झालेल्या नेतृत्वाचा प्रत्यक्ष मंत्रिमंडळांत समावेश झाल्याखेरीज जनतेला न्याय मिळणार नाही, समाज-कल्याण खऱ्या अर्थानं साध्य करतां येणार नाही, ही भावना समाजांत निर्माण झाली होती. त्याला यशवंतरावांजवळ बिनतोड उत्तर नव्हतं; पण तरीहि त्यांनी जिद्द सोडली नाही. महाराष्ट्रभर ते हिंडले आणि लोकांच्या मनांतल्या कॉंग्रेसविषयीच्या भावनेला तडा जाऊं नये यासाठी शर्थीचे प्रयत्न केले.

भारतीय घटनेनुसार पाहिल्या सार्वत्रिक निवडणुका १९५२ सालांत झाल्या. तोंपर्यंत शे. का. पक्षानं निवडणुकींत काँग्रेसशीं टक्कर देण्याची तयारी केली होती. काँग्रेसच्या बाजूनं चव्हाण, भाऊसाहेब हिरे आणि काकासाहेब गाडगीळ मोर्चे बांधून उभे होते. उलटसुलट विचारांनी सारा महाराष्ट्र त्या वेळीं ढवळून निघाला. शे. का. पक्षाची सारी मदार बहुजन-समाजाच्या मतांवर होती. चव्हाण-हिरे यांनी आपसांत प्रचाराची विभागणी करून घेतली. भाऊसाहेब हिरे हे इनामदार, वतनदार, कुलवान, श्रीमंत शेतकऱ्यांना जवळचे. त्यांनी त्या वर्गांत खिंडार पाडलं. त्यांचा प्रचार हा धोपटमार्गी होता. यशवंतरावांनी सर्वसामान्य जनतेला, काँग्रेसचं ध्येय, लोकशाही समाजवादाचं काँग्रेसचं धोरण, पं. नेहरूंच्या विचारसरणीचा अर्थ आणि लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्यासाठी ते करत असलेले प्रयत्न याची माहिती देऊन सामाजिक आणि आर्थिक न्याय काँग्रेसच प्रस्थापित करूं शकते, हें जनतेला पटवण्यांत यश मिळवलं. गाडगीळ यांचा प्रचार हा मध्यमवर्ग आणि बहुजन-समाज या दोघांनाहि बरोबर घेऊन जाणारा होता. या सर्वांच्या प्रचाराचा अतिशय अनुकूल परिणाम होऊन १९५२ च्या निवडणुकींत काँग्रेस प्रचंड बहुमतानं विजयी झाली. काँग्रेसला सत्तेवर राहूं द्यायचं नाही हें जेधे-मोरे यांचं स्वप्न धुळीला मिळालं. या निवडणुकीस बाळासाहेब खेर उभे राहिले नाहीत. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालाबरोबर खेरांची राजवट संपली आणि खऱ्या अर्थानं मोरारजी-राजवट सुरू झाली.

मोरारजींनी मंत्रिमंडळांत आल्यया यशवंतराव चव्हाण आणि भाऊसाहेब हिरे या दोघांनाहि सामावून घेतलं. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचं अध्यक्षपदहि या काळांत हिरे यांच्याकडेच आलं. चव्हाण यांच्याकडे नागरी-पुरवठा, समाज-कल्याण आणि जंगल हीं खातीं मोरारजींनी सोपविलीं आणि हिरे हे महसूलमंत्री बनले.

मंत्रिमंडळाच्या बनावटीच्या वेळीं कटुता निर्माण करणारी एक घटना घडली होती. मोरारजी यांनी सातारा जिल्ह्यापैकी मालोजीराजे नाईक-निंबाळकर आणि गणपतराव तपासे यांचा मंत्रिमंडळांत समावेश केला होता; परंतु त्यांचा समावेश करतांना प्रांतिक काँग्रेसला मोरारजींनी विश्वासांत घेतलं नाही किंवा कांही सल्लामसलतहि केली नाही. भाऊसाहेब हिरे यांना यामुळे आपला अवमान झाल्यासारखं वाटलं आणि हा प्रश्न धसास लावण्याच्या निर्णयापर्यंत ते पोंचले. परंतु यशवंतरावांनी दूरदृष्टीनं हिरे यांना त्यापासून परावृत्त करण्यांत यश मिळवलं. प्रांतिक काँग्रेसशीं सल्लामसलत अशा वेळीं करणं आवश्यक असलं तरीहि, मोरारजींना एकदा नेता म्हणून निवडल्यानंतर, मंत्रिमंडळाचा संच कसा असावा हें ठरवण्याचा आणि तशी निवड करण्याचा अधिकार त्यांना आहे, असं यशवंतरावांचं मत होतं. प्रांतिकनं सल्ला द्यावा, पण दबाव आणणं योग्य नव्हे अशी त्यांची भूमिका असल्यानं मंत्रिमंडळाच्या निर्मितींतून निर्माण झालेली कटुता त्यांनी वाढूं दिली नाही.

पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून यशवंतरावांनी राज्यकारभाराचा अनुभव मिळवला होताच. प्रत्यक्ष मंत्रिपद स्वतःकडे आल्यानंतर त्यांना या अनुभवाचा लाभ घेतां आला. मंत्री या नात्यानं काम करतांना यशवंतरावांच्या स्वभावाचं एक आगळं दर्शन लोकांना घडलं. इतकंच नव्हे तर, त्यांच्या अखत्यारींतल्या खात्यांतील सरकारी श्रेष्ठ आणि कनिष्ठ नोकरांनाहि त्यांच्या विशिष्ट स्वभावाची प्रचीति आली. आपल्या मनाचा थांग-पत्ता लागू न देतां काम करत रहाण्याची कला चव्हाणांनी आत्मसात केलेली असल्यानं कुणाचा पाणउतारा न करतां किंवा कुणाला प्रमाणापेक्षा अधिक महत्त्व न देतां सर्वांकडून काम करून घ्यायचं आणि कारभाराच्या मुख्य सूत्रापासून कुणी बाजूला जाणार नाही यासाठीहि जागरुकता ठेवायची या नैपुण्यामुळे त्यांनी सर्वांच्या मनांत आदराचं आणि आदरयुक्त भीतीचं स्थान निर्माण केलं. खात्यांतल्या कारभाराच्या लहानसहान गोष्टी आणि त्यांचे संदर्भ आपल्यापर्यंत सातत्यानं येत रहातील अशीच त्यांची कामाची, बोलण्याची किंवा माणसांचा वापर करण्याची पद्धत असे. या त्यांच्या स्वभावामुळे व अंगभूत गुणांमुळे ते स्वतः यशस्वी शासक तर ठरलेच शिवाय त्यांच्या खात्यांचा कारभार सुरळीत, सुबक आणि नीटनेटका होत असल्याचंहि प्रत्ययास आलं.

चव्हाण हे अधिकाऱ्यांच्या कामांत अकारण हस्तक्षेप करणारे मंत्री नव्हते. त्यांच्यावर विश्वासून काम करण्याची त्यांची पद्धत असे. परिणामीं अधिकाऱ्यांच्या ठिकाणीं त्यांच्याविषयी विश्वासाची भावना निर्माण झाली. चांगल्या कामाबद्दल शाबासकी देण्यासाठी त्यांनी कधी कुचराई केली नाही किंवा जरब बसावी म्हणून शिक्षा करण्याची घाईहि कधी केली नाही. परस्पर-आदराचे संबंध यामुळे कायम राहिले. मंत्रिमंडळांतल्या अन्य सहकाऱ्यांशींहि त्यांनी आपले संबंध स्नेहपूर्ण असेच ठेवले. राजकारणांत सदासर्वकाळ कठोर भूमिका लाभदायक ठरत नाही; त्याचप्रमाणे शासकीय काम करतांना लोकांच्या अडीअडचणी, तक्रारी यांबाबत सतत नकारघंटा वाजवूनहि चालत नाही. एखाद्या कामाबद्दल किंवा एखाद्याला साहाय्य करण्याबद्दल नकार देण्यांतच कित्येक मंत्री किंवा अधिकारी आपला मोठेपणा मानतात. चव्हाणांचा स्वभाव असा की, आडमुठेपणानं आणि मोठेपणाच्या भलत्याच हव्यासानं ते चुकूनहि कडवटपणानं कुणाशीं बोलणार नाहीत किंवा तुसडेपणानं वागणार नाहीत. त्यांच्या या स्वभावामुळे आणि राज्यकारभारांतील चोखपणामुळे ते मोरारजींच्या विश्वासास पात्र ठरले आणि त्या दोघांमध्ये अधिक सलोखा निर्माण झाला.

या संदर्भात भाऊसाहेब हिरे आणि चव्हाण यांच्यासंबंधी त्या काळामध्ये नकळत चर्चा सुरू राहिली. चव्हाण आणि हिरे यांचे स्वभाव अगदी विरुद्ध टोकाचे होते. हिरे यांचा स्वभाव कांहीसा संशयी आणि ताबडतोब मत बनवणारा, अफवांवर विश्वास ठेवणारा असा होता. हाताखालच्या लोकांच्या कामांत हस्तक्षेप करण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे कामांत गोंधळ निर्माण होत असे. स्वतःच्या प्रतिष्ठेबद्दल त्यांच्या कांही विशिष्ट कल्पना होत्या. त्यामुळे त्यांच्या वागणुकींतून लोकांचीं मनं दुखावलीं जात असत. मोरारजींचं या

सर्वांकडे लक्ष होतं. त्यांच्या गुप्त यंत्रणेद्वारा हें सर्व त्यांच्यापर्यंत पोंचत असें. त्यामुळे त्या दोघांमधील अंतर सतत वाढत राहिलं. चव्हाणांची जवळीक आणि हिरे यांच्या संबंधांतील नाराजी यांबाबतहि मग कांही वावड्या उडूं लागल्या आणि हिरे यांच्या नेतृत्वाला कमीपणा आणण्याचा हा एक डाव आहे, असे आरोपहि केले जाऊं लागले. सत्यस्थिति वेगळीच होती. हिरे यांचं नेतृत्व वाढावं अशी ज्यांची भावना होती त्यांनी हिरे यांना सावरलं असतं किंवा त्यांच्या स्वभावांत बदल घडेल असा सल्ला दिला असता, तर ते पुढच्या काळांत नेते झालेहि असते. पण तसं न घडतां मोरारजी, चव्हाण यांना दोष चिकटवण्यांतच कांहींनी इतिकर्तव्यता मानली.

भाऊसाहेबांनी आपलं व्यक्तिमत्त्व राजकीय आणि सामाजिकदृष्ट्या फार मोठं संपन्न बनवलेलं नसलं तरी त्यांनी शिक्षणक्षेत्रांत केलेल्या मोठ्या कार्याची पुण्याई त्यांच्या पाठीशीं होती. बहुजन-समाजांतल्या गरिबांच्या मुलांना शिक्षणाचं क्षेत्र उपलब्ध करून देण्याचं कार्य ते प्रामाणिकपणें करत होते. राजकारणी मुत्सद्दी म्हणून लोकांसमोर त्यांची प्रतिमा विशेषत्वानं उभी नव्हती आणि विवेकानं वर्तावं अशीहि त्यांची वागणूकहि घडत नव्हती. शत्रुत्वाचं कडं आपणच आपल्या कृतीनं स्वतःभोंवतीं उभं करावं असं त्यांच्या बाबतींत घडत राहिलं आणि याचा परिणाम पुढे नेता निवडण्याच्या वेळीं त्यांना अनुभवावा लागला.

मोरारजींचं मंत्रिमंडळ तसं संघटितपणें काम करत होतं. गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटक या भागांतल्या आमदारांमध्ये एकोपा नांदत होता. राज्याची सर्व बाजूंनी प्रगति होत राहिली होती. दोन-तीन वर्षं राज्यकारभाराचा गाडा असा सुरळीत चालला असतांनाच भाषिक राज्य-पुनर्रचनेचे वारे वाहूं लागले आणि फाजलअली-कमिशनचा त्या संबंधांतील अहवाल प्रसिद्ध झाला. १९५५ च्या ऑक्टोबरमध्ये हा अहवाल प्रसिद्ध झाला आणि महाराष्ट्राची सारी घडीच पुढच्या काळांत विसकटली.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा हा प्रारंभकाळ! १९५५ मध्ये फाजलअली-कमिशनचा अहवाल जाहीर झाला. तेव्हापासून तो पुढे संयुक्त महाराष्ट्र प्रत्यक्ष अस्तित्वांत येईपर्यंतच्या पांच-सहा वर्षांच्या काळांत यशवंतरावांच्या कर्तृत्वाची, बुद्धिमत्तेची, मुत्सद्दीपणाची सर्वांगानं कसोटी लागून गेली. संशय, गैरसमज, विश्वासघात, मतलबी टीका, शह-काटशह इत्यादींचे घाव त्यांना अंगावर झेलावे लागले. या आंदोलनाच्या काळांत महाराष्ट्राला लाभलेलं त्यांचं नेतृत्व सर्व प्रकारच्या राजकीय कसोट्यांतून तावून-सुलाखून निघालं.

# ९

भाषावार प्रांतरचनेचं तत्त्व काँग्रेसनं १९२० सालींच मान्य केलेलं तत्त्व असलं तरी राज्य-पुनर्रचनेचा प्रश्न भारत स्वतंत्र झाल्या-नंतर हातीं घ्यावा असा विचार प्रथम पुढे आला होता. त्यानुसार १९४७ च्या १५ ऑगस्टला भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्या प्रश्नाला चालना मिळत राहिली. परंतु त्यापूर्वी म्हणजे १९४६ मध्येच महाराष्ट्रांत या प्रश्नाची चर्चा सुरू झाली होती.

१९४६ मध्ये बेळगावला साहित्य-संमेलनाचं अधिवेशन झालं. ग. त्र्यं. माडखोलकर हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली संमेलनांत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव करण्यांत आला. त्यानंतर पुढे थोड्याच दिवसांत मुंबईला महाराष्ट्र-परिषद झाली आणि या परिषदेंत 'मुंबईसह महाराष्ट्र' असा ठराव झाला. भारताचं स्वातंत्र्य जवळ आल्याचा हा काळ. ॲटलीसाहेबांची योजना जाहीर झाली होती. माऊंटबॅटन भारतांत पोंचले होते व ब्रिटिशांनी सत्तान्तर केव्हा करायचं याचा मुहूर्त ठरत होता. घटना अतिशय वेगानं घडत होत्या. हिंदुस्थानची फाळणी होणार म्हणून हिंदु जनता बेचैन झाली होती. अशा परिस्थितींत भाषावार प्रांतरचनेकडे पहाण्यास कुणासच फुरसत नव्हती. पण १९४७ च्या १५ ऑगस्टला दुभंगलेल्या अवस्थेंत भारत स्वतंत्र झाला आणि त्याच वर्षाच्या जून महिन्यानंतर राज्य-पुनर्रचनेच्या प्रश्नानं उचल खाल्ली.

घटना-समितीचं काम त्या वेळीं सुरू झालं होतं. पट्टाभिसीतारामय्या हे प्रांत-रचनेच्या संदर्भात आंध्रचा प्रश्न उपस्थित करूं लागले होते. आंध्रांतील वृत्तपत्रांनी तर त्यासाठी जोरदार प्रचार-आघाडी उघडली होती. राज्य-पुनर्रचनेच्या प्रश्नाचा विचार करायचा आणि तो प्रश्न सोडवायचा, तर त्याची पूर्व-तयारी करावी लागणार होती. त्यासाठी आकडेवारी जमा करून तत्त्वहि निश्चित करावं लागणार होतं.

सरदार पटेल यांचं मत राज्य-पुनर्रचनेच्या प्रश्नाचा विचार आणखी कांही काळा-नंतर करावा असं होतं. स्वातंत्र्य नुकतंच मिळालेलं होतं आणि तें अजून स्थिर व्हायचं काम शिल्लक होतं. अशा स्थितींत गोंधळ निर्माण करणारा राज्य-पुनर्रचनेचा प्रश्न पुढे ढकलणंच योग्य, असा त्यांचा सल्ला होता. त्याचबरोबर हा प्रश्न लांबवणं धोक्याचं ठरेल असा विचार व्यक्त करणारेहि काँग्रेसमध्ये होते. विशेषतः काकासाहेब गाडगीळ यांनी सरदारांना आपला हा विचार कथन केला. या चर्चा सुरू असतांनाच राज्य-पुनर्रचना कोणत्या तत्त्वावर करावी हें ठरवण्यासाठी श्री. दार या काश्मिरी न्यायाधिशांचं एक कमिशन नियुक्त करण्यांत आलं. नेहरू व वल्लभभाई पटेल यांनीच या न्यायाधिशांची नेमणूक केली. या दार-कमिशननं अनेकांच्या साक्षी घेतल्या, कांही तत्त्वं ठरवलीं, पण हा प्रश्न तूर्त तहकूब करावा, असं मत त्यांनी दिलं.

या मतासंबंधी उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होऊं लागल्या असतांनाच राज्य-पुनर्रचनेच्या संदर्भात तावडतोब निर्णय करावा असं मत महाराष्ट्रांतील नेते शंकरराव देव आणि आंध्रचे नेते पट्टाभिसीतारामय्या यांनी व्यक्त केलं; परंतु हा प्रश्न ज्येष्ठ नेत्यांनी लोंबकळत ठेवला. पुढच्या वर्षी मग जयपूर काँग्रेस-अधिवेशनांत या प्रश्नानं पुन्हा उचल खाल्ली तेव्हां आणखी एक त्रि-सदस्य-समिति जन्माला आली. या समितींत नेहरू, पटेल आणि जोडीला पट्टाभिसीतारामय्या हे होते. या तिघांनीच बसून एक निष्कर्ष काढला. महाराष्ट्राला स्वतंत्र प्रांत मिळेल, पण तो मुंबई व्यतिरिक्त असेल, मद्रास वगळून आंध्र प्रांत तयार होईल आणि कर्नाटकाला प्रांत मिळेल, पण तो नंतर केव्हा तरी, असा या तिघांचा रिपोर्ट तयार झाला. मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळी काढण्याचं विष याच वेळीं पेरलं गेलं आणि पुढच्या काळांत त्यांत भर टाकली गेली. महाराष्ट्रांतल्या कांही पुढाऱ्यांनी आणि विशेषतः गुजराती बंधूंनी पुढच्या काळांत हें विष जालीम ठरण्यास मदत केली, हा इतिहास आहे.

१९४८ च्या जयपूर काँग्रेसनंतर ही त्रि-सदस्य-समिति स्थापन होऊन रिपोर्ट तयार झालेला असला, तरी पुढे दोन वर्षं प्रत्यक्ष राज्य-पुनर्रचनेच्या प्रश्नाबाबत फक्त चर्चा होत राहिली. प्रश्न मुंबई आणि आंध्र यासंबंधाचाच होता. केंद्रीय मंत्रिमंडळांतहि चर्चा घडत होत्या, पण निश्चित निर्णय जाहीर करण्याचं नेत्यांनी टाळलं. हा साराच प्रश्न तूर्त तहकूब करावा इथपासून, मुंबई ही स्वतंत्र राहील असा निर्णय करावा आणि बाकीचा प्रश्न तहकूब ठेवावा इथपर्यंत, या चर्चेतून सूर उमटत राहिले.

मुंबईचं वैभव गुजराती मंडळींनी वाढवलं आणि शिल्लक ठेवलं हा सरदार पटेल यांचा दावा होता. बहुसंख्येच्या जोरावर मुंबईची मालकी महाराष्ट्राकडे देण्यास गुजराती मंडळींचं मन तयार नव्हतं. त्याच दृष्टीनं डावाची आखणी त्यांनी सुरू केली. राज्य-कारभाराच्या दृष्टीनं प्रांत-रचना करण्यास काँग्रेस वचनबद्ध असतांनाहि मुंबईचा समावेश महाराष्ट्रांत करण्याचा प्रश्न प्रतिष्ठेचा बनवला गेला होता, पण या बाबतींत कोणतीहि

तडजोड स्वीकारण्याची महाराष्ट्रांतील नेत्यांची तयारी नव्हती. त्यामुळे हा प्रश्न चर्चेंत गुरफटत आणि चिघळत राहिला.

या चर्चा सुरू असतांनाच महाराष्ट्र आणि गुजरात यांनी एकत्र रहावं असं पटेलांनी महाराष्ट्रांतील नेत्यांना पटवण्यास सुरुवात केली. कांही झालं तरी मुंबई ही गुजरात्यांच्या हातांतून सुटूं नये हाच त्यामागील स्पष्ट हेतु होता. संयुक्त महाराष्ट्र राज्याची इच्छा बाळगून असलेले महाराष्ट्रांतील नेते सरदारांच्या या योजनेस अनुकूल असणं शक्यच नव्हतं. तरी पण सरदार आपला हेतु पुढे रेटण्याचा प्रयत्न करत राहिले. परंतु १९५० च्या अखेरीस त्यांच्यावर मृत्यूनं घाला घातला आणि त्यांनी पुढे केलेला पर्याय सिद्ध झाल्याचं त्यांना पहातां आलं नाही.

राज्य-पुनर्रचनेच्या प्रश्नाला १९५२ सालीं झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या धामधुमींत खरं स्वरूप प्राप्त झालं. हा प्रश्न बोलका ठरला. २६ जानेवारी १९५० ला भारताची राज्यघटना अस्तित्वांत आली आणि त्यानुसार झालेल्या भारतांतल्या पहिल्या निवडणुका पार पडल्या. निवडणूकप्रचारामध्ये कोणत्याहि पक्षानं या प्रश्नाचं भांडवल जरी केलं नव्हतं, तरी या निवडणुकीनंतर मात्र महाराष्ट्रांत तो प्रश्न तीव्र बनूं लागला. या निवडणुकींत आंध्रमध्ये कॉंग्रेस-पक्षाला चांगला तडाखा बसला आणि त्यामुळे आंध्रचा विचार करणं कॉंग्रेसच्या नेत्यांना क्रमप्राप्त ठरलं. तरी पण चर्चेच्या पलीकडे प्रत्यक्ष निर्णयापर्यंत नेते पोंचले नाहीत. आश्वासनं देत राहून कालहरण करणं आणि कालांतरानं प्रश्नांतील तीव्रता कमी झालेली आढळली की, आपल्याला अनुकूल असा निर्णय करणं ही नेत्यांची रीत जुनीच आहे. त्याच चाकोरींतून आंध्रच्या प्रश्नाचा विचार सुरू होता. आंध्रची मंडळी कॉंग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडून अनुकूल निर्णय लागण्याची वाट पहात होती. पण चर्चा आणि आश्वासनं याशिवाय कांही घडत नाही असं दिसून येतांच १९५२ च्या अखेर आंध्रांत या प्रश्नावर पहिलं आंदोलन उभं राहिलं.

आंध्रांतले एक नेते पोटृ सीतारामलु यांनी त्यासाठी उपोषण सुरू केलं, तरीहि दिल्ली थंड राहिली. अखेर या उपोषणांत सीतारामलू यांचा अंत झाला आणि त्यासरशी मग आंध्र पेटला. आंदोलनाला उग्र स्वरूप प्राप्त झालं. सर्वत्र विध्वंस सुरू झाला. लोकांनी रेल्वेच्या गाड्या पाडल्या, जाळपोळ केली आणि सबंध आंध्रांत दहशतीचं, घबराटीचं वातावरण निर्माण झालं. मग मात्र दिल्ली जागी होऊन निर्णय करण्यासाठी धांवपळ सुरू झाली. आंध्रानं मद्रासचा हक्क सोडला तर आंध्र प्रांत निर्माण करण्यास श्रेष्ठ नेत्यांची तयारी होतीच; परंतु त्या दृष्टीनं आंध्रांतील नेत्यांची समजूत काढून फायद्या-तोट्याची चर्चा करण्यापर्यंत मजल गेली नव्हती. दंगलींचा आगडोंब उसळतांच आंध्रांतील नेतेहि धांवपळ करूं लागले. या प्रश्नाचा जलद निकाल होण्याच्या दृष्टीनं मद्रासवरील हक्क सोडण्यास त्यांनी अनुमतीहि दर्शवली. एवढं होतांच 'आंध्र प्रांत निर्माण करण्याचं विधेयक आता मांडलं जाईल' अशी घोषणा दिल्लींतून झाली आणि मगच आंदोलनाला उतार पडला. आंध्र प्रांत प्रत्यक्ष अस्तित्वांत आला तो १९५३ च्या ऑक्टोबरमध्ये !

आंध्रांत या प्रश्नासाठी झालेलं आंदोलन आणि नंतर करावा लागलेला निर्णय यावरून काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी बोध घेऊन राज्य-पुनर्रचनेचा साराच प्रश्न सोडवण्यासाठी लोकेच्छेचा आदर केला असता, तर त्यांतून पुढे निर्माण झालेली कटुता, असंतोष, आंदोलन, प्राणहानि या गोष्टी टाळतां येणं त्यांना शक्य होतं. पण राज्य-पुनर्रचनेच्या प्रश्नावर देशांत आंदोलनं होत राहिल्यास देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीनं आणि राष्ट्रीय शिस्त जोपासण्याच्या दृष्टीनं तें धोक्याचं ठरेल याचा विचार सत्ताधारी पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या मनाला त्या वेळीं शिवला नाही. विरोधी नेत्यांनीहि देशाच्या ऐक्याचा विचार केला नाही. कॉंग्रेस-पक्षांत त्या वेळीं दोन गट पडले आणि आपल्या प्रदेशाचं भाषिक राज्य बनवण्याच्या मागणीसाठी जीं आंदोलनं सुरू झालीं त्या आंदोलनांत काँग्रेस-जन स्वतः तर सहभागी झालेच, शिवाय विरोधी पक्षांशीं सहकार्य करून प्रत्यक्ष आंदोलनांतहि उतरले. काँग्रेस-पक्षामध्ये या संदर्भात पुढारीपणाचे वाद निर्माण झाले. त्यांतून कांही ठिकाणीं नवे पुढारी जन्माला आले. तरी पण सत्ता ज्यांच्या स्वाधीन होती ती वरिष्ठ नेते-मंडळी स्वस्थ राहिली. याचा परिणाम असा झाला की, मागणी मान्य करण्याचा क्षण येईपर्यंत सत्ताधारी पक्षाच्या त्या त्या ठिकाणच्या शाखांचं भवितव्य कमालीचं डळमळीत बनलं. उलट कांही कमकुवत विरोधी पक्ष, आंदोलनांत सामील झालेल्या जनतेच्या बळावर प्रभावी बनले आणि सत्ताधारी पक्षाच्या अस्तित्वालाच यामुळे जेव्हा आव्हान मिळालं तेव्हा कुठे निर्णय करणारे नेते, निर्णयासाठी दाद देण्यास तयार झाले.

संयुक्त महाराष्ट्राची मागणी महाराष्ट्रांत १९४६ मध्ये पुढे आली होती. १ मे १९६० रोजीं संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाल्यावरच या आंदोलनाची समाप्ति झाली. संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वांत आला हें खरं, पण त्यापूर्वी दिल्लीच्या काँग्रेसच्या नेत्यांनी वेळोवेळीं वेगवेगळे निर्णय करून निर्णयांची एक मालिकाच तयार केली. या प्रत्येक निर्णयाविरुद्ध महाराष्ट्रांतील जनता लढत राहिली. निरनिराळे राजकीय पक्ष, संस्था आणि व्यक्ति यांनी या लढाईत शर्थीनं भाग घेतला. सत्ताधारी काँग्रेस-पक्षांतील नेते, विरोधी पक्षाचे नेते, पत्रकार, समाजांतील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ति आणि शहरांपासून खेड्यांपर्यंतची सामान्य जनता, कार्यकर्ते, सारेजण एकाच ध्येयासाठी, एकाच निशाणाखाली एकत्र झाल्याचं अपूर्व चित्र महाराष्ट्रांत या वेळीं निर्माण झालं. श्री. यशवंतराव चव्हाण हे या साऱ्या आंदोलनांत काँग्रेस-पक्षांत महाराष्ट्रांतील अन्य नेत्यांबरोबर अग्रभागीं राहून काम करत होते. त्यांच्या राजकीय आयुष्यांतील तो एक धगधगता काळ ठरला.

संयुक्त महाराष्ट्राचा लढा हा प्रामुख्यानं, भांडवलदार, बडे व्यापारी, उद्योगपति आणि समाजांतील सामान्य जनता यांच्या जीवनमरणाचा लढा होता. बड्या भांडवलदारांच्या दबावामुळे या प्रश्नाचा निर्णय करणारे दिल्लींतले वरिष्ठ नेते सामान्यांच्या मताला दूर ठेवून, त्यांच्या भावनांचा चुराडा करण्याच्या पवित्र्यांत सातत्यानं राहिले आणि त्यांतूनच असंतोषाचा भडका निर्माण झाला. मूळ मागणीला बगल देण्यासाठी

नेत्यांनी विविध पर्याय पुढे केले. पण महाराष्ट्र आपल्या उद्दिष्टापासून रेसभरहि मागे सरला नाही.

केंद्र-सरकारनं, या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी म्हणून निरनिराळीं कमिशनं नियुक्त केलीं. चर्चा चालू ठेवल्या. परंतु हीं कमिशनं जेव्हा आपला रिपोर्ट जाहीर करत त्या वेळीं मात्र अहवालांत नमूद झालेलं त्यांचं तें मत, न्यायीपणाचं, निःपक्षपाती असं कधीच व्यक्त झालं नाही. स्वतंत्र रीतीनं, कोणाच्या दबावाला बळी न पडतां, कमिशन निःपक्षपाती मत देतं, असा महाराष्ट्राच्या जनतेला विश्वास कधी वाटला नाही. कमिशनचा अहवाल आणि त्यांतून मूळ प्रश्नाविषयी व्यक्त झालेलं मत हें या गैरविश्वासाला नेहमी पूरकच ठरलं. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला साथ दिली किंवा ही मागणी न्याय्य आहे असं मत व्यक्त केलं आणि त्यानुसार संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला तर कोणत्या आपत्ति निर्माण होतील यासंबंधीची काल्पनिक चित्रं मनासमोर ठेऊनच प्रत्येक कमिशन आपला अहवाल तयार करत राहिलं. कमिशनच्या या कृतीमुळे संयुक्त महाराष्ट्राचा लढा तीव्र होण्यास, चिघळण्यास मदत मात्र झाली. आपली मागणी मान्य करून घेण्यासाठी जनतेला सर्व युक्ति-शक्तिनिशी लढावं लागलं. वनवास संपून संयुक्त महाराष्ट्राचं रामराज्य अवतरण्यास चौदा वर्षे जनतेला अशी झुंज द्यावी लागली हा इतिहास आहे.

संयुक्त महाराष्ट्राची एकमुखी मागणी महाराष्ट्रांतून सुरू झाल्यानंतर, दिल्लीच्या नेत्यांनी, त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्य मंत्री मोरारजी देसाई, मुंबई प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष स. का. पाटील, केंद्रस्थानचे गुजराती नेते आणि महाराष्ट्रांतील कॉंग्रेस-अंतर्गत अपरिपक्व नेते यांना हाताशीं धरून मूळ मागणी एकमुखी रहाणार नाही असेहि पराकाष्ठेचे प्रयत्न केले. त्यासाठी निरनिराळे पर्याय पुढे केले आणि मुंबई शहर महाराष्ट्रापासून अलग करण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न केला. परंतु महाराष्ट्रांतील नेते हुलकावणीला फसले नाहीत किंवा मिळेल तें पदरांत पाडून घेऊन समाधानी राहिले नाहीत.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा साराच इतिहास प्रदीर्घ आहे. निःपक्षपातीपणानं या महाभारतांतील सर्वच घटनांचं संशोधन करण्याइतका हा विषय मोठा आहे. हें महाभारत घडत असतांना आणि घडून झाल्यानंतरहि, अनेक नेते जन्माला आले, मोठे झाले, तर कांही लयास गेले. कांही विरोधी राजकीय पक्षांना बाळसं प्राप्त झालं, तर कांहींच्या चिंध्या झाल्या. सत्तेवरील कॉंग्रेस-पक्ष महाराष्ट्रांतून कायमचा निकालांत निघण्याइतका कमकुवत बनला आणि हाच पक्ष नंतरच्या काळांत सर्वश्रेष्ठहि बनला. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक इतिहासांत या काळांत अनेक चढउतार निर्माण झाले.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या आंदोलनाच्या वेळीं महाराष्ट्राला द्वैभाषिकाचे नेते म्हणून यशवंतराव प्रथम महाराष्ट्रासमोर आले. आणि नंतर संयुक्त महाराष्ट्राचे नेते – मुख्य मंत्री – म्हणून यशवंतरावांचा लाभ झाला त्या सर्वच घटना सर्वार्थानं अभ्यसनीय अशा ठरल्या आहेत.

सुप्रिम कोर्टाचे न्यायाधीश फाजलअल्ली, डॉ. हृदयनाथ कुंझरू आणि डॉ. के. एम्. पणिक्कर या तीन सदस्यांचं राज्य-पुनर्रचना कमिशन १९५३ च्या डिसेंबरमध्ये नियुक्त झाल्यानंतर पुढल्या तीन-चार महिन्यांत निरनिराळ्या राज्यांत समित्या स्थापन होऊन भाषावार प्रांतरचनेचा अनुकूल निर्णय करून घेण्यासाठी आंदोलनाची तयारी सुरू झाली. महाराष्ट्रांत त्या वेळीं कॉंग्रेस-पक्षासह सर्वपक्षीय अशी संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाली. शंकरराव देव, केशवराव जेधे, भाऊसाहेब हिरे, देवकीनंदन नारायण, डॉ. धनंजयराव गाडगीळ, श्री. अ. डांगे, डॉ. नरवणे प्रि. द. रा. धारपुरे, मामासाहेब देवगिरीकर, यशवंतराव चव्हाण, ना. ग. गोरे, एस्. एम्. जोशी, रिपब्लिकन पक्ष, शेतकरी-कामकरी पक्ष आदि विविध पक्षांचे नेतेहि यांत सामील झाले.

भाऊसाहेब हिरे व चव्हाण त्या वेळीं मोरारजींच्या मंत्रिमंडळांतील मंत्री होते. फाजलअल्ली कमिशनचं काम १९५४ च्या मार्चपासून सुरू व्हायचं असल्यानं, कमिशनला एक निवेदन सादर करण्याचा प्रश्न होता. त्यासाठी महाराष्ट्रांत डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली एक समिति नियुक्त करण्यांत आली. डॉ. गाडगीळ यांनी सर्वस्पर्शी निवेदन तयार केल्यानंतर त्यावर चर्चा झाली आणि हें निवेदन योग्य असल्याचं मत सर्व सदस्यांनी व्यक्त केलं. कॉंग्रेस-पक्षाचे काकासाहेब गाडगीळ वगैरे नेते-मंडळीहि परिषदेच्या चर्चेच्या वेळीं उपस्थित राहूं लागले होते; परंतु त्यामुळे मोरारजींचं पित्त खवळलं. देवकीनंदन नारायण त्या वेळीं महाराष्ट्र-कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. मोरारजींच्या भुवया वक्र झाल्याचं त्यांच्या लक्षांत येतांच, ते परिषदेशीं कांहींसे फटकून वागूं लागले. पण त्यांची ही वागणूक कॉंग्रेसमधल्या लोकांना खटकली. त्यांतूनच महाराष्ट्र-कॉंग्रेसच्या अध्यक्षांत बदल करण्यांत येऊन देवकीनंदनांच्या जागेवर मामा देवगिरीकर यांची निवड करण्यांत आली. देवगिरीकर हे परिषदेशीं संबंधित रहातील अशी काकासाहेब गाडगीळ आदींची कल्पना होती. पण पुढच्या काळांत देवगिरीकर हेहि उदासीन बनले असल्याचं मत कॉंग्रेस-वर्तुळांत निर्माण झालं. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे शंकरराव देव हे अध्यक्ष होते आणि यशवंतराव चव्हाण, हिरे, काकासाहेब गाडगीळ, डॉ. नरवणे ही कॉंग्रेसची नेते-मंडळी, कॉंग्रेसनिष्ठा विचलित होऊं न देतां परिषदेबरोबर काम करत होती. मुंबई विधानसभेचे सभापति द. का. उर्फ नानासाहेब कुंटे हेहि संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे पुरस्कर्ते त्यांना मिळाले होते.

राज्य-पुनर्रचना समितीला सादर करायचं निवेदन परिषदेनं तयार केलेलं होतं आणि ते उत्कृष्ट होतं, तरी महाराष्ट्र-कॉंग्रेसचे नवे अध्यक्ष देवगिरीकर यांनी परिषदेचं हें निवेदन एकमुखीपणानं कमिशनला देण्यांत मोडता घातला. त्यांचं म्हणणं असं की, कॉंग्रेसतर्फे स्वतंत्र निवेदन द्यावं. वस्तुतः दोघांचं उद्दिष्ट एकच होतं. परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव हे कट्टर कॉंग्रेसचेच होते. हिरे, चव्हाण ही मंडळीहि त्यांत होती. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी तयार केलेल्या निवेदनाची तारीफ देव, काकासाहेब गाडगीळ यांनी केली होती; परंतु देवगिरीकरांनी तें निवेदन देण्यांत सहभागी होण्याचं नाकारलं.

त्यांतलं इंगित असं होतं की, परिषदेंत कम्युनिस्ट पक्ष सामील झाला आहे हें देवगिरीकर आदि मंडळींना खटकलं होतं. आंध्रांतील चळवळींत कम्युनिस्ट आघाडीवर होते आणि आंध्र प्रांत निर्माण झाला होता. त्याची पुनरावृत्ति महाराष्ट्रांत व्हावी आणि कम्युनिस्टांना त्याचं श्रेय मिळावं हें त्यांना मान्य नव्हतं.

वस्तुतः निवेदन तयार झालं त्या वेळीं आंदोलनाचं स्पष्ट असं स्वरूप तयार झालेलं नव्हतं. तरीहि देवगिरीकरांना तें खटकलं आणि त्यांनी कॉंग्रेसतर्फे स्वतंत्र निवेदन तयार करून तें कमिशनला सादर करण्याची तयारी केली. प्रदेश-कॉंग्रेस कमिटीच्या सभेंत तसा ठरावहि केला आणि चौघांची समिति त्यासाठी नेमून त्यांत बापूसाहेब गुप्ते, व्यंकटराव पवार, मोरोपंत जोशी यांना सामावून घेतलं. परिणामीं कमिशनसमोर दोन स्वतंत्र निवेदनं सादर झालीं आणि परिषदेच्या अंतर्गत पक्षीय मतभेदाची मुहूर्तमेढ रोवली गेली. दरम्यान गुजरातमध्ये महागुजरात समिति व कर्नाटकांतहि तशीच एक समिति अस्तित्वांत आली होती.

राज्य-पुनर्रचनेच्या संदर्भात सविस्तर अहवाल तयार करण्यासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या फाजलअल्ली-कमिशनकडे दोन हजार निवेदनं त्या वेळीं जमा झालीं. कमिशननं निरनिराळ्या राज्यांतल्या १०४ ठिकाणीं जाऊन नऊ हजार लोकांच्या मुलाखती नोंदवल्या. कमिशन पुण्याला आलं असतांना त्याच्याच निमंत्रणावरून शंकरराव देव, डॉ. धनंजयराव गाडगीळ आणि भाऊसाहेब हिरे यांनी २७ ऑगस्ट १९५४ रोजीं कमिशनबरोबर चर्चा केली. या चर्चेच्या वेळीं स्वतः फाजलअल्ली यांनी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रास अनुकूलताच दर्शवली. आपण स्वतः याच मताचे आहोंत असंहि त्यांनी सांगितलं. परंतु कमिशनचा प्रत्यक्ष अहवाल जाहीर झाला त्यांत मात्र फाझलअल्ली यांनी पुण्याच्या भेटींत जें स्वतःचं मत व्यक्त केलं होतं त्याच्या नेमका उलट निर्णय नमूद केला. भाऊसाहेब हिरे यांनी मग या बदलाला वाचा फोडतांच कमिशननं गुजराती नेत्यांच्या दबावाला बळी पडून आपलं मत फिरवल्याबद्दल सर्वत्र टीका सुरू झाली.

काकासाहेब गाडगीळ आणि पं. नेहरू यांच्यांतहि यासंबंधांत त्या वेळीं प्रदीर्घ पत्रव्यवहार झाला. कमिशननं आपल्या मूळच्या अहवालांत, मुंबई, गुजरात आणि सौराष्ट्रांतील नेत्यांच्या दबावामुळे नंतर बदल केला आहे असं गाडगीळ यांनी नेहरूंना स्पष्टच लिहिलं; परंतु पं. नेहरूंनी कमिशनचा शब्द खरा मानला आणि हिरे यांचाच कांही तरी गैरसमज झाला असल्याचं कळवून हिऱ्यांना दोष दिला. हिरे यांचा गैरसमज झाला असं मान्य करायचं म्हटलं, तर पुण्यांतल्या बैठकीच्या वेळीं देव आणि डॉ. धनंजयराव गाडगीळ हेहि उपस्थित होते. त्यांनी तर हिरे यांची बाजू बरोबर असल्याचंच मत दिलं. तेव्हा गैरसमजाचे धनी या परिस्थितींत तिघांनाहि करावं लागतं. पण वस्तुस्थिति तशी नव्हती. कमिशन दबावाला बळी पडलंच होतं. फाजलअल्ली यांनी स्वतः जी टिप्पणी तयार केली होती ती या तिघांना वाचून दाखवली होती अन् त्यामध्ये मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची कल्पना त्यांनी योग्य म्हणून कबूल केलं होतं. पण त्यांनी

नंतर शंकरराव देव यांना जें उत्तर पाठवलं त्यामध्ये, टिप्पणी वाचल्याचा उल्लेख मात्र हेतुपुरस्सर टाळला होता. या सर्व पत्रव्यवहारावरून एक स्पष्ट झालं की, फाजलअली यांनी वाचून दाखवलेली टिप्पणी म्हणजे तो अंतिम अहवाल नव्हता. जणू कांही त्यांचं स्वतःचं मत म्हणूनच या तिघांना त्यांनीं तें सांगितलं होतं.

महाराष्ट्रांतल्या लोकांना कमिशननं व्यक्त केलेलं मत पाहून आश्चर्य वाटलं; तरी पण सर्व व्यवहार शांततेनं सुरू होते. अहवालाचा कांही भाग, अनधिकृतरीत्या वृत्तपत्रांतून हळूहळू बाहेर येत राहिला होता. परंतु अहवाल प्रत्यक्ष जाहीर झाल्यानंतर पं. नेहरू यांनीच प्रथम आश्चर्य व्यक्त केलं. कमिशननं महाराष्ट्रापासून मुंबई तर बाजूला काढली होतीच, शिवाय महाविदर्भाचं स्वतंत्र राज्यहि सुचवलं होतं.

अहवाल जाहीर होतांच महाराष्ट्रांतील वातावरण झपाट्यानं बदलूं लागल्याचं पाहून महाराष्ट्रांतील काँग्रेस-नेत्यांनी दिल्लीला जाऊन, कमिशनच्या अहवालाविरुद्ध वरिष्ठ काँग्रेस-नेत्यांकडे दाद मागण्याचा निर्णय केला. याच वेळीं म्हणजे १९५५ च्या १३ व १४ ऑक्टोबरला काँग्रेस वर्किंग कमिटीनं या अहवालाच्या अंमलबजावणीच्या संदर्भांत चर्चा करून नेहरू, पंत, आझाद आणि ढेबर यांची एक उपसमिति नेमली. मुंबईच्या प्रश्नाप्रमाणे जिथे कुठे वाद असतील त्या संदर्भांत चर्चा करून तडजोड घडवून आणण्याचं काम या उपसमितीकडे सोपविण्यांत आलं होतं. राज्य-पुनर्रचनेच्या प्रश्नांत काँग्रेस-जनांनी आंदोलनाच्या मार्गापासून दूर असावं, विशेषतः आंदोलनवादी एखादा गट किंवा पक्ष यांच्याशीं काँग्रेस-जनांनी हातमिळवणी करतां कामा नये, असा दंडकहि काँग्रेस-कार्यकारिणीनं घालून दिला. महाराष्ट्रांतील काँग्रेस-नेते हे संयुक्त महाराष्ट्र परिषदेमध्ये समाविष्ट झाले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनापासून त्यांनी बाजूला व्हावं असाच या ठरावाचा आदेश होता.

महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसचे अध्यक्ष मामा देवगिरीकर यांनी वरिष्ठांना चर्चेसंबंधी सुचवतांच काकासाहेब गाडगीळ, शंकरराव देव, देवगिरीकर, नानासाहेब कुंटे आणि यशवंतराव चव्हाण यांना चर्चेसाठी दिल्लीला वरिष्ठांकडून पाचारण करण्यांत आलं. देव यांच्या नेतृत्वाखाली या शिष्टमंडळानं पं. नेहरूंच्या कचेरींत दि. १७ ऑक्टोबरला पहिली चर्चा केली. वस्तुतः शंकरराव देव त्या वेळीं काँग्रेसचे साधे सभासदहि उरले नव्हते. महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसचे सन्माननीय निमंत्रक म्हणून ते होते आणि या चळवळींत अखेरपर्यंत ते याच भूमिकेंत राहिले.

भाऊसाहेब हिरे महाराष्ट्रांतील काँग्रेसचे एक प्रमुख नेते होते. देव यांचं मार्गदर्शन आणि सल्ला ते शिरसावंद्य मानत असत. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या भेटीसाठी हें शिष्टमंडळ जेव्हा गेलं त्या वेळीं हरिभाऊ पाटसकर आणि डॉ. नरवणे हेहि त्यामध्ये सामील झाले. पहिल्याच बैठकींत देव यांनी फाजलअली-कमिशनच्या अहवालाबद्दल महाराष्ट्राची नाराजी व्यक्त करून महाराष्ट्रावर अन्याय झाला असल्याचं निदर्शनास आणलं. चर्चेच्या ओघांत पं. नेहरू यांनी या अहवालाकडे व्यापक दृष्टीनं पहावं, असं प्रतिपादन करून

अहवालास मान्यता देणं कसं योग्य ठरेल हेंहि सांगितलं. पं. नेहरूंचं विवेचन युक्तीचं, डावपेंचाचं होतं. शिष्टमंडळांतल्या अन्य नेत्यांना त्याची तिथेच जाणीव झाली; परंतु पं. नेहरूंनी आपण कसे अडचणींत आहोंत त्याचा पाढा वाचला होता. चर्चा बराच वेळ चालली. देवगिरीकरांनी उपस्थित केलेल्या एका प्रश्नाला उद्देशून पंडितजींनी सांगितलं की, याच वेळीं आम्ही तुमची मागणी मान्य केली, तर विरोधकांना पुराचीं सर्व दारं उघडीं केल्यासारखं होईल. दोन-तीन वर्षांनी विचार केला, तर कुणाचंहि त्याकडे फारसं लक्ष जाणार नाही. या युक्तीवादानं देव भारावले.

पं. नेहरूंचा हा युक्तिवाद ऐकून, त्यांच्या मनांत आता बदल झाला आहे एवढंच समाधान शिष्टमंडळाला मिळालं. मुंबई शहराचं स्वतंत्र राज्य करूं नये असा पंडितजींचा दृष्टिकोन होता. आझाद हे मुंबई, गुजरात व महाराष्ट्र अशीं तीन राज्यं करावींत, या त्रिराज्य-योजनेशीं बद्ध होते. महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी काढणाऱ्या त्रिराज्य-योजनेला महाराष्ट्रांतील नेत्यांचा मात्र सक्त विरोध होता. या बैठकींत शेवटीं कॉंग्रेस वर्किंग कमिटीनं महाविदर्भाबाबत एक आश्वासन दिलं. महाविदर्भानं महाराष्ट्रांत सामील व्हावं यासाठी महाविदर्भांतील लोकांचं मन वळवण्याचा प्रयत्न केला जाईल असं तें आश्वासन होतं; परंतु पहिल्या बैठकींत निश्चित असं कांहीच न घडल्यानं ही चर्चा अशीच पुढे सुरू ठेवण्याचं ठरलं आणि त्यानुसार दुसऱ्या दिवशीं १८ ऑक्टोबरला पं. पंत यांच्या निवासस्थानीं ही चर्चा झाली.

या चर्चेसाठी जात असतांना शंकरराव देव यांच्या मनांत वरिष्ठ कॉंग्रेस-नेत्यांनी पुढे केलेला विशाल द्वैभाषिकाचा ( Bigger Bilingual ) पर्याय घोळत होता. मनांतले विचार त्यांनी प्रथम डॉ. धनंजयराव गाडगीळ यांना सांगितले. देव यांनी विषयाचा उपोद्घात करतांच, त्यांनी अधिक कांही सांगण्यापूर्वी डॉ. गाडगीळ यांनी खिशांतली एक टिप्पणी काढून त्यांना दाखवली. विशाल द्वैभाषिकाच्या पर्यायासंबंधांत डॉ. गाडगीळ यांना अगोदरच विचार सुचला होता व त्या संबंधांत त्यांनी एक कच्चं टिपणहि तयार केलं होतं. विषय सांगून होण्यापूर्वीच डॉ. गाडगीळ यांनी पुढे केलेले कागद पाहून देव आश्चर्यचकित झाले. देव यांनी ते कागद वाचले आणि डॉ. गाडगीळ यांना ते परत केले; आणि हें कुणाला बोलूं नका, असंहि सुचवलं.

पं. पंत यांच्या निवासस्थानीं त्या दिवशीं जी चर्चा झाली तिच्यांत कोणत्याहि प्रकारे एकमत होऊं शकलं नाही. नेत्यांच्या मतांचा अंदाज घेऊन अखेर आपण आपल्या मागणीशीं बद्ध रहायचं असाच निर्णय महाराष्ट्रांतील नेत्यांना करावा लागला; याबाबत कोणताहि पर्याय स्वीकारूं नये, असं त्यांनी ठरवलं. देव यांच्या मनांत मात्र विशाल द्वैभाषिकाचा पर्याय घोळतच होता. दुसऱ्या दिवशीं म्हणजे १९ ऑक्टोबरला त्यांनी या संदर्भांत डॉ. गाडगीळ यांच्याशीं पुन्हा एकदा चर्चा केली. काकासाहेब गाडगीळ यांचंहि मत अजमावलं. काकासाहेबांची अनुकूलता मिळतांच त्यांनी मग हिरे यांना निरोप पाठवून एक तातडीची बैठक बोलावली. देव यांच्या निरोपानुसार हिरे आणि नानासाहेब

कुंटे येतांच देव यांनी त्या दोघांना, आपली नवी कल्पना सांगितली. विशाल द्वैभाषिकाच्या योजनेचं टिपण डॉ. गाडगीळ यांच्याकडून घेऊन तें त्यांनी हिरे व कुंटे यांना दाखवलं.

या चौघांच्या बैठकींत बरीच चर्चा झाली. वरिष्ठ कॉंग्रेस-नेत्यांकडे आपण न्याय मागायला आलों असतांना, आपल्याला वेगळा पर्याय सुचवण्याचं कारण नाही, असं हिरे व कुंटे यांचं मत होतं. पण उलटसुलट चर्चेनंतर हिरे हे अनुकूल बनले. कुंटे यांना हा पर्याय मान्य नव्हता. डॉ. गाडगीळ यांच्याकडून देव यांनी कागद घेतल्याचं त्यांनी पाहिलं होतं. त्यामुळे त्यांचं असं मत बनलं की, विशाल द्वैभाषिकाचा पर्याय हा मूळचा डॉ. गाडगीळ यांनीच पुढे केला असला पाहिजे. आदल्या दिवशीं रात्रीपर्यंत संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीवरच सारे घट्ट बसलेले असतांना रात्रींतून हा नवीन पर्याय पुढे आल्याचं पाहून कुंटे अस्वस्थ बनले. नव्या पर्यायासंबंधांत इतरांना विश्वासांत न घेतां केवळ आपण निर्णय करणं योग्य ठरणार नाही असंहि त्यांनी सांगितलं. अखेर विशाल द्वैभाषिकाचा विचार करण्यासाठी शिष्टमंडळांतील सर्वांनाच पाचारण करावं असं ठरलं.

हरिभाऊ पाटसकर यांच्या निवासस्थानीं त्यानुसार शिष्टमंडळाची ही बैठक झाली. चिंतामणराव देशमुख हेहि बैठकीला उपस्थित राहिले. या बैठकींत शंकरराव देव यांनी साध्या कागदावर लिहिलेला, विशाल द्वैभाषिकाच्या पर्यायाचा मजकूर हळूच पुढे केला. अचानकपणें हा नवा पर्याय पुढे आलेला पाहून देवगिरीकर आणि यशवंतराव चव्हाण गोंधळून गेले. काय चाललं आहे हेंच मुळी त्यांना उमजेना. यशवंतरावांनी तर तुम्ही आमचा विश्वासघात करत आहांत, असं देव यांना तिथेच सुनावलं. सर्वांना विश्वासांत न घेतां, देव यांनी अशा प्रकारे, मूळ मागणी बाजूस ठेवून, नवा पर्याय सुचवावा याबद्दल यशवंतरावांनी कडक शब्दांत तिथे आपली प्रतिक्रिया व्यक्त केली; हें असंच चालू रहाणार असेल, तर शिष्टमंडळाबरोबर न रहातां मुंबईस परत जाण्याचं त्यांनी सांगून टाकलं.

दिल्लीच्या मुक्कामांतील या तिसऱ्या दिवशीं शिष्टमंडळानं मौलाना आझाद यांच्या निवासस्थानीं वरिष्ठ कॉंग्रेस-नेत्यांशीं चर्चा करण्याचं ठरलं होतं. या चर्चेसाठी आपण उपस्थित रहाणार नाही असं चव्हाण यांनी स्पष्ट करतांच बैठकीला वेगळंच वळण लागलं. देवगिरीकर, काकासाहेब गाडगीळ यांनी तेव्हा चव्हाणांना समजावण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या नेत्यांमध्येच फूट पडली आहे ही वस्तुस्थिति वरिष्ठ कॉंग्रेस-नेत्यांपर्यंत पोंचणं योग्य नव्हतं. शेवटीं विशाल द्वैभाषिकाचा पर्याय आपण स्वतः वरिष्ठ नेत्यांना सादर करणार नाही, असं देव यांनी आश्वासन दिलं तेव्हा वातावरण निवळलं.

विशाल द्वैभाषिकाचा पर्याय आपण स्वतः वरिष्ठांना सादर करणार नाही असं आश्वासन जरी देव यांनी दिलं होतं, तरी त्यांनी पुढे तें पाळलं नाही; परंतु या त्यांच्या दुटप्पीपणामुळे यशवंतरावांना स्वतःचे निष्कर्ष काढावे लागले. संयम राखून तेंच त्यांनी पुढच्या काळांत केलं.

आझाद यांच्या निवासस्थानीं शिष्टमंडळानं प्रदीर्घ चर्चा केली. पण सारे शब्दांचे खेळ होत राहिले. वरिष्ठ नेत्यांची समजूत घालण्यांत किंवा त्यांचं मन वळवण्यांत

शिष्टमंडळाला यश मिळालं नाही. ही कोंडी फोडण्यासाठी म्हणून देव यांनी याच बैठकींत विशाल द्वैभाषिकाची योजना पुढे केली. द्वैभाषिक आम्हांला मान्य आहे; पांच वर्षांनंतर गुजरातनं हवं तर बाजूला निघावं, असं देव यांनी सुचवलं होतं. चर्चेच्या अखेरच्या टप्प्यांत देव यांनी हा पर्याय जेव्हा उशिरा सुचवला तेव्हा पं. नेहरू बैठकींत उपस्थित नव्हते. अन्य कांही महत्त्वाच्या कामासाठी ते अगोदरच निघून गेले होते. कॉंग्रेस-कार्यकारिणीच्या उपसमितीनंच या संदर्भात चर्चा केली. पण स्वतः वचनबद्ध होण्याचं टाळलं. तिसऱ्या दिवशींची बैठकहि अशी निष्फळ ठरली. महाराष्ट्राच्या शिष्टमंडळाची दिल्लींत अशा प्रकारे बोळवण झाल्यानं, महाराष्ट्रांत परतल्यानंतर लोकांच्या प्रश्नांना उत्तरं काय द्यायचीं या विवंचनेनं त्यांना घेरलं. नाराज मनःस्थितींतच सारेजण महाराष्ट्रांत परतले होते.

# १०

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळवण्याचं महाराष्ट्रांतील काँग्रेस-नेत्यांच्या चर्चेचं पहिलं पर्व अशा रीतीनं जरी समाप्त झालं, तरी त्यांना संयमानं पुढचीं पावलं टाकणं क्रमप्राप्तच होतं. काँग्रेस-कार्यकारिणीच्या हातीं महाराष्ट्राचं भवितव्य होतं आणि त्रिराज्य-योजनेलाच अंतिम स्वरूप देण्याचा काँग्रेस-कार्यकारिणीचा मनोदय होता. पं. नेहरू यांनीहि त्रिराज्य-योजना मान्य केली होती. राज्य-पुनर्रचना समितीचा विदर्भाशिवाय असलेला पर्याय त्यांनी अमान्य करून मोरारजी, स. का. पाटील यांचा डाव हाणून पाडला होता. मुंबई-विदर्भ यांसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची महाराष्ट्राची मागणीहि त्यांनी बाजूला सारली होती. याचा अर्थच हा की, महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही ठिकाणच्या नेत्यांच्या दबावाला ते बळी पडले नव्हते. महाराष्ट्राची मागणी न्याय्य आहे असं ते म्हणत, परंतु मागणी मान्य करण्यासाठी कांही काळ थांबलं पाहिजे, लोकांच्या प्रक्षुब्ध भावना शांत झाल्या पाहिजेत आणि त्याचबरोबर मुंबईच्या लोकांनाहि समजावून सांगितलं पाहिजे, असं त्यांचं मत होतं. महाराष्ट्र, गुजरात, मुंबई आणि विदर्भ अशा सर्वच ठिकाणीं असंतोष होता आणि त्यांतून समाधानकारक मार्ग काढायचा होता. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी खात्रीचा असा जवळचा मार्ग कोणताच दिसत नसल्यानं संयम राखून मागणीच्या दिशेनं वाटचाल करत रहाणं एवढंच आता उरलं होतं. दिल्लीला गेलेलं शिष्टमंडळ ही वाटचाल ठरवण्यासाठी महाराष्ट्रांत परतलं.

दिल्लीमध्ये देव यांनी विशाल द्वैभाषिकाची जी योजना पुढे केली होती ती गुजरात आणि मुंबईनं लगोलग धुडकावून लावली. काँग्रेस-कार्यकारिणीनं त्या दोघांचं मत अजमावलं होतं. वस्तुतः हा प्रश्न दिल्लींत यमुनेच्या घाटावरच विसर्जित झाला होता. पण देव यांनी, आपल्या योजनेबद्दलची चिकाटी सोडली नाही. त्यांच्या या योजनेच्या पाठीशीं महाराष्ट्र-काँग्रेसची शक्ति असल्याचं त्यांना दाखवायचं होतं.

प्रदेश-काँग्रेसची बैठक त्यासाठी त्यांनी पुण्याला बोलावली. ऑक्टोबरच्या २० व २१ तारखेला या बैठका-सभा झाल्या. पहिल्या दिवशीं कार्यकारी मंडळाच्या बैठकीला मराठवाड्याचे कार्यकर्ते आले होते. नागपूर-वऱ्हाडपैकी रामराव देशमुख होते. आठ तास चर्चा झाल्यानंतर कार्यकारी मंडळानं द्वैभाषिकाच्या ठरावाला मान्यता दिली आणि दुसऱ्या दिवशीं हा ठराव सर्वसाधारण सभेपुढे आला. दीडशेहून अधिक लोक या सभेला उपस्थित राहिले होते. या सभेंत काकासाहेब गाडगीळ यांनीच ठराव मांडला आणि यशवंतराव चव्हाण यांनी त्यास पाठिंबा दिला. या ठरावावर सभेनं प्रदीर्घ चर्चा केली. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करावी आणि ती मान्य न झाल्यास क्रांति केली जाईल अशा उपसूचनाहि मांडल्या गेल्या. वि. वि. नेने, के. ज. क्षीरसागर, व्यंकटराव पवार यांनी या उपसूचना केल्या होत्या. पण उपसूचना मान्य न करतां सभेनं मूळ ठरावच मान्य केला. देव, रामानंद तीर्थ, हिरे यांचीं ठरावाचं समर्थन करणारीं भाषणं झालीं.

या सर्वांमध्ये यशवंतराव चव्हाण यांनी पाठिंबा देतांना मर्मभेदक शब्दांत महाराष्ट्राच्या भावना व्यक्त केल्या. हें भाषण त्या काळांत चांगलंच गाजलं. कारण यशवंतरावांनी या भाषणांत देशी वसाहतवादावर तोफ डागली होती. यशवंतराव हे त्या वेळीं मंत्री होते. आपण एक अपकारक बोलणारे मंत्री आहोंत, असं स्वतःचंच वर्णन त्यांनी केलं. अर्थातच त्यांनी स्वतःचं केलेलं हें वर्णन संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या संदर्भांत होतं. ज्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीच्या संदर्भांत हा एक दीर्घकाल सुरू रहाणारा उग्र स्वरूपाचा लढा असून, त्यासाठी प्रसंगीं कृति करावी लागणार आहे, असं लोकांना सांगून त्यांच्या भावना चेतवल्या आणि कृतीच्या दृष्टीनं कांही पावलं टाकलीं त्यांना आता पाठ दाखवतां येणार नाही, असा इशारा त्यांनी आपल्या भाषणांत दिला.

संयुक्त महाराष्ट्राच्या निष्ठेसंबंधी यशवंतरावांच्या मनांतल्या प्रामाणिकपणाबद्दल त्या काळांत कांही बोललं जात होतं, संशय व्यक्त केला जात होता. संशय व्यक्त करणारे काँग्रेस-पक्षांतहि होते आणि विरोधकांतहि होते. यशवंतरावांनी या सर्वांनाच धारेवर धरलं. त्यांच्या विधानांतून सोयिस्कर असा गैर अर्थ काढून त्याचं भांडवल केलं जाईल याची त्यांना जाणीव असल्यामुळे, आपल्या विधानाचा खुलासा अगोदरच त्यांनी करून टाकला.

संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर यशवंतरावांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा, असा सल्ला रँ. र. पु. परांजपे यांनी दिला होता. या सल्ल्याचा समाचार घेतांना यशवंतरावांनी सांगितलं की, प्रदेश-काँग्रेसचे नेते स्वतःच्या बुद्धीनं आदेश देत असतील तर क्षणाचाहि विलंब न लावतां किंवा कसलीहि खळखळ न करतां, मंत्रिपद सोडण्याची आपली तयारी आहे. पण बाहेरच्या लोकांकडून त्यासाठी दबाव निर्माण करण्याचं राजकारण कुणी खेळणार असतील तर तें जुमानलं जाणार नाही. स्वातंत्र्य-चळवळींतले सेनानी म्हणून यशवंतरावांनी मंत्रिपदाला चिकटून रहाण्याचा क्षुद्रपणा करूं नये असाहि सल्ला रँ. परांजपे यांनी दिला होता. त्याबाबतहि यशवंतरावांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

त्यांनी सांगितलं की, स्वातंत्र्य-संग्रामांत माझ्यासारख्या ज्यांनी हालअपेष्टा भोगल्या, अधिकारपदाच्या मागे न धांवतां वनवास पत्करला, त्यांना मंत्रिपदाचं आकर्षण नाही. स्वातंत्र्य-लढा सुरू असतांना ज्यांनी परक्याशीं लागेबांधे जोडले होते, निदान त्यांनी तरी आम्हांला असला सल्ला न दिलेला बरा!

यशवंतरावांच्या या विधानामुळे रँ. परांजपे यांच्या वर्गांतली मंडळी बरीच अस्वस्थ बनली. संयुक्त महाराष्ट्र नाकारला गेल्यामुळे यशवंतरावांच्या मनांत दुःख होतं. नैतिक भूमिकेचे पुरस्कर्ते शंकरराव देव यांनी पातिव्रत्य राखण्यासाठी तडजोडीची तयारी केली होती, पण तीहि दिल्लीनं मानली नव्हती. गुजराती नेत्यांनी मुंबईबाबत जो आडमुठेपणा धारण केला त्यामुळे प्रश्नाची सोडवणूक होण्यामध्ये अनंत अडचणी निर्माण झाल्या होत्या. तरी पण महाराष्ट्राची न्याय्य मागणी धुडकावणं हा महाराष्ट्राचा उपमर्द आहे, असंच यशवंतरावांनी सभेला ऐकवलं. भारतानं पाश्चात्त्य वसाहतवादाचा बुरखा फाडला, भारतांतून तो वसाहतवाद पिटाळून लावला, पण देशी वसाहतवाद मात्र आम्हांला घालवतां आलेला नाही, अशा शब्दांत त्यांनी गुजराती मनोवृत्तीचं वर्णन केलं. संयुक्त महाराष्ट्राला दिलेला नकार आणि गुजरातीभाषी स्वतंत्र राज्य झालं तरीहि, मुंबई शहरावरील महाराष्ट्राचा हक्क नाकारणाऱ्या महागुजरातच्या नेत्यांची वृत्ति म्हणजे देशी वसाहतवादाचा पुरावाच होय, असं त्यांनी स्पष्ट केलं.

दिल्लीच्या प्रारंभींच्या बैठकींत देव यांच्या विशाल द्वैभाषिक योजनेला जरी चव्हाण यांनी विरोध केला होता, तरी पुण्याच्या सभेंत मात्र त्यांनी पाठिंबा दिला. त्यांनी असंहि सांगितलं की, देव यांनी सखोल विचार करून गांधीवादी ध्येयाशीं सुसंगत अशी ही पर्यायी योजना सुचवली असल्यानं माझा दुजोरा आहे. महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसच्या या योजनेला मराठवाड्यानंहि नंतर चार दिवसांनी वसमत इथे बैठक घेऊन भरघोस पाठिंबा दिला. विदर्भांतील म्हणजे त्या वेळच्या मध्यप्रदेशांतील लोक चर्चेंत भाग घेत असत, पण संयुक्त महाराष्ट्राच्या पाठीशीं त्यांनी आपली शक्ति उभी केली नव्हती. मध्यप्रदेशाचे त्या वेळीं मंत्री असलेले पी. के. देशमुख यांनी एकट्यानंच राज्य-पुनर्रचना समितीच्या अहवालास विरोध केला होता आणि वसंतराव नाईक व श्रीमती प्रभावती जकातदार या दोन उपमंत्र्यांचा त्यांना पाठिंबा होता.

महाराष्ट्र-काँग्रेसनं द्वैभाषिकाच्या योजनेमागे आपली शक्ति उभी केली असली, तरी गुजरात काँग्रेस-कमेटीनं द्वैभाषिक राज्याची मागणी फेटाळली आणि राज्य-पुनर्रचना समितीच्या शिफारशी मान्य असल्याचा ठराव केला. सौराष्ट्र कायदेमंडळानं वेगळाच ठराव केला, राज्य-पुनर्रचना-समितीच्या शिफारशीबद्दल त्यांचं एकमत झालं नाही. तेव्हा त्यांनी मुंबई राज्यांतील गुजरातीभाषिक विभाग, सौराष्ट्र आणि कच्छ यांचं एक राज्य करावं असा ठराव केला. याचा अर्थ गुजरात राज्यांतहि स्वतंत्र राज्याची मागणी होतीच. तिकडे हैदराबादचं विभाजन झाल्यामुळे मराठवाड्याला महाराष्ट्रांत जाण्यास त्यांनी प्रेमानं अनुमति दिली. तिथेहि तसा ठराव झाला. विरोध केला तो

मुंबई कॉंग्रेस-कमिटीनं आणि मुंबई कॉर्पोरेशननं. महाराष्ट्र-कॉंग्रेसचा ठराव हा लोकशाही-विरोधी आहे अशी मुक्ताफळं मुंबई प्रदेश-कॉंग्रेसनं काढलीं आणि मुंबईकर आपलं भवितव्य महापालिकेच्या निवडणुकींत वर्किंग कमेटीच्या ठरावाप्रमाणे सिद्ध करतील असा अहंकारहि व्यक्त केला. ही दर्पोक्ति पुढे प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळीं मात्र स. का. पाटील यांना भोवली. कारण मुंबई महापालिकेच्या निवडणुका या संयुक्त महाराष्ट्राला अनुकूल अशाच झाल्या. नागपूर प्रदेश-कॉंग्रेसनंहि स्वतंत्र विदर्भाचंच स्वागत केलं. इतकंच नव्हे तर, मराठवाड्यांतील पांच जिल्ह्यांनीहि विदर्भांत समाविष्ट व्हावं, असं आवाहन केलं. अशा प्रकारे महाराष्ट्राची सर्व बाजूंनी लांडगेतोड करण्याच्या कारवाया विविध पातळीवर सुरू राहिल्या. संयुक्त महाराष्ट्र तर दूर गेलाच होता, द्वैभाषिकहि होत नाही आणि मुंबईहि मिळत नाही, अशी शोचनीय अवस्था निर्माण झाली. वार्किंग कमिटीचा एकमेव आधार दिल्लीच्या वाटाघाटींतच दुरावला होता.

संयुक्त महाराष्ट्र परिषद इकडे स्वस्थ नव्हती. महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसनं सुचवलेल्या विशाल द्वैभाषिकाच्या पर्यायाबद्दल परिषदेच्या नेत्यांना संशय होता. मुंबईत ५ नोव्हेंबर १९५५ ला परिषदेनं निरनिराळ्या नव्वद कामगार-संघटनांचा एक मेळावा आयोजित केला. एस्. एम. जोशी हे अध्यक्ष आणि कॉमरेड श्री. अ. डांगे हे उद्घाटक होते. या परिषदेनं असा इशारा दिला की, द्वैभाषिक लादलं गेलं किंवा मुंबईचं स्वतंत्र राज्य करण्यांत आलं, तर मुंबईची संपूर्ण कामगार-जनता त्याविरुद्ध मुकाबला करील. मुंबई विधान-सभेंत, राज्य-पुनर्रचनेचा अहवाल १९ नोव्हेंबरला चर्चेला येणार होता. त्या दिवशीं पोलिसांनी मिरवणुकांवर घातलेलं बंधन मागे घ्यावं असंहि परिषदेनं बजावलं.

त्याच दिवशीं मुंबईच्या चौपाटीवर कामगारांची एक सभा झाली. या सभेंत शंकरराव देव यांनी, या प्रश्नांत पंतप्रधानांचा लवाद मान्य करावा, असं आवाहन केलं आणि एकूण द्वैभाषिक योजनेचं विवेचन केलं. विरोधी पक्ष आणि शंकरराव देव यांच्यांतील अंतर आता वाढूं लागलं होतं. परिषदेला लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत होता. महाराष्ट्र मागणी-दिन लोकांनी यशस्वी केला होता. परिषदा, जाहीर सभा यांतून संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा व्यक्त होऊं लागला असतांनाच, मुंबई प्रदेश-कॉंग्रेसनं केलेल्या ठरावाला विरोध दर्शवण्यासाठी, कॉंग्रेसचेच डॉ. नरवणे यांच्या नेतृत्वाखाली दोन हजार कॉंग्रेस-जनांनी मोर्चा काढून आपल्या भावना व्यक्त केल्या.

दरम्यान दिल्लीला प्रदेश-कॉंग्रेसच्या अध्यक्षांची व त्याला जोडूनच वर्किंग कमिटीची बैठक ७ व ८ नोव्हेंबरला झाली. प्रदेश-अध्यक्षांच्या बैठकींत देवगिरीकर विरुद्ध स. का. पाटील असा सामना झडला. महाराष्ट्राच्या विरुद्ध पाटलांनी बरंच गरळ ओकलं. तें ऐकून पंडितजींनी संतापाच्या भरांत सांगितलं की, महाराष्ट्रांतील लोकांच्या माथेफिरूपणाविरुद्ध मी चौका-चोकांत, प्रत्येक रस्त्यांत, गावांत आणि शहरांत विरोध करीन. ही सभा वादळांतच संपली. दुसऱ्या दिवशीं वर्किंग कमिटीच्या बैठकींत, देवगिरीकरांनी बाजू मांडण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. वर्किंग कमिटीनं

त्रिराज्याचा ठरावच अखेर संमत केला. देवगिरीकरांची संमति नव्हती, पण त्यांना गप्प रहाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. कारण वर्किंग कमिटींत विरोधी मत नोंदतां येत नाही. तशी प्रथा नसते.

वर्किंग कमिटीनं त्रिराज्य-योजनेला मान्यता देतांच महाराष्ट्रांत त्याची तीव्र प्रतिक्रिया उमटली. संयुक्त महाराष्ट्र परिषदेतील विरोधी पक्षांनी या निर्णयाचे वाभाडे काढले. मुंबईत मिरवणुकांवर पोलिसांनी बंदी घातल्यानं या बंदी-हुकमाचा भंग करण्याची तयारी सुरू झाली होती. परिषदेनं हे करू नये यासाठी शंकरराव देव अयशस्वी प्रयत्न करत असतांनाच एस. एम्. जोशी, मिरजकर, एस. जी. सरदेसाई यांनी १२ नोव्हेंबरला त्यांना सांगितलं की, बंदी-हुकमाचा भंग करू नका हें आम्हाला सांगण्याऐवजीं मोरारजी देसाई यांनाच सांगा आणि बंदी-हुकूम मागे घेणं कां आवश्यक आहे हें त्यांनाच पटवून द्या. बंदी-हुकूम उठवला नाही तर तो मोडला जाईल, असंहि निर्वाणीचं सांगून ते मोकळे झाले.

सर्वसामान्य जनता आणि राजकीय कार्यकर्ते हे आपल्यापासून दूर गेले आहेत हें देव यांना आता उमजलं. वर्किंग कमिटीच्या निर्णयाविरुद्ध महाराष्ट्राची भावना व्यक्त होण्याच्या दृष्टीनं हरताळ पुकारला जाण्याचीच शक्यता होती. पण त्या संदर्भांत झालेल्या चर्चेनंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांना हरताळाच्या विचारापासून परावृत्त करण्यास देव यांना यश आलं होतं. लोकांनी मिरवणुका काढल्या तर त्यांना रोखतां येणार नाही अशी या नेत्यांनी देव यांना कल्पना दिली होती. मुंबईच्या नरे-पार्कवर देव यांनी मुंबईतल्या कामगारांशीं जें हितगुज केलं त्या वेळीं प्रचंड संख्येनं कामगार उपस्थित होते. पण देव यांच्या राजकीय आयुष्यांतील तीच अखेरची सभा ठरली. कारण त्यापुढल्या काळांत संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी ते दिल्लींतील वरिष्ठ कॉंग्रेस-नेत्यांच्या भेटीगाठी घेत होते आणि चर्चा करत होते; परंतु महाराष्ट्राच्या राजकारणांत देवांच्या शक्तीची आणि सामर्थ्याची मोजदाद पुढच्या काळांत क्वचितच झाली.

मामा देवगिरीकर हे दिल्लीहून त्रिराज्य-योजनेचा वर्किंग कमिटीचा निर्णय खिशांत ठेवून निराशेनं परतल्यानंतर महाराष्ट्र-कॉंग्रेसला हें सर्व सांगणं त्यांना क्रमप्राप्तच होतं. त्यासाठी त्यांनी प्रदेश-कॉंग्रेसची बैठक १६ नोव्हेंबरला पुण्यांत बोलावली. निराशेच्या वातावरणांतच ही सभा भरली होती. वर्किंग कमिटीच्या ठरावाचा विचार तर सभेला करावयाचा होताच, शिवाय मुंबई विधानसभेची १८ तारखेला जी बैठक होणार होती त्यामध्ये कॉंग्रेसच्या आमदारांचं धोरण काय असावं, याचा विचार करणं आवश्यक होतं. प्रदेश-कॉंग्रेसच्या कार्यकारी मंडळासमोर जेव्हा हे विषय आले तेव्हा त्यावर दहा तास हमरी-तुमरीची चर्चा झाली. या सभेनं, गुजरात व मुंबईनं द्वैभाषिकाला मान्यता न दिल्याबद्दल खेद व्यक्त केला आणि मुंबई, मध्यप्रदेश आणि हैदराबादमधील मराठीभाषकांना एकत्र आणण्याचं तत्त्व मान्य केल्याबद्दल वर्किंग कमिटीला धन्यवाद दिले. मुंबई राज्य स्वतंत्र केल्याबद्दल मात्र सभेनं दुःख व्यक्त केलं

आणि मुंबई महाराष्ट्राला देण्याबद्दल वर्किंग कमिटीनं फेरविचार करावा असं सुचवलं; मुंबई मिळवण्याचा 'हृदयपरिवर्तन' हा मार्ग दाखवण्यांत आला. काकासाहेब गाडगीळ यांनीच सर्वसाधारण सभेंत हा ठराव मांडला आणि यशवंतरावांनी त्याला अनुमोदन दिलं. पाठिंबा देतांना चव्हाण यांनी आपली भूमिकाहि स्पष्ट केली. त्यांनी सांगितलं की, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाकडे केवळ तात्त्विक दृष्टीनं न पहातां विविध अंगांनी त्याच्याकडे पाहिलं पाहिजे. काँग्रेस ज्या तत्त्वासाठी झुंजली त्या तत्त्वाला अनुसरून असलेले मार्ग व साधनं यांचा वापर करून आणि काँग्रेसच्या शिस्तीच्या चौकटींत राहूनच आपणांस आपलं उद्दिष्ट गाठायचं आहे. ज्यायोगे काँग्रेस-संघटना दुबळी होईल असं कोणतंहि कृत्य करणं देशाच्या एकतेस व स्वातंत्र्यास विघातक ठरेल यावर आमचा विश्वास असला पाहिजे. त्रिराज्य सूचनेनं संयुक्त महाराष्ट्राच्या ध्येयाच्या दृष्टीनं आपण बरीच प्रगति केली आहे. अंतिम ध्येय गाठण्यासाठी व ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मन वळवण्याचा प्रयत्न करणं हाच मार्ग आहे. लढा, मोर्चा, हरताळ या मार्गांना आमच्या योजनेंत स्थान मिळूं शकणार नाही.

शंकरराव देव यांनी मात्र ही सभा होण्यापूर्वी मुंबई असेंब्लीच्या १८ तारखेला होणाऱ्या बैठकीच्या संदर्भात एक पत्रक काढून, संप न करतां फक्त निदर्शनं करावींत, असं सुचवलं होतं. यशवंतरावांचं त्या संदर्भातील वरील विवेचन काँग्रेस-जनांना कांही वेगळंच सांगून गेलं.

महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसच्या या ठरावानं विरोधी पक्षांच्या नेत्यांचं समाधान झालं नाही. वरिष्ठ काँग्रेस-नेत्यांविरुद्ध महाराष्ट्र-काँग्रेस कणखरपणें उभी राहील अशी त्यांची अपेक्षा होती. राज्य-पुनर्रचना-समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर मुंबईत जी प्रचंड सभा झाली त्या वेळीं संयुक्त महाराष्ट्राच्या प्राप्तीसाठी नेत्यांनी आता निश्चित कार्यक्रम ठरवावा अशी मागणी झाली होती आणि त्याच संदर्भात एस. एम्. जोशी यांनी मुंबईला १५ नोव्हेंबरला सभा घेऊन, देव यांचा हृदयपरिवर्तनाचा मार्ग कुचकामी असल्याचं सांगितलं. त्याचबरोबर १८ नोव्हेंबरला मुंबई असेंब्लीच्या बैठकीच्या दिवशीं बंदी-हुकूम मोडून प्रचंड मिरवणूक काढण्याचंहि त्यांनी जाहीर केलं.

संयुक्त महाराष्ट्रासाठी विरोधी पक्षाच्या प्रदीर्घ लढ्याची, हा सत्याग्रह म्हणजे नांदी होती. एस्. एम्. जोशी यांनी ही घोषणा करतांना, यापुढचा टप्पा संपूर्ण हरताळाचा असल्याचंहि जाहीर केलं. सेनापति बापट यांनी १८ तारखेच्या मिरवणुकीचं आपण नेतृत्व करणार असल्याचं आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी छातीवर गोळ्या झेलून प्राण वेचण्याची तयारी असल्याचं याच वेळीं जाहीर करतांच लोकांमध्ये कमालीचा उत्साह निर्माण झाला.

वरिष्ठ काँग्रेस-नेत्यांचं मन वळवून त्या मार्गानं संयुक्त महाराष्ट्र मिळवण्यासाठी महाराष्ट्र काँग्रेस-नेत्यांचं साहाय्य मिळविण्याची अखेरी या सत्याग्रहानं झाली. कारण

विरोधी नेत्यांनी शंकरराव देव यांना बाजूस सारून १८ नोव्हेंबर १९५५ ला सत्याग्रहाचं रणशिंग फुंकलं. ५०० सत्याग्रह्यांनिशी या दिवशीं सेनापति बापट, आचार्य अत्रे, मिरजकर आदींनी बंदी-हुकमाचा भंग करतांच पोलिसांनी त्यांना अटक केली आणि या वेळेपासून हा लढा खऱ्या अर्थानं रस्त्यावर आला. संयुक्त महाराष्ट्र लढ्याचं दुसरं पर्व आता सुरू झालं.

# ११

मुख्य मंत्री मोरारजी देसाई यांनी कायदे-मंडळांतील काँग्रेस-पक्षाच्या सभासदांची सभा १८ नोव्हेंबरला दुपारीं बोलावली आणि सभागृहांत त्रिराज्याचा जो ठराव मांडावयाचा होता त्याची माहिती निवेदन केली. ठरावाच्या विरुद्ध कुणाला बोलतां येणार नाही आणि जरी कुणी बोललं, तरी त्याला अनुकूल मतदान करावं लागेल, ठरावाच्या विरुद्ध कुणालाच मतदान करतां येणार नाही, आणि ज्याला बोलायचं नसेल त्याला फार तर तटस्थ रहातां येईल अशाहि सूचना दिल्या. या सूचना दिल्लीहून वर्किंग कमिटीकडूनच आल्या आहेत, असं मोरारजींनी सांगितलं.

वर्किंग कमिटीनं साऱ्यांचीच मुस्कटदाबी केलेली होती. साहजिकच सर्व सभासद अस्वस्थ बनले. हा पेंच महाभयंकर होता. तरी पण भाऊसाहेब हिरे यांनी त्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सांगितलं की, सभागृहांत मी एक निवेदन वाचून दाखवीन आणि ठरावाच्या जे विरुद्ध आहेत, त्यांच्या या निवेदनावरील सह्याहि वाचीन. भाषण कुणी करणार नाही.

त्रिराज्य-योजनेला सभागृहांत विरोध होऊन बहुमतानं ती योजना फेटाळली जाणं शक्यच नव्हतं. कारण गुजरातचे आणि कर्नाटकाचे सभासद महाराष्ट्राबरोबर नव्हते आणि मुंबईतले काँग्रेसचे बहुसंख्य सभासदहि महाराष्ट्राच्या विरुद्धच होते. इतकंच नव्हे तर, महाराष्ट्रांतले सर्वच्या सर्व सभासद विरोधांत उभे रहाण्याची शक्यता कमी होती. कायदेमंडळाच्या सभासदांत १४३ महाराष्ट्र, ९८ गुजरात, ४७ कर्नाटक आणि २७ मुंबई असं बलाबल होतं. अशी परिस्थिति असतांनाहि हिरे यांची सूचना मान्य करण्याचा मोठेपणा मोरारजींनी दाखवला नाही. निवेदन वाचण्याची हिरे यांची सूचना त्यांनी अमान्य केली.

या सभेला देवगिरीकर हेहि उपस्थित होते. वर्किंग कमिटीनं जो पेंच टाकला होता त्यांतून सुटण्यासाठी त्यांनी मग काँग्रेस-अध्यक्ष ढेबरभाई यांच्याकडे धांव घेतली;

परंतु ढेबरभाईंनी या कामीं वाटाण्याच्या अक्षता लावल्या आणि वर्किंग कमिटीचा आदेशच सर्वांनी पाळला पाहिजे असं बजावलं. अर्थात् यामागेहि मोरारजींचा हात होताच. काकासाहेब गाडगीळ यांनी दिल्लींत पं. नेहरू आणि पं. पंत यांच्याकडे रदबदली करून विरोधी मत नोंदवण्यास परवानगी मिळवण्याची खटपट केली, परंतु त्याचा त्या वेळीं उपयोग झाला नाही. महाराष्ट्राबद्दलच्या भावना व्यक्त व्हाव्यात ही तळमळ तर सर्वांना होतीच; पण काँग्रेसच्या शिस्तींत राहून हें कसं घडवतां येईल, याची विवंचनाहि होती. मोरारजी यांनी १८ तारखेला प्रथम मंत्रिमंडळाच्या बैठकींत तो ठराव फक्त वाचून दाखवला. त्यावर कांहीच चर्चा झाली नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकी-समोर एखादा प्रश्न किंवा ठराव आल्यानंतर त्यावर चर्चा करून तो संमत करण्यांत येतो आणि मगच तो ठराव अधिकृत मानला जातो. या बैठकींत चर्चा झालेली नसल्यामुळे, हा ठराव मंत्रिमंडळाचा म्हणून मानण्यास कांही मंत्र्यांची तयारी नव्हती.

१९ नोव्हेंबरला सकाळीं कायदेमंडळाचं अधिवेशन संपल्यानंतर तप्त वातावरणांत हिरे यांच्या निवासस्थानीं दुपारीं काँग्रेस-आमदारांची एक बैठक झाली. ठरावावर भाषणं करण्यास आणि मत नोंदण्यास प्रतिबंध झाल्यामुळे सर्वजण संतापले होते. त्या संतापाच्या आवेशांत बहुसंख्य आमदारांनी राजीनामे सादर करण्याची भाषा सुरू केली. या बैठकीला शंकरराव देव हेहि उपस्थित होते. त्यांनी राजीनामे देण्यास पाठिंबाच दर्शवला. हा दबाव मन वळवण्यास साह्याय्यभूत ठरेल असं त्यांचं मत होतं. हिरे आणि डॉ. नरवणे यांनीहि राजीनाम्याची तयारी दर्शवली.

परंतु यशवंतराव चव्हाण यांनी राजीनाम्याचा मार्ग हा शहाणपणाचा ठरणार नाही, किंबहुना काँग्रेस-पक्षाच्या दृष्टीनं तो आत्मघात ठरेल, असा इशारा देऊन राजीनामे सादर करण्यास विरोध दर्शवला. देवगिरीकर यांनीहि हेंच मत व्यक्त केलं. देवगिरीकरांची माहिती अशी होती की, ३० आमदारांचा एक गट, कायदेमंडळांतील चर्चेच्या वेळीं एक तर गैरहजर राहील किंवा उपस्थित राहिल्यास तटस्थपणा स्वीकारील. या गटाला नाईक-निंबाळकर, गणपतराव तपासे, बू साठे, बी. डी. देशमुख, मुस्ताफा फकी अशा कांही मंत्र्यांचा आणि उपमंत्र्यांचा पाठिंबा होता. यांच्या जोडीला मुंबई, गुजरात, कर्नाटक येथील आमदार विरोधांत होतेच. अशा स्थितींत मूळ ठराव तर संमत होणार होताच, पण त्याचबरोबर काँग्रेस-अंतर्गत पडणारी फूटहि चव्हाट्यावर येणार होती.

चव्हाणांनी त्या परिस्थितींत मोरारजींची भेट घेऊन त्यांना सर्व निवेदन केलं आणि काँग्रेस-अंतर्गत निर्माण होणारी फूट टाळण्यासाठी कांही मार्ग काढण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

चव्हाण आणि देवगिरीकर यांनी राजीनाम्याला मोडता घातला, पण त्यामुळे महाराष्ट्र-काँग्रेसची ताकद वाढण्याऐवजीं ती खचली, अशी देव यांनी टीका केली. दरम्यान ठरावावर बोलूं द्यावं आणि मतहि नोंदवूं द्यावं यासाठी दिल्लींत काकासाहेब

गाडगीळ यांचे प्रयत्न सुरू राहिलेच होते. पं. नेहरूंना हें पटवण्यांत त्यांना अखेर यश मिळालं असावं. कारण दिल्लीहून मोरारजींना तसा आदेश मिळाला. मोरारजी हेहि पक्क्या गुरूचे चेले; त्यांनी कॉंग्रेसमधील फूट टाळण्याचं निमित्त पुढे करून ठरावावरील चर्चाच पुढे ढकलावी असं ठरवलं.

मोरारजींनी हा निर्णय करतांच २० नोव्हेंबरला पुन्हा हिरे यांच्या घरीं बैठक बसली. या बैठकीला मोजके लोकच हजर होते. बेमुदत तहकुबीचा पर्याय सर्वांनाच मान्य होता. पण ही तहकुबी मागतांना मोरारजींनी मुंबईच्या प्रश्नाचा फेरविचार करण्याकरिता तहकुबी मागावी असं देव यांचं म्हणणं होतं. दिल्लींत पुन्हा या प्रश्नाची चर्चा घडवण्याच्या दृष्टीनं त्यांना तें सोयिस्कर ठरणार होतं. हा पेंच समजण्याइतके मोरारजी शहाणे राजकारणी असल्यानं देव यांची सूचना ते मान्य करणं शक्यच नव्हतं. तरी पण देवगिरीकर, हिरे व चव्हाण यांनी मोरारजींशीं याबाबत चर्चा केलीच. याच वेळीं दिल्लीहून मोरारजींना कळवण्यांत आलं की, कॉंग्रेस सभासदांना विरोधी भाषण करण्यास परवानगी द्यावी, मतदान मात्र विरोधी करूं देऊं नये. चर्चा-तहकुबीची मोरारजींची सूचना दिल्लीनं नाकारली, हाच त्याचा अर्थ होता.

महाराष्ट्र कॉंग्रेस-पक्षाचे आमदार आणि नेते यांच्यांत हीं खलबतं सुरू असतांनाच स. का. पाटील यांना हाताशीं धरून मोरारजींनी मुंबई प्रदेश-कॉंग्रेसतर्फे २० नोव्हेंबरलाच सायंकाळीं चौपाटीवर एक जाहीर सभा इकडे आयोजित केली. राज्य-पुनर्रचना-समितीच्या अहवालाबाबत कॉंग्रेस-पक्षाची काय भूमिका आहे हें जनतेला समजावून सांगणं हा या सभेचा उद्देश ठरवण्यांत आला. वस्तुतः या अहवालाबद्दल जनतेंत अगोदरच आग भडकलेली होती. पाटील-मोरारजींनी त्यामध्ये आणखी तेल ओतण्याचं कारण नव्हतं. या दोघांचा राजकीय क्षेत्रांतील अनुभव पहातां त्यांना या सभेचा धोका उमजला नसेल, असं मानतां येत नाही. जो विषय कायदेमंडळापुढे असून अनिर्णीत स्थितींत राहिलेला आहे आणि ज्याबाबत भावना तीव्र बनल्या आहेत अशा विषयावर स्वतः मुख्य मंत्र्यानंच जाहीरपणानं बोलावं हें खचितच शोभादायक नव्हतं. पण तरीहि मोरारजी-पाटील यांनी तो अट्टाहास केला; त्याचा परिणाम मात्र त्यांना भोगावा लागला.

मुंबईतलं वातावरण १८ नोव्हेंबरच्या सत्याग्रहापासून तापलेलंच होतं. सेनापति बापट यांच्या नेतृत्वाखाली त्या दिवशीं निघालेला मोर्चा संपूर्ण शांततामय होता, पण एकूण वातावरण मात्र तंग होतं. कौन्सिलहॉलकडे जाणारे सर्व रस्ते पोलिसांनी रोखले होते. जागोजाग हत्यारी पोलिस सज्ज होते. कौन्सिलहॉलचं आवारहि पोलिसांनीच भरलं होतं. मोरारजींच्या आदेशानुसार सर्वत्र चोख बंदोबस्त ठेवला गेला. कौन्सिल-हॉलमध्येहि पोलिसांचं राज्य पाहिल्यानंतर सभापति नानासाहेब कुंटे यांना सभासदांची क्षमा मागावी लागली. मोर्चाचे म्होरके सेनापति बापट होते त्यांना व आचार्य अत्रे, मिरजकर यांना मिरवणूक-बंदीचा भंग केल्याबद्दल पोलिसांनी अटक करतांच एस्. एम्. जोशी, एस्. जी. पाटकर आदींनी कडाडून टीका केली. एवढं घडतांच या अटकेच्या

निषेधार्थ २१ तारखेचा संपूर्ण हरताळ पाळण्याचं संयुक्त महाराष्ट्र कृति-समितीनं आवाहन केलं.

शहरांत असं वातावरण निर्माण झालेलं असतांनाहि पाटील-मोरारजींनी चौपाटीवर जाहीर सभेचा घाट घालतांच, लोकांनी या सभेंतच त्यांना उत्तर देण्याचं ठरवलं. सभा सुरू होतांच लोकांनी प्रश्नांचा मारा सुरू केला. वक्त्याला बोलणंहि मुष्किल ठरलं. तरीहि भाषणं चालूच राहिल्यानं लोकांनी दगडफेक सुरू केली. सभेवर सर्व बाजूंनी दगड, चपला येत राहिल्या. त्यांतला एक दगड मोरारजींना लागल्यानं ते किरकोळ जखमी झाले. गडबड आणि अशांतता निर्माण करून गुंडगिरीनं महाराष्ट्राला मुंबई मिळणार नाही, असं मोरारजींनी या सभेंत सांगितलं; तर स. का. पाटील यांनी याहीपुढे जाऊन लोकांना खिजवण्याचा आणि भडकवण्याचा उद्योग केला. पुढच्या पांच हजार वर्षांत महाराष्ट्राला मुंबई मिळणार नाही अशी त्यांची भविष्यवाणी होती. आपल्या दमदाटीनं सारे हबकतील अशी पाटलांची कल्पना असावी. पण आपण आपल्या चावडींत बसून ही दमबाजी करत नसून, चौपाटीवर हजारो लोकांना दटावत आहोंत याचं भान त्यांना राहिलं नाही. सभेला हजर असलेल्या गुजराती नेत्यांना आणि त्यांच्या बगलबच्चांना पाटलांच्या अशा धिटाईबद्दल आनंदहि वाटला असेल, पण साऱ्या महाराष्ट्राचं मन मात्र या मुजोरीनं बिथरलं. मराठी भाषकांच्या मनाला झालेल्या जखमेवर पाटलांनी मीठ चोळलं होतं. त्यामुळे कमालीचा प्रक्षोभ माजला. पाटील यांनी जाणूनबुजून मराठी मनाच्या स्वाभिमानाचा अपमान केला होता. मोरारजी आणि पाटील यांनी या सभेच्या आणि भाषणाच्या रूपानं साऱ्या महाराष्ट्राला आव्हान देऊन दोन हात करण्यास आमंत्रणच दिलं होतं.

चौपाटीवरील सभेंत उडालेल्या गोंधळानं महाराष्ट्र-कॉंग्रेसचे नेतेहि अस्वस्थ बनले, पण त्यांनी पाटील आणि मोरारजी यांना जाहीरपणें दोष न देतां गोंधळ माजवल्याबद्दल लोकांनाच दोष दिला. शंकरराव देव यांनी तर प्रायश्चित्त घेण्यासाठी म्हणून पांच दिवसांचं उपोषणच सुरू केलं. मोरारजी-पाटील यांनी लोकांना भडकावून देण्याच्या डावपेंचा-बद्दल देवगिरीकर गप्प कां आहेत, याचा उलगडा जनतेला होत नव्हता. गांधीप्रणीत आत्मशुद्धीचा – देव यांच्या उपोषणाचा परिणाम लोकांच्या मनावर होणं शक्यच नव्हतं. कारण त्यांच्या स्वाभिमानालाच पाटील-मोरारजी यांनी आव्हान दिलं होतं. याचं दर्शन या सभेच्या दुसऱ्याच दिवशीं घडलं.

संयुक्त महाराष्ट्र कृति-समितीनं २१ तारखेला हरताळाचा आदेश दिलेलाच होता. हा हरताळ एवढा प्रचंड प्रमाणांत यशस्वी झाला की, विरोधी पक्षाचे नेतेहि त्यामुळे आश्चर्यचकित झाले. मनांतून संतापलेले हजारो लोक हरताळाच्या दिवशीं दुपारीं कौन्सिल-हॉलच्या रोखानं निघाले. हा मोर्चा शांततेनं चालला होता. मुंबईतल्या फ्लोराफाउंटन भागांत मोर्चेवाले पोंचले तेव्हा तिथे माणसांचा अक्षरशः महासागर निर्माण झाला. हत्यारी पोलिस, साधे लाठीधारी पोलिस आणि गृहरक्षक हेहि मोठ्या संख्येनं रस्ते अडवून उभे

होते. फ्लोराफाउंटनला त्या दिवशीं युद्धभूमीचं स्वरूप प्राप्त झालं. पोलिस लोकांना मागे हटवत आहेत आणि लोक जिद्दीनं पुढेच जात आहेत, असं बराच वेळ सुरू राहिलं. लोकांचा रेटा थोपवता येत नाही असं पाहून मग पोलिसांनी लाठ्या चालवून त्यांना मागे हटविण्यास प्रारंभ केला. मागोमाग अश्रुधुराचीं नळकांडीं फुटूं लागलीं आणि लगेच गोळीबार सुरू झाला. गोळीबारालाहि लोकांनी दाद दिली नाही आणि परिस्थिति पूर्णपणें पोलिसांच्या आटोक्याबाहेर गेली. गोळीबारानं माणसं मारलीं जात आहेत असं समजतांच एस्. एम्. जोशी, नौशेर भरूचा, अमूल देसाई हे कौन्सिलहॉलमधून धांवत बाहेर आले आणि भडकलेल्या लाखो लोकांना त्यांनी थोपवलं. या सर्व लोकांना त्यांनी चौपाटीवर सभेसाठी चला म्हणून सांगितलं आणि तिथली गर्दी हटवण्याच्या दृष्टीनं त्या दिवशीं तातडीनं चौपाटीवर सभा आयोजित केली.

फ्लोराफाउंटनच्या ठिकाणीं हजारो लोक जमा झालेले असतांनाहि, संयुक्त महाराष्ट्राचे नेते बनलेले देव किंवा हिरे यांच्यापैकी कुणीहि त्या दिवशीं लोकांसमोर आले नाहीत. आणीबाणीच्या त्या क्षणीं, लोकांना या नेतृत्वाच्या पराभवाचंच दर्शन घडलं. पोलिसांनी केलेल्या गोळीबारांत या ठिकाणीं दहा लोक ठार झाले आणि ३०० जखमी झाले. पोलिसांनी गर्दी हटवण्यासाठी बंदुकीच्या ऐंशी फैरी झाडल्या आणि विरोधी पक्षांनी मग त्यावरहि झोड उठवली.

सारं मुंबई शहरच अशान्त बनलेलं असल्यामुळे त्या परिस्थितींत कायदेमंडळांत, ठरावावर चर्चा करीत रहाणं योग्य नव्हे हें जाणून देवगिरीकर, चव्हाण, हिरे, बाळासाहेब देसाई, बॅ. जी. डी. पाटील हे मोरारजींना भेटले आणि दिल्लीहून चर्चा-तहकुबीला मान्यता आणा, अशी त्यांना विनंती केली. मोरारजींनी मग दिल्लीला फोन करून, मुंबईत निर्माण झालेली परिस्थिति सांगतांच, चर्चा-तहकुबीची परवानगी मिळाली आणि पक्षांतर्गत निर्माण झालेला पेंच तात्पुरता सुटला. गोळीबाराच्या दुसऱ्याच दिवशीं म्हणजे २२ नोव्हेंबरला कायदेमंडळांत २४२ विरुद्ध २८ असं मतदान होऊन चर्चा-तहकुबी मंजूर झाली. चर्चा तहकूब होईपर्यंत एकामागोमाग एक इतक्या गुंतागुंतीच्या घटना घडत राहिल्या की, चर्चा तहकूब होऊनहि, महाराष्ट्रांतील काँग्रेसचे नेते त्या मनःस्थितींतून बाहेर पडले नव्हते. उबग यावा अशीच सारी परिस्थिति होती.

त्याच मनोवस्थेंत हे सर्वजण, त्याच दिवशीं हिरे यांच्या बंगल्यावर, पुढचा विचार करण्यासाठी म्हणून जमा झाले. वरिष्ठ काँग्रेस-नेत्यांना आपल्या तीव्र भावनांचं दर्शन कसं घडवायचं या विचारानं साऱ्यांना पछाडलं होतं. असेंब्लीचे सभापति असूनहि सर्व प्रथा बाजूला सारून नानासाहेब कुंटे हे या बैठकीसाठी हजर राहिले. महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसच्या आदेशानुसार पुढे पावलं टाकायचीं, की काँग्रेस वर्कींग कमिटीची आज्ञा प्रमाण मानायची, याबाबत मग बैठकींत ऊहापोह झाला. ही चर्चा सुरू असतांनाच ११६ आमदारांनी आपल्याकडे राजीनामे आणून दिले आहेत, असं भाऊसाहेब हिरे यांनी

सांगितलं. त्याबरोबर हे सर्व राजीनामे सभापतींकडे पाठवून द्यावेत असं कुंटे यांनी सुचवलं. प्रदेश-कॉंग्रेसच्या अध्यक्षांकडे राजीनामे पाठवूं नयेत असंहि सांगितलं.

आमदाराचा लेखी राजीनामा सभापतीकडे येतांच तो परिस्थितीनुसार मंजूर करण्याची तरतूद असतेच. पण शंकरराव देव किंवा हिरे यांपैकी कुणालाच कुंटे यांचा सल्ला मान्य झाला नाही. यशवंतराव चव्हाण यांनी यापुढच्या काळांत कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा जो आदेश असेल तोच मी पाळीन, प्रदेश कॉंग्रेसच्या कांही जणांच्या मतांप्रमाणे आपणांस वागतां येणार नाही, असं स्पष्टच बजावलं. हिरे यांच्या हातांत ११६ राजीनामे जरी आले होते, तरी चव्हाणांना पाठिंबा देणाऱ्यांचे राजीनामे त्यांमध्ये नव्हते. मुंबईतल्या कॉंग्रेस-आमदारांपैकीहि दहा जणांनी राजीनामे दिलेले नव्हते; आणि जरी चव्हाणांना पाठिंबा देणारांचे व अन्य राजीनामे आले असते, तरी त्यांची संख्या १५० पर्यंतच पोंचणार होती. याचा अर्थ संयुक्त महाराष्ट्राला विरोध करणारांचीच संख्या यापेक्षा अधिक ठरणारी होती. राजीनामे देणें म्हणजे हात दाखवून अवलक्षण करून घेण्यासारखंच होतं. तरी पण यशवंतराव चव्हाण यांनी आपली निष्ठा वर्किंग कमिटीशीं राहील असं सांगतांच, प्रदेश-कॉंग्रेसच्या नेत्यांनी तेंच भांडवल केलं आणि चव्हाणांची ही भूमिका विश्वासघातकी आहे असं ते एकमेकांना सांगूं लागले.

शंकरराव देव यांनी त्या वेळीं पांच दिवसांचं उपोषण आरंभलं होतं. चव्हाणांच्या भूमिकेबद्दल बोलतांना त्यांचा तोल सुटला आणि ते चव्हाणांबद्दल तुच्छतेनं बोलूं लागले. देव यांच्या तुच्छतापूर्वक बोलण्याचा मथितार्थ देवगिरीकरांकडून चव्हाणांना समजतांच त्यांना तें अपमानकारक वाटलं आणि यापुढच्या कोणत्याहि चर्चेच्या वेळीं देव यांना बोलवायचं नाही, असा त्यांनी निर्णयच केला. शंकरराव देव यांच्यासारख्या प्रौढ आणि अनुभवी नेत्यानं त्या वेळीं तोल राखला असता, तर पुढच्या काळांतहि त्यांना चव्हाणांशीं अर्थपूर्ण संवाद सुरू ठेवतां येणं शक्य होतं; पण त्यांनी स्वतःला सावरलं नाही आणि त्याचाच परिणाम पुढे फलटणच्या सभेंत यशवंतरावांनी देव यांच्या नेतृत्वाविरुद्ध उघड उघड बंडाचं निशाण फडकवण्यांत झाला.

कुंटे यांच्या सूचनेप्रमाणे हिरे व देव यांनी ११६ आमदारांचे राजीनामे सभापतींकडे पोंचवले असते, तर त्यांतून कदाचित् वेगळं चित्र निर्माण झालंहि असतं. एक तर लोकांमध्ये त्याची एक वेगळी प्रतिक्रिया उमटली असती आणि राजीनामे देण्यासाठी जे कच खात होते किंवा महाराष्ट्राला विरोध करायचा म्हणून बाजूला रहात होते, त्यांच्यावरहि लोकांनी प्रचंड दबाव आणून, त्यांनाहि राजीनामे देण्यास भाग पाडलं असतं. मोरारजींचाहि नक्षा त्यामुळे कांहीसा उतरला असता. पक्षाचा बहुमताचा पाठिंबा असल्याचं दर्शवून ते जें बोलत होते आणि कृति करत राहिले होते तीहि थांबली असती. मोरारजींचं बहुमतच संपलं असतं, तर वर्किंग कमिटीला मग लोकेच्छेचा आदर करून राष्ट्रपतींची राजवट महाराष्ट्रांत निर्माण करावी लागली असती किंवा सार्वत्रिक निवडणुकीचा निर्णय तरी करावा लागला असता; परंतु हें सर्व घडायचं

तर देव आणि हिरे यांनी त्यांच्याकडे आलेले ११६ राजीनामे योग्य ठिकाणीं पाठवण्याचं धाडस दाखवण्याची जरुरी होती; परंतु त्यांनी हे राजीनामे सभापतींकडेहि पाठवले नाहीत आणि प्रदेश-कॉंग्रेस-अध्यक्षांच्या ताब्यांतहि दिले नाहीत.

कॉंग्रेस-अध्यक्षांचा अधिकृत लेखी आदेश नसल्यामुळे केवळ भावनेच्या आहारीं जाऊन राजीनामे देणं याच्याशीं चव्हाण सहमत नव्हते. कुंटे यांची सूचना दबाव निर्माण करण्यासाठी कितीहि उपयुक्त ठरणारी असली, तरी कॉंग्रेसमध्ये फूट निर्माण होऊं नये या मताचेच लोक अधिक असल्यामुळे, वर्किंग कमिटीचा आदेश पाळणारा एक गट आणि सदसद्विवेकबुद्धीप्रमाणे राजीनामे देणाऱ्यांचा दुसरा गट, असं चित्र कॉंग्रेस-पक्षांत मात्र यामुळे निर्माण झालं.

शंकरराव देव यांनी २६ नोव्हेंबरला आपलं पांच दिवसांचं उपोषण समाप्त केल्यानंतर २९ नोव्हेंबरला हिरे यांच्यासह ते दिल्लीस रवाना झाले. पं. पंत यांच्याशीं नव्यानं चर्चा करण्यासाठी म्हणून ते गेले होते. मागे महाराष्ट्रांत आता आपल्या नेतृत्वावरच बॉंब पडणार आहे याची त्यांना कल्पना नसावी. देव हे दिल्लींत असतांनाच, महाराष्ट्र-कॉंग्रेस-अंतर्गत मतभेदाचा फलटणच्या सभेंत स्फोट झाला. १ डिसेंबरला फलटणला नाईक-निंबाळकरांच्या मनमोहन राजवाड्यांत सातारा जिल्हा-कॉंग्रेसच्यातर्फे एक सभा आयोजित करण्यांत आली होती. चव्हाण, नाईक-निंबाळकर आणि तपासे हे तीनहि मंत्री या सभेला उपस्थित होते. मोरारजी देसाई यांनी त्रिराज्य-योजना सादर केली तेव्हा राजीनामे कां दिले नाहीत, हें कार्यकर्त्यांना समजावून सांगणं हा या सभेचा हेतु होता. या सभेंत यशवंतरावांनी त्या संदर्भात शंकरराव देव यांच्या नेतृत्वावरच जोराचा हल्ला चढवला. देवगिरीकर आणि भाऊसाहेब हिरे यांना याची कल्पना होतीच. कारण संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत माझा मार्ग आता वेगळा राहील याची जाणीव चव्हाण यांनी हिरे यांना अगोदरच दिली होती. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ संप, मोर्चे, उपोषण या मार्गानं पुढे नेण्याचा कांही विरोधकांचा डाव असून कॉंग्रेसला या मार्गानं जातां येणार नाही, हें आपलं मत चव्हाण यांनी शंकरराव देव यांनाहि या सभेपूर्वी सहा दिवस अगोदर कळवलं होतं.

फलटणच्या सभेंत चव्हाण यांनी प्रामुख्यानं देव यांच्या नेतृत्वाबद्दल नाराजी व्यक्त केली. हिरे आणि देव हातांत हात घालून, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दल पावलं टाकत होते, तरी चव्हाण यांनी हिरे यांच्या नांवाचा या सभेंत उघडपणें उल्लेख केला नाही. असं असलं तरी हिरे यांना परस्पर उत्तर मिळणारच होतं. राजीनामे गोळा करणं, उपोषण करणं या देव आणि हिरे यांच्या हालचाली सरळ सरळ कॉंग्रेस-पक्षाच्या शिस्तीला बाध आणणाऱ्या आहेत; कॉंग्रेस पक्षाचा अधिकृत आदेश नसतांना, प्रदेश-कॉंग्रेसनं आमदारांकडून राजीनामे घेण्याचा विचार करणं हें अयोग्य आहे, असं चव्हाणांनी या सभेंत कार्यकर्त्यांना सांगितलं. राजीनामे, संप, उपोषण असल्या दबावाच्या राजकारणाला चव्हाणांचा विरोध होता.

शंकरराव देव हे त्या वेळीं काँग्रेसचे सभासदहि नव्हते. तरीहि ते काँग्रेस-आमदारांना राजीनाम्याचा सल्ला देऊन, राजीनाम्याला अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीनं स्वतः उपोषणाला बसले. देव हे पूर्वीचे महाराष्ट्र-काँग्रेसचे अध्यक्ष. अखिल भारतीय काँग्रेसचे ते चिटणीसहि होते आणि आता संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष झाले होते. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दलची त्यांची तळमळ निर्विवाद होती. पं. नेहरू, पंत यांच्या मनांत देव यांच्याबद्दल आदर होता. त्यामुळे दिल्लीस ते ज्या वेळीं चर्चेसाठी जात असत त्या प्रत्येक वेळीं त्यांचा युक्तिवाद श्रेष्ठांनी समजून घेतला, त्यांना सन्मानानं वागवलं. परंतु त्यांची ही प्रतिष्ठा जमेस धरूनहि महाराष्ट्रांत त्यांच्याकडून दिला जाणारा सल्ला आणि ते करत असलेली कृति एक दिवस महाराष्ट्र-काँग्रेसच्या मुळावरच घाव घालण्यास कारणीभूत ठरण्याची शक्यता निर्माण झाली होती. त्यामुळे महाराष्ट्र-काँग्रेसमधील त्यांचं नेतृत्व झुगारून देणं यशवंतरावांनी काँग्रेस-पक्षाच्या दृष्टीनं व्यवहार्य मानलं असावं. मोठ्या धिटाईनं फलटणच्या सभेंत त्यांनी तें झुगारून दिल्याचं जाहीर केलं. आपल्या या भूमिकेचा गैरफायदा विरोधी पक्ष घेतील आणि महाराष्ट्रांत वैयक्तिक-दृष्ट्या त्याचे परिणाम सहन करावे लागतील याची कल्पना असूनहि त्यांनी हें केलं. देव यांचं नेतृत्व झुगारून देतांना संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दलची आपली भूमिकाहि या सभेंत त्यांनी स्पष्ट केली. आपल्याला मंत्रिपदाची आसक्ति नाही हेंहि त्यांनी पुन्हा एकदा सांगितलं. देव हे काँग्रेसचे सभासद राहिलेले नसल्यानं, काँग्रेस-पक्षाची कसलीहि जबाब-दारी त्यांच्यावर उरलेली नव्हती. या संदर्भात यशवंतरावांनी देव यांना एका पत्राद्वारे अगोदरच कळवलं होतं की, उपोषण, निदर्शनं, राजीनामे वगैरे भाषा तुम्ही बोलणार असाल, तर कृपया काँग्रेसच्या नांवाखाली ती भाषा तुम्ही बोलूं नये.

देव हे वाटाघाटीसाठी म्हणून दिल्लीला हिरे यांच्यासमवेत गेले असतांना, मागे महाराष्ट्रांत यशवंतराव यांनी फलटणच्या सभेंत त्यांचं नेतृत्व झुगारून दिल्याचं जाहीर होतांच, महाराष्ट्रांत त्यांच्यावर फितुरीचे, विश्वासघाताचे आरोप सुरू झाले. फलटणच्या सभेपूर्वी घडलेल्या घटना लक्षांत घेतां यशवंतरावांचं बोलणं हें विश्वासघाताचं, फितुरीचं ठरण्याचं वस्तुतः कारण नव्हतं. देव, हिरे यांना अगोदर एक आठवडा त्यांनी आपले विचार पत्रानं कळविलेच होते. त्या दोघांनाहि त्याची कल्पना होती आणि तरीहि कोणत्याहि प्रकारचं निराकरण न करतां ते दोघे दिल्लीला गेले होते. अर्थात् विरोधकांनी या परिस्थितीचा लाभ उठवणं त्या काळांत स्वाभाविकच होतं. संयुक्त महाराष्ट्राचा न्याय न देणाऱ्या काँग्रेसविरुद्ध लोकमत तयार होण्यासाठी त्याचा उपयोग होता आणि त्याप्रमाणे त्यांनी तो करून घेतला.

या सभेंतील यशवंतरावांच्या आणखी एका विधानानं त्या काळांत महाराष्ट्रांत खळखळ उडवली. "संयुक्त महाराष्ट्र आणि पं. नेहरू असा पेंच माझ्यापुढे आला, तर मी नेहरूंचाच कौल देईन" असं तें विधान होतं. अर्थात् हें ठोम विधान करण्यापूर्वी एकूण परिस्थितीचं विश्लेषणहि त्यांनी केलं होतं आणि त्या विवेचनाचा निष्कर्ष म्हणून

कार्यकर्त्यांना त्यांनी ही भूमिका सांगितली होती; परंतु मागचा-पुढचा संदर्भ सोडून देऊन एवढं एकच विधान कुणी उगाळत बसायचं ठरवलं, तर महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ म्हणणाऱ्या यशवंतरावांना दोष चिकटवणं सुलभ ठरतं. वस्तुतः १९५३ मध्येहि त्यांनी पूर्वी एका संदर्भात ही आपली भूमिका व्यक्त केलेलीच होती; परंतु फलटणच्या सभेचा संदर्भ वेगळा होता. परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव यांचं नेतृत्व त्यांनी झुगारून दिलं होतं, आणि नेहरूंचा मोठेपणाहि याच सभेंत सांगितला होता. विरोधकांनी ' अधिकस्य अधिकं फलम् ' या न्यायानं या दोन्ही गोष्टी एकत्र करून प्रखर विरोधाची हवा निर्माण केली नसती तरच नवल !

यशवंतरावांनी हें विधान भारत-निष्ठा आणि महाराष्ट्र-निष्ठा या संदर्भात केलं होतं. महाराष्ट्राचं हित तर त्यांना अभिप्रेत होतंच आणि संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांत त्यासाठी तर ते अगदी प्रारंभापासून निगडित झाले होते. दिल्ली, मुंबई, पुणें आदि प्रत्येक ठिकाणीं होत असलेल्या चर्चेंतहि ते प्रामुख्यानं भाग घेत होते, पण हे सर्व करत असतांना त्यांनी आपला दृष्टिकोन एकांगी ठेवला नव्हता, एकांगी बनूं दिला नव्हता. देशाचं हित तें महाराष्ट्राचं हित हें स्वातंत्र्यपूर्वकाळापासून त्यांना अभिप्रेत होतं. स्वातंत्र्याच्या चळवळींत काम करतांनाच त्यांच्या मनाचा पिंड तसा तयार झाला होता. स्वातंत्र्याच्या लढ्यांत महाराष्ट्र आघाडीवर राहिला, पण भारताचा तो एक भाग म्हणून; महाराष्ट्र म्हणजे संपूर्ण देश नव्हे, देशाचा तो एक महत्त्वाचा भाग असल्यानं, देशा-बरोबर महाराष्ट्रानं राहिलं पाहिजे हेंच त्यांनी कार्यकर्त्यांना फलटणच्या सभेंत सांगितलं. पं. नेहरू हे देशाचे पंतप्रधान म्हणजे देशाचं प्रतीक होतं आणि त्याच अर्थानं त्यांना मी मोठे मानतों, असं चव्हाण प्रतिपादत होते.

मिरजेच्या एका सभेंत १९५३ मध्ये, त्यांना विचारलेल्या एका प्रश्नाच्या संदर्भात, त्यांनी हीच भूमिका विशद केली होती; परंतु फलटणच्या सभेनंतर मात्र चव्हाणांविरुद्ध कठोर टीकेचं रान उठलं आणि संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नांत चव्हाण हे पं. नेहरूंच्याच धोरणाचा – म्हणजे महाराष्ट्रविरोधी धोरणाचा – पाठपुरावा करीत आहेत असं सांगितलं जाऊं लागलं. टीकेचा असा गदारोळ उठला असतांना यशवंरावांनी आपल्या म्हण-ण्याच्या समर्थनार्थ फारशी कुठे धांवपळ केली नाही. याचं कारणहि उघड होतं. लोक त्या वेळीं भले-बुरे समजून घेण्याच्या मनःस्थितींतच राहिले नव्हते. विरोधकांनी लोकांची मनःस्थिति वेगळ्या अंगानं तयार केली होती. फलटणच्या सभेंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, बाळासाहेब देसाई, किसन वीर यांनीहि यशवंतरावांच्या भूमिकेलाच भरघोस पाठिंबा दिला होता, किंबहुना कठोर शब्दांतच त्यांनी देव यांच्यावर हल्ला चढवला.

यशवंतरावांनी संयुक्त महाराष्ट्राची आणि मुंबईची मागणी सोडलेली नव्हती. फलटणच्या सभेंत त्यांनी हें आवर्जून सांगितलं की, आपली मागणी न्याय्य आहे हें पटवून देणं आणि मुंबई महाराष्ट्रांत आल्यास त्यामध्ये कुणी धास्ती बाळगावी असं घडणार नाही याची संबंधितांना खात्री पटवून देणं, त्याचबरोबर राष्ट्रीय पुढाऱ्यांचीहि

याबाबत खातरजमा करून देणं हा या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा मार्ग आहे. त्रि-राज्याची योजना अमान्य करावी असं त्या वेळीं सांगितलं जात होतं, पण हें योग्य नव्हे असं यशवंतरावांचं मत होतं. याबाबत त्यांनी या सभेंत सांगितलं की, त्रिराज्याची योजना फेटाळायची म्हणजे महाराष्ट्राच्या जवळ येत असलेल्या विदर्भाला दूर ढकलणं होय. संयुक्त महाराष्ट्राची पूर्तता व्हायची तर विदर्भ महाराष्ट्रांत येणं आवश्यक आहे, तें महत्त्वाचं आहे. हा साराच प्रश्न महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसनं संपूर्णरीत्या स्वतःकडे घेऊन, राष्ट्रीय नेत्यांकडून लोकशाही पद्धतीनं न्याय मिळवला पाहिजे अशी यशवंतरावांची भूमिका होती.

या सभेंत याचा ऊहापोह करतांना त्यांनी सांगितलं की, राज्य-पुनर्रचना कमिशन-समोर महाराष्ट्राची मागणी करतांना आणि बाजू मांडतांना ती सर्वपक्षीय मागणी असणं हें युक्तच होतं. संयुक्त महाराष्ट्र परिषदेसमवेत, शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली त्यासाठी सर्वांनी कामहि केलं, परंतु राज्य-पुनर्रचना कमिशनकडे केलेली मागणी फेटा-ळली गेल्यानंतर, तिच्या पूर्ततेसाठी नव्या परिस्थितींत सर्वपक्षीय संघटना करून संप, मोर्चे, हरताळ, आंदोलन या मार्गांचा अवलंब करून चालणार नाही. प्रदेश-कॉंग्रेसनं स्वतःच त्यासाठी पुढाकार घेऊन लोकशाही पद्धतीनं आपली मागणी पटवून देऊन न्याय मिळवला पाहिजे. कॉंग्रेस-कार्यकर्त्यांनी अशी स्पष्ट व स्वच्छ भूमिका न स्वीकारतां स्वस्थ रहाण्याचं ठरवलं, तर मुंबईच्या जनतेला केवळ विरोधकांच्या, कम्युनिस्टांच्या ताब्यांत दिल्यासारखं होईल, असा इशाराहि त्यांनी दिला.

यशवंतरावांच्या फलटणच्या सभेचा अर्थ लावण्याची मग महाराष्ट्रांत चढाओढ सुरू झाली. कॉंग्रेस-पक्षांतले त्यांचे जे विरोधक होते त्यांना असं वाटलं की, गुजराती नेत्यांच्या वृत्तीचे 'देशी वसाहतवाद' म्हणून चव्हाणांनी वर्णन करतांच जी कटुता निर्माण झाली होती ती शांत करण्यासाठी म्हणून चव्हाणांनी हा पवित्रा घेतला असावा. र. के. खाडिलकर यांनी तर एक निवेदन काढून चव्हाणांनी पाठींत खंजीर खुपसला आहे, असं त्याचं वर्णन केलं. माधवराव बागल यांनीहि कडाडून हल्ला चढवला. देवांचं नेतृत्व झुगारून दिलं यापेक्षाहि चव्हाणांनी भाऊसाहेब हिरे यांच्या नेतृत्वाला धक्का दिल्याचं दुःख बागल यांना अधिक झालं.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे नेते म्हणून हिरे यांचं नेतृत्व मान्य असल्याचं चव्हाण यांनी पूर्वी शिरोळी गावच्या जाहीर सभेंत सांगितलं होतं. बागल यांनी या संदर्भांत चव्हाण यांना त्याची आठवण करून दिली आणि पंतप्रधान या नात्यानं पं. नेहरू यांचं श्रेष्ठत्व असलं, तरी शुद्धीवर असलेला महाराष्ट्राचा कुणीहि नेहरूंपेक्षा महाराष्ट्रालाच अग्रस्थान देईल, असंहि सांगितलं. चव्हाण यांना लोकशाहीच्या खऱ्या आशयाचा विसर पडला असून ते स्वतःच्याच हितसंबंधांची जपणूक करत असल्याबद्दल बागल यांनी त्यांना दोष दिला.

चव्हाण आणि त्यांचे साथीदार हे मोरारजींच्या तालावर नाचत आहेत आणि काँग्रेस-अंतर्गत बंडाळी निर्माण होण्यासाठी त्यांचे भागीदार बनत आहेत, असा समज फलटणच्या सभेनंतर सर्वत्र पसरला आणि त्यांतूनच त्यांना सूर्याजी पिसाळ, विश्वासघातकी अशीं विशेषणं बहाल करण्यांत आलीं. देव आणि हिरे यांच्याकडून प्रदेश-काँग्रेसचं नेतृत्व हिसकावून घेण्यासाठी मोरारजींनी आपले तीन मंत्री कामाला लावले आहेत असंहि बोललं जाऊं लागलं; आणि स. का. पाटील यांनी अतिउत्साहानं चव्हाण यांचं अभिनंदन करण्यासाठी जी धांव घेतली त्यामुळे तर हा समज मराठी-भाषकांच्या मनांत अधिकच दृढ होण्यास मदत झाली.

देवगिरीकर हे प्रदेश-काँग्रेसचे अध्यक्ष होते; परंतु त्यांनी चव्हाण यांच्या विरुद्ध कुठे शब्द उच्चारला नाही. चव्हाण जें बोलले तें बोलण्याची आत्ताची वेळ नाही, एवढाच त्यांचा अभिप्राय होता. देव यांच्याबद्दल चव्हाण जें बोलले तें बरोबर होतं, पण आणखी कांही दिवसांनंतर बोलले असते तरी चाललं असतं, असं त्यांना सुचवायचं होतं. देवगिरीकरांना दुय्यम स्थान देऊन, देव यांनी दिल्लींतल्या चर्चेचीं सूत्रं स्वतःकडे घेतलीं होतीं आणि हिरे हेहि देवांच्याच मतानं, कांहीसं स्वतंत्र असंच वागत असल्यानं देवगिरीकरांना तें खटकलंच होतं. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न, प्रदेश-काँग्रेसनं स्वतंत्रपणानं हाताळावा, या सूचनेचं देवगिरीकर यांनी मनांतून स्वागतच केलं असलं पाहिजे.

महाराष्ट्रांतील काँग्रेस-अंतर्गत या उठावाचा एक परिणाम मात्र निश्चित झाला. दिल्लीमध्ये देव आणि हिरे काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांशीं सौदेबाजी करण्यांत जे गुंतले होते ते निराधार बनल्यासारखे झाले. मागणीच्या पाठीमागचा एकमुखीपणा संपला होता आणि महाराष्ट्रांतील अंतर्गत मतभेदाचा लाभ घेऊन एकाविरुद्ध दुसऱ्यास खेळवण्यासाठी दिल्लीला आता अनुकूल वातावरण मिळालं होतं. देवगिरीकर यांनी एक निवेदन काढून महाराष्ट्रांत फूट वगैरे कांही पडलेली नाही असं त्या वेळीं जाहीर केलं, पण फूट पडली होती आणि रुंदावत चालली होती, ही वस्तुस्थिति होती.

याच अवस्थेंत १४ डिसेंबर १९५५ ला राज्य-पुनर्रचना समितीच्या अहवालावर दिल्लींत लोकसभेमध्ये चर्चा सुरू झाली. काकासाहेब गाडगीळ यांनी आपल्या भाषणांत, काँग्रेस-श्रेष्ठांचे या प्रश्नावर वाभाडे काढले आणि नेत्यांनी हा प्रश्न सोडवला नाही तर लोक हा प्रश्न रस्त्यावर सोडवतील, आपण तें टाळलं पाहिजे असा इशारा दिला. स. का. पाटील यांनी आकांडतांडव करून, मुंबई महाराष्ट्राला देतां कामा नये; हीच चीज निरनिराळ्या रागांत आळवली. देवगिरीकर यांनीहि तास-दीड तास युक्तिवाद केला. गाडगीळांच्या भाषणांतील 'लोक हा प्रश्न रस्त्यावर सोडवतील' एवढं एकच वाक्य उचलून मग त्यावर महाराष्ट्राच्या विरोधकांनी गदारोळ माजवला.

गाडगीळांचं त्या दिवशींचं भाषण म्हणजे वक्तृत्वाचा एक नमुना ठरला होता. पण परिणामाच्या दृष्टीनं त्याचा उपयोग झाला नाही. लोकसभेंत चर्चा झाली, पण

निर्णय झाला नाही. पं. पंत यांनी, देव, गाडगीळ व मोरारजी यांनी एकत्र बसून या प्रश्नाचा निर्णय करावा, असं उत्तराच्या भाषणांत सांगितलं.

लोकसभेंत ही चर्चा सुरू असतांनाच इकडे मुंबई कॉर्पोरेशनमध्ये २२ डिसेंबर १९५५ ला मुंबईचा समावेश महाराष्ट्रांत करावा असा ठराव संमत करण्यांत आला आणि स. का. पाटील यांच्या अहंकाराला धक्का दिला गेला. मुंबई महापालिकेंत काँग्रेसचं बहुमत होतं, पण प्र. स. पक्षाचे राम जोशी यांनी तो ठराव मांडला, आर. डी. भंडारे यांनी पाठिंबा दिला आणि ६३ मतांनी तो संमतहि झाला. याबाबत मुंबई प्रदेश-काँग्रेसनं दिलेला आदेश धुडकावण्यांत आला. गो. वा. महाशब्दे, का. शं. धारिया, एस्. एम्. ठाकरे, आर. के. आचरेकर, डब्ल्यू. एस्. मठकर आदि नगरपिते काँग्रेस-पक्षाचा आदेश मानण्याच्या मनःस्थितींत नव्हते. पाटील यांनी आरडाओरडा करून शिस्त-भंगाचा धाकहि घातला, पण कुणीं जुमानलं नाही. काँग्रेसमधल्या बंडखोरांना डॉ. नरवणे यांचं मार्गदर्शन असल्यामुळे मोरारजींनी मग डॉ. नरवणे यांना मंत्रिमंडळांतून दूर करून त्यांचा कांटा काढायचं ठरवलं. याबाबत त्यांनी डॉ. नरवणे यांच्यापुढे असा पेंच टाकला की, त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत भाग घेणार नाही असं लेखी आश्वासन द्यावं किंवा मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा. डॉ. नरवणे यांनी त्यानुसार २७ डिसेंबरला राजीनामा सादर केला.

डॉ. नरवणे हे संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे चिटणीस होते आणि मंत्रिपद स्वीकारतांना त्यांनी मोरारजींना याची आगाऊ कल्पना दिली होती. पण नरवणे यांचा कांटा काढण्याची वाट पहात बसलेल्या मोरारजींनी आपला हेतु साध्य केला. मोरारजींच्या मंत्रिमंडळांतील दुसरे मंत्री भाऊसाहेब हिरे हे तर आमदारांना राजीनामे देण्यास सांगत होते व राजीनामे त्यांनी घेऊनहि ठेवले होते. पण त्यांना धक्का लावण्याची मोरारजींची प्राज्ञा नव्हती. नरवण्यांचा मात्र त्यांनी बळी घेतला.

पं. पंत यांनी सुचवल्याप्रमाणे मोरारजींशीं चर्चा करण्यासाठी देव हे नंतर धांवपळ करत राहिले होते. २८ डिसेंबरला त्यांची पहिली चर्चा मुंबईत झाली. दोन-तीन दिवसांच्या चर्चेनंतर मोरारजी द्वैभाषिकाचा पर्याय स्वीकारण्यास तयार झाले; पण त्यामधील पांच वर्षांनी विभक्त होण्याची अट त्यांनी मानली नाही. मोरारजी हे द्वैभाषिक मान्य करतील, तर या नव्या द्वैभाषिकाचं मुख्य मंत्रिपद मोरारजींनाच देण्याचं आमिष देव यांनी या चर्चेमध्ये त्यांना दाखवलं होतं. मोरारजी अर्धवट द्वैभाषिकाला सुद्धा जे तयार झाले ते मुख्यमंत्रिपदाचा हिशेब मनांत ठेवूनच तयार झालेले असावेत अशी कुजबूज त्यानंतर सुरू झाली.

दरम्यान २९ डिसेंबरला पं. नेहरू यांनी बंगलोरहून दिल्लीला जातांना वाटेंत मुंबईला थांबून दोन तास जी चर्चा केली त्यांतून मोरारजींना भावी घटनेचा कांही अंदाजहि करतां आला. देव आणि मोरारजी यांच्यांत सुरू असलेल्या खलबतांमुळे

विरोधी पक्षांत आणि कॉंग्रेस-जनांतहि अस्वस्थता निर्माण झाली होती. तरी पण त्याकडे दुर्लक्ष करून देव यांनी भेटी-गाठी सुरूच ठेवल्या.

याच संदर्भात देव यांनी, हिरे यांच्या निवासस्थानीं महाराष्ट्रांतील कॉंग्रेस-नेत्यांची बैठक बोलावली. या बैठकीला देवगिरीकर, कुंटे, चव्हाण, नरवणे, बारपुरे, रामराव देशमुख, पी. के. देशमुख, रा. कृ. पाटील आदि उपस्थित होते. पण देवांच्या योजनेबद्दल कुणीच उत्सुक नव्हतं. तिकडे गुजरात प्रदेश-कॉंग्रेसनंहि उत्सुकता दाखवली नाही. त्यामुळे सारी योजनाच बारगळली. १९५५ साल संपलं तेव्हा परिस्थिति जैसे थे अशीच राहिली.

१९५५ च्या शेवटीं शेवटीं महाराष्ट्र-कॉंग्रेसमध्येच केवळ फुटीचं वातावरण निर्माण झालं होतं असं नव्हे. संयुक्त महाराष्ट्र परिषदेंतहि ही लागण झाली होती. १९५५ च्या नोव्हेंबरमध्ये, परिषदेनं मोर्चा संघटित करण्यासाठी म्हणून संयुक्त महाराष्ट्र कृति-समिति जन्मास घातली होती. परंतु कृति-समिति ही परिषदेची प्रतिस्पर्धी समिति ठरूं लागल्यानं प्रजासमाजवादी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्या समितीला विरोध दर्शवला. दंडवते वगैरे मंडळींनी कृति-समितीचा संबंध सोडल्याचं १ डिसेंबर १९५५ ला जाहीर केलं. हें घडतांच कम्युनिस्टांनी पुढाकार घेऊन एक नवीन गट बनवला. या गटाच्या वतीनं ७ जानेवारी १९५६ ला संयुक्त महाराष्ट्र-दिन पाळण्याचा आदेशहि दिला. या गटांत शे. का. पक्ष आणि कांही अपक्षहि सामील झाले. डांगे, मिरजकर, राऊत, दाजीबा देसाई, आचार्य अत्रे, दोंदे, ठाकरे आदि २१ जणांनी हा आदेश देतांच एस्. एम्. जोशी यांनी संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक तातडीनं बोलवावी असा शंकरराव देव यांना तगादा केला. मुंबईमध्ये जनतेंतील असंतोष वाढत चालला होता आणि संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत शांततेच्या व लोकशाही मार्गानं चळवळ चालू ठेवण्याबाबत कार्यक्रमाची आखणी करण्याची गरज होती. परंतु देव यांनी १५ जानेवारी उजाडली तरी त्याकडे दुर्लक्षच केलं. तोंपर्यंत सारीच परिस्थिति हाताबाहेर गेली.

या वर्षाच्या सुरुवातीला त्या वेळचे केंद्रीय अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांना महाराष्ट्र-कॉंग्रेसच्या नेत्यांनी तोंडघशी पाडल्याची एक घटना घडली. मुंबईचं स्वतंत्र राज्य असावं की मुंबई केंद्रशासित असावी याबद्दल या नेत्यांचा निश्चित निर्णय होत नव्हता. याच संदर्भात हिरे हे दिल्लीच्या भेटींत सी. डी. देशमुखांना मुंबईचं स्वतंत्र राज्य करावं हें कबूल करून आले. महाराष्ट्र-कॉंग्रेसच्या अंतर्गत ज्या लाथाळ्या सुरू होत्या त्याबाबत या मंडळींनी देशमुखांना संपूर्ण माहिती कधीच दिली नव्हती. केंद्रीय मंत्रिमंडळांत देशमुख हे महाराष्ट्राचेच प्रतिनिधि असतांना त्यांना अंधारांतच ठेवण्यांत आलं. ७ जानेवारीला हिरे यांनी मुंबईबद्दलचा निर्णय सांगतांच देशमुख यांनी पं. पंतांची भेट घेऊन त्यांना हा निर्णय कळवला. त्याचबरोबर पंतांनाहि आश्चर्य वाटलं.

महाराष्ट्रांतील नेत्यांचं म्हणणं यापेक्षा वेगळं आहे याची जाणीव देशमुखांना या भेटींत पं. पंत यांनी दिली. दरम्यान हिरे मुंबईला परतले. देवगिरीकर यांच्यासह पुन्हा

जेव्हा दिल्लीला गेले तेव्हा ते देशमुखांना भेटले. पण या भेटीच्या वेळीं हिरे यांनी 'मुंबई-बद्दल मी असं म्हणालोंच नव्हतों' असं सांगायला सुरुवात करतांच देशमुख संतापले. मुंबई ही केंद्रशासित असावी असंच हिरे यांनी या भेटीच्या वेळीं त्यांना सांगितलं.

हें सर्व हिरे यांच्या स्वभावाला धरून होतं. देशमुख यांच्याशीं दिल्लींत चर्चा करण्यापूर्वी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांचा सल्ला घेतला नव्हता. मुंबईत तो सल्ला घेतांच त्यांचं पहिलं मत बदललं. हिरे हे स्वतः क्वचितच निर्णय घेत असत. घेतलेला निर्णयहि क्वचितच पाळत असत. मुंबईत त्यांनी आपलं मत बदलल्यानंतर देशमुखांना तसं कळवण्याची त्यांची जबाबदारी होती. त्यांनी ती पार पाडली नाही. वस्तुतः मुंबई स्वतंत्र राज्य करण्यास देशमुखांचा विरोधच होता. तरी पण महाराष्ट्र-कॉंग्रेसच्या नेत्यांचा निरोप म्हणून तो पंतांना सांगण्याचं काम त्यांनी प्रामाणिकपणें केलं. त्याच्या बदल्यांत त्यांच्या पदरीं खोटेपणा मात्र आला.

त्यानंतरहि पं. नेहरूंनी मुंबईबाबत मंत्रिमंडळाचा निर्णय म्हणून तो जाहीर केला तेव्हाहि त्यांनी देशमुख यांना एक सहकारी या नात्यानं विश्वासांत घेतलं नाही. कॅबिनेटच्या उपसमितीशींच चर्चा करून पंडितजींनी तो निर्णय केला आणि वृत्तपत्रांत जाहीर झाल्यानंतरच देशमुखांना तो समजला. केंद्रीय मंत्री या नात्यानं त्यांच्याशीं चर्चा करण्याचं किंवा झालेला निर्णय त्यांना कळवण्याचं केंद्रीय नेत्यांनी टाळलं. देशमुखांचा तो हक्क असतांना नाकारला गेला.

मुंबईचा कारभार केंद्र-सरकार ताब्यांत घेणार याची कल्पना विरोधी पक्षांनाहि १२ जानेवारीलाच आली होती. पं. नेहरूंनी मुंबईबाबतची अधिकृत घोषणा नभोवाणी-वरून प्रत्यक्षांत १६ जानेवारीला केली, पण महाराष्ट्राची मागणी केंद्र-सरकारनं नाकारली असल्याचं वृत्तपत्रांनी त्याअगोदरच जाहीर केलं होतं. नव्यानं जन्माला येणाऱ्या महाराष्ट्राची राजधानी मुंबईत असणार नाही हेंहि जाहीर झालं. याच संदर्भात संयुक्त महाराष्ट्रवादी कॉंग्रेस-जनांची सभा १५ जानेवारीला मुंबईत झाली. हिरे तिथे हजर होते, पण त्यांनी भाषण केलं नाही. काकासाहेब गाडगीळ, नरवणे, बारपुरे यांचींच फक्त भाषणं झालीं आणि सभा शांततेनं पार पडली. या सभेंत लोकांनी गाडगीळांकडे राजीनाम्याची मागणी केली. मोरारजींचं याकडे लक्ष होतंच. त्यामुळे पं. नेहरूंचा निर्णय अधिकृतरीत्या जाहीर झाल्यानंतर गडबड निर्माण होईल हें जाणून मोरारजींनी अगोदर सारी तयारी करून ठेवली.

निर्णय जाहीर होण्यापूर्वीच मोरारजींनी ४३५ लोकांना प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली अटक केली. अटक केलेल्यांमध्ये १२ नेतेहि होते. ते झोपेंत असतांनाच त्यांना अटक करून त्यांची नाशिकच्या तुरुंगांत रवानगी केली. हें करतांना मोरारजींनी मंत्रिमंडळाला अंधारांत ठेवलं. पुढे कौन्सिलमध्ये हा प्रश्न उपस्थित झाला तेव्हा अटक करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतलेला नसून, पोलिस-कमिशनरांचा तो निर्णय आहे असं मोरारजींनी बेदिक्कतपणें सांगितलं. मोरारजी हे स्वतः मुख्य मंत्री आणि गृहमंत्रीहि

असतांना एवढा महत्त्वाचा निर्णय पोलिस-कमिशनर आपल्या एकट्याच्या जबाबदारी-वर घेतील यावर कोण विश्वास ठेवील? पण पोलिस-कमिशनरांनी निर्णय घेतला हें सांगण्यांत अन्य मंत्र्यांना आपल्यालेखीं कवडीची किंमत नाही हेंच मोरारजींना सिद्ध करायचं होतं. हिरे यांनी याबद्दल थोडी कुरबुर केली. पण त्याचा कांही उपयोग नव्हता. राजीनाम्याची धमकी देऊन, अखेर तो खिशांत ठेवून देण्याचीं नाटकं यापूर्वी अनेकदा झालीं होतीं. त्यांनी राजीनामा दिला असता तर मोरारजींना तो हवाच होता; पण तसं कधी घडलंच नाही आणि आताहि घडणार नाही, हें मोरारजी जाणून होते.

पं. नेहरूंनी नभोवाणीवरून मुंबईबाबतचा निर्णय जाहीर केला त्या दिवसापासून मुंबईंत दंगल उसळली. गिरगावांत ठाकूरद्वार भागांत ट्रॅम्स आणि बसगाड्या जाळण्या-पासून जनतेनं राग व्यक्त करण्यास सुरुवात केली तेव्हा तिथेच पहिला गोळीबार झाला. लोक मोर्चानं येऊन घोषणा करत चालले होते. कुठेहि दगडफेक किंवा लुटालूट हे प्रकार सुरू झालेले नव्हते. तरी पण पोलिसांनी लाठीहल्ला व गोळीबार करून लोकांना चिथवलं. मुंबईत आठ दिवस दंगल सुरू राहिली. लाठीहल्ले, गोळीबार, धरपकड यांमुळे साऱ्या शहरांत हाहाकार उडाला.

या दंगलींत पोलिसांच्या गोळीबारांत किती लोक ठार झाले याबाबत एकमत कधीच होऊं शकलं नाही. संयुक्त महाराष्ट्र समितीचं म्हणणं या गोळीबारांत मोरारजींनी १०५ लोक ठार मारले. लालजी पेंडसे यांनी नांवनिशीवार कांही मृतांची माहिती जाहीर केली आहे. सरकारनं मृतांचा अधिकृत आकडा जाहीर केला आहे – त्यांतहि प्रत्येक वेळेला बदल होत गेला आहे. ६७ आणि ७५ असे ते आकडे आहेत. निरनिराळ्या मार्गांनी माहिती जमा करून वस्तुस्थितीचा तपास लावण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यांच्या माहितीनुसार मृतांची संख्या ८१ पेक्षा जास्त नसावी. परंतु एक गोष्ट स्पष्ट दिसते की, सरकारी आकडे आणि समितीचे आकडे यांमध्ये दहा-बारांचाच फरक आहे.

या दंगलीच्या वेळीं गुजराती स्त्रियांवर अत्याचार झाल्याचंहि भांडवल करण्यांत आलं. मोरारजींना याबाबत असेंब्लींत जेव्हा प्रश्न विचारला गेला त्या वेळीं, अत्या-चाराचे २७ प्रकार घडल्याची माहिती त्यांनी दिली. पण यांपैकी एकाहि महिलेनं तक्रार नोंदवलेली नाही किंवा माहिती दिलेली नाही, अशी सोडवणूक त्यांनी करून घेतली. मोरारजींचं म्हणणं असं की, ज्या महिलांवर अत्याचार झाले त्यांच्या नातेवाइकांनी ही माहिती सांगितली. त्याच्याहि पुढे जाऊन तीन महिलांना कांही गुंडांनी नग्न करून रस्त्यावरून ओढत नेलं अशी एक चक्षुर्वैसत्यम् हकीगतहि मोरारजींनी सांगितली. त्यांनी म्हणे तो भयंकर प्रकार स्वतः पाहिला होता. पण आश्चर्य असं की, मोरारजींच्या पोलिसखात्याला या महिलांवर अत्याचार करणाऱ्या या गुंडांपैकी कुणीहि कधीहि सापडले नाहीत. यांतलं एकहि प्रकरण कधी कोर्टांत गेलं नाही. महिलांवरील अत्या-चाराचे आरोप हे निराधार असल्याचं समितीच्या महिलांनी गुजराती व मारवाडी यांच्या घरोघर हिंडून व माहिती घेऊन सिद्ध केलं. तरी पण मोरारजींनी दिल्लीला या

अत्याचाराची माहिती कळवून समितीच्या चळवळीची बद नामी करण्याचा प्रयत्न केला. मुंबईतल्या गोळीबाराची आणि या अत्याचाराचीहि न्यायालयीन चौकशी करावी अशी मागणी लोकांनी केली, परंतु मोरारजी, नेहरू, पंत यांनी ती मानली नाही.

१७ जानेवारीच्या हरताळापासून मुंबईत खरी दंगल उसळली. हजारो लोक रस्त्यावर आले. पोलिस आणि जनता यांच्यांत जागोजाग युद्ध सुरू झालं. पोलिसांच्या अंगावर ॲसिड-बल्ब फेकले जात होते, तर पोलिस त्यांना गोळीबारानं उत्तर देत होते. दंगल आटोक्यांत आणण्यासाठी संचारबंदीहि लागू करण्यांत आली, पण लोक हटले नाहीत. पोलिसांच्या गोळ्यांना लोक बळी पडत आहेत असं पाहून ऐन दंगलीच्या भागांत घुसून एस्. एम्. जोशी लोकांना शांत करण्याचा प्रयत्न करत राहिले. आपल्या प्राणाची पर्वा न करतां ते प्रत्येक ठिकाणीं धांवून गेले. खवळलेल्या लोकांमध्ये सापडलेल्या एका पोलिस-इन्स्पेक्टरचे प्राण त्या वेळीं एस्. एम्. जोशी यांच्यामुळेच वांचले. मुंबई प्रदेश व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या नेत्यांनी गर्दीत जाऊन लोकांना शांत करण्याचा प्रयत्न केला नाही. तसा तो करणंहि त्या वेळीं शक्य नव्हतं. पत्रकं काढून त्यांनी फक्त गुंडगिरीचा निषेध केला. या दंगलींत पांच वर्षांच्या मुलापासून पन्नास वर्षांच्या माणसापर्यंत गोळी-बारांत ७१ जण ठार झाले आणि यांतील कांहीजण आपल्या घरांत असतांनाच मारले गेले. याचा अर्थ पोलिसांनी केलेला गोळीबार हा स्वैर होता. गोळीबारासाठी पोलिसांनी ३०३ नंबरच्या गोळ्या वापरल्या होत्या हें मोरारजींनीच मान्य केलं.

मुंबईत दंगल सुरू झाल्यानंतर पं. नेहरूंना त्याची माहिती कळवून, त्यांच्या अनुमतीनंच मोरारजींनी दंगल काबूंत आणण्यासाठी सर्व कठोर उपाय योजले होते. आवश्यकता भासल्यास लष्कराची मदत घेण्याची परवानगीहि नेहरूंनी त्यांना दिली होती. त्यानुसार मोरारजींनी लष्कराला तयार रहाण्याचा इशाराहि दिला; पण प्रत्यक्षांत मुंबईत लष्कर बोलावलं गेलं नाही.

मोरारजींनी ज्या पद्धतीनं परिस्थिति हाताळली त्याबद्दल मंत्रिमंडळांतील मराठी-भाषक मंत्र्यांपैकी कुणीहि त्यांना जाब विचारला नाही. केंद्र-सरकारला मोरारजींनी दंगलीचा जो अहवाल पाठवला तोहि त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दाखवला नाही. शंकरराव देव यांनी पं. नेहरूंकडे या सर्व प्रकरणीं सौम्य शब्दांत नंतर नाराजी व्यक्त केली आणि पुन्हा एकदा आत्मशुद्धीप्रीत्यर्थ अकरा दिवसांचं उपोषण जाहीर केलं. लोकांनी मात्र देव यांच्या उपोषणाबद्दल कांहीच आस्था व्यक्त केली नाही. मुंबईपासून पुणें-कोल्हापुरापर्यंत या आठ दिवसांत सगळीकडे आंदोलन पसरलं होतं. आणि पोलिसांनी सर्वत्र सारखीच दडपशाही केली होती. देव यांनी मुंबई सरकारची त्याबाबत कडक शब्दांत कानउघाडणी करावी अशी अपेक्षा होती. देवांच्या उपोषणाचा मोरारजींसारख्या पाषाणहृदयी मुख्य मंत्र्याच्या मनावर कांही परिणाम होणार नाही हें लोक जाणून होते. केशवराव जेधे आणि काकासाहेब गाडगीळ यांनी मात्र मोरारजींच्या

कारभाराची जाहीर चौकशी व्हावी अशी मागणी केली. रावसाहेब पटवर्धन यांनी उपोषणाचा मार्ग पत्करला तर देवगिरीकरांनी चौकशीला विरोधच केला.

महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसनं, केंद्र-सरकारच्या मुंबईच्या निर्णयाबद्दल मात्र भक्कमपणा दाखवून, राजीनाम्याची धमकी दिली. प्रदेश-काँग्रेसच्या कार्यकारी मंडळानं आणि सर्वसाधारण सभेनंहि त्यास दुजोरा दिला. फलटणच्या सभेनंतर चव्हाणांच्याबद्दल कुंटे यांच्या मनांत शंका होती. पण चव्हाण यांनी स्वतःच राजीनाम्याला पाठिंबा देऊन सर्वांनाच आश्चर्यचकित केलं. त्या सभेंतील निर्णयानुसार हिरे, चव्हाण व अन्य सर्व महाराष्ट्रीय मंत्र्यांनी मुख्य मंत्र्यांकडे राजीनामे पोंचते केले. मोरारजींनी हे राजीनामे मंजूर करण्याची तयारी केली, पण तसं झालं असतं, तर महाराष्ट्रांत राष्ट्रपतींची राजवट सुरू होणं क्रमप्राप्तच ठरलं असतं. राज्यपाल हरेकृष्ण मेहताब यांनी ही वस्तुस्थिति मोरारजींच्या नजरेस आणतांच त्यांनी मग दिल्लीला काँग्रेस-अध्यक्ष ढेबर यांच्याशीं संपर्क साधला.

दिल्लींत त्यापूर्वीच २३ जानेवारीला वर्किंग कमिटीच्या बैठकींत एक निर्णय करण्यांत आला होता. काँग्रेसच्या घटनेप्रमाणे निवडणूक-मंडळ आणि वर्किंग कमिटी यांच्या संमतीशिवाय कुणालाहि राजीनामे देतां येणार नाहीत असा तो निर्णय होता. वर्किंग कमिटीनं ठरावांत तसं नमूद केलं होतं. मोरारजींनी मग या ठरावाचा आधार घेतला आणि कुणाचेच राजीनामे स्वीकारले नाहीत. सहिसलामत ते सुटले.

दिल्लीमध्ये सी. डी. देशमुख यांनीहि २३ जानेवारीला आपला अर्थमंत्रिपदाचा राजीनामा पंतप्रधानांकडे सादर केला होता. वर्किंग कमिटीच्या बैठकीनंतर देवगिरीकरांनी त्यांना जेव्हा पक्षाची शिस्त पाळण्याचं महत्त्व पटवण्यास सुरुवात केली तेव्हा ते प्रदेश-काँग्रेसच्या भूमिकेबद्दल विस्मयचकित झाले. नेहरूंनीहि त्यांचं मन वळवण्याचा प्रयत्न केला. पण देशमुख हे आपल्या निर्णयाशीं बद्ध होते. राज्य-पुनर्रचनेच्या विधेयकांवर लोकसभेंत चर्चा व्हायची असल्यानं तोंपर्यंत थांबा असा सल्ला इतरांनी त्यांना दिला. अमृतसरचं काँग्रेस-अधिवेशन होईपर्यंत थांबावं असं नेहरूंनीहि सुचवलं. या चर्चेनंतरहि देशमुख यांनी राजीनाम्याचं पत्र परत घेतलं नाही; अनिर्णीत स्वरूपांत तें तसंच राहूं दिलं.

वर्किंग कमिटीच्या ठरावानंतरहि देवगिरीकर आणि हिरे यांनी पं. नेहरूंचं मन वळवण्याचा प्रयत्न चालूच ठेवला होता. पंतांचीहि त्यांनी भेट घेतली आणि मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी रहावी, मुंबई महाराष्ट्रांत केव्हा समाविष्ट करायची याचं वेळापत्रक नेहरूंनी ठरवावं, असा त्यांचा आग्रह होता. परंतु ज्येष्ठांनी त्यांना दाद दिली नाही. हिंसेला आणि दहशतीला आम्ही शरण जाणार नाही, असं वर्किंग कमिटीच्या ठरावांत स्पष्ट केलं होतं. त्याचीच नेहरूंनी जाणीव दिली.

दिल्लीहून परतल्यानंतर देवगिरीकरांनी प्रदेश-काँग्रेसची बैठक घेऊन एक निरर्थक ठराव केला. वर्किंग कमिटीनं आमच्या राजीनाम्यांचा फेरविचार करावा आणि ते मंजूर

करावेत अशी विनंती या ठरावांत करण्यांत आली होती. त्यांनी आणखी एक ठराव केला आणि संयुक्त महाराष्ट्र परिषदेंतून काँग्रेस-सभासदांनी बाहेर पडावं असं ठरवण्यांत आलं. वर्किंग कमिटीला केलेल्या त्या आवाहनाचा कांही उपयोग होणार नव्हताच; परिणामीं मुख्य मंत्र्यांकडे दिलेले राजीनामे सर्वांना परत घ्यावे लागले. प्रदेश-काँग्रेसच्या नेत्यांची प्रतिष्ठा वर्किंग कमिटींत राहिली नव्हतीच; लोकांच्या मनांतून ते केव्हाच दूर गेले होते. कणखरपणाचा म्हणून एखादा ठराव करण्याचा निर्णय करायचा आणि लगेच तो परत घ्यायचा या प्रदेश-काँग्रेसच्या दुटप्पीपणामुळे महाराष्ट्र-काँग्रेसबद्दल लोकांच्या मनांत अविश्वास वाढत राहिला आणि काँग्रेसची एकूण प्रतिमाच डागळली गेली.

असं जरी घडलं तरी मुंबईतील दंगलींत जनतेची जी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त झाली तिचा परिणाम दिल्लींत झाला होता. विशेषतः पं. पंत हे मुंबईतील हिंसक प्रकारांनी अस्वस्थ बनले होते. या प्रश्नांत निर्माण झालेली कोंडी फोडण्याच्या दृष्टीनं त्यांच्या मनांत द्वैभाषिकाची योजना पुन्हा घोळूं लागली. महाराष्ट्राच्या नेत्यांना ती मान्य होतीच, पण गुजरातनं नाकारली होती. याच मनःस्थितींत सर्व मंडळी अमृतसरला काँग्रेस-अधिवेशनासाठी रवाना झाली आणि त्याच वेळीं इकडे महाराष्ट्रांत देवप्रणीत संयुक्त महाराष्ट्र परिषद् संपुष्टांत येऊन संयुक्त महाराष्ट्र समिति ६ फेब्रुवारी १९५६ ला स्थापन झाली. पुण्यांतील टिळक-स्मारक-मंदिरांत समिति-नेत्यांची बैठक होऊन हा निर्णय करण्यांत आला.

# १२

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानं आता तिसऱ्या टप्प्यांत प्रवेश केला होता. या टप्प्याचा प्रारंभ महाराष्ट्रांतील सर्व विरोधी पक्षांत समझोता होऊन संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना करण्यांत झाला. घटना मंद गतीनं घडूं लागल्या; आणि याच वर्षांत १ नोव्हेंबर १९५६ ला द्वैभाषिक राज्य निर्माण झालं.

द्वैभाषिक अस्तित्वांत येण्याच्या या नऊ महिन्यांच्या काळांत पश्चिम महाराष्ट्रांतील खवळलेल्या जनतेनं महाराष्ट्र-कॉंग्रेसच्या नेत्यांना धारेवर धरलं. या काळांत संघटित सत्याग्रह अनेक गावांतून झाले. समितीच्या वतीनं गावोगावीं सभा झाल्या. एस्. एम्. जोशी, ना. ग. गोरे, आचार्य अत्रे, जयंतराव टिळक, र. के. खाडिलकर, विष्णुपंत चितळे, श्री. अ. डांगे, वा. रा. कोठारी आदि नेत्यांचीं तडाखेबंद भाषणं, मर्मभेदक टीका तसंच वृत्तपत्रांतील सडेतोड लिखाण यांमुळे बहुसंख्य लोक समितीच्या झेंड्याखाली एकत्र आले आणि सर्वत्र निदर्शनं, घोषणा यांनी वातावरण भरून गेलं होतं. नेत्यांचीं प्रक्षोभक भाषणं ऐकून व त्यांतून स्फूर्ति घेऊन तरुण वर्ग त्याप्रमाणे कृति करत राहिला. कॉंग्रेस-नेत्यांची रेवडी उडवण्यासाठी अनेक डावपेंच खेळले गेले.

महाराष्ट्रांत या काळांत यशवंतराव चव्हाण हे विरोधकांचं प्रमुख लक्ष्य होतं. त्यांचा दौरा कोणत्याहि भागांत असो किंवा सभा कुठेंहि असो, दगड-चपलांचा वर्षाव व्हायचाच, असं जणूं ठरून गेलं होतं. पण चव्हाणहि असे बहाद्दर कीं, हा सारा टीकेचा मारा अंगावर घेऊन महाराष्ट्राच्या सर्व भागांत ते फिरत राहिले. कॉंग्रेस कार्यकर्त्यांना या सर्व प्रश्नांतील विधायक भाग समजून सांगणं आणि पक्ष शाबूत ठेवणं यासाठी त्यांचे हे दौरे आणि सभा सुरू राहिल्या होत्या.

याच काळांत विनोबा भावे आणि जयप्रकाश नारायण हे सर्वोदयी नेते या प्रश्नांत मध्यस्थी करूं लागले होते आणि विशाल द्वैभाषिक अस्तित्वांत येण्यासाठी पं. पंतहि सावधपणानं हालचाल करूं लागले होते. लोकसभेंत निरनिराळ्या पक्षांच्या खासदारांनी,

मुंबईचा प्रश्न सोडवण्यासाठी म्हणून जो पर्याय सुचवला त्याच्यामागे पं. पंत, काकासाहेब गाडगीळ यांचेच प्रयत्न होते. लढ्याच्या याच टप्प्यांत महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसमध्ये निर्माण झालेल्या पक्षांतर्गत फाटाफुटींतून, दोन गटांत सत्ता-स्पर्धा सुरू झाली. ती कळसाला पोंचली. मोरारजी आणि विदर्भ-नेते मा. सा. कन्नमवार हे चव्हाणांच्या बाजूला आणि शंकरराव देव, स्वामी रामानंदतीर्थ आणि पी. के. देशमुख हे भाऊसाहेब हिरे यांच्या बाजूला, असा हा नेतृत्वाचा सामना झाला.

अमृतसर काँग्रेसचं अधिवेशन १० फेब्रुवारी १९५६ ला सुरू झालं. या अधिवेशनास देवगिरीकर, काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव चव्हाण आदि नेते उपस्थित होते. अधिवेशनाच्या तीन दिवसांत, मुंबईच्या प्रश्नाशीं ज्यांचा ज्यांचा संबंध होता आणि ज्यांचा प्रमुख अडथळा होता त्या गुजरात, सौराष्ट्र आदि भागांतील नेत्यांचीं मतं युक्तियुक्तीनं अजमावण्याचं काम वरिष्ठ नेत्यांनी केलं. आपल्या मनाचा आणि मताचा थांगपत्ता मात्र त्यांनी कुणासच लागू दिला नाही. पंतांच्या जोडीला आता ढेबरभाईहि द्वैभाषिकाचा पर्याय मानण्याच्या अवस्थेपर्यंत येऊन पोंचले होते. सौराष्ट्र हा गुजरातपासून वेगळं रहाण्याची मागणी करत होता. सौराष्ट्राला गुजरात्यांचं वर्चस्व नको होतं. वरिष्ठ नेत्यांनी मग चर्चेच्या ओघांत एक ठराव करून घेतला, परंतु त्याचा अर्थबोध कुणालाच झाला नाही. द्वैभाषिकाचा सूर मात्र त्यांतून उमटत होता. महाराष्ट्रांतील नेत्यांना वरिष्ठांनी निश्चित असं कांहीच सूचित केलं नव्हतं. तरी पण एकूण चर्चेवरून मुंबईचा समावेश महाराष्ट्रांत होण्याच्या दृष्टीनं वरिष्ठ नेत्यांच्या मनांत सहानुभूति आहे, असं समाधान त्यांना मिळालं. मुंबई केंद्र-शासित करण्याचा निर्णय अखेरचा आहे किंवा त्याचा पुन्हा विचार करतां येणार नाही असं नव्हे, असं पं. नेहरूंनीहि सूचित केलं होतं.

मोरारजी देसाई यांना मात्र नव्यानं कांही बदल घडून येत असल्याचा सुगावा लागला होता. अमृतसरला पंत, नेहरू, ढेबरभाई, आझाद यांची जी बैठक झाली त्या वेळीं मोरारजीहि उपस्थित होते. पं. पंत यांनी महाराष्ट्रांतील आणि विशेषतः मुंबईतील वातावरण शांत करायचं, तर द्वैभाषिक प्रस्थापित करण्यासंबंधीचा विचार करावा लागेल, असं या वेळीं सांगितलं होतं. मोरारजींनी मात्र पंतांची ही सूचना धुडकावून लावण्याचा प्रयत्न केला. द्वैभाषिक जन्माला येणार असेल, तर मुख्य मंत्री या नात्यानं त्याची जबाबदारी मी घेऊं शकणार नाही असं सांगून त्यांनी सुरुवातीलाच मोडता घातला, पण त्याचबरोबर वर्किंग कमिटी आणि केंद्र-सरकारला द्वैभाषिक मान्य असेल, तर मी विरोध करणार नाही, अशी मोरारजींनी सोडवणूक करून घेतली होती. द्वैभाषिकाचा पर्याय मी गुजरातच्या गळीं उतरवूं शकणार नाही आणि तसं घडवायचं तर त्यासाठी मला एक तर राजकीय संन्यास घेण्याची तयारी ठेवावी लागेल किंवा प्राणाची बाजी लावावी लागेल, असा मोरारजींचा पवित्रा होता. बैठकींत या पातळीवर फक्त चर्चा झाली, पण निर्णय कांहीच झाला नाही. दिल्लीचं वारं मात्र बदललं आहे एवढं मोरारजींना उमजण्यास ही

चर्चा पुरेशी ठरली. पं. पंतांनाहि तिथे निर्णय करायचाच नव्हता, फक्त मताचा अंदाज घ्यायचा होता आणि त्या दृष्टीनं त्यांचंहि काम झालं होतं.

अमृतसरच्या अधिवेशनांत देवगिरीकर आणि लालबहादूर शास्त्री यांच्यांत चर्चा होऊन देवगिरीकरांनी पूर्वीचाच सारा पाढा वाचला आणि प्रदेश-काँग्रेसच्या ठरावाला अनुसरून एक टिपण करून दिलं, पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. काकासाहेब गाडगीळ आणि यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राची बाजू कणखरपणें मांडली, तर स. का. पाटील यांनी विरोधी सूर लावला. या संपूर्ण अधिवेशनावरच राज्य-पुनर्रचना प्रश्नाची छाया पडली होती. पंजाबी सुब्याची मागणी करण्यासाठी शिखांनी दहा लाखांचा मोर्चा आणला होता. अधिवेशनांतील साऱ्या चर्चा आणि मोर्चाचं वातावरण पाहून पंडितजींनी त्या वेळीं भावनेला आवाहन करणारं भाषण केलं. त्यांचं भाषण मोठं हृदयस्पर्शी होतं. हें सर्व झालं तरी मूळ प्रश्न सुटण्याच्या दृष्टीनं गाडी पुढे सरकली नाही. सर्व चर्चा आणि ठराव याचा मथितार्थ एवढाच होता की, बहुभाषी राज्य-रचना करणं जिथे शक्य असेल तिथे ती निर्माण करण्याच्या दृष्टीनं लोकांना आवाहन करावं, त्यांना समजून द्यावं.

अमृतसर काँग्रेस संपवून महाराष्ट्रांत परतलेली नेते-मंडळी मग अमृतसरचा संदेश लोकांना सांगण्यासाठी दौऱ्यावर निघाली. महाराष्ट्रांत यशवंतरावांनी 'अमृतसर काँग्रेसचा संदेश' या विषयावर सांगली इथे पहिलं महत्त्वाचं भाषण केलं. समितीची चळवळ सर्वत्र सुरू होती; पण सांगलींत वसंतरावदादा पाटील यांचा कार्यकर्त्यांचा संच मोठा होता. तो तयार होता. सभा निर्वेधपणानं पार पाडण्याची त्यांची जिद्द होती. समितीच्या लोकांनीहि त्या वेळीं सांगलीच्या सभेंत व्यत्यय न आणण्याचं ठरवलं असावं. कारण चव्हाणांची ही सभा व्यवस्थित पार पडली. या सभेंत कार्यकर्त्यांना विश्वासांत घेऊन, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत त्यांनी प्रदीर्घ विवेचन केलं आणि संयुक्त महाराष्ट्राची प्रेरणा ही भारतीय निष्ठेची प्रेरणा आहे, ही गोष्ट प्रत्येकानं शिकण्यासारखी असून, अमृतसरला हीच शिकवण मिळाली असं त्यांनी सांगितलं.

यशवंतरावांचं सांगली येथील भाषण हें संयुक्त महाराष्ट्राबद्दलचं त्यांचं सुस्पष्ट मतप्रदर्शन होतं. महाराष्ट्रभर त्यांची बदनामी सुरू करण्यात येऊन त्यांच्या हेतूबद्दलच जो संशय व्यक्त करण्यांत आला होता, सूर्याजी पिसाळ म्हणून त्यांची संभावना केली जात होती, या सर्व प्रचाराला त्यांनी प्रामाणिकपणानं दिलेलं उत्तर म्हणजे त्यांनी सांगलीच्या सभेंत व्यक्त केलेले विचार होत.

या सभेंत त्यांनी असं स्पष्ट केलं, "मीं मुंबई महाराष्ट्राला नको असं कधीहि म्हटलेलं नाही. मुंबईसाठी चळवळ नको एवढंच मी म्हणत आहे. मुंबई मिळाली नाही याचं मला दुःख आहे. पण मुंबई मिळाली नाही म्हणून देश जाळायचा काय ? काँग्रेस-बाहेर या आणि झगडा करा म्हणून सांगितलं जात आहे, पण कुणाशीं झगडा करायचा ? भावाशीं झगडा करायचा ? झगड्यानं, वैरानं मुंबई मिळणार नाही; आणि मिळाली तरी

ती मुंबई असणार नाही. ज्या शक्तीवर आणि निष्ठेवर मोठाले प्रश्न सोडवले त्या शक्तीनंच हा प्रश्न सुटणार नाही काय? लढ्याची भाषा बंद झाली पाहिजे. मुंबईचा प्रश्न सुटेल. निश्चितपणें सुटेल हें मी सांगूं शकतों, पण केव्हा सुटेल याचं वेळापत्रक मी सांगूं शकत नाही.

"साधनांचा विचारपूर्वक स्वीकार करावा, साध्य आपोआप मिळेल असं म. गांधींनीच सांगितलं आहे. महाराष्ट्राला मीं हें सांगितलं, पण वर्तमानपत्रांनी तें भडक स्वरूपांत प्रसिद्ध केलं आणि अपप्रचाराला त्यांतून साधन मिळालं. साधेभोळे लोक मात्र त्यामुळे फसले. मी राजकारणांत आलों तो सेवेचा अधिकार घेऊन आलों आहे. लोकांना मी आवडलों नाही तर त्यांनी मला असेंब्लींत पाठवूं नये. पण माझ्या सेवेचा अधिकार कुणी काढून घेऊं शकणार नाही. मीहि कांही अगदीच पालापाचोळ्याचा नाही की कुणीं फुंकर मारून मी उडून जाईन! पंचवीस वर्षांचं माझं राजकीय जीवन जनतेपुढे आहे, मी त्याची जाहीर चौकशी करून घेण्यास तयार आहे. यशवंतराव राजकारणांतून सहजासहजीं उठून जाणार नाहीत. कृष्णाकाठच्या पाण्यावर आणि मातीवर मीहि वाढलों आहे. माझे कांही विचार आहेत. ज्यांनी या देशाला जीवन दिलं, मातींतून सोनं काढलं त्यांच्या धिक्काराच्या घोषणा या मरणप्राय दुःख देणाऱ्या आहेत. मी गांधी-नेहरूंना मोठा म्हणतों म्हणून तक्रार आहे; त्यांना मोठं नको म्हणूं तर कुणाला म्हणूं? स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीं ज्यांनी घरांवर काळीं निशाणं लावलीं त्यांना मोठं म्हणूं? कणाकणानं राबून ज्यांनी देशाचं स्वातंत्र्य आणलं, या देशासाठी शेवटीं प्राणहि दिला त्यांना मी मोठं म्हणतों, यासाठी का मला सूर्याजी पिसाळ म्हणणार आहांत?

"मी सूर्याजी पिसाळ, तर या प्रश्नांतील शिवाजी आणि औरंगजेब कोण? आणि हा शिवाजी काय काळीं निशाणं घेऊन हिंडतो? मला मुद्दाम बदनाम करायचं असेल, तर तो उद्देश साध्य होईल कदाचित्, पण सत्य बदनाम होणार नाही. कोणत्याहि पक्षास मुंबई मिळवायची असेल, तर महाराष्ट्राबाहेरील आपल्या पक्षाच्या लोकांना मुंबईची मागणी न्याय्य कशी आहे, हें पटवून देऊनच ती मिळवतां येईल. लोकशाही राज्यकारभार जनतेच्या जवळ आणण्यासाठी एकभाषिक राज्याची चळवळ आपण चालू केली. त्यांतूनच संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली. तशीच कानडी, गुजराती, हिंदी, तामीळ, मल्याळी अशींहि राज्यं मागितलीं. ही मागणी जेव्हा केली तेव्हाचं चित्र आणि आताचं चित्र हें समजून घेतलं पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राचा नकाशा चार ठिकाणीं फाटलेला होता. मराठवाडा तुटक होता. मराठीचं माहेरघर, ज्ञानेश्वरीची पहिली ओवी गायली तो भाग, हैदराबाद संस्थानांत अडकून पडला होता. तिकडे नागपूर हिंदी भागांत होतं. मग उरला आपला बारा जिल्ह्यांचा महाराष्ट्र. हा सर्व विभाग एकत्र आणण्याचा आपला निश्चय होता. आम्हीं आमची त्याप्रमाणे मागणी मांडावयास

सुरुवात केली. पूर्वीच्या दोन्ही कमिशनपेक्षा फाजलअली कमिशनमुळे दोन-तीन गोष्टी निर्माण झाल्या.

"मराठवाडा महाराष्ट्र राज्यांत यावा हें राज्य-पुनर्रचना कमिशननं मान्य केलं; पण त्याचबरोबर विदर्भाचं स्वतंत्र राज्य हें महाराष्ट्रावरील संकट ठरलं. या योजनेविरुद्ध महाराष्ट्र-काँग्रेसनं आवाज उठवला. विदर्भाचं स्वतंत्र राज्य हा अन्याय असल्याचं मत नेत्यांनी मान्य केलं. महाराष्ट्र-काँग्रेसनं हें नाकारलं म्हणून राज्य-पुनर्रचना कमिशनचं द्वैभाषिक गेलं. आठ जिल्ह्यांचा विदर्भ, गेलीं तीन शतकं त्यांनी स्वतंत्र राज्याची भावना निर्माण केली होती. आणि आम्हींच खुद्द अकोला-करारानं विदर्भाचं छोटं राज्य तत्त्वतः मान्य केलं होतं. तरी पण एकभाषी राज्याकरिता विदर्भाला मिळालेलं राज्य काढून घेतलं गेलं आणि तो भाग महाराष्ट्रांत आला. आता राहिलीं दोन दुःखं! एक मुंबईचा प्रश्न आणि महाराष्ट्राची दक्षिण सरहद्द – सीमा प्रश्न. मुंबई महाराष्ट्राला मिळाली नाहीं म्हणून प्रत्येक मराठी माणसाला दुःख आहे. त्या दुःखांत मीहि सहभागी आहे. मुंबईचा माझा हक्क मी नेहरूंच्या जवळून सोडणार नाहीं. सामान्य माणसाच्या डोळ्यांत आज नुकतंच कुठे तेज आलं आहे; राष्ट्रीय शक्तीशीं समरस होऊन चालण्याचा ते प्रयत्न करत आहेत; पण त्यांना आंदोलनाच्या मार्गावर ओढलं जात आहे. तुम्ही फसत आहांत अशी त्यांना माझी धोक्याची सूचना आहे. मागणी पूर्ण होण्यासाठी मार्गाचा आणि पद्धतीचा हा विरोध आहे. आज या प्रश्नावर गावा-गावांत जें विष पेरलं जात आहे त्याच्या परिणामाचा विचार करा. देशाचे इतर प्रश्न ज्या मार्गांनी काँग्रेसनं सोडवले त्याच मार्गानं – पद्धतीनं हाहि प्रश्न सोडवला पाहिजे. संयुक्त महाराष्ट्राची प्रेरणा ही रानडे, गोखले, टिळक यांची प्रेरणा आहे. अखिल भारतीय काँग्रेसला जन्माला घालण्यास ज्यांचा हातभार लागला त्यांच्या मनांत सर्व देशाचं भलं होण्याबरोबरच महाराष्ट्राचंहि भलं होईल, हा विचार होता. कोणताहि संयुक्त महाराष्ट्राचा खरा प्रेमी हा प्रथम भारतीयच आहे."

यशवंतरावांच्या या भूमिकेला सातारा जिल्ह्यांतील काँग्रेस-कार्यकर्त्यांनीहि साथ दिली. यशवंतरावांनी त्या काळांत महाराष्ट्रांत दौरे करणं हें मोठंच धाडसाचं होतं. परंतु 'शहाणे करून सोडावे सकळजन' याचं जणू त्यांनी व्रतच घेतलं होतं. त्यांनी हें व्रत त्या वेळीं स्वीकारलं तेंच ठीक झालं असं इतिहास सांगतो. कारण देव आणि हिरे यांच्या बोलण्यांत आणि कृतींत कांही मेळ राहिला नव्हता. हिरे हे इतके गोंधळले होते की, ते दिल्लींत एक बोलत आणि महाराष्ट्रांतील सहकाऱ्यांना वेगळंच कांही सांगत असत. चव्हाणांचं नेतृत्व महाराष्ट्रांत मूळ धरूं लागलं आहे हें त्यांच्या मनांतलं एक दुखणं असावं असं दिसतं. कारण ते त्यांना दूर ठेवण्याचा प्रयत्न करत असत. चव्हाणांनी त्यांना या संबंधांत एकदा प्रेमानं जाणीवहि दिली. हिरे हे जाहीर भाषणामध्ये प्रसंगीं लोकांना दोष देणारे शब्द उच्चारत असत, तर दुसऱ्या बाजूला चव्हाण हे विरोधकांचे

शिव्याशाप चालू असतांनाहि लोकांना विश्वासांत घेऊन जाहीरपणें त्यांच्याशीं संवाद करत राहिले होते. यशवंतरावांची सांगलींतील सभा हें त्याचंच द्योतक होतं.

अमृतसरहून परतलेले नेते अमृतसर काँग्रेसचा संदेश लोकांना सांगण्यासाठी महाराष्ट्रांत हिंडत असतांनाच फेब्रुवारी व मार्च या महिन्यांत सर्वोदयी नेते काँग्रेस-श्रेष्ठांचं मन वळवण्याचा प्रयत्न करत होते. विनोबा भावे, जयप्रकाश, दादा धर्माधिकारी, रावसाहेब पटवर्धन, अण्णासाहेब सहस्रबुद्धे, शंकरराव देव, एस्. एम्. जोशी हे परस्परांना भेटून चर्चा करत राहिले आणि त्यांच्यांतील भावे-जयप्रकाश यांनी पंत, नेहरू, ढेबरभाई यांच्याशींहि चर्चा केली.

२५ मार्चला भावे आणि ढेबरभाई यांची चर्चा झाली. देव यांचा द्वैभाषिकाचा पर्याय, त्यांनी मुंबईच्या भवितव्याबद्दल घातलेली पांच वर्षांची मुदत कायम ठेवण्याचा हट्ट धरल्यामुळे मान्य होऊं शकला नाही, असं ढेबर यांनी विनोबाजींना या चर्चेच्या वेळीं सांगितलं. त्यावर विनोबा भावे तटस्थ नसून तेहि संयुक्त महाराष्ट्राच्याच बाजूचेच आहेत असं ढेबरभाईचं मत बनलं होतं. परंतु नंतर भावे यांनी स्थितप्रज्ञाच्या भूमिकेवरून जें मत व्यक्त केलं त्यानं महाराष्ट्रांत त्यांच्याविषयी खूपच नाराजी निर्माण झाली. मुंबईवर महाराष्ट्राचा हक्क असला आणि महाराष्ट्राची मुंबईसाठी मागणी असली, तरी गुजराती-भाषक मुंबईचं भवितव्य ठरवणार असतील, तर एक 'सत्याग्रही' म्हणून मला तें मान्य आहे असं विनोबाजींनी जाहीर केलं होतं. विनोबांच्या संत-वृत्तीवर या संदर्भांत आचार्य अत्रे यांनी कडक टीका केली. सर्वोदयी मंडळींची दोन महिन्यांची मध्यस्थी मात्र व्यर्थ ठरली होती.

दरम्यान २७ मार्च ते ७ एप्रिलपर्यंत असेंब्लींत राज्य-पुनर्रचना समितीच्या संदर्भांत त्रिराज्य-योजनेवर मतप्रर्शन करणाऱ्या ठरावावर चर्चा झाली. मुख्य मंत्री मोरारजी देसाई यांनी मांडलेला ठराव बहुमतानं संमत झाला. या ठरावाला काँग्रेस-सभासदांपैकीं कुणी विरोध करायचा नाही, असा आदेश होता. तथापि पी. के. सावंत यांनी व कोकणांतील तीन जिल्ह्यांतील त्यांच्या सहकाऱ्यांनी, मुंबई महाराष्ट्रांत समाविष्ट करावी वगैरे स्वरूपाच्या कांही उपसूचना मांडल्या. अर्थातच त्या नामंजूर झाल्या. हिरे आणि चव्हाण यांच्या मध्यस्थीमुळे ही मंडळी शिस्तभंगांतून त्या वेळीं बचली. असेंब्लींतील चर्चेमध्ये या प्रश्नावर मंत्रिमंडळांत मतभेद असल्याचं मात्र मोरारजींना मान्य करावं लागलं.

याच महिन्यांत २३ एप्रिलला लोकसभेंतहि गृहमंत्री पं. गोविंदवल्लभ पंत यांनी राज्य-पुनर्रचना विधेयक मांडलं. आणि हें बिल संयुक्त निर्वाचन समितीकडे पाठवण्याचा, लोकसभेनं २६ एप्रिलला निर्णय केला. लोकसभा आणि राज्यसभा यांच्या ५१ सभासदांची ही समिति होती. १४ मे रोजीं हें विधेयक पुन्हा सभा-गृहापुढे येणार होतं. या विधेयकावर लोकसभेंत जी चर्चा झाली त्यामध्ये ५० खासदारांनी जे विचार व्यक्त केले त्यामध्ये सर्वांचे विचार आणि टीका मुंबईच्या

प्रश्नावरच केंद्रित झालेली आढळली. दरम्यान २२ एप्रिलला हरिभाऊ पाटसकर यांच्या निवासस्थानीं महाराष्ट्रांतील खासदारांची बैठक होऊन पं. नेहरूंना सादर करायच्या निवेदनावर चर्चा झाली आणि निवेदन तयार करण्यांत आलं. या बैठकीला ३५ खासदार उपस्थित होते, पण निवेदनावर २५ खासदारांनीच स्वाक्षऱ्या केल्या. काकासाहेब गाडगीळ यांनी या वेळीं, विधेयकाच्या विरुद्ध मतदान करून आपण एकटे लढत रहाणार असं सांगितलं, तर एस्. आर. राणे यांनी श्रेष्ठांचा निर्णय शिरसावंद्य मानण्याची तयारी दर्शवली. या खासदारांनी २७ एप्रिलला पंडितजींची भेट घेऊन चर्चा केली. या चर्चेतून कांहीहि समाधानकारक निर्णय होऊं शकला नाही; पण पं. नेहरूंना मुंबईच्या प्रश्नाचा निर्णय करायचा आहे आणि ते त्याबद्दल सहानुभूति बाळगून आहेत एवढंच समाधान घेऊन सर्वजण परतले.

हरिभाऊ पाटसकर यांनी त्यानंतरहि श्रेष्ठांची विनवणी चालूच ठेवली. मुंबई दोन वर्षे केंद्रशासित ठेवावी, नव्या महाराष्ट्राच्या कांही कचेऱ्या नागपूर व पुणें इथे ठेवाव्या वगैरे स्वरूपाच्या योजनेचा एक आराखडाहि त्यांनी केला आणि हिरे, चव्हाण, कुंटे यांच्या उपस्थितींत त्यावर चर्चाहि केली. पाटसकरांच्या या आराखड्यावरहि पुढे महाराष्ट्रांतील नेत्यांमध्येच वादळ निर्माण झालं. पाटसकरांचं म्हणणं, हा आराखडा एकमतानं मान्य करण्यांत आला, तर काकासाहेब गाडगीळ यांचं म्हणणं, तसा तो एकमतानं मान्य झालेला नव्हता. हा वाद सुरू असतांनाच महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसच्या नेत्यांनी नेहरूंच्या मागे तगादा लावून महाराष्ट्राची मागणी तत्त्वतः मान्य करून तसं जाहीर करण्याविषयी खटपट चालवली.. अखिल भारतीय कॉंग्रेसचं अधिवेशन २ जून १९५६ पासून मुंबईला सुरू व्हायचं होतं. तेव्हा त्यापूर्वी किंवा निदान त्या अधिवेशनांत पं. नेहरूंनी हें जाहीर करावं अशासाठी हा प्रयत्न होता.

मुंबईचं कॉंग्रेस-अधिवेशन आणि त्या वेळीं निर्माण झालेली परिस्थिति ही ऐतिहासिक ठरली. अधिवेशनाच्या ठिकाणीं आणि पं. नेहरूंची चौपाटीवरील सभा या दोन्ही ठिकाणीं प्रचंड गोंधळ उडाला आणि पंडितजींना व सर्वच कॉंग्रेस-श्रेष्ठांना महाराष्ट्राच्या भावनेची जाणीव झाली. संयुक्त महाराष्ट्र समितीनं या कॉंग्रेस-अधिवेशनाचं आव्हानच स्वीकारलं.

पं. नेहरूंचं स्वागत मुंबईत काळ्या निशाणांनी करण्याची जय्यत तयारी समितीनं केली होती. पंडितजींना असं स्वागत नवीन होतं. आजवर ते जातील तिथे हजारो लोकांनी हसतमुखानं आणि पुष्पहारांनीच त्यांचं स्वागत केलं होतं. परंतु पंडितजी अधिवेशनासाठी मुंबईत आले आणि राजभवनाकडे निघाले तेव्हा पन्नास हजार निदर्शकांनी त्यांना काळी निशाणं दाखवलीं, विरोधी घोषणा केल्या आणि निषेधाचे फलक समोर धरले. 'बेळगाव, कारवार, निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या घोषणेनं मुंबईचे सारे रस्ते दुमदुमले.

समितीच्या निदर्शनाला वृत्तपत्रांतून मोठ्या प्रमाणांत प्रसिद्धि मिळूं नये म्हणून मोरारजींच्या सरकारनं खूपच आटापिटा केला. सरकारी प्रसिद्धि-पत्रकांत निदर्शकांची संख्या जेमतेम ५०० असल्याचं नमूद करून तें प्रसिद्धीसाठी देण्यांत आलं. राष्ट्रीय पातळीवरील बड्या वृत्तपत्रांनी, मुंबईत पंतप्रधानांविरुद्ध झालेल्या शांततापूर्ण निदर्शनास प्रसिद्धीच्या झगमगाटांत आणूं नये असं सुचवलं गेलं. पण आश्चर्य असं की, मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडियानं निदर्शनाची बातमीच प्रसिद्ध केली नाही, तर 'केसरी' आणि 'संयुक्त महाराष्ट्र पत्रिका' यांनी प्रसिद्धिखात्यानं ५०० निदर्शकांचा आकडा घालून प्रसिद्धीसाठी पाठवलेल्या सरकारी पत्रकाचा फोटो छापला आणि सरकारचा खोटेपणा जाहीर केला. समितिकृत ५० हजार निदर्शकांचा आकडा आणि सरकारचा ५०० हा आकडा यांतील तफावत आणि वाद बाजूला ठेवला तरी निदर्शनं जोरदार झालीं, हें मात्र निर्विवाद सत्य होतं. सत्याग्रह्यांच्या आणि निदर्शकांच्या तुकड्या तासा-तासानं रस्त्यावर येत राहिल्या होत्या. परंतु या निदर्शनांमुळे नेहरू मात्र मनांतून संतापले आणि त्यांनी आपला राग ३ जूनला चौपाटीवर झालेल्या भाषणांत व्यक्त केला.

या अधिवेशनाला जोडूनच महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसनं कार्यकारिणीची सभा घेतली आणि कांही विषयांचा खल केला. २ जूनला रात्रीं पुन्हा कार्यकारिणीची बैठक होणार असल्यानं या सभेला पंडितजींनी उपस्थित रहावं अशासाठी चव्हाण यांनी इंदिरा गांधी यांच्यामार्फत रदबदली केली. पंडितजींनीहि त्याला मान्यता दिली. परंतु नंतर राजभवनावरच भेटावं असा त्यांचा निरोप आल्यानं देवगिरीकर, यशवंतराव व बाळासाहेब भारदे पंडितजींच्या भेटीस गेले. राजभवनवर पंडितजींच्या भेटीस जाणं कांहीजणांना मान्य नव्हतं. हिरे आणि काकासाहेब गाडगीळ यांनी तिकडे जाण्यास नकारच दर्शवला.

पंडितजींनी या तिघांबरोबर मोकळेपणानं चर्चा केली. गुजरात वेगळा होऊं द्या म्हणजे मग मुंबईचा विचार करूं ही जुनीच गोष्ट वस्तुतः त्यांनी नव्यानं सांगितली होती. महाराष्ट्राची ही मागणी अखिल भारतीय काँग्रेस-कमिटीपुढे ठेवावी असं चव्हाण यांनी नेहरूंना सुचवतांच त्यांनी तें तर मान्य केलंच शिवाय चौपाटीवरील जाहीर सभेंतहि सांगतो असं कबूल केलं.

परंतु चौपाटीवरील सभेंत वेगळंच घडलं. पं नेहरू या सभेला संतप्त मनानंच आले. मुंबईत झालेलीं निदर्शनं आणि अधिवेशनासाठी आलेल्या काँग्रेस-जनांची निदर्शकांनी केलेली अडवणूक, दगडफेक, शिवीगाळ, अपमानास्पद वागणूक यांमुळे नेहरू संतापले होते. सभेंत ते क्रोधानंच बोलले आणि अत्याचार, धाकदपटशा यानं आम्ही शरण येणार आहोंत काय, असा सवाल त्यांनी लोकांना केला. दगडांच्या वर्षावानं सरकार कोलमडेल असं समजणं मूर्खपणाचं आहे; अशा कृत्यांनी सरकार मागण्या पुऱ्या करण्याइतकं दुबळं नाही, असंहि त्यांनी बजावलं. माझ्यावर कुणाला हल्ला करावयाचा असेल, तर हा मी इथे उभा आहे, माझं डोकं हवं असेल तर त्यांना घेऊं द्या, पण लक्षांत ठेवा की, या प्रश्नाकरिता सरकार कोसळणार नाही, असं आव्हानच त्यांनी दिलं.

पंडितजींनी रुद्रावतार धारण करून वाक्ताडन केल्यानं सारा नूरच बदलला. प्रदेश-काँग्रेसच्या नेत्यांची तर गाळणच उडाली. राजभवनावर जें ठरलं होतं त्याच्या नेमकं उलट घडल्यानं सारेच निराश बनले. निदर्शनं पाहून नेहरूंचा संताप होतो हें काँग्रेस-जनांना माहीत होतं. त्यामुळे त्यांच्यासमोर निदर्शनं होऊं नयेत यासाठी पाटसकर वगैरेंनी खटपटहि केली होती. परंतु त्यांना अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. नेहरू रागांत बोलले, पण त्याचा परिणाम मात्र लोक अधिकच संतापण्यांत झाला.

या सभेनंतर परत जाणाऱ्या काँग्रेस-नेत्यांच्या मोटारी अडविण्यास सुरुवात झाली. सभेंत गोंधळ, दगडफेक होऊन सभा उधळण्याचा प्रकार घडलाच होता. सभेनंतरहि तेंच वातावरण सर्वत्र पसरलं. के. के. शहा, रतिलाल संघवी, वाडिलाल पांचाळ आदींची मोटार चर्नीरोड स्टेशनजवळ अडवतांच, वाडिलाल पांचाळ यांनी गर्दीच्या रोखानं पिस्तूल झाडलं व त्यामध्ये सीताराम धाडीगावकर ठार झाला. त्यासरशी लोक खवळले आणि त्यांनी संघवी व पांचाळ यांना बाहेर ओढून मारहाण केली. स्वसंरक्षणार्थ पांचाळनं पिस्तूल झाडलं असं समर्थन नंतर मोरारजींनी केलं, पण या प्रकरणाची पोलिसांनी कांहीहि चौकशी केली नाही किंवा कुणाला अटक करून खटला दाखल केला नाही.

दुसऱ्या दिवशीं काँग्रेस-अधिवेशनावर प्रचंड जमाव चालून गेला. मंडपावर बेसुमार दगडफेक झाली. कांही काँग्रेस-कार्यकर्ते व नेते जखमी झाले. त्या ठिकाणींहि जमाव हटवण्यासाठी पोलिसांनी लाठीहल्ला, अश्रुधूर, गोळीबार असे उपाय योजले. गोळीबारांत पन्नासांवर लोक जखमी झाले. समितीनं आयोजित केलेल्या सत्याग्रहानं आणि निदर्शनानं, मोरारजी देसाई व मुंबई प्रदेश-काँग्रेस यांचं सारं गणितच चुकीचं ठरलं. मुंबईतील अधिवेशनाच्या निमित्तानं, वरिष्ठ काँग्रेस-नेत्यांनी मुंबईबद्दलचा केलेला निर्णय मुंबईच्या जनतेला सर्वसाधारणपणें मंजूर आहे याचा देखावा त्यांना पंतप्रधानांकडे उभा करायचा होता. ती त्यांची योजना व आशा निदर्शनांमुळे धुळीला मिळाली.

पंतप्रधानांना मुंबई शांत असल्याचं अनुभवास आलं असतं आणि तीच प्रतिमा मनांत ठेवून पं. नेहरू परतले असते, तर मुंबईतील जनतेच्या मनाला झालेली जखम आता भरून निघाली असून, ते आपल्या भवितव्याशीं आता मिळतं घेत आहेत असा त्यांचा समज झाला असता. समितीच्या नेत्यांना नेमकी हीच काळजी होती आणि त्यामुळे पं. नेहरूंच्या हळव्या मनाला त्यांनी धक्का दिला होता.

चौपाटीवरील सभेंत नेहरूंनी मुंबईबाबतचा निर्णय ठामपणानं सांगतांच महाराष्ट्रांतले काँग्रेस-नेते गोंधळून गेले. शिवाय सरकारचा निर्णय जाहीर करण्याच्या कामीं नेहरूंनी पक्षाच्या व्यासपीठाचा उपयोग केल्याबद्दल आणि सहकाऱ्यांना तो निर्णय अगोदर न सांगतां किंवा त्यांना विश्वासांत न घेतां तो जाहीर केल्याबद्दल लोकसभेचे सदस्यहि नाराज बनले. परिणामीं, पं. नेहरू दिल्लींत पोंचतांच सी. डी. देशमुख यांनी आपला राजीनामा मंजूर करावा यासाठी आग्रह धरला; परंतु नेहरूंनी पुन्हा त्यांना

'थांबा' म्हणून सांगितलं. नेहरू त्या वेळीं पांच आठवड्यांच्या परदेशच्या दौऱ्यावर जाणार होते आणि राज्य-पुनर्रचना विधेयक निर्वाचन समितीकडून परत येऊन लोकसभेसमोरहि दाखल व्हायचं होतं. हें सर्व होईपर्यंत देशमुखांनी थांबावं असा त्यांचा सल्ला होता.

पं. नेहरूंच्या मुंबईतील भाषणानंतर देवगिरीकर यांनी पंडितजींना पत्र लिहिलं. मुंबईसंबंधीच्या निर्णयाबद्दल पुन्हा एकदा विचार करून महाराष्ट्रांतील वातावरण शांत होण्याच्या दृष्टीनं खुलासा करावा असं त्यांत सुचवलं होतं. परंतु पंडितजींनी त्यांना पाठवलेल्या उत्तरांत पूर्वीचाच निर्णय त्यांनी कायम ठेवला आणि प्रदेश-कॉंग्रेसच्या बैठकींत तोच वाचून दाखवा असं कळवलं.

प्रदेश-कॉंग्रेसची बैठक १५ जून १९५६ ला सुरू झाली. कार्यकारिणीच्या बैठकीला दहा जिल्हा-कॉंग्रेसचे अध्यक्ष आणि चिटणीस हजर होते. यांतील सहाजणांनी कॉंग्रेस-श्रेष्ठांच्या निर्णयाबद्दल नापसंती दर्शवून महाराष्ट्रांतील कॉंग्रेस-जनांनी आणि असेंब्लीच्या सभासदांनी राजीनामे द्यावेत असं सुचवलं; परंतु सातारा, कोल्हापूर, सोलापूर आणि पूर्व-खानदेशच्या लोकांनी कॉंग्रेस-श्रेष्ठांचा निर्णय आपल्यावर बंधनकारक असून शिस्त म्हणून तो पाळला पाहिजे असं सांगितलं. कार्यकारी मंडळाच्या बैठकींतच अशा प्रकारे हिरे आणि चव्हाण यांचे दोन गट तयार झाले आणि ते समोरासमोर उभे ठाकले. रत्नांगिरी, कुलाबा आणि ठाणें जिल्ह्याचे नेते पी. के. सावंत, भास्करराव दिवे आणि भाऊसाहेब वर्तक हे हिरे यांच्या बाजूला, तर देवकीनंदन नारायण, रत्नाप्पा कुंभार आणि छन्नूसिंग चंदले हे पूर्व-खानदेश, कोल्हापूर आणि सोलापूरचे नेते चव्हाण यांच्या बाजूला, अशी ही फळी निर्माण झाली. विदर्भ व नागपूर भागांतून गोपाळराव खेडकर आणि एम्. डी. तुमपल्लीवार हे या बैठकीला आले नव्हते, पण श्रेष्ठांचा निर्णय आपण मानावा असंच त्यांनी कळवलं होतं.

राजीनामे देण्याचे हिरे-कुंटेकृत निर्णय यापूर्वी दोन वेळा झाले होते आणि हे सर्व राजीनामे हिरे यांच्या खिशांतच पडून होते. याच नाटकाचा तिसरा अंक आता सुरू झाला होता. या बैठकींत जो ठराव करायचा त्याच्या मसुद्याबाबतहि हिरे, चव्हाण व कुंटे यांच्यांत एकमत होऊं शकलं नाही. अखेरीस हिरे यांनी स्वतःच मसुदा तयार करून तो सभेपुढे ठेवला.

कॉंग्रेस-श्रेष्ठांनी महाराष्ट्राच्या प्रश्नाचा फेरविचार करावा याबाबत या दोन्ही गटांत एकमत होतं, परंतु त्या प्रश्नावर राजीनामे सादर करण्याबाबत त्यांच्यांत तीव्र मतभेद झाले. हिरे यांनी आपल्या ठरावांत " या कमिटीची अशी धारणा आहे की, कॉंग्रेसच्या नेत्यांनी जनतेंत काम करण्याच्या दृष्टीनं व तें कार्य सफल होण्यासाठी आपल्या सरकारांतील अधिकारपदांचा त्याग करून कार्य करणं योग्य ठरेल. " असा एक परिच्छेद घातला होता. चव्हाण आणि त्यांना पाठिंबा देणारांना हा परिच्छेद मान्य नव्हता. वामनराव यार्दी यांनी त्यावर या परिच्छेदांत ' जरूर तर ' असे शब्द घालावेत अशी

उपसूचना दिली. या उपसूचनेवर समान मतदान झाल्यानं अध्यक्ष देवगिरीकर यांनी आपलं जादा मत उपसूचनेच्या बाजूनं दिल्यानं ती मंजूर झाली; परंतु पुन्हा मूळ ठरावाच्या वेळींहि समान मतं पडल्यानं पेंच निर्माण झाला. या वेळीं मात्र हा महत्त्वाचा ठराव जादा मतानं मान्य करणं देवगिरीकर यांना सयुक्तिक वाटलं नाही आणि तशाच स्थितींत तो ठराव सर्वसाधारण सभेपुढे आल्यानंतर मात्र हिरे यांनी तो जिंकला.

ठराव मतास टाकण्यापूर्वी यशवंतरावांनी असं स्पष्ट केलं की, 'राजीनामे देणार नाहीत तेहि तितकेच कळकळीचे व प्रामाणिक कार्यकर्ते आहेत' असा ठरावांत उल्लेख केल्यास तो एकमतानं संमत करतां येईल. राजीनामे देण्याच्या निर्णयानं सवंग प्रसिद्धि एखाद्याला मिळवतां येईल, पण त्यामुळे ज्यासाठी राजीनामे द्यायचे तो हेतु साध्य होणार नाही, उलट विरोधकांना बळ प्राप्त होईल. पूर्वी दोन वेळा राजीनामे दिले गेले, पण त्यामुळे मागणी मान्य होण्याच्या दृष्टीनं मात्र कांहीहि साध्य झालेलं नाही, असंहि यशवंतरावांनी पटवण्याचा प्रयत्न केला.

राजकारणांत सत्तेचा स्वीकार करणं हें टाळतां येणारं नाही असं त्यांनी हिरे यांना उद्देशून सांगितलं आणि त्यांनी राजीनाम्याचा आग्रह धरूं नये आणि स्वतःहि राजीनामा देऊं नये यासाठी प्रयत्न केले. पण हिरे यांनी कांहीच जुमानलं नाही. काकासाहेब गाडगीळ, गो. ह. देशपांडे, वि. स. पागे, एम्. डी. जोशी, बोंगावत, कानवडे पाटील यांनी हिरे यांना पाठिंबा दिला. हिरे यांचा ठराव अवघ्या दहा मतांनी संमत झाला. सभेस १२६ लोक हजर होते. चव्हाणांचा पराभव झाला, पण त्या वेळीं झालेल्या झटापटींतून आणि चव्हाणांनी मिळवलेल्या पाठिंब्यावरून, आज ना उद्या, प्रदेश-कॉंग्रेस-संघटना ताब्यांत घेण्याइतकी त्यांची शक्ति वाढली असल्याचा प्रत्यय मात्र संबंधितांना आला.

प्रदेश-कॉंग्रेसमध्ये हिरे यांचा विजय झाल्यानंतर, ते स्वतः आणि त्यांचे साथीदार कुंटे हे दोघे आता निश्चित राजीनामे देणार अशी खात्री निर्माण झाली. त्यांना पाठिंबा देणारांचीहि तीच स्वाभाविक अपेक्षा होती; परंतु हिरे आणि कुंटे या दोघांनीहि सर्वांची शेवटीं निराशा केली. हिरे, कुंटे आणि देवगिरीकर हे या सभेनंतर दिल्लीला गेले असतांना हिरे यांनी ढेबरभाईंना राजीनाम्याचा मनोदय सांगितला. पं. नेहरूंना भेटून त्यांनाहि सांगितलं. परंतु पंडितजींनी हिरे यांना प्रेमानं जवळ घेऊन, असं कांही करूं नका म्हणून सांगतांच हिरे थिजून गेले आणि पंडितजी म्हणतात तेंच बरोबर आहे असं मनांत घोळवत मुंबईस परतले. हिरे यांचा राजीनाम्याचा आवेश बारगळल्यानं कुंटे यांचाहि राजीनामा बारगळला. आणि राजीनाम्याच्या नाटकाचा तिसरा अंक समाप्त झाला.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत यशवंतराव हे आतापर्यंत हिरे यांचंच नेतृत्व मानत होते. परंतु राजीनाम्याच्या या तिसऱ्या प्रकारानंतर मात्र त्यांनी हिरे यांना स्वच्छच सांगितलं की, आता तुमचे आणि माझे मार्ग भिन्न झाले आहेत. हिरे यांनी

तिसऱ्या खेपेसहि राजीनामा दिला नाही. तेव्हापासूनच हिरे यांचं नेतृत्व घसरणीला लागलं.

प्रदेश-कॉंग्रेसनं १७ जूनला ठराव केल्यानंतर पुढच्या चार महिन्यांत गोष्टी इतक्या झपाट्यानं घडत गेल्या की, ऑक्टोबरअखेर द्वैभाषिकाला श्रेष्ठांनी मान्यता देण्यापासून तों १ नोव्हेंबर १९५६ ला द्वैभाषिक अस्तित्वांत येण्यापर्यंत या निर्णयांची मजल गेली. पुण्याच्या बैठकीनंतर भाऊसाहेब हिरे आणि नानासाहेब कुंटे, राजीनाम्याचा निर्णय श्रेष्ठांना सांगण्यासाठी दिल्लीला पोंचेपर्यंत कांही वेगळ्याच घटना घडत राहिल्या होत्या. डॉ. हिरानंदानी यांनी आपल्या निवासस्थानीं स. का. पाटील आणि प्रदेश-कॉंग्रेसच्या नेत्यांची एकत्रित अशी एक बैठक मुंबईत अयोजित केली. चव्हाण त्या वेळीं मुंबईत नव्हते. त्यामुळे या बैठकीला हिरे आणि कुंटे हे फक्त दोघेच उपस्थित राहिले. महाराष्ट्र आणि गुजरात यांची मुंबई ही राजधानी असावी असा प्रस्ताव पाटील यांनी या बैठकींत पुढे आणला. पाटील आणि कुंटे यांच्यांतच ही चर्चा प्रामुख्यानं झाली. हिरे यांनी फक्त श्रोत्याचं काम केलं.

या चर्चेचा आशय कुंटे यांनी आवश्यक त्या ठिकाणीं नंतर पोंचविण्याची त्वरा केली. दरम्यान देव, हिरे आणि कुंटे यांनी द्वैभाषिकाच्या योजनेला मान्यता देऊन, पुन्हा एकदा त्या प्रश्नाला चालना देण्याचं ठरवतांच पी. के. देशमुख यांनी नेहरूंची भेट घेतली आणि महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसच्या नेत्यांना दिल्लीला पाचारण करून, विशाल द्वैभाषिकाची चर्चा करावी असं सुचवलं. पंत आणि ढेबरभाई हे आता द्वैभाषिकाकरिता अनुकूल बनलेच होते. मोरारजींचा फक्त विरोध होता; परंतु कॉंग्रेस-श्रेष्ठ निर्णय करत असतील तर तो मानण्याची तयारी हिरे यांनी दर्शवली. पुढे ऑगस्टमध्ये लोकसभेच्या बहुसंख्य सभासदांनी द्वैभाषिकासंबंधींचं निवेदन पंतप्रधानांना सादर करण्यापूर्वीच कॉंग्रेस-श्रेष्ठ आणि प्रदेश-कॉंग्रेसचे कांही नेते यांच्यांत अशा प्रकारे हा मिलाप घडून आला होता.

मुंबई राज्यविषयक विधेयक २ जुलैला निर्वाचन मंडळापुढे चर्चेला घेतलं गेलं. त्या वेळीं मुख्य प्रश्न मुंबईचाच होता. या विधेयकांतील त्रिराज्य-योजनेला देवगिरीकर यांनी या बैठकींत विरोध केला. मुंबई शहर केंद्रशासित असावं या मूळ सूचनेंतहि बदल करण्याचा आग्रह धरून, नेहरूंनी मुंबईत जाहीर केलं त्याप्रमाणे मुंबई शहर पांच वर्षं केंद्रशासित राहील व नंतर मुंबई आपलं भवितव्य ठरवील असा उल्लेख या विधेयकांत त्यांनी, वादावादीनं करून घेतला. पंतप्रधानांच्या भाषणाचा उल्लेख विधेयकांत केला गेला तरी सर्व सरकारी नोकरांच्या सोयीच्या दृष्टीनं मुंबईहूनच महाराष्ट्राचा कारभार चालू द्यावा हा त्यांचा आग्रह मात्र पंतांनी त्यांना सोडायला लावला. तरी पण देवगिरीकर व जी. एस्. अळतेकर यांनी मिळून या विधेयकाला आपली भिन्न मतपत्रिका जोडली. या मतपत्रिकेंत त्यांनी सीमा-प्रश्नाचाहि उल्लेख करून, हा प्रश्न सोडवण्यासाठी सीमा-कमिशन नेमण्याची सूचना केली. ही भिन्न मतपत्रिका

परत घ्यावी यासाठी पाटसकर व पंत यांनी देवगिरीकरांवर पुष्कळ दबाव आणला, पण त्यांनी आपला निर्णय बदलला नाही.

लोकसभेंत या विधेयकावर २६ जुलैला चर्चा सुरू झाली आणि त्याच वेळीं मुंबई केंद्रशासित करण्याच्या सरकारच्या निर्णयाविरुद्ध सी. डी. देशमुख यांनी अर्थमंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजीनाम्याच्या कारणाबद्दल त्यांनी पंतप्रधानांना दोन खरमरीत पत्रं लिहिलीं. एका पत्रांत तर या विधेयकाच्या विरुद्ध आपण मतदान करणार असल्यानं, पक्षाच्या सदस्यत्वाचाहि राजीनामा देत असल्याबद्दल कळवलं. पं. नेहरूंनी मग त्यांचा राजीनामा मंजूर करण्यासाठी राष्ट्राध्यक्षांकडे सुपूर्त केला.

राजीनामा दिल्यानंतर देशमुख यांनी लोकसभेंतील चर्चेमध्ये भाग घेऊन, सरकारवर आणि प्रामुख्यानं पं. नेहरूंवर तुफान टीका केली. महाराष्ट्राबद्दल काँग्रेस-श्रेष्ठांच्या मनांत द्वेषबुद्धि, आकस कसा साठलेला आहे याचं त्यांनी सोदाहरण विवेचन केलं. देशमुख यांनी राजीनामा दिला त्या वेळीं काँग्रेस-श्रेष्ठांच्या मनांत द्वैभाषिकाच्या योजनेनं मूळ धरलं आहे याची त्यांना गंधवार्ताहि नव्हती. देशमुखांचा त्या योजनेला वस्तुतः पाठिंबा होता. नेहरूंना त्याची जाणीव असूनहि नेहरूंनीहि बदलत्या परिस्थितीबद्दल त्यांना विश्वासांत घेऊन कांही सांगितलं नाही. यापूर्वी देशमुखांना त्यांनी राजीनाम्यासाठी तीन वेळा थोपवलं होतं आणि आता या प्रश्नांत कांहीसा समाधानकारक निर्णय होण्याचा क्षण जवळ येत असतांना मात्र त्यांनी देशमुखांचा राजीनामा राष्ट्राध्यक्षांकडे पाठवून दिला.

देशमुखांच्या राजीनाम्यानंतर केवळ लोसकभेंतील खासदार द्वैभाषिकाचा पुरस्कार करण्यासाठी धांवपळ करूं लागले असं सांगितलं जातं, परंतु तें विश्वासार्ह वाटत नाही. कारण अमृतसर काँग्रेसपासूनच द्वैभाषिकाची हवा निर्माण झाली होती. सर्वोदयवादी मंडळींनीहि त्या दृष्टीनं चर्चा करून वातावरण निर्माण केलं होतं. देशमुख यांचा राजीनामा आणि लोकसभेंतील त्यांची स्पष्टोक्ति यामुळे महाराष्ट्रांत मात्र त्यांच्याबद्दलचा आदर अनेक पटींनी वाढला. त्यांचा राजीनामा हा समितीला पूरकच ठरला. देशमुखांच्या राजीनाम्यानं निर्माण झालेल्या परिस्थितींत लोकसभेलाहि, महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत तातडीनं कांही पर्याय निर्माण करण्याची आवश्यकता असल्याची खऱ्या अर्थानं जाणीव झाली आणि त्या अनुषंगानं भराभर पावलं टाकण्यांत येऊन पुढच्या पंधरा दिवसांतच द्वैभाषिकाच्या पर्यायास लोकसभेनं मान्यता दिली.

पं. नेहरूंच्या मनानंहि हा पर्याय मान्य केला होता, परंतु त्यांनी त्याबाबत मौन पाळलं होतं. दि. १ ऑगस्टला लो. टिळकांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुण्यांत आयोजित करण्यांत आलेल्या जाहीर सभेसाठी पं. नेहरू पुण्यास आले होते. पुण्यांतील रेसकोर्स मैदानावर पंडितजींचं भाषण होतं, तर समितीनं त्याच वेळेला शनिवारवाड्यासमोर जाहीर सभा बोलावली होती. पुणें शहर हें समितीच्या प्रचारानं आणि महाराष्ट्र-प्रेमानं भारलेलं होतं, जागृत बनलं होतं. एका बाजूला पं. नेहरूंची सभा यशस्वी करण्याचा

प्रयत्न, तर त्याच वेळीं नेहरूंच्या सभेवर बहिष्कार घालण्याचं व समितीच्या सभेला उपस्थित रहाण्याचं समितीचं आवाहन, ह्यामुळे पुण्यांत अक्षरशः धमाल उडाली. नेहरूंची जाहीर सभा म्हणजे लक्षावधि श्रोत्यांची उपस्थिति हें गणित ठरलेलं होतं. पण पुण्यांतील या दोन्ही सभा अशा झाल्या की, त्यांची तुलना करणं कठीण ठरावं! या सभेंतील भाषणांतहि पं. नेहरूंनी, महाराष्ट्राच्या मागणीसंबंधानं कांही फेरविचार सुरू असल्याचा थांगपत्ता लागू दिला नाही. दिल्लीला ते २ ऑगस्टला परतले. पण तोंपर्यंत द्वैभाषिकाचं वातावरण तयार करण्यासाठी दिल्लींत जोरानं हालचाली सुरू झाल्या होत्या. स. का. पाटील हेच त्यासाठी धांवपळ करत होते.

दिल्लींत ५ ऑगस्टला वर्किंग कमेटीची बैठक होती. या बैठकीपुढे अचानकपणें २८२ खासदारांच्या सह्यांचा एक खलिता आला. त्रिराज्य-योजनेऐवजीं त्यामध्ये द्वैभाषिक सुचवलं होतं. गुजरात, सौराष्ट्र, कच्छ, मुंबई, महाराष्ट्र, महाविदर्भ व मराठवाडा यांचं मिळून एक द्वैभाषिक करावं अशी सूचना त्या निवेदनांत होती. वर्किंग कमिटीच्या सर्व समासदांना तें मान्य होतं. देवगिरीकर त्याला विरोध करूं लागतांच स. का. पाटील यांनी त्यांना अडवलं आणि हिरे आणि कुंटे यांनीच ही योजना सुचवली असतांना तुम्ही विरोध कसला करतां, असं म्हणून देवगिरीकरांना गप्प केलं. डॉ. हिरानंदानी यांच्या घरीं शिजलेली योजना ती हीच होय; परंतु देवगिरीकरांना पडद्यामागे घडलेल्या या घटनांची कांहीच माहिती नव्हती. हिरे किंवा कुंटे यांनी कुणालाच विश्वासांत घेऊन त्याची चर्चा केली नव्हती. यशवंतरावांनाहि त्यांनी अंधारांतच ठेवलं होतं. देवगिरीकरांनी नंतर मुंबईला हिरे यांच्याशीं संपर्क साधून विचारलं तेव्हा ते 'हो' म्हणाले, पण तें तुम्ही मोडून काढा असंहि त्यांनी देवगिरीकरांना सांगितलं. अर्थात् गोष्टी आता निर्णयाच्या थराला पोंचल्या होत्या आणि देवगिरीकरांसाठी कुणी थांब-ण्याची शक्यता उरली नव्हती. महाराष्ट्रांतील नेते बरोबरीच्या नेत्यांशीं कसे आडपडद्यानं वागत राहिले होते हेंच या घटनेनं पुन्हा एकदा सिद्ध झालं.

वर्किंग कमिटीनं द्वैभाषिकाची योजना मान्य केली आणि महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेस-च्या नेत्यांना मग, चर्चेसाठी दिल्लीला तातडीनं पाचारण केलं. त्यानुसार ६ ऑगस्टला हिरे, चव्हाण, कुंटे आणि बाळासाहेब देसाई ही मंडळी दिल्लीस पोंचली. तिथे हरि-भाऊ पाटसकर यांच्या निवासस्थानीं झालेल्या चर्चेच्या वेळीं या सर्वांना, द्वैभाषिकाच्या पर्यायास मान्यता देण्यांत आली असून, त्या संदर्भातच पं. नेहरू हे महाराष्ट्रांतील खासदार आणि प्रदेश-कॉंग्रेसच्या नेत्यांना भेटणार आहेत असं समजलं.

यशवंतरावांना द्वैभाषिक मान्य नव्हतं; पण श्रेष्ठांनी तर निर्णय केला होता. लोक-सभेचा शिक्कामोर्तब होणं तेवढंच आता उरलं होतं. तरी पण, देवगिरीकरांनी पाटसकरां-च्या येथील चर्चेच्या वेळीं चव्हाणांना त्यांचं मत विचारलं तेव्हा त्यांनी फक्त हिरे यांच्याकडे बोट दाखवलं. महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसच्या कार्यकारिणीला, सभासदांना नव्या बदलाची कांहीहि माहिती न देतां, त्यांची संमति न घेतां दिल्लींत बसून या योजनेला

मान्यता देणं व्यवहार्य ठरणार नाही, असं देवगिरीकरांचं मत होतं. नेहरूंच्या भेटींत त्यांनी हें बोलूनहि दाखवलं, परंतु प्राप्त परिस्थितींत निर्णय मान्य करण्याखेरीज गत्यंतर उरलं नव्हतं.

त्याच दिवशीं लोकसभा काँग्रेस-पक्षाची बैठक झाली. या बैठकीस ३०० खासदार हजर होते. ढेबर आणि मोरारजी यांनाहि खास निमंत्रण होतं. पं. नेहरू यांनी, द्वैभाषिकाचा पर्याय ज्यांना मान्य आहे त्यांनी हात वर करून तसं दर्शवावं असं सांगतांच काकासाहेब गाडगीळ वगळतां सर्वांनी अनुमति दर्शवली. सी. डी. देशमुख यांना मुंबई-बद्दलची आपुलकी होतीच. मुंबईसह द्वैभाषिकाला त्यांनी पसंती दिली.

अशोक मेहता हे प्रजासमाजवादी. महाराष्ट्रांतले प्रजासमाजवादी मुंबईसाठी चळवळ करत होते, परंतु मुंबई ही एकट्या महाराष्ट्राला मिळूं नये असं मात्र मेहता यांचं मत होतं. द्वैभाषिकाला त्यासाठीच त्यांनी मान्यता दर्शवली. पं. पंत यांना पर्याय मान्य झाल्याचा आनंद होता. कारण त्यांनीच अमृतसरनंतर युक्तियुक्तीनं गोष्टी या थरापर्यंत आणल्या होत्या. लोकसभेंत बोलतांना, ७ ऑगस्टला त्यांनी आपलं समाधान मोकळेपणानं व्यक्त केलं. लोकसभेसमोर असलेल्या विधेयकाला त्यांनी, द्वैभाषिकाची दुरुस्ती सुचवून त्यावर मतदान घेतलं तेव्हा २४१ विरुद्ध ४० अशा प्रचंड बहुमतानं त्याला मान्यता मिळाली. विधेयकाच्या दुसऱ्या वाचनाच्या वेळीं काकासाहेब गाडगीळ यांनी विरोधी बाजूनं मत दिलं, पण दुरुस्तीसह मूळ ठराव समोर आला तेव्हा मात्र त्यांनी विरोध केला नाही. लोकसभेच्या मताचा आदरच केला. अशा प्रकारे काँग्रेस-श्रेष्ठांनी द्वैभाषिकाचा पर्याय लोकसभेकडून मान्य करून घेण्यापर्यंत अखेर मजल मारली.

# १३

लोकसभेनं द्वैभाषिक मान्य करतांच गुजरातमध्ये मात्र त्याची अतिशय तीव्र प्रतिक्रिया उमटली. महागुजरात समितीनं तिथे प्रचंड आंदोलन सुरू केलं. अहमदाबाद शहरांत सर्वांत अधिक दंगल उसळली. गुजरातमधील नेत्यांचा सल्ला न घेतां निर्णय केला गेला याचा त्यांना राग होता. मोरारजींनी दंगलखोरांना नेहमीच्या पद्धतीनुसार दटावतांच परिस्थिति अधिकच चिघळली. निदर्शकांना रोखण्यासाठी मग अहमदाबाद, बडोदें, नडियाद, डभोई, कळोल, उंझा या ठिकाणीं पोलिसांनी गोळीबार केले आणि त्यांत २४ लोक ठार झाले. शेकडो जखमी झाले. ८ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट हा संपूर्ण आठवडा अहमदाबादमध्ये संचारबंदी लागू करण्यांत येऊनहि दंगल आटोक्यांत आली नाही. विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन हरताळ पुकारला. त्यांनी काँग्रेस-पुढाऱ्यांविरुद्ध निदर्शनं करतांच त्यांच्यावर गोळ्या झाडण्यांत आल्या. त्यांत सहाजण ठार झाले. विद्यार्थ्यांनी मोरारजींच्या प्रतिमेची होळी तर केलीच, शिवाय गांधी-टोपी घालणारा कुणीहि दिसला तरी विद्यार्थी त्यांच्यावर तुटून पडूं लागले. गांधी-टोप्यांची होळी करणं किंवा साबरमतीनदीमध्ये त्या फेकून देणं असा प्रकार सर्रास सुरू राहिला. मुंबईचीच आवृत्ति आता अहमदाबादमध्ये घडूं लागली. गांधींचा आश्रम जाळण्याचा प्रयत्न केवळ पोलिसांच्या दक्षतेमुळे टळला.

१९ ऑगस्टला गुजरात प्रदेश-काँग्रेसची बैठक झाली त्या वेळीं अहमदाबाद शांत झालेलं नव्हतं. तरी पण याच बैठकींत गुजरात काँग्रेसनं द्वैभाषिकाला मान्यता दिली. वातावरण कांहीसं निवळल्याचा फायदा घेऊन मोरारजींनी जाहीर सभेचा घाट घातला; परंतु विद्यार्थी कृति-समितीनं या सभेवर बहिष्कार घालून 'जनता कर्फ्यू' पुकारण्याचा आदेश दिला. त्याचबरोबर अहमदाबाद शहरांत संपूर्ण हरताळ पाडण्याचं फर्मानहि काढलं. याचा परिणाम असा झाला की, मोरारजींच्या सभेला फक्त तीनशे लोक जमले.

त्यामध्येहि स्वयंसेवक आणि पोलिस यांचाच भरणा होता. मोरारजींचं भाषण दुसऱ्यानं वाचून दाखवलं आणि ही सभा गुंडाळण्यांत आली.

एवढं होतांच जाहीर सभा होऊन लोकांनी शांतपणें भाषण ऐकून घ्यावं म्हणून मोरारजींनी उपोषण जाहीर केलं. दरम्यान विद्यार्थ्यांनी जाहीर सभेचा पुकारा करतांच त्यांच्या सभेला दोन लाख लोकांनी गर्दी केली. मोरारजींनी उपोषण सुरू करणं नेहरूंना पसंत नव्हतं. अखेर महागुजरात समितीचे अध्यक्ष हर्षदभाई शुक्ला यांनी मोरारजींसाठी सभा आयोजित करण्याचं ठरवून, लोकांनी शांतपणें ऐकून घ्यावं असं आवाहन केलं. २६ ऑगस्ट या दिवशीं, मग मोरारजी सभेच्या स्थानीं उपस्थित झाले. परंतु लोक त्यांचं भाषण ऐकून घेण्याच्या मनःस्थितींत अजूनहि नव्हते. सभेंत बरीच गडबड निर्माण झाली आणि दगडफेकहि झाली. मोरारजींचं उपोषण म्हणजे एक राजकीय स्टंट आहे, अशी गुजराती जनतेनं त्यांची टिंगल केली. सभेंत गोंधळ वाढतांच गोळीबार झाला आणि त्यांत एकजण ठार झाला, शंभरावर जखमी झाले. त्यानंतरहि पुढे कांही दिवस अहमदाबादमध्ये दंगली घडत राहिल्या.

सर्वत्र निर्माण झालेल्या असंतोषाला, योग्य वाट करून देण्यासाठी, त्यानंतर इंदुलाल याज्ञिक यांच्या अध्यक्षतेखाली ९ सप्टेंबरला महागुजरात जनता-परिषद स्थापन करण्यांत आली. तरीहि दंगल चालूच होती. शेवटीं पं. नेहरूंनी आपली वैयक्तिक प्रतिष्ठा पणाला लावून अहमदाबादला सभा घेण्यासाठी ते ऑक्टोबरच्या २ तारखेला आले. त्यांच्या सभेला सुमारे एक लाख लोक जमा झाले, पण त्याच वेळीं जनता-परिषदेनं आयोजित केलेल्या सभेला तीन लाखांवर समाज उपस्थित राहिला. गुजरात विद्यापीठांतील सभेच्या वेळीं मात्र विद्यार्थ्यांनी नेहरूंच्या सभेंत गोंधळ माजवला. महागुजरातच्या बाजूनं सभेंत एकसारख्या घोषणा होत राहिल्या. त्याबरोबर पं. नेहरू संतापले आणि मुंबईतल्याप्रमाणे गुजरातच्या जनतेलाहि ते टोचून बोलले.

गुजरातमध्ये सुरू झालेल्या चळवळींत, गोळीबारामुळे जे ठार झाले त्यांच्याबद्दल महाराष्ट्राच्या वतीनं दुःख व सहानुभूति व्यक्त करण्यांत आली. मोरारजी देसाई हे गुजरातचे राजे समजले जात. पण गुजरातनंच त्यांचं राजेपण आता फेकून दिलं होतं. महाराष्ट्रांतील जनतेला मोरारजी आणि पं. नेहरू यांनी माथेफिरू म्हणून दोष दिला होता; पण अहमदाबादच्या दंगलींत गुजराती जनतेनं महाराष्ट्राच्या माथेफिरूपणावरहि ताण केली होती. इथून-तिथून माणसं सारखींच. आपल्यावर अन्याय होत असल्याचं त्यांच्या लक्षांत येतांच, त्यांची रागाची प्रतिक्रिया सर्वत्र सारखीच उमटते, हा बोध या चळवळीपासून राज्यकर्त्यांना मिळाला.

मुंबईत गोळीबार होऊन कित्येक लोक ठार करण्यांत आले, पण त्या वेळीं मोरारजींना उपोषणाचा मार्ग सुचला नाही. गुजरातमध्ये मात्र तसं घडतांच त्यांनी उपोषण केलं. गुजरातला ते स्वतःचं घर समजत असल्यामुळे तिथे प्राणाची बाजी लावली तर शांतता

निर्माण होईल असा त्यांचा समज होता, पण तो भ्रम ठरला. महाराष्ट्रांतून समितीनं मात्र मोरारजींच्या या आपपरभावाचा निषेधच केला.

एक गोष्ट सत्य होती की, ऑक्टोबरपासून अस्तित्वांत येणार असलेलीं तीन राज्यं संपुष्टांत आलीं होतीं. द्वैभाषिक निश्चित झालं होतं. त्याचा मुहूर्त ठरून आता तें राज्य फक्त अस्तित्वांत यायचं तेवढं राहिलं होतं. कॉंग्रेस-पक्षांतर्गत तरी निदान, पर्याय निर्माण करण्याच्या वादावर पडदा पडला होता, धांवपळ संपली होती. आता धांवपळ सुरू करावी लागणार होती ती द्वैभाषिकाचा नेता निश्चित करण्यासाठी, मुख्य मंत्री ठरवण्यासाठी. त्यासाठीच मग डावपेचांची आखणी सुरू झाली. कॉंग्रेस-नेत्यांनी आणि लोकसभेनं महाराष्ट्राच्या आणि गुजरातच्या गळ्यांत द्वैभाषिक अडकवून ते मोकळे झाले परंतु महाराष्ट्रांतील नेत्यांना विशेषतः मोरारजींना मात्र घरघर लागली.

१६ ऑक्टोबर १९५६ ला द्वैभाषिकाचा निर्णय झाला, परंतु द्वैभाषिकाचं वारं वाहूं लागल्यापासून, ७ ऑगस्टपासूनच, महाराष्ट्रांत कॉंग्रेस आणि विरोधी पक्ष यांच्यांत वेगळ्याच हालचाली सुरू झाल्या होत्या. १९५७ मधील सार्वत्रिक निवडणुकीचा विचार संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये सुरू होऊन अंतर्गत मतभेद बाजूला ठेवून, सार्वत्रिक निवडणुकीसाठी म्हणून समितीच्या वतीनं सर्वांचा मिळून एक सामायिक कार्यक्रम, जाहीरनामा निश्चित करण्यांत समितीचे नेते गुंतले होते, तर कॉंग्रेस-जनांमध्ये द्वैभाषिकाचा असेंब्लींतील नेता कोण असावा, यासंबंधीची धांवपळ सुरू झाली होती.

वस्तुतः मार्चपासूनच कॉंग्रेस-अंतर्गत निरनिराळ्या गटांत नेते कोण असावेत याच्या गुप्त चर्चा सुरू झाल्यानं, समजोत्याची आशा दुरावत चालली होती. हा सामना अटीतटीचा होणार असं गृहीत धरूनच त्या दृष्टीनं प्रत्येक गट शक्तिसंचय करण्याच्या कामांत गुंतला होता.

शंकरराव देव यांना याची जाणीव झाली होती. त्या वेळीं यशवंतराव चव्हाण यांच्याशीं ब्रिजलाल बियाणी आणि देवीसिंग चौहान यांनी जवळीक निर्माण केली होती. चव्हाण नेते म्हणून निवडले गेले, तर आपल्यापैकी कांहींची वर्णी लागावी हा बियाणी आणि देवीसिंग यांचा हेतु असल्याचंहि बोललं जात होतं.

देवकीनंदन नारायण आणि देवगिरीकर हे दोघे एकत्रित राहून चव्हाण आणि बियाणी यांना सहकार्य करूं लागले. भाऊसाहेब हिरे यांना शंकरराव देव आणि काकासाहेब गाडगीळ यांचा पाठिंबा होता. या निवडणुकींत, मुंबई, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, गुजरात, सौराष्ट्र, कच्छ या सर्व भागांतील आमदारांच्या मतांचं दान कसं पडेल त्यावर सर्व अवलंबून होतं. त्यामुळे, प्रादेशिक शक्ति, आपल्यामागे मोठ्या प्रमाणांत उभी करणं यावरच नेतेपदाच्या इच्छुकाला सर्व लक्ष केंद्रित करणं क्रमप्राप्त ठरलं. त्या दृष्टीनं आखणी सुरू राहिली. मराठवाडा कॉंग्रेसचे नेते स्वामी रामानंद तीर्थ हे होते. त्यांच्या इशाऱ्यानुसार मराठवाड्यांतील मतदान होणार असल्यानं, तें एकमुखी

होऊं नये यासाठी गोपाळराव खेडकर यांनी मराठवाड्यांतील बाबसाहेब सावनेकर आणि भगवंतराव गाढे यांच्याशीं संधान बांधून ठेवलं. या सर्व हालचाली पाहून नेतेपदाच्या सामन्यांत, हिरे यांना चीतपट करण्याची तयारी सुरू असल्याबद्दल रामराव देशमुख यांनी शंकरराव देव यांना जागं केलं. विदर्भातील दुसरे एक नेते मा. सा. कन्नमवार यांच्या मुंबईतील भेटीगाठीहि त्या दृष्टीनं महत्त्वाच्या मानल्या जाऊं लागल्या. सुरवातीला तरी चव्हाण, वियाणी, कन्नमवार आणि मराठवाड्यांतील रामानंदांच्या विरोधी असलेला गट एकत्र आला असल्याचं स्पष्ट झालं. भाऊसाहेब हिरे यांच्या विरोधांत आता एक भक्कम फळी तयार होऊं लागली होती. सत्तेपासून दूर असलेल्या काँग्रेस-जनांना मात्र या अंतर्गत हालचालींची विशेष माहिती नव्हती.

मुख्यमंत्रिपदावर त्या वेळीं मोरारजी देसाई होते. तरी पण ही जागा रिकामी होणार असल्यानं यशवंतरावांनी ही जागा संपादन करण्याच्या निर्धारानं पश्चिम महाराष्ट्राच्या बाहेरचा पाठिंबा मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू केले. विदर्भात कन्नमवार आणि पी. के. देशमुख या दोन शक्ति होत्या. देशमुख हे हिरे यांच्या बाजूचे होते आणि कन्नमवार यांनी आपली सर्व शक्ति चव्हाण यांच्या पाठीशीं उभी करण्याचा निर्णय केला होता. प्रदेश-काँग्रेसनं ३० ऑगस्टच्या बैठकींत, द्वैभाषिकाला मान्यता देण्याचा ठराव केल्यापासूनच द्वैभाषिकाच्या नेतृत्वासाठी पडद्यामागे हालचाली सुरू झाल्या होत्या. हिरे हे प्रथमपासूनच त्यासाठी उत्सुक होते. किंबहुना त्रिराज्य-योजना मान्य करण्याचा आग्रह धरणारांपैकी ते एक होते. त्रिराज्य निर्माण झालं तर महाराष्ट्राचं मुख्यमंत्रिपद त्यांनी गृहीतच धरलं होतं. तसं घडण्याची शक्यताहि होती; परंतु स्वतःच्या निर्णयाबद्दल ते स्वतःच भक्कम रहात नव्हते. निर्णय बदलत रहाणं हा त्यांचा पुढे स्वभाव बनल्यानं, द्वैभाषिकाची योजना येतांच त्रिराज्य-योजना बाजूस सारून त्यांनीच प्रथम ती मान्य केली. मुख्यमंत्रिपद मिळण्याची संधि यामुळे हुकणार आहे याकडे त्यांनी लक्ष दिलं नसावं.

द्वैभाषिकाचा पर्याय पुढे आला त्या वेळीं, अमृतसर इथेच मोरारजींनी, द्वैभाषिकाची जबाबदारी आपण स्वीकारणार नाही, असं पं. पंत आणि ढेबरभाई यांना सांगितलं होतं. तरीहि काँग्रेस-श्रेष्ठांचं मत, मोरारजी यांनीच द्वैभाषिकाची जबाबदारी स्वीकारावी असं होतं. त्यानुसार मोरारजींना श्रेष्ठांनी सूचनाहि केली. नेतेपदाबद्दल महाराष्ट्रांत सुरू झालेल्या हालचाली आणि चव्हाणांची वाढती शक्ति लक्षांत आल्यानंतर विदर्भातील पी. के. देशमुख प्रभृतींनी, चव्हाण यांना बाजूला सारण्याच्या दृष्टीनं दिल्लीचे हेलपाटे सुरू केले. काँग्रेस-श्रेष्ठांनी मोरारजींनाच मुख्यमंत्रिपदासाठी तयार करावं असा त्यांचा आग्रह होता. मोरारजींनी तें मान्य केलं असतं, तर हिरे यांना निवडणुकीच्या रिंगणांतूनच बाहेर काढण्याची त्यांची तयारी होती. पी. के. देशमुख आणि गो. ह. देशपांडे यांनी हिरे यांना हा बेत सांगतांच मात्र हिरे भडकले. मोरारजी यांची एकमतानं निवड व्हावी हे हिरे यांना कदापि मान्य नव्हतं.

एकमतानं निवड होणार असेल तरच जबाबदारी स्वीकारण्याची मोरारजींनी तयारी दर्शवली होती. दरम्यान द्वैभाषिकाचं नेतृत्व स. का. पाटील यांनी स्वीकारावं असाहि कांही कॉंग्रेस-श्रेष्ठांचा प्रयत्न होता. परंतु ते निवडून येण्याची सुतराम् शक्यता नव्हती. स. का. पाटील हे कोकणांतले सारस्वत. महाराष्ट्रांतल्या विविध जाति-जमातींतून निवडून आलेल्या आमदारांचीं मतं मिळतील अशी त्यांना खात्री नव्हती. त्यांची सर्व मदार मुंबईवर होती; पण तिथेंहि फाटाफूट झालेली होती. मोरारजींचाहि पाठिंबा मिळण्याची शक्यता उरलेली नसल्यानं श्रेष्ठांची इच्छा पूर्ण करणं पाटील यांना अशक्य ठरलं.

शंकरराव देव यांनी मात्र हिरे यांना मुख्य मंत्री करण्यासाठी बरीच धांवपळ केली. गुजरात, कच्छ आणि सौराष्ट्र इथल्या आमदारांनी नेता-निवडीच्या वेळीं तटस्थ रहावं यासाठी त्यांनी मोरारजींची मदत घेण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रांतले आमदार, नेतेपदाचा निर्णय एकमतानं करणार नसतील, तर गुजरात, कच्छ, सौराष्ट्र इथल्या आमदारांनी तटस्थ रहाणं योग्य होय अशी त्यांची सूचना होती. मोरारजींनी स्वतःच मुख्य मंत्री म्हणून रहावं असा देव यांचा प्रारंभीं आग्रह होता; परंतु मोरारजींनी त्यास नकार देतांच त्यांनीहि दुसरी सूचना केली. या संदर्भात मोरारजींवर दिल्लीहून दबाव आणण्याचाहि त्यांनी प्रयत्न केला; पण त्याचा परिणाम होत नाही असं आढळतांच वैकुंठलाल मेहता किंवा सी. डी. देशमुख या दोघांपैकी कोणा तरी एकाचा नेते-पदासाठी प्रयत्न करावा असं त्यांनी मोरारजींना पत्र लिहून सुचवलं.

देव यांचे खरे उमेदवार भाऊसाहेब हिरे हे होते; परंतु त्यांचं सारं डळमळीत आहे असं दिसतांच, त्यांचे प्रतिस्पर्धी यशवंतराव चव्हाण यांना संधि मिळण्यापेक्षा, दुसऱ्याच कुणाला तरी नेते-पदाची माळ घालण्याचा एक वेगळाच आनंद त्यांना मिळवायचा होता; परंतु मोरारजींनी तसला आनंद देव यांना मिळूं दिला नाही. कारण वैकुंठलाल मेहता यांची स्वतःचीच तयारी नव्हती आणि सी. डी. देशमुख यांना मतदान करण्याला गुजराती आमदार तयार नव्हते. त्यामुळे देव यांचा मोठाच विरस झाला.

नेता-निवडीचा दिवस जवळ येऊं लागतांच, महाराष्ट्रांतील कॉंग्रेस-अंतर्गत निर्माण झालेली आणि वाढत चाललेली गटबाजी कमी करून, नेत्याची निवड खुल्या दिलानं करण्याच्या प्रयत्नास जोर चढला. हिरे आणि चव्हाण यांच्यांत समझोता होऊन एकमतानं नेत्याची निवड होणार नसेल, तर उपोषण सुरू करण्याची धमकी, प्रदेश-कॉंग्रेसच्या एका सभासदानं देवगिरीकरांना एका पत्राद्वारे दिली. त्याचबरोबर ८३ सभासदांनी प्रदेश-कॉंग्रेसची तातडीची सभा बोलावण्याचीच लेखी मागणी केली. प्रदेश-कॉंग्रेसची नवी निवडणूक-समिति तयार करावी अशी या सभासदांची मागणी होती. त्यानुसार मग हिरे आणि चव्हाण यांच्या संमतीनं तशी एक समिति निवडण्यांत आली.

या समितींत गणपतराव तपासे, देवकीनंदन नारायण, हरिभाऊ पाटसकर आणि बापूसाहेब गुप्ते यांची निवड करण्यांत आली. समिति नियुक्त करण्याच्या बाबतींत

मतभेद जरी मिटले होते, तरी या दोन नेत्यांमधील चुरस थांबण्याची शक्यता नव्हती. सभासदांना त्याची कल्पना होतीच. तरी पण रामानंद तीर्थ आणि धर्माधिकारी यांनी एकदा अखेरचा प्रयत्न करण्याचं ठरवून त्यांनी मोरारजींची भेट घेतली आणि मोरारजींनी या निवडणुकींत तटस्थ भूमिका स्वीकारावी यासाठी प्रयत्न केला. मोरारजींनी या चर्चेच्या वेळीं स्वतः नेतृत्व स्वीकारण्याची तयारी दर्शवली, परंतु त्यासाठी त्यांनी बिनविरोध निवड होण्याची अट पुढे केली.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत काँग्रेसचे सर्वच नेते सामील झालेले असल्यानं, कोणाहि एकाबद्दल मोरारजींनी मनांत राग धरावा अशी वस्तुस्थिति नव्हती. तरी पण नेते म्हणून निवड झाली, तर आपलं नेतृत्व मान्य नसणाऱ्या कुणालाहि मंत्रिमंडळांत स्थान देतां येणार नाही हेंहि मोरारजींनी खुलेपणानं सांगितलं. मोरारजींनी प्रामुख्यानं भाऊसाहेब हिरे यांच्या रोखानंच हें स्पष्ट केलं असलं पाहिजे. काँग्रेस-श्रेष्ठींनी, वारसदार निवडण्याची जबाबदारी आपल्यावर सोपवली तर विश्वासांतील माणसांचीच निवड त्यासाठी करावी लागेल असं मोरारजींनी सांगितलं. हें सांगतांना त्यांनी हिरे यांचा मोठ्या खुबीनं ओझरता उल्लेख केला आणि ज्यांनी संपूर्ण राज्यांतच धुमाकूळ माजवलेला आहे त्यांची नेतेपदीं निवड करतां येणं कसं शक्य आहे, असा सवाल या चर्चेच्या वेळीं टाकला.

मोरारजींची मध्यस्थी यशस्वी ठरत नाही असं लक्षांत येतांच रामानंद तीर्थ दिल्लीला धांवले आणि पं. नेहरू, पं. पंत यांना गळ घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु तिथेंहि त्यांची डाळ शिजली नाही. उलट एखाद्या राज्याच्या राजकारणांत अशा प्रकारे प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्याबाबत पं. नेहरूंनी असमर्थता व्यक्त करून तसं देव यांना कळवलं. मोरारजींनीच आपला वारसदार निश्चित करावा असाच याचा अर्थ होता. अखेरचा प्रयत्न म्हणून मग देव यांनी मोरारजींची भेट घेऊन या प्रश्नावर दोन तास गुप्त खलबत केलं. या चर्चेतील एक शब्दहि बाहेर जातां उपयोगी नाही अशीच मोरारजींची अट होती. त्यामुळे या बैठकीचा निष्कर्ष समजून घेण्याचा हिरे यांनी प्रयत्न केला तेव्हा देव यांनी मौन पाळलं. मग मात्र हिरे निराश बनले. तरी पण निवडणुकींतून माघार घ्यावयाची नाही, असा निश्चयहि त्यांनी केला. मोरारजींना त्यांनी तसं स्पष्टच सांगितलं.

बरेच दिवस सुरू राहिलेली ही रस्सीखेच अखेर १६ ऑक्टोबरला निकालांत निघाली. असेंब्ली काँग्रेस-पक्षाची बैठक या दिवशीं सुरू झाली तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी नेतेपदासाठी मोरारजींचं नांव सुचवलं आणि आपलं नांव मागे घेण्याची तयारी दर्शवली. हिरे यांनी मात्र नांव मागे घेण्यास नकार दिला. यशवंतरावांनी आणखी प्रयत्न म्हणून असं जाहीर केलं की, हिरे हे माझ्या विरुद्ध निवडणूक लढवत नसतील, तर अजूनहि मी माझं नांव मागे घेईन. पण तसं झालं असतं तर मोरारजींची निवड सरळपणानं होणार होती. मोरारजींची बिनविरोध निवड करण्यास हिरे यांचा विरोध होता. त्यामुळे त्यांनी निवडणूकच झाली पाहिजे असं सांगितलं.

अशा प्रकारे चव्हाण-हिरे यांचा सामना निश्चित आहे असं पहातांच बाळासाहेब देसाई यांनी यशवंतरावांचं नांव सुचवलं. त्यावर रीतसर मतदान होऊन मग या निवडणुकींत यशवंतराव चव्हाण प्रचंड बहुमतांनी विजयी झाले. चव्हाण यांना ३३३ आणि हिरे यांना १११ अशी मतांची विभागणी झाली.

या निवडणुकींत गुजरात, कच्छ, सौराष्ट्र, मुंबई इथल्या आमदारांनी चव्हाण यांना आपला संपूर्ण पाठिंबा दिला. मराठवाडा, विदर्भ इथे मात्र फाटाफूट झाली. मराठवाड्यांतील ३३ आमदार या बैठकीला उपस्थित होते, पण त्यांतलीं फक्त पांच मतं चव्हाण यांना मिळालीं. विदर्भानं मात्र ही तूट भरून काढली. विदर्भांतून चव्हाण यांना ४० आणि हिरे यांना २० मतं मिळालीं. पश्चिम महाराष्ट्रांतूनहि हिरे यांनी पाठिंबा मिळवला होता; परंतु मुंबईपासून सौराष्ट्रापर्यंतचीं मतं चव्हाण यांनी मिळवलीं आणि हिरे यांना हें अंतर भरून काढणं अशक्य ठरलं. अखेर द्वैभाषिक अस्तित्वांत आलं, मोरारजींचं नेतृत्व संपलं आणि यशवंतराव चव्हाण हे १ नोव्हेंबर १९५६ रोजीं द्वैभाषिकाचे मुख्य मंत्री झाले.

१९३० सालामध्ये, कराडांत विद्यार्थी असलेला एका गरीब सामान्य कुटुंबांतला मुलगा, आता महाराष्ट्र राज्याच्या गादीवर आरूढ झाला. यशवंतराव मुख्य मंत्री झाले तेव्हा त्यांचं वय ४२ वर्षांचं होतं. एवढ्या तरुण वयांत त्या काळांत मुख्यमंत्रिपदावर आरूढ झालेले तेच पहिले मुख्य मंत्री होते. त्यांची हिंमत आणि महत्त्वाकांक्षा मोठी होती, तेवढाच त्यांना नियतीचा पाठिंबा मिळाला. नेतेपदाच्या मार्गावर किती तरी खड्डे तयार झालेले होते. कांही उघड, कांही गुप्त. चालतांना पाय बाजूला पडेल असं गृहीत धरूनच नेतृत्वाच्या मार्गावर खड्डे तयार करण्याची व्यवस्था कांहींनी अगोदरच करून ठेवलेली होती. परंतु त्याचबरोबर नेते-पदाच्या मार्गानं यशवंतरावांची चाल सुरू झालेली पहातांच अनेकांचे हात ते खड्डे भरून काढण्यासाठी पुढे झाले आणि 'देता किती घेशिल दो करांने' अशी अवस्था निर्माण झाली. यशवंतरावांचा मार्ग त्यामुळे निर्वेध झाला आणि लगेचच तो त्यांनी निष्कंटकहि बनवला.

मुख्य मंत्री झालेले यशवंतराव मातोश्रींचा आशीर्वाद घेण्यासाठी गेले तेव्हा आपला यशवंता कुणी तरी मोठा झाला आहे एवढंच विठाईला समजलं. राजकारणांतलं असलं मोठेपण समजून घेण्याचा प्रयत्न त्या माउलीनं कधी केलाच नव्हता. पण मुलगा 'साहेब' झाल्याचं समजतांच तिचे डोळे ओले झाले. ते आनंदाश्रु होते. त्या अश्रूंना मोत्यांचं मोल होतं. यशवंतरावांचं मनहि गलबलून गेलं होतं. महाराष्ट्राच्या सिंहासनावर ते आरूढ झाले खरे, पण तें पहाण्यासाठी ज्ञानोबा आणि गणपतराव त्यांना हवे होते. ते तर केव्हाच निघून गेले होते! मागे राहिल्या होत्या आठवणी आणि प्रतिमा — त्यांनाच आता वंदन करावं लागणार होतं.

# १४

मुंबई विधानसभा कॉंग्रेस-पक्षाच्या नेते-पदावर यशवंतराव चव्हाण यांची निवड होऊन त्यांनी मुख्य मंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारतांच अंधारांत चाचपडत असलेल्या महाराष्ट्रांतील कॉंग्रेसला आता एक प्रकाश-किरण लाभला.

महाराष्ट्रावर सर्वत्र त्या वेळीं ढग पसरले होते. वादळ घोंगावत होतं. जनसागर उफाळला होता. अशा या आणीबाणीच्या वेळेला यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या द्वैभाषिकाच्या नावेचं सुकाणूं आपल्या हातीं धरण्याचं धाडस केलं होतं. जबाबदारीचं हें ओझं आपल्या खांद्यावर पेलण्याचं धाडस त्यांनी केलं याचं सर्वांनाच कोडं होतं.

द्वैभाषिक राज्याची व्याप्ति मोठी होती. सौराष्ट्रांतल्या राजकोटपासून खाली कोकणांतल्या रत्नागिरीपर्यंत आणि पूर्वेला आंध्रापर्यंत पसरलेला हा प्रचंड मुलूख! प्रत्येक मुलखांतला निसर्ग वेगळा, त्यांचे प्रश्न वेगळे, एका बाजूला श्रीमान उद्योगपति, त्यांची श्रीमंती रहाणी आणि करणी. दुसऱ्या बाजूला नुसती लंगोटी बाळून हिंडणारा शेतकरी, आदिवासी! याच्या जोडीला नोकरीच्या आधारानं केवळ जगणारा, परंतु बुद्धिवैभवाची परंपरा मनांत बाळगणारा मध्यमवर्ग. विदर्भापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत पसरलेला कुलश्रेष्ठ श्रीमंत शेतकरी. शोध करूनहि साम्य सापडणार नाही असं हें राज्य. हें राज्य चालवायची जबाबदारी तरुण यशवंतरावांनी स्वीकारावी याचं अनेकांना आश्चर्य वाटणं स्वाभाविक होतं.

कारण सारा महाराष्ट्र मनानं फाटला होता. गुजरात, सौराष्ट्र, कच्छ, विदर्भ, मराठवाडा, मुंबई या काठ्यांच्या आधारावरच द्वैभाषिकाचा गोवर्धन उभा करण्याची करामत घडली होती. यांतल्या कोणत्या काठ्या कधी बाजूला होतील आणि या पर्वताचे कडे कोसळतील याची कांही शाश्वती नव्हती. नाव वल्हवतांना कोणत्याहि क्षणाला ती भोवऱ्यांत सापडावी असाच हा प्रवाह होता. वल्हें मारून हात दमावेत आणि दमछाक व्हावी अशीच स्थिति; परंतु या नव्या नावाड्यानं सुकाणूं अशा खुबीनं वळवत ठेवलं

की, साऱ्या भोवऱ्यांना तर वळसे मिळालेच; शिवाय धारदार प्रवाह तोडून नाव किनाऱ्यापर्यंत सुखरूप पोंचली. अंतर कापण्यास चार वर्षे खर्च झालीं हें खरं, पण मुंबईला संयुक्त महाराष्ट्राच्या बंदरांतच नावाड्यानं अखेर ही नाव नांगरली आणि मगच सुकाणूंवरील हात काढला.

महाराष्ट्राचं नेतृत्व स्वीकारण्याचा मनांत एकदा निर्धार केल्यानंतर पुढच्या सर्व वाटचालींचीं गणितं यशवंतरावांनी करून ठेवलीं असलीं पाहिजेत. संयुक्त महाराष्ट्राचा आणि मुंबईचा प्रश्न सुटायचा तर सर्वप्रथम मोरारजींना बाजूला करणं आवश्यकच होतं. नेतेपणाच्या निवडणुकींत प्रथम तें घडलं. नेतेपदावर निवड झाल्यानंतर मात्र राजकीय आणि शासकीय कारभाराचं मोठं आव्हान समोर आलं. महाराष्ट्रांत त्या अगोदर बाळासाहेब खेर आणि मोरारजी देसाई यांनी कारभाराची एक चौकट तयार केलेली असल्यानं त्यांत बदल घडवायचा तर तो दमदारपणानं, धिमेपणानं करावा लागणार होता. कारण द्वैभाषिकासमोर सामाजिक, आर्थिक, राजकीय आव्हानं तर होतींच, शिवाय सर्वांत महत्त्वाचं आव्हान भावनात्मक ऐक्य निर्माण करण्याचं होतं. हें सर्व व्हायचं तर नवं मंत्रिमंडळ एकदिलाचं राहील आणि कोणत्याहि प्रसंगांत सारे सहकारी एकसंध साथ देतील यावर लक्ष केंद्रित करणंहि आवश्यक होतं.

मंत्रिमंडळांतल्या मंत्र्यांची निवड ही त्याची पहिली कसोटी होती. मुख्य मंत्री या नात्यानं महाराष्ट्राच्या राजकीय रंगभूमीवर यशवंतरावांचा हा पहिलाच प्रवेश होता. त्यांच्याबद्दल अनेकांच्या अनेक कल्पना असणं शक्य होतं. मुख्य मंत्री म्हणून तर ते नवखेच होते. खेर किंवा मोरारजी यांच्याप्रमाणे राजकारणांतले डावपेच त्यांच्याजवळ नाहीत; डावपेच माहीत नसलेला, पण कुणाबद्दल मनांत असूया न बाळगणारा साधा कार्यकर्ता हीच त्यांच्याबद्दलची प्रारंभींची प्रतिमा असणं स्वाभाविक होतं. परंतु यशवंतरावांनी अतिशय तर्कशुद्ध पद्धतीनं झपाट्यानं निर्णय केले. त्यामुळे त्यांच्याबद्दल साधेपणाची प्रतिमा बाळगणारे आश्चर्यचकित झाले.

द्वैभाषिकाच्या नव्या मंत्रिमंडळांतून भाऊसाहेब हिरे, विदर्भसिंह मानले जाणारे ब्रिजलाल बियाणी आणि पूर्वीच्या हैदराबाद राज्याचे गृहमंत्री आणि मराठवाड्यांतले एक नेते दिगंबरराव बिंदु यांना ऐनजिनसी वगळून, त्यांनी साऱ्यांनाच पहिला धक्का दिला. ते तीनहि नेते आपापल्या विभागांतील समर्थ नेते असूनहि त्यांना मंत्रिमंडळांतून वगळून आपल्या स्वतःला तिन्ही बाजूंनी त्यांनी ताण लावून घेतले होते. मुख्य मंत्री म्हणून अननुभवी असलेल्या परिस्थितींत सुरुवातीलाच यशवंतरावांनी बेबनाव आणि वाद निर्माण करणारा हा त्रिकोण आपल्याभोवतीं कां निर्माण केला, याचं आकलन सहजासहजीं होणं कठीण ठरलं. या तिन्ही नेत्यांची प्रवृत्ति वेगवेगळी असल्यानं, त्यांना वगळल्यामुळे कांही समस्या निर्माण होण्याची शक्यता होती. विदर्भ, मराठवाडा व महाराष्ट्र यांच्यांतील समतोल ढासळण्याचा धोका होता; परंतु यशवंतरावांनी या सर्वांचं गणित करून त्याचीं उत्तरंहि तयार ठेवल्यानं त्यांच मार्ग निर्धोक बनला.

भाऊसाहेब हिरे हे राजकारणांत स्वयंप्रेरित होते. ब्रिजलाल बियाणी हे स्वतंत्र विदर्भाचे पुरस्कर्ते आणि मराठवाड्याचे जिल्हे विदर्भात सामील करून घेऊन स्वतंत्र विदर्भ-राज्य स्थापन करण्याची आकांक्षा बाळगणारे महत्त्वाकांक्षी नेते होते. दिगंबरराव बिंदु हे द्वैभाषिकाच्या प्रारंभापासूनच बाजूला राहिलेले होते. या पार्श्वभूमीवरच यशवंतरावांना मंत्रिमंडळाचा नवा संच एकमुखी, एकजीव असा तयार करायचा होता. महाराष्ट्र आणि गुजरात यांना एकत्रित आणून निर्माण करण्यांत आलेलं द्वैभाषिक प्रामाणिकपणें राबवण्याची त्यांची जिद्द होती. द्वैभाषिकाबाबत महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही ठिकाणच्या जनतेची भावना चांगुलपणाची, परस्पर-सहकार्याची, परस्परपूरक अशी राहील आणि आपापल्या विभागाचा विकास साध्य करण्यामध्ये त्यांची मदत होऊन दोघांनाहि आपल्या कला-गुणांचा आणि साहसी प्रयत्नांचा ठसा उमटवतां येईल असं वातावरण निर्माण करण्याचं स्वप्न त्यांच्या मनासमोर होतं. त्या दृष्टीनं धोरण निश्चित करून त्याची अंमलबजावणी व्हायची, तर मंत्रिमंडळाचा एक आवाज राहील अशीच मंत्रिमंडळाची रचना त्यांना अभिप्रेत होती.

भाऊसाहेब हिरे आणि ब्रिजलाल बियाणी यांना मंत्रिमंडळांतून बाजूला ठेवतांना त्यांना दहादा विचार करावा लागलाच असेल. कारण हिरे ज्येष्ठ काँग्रेस-नेते आणि पूर्वीच्या मंत्रिमंडळांतले सहकारी या नात्यानं यशवंतरावांच्या मनांत त्यांच्याविषयी आदराचीच भावना होती. भाऊसाहेबांची राजकीय प्रतिमा डागळली जाऊं नये यासाठी त्यांनी बुद्धिपुरस्सर प्रयत्नहि केले होते. काँग्रेस-पक्षांतील अल्पमत असलेल्या गटाच्या हातचं हिरे जेव्हा बाहुलं बनूं लागले, त्या वेळीं म्हणजे त्रिराज्याची योजना, द्वैभाषिकाचा पर्याय याच्या हालचाली सुरू असतांनाच चव्हाण यांनी त्यांना वेळोवेळीं इशारा देण्याचं काम केलं. अल्पमताच्या गटांतील मंडळींनी हिरे यांच्याभोवतीं पद्धतशीर जाळं विणण्याचं काम सुरू ठेवलं होतं. विशिष्ट पद्धतीनं सुखासीन जीवन व्यतीत करणाऱ्या व्यक्ति भाऊसाहेब हिरे यांच्याकडे उद्याचे मुख्य मंत्री या भावनेनं पहात होत्या. यशवंतरावांची प्रतिमा उजळ होत आहे असं पाहिल्यानंतर तर या मंडळींनी पत्ते पिसण्यास सुरुवात करून हुकमी डाव टाकण्याचीहि तयारी केली; परंतु तो डाव यशवंतरावांनी उलटवला.

या सर्व प्रकरणामध्ये हिरे यांचा मात्र विशिष्ट मनःपिंड बनला होता. काँग्रेस-पक्षांतील ते तर श्रेष्ठ होतेच, परंतु त्यांचा मंत्रिमंडळांत समावेश करण्याचा प्रसंग निर्माण झाला त्या वेळीं यशवंतरावांनी व्यवहारी विचार केलेला आढळतो. हिरे यांचं सहकार्य तर त्यांना हवंच होतं; परंतु मुख्यमंत्रिपदाची अपेक्षा बाळगून पावलं टाकत राहिलेले हिरे, द्वैभाषिकाच्या मंत्रिमंडळांत एक साधे मंत्री म्हणून कितपत रस घेतील, ही शंका यशवंतरावांच्या मनांत निर्माण होणं स्वाभाविक होतं. आपण वयानं मोठे आणि पक्षांतील आपला दर्जाहि मोठा, हा गंड हिरे यांच्या मनांत कायमचाच रहाणारा असल्यानं, मंत्रिमंडळाचा संच एकमुखी बनवण्याच्या कामीं ही परिस्थिति हितकारी ठरूं शकेल काय आणि झालं गेलं विसरून ते एकजीव बनतील काय, हाहि विचार

त्यांच्या मनांत उभा राहिला असला पाहिजे. भाऊसाहेब हिरे यांना वगळल्याबद्दल यशवंतरावांना दोष देतांना ही वस्तुस्थिति विसरतां येणार नाही.

हिरे आणि बियाणी यांच्यांतील बियाणी यांना बाजूला सारल्याबद्दलचं समर्थन होऊं शकतं. कारण बियाणी हे मूळचेच हितसंबंधी वर्गाचे पुरस्कर्ते आणि प्रतिनिधि. बियाणी यांचा मंत्रिमंडळांत समावेश करायचा म्हणजे पिळवणूक करणं हीच ज्या वर्गाची परंपरा, त्या वर्गाला सरकारच्या यंत्रणेंत एक मोठा आणि हुकमी आधार निर्माण करून देण्यासारखंच घडणार होतं. यशवंतरावांनी ज्या राजकीय दृष्टिकोनाची जोपासना वर्षानुवर्षे केलेली होती त्याला हें धक्का देण्यासारखं होतं. मंत्रिमंडळांतल्या सहकाऱ्यांची निवड करतांना यशवंतरावांना तें काम जागरूकपणानं आणि ध्येयदृष्टि शाबूत ठेवून करावं लागणार होतं; आणि त्यांनी तें तसं केलं. त्याचबरोबर सहकाऱ्यांमध्ये खात्याची वांटणी करतांनाहि राज्याच्या रथाचा लगाम मुख्य मंत्र्यांच्या हातांत राहील याची त्यांनी दक्षता घेतली.

मोरारजींच्या राजवटींत गृहखातं हें मुख्य मंत्र्यांच्या अखत्यारींत होतं. द्वैभाषिक अस्तित्वांत येऊन मुख्यमंत्रिपद हें चव्हाण यांच्याकडे येतांच गृहखातंहि त्यांनी स्वतःकडे ठेवलं. पण गुर्जर-बंधूंना मात्र तें खटकलं. त्यांना त्यांच्या जीवित-वित्ताची नव्या राजवटींत काळजी होती आणि महाराष्ट्रीय नेत्यांवर त्यांचा विश्वास नव्हता, त्यामुळे गृहखातं हें गुजराती मंत्र्याकडे असावं, असा त्यांनी प्रयत्न सुरू केला; परंतु या बदलाला मान्यता द्यायची म्हणजे जनतेचा आपल्यावर विश्वास नाही, हें मुख्य मंत्र्यांनी स्वतःच सिद्ध करण्यासारखं होतं.

मंत्रिमंडळाची व खात्यांची रचना करतांना, स्वतः मोरारजी देसाई आणि ढेबर-भाई यांनीहि चव्हाण यांच्यावर त्यासाठी दबाव आणण्यास कमी केलं नाही; परंतु यशवंतरावांनी या वृत्तीबद्दल नापसंती दर्शवली, आणि आपलं काम पूर्ण केलं. महाराष्ट्र मराठवाडा, गुजरात, विदर्भ आणि सौराष्ट्र या पांचहि विभागांचा कारभार एकसूत्रतेनं करण्याचं हें काम मोठं जिकिरीचं होतं. तरीहि कामामध्ये समतोल राहील अशाच पद्धतीनं त्यांनी सर्व खात्यांचं वांटप केलं आणि त्या प्रत्येकाचा संबंध आपल्यापर्यंत पोंचेल हें सूत्र मंत्र्याकडील खात्यांची रचना करतांना कायम ठेवलं.

नव्या मंत्रिमंडळाचा संच तयार झाल्यानंतर १ नोव्हेंबर १९५६ ला यशवंतरावांनी द्वैभाषिकाचे मुख्य मंत्री म्हणून अधिकृतपणें सूत्रं स्वीकारलीं. मंत्रिमंडळाचा शपथविधि त्या दिवशींच झाला. १९४६ मध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मुंबईत दाखल झालेले चव्हाण दहा वर्षांच्या अखेरीस खेर-मोरारजींच्या आसनावर आरूढ झाले होते. यशवंतरावांच्या आणि महाराष्ट्राच्या जीवनाचा नवा अध्याय आता सुरू झाला. महाराष्ट्राचं नेतृत्व पुरोगामी व उमद्या, जिद्दीच्या आणि व्यवहारी नेत्याकडे आल्याचं प्रथम प्रथमच घडलं.

मुख्यमंत्रिपद स्वीकारतांना यशवंतरावांच्या मनांतले विचार अगदी स्पष्ट होते. महाराष्ट्र आणि महाराष्ट्रांतला 'माणूस' हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदु होता. देशांतल्या आणि महाराष्ट्रांतल्या माणसांचं भौतिक कल्याण साध्य करतां आलं पाहिजे, माणूस सर्वार्थानं संपन्न व सुखी बनला पाहिजे, हा विचार स्वातंत्र्यपूर्वकालापासूनच त्यांच्या मनःचक्षूसमोर तरळत होता. तें घडवण्याची संधि आयुष्याच्या चौथ्या दशकांत लोकशाहीनं त्यांना उपलब्ध करून दिली होती. यशवंतरावांच्या मनांत त्याचं समाधान होतंच. महाराष्ट्रांतल्या बहुजन-समाजाच्या मनांतलं समाधान मात्र त्यापेक्षा मोठं होतं. महाराष्ट्रांतल्या सर्वसामान्य शेतकरी कुटुंबांतला प्रत्यक्ष एका शेतकऱ्याचा मुलगा महाराष्ट्राचा मुख्य मंत्री झाला याचं या समाजाला समाधान होतं, स्वातंत्र्योत्तरकाळांत हें प्रथमच घडलं होतं.

कृषिप्रधान भारतांतला शेतकरी हा खऱ्या अर्थानं देशाचा राजा आहे असं विद्वान् विवेचक व्याख्यानांतून आजवर बोलत असत; आता तें प्रत्यक्ष घडल्याचं त्यांना सांगावं लागणार होतं. तें ऐकण्यासाठी जनताहि उत्सुक होती. लोकशाही पद्धतीनं जनतेच्या हिताचा कारभार करणारा नेता हा सर्वसामान्य जनतेंतून वाढलेला असला, तर जनतेला तो एक आधार वाटतो आणि त्याच भावनेनं जनता आपल्या नेत्याला साथ देते.

गोरगरिबांबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्या नेत्यांचा एक वर्ग असतो; परंतु सर्वसामान्य जनतेच्या दुःखांशीं त्यांचा दुरूनच संबंध येतो. महाराष्ट्रांत यशवंतराव चव्हाण यांच्यापूर्वी झालेले मुख्य मंत्री धनजीशहा कूपर, बाळासाहेब खेर, मोरारजीभाई देसाई हे या वर्गांतले नेते होते. गरीब या शब्दाशीं त्यांची ओळख असली तरी गरिबी ही प्रत्यक्ष काय वस्तु आहे तें त्यांनी अनुभवलेलं नव्हतं. यशवंतरावांची स्थिति अगदी वेगळी होती. त्यांचा जन्म गरिबींतच झाला, शिक्षणहि गरिबींतच झालं. गरिबांच्या संगतींत राहूनच त्यांनी राजकीय कार्य केलेलं असल्यानं ते मुख्य मंत्री झाले तरी, सामान्य जनतेला, त्यांच्यांत आणि आपल्यांत अंतर निर्माण झालं आहे, असं कधी वाटलं नाही. यशवंतरावांनीहि आपल्या वागणुकीनं तें तसं वाटूं दिलं नाही. आपलं योग्य प्रतिनिधित्व करणारा नेता हीच भावना त्यामुळे जनतेंत कायम राहिली.

यशवंतराव मुख्य मंत्री झाले आणि त्यांच्यापासून महाराष्ट्रांतल्या सर्वसामान्य जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या असल्या, तरी त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी स्वतः यशवंतरावांना मात्र एकामागून एक डोंगर चढून जाणं आवश्यक होतं. राज्य-पुनर्रचना-मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यापासून त्याला ते विरोध करत होते. त्यामागे त्यांचा विशिष्ट हेतु होता. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति भाषिक राज्य-रचनेच्या तत्त्वानुसार व्हावी ही तर त्यांची आकांक्षा होतीच; शिवाय संयुक्त महाराष्ट्र कशासाठी, याविषयीचे त्यांचे विचार निश्चित होते. १९३४ पासून समाजवादाचा विचार करणारं त्यांचं मन, समाजवादी संयुक्त महाराष्ट्राचं स्वप्न पहात होतं. द्वैभाषिकाच्या निर्मितीनं संयुक्त महाराष्ट्राच्या

मागणीचा एक टप्पा ओलांडला गेला असला तरी देशी वसाहतवादाविरुद्धचा त्यांचा लढा संपलेला नव्हता. मुंबईचा समावेश महाराष्ट्रांतच झाला पाहिजे यासाठी ते निर्धार-पूर्वक प्रयत्नशील होते.

द्वैभाषिक राज्य-निर्मितीनं, मुंबईचं स्वतंत्र राज्य किंवा मुंबई ही केंद्रशासित रहावी यासाठी कारवाया करणारांचा पराभव झालेला असला, तरी गुजराती वर्गाच्या मनांतली पिळवणूक करण्याची वृत्ति संपलेली नव्हती; उलट महाराष्ट्रीय नेतृत्वाबद्दल अविश्वास व्यक्त करण्यापर्यंत त्यांची मजल पोंचली होती. यशवंतरावांना हें अवमानास्पद वाटणं स्वाभाविकच होतं. द्वैभाषिकाच्या प्रत्यक्ष कारभारानं, या राज्यांत समाविष्ट झालेल्या सर्व विभागामध्ये परस्पर-विश्वास निर्माण करण्याचं आव्हान त्यामुळेच त्यांच्यासमोर होतं. गुजराती समाजाच्या मनांत महाराष्ट्रीय जनतेबद्दल जिव्हाळा, आपुलकी निर्माण व्हायची तर मित्रत्वावर आणि प्रेमळपणावरच सर्व भर द्यावा लागणार होता. कोणत्याहि प्रकारची धमकीची किंवा दबावाची भाषा ही या दोन्ही जमातींत कायम स्वरूपाचा वैरभाव निर्माण होण्यासच कारणीभूत ठरणारी असल्यानं, तो धोका दृष्टिआड करतां येण्या-सारखा नव्हता.

यशवंतरावांचं मूळ उद्दिष्ट संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति हें असलं तरी श्रेष्ठ काँग्रेस-नेत्यांनी पुढे केलेला द्वैभाषिकाचा पर्याय त्यांना विशिष्ट परिस्थितींत मान्य करावा लागला होता. त्यामुळे द्वैभाषिक राबवतांना संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी योग्य असं वातावरण निर्माण करणं आणि त्याचबरोबर अंतिम उद्दिष्ट साध्य होण्यासाठी श्रेष्ठांच्या मनांत बदल घडवणं सुलभ ठरेल, याच दृष्टिकोनांतून पावलं टाकणं जरूर होतं. संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव यांच्याबरोबर राहून त्यांनी पूर्वी काम केलं, परंतु श्रेष्ठांकडून महाराष्ट्राचा निर्णय करून घेण्यांत देव यांना यश आलं नव्हतं. अशा स्थितींत काँग्रेस-जनांनी परिषदेबरोबर रहाण्यामधून कांही अनुकूल निष्पन्न होण्याची शक्यता उरली नव्हती. त्यामुळे काँग्रेस-पक्षानं शिस्तीच्या चौकटींत राहूनच उद्दिष्टपूर्ती-साठी एकोप्यानं काम करावं या निर्णयाप्रत आता यशवंतराव पोंचले.

तरी पण हें करीत असतांना त्यामध्ये सर्वांचा सहभाव त्यांना अपेक्षित होता. नवीन मुंबई राज्याचीं सूत्रं स्वीकारल्यापासून त्यांनी यासाठी जनतेकडे मागणं मागितलं. काय घडलं आणि काय घडवायचं आहे यासंबंधी यशवंतरावांचे विचार स्पष्ट होते. द्वैभाषिकाच्या उद्घाटन-प्रसंगींच त्यांनी तें व्यक्त केलं. भारतांत त्या काळांत अनेक पुनर्घटित राज्यं अस्तित्वांत येत होतीं; तरी पण विशाल मुंबई राज्याला असामान्य महत्त्व प्राप्त झालेलं असल्यानं मुंबईसारखं भारतांतलं अग्रेसर राज्य, द्वैभाषिक राज्य या नात्यानं भारतापुढे कोणता आदर्श ठेवत आहे याकडे सर्वांचं आस्थापूर्वक लक्ष लागलेलं आहे, याची जाणीव यशवंतरावांनी प्रथमपासून मनांत बाळगली होती.

नवराज्याच्या उद्घाटनाच्या संदेशांतच त्यांनी मोकळेपणानं आपली भूमिका विशद केली. त्यांनी सांगितलं, " भाषिक राज्याची ओढ ज्या जनतेस वाटत होती त्या

जनतेला मुंबई शहराचीहि ओढ होती. महाराष्ट्र व गुजरात या उभय प्रदेशांतील जनतेच्या या भावनांची दखल घेऊनच त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं विशाल मुंबई राज्य आता सुरू होत आहे. या राज्यांत सर्व मराठी व सर्व गुजराती बंधु एकत्र आले आहेत. भाषिक राज्य जाऊन त्याबद्दल द्वैभाषिक आल्याबद्दल कांही लोकांना नाराजी वाटत असली, तरी बहुसंख्य जनतेनं या निर्णयाचं स्वागत केलं आहे. राज्यांत सर्व मराठी व गुजराती प्रदेश एकत्र आल्यानं, भाषिक राज्य झाल्यामुळे जो लाभ त्या त्या भागाला मिळाला असता, तो तर त्यांना मिळणारच आहे; शिवाय परस्पर-पूरक बनून सर्वांचा अधिक प्रगत विकास करण्याची संधि मराठी व गुजराती बांधवांना मिळाली आहे.

"विशाल द्वैभाषिक राज्य जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणारं आहे, त्याच्या विकासाचा पाया घालणारं आहे. राज्य द्वैभाषिक झाल्यानं भाषेच्या व सांस्कृतिक विकासाच्या बाबतींतहि अडथळे येण्याची शक्यता नाही. भारतांत चौदा प्रादेशिक भाषा सरकारमान्य आहेत. त्यांचा विकास अनिर्बंधपणें सुरू आहे. या न्यायानं एका राज्यांत दोन भाषा आल्यावरहि उभय भाषकांचा सांस्कृतिक विकास साधणं शक्य आहे. मुंबई राज्याचे भाषिक पायावर आधारलेले दोन विभाग आहेत. यामुळे भाषेच्या पायावर आधारलेल्या सांस्कृतिक विकासास प्रत्येक विभागास वाव मिळणार आहे. जिल्ह्यांतल्या राज्यकारभाराची भाषा प्रादेशिकच असल्यानं, यापुढेहि शक्य तिथे प्रादेशिक भाषा उच्च पातळीवरील राज्यकारभारांत उपयोगांत आणली जाणार आहे. तसंच उभय भाषांतील वाङ्मय, नाट्य, संगीत व इतर ललितकला यांना द्वैभाषिक राज्याच्या भक्कम आर्थिक स्थितीमुळे अधिक प्रमाणांत उत्तेजन देणं शक्य होणार आहे. मराठी व गुजराती भाषांबरोबर इतर भाषांचाहि योग्य पुरस्कार केला जाईल. एकभाषी राज्य असतांना जे फायदे मिळाले असते ते द्वैभाषिक राज्यांतहि मिळतीलच. भाषिक विचार हा राष्ट्रीय विचारांशीं पूरक व संवादी असला पाहिजे. राष्ट्रहिताची विशाल दृष्टि ठेवून विशाल मुंबई राज्य हें मराठी-गुजराती बांधवांच्या हातीं सुपूर्द केलेलं असल्यानं कुठलाहि श्लेष न काढतां हें राज्य यशस्वी करून दाखवणं ही आपली ऐतिहासिक जबाबदारी आहे.

"हें सांगत असतांना त्यांत राजकारण वा पक्षकारण आणण्याची माझी इच्छा नाही. सरकारी धोरण आखतांना तें पक्षाच्या कार्यक्रमानुसार आखायचं, पण राज्यकारभार पक्षातीत चालवायचा अशी लोकशाहीची परंपरा असते. ही परंपरा इथे पाळली जाईल. भारतानं लोकशाही समाजवादी समाज-रचनेचं ध्येय साध्य करण्याचा निर्धार केला आहे. देशहित कसं व कोणत्या मार्गानं, कार्यक्रमानं साधावं याबद्दल मतभेद होणं अपरिहार्य आहे; पण उत्पादनवाढ, आर्थिक व सामाजिक समता, बेकारी-निवारण इत्यादि उद्दिष्टपूर्तीच्या बाबतींत सर्व पक्षांना सरकारशीं सहकार्य करतां येईल. कारण सर्वांनाच तीं उद्दिष्टं अभिप्रेत आहेत. सरकारकडून चुका होणं स्वाभाविक आहे; सरकारचा प्रमुख या नात्यानं मीहि चुकांपासून अलिप्त असणं शक्य नाही. विरोधी पक्षांनी

सरकारच्या चुका दाखवाव्या, पण सरकारचं जें चांगलं काम असेल त्यालाहि साथ द्यावी. टीका होणं हें कारभार सुधारण्याच्या दृष्टीनं अवश्य असतं; पण ही टीका विधायक व तात्त्विक असावी, विघातक व वैयक्तिक नसावी. वृत्तपत्रांच्या विधायक टीकेच्या अनुरोधानं कारभार सुधारण्यास मदत झाली तर तें स्वागतार्हच होईल. वृत्तपत्रं हीं सुद्धा मोठी शक्ति आहे. सरकारच्या चुका दाखवून व सरकारच्या चांगल्या गोष्टींचा जनतेमध्ये पुरस्कार करून वृत्तपत्रं लोकशाही संवर्धनाचं महनीय कार्य करत असतात. सरकारच्या लोकहिताच्या योजनांना जनतेमध्ये प्रभावी साथ मिळवून देण्याच्या कामीं वृत्तपत्रांनी या सरकारला मदत करावी. त्यांनी केलेल्या विधायक कार्याच्या अनुरोधानं राज्याचा कारभार सुधारण्याला मदतच होईल. तें स्वागतार्ह होईल.

"नव्या राज्याच्या राज्यकारभाराची धुरा माझ्याकडे आली आहे. राज्य यशस्वी करून दाखवण्याची सर्वांत अधिक जबाबदारी माझी आहे. नव्या राज्यांत जात, धर्म व भाषा असा भेद न करतां निःपक्षपातीपणानंच राज्यकारभार केला जाईल. भाषेच्या व प्रादेशिकतेच्या तत्त्वावर सरकारकडून भेदभाव केला जाणार नाही. ज्या दिवशीं द्वैभाषिक राज्य उदयाला आलं त्याच दिवशीं सर्व भाषिक वाद संपले, असं समजूनच सर्वांनी कामास लागलं पाहिजे. नवीन राज्य ही लोकमान्यांची व म. गांधींची कर्मभूमि व पुण्यभूमि आहे. सर फिरोजशहा मेहता, नामदार गोखले, विठ्ठलभाई पटेल यांसारखे राजकारणधुरंधर मुंबई राज्यांतच होऊन गेले. सरदार पटेल आणि आचार्य विनोबा भावे यांच्यासारख्या नररत्नांमुळे मुंबई राज्याची प्रभा सर्वत्र फाकली आहे. लोकांची सेवा करण्याची अधिकाधिक संधि मला प्राप्त व्हावी यासाठी वडिलधाऱ्यांचे आशीर्वाद, बरोबरीच्यांचं सहकार्य आणि धाकट्यांची मदत यांची मला जरुरी आहे."

यशवंतरावांनी विचाराचं आपलं हें सूत्र पुढेहि कायम ठेवलं. कराडवासीयांनी मुख्य मंत्री झाल्याबद्दल १४ नोव्हेंबरला त्यांचा सत्कार केला. त्या वेळींहि त्यांनी आपल्या भावना मोकळेपणानं व्यक्त केल्या. कराडमधील त्यांचा हा सत्कार अभूतपूर्व झाला. सारी कराडनगरी तर सत्कारासाठी लोटली होतीच; शिवाय सातारा, सांगली, कोल्हापूर या शहरांतून आणि ग्रामीण भागांतून हजारो लोक या समारंभाला उपस्थित राहिले. कराडला त्या दिवशीं यात्रेचं स्वरूप प्राप्त झालं. विविध संस्था व व्यक्ति यांच्यातर्फे देण्यांत आलेल्या हजारांवर पुष्पहारांचा स्वीकार यशवंतरावांनी केला. सारं शहरच उत्साहित झालं होतं, आनंदलं होतं.

द्वैभाषिक राज्याचा निर्णय होऊन यशवंतराव मुख्य मंत्री होईपर्यंतचे अगोदरचे वर्ष-सहा महिने महाराष्ट्रांतील शिव्याशापांचा वर्षाव त्यांनी झेलला होता. टीका सहन केली होती. कांहींनी त्यांना विश्वासघातकी ठरवलं होतं. त्याच यशवंतरावांच्या सत्कारासाठी कराडनगरी लतापल्लवांनी आता फुलली होती. रस्तोरस्तीं कमानी उभ्या होत्या. यशवंतराव हे या नगरीला परके नव्हते. तिथेच लहानाचे मोठे झाले. पण आताचं

मोठेपण हें आगळं होतं. या मोठेपणाचा आनंद तमाम शेतकरी समाजाच्या डोळ्यांतून ओसंडत राहिल्यानं निर्भेळ आनंदाचं तें चालतं-बोलतं दृश्यस्वरूप तिथे प्रगट झालं.

कराडप्रमाणे सांगलींतल्या नागरिकांनीहि त्यांचा असाच प्रचंड सत्कार करून नगरपालिका व जिल्हा लोकलबोर्डातर्फे त्यांना मानपत्र दिलं. कराड आणि सांगली या दोन्ही ठिकाणीं त्यांनी द्वैभाषिकाचा अर्थच समजावून सांगितला. द्वैभाषिक मुंबई राज्याबाबतच्या संसदेनं केलेल्या निर्णयामुळे नव्या युगाला प्रारंभ होत असून हा निर्णय लो. टिळक, म. गांधी यांच्या उदात्त शिकवणुकीचं प्रतीक आहे. कांही छोट्या गटांच्या इच्छेनुसार लोकसभेचा निर्णय बदलूं शकणार नाही; तो निर्णय बदलण्याचं सामर्थ्य फक्त राष्ट्राला म्हणजे लोकसभेलाच आहे, असं त्यांनी स्पष्ट केलं.

यशवंतराव मुख्य मंत्री झाले होते; परंतु त्याचा अर्थ स्वतः यशवंतरावांनीच सांगितला, "मी मुख्य मंत्री झालों याचा अर्थ, पुरोगामी वृत्ति भारतांत काम करूं लागली असा आहे. कुणी कोणत्याहि उच्च ठिकाणीं जाऊं शकतो हें यावरून सिद्ध झालं आहे. बहुजन-समाजाला शिक्षणाचा लाभ करून देणारे महात्मा फुले व शाहूमहाराज झाले नसते, स्वातंत्र्य चालवतांना मातीचं सोनं बनवणारे म. गांधी नसते, समाजवादाचा साक्षात्कार घडवून देणारे पं. नेहरू झाले नसते, तर देवराष्ट्र या गावचा यशवंतराव गुराखीच राहिला असता. भारतांत साचलेल्या नव्या शक्तीचीच ही किमया आहे. नवी किमया कार्यान्वित करण्यासाठीच आता झटलं पाहिजे.

"नवं राज्य विशिष्ट परिस्थितींत निर्माण झालं आहे. जीं आंदोलनं झालीं तीं पाहून राष्ट्रीय विचार-परंपरेंत ज्यांची वाढ झाली आहे त्यांच्यांत उदासीनता, निराशा निर्माण झाल्याशिवाय राहिली नाही. पण झालेल्या चुका विसरून जाऊं या. काळ बदलतो आहे. त्या काळाची जाणीव नसेल, तर आपण आपलं काम पार पाडूं शकणार नाही. भाषिक राज्याची चळवळ भावनेचा प्रश्न बनवला गेल्यानं भाऊ-भाऊ होते ते वैरी बनले. आता पुन्हा आपण भाऊ-भाऊ म्हणून नांदायला लागलों आहोंत. मराठी मायबोलीचा दूर असलेला मराठवाडा आता एकत्र आला आहे. कृष्णा, भीमा, कोयना यांच्या काठचा सर्व प्रदेश एका राज्यांत आला आहे. मुंबई कुणीं हिरावून नेलेली नाही. सोमनाथाची सेवा करणारा काठेवाडी भाऊ आमच्यांत आला आहे. विशाल मुंबई राज्य ही इतिहासाची नवी घटना आहे. ही जबाबदारी पार पाडली नाही, तर दुर्दैवाचा नवा फेरा येणार आहे.

"विरोधी मित्रांनी पुन्हा एकदा विचार करावा. लोकसभेच्या निर्णयानंतर लोकशाहींत आपल्या सर्व मर्यादा संपतात. लोकसभेचा सर्व निर्णय मानला पाहिजे. कोणत्या रस्त्यानं जायचं यासाठी भांडत बसलों, तर गाव बाजूलाच राहील. राज्याच्या आकाराच्या वादासाठी आपण डोकीं फोडलींत, तर डोकींच शिल्लक रहाणार नाहीत. भारताच्या निष्ठेला मीं माझं शिर एकदा वाहिलेलं आहे. दुसऱ्या निष्ठांसाठी आता मी शिर आणूं कुठून ? देशांत झपाट्यानं आर्थिक व सामाजिक बदल होऊं

लागले आहेत. आपण प्रयत्न केला नाही, तर पुरोगामी विचारांचा प्रवाह जोरानं पुढे जाईल. दारिद्य व अज्ञान दूर करण्याची शक्ति आपल्यांत आणायची आहे. त्यासाठी क्षणाक्षणानं आणि कणाकणानं राबावं लागणार आहे. दोन सख्ख्या भावांचं, नव्हे जुळ्या भावांचं हें राज्य म्हणजे संस्कृतीचा पवित्र संगम आहे.

"इथे राज्य कोणत्या पक्षाचं असावं हा दावा अवश्य करा, मात्र राज्य मोडून काढण्याचा विचार देशहिताचा तर नाहीच, पण शहाणपणाचाहि नाही. राग, त्वेष, द्वेष यानं जीवन बदलत नाही. राजवट बदलण्याचा कुणालाहि अधिकार आहे. या घरांत जरूर येऊन रहा, पण कृपा करून घर जाळण्याचा, मोडण्याचा प्रयत्न करूं नका. भाषिक चळवळ आता संपली आहे. ती पुन्हा चालू करून इतिहासावर संकट आणूं नका. नवा विकास घडत आहे, आपण इतिहास घडवत आहोंत, तो कुणी मागे घेऊं शकणार नाही. न्यूनगंडाची भावना काढून टाकली पाहिजे. महाराष्ट्र किंवा गुजरात, कुणी कुणावर अन्याय करूं शकणार नाही हें नीति-तत्त्व आचरणांत आणायचं आहे!"

द्वैभाषिकाचा निर्णय हा राष्ट्रीय निर्णय आहे हें समजून सांगण्यासाठी यशवंत-रावांचीं महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, गुजरात, सौराष्ट्र अशा सर्वच प्रदेशांत सतत भाषणं होत राहिलीं, तरी पण संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनं महाराष्ट्रांत निर्माण झालेलं वातावरण निवळलं नाही. गुजरातमध्ये महागुजरात समितीनंहि आपला पवित्रा सोडला नाही. द्वैभाषिक यशस्वी करण्याची यशवंतरावांची जिद्द होती, पण त्यांच्या काँग्रेस-निष्ठेचं आकलन फार थोड्या लोकांना झालं. यशवंतराव मुख्य मंत्री झाल्यानं काँग्रेस-जन मात्र उत्तेजित बनले होते. चव्हाण हे संयुक्त महाराष्ट्राचे कट्टे पुरस्कर्ते असले तरी राष्ट्रानं, लोकसभेनं दिलेला निर्णय शिरोधार्य मानून, काँग्रेसच्या शिस्तीच्या चौकटींत राहून, त्यांना काम करावं लागत होतं. चातुर्यानंच त्यांना उद्दिष्टपूर्ति करून घ्यावी लागणार होती. दिल्लीशीं उभा दावा साधल्यानं, अगोदरच उद्दिष्ट दूर गेलं होतं. संयुक्त महा-राष्ट्राच्या मागणीच्या दिल्लींतल्या पहिल्या दिवसापासून घडलेल्या सर्व घटना त्यांच्यासमोर होत्या. त्यांतून त्यांनी बोध घेतला नसता तरच नवल! द्वैभाषिकाच्या भलेपणाची निवेदनशैली म्हणूनच त्यांनी वेगळ्या धाटणीची ठेवली असली पाहिजे. याहीपेक्षा त्यांच्या राज्यकारभाराच्या चातुर्यानं अनेकांना त्या वेळीं आश्चर्यचकित केलं.

इतिहासामध्ये कधीहि एकत्र आले नाहीत एवढे सगळे मराठीभाषक व गुजरातीभाषक या नव्या राज्यांत एकत्र आलेले होते. या देशांतले सगळे लोक हे भाऊ-भाऊ आहेत ही मूलभूत भावना भारताला स्वातंत्र्य मिळवण्यामागे होती. त्यासाठी यशवंतराव सांगत राहिले की, राज्य कोणत्या तत्त्वानं चालावं, म्हणजे कोणत्या पक्षाच्या तत्त्वानं चालावं यासंबंधानं मतभेद होऊं शकतील; परंतु स्वातंत्र्याचा जो इमला आहे या सर्व इमल्याच्या पायांतला पहिला दगड, मानाचा, महत्त्वाचा दगड जर कोणता असेल, तर तो हा आहे की, देशांतला प्रत्येक माणूस हा दुसऱ्या माणसाचा भाऊ आहे. त्यानं भावासारखंच वर्तन केलं पाहिजे. देशांतल्या राजकारणांतून बंधु-भावना ज्या

क्षणाला नाहीशी होईल त्या क्षणाला देशाचं स्वातंत्र्य, राष्ट्रपण, मोठेपण, या देशांतला गौरव, तेज सर्व कांही लुप्त होऊन जाईल.

कानडी आणि तामीळ भाषकांचीं स्वतंत्र राज्यं अस्तित्वांत आलेलीं होतीं आणि महाराष्ट्राच्या वांट्याला द्वैभाषिक आल्यानं महाराष्ट्रांतल्या आणि गुजरातमधल्या जनतेकडून त्या संदर्भात टीका होणं स्वाभाविकच होतं. आपल्यावरच तेवढा अन्याय झाला आहे, अशी त्यांची वाजवी भावना होती. यशवंतरावांना, टीकाकारांनी या मुद्द्यावर छेडण्यास सुरुवात करतांच त्यांनी सांगितलं की, मराठी-गुजरातीच्या वांट्याला हें भाग्य येण्यांत त्यांचा गौरवच आहे. एकमेकांशीं भांडून ते बाजूला होत होते म्हणून त्यांचं एकत्र येणं जरूर होतं. या दोन्ही भाषिक लोकांनी हिंदुस्थानच्या राजकारणामध्ये अनेक दृष्टींनी नवीन कामं केलीं आहेत. देशाला राष्ट्राभिमान शिकवण्यासाठी टिळकांनी आणि गांधींनी महाराष्ट्रांत आणि गुजरात मुलखांतच जन्म कां घेतला ? खरं म्हणजे हें आपलं भाग्य आहे. राष्ट्रपिता गांधीजी गुजरातेंत जन्मास आले आणि 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' असा मंत्र देणारे टिळक महाराष्ट्रांत जन्माला आले हें आपलं भाग्य नाही काय ? ज्यांच्या वांट्याला एवढे मोठे राष्ट्रपुरुष निर्माण करण्याचं भाग्य येतं त्यांच्यावर राष्ट्राला मार्गदर्शन करण्याची पुन्हा जबाबदारी येते. ही जबाबदारी पार पाडण्याचं काम त्यांनी पत्करलं तर बिघडलं कुठे ?

टीकाकार या किंवा त्या बाजूनं कसं बोलूं शकतात याबाबत यशवंतरावांनी विदर्भातील दौऱ्यांत असाच एक समर्पक दृष्टान्त दिला. हा दृष्टान्त असा – रावणानं सीतेचं हरण करून तिला लंकेला नेलं ही कथा पुराणिकबुवा सांगत होते. त्यांनी सांगितलं की, लंकेला नेल्यावर रावणानं सीतेला आपल्या आमराईमध्ये एका अशोकाच्या झाडाखाली ठेवलं. तेवढ्यांत एका श्रोत्यानं शंका विचारली. शंका अशी की, रावणानं सीतेला लंकेला नेल्यानंतर अशोकाच्या झाडाखालीच तिला कां ठेवलं ? त्यावर शास्त्रीबुवा म्हणाले, याचं कारण असं की, तुम्ही शंका विचारणार हें रावणाला माहिती होतं. त्यानं सीतेला अशोकाच्या ऐवजीं आंब्याच्या, लिंबाच्या किंवा अन्य कोणत्या झाडाखाली ठेवलं असतं तरीहि तुम्हीं विचारलंच असतं की, कां हो, तिला त्या झाडाखालीच कां ठेवलं ? – मराठी-गुजराती एकत्र कां आले याचं यशवंतरावांचं उत्तर हें असं होतं.

द्वैभाषिकाच्या संदर्भात यशवंतरावांच्या बोलण्यांतले उपमा, दृष्टान्त समर्थ आणि समर्पक असले तरी ते ऐकण्याची आणि पचवण्याची लोकांची मनःस्थिति अजून तयार झालेली नव्हती. द्वैभाषिकाचं आव्हान संयुक्त महाराष्ट्र समितीनं आणि महागुजरात समितीनं स्वीकारलं होतं. यशवंतरावांनी मुख्यमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारलीं तेव्हा – नोव्हेंबरपासूनच – भारताच्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीचा वेध लागलेला होता. १९५७ च्या पहिल्या तिमाहींतच या निवडणुका व्हायच्या असल्यानं, दोन्ही ठिकाणच्या समित्यांनी मोर्चे बांधण्यास सुरुवात केलेली होती. या निवडणुकीच्या निकालानंच द्वैभाषिकावर लोकमताचं शिक्कामोर्तब होणार होतं. संयुक्त महाराष्ट्राचं भवितव्यहि

त्यावरच अवलंबून होतं. दोन्ही दृष्टींनी यशवंतरावांना तें आव्हान होतं आणि कसोटीहि लागणार होती.

लोकांच्या भावना भडकलेल्या आणि नव्या राजवटीचा लोकांच्या मनावर ठसा उमटवण्यास अवसर नाही अशा कैचींत यशवंतराव सापडले. त्याच स्थितींत १९५७ च्या निवडणुका झाल्या आणि या निवडणुकांनी महाराष्ट्रांत एक नवा इतिहास निर्माण केला. एवढ्या अटीतटीचा सामना निवडणुकांच्या इतिहासांत प्रथमच झाला. या निवडणुकांसारखा प्रचार पुन्हा होणें नाही. विशेषतः मुंबई शहर आणि सारा पश्चिम महाराष्ट्र निवडणूक-प्रचारानं ढवळून निघाला. आचारसंहिता नांवालाहि कुठे उरली नाही. साम, दाम, भेद सर्व प्रकार सर्रास हाताळले गेले. सत्य आणि असत्य यांच्या सीमा-रेषा पुसून गेल्या.

काँग्रेस विरुद्ध समिति असा हा सामना होता. या निवडणुकींत काँग्रेसचं पानिपत होईल असं अगोदरपासूनच बोललं जात होतं; परंतु या निवडणुकींत द्वैभाषिकाच्या बाजूनं जनतेचा कौल मिळवण्याचं आव्हान यशवंतरावांनी दिलं. पहिल्या पंचवार्षिक योजनेनं विकासाचं उद्दिष्ट साध्य केलं होतं आणि दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा आता तयार झालेला होता. काँग्रेसची घोषणा समाजवादी समाजरचना ही होती. एवढ्या सामग्रीवर बहुसंख्य मतदारांचं, विधायक कार्यासाठी मतपरिवर्तन करण्याचा चंग महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसनं बांधला.

समितीमधील विविध मतांच्या पक्षांमध्ये उमेदवारीच्या निवडीबाबत मोठ्या प्रमाणांत बेबनाव होऊन समितीची शक्ति विभागली जाईल असंहि काँग्रेस-नेत्यांनी गृहीत धरलं होतं. काँग्रेस-नेत्यांची ही आशाहि अगदीच निराधार नव्हती. फेब्रुवारीच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत समितीमध्ये निरनिराळ्या कारणांसाठी विशेषतः उमेदवारांच्या वांटणीवरून खटकाखटकी सुरू राहिलीच होती. समितीचे जे आदेश होते त्यांचा भंग करण्याचे प्रकारहि कांही असंतुष्ट आत्म्यांकडून सुरू होते. मराठवाडा आणि विदर्भ या विभागांत समितीचा माफक प्रभाव होता. गुजरातमध्ये अहमदाबाद, खैरा आणि मेहसाणा या तीन जिल्ह्यांपुरताच महागुजरात समितीचा जोर होता. सौराष्ट्र आणि कच्छमध्ये द्वैभाषिकाबाबत सर्वसाधारण समाधान निर्माण झालेलं होतं. या सर्व पार्श्वभूमीचा अभ्यास करूनच चव्हाण यांनी द्वैभाषिकाच्या पाठीशीं जनतेनं भक्कमपणें उभं रहावं असं आवाहन केलं. मराठवाड्याच्या दौऱ्यामध्ये तर त्यांनी सार्वत्रिक निवडणुकी-नंतर समितीकृत संयुक्त महाराष्ट्राचा आवाजहि ऐकूं येणार नाही, असं भविष्य वर्तवलं. १९५७ च्या जानेवारीमध्ये त्यांनी हें सांगितलं होतं.

पश्चिम महाराष्ट्रांतील वातावरण मात्र काँग्रेसच्या संपूर्ण विरोधांत होतं. मुंबईचा गोळीबार आणि दडपशाही यांमुळे जनता संतप्त बनलेली होती. मतदारांचा राग शांत व्हावा यासाठी प्रदेश-काँग्रेसच्या नेत्यांनी, निवडणूक-प्रचारासाठी पं. नेहरू, पं. गोविंद-वल्लभ पंत, जगजीवनराम आणि अन्य श्रेष्ठ काँग्रेस-नेत्यांचे दौरे मग आयोजित केले.

या श्रेष्ठ नेत्यांनी द्वैभाषिक राज्य हेंच मराठीभाषकांच्या दृष्टीनं कसं प्रतिष्ठेचं आणि लाभदायक आहे हें मतदारांना ऐकवलं.

काँग्रेसमधील दुय्यम दर्जाचे जे नेते होते त्यांनी प्रचाराची वेगळीच पद्धत अवलंबली. मराठी भाषा नसलेल्या ज्या अल्पसंख्य विविध जमाती होत्या त्यांना द्वैभाषिकांत रहाण्यामुळेच कसं संरक्षण मिळणार आहे, हें पटवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. ग्रामीण भागाला वेगळंच आवाहन होतं. काँग्रेसला मत म्हणजे यशवंतराव चव्हाणांना मत, अशा घोषणा सुरू झाल्या. यशवंतराव हे शेतकरी कुटुंबांतले. त्याचा आधार घेऊन शेतकऱ्याचा मुलगा मुख्य मंत्री झाला हें उच्चवर्गीयांना पहावत नाही, असं भासवण्याचा हा प्रयत्न होता. चव्हाणांना स्थानभ्रष्ट करण्याचा उच्चभ्रूंचा डाव उधळून लावा, असं या मंडळींचं मतदारांना आवाहन होतं.

या निवडणुकीचं मतदान २ मार्च १९५७ ला सुरू झालं आणि ११ मार्चला संपलं. मतदानाच्या तारखा काँग्रेस-पक्षाला सोयीच्या ठरतील अशाच पद्धतीनं निश्चित करण्यांत आल्या आहेत, असा विरोधकांचा आरोप होता. यशवंतराव चव्हाण हे या निवडणुकींतील एक प्रमुख उमेदवार होते आणि त्यांच्या निवडणुकीचं मतदान पहिल्याच फेरींत होणार असल्यानं साऱ्या महाराष्ट्राचं आणि दिल्लीचंहि लक्ष या निवडणुकीच्या निकालाकडे लागलं.

कराड मतदार-संघांतच ही अटीतटीची निवडणूक झाली. यशवंतरावांना पराभूत करण्यासाठी समितीनं आपली सर्व शक्ति पणाला लावली; परंतु अखेर या निवडणुकींत यशवंतराव विजयी झाले. त्यांना मिळालेलीं मतं आणि विरोधी उमेदवाराचीं मतं यांमध्ये फक्त ६०० मतांचा फरक होता. तेवढींच अधिक मतं मिळवून ते विजयी झाले; परंतु त्यांचा विजय हा अखेर महाराष्ट्राचाच विजय असल्याचं इतिहासानं सिद्ध केलं.

यशवंतरावांच्या या विजयाचा अर्थ वेगवेगळ्या क्षेत्रांत वेगवेगळा लावला जाण्याची अहमहमिका मग सुरू झाली. या निवडणुकीच्या अगोदर आणि प्रत्यक्ष निवडणूक-प्रचारामध्ये यशवंतरावांची बदनामी करण्याचं कांही शिल्लक उरलेलं नव्हतं. या बदनामीच्या पार्श्वभूमीवर मतदारांनी यशवंतरावांच्या कर्तृत्वावर शिक्कामोर्तब केलेलं असल्यानं स्वतः यशवंतरावांना आपला विजय, हा द्वैभाषिकाला मिळालेला कौल आहे, असं वाटणं स्वाभाविक होतं. मुंबईच्या कांही वृत्तपत्रांनीहि हाच अर्थ जनतेला सांगितला. यशवंतरावांचा विजय म्हणजे हिंसक आंदोलनावर लोकशाहीनं मिळवलेला विजय आहे, असंहि सांगितलं गेलं.

यशवंतरावांच्या विजयामुळे अन्य ठिकाणच्या काँग्रेस-उमेदवारांमध्ये फार मोठी आशा निर्माण झाली. इतर मतदार-संघांमध्येहि मतदार काँग्रेसच्या बाजूनंच कौल देतील अशी त्यांची वेडी आशा होती. कारण तेवढीच आशा त्यांच्याजवळ उरली होती; परंतु पश्चिम महाराष्ट्रांतील सर्व मतदार-संघांतील निवडणुकांचे निकाल जाहीर झाले तेव्हा या मंडळींची आशा धुळीला मिळाली.

या निवडणुकीच्या प्रत्यक्ष निकालानं महाराष्ट्रांतील काँग्रेस-नेत्यांना तर धक्का बसलाच, परंतु काँग्रेसच्या भल्या-भल्या प्रतिष्ठित उमेदवारांना समितीच्या सामान्य उमेदवारांनी पराभूत केल्याचं पाहून समिति-नेत्यांच्या आश्चर्यालाहि पारावार उरला नाही. समितीचे अध्यक्ष एस्. एम्. जोशी हे पुण्यांतले काँग्रेसचे समर्थ उमेदवार, सरदार बाबूराव सणस यांचा पराभव करून विजयी झाले. पुणें शहरांत या निवडणुकींत काँग्रेसला एकहि जागा मिळाली नाही. विष्णुपंत चितळे यांनी काँग्रेसचे मंत्री बू साठे यांचा पराभव केला, तर जयंतराव टिळक यांनी सौ. नलिनीबाई शिंदे यांना पराभूत केलं. लोकसभेसाठी पुण्यांतून काकासाहेब गाडगीळ हे काँग्रेसचे ज्येष्ठ उमेदवार उभे होते. पोर्तुगीजांची शिक्षा भोगत असलेले ना. ग. गोरे हे त्याच वेळीं तुरुंगांतून सोडले गेले होते. या निवडणुकींत गोरे यांनी गाडगीळ यांचा पराभव केला. पोपटलाल शहा हे पुण्यांतील काँग्रेसचे जुने पुढारी, त्यांचा पराभव वि. ना. शिवरकर या राजकीय क्षेत्रांतील एका नवख्या उमेदवारानं केला.

पुणें शहर हें महाराष्ट्रांत राजकीयदृष्ट्या मोठंच जागृत शहर. या शहरानं समितीच्या बाजूनं आपला कौल संपूर्ण दिला होता. यावरूनच महाराष्ट्रांत काँग्रेसची अवस्था अन्यत्र काय झाली असेल हें लक्षांत येऊं शकतं. केंद्रीय मंत्रिमंडळांत असलेले महाराष्ट्राचे त्या वेळचे दोन प्रतिनिधि हरिभाऊ पाटसकर आणि जगन्नाथराव भोसले हेहि पराभूत झाले. नौशीर भरूचा आणि प्रेमजीभाई आसर हे त्यांच्या विरुद्धचे दोन्हीहि समितीचे उमेदवार तुलनात्मकदृष्ट्या राजकारणाच्या क्षेत्राला अपरिचित असेच होते. तरी पण समितीची जी हवा निर्माण झालेली होती त्यामध्ये कित्येकजणांना विजयाचा टिळा लागला.

पश्चिम महाराष्ट्रांतील मतदारांनी मालोजीराजे नाईक-निंबाळकर, मुस्तफा फकी, गणपतराव तपासे, बू साठे या मंत्र्यांचा पराभव केला. भाऊसाहेब हिरे हे या निवडणुकींत विजयी झाले, परंतु पी. के. सावंत, नानासाहेब कुंटे यांना पराभव पत्करावा लागला. मुंबई वगळतां पश्चिम महाराष्ट्रांत काँग्रेसला फक्त ३३ जागा मिळाल्या, तर समितीनं १०२ जागा जिंकल्या. मुंबईतील २४ जागांपैकी काँग्रेसला १३ जागा जिंकतां आल्यामुळे मुंबई प्रदेश-काँग्रेसची प्रतिष्ठा कांहीशीं शिल्लक राहिली. समितीनं मुंबईत ११ जागा पटकावल्या होत्या. अशा प्रकारे मुंबईसह पश्चिम महाराष्ट्रांत काँग्रेस ४६ आणि समिति ११३ असं बलाबल निर्माण झालं.

समितीचा हा विजय दुसऱ्या दृष्टीनंहि नजरेंत भरण्यासारखा ठरला. कारण या निवडणुकींत समितीच्या बाजूनं एकूण ३७ लक्ष मतदारांनी कौल दिला, तर काँग्रेसच्या बाजूनं २४ लक्ष मतदारांनी मतदान केलेलं आढळलं. पश्चिम महाराष्ट्रांत मुंबईच्या बाहेर लोकसभेच्या २२ जागा होत्या. त्यांतल्या समितीनं २० जिंकल्या. मुंबईत मात्र प्रत्येकी दोन अशी समसमान वांटणी झाली. काँग्रेसतर्फे त्या वेळीं केशवराव जेधे हे उभे होते;

परंतु ते द्वैभाषिकाच्या विरोधी मताचे असल्यामुळे समितीनं त्यांच्या विरुद्ध उमेदवार उभा केला नाही.

विदर्भांत आणि मराठवाड्यांत मात्र समितीला हातपाय पसरतां आले नव्हते. मराठवाड्यांत एकूण ४२ जागांपैकी समितीला फक्त ७ जागा जिंकतां आल्या आणि विदर्भांत एकूण ६३ जागांपैकी विरोधकांना ८ जागा मिळाल्या. यामध्ये समितीनं ७ जागा जिंकल्या आणि १ जागा प्रजासमाजवादी पक्षानं स्वतंत्ररीत्या मिळवली. द्वैभाषिकांतील गुजरात, कच्छ, सौराष्ट्र या विभागानं मात्र काँग्रेसला चांगला हात दिला. त्यामुळे असेंब्लीमध्ये काँग्रेसला बहुमत प्रस्थापित करतां आलं. या तिन्ही भागांत मिळून १३२ जागांपैकी १०० जागा काँग्रेसनं जिंकल्या होत्या. महागुजरात जनता परिषदेनं २९ जागा मिळवल्या, तर तीन जागा प्र. स. पक्षानं जिंकल्या. या एकूण निवडणुकींत काँग्रेसचं मोठंच पानिपत झालं. विदर्भ, मराठवाडा, गुजरात, सौराष्ट्र आणि कच्छ यांच्यामुळेच अखेर काँग्रेसची सत्ता इथे टिकून राहिली, आणि यशवंतरावांना मुख्य मंत्रिपद शाबूत ठेवतां आलं. जनतेनं द्वैभाषिकाच्या विरुद्ध कौल दिला असल्याची जाणीव काँग्रेस-श्रेष्ठांना या निवडणुकीनं चांगलीच करून दिली.

पश्चिम महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित काँग्रेस-नेत्यांचा पराभव झाला होता, पण कालांतरानं महाराष्ट्र-काँग्रेसला, विशेषतः यशवंतराव चव्हाण यांना हा पराभव वेगळ्या अर्थानं लाभदायकच ठरला. महाराष्ट्रांतील काँग्रेस-संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीनं यशवंतरावांना, पुढच्या काळांत जी योजना करायची होती त्या दृष्टीनंहि वातावरण अनुकूल बनवण्यास याचा मोठाच उपयोग झाला असला पाहिजे असं दिसतं. महाराष्ट्रांतील जुन्या काँग्रेस-नेत्यांबद्दल त्या काळांत सर्वसाधारणतः अप्रीति निर्माण झालेली होती. काँग्रेस-अंतर्गत नवी पुरोगामी विचारधारा रुजवण्याच्या दृष्टीनं या मंडळींचं सहकार्य पूर्णतः होऊं शकेल अशी परिस्थिति नव्हती. त्यासाठी काँग्रेसमध्ये नवं रक्त आणण्याचीच आवश्यकता होती. यशवंतरावांना नंतरच्या काळांत तसा निर्णय करावा लागला. निवडणुकींतील पराभवामुळे तो निर्णय करणं त्यांना सुलभ गेलं.

पश्चिम महाराष्ट्रांत काँग्रेसचा एवढा मोठा पराभव होऊनहि प्रदेश-काँग्रेसचे नेते मात्र त्याचा वेगवेगळा अर्थ लावण्यांत स्वतःचं समाधान करून घेत राहिले होते. द्वैभाषिकाच्या विरुद्ध, जनतेनं दिलेला हा कौल आहे असं मानण्यास त्यांची तयारी नव्हती. काँग्रेस-पक्ष तळापर्यंत एकसंध राहिला नाही, पक्षांत विस्कळितपणा निर्माण झाल्याचा हा परिणाम आहे, असं मत स्वतः मोरारजींनी व्यक्त केलं. त्यांचा प्रमुख रोख अर्थातच महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसवर होता; परंतु गुजरातमध्ये आणि त्यांचा स्वतःचा मतदार-संघ असलेल्या बलसारमध्येहि तेंच घडलं होतं. त्याबाबत मात्र त्यांनी मौन राखलं. विदर्भांतील आणि मराठवाड्यांतील काँग्रेसच्या यशाचं कारण वेगळं होतं. मराठवाड्याचे जिल्हे हैदराबाद राज्यांतून मुक्त झालेले असल्यानं, तिथल्या मतदारांनी आपलं समाधान या निवडणुकींद्वारे व्यक्त केलं होतं. विदर्भांत काँग्रेसला जरी भरघोस यश मिळालं होतं,

तरी तो निवळ द्वैभाषिकाच्या बाजूनं मिळालेला कौल आहे, असं सिद्ध करतां येण्यासारखं नव्हतं. स्वतंत्र विदर्भ निर्माण होण्याचं आता यत्किंचिताहि चिन्ह उरलेलं नव्हतं आणि समितीकडून त्यांना त्यासाठी सहकार्य मिळावं अशी परिस्थिति नव्हती. विदर्भानं काँग्रेसच्या बाजूनं मतदान केलं ही वस्तुस्थिति असली, तरी त्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसनं अभिमान बाळगावा असं कांही नव्हतं.

निवडणुकीच्या निकालानंतर प्रदेश-काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक ९ एप्रिलला होऊन, काँग्रेस-पराभवाची चिकित्सा करण्यांत आली. या बैठकींत सविस्तर चर्चा झाली आणि विरोधी पक्षांनी द्वेष आणि त्यावर आधारित प्रक्षोभक, भडक प्रचार केल्याचा अनिष्ट परिणाम निवडणुकींतील मतदानावर झाल्याचं मत नमूद करण्यांत आलं. समितींत एकत्र आलेल्या विरोधी पक्षांचा कोणताहि संयुक्त असा विधायक कार्यक्रम नसून, केवळ काँग्रेसला विरोध, एवढा एकमेव उद्देश त्यांनी स्वीकारून मतदारांची फसवणूक केलेली असल्यानं, या निवडणुकींतल्या निकालांतून व्यक्त होणारं मत हें द्वैभाषिकाच्या विरोधांत व्यक्त झालेलं मत नव्हे, असंहि प्रदेश-काँग्रेसनं आपल्या ठरावांत नमूद केलं. वस्तुतः या निवडणुकींत व्यक्त झालेल्या मतांचा आधार घेऊन प्रदेश-काँग्रेसला काँग्रेस-श्रेष्ठांकडे संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा फेरविचार करण्यासंबंधीचा आग्रह धरतां येणं शक्य होतं; परंतु प्रदेश-काँग्रेसनं तें केलं नाही.

संसदीय काँग्रेस-पक्षाच्या नव्या-जुन्या सभासदांच्या बैठकींतहि, या निवडणुकीनंतर, पं. नेहरूंनी महाराष्ट्र व गुजरातमधील काँग्रेस-पक्षाच्या पराभवाबद्दल विशेष चिंता करण्याचं कारण नाही, असंच मत व्यक्त केलं. काकासाहेब गाडगीळ यांनी मात्र या बैठकींत, या दोन्ही ठिकाणच्या पराभवाकडे काँग्रेस-श्रेष्ठांचं लक्ष वेधलं आणि महाराष्ट्र व गुजरातमधील जनतेचा राग या निवडणुकीनं व्यक्त झाला असल्याचं निदर्शनास आणलं. समितीनं निवडणूक-प्रचारासाठी ज्या तंत्राचा अवलंब केला होता त्याचा उल्लेख करून स. का. पाटील यांनी मात्र विरोधी पक्षांना दोष दिला.

मुंबईतील गोळीबारांत मोरारजींच्या पोलिसांनी १०५ लोकांचा बळी घेतला होता. समितीनं या घटनेचा निवडणूक-प्रचारासाठी पुरेपूर उपयोग करून घेतला. समितीच्या प्रत्येक सभेंत वक्त्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी हौतात्म्य पत्करलेल्या १०५ जणांचा उल्लेख करून लोकांच्या भावनांना आवाहन केलं आणि गोळीबाराची आठवण सतत जिवंत ठेवली. आचार्य अत्रे यांनी तर आपल्या 'मराठा' पत्रामध्ये या हुतात्म्यांचीं छायाचित्रं छापलीं आणि पोलिसांच्या अत्याचारांचं त्यांच्या खास शैलींत हृदयद्रावक वर्णन लोकांना वाचायला दिलं. मोरारजी देसाई यांचा उल्लेख त्यांनी 'कसाई' आणि चव्हाण यांचा उल्लेख 'विश्वासघातकी' असा वृत्तपत्रांतून व भाषणांतून ते नेहमीच करत राहिले. पं. नेहरूंना 'औरंगजेब' आणि यशवंतरावांना 'सूर्याजी पिसाळ' अशीं त्यांचीं विशेषणं होतीं. अत्रे यांनी आपल्या विनोदी वक्तृत्वानं महाराष्ट्रांतील जनतेचं मन त्या काळांत जिंकलं होतं. त्यांच्या प्रत्येक सभेला श्रोत्यांची तुफान गर्दी उसळत असे. पश्चिम

महाराष्ट्रांत 'काँग्रेस' हा त्यांनी एक हस्यास्पद विषय करून सोडला. काँग्रेस-कार्यकर्त्यांनी अत्र्यांच्या हीन दर्जाच्या टीकेमुळे नाराजी व्यक्त केली, पण त्याचा कांही उपयोग होण्यासारखा नव्हता. १९४६ सालीं आचार्य अत्र्यांनी काँग्रेसचा प्रचार करतांना विरोधकांची अशाच शब्दांत भंबेरी उडवली होती. इतिहासानं आता काँग्रेसवर सूड उगवला होता.

या निवडणुकीचं त्रयस्थ दृष्टिकोनांतून परीक्षण केलं तर असं सहज लक्षांत येण्यासारखं आहे की, समितीनं गोळीबार आणि द्वेषावर आधारित असा भडक प्रचार केला असला किंवा अत्रे यांनी काँग्रेस आणि काँग्रेसचे नेते हा विषय चेष्टेचा बनवला असला, तरी यामुळे समितीची सामुदायिक शक्ति आणि आकर्षण फार तर वाढलं, एवढंच म्हणतां येईल. विरोधक निवडून आले हें खरं, पण त्यांना मिळालेलीं मतं हीं विरोधी पक्षांना मिळालेलीं मतं मात्र नव्हतीं. तीं मतं समितीला मिळालीं होतीं. संयुक्त महाराष्ट्राला मिळालेलीं होतीं. संघटित मतांचं तें बल होतं. विरोधी पक्षांचा समझोता निर्माण झाला होता, पण विरोधी पक्षांची स्वतःची अशी ती शक्ति नव्हती. संयुक्त महाराष्ट्र या भावनेचं तें बळ होतं. परंतु प्रदेश-काँग्रेस किंवा दिल्लीचे वरिष्ठ काँग्रेस-नेते यांनी हा विचार न करतां द्वैभाषिकच कायम ठेवण्याचा विचार कायम ठेवला. आज ना उद्या लोक आपलं मत बदलतील आणि काँग्रेसला अनुकूल बनतील असा हिशेब या मंडळींनी केला असावा.

निवडणुकींत विजयी झाल्यानंतर स्वतः यशवंतरावांनी, "हें यश माझं व्यक्तीचं नसून काँग्रेस-संघटना व काँग्रेसचं ध्येय यांचं आहे. जनतेला स्थानिक प्रश्नापेक्षा राष्ट्राचं कल्याण महत्त्वाचं वाटतं, हें माझ्या निवडीनं सिद्ध झालं आहे. दुर्दैवानं गेल्या कांही महिन्यांत विवाद्य प्रश्नावरून निर्माण झालेल्या भावनांचा प्रक्षोभ कायमचा विरून जाईल अशी माझी खात्री आहे." असं पत्रक काढलं आणि मतदारांचे आभार मानले.

यशवंतरावांचा विजय हा लोकशाही राजकारणांतील सत्प्रवृत्तींचा विजय असल्यानं अनेक थोरामोठ्यांनी त्यांचं याबाबत अभिनंदन केलं. अनेक वृत्तपत्रांच्या संपादकांनी अभिनंदनपर अग्रलेख लिहिले. खेड्यांतील राजकारणाचं स्वरूप ज्यांना माहिती नाही अशी अनभिज्ञ मंडळी निवडणुकींत फक्त संयुक्त महाराष्ट्राचाच प्रश्न होता असं जरी सांगत होती, तरी पण त्यांत सत्यांश नव्हता. व्यक्तिद्वेष हा तिथे प्रमुख होता. द्वेषाचं बीं पेरून त्याला सार्वजनिक व खाजगी खतपाणी घातलं गेलं होतं. बुद्धिवादीवर्गानं या द्वेषावर, राज्य-पुनर्रचनेच्या तत्त्वज्ञानाची शाल चढवली होती. 'विश्वासघातकी' म्हणून यशवंतरावांना संबोधणारे स्वतः मात्र मतदारांचा विश्वासघात कसा करावा याचे पाठ मतदारांना रोज देत होते; काँग्रेसच्या उमेदवारांना गुंड म्हणणारे स्वतः सर्व भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करत होते. सामना अटीतटीचा झाला यांत संशय नाही; परंतु ज्या लोकशाहीच्या आधारानं विरोधक संयुक्त महाराष्ट्राची आणि

यशवंतरावांचा पराभव करण्याची मागणी करीत होते, तो हेतु पूर्ण होण्यासाठी निवडणुकीचा प्रचार करतांना विरोधकांना लोकशाहीचं कोणतंहि पथ्य पाळण्याचं भान मात्र राहिलं नाही.

सार्वजनिक जीवनांत जास्तींत जास्त असत्प्रवृत्ति निर्माण करण्यावरच या काळांत भर देण्यांत आला. महाराष्ट्राची राजकारणाची कांही उज्ज्वल परंपरा लो. टिळक आदींनी सुरू केलेली होती, पण या निवडणुकींत या परंपरेचा कुठे मागमूसहि उरला नाही. सभ्यता व सुसंस्कृतता रसातळाला पोंचली. द्वैभाषिकाची धुरा महाराष्ट्राकडे – यशवंतरावांकडेच आलेली होती आणि यशवंतराव हे स्वतः संयुक्त महाराष्ट्राचे, मुंबईचे पुरस्कर्ते असूनहि, राज्य चालविण्याची ज्यांची कुवत नव्हती अशी मंडळी त्यांच्याविरुद्ध आरडाओरडीचं राजकारण करत होती. यशवंतराव हे निश्चित पराभूत होतील अशी ज्यांची अपेक्षा होती त्यांचा अपेक्षाभंग झाल्यानंतर मात्र समितीनं आपल्या पराजयाचंहि तत्त्वज्ञान बनवण्यास कमी केलं नाही. यशवंतराव मुख्य मंत्री असल्यामुळे विजयी झाले, असं मग सांगितलं जाऊं लागलं. ग्रामीण भागांतल्या राजकारणाचा आवाका समितीच्या प्रमुख नेत्यांना आला नाही हा याचा स्पष्ट अर्थ होता.

या निवडणुकींत काँग्रेसचा दणदणीत पराभव झाला आणि समितीचा मोठा विजय झाला ही सत्य घटना होती. तरी पण काँग्रेसच्या गोटांत या पराभवाचा मर्यादित अर्थ लावला जात होता, तर समितीच्या गोटांत निवडणुकींतल्या विजयाचा अर्थ प्रमाणापेक्षा अधिक लावला गेला. काँग्रेसचा पराभव हा स्थानिक स्वरूपाच्या वैफल्यांतून झाला असून काँग्रेसच्या धोरणाचा किंवा पक्षानं स्वीकारलेल्या तत्त्वांचा हा पराभव नव्हे, असा सोयिस्कर अर्थ लावून प्रदेश-काँग्रेसचे नेते समाधान मानत राहिले.

निवडणुकीनंतर नव्या विधानसभेच्या नेतेपदीं यशवंतरावांचीच निवड झाली आणि मुख्यमंत्रिपदाचीं सूत्रं त्यांनी स्वीकारलीं. विधानसभेचं अधिवेशन राज्यपालांच्या भाषणानं प्रथेनुसार सुरू झाल्यानंतर राज्यपालांच्या भाषणावरील चर्चेच्या वेळीं प्रथमच समितीच्या सभासदांनी सभागृहांत टीकेची झोड उठवली. राज्यपालांच्या भाषणांत संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा उल्लेख नव्हता, याचा त्यांनी सरकारला जाब विचारला. राज्यपालांच्या भाषणांतून हा प्रश्न वगळण्याला सरकारच जबाबदार आहे, असा त्यांचा आरोप होता. समितीचा असेंब्लींतला गट समर्थ असल्यानं सरकारला सभागृहांत संघटितपणें विरोध करणं या गटाला सहज शक्य होतं; परंतु सभागृहाचं कामकाज, कटुता निर्माण न होऊं देतां सुरळीत सुरू रहावं, असा यशवंतरावांचा कटाक्ष होता.

राज्यपालांच्या भाषणांत, संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाचा उल्लेख न झाल्यानं समितीचे सभासद परखडपणें टीका करत राहिले, तरी पण यशवंतरावांनी मनाची शांतता ढळूं दिली नाही. उत्तराच्या भाषणांत शांतपणें त्यांनी सांगितलं, "द्वैभाषिकाचा पर्याय हा मुंबई राज्यांतील जनतेच्या हिताच्या दृष्टीनं आणि देशाचं हित समोर ठेवूनच

स्वीकारलेला असून, द्वैभाषिक राबवण्याचा प्रयत्न आपल्याला प्रांजलपणें करावा लागणार आहे."

द्वैभाषिकाचा प्रयोग पश्चिम महाराष्ट्रांतील जनतेला एकदम जरी मान्य झाला नाही, तरी जनतेला हें द्वैभाषिक सुसह्य ठरेल यासाठी अतिशय कष्ट घ्यावे लागतील याची कॉंग्रेस-नेत्यांना जाणीव होती. द्वैभाषिक स्थिर होण्यासाठी लोकहिताचे कांही निर्णय करून त्यांची तातडीनं अंमलबजावणी सुरू करण्याचीहि गरज होती. त्याचबरोबर कॉंग्रेस-पक्षांतील विस्कळितपणा कमी करून पक्षांत जिवंतपणा निर्माण करावा लागणार होता.

यशवंतरावांनी निवडणुकीनंतर लगेचच पक्ष-संघटनेवर पकड निर्माण करण्याच्या कामास हळूहळू प्रारंभ केला. पक्षाचे रक्षक बनून जुन्या नेत्यांनी खुर्च्या अडकवून ठेवलेल्या होत्या. त्यांचे ठराविक भगतगण त्यांच्या भोवतीं जमा झालेले होते. यशवंतरावांनी पक्षामध्ये नवं रक्त सामील करून घेण्याच्या दृष्टीनं तिथूनच शुद्धीकरणाला प्रारंभ केला. देवीसिंग चौहान हे मराठवाडा प्रदेश-कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. त्या ठिकाणीं बदल करून बाबासाहेब सावनेकर यांच्याकडे अध्यक्षीय सूत्रं देण्यांत आलीं. महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून मामासाहेब देवगिरीकर यांना दूर करून मालोजीराजे नाईक-निंबाळकर यांच्याकडे अध्यक्षपद देण्यांत आलं. संघटनेंत हा बदल करत असतांनाच, द्वैभाषिकांतील प्रत्येक विभागाचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीनं मुंबई, पुणें, नागपूर, औरंगाबाद, अहमदाबाद आणि राजकोट अशीं सहा 'डेव्हलपमेंट कौन्सिल्स' यशवंतरावांनी तयार केलीं.

सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या सहा महिन्यांतच महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसनं पश्चिम महाराष्ट्रांत आक्रमक पवित्रा स्वीकारला. त्या अगोदरचीं दोन-तीन वर्षं समितीनं पश्चिम महाराष्ट्राचा कबजा केला होता. त्यांतून सुटण्याच्या दृष्टीनं आणि कॉंग्रेस-संघटना पश्चिम महाराष्ट्रांत पुनरुज्जीवित करण्यासाठी काळजीपूर्वक आणि पद्धतशीर आखणी प्रदेश-कॉंग्रेसनं सुरू केली. निवडणुकींतील पराभवानं पक्षाचं खच्चीकरण झालेलं होतं. पक्षाला त्या मरगळलेल्या अवस्थेंतून बाहेर काढण्यासाठी, यशवंतरावांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेश-कॉंग्रेसनं ही आखणी सुरू केली होती.

याच वेळीं नाईक-निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या 'शिव-स्मारक-समिती'नं प्रतापगडावर छत्रपति शिवरायांच्या पुतळ्याच्या अनावरणासाठी पंतप्रधान पं. नेहरूंना आणण्याचा निर्णय केला. पंडितजींना प्रतापगडला येण्याविषयी अगोदरच एक वर्षापूर्वी निमंत्रण दिलेलं होतं; परंतु कार्यव्यापतीमुळे ते त्या वेळीं येऊं शकले नव्हते. दरम्यान सार्वत्रिक निवडणुकीचं वातावरण सुरू झाल्यानं, निवडणुकीचा आणि शिवस्मारकाच्या कार्यक्रमाचा संबंध जोडला जाणं त्यांना योग्य वाटलं नाही. त्यामुळे त्या वेळींहि कार्यक्रम पुढे ढकलण्यांत आला. आता निवडणुका संपल्या होत्या आणि द्वैभाषिक निर्माण झालेलं होतं. त्यामुळे शिव-स्मारक-समितीच्या निमंत्रणाचा

स्वीकार करून पंडितजींनी महाराष्ट्रांत, प्रतापगडावर उपस्थित रहाण्याचं निश्चित केलं होतं.

प्रतापगडावर पं. नेहरूंच्या हस्तें शिवपुतळ्याचं अनावरण करण्यांत येणार असल्याचं जाहीर होतांच, त्यांतून निरनिराळे अर्थ काढण्याची चढाओढ महाराष्ट्रांत सुरू झाली. समितीचा प्रभाव महाराष्ट्रांत होताच. प्रतापगडावरील समारंभाचा महाराष्ट्रांतील राजकारणाशीं किंवा भाषिक राज्य-पुनर्रचनेशीं अर्थाअर्थी कांही संबंध नव्हता. शिव-स्मारकाची कल्पना ही भाषिक वाद सुरू होण्यापूर्वीची होती. मुंबईचे राज्यपाल श्री. हरेकृष्ण मेहताब हे प्रतापगडावर गेलेले असतांना, छत्रपति शिवाजी या राष्ट्र-पुरुषाचं योग्य असं स्मारक प्रतापगडावर व्हावं, असं त्यांना वाटलं आणि त्यांनीच यशवंतराव, नाईक-निंबाळकर, हिरे यांना तें सांगितलं. या मंडळींनी नंतर पुढाकार घेऊन साताऱ्च्या छत्रपति राजमाता सुमित्राराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति स्थापन करून, प्रतापगडावर शिवरायांचा पुतळा उभारण्याची तयारी सुरू केली. पं. नेहरूंच्या हस्तें हें कार्य व्हावं असंहि पूर्वीच ठरलं होतं; परंतु हा सभारंभ प्रत्यक्ष होण्याचा समय जेव्हा आला तेव्हा समितीनं त्यांत राजकारण आणलं.

सार्वत्रिक निवडणुकीमध्ये कॉंग्रेस-पक्षाची गेलेली पत सावरण्यासाठी आणि पश्चिम महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतल्या शक्ति, नेहरूंच्या आगमनाच्या निमित्तानं कॉंग्रेसच्या मागे उभी करण्याचा हा एक डाव आहे, असं वातावरण समितीनं निर्माण केलं होतं; आणि पं. नेहरूंना शिव-स्मारकाचं उद्घाटन आम्ही करूं देणार नाही असा निर्णय करण्यापर्यंत समितीच्या नेत्यांची मजल गेली. या समारंभाच्या वेळीं निदर्शनं करण्याचं तर जाहीर झालंच, शिवाय पं. नेहरूंना या समारंभास आमच्या प्रेतावरूनच जावं लागेल, असं सांगण्याला त्यांनी प्रारंभ केल्यामुळे साऱ्या महाराष्ट्रांत खळबळ उडाली.

यशवंतरावांना हें समजतांच त्यांनी आवाहन केलं की, भारताच्या पंतप्रधानांसारखे एक श्रेष्ठ भारतीय आपल्या देशांत होऊन गेलेल्या एका राष्ट्रीय विभूतीला – छत्रपति शिवरायांच्या स्मृतीला – वंदन करण्यासाठी येत असतांना त्यांच्याविरोधी निदर्शनं करून त्या प्रसंगाचं पावित्र्य महाराष्ट्रियांनी बिघडवूं नये; परंतु विरोधी पक्षांनी या आवाहनाचा आदर केला नाही.

पं. नेहरूंनी इंग्रजी इतिहास-ग्रंथाच्या आधारे पूर्वी केव्हा तरी, शिवाजी-महाराजांनी अफजुलखानास कपटानं मारलं, असं विधान आपल्या एका ग्रंथांत केलं होतं, परंतु हें विधान चुकीचं आहे असं त्यांच्या नजरेस आणून देतांच, ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तींत त्यांनी दुरुस्तीहि केली होती. महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसचे अध्यक्ष मामा देवगिरीकर यांना २६ मार्च १९५६ ला पत्र लिहून छत्रपति शिवरायांबद्दल पं. नेहरूंनी आदरहि व्यक्त केला होता. हें पत्र देवगिरीकरांनी जनतेच्या माहितीसाठी प्रसिद्धहि केलं. मोरारजी देसाई यांनीहि पूर्वी केव्हा तरी शिवाजीमहाराजांविषयी अनुदार विधान केलेलं होतं. हे दोन्ही एकत्र करून समितीच्या पुढाऱ्यांनी, नेहरूंची प्रतापगडची वाट

अडविण्याचा कार्यक्रम जाहीर केला आणि मोठमोठ्या सभांमधून त्याचा प्रचार सुरू झाला.

समितीनं हा पवित्रा स्वीकारतांच महाराष्ट्रांत या प्रश्नावरून यादवी युद्ध निर्माण होण्याचीं चिन्हं दिसूं लागलीं. कारण समिति विरुद्ध काँग्रेस या प्रचाराला उघड उघड जातीय स्वरूप प्राप्त झालं. शिवाजीमहाराजांबद्दल महाराष्ट्रांत सर्वांच्याच मनांत पूज्यभाव असून महाराजांच्या कर्तृत्वाकडे पहातांना, जातीचा अभिमान किंवा जातीची भावना कुणाच्याच मनांत आजवर कधी आलेली नव्हती. हिंदवी स्वराज्याचे थोर संस्थापक हाच त्यांच्याबद्दलचा सर्वांच्या मनांतील आदरभाव; परंतु प्रतापगडावरील त्यांच्या स्मारकास समितीचा कठोर विरोध मोडून काढण्याच्या दृष्टीनं, ज्यांनी प्रयत्न सुरू केले त्यांनी, समितीला ब्राह्मणांच्या पक्षाचा टिळा चिकटवला आणि हे ब्राह्मण पुढारी छत्रपतींना विरोध करत आहेत असं सांगण्यास सुरुवात केली.

१९२०–२१ मध्ये पुण्यांत प्रिन्स ऑफ वेल्सच्या हस्तें, छत्रपतींच्या पुतळ्याचं अनावरण व्हायचं होतं. त्या वेळीं या समारंभास कांहींनी विरोध दर्शवून तशीं पत्रकं काढलीं होतीं. अर्थात् त्या वेळीं विरोध करणारांचा हेतु वेगळा होता. छत्रपतींच्या पुतळ्याचं अनावरण आपला शत्रु असणाऱ्या इंग्रजांच्या हस्तें होऊं नये यासाठी तो विरोध होता. छत्रपतींबद्दल अनादर दाखवण्याचा हेतु मुळीच नव्हता; परंतु वेगळ्या कारणासाठी त्या काळांत झालेल्या विरोधाची सांगड काँग्रेस-जनांनी, प्रतापगडवरील समारंभाशीं घालून, तेच ब्राह्मण आताहि विरोध करत असल्याचा भास निर्माण केला.

वस्तुतः समितींत सर्व जाति-धर्मांचे पुढारी होते, परंतु त्यांतील एस्. एम्. जोशी, डांगे, गोरे, अत्रे, टिळक, सेनापति बापट, बारपुरे आदि विशिष्ट नेत्यांच्या नांवांचा उल्लेख करूनच समितीच्या निदर्शनाविरुद्ध महाराष्ट्रांत त्या वेळीं आघाडी उघडली गेली. या नेत्यांच्या नांवांचा उल्लेख करून, पण जातीचा उल्लेख टाळून एक निनांवी पत्रकहि काँग्रेस-जनांनी प्रसिद्ध केलं. हें पत्रक पश्चिम महाराष्ट्रांत सर्वत्र वांटलं गेल्यानं एकच खळबळ उडाली. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादांत आघाडीवर असलेल्या पश्चिम महाराष्ट्रांत जातीय तणावाचा वणवा फैलावण्यास यामुळे वेळ लागला नाही. समितीमध्ये बागल, नाना पाटील, दत्ता देशमुख, उद्धवराव पाटील, दाजीबा देसाई, व्ही. एन्. पाटील, यशवंतराव मोहिते, आत्माराम पाटील, आनंदराव चव्हाण, बापूराव जगताप हे पुढारीहि होतेच, परंतु निनांवी पत्रक काढणाऱ्यांनी या नेत्यांचा उल्लेख खुबीनं टाळला होता.

समितीच्या ब्राह्मणी पुढाऱ्यांचा शिव-स्मारकाचं उद्घाटन पं. नेहरूंच्या हस्तें होण्यास विरोध असून पं. नेहरूंना ठार मारण्याचाहि त्यांचा कट आहे, अशी एक अफवा त्या वेळीं सोडून देण्यांत आली. इतकंच नव्हे तर, शहरी उच्चभ्रूंच्या या कटापासून पं. नेहरूंचं रक्षण करण्यासाठी बंदोबस्तानं तयार रहा, असं जनतेला आवाहनहि करण्यांत आलं. छत्रपतींबद्दल आणि एकूण मराठा जातीबद्दल मुळांतच असलेलं अस्सल इमान, निष्ठा, जागृत करण्यासाठीच अर्थात् या मार्गाचा अवलंब करण्यांत

आला, हें उघड होतं. प्रदेश-काँग्रेसचे पुढारीहि असल्या प्रचारापासून अलिप्त राहूं शकले नाहीत. जेधे-मोरे हे नुकतेच पुन्हा काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. त्यांनी आपल्या भाषणांतून हे जातीय विष पेरण्याचा सपाटा चालवला. ते असंहि सांगूं लागले की, समितीचा द्वैभाषिकाला आणि पं. नेहरूंना जर विरोध होता, त्यांच्यावर राग होता, तर पंडितजी टिळक-जन्मशताब्दी समारंभासाठी पुण्याला आले त्या वेळीं त्यांनी निदर्शनं करायचीं होतीं. पण समितीनं तेव्हा निदर्शनं केलीं नाहीत. कारण टिळक हे ब्राह्मण होते. छत्रपति शिवाजीमहाराजांच्या समारंभाला विरोध करत आहेत ते शिवाजी हे मराठा म्हणून!

वस्तुतः पं. नेहरूंच्या त्या वेळच्या पुण्यांतल्या आगमन-प्रसंगींहि समितीनं पंडितजींच्या सभेवर जनता-कर्फ्यू पुकारून शनिवारवाड्यासमोर स्वतंत्र सभा आयोजित केलेली होती आणि त्या सभेच्या वेळीं द्वैभाषिकाचा निर्णयहि पुढे आलेला नव्हता. तरी पण जेधे-मोरे जातीयतेला खतपाणी घालत राहिले. काँग्रेसच्या झेंड्याखाली बहुजन-समाजाची शक्ति संघटित करण्यासाठी त्यांना तें उपयुक्त ठरणारं असलं, तरी महाराष्ट्राचं सारं समाज-जीवनच दीर्घकाळपर्यंत अस्वस्थ बनण्याचा धोका त्यांतून निर्माण झाला.

महाराष्ट्रांतील जनशक्ति समितीविरुद्ध उभी करून प्रतापगडचा समारंभ यशस्वी करतां येणं शक्य ठरलं, तरी महाराष्ट्राचं सामाजिक जीवन अशा प्रकारे बिघडवलं जाणं महाराष्ट्रांतील विचारवंतांना आणि विशेषतः स्वतः यशवंतरावांना रुचणारं नव्हतं. सत्यशोधक-समाजाच्या चळवळींतून निर्माण झालेल्या सामाजिक अपप्रवृत्ति त्यांनी जवळून पाहिलेल्या होत्या. द्वैभाषिक निर्माण झालं त्या वेळीं जनतेचीं फाटलेलीं मनं सांधण्याचंच आवाहन त्यांनी केलेलं होतं आणि सामाजिक मन स्थिर असेल, तरच द्वैभाषिक स्थिर होऊं शकेल, अशी त्यांची धारणा होती. त्या दृष्टीनं यशवंतरावांसमोर आता एक नवं आव्हान उभं राहिलं. मुख्य मंत्री या नात्यानं त्यांच्यावर दुहेरी जबाबदारी होती. प्रतापगडचा कार्यक्रम तर त्यांना यशस्वी करावा लागणारच होता; पण त्याचबरोबर अटीतटीचा सामनाहि टाळायचा होता. यासाठी त्यांनी अगोदर प्रचारांतील जातीय धार कमी केली. पुण्यांतील टिळक-जन्मशताब्दीचा समारंभ आणि प्रतापगडावरील समारंभ यांचा अशा प्रकारे कुणी संबंध जोडणं आणि या समारंभाचा जातीय दृष्टिकोनांतून विचार करणं योग्य नव्हे, असा त्यांनी असेंब्लीमध्येच खुलासा केला आणि त्याचबरोबर समितीच्या मनांत नेमकं काय आहे, हेंहि सांगितलं.

निदर्शनाच्या निर्णयानं महाराष्ट्रांत जातीयवाद फैलावून यादवीचं वातावरण निर्माण होण्याचा धोका लक्षांत घेऊन १ नोव्हेंबर १९५७ रोजीं पुण्यांतले विचारवंत अस्वस्थ बनले आणि त्यांनी समितीनं निदर्शनाचा पुनर्विचार करावा अशासाठी पत्रकं प्रसृत करून आवाहन करण्यास प्रारंभ केला. रँ. र. पु. परांजपे, प्राचार्य सोनोपंत दांडेकर, बाबूराव जगताप, वि. द. घाटे वगैरे अपक्ष पुढारी, सामाजिक नेते, शिक्षणतज्ज्ञ, विचारवंत यांनी संयुक्त पत्रक काढलं आणि समितीच्या विधानसभा-पक्षानं निदर्शनाचा पुनर्विचार करून

आपला प्रस्ताव मागे घ्यावा अशी विनंती केली. प्रतापगडावरील राष्ट्रीय समारंभाला गालबोट न लावतां आणि उत्साहावर विरजण न घालतां, मन मोठं करून हा समारंभ साजरा करा, असं आवाहनहि त्यांनी या पत्रकांत केलं.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या राजकारणाची झळ छत्रपति शिवरायांना पोंचूं नये असं रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी आपलं मत व्यक्त केलं. पुणें महापालिकेचे पहिले महापौर बाबूराव सणस यांनीहि निदर्शकांना आणि अराजक माजवणाऱ्यांना ताकीद देणारं कडक पत्रक काढलं. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी निदर्शनासंबंधी निषेध प्रगट केला. शंकरराव मोरे यांनी तर अफझुलखानाच्या कबरीशेजारीं निदर्शकांची कबर बांधली जाईल, असा जळजळीत इशारा दिला. रावसाहेब पटवर्धन यांनी यादवी टाळण्याचा सल्ला देणारं सविस्तर पत्रक काढलं. एक नागरिक या नात्यानं त्यांनी समिति नेत्यांच्या वक्तव्याबद्दल चिंता व्यक्त केली.

प्रतापगडच्या शिवछत्रपति स्मारकाचं उद्‌घाटन करण्याचा पं. नेहरूंना काय हक्क आहे असा सवाल एस्. एम्. जोशी यांनी महापालिका निवडणुकीच्या एका सभेंत केला होता. रावसाहेब पटवर्धन हे यामुळे अस्वस्थ बनले. त्यांच्या मनाला तीव्र वेदना झाल्यानं त्यांनी आपल्या पत्रकांत असं जाहीर केलं की, जनतेला वाटणारा प्रक्षोभ कमी व्हावा अशी समितीच्या नेत्यांची इच्छा दिसत नाही. लोकशाही-मार्गांत जी देवाण-घेवाण, तडजोड व मतपरिवर्तनाची प्रक्रिया असते ती समितीच्या नेत्यांना मान्य नाही, असं उघड दिसतं; लोकशाहीमध्ये शांततामय निदर्शनं करण्याचा हक्क कुणीहि अमान्य करणार नाही, परंतु प्रतापगडावरील समारंभ-प्रसंगीं प्रचंड निदर्शनाचा जो कार्यक्रम समितीनं आखला आहे तो लोकशाही बाण्याला धरून आहे का, याची शंका आहे. हा समारंभ सरकारी नाही. तो स्मारक-समितीमार्फत होत आहे. तेव्हा तिथे होणारीं निदर्शनं हीं स्मारक-समिति आणि तिच्या मागे असलेल्या जनतेच्या विरुद्ध आहेत. याचा परिणाम असा होईल की, प्रतापगडच्या पायथ्याशीं दोन्ही बाजूंनी मोठा जमाव होईल. हें स्पष्ट असतांना निदर्शनं भरवणं व 'रक्ताचे पूर', 'तीन कोटि वाघनखं' व्यक्त होण्याच्या गोष्टी सांगणं म्हणजे यादवीला आमंत्रण देण्यासारखंच आहे. समितीच्या वक्त्यांच्या भाषणांत लोकशाही किंवा शांततामय पर्याय यांचा मागमूसहि दिसत नाही.

'पं. नेहरूंनी माफी मागावी व महाराष्ट्रांत पाऊल टाकावं' अशी समितीनं धमकी दिल्यामुळे वि. स. पागे यांनी समितीनं ही भूमिका सोडावी यासाठी कळकळीचं आवाहन केलं. पुणेरी बुद्धिवादाची महाराष्ट्रावरील सांवट आता फार काळ चालणार नाही हें समितीनं ध्यानांत ठेवावं, असा इशाराहि त्यांनी दिला आणि दक्षिण-साताऱ्यांतील जनता यापुढे मुकाबला करण्यासाठी सिद्ध झालेली असून, समितीच्या नेत्यांनी शहाणपण दाखविलं नाही आणि आमच्या या खाजगी आणि राष्ट्रीय समारंभांत शिरून त्यांत हस्तक्षेप केला गेला किंवा घोषणा दिल्या, तर ते तसला खेळ चालू देणार नाहीत.

दक्षिण-सातारावासी, आम्ही आपल्या छातीचा कोट करून निदर्शनं तोडून टाकूं असं एका भाषणांत त्यांनी ठणकावून सांगितलं.

मुंबई, पुणें, कोल्हापूर इथल्या कांही वृत्तपत्रांनीहि अग्रलेख लिहून, निदर्शनाचा फेरविचार करावा असं सुचवण्यास सुरुवात केली. समितीच्या बाजूचीं वृत्तपत्रं भडक भाषेनं भरलेलीं, तर अन्य वृत्तपत्रं सबुरीचा सल्ला देणारीं, अशी स्थिति निर्माण झाल्यामुळे महाराष्ट्रांतील जनतेमध्ये कमालीचा गोंधळ निर्माण झाला. 'निदर्शनं झालींच पाहिजेत' आणि 'निदर्शनं मोडून काढलींच पाहिजेत' असे दोन्ही आवाज उठत राहिले. लोकमताचा प्रचंड दबाव निर्माण होतांच आणि यादवीचीं चिन्हं दिसूं लागतांच समितीमध्येहि मग दोन विचारप्रवाह निर्माण झाले. समितीचे कांही नेते निदर्शन-विरोधी बोलूं लागले, तर कांही हा प्रश्न प्रतिष्ठेचा बनवूं लागले. समारंभाची तारीख जवळ येऊं लागली तसा महाराष्ट्र उलटसुलट विचारानं ढवळून निघूं लागला.

महाराष्ट्रांत निर्माण झालेल्या वातावरणानं यशवंतराव बेचैन झाले. प्रतापगडावर समारंभाची जय्यत तयारी त्यांनी सुरू ठेवलीच होती. पंडितजींना मोटारीनं गडावर जातां यावं यासाठी रस्ता तयार करून घेण्यांत आला होता. छत्रपतींचा ३८ फूट उंचीचा भव्य अश्वारूढ पुतळा गडावर पोचला होता. हा समारंभ थाटानं, छत्रपतींच्या आणि महाराष्ट्राच्या इतमामाला साजेसा व्हावा यासाठी त्यांचा प्रयत्न होता. समितीच्या नेत्यांना त्यांचं त्यासाठी आवाहन सुरू होतं.

मुंबईतील त्यांच्या एका सत्कार-समारंभांत त्यांनी असंच आवाहन केलं आणि सावधानतेचा इशाराहि दिला. त्यांनी सांगितलं, "प्रतापगडावरील कार्यक्रम ही शिव-रायांची महान् सेवा आहे. भारताच्या ४० कोटि जनतेच्या वतीनं हा कार्यक्रम होत आहे. तेव्हा या निदर्शनाचा समितीच्या पुढाऱ्यांनी पुन्हा विचार करावा. कांही मंडळींना निवडणुका जिंकल्याचा फारच अभिमान झाला आहे. आम्हींहि २५ वर्षे निवडणुका लढवल्या आहेत आणि त्या जिंकल्या आहेत. लोकशक्तीचा वापर योग्य रीतीनं करा, असं मला या मंडळींना सांगायचं आहे. प्रतापगडावर निदर्शनं करून हे लोक स्वतःची फसवणूक करत आहेत. घोषणांनी शेकडो, हजारो लोक फसतात. यापुढे त्यांना फसवूं नका. आपल्याला जनतेनं लोकशक्तीचा जो पाठिंबा दिला आहे त्याचा उघड्या डोळ्यांनी वापर करा, असं मी पुन्हा एकदा सांगतों. सावधान!

"समितीनं निदर्शनाचा निर्णय करून प्रेतावरून जाण्याची त्यांची भाषा सुरू होती. त्यांनी पूर्वीचे विचार आता बदलले आहेत आणि नुसत्या घोषणा करण्याचा निर्णय केला आहे; परंतु अशा महत्त्वाच्या व मंगल प्रसंगीं घोषणाहि करूं नयेत. संयुक्त महाराष्ट्रासाठी जरूर ते सर्व प्रयत्न करा. तुमचा तो अधिकारच आहे. पण हे प्रयत्न प्रतापगडावर नकोत. त्यासाठी दोन हजार चौरस मैल भारताची भूमि मोकळी आहे. आपल्या भावना व्यक्त करण्याची जागा प्रतापगड ही नव्हे. म्हणून मी पुन्हा एकदा सांगतो – सावधान!"

समारंभाच्या दिवसापर्यंत अशा प्रकारे उलटसुलट मतप्रदर्शन होत राहिलं असलं, तरी सातारा जिल्ह्यांतल्या जनतेनं मात्र निदर्शकांशीं सामना करण्याची जय्यत तयारी करून ठेवली. गावोगावच्या हजारो शिव-प्रेमींना समारंभास उपस्थित रहातां यावं यासाठी खास वाहनांची व्यवस्थाहि केली गेली. त्याचबरोबर निदर्शकांना प्रतापगडच्या पायथ्यापर्यंत निदर्शनासाठी पोंचतां येणार नाही याचीहि सरकारनं दक्षता घेतली. कॉंग्रेस-जनांची रहदारी मालमोटारी भरून सुरू राहिली, परंतु समितीला मालमोटारी वापरण्याची परवानगी नाकारण्यांत आली. कोकणांतून महाड, पोलादपूरच्या बाजूनं आणि सातारा जिल्ह्यांतून वाई, मेढा या बाजूनं, हजारो लोकांची रीघ प्रतापगडाकडे सुरू झाली. समितीच्या बाजूनंहि हजारो निदर्शक वाईमध्ये तुकड्या-तुकड्यांनी येत राहिले. दोन्ही बाजूंनी अमाप उत्साह निर्माण झाला आणि प्रतापगडाच्या पायथ्याशीं लाखानं जनता उपस्थित रहाणार असं स्पष्ट झालं.

हीं दोन्ही सैन्यं समोरासमोर येतांच प्रथम घोषणांचं युद्ध आणि मागोमाग प्रसंग हातघाईचा निर्माण होणार, ही अगदी काळ्या दगडावरची रेघ होती. आयत्या वेळीं कोण कशी ठिणगी टाकील याचा नेम नव्हता. प्रसंग ओळखून मग यशवंतरावांनी समितीमधील समजूतदार गोटांत वाटाघाटीसाठी प्रवेश केला. महाबळेश्वरचा आणि पोलादपूरच्या बाजूचा घाट ओलांडून दोन्ही बाजूचे लोक प्रतापगडापर्यंत पोंचतील, तर गडाच्या पायथ्याशीं भीषण प्रसंग निर्माण होऊन परिस्थिति कुणाच्याच हातांत रहाणं शक्य नव्हतं. शिवाजी-अफझुलखान भेटीनंतर, अफझुलखानाच्या सैन्याची जी लांडगे-तोड करण्यांत आली तो प्रसंग महाराष्ट्रांतील जनतेच्या मनांत त्या काळांत तरंगत होता. यशवंतरावांनी परिस्थितीचा धोका, समजूतदार पुढाऱ्यांच्या नजरेला आणल्यानंतर चर्चा होऊन देशावरील समितीच्या लोकांनी वाईच्या पुढे येऊं नये आणि कोकणांतील पुढाऱ्यांनी पोलादपूरच्या पुढे चाल करूं नये, तिथेच थांबून सभा घ्याव्यात, घोषणा कराव्यात, असा निर्णय झाला.

कायदा, सुव्यवस्था आणि शांतता यांचा भंग होऊं नये यासाठी पोलिसांनी समितीच्या निदर्शकांना त्यानुसार वाईतच थांबवून ठेवलं. समारंभ ३० नोव्हेंबरला होणार होता. त्याच्या आदल्या दिवशीं वाईमध्ये समितीचे हजारो लोक व सर्व नेते येऊन दाखल झाले आणि वाईपासून कांही अंतरावर, पंडितजी जाण्याच्या मार्गावरच त्यांनी तळ ठोकला. वाई-महाबळेश्वर रस्त्यावर, पांचगणीचा घाट जिथून सुरू होतो तिथेच समितीचे सर्व लोक थांबल्यानं आणखी एक पेंच निर्माण झाला. समारंभाला जाणाऱ्या कॉंग्रेस-जनांच्या मोटारी याच मार्गानं जाणार होत्या. तिथे घोषणांचं युद्ध आणि त्यांतून कुरापत निघण्याची शक्यता होती. पोलिस-बंदोबस्त मोठ्या प्रमाणांत असला, तरी पोलिसांनी नम्रतेनं वागावं अशा सूचना यशवंतरावांनी दिलेल्या होत्या; परंतु वातावरण तंग बनण्याचा प्रसंगच निर्माण होऊं नये, यासाठी कॉंग्रेस-जनांनी वाई-महाबळेश्वर या मोठ्या मार्गानं न जातां, त्यांना अन्य मार्गानं जातां यावं यासाठी, वाईच्या पश्चिमेला

कृष्णानदींतून व ओढ्यांतून लांबून जाणारा एक रस्ता तात्पुरता तयार करून देण्यांत आला. हा रस्ता, मुख्य रस्त्याला घाटाजवळ पायथ्याला येऊन मिळत असल्यानं मग त्याच मार्गानं वाहतूक सुरू झाली. लोकांना घेऊन जाणारे ट्रक या मार्गानं पुढे गेले. निदर्शकांना ते किंवा त्यांना निदर्शक दिसतच नव्हते. अशा प्रकारे या समारंभाच्या निमित्तानं होणारं पानिपत टळलं.

पं. नेहरू हे ३० नोव्हेंबरला पुणेंमार्गे मोटारीनं प्रतापगडला जाणार असल्यानं ७५ मैल लांबीच्या या रस्त्यावर ठिकठिकाणीं त्यांच्या स्वागतासाठी कमानी उभारण्यांत आल्या होत्या. यशवंतराव हे पंडितजींच्या बरोबरच मोटारींत होते. पंडितजींची मोटार वाईहून पुढे जात असतांना, रस्त्यावर दुतर्फा उभ्या असलेल्या समितीच्या लोकांनी विरोधी घोषणा केल्या, परंतु कोणताहि अनुचित प्रकार न घडतां मोटार पुढे गेली आणि ऐतिहासिक समारंभाच्या ठिकाणापर्यंत सुखरूप जाऊन पोंचली. प्रतापगडावरील समारंभहि थाटानं, उत्साहानं झाला.

समारंभ यशस्वी रीतीनं पार पडल्यानंतर यशवंतरावांनी, काँग्रेस-जनांना आणि समितीलाहि धन्यवाद दिले. या समारंभानंतर फलटण इथे सातारा जिल्हा-काँग्रेसची एक सभा झाली. या सभेंत यशवंतरावांनी सांगितलं की, शिवछत्रपतींनी राष्ट्राला इतिहास व संस्कृति दिली; परंतु छत्रपतींच्या पुण्याईला मागे टाकून पुढे जाण्याचा अहंकार समितीनं बाळगला होता. प्रतापगडावरील मंगल सोहळ्यानं मात्र हेंच सिद्ध केलं की, शिवछत्रपतींचं नांव अजरामर असून मोठंहि आहे. इतर कोणत्याहि निष्ठेपेक्षा राष्ट्रनिष्ठा अधिक तेजस्वी आहे, हें प्रतापगडावर दिसलं. प्रतापगड-समारंभानं महाराष्ट्राचा आत्मा राष्ट्रनिष्ठेच्या बाहेर गेला नाही हेंच दिसून आलं; आणि हें चित्र महाराष्ट्रांतल्या काँग्रेस-कार्यकर्त्यांना भूषणावह आहे.

या समारंभाच्या वेळीं एक राष्ट्र-नेता दुसऱ्या एका राष्ट्र-नेत्याबद्दल आदर प्रगट करण्यासाठी येत होता. अशा मंगल समारंभाला अपशकुन करण्याचा घाट समितीनं घातला होता; परंतु महाराष्ट्रांतील विचारी आणि जागृत जनतेनं विचार करून समारंभ यशस्वी करण्यास तळमळीनं सहकार्य दिलं, याबद्दल महाराष्ट्रांतील जनतेला आणि काँग्रेस-कार्यकर्त्यांना यशवंतरावांनी धन्यवाद दिले. समितीनंहि शिस्त आणि संयम राखण्याचं सौजन्य दाखवलं, याबद्दल समितीच्या मंडळींनाहि त्यांनी धन्यवाद दिले.

निवडणुकीनंतर यशवंतराव द्वैभाषिकाचे पुन्हा मुख्य मंत्री झाले होते. संयुक्त महाराष्ट्राचा पेंच कायम होता. निवडणुकीनं त्याचं दर्शन घडवलं होतं. अशा स्थितींत राज्य चालवायचं तर राज्यांतल्या जनतेचं समाधान होईल असंच कांही करावं लागणार होतं. प्रतापगडच्या समारंभाच्या निमित्तानं जनतेची नाखुषी पत्करण्याचा प्रसंग निर्माण झाला. तो प्रसंग उद्भवला, परंतु यशवंतरावांनी ही अवघड कामगिरी मोठ्या मुत्सद्दी-पणानं पार पाडली. त्यांच्या राजकारणाचं कौशल्यच यांतून महाराष्ट्राच्या समोर आलं.

# १९

प्रतापगडचा समारंभ यशस्वी करण्यांत पश्चिम महाराष्ट्रांतील काँग्रेसनं जरी बाजी मारली होती, तरी जनतेच्या मनांतली द्वैभाषिका-संबंधीची नाराजी कमी झालेली नव्हती याचं प्रत्यंतर लगेचच पोटनिवडणुकीच्या वेळीं आलं. नोव्हेंबरअखेर हा समारंभ झाला आणि डिसेंबरमध्ये मुंबई आणि मराठवाड्यांत कांही पोटनिवडणुका होण्याचा प्रसंग येतांच समितीनं पुन्हा आपली शक्ति उभी केली आणि सामना दिला. मुंबईत डॉ. रफिक झकेरिया या काँग्रेस-उमेदवाराविरुद्ध समितीनं व्ही. आर. तुल्ला यांना उभं केलं. खास मुस्लिम मतदार-संघांतली ही पोटनिवडणूक असूनहि त्यांत डॉ. झकेरिया पराभूत झाले. १३ डिसेंबर १९५७ ला ही निवडणूक झाली. पुढे फेब्रुवारीमध्ये पी. के. सावंत (काँग्रेस) विरुद्ध डी. एल्. आनंदे (समिति) असा सामना झाला आणि त्यांत आनंदे हेच विजयी झाले. ९ फेब्रुवारी १९५८ ला ही निवडणूक झाली होती.

या निवडणुकांप्रमाणेच मराठवाड्यांतहि समितीनं हातपाय पसरले. मराठवाड्यांत जालना मतदार-संघांत लोकसभेची निवडणूक झाली. बाबासाहेब सावनेकर (काँग्रेस) विरुद्ध अंकुशराव घारे (समिति) असा हा सामना झाला आणि तोहि समितीनंच जिंकला. सावनेकर हे तर मराठवाडा काँग्रेसचे अध्यक्ष होते. मराठवाड्यांतच वसमत इथे असेंब्लीसाठी आणखी एक पोटनिवडणूक झाली आणि या निवडणुकींत समितीचे उमेदवार आर. पी. देशमुख यांनी यश संपादन केलं. मराठवाड्यांतल्या पांच जिल्ह्यांत या वेळीं जिल्हा लोकलबोर्डाच्या निवडणुका झाल्या आणि नांदेड जिल्हा वगळतां चार जिल्ह्यांच्या निवडणुकाहि समितीनंच जिंकल्या. मराठवाड्यांत काँग्रेसला आता कांही आशा उरली नव्हती, हाच या निवडणुकांचा स्पष्ट अर्थ होता.

तरी पण यशवंतरावांनी द्वैभाषिक राबवण्याची आपली निष्ठा कमी होऊं दिली नाही. लोकसभेनं केलेला निर्णय हाच सर्वांनी मानला पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. द्वैभाषिकाविरुद्ध काँग्रेस-अंतर्गत कुणी मतभेद व्यक्त करणार नाही याविषयीहि ते

दक्ष होते. आणि स्वतःच्या भाषणांतून द्वैभाषिकाचीच प्रशंसा ते करत राहिले होते; निवडणुकीमध्ये जरी काँग्रेसची पिछेहाट झाली होती, तरी पण द्वैभाषिकाचा हेतु आणि त्याचे फायदे लोकांच्या मनावर बिंबवण्यांत आज ना उद्या यश येईल, द्वैभाषिकासंबंधीची तुच्छता कमी करतां येईल, असं त्यांना वाटत होतं.

१९५८ एप्रिलच्या १९ व २० तारखेला दिल्लींतल्या प्रदेश-काँग्रेसाध्यक्षांच्या बैठकींतहि, महाराष्ट्राच्या प्रवक्त्यांनी महाराष्ट्रांतलं वातावरण बदलत असल्याचीच ग्वाही दिली. द्वैभाषिकाशीं कोण अधिक प्रामाणिक आहे याची जणू कांही महाराष्ट्रांतल्या काँग्रेस-जनांत त्या वेळीं चढाओढ लागून राहिली होती. महाराष्ट्रांतले स्थानिक काँग्रेस-जन या मनःस्थितींत असतांनाच पं. नेहरू मात्र वेगळाच विचार करूं लागले होते. विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणुकींत महाराष्ट्रांत काँग्रेसची पिछेहाट झालेली असल्यामुळे द्वैभाषिकासंबंधीच्या पूर्वी केलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे, असं त्यांचं मत बनूं लागलं होतं. आणि पुढे लवकरच मराठवाडा विद्यापीठाच्या उद्घाटनाच्या वेळीं पंडितजींचं औरंगाबाद इथे जें भाषण झालं त्यावरून पंडितजींच्या विचारांत आता बदल झाला आहे असाच अर्थ त्यांतून ध्वनित केला जाऊं लागला. कांही राज्यशास्त्रज्ञ मात्र मुंबईच्या प्रश्नाबद्दल पंडितजी पुनर्विचार करत असल्याचा इन्कार करण्यासहि घाईघाईनं पुढे सरसावले. पंडितजींनी मात्र त्यांचा मुखभंग केला.

औरंगाबादच्या दौऱ्यानंतर पं. नेहरूंनी दिल्लींतल्या पत्रकार-परिषदेंत एक निवेदन केलं. त्यामुळे तर इन्कार करणाऱ्यांवर कुणी विश्वास ठेवणंच शक्य नव्हतं. वृत्तपत्रांतून त्यावर मग टीका-टिप्पणी सुरू झाली. महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दल केंद्र-सरकारच्या मनांत नेमकं काय आहे, याचा उलगडा सरकारनं त्वरित करून संशयाचं वातावरण शिल्लक ठेवूं नये अशा सूचना संपादकांनी अग्रलेखाद्वारे केल्या. गुजरात प्रदेश-काँग्रेसनंहि आपलं मत ७ सप्टेंबर १९६८ च्या कार्यकारिणींत व्यक्त केलं. द्वैभाषिकाचा पुनर्विचार दिल्लींत सुरू झाल्याबद्दल गुजराती मंडळी कांहीशी अस्वस्थ बनली होती.

सार्वत्रिक निवडणुकींत मुंबई प्रदेश-काँग्रेसला हादरा बसल्यामुळे निवडणुकीचे बादशाहा समजले जाणारे स. का. पाटील हेहि गडबडले होते. मग त्यांनी महाराष्ट्राच्या प्रश्नाचा पुनर्विचार केला जावा यासाठी पं. नेहरूंकडे रदबदली सुरू केली. स. का. पाटील यांनीच पवित्रा बदललेला पाहून पंडितजींना आश्चर्य वाटलं. पाटील यांच्या मनांत आणि विचारांत पूर्णतः बदल घडून आला होता हें काम सिद्ध करणं कठीण आहे, परंतु द्वैभाषिकासंबंधांत काँग्रेस-श्रेष्ठांनी पुनर्विचार केल्याशिवाय महाराष्ट्रांतल्या मतदारांना काँग्रेसच्या बाजूनं वळवतां येणार नाही हें त्यांना उघड दिसत होतं. द्वैभाषिकासंबंधांत कांही निर्णय करायचा तर योग्य वेळींच केला जावा असं त्यांचं मत होतं. कारण त्यांच्यासमोर १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुका होत्या. त्यापूर्वी हा निर्णय

व्हावा हा त्यांचा दृष्टिकोन असला पाहिजे. महाराष्ट्राला न्याय मिळवून दिला पाहिजे यापेक्षा निवडणुकीचा फड जिंकणं ही त्यांची व्यावहारिक आच होती. स. का. पाटील यांच्या मनःस्थितींत झालेला बदल पं. नेहरूंच्या दृष्टीनं अर्थातच सोयीचा होता.

पं. नेहरूंनी द्वैभाषिकाचा पुनर्विचार करण्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित केला आणि यशवंतराव चव्हाण यांच्या मताचा प्रथम अंदाज घेतला तो अखिल भारतीय काँग्रेसच्या हैदराबादच्या अधिवेशनांत – २४ ऑक्टोबर १९५८ ला. त्यापूर्वी वृत्तपत्रांतून मत-प्रदर्शन होत राहिलं होतं, तरी पंडितजींनी सप्टेंबर व ऑक्टोबर हे दोन महिने, महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसच्या नेत्यांना आपल्या विचाराचा थांगपत्ता लागू दिला नव्हता. १९६२ च्या निवडणुकांना अद्याप बराच अवधि असल्यामुळे या प्रश्नाबाबत घाईनं निर्णय करावा अशी पंडितजींची मनःस्थिति नव्हती.

पंडितजींच्या औरंगाबाद येथील भाषणानंतर भाऊसाहेब हिरे यांनी त्यांना पत्र लिहून नव्या हालचालींच्या संबंधांत विचारणा केली; परंतु चार-पांच आठवड्यांपर्यंत पंडितजींनी त्यांना या पत्राचं कांहीच उत्तर पाठवलं नाही. वस्तुतः पत्राचीं उत्तरं पंडितजींकडून तातडीनं रवाना केलीं जात असत; परंतु या खेपेला त्यांनी मौन पाळलं; आणि नंतरहि हिरे यांना जें पत्रोत्तर मिळालं त्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र समिति आणि महागुजरात जनता-परिषद यांनी केलेल्या आंदोलनाच्या मार्गाबद्दल नापसंती आणि मुंबई द्वैभाषिक राज्याचं महत्त्व याचाच फक्त उल्लेख केला. गो. ह. देशपांडे यांनी याच वेळीं द्वैभाषिकाचे दोन तुकडे करावेत अशी मागणी एका निवेदनाद्वारे केली. देशपांडे हे हिरे यांच्या खास विश्वासांतले असल्यामुळे त्यांचं निवेदन प्रगट होऊन त्याला भरपूर प्रसिद्धि लाभतांच, देशपांडे यांचं निवेदन म्हणजे द्वैभाषिकाचे नेते यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्वालाच शह देण्याचा उद्योग आहे, असा त्याचा अर्थ लावला गेला. इतकंच नव्हे तर, देशपांडे हे पक्ष-शिस्तीचा भंग करत आहेत असं वादळ उठलं. नाशिक जिल्हा-काँग्रेसनं मात्र देशपांडे यांनी महाराष्ट्राच्या भावना मोकळेपणानं व्यक्त केल्याबद्दल त्यांचं अभिनंदनच केलं. महाराष्ट्रांतील बहुसंख्य काँग्रेस-जनांचं मत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा, असंच असल्याचं भाऊसाहेब हिरे यांनीहि सांगितलं. दरम्यान देवकीनंदन नारायण यांनी प्रदेश-काँग्रेसच्या कार्यकारिणीच्या बैठकींत देशपांडे यांच्या निवेदनासंबंधी आणि द्वैभाषिकाच्या एकूण प्रश्नाबाबतच चर्चा घडवण्याचा आग्रह धरल्यानं १० ऑक्टोबर १९५८ ला कार्यकारिणीच्या बैठकींत या प्रश्नावर चर्चा झाली. भाऊसाहेब हिरे या बैठकीला उपस्थित होते, पण त्यांनी चर्चेत कांहीच मत व्यक्त केलं नाही. वि. स. पागे, यशवंतराव चव्हाण, देवकीनंदन नारायण, तुळशीदास जाधव, प्रदेश-अध्यक्ष नाईक-निंबाळकर व स्वतः देशपांडे यांनीहि चर्चेत भाग घेतला आणि कार्यकारिणीनं एक ठराव संमत करून चव्हाण यांच्या समर्थ नेतृत्वाखाली द्वैभाषिक यशस्वी होत असून, तें आता स्थिर होत आहे असं मत व्यक्त केलं. त्याचबरोबर चव्हाण यांचे हात बळकट करावेत आणि ज्यामुळे मुंबई राज्यांतल्या काँग्रेस-संघटनेला बाधक ठरेल आणि स्थैर्य भंग

पावेल अशा प्रकारच्या कोणत्याहि प्रचारास कार्यकर्त्यांनी बळी पडूं नये, असेंहि प्रदेश-काँग्रेसनं आवाहन केलं.

हिरे आणि देशपांडे यांनी या ठरावाकडे दुर्लक्ष केलं. त्यामुळे प्रदेश-काँग्रेसचे सरचिटणीस व्ही. एन्. नाईक यांनी हिरे व देशपांडे हे आपला प्रचार अशाच पद्धतीनं पुढे सुरू ठेवणार असतील, तर त्यांच्याविरुद्ध प्रदेश-काँग्रेसनं शिस्तभंगाचा इलाज करावा असा आग्रह धरला. त्यावर भाऊसाहेब हिरे यांनी नाशिक जिल्हा-काँग्रेसच्या बैठकींत स्पष्टीकरण केलं की, "मी फक्त लोकांच्या भावना बोलून दाखवत असून, मला सत्ता-स्पर्धेत कसलाहि रस नाही. द्वैभाषिकाचे जे समर्थक आहेत त्यांना स्वतःची आणि लोकांची फसवणूक फार काळ करतां येणार नाही." व्यक्त करण्यांत आलेलं मत हें पक्षाच्या शिस्तीचा भंग करणारं नाही, असाहि हिरे यांचा दावा होता. महाराष्ट्राच्या एकूण प्रश्नाचाच पुनर्विचार सुरू आहे आणि त्यामध्ये स्वतः यशवंतराव चव्हाण हे गुंतलेले आहेत याची भाऊसाहेब हिरे यांना माहिती होती त्यामुळे ते ही भूमिका विशद करण्यास पुढे सरसावले.

अशा प्रकारचं वातावरण निर्माण होण्यास आणखी एक सबळ कारण होतं. गृहखातं गुजराती मंत्र्याकडे दिलं गेलं नाही याबद्दल, मंत्रिमंडळांतील गुजराती मंत्री नाखूष होते. पश्चिम महाराष्ट्रांतील ज्यांचा समावेश मंत्रिमंडळांत झालेला होता त्यांनी अर्थमंत्री जिवराज मेहता यांच्याविरुद्ध तक्रार करण्यास प्रारंभ केला. जिवराज मेहता हे रस्ते-बांधणी आणि पाटबंधारे यांसाठी गुजरात भागांत अधिक पैसे खर्च करत आहेत अशी बाळासाहेब देसाई यांची तक्रार होती. मराठी भाषिक प्रदेशाकडे अर्थखातं दुर्लक्ष करत राहिल्यानं बाळासाहेब देसाई यांच्या तक्रारीला विशेष गंभीर स्वरूप प्राप्त झालं. मंत्रिमंडळांतच अशा प्रकारे, गुजराती भाषिक आणि मराठी भाषिक असे दोन गट निर्माण झाल्यानं यशवंतरावांसमोरहि पेंच निर्माण झाला. द्वैभाषिकांत समाविष्ट झालेल्या, राज्यांतील मागासलेल्या विभागांतील जनतेच्या भावनांची दखल घेणं त्यांना क्रमप्राप्तच होतं. मंत्रिमंडळांतील या दोन गटांमधील तणाव फार काळ शिल्लक ठेवून द्वैभाषिकाचा कारभार यशस्वी करणं अवघड आहे, असं त्यांना दिसूं लागलं.

वरिष्ठ काँग्रेस-नेते आपल्या पूर्वीच्या निर्णयाचा फेरविचार करण्यास अनुकूल बनले होते, तरी पण निर्णयांत बदल केल्यानं होणाऱ्या राजकीय परिणामाबद्दल ते कांहीसे साशंक होते. महाराष्ट्रासंबंधांतील निर्णयांत बदल केल्यास पंजाबी सुभ्याची मागणी जोरानं पुढे येईल, अशी धास्ती होती. पंजाबी सुभ्याची मागणी मान्य करायची तर पंजाबची विभागणी जातीय स्वरूपाची घडणार होती. द्वैभाषिकामध्ये जलद बदल घडवण्यास पं. नेहरूंची जरी तयारी नव्हती तरी महाराष्ट्रांत, संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीबद्दलचं आंदोलन सतत सुरू राहिल्यानं, या प्रश्नाचा फेरविचार करण्याच्या दृष्टीनं त्यांच्या मनाची तयारी होऊं लागली होती. विनोबा भावे यांची त्यांनी या संदर्भांतच १७ व १८ डिसेंबर १९५८ ला गुजरातमध्ये भेट घेऊन चर्चा केली. संयुक्त महाराष्ट्र

समितीनंहि १८ डिसेंबरला दिल्लींत संसदभवनासमोर प्रचंड निदर्शन घडवून आणलं; आणि मागोमाग, विरोधी पक्षानं लोकसभेंत या प्रश्नावर तहकुबी आणून चर्चाहि घडवली. एवढं होतांच पं. पंत यांनी मग औरंगाबादला आणि मुंबईला भेट देऊन परिस्थितीचा अंदाज घेतला.

लोकेच्छेचा फार काळ अनादर करून किंवा त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, द्वैभाषिकाची विभागणी लांबणीवर न टाकतां किंवा रेंगाळत न ठेवतां, याबाबत जलद निर्णय करणं आवश्यक असल्याची जाणीव पं. पंत यांना या दौऱ्यांत झाली. मनाच्या त्या अवस्थेंतच ते दिल्लीला परतले. राज्यपालांच्या परिषदेंतहि मुंबई राज्याचे राज्यपाल श्रीप्रकाश यांनी मुंबई राज्याचा प्रश्न उपस्थित केला आणि या चर्चेच्या वेळीं पं. नेहरूं-कडून त्याला अनुकूल असाच प्रतिसाद मिळाला. काकासाहेब गाडगीळ यांनी दिल्लींत घडून येणारा हा बदल चव्हाण व नाईक-निंबाळकर यांच्या नजरेस आणला आणि द्वैभाषिकाच्या प्रश्नाचा पुनर्विचार होण्याच्या दृष्टीनं हीच नामी संधि असल्याचं सांगितलं.

पं. नेहरूंनी हैदराबादच्या कॉंग्रेस-अधिवेशनांतच चव्हाणांशीं या प्रश्नाची चर्चा केली होती याची काकासाहेब गाडगीळ यांना बहुधा चाहूल लागलेली नसावी. त्यांना दिल्लींतला बदल हा नवीनच वाटत होता. यशवंतरावांनी याबद्दल पूर्ण गुप्तता पाळली होती. चव्हाणांच्या मौनाबद्दल मोरारजी मात्र दुखावले गेले. चव्हाणांनी आपल्याला अंधारांत ठेवलं असा त्यांचा समज झाला होता; परंतु पं. नेहरूंनी हैदराबाद इथे या प्रश्नाची चर्चा करण्यापलीकडे, आपल्या मनाचा कल दर्शवलेला नसल्यानं चव्हाण यांना ही चर्चा मनांत ठेवण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. मोरारजींचं त्याहीपुढे असं म्हणणं होतं की, द्वैभाषिकाचा भंग करण्याचा निर्णय हा नागपूर-अधिवेशनाच्या वेळीं नागपुरांतच केला गेला.

श्रीमती इंदिरा गांधी या, त्या वेळीं कॉंग्रेसच्या अध्यक्ष झाल्यानंतर, पं. नेहरू, पंत आणि स्वतः इंदिरा गांधी यांनी तिथे चव्हाणांशीं याबाबत चर्चा करून निर्णय केला. मोरारजी देसाई हे या अधिवेशनाला उपस्थित नव्हते. त्यांना द्वैभाषिक तोडण्याबाबत नंतर विचारण्यांत आलं, परंतु ही विचारणा औपचारिक स्वरूपाची होती, निर्णय अगोदरच करण्यांत आला होता, असं मोरारजींचं मत बनलं.

त्या निर्णयास विरोध करणं व्यर्थ आहे याची त्यांना जाणीव होती. तरी पण मोरारजींनी द्वैभाषिक मोडण्यास सक्त विरोध केला. मराठी भाषिकांची मुंबईबाबतची मागणी श्रेष्ठांनी फेटाळल्यामुळे पं. नेहरू अडचणींत सापडले होते. या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी तसं करावं लागलं याची पंडितजींनी कबुली दिली; आणि मोरारजींना गप्प केलं. कॉंग्रेस पक्षांतर्गत निर्माण झालेल्या सत्ता-स्पर्धेंत, चव्हाण यांचा पाठिंबा मिळवण्यासाठी इंदिरा गांधी यांनी द्वैभाषिकाचा भंग करण्याच्या निर्णयांत रस घेतला असंच मोरारजींचं मत बनलं. इंदिरा गांधी या कॉंग्रेसच्या अध्यक्ष होत्या, परंतु या

प्रश्नाच्या निर्णयाबद्दल त्यांचा शब्द अंतिम मानला जावा एवढं सामर्थ्य त्या वेळीं त्यांना प्राप्त झालेलं नव्हतं. पं. नेहरू आणि पं. पंत यांचा श्रीमती गांधी आणि चव्हाण यांनी विश्वास संपादन केला होता हें खरं; पिताजींचं मन वळवण्याचं काम श्रीमती इंदिराजींनी केलं असेल हेंहि खरं, परंतु अंतिम निर्णय करणं हें नेहरू आणि पंत यांच्यावरच अवलंबून होतं.

हैदराबादमध्ये झालेल्या चर्चेच्या वेळीं यशवंतराव चव्हाण यांनी, द्वैभाषिक राबवण्यांतलं यश निश्चित करण्यासाठी आणखी सहा महिन्यांची मुदत सांगितली होती; परंतु पोटनिवडणुकींतल्या पराभवानंतरहि चव्हाण यांच्या मार्गांतल्या अडचणी कमी झालेल्या नव्हत्या. नेहरू आणि पंत यांना त्याची जाणीव चव्हाणांनी आता स्पष्टपणें दिली.

गुजरातचे नेते मोरारजीभाई देसाई आणि ठाकूरभाई देसाई यांची इतराजी पत्करून, यशवंतराव हे इंदिरा गांधी यांच्या सहकार्यानं मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या रोखानं क्रमाक्रमानं पुढे सरकत असतांनाच ब्रिजलाल बियाणी यांनी वेगळाच सूर काढण्यास प्रारंभ केला.

४ मार्च १९५९ या दिवशीं मुंबई विधानसभेंतील चर्चेच्या वेळीं बियाणी यांनी, मुंबई द्वैभाषिक राज्याच्या विभागणीची आणि त्रिराज्य-निर्मितीची मागणी केली. महाराष्ट्र, महागुजरात आणि महाविदर्भ अशा तीन राज्यांचीं स्वप्नं ते पहात होते. त्रिराज्य-योजनेवर पूर्वी एकदा रण माजलं होतं आणि त्याबाबत झालेल्या वाटाघाटींतूनच लोकसभेनं अखेर द्वैभाषिकाचा निर्णय केला होता. तरीहि बियाणी हे चार-पांच वर्षांनंतर पुन्हा त्याच मागणीचा पाठपुरावा करूं लागतांच, विधानसभा काँग्रेस-पक्षांत खळबळ उडाली आणि बियाणींना त्याबाबत जाब विचारण्यांत आला; इतकंच नव्हे तर, पुढच्या महिन्याभरांतच बियाणी यांची काँग्रेस-पक्षांतून हकालपट्टी करण्यांत आली. महाविदर्भाच्या स्वतंत्र निर्मितीचा प्रश्न उपस्थित केला जाऊन त्यांतून नव्या चळवळीला वाव मिळवून देण्याला काँग्रेस-श्रेष्ठांची अनुकूलता लाभणं मुळीच शक्य नव्हतं. त्यामुळे बियाणी यांची पक्षांतून हकालपट्टी होत असतांना दिल्ली स्वस्थ राहिली.

काँग्रेस-श्रेष्ठांच्या विचारांत बदल घडत असल्याच्या कारणाबद्दल त्या वेळीं दिल्लींत निरनिराळ्या गोटांत निरनिराळं बोललं जात होतं. १९५६ मध्ये द्वैभाषिक अस्तित्वांत आणण्यासाठी उत्तर प्रदेशामधील खासदारांनी मोठा पाठिंबा दिला होता; परंतु आता ते वेगळ्या राजकारणाचा विचार करूं लागले होते. मोरारजी देसाई यांचा १४ नोव्हेंबर १९५६ ला केंद्रीय मंत्रिमंडळांत प्रवेश झालेला होता. मोरारजींना दिल्लींत बढती मिळाली, परंतु त्यामुळे उत्तर-प्रदेशाच्या खासदारांना वेगळीच धास्ती वाटूं लागली. मोरारजी यांचं पंतप्रधानपदावर लक्ष असून, पं. नेहरूंची जागा या ना त्या रूपानं मोकळी झाल्यास, तें पद हस्तगत करण्यासाठी झगडा करणारे ते पहिले आहेत, या दृष्टीनं त्यांच्याकडे पाहिलं जात होतं. अशा स्थितींत द्वैभाषिकाचा

भक्कम पाठिंबा त्यांच्याजवळ शिल्लक असेल, तर पंतप्रधानपदाच्या चुरशीमध्ये मोरारजी तें पद हस्तगत करण्याचा संभव अधिक, अशी त्यांची समजूत होती. द्वैभाषिक मोडलं तर तें त्यांना हवं होतं.

उत्तर-प्रदेशामधील खासदारांची संख्या लोकसभेंत इतर सर्व राज्यांपेक्षा अधिक रहायची, तर उत्तर-प्रदेशाच्या तोडीचं मुंबई द्वैभाषिक राज्य हें कायम राखून चालणार नव्हतं. त्यामुळे द्वैभाषिक राज्याची विभागणी व्हावी या मागणीमागे उत्तर-प्रदेशाच्या खासदारांनी आपली शक्ति उभी करण्याचा निर्णय केला.

या आणि अशा प्रकारच्या वावड्या उडत राहिल्या असतांनाच १९५९ च्या ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यांत कॉंग्रेस-श्रेष्ठांनी, मुंबईच्या भवितव्यासंबंधीचा निर्णय अखेर जाहीर केला. त्यामुळे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत राहिलेले विविध प्रकारचे अंदाज, अफवा आणि अनिश्चितता यांची एकदाची सांगता झाली.

महाराष्ट्राची मागणी मान्य करण्यासाठी ही विशिष्ट वेळच का निवडली गेली, यासंबंधांत मग उलटसुलट मतप्रवाह व्यक्त होऊं लागले. केरळमध्ये जी राजकीय परिस्थिति त्या काळांत निर्माण झाली होती त्याचा संबंध एस्. एम्. जोशी यांनी या निर्णयाच्या मुहूर्ताशीं जोडला. केरळमधील कम्युनिस्ट सरकारला दूर करण्यांत कॉंग्रेसला यश आलं होतं. महाराष्ट्रांत संयुक्त महाराष्ट्र समितीकडून कॉंग्रेसला आव्हान मिळालेलंच होतं. केरळमध्ये वापरलेला डावपेंच महाराष्ट्रांत वापरून कॉंग्रेस स्थिर करण्याचा हेतु या निर्णयामागे आहे असंहि त्यांचं मत होतं. केरळ आणि महाराष्ट्र येथील त्या काळांतल्या घटना लक्षांत घेतां, महाराष्ट्रासंबंधांत अनुकूल निर्णय करण्याशिवाय कॉंग्रेस-श्रेष्ठांना कांही गत्यंतरच उरलं नव्हतं. त्यामुळे एस्. एम्. जोशी यांच्या तर्काला पुष्टीच मिळते.

द्वैभाषिक तोडण्याचा निर्णय करण्याचं श्रेय त्या वेळीं लोकांनी इंदिरा गांधी यांच्याकडे दिलं. एखादी समस्या हाताळायची त्यांची पद्धत ही निश्चयात्मक स्वरूपाची असे. त्याच पद्धतीनं महाराष्ट्राच्या मागणीचा निर्णय त्यांनी केला होता. भाऊसाहेब हिरे यांनीहि उघडपणें हें श्रेय इंदिरा गांधी आणि स. का. पाटील यांना दिलं. इंदिरा गांधी त्या वेळीं कॉंग्रेस-पक्षाच्या अध्यक्ष असतांना पक्ष-कार्यकारिणींत, मुंबईसंबंधीचा प्रश्न येईल तेव्हा, मोरारजींचा विरोध होणार हें निश्चितच होतं; परंतु मोरारजींना अलग ठेवून, इंदिरा गांधी यांनी त्यांच्या विरोधावर युक्तीनं मात केली आणि अंतिम निर्णय केला. ही त्यांची कामगिरी भूषणावह अशीच होती.

यशवंतराव चव्हाण आणि स. का. पाटील हे दोघेहि द्वैभाषिक नाहीसं करण्यासाठी उत्सुक असलेले पाहून तर मोरारजींना धक्काच बसला. पं. नेहरू आणि पं. पंत यांनी या प्रश्नाचा पुनर्विचार करण्याचं पूर्वीच ठरवलेलं असल्यानं त्यांचा विरोध होण्याची शक्यताच नव्हती. त्यामुळे इंदिरा गांधी यांना निर्धारानं पावलं टाकण्यास अडचण पडली नाही. द्वैभाषिक नाहीसं करण्याचा निर्णय होतांच त्या वर्षीच्या सप्टेंबरपासून डिसेंबर

१९५९ पर्यंत महाराष्ट्र आणि गुजरात यांच्यामध्ये सलोख्यानं समझोता करण्याचे प्रयत्न मग सुरू झाले.

चंदीगड इथे सप्टेंबरअखेर झालेल्या कॉंग्रेस-अधिवेशनाच्या वेळीं इंदिरा गांधी यांनी या कामासाठी पं. पंत यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यांची एक समिति नियुक्त करण्यांत आल्याचं जाहीर केलं. या समितींत यशवंतराव चव्हाण, जिवराज मेहता, स. का. पाटील, गोपाळराव खेडकर, के. के. शहा, ठाकूरभाई देसाई, बाबासाहेब सावनेकर आणि मारोतराव कन्नमवार यांचा समावेश होता. डांग आणि ठाणें व प. खानदेश-मधील कांही गावं गुजरातमध्ये घालण्यास चव्हाण यांनी मान्यता दिलीच होती, त्यामुळे या दोन राज्यांमधल्या सीमेसंबंधांत कांही वाद निर्माण होण्याचा प्रश्न नव्हता. आर्थिक-दृष्ट्या या दोन राज्यांची विभागणी करण्याच्या प्रश्नावरच सारी चर्चा केंद्रित झालेली होती.

पं. पंत यांनी ३ डिसेंबरला आपल्या समितीचा अहवाल कॉंग्रेस वर्किंग कमिटीला सादर केल्यानंतर दुसऱ्या दिवशीं वर्किंग कमिटीनं एक ठराव संमत केला. महाराष्ट्र व गुजरात या नव्यानं निर्माण होणाऱ्या दोन राज्यांतल्या अर्थविषयक तपशिलास चव्हाण व जिवराज मेहता यांनी मान्यता दिली होती. त्याचा उल्लेख या ठरावांत करण्यांत आला. मुंबई राज्यांतील एकूण मालमत्तेचं वांटप करण्यापूर्वी, महाराष्ट्रानं गुजरातला दहा कोटि रुपये, नवीन राजधानी बांधण्यासाठी म्हणून द्यावेत असं त्यानुसार ठरलं. गुजरात राज्य नव्यानं अस्तित्वांत आल्यानंतर त्याला जी वार्षिक तूट येईल ती तूट पहिलीं सहा वर्षं महाराष्ट्रानं भरून काढावी हेंहि मान्य करण्यांत आलं होतं. अर्थात् पुढील चार वर्षांसाठी त्यामध्ये २० टक्के कपात सुचवण्यांत आली होती. हा ठराव ४ डिसेंबरला वर्किंग कमिटीनं मान्य केला असला, तरी जनतेला तो १९ डिसेंबरला समजला. संयुक्त महाराष्ट्र समितीनंहि महागुरात जनता-परिषदेच्या नेत्यांशीं नोव्हेंबरमध्ये चर्चा करतांना, गुजरातला मदत करण्याचं आश्वासन दिलेलं होतं, पण शब्द दिलेला नव्हता.

१९६० मध्ये महाराष्ट्र आणि गुजरात हीं दोन स्वतंत्र राज्यं अस्तित्वांत यायचीं होतीं. १९६१ अखेरपर्यंत म्हणजे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत, दोन्ही राज्यांच्या फायनान्स कमिशननं दोन्ही राज्यांच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेईपर्यंत ही मदत करायची होती. हा आढावा १९६२ मध्ये घेतला जाणार होता. गुजरातला दहा वर्षं आर्थिक मदत करण्यास चव्हाणांनी व्यावहारिक भूमिकेवरून मान्यता दिली होती. गुजरातची तूट भरून काढण्याचा बोजा केंद्र-सरकारवर लादायचा नाही याबाबत चव्हाण आणि जिवराज मेहता यांचं एकमत होतं.

असं जरी ठरलं, तरी गुजरातला प्रतिवर्षी नेमकी किती तूट येईल याबाबत वाद निर्माण झाला. दहा वर्षांच्या काळांत एकूण नेमकी किती तूट येईल याचा अभ्यास करण्यासाठी पी. सी. भट्टाचार्य यांच्या अध्यक्षतेखाली चार सदस्यांची एक समिति नेमली गेली. या समितींत व्ही. टी. देहेजिया, व्ही. ईश्वरन् , एम्. आर. यार्दी आणि

स. गो. बर्वे हे चार सदस्य होते. या समितीमध्ये मोठेच मतभेद निर्माण झाले. १९६१-६२ या वर्षांत गुजरातला एकूण नऊ कोटि रुपयांची तूट येईल असं देहेजिया व ईश्वरन् यांचं म्हणणं होतं, तर यार्दी आणि बर्वे यांच्या मतें ही तूट ४ कोटि ३२ लक्ष रुपयांपेक्षा अधिक येणार नाही असं होतं. समितींत एकमत न झाल्यानं अखेर हा वाद पं. पंत यांच्यापर्यंत नेण्यांत आला.

पं. पंत यांनी या वादांत तडजोड घडवून आणण्याचं काम अर्थखात्याचे पूर्वीचे एक सेक्रेटरी रंगाचारी यांच्याकडे सोपवलं आणि अखेर उलटसुलट चर्चा होऊन महाराष्ट्रानं गुजरातला दहा वर्षांत एकूण ४० कोटि ५५ लक्ष रुपये देण्यास मान्यता दर्शवली. राजधानी उभारण्यासाठी द्यावे लागणारे १० कोटि रुपये हे अर्थातच वेगळे होते. गुजरातपासून वेगळं होण्यासाठी महाराष्ट्राला ही जबर किंमत पडली.

या एकूण व्यवहाराबद्दल दोन्ही प्रदेशांत उलटसुलट चर्चा होत राहिली असली, तरी कराराच्या अटी या गुजरातला निश्चितच फायदेशीर ठरलेल्या होत्या. त्यांनी हा सारा व्यवहार व्यापारी तत्त्वानुसारच संपवला. गुजरातच्या बाजूनं बंधुभावाचा अर्थ आर्थिक लाभाच्या संदर्भातच लावला गेला. भाऊबंदकीचा वाद ज्या देवाण-घेवाण पद्धतीनं संपवला जातो तेंच इथे घडलं.

काँग्रेस-श्रेष्ठांनी महाराष्ट्राच्या विशिष्ट भावनेचा मात्र आदर केलेला आढळतो. दोन नवीं राज्यं अस्तित्वांत येत असतांना गुजरात राज्य हें त्या नांवानंच अस्तित्वांत येईल हें उघड होतं; परंतु नवीं राज्यं येण्याचं जें विधेयक तयार झालं त्यामध्ये गुजरात आणि 'मुंबई राज्य' असा उल्लेख करण्यांत आला. महाराष्ट्रामध्ये याबद्दल तीव्र प्रतिक्रिया उमटली. महाराष्ट्राबद्दल काँग्रेस-श्रेष्ठांच्या मनांतल्या द्वेषबुद्धीचंच हें निदर्शक असून 'महाराष्ट्र' हें नांव बुद्धिपुरस्सर टाळलं जात असल्याबद्दलची ही टीका होती. नव्यानं अस्तित्वांत येणारं राज्य हें पूर्वीच्या नांवानंच सुरू व्हावं अशी पं. नेहरूंची इच्छा होती. तरी पण याबाबतचा अंतिम निर्णय महाराष्ट्रांतील जनतेनं करण्यास त्यांची हरकत नव्हती. अखेर लोकांची इच्छा आणि भावना लक्षांत घेऊन यशवंतराव चव्हाण यांनी नवं राज्य हें 'महाराष्ट्र राज्य' या नांवानं अस्तित्वांत येईल असं निश्चित केलं.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची लढाई अखेर अशा प्रकारे संपली. महाराष्ट्रानं ही लढाई जिंकली. महाराष्ट्रानं ही शर्यत जिंकली, ध्येय साध्य केलं तें त्याला चर्चा, वाटाघाटी यामुळे साध्य करतां आलं, असं यशवंतराव यांनी आपलं मत व्यक्त केलं. अर्थात् या यशाचा संपूर्ण वांटा ते स्वतःकडे घेत नाहीत. केवळ त्यांच्या प्रयत्नानं संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला असा त्यांचा दावा नव्हता. 'महाराष्ट्रांतील जनतेचा हा विजय आहे' असाच या विजयाचा अर्थ त्यांनी सांगितला.

संयुक्त महाराष्ट्राचा विजय हा जनतेचा विजय आहे असं म्हटल्यानंतर हा विजय नेमका कुणी मिळवला हा वाद सुरू होणं क्रमप्राप्त ठरतं. संयुक्त महाराष्ट्र समिति, महागुजरात जनता-परिषद आणि महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेस या सर्वांचेच प्रयत्न वेगवेगळ्या

मार्गानं ध्येयसिद्धीसाठी सुरू होते. महाराष्ट्र आणि गुजरात यांमध्ये, दोन्ही ठिकाणच्या समिति-गटानं आंदोलनाचा मार्ग स्वीकारला होता आणि प्रदेश-काँग्रेसनं प्रारंभापासूनच वाटाघाटींचा मार्ग अवलंबला होता. लढाईचा अंतिम टप्पा वाटाघाटींच्या मार्गानं जिंकला हें तर खरंच, परंतु अखेरचा क्षण प्राप्त होईपर्यंत दोन्ही ठिकाणच्या विरोधी पक्षांनी जोरदार आंदोलन सुरू ठेवलं; किंबहुना या लढाईतला अखेरचा क्षण नजीक येण्यास आणि वाटाघाटी फलद्रूप होण्यास त्यांचं साहाय्य झालं, ही वस्तुस्थिति नाकारतां येणार नाही. केवळ आंदोलन तीव्र केल्यानं राजकीय स्वरूपाचे प्रश्न सुटतात असं सहसा घडत नाही. तथापि चळवळीमुळे सरकार वाटाघाटीला तयार होतं आणि त्या वाटाघाटींतून कांही ना कांही निर्णय होण्याची परिस्थिति मात्र निर्माण होऊं शकते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याबाबत त्रयस्थ भूमिकेंतून पहातांना दिसतं तें असं की, विरोधी पक्षांनी काँग्रेस-पक्षाला जें आव्हान दिलं होतं, त्याचा परिणाम काँग्रेस-श्रेष्ठांमध्ये महाराष्ट्राच्या मागणीची पूर्तता करण्याची जाणीव निर्माण होण्यांत झाला.

१९५७ ची निवडणूक, नंतरच्या पोटनिवडणुकांमधील काँग्रेसचं अपयश आणि चळवळीचं वातावरण याचा लाभ यशवंतरावांना श्रेष्ठांबरोबरच्या वाटाघाटींच्या वेळीं झाला असलाच पाहिजे. चर्चेची अंतिम फेरी त्यांनी चातुर्यानं जिंकली आणि महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसला ध्येयपूर्तीचं यश मिळवून दिलं. दिल्लींतला बुद्धिबळाचा डाव यशवंतरावांनी जिंकला होता हें तर खरंच! परंतु महाराष्ट्रांत आणि गुजरातमध्येहि त्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झालं नसतं, तर संयुक्त महाराष्ट्राचा डाव दिल्लीच्या श्रेष्ठांनी कुजत ठेवला असता हेंहि तितकंच खरं. महाराष्ट्रांतल्या जनतेचा हा विजय आहे हें यशवंतरावांचं विधान त्या दृष्टीनं यथार्थ आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानं महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासांतलीं कांही पानं सुवर्णाक्षरानं लिहिलीं गेलीं. काँग्रेसचे नेते शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली प्रारंभीं स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे, काँग्रेस-अंतर्गत वादामुळे जेव्हा एस्. एम. जोशी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्र समिति या नांवानं रूपांतर झालं त्या वेळीं महाराष्ट्रांत काँग्रेसविरुद्ध अकरा विरोधी पक्ष, अशी एक भक्कम संघटना उभी राहिली. स्वातंत्र्याच्या चळवळींत सुद्धा विविध राजकीय पक्षांत असा एकसंधपणा निर्माण झालेला नव्हता.

संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट, शेतकरी-कामकरी पक्ष, संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेस-जन, मजदूर-किसान पक्ष, लाल निशाण गट, शेड्युल-कास्ट फेडरेशन, हिंदुमहासभा, जनसंघ, रेव्होल्युशनरी कम्युनिस्ट पक्ष, बोल्शेव्हिक पक्ष असे अकरा विरोधी पक्ष जरी एकत्र झाले होते, तरी यांतले प्र. स. पक्ष, उजवा कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी-कामकरी आणि शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हे चार पक्ष प्रमुख होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळीच्या संदर्भात सर्व विरोधी पक्षांचं एकमत वेळोवेळीं प्रगट होत राहिलं होतं. तथापि समितीच्या वतीनं लहान-मोठ्या निवडणुकांच्या आणि

निवडणुकांनंतर सत्तेच्या आणि प्रतिष्ठेच्या जागांच्या वांटपाचा प्रश्न ज्या ज्या वेळीं उपस्थित झाला त्या प्रत्येक वेळेस मतभेद टाळून मुख्य प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्याऐवजीं समितीचा एकोपा भंग पावण्याचे प्रसंगच अधिक निर्माण होत राहिले. विशेषतः विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या वेळीं मुंबईत प्र. स. पक्ष आणि डांगेप्रणीत कम्युनिस्ट पक्ष यांच्यामध्ये जागांच्या वांटपावरून झगडा झाला. समितीच्या निवडणूक-समितीला आणि खुद्द एस्. एम्. जोशी यांना धाब्यावर बसवून प्र. स. पक्षानं आपल्या उमेदवारांची स्वतंत्रपणें यादी जाहीर केली. डांगे विरुद्ध आचार्य दोंदे हा उमेदवारीचा वाद आणि अखेरीस या सर्व प्रकरणांत उजव्या कम्युनिस्ट पक्षाला विधानसभेसाठी फक्त दोन जागा आणि डांगे यांच्यासाठी सुरक्षित मतदार-संघ मिळवणं एवढ्यावरच मानावं लागलेलं समाधान, असे किती तरी प्रसंग समितीच्या एकोप्याला धक्का देणारे ठरले.

पश्चिम महाराष्ट्रांतील निरनिराळ्या जिल्ह्यांतील नगरपालिकांच्या निवडणुकांच्या वेळीं आणि मुंबई, पुणें येथील महापालिकांच्या निवडणुकांच्या वेळीं तर अंतर्गत मतभेद अधिक तीव्र बनले. परिणामीं संयुक्त महाराष्ट्रासाठी एकत्र आलेल्या विरोधी पक्षांमध्ये नंतरच्या काळांत एकमेकांचे पाय ओढण्याचे उद्योगच वाढीला लागले. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अगोदर कॉंग्रेस विरुद्ध समिति असा सरळ सामना होता आणि समितीला प्रमुख विरोधकांमध्ये महत्त्वाचं स्थान प्राप्त झालं होतं. परंतु निवडणुकी-नंतर समितीच्या घटक-पक्षांत हुकूमशाहीची प्रवृत्ति वाढत राहिली आणि आपापसांतच शह-काटशह देण्याचं राजकारण सुरू झाल्यानं समितीबद्दल लोकांमध्ये असलेल्या सहानु-भूतीला उतरती कळा लागली.

त्याच वेळीं महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसनं आक्रमक पवित्रा स्वीकारून, कॉंग्रेसची गेलेली पत पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न यशवंतराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू केला. उलट निराशेनं ग्रासलेल्या प्रजासमाजवादी पक्षानं, प्रवाहाविरुद्ध पोहत रहाण्याचा त्या वेळीं आत्मघातकी प्रयत्न केला, समितीचं बोट सोडून तिरंगी लढतीचं चित्र निवडणुकींत निर्माण केल्यानंतर समितीचं एकूण स्वरूपच बदलण्याचा विचार डांगे यांच्या-सारखे नेते करूं लागले. समिति म्हणजे विरोधी पक्षांचं कडबोळं असं तिचं स्वरूप न ठेवतां, समिति नांवाचा एक स्वतंत्र विरोधी पक्ष स्थापन करण्याचा आणि या पक्षाचं सभासदत्व जनतेसाठीहि खुलं ठेवण्याचा निर्णय ४ एप्रिल १९५७ च्या बैठकींत करण्यांत आला. समितीच्या तिकिटावर निवडून आलेल्या विधानसभा व लोकसभा यांतील सभासदांना मार्गदर्शन करण्यासाठी समितीनं 'पार्लमेंटरी बोर्ड' हि नियुक्त केलं. श्री. अ. डांगे हे या मंडळाचे अध्यक्ष, डॉ. नरवणे हे उपाध्यक्ष आणि एस्. एम्. जोशी हे चिटणीस होते. या मंडळांत आचार्य प्र. के. अत्रे, दत्ता देशमुख, र. के. खाडिलकर, ज. श्री. टिळक, दाजिबा देसाई, रा. का. म्हाळगी, रसिक भट आणि गायकवाड यांचा समावेश करण्यांत आला.

विधानसभा समिति-पक्ष म्हणून विधानसभेंत काम करायचं असं ठरलं होतं; परंतु आपापल्या पक्षाचीं निशाणं गुंडाळून ठेवून समितीच्या छत्राखाली राहूनच सर्व राजकारण, निवडणुका वगैरे करण्याच्या या निर्णयानं समिति-अंतर्गत घटक पक्षांत चलबिचल होऊन एकमेकांवर उलटसुलट दोषारोप करण्याची चढाओढ त्यांच्यांत सुरू झाली. लोकांच्या समोर समितीनं आपली एक तेजस्वी प्रतिमा उभी केलेली होती; परंतु अंतर्गत हेवेदावे आणि तणाव यांमुळे ही प्रतिमा निस्तेज बनत आहे असं आढळतांच, कॉंग्रेसनं या बदलत्या परिस्थितीचा लाभ घेतला आणि हळूहळू आपले पाय भक्कम करण्यास सुरुवात केली.

आमदार आणि खासदार यांनी समितीचा गट म्हणून काम करावं या निर्णया-बाबतहि प्र. स. पक्षामध्ये पुढे मतभेद निर्माण झाले. या पक्षाच्या राष्ट्रीय कार्य-कारिणीनं, आपल्या पक्षाच्या सभासदांना, प्र. स. पक्षाचा गट करूनच रहावं आणि विधानसभेंत व लोकसभेंत पक्षाच्या भूमिकेवरून काम करावं असा आदेश दिल्यामुळे समिति आणि हा पक्ष यांतील मतभेद रुंदावतच राहिले. प्र. स. पक्षाच्या राष्ट्रीय कार्य-कारिणींतील अशोक मेहता गट आणि महाराष्ट्रांतील एस्. एम्. जोशी व ना. ग. गोरे यांचा गट यांत त्या काळांत बराच बेबनाव निर्माण झाला. राष्ट्रीय कार्यकारिणीचा आदेश जरूर पडल्यास झुगारून देण्याची तयारी एस्. एम्. जोशी यांनी दर्शवली, तर राष्ट्रीय कार्यकारिणीच्या आदेशाप्रमाणे वागल्यास, महाराष्ट्रांतील प्र. स. पक्षाची ताकत खची होऊन कम्युनिस्ट त्याचा लाभ उठवतील, अशी भीति गोरे यांनी व्यक्त केली. समितींत राहूनच कम्युनिस्टांशीं सामना करावा असं गोरे यांचं मत होतं. अखेर महा-राष्ट्रांतील प्र. स. पक्षाच्या सभासदांनी, समितीचा गट म्हणूनच काम करण्याचा ठराव बहुमतानं संमत करून घेण्यांत यश मिळवलं. कालांतरानं राष्ट्रीय कार्यकारिणीनंहि त्यास संमति दिली. अर्थात् संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति होईपर्यंत महाराष्ट्र-शाखेला, समिती-बरोबर रहाण्यासहि मान्यता देण्यांत आली होती. तरी पण, विधानसभा-अंतर्गत समिति-गटांत विविध प्रश्नांवरून धोरणात्मक मतभेद निर्माण होत राहिले आणि त्याचा फायदा यशवंतरावांनी, कॉंग्रेस-पक्ष भक्कम बनवण्यासाठी करून घेतला.

महाराष्ट्रांत समिति नांवाचा एक स्वतंत्र पक्ष स्थापन करण्याच्या हेतूनं जी घटना तयार करण्यांत आली, त्याबाबतहि घटक-पक्षांत पुढे मतभेद निर्माण झाले. जनसंघाचे प्रभाकर पटवर्धन आणि शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे बी. सी. कांबळे यांनी पक्ष गुंडाळ-ण्यास कडवा विरोध केला. समिति हा राजकीय पक्ष म्हणून अस्तित्वांत यावा असं एस्. एम्. जोशी यांचं मत होतं आणि उजवा कम्युनिस्ट पक्ष, लाल-निशाण गट आणि शे. का. पक्ष यांचा त्यांना पाठिंबा होता; परंतु अन्य घटक-पक्ष यांसाठी उत्सुक नसल्याचं दिसून येतांच घटनेंत बदल करण्यासाठी मग अठरा सदस्यांची एक उपसमिति २७ जून १९५७ ला नेमण्यांत आली. या समितीनं पक्षाची नवी घटना तयार केली, परंतु त्यानंहि सर्वांचं समाधान झालं नाही. नव्या पक्षासाठी सभासद नोंदवून घेण्याबाबत मतभेद निर्माण

झाले. असे सभासद नोंदण्यास घटक-पक्ष उत्सुक नव्हते, तर अपक्ष-नेत्यांचा आग्रह समितीची सभासद-संख्या वाढवावी असा होता. पक्षाची नवी घटना मान्य करण्याच्या प्रश्नावरूनच १९५८ मध्ये जनसंघानं अखेरीस समितीला रामराम ठोकला.

स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यांत घेण्याचा चंग बांधून समितीनं आपल्या जिल्हा आणि तालुका शाखांना जेव्हा आदेश दिला तेव्हा तर उमेदवार ठरवण्यासाठी समितीच्या अकरा घटक-पक्षांमध्ये अक्षरशः झोंबाझोंबी सुरू होऊन बेशिस्तीचं प्रदर्शन घडलं. मध्यवर्ती समितीनं समझोत्याचे प्रयत्न केले, पण त्यांतून कोणाचंच समाधान झालं नाही. मुंबई आणि पुणें महानगरपालिकेंतील समितीच्या नगरपित्यांचं वर्तन तर अतिशय खेदकारक ठरलं. सत्ता-स्पर्धेच्या चढाओढीमुळे, नगरपालिका आणि जिल्हा लोकलबोर्डं यांमधील समितींतल्या घटक-पक्षांत सुंदोपसुंदी सुरू राहिल्यामुळे सार्वत्रिक निवडणुकींत समितीनं मिळवलेला नांवलौकिक धुळीला मिळत राहिला. कॉंग्रेस-पक्षानं या संधीचा फायदा भरपूर करून घेतला.

सातारा जिल्हा लोकलबोर्डांत कॉंग्रेसनं मताधिक्य मिळवलं. प्र. स. पक्ष आणि जनसंघ आपसांत लढत राहिल्यानं त्याचा फायदा कॉंग्रेसला मिळाला आणि एकूण ४२ जागांपैकी २३ जागा कॉंग्रेसनं हस्तगत केल्या. कोल्हापूर जिल्ह्यांतील नगरपालिका समितीच्या ताब्यांत तर जिल्हा लोकलबोर्ड कॉंग्रेसच्या ताब्यांत, अशी स्थिति निर्माण झाली. पन्हाळा आणि शाहूवाडी तालुक्यांत तर समिति विरुद्ध समिति असा सामना झाला. नागपूर महापालिकेच्या निवडणुकीच्या वेळीं जनसंघानं उघड बंडखोरी करून विदर्भांत समितीचा कांहीहि संबंध नाही अशीच भूमिका घेतली. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशननं तर निम्म्या जागांची मागणी केली. नाशिक जिल्हा लोकलबोर्ड समितीनं जिंकलं, परंतु अध्यक्षीय निवडणुकींत कम्युनिस्ट आणि शे. का. पक्ष यांच्यांत मतभेद निर्माण झाले. समितीच्या मध्यवर्ती शाखेनं अखेर अध्यक्षपद प्रतिवर्षी निरनिराळ्या पक्षाकडे दिलं जावं अशी तडजोड केली आणि पहिल्या वर्षासाठी कम्युनिस्ट पक्षाला संधि देण्याचं ठरवलं; परंतु शे. का. पक्षाला लवादाचा हा निर्णय मान्य झाला नाही आणि प्रत्यक्ष निवडणुकीच्या मतदानामध्ये शे. का. पक्ष व प्र. स. पक्ष यांनी संगनमत करून कम्युनिस्ट उमेदवार व्ही. व्ही. सांगळे यांचा पराभव केला. शे. का. पक्षाचे बी. एल्. पाटील विजयी झाले. कॉंग्रेस-पक्षानंहि या फाटाफुटीला मदत करून आपलीं १५ मतं शे. का. पक्षाच्या उमेदवारास दिलीं.

मुंबई महानगरपालिका मात्र समितीनं सरळ सरळ जिंकली आणि महापौरपदहि पटकावलं. पण महापालिकेंतील समिति-गटाला मार्गदर्शन करण्यासाठी, मुंबई समिति-शाखेचं नियंत्रक-मंडळ नियुक्त करण्याचा लालजी पेंडसे यांचा प्रयत्न हाणून पाडण्यांत आला. परिणामीं कोणाचाच अंकुश न राहिल्यानं समितीच्या घटक-पक्षांतील, महापालिकेचे सदस्य आपापसांत उघडपणानं वाद खेळत राहिले. समाजवादी पक्षांतील लोहियावादी गटाचा या निवडणुकींत संपूर्ण त्रिफळा उडाला होता, तरी पण महापालिका

कामगार-युनियन या गटाच्या हातांत असल्यानं, त्यांनी समिति-अंतर्गतवादाचा लाभ उठवण्याच्या दृष्टीनं, महापालिका मजदूर युनियननं मागणी पदरांत पाडून घेण्याचा डाव टाकला. या मागण्या पूर्वीपासूनच पडून होत्या. महापालिकेंत समितीचीच राजवट असल्यानं युनियननं त्यांना कोंडींत पकडलं आणि संपाचा पुकारा केला. कम्युनिस्ट पक्षाची यामुळे मोठीच पंचाईत झाली. अखेर डांगे यांनी पुढाकार घेऊन, संप टाळण्याच्या हेतूनं दोन मागण्या मान्य केल्या आणि प्रत्येक कामगाराला दर महिना जादा ५ रुपये देऊं केले; परंतु यासंबंधीची भूमिका विशद करतांना डांगे यांनी जाहीर सभेंत कठोर टीका केल्यानं प्र. स. पक्षाचे नगरपिते दुखावले गेले आणि त्यांतून कम्युनिस्ट व प्र. स. पक्ष असा उभा दावा सुरू झाला.

संयुक्त महाराष्ट्र समिति आणि महागुजरात जनता-परिषद यांच्यामध्ये १९५८ मध्ये, गुजरात राज्याची आर्थिक तूट भरून काढण्यासाठी महाराष्ट्रानं किती मदत करावी आणि डांग, उंबरगाव व नंदुरबार तालुका व महाराष्ट्र यांतील सीमा निश्चित करण्याविषयी, दोन वेळा चर्चा झाल्या; परंतु त्यांतून कोणताहि निश्चित निर्णय झाला नाही. त्यामुळे महागुजरात जनता-परिषदेचा दावा समिति मान्य करणार नसेल तर या विषयावर पुढे चर्चा करण्यांत कांही हशील नाही, असं जनता-परिषदेचे उपाध्यक्ष दादूभाई अमीन यांनी जाहीर करून टाकलं. मुंबईच्या बदल्यांत डांगचा भाग गुजरातला जोडण्याला समितीच्या नेत्यांनी मान्यता दिली आहे, असा समज मात्र त्या काळांत समितीच्या गोटांत निर्माण झाला; परंतु ना. ग. गोरे यांनी त्याचा इन्कार केला.

समितीच्या कर्तृत्वाचा इतिहास पहातांना १९५८ या संपूर्ण वर्षांत समितीच्या घटक-पक्षांत भांडणाची फार मोठी लागण झाली होती असं आढळतं. आचार्य अत्रे यांनी प्र. स. पक्षाला धारेवर धरून 'मराठा' पत्रांतून या पक्षावर टीकेची झोड उठवल्यानं सर्वजण अस्वस्थ बनले होते. अत्रे यांना या टीकेच्या बाबतींत कम्युनिस्ट गटाची फूस असल्याबद्दलहि त्या वेळीं बोललं गेलं. प्र. स. पक्षाची मंडळी समितीच्या ऐक्याला सुरुंग लावून काँग्रेस-नेत्यांशीं चुंबाचुंबी करत आहेत हा अत्रे यांचा राग होता. अत्रे यांची टीका अधिकच जहाल होऊं लागतांच एस्. एम्. जोशी यांनी त्याबद्दल जाहीर नापसंती व्यक्त केली आणि अत्रे हे रानटीपणाचे आरोप थांबवणार नसतील, तर समितीमधून बाहेर पडण्याची धमकीहि त्यांनी दिली. हा चव्हाट्यावर सुरू झालेला वाद थांबवण्यासाठी जोरदार प्रयत्न होऊन मोठ्या मुष्किलीनं टीकेची धार कमी करण्यांत जरी यश मिळालं, तरी प्र. स. पक्ष आणि कम्युनिस्ट यांच्यांतील मतभेदाची दरी मात्र पुढच्या काळांत रुंदावतच गेली.

मुंबई महापालिकेंतील दुसऱ्या वर्षीच्या महापौरपदाच्या निवडणुकीच्या वेळींच हें अनुभवास आलं. महापालिकेंत प्र. स. पक्षीयांची सभासद-संख्या समितीमधील अन्य घटक-पक्षांच्या तुलनेनं अधिक होती. महापौरपद हें आळीपाळीनं एकेका पक्षाला

देण्याचं ठरलं होतं. तरी पण कम्युनिस्टांनी एस्. एस्. मिरजकर यांना महापौर बनवण्याचा हट्ट पुरा केला; परंतु या वेळीं झालेल्या मतदानामध्ये समिति एकसंघ राहिली नाही. तिघांनी कॉंग्रेस-उमेदवारास मतदान केलं आणि एकानं कोरी मतपत्रिका दिली. समितीनं मात्र कोणाहिविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई केली नाही. कॉंग्रेस-पक्षानं या फाटाफुटीचा फायदा इम्रेनाझ-प्रकरणीं महापालिकेंत एक ठराव आणून घेतला. मग आपली इज्जत राखण्यासाठी, मुंबईतील गोळीबारांत ठार झालेल्या १०५ जणांचं प्रकरण ठराव-रूपानं समितीला पुढे करावं लागलं आणि शेवटीं हें सर्वच प्रकरण कोर्टात गेल्यानं सर्वांचीच अब्रू बचावली.

समितीमधील मतभेद शिगेला पोंचले असतांनाच १९५८ च्या ऑगस्टमध्ये गुजरातमध्ये अहमदाबाद व अन्य एक-दोन ठिकाणीं दंगल सुरू झाल्यानं, समितीचं लक्ष तिकडे वेधलं आणि येथील अंतर्गत भांडणांना कांहीसा उतार पडला. त्याच वेळीं म्हणजे १ नोव्हेंबर १९५८ ला महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्न निर्माण झाला. समितीच्या घटक-पक्षांतील द्वेषाचं वातावरण कमी होऊन त्यांचं अन्यत्र लक्ष वेधावं यासाठी एस्. एम्. जोशी हे मनाच्या मोठ्या निराश अवस्थेंत असतांना सुद्धा कांही ना कांही कार्यक्रम तयार करण्यांत गुंतले होते. त्यांतून सीमा-मोर्चा आणि दिल्ली-मोर्चा असे दोन कार्यक्रम ठरवण्यांत आले. याच वेळीं एस्. एम्. जोशी यांनी डांगे, भंडारे, उद्धवराव पाटील आणि दत्ता देशमुख यांच्याशीं हातमिळवणी करून, मुंबईतील कापड-कामगारांची एक नवी कामगार-संघटना सुरू करण्याची योजना जाहीर केली; परंतु दंडवते प्रभृति प्र. स. पक्षाच्या नेत्यांनी या योजनेस जोरदार विरोध केला. कापड-कामगार क्षेत्रांत वस्तुतः कम्युनिस्टांचाच कब्जा होता. या नव्या योजनेचा लाभ कांही प्रमाणांत प्र. स. पक्षालाच होण्याची शक्यता होती; परंतु कम्युनिस्टांशीं कोणत्याहि कारणासाठी हातमिळवणी न करण्याच्या धोरणापायीं या संधीचा लाभहि त्यांना घेतां आला नाही.

१९५९ च्या पहिल्या सहामाहींत समिति-अंतर्गत मतभेद निरनिराळ्या कारणा-साठी वाढत राहिलेले असतांनाच, पुणें महानगरपालिकेंतहि समितीमध्ये फाटाफुटीची लागण झाली. यशवंतराव चव्हाण यांच्या राजीनाम्याची मागणी करणारा एक ठराव सभागृहांत आला होता. सभागृहांत समितीचे ४३ सभासद आणि कॉंग्रेसचे २२ सभासद असं बलाबल होतं; परंतु हा ठराव अवघीं चार मतं अधिक पडून संमत झाला. पुणें महानगरपालिकेंतील प्र. स. पक्षाच्या कांही सदस्यांनी समितीला हें उघड आव्हान दिलेलं पाहून अत्रे पुन्हा खवळले आणि त्यांनी टीकेचे आसूड झाडण्यास सुरुवात केली. त्याबरोबर समितीमधील राम तेलंग आणि भाऊसाहेब शिरोळे या बंडखोर नेत्यांनी अत्रे यांच्यावर ठपका ठेवणारा ठराव महापालिकेंत संमत करून घेतला. ठरावाच्या बाजूनं १३ तर विरोधी १० असं मतदान झालं. १५ नगरपिते तटस्थ राहिले. अत्रे यांच्याविरुद्ध ठराव संमत होतांच त्यांचा पारा उतरला आणि समितीमधील आपल्या सहकाऱ्यांना आता शिवीगाळ करणार नाही, अशी त्यांनी कबुली दिली.

परंतु त्यांची ही कबुली अल्पकाळ टिकली. मुंबई महापालिकेमध्ये केरळमधील कम्युनिस्ट सरकारचा निषेध करणारा ठराव काँग्रेस-पक्षानं आणला असतांना समिती-मधील प्र. स. पक्षाच्या नगरपित्यांनी अखेरपर्यंत काँग्रेसला सहकार्य करतांच अत्रे यांनी त्यांचे राजीनामे मागितले. त्यासरशी २८ नगरपित्यांनी राजीनामे पुढे केले. अखेर या ठरावावरील मतदानाबाबत समितीच्या सदस्यांना मोकळीक दिली होती असं सिद्ध झाल्यानं हें प्रकरण तिथेच थांबलं.

समितीचं तारूं अशा प्रकारे मागे-पुढे होत राहिलं असतांनाच १९५९ च्या ऑगस्टमध्ये द्वैभाषिक रद्द होत असल्याबद्दच्या व काँग्रेस-श्रेष्ठांनी त्याला मान्यता दिल्या-बद्दलच्या वार्ता येऊं लागल्या. समितीनं ज्यासाठी लढा पुकारला होता आणि सातत्यानं सुरू ठेवला होता त्यामध्ये विजय संपादन केल्याचा, परमावधीच्या आनंदाचा असा हा क्षण होता. विजयामुळे समितीला आपली बुडती नाव सावरणं शक्य होतं. परंतु काँग्रेस-श्रेष्ठांनी योग्य असा निर्णय केल्याचं पाहून एस्. एम. जोशी यांच्या मनावरील ताण संपला. अकरा विरोधी पक्षांना एकत्र ठेवण्याची कसरत सुरू ठेवून सत्ताधारी काँग्रेस-पक्ष विरुद्ध प्रभावी विरोधी पक्ष म्हणून विविध प्रयोग करत रहाण्याचंहि आता त्यांना कांही कारण उरलं नव्हतं. समितीची एकजूट कायम रहाण्यासाठी त्यांनी आजवर जिवापाड कष्ट केले होते. प्रसंगीं अपमानहि पचवले होते. संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीची इच्छा फलद्रूप होतांच त्यांच्या मनावरील जबाबदारीचा भार कमी झाला आणि त्या उत्साहांतच त्यांनी प्र. स. पक्षाच्या सदस्यांना त्यांच्या इच्छेनुसार काम करण्यास अनुमति दर्शवली. दंडवते यांनाच त्यांनी हें सांगितलं.

संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेस-जन हे डॉ. नरवणे यांच्या नेतृत्वाखाली, एका विशिष्ट ध्येयासाठीच समितींत दाखल झालेले होते. काँग्रेस-श्रेष्ठांनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला मान्यता देतांच डॉ. नरवणे यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आणि आपल्या सर्व सहकाऱ्यांना त्यांनी पुन्हा पूर्ववत् काँग्रेसमध्ये दाखल होण्याला संमति दिली; परंतु यामुळे आचार्य अत्रे अस्वस्थ बनले. विधानसभेंतील आमदारांच्या संख्येंत या ना त्या प्रकारानं वाढ करून मुंबई राज्याची सत्ता काबीज करण्याचीं स्वप्नं ते पहात होते. घटक-पक्षांपैकी कुणीहि समितीचा त्याग करूं नये यासाठी दबाव निर्माण करून समितीची एकजूट कायम राहील अशी खात्री ते देत राहिले. संयुक्त महाराष्ट्राची अधिकृत घोषणा होऊन महाराष्ट्र अस्तित्वांत आल्याचा आनंदोत्सव साजरा होण्यापूर्वी समितीचे ३० आमदार काँग्रेसमध्ये अधिकृतरीत्या दाखल होणार आहेत याची बिचारे अत्रे यांना कल्पनाहि शिवली नाही; पण तसं घडलं.

संयुक्त महाराष्ट्र प्रत्यक्षांत अस्तित्वांत येण्याची वेळ जवळ आली असतांनाच समितीमध्ये मतभेद होण्याचा आणखी एक प्रसंग निर्माण झाला. भारत आणि चीन यांच्या दरम्यान सीमेचा तंटा उपस्थित झाला होता. भारताच्या भूमीवर चीननं आक्रमण केल्यामुळे हा वाद निर्माण झाला असतांना समितीमधील कम्युनिस्ट पक्षाची, विशेषतः डांगे यांची

चीनला आक्रमक म्हणण्याची तयारी नव्हती. मॅक्-मोहन-रेषेचं समर्थन ते करत राहिले. समितीनं चीनच्या आक्रमणाविरुद्ध आवाज उठवला होता; परंतु याचा अर्थ चीनला आक्रमक ठरवून समिति चीनचा निषेध करत आहे असा नव्हे, असं डांगे यांनी सांगितलं. प्र. स. पक्ष आणि जयप्रकाशनारायण यांच्यावरहि त्यांनी टीका केली. त्यावरून या दोन्ही पक्षांत पुन्हा वादावादी झाली. त्यावर कम्युनिस्ट पक्ष आपल्या धोरणांत बदल करणार नसेल, तर प्र. स. पक्षाला कम्युनिस्टांबरोबर समितींत राहून काम करणं अशक्य ठरेल, असा इशारा स्वतः एस्. एम्. जोशी यांनीच दिला. असे वाद सतत होत राहिल्यानं अखेर समितीमधून बाजूला होण्याचा निर्णय प्र. स. पक्षाला करावा लागला.

दरम्यान १९५९ च्या डिसेंबरमध्ये गुजरात आणि महाराष्ट्र यांतील नेत्यांमध्ये, नव्या राज्यांच्या संदर्भांतील व्यवहाराबद्दल तडजोड झाली. त्यानंतर समितीला महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्नाव्यतिरिक्त अन्य कांही प्रश्न उरलाच नाही. यशवंतराव चव्हाण यांनी डांग, उंबरगाव आणि नंदूरबार तालुक्याचा कांही भाग, गुजरात राज्यांत समाविष्ट करण्याला अनुमति दिल्यानं समितीनं त्यास विरोध दर्शवला हें खरं. गुजरातची आर्थिक तूट भरून काढण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी नऊ सदस्यांची जी समिति नियुक्त करण्यांत आली होती त्याबाबतहि समितीनं टीका केली; परंतु आता कांही उपयोग नव्हता. मुख्य प्रश्न निकालांत निघाल्यानं, तपशिलाच्या प्रश्नावर समिति पूर्ववत् समर्थ बनवण्याची परिस्थिति आता उरली नव्हती; तसं वातावरणहि नव्हतं.

समितीचं ऐतिहासिक जीवन-कार्य आता बहुतांशीं पूर्ण झालेलं असल्यामुळे एक तर समिति बरखास्त करावी किंवा महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्नापुरतंच समितीचं कार्य मर्यादित करावं, असं प्र. स. पक्षाच्या नेत्यांचं मत होतं. याच वेळीं पुणें जिल्ह्यांतल्या बारामती लोकसभा मतदार-संघांत काँग्रेसचे उमेदवार गुलाबराव जेधे हे पोटनिवडणुकींत विजयी झाले आणि पश्चिम महाराष्ट्रांतील मतदारांच्या मनांत पूर्णपणें बदल झाला असल्याचं या निवडणुकीनं सिद्ध केलं. राजारामबापू पाटील हे तरूण तडफदार कार्यकर्ते त्या वेळीं महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसच्या अध्यक्षपदीं होते. मुंबई पालिकेंतहि महापौरपदाच्या निवडणुकींत समिति-उमेदवाराचा तेरा मतांनी पराभव झाला आणि महापौरपद हें काँग्रेस-पक्षानं हस्तगत केलं. प्र. स. पक्षाच्या आळंदी येथील बैठकींत, बदलत्या परिस्थितीचा विचार आणि जी चर्चा झाली त्यांतून प्र. स. पक्षानं समितींतून बाहेर पडण्यासाठी फक्त मुहूर्त ठरवण्याचंच तेवढं बाकी उरलं होतं हें स्पष्ट झालं.

सीमा-प्रश्नाच्या संदर्भांत समितीच्या सर्व आमदार-खासदारांनी राजीनामे द्यावेत अशी एक सूचना प्र. स. पक्षानं या दरम्यान पुढे केली; परंतु कम्युनिस्ट पक्षानं या सूचनेला उघड आणि जाहीरपणेंच विरोध केला. प्र. स. पक्षीय मंडळी समितीला राम-राम ठोकण्याची वाट पहात बसलीच होती. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला आणि अखेर पुढच्या पंधरा दिवसांतच त्यांनी समितीशीं काडीमोड केली. समिति-अंतर्गत सुरू असलेली सुंदोपसुंदी जनतेला समजलीच होती. त्यामुळे प्र. स. पक्षीय समितीमधून

बाहेर पडले याचं कुणालाहि आश्चर्य वाटलं नाही; किंवा या घटनेनं कुणाला धक्का बसला नाही.

संयुक्त महाराष्ट्रवादी काँग्रेस-जन त्यापूर्वीच माहेरीं गेले होते. प्र. स. पक्षीयांच्या मागोमाग किसान-मजदूर पक्षाचे सदस्य मोठ्या संख्येनं काँग्रेसमध्ये दाखल झाले. अन्य कांही घटक-पक्ष समितीच्या आश्रयाला राहिले; परंतु समितीचं स्वरूप सर्व विरोधी पक्षांची एक कणखर आघाडी, असं आता शिल्लक उरलं नव्हतं. समितीचा ताबा कम्युनिस्ट पक्षानं पूर्णपणें घेतला आणि सर्व सूत्रं याच पक्षाकडे गेलीं. समिति हें नांव पुढे कांही वर्षं रेंगाळत राहिलं; परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर काँग्रेस-पक्षाला आव्हान देणारी एक समर्थ-शक्ति म्हणून ती जनतेसमोर कधीच उभी राहूं शकली नाही. पक्षोपपक्षांनी समितीचं कुंकू आपल्याच हातानं एकदा पुसून टाकल्यानंतर १९६२ च्या निवडणुकींत जनतेनं त्यांच्या अंगावरील उरलेसुरले सौभाग्यालंकारहि काढून घेतले आणि त्यामुळे काँग्रेसचं मूळचं सौभाग्य आणखी तजेलदारच बनलं. जनतेनं याचं सारं श्रेय यशवंतराव चव्हाण यांच्या कर्तृत्वाला दिलं.

काँग्रेस-श्रेष्ठांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीची पूर्तता केल्यानंतर समितीचा ऱ्हास हा अटळ ठरला होता. त्यानुसार ध्येयपूर्तीनंतरच्या काळांत समिति निर्जीव बनली ही जरी वस्तुस्थिति असली, तरी काँग्रेस-श्रेष्ठांनी योग्य असा निर्णय करावा आणि महाराष्ट्राला न्याय मिळावा यासाठी समितीनं जें सामर्थ्य प्रगट केलं त्याचं महत्त्व कुणालाहि नाकारतां येणार नाही. संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त होण्याच्या काळांत, या चळवळींत एक मोठी पोकळी निर्माण होण्याची अवस्था प्राप्त झाली असतां संयुक्त महाराष्ट्र समितीनं ती पोकळी भरून काढली. जनतेंत निर्माण झालेल्या असंतोषाला वाट करून देण्याच्या दृष्टीनं, समितीनं सत्याग्रह, निदर्शनं या मार्गांची आखणी केली आणि अनेक संकटांवर मात करून हे उपक्रम यशस्वी करून दाखवले. निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करतांना, समिति-अंतर्गत घटक-पक्षांत वादविवाद जरी झाले, तरी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये प्रथम पश्चिम महाराष्ट्रांत आणि नंतर मराठवाड्यांतहि समितीनं नेत्रदीपक विजय संपादन केले आणि अखेरपर्यंत संयुक्त महाराष्ट्राची मागणी तार्जा ठेवली. महाराष्ट्रांतील जन-मताची दखल काँग्रेस-श्रेष्ठांना घ्यावीच लागेल यासाठी एकजुटीचा आणि कर्तृत्वाचा फार मोठा ठसा समितीनं उमटवला. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासांत समितीच्या या कार्याची नोंद कायमची झाली आहे.

महाराष्ट्रांतील संयुक्त महाराष्ट्र समितीचं पर्व, यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनाला व व्यक्तिमत्त्वाला एक वेगळा आकार देऊन गेलं. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत यशवंतरावांनी भाऊसाहेब हिरे यांनाच नेते म्हणून मान्य केलं होतं; परंतु आमदारांनी राजीनामे देऊन काँग्रेस-श्रेष्ठांवर दबाव आणण्याला हिरे यांचा प्रयत्न महाराष्ट्रांतील काँग्रेस-संघटनेला बाधक ठरेल असं यशवंतराव यांचं मत होतं. याच संदर्भांत हिरे आणि देव यांच्याशीं त्यांचे मतभेद झाले. तरी पण त्यांच्याशीं त्यांनी उभा

दावा मांडण्यावर कधी लक्ष केंद्रित न करतां, संघटना भक्कम करण्याचीच चिंता बाळगली. या संदर्भांत झालेले टीकेचे प्रहारहि त्यांनी सहन केले. राजीनामे देण्याच्या मार्गाचा अवलंब केल्यास लोकांच्या काँग्रेस-विरोधी भडकलेल्या भावना शांत होतील, असा हिरे आणि देव यांचा अंदाज होता; परंतु राजीनामे देऊन काँग्रेस-विरोधी समितीच्या गोटांत दाखल होण्याची कल्पना यशवंतरावांना मान्य नव्हती. महाराष्ट्रांत काँग्रेस-अंतर्गत उलटसुलट विचार होऊं लागतांच काँग्रेसाध्यक्ष ढेबरभाई यांची भेट घेऊन त्यांनी सल्लामसलत केली, आपला विचार पक्का केला आणि राजीनाम्याचा प्रश्न पुन्हा जेव्हा उपस्थित झाला त्या वेळीं राजीनामे सादर न करणारे काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्ते हेहि काँग्रेसनिष्ठच आहेत असा उल्लेख राजीनाम्याचा आदेश देणाऱ्या प्रदेश-काँग्रेसच्या ठरावांत करण्यांत यावा असं सुचवलं. काँग्रेसनिष्ठा व्यक्त करण्यासाठी राजीनामे दिले पाहिजेत हें त्यांना मंजूर नव्हतं आणि या प्रश्नावर हिरे आणि चव्हाण यांचा संयुक्त महाराष्ट्राच्या उद्दिष्टाकडे जाण्याचा मार्ग भिन्न झाला.

भिन्न झालेल्या मार्गानं वाटचाल करीतच यशवंतराव १९५६ सालांत द्वैभाषिकाच्या मुख्यमंत्रिपदापर्यंत पोंचले. भाऊसाहेब हिरे यांच्याविरुद्ध त्यांना सामना द्यावा लागला आणि त्यांत ते यशस्वी झाले ही वस्तुस्थिति असली, तरी मोरारजींविरुद्ध सामना देण्याचा प्रसंग निर्माण झाला नाही, ही गोष्ट अधिक महत्त्वाची मानावी लागते. स्वतः मोरारजी देसाई यांनीच मुख्यमंत्रिपदाची निवडणूक लढवायची असं ठरवलं असतं, तर मोठाच पेंच निर्माण होण्याची शक्यता होती. मोरारजी व चव्हाण यांचे संबंध त्या वेळीं परस्पर-सहकार्याचे होते; आणि मोरारजीहि बहुमतानं नेते बनण्याची घटना त्यामुळे अशक्य नव्हती; परंतु मोरारजींना एकमतानं नेते बनण्याची बुद्धि झाली, तोच आग्रह त्यांनी कायम ठेवला आणि त्याच वेळीं मोरारजी एकमतानं नेतेपदीं निवडले जाणार नाहीत, अशी भूमिका भाऊसाहेब हिरे यांनी स्वीकारली.

या सर्वांचा परिणाम यशवंतराव चव्हाण यांचं नेतृत्व महाराष्ट्रांत आणि देशांत स्थिर होण्यामध्ये झाला. नियतीचीच तशी योजना असली पाहिजे. महाराष्ट्र राज्य स्थापन व्हावं ही जनतेची इच्छा! महाराष्ट्राच्या भाग्योदयाचा तो क्षण येतांच पुरोगामी ध्येयवादानं प्रेरित झालेला प्रज्ञावंत तरुण नेता महाराष्ट्राला लाभावा ही योजना नियतीचीच. १९५७ च्या निवडणुकीनंतर यशवंतराव यांची पुन्हा नेतेपदीं झालेली निवड म्हणजे महाराष्ट्राचा भाग्योदय होणार याचं तें जणू शुभ-लक्षणच होतं.

महाराष्ट्र राज्य व्हावं अशी तीव्र इच्छा प्रत्येक महाराष्ट्रियाच्या अंतःकरणांत वसत होती. पण ती अपेक्षापूर्ती बरीच दुरावली होती. सर्वत्र निराशेचा अंधार पसरला होता. यशवंतराव चव्हाण अशा वेळीं महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदीं नसते, तर निराशेचा हा काळ आणखीहि वाढण्याची शक्यता होती. यशवंतराव हे धीराचे, दूरदर्शी, निश्चयी, त्यागी आणि राष्ट्रवादी नेते असल्यामुळे दृढ मनानं, दिशा अनुकूल करून घेऊन, ते पावलं टाकत राहिले. संयुक्त महाराष्ट्राचं उद्दिष्ट समोर ठेवूनच त्यांनी

द्वैभाषिक राबवण्याचा, तें यशस्वी करण्याचा शांतवृत्तीनं मनस्वी प्रयत्न केला; आणि मुंबईतल्या सर्व अल्पसंख्याक जाति-जमातींचा विश्वास संपादन केला. त्यांचं हृदय-परिवर्तन घडवून आणलं.

काँग्रेसचे वरिष्ठ नेते हें लक्षपूर्वक पहात होते. यशवंतरावांची उक्ति आणि कृति यांमध्ये मेळ होता. धाकधपटशानं सत्तेच्या जोरावर महाराष्ट्राला दाबून टाकण्याचं, आणि महाराष्ट्र जिंकला अशी दिल्लींत फुशारकी मारायची, तशी हवा निर्माण करायची, हा पूर्वीच्या मुख्य मंत्र्यांचा प्रयोग फसला होता. काँग्रेस-श्रेष्ठांनी तेंहि अनुभवलं होतं. मोरारजीभाई हे कर्तबगार शासक खरे, पण महाराष्ट्र त्यांना कधी उमजलाच नाही. 'नाठाळाचे माथीं हाणूं काठी' हें या मातीचं वैशिष्ट्य! तें समजून घेण्याचा प्रयत्न त्यांनी कधी केला नाही. असं असलं तरी यशवंतरावांना मात्र 'नाही तरी देऊं कासेची लंगोटी' ही भागवत धर्माची महाराष्ट्राला मिळालेली देणगी आहे याची पुरेपूर माहिती होती. महाराष्ट्राच्या सामाजिक मनाशीं ते मिळून-मिसळून गेलेले होते. मुख्य मंत्री झाल्यावर त्यांनी आपल्या अनुभवाची व्यवहाराशीं सांगड घातली. त्यासरशी राजवटींत झालेला बदल जनतेला तत्काळ जाणवला.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला अनंत अरिष्टं आलीं. किती तरी अडचणींनी अडवून धरलं होतं. यशवंतरावांनी सावधानतेनं, संयमानं, शांततेनं या चक्रव्यूहाचा भेद केला. राजकारणाचे पत्ते पिसतांना, डाव खेळतांना, आपले डाव हुकल्याचंहि त्यांनी कांही वेळेस दाखवलं. प्रतिस्पर्ध्यांना किंवा हितसंबंधियांना एकामागून एक डाव जिंकत असल्याचा आनंदहि मिळवून दिला. पण खरा राजकीय मुत्सद्दी आपल्या हातांतलीं सर्व पानं कधीच उघड करत नसतो. तो डाव खेळत रहातो, इतरांनाहि खेळण्यास सवड देतो; आणि नेमकी वेळ आली की, हुकमाचे पत्ते पुढे करून सारा डावच जिंकतो. इथे असंच घडलं.

१९५६ पासून १९६० पर्यंत यशवंतराव डाव जिंकण्याचं मनांत ठेवून मोठ्या धीरानं, सचोटीनं, धोरणीपणानं पावलं टाकत राहिल्यामुळे १९६० च्या एप्रिलमध्ये महाराष्ट्राला लागलेलं ग्रहण एकदाचं सुटलं.

# १६

राज्य-पुनर्रचना मंडळाच्या प्रचंड आंदोलनांत महाराष्ट्रांत 'यशवंत' पर्व हें खऱ्या अर्थानं १९५६ ला सुरू झालं. महाराष्ट्रासमोर आणि देशासमोर ते याच सालांत तरुण मुख्य मंत्री म्हणून प्रथम आले. पार्लमेंटरी सेक्रेटरी या नात्यानं १९४६ सालापासून खेर-मोरारजींच्या अमदानींत ते मुंबईच्या सचिवालयांत फायली पाहूं लागले होते हें खरं; परंतु त्यांच्या अंगच्या गुणांची आणि कर्तृत्वाची जाणीव, १९५२ मध्ये मोरारजींच्या मंत्रिमंडळांत मंत्रिपदावर ते आरूढ झाले तेव्हापासून होऊं लागली होती. मुख्य मंत्री मोरारजी देसाई यांनी यशवंतरावांकडे पुरवठाखातं सोपवलं आणि स्वतंत्र भारतांत मंत्रिपदावर ते प्रथमच आरूढ झाले होते.

मंत्र्याच्या हिमतीची, कार्यक्षमतेची, अचूक निर्णयाची कसोटी पुरवठा खात्याच्या कारभारानं लागावी अशीच त्या काळांतली परिस्थिति होती. अन्नधान्याची परिस्थिति अत्यंत बिकट, पुरवठाखात्याबद्दल जनतेंत तिरस्काराची भावना, रेशनिंग आणि अन्नधान्याच्या वाहतुकीवरील नियंत्रणं यांमुळे सरकाराविषयी लोकांच्या मनांत अप्रियता वाढलेली – अशी एकूण परिस्थिति होती. त्यामुळे नित्याच्या जीवनविषयक गरजांशीं संबंध असलेलं पुरवठाखातं, कर्तबगार आणि व्यवहारी मंत्र्याकडेच सुपूर्त केलं पाहिजे असा कदाचित् मोरारजींचा हिशेब असावा.

पार्लमेंटरी सेक्रेटरी या नात्यानं यशवंतरावांच्या कार्यक्षमतेचा अनुभव त्यांच्या संग्रहीं होताच, परंतु हें खातं सांभाळतांना पुरवठाखात्याबद्दल जनतेंतील तिरस्काराची भावना कमी करायची तर महाराष्ट्रांतल्या सामान्य माणसांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणं आणि अन्नधान्याच्या धोरणाबद्दल जनतेंत विश्वास निर्माण करणं याच दृष्टीनं यशवंतरावांना धोरण निश्चित करून त्याच्या अंमलबजावणीवर लक्ष केंद्रित करावं लागणार होतं. दिल्लीच्या धोरणाशीं सांधा जुळवला तरच हें घडण्याची शक्यता होती.

पुरवठाखात्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली किंवा त्यांच्यावर सोपवण्यांत आली, त्या वेळीं यशवंतराव हे अन्नधान्याच्या शास्त्रांत किंवा अर्थशास्त्रांत तज्ज्ञ मानले जात नव्हते. कारभारांतील कुशलताहि त्यांना अजून स्वतंत्रपणानं सिद्ध करायची होती आणि तरीहि, या महत्त्वाच्या खात्याची जबाबदारी त्यांच्यावर आली होती.

खात्याचीं सूत्रं स्वीकारतांच पुरवठाखात्यांतील गुंतागुंतीच्या व्यवहाराची कल्पना यशवंतरावांना येणं स्वाभाविकच होतं. त्या शास्त्रांतले ते पुस्तकी विद्वान् नव्हते, पण त्यांचं व्यवहारज्ञान पक्कं होतं. सामान्यांचं मन आणि व्यवहार जाणण्याची शक्ति त्यांच्या संग्रहीं अनुभवानं सिद्ध झालेली होती. लोकांच्या अपेक्षा ते ऐकत होते, समजून घेत होते. संघटनेंतच ते वाढलेले असल्यानं मनुष्यस्वभावाचं ज्ञान त्यांनी मिळवलं होतं. पुरवठा-खात्याची जबाबदारी पार पाडायची तर व्यवहार-बुद्धि हीच आपली तारक-शक्ति आहे हें त्यांनी निःसंशय जाणलं आणि मोठ्या सावधगिरीनं नव्या धोरणाच्या दिशेनं पावलं टाकण्यास प्रारंभ केला.

दिल्लींत केंद्र-सरकारांत त्या वेळीं रफी अहमद किडवाई यांच्याकडे अन्नधान्य-खातं होतं. हुषार तितकेच व्यवहारी म्हणून त्या वेळीं किडवाई यांची ख्याति होती. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल पं. नेहरूंच्या मनांत आदर होता. किडवाई यांनी नव्या धोरणाची आखणी करावी आणि पंडितजींनी त्यास होकार द्यावा, इतका परस्परांत विश्वास होता. किडवाई यांच्याकडे पूर्वी दळणवळणखातं असतांना त्यांनी आपली कार्यक्षमता तिथे चांगलीच सिद्ध केली होती. स्वतःकडे असलेल्या खात्याच्या विविध विभागांना अचानक भेटी देऊन वस्तुस्थितीची माहिती स्वतःच करून घ्यायची असा त्यांचा परिपाठ असे.

केंद्रीय अन्नधान्यखातं स्वीकारतांच त्यांनी अशीच वस्तुस्थिति जाणून घेतली. व्यापारीवर्गाची, त्यांच्या व्यवहाराची माहिती त्यांनी संपादन केली आणि व्यापाऱ्यांचं मनोगतहि समजून घेऊन धोरणाची व्यवहारी दिशा आखली. केंद्रस्थानीं आणि महाराष्ट्रांतहि त्याच खात्याला व्यवहारी दृष्टिकोन असलेले मंत्री लाभावेत हा एक योगायोग म्हणावा लागेल. परिस्थितीचं अचूक ज्ञान करून घेण्यांत आणि माणसांच्या स्वभावाची पारख करण्यांत किडवाई आणि यशवंतराव यांच्यांत विलक्षण साम्य असलेलं आढळतं. या दोघांच्या पहिल्या भेटींतच परस्परांत स्नेहाची भावना निर्माण होण्यापर्यंत यशवंतरावांनी मजल गाठली.

यशवंतराव हे वयानं लहान, परंतु पहिल्या भेटींतल्या चर्चेंतच किडवाईंच्या मनांत या तरुण मंत्र्याच्या कार्यक्षमतेबद्दल कांही आगळ्या अपेक्षा निर्माण झाल्या. नव्या धोरणाचा अंगीकार करून तें अमलांत आणण्याच्या दृष्टीनं यशवंतरावांना त्याचा मोठाच लाभ झाला. खात्याचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर एका वर्षांत या खात्याच्या कारभाराचा आणि एकूण व्यवहाराचा चेहरा-मोहरा यशवंतरावांनी बदलून टाकला, याचं मोठं श्रेय यशवंतरावांच्या व्यवहारीपणाला तर द्यावंच लागेल, पण त्याचबरोबर किडवाई यांच्या सहकार्याचा वांटा त्यामध्ये प्रमुख आहे, हें मान्य करावं लागेल.

महाराष्ट्रांत नव्या अन्यधान्य-धोरणाची अंमलबजावणी सुरू करण्याच्या दृष्टीनं यशवंतराव आणि किडवाई यांच्यामध्ये सातत्यानं चर्चा सुरू राहिल्या आणि त्यांतून नव्या धोरणाला निश्चित असा आकार आला. अन्नधान्यावर जीं नियंत्रणं होतीं तीं कायम ठेवायचीं, परंतु कोणत्याहि राज्य-सरकारला जादा धान्य असलेल्या राज्य-सरकार-कडून धान्यखरेदी करण्यास मुभा ठेवायची, असा केंद्र-सरकारनं धोरणात्मक बदल प्रथमपक्षीं केला. राज्य-सरकारांशीं वाटाघाटी करून हा निर्णय झाला, त्याचप्रमाणे राज्यांतील अन्नधान्यांवरील नियंत्रणं कांही प्रमाणांत कमी करण्यासहि परवानगी देण्यांत आली. केंद्राकडून एवढी सवलत मिळतांच यशवंतरावांनी त्या रोखानं भराभर निर्णय सुरू केले. हे निर्णय करतांना मध्यवर्ती सरकारच्या धोरणाशीं सुसूत्रता ठेवण्याची दक्षताहि त्यांनी घेतली.

त्या काळांत नियंत्रण-पद्धतींत कांही जाचक अटी होत्या. या नियंत्रणामुळे प्रामुख्यानं ग्रामीण जनतेचे हाल होत होते. त्यामुळे जाचक अटींचं निवारणं करून ग्रामीण जनतेला दिलासा देण्याचं काम यशवंतराव यांनी सर्वप्रथम सुरू केलं. एकूण धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनं तीस हजारांपेक्षा कमी लोकवस्ती असलेल्या लहान शहरांतून आणि खेड्यांत ज्वारी, बाजरी आणि मका यांवरील नियंत्रण दूर करण्याचं त्यांनी ठरवलं. मुंबई सरकारचं हें धोरण म्हणजे त्या काळांतील नियंत्रण-पद्धत आणि आंतर-राज्य निर्निबंधाबरोबर ज्वारी, बाजरी, मका अशा धान्यांवरील संपूर्ण निर्नियंत्रण यांतील समझोता होता.

यशवंतरावांनी २ डिसेंबर १९५२ ला हें नवं धोरण जाहीर करतांना धान्य-व्यापाऱ्यांनाहि योग्य ती समज दिली. किमती भरमसाट वाढणार नाहीत याकडे आणि साठेबाजी, नफेबाजी किंवा अन्य समाजविरोधी गोष्टी वाढणार नाहीत यांकडे सरकार कटाक्षानं लक्ष देईल, किंबहुना या गोष्टींना आळा घालण्यासाठी सरकार कसूर करणार नाही, असाहि इशारा दिला. भाववाढीच्या संकटापासून, कमी उत्पन्नाच्या माणसाचं संरक्षण करणं आवश्यकच होतं. सरकारचं तें कर्तव्यच होतं. त्यामुळे अन्नधान्यावरील नियंत्रण कमी करण्याचं धोरण जाहीर करत असतांना, किमती निष्कारण वाढत असल्याचं आढळल्यास पुन्हा नियंत्रणं बसवण्यांत येतील असंहि त्यांनी बजावलं.

यशवंतरावांनी हें धोरण जाहीर करतांना चतुरस्र दृष्टि ठेवली. हें नवं धोरण त्यांना यशस्वी करायचं असल्यामुळे सर्वांचं सहकार्य मिळवून आणि विश्वास संपादन करूनच या धोरणाची अंमलबजावणी त्यांना करावी लागणार होती. त्यासाठी त्यांनी टीकाकार आणि अर्थशास्त्रज्ञ यांनाहि आवाहन केलं आणि त्यांनी थोडं दमानं घेऊन सरकारनं नव्यानं स्वीकारलेल्या धोरणाला यश देण्यासाठी पोषक वातावरण निर्माण करावं असं आवाहनहि केलं. धान्य पिकवणाऱ्यांच्या आणि व्यापाऱ्यांच्या सद्भावनेवरच सारं कांही अवलंबून असल्यामुळे या वर्गानंहि राष्ट्रीय सद्भावना जागृत ठेवावी, असा सल्ला

त्यांनी दिला. कारण या वर्गानं मोकळेपणानं अन्नधान्याचा पुरवठा करण्यावरच नव्या प्रयोगाचं यश अवलंबून होतं.

या आवाहनानंतर यशवंतरावांनी तांदळाखेरीज अन्य सर्व धान्यांवरील नियंत्रणं क्रमाक्रमानं दूर केलीं. कापड, रॉकेल, साखर या वस्तूहि नियंत्रणांतून बाजूला केल्या. गव्हावरील नियंत्रणं सैल केलीं, शेतकरी व ग्राहक यांच्यावरील जाचक बंधनंहि रद्द केलीं. परिणामीं बाजारांत धान्याचे ढीग जमा होऊं लागले आणि मुंबई राज्य रेशनिंग-युगांतून सहीसलामत बाहेर पडलं. क्रमशः नियंत्रणं दूर करण्याच्या मुंबई सरकारच्या या धोरणानं चांगलंच यश संपादन केलं आणि जनतेनंहि या धोरणाचं मनमुराद स्वागत केलं.

पुरवठाखात्याचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर यशवंतरावांनी व्यवहारीपणानं आणि आत्मविश्वासानं हालचाली केल्याचा हा इष्ट परिणाम होता. राज्यांतील जनतेला त्यांनी आता बिगर रेशनिंग-काळांत पोंचवलं होतं. कांही नियंत्रणं गेलीं होतीं आणि कांही शिल्लक होतीं; परंतु त्या पुढच्या हंगामापर्यंत उरलींसुरलीं नियंत्रणंहि निघून जातील असा दिलासा ते देत राहिले. देशांत भरपूर धान्य-उत्पादन व्हावं आणि देश अन्न-धान्याच्या दृष्टीनं स्वयंपूर्ण बनावा असा प्रयत्न पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सुरू झालेलाच होता. त्या प्रयत्नांचा परिणाम होऊन देशांत भरपूर धान्य-उत्पादन झालं आणि त्यामुळे नियंत्रणं आपोआपच नाहीशीं होऊं लागलीं. पुरवठाखातं बंद करावं लागलं नाही तर मला आश्चर्य वाटेल, असंहि यशवंतरावांनी नियंत्रण-काळाचा आढावा घेतांना एका प्रसंगीं सांगितलं.

नव्या धोरणाबद्दल त्यांना केवढा आत्मविश्वास होता, याचंच हें द्योतक होय. यशवंतरावांचा हा विश्वासच अखेर खरा ठरला. कारण पुढे वर्षअखेरीस पुरवठाखातं गुंडाळण्यास सुरुवात झाली, तें गुंडाळलं गेलंहि. मंत्रिपद स्वीकारून यशवंतरावांनी कारभार-कुशलतेचा ठसा प्रारंभींच्या काळांतच अशा प्रकारे राज्यावर कायमचा उमटवला. पुरवठाखात्याच्या जबाबदारींतून ते स्वतःहि मुक्त झाले अन् राज्य-सरकारलाहि मुक्त केलं. हें घडवून आणण्यांत सामाजिक न्यायाचं तत्त्व अनुस्यूत होतं. लोकशाही समाज-वादाची निर्भेळ दृष्टीहि त्यामध्ये होती.

रेशनिंग हें सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचं सूचक असून, जीवनविषयक गरजांच्या वस्तूंचं वांटप करतांना माणसामाणसांतील, गरीब आणि श्रीमंत अशी विषमता मानली जात नाही, असाच या रेशनिंगचा अर्थ मुंबई राज्यांतील जनतेला अभिप्रेत आहे, असं यशवंतराव यांनी किडवाई यांच्याशीं चर्चा करतांना स्पष्ट केलं होतं. समाजांत फार मोठा गोंधळ निर्माण न होतां माणसामाणसांतील विषमता गेली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष होता. रेशनिंगमुळे हें तत्त्व कायमचं रुजलं, परंतु नियंत्रणं दूर करत असतांना, ग्राहकांना त्यांच्या गरजा समाधानकारकरीत्या पूर्ण होतील आणि त्याचबरोबर धान्य-उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांनाहि, त्यांच्या उत्पादनाला योग्य किंमत मिळेल आणि अधिक

उत्पादनासाठी ते उत्साहित होतील:असं वातावरण निर्माण करावं लागणार आहे हाहि आपला मनसुबा त्यांनी किडवाईपर्यंत पोचविला.

दिल्लींतल्या चर्चेमध्ये, पुरवठाखात्याच्या एकूण कारभाराबद्दलचा आणि धोरण-विषयक दृष्टिकोन यशवंतराव यांनी व्यक्त करतांच किडवाई यांच्या मनांत यशवंतरावांच्या दूरदृष्टीविषयी आदराची भावना निर्माण झाली. त्यांतूनच पुढे सरकारनं हळूहळू यशवंत-रावांच्या धोरणाचा पुरस्कार केला आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन त्यांच्याकडून लेव्ही-पद्धतीनं धान्य खरेदी करण्याच्या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. या धोरणाचा अंगीकार करूनच किडवाईमहाशयांना धान्याचा मोठ्या प्रमाणांत राखीव साठा तयार करण्यांत यश मिळालं. निर्नियंत्रणाच्या टीकाकारांचीं तोंडं त्यामुळे बंद झालीं आणि निर्नियंत्रणं दूर करण्यामधील सरकारचं यशहि उजळून निघालं. या श्रेयाचा मोठा हिस्सा अर्थातच यशवंतरावांचा होता.

पुरवठाखात्याच्या अस्तित्वालाच यशवंतरावांनी अशा प्रकारे पूर्णविराम दिल्यानंतर त्यांच्याकडे स्थानिक स्वराज्य, जंगल आणि विकास या खात्यांची संयुक्त जबाबदारी मोरारजींनी सोंपवली. या खात्यांचीं सूत्रं स्वीकारतांच तिथल्या समस्यांचाहि मूलभूत विचार करून धोरणविषयक सूत्री त्यांनी प्रथम तयार केली. कारभारविषयक धोरण निश्चित करणारांना मार्गदर्शन लाभावं आणि धोरणांची अंमलबजावणी करणारांनाहि त्यांचा उपयोग व्हावा, अशा दुहेरी हेतूनं त्यांनी ही सूत्री बनवली.

नगरपालिका, लोकलबोर्ड आणि ग्रामपंचायती या संस्था राजकारणाचे अड्डे बनले होते. कराच्या रूपानं उत्पन्नांत वाढ करण्यास स्थानिक स्वराज्य संस्था राजी नव्हत्या. खर्चांत:मात्र बेसुमार वाढ सुरू होती. गैरवाजवी प्रश्नांवर चर्चा करत राहून निष्कारण वेळ दवडायचा आणि हीन प्रतीच्या राजकारणावर बुद्धि खर्च करायची हें नित्याचंच झालं होतं. हे सर्व दोष कमी करून या सर्व संस्थांना ताळ्यावर आणण्याचं मोठं जिकीरीचं काम यशवंतरावांना त्या काळांत करावं लागलं.

ग्रामपंचायती आणि त्यांचं संघटन यांवर त्यांनी सर्वप्रथम आपलं लक्ष केंद्रित केलं. महाराष्ट्रांत हजारो खेडीं असल्यामुळे ग्रामपंचायतींचा विस्तारहि मोठा आहे. ग्रामपंचायत हा लोकशाहीचा पाया असल्यानं या संस्था केवळ खेडेगावचा नागरी कारभार चालवणाऱ्या यंत्रणा न रहातां त्यांच्यावर आपल्या गावांतील समाज-जीवनाचं सर्व तऱ्हेचं कल्याण करण्याची जबाबदारी आहे अशी यशवंतरावांची ग्रामपंचायतींच्या कामाबद्दलची मूलभूत धारणा. मुंबई राज्य ग्रामपंचायत संघाची स्थापना १९५४ मध्ये यशवंतरावांनी आपल्या सहकाऱ्यांच्या साहाय्यानं केल्यानंतर, ग्रामपंचायतींमध्ये काम करणाऱ्यांच्या मनावर हा मूलभूत विचार बिंबवण्याचं कार्य त्यांनी सुरू केलं.

१९५५ च्या ऑगस्टमध्ये पुण्याला या संघाचं एक अधिवेशन झालं. या अधि-वेशनाच्या उद्घाटनाच्या वेळीं यशवंतरावांनी ग्रामपंचायतीबाबतची सरकारची भूमिका स्पष्ट केली. मोठमोठ्या ग्रामपंचायतींकडे सारा-वसुलीच्या कामाची जबाबदारी सोंपवावी

आणि ग्रामपंचायतींच्या चिटणिसांनी पंचवार्षिक योजनेंतील विविध विकास-कामांचा फायदा आपल्या गावास मिळवून देण्याच्या दृष्टीनं अधिकाधिक प्रयत्नशील रहावं अशी सरकारची इच्छा असल्याचं त्यांनी सांगितलं. त्याचबरोबर पंचायतीच्या सभासदांनी व अधिकाऱ्यांनी स्वतःच्या हितापेक्षा सामाजिक हितास अधिक प्राधान्य देण्याची गरजहि त्यांनी प्रतिपादन केली. ग्रामपंचायतीचं जें मूळ ध्येय, त्याचीच पूर्तता करण्यांत सभासद यश मिळवणार नसतील, तर पंचायतींना केवळ अधिक सत्ता आणि महसूलाचा वांटा देण्यांत हशील नव्हतं. ग्रामपंचायतींनी नागरी जीवनाच्या सुखसोयी पहाण्यापुरतंच आपलं कार्य मर्यादित न करतां ग्रामीण जीवनाच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी झटावं अशी त्यांची अपेक्षा होती.

स्थानिक स्वराज्याचा घटक एवढीच पंचायतीची भूमिका नसून ती लोकशाही-यंत्रणेचा पाया आहे; परंतु पंचायतीचा कारभार यशस्वी होण्याच्या आड दोन-तीन गोष्टी प्रामुख्यानं होत्या. अपुरा फंड हें तर एक कारण होतंच, शिवाय योग्य पुढारी-पणाचा अभाव आणि परस्परांत जुळतं न घेण्याची सभासदांची भावना हें प्रमुख कारण असायचं. गावांतील भांडणं कमी करून आणि विधायक दृष्टि असलेल्या चांगल्या पुढाऱ्यांची निवड करून पंचवार्षिक योजनेच्या यशाचा वांटा पंचायतींनी प्रामुख्यानं उचलावा आणि योजनांद्वारा प्राप्त होणाऱ्या संधीचा पुरेपूर लाभ घेण्याचं कर्तव्य त्यांनी बजावावं असं यशवंतराव सांगत राहिले.

पंचायतींकडून हें सारं घडायचं तर त्यांना अधिक सत्ता आणि आर्थिक मदत उपलब्ध करून देण्याची गरज होती. त्यासाठी एक स्वतंत्र विधेयक आणण्याची तयारीहि यशवंतरावांनी सुरू केली. पंचायत समितीच्या चिटणिसांचं एक 'केडर' बनवावं असा त्यामागचा आणखी एक हेतु होता. या विधेयकामुळे ग्रामपंचातींना नवं रूप प्राप्त होणार होतं. स्थानिक स्वराज्य-मंत्री असतांना हे विचार ते बोलंत होते, परंतु या ना त्या कारणासाठी, आपल्या मंत्रिपदाच्या कारकीर्दीत तसं विधेयक आणणं यशवंतरावांना शक्य झालं नाही; परंतु त्यांनी हा विचार सोडला नव्हता. ग्रामीण भागांतील बहुसंख्य लोकांच्या जीवनांत सुधारणा घडवण्याची शक्ति या विधेयकानं प्राप्त होणार होती. अखेर या स्वरूपाचं विधेयक तीन वर्षांनंतर आणलं गेलं. यशवंतराव त्या वेळीं मुख्य मंत्री झाले होते. त्यांच्याच नेतृत्वाखाली तयार झालेल्या मंत्रिमंडाळानं हें विधेयक आणलं आणि त्यामुळे पंचायतींच्या कारभाराचा नवा अध्याय राज्यांत सुरू झाला.

ग्रामपंचायतींचं कार्यक्षेत्र विशाल स्वरूपाचं असल्याची जाणीव तर त्यांनी संबंधितांना करून दिलीच; शिवाय कारभारांतील प्रत्यक्ष अडचणी आणि त्यांतून काढायचा मार्ग या संबंधांतहि वेळोवेळीं मार्गदर्शन केलं. ग्रामसुधारणा व ग्रामकल्याण याबाबतच्या कार्यक्रमांत यामुळे ग्रामीण जनता पुढाकार घेण्यासाठी आणि सरकारला सहकार्य करण्यासाठी एक नवा दृष्टिकोन बाळगून पुढे सरसावली.

सामूहिक विकास-योजना सुरू झाल्यापासून ग्रामीण विभागांतील जनतेंत स्वावलंबनाची वृत्ति वाढीस लागली होती. विकासकार्याबाबत उत्साह प्रगट होऊं लागला होता. त्यामुळे स्थानिक गरजांबाबत त्वरित निर्णय करणं आणि कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा वेग वाढवणं आवश्यक ठरलं. राज्यांतील ग्रामीण विकास-कार्याशीं संबंधित असलेल्या विविध संस्थांची पुनर्घटना सद्यःस्थितीशीं सुसंगत कशी करावी, की ज्यायोगे त्या संस्थांवर ग्रामीण विकास-कार्याची अधिकाधिक जबाबदारी सोपवता येणं शक्य होईल! कार्यपद्धतींत अधिक वेग आणि कार्यक्षमता आणतां येईल या दृष्टीनं मग यशवंतरावांचं विचारचक्र सुरू झालं.

राज्य आर्थिकदृष्ट्या अप्रगत असल्यानं या संस्थांनी सेवा-वृत्तीनं काम करावं हा विचार लोकांच्या मनावर कुशलतेनं बिंबवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सेवा-वृत्तीनं काम करणारी मंडळी राज्यांत कमी नव्हती. त्यांना काम करण्याची संधि देण्याचा प्रश्न होता. जनहिताला पोषक असं कार्य या व्यक्तींकडून आणि लोकशाही संघटनांकडून व्हायचं तर त्यांना तांत्रिक सल्ला आणि मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची गरज होती. यशवंतरावांनी त्या दिशेनं धडाडीनं पावलं टाकण्यास प्रारंभ केला. सत्तेचं विकेंद्रीकरण राज्यांत थोडंफार झालेलंच होतं. जिल्हा व त्याखालच्या पातळीवरील लोकशाही संस्थांना त्यांच्या विभागांत विकास-योजनांबाबत अधिक सत्ता व जबाबदाऱ्या सोपवण्याच्या विचाराला — सत्तेच्या विकेंद्रीकरणाला — त्यांतूनच पुढे वेग आला हें उघड आहे.

ग्रामपंचायतींप्रमाणेच नगरपालिकांच्या कारभारालाहि त्यांनी या काळांत नवी दिशा प्राप्त करून दिली. हें करतांना स्वतः यशवंतरावांनी युरोप, अमेरिका यांसारख्या पाश्चात्त्य राष्ट्रांतील स्थानिक स्वराज्य-संस्थांच्या कारभाराचा अभ्यास केला. उपलब्ध ग्रंथांचं वाचन करत असतांना भारतांतील परिस्थितीला अनुरूप असा कोणता बदल इथल्या कारभारांत करतां येणं शक्य आहे, किंबहुना एखादी नवीन पद्धतच सुरू करतां येईल काय, याविषयीहि त्यांचं चिंतन सुरू राहिलं.

आपल्यासमोरच्या समस्यांचा मूलभूत विचार करायचा, प्रत्येक समस्येच्या अंगोपांगांचा अभ्यास करायचा, मनन-चिंतनांतूनच निर्णयाप्रत यायचं, हा यशवंतरावांचा स्वभावच बनलेला असल्यानं, घाईगर्दीनं भावनेवर स्वार होऊन निर्णय करणं किंवा लोकांची वाहवा मिळवण्यासाठी तशा आशयाच्या घोषणांची खैरात करत रहाण्याचं पुढारीपणाचं कसब त्यांना आत्मसात करतां आलेलं नसावं.

स्थानिक स्वराज्यखातं स्वीकारल्यानंतर नगरपालिकांचं एक शिष्टमंडळ त्यांच्या भेटीसाठी आलं. गलिच्छ वस्त्यांच्या निर्मूलनासाठी सरकारनं मदत करावी ही मागणी शिष्टमंडळानं मंत्र्यांसमोर ठेवली. चर्चेच्या वेळीं, गलिच्छ वस्त्यांचं उच्चाटन करणं हें अतिशय महत्त्वाचं काम आहे, असं यशवंतरावांनी मान्य केलं. शिष्टमंडळाला धीर आला. तें काम महत्त्वाचं तर होतंच आणि मंत्र्यांनी या प्रश्नाचा अभ्यासहि केला होता. गलिच्छ वस्त्या आहेत त्या स्थितींतच ठेवाव्यात किंवा त्या वाढूं द्याव्यात असा

सल्ला कोणताच मंत्री देणं शक्य नाही. गलिच्छ वस्त्यांचं उच्चाटन तर करावंच लागेल, परंतु अस्तित्वांत असलेल्या वस्त्यांचं उच्चाटन केल्यानं ही समस्या निरंतरची निकालीं निघूं शकते का, याचा विचार यशवंतरावांनी केला होता. त्यामुळे कसलाहि आडपडदा न ठेवतां किंवा गुळमुळीत आश्वासन न देतां शिष्टमंडळासमोर आपली भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

गलिच्छ वस्त्यांचं उच्चाटन करणं हें तर महत्त्वाचं काम आहेच, परंतु त्याचबरोबर गलिच्छ वस्त्या निर्माण होण्याचीं व त्या वाढण्याचीं कारणं अधिक महत्त्वाचीं असल्यानं तीं कारणं दूर करण्याला अग्रक्रम द्यावा लागेल, असं त्यांनी शिष्टमंडळाला सांगितलं. आर्थिक मदत मिळवण्यासाठी शिष्टमंडळ आलं होतं; पण आर्थिक मदतीचा विनियोग नेमका कशासाठी करायचा हा विचार बिंबवण्यांत यशवंतरावांनी यश मिळविलं.

नगरपालिकांच्या कारभाराबाबत त्या काळांत ज्या परिषदा झाल्या तिथेहि यशवंतरावांनी मोकळेपणानं चर्चा करून कारभार सुधारण्याच्या दृष्टीनं मार्ग शोधण्याचं आवाहन केलं. नगरपालिकांच्या अंतर्गत कारभारांत सरकारला हस्तक्षेप करायचा नाही किंवा कारभारावर अकारण टीकाहि करायची नाही, असा दिलासा देतांना, कर-चौकशी मंडळाच्या शिफारसीनुसार नगरपालिकांनी प्रत्यक्ष कर बसवण्याचं धैर्य दाखवलं पाहिजे याची जाणीवहि त्यांनी करून दिली. शक्तीचा अपव्यय आणि चुका टाळण्यासाठी कार्यकर्ते आणि अधिकारी यांनी एकत्र येऊन काम करण्याचा त्यांचा सल्ला होता. नगरपालिकांनी महत्त्वाच्या प्रश्नांना अग्रक्रम द्यावा आणि समस्यापूर्तीसाठी प्रसंगीं स्थानिक बिगर राजकीय कार्यकर्त्यांचं सहकार्य मिळवावं, अशी एक नवी प्रथा त्यांनी आपल्या कारकीर्दीत राज्यांत सुरू केल्यानं, नगरपालिकांच्या क्षेत्रांतहि कांही नवं वातावरण निर्माण झालं आणि लोकांनाहि त्याची प्रचीति येऊं लागली.

संयुक्त जबाबदाऱ्यांपैकी जंगल (फॉरेस्ट) खात्याची जबाबदारीहि या काळांत यशवंतरावांकडेच होती. वनमहोत्सवाचा जमाना त्यापूर्वीच सुरू झालेला होता आणि लोकांच्या दृष्टीनं वनमहोत्सव हा एक चेष्टेचा विषय बनूं लागला होता. वनांचं संरक्षण आणि वन्य पशुपक्ष्यांचं संरक्षण याकडे पहाण्याची यशवंतरावांची दृष्टि मानवी होती. जंगलांची वाढ करणं आणि त्यांचं संरक्षण करणं याचा धागा त्यांनी मानवी जीवनाशीं जोडला.

अन्नधान्याची स्वयंपूर्णता राष्ट्रीय योजनेंत कायम टिकवायची असेल तर जंगल-संपत्तीचं काळजीपूर्वक संरक्षण करून, वाढहि केली पाहिजे यावर त्यांनी भर दिला. वृक्षांची लागवड करतांना निवड कशी करावी यावरहि त्यांचा कटाक्ष होता. ग्रामीण भागांत जळणासाठी शेणाचा उपयोग मोठ्या प्रमाणांत केला जातो. जळणासाठी खर्चीं पडणाऱ्या शेणाची बचत करून त्याचा शेतीस खतासाठी अधिक उपयोग करायचा, तर जळणासाठी उपयुक्त ठरणाऱ्या वृक्षांची लागवड अधिक प्रमाणावर करण्याचा नवा दृष्टिकोन समजावून सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. वनमहोत्सवाची भारताची जुनी सांस्कृतिक

परंपरा असून ग्रामीण भागांतील परंपरागत वृक्ष-पूजेची आठवणहि त्यांनी ताजी ठेवली आणि राज्यांत वृक्षराजी वाढण्याच्या योजनेला त्यांतून चांगलीच चालना मिळाली.

अस्तित्वांत असलेल्या जंगल-संपत्तीला संरक्षण देतांना, जंगलाच्या आश्रयानं वस्ती करणाऱ्या वन्य-पशुपक्ष्यांचं संरक्षण होण्यासाठी त्यांनी कायदेशीर उपाय-योजना केली. वन्य-पशुपक्ष्यांचं संरक्षण करण्याच्या दृष्टीनं कायदे करणारं मुंबई राज्य हें त्या काळांत पहिलं राज्य ठरलं. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी यशवंतरावांनी कारभार-यंत्रणाहि स्थापन केली. शिकाऱ्याजवळ परवाना असल्याशिवाय कोणत्याहि वन्य पशूची किंवा पक्ष्याची शिकार करतां येणार नाही, असा या कायद्याचा दंडक होता. वन्य-पशूंसाठी आश्रयस्थानं निर्माण करण्याची तरतूदहि या संरक्षणविषयक कायद्यांत करण्यांत आली.

वन्य-पशुपक्षी क्रूर असले तरी मानवाला मात्र ते उपयोगी पडतात आणि मानवाबरोबर सहजीवन जगण्याची कला त्यांना अवगत असतेच. मानवाचं जीवन समृद्ध करण्यांतहि त्यांचा हातभार लागतो. साप विषारी खरा, पण तोच रानांतले उंदीर मारून पिकांचा बचाव करतो. वाघ रानडुकरांना मारून पीक वांचवतो. चित्ता माकडांचा बंदोबस्त करतो, असं यशवंतराव समर्थन करत होते.

मानवी जीविताला व मालमत्तेला हानिकारक ठरलेल्या प्राण्यांची शिकार करण्यास मात्र तसा परवाना धारण करण्याच्या अटीवर त्यांनी मोकळीक ठेवली. 'वाइल्ड लाइफ प्रिझर्व्हेशन' अधिकाऱ्यास असे परवाने देण्याचा अधिकार या कायद्यांत नमूद करण्यांत आला. जंगली प्राण्यांचं संरक्षण करा हा एक साधा विचार लोकांच्या मनावर ठसवण्या-साठी त्यांनी त्याला मानवतेचा साज चढवला. सहजीवन जगण्याची कला वन्य-पशूंनाहि अवगत असते असं सांगतांना, राज्याचा गाडा सरळ मार्गावरून चालण्याच्या दृष्टीनं, माणसामाणसांत तर सहजीवन अधिक शक्य आहे याबद्दलची त्यांना जाणीव करून द्यायची असावी.

जंगली प्राण्यांना खऱ्या किंवा भ्रामक भीतींतून स्वतःचं संरक्षण करणं भाग पडतं. माणसामाणसांतहि कधी कधी असं घडतं. संघटनेंत आणि सामाजिक क्षेत्रांत काम करतांना असे अनुभव यशवंतरावांच्या संग्रहीं जमा झालेले होतेच. योग्य संधि मिळतांच हें गाठोडं सोडून त्यांतील एक एक चिजा कमी करण्याचा आणि त्याच त्या गोष्टींची वाढ होत रहाणार नाही यासाठी निश्चित स्वरूपाचे निर्णय करण्याचा पायंडा त्यांनी आपल्या खात्याच्या कारभारांत पाडलेला आढळतो.

१९४६ मध्ये पार्लमेंटरी सेक्रेटरीपदाच्या रूपानं यशवंतरावांचं नेतृत्व मुंबईत पोंचलं होतं. १९५२ सालीं त्यांच्याकडे मंत्रिपद आल्यानंतर महाराष्ट्राच्या पातळीवर तें नेतृत्व क्रमाक्रमानं वृद्धिंगत होऊं लागलं; आणि त्यानंतरच्या चार वर्षांत म्हणजे १९५६ पर्यंत प्रशासकीय गुणांनीहि तें उजळून निघालं. पुरोगामी, ध्येयवादी प्रशासक असा त्यांचा सर्वत्र नांवलौकिक वाढला.

प्रशासकीय पातळीवर हें समाधान असलं तरी, राज्यांतील राजकीय क्षितिजावर मात्र:त्या काळांत तप्त लाव्हा रसाचे लोट वहात होते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ शिगेला पोंचली होती, संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचं वादळ सर्वत्र घोंगावत होतं. शासकीय क्षेत्रांतील विधायक बदलाची पोंच-पावती देण्यास आणि ती तशी स्वीकारण्यास कोणाचंच चित्त शांत नव्हतं. निरनिराळ्या पातळीवर चर्चा, वाटाघाटी झडत राहून विविध पर्याय पुढे येत आणि विरघळून जात. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला अन्य कांही पर्याय:असूं शकतो हेंच मुळी राज्यांतील जनतेला मान्य नव्हतं. मराठीच्या एकभाषी संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति या एकाच मागणीसाठी अवघा महाराष्ट्र जिवंत होऊन खडा राहिला असतांनाच १९५६ मध्ये द्वैभाषिक राज्याचे वारे दिल्लीहून सुटले आणि ते महाराष्ट्रांत पोंचले. त्यासरशीं महाराष्ट्रांत खळबळ उडाली. या नव्या पर्यायाचे मूठभर प्रवर्तक वगळतां, अन्य कुणालाच तो मान्य नव्हता. यशवंतरावांनी मोठ्या नाखुषीनंच द्वैभाषिकाची कोयनेलची गोळी घशाखाली सोडली होती. दिल्लीकरांनी मोरारजीभाईंना विश्वासांत घेऊन द्वैभाषिकाचा अंतिम निर्णय केलेला नसल्यानं तेहि नाखूष होते.

अशाच अवस्थेंत ३ ऑक्टोबर १९५६ ला मुंबई राज्य विधानसभेचं अखेरचं अधिवेशन सुरू झालं. महाद्वैभाषिक राज्य निर्माण करण्याच्या दृष्टीनं घटनेंत करायच्या दुरुस्तीस विधानसभेला मान्यता द्यावी लागणार होती. विधानसभेंत दि. ६ ऑक्टोबर-पासून घटना-दुरुस्तीवर चर्चा सुरू होतीच. द्वैभाषिक मुंबई राज्याचा निर्णय घाईनं करण्यांत आल्याबद्दल विरोधी पक्षांनी कठोर टीका करून सरकारला दोष दिला. या निर्णयामागे कोणतंहि तत्त्व नाही व तो लोकशाहीविरोधी आहे, असं एस्. एम्. जोशी यांनी मत व्यक्त केलं. मुख्य मंत्री मोरारजी देसाई यांनी या चर्चेची संधि साधून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळ्यांना दोष देऊन कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचं कर्तव्य पार पाडण्यासाठी चळवळीच्या काळांत मेअखेरपर्यंत काय काय घडलं याची अधिकृत वाच्यता केली.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीबाबत ज्या ३१०९२ इसमांना अटक करण्यांत आली त्यांत ४३ वकील होते, असं त्यांनी विधानसभेला सांगितलं. १९४४५ लोकांवर खटले भरले आणि त्यांतील १८४१९ लोकांना कैदेची शिक्षा झाली. राज्य-पुनर्रचनेच्या संबंधांतील दंगलींत ५३७ वेळा गोळीबार करण्यांत आला, असा हिशेब सादर करतांना त्याचं समर्थन करण्याचीहि संधि घेतली. मोरारजींचं समर्थन असं की, हिंसेला अहिंसेनं तोंड देतां येत नाही. हिंसा करणारांना हिंसेनंच उत्तर द्यावं लागतं. सरकारचं तें कर्तव्यच आहे. मुंबईत दंगलखोरांनी ५०० दुकानं लुटलीं, ८० ट्रॅमगाड्यांची व २०० बसगाड्यांची मोडतोड केली आणि अन्य सरकारी व सार्वजनिक माल-मत्तेचंहि मोठ्या प्रमाणावर नुकसान केलं. महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा वारसा सांगणारे मोरारजी 'हिंसेला हिंसेनंच उत्तर द्यावं लागतं' असं आपल्या गोळी-बाराचं समर्थन करूं लागतांच विरोधी पक्षांनीहि त्यांची चांगलीच हजेरी घेतली. घटना-दुरुस्तीवर तीन दिवस उलटसुलट चर्चा झाल्यानंतर दि. ९ ऑक्टोबरला १४४ अनुकूल

व २७ विरुद्ध असं मतदान होऊन विधानसभेनं घटनेंत करायच्या दुरुस्तीला अखेरं मंजुरी दिली.

घटना-दुरुस्तीला मंजुरी मिळाल्यानंतर महाराष्ट्र काँग्रेस-अंतर्गत, विधानसभेचा नवा नेता निवडण्याच्या हालचालीला वेग आला. महाद्वैभाषिक राज्य १ नोव्हेंबर १९५६ ला अस्तित्वांत यायचं होतं. त्यापूर्वी नेता-निवडीचं सर्व सव्यापसव्य पूर्ण करणं आवश्यक ठरलं. त्यानुसार दि. १६ ऑक्टोबरलाच जुन्या मुंबई राज्यांतील सौराष्ट्र, कच्छ, वऱ्हाड, मराठवाडा इथल्या आमदारांची संयुक्त बैठक होऊन, यशवंतरावांच्या नेतृत्वावर ३३३ मतांनी शिक्कामोर्तब करण्यांत आलं. नेतेपदाच्या शर्यतींतून मोरारजींनी माघार घेतली आणि भाऊसाहेब हिरे यांना १११ मतं मिळाल्यानं ते पराभूत झाले.

यशवंतराव कराड येथून मुंबईत पोंचले. त्यानंतरचं पहिलं दशक नुकतं कुठे पूर्ण होत होतं. मुंबईच्या वास्तव्यांतील दुसऱ्या दशकाच्या प्रारंभींच अशा प्रकारे महाराष्ट्राच्या नेतृत्वपदीं ते विराजमान होण्याचा चमत्कार घडला. मुख्यमंत्रिपदाच्या महाराष्ट्रांतील आपल्या सहा वर्षांच्या कारकीर्दीत यशवंतरावांनी विविध पातळीवर जे अनेक चमत्कार दाखवले त्याचा शुभारंभ या पहिल्या चमत्कारानंच झाला.

# १७

वस्तुतः यशवंतराव हे संयुक्त महाराष्ट्राचे कट्टे पुरस्कर्ते. असं असूनहि विशाल द्वैभाषिक त्यांनी स्वीकारलं; इतकंच नव्हे तर तें चालवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली ! मुख्यमंत्रिपदाचा काटेरी मुगुट जाणतेपणानं त्यांनी स्वीकारला. संयुक्त महाराष्ट्राचा वणवा पेटलेला असतांना आणि मोरारजींनी प्रसंगोपात त्या वणव्यांत तेल ओतून तो चांगला भडकवून ठेवला असतांना, यशवंतरावांनी त्या आगींत उडी घ्यावी याचा अनेकांना अचंबा वाटला. मुख्यमंत्रिपदाच्या हव्यासानं त्यांनी हें केलं का? इष्ट तें साध्य करून घेण्यासाठी, मुख्यमंत्रिपद स्वीकारण्यामागे राजकीय चतुराईचा तो डावपेंच होता का ? का लोकसभेनं दिलेला पर्याय स्वीकारून, त्याची इमानानं अंमलबजावणी करत करतच लोकशाही-पद्धतीनंच, लोकसभेला, वरिष्ठ नेत्यांना, संयुक्त महाराष्ट्राच्या पर्यायापर्यंत नेऊन भिडवायचं यासाठी अवलंबलेला तो 'खास' महाराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचा पवित्रा होता ? या आणि अशा प्रकारच्या सवालांचीं उत्तरं यशवंतरावांनी तो काटेरी मुगुट डोक्यावर ठेवून पुढे स्वतःच्या कृतीनंच दिलीं.

दिल्लीहून येणाऱ्या लाटा थोपवण्यासाठी आणि महाराष्ट्र जागच्या जागीं स्थिर रहाण्यासाठी प्रसंगीं नम्रता स्वीकारल्याच्या घटना जुन्या ऐतिहासिक काळांतहि घडल्या आहेत. दिल्लीहून सुटलेल्या आदेशाचं महाराष्ट्रांत आताहि नम्रपणानं पालन होऊं लागलं. पण त्यामागचा अंतिम हेतु कोणता होता तें आज्ञापालनकर्त्यालाच माहीत असावं. हेतूची पूर्तता झाल्यानंतरच त्या आज्ञापालनाचा अर्थ इतरेजनांना उमगला. १९५६ ते १९६० या काळांत यशवंतरावांनी दिल्लीशीं प्रतारणा तर कधी केली नाहीच, शिवाय महाराष्ट्रांतहि कमालीचा विवेक पाळून, महाद्वैभाषिक कां राबवलं पाहिजे याची शिताफीनं ते वकिली करत राहिले. द्वैभाषिकाचं मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यानंतर सौराष्ट्रापासून सावंतवाडीपर्यंत आणि विदर्भापासून मराठवाड्यापर्यंत वायुवेगानं त्यांनी

दौरे केले. या दौऱ्यांत प्रत्येक ठिकाणीं त्यांनी व्यक्त केलेले विचार समजावून घेतले तर यशवंतरावांच्या दूरदृष्टीचाच प्रत्यय त्यांतून येतो.

१ नोव्हेंबर १९५६ ला महाद्वैभाषिक अस्तित्वांत आलं. मुंबई राज्याचे त्या वेळचे राज्यपाल डॉ. हरेकृष्ण मेहताब यांनी १४ ऑक्टोबरला सूत्रं खाली ठेवलीं आणि सरन्यायाधीश महंमदअली करीम छागला यांनी हंगामी राज्यपालपदाचीं सूत्रं स्वीकारलीं. ३१ ऑक्टोबरला रात्रीं ११–५५ वाजतां मुंबईतील राजभवनासमोरील भव्य पटांगणांत सरन्यायाधीश एन. एच्. सी. कोयाजी यांच्या उपस्थितींत नियोजित राज्यपाल श्री. छगला यांचा शपथविधि झाला आणि नंतर छागला यांनी नव्या राज्याचे मुख्य मंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या नांवाची अधिकृत घोषणा केली. १ नोंव्हेंबरला द्वैभाषिक राज्याच्या मंत्रिमंडळांतील १५ मंत्री आणि ८ उपमंत्री यांचा शपथविधि होऊन मुख्य मंत्री या नात्यानं यशवंतरावांची पहिली राजवट सुरू झाली.

नव्या राज्याचं स्वरूप जितकं चित्तवेधक तितकंच गुंतागुंतीचं होतं. सौराष्ट्र, कच्छ, विदर्भ आणि मराठवाडा हे नवे प्रदेश या राज्यांत आता समाविष्ट झाले होते. ताडाच्या झाडांनी वेष्टिलेला सुंदर समुद्रकिनारा, गिरनार पर्वत, घनदाट जंगलं आणि वाळवंटाचा भव्य प्रदेश, लहानमोठ्या खाड्या, भव्य असा पश्चिम घाट आणि दख्खनचं पठार हें सौराष्ट्राचं वैशिष्ट्य. सौराष्ट्रांतील सखल प्रदेशांतली काळी जमीन कपाशीच्या पिकासाठी महशूर आहे. मुंबई राज्य हें कापड-धंद्याचं एक महत्त्वाचं केंद्र. सौराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा हे प्रदेश मुंबई राज्यांत सामील झाल्यानं कापड-धंद्यांत मुंबई राज्य हें आता अग्रस्थानीं येणार होतं. सौराष्ट्राचं पूर्वीचं राजधानीचं शहर राजकोट, मुंबईपासून विमानानं दोन-सव्वादोन तासांच्या प्रवासाच्या टप्प्यांतलं हें शहर आता राज्याचा एक भाग बनलं होतं.

अरबी समुद्रांतलं एक लहानसं द्वीपकल्प म्हणजेच कच्छ होय. कच्छ हें एक संस्थान होतं. भुज ही कच्छची राजधानी. कच्छचा प्रमुख व्यवसाय शेती. गुरांची पैदास करणं हा स्वाभाविक व्यवसायाचा भाग. दक्षिणेस व पश्चिमेस कच्छचं आखात आणि अरबी समुद्र. पूर्वेला रणचं वाळवंट व त्याच्या पलीकडे सौराष्ट्र व उत्तर-गुजरातचा प्रदेश. कच्छचं वाळवंट म्हणजे एक भौगोलिक चमत्कार आहे. पावसाळ्यांत अथांग पाणी आणि इतर वेळीं कोरडं ठणठणीत वाळवंट! कच्छच्या पश्चिम-किनाऱ्यावर कांडला हें नव्यानंच बांधण्यांत आलेलं बंदर. हें दुसऱ्या क्रमांकाचं बंदर मानलं जात असे. कांडला बंदर आणि सौराष्ट्राच्या उत्तर-टोकावरील ओखा बंदर हीं दोन बंदरं आता नव्या मुंबई राज्यांत समाविष्ट झालीं होतीं.

मराठवाड्याचा वैचित्र्यपूर्ण भूभागहि आता या राज्यांत समाविष्ट झाला होता. मराठवाड्याचा कांही भाग डोंगराळ, जंगलमय आणि कांही सृष्टिसौंदर्यपूर्ण. सर्वच जमीन सुपीक व संपन्न. दुर्मिळ सृष्टिसौंदर्य हें औरंगाबाद जिल्ह्याचं वैशिष्ट्य होय. विदर्भाचे २·३६ कोटि एकर क्षेत्र नव्या मुंबई राज्यांत विलीन झालं. यांतील १.२६

कोटि एकरांत शेती हा प्रमुख व्यवसाय असून ८८.२२ लक्ष एकर क्षेत्रांत जंगल पसरलं होतं. याशिवाय विदर्भातील १२.९१ लक्ष एकर क्षेत्र लागवडीला योग्य असं होतं. नागपूर शहर ही मध्यप्रदेशाची राजधानी. हें शहर आता मुंबई राज्यांत दाखल झालं होतं.

मुंबई राज्यांत आलेला नवा प्रदेश अशा प्रकारे भौगोलिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण तर खराच, शिवाय या प्रत्येक भागाचा इतिहासहि असाच मननीय आहे. सौराष्ट्राला सु-राष्ट्र – चांगलं राज्य – असं नामाभिधान पूर्वीच प्राप्त झालेलं आहे. यादव मथुरेहून इथे आले आणि त्यांनी द्वारका ही राजधानी स्थापन केली. इ. स. पूर्वी ३८६ पासून खिस्ताब्द ३८० पर्यंत सौराष्ट्रावर मौर्य आणि क्षत्रपांचं राज्य होतं. सौराष्ट्राच्या इतिहासाला या दरम्यान सुरुवात झाली. आठव्या शतकांत रजपुतांनी सौराष्ट्रावर स्वारी केली व शेकडो स्वतंत्र राज्यं स्थापन केलीं. १९४८ पर्यंत हीं राज्यं अस्तित्वांत होतीं. १९४८ मध्ये या सर्वांचंच एक संयुक्त राज्य निर्माण केलं गेलं.

कच्छच्या इतिहासांतहि यादवांच्या काळापासून किती तरी राजघराण्यांचा इतिहास सापडतो. १५४८ मध्ये जादेजा घराण्याचं राज्य इथं स्थापन झालं. भुज ही तेव्हापासूनची राजधानी. जहाज-बांधणी व समुद्रपर्यटनाची कला तिथे या काळांत कळसाला पोंचल्याचं आढळतं. हीं जहाजं मध्यपूर्वेपर्यंत आणि आफ्रिकेपर्यंत पश्चिमेला इंग्लंड, पूर्वेला इंडोनेशियन बेटापर्यंत जात असत. १९४८ मध्ये कच्छ हेंहि भारतीय संघराज्यांत विलीन करण्यांत आलं आणि तिथे चीफ कमिशनरचा प्रांत अस्तित्वांत आला.

मराठवाड्याचा इतिहासहि इ. स. पूर्व २५६ पासून उपलब्ध आहे. अशोकाच्या शिलालेखावरून दक्षिणेकडील लोकांना राष्ट्रीक, पोटेनिक, अपरान्त, आंध्र आणि भोज वगैरे नांवांनी संबोधलं जात असावं असं दिसतं. प्राचीन काळीं मराठवाड्यांतल्या राष्ट्रीकांनी सध्याच्या मराठवाड्याचे जिल्हे मिळून दक्षिणेमध्ये राज्य केलं. गोदावरीच्या काठावरील पैठण गावच्या आजूबाजूच्या भागांत रहाणाऱ्या पोटेनिकांना पैठणक असंहि म्हणत. अपरान्त हे लोक उत्तर-कोकणांतील होत. गोदावरी आणि कृष्णानदीच्या मधल्या पठारावर आंध्र लोकांची वस्ती होती. देवगिरीचा यादवराजा पांचवा, भिल्लमा, यानं नंतरच्या चालुक्य राज्याच्या उत्तरेकडील व पूर्वेकडील प्रदेशांवर चढाई केली. सिंघाण (इ. स. १२१० ते १२४७) हा यादव-कुलांतला अतिशय पराक्रमी राजा इथे होऊन गेला. वाङ्मय व विद्या यांचा तो चाहता होता. मराठवाड्याची ही परंपरा आजहि कायम आहे.

विदर्भाला तर वेदकालापासून दिव्य असा भूतकाल आहे. प्रणय आणि साहस यांचं मूर्तिमंत प्रतीक असं रुक्मिणी-स्वयंवर विदर्भांतच घडलं. सप्तवाहन, वकतक, नल, राष्ट्रकुल वगैरे अनेक राजांनी या प्रदेशावर राज्य केलं. हा सारा इतिहास आणि भूगोल आता मुंबई राज्याच्या वांट्याला आला.

या ऐतिहासिक द्वैभाषिकाचं मुख्यमंत्रिपद यशवंतरावांनी स्वीकारलं आणि लगेचच त्यांच्या कसोटीचा काळ सुरू झाला. पुनर्रचनेपूर्वीच्या मुंबई राज्यांतील विजापूर, धारवाड,

कारवार आणि बेळगाव हे जिल्हे विशाल म्हैसूर राज्याला जोडण्यांत आले होते. तर अबूरोड तालुका राजस्थानांत सामील करण्यांत आला होता. बेळगाव जिल्ह्यांतला चंदगड तालुका मात्र कोल्हापूर जिल्ह्यांत घालण्यांत आला होता. मराठवाड्यांत, अहमदपूर, निलंग व उद्‌गीर हे तालुके उस्मानाबाद जिल्ह्यांत समाविष्ट झाले आणि इस्लामपूर सर्कल, किनवत तालुका, राजुरा तालुका हे नांदेड जिल्ह्यांत आले. नांदेड जिल्ह्यांतला बिचकोंडा, जुक्कल वगैरे भाग नव्या आंध्र राज्यांत गेला. इतिहास आणि परंपरा यांच्या संयोगामुळे मुंबई-महाराष्ट्र हे एक महान् आणि समृद्ध असं राज्य जन्माला आलं.

राज्यांची पुनर्रचना झाली तरी त्या रचनेंत मुंबई राज्याचं संमिश्र स्वरूप कायमच ठेवण्यांत आलं होतं. राज्यापुढे अनेक प्रश्न होते. पण त्यांपैकी महत्त्वाचा प्रश्न राष्ट्रीय ऐक्यासंबंधीचा होता. नव्या मुंबई राज्यानं केवळ कारभार आणि प्रादेशिक फेरफार या बाबतींतच ऐक्य संपादन करण्याचा एक मार्ग दाखवला असं नसून व्यक्तिगत, संस्था-विषयक आणि राष्ट्रीय अशा अनेक क्षेत्रांच्या बाबतींत आदर्श घालून दिला. शेती, उद्योगधंदे, व्यापार, सामाजिक सुखसोयी, सांस्कृतिक सोयी आणि राष्ट्रीय विकासाचीं कार्ये या बाबतींत मुंबई राज्य हें नेहमीच अग्रभागीं असलेलं राज्य होतं आणि तसंच रहाणं अटळ ठरलं.

यशवंतरावांना आता एक आव्हान मिळालं होतं. क्षेत्रफळाच्या बाबतींत मुंबई राज्य हें भारतीय संघराज्यांतील पहिलं आणि लोकसंख्येच्या बाबतींत दुसरं बनलं होतं. पूर्वीच्या मुंबई राज्यांत आता क्षेत्रफळाच्या बाबतींत ७० टक्क्यांनी आणि लोकसंख्येच्या बाबतींत ३४ टक्क्यांनी वाढ झाली होती. नव्या राज्यांत बृहन्मुंबईसह एकूण ४३ जिल्हे (पूर्वी २८ होते), लोकसंख्या ४ कोटि ८३ लक्ष आणि क्षेत्रफळ १ कोटि ९० लक्ष ६९० चौरस मैल असा त्याचा ऐसपैस आकार बनला. या प्रचंड राज्याचा राज्यकारभार परिणामकारक आणि सुलभरीत्या कसा होऊं शकेल याकडे मुख्य मंत्र्यांना प्रारंभापासूनच लक्ष द्यावं लागणार होतं.

यशवंतराव त्यासाठी स्वतःच चक्रव्यूहांत शिरले होते. कांही पुढाऱ्यांची जन्म-जात अशी एक खोड असते की, परिस्थितीचा चक्रव्यूह निर्माण करण्यांतच ते आपली बुद्धि, शक्ति खर्च करीत रहातात. स्वतःच त्या चक्रव्यूहांत शिरतात आणि इतरांनाहि अडकवतात. त्यांतून सोडवणूक करून घेणं मात्र अडकलेल्या प्रत्येकावर सोपवलं जातं. चक्रव्यूहांत गुरफटलेले बिचारे बाहेर पडण्यासाठी, वाट मोकळी करण्यासाठी धडपडतात, कांही प्रमाणांत यशस्वीहि होतात आणि थोडी फार वाट मोकळी झाल्याचं दिसतांच, प्रथम बाहेर पडण्याचा मान घेतात ते मात्र चक्रव्यूहांत अडकवणारे पुढारी! मुत्सद्दी म्हणून स्वतःचा बोलबाला करून घेण्यासाठी मग सर्वप्रथम तेच धांवतात. चक्रव्यूह मागे कायमच राहिलेला असतो आणि बाहेर पडण्यासाठी खस्ता खाणारे आशाळभूतपणें या मोकाट सुटलेल्या पुढाऱ्याकडे नुसतं पहात रहातात.

यशवंतरावांचा पिंड अगदी वेगळा. राष्ट्रीय परिस्थितींत कुठे चक्रव्यूह निर्माण होत आहे किंवा झालेला आहे असं जाणवतांच स्वतःच त्यामध्ये उडी घेण्याचे प्रसंग त्यांच्या राजकीय जीवनांत अनेकदा आले; परंतु ज्या ज्या वेळीं त्यांनी अशी हिंमत केली त्या प्रत्येक वेळीं चक्रव्यूहाचा संपूर्ण भेद करून, स्वतःसाठी आणि इतरांसाठीहि, वातावरण मोकळं करण्यात त्यांनी यश मिळवलेलं आढळतं. परिस्थितीच्या चक्रव्यूहांत शिरायचं तें भेद करण्यासाठी असा त्यांचा मनःपिंडच बनला असावा. नव्या चक्रव्यूहाचा भेद त्यांनी असाच सुरू केला.

नव्या राज्याच्या गरजा भागवण्यासाठी प्रगतिशील कारभारयंत्रणा स्थापन करणं ही त्या वेळीं मूलभूत गरज होती. मंत्री या नात्यानं यशवंतरावांनी कारभाराचा कांही अनुभव मिळवला होता. त्यांतील उणिवांची जाणीवहि त्यांना झाली होती. आता तर राज्याचा आकार वाढला होता आणि कामाचा बोजा वाढणार होता. महाराष्ट्र आणि गुजरातमधली जनता, संयुक्त महाराष्ट्र समिति आणि महागुजरात जनता-परिषद भक्कमपणें उभी होती. द्वैभाषिकाच्या विरुद्ध त्यांनी युद्धच पुकारलं होतं. बुद्धिजीवीवर्ग असंतुष्ट बनला होता आणि सर्वसामान्य जनता सरकारविरुद्ध युद्धाच्या पवित्र्यांत उभी होती.

यशवंतराव शांत होते पण मनानं तितकेच भक्कम होते. मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी प्राप्त परिस्थितींत अवघड असल्याचं त्यांनी जाणलं. महाराष्ट्र उत्तम राज्यकारभार करूं शकतो हें सिद्ध करण्याची मनांत जिद्द होती. द्वैभाषिक चांगलं चालवण्यासाठी सर्वांचं सर्व प्रकारचं साहाय्य घेण्याची योजना त्यांनी मग सर्वप्रथम मनाशीं आखली आणि त्यानुसार निर्णय करण्यास लगोलग प्रारंभहि केला.

नेतेपदीं निवड झाली त्याच्या दुसऱ्याच दिवशीं यशवंतराव पुण्याला गेले. पुण्याच्या काँग्रेस-भवनांत त्यांचा सत्कार व्हायचा होता. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनांत ज्या शहरानं त्यांना जोडे, चपला, दगड दिले तिथेच आता ते मुख्य मंत्री म्हणून पुष्पहार स्वीकारणार होते. महाराष्ट्राच्या राजकारणांतले त्या काळचे भीष्माचार्य काकासाहेब गाडगीळ हे पुण्यांतच होते. पुण्यांत पोंचतांच यशवंतराव प्रथम काकासाहेबांच्या घरीं गेले. 'मी तुमचा यशवंत आलों आहे' एवढंच नम्रपणानं ते बोलले. आशीर्वाद हवा हें त्यांत अभिप्रेत होतंच. या भेटींतच यशवंतरावांनी थोर नेत्यांच्या सहकार्याची पहिली फेरी जिंकली. स्वतः काकासाहेबांनीच आपल्या आत्मचरित्रांत – 'पथिक'मध्ये या भेटीचा उल्लेख केला आहे. काकासाहेब गाडगिळांनी लिहिलं आहे की, "महाराष्ट्राला राज्य चालवतां येत नाही, असा समज मुन्शी-मोरारजी भक्तांनी पसरवला होता. महाराष्ट्रीय लुच्चे आहेत, शासक नाहीत, असा प्रचार केला जात होता. द्वैभाषिक चांगलं चाललं पाहिजे म्हणून सर्व प्रकारचं साहाय्य, मार्गदर्शन, चव्हाण यांना देण्याचं मीं ठरवलं होतं."

त्यापूर्वी मुंबईच्या गोदी-कामगारांनी मुख्य मंत्र्यांचा सत्कार करण्याचा पहिला मान मिळवून यशवंतरावांच्या मुख्यमंत्रिपदाच्या निवडीनं शेतकरी-कामकरी राज्याची आणि लोकशाही समाजवादाची नांदी झाल्याचं महाराष्ट्राला विदित केलं होतंच. महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसनं दि. २१ ऑक्टोबरला त्यांचा सत्कार केला. ही संधि साधून त्यांनी मोकळ्या मनानं आपले राजकीय विचार जाहीर केले आणि माझ्या कार्यांत सहकार्य करा अशी जाहीर भिक्षा मागण्यासाठी आलों आहे, असा प्रस्ताव केला. वडील असतील त्यांनी आशीर्वाद द्यावा, बरोबरीचे असतील त्यानी सहकार्य द्यावं, असं त्यांचं मागणं होतं. गुंतागुंतीचे प्रश्न सोडवण्यासाठी सहकार्याशिवाय कांहीहि शक्य होणार नव्हतं. वातावरण बदलून परस्पर-सहकार्याची आणि विश्वासाची भावना निर्माण झाल्याशिवाय महाराष्ट्राचं पाऊल पुढे पडणार नव्हतं. "जनसेवेचं साधन या दृष्टीनंच मी सत्तेकडे पहातों, त्याचसाठी सत्तेचा उपयोग व्हावा असं माझं मत आहे. सेवेचं मंगल कंकण मीं बांधलं आहे. ज्या योगायोगानं मी नेतेपदीं निवडला गेलों तो योगायोगच मला माझ्या नव्या जबाबदारींत यशस्वी करील अशी आशा मीं बाळगून आहे." यशवंतरावांनी आपल्या मनांतल्या भावना अशा माफक, पण जिव्हाळ्याच्या शब्दांत व्यक्त करतांच त्यांची बुद्धिमत्ता, धैर्य, प्रामाणिकपणा आणि राजकारणपटुत्वाविषयी त्याच सभेंत त्यांच्यावर स्तुतीचा वर्षाव झाला.

पुढे आठवड्याभरांत, २८ ऑक्टोबरला सातारकर कामगारांतर्फे यशवंतरावांचा मुंबईत सत्कार झाला. या समारंभांत तर त्यांनी अधिक खुलेपणानं मनोगत सांगितलं. यशवंतराव हे सातारा जिल्ह्याचे रहिवासी. मुख्य मंत्री झाल्यानंतर लोक आणि ते स्वतः यामध्ये अंतर पडण्याची शक्यता निर्माण झाली. लोकांच्या मनांतले हे तरंग ओळखून यशवंतरावांनी या सत्काराच्या वेळीं लोकांना दिलासा दिला की, "माझ्या कचेरीचा दरवाजा चोवीस तास खुला आहे. मी चुकत आहे असं ज्या कुणाला वाटत असेल त्यानं खुशाल यावं व माझी चूक मला समजावून सांगावी. मी चुकलों आहे किंवा चुकत आहे असं आढळून आलं, तर धोरणांत बदल करण्यास मी मुळीच अनमान करणार नाही.

"सातारकर मंडळी सत्कार करत आहेत याचा अर्थातच आनंद आहे, पण मुंबईतल्या सातारकर मंडळींवर आता मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. मुंबईतली सातारकर मंडळी यापुढे कशी वागणार इकडे सर्व लोक बारकाईनं बघत रहाणार आहेत. तेव्हा प्रत्येक सातारकर माणसानं आपणहि थोडेसे मुख्य मंत्री आहोंत या जाणिवेनं व जबाबदारीनं वागलं पाहिजे. माझ्यावर जी जबाबदारी टाकलेली आहे ती माझ्या वैयक्तिक गुणांमुळे नसून १९२० व १९३० सालीं ज्या नव्या शक्ति जन्मास आल्या त्या शक्तींचा मी प्रतिनिधि आहे, म्हणून ही जबाबदारी टाकण्यांत आली आहे. शिक्षणाची आवड, जन-जागृति, निरोगी राष्ट्रवादाचा जन्म, आर्थिक व सामाजिक न्यायाची जाणीव या गोष्टी खेड्यापाड्यापर्यंत शिरल्या व त्यांतूनच या नव्या शक्तीचा

जन्म झाला. या शक्ति जिवंत राहिल्या, कार्यक्षम राहिल्या, तरच मला यश मिळणार आहे.

"या शक्तीचं संवर्धन करण्याकडे सर्वांनीच लक्ष दिलं पाहिजे. व्यवसायानं मी शेतकरी नसलों तरी संस्कार शेतकऱ्याचेच आहेत. खेड्यांतलं दारिद्य, अज्ञान याची मला जाणीव आहे. तें कमी करण्याचा माझा प्रयत्न राहील. तें शक्य न झाल्यास एक लाख वेळा जरी मुख्यमंत्रिपद मिळालं तरी त्याचा उपयोग नाही. जबाबदारीची मला चिंता आहे. माझ्यावर प्रेम करणारे जसे आहेत तसेच विरोधकहि आहेत; पण त्या-मुळेच माझ्यांतली ईर्षा वाढते व कामाचा मला हुरूप येतो."

प्रगट आत्मचिंतन करतच, यशवंतराव त्या काळांत महाराष्ट्रामध्ये फिरत राहिले, बोलत राहिले. त्यांच्या शब्दाशब्दांतून सहकार्याचं आवाहन, जबाबदारीची चिंता, जबाब-दारी पार पाडण्याबद्दलचा आत्मविश्वास हें प्रतीत होत राहिलं. त्याचबरोबर विस्कटलेला मराठीभाषी प्रदेश मतभेद विसरून एकजीव व्हावा, मराठी आणि गुजराती राज्यांत बंधुत्वाचं नातं निर्माण व्हावं आणि आदर्श, कार्यक्षम राज्यकारभाराचा नमुना म्हणून द्वैभाषिक मुंबई राज्य भारतासमोर यावं ही अंतरीची ओढहि त्यांतून व्यक्त होत राहिली. मुंबईतली सातारकर मंडळी यापुढे कशी वागणार याकडे सर्वांचं बारकाईनं लक्ष रहाणार आहे, या त्यांनी दिलेल्या इशाऱ्यांतली गोम ज्याला उमजेल त्यालाच यशवंतरावांच्या चौफेर चिंतेचा आणि चिंतनाचा आवाका उमगूं शकेल.

दि. १ नोव्हेंबरला यशवंतरावांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळाचा शपथविधि झाल्या-नंतर नव्या मुंबई राज्याच्या उद्‌घाटनानिमित्त जनतेला त्यांनी एक प्रदीर्घ संदेश दिला. मनाचीं सर्व कवाडं उघडीं ठेवून दिलेला हा संदेश होता. नोव्हेंबर म्हणजे दिवाळीच्या सणाचा महिना. पावसाळा संपून हिवाळा सुरू होण्याचा तो मोसम. सुंदर हवा, विपुल पाणी, सारी सृष्टि फुलून गेलेली, सुगी जवळ आलेली, असा तो समृद्धीचा मंगल समय असतांनाच नव्या मुंबई राज्याचा शुभारंभ होत होता. भारतांत अनेक पुनर्घटित राज्यं सुरू होत होतीं, परंतु विशाल मुंबई राज्याला असामान्य महत्त्व प्राप्त झालेलं होतं. भारतांतील हें अग्रेसर राज्य द्वैभाषिक राज्य या नात्यानं भारतापुढे कोणता आदर्श ठेवील याकडे सर्वांचंच आस्थापूर्वक लक्ष लागून राहिलं होतं. अन्य भाषकांप्रमाणेच सर्व मराठी व गुजराती बांधव एकत्र येऊन त्यांचं भाषिक राज्य बनावं असं जनतेला वाटत होतं; पण भाषिक राज्याची ओढ असलेल्या या जनतेला मुंबई शहराचीहि ओढ होती.

उभय प्रदेशांतील जनतेच्या या भावनांची दखल घेऊनच त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं विशाल मुंबई राज्य सुरू होत आहे असं यशवंतरावांनी त्याचं प्रथम-पक्षीं समर्थन केलं.

स्वतःभोवतीं प्रतिज्ञांचे तट उभारूनच यशवंतरावांनी नव्या राज्याच्या कारभाराला प्रारंभ केला. पुरवठा आणि अन्नखात्याचं मंत्रिपद सांभाळतांना प्रशासकीय कारभारां-तली दिरंगाई, अडचणी, उणिवा याचा अनुभव त्यांनी घेतलेला होताच, तरी पण

कारभाराचे प्रमुख या नात्यानं आता कांही बदल घडवायचा तर प्रशासकीय तज्ज्ञांचा सल्ला संपादन करण्याची आणि स्वतः अभ्यास करण्याची गरज त्यांना भासली.

समस्या, मग ती कसलीहि असो, त्या समस्येच्या मुळापर्यंत पोंचून तिच्या सव बाजूंचा अभ्यास करायचा, निर्णयाच्या परिणामाला सर्वांगांनी कसोट्या लावायच्या ऑणि निर्णय करायचा तो समस्या निपटून काढण्यासाठी करायचा, असंच वळण आपल्या मनाला आणि स्वभावाला यशवंतरावांनी लावलेलं होतं. त्यामुळे परिणामकारक आणि सुलभ राज्यकारभार करतां यावा यासाठी सर्व समस्यांचं त्यांनी पुन्हा एकदा बारकाईनं निरीक्षण केलं.

नव्या राज्याच्या मार्गदर्शनाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली होती. सामान्यतः मार्गदर्शक असतो तो बोट धरून वाट दाखवणारा असतो. हा मार्गदर्शक तसा नव्हता. वाटसरूचा बोजा स्वतःच डोईवर घेऊन चालणारा हा एक विरळा मार्गदर्शक आता महाराष्ट्राला मिळाला होता. ज्याचा बोजा त्याच्या माथ्यावर, असा प्रकार इथे नव्हता. पराहिताच्या बुद्धीनं स्वतः त्रास सोसून एखाद्या कार्याला प्रवृत्त होणारीं माणसं असतात. परहितासारखं दुसरं स्वहित नाही अशीच त्यांची धारणा असते. प्रसंग आल्यास डगमगायचं नाही व प्रसंग नसेल तर तो आणायला कचरायचं नाही, असंच कांहीसं यशवंतरावांच्या स्वभावाचं दर्शन, विशाल द्वैभाषिक राबवितांना किंवा नंतरच्या काळांतहि घडतं. महाराष्ट्रांत त्या काळांत लोक ज्या एका विषयासाठी अतिशय जागृत होते, त्याविषयी यशवंतराव उदासीन होते आणि ज्या विषयासंबंधी लोकांची गाढ झोप होती त्याविषयी यशवंतराव जागृत होते. त्यामुळे ज्या गोष्टी त्यांच्या बाबतींत विपत्तीला कारण ठराव्यात त्या त्यांच्या ठायीं संपत्तिरूप बनल्या – त्याची फलप्राप्ति त्यांना झाली.

लोकांचं, लोकांसाठी, लोकांनी चालविलेलं राज्य याचा पडताळा आणण्याच्या दृष्टीनं अधिकाराचं आणि कामाचं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय यशवंतरावांनी सुलभ कारभाराच्या दृष्टीनं सुरुवातीलाच केला. लोकांच्या दृष्टीनंहि तें आवश्यकच होतं. क्षुल्लक आणि दैनंदिन कामासाठी लोकांना या टोकापासून त्या टोकापर्यंत, राजधानीच्या ठिकाणीं जावं लागू नये अशी या विकेंद्रीकरणामागची दृष्टि होती. लोकांचे हेलपाटे टाळण्यासाठी आणि शक्य तर त्यांचं काम त्या त्या विभागांत होण्याच्या दृष्टीनं त्यांनी राज्याची विभागणी सहा डिव्हिजनमध्ये केली. मुख्य विभागीय ठाणीं राजकोट, अहमदाबाद, मुंबई, पुणें, औरंगाबाद आणि नागपूर अशीं झालीं होतीं. प्रादेशिक सलगता आणि एकसंघपणा, समान समस्या आणि राजकोट, औरंगाबाद व नागपूर यांसारख्या स्थळांचं महत्त्व टिकवण्याची आवश्यकता लक्षांत घेऊनच हें घडलं. यांतल्या तीन विभागांमध्ये प्रत्येकी आठ जिल्हे आणि दोनमध्ये प्रत्येकी सहा जिल्हे असा समावेश करण्यांत आला.

सहा विभागांमध्ये विभागणी करतांना सचिवालयांतल्या खात्यांच्या कामांतहि त्यांनी फेरबदल केले. पुनर्वस्ती, घर-बांधकाम आणि मागासवर्गखातं हें त्यांनी एक

संपूर्ण खातं बनवलं; आणि एका सचिवाच्या ताब्यांत तें देण्यांत आलं. कामगार खात्याचं काम विकासखात्याकडून काढून तेंहि याच खात्याकडे देण्याचा निर्णय करण्यांत आला. त्याचप्रमाणे मागासलेल्या वर्गाचं कल्याण आणि कल्याणविषयक उर्वरित बाबी यांचंहि काम या खात्याकडे सुपूर्द करण्यांत येऊन, या सर्वांस मिळून कामगार व समाजकल्याण खातं असं नवं नांव त्यास देण्यांत आलं.

नियोजन व विकास खातं हें मुख्य सचिवांकडे होतं. तें सांभाळण्यासाठी आता एका डेव्हलपमेंट कमिशनरची नेमणूक करण्याचं त्यांनी ठरवलं. वीज व वीज-कंपन्या यांच्यावर देखरेख करण्याचं काम बांधकामखात्याकडे पूर्वी होतं. या खात्याकडून हें काम काढून घेऊन तें विकासखात्याकडे देण्यांत आलं; आणि विकासखात्याला उद्योगधंदे व सहकार खातं असं संबोधण्यांत येऊं लागलं.

मध्यप्रदेश व हैदराबाद रेव्हेन्यू बोर्डाचीं आणि सौराष्ट्र व कच्छ रेव्हेन्यू ट्रायब्यूनलचीं न्यायदानविषयक कामं पार पाडण्यासाठी मुंबई रेव्हेन्यू ट्रायब्यूनलचीं बेंचेस् नागपूर व औरंगाबाद इथे स्थापन करण्याचा आणि नागपूर इथे एक, तसेंच राजकोट इथे एक अशा दोन हायकोर्ट बेंचेसचीं स्थापना करण्याचे महत्त्वाचे निर्णय याच वेळीं झाले.

राज्याचा आकार आणि कामाचा बोजा लक्षांत घेऊन सचिवालयांतल्या खात्यांची, खातेप्रमुखांच्या कचेऱ्यांची २५ टक्के वाढ करण्याची एक योजनाहि या वेळीं तयार करण्यांत आली. याशिवाय सध्याचा जो नोकरवर्ग होता त्यापैकी सुमारे १४ टक्के नोकरवर्ग म्हैसूर राज्यास देण्यांत आल्यानं जागा रिकाम्या होणार होत्या. अशा रीतीनं बहुतेक खात्यांतून त्या वेळीं अस्तित्वांत असलेल्या जागांपैकी ४० टक्के जागा नव्या प्रदेशांतून येणाऱ्या नोकरांची सोय लावण्यासाठी उपलब्ध करण्यांत आल्या. पूर्वीच्या मुंबई राज्यांत नवे प्रदेश समाविष्ट झाल्यानंतर तिथल्या सरकारी नोकरांचं काय करायचं याची डोकेंदुखी निर्माण होणार होती. परंतु वेळींच विचार करून निश्चित स्वरूपाचा निर्णय केला गेल्यानं या समस्येची तीव्रता कोणास भासली नाही. बसलेली घडी मोडूं नये, नोकरवर्गाचे व लोकांचे हाल होऊं नयेत म्हणून सौराष्ट्र, कच्छ, हैदराबाद व मध्यप्रदेश यांच्या सेक्रेटरीएटमधल्या व मुख्य ठाण्यांतील नोकरवर्गाची शक्यतोंवर विभागीय व प्रादेशिक कचेऱ्यांतून सोय लावण्याचा प्रयत्न करणं आवश्यकच होतं. नव्या योजनेमुळे तेंहि साध्य झालं.

सरकारी सर्व प्रमुख खातीं आणि त्यांच्या कचेऱ्यांचं एकत्रीकरण हें कारभार सुलभ होण्याच्या दृष्टीनं आवश्यक होतं. त्यासाठी एक स्वतंत्र भव्य इमारत बांधावी लागणार होती. १ नोव्हेंबरला द्वैभाषिक निर्माण झाल्यानंतर १२ नोव्हेंबरलाच सचिवालयाच्या भव्य सहामजली इमारतीची कोनशिला मोरारजी देसाई यांच्या हस्तें बसवण्यांत येऊन त्याहि कामास प्रारंभ झाला. त्या काळांत ७२ लक्ष रुपये खर्चाची ही योजना होती.

मुख्यमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारल्याच्या दिवसापासूनच त्यांनी कामाचा उरक करण्यास सुरुवात केली. अवधि थोडा होता. राज्यकारभार यशस्वी करायचा होता आणि तो

गतिमान ठेवायचा होता. १९५७ हें सार्वत्रिक निवडणुकीचं वर्ष. तें जवळ आलं होतं.

राज्यकारभाराबद्दल दिलेल्या आश्वासनांची प्रचीति कांही प्रमाणांत तरी लोकांना येत आहे याकडे लक्ष देणं तर आवश्यक होतंच, त्याचबरोबर द्वैभाषिकाची भूमिका आणि महती लोकांना पटवून जनतेच्या मनांतल्या निराशेची भावना कमी करण्याच्या राजनीतीचा अवलंबहि त्यांना करावा लागणार होता. द्वैभाषिक राज्य हाच मुळी पेंच आहे, अशी समजूत महाराष्ट्रांत वाढली होती. ही समजूत वाढवण्यासाठी विरोधी पक्ष पद्धतशीर रचना करत होता. अशा स्थितींत राज्य चालवायचं म्हणजे राज्यांतल्या जनतेचं समाधान होईल, त्यांच्या मनांतील शंका-कुशंकांना उत्तरं मिळतील, भावनेला प्रतिसाद मिळेल, असं वातावरण निर्माण करण्यासाठी मग यशवंतरावांनी द्वैभाषिकाच्या दौऱ्याचं प्रस्थान ठेवलं.

दक्षिण-महाराष्ट्रापासून त्यांच्या दौऱ्याला प्रारंभ झाला. द्वैभाषिकाचा निर्णय योग्य असल्याचं वातावरण निर्माण करणं हा यशवंतराव यांच्या दौऱ्याचा प्रमुख हेतु होता.

कराड आणि सांगली इथे त्यांचं दृष्ट लागावी असं स्वागत केलं. कराडकरांनी आपल्या वरच्या नेत्याला नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांच्या हस्तें मानपत्र दिलं. सोलापूरचं स्वागत तर प्रचंडच होतं. विमानतळ ते शहर या चार मैलांच्या अंतरावर लोकांनी आपल्या नेत्याच्या स्वागतासाठी शेकडो कमानी उभारल्या होत्या आणि हजारो लोक जयजयकार करत होते. या दौऱ्यांत ते विरोधी पक्षांनाहि सबुरीचं आवाहन करत राहिले.

यशवंतरावांच्या या दक्षिण-विजयाचा गौरव त्या वेळीं मुंबईच्या कांही वृत्तपत्रांनी अग्रलेख लिहून केला. द्वैभाषिकाला स्थायी स्वरूप देण्याचा हिरीरीचा प्रचार तर त्यांनी केलाच, शिवाय मूलगामी मुद्दा उपस्थित करून महाराष्ट्राच्याच नव्हे, तर गुजरातच्या लोकांना एक प्रकारे आव्हान दिलं. हें आव्हान स्वीकारल्याशिवाय मुंबई राज्याच्या लोकांना गत्यंतर नाही, असा वृत्तपत्रांचा अभिप्राय व्यक्त झाला.

गुजराती व महाराष्ट्रीय भाऊ-भाऊ होते, भाऊ-भाऊ म्हणून रहाण्यांतच हित आहे, दादाभाई नवरोजी व महात्मा गांधी यांनी आपणांस हेंच शिकवलं हें सांगण्यासाठी त्यांनी मग गुजरातकडे धांव घेतली. मुंबई शहर हें मराठी व गुजराती भाई-भाईची आई आहे. प्रेमाची विभागणी करतां येत नाही, असं या भाई-भाईना पटल्यावरूनच त्यांनी एकत्र रहाण्याचा निर्णय केला आहे, असं या दौऱ्यांत नवसारी, काचोळी, वेरावळ आदि ठिकाणच्या जाहीर सभांतून सांगून गुजराती समाजांत त्यांनी आपुलकी निर्माण करण्यांत यश मिळवलं.

नोव्हेंबरचा पहिला आठवडा मंत्रिमंडळाचं खातेंवांटप, कचेऱ्यांची स्थिरस्थावर, कामांची आखणी यांत खर्च झाला; आणि दुसऱ्या आठवड्यापासून सर्व राज्यांत फिरून नव्या राज्याविषयी लोकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी सातत्यानं सुरू

केला. त्यांतच १९ नोव्हेंबरला कायदेमंडळाचं अधिवेशन सुरू झाल्यानं, मुंबईस परत येऊन विधानसभेच्या आणि शासकीय कामाच्या गाड्यास त्यांनी जुंपून घेतलं.

मुंबई राज्याची, कारभाराच्या सुलभतेसाठी सहा डिव्हिजनमध्ये विभागणी केलेलीच होती. या सर्व विभागांतल्या विकासाच्या कामांना गति येण्यासाठी मग सल्लागार मंडळं स्थापन करण्यांत आलीं. मुख्य मंत्र्यांनी विधानसभेंतच २४ नोव्हेंबरला ही घोषणा केली. सरकारी व बिनसरकारी सभासद असलेलीं हीं मंडळं सर्व विभागांसाठी तयार करण्यांत आलीं होतीं.

मुख्य मंत्री या नात्यानं विधानसभेंत आपली प्रतिमा ठळक बनवत असतांनाच, अन्य प्रशासकीय कामांकडे आणि विविध खात्यांच्या समस्यांकडेहि त्यांनी तातडीनं लक्ष पुरवण्याचा प्रघात या वेळीं सुरू केला. राज्यांतल्या उद्योगधंद्यांच्या आर्थिक गरजा भागवण्याचा प्रश्न या वेळीं उपस्थित झाला असतांना यशवंतरावांनी, राज्याच्या सर्व भागांतील औद्योगिक कंपन्यांच्या उद्योगधंद्याबाबतच्या आर्थिक गरजा भागवण्यासाठी 'मुंबई राज्य फायनान्सियल कॉर्पोरेशन'ची स्थापना केली आणि हा प्रश्न मार्गी लावला. त्याचबरोबर नव्या प्रदेशाची औद्योगिक कुवत अजमावण्याचं कामहि सुरू केलं.

उद्योगधंदेखात्याच्या सर्व अधिकाऱ्यांची एक बैठक २३ नोव्हेंबरला त्यांनी बोलावली आणि राज्यांतल्या सर्व सुप्त साधनसामग्रीचा उपयोग करून घेतला जात नाही याकडे सर्व अधिकाऱ्यांचं लक्ष वेधलं. औद्योगिक विकासाच्या योजनांचा दीर्घमुदतीच्या नियोजनाच्या दृष्टीनं विचार करावा असं सांगतांना, केवळ दुसरी पंचवार्षिक योजना आखण्याच्या व अमलांत आणण्याच्या दृष्टीनं त्याकडे पाहूं नये अशी जाणीवहि दिली. मुंबई राज्य औद्योगिकदृष्ट्या प्रगतिपथावर नेण्यास त्यांनी एव्हापासूनच प्रारंभ केला.

कलाक्षेत्रांतूनहि कांही मागण्या पुढे येऊं लागल्या होत्या. मुख्यमंत्र्यांनी त्याहि समजून घेतल्या आणि भराभर निर्णय केले. त्यांतूनच नाट्यकलेला उत्तेजन देण्यासाठी म्हणून २·१६ लक्ष रुपये खर्चाची एक योजना तयार झाली. नाटकाच्या पुस्तकांना बक्षिसं, हौशी कलावंतांचा नाट्यमहोत्सव, शिक्षण-संस्थांतील नाट्यमहोत्सव, खुलीं नाट्यगृहं बांधणं, हलाखीची स्थिति असलेले नाटककार, नट वगैरेंना आर्थिक साहाय्य करणं, संगीत, नृत्य आणि नाट्यशाळांना अनुदान देणं, नाट्यप्रयोग करण्याच्या बाबतींत शाळांतल्या शिक्षकांना आवश्यक तें प्राथमिक शिक्षण देणं, तमाशा वगैरेंसाठी बक्षिसं ठेवणं आदि गोष्टी महाराष्ट्रांत यशवंतरावांनी त्या काळांत प्रथमच सुरू केल्या.

यशवंतराव इथे कांही असं नवीन घडवण्याच्या कामांत गुंतले असतांनाच कच्छ भागांत भूकंप होऊन एक वेगळंच संकट उभं राहिलं. त्यामुळे अन्य व्यवधानं मागे ठेवून २८ नोव्हेंबरला त्यांनी कच्छकडे धांव घेतली. भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनाचा, आर्थिक आणि अन्य प्रकारच्या मदतीचा प्रश्न निर्माण झालेला होता. भूकंपग्रस्त भागाची त्या दृष्टीनं तीन दिवस सतत पहाणी करून आणि आवश्यक ते निर्णय करूनच त्यांना परतावं लागलं.

आता डिसेंबर महिना उजाडला होता. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीचे नगारे वाजूं लागले होते. यशवंतरावांना अजून विदर्भ व मराठवाड्याचा दौरा करायचा होता. निवडणुकांचं ऐन वातावरण सुरू होण्यापूर्वी या दोन्ही विभागांतल्या जनतेशीं हितगुज करणं आवश्यकच होतं. कच्छहून परत येतांच त्यांनी मग विदर्भ-मराठवाड्याच्या दौऱ्याचं प्रस्थान ठेवलं. एक आठवड्याच्या त्यांच्या सततच्या दौऱ्यांत हे दोन्ही भाग अक्षरशः ढुसळून निघाले.

विदर्भांत पुलगाव आणि वर्धा इथल्या नागरिकांनी त्यांना मानपत्रं दिलं. वर्धा-चांदा रस्त्यावर तर विदर्भवासियांनी नव्या मुख्य मंत्र्यांचं अपूर्व असं स्वागत केलं. हिंगणघाट, वरोडा, भद्रावती इथल्या जाहीर सभांतून आपण नव्या राज्याचे नागरिक आहोंत याचा अभिमान बाळगा, गौरव माना आणि नवं राज्य त्या दर्जानं चालवण्यासाठी आपल्या हातीं आलेलं आहे असं सांगून, सर्वांनाच त्यांनी नव्या कामांत सामील करून घेतलं. या दौऱ्यांत त्यांचीं जीं वक्तव्यं झालीं त्यांचं सार असं –

"नवीन राज्य निर्माण झालं म्हणजे नवीन काम सुरू झालं आहे. हें काम पूर्ण करण्यासाठी दृष्टि विशाल पाहिजे. देशांतच हें काम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी विश्वासाची, सदिच्छेची, सहकार्याची देवाण-घेवाण करण्यासाठी हा दौरा आहे. मोठं राज्य कर्तृत्वानं अधिक मोठं केलं पाहिजे. तें गुणानं वाढलं पाहिजे. नव्या राज्यांतील सगळे लोक मनानं, विचारानं, भावनेनं एक झाले आहेत अशी परिस्थिति निर्माण होईल तेव्हाच हें राज्य मोठं झालं असं म्हणूं शकूं."

हिंदुस्थानचा जो ज्ञात इतिहास आहे त्या इतिहासामध्ये एका राज्याखाली एवढे लोक कधीहि एकत्र आलेले नव्हते. सगळ्या भावा-भावांना एकत्र आणून हें नवं राज्य उभं केलेलं आहे. अर्थात् आपापल्या भाषांचा विकास, भाषांवर आधारलेली संस्कृति, कला आणि त्यांचा इतिहास यांची वाढ करण्याची खात्री, विश्वास आणि संधि या राज्यामध्ये जरूर मिळणार आहे. एकमेकांच्या हातांत हात घालूनच या नव्या संसाराचं काम करायचं आहे. नव्या राज्यामध्ये परमेश्वरानं, निसर्गानं दिलेलीं सर्व साधनं कामीं आणायचीं आहेत. विज्ञान, नवी अक्कल, नवी बुद्धि आणि आपल्याला दिलेले दोन हात या त्रिवेणीसंगमांतून नवीन शक्ति आणि नवीन सामर्थ्य उभं करून देशाचं राज्य सुखी करायचं आहे. वर्षांमागून वर्षे हें काम करत रहावं लागणार आहे याची कृपा करून मनाशीं जाणीव ठेवा आणि नव्या कामाकरितां नव्या राज्याच्या पाठीशीं उभे रहा ही साधी हाक देण्यासाठी, विनंती करण्यासाठी मी इतक्या लांब आलों आहे.

"मुख्य मंत्री म्हणून तुम्हीं स्वागत केलं, पण हें स्वागत मी व्यक्तिगत मानत नाही. व्यक्ति ही गोष्ट महत्त्वाची नाही. व्यक्ति येतात आणि जातात. समाज हा नेहमी पुढे चालत असतो. सत्कार व त्यासाठी वापरलेले शब्द, ज्या सिद्धान्तावर नवं राज्य उभं केलं आहे त्या सिद्धान्तासाठी आहे हें मी जाणून आहे. छोटीं छोटीं राज्यं करण्याच्या

प्रश्नाचा निकाल देशानं दिला आहे. जो प्रश्न संपला आहे, तो प्रश्न घडवून आणणार आहोंत अशी स्वतःची व लोकांची फसवणूक करून यापुढे राजकारण होणार नाही. असे प्रश्न जे लोक निर्माण करत आहेत त्यांच्याकडे आर्थिक दृष्टीनं लोकांपुढे मांडण्याइतका, कॉंग्रेसपेक्षा वेगळा कार्यक्रम नाही, असं जबाबदारीनं एका राज्याचा मुख्य मंत्री म्हणून मी सांगत आहे."

विदर्भाचा दौरा आटोपून १९५७ च्या जानेवारीमध्ये यशवंतराव मराठवाडा सर करायला निघण्यापूर्वी त्यांनी नागपूरला भेट दिली. नागपूरमधील चिटणीस पार्कवर त्यांचं १६ डिसेंबरला झालेलं भाषण म्हणजे भावनांचा कल्लोळ होता. त्या दिवशीं त्यांनी वक्तृत्वकलेचा कळस गाठला.

नागपूर शहर हें पूर्वी मध्यप्रदेशचं राजधानीचं शहर होतं. द्वैभाषिकानंतर नागपूरचं राजधानीचं महत्त्व संपलं होतं. नागपूरकरांच्या मनांत तें दुःख होतं. राजधानी असल्यामुळे शहराला एक प्रकारचा गौरव असतो; तो गौरव किंचितसा दुखावला गेला होता. यशवंतरावांना त्याची चांगली कल्पना होती.

यशवंतरावांनी या भेटींत या प्रश्नाचा प्रदीर्घ ऊहापोह करून लोकांच्या भावना हेलावून सोडल्या. एखाद्या शहराचं महत्त्व निव्वळ राजधानीवरच अवलंबून असतं असं नागपूरच्या मंडळींनी समजूं नये, हा मुद्दा त्यांनी श्रोत्यांना पटवला. त्यांचं असं सांगणं होतं की, "मुंबई ही आलीच पाहिजे असा कांही मंडळींचा आग्रह होता. ठीक आहे. मुंबई आली. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे, 'टू ईट दि केक ॲण्ड स्टिल हॅव इट्.' म्हणजे घरामध्ये एकच पोळी शिल्लक राहिलेली असते. कांही लोक असे चिक्कू असतात की, त्यांना पोळी खायची इच्छा तर असते आणि पोळी शिल्लक रहायलाहि हवी असते. आता या दोन्ही गोष्टी कशा शक्य आहेत ? एकदा पोळी खाऊन ती संपवली तरी पाहिजे किंवा न खातां शिल्लक तरी ठेवली पाहिजे. मुंबई राजधानी म्हणून पाहिजे असेल तर मुंबई राजधानी होईल. मग पुन्हा नागपूर कशी राजधानी होणार ? दोन्ही गोष्टी एकाच वेळीं शक्य नाहीत.

"नागपूर राजधानी राहिली नाही म्हणून कांही नागपूरचं महत्त्व कमी झालं असं समजण्याचं कारण नाही. कोणत्याहि शहराचं वैशिष्ट्य म्हणून कांही असतं; त्यावर त्या शहराचं महत्त्व अवलंबून असतं. शेवटीं खरं महत्त्व आहे कशाला ? राजधानीकरिता लढा देण्याला, की लोकांच्याकरिता लढा देण्याला ? विदर्भातील भद्रावती ही सुद्धा इतिहासकाळांत एक मोठी राजधानी होती. तें शहर आता छोटं गाव झालं आहे. लोकांना स्वाभाविकपणें त्याचं दुःख होतं. पण ह्या देशांत किती तरी राजधान्या होत्या आणि नंतर त्या बंद झाल्या. राजधान्याच नव्हे, राज्यंहि बंद झालीं. वेगळ्या वेगळ्या राजांचीं, घराण्यांचीं, जमातींचीं हीं राज्यं होतीं. हीं सगळीं राज्यं गेलीं, राजधान्या गेल्या. देशांत फक्त लोक शिल्लक राहिले. या लोकांचं महत्त्व वाढविणं हें काम शिल्लक राहिलं.

" जोंपर्यंत नागपूर शहरांतल्या लोकांचं कर्तृत्व शिल्लक आहे तोंपर्यंत या शहराचं महत्त्व कुणीहि कमी करूं शकणार नाही. निसर्गानं म्हणून कांही नागपूरला महत्त्व दिलेलं आहे. समुद्रकाठावर असल्यामुळे मुंबईला जसं महत्त्व आहे, तसं भारताच्या भू-गोलाच्या केंद्रस्थानीं असल्यामुळे नागपूरलाहि कांही महत्त्व आहे. हें महत्त्व कुणी काढून घेऊं शकणार नाही. नागपूरमध्ये राजधानी होती म्हणून त्याला थोडं महत्त्व होतं ही गोष्ट खरी; पण नागपूरचं महत्त्व संपूर्णतया राजधानीवर अवलंबून नव्हतं.

" हिंदुस्थानच्या केंद्रस्थानीं नागपूर शहर आहे हें त्याचं जें महत्त्व आहे, तें महत्त्व समजून घेऊन भारत सरकारला व मुंबई सरकारला आपली पराकाष्ठा करून स्वतः-च्या कल्याणाकरिता नागपूरचं महत्त्व कायम ठेवावं लागणार आहे. हें महत्त्व कायम ठेवण्यांत या शहरावर कुणी कांहीहि उपकार करणार नाही. राजधानी गेल्यामुळे महत्त्व कमी होईल ही भीति बाळगूं नका. पं. नेहरूंनीहि तें सांगितलं आहे. देशांतील मोठ्या व्यक्तीनं सांगितलं त्याच्यावर विश्वास ठेवणार, की दहा-वीस, पांच-पन्नास जणांच्या आरडाओरडीवर विश्वास ठेवणार, असा हा सवाल आहे. "

राज्य-पुनर्रचनेचा प्रश्न त्या वेळीं तरी संपलेला होता. तूर्तास त्यांत बदल होणं शक्य नव्हतं. समुद्रमंथनाची उपमा देऊन यशवंतरावांनी असं पटवण्याचा प्रयत्न केला की, समुद्रमंथन दोनदा झालं नाही. तें एकदाच झालं. त्यांतून अमृत आणि विष दोन्ही निघालीं. विष प्यायला एकटे महादेवच भेटले. त्यानंतर समुद्रमंथन करण्याचा प्रयत्न कुणीं केला नाही.

राज्य-पुनर्रचनेचं मंथन एकदा झालं आहे आणि तें आता पुन्हा होणार नाही असं बिंबवण्याचाच त्यांचा हा प्रयत्न होता. चांदा, भंडारा, नागपूर हे जिल्हे वेगळे निघणार आहेत अशी एक आवई त्या वेळीं उठली होती. अन्य कांही कामं नसणारांनी निष्कारण कांही तरी उद्योग किंवा विरोध करत रहाण्यासाठी या अफवा उठवण्याचं काम सुरू केलं होतं.

मुंबई राज्यांत आलेले हे जिल्हे परत जाण्यासाठी आलेले नाहीत हें या मंडळींना माहिती होतं. राज्याची राजधानीहि निश्चित झाली होती आणि त्यांत बदलहि अशक्य होता. नागपूला पूर्वी मंत्री नि राज्यपाल रहात होते. हायकोर्ट होतं. विधिमंडळाचं अधि-वेशन भरत होतं. वकीलपेशांतलीं कर्तृत्ववान्, बुद्धिमान् माणसं या शहरांत वास्तव्य करून होतीं. त्यांना या शहरांत राहून आपला धंदा करतां यावा अशी स्वाभाविक अपेक्षा असणारच. मुंबई राज्य नव्यानं अस्तित्वांत आल्यापासून लोकांकडून या भावना व्यक्त होत राहिल्यानं यशवंतरावांनी म्हणजेच मुंबई सरकारनं अर्थातच याचाहि विचार केला होता. नागपूरचं महत्त्व कमी होणार नाही, यासाठी त्यांतल्या त्यांत कोणत्या गोष्टी करतां येणं शक्य आहे याचा विचार सुरू झालेलाच होता. हायकोर्ट बेंच नागपूरला कायम ठेवायचं असा निर्णयहि सरकारनं केला होता. यशवंतरावांनी या सभेची संधि साधून लोकांना तें सर्व सांगितलं.

सर्वजण एका मोठ्या राज्यांत एकत्र आले ही वस्तुस्थिति घाबरून जावं अशी नव्हती. पण घाबरून सोडणारे होते. त्यांतून लोकांना सावरणं जरूर होतं. एखादी गोष्ट पटवायची तर ज्याला ती पटवायची त्याच्या काळजाला हात घालावा लागतो. त्याच्या अंतःकरणापर्यंत तो विचार पोंचवावा लागतो. यशवंतरावांच्या ठिकाणचं हें सामर्थ्य तर मोठं होतं. जाहीर रीतीनं फड जिंकीतच या जागेपर्यंत ते आता पोंचले होते. गुजराती आणि मराठी या भावांनी एकत्र रहावं असा निर्णय लोकसभेनं केला. हा निर्णय चुकीचा नाही असं लोकांना अजून पूर्णपणानं पटलेलं नव्हतं. त्यामुळे या दोघा भावांत भांडण उकरून काढण्यासाठीच कांही जणांची बुद्धि खर्च होत राहिली. देशाचं ऐक्य कायम राहिलं पाहिजे, भारताच्या हितामध्येच महाराष्ट्राचं हित सामावलेलं आहे असं यशवंतरावांनी आजवर अनेकदा सांगितलं होतं. नागपूरकर मंडळींना हाच विचार पण एका लोककथेच्या संदर्भात त्यांनी पुन्हा सांगितला.

" एकत्र रहाणारे दोन भाऊ भांडायला लागले. प्रेमानं एकत्र रहात होते, परंतु घरमालकिणीचं जमेना आणि त्यांतून वाद सुरू झाला. अखेर जें होतं त्याच्या वांटण्या करण्यापर्यंत पाळी आली. जमीन, घर, भांडीकुंडीं, जनावरं, कर्ज सर्व वांटून झालं. एकाच्या दोन चौकटी झाल्या. गाय एकाकडे तर वासरू दुसऱ्याकडे अशी फारकत झाली. हें सर्व आपसांत झालं. पण दोघांनाहि असं वाटलं कीं, हें सर्व आईला सांगावं. तिच्यासमोरच कागदावर सह्या करायच्या आणि वेगळं व्हायचं. वांटणी पुरी करण्यासाठी दोघेहि मग आईकडे गेले. आई मोठी शहाणी होती.

' काय, झाल्या वांटण्या ? ' आईनं विचारलं.

' हो, सर्व वांटण्या पुऱ्या झाल्या. ' – मुलं.

' सगळी मालमत्ता वांटून झाली ? ' – आई.

' हो. सगळी झाली. ' – मुलं.

' अरे, सगळं वांटलं खरं, पण मी तुमच्या दोघांची आई आहे. माझं काय केलंत ? आईचेहि दोन तुकडे करा ना ? ' – आई.

आईचे हे शब्द ऐकतांच मात्र दोघांहि भावांच्या डोळ्यांत पाणी आलं. जगामध्ये सर्व गोष्टींचे तुकडे करतां येतात, पण आई ही वस्तु अशी आहे की, आईच्या प्रेमाचे तुकडे करणं आजवर कुणालाहि शक्य झालेलं नाही. अर्थातच दोघां भावांनी वांटणीचा बेत रद्द केला. "

महाराष्ट्र आणि गुजरात यांमध्ये झालेले वाद अशाच प्रकारचे होते. वस्तुतः याच दोघांनी देशाला सुरुवातीपासूनच राष्ट्राभिमान शिकवला. ' स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच ' ही लो. टिळकांची मराठी वाणी इथेच प्रथम बाहेर पडली. राष्ट्र-धर्माचा धडा देणारा हा महापुरुष महाराष्ट्रांतच निर्माण झाला. ज्यांना राष्ट्रपिता म्हणून देशानं स्वीकारलं ते म. गांधी गुजरातमध्ये निर्माण झाले. आता या दोन प्रांतांतल्या लोकांनी वैरी म्हणून भांडावं की प्रेमानं एकत्र रहावं, असा प्रश्न

निर्माण झाला. तेव्हा देशाच्या नेत्यांनी निर्णय दिला की, या दोघांनी भाऊ-भाऊ म्हणून एकत्र राहिलं पाहिजे. उच्च आणि उदात्त पातळीवरून नेत्यांनी हा निर्णय केल्यानंतर, आता हे चार जिल्हे वेगळे, आमचं कांही तरी वेगळं राहूं द्या असं कोणी म्हणूं लागलं तर त्याचा अर्थ, त्या लोककथेंतलं रहस्य त्यांना उमगलेलंच नाही, असा करावा लागतो.

राज्य समृद्ध करायचं, उत्पादनक्षमता वाढवायची, उत्पादनाची पद्धति बदलायची, होणारी वाढ समाजामध्ये व्यवस्थित रीतीनं वांटून समाजांतील विषमता कमी करायची, कांही दूरचे आणि कांही नजीकचे प्रश्न होते त्या सर्वांना एकत्र येऊन विचार करायचा यांकडे फार थोड्या लोकांचं लक्ष होतं. यशवंतरावांना त्याचं खरं दुःख होतं. मुंबई राज्यांत सर्वांचं भाग्य आता एक झालं होतं, भविष्य एक ठरलं होतं. एकाचं जें वाईट तें दुसऱ्याचं वाईट आणि एकाचं जें चांगलं तें दुसऱ्याचंहि चांगलं ही स्थिति गृहीत धरूनच कामाला लागणं जरूर होतं.

या दौऱ्यांत यशवंतरावांनी याच मूलभूत विचारावर जोर दिला. जनतेचं, लोकशाहीचं राज्य चालवण्यासाठी, तें समृद्ध होण्यासाठी, प्रेम व सहकार्य हवं, पण आंधळं प्रेम, आंधळा विश्वास, आंधळं सहकार्य नको असं यशवंतराव जाणीव करून देत राहिले. जें कांही करायचं, ज्याच्याशीं सहकार्य करायचं तें सर्व समजून केलं तरच त्या सहकार्याला अधिक मोल येतं. यशवंतरावांनी या दौऱ्यांत अशा मोलाच्या सहकार्याची मागणी करतच दौरा संपवला.

आज साताऱ्यांत तर उद्या विदर्भांत, परवा गुजरातमध्ये, सौराष्ट्रामध्ये अशी त्यांची भ्रमंती सुरू राहिली. रोज शेकडो मैलांचा प्रवास, जाहीर सभांतून व्याख्यानं, चर्चा, भेटीगाठी, खलबतं, निर्णय आणि पुढचा टप्पा हीच त्यांची दैनंदिनी होती. एका बाजूला नव्या मुंबई राज्याबद्दल जनतेंत आत्मविश्वास निर्माण करण्याची त्यांची पराकाष्ठा होती. तर त्याच वेळीं दुसऱ्या बाजूला, महागुजरात परिषद आणि संयुक्त महाराष्ट्र समिति हे द्वैभाषिकाला कडवा विरोध व्यक्त होत रहावा यासाठी विरोधी चळवळींत हवा भरत राहिले होते.

यशवंतरावांच्या दौऱ्यानं आणि त्यांच्या बिनतोड युक्तिवादानं राजकीय वातावरण हळूहळू निवळूं लागलं होतं. शांतपणानं विचार करण्याच्या मनःस्थितीला लोक पोंचत आहेत, द्वैभाषिकाला पाठिंबा दर्शवत आहेत अशी परिस्थिति वाढूं देणं परिषद व समिति यांना अर्थातच सोयीची ठरणार नव्हती. कांही महिन्यांवर सार्वत्रिक निवडणुका येऊन ठेपलेल्या असतांना परिषद व समितीमधील कॉंग्रेसविरोधी पक्षांना कृत्रिम विरोध वाढवावाच लागणार होता. निवडणुकींत आपलं घोडं पुढे दामटायचं, तर भाषिक प्रश्नासंबंधीच्या लोकभावनेवर स्वार होऊन कॉंग्रेसशीं दोन हात करण्यासाठी अशांततेचं, कॉंग्रेसविरोधाचं वातावरण तापत ठेवणं एवढंच त्यांच्या हातीं उरलं होतं.

यशवंतरावांच्या अहमदाबाद दौऱ्याचं टिपण साधून विरोधकांनी जाणूनबुजून गोंधळाची परिस्थिति निर्माण करण्याचा असाच चंग बांधला. अहमदाबादला १५

डिसेंबर १९५६ ला यशवंतरावांचं भाषण व्हायचं होतं. महागुजरात परिषदेनं ही संधि साधून 'जनता कर्फ्यू'चा पुकारा केला. कम्युनिस्ट तंत्राचा अवलंब करून दहशतीचं वातावरण निर्माण केलं. लोकांना सभेस येऊं द्यायचं नाही यासाठी सर्व मार्गांचा अवलंब सुरू झाला. न जाणो, यशवंतरावांचे बोल ऐकून गुजराती बांधवांमधील मानवता, राष्ट्रप्रेम जागं झालं तर! परिषदेच्या लोकांना ही धास्ती निर्माण झाली असावी.

जनता कर्फ्यूवाल्यांनी, काँग्रेस-जनांवर दगडफेक करून त्यांना चिडवण्याचा, भडकवण्याचा प्रयत्न केला. हेतु हा की, गोंधळ माजून, लाठीहल्ला, गोळीबार इथपर्यंत मजल जावी. पुढच्या काळांत तेंच भांडवल उपयोगी पडणारं होतं. त्यानुसार विरोधकांनी परिस्थिति पुष्कळ चिघळवण्याचा प्रयत्न केला, पण यशवंतरावांची पकड कायम होती. भावनेवर स्वार होण्याचा त्यांचा बाणा. त्यांनी कुठंहि गोळीबार होऊं दिला नाही. उलट अहमदाबाद शहर काँग्रेसच्या सभेंत त्यांनी ठामपणानं द्वैभाषिकाचं समर्थन करून गांधीजींच्या गुजरातवर अन्याय झाला, तर न्यायच उरणार नाही असं सांगून द्वैभाषिकांत गुजरातला न्यायच मिळेल याची हमी दिली.

अहमदाबादच्या दौऱ्यांत पुढे दोन दिवसांनी एका प्रसंगीं यशवंतरावांच्या मोटारीवर विरोधकांनी तुफान दगडफेक केली. मोटारीवरील राष्ट्रध्वज काढून फेकून दिला, पायाखाली तुडवला. विरोधकांनी सारासार विवेकबुद्धीलाच तिलांजलि देऊन अत्यंत निषेधार्ह गोष्टी केल्या. राष्ट्रध्वजाचा अपमान करण्याची दुर्बुद्धि ज्या निदर्शकांना होते ते निदर्शक ज्या कोणा विरोधी पक्षाचे असतील त्या पक्षांना हें मुळीच शोभादायक नव्हतं; परंतु सभेंत दगडफेक करून आणि राष्ट्रध्वज पायाखाली घालून महागुजरात निर्माण करूं, या भ्रमांत असणाऱ्यांनी परिषदेलाच बदनाम करून टाकलं.

परिषदेनं हरताळाचा आदेश दिला असतांना त्याला प्रतिसाद मिळाला नाही त्यावरूनच परिषदेनं आत्मनिरीक्षण करण्याची वस्तुतः गरज होती. द्वैभाषिक मोडून महागुजरात ज्यांना मिळवायचा होता त्यांच्यासमोर निवडणुकीची संधि आलेली होती. निवडणुकींत सरकार बदलून घेऊन, लोकसभेंत बहुमत मिळवून किंवा मुंबई राज्यांत काँग्रेसला अल्पमतांत ढकलून त्यांना आपला हेतु लोकशाहीमार्गानं साध्य करण्याचा मार्ग उपलब्ध होता; परंतु गुंडगिरी करूनच आपलं वजन वाढवण्याचा अहंकार परिषदेला झाला आणि त्या भ्रमिष्टपणांत, लाजेनं मान खाली घालावी अशीं अनेक कृत्यं निदर्शकांनी केलीं. अहमदाबाद शहर काँग्रेसच्या अध्यक्षांचं धोतर खेचण्यापर्यंत हा चाहटळपणा पोंचला.

सर्वत्र अराजक माजलं असतांनाहि विवेक ढळूं न देतां यशवंतरावांनी नव्या मुंबई राज्याचा प्रचार धट्टपणें सुरूच ठेवला. देशाच्या हितार्थ ऐक्य राखा असा संदेश त्यांनी लोकांपर्यंत पोंचवला. स्वराज्यप्राप्तीनंतर निर्माण झालेल्या मानसिक वितंडवादाच्या बंडाला उत्तर म्हणून द्वैभाषिक राज्य निर्माण करण्यांत आलेलं असून भारताच्या इतिहासांतली ती एक अपूर्व घटना होती. समिति व परिषद हें राज्य तोडण्याच्या मागे

होतीं. निवडणुकींत या प्रश्नाचा निर्णय करायचा आहे असंच यशवंतरावांनी लोकांना आवाहन केलं. राष्ट्रीय भावनेला प्राधान्य देण्यासाठी आणि राष्ट्रीय ऐक्य टिकवून ठेवण्यासाठी मुंबई राज्य निर्माण झालं आहे हें त्यांचं विश्लेषण लोकांपर्यंत ठीकपणें पोंचत होतं.

डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत मजल दरमजल करत यशवंतराव पुण्यांत पोंचले. पुण्याची महात्मा फुले-मंडई म्हणजे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या छावणीचा मोठाच तळ. फुले-मंडईतच पुणेकर नागरिकांच्या वतीनं यशवंतरावांना मानपत्र देण्याचा बेत मुक्रर झाला. सरदार बाबूराव सणस हे त्या वेळीं शहरांत महापौर होते. त्यांच्याच अध्यक्षतेखाली ही सभा आणि मुख्य मंत्र्यांचा सत्कार झाला.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीचं पुणें हें तर प्रमुख केंद्र होतं. यशवंतरावांचा पुण्यांत सत्कार होण्याचं ठरतांच समितीच्या गोटांतहि निदर्शनाच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यानुसार सत्कार-सभा सुरू होतांच काळे झेंडे घेतलेले समितीचे निदर्शक सभास्थानीं आले आणि घोषणा, आरडा-ओरड सुरू झाली. मंडईतले कार्यकर्ते तयारच होते. सभेला हजारो नागरिक आलेले. ही सभा उधळली गेली असती, तर मंडईचं नाक कापलं जाणार होतं. मंडईकरांना तें आव्हानच होतं. निदर्शन आणि घोषणा सुरू होत्या तोंवर हे कार्यकर्ते गप्प राहिले. पण निदर्शक सभास्थानीं घुसून सभा उधळण्याचा प्रयत्न करूं लागतांच मंडईतले कार्यकर्तेच नव्हे, तर सभेंतले कांही लोकहि पुढे सरसावले आणि निदर्शकांना त्यांनी पळवून लावलं. सभा शांतपणें पार पडली.

द्वैभाषिकानंतरच्या दौऱ्यांत यशवंतरावांना सत्काराचे विविध प्रकार परिचयाचे झाले होते. महाराष्ट्रांत आणि गुजरातमध्येहि जाहीर सभा घेऊन ते परतले होते. पुण्यांतले लोक बुद्धिमान् म्हणून महशूर. बहुतेक अखिल भारतीय पुढारी पुण्याच्या मातींत वाढलेले. इथे तरी निदान एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडे माथेफिरूपणा घडणार नाही, अशी कल्पना बाळगून जे आले होते त्यांनाहि मंडईतल्या निदर्शन-प्रकारानं धक्का बसला. वस्तुतः या बुद्धिमान् मंडळींनी यशवंतरावांचे विचार ऐकण्यास घाबरण्याचं कांही कारण नव्हतं; परंतु यशवंतरावांचे विचार ऐकल्यानं आपली बुद्धीहि कदाचित् ढळेल अशी भीति त्यांना वाटली असली पाहिजे. आरडाओरड आणि निषेध असल्या प्रकारांनी यशवंतराव घाबरून पळून जाणारे नाहीत हें खरं म्हणजे पुणेकर मंडळींच्या परिचयाचं झालं होतं. तरी पण निदर्शनाच्या मार्गाचा अवलंब करून सभा उधळण्याचा प्रयत्न त्यांनी करून पाहिलाच. विचारांची मक्तेदारी फक्त आमचीच आहे असं कदाचित् पुणेकरांना या निमित्तानं सिद्ध करायचं असावं!

लोकशाहीचे पवाडे म्हणायचे, भाषण-स्वातंत्र्याची, विचार-स्वातंत्र्याची पल्लेदार महती सांगायची आणि आपल्या सुरांत सूर मिसळून जो कुणी बोलणार नाही त्याला बोलूंच द्यायचं नाही आणि तेंहि लोकशाहीची जपमाळ हातांत धरून, हा अनुभव

यशवंतरावांच्या संग्रहीं या चळवळीमध्ये साठलेलाच होता. त्यामुळे मोठ्या जिद्दीनं लोकशाही-मार्गानंच त्या दिवशीं त्यांनी आपले विचार लोकांना ऐकवले.

समितींत विविध हेतूनं दाखल झालेल्या पक्षांना त्या दिवशीं त्यांनी 'कोशिंबीर' म्हणून संबोधलं. निवडणुकीच्या वेळीं फक्त अनेक पक्षांनी एकत्र येऊन निवडणुका लढवायच्या आणि निवडणुका संपल्या की हा एकोपाहि संपायचा, असं विरोधी पक्षांच्या बाबतींत नेहमीच घडतं. जनतेचं हित समोर ठेवून सेवेसाठी पक्षास जन्मास घालायचं असतं; परंतु निवडणुकीसाठी एकत्र आलेल्या पक्षांच्या निष्ठा अजब, नेतृत्वहि अजब आणि संघटनेचा डोलारा तर त्याहून अजब. यशवंतरावांनी म्हणूनच त्याला कोशिंबिरीची उपमा दिली. कोशिंबिरीनं कुणाचं कधी पोट भरत नाही. जेवतांना कोशिंबिरीनं जेवायला चव मात्र येते. श्रोत्यांनी तुडुंब भरलेल्या सभेंत निदर्शनांच्या या कोशिंबिरीनं त्या दिवशीं न्यारीच चव आली.

विरोधी पक्षांनी केवळ निषेध आणि आरडाओरड करण्यापेक्षा काँग्रेस-पक्षाप्रमाणे खंबीर नेतृत्व निर्माण करावं, जनतेचं हित डोळ्यासमोर ठेवून काँग्रेसप्रमाणे कांही काम निर्माण करावं असाच सल्ला त्यांनी या सभेंत विरोधकांना दिला.

द्वैभाषिक नको म्हणून विरोधी पक्ष निषेध करत होते; परंतु त्याच वेळीं निवडणुका लढवून राज्यावर जाण्याचाहि त्यांचा मनस्वी प्रयत्न होता. या पक्षांना जें नको आहे तिथे जाण्याचा प्रयत्न करतांना राजकीय, सामाजिक, आर्थिक कार्यक्रम घेऊन लोकांसमोर जावं याचं भान त्यांना राहिलं नव्हतं. यामुळे ते पक्ष स्वतःची आणि जनतेचीहि फसवणूक करत आहेत अशी टीका त्यांना ऐकावी लागली; परंतु अशांतता निर्माण केल्यानं राज्यं मिळत नाहीत हें ऐकण्याच्या मनःस्थितींतहि कुणी नव्हतं.

यशवंतराव लोकांना कांही विधायक आणि राष्ट्रहिताचं असं ऐकवत होते आणि हळूहळू त्याचा परिणामहि घडत राहिला होता. चव्हाणांच्या नेतृत्वाखाली द्वैभाषिक प्रामाणिकपणें राबवूं अशी प्रतिज्ञा करतच काँग्रेसचे कार्यकर्ते कामाला लागले होते. १९५७ च्या निवडणुकीचं जें रणांगण झालं त्यांत ही प्रतिज्ञा घेऊनच काँग्रेस कार्यकर्ते उतरले. संयुक्त महाराष्ट्र समितीहि आवेशानं, सर्वशक्तिनिशी सामना देण्याच्या तयारीत होती.

निवडणूक प्रचाराच्या त्या दोन-तीन महिन्यांत 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' या बुलंद घोषणेनं समितीनं सारा महाराष्ट्र जागा केला. प्रतिघोषणांनी काँग्रेसनं रान उठवलं. या निवडणुकींतील संघर्ष महाराष्ट्रांत अभूतपूर्व झाला. काँग्रेसचे नेते जिथे प्रचारासाठी जात त्या ठिकाणीं गोंधळ हा व्हायचाच. दगडगोटे, जोडे तयार असत. निषेध-घोषणांनी तर वातावरण दुमदुमून जात असे. काँग्रेसच्या सभेंत, वक्त्याला अड-चणींत टाकणारे प्रश्न, कोणते आणि कसे विचारायचे, आणि उत्तर कसंहि दिलं जावो, हुर्यो करण्याचा हक्क बजवायचाच, याचे अगदी पद्धतशीर धडे समितीच्या कार्यकर्त्यांना दिले जात होते. उण्याला भर म्हणून, समितीचा पुरस्कार करणारीं वृत्तपत्रं होतींच.

काँग्रेसवाल्यांना हें गाव बंद आहे किंवा वाडा, चाळ बंद आहे अशा न लागलेल्या पाट्याहि हिकमती पत्रकारांना त्या वेळीं दिसल्या आणि बातमीच्या रूपानं त्या त्यांनी लोकांपर्यंत पोंचवल्या. एखाद्या गावांत असं घडल्याचं वृत्त प्रसिद्ध झालं की, अन्य गावांतून प्रत्यक्षांत त्याची लागण होत असे; या सगळ्याचा अर्थ एवढाच होता की, जनता रागावली होती आणि आपला राग व्यक्त करून काँग्रेसवाल्यांना आणि मतदारांना त्याची जाणीव करून देण्यासाठी सुचतील ते मार्ग अवलंबण्याची गावागावांतून चढाओढ सुरू झाली होती. वैयक्तिकदृष्ट्या काँग्रेस-नेत्यांबद्दल अनादर होता असं नव्हे. काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, केशवराव जेधे, शंकरराव मोरे, अशा नेत्यांच्याबद्दल लोक खाजगतांत आदर व्यक्त करत, पण निवडणूक-प्रचाराची वेळ आली की, 'काँग्रेसला आपटा' अशा घोषणा सुरू होत असत.

काँग्रेस-पक्षाचे नेते यशवंतराव हे कराड मतदार-संघांतून निवडणूक लढवत होते. केशवराव पवार, हे त्यांचे विरोधक. ही लढत अविस्मरणीय झाली. तशी ती होणारच होती. द्वैभाषिक राबवण्याचा वसा यशवंतरावांनी घेतला होता. निवडणुकींत त्यांचा पराभव म्हणजे द्वैभाषिकाचा पराभव असं समितीचं गणित होतं. त्यामुळे समितीच्या भल्याभल्यांनी आपली सारी शक्ति-युक्ति या निवडणुकीवर खर्च केली. यशवंतरावांना त्या वेळीं कोंडींत पकडल्यासारखं झालं.

विशाल द्वैभाषिकांत काँग्रेसला सर्वत्र विजयी करायचं, त्यासाठी डावपेंचाची आखणी करायची, दौरे करायचे हीं व्यवधानं त्यांच्या पाठीशीं प्रामुख्यानं होतींच, शिवाय त्याच वेळीं, स्वतःच्या मतदार-संघाकडे काळजीपूर्वक लक्ष द्यावं लागणारच होतं. कारण समितीचा सारा फौजफाटा कराड सर करायला जमा झाला होता.

कराडकरांना यशवंतरावांबद्दल आदर होता, अभिमान होता. मुख्य मंत्री झाल्या-नंतर बाराशेच्यावर पुष्पहार घालून कराडनं त्यांना मानपत्रहि दिलं होतं. पण सर्वसामान्य जनता संतापलेली होती. त्यांचा संताप कायम राहील, वाढेल यासाठी समितीच्या सभां-मधून बरंच कांही सांगितलं जात होतं. ९ एप्रिलला ही निवडणूक झाली आणि ६०० मतांनी यशवंतराव विजयी झाले. मतांमधील हें अंतरच निवडणूक कशी अटीतटीची होती हें सिद्ध करण्यास पुरेसं ठरतं.

समितीचा मोहरा एस्. एम्. जोशी पुण्यांतून निवडणूक लढवत होते. पुण्याचे पहिले महापौर आणि बहुजन-समाजाचे आवडते पुढारी सरदार बाबूराव सणस हे काँग्रेस-पक्षाचे उमेदवार म्हणून होते. या निवडणुकींतहि अशीच भवति न भवति झाली, आणि अखेर एस्. एम्. विजयी झाले. दोन्ही बाजूंचे दोन प्रमुख विजयी झाले. त्यामुळे काँग्रेसचा, द्वैभाषिकाचाहि विजय झाला आणि समितीचा, संयुक्त महाराष्ट्राचाहि विजय झाला, असं मग सांगितलं जाऊं लागलं.

निवडणुकीच्या एकूण निकालांत, राज्य करण्याइतकं काँग्रेसला बहुमत मिळालं हें जरी खरं, तरी या पक्षाचे बरेच मोहरे पडले. खुर्दा किती उडाला याची तर गणतीच नाही.

यशवंतराव मात्र अंबारींत शाबूत होते. शरसंधानासाठी पवित्र्यांत होते. द्वैभाषिक स्वीकारलं तेव्हा आणि आता या निवडणुकींत यशवंतरावांचा खरा कस लागला. महाराष्ट्र नाराज, गुजरात नाराज, मोरारजींनी आगींत तेल ओतून ठेवलेलं, जावं तिथे निदर्शनं, पहावं तिथे दगड-गोटे, जोडे, ऐकावं तिथे शिव्या! शत्रु आणि मित्र यांच्यांत दिसलीच तर पुसट – अंधुक रेषा, असं सर्वत्र निर्माण झालं होतं.

काँग्रेसचा मोठा पराभव झाला, पण कालांतरानं हा पराभवच महाराष्ट्राला आणि महाराष्ट्र-काँग्रेसला, आणि यशवंतरावांना लाभदायक ठरला, असं इतिहास सांगतो. काकासाहेब गाडगीळ लोकसभेच्या निवडणुकींत पुण्यांतून पराभूत झाले आणि समितीचे ना. ग. गोरे हे गोवाफेम पुढारी विजयी झाले; परंतु काकांच्या पराभवानं दिल्ली हादरली. महाराष्ट्रांतले मोहरे गळाले, पण अशा अनेकांच्या पराभवानं पंडित नेहरूंना अंतर्मुख बनवलं; काँग्रेसला आत्मपरीक्षण करणं भाग पडलं. हाच खरा समितीचा विजय होता. १९५७ च्या निवडणुकींत काँग्रेस, प्रजासमाजवादी पक्ष, शेतकरी-कामकरी पक्ष, जनसंघ, वर्गीकृत ज्ञाति फेडरेशन, रामराज्य परिषद, कम्युनिस्ट पक्ष, महागुजरात जनता परिषद आणि स्वतंत्र, असे सारे उतरले होते.

निवडणुकांचा निकाल जाहीर झाला आणि काँग्रेसला कामापुरतं बहुमत मिळतांच यशवंतरावांची पुन्हा नेतेपदीं निवड झाली. १९५६ च्या निवडीनंतर अवघ्या सहा महिन्यांच्या अवधींत त्यांना आता मुख्यमंत्रिपदाची पुन्हा शपथ घ्यावी लागली. नवं मंत्रिमंडळहि तयार करावं लागलं. त्या वर्षीच्या १२ एप्रिलला १५ मंत्री आणि १२ उपमंत्री असलेल्या मंत्रिमंडळाचा शपथविधि झाला. विशुद्ध, कार्यक्षम व निःपक्षपाती राज्यकारभाराची हमी देऊन यशवंतरावांची राजवट पुन्हा पुढे सुरू झाली.

# १८

मुंबई राज्यासमोरच्या समस्या कमी झालेल्या नव्हत्या. समस्या एवढ्या मोठ्या होत्या, कर्तव्यं एवढीं पवित्र होतीं की, त्यांत संघर्षाला वाव नव्हता. फुटीर प्रवृत्तींना थारा दिल्यानं अडचणी गंभीर बनणार होत्या. नवं द्वैभाषिक राज्य सहा महिन्यांपूर्वीच उदयास आलं होतं आणि राज्याच्या उद्‌घाटनापूर्वी माजलेल्या वादाची धूळ अजून खालीं बसलेली नव्हती. चळवळीच्या काळांत घडलेल्या दुर्दैवी घटनांनी झालेल्या जखमांचा परिणाम भोगणारांची संख्या बरीच मोठी असल्यानं, सत्तावनच्या निवडणुकी-नंतर पुन्हा राजशकट हाकण्याचं काम सुरू करण्यापूर्वी यशवंतरावांना त्याची दखल घेणं क्रमप्राप्तच ठरलं.

दंगलीच्या काळांत त्यांचा एखादा नातेवाईक, स्नेही अथवा कुटुंबांतील कर्ता-सवरता माणूस मृत्यु पावला असेल, जखमी झाला असेल अथवा त्यामुळे जे कष्टी असतील, त्यांच्या दुःखाविषयी यशवंतरावांनी या नव्या उद्‌घाटनाच्या वेळीं सहानुभूति व्यक्त केली. इतकंच नव्हे तर, दंगलींत बळी पडलेल्या निरपराधी लोकांना शक्य ती मदत करण्याच्या सरकारी धोरणाची घोषणा करून हें धोरण अमलांत आणण्याची पराकाष्ठा करण्याचं आश्वासनहि दिलं.

सरकारचीं धोरणं भावनात्मक दृष्टीनं न आखतां सामाजिक आणि आर्थिक दृष्टीनं आखण्यास मुख्य मंत्र्यांनी यापूर्वीच सुरुवात केलीच होती. कल्याणकारी राज्याचं ध्येय दुसरं-तिसरं कांही नसून, नव्या सामाजिक आणि आर्थिक दृष्टिकोनाची ती अभिव्यक्ति आहे असं सिद्ध करण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न होता. लक्षावधि जनतेचं कल्याण साध्य करायचं, तर जनतेच्या सर्वांगीण कल्याणाच्या प्रयत्नांत जनतेच्या सहकार्याची नितान्त गरज होती. सहकार्यासाठी दिलेला हात झिडकारला जाणं शक्यच नव्हतं. यशवंतरावांचं तसं मुळी आश्वासनच होतं.

पंचवार्षिक योजना सुरू झाल्या होत्या. जनतेच्या सर्वसाधारण स्थितींत सुधारणा घडवून आणणं हें या योजनांचं उद्दिष्ट ठरलं होतं. त्या अनुषंगानं, औद्योगीकरणाच्या आणि जमीन-सुधारणेच्या क्षेत्रांत उत्पादन-कार्याला ज्या योगे चालना मिळेल अशा रीतीनं धोरण तयार करणं आणि त्याचबरोबर सर्वांना न्याय मिळवून देणं हें अर्थातच सरकारचं कर्तव्य ठरलं. राज्याच्या औद्योगीकरणाची सर्वंकष योजना यशवंतरावांच्या मनांत बद्ध होती. उत्पादनाच्या बाबतींतच नव्हे, तर या उत्पादनाचे फायदे मालक-कामगार आणि सर्वसाधारण जनता यांच्यामध्ये विभागून रहातील, विभागून देण्याच्या बाबतींत समानता व एकसूत्रीपणा राहील, यावरहि मुख्य मंत्र्यांचा कटाक्ष होता.

हें सर्व घडायचं, औद्योगिकरणाची सर्वंकष योजना अमलांत यायची, तर त्यासाठी पुरेसं तांत्रिक साहाय्य राज्यांत उपलब्ध करून द्यावं लागणार होतं. शैक्षणिक आणि व्यावहारिक अशा या साहाय्याची आवश्यकता असल्यानं तांत्रिक शिक्षणाची राज्यांत सोय करण्याच्या निर्णयाचा विचार करणं मग क्रमप्राप्त ठरलं. तंत्रविशारदांच्या कमतरतेमुळे कार्यांत खंड पडणार असेल, तर औद्योगीकरण यशस्वी व्हावं कसं ? साध्य आणि साधन याचा मिलाप होणं ही नव्या राज्याची गरजच होती. त्यांतूनच तांत्रिक शिक्षणाच्या सोयी वाढवण्यासाठी सरकार कोशीस करील, असं आश्वासन यशवंत-रावांनी दिलं.

राज्याच्या औद्योगिकरणाप्रमाणेच शेतीचा प्रश्नहि मूलभूत होता. जमीनविषयक सुधारणेचा कायदा करण्यांत त्याअगोदर दहा वर्षे राज्य गुंतलेलं होतं. या कायद्याचा शेतकऱ्यांच्या जीवनावर आणि भवितव्यावर मूलगामी असा परिणामहि झाला. पुढच्या काळांतहि तो तसा होणार होता. शेतीच्या क्षेत्रांत प्रगति साध्य करायची, तर या प्रश्नाच्या मानवी आणि आर्थिक अशा दोन बाजू असल्यानं त्या सहानुभूतीनं आणि कल्पकतेनं सोडवाव्या लागतील, हें यशवंतरावांनी जाणलं आणि तशीं पावलं टाकण्याचं ठरवलं.

राज्याच्या विकासावर लक्ष केंद्रित करतांना, विकासाचं जें माध्यम – कारभार-यंत्रणा त्याकडे वेगळ्या दृष्टिकोनांतून लक्ष द्यावं लागणार आहे; असा पहिल्या सहा महिन्यांतला यशवंतरावांचा अनुभव होता. लोकांशीं ज्यांचा प्रत्यक्ष संबंध येतो किंवा नागरिकांशीं अप्रत्यक्ष संबंध येणारीं कामं ज्यांना करावीं लागतात, अशा कारभारांत गुंतलेल्या सर्व व्यक्तींना लोकांच्या गरजा ओळखतां आल्या पाहिजेत. गरजा नीटपणानं न ओळखल्या गेल्यानंच लोक आणि कारभार-यंत्रणा यांत अंतर पडत रहातं. या दृष्टीनं कारभार-यंत्रणेची व पद्धतीची पुनर्रचना करण्याची मूलभूत गरज त्या वेळीं राज्यांत होती. प्रशासन परिणामकारक आणि न्यायाचं ठरायचं, तर कारभाराच्या आणि कायद्याच्या बाबतींत निरनिराळ्या प्रदेशांत समानता ही असावीच लागते. अन्यथा राज्याच्या यंत्रणेचा जास्तींत जास्त लोकांना फायदा मिळूं शकत नाही. कार्यक्षम कारभाराबद्दल

यशवंतरावांच्या कल्पना अगदी सुस्पष्ट अशा होत्या. त्यांनी त्याबद्दल आपल्या वक्तव्यांतून दिलेली जाणीव मोठी बोलकी आहे –

" कार्यक्षमता म्हणजे हातांतलं काम झटपट निकालांत काढणं नव्हे. कामाशीं ज्या माणसांचा संबंध असेल त्यांना आपलं म्हणणं ऐकून घेण्यांत आलं व आपल्याला न्याय मिळाला असं समाधान मिळवून देणं यांत खरी कार्यक्षमता आहे. कार्यक्षमतेविषयी ही कल्पना राज्याला सविस्तर कृतींत आणायची आहे. अधिकारीवर्ग आपलीं कर्तव्यं न्यायबुद्धीनं, सेवाभावानं, निर्भीडपणें आणि निःपक्षपातीपणें, धर्म, जात अथवा राजकीय मतभेद यांचा विचार न करतां करील असं पाहिलं पाहिजे. राज्यांतल्या लोकांना जास्तींत जास्त विशुद्ध, कार्यक्षम व निःपक्षपाती असा कारभार देण्याच्या प्रयत्नांत कोणत्याहि प्रकारे कसूर करण्यांत येणार नाही. "

यशवंतरावांनी खुलेपणानं हें सांगून राज्याचं भवितव्य उज्ज्वल आहे अशी श्रद्धा राज्याच्या पहिल्याच दिवशीं त्यांनी विश्वासानं, खात्रीपूर्वक व्यक्त केली.

कॉंग्रेसशीं मतभेद असलेले लोक बहुसंख्येनं निवडून आले होते आणि विधानसभेंत दाखल झाले होते; परंतु मतभेद असणारांना सुद्धा सर्व जनतेचं कल्याण साध्य करणं हेंच अपेक्षित असल्यानं, राज्याची यशस्वी वाटचाल होण्यासाठी तेहि जास्तींत जास्त सहकार्यच देतील असं सांगून विरोधकांनाहि त्यांनी विधायक दृष्टि देण्याचा प्रयत्न केला. विरोधकांचा राग, शंका, अविश्वास, प्रेमानं व सेवेनं नाहीसा करण्याचा, कमी करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. विधानसभेंत आणि बाहेरहि ते याच धोरणाचा पाठपुरावा करत राहिले.

१९५७ च्या निवडणुकीनंतर विरोधी पक्षांतील कांही पुढाऱ्यांनी कॉंग्रेसविरुद्ध ' छोडो महाराष्ट्र 'चा पुकारा करण्यास प्रारंभ केला होता. निवडणुकींत महाराष्ट्रामध्ये कॉंग्रेसचा पाडाव झालेला असला तरी २० लाख मतदारांनी कॉंग्रेसला मतं दिलीं होतीं. राज्यकारभार करण्याइतकं बहुमतहि मिळालं होतं. कॉंग्रेसविरुद्ध ' छोडो महाराष्ट्र ' पुकारा करण्यानं २० लाख मतदारांना आपण महाराष्ट्राबाहेर हुसकून लावूं शकत नाही याची जाणीव विरोधकांना नव्हती असं नव्हे; परंतु जनतेचा राग सतत धुमसत रहाण्यासाठी अशा घोषणांच्या भांडवलाचा त्यांना उपयोग होता.

जनतेनं अशा घोषणांचा वस्तुतः शांतपणें विचार करण्याची आवश्यकता होती. महाराष्ट्रांत यादवी निर्माण करण्याची, विद्वेष फैलावण्याची भावना या भाषेमागे आहे, असं यशवंतरावांना त्यामुळेच जनतेला सांगावं लागलं. आपण महाराष्ट्रप्रेमी आहोंत असा विरोधकांचा दावा असायचा, परंतु यशवंतराव महाराष्ट्रप्रेमी नाहीत असं सिद्ध करणं त्यांच्या आवाक्याबाहेर होतं. तसं सिद्ध करतां येणारहि नव्हतं.

यशवंतराव दुसऱ्या खेपेस मुख्य मंत्री म्हणून निवडले गेले होते, तरी पण महाराष्ट्रांतली परिस्थिति त्या काळांतहि मोठी अडचणीची होती. या अडचणींतूनच त्यांना मार्ग काढावा लागणार होता. लोकमत, लोकप्रेम त्यांच्या बाजूचं नव्हतं. कर्तृत्वाची, गुणांची

कसोटी लागावी अशीच एकूण स्थिति होती. काँग्रेस-पक्ष संकटांत सापडलेला असल्यानं पक्षाची बाजू सावरायची आणि त्याच वेळीं लोकांना उत्तम प्रशासकीय कारभाराची प्रचीति आणून द्यायची अशा दुहेरी आघाडीवर कस लागणार होता.

या काळांत त्या दृष्टीनं यशवंतरावांनी सर्वप्रथम राज्यकारभारावर लक्ष केंद्रित केलं. राज्यकारभार सुधारायचा तर राज्याचीं मार्गदर्शक तत्त्वं, धोरण-सूत्री निश्चित करावी लागणार होती. यात्रेला निघालेल्या यात्रेकरूला जिथे कुठे पोंचायचं तें स्थळ निश्चित करावं लागतं. यशवंतराव हे राजकीय झेंडा घेऊन निघालेले यात्रेकरू. जनतेचं अंतिम कल्याण साधणं हें त्यांच्या यात्रेचं प्रमुख उद्दिष्ट होतं. नव्यानं सुरू झालेली ही यात्रा दीर्घकाळ चालणारी होती हें तर उघडच होतं. मुख्य अडचण होती ती या यात्रेंत सर्वांना सामील करून घेण्याची आणि विश्वासानं सर्वजण सामील कसे होतील याची!

महाराष्ट्राच्या भवितव्याच्या यात्रेवर निघण्यापूर्वी, म्हणूनच यशवंतरावांनी राज्याची धोरण-सूत्री बनवली आणि मगच पहिलं पाऊल उचललं. संयुक्त महाराष्ट्र हेंच साध्य, असं त्या वेळीं महाराष्ट्रांत मानलं गेलं होतं. राज्याची धोरण-सूत्री बनवून यशवंतरावांनी त्याच्याहि पुढे झेप घेतली. संयुक्त महाराष्ट्र हें केवळ साध्य नाही, तर सामाजिक एकता आणि समानता गाठण्याचं तें साधन आहे आणि प्रशासकीय कारभाराद्वारे या साधनाचा पुरेपूर वापर करण्यांत येणार आहे याची ग्वाही, जनतेला त्यांच्या या नव्या धोरणांतून मिळाली.

महाराष्ट्राच्या सर्व समस्या एका देशाच्या राष्ट्रीय वृत्तीच्या पार्श्वभूमीवर सोडवल्या पाहिजेत आणि भारताचा अविभाज्य भाग म्हणूनच या राज्याचा विकास करण्यांत आला पाहिजे, हें या धोरणाचं मूळ सूत्र होतं.

महाराष्ट्राच्या विरोधी, कुणी तरी वैर करणारीं माणसं आहेत, कुठे तरी तीं बसलेलीं आहेत अशा भावना मनांत वाढवून, आपल्याच मनानं आपल्या विरुद्ध एखादा शत्रु निर्माण करून आणि त्याच्याशीं आपल्याच मनांतली समशेर काढून लुटुपुटूची लढाई करत बसण्यांत कांही फारसा अर्थ राहिलेला नव्हता. राष्ट्र-निष्ठा आणि महाराष्ट्र-निष्ठा एकमेकांच्या हातांत हात घालून चालणारी आहे, राष्ट्र आणि महाराष्ट्र यांच्या प्रवृत्ति परस्पर-विरोधी नाहीत हें केव्हा तरी एकदा स्पष्ट होण्याची गरज होती. महाराष्ट्राचे अनेक प्रश्न होते, परंतु हे प्रश्न राष्ट्रीय बाबींच्या पार्श्वभूमीवर निश्चित करावेत आणि इतर भागांबरोबर जास्तींत जास्त मित्रत्वाचे संबंध राखून, बंधुत्वाच्या संबंधांना धक्का न पोंचतां राज्यानं आपला विकास करून घेतला पाहिजे, असा दृष्टिकोन यशवंतरावांनी स्वीकारला.

राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये एकभाषी राज्याचा हेतूहि त्यांनी स्पष्ट केला. राज्याच्या कारभारांत एकभाषी लोकांना भाग घेणं सोयीचं व्हावं ही भाषिक राज्याच्या मागणीसंबंधीची भूमिका होय. त्या दृष्टीनं आपलीं नेहमींचीं कामं व कारभार मातृभाषेंतून लोकांना सुलभपणें पार पाडतां येईल, स्वतःच्या भाषेंत त्यांना सरकारसमोर मागण्या

मांडतां येतील, स्वतःच्या भाषेंत त्यांना आपल्या मुलाबाळांना शिक्षण देतां येईल आणि आपलं वाङ्मय, कला व इतर गोष्टी यांच्या माध्यमाद्वारे त्यांना आपला सांस्कृतिक विकास घडवून आणणं सुलभ जाईल अशी ग्वाही देण्यांत आली. भाषिक एकसंधता निर्माण करणं ही समस्या तितकीशीं बिकट नव्हे. जनतेचं जास्तींत जास्त कल्याण साधणं ही खरी बिकट समस्या होय. राज्यांतलीं सरकारी धोरणं, निवळ भावनेपेक्षा सामाजिक व आर्थिक विचारांनी प्रेरित झालेलीं असतील तरच ही प्रमुख समस्या सुटण्याची शक्यता अधिक, हें लक्षांत घेऊनच महाराष्ट्र राज्याचा कारभार जात, धर्म, भाषा अथवा प्रदेश या बाबतींत कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न करतां चालवण्यांत येईल, हें एक मार्गदर्शक तत्त्व म्हणून मान्य करण्यांत आलं होतं.

महाराष्ट्राचं राज्य म्हणजे कुणाचं राज्य हेंहि या मार्गदर्शक तत्त्वांत निश्चित करण्यांत आलं. सामाजिक मन एकजिनसी बनण्यावरच सर्वांगीण विकास अवलंबून असतो. त्या दृष्टीनं महाराष्ट्रांत हा ब्राह्मण-ब्राह्मणेतर, मराठा-मराठेतर, अमका-अमकेतर असा विचार करण्यापेक्षा सगळ्या लोकांची एकजिनसी कार्यकर्त्यांची सेना उभी करण्याचं उद्दिष्ट त्यांनी ठरवलं आणि विशिष्ट समाजाच्या अथवा गटाच्या संकुचित दृष्टिकोनांतून विचार करणाऱ्या क्षुद्र बुद्धीच्या लोकांना महाराष्ट्रांत थारा मिळणार नाही असंहि बजावण्यांत आलं. मराठी राज्य याचा अर्थ मराठा राज्य किंवा एका जातीचं – निदान मराठ्यांचं किंवा आणखी एखाद्या जातीचं राज्य असा कदापि करण्यांत येणार नसून जिथे जिथे गुणवत्ता आढळेल तिथे तिथे गुणांची पूजा जरूर आहे असं सूत्र ठरलं.

विदर्भ, मराठवाडा आणि मुंबई शहर यांच्यासंबंधांतहि सरकारचं धोरण लोकांसमोर येणं आवश्यक होतं. मुंबई राज्याच्या विभाजनावरील चर्चेंत असं आढळून आलं होतं की, विदर्भांतील व मराठवाड्यांतील लोकांच्या भावनांचा आदर करण्याची आणि त्यांच्या विशेष गरजांची जाणीव ठेवण्याची जरुरी आहे. नागपूर-करार म्हणून ओळखण्यांत येणाऱ्या करारान्वये दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी करून शक्य असेल तिथे याहूनहि अधिक सवलती देण्यांत याव्यात याला मान्यता अगोदरच देण्यांत आली होती. त्याचप्रमाणे मुंबई शहराच्या बाबतींत मुंबईचं बहुरंगी स्वरूप कायम टिकवावं आणि शहराच्या विकासाकडे विशेष लक्ष पुरवण्यांत यावं याहि गोष्टींना मान्यता दिली होती. त्या दृष्टीनं उर्वरित महाराष्ट्राच्या वतीनं कांही उपाय योजण्याचं धोरण या नव्या धोरण-सूत्रांत नमूद करण्यांत आलं.

मुंबई शहराला उभ्या भारतांत एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालेलं आहे. निरनिराळ्या समाजांनी त्यासाठी प्रशंसनीय असे प्रयत्न केलेले आहेत. मुंबईनं राज्याच्या व देशाच्या भरभराटींत अतिशय महत्त्वाची आणि उल्लेखनीय भर घातली हें मान्य करावंच लागतं. मुंबईचं हें स्थान टिकवणं व भारतांतल्या पहिल्या क्रमांकाच्या या प्रमुख शहराच्या योग्य विकासाकडे विशेष लक्ष देणं यासाठी सरकारला प्रयत्नशील रहावं

लागणार होतं. त्यासाठी म्हणून, मुंबई शहर ज्या भिन्नभाषीय व बहुरंगी स्वरूपाबद्दल प्रसिद्ध आहे तें स्वरूप वाढवायचं ध्येय सरकारनं मान्य केलं.

महाराष्ट्रीय, गुजराती, पारशी, मारवाडी, पंजाबी, सिंधी, बंगाली, दाक्षिणात्य, मुसलमान आणि ख्रिस्ती असे सर्व लोक या शहरांत सारख्याच मित्रत्वानं व गुण्यागोविंदानं भूतकाळांत नांदले आणि परस्पर-आदराच्या व सलोख्याच्या भावनेनं एकत्र होऊन त्यांनी कार्यहि केलं. नवीन राज्यामध्ये इतर भाषा बोलणाऱ्या लोकांच्या मनांत सुरक्षितपणाची भावना वाढेल, त्यांचा आपणांवरील विश्वास वाढेल याविषयी काळजी घेणं हें मराठीभाषी लोकांचं कर्तव्य असल्याची जाणीव नव्या धोरणांत करून देण्यांत आली; आणि सगळ्यांनी बंधुत्वाच्या भावनेनं इथे रहावं, स्वतः सुखी व्हावं, मुंबईला समृद्ध करावं म्हणजे महाराष्ट्रहि आपोआप समृद्ध होईल, असं आवाहनहि करण्यांत आलं.

ऐतिहासिक परिस्थितीमुळे ' विदर्भ, मराठवाडा ' असे राज्याचे निरनिराळे भाग पडले होते. या भागांना आपली प्रगति साध्य करतां यावी यासाठी साहाय्य करणं हें राज्याचं व लोकांचं कर्तव्यच होतं. भारताच्या घटनेच्या ३७१ कलमामध्ये सर्व राज्यांच्या बाबतींत असं स्पष्टपणें नमूद करण्यांत आलं आहे की, राज्यांतल्या कुठल्याहि प्रदेशांत रहाणारे लोक असोत, राज्यांतल्या सर्वच प्रकारच्या सुखसोयींचा समान लाभ ते घेऊं शकतील. या कलमानुसार विदर्भ आणि मराठवाडा यांना या धोरण-सूत्रांत असं आश्वासन देण्यांत आलं की, वेगळीं विकास-मंडळं, विकासाच्या खर्चासाठी निधीची समान वांटणी, तांत्रिक शिक्षणासाठी व धंदेशिक्षणासाठी सारखी व्यवस्था आणि राज्यांतल्या कचेऱ्यांमध्ये नोकरीची पुरेशी संधि इत्यादि गोष्टींची तरतूद करण्यांत आली आहे.

घटनेनं दिलेल्या कायदेशीर संरक्षणापुरतंच यशवंतरावांनी हें आश्वासन दिलं नव्हतं, तर त्याहीपुढे जाऊन विदर्भाचे रहिवासी, मराठवाड्याचे लोक व राज्यांतले इतर लोक यांच्यांत एकात्मता निर्माण करणं व त्यांना समान ध्येयासाठी कार्यान्वित करणं असाहि महाराष्ट्राच्या सरकारचा दृष्टिकोन असल्याचं त्यांनी विश्वासपूर्वक सांगितलं. कोल्हापूर व सातारा, पुणें व रत्नागिरी यांचा राज्यावर जेवढा हक्क आहे तसाच तो औरंगाबाद, नांदेड, चांदा व भंडारा यांचाहि रहाणार आहे याची ही खात्री होती. ध्येयाच्या अशा एकतेनं राज्यापासून जे अनेक फायदे होतात त्याची समान वांटणी होण्यास आपोआपच मदत होणार होती. महाराष्ट्र सरकारचा एक पवित्र ठेवा या भावनेनं विदर्भ, मराठवाडा यांची जोपासना व जागरूकतेनं रक्षण करण्याचं धोरण यशवंतरावांनी जाहीर केल्यानं राज्याच्या या नव्या प्रदेशांना आपल्या न्याय्य हितसंबंधांच्या संरक्षणाबाबत भय बाळगण्याचं कारण उरलं नाही.

राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये राज्याचं आर्थिक उद्दिष्ट आणि प्रगतीचं मुख्य साधन – शिक्षण – यासंबंधीहि निश्चित असं सूत्र राज्याचं धोरण म्हणून ठरवण्यांत आलं.

प्रादेशिक व इतर प्रकारचा असमतोल दूर करून, या नवीन राज्याच्या अर्थव्यवस्थेची निर्मिति करण्याच्या प्रचंड व महान् कार्यासाठी उद्योगपति व समाजाचे विविध थर यांचं सहकार्य मिळावं, असं यशवंतरावांनी आवाहन केलं. राज्याचं औद्योगीकरण करण्यासाठी एक सर्वंकष योजना (मास्टर प्लॅन) तयार करण्यांत आलेली असून, उत्पादनाची समन्वित प्रगति घडवून आणणं एवढंच नव्हे, तर त्यापासून उपलब्ध होणाऱ्या फायद्यांची मालक, कामगार व ग्राहक यांच्यांत समान वांटणी करणं हें या योजनेचं उद्दिष्ट असल्याचं यशवंतरावांनी धोरण-सूत्रींत नमूद केलं.

मूलभूत उद्योगधंद्यांच्या विकासामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेंतच नव्हे, तर भारताच्या सामर्थ्यांतहि महाराष्ट्रानं मोलाची भर घालावी असा त्यांचा दृष्टिकोन होता. ग्राहकोपयोगी वस्तूंचं उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांचीच केवळ नव्हे, तर कोळसा, लोखंड आदि मालाचं उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांचीहि महाराष्ट्राला गरज होती, परंतु निरनिराळ्या प्रकारचा कच्चा माल महाराष्ट्रांत भरपूर प्रमाणांत उपलब्ध असल्यानं मूलभूत उद्योगधंदे निर्माण करण्यासाठी या सामग्रीचा उपयोग करून घेण्यांत आला पाहिजे असं सूत्र त्या वेळीं ठरवण्यांत आलं.

औद्योगीकरण व जमीन-सुधारणा या दोन्ही क्षेत्रांतील धोरणांत सुसूत्रता निर्माण करण्याची गरज होती. उत्पादनाचे प्रयत्न गतिमान होण्यास व सर्वांना समान लाभ मिळण्याच्या दृष्टींनं तें आवश्यकच होतं. जमीन हा उत्पादनाचा सर्वांत विस्तृत असा घटक. बहुसंख्य लोक जमिनीवरच आपली उपजीविका करतात. त्या दृष्टींनं औद्योगिक क्षेत्राप्रमाणे, जमिनीच्या क्षेत्रांतहि अशीच प्रगति करण्याची योजना निश्चित करण्यांत आली. जमीन-सुधारणांमुळे लक्षावधि शेतकरी बांधवांच्या जीवनावर महत्त्वाचे परिणाम घडून येतात. त्यामुळे या प्रश्नाचं स्वरूप मानवी आणि आर्थिक असं दोन्ही प्रकारचं बनतं. सहानुभूतीनं आणि कल्पकतेनंच असे प्रश्न हाताळावे लागतात. यशवंत-रावांनी या दृष्टिकोनाचा पुनरुच्चार केला. दरम्यान, शहर व खेडं यांच्यांत आढळून येणारी विषमता दूर करण्याचंहि धोरण ठरवण्यांत आलं. उद्योगधंदे हे शहरांतच मोठ्या प्रमाणांत केंद्रित होतात आणि त्यांतून शहर व खेडं यांत विस्तृत अंतर निर्माण होतं. त्यांतून अनेक समस्यांना जन्म दिला जातो. त्या दृष्टींनं ग्रामीण जीवनाचं नागरीकरण करण्याच्या भूमिकेवरून आर्थिक विकासाचं धोरण आधारल्यास, ग्रामीण विभागांत रहाणाऱ्या लोकांना जीवनांतील विविध सुखसोयी आणि विकासाची संधि प्राप्त करून दिल्यास, प्रमुख सामाजिक संघर्ष मिटण्यास मदत होण्याची शक्यता अधिक! महाराष्ट्र सरकारनं आपल्या धोरणांत हा दृष्टिकोन मान्य केल्यानं समाजाचं भावनात्मक ऐक्य प्रस्थापित होण्याची आशा वाढली.

आर्थिक विकास व भरभराट यांसह सर्व प्रकारच्या प्रगतीचं मुख्य साधन शिक्षण हें होय. आर्थिक प्रगतींत साहजिकपणेंच तांत्रिक शिक्षणाचं महत्त्व अधिक. पुरेसं तांत्रिक ज्ञान उपलब्ध असल्याशिवाय औद्योगीकरणासाठी असलेल्या मास्टर प्लॅनसारखी

योजना यशस्वी करतां येणं अशक्य असल्यानं तांत्रिक शिक्षणाच्या व प्रशिक्षणाच्या सोयी वाढवण्याच्या धोरणाचा पुरस्कार करण्यांत आला. राज्यांत एकूण शिक्षणाची जास्तींत जास्त वाढ होईल अशी परिस्थिति निर्माण करण्यासाठी शिक्षणाचीं सर्व दारं उघडीं करून खालच्या थरापर्यंत तें पोंचेल असं ठरविण्यांत आलं.

शिक्षणाला सामाजिक महत्त्व विशेष आहे. उच्च शिक्षणाच्या सोयी, बहुधा थोड्याशा मोठाल्या शहरांतच केंद्रित झालेल्या असतात. त्यामुळे ग्रामीण विभागांतून शहरांतील महाविद्यालयांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा आपल्या ग्रामीण जीवनाशीं असलेला संबंध तुटतो. महाराष्ट्रांत त्या वेळीं हीच स्थिति होती. सामाजिक, सांस्कृतिक तसेंच आर्थिकदृष्ट्याहि हें अनिष्टच होतं. या दृष्टीनं उच्च अभ्यासासाठी असणाऱ्या व्यवस्थेंत विकेंद्रीकरण करणं, आणि माध्यमिक शिक्षणाच्या पद्धतीची पुनर्रचना करणं हाच या समस्या सोडवण्याचा उपाय ठरवण्यांत आला. माध्यमिक शाळांतून निरनिराळ्या धंद्यांचं व तांत्रिक विषयांचं शिक्षण उपलब्ध करून देणं हाहि या मागचा एक हेतु होता. हा निर्णय करण्यांत, शेवटच्या थरापर्यंत विचार आणि शिक्षणाचा प्रकाशझोत नेऊन महाराष्ट्राची शक्ति जबरदस्त वाढविणं हाच यशवंतरावांचा यांतील दृष्टिकोन स्पष्ट होतो.

अशा प्रकारे प्रत्येक समाजाला, प्रदेशाला, गटाला, प्रत्येक विचारप्रणालीला योग्य, न्याय्य वागणूक मिळेल असं उद्दिष्ट या धोरणानुसार ठरलं. १९५७ च्या पूर्वी महाराष्ट्रांत या ना त्या कारणासाठी हिंसक वातावरण निर्माण झालेलं होतं. ही परिस्थिति पालटण्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरूपाची हिंसा निर्माण करणारं वातावरण तयार होण्यास राज्याकडून प्रतिबंध करण्यांत येईल असं घोषित करतांनाच सर्व लोकांना परस्परविश्वासानं जगतां येईल व आपलं जीवन धोक्यांत आहे आणि कुणी तरी आपल्याला उपसर्ग पोंचवील अशी भीति कायद्याचं पालन करणाऱ्या नागरिकाला वाटणार नाही, असं वातावरण निर्माण करण्याच्या कामीं सरकार कसोशीनं प्रयत्न करील, असा दिलासाहि या धोरण-सूत्रींत देण्यांत आला.

या सर्व गोष्टी ज्या प्रशासनामार्फत व्हायच्या त्या प्रशासनाची कार्य-पद्धतहि यशवंतरावांनी निश्चित केली. प्रशासनाचं कार्य ज्यांच्याकडे सोपवण्यांत आलेलं असेल ते सर्वजण जनतेच्या गरजांबाबत जागरूक रहाण्याची पूर्ण काळजी घेतली गेली, तरच जनतेला उत्तम प्रशासनाचा अनुभव येणं सुलभ ठरतं. सरकार ती काळजी घेईल अशी या वेळीं हमी देण्यांत आली आणि एखादा प्रश्न केवळ निकालांत काढणं ही प्रशासनाच्या कार्यक्षमतेची कसोटी रहाणार नाही, तर आपली बाजू ऐकून घेण्यांत आली, आपल्याला योग्य रीतीनं व न्यायानं वागवण्यांत आलं अशी संबंधित इसमाची खात्री पटणं ही याबाबत कसोटी ठरवण्यांत आली.

ग्रामपंचायती व इतर स्थानिक संस्था यांसारख्या लोक-संस्थांची वाढ करून व त्यांच्या कामाचा विस्तार करून, खेड्यांत तसेंच शहरांत स्वतःचा कारभार चालवण्याच्या

बाबतींत जनतेचा वाढता कौल मिळवण्याच्या धोरणाचाहि समावेश त्यामध्ये करण्यांत आला.

महाराष्ट्राची निर्मिति हें इतिहासानं दिलेलं एक आव्हान आहे अशी यशवंतरावांची धारणा होती. हें आव्हान लोक कशा प्रकारे स्वीकारणार यावर राज्याचा भविष्यकाळ अर्थातच अवलंबून होता. एकजुटीनं कार्य करण्याची या राज्याची महान् परंपरा सुप्रसिद्ध असली, तरी खोट्यानाट्या भावनेनं, शंकांनी, संशयांनी लोकांच्या मनांत संभ्रम निर्माण करण्याची नवी प्रथा महाराष्ट्रांत अलीकडे सुरू झाली होती. महाराष्ट्रांतील माणसांनी या सर्वांपासून सावध राहिलं पाहिजे, असा इशाराहि या संदर्भांत त्यांना द्यावा लागला. परस्परांत अविश्वास अथवा विसंवाद याला महाराष्ट्रांत थारा मिळूं नये आणि जनतेंतील सर्व वर्गांनी, समाजानं राज्याच्या कल्याणासाठी, वैभवासाठी प्रयत्नशील रहावं याचसाठी यशवंतरावांनी नव्या राज्याच्या प्रारंभीं हीं मार्गदर्शक तत्त्वं निश्चित करण्याचा अट्टाहास केला.

मंत्रिमंडळाची रचना झालीच होती. आता धोरण-सूत्रीहि निश्चित करण्यांत आली. यशवंतरावांना आता प्रत्यक्ष जनतेपर्यंत पोंचायचं होतं. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, या निवडणुकीनंतरहि शांत झालेली नव्हती. विधानसभेंत समितीचे बहुतेक प्रमुख नेते निवडून आलेले असल्यानं तिथे सरकारविरुद्ध तोफा डागण्याची तयारी झालेली होती. एस्. एम्. जोशी, दत्ता देशमुख, विष्णुपंत चितळे, जयंतराव टिळक, आचार्य अत्रे असे समितीचे किती तरी म्होरके विधानसभेंत पूर्वपक्ष, उत्तरपक्ष करण्यासाठी सिद्ध होते. बाहेरचा जनतेचा असंतोष विधानसभेंत व्यक्त करणं त्यांना क्रमप्राप्तच होतं.

यशवंतरावांची आता दोन्ही आघाड्यांवर कसोटी होती. कॉंग्रेस-पक्षाची प्रतिमा बाहेर जनतेंत उजळ व्हायची, तर विधानसभेंतील साद-पडसाद नीटपणानं उमटत रहातील, तिथे कांही बेताल घडणार नाही याची प्रामुख्यानं काळजी घेणं जरूर होतं. त्याचबरोबर राज्याची जी धोरण-सूत्री जाहीर करण्यांत आली, त्या संदर्भांत लोकांमध्ये विश्वास निर्माण होऊन त्यांचं प्रशासनासाठी सहकार्य मिळवण्यासाठी लोकांशीं हितगुज साधण्याचीहि जरुरी होती. यशवंतरावांनी या स्थितींत अतिशय धिमेपणा स्वीकारला आणि परिस्थितीचा अंदाज घेत घेत एकेक पाऊल ठामपणानं रोवण्यास सुरुवात केली.

लोकांना विश्वासांत घेण्याच्या दृष्टीनं त्यांनी जाहीर करून टाकलं की, मुख्य मंत्री जेव्हा एखाद्या जिल्ह्याला, तालुक्याला भेट देतील तेव्हा तेथील लोकांना त्यांची भेट घेतां येईल. या भेटीसाठी दौऱ्यांतला तास-दीड तासाचा वेळ राखून ठेवावा अशा सूचनाहि कलेक्टरांना देण्यांत आल्या. लोकांच्या प्रत्यक्ष अडीअडचणी समजून घेण्यासाठी या निर्णयाचा अतिशय अनुकूल परिणाम झाला.

राज्याच्या समृद्धीसाठी सुशिक्षित नागरिकांना त्यांनी प्रामुख्यानं आवाहन केलं. लोकशाही राजवटींत लोकांना त्यांच्या लायकीप्रमाणे सरकार मिळणं हें ओघानंच येतं.

भारत उच्च ध्येयाच्या बाबतींत कधीहि मागे नव्हता आणि आजहि नाही. पण तीं ध्येयं साध्य करण्यांत मात्र मागे राहिला आहे. विश्वासू व कळकळीच्या कार्यकर्त्यांची उणीव हें त्याचं कारण असण्याची शक्यता गृहीत धरावी लागते. वस्तुतः कार्यकर्त्यांनी चांगल्या गोष्टींची प्रशंसा करायला व उत्तम प्रवृत्तींना उत्तेजन देण्यासाठी तयार असलं पाहिजे; परंतु चांगले म्हणवणारे पुष्कळसे लोक दैनंदिन सामाजिक समस्यांपासून अलिप्त असलेले आढळतात. यशवंतरावांनी या संदर्भांत आवाहन केलं की, खऱ्या अर्थानं मोठ्या म्हणवणाऱ्या माणसांनी समाजाचा किंवा जनतेचा संपर्क तोडूं नये. सामाजिक जीवनांतील बरंवाईट जें असेल तें सहन करण्याची तयारी ठेवावी.

एवढी आवश्यक ती प्राथमिक तयारी पूर्ण करून ठरलेल्या धोरण-सूत्रीप्रमाणे त्यांनी मग प्रत्यक्ष अंमलबजावणीस प्रारंभ केला. शिक्षण, शेती, अर्थव्यवस्था, उद्योग, कारभाराचं विकेंद्रीकरण, सहकार, धरणं, पाटबंधारे, कला, वाङ्मय, भाषा, साहित्य व संस्कृति, कृषि-उद्योग, दुग्धोत्पादन आदि सर्व क्षेत्रांतील समस्या त्यांनी अभ्यासल्या आणि पुरोगामी दृष्टीनं त्यासंबंधी निर्णय करून त्यांची अंमलबजावणीहि केली.

जनसामान्यांच्या हितासाठी यशवंतरावांनी १९५७ ते १९६०–६२ या काळांत जे निर्णय केले, जनतेचा सहकार मिळवला, प्रशासनाला गति दिली त्यामुळे महाराष्ट्राचा सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शेती व शिक्षणविषयक आणि राजकीय चेहरा-मोहराहि पार बदलून गेला. देशांतलं स्थिर, पुरोगामी आणि सर्व बाबतींत जागरूक असं राज्य अशी महाराष्ट्राची प्रतिमा त्यांतूनच भारतभर निर्माण झाली. आजअखेर ती टिकून आहे याचं श्रेय यशवंतरावांच्या पक्क्या पायाभरणीला आणि पुरोगामी दृष्टीला आहे. एकदा पाया पक्का झाला म्हणजे इमारत वर चढत रहाते. दोनाचे तीन, चार, पांच, दहा आणि किती तरी मजले एकावर एक उभे राहूं शकतात. इमारत शोभिवंतहि दिसूं लागते. महाराष्ट्राच्या इमारतीचं असंच घडलं आहे. १९६२ मध्ये यशवंतराव दिल्लीला केंद्रस्थानीं गेल्यानंतर ही इमारत उंच करण्याची किमया घडत राहिली हें खरं, पण पायाभूत काम अगोदर पक्कं झालं असल्यामुळे मजले चढवण्याचं काम नंतरच्या काळांत सुलभ रीतीनं होऊं शकलं.

नवीन राज्याची स्थापना झाल्यानंतर, नवीन राजवट सुरू करण्यापूर्वी यशवंतरावांनी पहिली गोष्ट ही केली की, निरनिराळ्या सरकारी खात्यांची पुनर्रचना त्यांनी प्रथम घडवून आणली. नवीन बारा खातीं त्यांनी तयार केलीं होतींच; त्या बारा खात्यांकडे सोपवण्यांत आलेले गट अशा प्रकारे बनवण्यांत आले की, त्या त्या विवक्षित खात्याच्या प्रमुख कार्याच्या सर्व बाजूंचं संपूर्ण चित्र त्यावरून निर्देशित व्हावं. त्यामुळे एक प्रमुख फायदा असा झाला की, इतर खात्यांना कमींत कमी विचारणा करण्यांत येऊन निर्णय त्वरित घेतां येणं शक्य झालं.

सरकारी कचेऱ्यांतून दिरंगाईचा जो रोग पसरलेला असतो याचं कारण एखाद्या विषयाचा निर्णय घेण्याच्या कामीं अनेक खात्यांचीं मतं मागवण्याचा गुंता झालेला

असतो. मत समजल्याशिवाय निर्णय करतां येत नाही; प्रश्नाचा अभ्यास करून संबंधित अधिकाऱ्यानं आपलं मत द्यावं, अशी अपेक्षा असते; परंतु प्रत्येक खात्याच्या अधिकाऱ्याच्या कसोट्या वेगळ्या, हितसंबंध वेगळे, बुद्धीची व कामाची कुवत वेगळी. त्यामुळे महिन्यामागून महिने या सर्वांची एकत्रित गाठ मारण्यांत आणि निर्णय करून घेण्यांतच निघून जातात. प्रश्नाचा निर्णय झाला, तरी अंमलबजावणीच्या वेळींहि असाच गुंता शिल्लक होत रहातो. ग्रामीण जीवनांतून आलेल्या यशवंतरावांना हें सर्व परिचयाचं होतं. त्यामुळेच राज्याचं ध्येय साध्य करण्यांत कचेऱ्यांतल्या दिरंगाईचा अडथळा दूर करण्याचं काम त्यांनी खात्यांची सुटसुटीत पुनर्रचना करून सर्वप्रथम केलं.

सर्व खात्यांचा लगाम मुख्य मंत्री या नात्यानं आपल्या हातांत राहील हें पहाणं त्यांना आवश्यकच होतं. कामाला गति देणं म्हणजे प्र-गति साध्य करणं नव्हे, हें यशवंतराव जाणून होते. प्रत्यक्ष प्रगतीची प्रचीति आणून द्यायची, तर सारथ्य करणाराला रथाच्या सर्व घोड्यांवर ताबा ठेवणारं सूत्र – लगाम – स्वतःच्या हातीं धरावाच लागतो. एकामागोमाग एक निर्णय करून यशवंतरावांनी तेंच साध्य केलं.

नवा, अपेक्षित महाराष्ट्र निर्माण करायचा तर तत्कालीन पिढी आणि नंतर येणारी प्रत्येक पिढी यांच्यांत नवेपणाचं बीजारोपण केल्यानंच तें साध्य होणार होतं. नवी पिढी शिकून शहाणी व्हावी, आधुनिक ज्ञानविज्ञानाची महती या पिढीला उमगावी आणि त्यांतून उदयास येणाऱ्या नव्या शक्तीचा उपयोग महाराष्ट्राच्या बांधणीसाठी व्हावा असं कांही प्रत्यक्षांत घडणं आवश्यकच होतं.

हा विचार करतांना यशवंतरावांचं लक्ष शिक्षणक्षेत्रानं वेधून घेतलं. त्या काळांतहि मुंबई राज्य हें शिक्षणक्षेत्रांत, तुलनेनं आघाडीवर असलेलं राज्य मानलं जात असे. राज्यांत त्या वेळीं ६२ हजार शिक्षण-संस्था होत्या. शैक्षणिक कार्याला गति देण्याच्या दृष्टीनं मग पुस्तकी आणि व्यावसायिक या दोन्ही प्रकारच्या शिक्षणापासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचा विविधांगी कार्यक्रम राज्यांत वाढत्या प्रमाणांत हातीं घेण्यांत आला. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाबरोबरच मूलोद्योग शिक्षणाचीहि पद्धतशीररीत्या प्रगति सुरू करून देण्यांत आली. कांही विशिष्ट शिक्षण-प्रकारांच्या सोयींमध्ये वाढ करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यानं माध्यमिक व उच्च शिक्षण, तांत्रिक व धंदेशिक्षण, शारीरिक शिक्षण आणि ललित कलांचं शिक्षण यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी उपाययोजना करण्यांत आल्या. शिक्षणाची दैनंदिन जीवनाशीं व शिकणाऱ्याच्या परिस्थितीशीं अधिक प्रमाणांत सांगड घालण्याची काळजी घेणं हें परिस्थितीचं आवाहनच होतं. सरकारनं त्यालाहि साद दिली. प्रौढशिक्षणाची व्याप्ति तर वाढवण्यांत आलीच, शिवाय त्यांत नागरी जीवनाच्या विविध अंगांचं शिक्षण मिळण्याची तरतूद नव्यानं करण्यांत आली. त्या काळांत राज्याच्या एकूण खर्चाच्या एकपंचमांश इतक्या रकमेची ( २० कोटि ) तरतूद शिक्षणकार्यासाठी करण्यांत आली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत ती २३ कोटि ७५ लाखांपर्यंत वाढवण्यांत आली.

मोफत शिक्षणाची योजना महाराष्ट्रांत या वेळीं प्रथमच सुरू करण्यांत आली आणि, शिक्षणाचीं दारं सर्वांसाठी सताड उघडीं झाल्यामुळे महाराष्ट्रांत एक आगळी क्रांति घडून गेली. शिक्षण हें सर्वांना मोफत देण्याचा हा उपक्रम होता. भारतीय घटनेच्या ४६ व्या कलमानुसार राज्य-सरकारनं लोकांच्या – विशेषतः मागासलेल्या लोकांच्या – शैक्षणिक व आर्थिक हिताकडे खास लक्ष पुरवण्याची तरतूद करण्यांत आली आहे. हें मार्गदर्शक तत्त्व संपूर्णपणें अमलांत आणण्याच्या दृष्टीनं सरकारनं मदत देण्याकरिता जात आधारभूत न मानतां आर्थिक मिळकत आधारभूत मानण्याचं ठरवलं. त्यानुसार ज्यांच्या पालकाचं वार्षिक उत्पन्न ९०० रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा गरीब विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्या-संबंधीचे नियम त्या काळांत प्रथमच तयार करण्यांत आले. या सवलतीचा लाभ अर्थातच समाजांतल्या बहुसंख्य वर्गाला झाला. जे लोक नोकरीपेशांत होते आणि ज्यांचं निश्चित उत्पन्न ९०० पेक्षा अधिक होतं असा वर्ग वगळतां इतरांना शिक्षणामध्ये आर्थिक अडचण आता उरली नाही.

विपन्नावस्थेचे आणि आर्थिक अडचणींचे कठोर अनुभव यशवंतरावांनी प्रारंभीं-च्या काळांत, त्यांचं शिक्षण सुरू असतांना घेतले होते. मानहानीहि सहन केली होती. त्यांच्या व्यवहारी अनुभवांतूनच राज्याचं शिक्षणाचं हें नवं धोरण आता तयार झालं होतं. मंत्रिमंडळानंहि त्यावर शिक्कामोर्तब केलं. त्यांच्याच कारकीर्दीत मोफत शिक्षणाची सालिना ९०० रुपयांची असलेली मर्यादा वाढवून पुढे १२०० रुपये करण्यांत आली. नंतरच्या काळांत ती १८०० रुपयांपर्यंत गेली आणि १९७५ पर्यंत हीच मर्यादा २४०० रुपयांवर जाऊन पोंचली.

प्रारंभीं सुरू केलेल्या मोफत शिक्षण-योजनेचा परिणाम शिक्षणाचा प्रसार समाजाच्या सर्व वर्गांमध्ये मोठ्या प्रमाणांत होण्यामध्ये झाला. ग्रामीण भागांतील आणि नागरी भागांतीलहि अनेकजण आपल्या भागांत शाळा सुरू करून मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी पुढे आले. शिक्षणप्रसाराला चालना देण्यासाठी सरकारी तिजोरीवर त्यामुळे भार पडला हें खरं, पण हा खर्च सत्कारणीं लागणार होता. परिणामीं जिथे शाळा नव्हत्या तिथे प्राथमिक शाळा सुरू झाल्या, प्राथमिक शाळांच्या जोडीला माध्यमिक शाळा निघाल्या, महाविद्यालयं स्थापन झालीं आणि राज्यांतले हजारो युवक-युवति शिक्षणांत रममाण झाले आहेत असं मोठं रम्य चित्र दिसूं लागलं. आपल्या रम्य भावी काळाचीं चित्रं रंगवण्यांत महाराष्ट्राची नवी पिढी शिक्षणानं, मनानं त्यामुळे तयार झाली.

पूर्वीचे मुख्य मंत्री बाळासाहेब खेर यांच्या कारकीर्दीत महाराष्ट्रांत इंग्रजी विषयाच्या शिक्षणाचा खेळखंडोबा झाला होता. बाळासाहेबांनी इंग्रजीला पायबंद घातला होता. त्याचा परिणाम त्या काळांतल्या तरुण विद्यार्थि-पिढीला भोगावा लागला. यशवंत-रावांनी बाळासाहेबांचा तो जुना निर्णय बदलून टाकला आणि शाळांतून इंग्रजी विषय शिकवण्याबाबत सरकारचा नवा निर्णय जारी केला. इंग्रजी हा ऐच्छिक विषय म्हणून

पांचव्या इयत्तेपासून शिकवण्यांत यावा असा त्यांचा निर्णय होता. त्याचबरोबर ग्रामीण भागांतल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी शिकवण्याचं नाकारलं जाणार नाही याचीहि काळजी त्यांनी घेतली; तसा निर्णय जाहीर केला. इयत्ता पांचवी ते सातवीमध्ये ऐच्छिक विषयाच्या आधारावर इंग्रजी शिक्षण देण्याच्या संबंधांत, सरकारचा निर्णय अमलांत आणण्याच्या दृष्टीनं त्यांनी एक समितीहि नियुक्त केली आणि पुढे या समितीनं तयार केलेला अभ्यासक्रम सरकारनं स्वीकारलाहि !

राज्यांत नव्यानं सामील झालेल्या मराठवाडा विभागांत शिक्षणप्रसार करण्याचा प्रश्न होता. त्यानुसार तिथे शिक्षणप्रसार व्हावा आणि दुय्यम शिक्षण देणाऱ्या खाजगी संस्था पुढे याव्यात यासाठी एक योजना तयार करण्यांत आली. ज्या संस्था आठवीपासून पुढील वर्ग सुरू करतील त्यांना या दृष्टीनं सढळ मदत देण्याचं, सरकारनं ठरवलं. ग्रामीण भागांत अशा संस्थांना मात्र पहिल्या वर्षी एकूण खर्चाच्या ९० टक्के, दुसऱ्या वर्षी ८० टक्के, तिसऱ्या वर्षी ७० टक्के, चौथ्या वर्षी ६० टक्के आणि पांचव्या वर्षी ५० टक्के, असं अनुदान या निर्णयामुळे देण्याची तरतूद झाली.

मराठवाडा विभागाकरिता वेगळं विद्यापीठ स्थापन करण्याच्या प्रश्नालाहि याच वेळीं चालना देण्यांत आली. जस्टिस एस्. एम्. पळनीटकर यांच्या अध्यक्षतेखाली त्यासाठी नऊ सदस्यांची एक समितीहि नियुक्त करण्यांत आली. सेतु माधवराव पगडी, डॉ. वि. भि. कोलते, एस्. आर. डोंगरकेरी, एस्. के. वैशंपायन, एस्. एफ्. बी. तय्यबजी, शामराव कदम, डॉ. डी. डी. शौंदरकर, एम्. बी. चिटणीस यांसारख्या शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक क्षेत्रांतील कार्यकर्ते आदींचा या समितींत समावेश होता. विद्यापीठाचं स्वरूप, विस्तार, कार्यक्षेत्र, स्थापना, खर्चाचा अंदाज वगैरेबाबत या समितीनं शिफारशीवजा अहवाल सादर करावा, अशी अपेक्षा होती.

या समितीनं पुढे डिसेंबर १९५७ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला आणि मराठवाड्यासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याची शिफारस केली. मराठवाड्यांतलीं महाविद्यालयं उस्मानिया विद्यापीठाशीं जोडण्यांत आलीं होतीं. त्यांची मुदत आता संपत आली होती. त्यामुळे १९५८ च्या जूनपासून म्हणजे नव्या शैक्षणिक वर्षापासून मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करावी अशी समितीची आग्रहाची सूचना होती.

मराठवाडा विद्यापीठ त्यानुसार प्रत्यक्षांत स्थापन झालं आणि २३ ऑगस्ट १९५८ ला पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्याच हस्तें या नव्या विद्यापीठाचं उद्घाटन करण्यांत आलं. पंडितजींनी महाराष्ट्राच्या प्रगतीची आणि मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण यांची या प्रसंगीं मुक्तकंठानं प्रशंसा केली. चव्हाण यांच्या कारभाराची प्रशस्ति करतांना त्यांनी खुलेपणानं सांगितलं की, "चव्हाण यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांच्याबद्दल माझ्या मनांत आदराची भावना आहे. निरनिराळ्या राज्यांतल्या कारभाराबद्दल प्रधानमंत्री या नात्यानं मला अनेकांकडून माहिती कळते. त्यावरून मुंबई सरकारचा कारभार चांगला आहे असं माझं मत झालं आहे."

मराठवाड्याप्रमाणेच दक्षिण महाराष्ट्रासाठी कोल्हापूर इथे शिवाजी विद्यापीठ स्थापन करण्याचा विचारहि यशवंतरावांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीतच केला गेला आणि योजनेमध्ये त्यासाठी ५० लाखांची तरतूदहि करण्यांत आली. विद्यापीठ-स्थापनेचे सर्व सोपस्कार झाल्यानंतर राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांच्या हस्तें कोल्हापूरचं शिवाजी विद्यापीठहि अस्तित्वांत आलं. या दोन्ही विद्यापीठांच्या उभारणींत यशवंतरावांचा मौलिक हिस्सा आहे. दि. १८ नोव्हेंबर १९६२ ला या विद्यापीठाचं उद्‌घाटन झालं. त्यानंतर लगेचच यशवंतरावांना दिल्लीला जावं लागल्यानं मुख्य मंत्री या नात्यानं त्यांचा हा अखेरचा कार्यक्रम ठरला.

सातारा येथील सैनिकी स्कूलची स्थापना हें सैनिकी शिक्षण-क्षेत्रांतलं यशवंतरावांचं असंच एक चिरंजीव कार्य उभं राहिलं आहे. नॅशनल डिफेन्स अकादमीसाठी शिक्षण मिळण्याची सोय साताऱ्याच्या या सैनिकी स्कूलमुळे उपलब्ध झाली. भारतांतलं अशा प्रकारचं हें पहिलं सैनिकी स्कूल ठरलं. या स्कूलमधल्या एकूण विद्यार्थ्यांमध्ये दहा टक्के जागा महाराष्ट्रांतल्या माजी सैनिकांच्या मुलांकरिता राखून ठेवण्याची तरतूद आहे. महाराष्ट्राच्या सैनिकी पेशाला हें स्कूल म्हणजे एक वरदान ठरलं आहे. त्या वेळचे संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्याच हस्तें यशवंतरावांनी या स्कूलचं दि. २३ जून १९६१ ला उद्‌घाटन केलं. प्रशंसा व्हावी असाच हा उपक्रम होता. कृष्ण मेनन यांनी या उपक्रमाची अशीच प्रशंसा केली.

शिक्षणाच्या या सोयी करत असतांना वर्गीकृत जनजातींमधल्या मुलांनाहि शिक्षण मिळालं पाहिजे, असा कटाक्ष ठेवण्यांत आला. आदिवासींच्या मुलांच्या शिक्षणा-बाबत असाच एक व्यवहारी निर्णय त्या काळांत करण्यांत आला. आदिवासी मुलांना शिक्षण द्यायचं, तर त्यांना आपल्या मुलांना शाळेंत आणावं लागणार होतं; परंतु या प्रश्नांत बरीच गुंतागुंत होती, त्यासाठी मग असा निर्णय करण्यांत आला की, आदिवासी मुलांना शाळेंत आणण्याऐवजीं त्यांच्या दारींच शैक्षणिक सोयी नेऊन पोंचवाव्या. त्यांतूनच मग आश्रम-शाळांची योजना साकार झाली. आश्रम-शाळा स्थापन करणं हाच आदीवासींच्या शिक्षणाच्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर उपाय होता. या मुलांच्या मनावर शहरी कल्पनांचा पगडा बसून त्यांच्या स्वतःच्या जीवनाविषयी व संस्कृतीविषयी त्यांच्या मनांत नापसंती निर्माण होऊं नये हा आश्रमशाळा स्थापन करण्यामागील आणखी एक हेतु होता. अशा आश्रम-शाळांचं लेण, आदिवासींच्या दारापर्यंत त्या काळांत जें पोंचवण्यांत आलं तें पुढच्या काळांतहि कायम राहिलं आहे.

एक ना दोन, शिक्षणक्षेत्रांत आमूलाग्र क्रांति घडवून आणणारे अनेक निर्णय यशवंतरावांच्या नेतृत्वाखालील सरकारनं त्या वेळीं केले. औरंगाबाद आणि कराड इथे दोन नवीं इंजिनियरिंग कॉलेजं सुरू करण्याचा निर्णय तेव्हाच करण्यांत आला. हीं महाविद्यालयं प्रत्यक्षांत सुरू करण्यांत आलीं. तसेंच नागपूरच्या सरकारी इंजिनियरिंग

कॉलेजचं भारत सरकार पुरस्कृत करण्यांत येणाऱ्या इंजिनियरिंग कॉलेजमध्ये रूपांतर करण्यांत आलं.

मुंबई सरकारनं माध्यमिक शाळांना फी-वाढीची परवानगी दिली होती. त्याचा फायदा निरनिराळ्या शिक्षण-संस्थांनी घेऊन फीमध्ये भरमसाट वाढ करण्याचा, त्यांच्या दृष्टीनं फायदेशीर मार्ग त्या काळांत अवलंबिला. मोफत शिक्षण देण्याचा निर्णय सरकारनं केल्यानंतर, ज्या विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ मिळणार होता त्यांची फी शाळांना देण्याची हमी स्वतः सरकारनं घेतली होती. अशा स्थितींत माध्यमिक शाळांना फी-वाढीची परवानगी कायम ठेवण्यानं सरकारच्या तिजोरीवर बेहिशेबी ताण निर्माण होण्याची शक्यता होती. सरकारनं सारासार विचार करून ही परवानगी मग एक दिवस काढून घेण्याचा निर्णय केला. प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालयं, विद्यापीठं आदि शैक्षणिक सोयींनी महाराष्ट्र जो गजबजलेला, पुढारलेला आढळतो त्याचं मूळ, त्या चार-पांच वर्षांच्या कारकीर्दीत चव्हाण-सरकारनं केलेल्या निर्णयांत सापडतं.

मुंबई राज्यांत औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची सर्वांगीण विकासाची एक योजनाहि मुंबई सरकारनं सुरू करण्याचं त्याच वेळीं ठरवलं. औद्योगिक वसाहती तयार करायच्या, पण ही केवळ सरकारी योजना बनवण्याचा उद्देश सरकारनं ठेवला नाही. जो प्रदेश मागासलेला असेल तिथे औद्योगिक वसाहत स्थापन करण्याच्या बाबतींत सरकारनं पुढाकार घ्यावा, परंतु हें काम प्रामुख्यानं पुढारलेल्या व प्रगतिशील अशा नगरपालिकांनी, सहकारी संस्थांनी व खाजगी उद्योगधंदेवाल्यांनी हातीं घ्यावं असा यशवंतरावांचा त्यामध्ये दृष्टिकोन होता. बिनसरकारी संस्थांनी, औद्योगिक वसाहती उभारण्यांत आपला वांटा उचलला पाहिजे या कल्पनेचा पुरस्कार करणारं मुंबई हेंच पहिलं राज्य असावं.

विशिष्ट भाग निवडून, तो साफ करून व आखून तिथे वीज, पाणी वगैरेंची सोय करून औद्योगिक सहकारी संस्था स्थापन करण्याची आणि छोट्या उद्योगधंद्यांना चालना देण्याची कल्पना १९४७ सालींच मांडण्यांत आली होती. भारत सरकारनं त्या वेळीं फक्त 'ॲडव्हायसरी प्लॅनिंग बोर्ड' नेमलं होतं व त्या बोर्डानं ट्रेडिंग इस्टेटी स्थापन करण्याची शिफारसहि केली होती. छोट्या उद्योगधंद्यांसंबंधीच्या बोर्डानं १९५५ सालीं औद्योगिक वसाहतीबाबतच्या कल्पनेचा विचार केला आणि अशा वसाहती स्थापन करण्याची राज्य-सरकारांना शिफारस केली होती.

ब्रिटननं पूर्वी अशीच औद्योगिक वसाहतींची एक योजना केली होती व ती यशस्वीहि झाली होती. तेथील 'बोर्ड ऑफ ट्रेड'नं त्यासाठी पैसा उपलब्ध करून दिल्यानं योजना यशस्वी होण्यास मोलाची मदत झाली. भारतांत छोट्या उद्योगधंद्यांना पुरेसा पैसा मिळत नसल्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतां येत नव्हतं. आपल्या मालाची त्यांना विक्रीहि करतां येत नव्हती. त्या दृष्टीनं ही नवी औद्योगिक वसाहतींची योजना यशस्वी होणं शक्य असल्यामुळे मुंबई सरकारनं त्याचा जोरदार पाठपुरावा करण्याचं ठरवलं.

मुंबई राज्यांत त्या वेळीं पंधरा औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचं ठरवण्यांत आलं. गलिच्छ वस्त्या व बेकारी दूर करण्याच्या दृष्टीनं दाट लोकवस्तीच्या शहरांमध्ये औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची ही योजना होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत यासाठी १६० लक्ष रुपयांची तरतूदहि करण्यांत आली.

औद्योगिक वसाहतीसाठी जे भाग निवडण्यांत आले त्यामध्ये राजकोट विभागांत राजकोट, गांधीधाम, भावनगर; अहमदाबाद विभागांत अहमदाबाद व बडोदें; मुंबई विभागांत सुरत, वाप्तीरोड ( मुंबई ), कुर्ला ( मुंबई ), आणि मालेगाव; पुणें विभागांत हडपसर, कोल्हापूर आणि कराड; नागपूर व अमरावती आणि औरंगाबाद विभागांत नांदेड असे भाग निश्चित करण्यांत आले. पाणी, गटारं, रेल्वे-सायडिंग, रस्ते, वीज वगैरे सोयी औद्योगिक वसाहतींमध्ये करण्याचा यांत समावेश होता.

कोल्हापूर येथील उद्यमनगर आणि पुण्यांतील हडपसर भागांतल्या वसाहतींची योजना त्यांतूनच मूर्त स्वरूपांत आली. पुढच्या काळांत पुण्याशेजारीं चिंचवड, पिंपरी, भोसरी आदि भागांतहि त्याची वाढ करण्यांत आली. पिंपरी आदि भागांतील वसाहती-संबंधांतील जागेची वगैरे पहाणी स्वतः यशवंतरावांनी जाग्यावर जाऊन केली. याच काळांत छोट्या व घरगुती उद्योगधंद्यांसाठी राज्य-सरकारच्या आर्थिक मदतीबाबतच्या नियमानुसार कर्ज लवकर मंजूर करून तें ताबडतोब देतां यावं यासाठी उद्योगपतींना व कंपन्यांना कांही अटी व शर्तींवर कर्ज देण्यासाठी मुंबई सरकारनं बॉम्बे स्टेट फायनान्सिअल कॉर्पोरेशनची एजन्सीविषयक व्यवस्थाहि केली.

राज्याचा औद्योगिक विकास साध्य करण्यासाठी शास्त्रशुद्ध योजना तयार करण्याचीहि गरज होती. महाराष्ट्रांतील अर्थतज्ज्ञ व उद्योगक्षेत्रांतील तज्ज्ञहि महाराष्ट्राच्या औद्योगिक वाढीचा आणि रचनेचा विचार करूं लागले होते. याच संदर्भात डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळानं यशवंतराव चव्हाण यांची भेट घेतली आणि औद्योगिक रचनेसंबंधींचं एक निवेदन सादर करून सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्राच्या आर्थिक विकास-मंडळाच्या वतीनं हें शिष्टमंडळ भेटीसाठी गेलं होतं. या भेटीमध्ये उद्योगाच्या ' मास्टर प्लॅन 'बाबत चर्चा झाली. यशवंतरावांनी या विषयाचा विचार केलेलाच होता. त्यामुळे याच बैठकींत त्यांनी असा मास्टर प्लॅन सरकारच्या वतीनं तयार करण्यांत येत असल्याचं शिष्टमंडळाला सांगितलं.

औद्योगिक विकासाबरोबरच शेती व उद्योगधंदे ह्यांच्या समतोल विकासावर आधारलेल्या गतिमान अशा अर्थव्यवस्थेच्या पायावर एक आधुनिक, पुरोगामी राज्य निर्माण करण्याचा कार्यक्रम या काळांत यशवंतरावांनी जनतेपुढे ठेवला. शेती-सुधारणा, शेतीचं आधुनिकीकरण आणि उद्योगधंदे यांच्या साहाय्यानं ग्रामीण भागाचा विकास करावा लागणार होता. त्याचबरोबर वर्गहीन आणि जातिविरहित असा समाज निर्मिण्यासाठी सामाजिक व आर्थिक उपाययोजना हातीं घेण्याचीहि गरज होती. अधिक उद्योगधंदे व अधिक उत्पादन, कामधंद्यांची अधिक सोय, कामगारांसाठी रहाण्याची

चांगली परिस्थिति आणि राज्याच्या प्रगतीला हातभार लावण्यासाठी मध्यमवर्गीयांना आणि विचारवंतांना अधिक संधि, असं भावी महाराष्ट्राचं चित्र यशवंतरावांनी आपल्या मनाशीं रेखाटलं होतं.

त्याच दृष्टिकोनांतून गावांना वीज-पुरवठा, ज्यायोगे राज्याच्या आर्थिक विकासाला साहाय्यभूत होईल अशा रीतीची शिक्षणपद्धतीची पुनर्रचना, अल्पसंख्याकांच्या धार्मिक तसेच भाषिक हितसंबंधांचं रक्षण, या सृजनशील, आशावादी आणि गतिमान समाजव्यवस्थेशीं ज्यायोगे सुसंगत राहील, अशा रीतीनं राज्यकारभारांतील यंत्रणेंतील फेरफार, या गोष्टी एकामागोमाग एक किंबहुना एकसमयावच्छेदेंकरून त्यांनी हातीं घेतल्या.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा उद्देश कृषि-औद्योगिक समाजाचा पाया घालणं असा त्या वेळीं ठरवण्यांत आला होता. त्या अनुषंगानं यशवंतरावांनी ग्रामीण भागांत उद्योगधंदे सुरू करण्यास प्रोत्साहन दिलं. हे उद्योगधंदे ग्रामीण जीवनाचं अविभाज्य अंग बनतील आणि शेती व ग्रामीण उद्योग हे परस्परांवर अवलंबून रहातील हा त्यामागचा त्यांचा दृष्टिकोन राहिला. आधुनिक उद्योगधंदे ग्रामीण भागांत सुरू करण्याचं एक किफायतशीर क्षेत्र म्हणजे सहकारी पायावर, शेत-मालावर प्रक्रिया करणारे धंदे हें होय. जिथे कच्च्या मालाच्या उत्पादकांच्या सहकारी संस्था नवे उद्योगधंदे सुरू करूं शकत नसतील तिथे संयुक्त क्षेत्रांद्वारे म्हणजे, राज्य आणि खाजगी क्षेत्र यांच्या सहकार्यानं ग्रामीण भागांत मोठे उद्योगधंदे सुरू करण्याच्या विचाराला त्यांनी म्हणूनच चालना दिली. संयुक्त क्षेत्रांतल्या उद्योगधंद्यांत भागीदारी करण्यासाठी पुरेशी तरतूद करण्याचाहि निर्णय केला आणि स्वयंचलित विकासाच्या दृष्टीनं पाऊल टाकणं हें तिसऱ्या योजनेचं जें उद्दिष्ट होतं तें समोर ठेवूनच राज्याची वाटचाल सुरू करून देण्यांत आली.

औद्योगिक विकासासंबंधींचं एक स्वतंत्र विधेयकहि यशवंतरावांनी आपल्या कार-कीर्दींत विधानसभेंत संमत करून घेतलं आणि या विकासकार्याला कायद्याचा आधार निर्माण केला. महाराष्ट्राचं उद्योगीकरण करण्याचा महाराष्ट्रांत अशा प्रकारे पाया निर्माण झाल्यानं पुढच्या काळांत औद्योगिक क्षेत्राची वाढ झपाट्यानं होत राहिली. कांही पुण्यासारखीं शहरं तर नंतरच्या काळांत औद्योगिक शहरं म्हणूनच महाराष्ट्राच्या नकाशांत नमूद होण्यापर्यंत प्रगति साध्य झाली. मुंबईसारख्या शहरांतच बहुसंख्य उद्योग केंद्रित होत राहिलेले असल्यामुळे ग्रामीण भागांतील जनतेचा लोंढा शहरांत पोंचत होता. हा लोंढा कांही प्रमाणांत थोपवायचा, तर ग्रामीण भागांतल्या लोकांना त्यांच्या भागांतच उद्योगांत गुंतवणं हा उपाय होता. उद्योगांचं लोण, खाजगी आणि सहकारी क्षेत्राच्या द्वारा, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांत पोंचवण्याचं श्रेय त्या काळांत तयार झालेल्या आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यांत आलेल्या योजनांकडे जातं हें उघड आहे.

महाराष्ट्रांतील सहकारी चळवळीनंहि याच वेळीं महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाच्या अंगोपांगांत प्रवेश केला. सहकाराचं क्षेत्र विस्तृत बनवण्यासाठी आणि त्याचा ग्रामीण

जीवनाच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम घडवण्यासाठी यशवंतरावांनी त्या वेळीं सहकाराचीं अनेक दालनं खुलीं करून दिलेलीं आढळतात.

शेतीसाठी कर्ज-पुरवठा करणं, शेत-मालाची विक्री करणं, शेतीसाठी व घरगुती उपयोगासाठी लागणाऱ्या वस्तूंची विक्री करणं, शेती-विकास, शेत-मालावर प्रक्रिया करणं, दुग्धोत्पादकांच्या व दूध-पुरवठा करणाऱ्यांच्या संघटना स्थापन करणं, असं विविध प्रकारचं काम या काळांत त्यांच्या शासनानं सुरू करून दिलं. घर-बांधकाम सोसायट्यांना या काळांत चालना देण्यांत आली. या सोसायट्यांच्या निर्मितीमुळे, सहकारी चळवळ खेड्याकडून छोट्या शहराकडे आणि तिथून मोठ्या शहरापर्यंत पोंचली. ग्रामीण भागांतलं सामाजिक जीवन सुधारण्याचा एक महत्त्वाचा मार्ग म्हणजे ग्रामीण भागांत कर्ज-पुरवठा करण्याची सोय उपलब्ध करून देणं होय. त्याचाहि विचार यशवंतरावांनी केला. ग्रामीण भागाचं क्षेत्र आणि तिथल्या कर्जाच्या अडचणी त्यांच्या चांगल्याच परिचयाच्या होत्या. त्यांतून मार्ग काढण्यासाठी म्हणून सरकारनं सर्वोच्च बँक व प्राथमिक संस्था, प्रांतिक भूविकास बँक, प्राथमिक भूविकास बँक, या संस्थांमार्फत कर्ज-पुरवठा करण्याची सोय उपलब्ध करून दिली. प्रत्यक्षांत या संस्थांमार्फत कर्ज-पुरवठाहि करण्यांत येऊं लागला. शेती-उत्पादनाला उत्तेजन देण्यासाठी अधिक कर्ज-पुरवठा करण्याबाबतहि उपाययोजना करण्यांत आली. शेती-संस्थांचं एक प्रकारे सर्वत्र जाळंच निर्माण करण्यांत आलं. जलसिंचन योजना, दूध-संस्था, दूध उत्पादकांचं फेडरेशन आदि संस्था स्थापन करण्याच्या विचारालाहि याच वेळीं चालना देण्यांत आली.

१९५७ सालच्या निवडणुका होऊन एप्रिलमध्ये यशवंतरावांनी मुख्यमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर त्याच वर्षाच्या ऑगस्टमध्ये महाराष्ट्रानं अठरा सहकारी साखर-कारखान्यांची नोंद करून अग्रेसरत्व प्रस्थापित केलं. दुसऱ्या योजनेंत आणखी चार नवे साखर-कारखाने सुरू करण्याचंहि ठरवण्यांत आलं. नवे साखर-कारखाने काढण्यांत शेतकऱ्यांची आर्थिक भांडवलाची अडचण होती. सरकारनं त्याचाहि अभ्यास करून सहकारी साखर-कारखान्याच्या भाग-भांडवलांत २८ लाख रुपये गुंतवण्याचा निर्णय केला आणि प्रत्यक्षांत तें भांडवल गुंतवून कामाला चालना दिली. त्याचबरोबर इंडस्ट्रियल कॉर्पोरेशननंहि पुढाकार घेऊन पांच कारखान्यांना कर्जे मंजूर केलीं. सहकारी चळवळ राज्यांत वाढवण्याच्या मुख्य मंत्र्यांच्या या दूरदृष्टींतूनच पुढच्या पंधरा-वीस वर्षांच्या काळांत महाराष्ट्रांतील केवळ सहकारी साखर-कारखान्यांची संख्या अर्धशतक ओलांडून पुढे गेली. अन्य क्षेत्रांतील सहकारी संस्था तर हजारोंच्या संख्येनं निर्माण झाल्या आणि भारताच्या सहकारी नकाशावर महाराष्ट्रानं त्यामुळेच अग्रेसरत्व पटकावलेलं दिसूं लागलं.

# १९

यशवंतरावांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीतच सहकारी चळवळीविषयक एक विधेयक (ड्राफ्ट बिल) तयार केलं होतं. २८ ऑक्टोबर १९६० ला हें बिल राजपत्रांत जाहीर झालं. राज्यघटनेंतील मार्गदर्शक तत्त्वानुसार सहकारी चळवळीचा पद्धतशीर विकास घडवून आणण्याच्या दृष्टीनं सरकारनं हें विधेयक तयार केलं होतं. नागपूर येथील विधानसभेच्या अधिवेशनांत प्रथम तें सादर केलं गेलं. हें विधेयक केंद्र-सरकारनं आणि पूर्वीच्या मुंबई राज्याच्या सरकारनं नेमलेल्या समित्यांच्या शिफारशींचा विचार करूनच तयार करण्यांत आलं होतं. या विधेयकांत संलग्न, नाममात्र आणि सहानुभूतिदार सभासदत्वाची तरतूद करण्यांत आली. या तरतुदीमुळे ज्या संस्थांच्या सभासदांमध्ये लायक आणि कर्तृत्ववान् सभासदांची उणीव असेल त्यांना बाहेरच्या व्यक्तींचं सहकार्य घेणं अर्थातच सुलभ ठरलं. नाममात्र, संलग्न आणि सहानुभूतिदार सभासदांचे हक्क विधेयकांत निश्चित स्वरूपांत नमूद करण्यांत आले होते. त्यामुळे अशा सभासदांना संस्थांच्या कामकाजावर आपला अधिकार गाजवणं शक्य होणारं नव्हतं. या विधेयकांत, प्रमुख व दुय्यम राज्य-भागीदारी-निधि उभा करण्याबाबतची तरतूद करण्यांत आल्यानं, त्यांतून सहकारी संस्थांना भाग-भांडवलासाठी पैसा पुरवण्याची सोय होती. ह्या निधीमुळे संस्थांना, त्यांचा योग्य विकास व्हावा, सभासदांना कर्जाचा पुरवठा व्हावा, आणि अन्य कामं हातीं घेतां यावीं यासाठी चांगलं आर्थिक साहाय्य उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा झाला.

संस्थांना सरकारकडून निरनिराळ्या रूपानं जें आर्थिक साहाय्य देण्यांत येईल, त्याबाबत सरकारच्या हितसंबंधांचं रक्षण होईल याचीहि काळजी घेणं जरूर होतं. त्यासाठी अशा संस्थांच्या समित्यांवर सरकारी सभासद नियुक्त करण्याची योजना या विधेयकाद्वारे करण्यांत आली होती. संस्थांना केवळ आर्थिक साहाय्य करून थांबतां येणारं नव्हतं. या संस्थांची आर्थिक स्थिति नीट राहील यासाठी कांही व्यवस्था करणं

जरूरीचं होतं. त्यासाठी मग सरकारनं या संस्थांच्या कामकाजावर देखरेख करण्यासाठी अधिकारी नेमण्याचा अधिकार स्वतःकडे घेतला. विधेयकामुळे सरकारला हा अधिकार प्राप्त झाला. त्याचबरोबर सहकारी संस्थांचं वर्गीकरण करण्याचा अधिकारहि सहकारी सोसायटयांच्या रजिस्ट्रारना मिळाला. एखाद्या संस्थेच्या हिताच्या दृष्टीनं तिचे पोट-नियम बदलणं आवश्यक वा श्रेयस्कर आहे असं वाटल्यास, त्या संस्थेस तसा आदेश देण्याचा अधिकारहि रजिस्ट्रार यांना प्राप्त झाला.

सहकारी कायद्यांत या विधेयकानं एकूण ज्या दुरुस्त्या करण्यांत आल्या त्यामुळे सहकारी संस्था स्थापन करण्याच्या बाबतींत लवचिकपणा आला आणि परिणामीं सहकारी क्षेत्र समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोंचून तें विस्तृत होण्यास अशा प्रकारे मदत झाली. लोकांनीहि त्याचा पुरेपूर फायदा घेतला.

मुंबई राज्यासमोर राज्याच्या विकासाच्या, प्रगतीच्या कामांचा अक्षरशः ढीग उभा होता. स्वातंत्र्योत्तर काळांत जनतेच्या अपेक्षा वाढलेल्या असल्यामुळे सरकारकडे मागण्यांचीं भेंडोळीं गावागावांतून येऊं लागलीं होतीं. प्रत्येक कामामध्ये सरकारच्या मदतीचा वांटा मिळावा अशी लोकांची स्वाभाविक अपेक्षा असल्यानं, या सर्व योजना करायच्या, किमान मार्गी लावायच्या तर राज्य-सरकारला आपल्या तिजोरीचीहि व्यवस्था करावी लागणार होती.

मुंबई राज्याची दुसरी पंचवार्षिक योजना निश्चित करतांना, लोकांच्या अपेक्षा लक्षांत घेऊनच योजनेचा आराखडा तयार केला गेला. राज्याची ही दुसरी पंचवार्षिक योजना त्यांतूनच ३५० कोटि रुपये खर्चाची तयार झाली. देशाची दुसरी पंचवार्षिक योजना ही एकूण ४८०० कोटींची होती. त्यांतली महाराष्ट्राची ३५० कोटींची योजना ही सर्वांत मोठी योजना होती. मुंबई राज्याची पहिली योजना १४६·३१ कोटि खर्चाची तयार झाली होती. त्या तुलनेंत दुसरी योजना ही आकारानं आणि व्याप्तीनं बरीच मोठी झाली. शेती व समाज-विकास, पाटबंधारे व खाणी, उद्योगधंदे, वीज, वाहतूक-दळणवळण, शिक्षण, आरोग्य, घर-बांधकाम व इतर सामाजिक सुखसोयी, शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन, अशा अनेकविध कामांचा या योजनेंत समावेश करण्यांत आल्यामुळे ती सर्वार्थानं मोठी झाली.

शेतीच्या बाबतींत स्वातंत्र्याचं दहावं वर्ष हें महाराष्ट्रांतील शेतकऱ्यांच्या दृष्टीनं युगप्रवर्तक ठरलेलं वर्ष होय. शेतीच्या क्षेत्रांत पुरोगामी पावलं टाकून प्रत्यक्ष निर्णय करण्याचं कार्य महाराष्ट्रानंच सर्वप्रथम केलेलं आहे. शेतकरी हाच महाराष्ट्राचा प्राण असून शेतकरी हेच महाराष्ट्राचे राज्यकर्ते आहेत, असं यशवंतराव जाहीरपणें सांगत होते. महान् संत व ऋषि होऊन गेलेल्या महाराष्ट्राची जनता आपली जात, वंश व पक्ष इत्यादि क्षुल्लक मतभेद विसरून एक होईल, तर महाराष्ट्राचा भविष्यकाळ उज्ज्वल राहील, असं त्यांचं आवाहन होतं. महाराष्ट्राबाबतच्या स्वप्नसृष्टींत महाराष्ट्रांत एकहि निरक्षर रहाणार नाही, शेती व उद्योगधंदे यांसाठी आवश्यक असलेल्या व्यक्तींना

शिक्षण देण्यासाठी तांत्रिक व शेती-शाळांची मालिका असेल व महाराष्ट्रांतील प्रत्येक खेड्यांत वीज उपलब्ध होईल असं आश्वासन देऊन कोट्यवधि हात कामाला लावण्याचा त्यांचा जिवापाड प्रयत्न होता.

राज्याला नवा कूळ-कायदा लागू करून कसेल त्याची जमीन हें नवं तत्त्व राज्यानं स्वीकारलेलंच होतं. १९५६ मध्येच हा कायदा अस्तित्वांत आला आणि त्यानुसार मुंबई राज्यांतील सर्व कुळांनी त्यांच्याकडे असलेली सर्व जमीन एका विशिष्ट तारखेला ( १ एप्रिल १९५७ ) खरेदी केलेली आहे, असं समजण्यांत आलं. कसणाऱ्याचा दिवस म्हणूनच तो जाहीर झाला. जमिनीचे कब्जे-हक्क कांही अपवाद वगळतां कुळांना देण्यांत आले.

नव्या कूळ-कायद्यांतील एक महत्त्वाची तरतूद अशी होती की, जर कुळानं स्वखुषीनं आपली जमीन मालकास परत केली, तर मालकाला ती फक्त स्वतः कसण्यासाठी किंवा बिगरशेती कारणासाठी वापरण्याकरिता स्वतःकडे ठेवतां येईल. जी जमीन, जमीनमालकाला स्वतःकडे ठेवतां येत नाही ती कलेक्टरकडे जाते आणि कलेक्टर ती भूमिहीन कुळाला देऊं शकतात. शिवाय कूळ आणि मालक यांना आपसांत वाटाघाटी करून कुळाला घराची जागा खरेदी करतां येते. परस्पर-संमतीनं किंमत न ठरल्यास ट्रायब्यूनल किंमत ठरवून देतें; अर्थात् ही किंमत जागेच्या भाड्याच्या वीसपटीपेक्षा जास्त असणार नाही, अशी या कायद्यांत तरतूद होती.

कसेल त्याची जमीन हें तत्त्व लागू झाल्यापासून महाराष्ट्राच्या शेती-क्षेत्रांत, जमीन-मालकीच्या क्षेत्रांत प्रचंड क्रांति झाली. जमीनमालक आणि कुळं यांच्यांतील झगडे, फिर्यादी हा एक फार मोठा इतिहास त्यांतून निर्माण झाला. एक गोष्ट मात्र खरी, मध्यमवर्गीय जमीन-मालक हा सरकारचा शत्रु बनला, तर सर्वसामान्य शेतकरीवर्गांत सरकारकडे एका वेगळ्या, आपुलकीच्या दृष्टीनं पहाण्याची भावना निर्माण झाली. अनेक कुळांना या कायद्यानं जमिनीचे मालक बनवल्यानं, शेती पिकवायची ती स्वतःसाठी ही दृष्टि त्यांना प्राप्त झाली आणि मोठ्या हिरीरीनं त्यांनी उत्पादनाच्या क्षेत्रांत धडक मारली.

१९४७ च्या मुंबई तुकडेबंदी-तुकडेजोड कायद्याखाली राज्यांत अनेक गावांतून तुकडेजोड करण्यासंबंधीच्या कारवाया सुरू झाल्या होत्या. या कामाला गति देण्यांत आली आणि त्यामुळे १९५७–५८ सालीं सुमारे १८०० गावांना हा कायदा प्रत्यक्षांत लागू झाला. पुढे तर १ एप्रिल १९५९ पासून तुकडेबंदी व तुकडेजोड हा नवा कायदाच अस्तित्वांत आणण्यांत आला आणि त्यामुळे १९४७ चा कायदा हा सबंध राज्याला लागू झाला. शेतीसाठी जमीनीचं क्षेत्र सलग होण्याच्या दृष्टीनं या कायद्याचा इष्ट असाच परिणाम झाला.

खास जमीनधारा-पद्धत नष्ट करण्याबाबतचे कायदे अमलांत आणण्याचं कार्यहि पूर्ण करण्यांत येऊन महाराष्ट्रांत जहागीरदारीचा अंत करण्यांत आला.

शेत-जमिनीच्या कमाल धारणेवर मर्यादा घालण्याचा ( सिलिंग ) कायदा करून महाराष्ट्र हा खऱ्या अर्थानं पुरोगामी असल्याचं देशांत सर्वप्रथम याच काळांत प्रत्ययास आणून दिलं गेलं आहे. केंद्र-सरकारनं सिलिंगचा कायदा करण्याचा विचार त्यानंतर दहा-बारा वर्षांनी केला. तरीहि देशांतील विविध राज्यांनी त्याची अंमलबजावणी करण्याचं धाडस प्रामाणिकपणानं दाखवलं नाही. पुरोगामीपणाची सवंग भाषा बोलणारे लहानमोठे पुढारी पुढच्या काळांत दिल्लींत आणि अन्यत्र राजकीय क्षेत्रांत झाले असतीलहि, परंतु यशवंतरावांनी आपला पुरोगामी विचार आणि कृति दिल्लींत पोंचण्या-पूर्वी, महाराष्ट्राचे मुख्य मंत्री असतांना प्रत्यक्षांत सिद्ध केलेली आहे.

१९६१ च्या जानेवारीमध्येच महाराष्ट्रांतल्या शेत-जमिनीबाबतचं ( जमीनधारणेवर मर्यादा ) विधेयक समोर आलं आणि या विधेयकामुळे दूरगामी अशा, जमीन-सुधारणेचा पाया घातला गेला. राज्याचे ७४ विभाग पाडण्यांत आले आणि शेत-जमीनधारणेवर मर्यादा घालण्यांत आली. मर्यादेहून अधिक असणारी जमीन ताब्यांत घेऊन, विधेयकांत नमूद केल्याप्रमाणे, अग्रहक्कानं ती वांटण्याची तरतूद करण्यांत आली. या जादा जमिनी-बाबत द्यायची नुकसान-भरपाईची रकम साऱ्याच्या पटीमध्ये ठरवण्यांत येणार होती. जमीन या शब्दाचा अर्थहि विधेयकांत स्पष्ट करण्यांत आला. त्यानुसार शेत-जमीन वा चराईत जमीन ( कुरण ) तसेच गौळीवाड्यासाठी व कोंबडीपालन किंवा पशुपालन यांसाठी वापरली जाणारी जमीन, अशी ही व्याख्या ठरवण्यांत आली.

जमिनीची जी मर्यादा निश्चित करण्यांत आली त्यामध्ये जिरायती जमिनीसाठी निश्चित केलेली कमाल मर्यादा ही स्थानिक क्षेत्रानुसार ८४ ते १५६ एकर अशी होती. कायम पाणीपुरवठा असणाऱ्या जमिनीची मर्यादा १६ एकर आणि दुबार पिकाची हंगामी पाणीपुरवठ्याच्या जमिनीची कमाल मर्यादा २४ एकर करण्यांत आली. एका पिकाची हंगामी पाणीपुरवठा असलेल्या जमिनीची कमाल मर्यादा मात्र ४८ एकर होती. पांच माणसांचं एक कुटुंब अशी कुटुंबाची व्याख्या निश्चित करूनच निरनिराळ्या श्रेणींतली ही कमाल जमीन-मर्यादा ठरवण्यांत आली होती. ८ फेब्रुवारीला हें विधेयक प्रत्यक्ष सादर झालं. त्यावर सर्व बाजूंनी चर्चा होऊन तें संमत करण्यांत आलं आणि राष्ट्रपतींनी त्याच वर्षाच्या जूनमध्ये या विधेयकास संमति दिल्यानंतर कायदा म्हणून तें अस्तित्वांतहि आणलं गेलं.

शेती पिकवायची तर शेतीसाठी पाणीपुरवठ्याची कायमची व्यवस्था करण्याचा एक बिकट प्रश्न होता. महाराष्ट्रांतल्या नद्या आणि भू-रचना याचा अभ्यास करून पाटबंधारे आणि वीज-निर्मिति या दोन्ही दृष्टींनी संशोधन करावं लागणार होतं. योजना करायची ती शास्त्रशुद्ध पद्धतीनं करायची, असा यशवंतरावांचा बाणा असल्यानं पाटबंधारे, पाणीपुरवठा, पाण्याची उपलब्धता आणि वीजनिर्मिति अशा विविध हेतूनं या कामांची आखणी त्यांनी सुरू केली. यासाठी मग सर्वप्रथम एका खास सर्कलची रचना

त्यांनी केली. पाटबंधारे व विद्युत्-निर्मिति यांसाठी उपयोगी पडतील अशा पाण्याच्या साधनासंबंधी माहिती गोळा करणं हें या सर्कलचं काम ठरलं.

जल-साधनसामग्री संशोधन विभाग ( सर्कल ) या नांवानं हें काम सुरू झाल्या-नंतर जल-विद्युत् निर्मितीसाठी योग्य अशी जल-सामग्री शोधण्याच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी चार विभागांचा एक वेगळा विभाग तयार करण्यांत आला. कृष्णा, भीमा व रत्नागिरी आणि कुलाबा या जिल्ह्यांतल्या सर्व पश्चिम-वाहिनी नद्या, गोदावरी नदीनं व्यापलेला राज्यांतला सर्व विभाग, बाणगंगा व मांजरा खोरें, तापी, वर्धा आणि वैनगंगा-टापू, गुजरातमधलीं ( तापीचं खोरं सोडून ) इतर नद्यांचीं खोरीं, ठाणें जिल्ह्यांतल्या सर्व पश्चिम-वाहिनी नद्या आणि सौराष्ट्र व कच्छमधल्या सर्व नद्यांचीं खोरीं असं या विभागाचं एकूण कार्यक्षेत्र होतं.

विदर्भ व मराठवाड्यांतल्या पाटबंधाऱ्यांच्या योजनांसाठी सरकारनं एक इरिगेशन डिव्हिजन व पाच सब्-डिव्हिजन्स स्थापन केल्या आणि उपलब्ध पाणीपुरवठ्याच्या सोयींची व्यापक पहाणी करण्यासंबंधी हुकूम दिले. विदर्भांत नवीन जमीन, धान्याच्या लागवडीखाली आणण्यासाठी किफायतशीर पाटबंधाऱ्यांच्या योजनांची निवड करणं आणि मराठवाड्यांत समाज-विकास व राष्ट्रीय विकास-गट यांना लागू करण्यासाठी ही योजना सिद्ध करण्यांत आली होती.

शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याबाबतच्या सर्वसाधारण धोरणासंबंधी व व्यवस्थे-संबंधी सरकारला सल्ला देण्यासाठी मुंबई राज्य इरिगेशन बोर्ड हेंहि याच काळांत अस्तित्वांत आलं. सार्वजनिक बांधकामखात्याचे मंत्री हे या बोर्डाचे अध्यक्ष होते आणि इरिगेशनसाठी ८८·१२ कोटींची तरतूदहि करण्यांत आली होती.

शेतकरी आणि ग्रामीण विभाग यांच्या हिताचा यशवंतरावांना ध्यास लागला आहे, असा आरोप त्या काळांत त्यांच्यावर करण्यांत येत असे. पाटबंधारे-मंडळाच्या उद्घाटनाच्या समारंभ-प्रसंगीं बाळासाहेब देसाई यांनीच हा आरोप केला. देसाई यांनी जें मत व्यक्त केलं त्याची संभावना त्या वेळीं आरोप म्हणून करण्यांत आली असली, तरी बाळासाहेबांचा हेतु 'आरोप' करण्याचा नव्हता. आरोप करण्याचं कारणहि नव्हतं; कारण यशवंतरावांनी संपूर्ण महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचाच ध्यास घेतला होता.

महाराष्ट्र हा प्रामुख्यानं खेड्यांत पसरलेला असल्यामुळे, ग्रामीण विकासाला प्राधान्य देणं क्रमप्राप्तच होतं. समाजांत शेतकरीवर्ग बहुसंख्य असूनहि अर्थव्यवस्थेचा हा भाग दुर्लक्षिला गेलेला आणि अवनत असा आहे. त्यामुळे यशवंतरावांवर होणारा तथाकथित आरोप ते मान्यच करतात आणि शेतकरीवर्गाच्या कोणत्याहि गोष्टीला आपल्याकडून, त्यांच्या परिस्थितीबाबत चटकन प्रतिसाद दिला जातो असंहि सांगतात. विकास-कार्याचा यशवंतरावांचा निकष असा की, त्या कार्यामुळे दारिद्य व घाण यांत खितपत पडलेल्या व सुसंस्कृत जीवनाला आंचवलेलं भकास जीवन खेडोपाडीं जगत

असलेल्या बहुजन-समाजाला किती फायदा झाला ? लोक खेड्यांत रहातात आणि जमीन हेंच त्यांच्या उपजीविकेचं साधन आहे. सर्व धंद्यांत महत्त्वाचा धंदा शेती.

यशवंतरावांच्या मतें, इतर सर्व प्रश्न थिटे पडावेत असा भारतीय शेतीचा असलेला एक प्रश्न म्हणजे पाटबंधाऱ्याचा प्रश्न; शेतीला ज्यावर विसंबतां येईल असा पाणीपुरवठा करण्याचा होय. देशांतली त्या काळांत असलेली ८० टक्के व मुंबई राज्यांतली ९५ टक्के जमीन पावसाच्या लहरीवर सर्वथैव अवलंबून असावी, हें त्यांना लांछनास्पद वाटत होतं. पाटबंधाऱ्यांच्या सोयीचा विस्तार करण्यानंच भारतीय शेतींत महत्त्वाचा बदल घडवून आणतां येईल असं त्यांचं मत होतं आणि त्यानुसारच राज्यांतल्या पाटबंधाऱ्यांच्या सोयी वाढवण्याचं काम त्यांनी सुरू केलं.

पाटबंधारे आणि जलसंपत्ति याबाबत महाराष्ट्राची एकदा संपूर्ण पहाणी व्हावी या उद्देशानं यशवंतरावांनी स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नंतर राज्य-पाटबंधारे-मंडळाची स्थापना केली. यासाठी नियुक्त करण्यांत आलेल्या समितींत डॉ. धनंजयराव गाडगीळ, एम. एल्. चाफेकर, अण्णासाहेब शिंदे, दत्ता देशमुख, यशवंतराव गिरमे, के. जी. देशमुख, श्रीपतराव कदम, शंकरराव मोहिते, जी. एन्. पंडित आणि डी. ए. गडकरी यांचा समावेश होता. एस्. के. बेडेकर हे या समितीचे कार्यवाह होते.

बर्वे-समितीनं या प्रश्नाचा सर्वांगीण असा करून अभ्यास केला. त्यांनी तयार केलेला अहवाल महाराष्ट्र सरकारच्या दप्तरीं दाखल आहे. महाराष्ट्रांतील भौगोलिक परिस्थिति आणि डोंगराळ भू-रचना हीं लक्षांत घेतां, राज्यांतल्या पाण्याचा थेंब न् थेंब अडविला, तर किती टक्के जमिनीला पाणी-पुरवठा होऊं शकेल आणि त्यासाठी एकूण किती कोटि रुपये खर्च करावे लागतील याचा संपूर्ण तपशील, या अहवालांत नमूद आहे. निसर्गच महाराष्ट्राच्या इतका विरुद्ध आहे की, वर्षानुवर्षं कोट्यवधि रुपये खर्च केल्यानंतरहि त्यांतून साकार होणाऱ्या पाटबंधाऱ्यांच्या सोयींतून राज्यांतली जास्तींत जास्त २२ ते २५ टक्के जमीन पाण्याखाली येऊं शकेल, असं समितीनं आपलं मत नोंदवलं आहे.

यशवंतरावांनी पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित केलं होतं आणि त्यासंबंधीचं उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी त्यांनी जिद्द बाळगली होती. त्यांनी तें उद्दिष्ट साध्य केलंहि असतं. अर्थात् महाराष्ट्रांत ते मुख्य मंत्री म्हणून दीर्घकाळ राहिले असते तरच हें शक्य होणार होतं. पुढच्या काळांत परिस्थिति बदलली. यशवंतरावांना दिल्लीला जावं लागलं आणि बर्वे-समितीचा अहवाल पुढल्यांच्या अभ्यासासाठी दप्तरांतच राहिला. समितीनं सूचित केलेल्या योजनांपैकी, फार थोड्या योजनांची कार्यवाही नंतरच्या काळांत होऊं शकली. उपलब्ध असेल तिथून शेतीसाठी पाण्याचा उपसा करण्यासाठी म्हणून राज्य-सरकारनं शेतकऱ्यांना त्या काळांत ऑइल एंजिनं, आणि पंपिंगसेटस् पुरवण्याची एक योजना विदर्भ, मराठवाडा, सौराष्ट्र आणि कच्छ या विभागांना लागू केली. त्यामुळे असलेल्या पाण्याचा तरी शेतीसाठी उपयोग करणं शेतकऱ्यांना सोयीचं ठरलं.

कांही नव्या धरणांची, जल-विद्युत् योजनेचीं आणि थर्मल पॉवर स्टेशनचीं कामं यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत केलीं. कोयना जल-विद्युत् योजनेच्या २०७ फूट उंचीच्या धरणाचा कॉंक्रिटचा बांध बांधण्याच्या प्रमुख प्रकल्पाचा प्रारंभ १ मार्च १९५८ ला यशवंतरावांच्या हस्तेंच सुरू झाला. महाराष्ट्राचं भाग्य उजळून काढणारी सुमारें ३०० कोटि रुपये खर्चाची ही योजना तीन टप्प्यांत पूर्ण होणारी अशी होती. पांच लक्ष किलोवॅट वीज निर्माण करून देणारी ही योजना भारताला ललामभूत ठरलेली आहे. कोयना योजनेंतलं पहिलं जनित्र १६ मे १९६२ रोजीं यशवंतरावांच्या हस्तेंच सुरू झालं आणि महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाचीं चक्रं गतिमान होण्यास प्रारंभ झाला.

मराठवाड्याचा कायापालट घडवून आणणारा पूर्णा प्रकल्प या १७ कोटि ५० लक्ष रुपये खर्चाच्या प्रकल्पाचा प्रारंभहि यशवंतरावांनीच केला. सिद्धेश्वर, येलदारी आणि वसमत अशा तीन ठिकाणीं या धरण-प्रकल्पांचं बांधकाम करण्याची ही प्रचंड योजना होती. नीरा खोऱ्याचा संपूर्ण विकास करण्याच्या उद्देशानं, नीरा नदीवर वीर इथे वीर-धरण बांधण्याची योजनाहि त्यांच्याच कारकीर्दीतली आहे. या योजनेचा दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेंतच त्यांनी समावेश केला आणि पांच वर्षांच्या काळासाठी ४२५ लक्ष रुपयांची तरतूद करून ठेवली. या धरण-योजनेवर अखेर ५८४·३३ लक्ष रुपये खर्च करून ही योजना पूर्ण करण्यांत आली आणि त्यामुळे संपूर्ण नीरा खोऱ्याचा कायापालट घडून आला.

विदर्भांतील पारस या ठिकाणचं थर्मल पॉवर स्टेशन हा असाच एक भव्य-दिव्य स्वरूपाचा प्रकल्प त्यांनी आपल्या कारकीर्दीत पूर्ण केला. विदर्भाच्या जीवनाचं आधुनिकी-करण करण्याच्या दिशेनं टाकलेलं तें एक महत्त्वाचं पाऊल होतं. शेती-औद्योगिक प्रगतीस किंबहुना अप्रत्यक्षपणें महाराष्ट्राच्या प्रगतीसच हातभार लावणारी ही योजना होती. पारसच्या कामाची प्राथमिक सुरुवात १९५६ मध्ये झाली. १९५७ मध्ये विद्युत्-केंद्राच्या इमारतीचा कोनशिला समारंभ झाला. १९५९ मध्ये यंत्राची पायाभरणी झाली आणि १९६१ मध्ये या प्रकल्पांत प्रत्यक्ष वीज-निर्मिति सुरू झाली. दुसऱ्या योजनेच्या काळांतच हें काम पूर्ण झालं. तीस हजार किलोवॅट वीज रोज निर्माण होण्याची या प्रकल्पाची क्षमता होती.

सत्तेचं विकेंद्रीकरण करण्याचा कायदा हा यशवंतरावांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत झालेला कायदा आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी याचा ठसा महाराष्ट्रा-च्या राजकीय आणि प्रशासकीय जीवनावर, तसंच राज्यांतल्या सर्व जिल्ह्यांतील जनतेच्या मनावर आणि मतांवर उमटलेला निरंतरचा ठसा आहे. लोकशाही पद्धतीचं विकेंद्री-करण करण्याचा विचार यशवंतरावांनी मोठ्या दूरदृष्टीनं महाराष्ट्राच्या भूमींत रुजवला.

बलवंतराय मेहता-समितीनं लोकशाही-पद्धतीचं विकेंद्रीकरण करण्याचा विचार पूर्वी सुचवला होता. मेहता-समितीच्या सूचनेचा सर्व बाजूंनी विचार करण्याचं राज्य-

सरकारनं ठरवलं आणि त्यासाठी वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखालीं एका समितीची स्थापना करण्यांत आली.

ग्रामीण भागाच्या विकासासंबंधीची जबाबदारी राज्य-सरकारची. त्या वेळची कारभारविषयक यंत्रणा, तिच्या साहाय्यास असलेल्या सल्लागार-समित्या आणि जिल्हा लोकलबोर्डें, जनपद-सभा आणि ग्रामपंचायती यांसारख्या स्थानिक अधिकाऱ्यांमार्फत ही जबाबदारी एखाद्या कायद्यानं एक वा अनेक संस्था स्थापन करून त्यांच्याकडे सोपवावी काय, याचा विचार करणं आवश्यक ठरलं होतं. तेव्हा जिल्हा सब्डिव्हिजन, तालुका अथवा गट यांच्यासारख्या विवक्षित घटकांसाठी या संस्था स्थापन करून, त्यांवर लोकनियुक्त प्रतिनिधींना सभासदत्व द्यावं; तसंच या संस्थांना ही जबाबदारी पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार व आर्थिक साधन-सामग्री उपलब्ध करून द्यावी, असा एक विचार पुढे आला.

सत्तेच्या विकेंद्रीकरण करण्याच्या संदर्भांत जे विविध विचार पुढे येत होते त्यांचा सर्व बाजूंनी या समितीनं विचार व अभ्यास करावा, असा ही समिति स्थापन करण्यामागील उद्देश होता. समितीची स्थापना केल्याचं २१ जुलै १९६० ला जाहीर करण्यांत आलं. या समितीनं पुढच्या सहा-सात महिन्यांत या प्रश्नाचा अभ्यास केला आणि आपला अहवाल सरकारला सादर केला. सरकारकडे हा अहवाल आल्यानंतर पुढे ७ एप्रिल १९६१ या दिवशीं यशवंतराव चव्हाण यांनी हा अहवाल विधानसभेसमोर चर्चेसाठी सादर केला. सत्तेचं लोकशाही विकेंद्रीकरण करण्याचं तत्त्व सरकारनं मान्य केलेलं असून देशाचं सामाजिक व आर्थिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ग्रामीण भागांतल्या जनतेला सत्ता देणें कां आवश्यक आहे, याचं समर्थन यशवंतरावांनी या वेळीं केलं.

पंचायत राज्याच्या कल्पनेला बऱ्याच विचारविनिमयानंतर आकार प्राप्त झाला होता; परंतु त्याचा अर्थ जुन्या पंचायत राज्याचं पुनरुज्जीवन करण्यांत येणार आहे असा नव्हता. कारण शिक्षण, सहकारी चळवळ अशा नव्या शक्ति महाराष्ट्रांत आता अस्तित्वांत आल्या होत्या. ग्रामीण जीवनावर त्यांचा प्रभाव निर्माण होत राहिला होता. यशवंतरावांनी या सर्व वस्तुस्थितीचं विवेचन करूनच समितीचा अहवाल सादर केला. तरी पण या अहवालाचं विधानसभेंत संमिश्र स्वागत झालं. संयुक्त महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष आणि विरोधी आमदार एस्. एम्. जोशी यांनी मात्र अहवालाचं स्वागत केलं.

या चर्चेनंतर लोकशाही विकेंद्रीकरणासंबंधीच्या विधेयकावर उलटसुलट चर्चा होत राहिली आणि अखेर हें विधेयक प्रवर-समितीकडे सोपवावं असं ठरलं. प्रवर-समितीनंहि त्यावर विचार करून आपला अहवाल देण्यास कांही अवधि घेतला. या अहवालावर मग विधानसभेंत चर्चा झाली आणि ८ डिसेंबर १९६१ ला अखेर हें विधेयक संमत झालं.

सत्तेचं विकेंद्रीकरण करणाऱ्या जिल्हा-परिषदा व पंचायत-राज्याची योजना प्रत्यक्षांत मात्र १ मे १९६२ ला अमलांत आली. अशा तऱ्हेची योजना अमलांत

आणणारं महाराष्ट्र हें भारतांतलं पहिलंच राज्य होय. राज्याच्या धोरण-सूत्रींत यशवंतरावांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा विचार नमूद केलाच होता. उक्ति आणि कृति यांचा प्रत्यक्षांत मेळ घालणारे महाराष्ट्राचे पहिले मुख्य मंत्री म्हणून त्यांचा त्या वेळीं सर्वत्र गौरवच झाला.

विधेयक संमत होतांच जिल्हा-परिषदा व पंचायत-समित्या यांच्या पहिल्या निवडणुकीचा कार्यक्रम शासनानं तयार केला आणि त्या वर्षाच्या २४ मे ते ८ जून या काळांत निवडणुका होऊन ग्रामीण भागांतल्या जनतेच्या हातांत प्रत्यक्षांत सत्ता पोंचली. यशवंतरावांनीच ती पोंचवली.

महाराष्ट्र राज्य हें खऱ्या अर्थानं कल्याणकारी राज्य व्हावं या हेतूनंच यशवंतरावांनी राज्यकारभाराचीं सूत्रं स्वीकारलेलीं असल्यामुळे योग्य त्या दिशेनंच त्यांची वाटचाल होत राहिलेली आढळते. कल्याणाकारी राज्य म्हणजे काय, याच्या यशवंतरावांच्या कल्पना अगदी भिन्न दिसतात. कल्याणकारी राज्यांत केवळ सरकार लोकांना मदत करतं असं नव्हे, तर लोकहि सरकारला मदत करतात, करावी, अशी ही भावना आहे. आपले नागरिक हमखास अपंग होणार आहेत अशी खात्री बाळगून सतत त्यांच्यासाठी कुबड्या तयार करण्यांत गुंतलेलं राज्य हें कल्याणकारी राज्य, असं ते मानत नाहीत. सरकारनं लोकांसाठी विशिष्ट सुखसोयी उपलब्ध करणं एवढीच कल्याणकारी राज्याची कल्पना त्यांना अभिप्रेत दिसते. कल्याण ही एकानं दुसऱ्यावर लादण्याची कल्पना अर्थातच नव्हे. परस्परांच्या सहकार्यानं ती निर्माण व्हावी लागते. याचा दुसरा अर्थ असा की, प्रत्येकाच्या गरजा भागतील इतकं उत्पादन करणं ही कल्याणकारी राज्याची मूलभूत गरज असते.

याच दृष्टिकोनांतून विकास-कार्यक्रमांचा आणि लोकांना सुखसोयी उपलब्ध करून देण्याचा धुमधडाका सरकारनं सुरू केला होता. राज्यांतल्या रस्त्यांच्या – सडकांच्या विकासाचा कार्यक्रम हा, सुखसोयी उपलब्ध करून देण्याचा एक भाग म्हणूनच त्या वेळीं हातीं घेण्यांत आला. सर्व हंगामांत उपयोगी पडतील असे प्रमुख रस्ते चांगल्या स्थितींत रहातील अशा पद्धतीनं तयार करण्याचा हा कार्यक्रम होता. त्यानुसार मुंबई-अहमदाबाद सडक, मुंबई-कोकण-गोवा सडक, आणि मुंबईबाहेर जाणाऱ्या दोन एक्स्प्रेस सडका, हीं राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतलीं दळणवळणाच्या कार्यक्रमाचीं प्रमुख वैशिष्ट्यं ठरवण्यांत आलीं.

सडक-विकासाच्या योजनेमध्ये १९४३ मध्ये, ब्रिटिश काळांत कांही तत्त्वं नमूद केलेलीं होतीं. त्या तत्त्वांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनं सर्वंकष स्वरूपाचा कायदा करणारं मुंबई हें पहिलं राज्य होय. हा कायदा जारी करण्यांत यशवंतरावांच्या तडफदार धोरणाचाच प्रत्यय येतो. सडकांचा केवळ कार्यक्रम तयार करून ते थांबले नाहीत, तर १९५७–५८ च्या अंदाजपत्रकांत त्यासाठी ४·२ कोटींची तरतूदहि त्यांनी केली. याच्या जोडीला भारत सरकारकडून ४·५ कोटि रुपये मिळतील अशी अपेक्षा

गृहीत धरण्यांत आली होती. निश्चित केलेल्या कार्यक्रमानुसार नंतरच्या काळांत या सडका अस्तित्वांत आल्या.

दैनंदिन जीवनापासून राजकारण वेगळं काढतां येत नाही हा दृष्टिकोन मुख्य मंत्र्यांनी स्वीकारलेला असल्यामुळे जीवनाच्या प्रत्येक अंगाशीं स्पर्श करणाऱ्या गोष्टीकडे व्यवहारीपणानं पहाण्याचा त्यांचा कल दिसतो. राजकीय आखाड्यांत बसून करण्यांत येणाऱ्या प्रत्येक निर्णयाचा परिणाम लोकांच्या दैनंदिन जीवनावर घडत असतो. कोणते आणि कसे निर्णय होतात यावरच सामाजिक स्वास्थ्य अवलंबून रहातं. सरकार केवळ राजकारणाकरिता निर्णय करणारं असेल, तर त्यामुळे लोकांचं जीवन सुसह्य होईलच अशी खात्री नसते. किंबहुना असे होणारे निर्णय हे लोकांच्या दृष्टीनं कित्येकदा असह्यच ठरतात.

लोकशाहीची व्याख्या, लोकांचं, लोकांसाठी, लोकांनी चालवलेलं सरकार अशी जर असेल, तर लोकशाही सरकारांत लोकच आपल्यासाठी निर्णय करत असतात हें उघड आहे. सरकारचे निर्णय आणि लोक यांच्यांत फार मोठी दरी निर्माण होणार असेल, तर लोकशाही सरकारची कल्पना किंवा मूळ हेतूच बदलून जातो. मुंबई राज्य हें सार्थ लोकशाही राज्य बनावं असा या मुख्य मंत्र्यांचा प्रयत्न असल्यामुळे त्यांच्याकडून केले जाणारे निर्णय हे लोकांच्या दैनंदिन जीवनाला चांगल्या अर्थानं स्पर्शून जाणारे आणि लोकांना त्याचा वाजवी लाभ करून देणारे, त्यांचं जीवन सुसह्य ठरविणारे असेच हे निर्णय ठरले.

सांस्कृतिक आणि करमणुकीच्या क्षेत्रांतले निर्णयहि त्यांनी अशाच स्वरूपाचे केले. नाट्यकलेला उत्तेजन देण्यासाठी याअगोदर कांही खर्चाची योजना सरकारनं केलेलीच होती. नंतर १९५९-६० सालासाठी म्हणून ८४ हजारांची आणखी योजना तयार करण्यांत आली. नाट्यकलेला प्रोत्साहन देणं हा या योजनेचा हेतु ठरला. त्यानुसार मराठी व गुजराती या भाषांतल्या सर्वोत्कृष्ट नाटकांकरिता शिक्षण-संस्थांच्या पातळीवर नाट्यमहोत्सव संघटित करून नाट्यकलेचीं शिबिरं चालू करावींत असं ठरवण्यांत आलं. मुंबईत संस्कृत नाट्यमहोत्सव संघटित करण्याचा एक नवा पायंडा पाडण्याची योजनाहि यांत अंतर्भूत करण्यांत आली. नंतरच्या काळांत महाराष्ट्राच्या नाट्यसृष्टींत अमाप पीक उगवलं, पण हें पीक वाढण्याकरिता जमिनीची मशागत यशवंतरावांनी आपल्या हातानं केलेली आहे हें नाट्यरसिक जाणून आहेत.

करमणूक-करांत सूट मिळण्याच्या बाबतींत सरकारनं एक नवी पद्धत या काळांत लागू केली. १९५७ च्या एप्रिलपासून ही नवी पद्धत लागू झाली. करमणूक-कराची सूट देण्यासाठी चित्रपटांची निवड प्रत्येक तिमाहींत करण्यासाठी या पद्धतींत कांही अटी ठरवण्यांत आल्या. पूर्वी सूट देण्याविषयी निर्मात्याकडून अर्ज आल्यानंतर त्याला सूट द्यायची की नाही तें 'ॲडहॉक' तत्त्वावर ठरवण्यांत येत असे. तांत्रिकदृष्ट्या पुरेसे उच्च दर्जाचे चित्रपट निघावेत आणि निर्मात्यांना अशा प्रकारचे अधिकाधिक चांगले चित्रपट

काढण्यास उत्तेजन मिळावं हा यांतला हेतु होता. तथापि या सवलतींचा फायदा घेई-पर्यंत बराच कालावधि जात असे व मूळ हेतु सफल होत नसे. नवी पद्धत जी अमलांत आणली गेली त्यामध्ये पूर्वीची कार्यपद्धत दुरुस्त करण्यांत आली. त्यामुळे चित्रपट-निर्मात्यांना चांगले चित्रपट तयार करण्याच्या दृष्टीनं तें लाभदायक ठरलं. वेळेची बचत झाली आणि चित्रपटसृष्टींत नव्या चित्रपटांच्या योजना भराभर आकारास येऊं लागल्या. चित्रपट हें लोकांचं दैनंदिन करमणुकीचं साधन असल्यामुळे सरकारनं केलेला निर्णय हा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणें अशा प्रकारे लोकांच्या जीवनाला स्पर्शून जाणारा असाच होता.

साहित्याच्या क्षेत्रांतहि प्रादेशिक भाषांतून लिहिलेल्या उत्कृष्ट पुस्तकांना बक्षिसं देऊन लेखकांना वाङ्मय-निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याचं कार्य सरकारनं एका निर्णयाद्वारे या काळांत केलं. विद्वान्, संशोधक, लेखक, कलावंत, दिग्दर्शक, संगीतकार, उत्कृष्ट नाटकं व ग्रंथ यांचा बक्षिसं देण्याच्या यादींत प्रथमच समावेश करण्यांत आला.

कलावंतांना आर्थिक साहाय्य सरकारतर्फे देण्याची प्रथा यशवंतरावांनीच महाराष्ट्रांत सुरू केली. नाट्यक्षेत्रांतील सम्राट् व कलावंत नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व हे वृद्ध, अपंग झाले होते. ज्या कलावंतानं, मराठी नाट्यरसिकांना वर्षानुवर्षे डोलवलं तो महान् कलावंत अंथरुणांत विपन्नावस्थेंत खिळून पडला असतांना सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांनी ही गोष्ट यशवंतरावांच्या नजरेस आणली. कलावंत या नात्यानं बालगंधर्व हे यशवंतरावांचं दैवतच होतं. बालगंधर्वांचीं नाटकं पहाण्यासाठी, कराडहून ते कोल्हापूरला मित्रांसमवेत लहानपणीं, अनेकदा गेलेले असून महाराष्ट्राच्या या थोर कलावंताबद्दल त्यांना कमालीचा आदर होता. पु. ल. देशपांडे यांनी बाल-गंधर्वांची हलाखी नजरेला आणतांच यशवंतरावांनी तातडीनं त्या संबंधांत निर्णय केला आणि मासिक ३०० रुपये मानधन बालगंधर्वांना सुरू करून दिलं.

बालगंधर्व, अखेरच्या दिवसांत पुणें शहरांत बेशुद्धावस्थेंत खिळून पडले होते. अंथरुणांत सतत राहिल्यानं आणि हालचाल बंद असल्यानं त्यांच्या अंगास जखमा होऊं लागल्या. औषधोपचार सुरू होते; परंतु उपयोग होत नव्हता. परदेशांतून एक विशिष्ट प्रकारचं औषध उपलब्ध होऊं शकलं तर त्याची आवश्यकता होती. तज्ज्ञ डॉक्टरांचं हें मत यशवंतरावांपर्यंत पोंचवलं गेलं. त्या वेळीं ते दिल्लींत होते. त्यांनी आवश्यक तें औषध उपलब्ध करून देण्याची तयारीहि दर्शवली, परंतु तें औषध इथे पोंचावं आणि बालगंधर्वांना आराम पडावा असा जणू योगच नव्हता !

राजकवि यशवंत (यशवंत दिनकर पेंढरकर) यांचा बहुमान करावा असं कराडचे शंकरराव करंबेळकर यांनी एक दिवस यशवंतरावांना सुचवलं. कवि यशवंत यांना बडोदें दरबारनं 'राजकवि' म्हणून पूर्वीच भूषवलेलं होतं. एक थोर कवि या नात्यानं महाराष्ट्राच्या साहित्यक्षेत्रांत कवि यशवंतांनी अग्रस्थान मिळवलेलं होतं. मित्रवर्य करंबेळकर यांची सूचना योग्यच होती. यशवंतरावांनी या सूचनेचा तत्काळ आदर केला. राजकवि यशवंत यांना 'महाराष्ट्र-कवि' म्हणून भूषवलं आणि

त्यांचा बहुमान केला. कवि यशवंतांना आजन्म दरमहा ४०० रुपये मानधन देण्याचाहि निर्णय त्यांनी केला. विशेष हें की, या मानधनाबद्दल कवि यशवंत यांच्यावर कांहीहि बंधनं अगर जबाबदारी टाकण्यांत आलेली नव्हती. ऑक्टोबर १९६० पासून कवि यशवंतांना हें मानधन मिळत राहिलं.

द्वैभाषिक संपून संयुक्त महाराष्ट्र – महाराष्ट्र राज्य १९६० मध्ये अस्तित्वांत आल्यानंतर त्याच वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यांत महाराष्ट्र राज्य कायदेमंडळाचं अधिवेशन नागपूर इथे, वर्षातून एकदा घेण्याचा निर्णय यशवंतरावांनी केला. नागपूर शहराचं महत्त्व कायम ठेवून तें वाढवण्यांत येईल असं आश्वासन त्यांनी दिलेलंच होतं. त्यानुसार नागपूर इथे हें अधिवेशन प्रथमच भरवण्यांत आलं. या वर्षापासूनच पुढे दरवर्षी विशिष्ट काळासाठी राज्य-सरकारचं वास्तव्य नागपूर इथे होऊं लागलं आणि कायदेमंडळाचं एक अधिवेशनहि भरूं लागलं.

नागपूरच्या पहिल्या अधिवेशनांतच, दि. २१ डिसेंबर १९६० ला, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळाचं उद्घाटन यशवंतरावांनी केलं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली या मंडळाची स्थापना त्याच वर्षी १ डिसेंबरला झालेली होती. या मंडळाची स्थापना म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर सांस्कृतिक क्षेत्रांत घडलेली एक महत्त्वपूर्ण अशी घटना होय.

साहित्य आणि संस्कृति यांच्या वृद्धीसाठी व संवर्धनासाठी काम करणारी विद्वज्ज-नांची एक यंत्रणा निर्माण करण्याबद्दल महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळींच यशवंतराव हे वचनबद्ध होते. शासनामार्फत ज्या घोषणा, जे उच्चार, पुनरुच्चार होत गेले त्यांचं फलित स्वरूप म्हणजेच या मंडळाची स्थापना होय. मराठी जनतेला दिलेल्या वचनाची परिपूर्ति, या मंडळाची स्थापना करून यशवंतरावांनी केली. विचारवंत, विद्वान्, मित्र यांच्याशीं प्रदीर्घ चर्चा करून, संपादकांनी केलेल्या सूचना, दिलेले इशारे यांचा विचार करून, महाराष्ट्राचं जीवन व्यापक, विस्तृत नि क्रियाशील बनावं, आणि ठिकठिकाणीं जी विद्वान् मंडळी आहेत, त्यांच्या शक्तीचा, त्यांच्या ज्ञानाचा व साहित्याचा, विचारांचा उपयोग करून काम करण्याची प्रवाही योजना सिद्ध व्हावी या हेतूनं हें मंडळ स्थापन करण्यांत आलं.

या मंडळाला जन्म देणारा जो सरकारी आदेश प्रसिद्ध झाला त्या आदेशांत मंडळासंबंधीच्या कांही धोरणांचा उल्लेख केलेला होता. अर्थात् हीं धोरणं नमुन्यादाखल आहेत असं या मंडळाच्या औपचारिक उद्घाटनाच्या प्रसंगीं यशवंतरावांनी सांगितलं. आणि त्याचबरोबर कुठल्या तऱ्हेचं काम केलं पाहिजे, कसं केलं पाहिजे यासंबंधी कुठलंहि बंधन, कुठल्याहि मर्यादा शासन या मंडळावर घालूं इच्छित नाही, असंहि जाहीर केलं.

शासकीय कामाच्या नेहमीच्या संदर्भात मुख्य मंत्र्यांची ही घोषणा आगळी म्हणावी लागते. कोणत्याहि कार्याच्या बाबतींत नियमांनी आणि बंधनांनी जखडून टाकणं

हें शासकीय कामाचं सूत्र असतं. इथे तर मंडळाला सर्वच बाबतींत मुक्तद्वार ठेवलं होतं; परंतु महाराष्ट्रांत असं मंडळ स्थापन करण्यामागचा यशवंतरावांचा हेतु समजून घेतला म्हणजे त्यांनी सर्व अधिकार, मंडळाच्या स्वाधीन कां केले होते तें लक्षांत येऊं शकतं. मुख्य मंत्र्यांचा या मंडळाकडे पहाण्याचा दृष्टिकोन त्यांतून स्पष्ट होऊं शकतो.

या मंडळामध्ये तज्ज्ञ व विद्वान् मंडळींचा समावेश करण्यांत आला होता. या मंडळींनी आपल्या कार्याची लांबी, रुंदी, उंची, खोली वाढावी म्हणून योग्य ते प्रयत्न करून अधिक व्यापक, अधिक सर्वंकष कार्य केलं तर शासनाला तें हवं होतं. देशांतले लेखक, विचारवंत, कलावंत, शास्त्रज्ञ, संशोधक यांच्या प्रयत्नानं निर्माण होणारं जें विचारधन तेंच खरं म्हणजे समाजाचं फार मोठं धन आहे, अशी महाराष्ट्र शासनाची भूमिका आहे, असा यशवंतरावांचा दावा होता. समाज जिवंत रहातो, तो त्याच्याजवळ असणाऱ्या भौतिक सामर्थ्यानं नाही, तर त्याच्याजवळ असणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांवर आणि विचारधनावर! समाज आणि देश यामुळेच जिवंत राहिलेले आहेत, वाढलेले आहेत असाच इतिहासाचा दाखला आहे. भारताची परंपरा अनेक पंडितांची, विचारवंतांची आणि विद्वानांची अशीच आहे. देशांत व्यास-वाल्मीकींपासून तों रवींद्रनाथ टागोर यांच्यापर्यंत आणि महाराष्ट्रांत ज्ञानेश्वरांपासून तों आजच्या विद्वानांपर्यंत ही परंपरा चालत आलेली आहे. थोर विद्वान्, पंडित, त्यागी संत, पराक्रमी पुरुष अशी ही लांबच लांब परंपरा आहे. देशाची तीच खरी प्रेरणा आहे. ही परंपरा पुढे चालवायची, जतन करायची, तर तें काम करत असतांना त्याकरिता लागणारं साहित्य पुरवणं, साधनसामग्री पुरवणं हें शासनाचं काम आहे आणि त्यासाठी साहित्य आणि संस्कृति मंडळाचा जन्म आहे, असा यशवंतरावांचा याबाबतचा विशाल दृष्टिकोन होता.

मराठी भाषा ही राज्यभाषा करण्याचं तत्त्व राज्य सरकारनं स्वीकारलं आणि त्याबरोबर कांही जबाबदाऱ्याहि निर्माण झाल्या. मराठी भाषेवर अशी जबाबदारी आता आली होती की, तिनं लोकशाहीचा कारभार केला पाहिजे. लोकांचं जीवन संपन्न करील, समृद्ध करील ही जबाबदारी तर होतीच, शिवाय भौतिक अर्थानं जें जें शास्त्र उंचावलेलं आहे, त्या त्या शास्त्रांतलं ज्ञान, मराठी भाषेंत पकडून आणण्याचं कामहि करावं लागणार होतं. तेव्हा ज्ञानरूपी सरोवराचे पाट लोकांच्या जीवनापर्यंत पोंचवण्याचं काम या मंडळाच्या मदतीनं व्हावं अशी यशवंतरावांची अपेक्षा होती.

विदर्भांतले सुप्रसिद्ध साहित्यिक ग. त्र्यं. माडखोलकर यांची आणि यशवंतरावांची एके ठिकाणीं विविध विषयांवर चर्चा झाली होती. या चर्चेच्या ओघांत इतिहासाच्या कांही साधनांकडे माडखोलकर यांनी त्यांचं लक्ष वेधलं होतं. विदर्भ आणि मराठवाडा ही जर आदिभूमि मानायची झाली तर, आणि त्याचा तुटलेला दुवा जोडायचा असेल तर, मराठवाड्याच्या आणि विदर्भाच्या खेड्यापाड्यांतून जीं अनेक साधनं पडलेलीं आहेत त्यांचं संशोधन करण्यांत आलं पाहिजे अशी मनीषा माडखोलकर यांनी व्यक्त केली

होती. इतिहासाच्या पुनरुज्जीवनासाठी ठिकठिकाणीं जीं अनेक साधनं पडलेलीं आहेत त्यांचं संशोधन करण्याचं काम मंडळाच्या रूपानं उभ्या राहिलेल्या संस्थेनं, महाराष्ट्रांत ज्या निरनिराळ्या संस्था आहेत त्यांच्याकडून करून घ्यावं, त्यांना कार्यक्षम, क्रियाशील बनवून त्यांच्या विचारांचा, त्यांच्या शक्तीचा, साधनांचा उपयोग करून घेतला जावा, अशी यशवंतरावांची याबाबतची सूचना होती. मंडळामध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वा. वि. मिराशी हे विद्वान् असल्यानं त्यांनी याबाबत एक योजना तयार करावी, अशी अपेक्षाहि त्यांनी व्यक्त केली.

इतिहासाचं संशोधन करायचं म्हणजे नेमकं काय करायचं याच्याहि यशवंतरावांच्या कल्पना स्पष्ट आढळतात. इतिहासाच्या संशोधनामध्ये भूतकाळाचं उत्खनन करून माहिती जमा करणं याचा तर समावेश असतोच; शिवाय वर्तमानकाळाकडे लक्ष द्यावं आणि तसं करतांना भविष्यकाळाकडे नजर ठेवून महाराष्ट्राला मदत करावी, अशी त्यांची कल्पना होती. साहित्य संस्कृति मंडळ असं या मंडळाचं नांव होतं. यांतल्या 'साहित्य' या शब्दाची व्याख्या यशवंतरावांना अभिप्रेत होती ती अशी : ललित शब्द म्हणजेच केवळ साहित्य नव्हे. ललित साहित्य याचा अर्थ सामान्य जनतेचं हित करणारं साहित्य होय.

अमृताशीं समान अक्षरं देणाऱ्या महान् पंडितांना महाराष्ट्र शिरोधार्य मानतो हें खरं, तरी पण संशोधनासाठी इंग्रजी भाषेचा पाठपुरावा करणं आवश्यकच ठरतं. इतर भाषांमध्ये जें ज्ञानभांडार असेल, जे विचार असतील ते मराठी भाषेंत खेचून आणावेच लागतील. परंतु हें करीत असतांना वेगवेगळ्या भाषेंतलं ग्रंथांचं प्रकाशन करणारं प्रकाशन-खातं असं या मंडळाचं स्वरूप बनावं हें यशवंतरावांना मान्य नव्हतं. तर एक प्रकारचं सर्जनशील, विचार करणारं हें मंडळ म्हणजे एक पॉवर हाऊस बनावं, विद्युत्‌गृह बनावं अशी त्यांची अपेक्षा होती. महाराष्ट्राचं जीवन व्यापक आणि विस्तृत बनावं, वाढतीं क्षितिजं निर्माण व्हावींत आणि त्याचं माध्यम म्हणून मंडळानं काम करावं असा यामागचा स्वाभाविक व्यवहारी दृष्टिकोन होता. अशा प्रकारचं सर्वांगीण हेतु साध्य करणारं एखादं मंडळ जन्मास येणं हें महाराष्ट्रांत त्या वेळीं प्रथमच घडलं. १७ मे १९६२ रोजीं, वाईला या मंडळानं स्थापित केलेल्या विश्वकोश कार्यालयाचं उद्घाटन यशवंतरावांनीच पुढच्या काळांत केलं.

यशवंतरावांनी याच्या जोडीला 'डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेजेस' (भाषा-विभाग) हें एक नवं खातं या काळांत सुरू केलं. सरकारी कारभारांत मराठी भाषेचा, माध्यम म्हणून उपयोग करण्यासाठी त्वरेनं उपाय योजण्यांत आले आणि सरकारी कचेऱ्यांतला कारभार प्रादेशिक भाषेंतून चालवण्याचा निर्णय करून सर्व तालुका-कचेऱ्यांतला कारभार तालुक्याच्या भाषेंतून चालावा, पत्रव्यवहार त्याच भाषेंतून व्हावा, असेहि निर्णय करण्यांत आले.

लोकसाहित्य हें 'मराठी जीवनाचं' विशेष अंग आहे. आजवर हें लोकसाहित्य मुखोद्गत अवस्थेंतच राहिलं होतं. लोक-संस्कृतीचं दर्शन घडवणारं हें लोकसाहित्य अक्षरबद्ध होऊन मराठी जनतेपुढे येण्याची गरज होती. यशवंतरावांनी या कार्याचीहि मुहूर्तमेढ रोवली. लोक-साहित्य व लोक-संस्कृति संमेलन पुण्याला २३ मे १९६१ रोजीं झालं. यशवंतरावांनीच त्याचं उद्घाटन करून या कार्याचा शुभारंभ करून दिला.

राज्याची सर्वांगिण प्रगति होण्यासाठी अशा कांही मूलभूत प्रश्नांचे निर्णय ते करत होते. याच वेळीं मुंबई दूध-योजनेखाली वरळी इथल्या दूध-डेअरीची योजनाहि त्यांनी तयार केली. मुंबई शहरासमोर दूध-पुरवठ्याचा फार मोठा प्रश्न होता. त्यामुळे ३ कोटि रुपये खर्चाची ही योजना तयार झाली. ७ नोव्हेंबर १९६१ ला डेअरीच्या योजनेचं काम सुरू झालं आणि पुढच्या १८ महिन्यांतच तें पूर्ण करून घेतलं गेलं. आरे-दुग्धालयांत डेअरी टेक्नॉलॉजी संस्थेमध्ये पहिला भारतीय दुग्धालय डिप्लोमा अभ्यासक्रमहि त्यांनी आपल्या कारकीर्दीतच सुरू केलेला आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न व कृषि संघटनेच्या विद्यमाने डेन्मार्कचं सरकार आणि भारत सरकार यांनी संयुक्तरीत्या पुरस्कारलेला दुधाच्या धंद्याबाबतचा दुसरा शिक्षणवर्गहि त्यांनी आरे-दूधवाडींत आणला.

कोकण भागांत दिवा-दासगाव मार्गावर रेल्वे सुरू करून कोकणांत रेल्वे पोंचवण्याचं श्रेय यशवंतराव यांचंच आहे. दिवा-पनवेल या रेल्वे-मार्गाचं काम त्यांनी भारत सरकारची मान्यता मिळवून आपल्याच कारकीर्दींत सुरू केलं.

मराठवाड्यांतल्या कला व क्रीडा-गुणांना उत्तेजन देण्यासाठी मराठवाडा सांस्कृतिक मंडळाची स्थापना, राज्य-कामगार योजनेखाली मुंबईत महात्मा गांधी स्मारक इस्पितळ, महाराष्ट्रांतलं पहिलं नर्सिंग कॉलेज, पहिली नेत्रपेढी, माजी सैनिकांसाठी साताऱ्याला प्रशिक्षण तथा उत्पादन-केंद्र, नाशिकला सर्वसाधारण व सर्व सुखसोयींनी सुसज्ज असं क्षयरोग चिकित्सालय, झाडूवाल्यांनी डोक्यावरून मैला वाहून नेण्याच्या पद्धतीस बंदी, शुगर फार्मचं राष्ट्रीयीकरण, असे सर्व प्रकारचे, जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणारे किती तरी निर्णय यशवंतरावांनी करून सारा महाराष्ट्र प्रगतीच्या कामाला लावला.

परंतु या सर्वांपेक्षा, पददलितांना न्याय देण्यासाठी त्यांनी केलेले निर्णय हे अजोड ठरले. नवीन महाराष्ट्र चांगल्या कर्तृत्ववान् हातानं घडवायचा तर इथे सामाजिक समता निर्माण करण्याचा कसोशीचा प्रयत्न आवश्यक होता. महाराष्ट्र हा जास्तींत जास्त खेड्यांत रहातो. अनेक पददलित खेड्यांतच राहिलेले असतात. बौद्ध धर्माचा अंगीकार केलेल्या नव-बौद्धांची आता त्यांत भर पडलेली आहे. राज्याच्या जीवनांत या सर्व पददलितांना हक्काचं स्थान प्राप्त करून देऊन त्यांच्याबद्दल मनांत असलेले जुने राग, लोभ, दोष, स्वार्थ दूर करण्याची आणि आतापावेतों उपेक्षित असलेल्या या समाजांतले लोक आणि सवर्ण हिंदु यांच्यांत भागीदारी व समरसता निर्माण करून देण्याचं राज्य सरकारचं धोरण असल्याचं, राज्यस्थापनेच्या वेळींच यशवंतरावांनी सांगितलं होतं.

मुख्यमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर या मूलग्राही सामाजिक समस्येकडे त्यांनी तातडीनं लक्ष दिलं. पददलित म्हटल्या जाणाऱ्या सर्वच 'हरिजनांना' राज्यानं सर्व तऱ्हेनं मदत देणं ही एक आवश्यक बाब तर होतीच; परंतु त्यांतहि नवबौद्धांचा एक नवा प्रश्न महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनांत त्या वेळीं निर्माण झालेला होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ नोव्हेंबर १९५६ ला बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. त्या वेळेपासून महाराष्ट्राच्या शहरांतून आणि खेड्यांमधून बौद्ध धर्माचा स्वीकार करण्याची प्रचंड लाट निर्माण झाली. अस्पृश्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार करतांच, 'अस्पृश्य' म्हणून त्यांना मिळणाऱ्या सवलती सरकारनं बंद केल्या होत्या. हें घडतांच बौद्धांनी सभा, परिषदा भरवून, ठराव करून, शिष्टमंडळं नेऊन सवलती चालू ठेवाव्यात या मागणीसाठी चळवळ आरंभली.

यशवंतरावांपर्यंत हीं शिष्टमंडळं पोंचलीं. त्यांचं म्हणणं असं होतं की, मूळचे जे अस्पृश्यवर्गीय आहेत, त्यांनी केवळ बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानं त्यांचा सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा नष्ट होऊं शकत नाही. सवलती मागण्यामागील त्यांची मूलभूत भूमिका ही वास्तव अशीच होती. ग्रामीण भागांतून मुंबईत पोंचलेल्या या मुख्य मंत्र्यांना वेगळ्या शब्दानं किंवा कृतीनं, मागण्यामागील ही भूमिका समजून देण्याची आवश्यकताहि नव्हती. शिष्टमंडळाच्या मागण्या यशवंतरावांनी ऐकल्या आणि 'सवलती' देण्याचं धोरण त्यांनी लगेच जाहीर करून तसे हुकूमहि संबंधित खात्यांना दिले.

नवबौद्धांना सवलती देण्यांत, त्यांना इतर समाजाच्या बरोबरीला आणणं हाच हेतु होता. त्यांच्या या जाणिवपूर्ण धोरणामुळे बौद्धांच्या आर्थिक व शैक्षणिक प्रगतीचा मार्ग खुला झाला आणि त्याबद्दल रिपब्लिकन पक्षानं यशवंतरावांना धन्यवाद दिले. सभा-सभांतून कृतज्ञता मग व्यक्त होऊं लागली.

नागपूर इथे ज्या भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली तिला बौद्धधर्मीय लोक पवित्र दीक्षाभूमि असं संबोधूं लागले आणि या भूमीवर डॉ. आंबेडकर यांचं, साजेसं स्मारक उभारण्याचा निर्धारहि त्यांनी व्यक्त केला. या स्मारकासाठी दीक्षाभूमि आम्हांला द्यावी अशी बौद्धजनांची मागणी होती. भारतीय बौद्धांच्या भावनेचा तो प्रश्न होता. डॉ. आंबेडकर यांचा थोरपणा यशवंतराव जाणून होते. त्यांच्याबद्दल त्यांच्या मनांत आदर असल्यानं डॉ. आंबेडकर जयंति-दिनाची सुट्टी ( १४ एप्रिल ) देण्याची प्रथा, यशवंतरावांनीच महाराष्ट्रांत सुरू करून डॉ. आंबेडकरांच्या कोट्यवधि अनुयायांच्या भावनेचा आदर केलाच होता.

अस्पृश्यांचा प्रश्न मूलतः सोडवला पाहिजे ही त्यांची कळकळ, मुख्यमंत्रिपदावरून त्यांनी पददलितांच्या संबंधांत केलेल्या निर्णयावरून प्रत्ययास येते. पददलितांच्या समस्या सोडवण्यामागील मूलदृष्टि, आणि त्यामागील प्रामाणिक तळमळ, शुद्ध हेतु यांबद्दल रिपब्लिकनांच्या मनांतहि त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला होता. नागपूरच्या

दीक्षा-मैदानावर, नवबौद्धांनी या आदरामुळेच १९६० सालीं त्यांचा प्रचंड सत्कार केला आणि त्यांच्यावर पुष्पहारांची वृष्टि केली.

अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी कायदे कितीहि करण्यांत आले, तरी त्या कायद्यांची व व्यवहाराची संगति लागत नाही तोंवर कायद्याचा हेतु सफल होणं शक्य नव्हतं. नवबौद्धांना आणि एकूण हरिजनांना यशवंतरावांबद्दल आदर वाटत असे, तो कायदा आणि व्यवहार यांची संगति घालण्याचा ते प्रयत्न करतात म्हणून! मूळ प्रश्न काय आहे, हें पाहून त्यावर आपल्या विचाराचा आणि कृतीचा घाव घालणं हेंच त्यांचं वैशिष्ट्य. दीक्षा-भूमि स्मारकासाठी म्हणून देण्यास सरकारी अधिकाऱ्यांचा विरोध होता. परंतु यशवंतरावांनी तो निर्णय करून साऱ्या नवबौद्ध समाजाला न्याय दिला.

यशवंतरावांनी मुख्य मंत्री म्हणून प्रथम मुंबई राज्याचीं आणि नंतर महाराष्ट्र राज्याचीं सूत्रं स्वीकारल्यावर अस्पृश्य व नव-दीक्षित बौद्ध यांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीनं बहुमोल कार्य केलेलं असून देशांतील अन्य राज्यांना तें आदर्शभूत ठरावं या मोलाचं आहे. अस्पृश्यांचा प्रश्न सोडवण्याविषयी, विविध पातळींवर, सत्ताधारी आणि अन्य राजकीय पक्षांकडून वाचाळता खूप होत असते; परंतु सत्ता हातांत आल्यानंतर त्या दिशेनं प्रत्यक्ष कृति करून त्याचं फल पददलितांना प्रत्यक्षांत मिळवून देणं हें सर्वांत महत्त्वाचं ठरतं.

महाराष्ट्रांत महार-वतनाची पद्धत नष्ट करणारा कायदा करून व त्याची अंमल-बजावणी करून या मुख्य मंत्र्यांनी अस्पृश्यांना हजारो वर्षांच्या गुलामगिरींतून मुक्त करण्याचं फार मोठं धाडस केलं. महार-वतन पद्धतीमुळे महार समाजाचा कमालीचा अधःपात झालेला होता. त्यांना गुलामासारखं राबवलं जात होतं. गावा-गावांत महार हा हरकामी बनून त्याला कुणीहि कांहीहि काम सांगावं आणि सक्तीनं करून घ्यावं, अशी स्थिति होती. महारांनी कोणतं काम करावं याला कांही निश्चितपणा राहिलेला नव्हता. त्याच्या घरांतील कुणीं काम करावं यालाहि कांही बंधन नव्हतं. त्यामुळे प्रसंगीं, महाराच्या घरांतल्यांपैकी सर्वांनाच कामासाठी वेठीस धरलं जात असे. पुरुष, स्त्री, मुलगा, म्हातारा असा फरक मानला जात नसे. काम किती करावं आणि किती तास करावं यालाहि बंधन नव्हतं. चोवीस तास गुलामगिरी करायची हेंच त्याचं काम. सरकार आणि रयत दोघेहि या जमातीला राबवून घेत असत. या साऱ्यांची चाकरी केल्यावर त्याला पोटाला प्रत्यक्षांत जें काय मिळत असे तें मात्र लाजिरवाणं होतं.

महाराला जी 'महारकी' नांवाची बिघा अर्धा बिघा, टीचभर जमीन दिलेली असे, त्या रानांत जें कांही पिकेल त्यावर त्यानं आपलं व आपल्या कुटुंबाचं पोट भरावं, अशी व्यवस्था होती. पाऊस पडला आणि त्या महाराला आपल्या जमिनींत काम करायला फुरसत सापडली, तर एखादं-अर्धं पोतं धान्य त्याला मिळायचं! स्वतःचीं गुरंढोरं नसल्यानं, जमिनीची मशागत करण्याचीहि त्याला अडचण असे. रयतेनं वतनी-हक्कानं त्याला कांही बलुतं देण्याची प्रथा असे. पण शेर-पायली बलुतं गोळा करूनहि तो आणि

त्याचं कुटुंब अर्धपोटींच रहात असे. त्या दृष्टीनं वतनी गाव-कामगार महारांचा प्रश्न मोठा बिकट बनलेला होता. गावांत सगळेच पाटील! महाराला काम न सांगेल तो आळशी! डॉ. आंबेडकर हे या महार-वतनाला विसाव्या शतकांतली गुलामगिरी म्हणत असत.

पूर्वी १९२२ सालीं व नंतर १९३७ सालीं वतनांतून निर्माण झालेली ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी म्हणून कायदेमंडळांत विधेयक आणण्यांत आलं होतं. परंतु त्या वेळीं कायदेमंडळावर उच्चभ्रूंचा पगडा होता. राज्यकर्त्या पक्षानं तें विधेयक फेटाळून लावण्यांतच धन्यता मानली! त्यानंतर पंचवीस-तीस वर्षे ही गुलामगिरी नष्ट करण्यासाठी डॉ. आंबेडकर प्रयत्नशील राहिले; परंतु सत्ताधारी मंडळींनी ही गुलामगिरी मोडून काढली नाही. अखेर यशवंतराव मुख्य मंत्री झाले आणि त्यांनी 'बॉम्बे इन्फिरिअर व्हिलेज वॉन्टस् अबॉलिशन ॲक्ट १९५८' हा कायदा संमत करून पूर्वाश्रमीच्या महार-समाजाला या वतनी गुलामगिरीच्या फासांतून निरंतरचं मुक्त केलं. त्याचबरोबर 'वतनी जमिनी' या पूर्ण शेतपट्टीच्या तिप्पट किंमत घेऊन वहिवाटदार मालकांना मालकी-हक्कानं परत ताब्यांत दिल्या.

यशवंतरावांचं जीवन खेड्यांत गेलेलं असल्यानं त्यांना या गुलामगिरीची चांगली जाणीव होती. त्यामुळेच त्यांच्या हातून हें ऐतिहासिक, चिरस्मरणीय कार्य घडूं शकलं. समाजाच्या प्रगतीच्या मार्गांतली ही धोंड नाहीशी करण्यांत यशवंतरावांच्या मनाचा थोरपणा जसा जाणवतो, तद्वतच पूर्वीचे मुख्य मंत्री आणि हे मुख्य मंत्री यांच्या विचारांतला आणि या समाजाकडे पहाण्यांतील मूलभूत दृष्टिकोनांतला फरकहि समजूं शकतो. मध्ययुगीन सरंजामी पद्धत शाबूत राखण्यासाठी पूर्वसूरींनी जन्मास घातलेली ही वतनी गुलामगिरीची पद्धत, टाकाच्या एका फटकाऱ्यानं नाहीशी करण्यांतले या मुख्य मंत्र्यांचे उजळ पुरोगामी विचार कुणाच्याहि हृदयापर्यंत जाऊन भिडतात.

महार-वतनाचा प्रश्न कॉंग्रेसनं डॉ. आंबेडकरांच्या हयातींतच संपवायला हवा होता असं यशवंतरावांचं प्रामाणिक मत होतं. सांगलींतल्या एका भाषणांत त्यांनी तें मोकळेपणानं बोलूनहि दाखवलं. समाजाचा एक घटक हजारो वर्षे अंधारांत आहे याची दखल कॉंग्रेस-जनांनी घेतली पाहिजे आणि या समाजाच्या ज्या मागण्या आहेत त्या मान्य करण्यांत दया किंवा दान करण्याची उपकाराची भावना न ठेवतां, जिद्दीच्या व जागृत मनाची ती हक्काची मागणी म्हणून माणुसकीचे अधिकार त्यांना आनंदानं बहाल केले पाहिजेत, असे त्यांचे विचार होते. या विचारानुसार महारांची गुलामगिरी नष्ट करण्याची आणि त्यांनी माणुसकीचे अधिकार भोगून हक्कानं जगण्याची त्यांची मागणी यशवंतरावांनी मान्य केली. हा कायदा त्यांनी केला तरी अस्पृश्यता संपली अशा स्वप्नाळू विचारांत ते कधीच राहिले नाहीत. अस्पृश्यता खऱ्या अर्थानं संपवण्यासाठी विविध प्रकारचे इलाज करणं हें त्यांनी पुढे चालूच ठेवलं.

महार-वतनाची पद्धत नष्ट होऊन गुलामगिरी संपली तरी महारांच्या आणि तत्सम मागासलेल्या वर्गाचा पोटाचा प्रश्न शिल्लक होताच. हा साराच भूमिहीनवर्ग भुकेला

होता. या भूमिहीनांची भाकरीसाठी, पोटासाठी जमीन द्या, अशी सरकारकडे मागणी होती. खासदार दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मग या भूमिहीनांनी आंदोलन आरंभलं आणि हजारो भूमिहीन स्त्री-पुरुष भूमीच्या मागणीसाठी कारागृहांत गेले. सरकारकडे हजारो एकर जी पडीक जमीन आहे ती कसण्यासाठी, पोटासाठी द्या, अशी त्यांची मागणी होती.

आंदोलकांच्या एका शिष्टमंडळानं शेवटीं यशवंतराव चव्हाण यांची भेट घेऊन 'पोटासाठी जमीन' ही मागणी नोंदवली. रिपब्लिकन पक्षाच्या या शिष्टमंडळाची मागणी व्यवहार्य आणि रास्त होती. ही न्याय्य मागणी मुख्य मंत्र्यांनी जाणिवेनं तत्काळ मान्य केली, आणि भूमिहीनांना जमीन वांटपाचं काम चालू केलं.

महाराष्ट्रांत एकूण किती पडीक जमीन आहे किंवा सर्व भूमिहीनांचा प्रश्न यांतून सुटेल का, सर्वांना ती पुरेशी आहे का, हा प्रश्न वेगळा. सरकारनं हें सर्व गणित करून उत्तर तयार करण्याचं ठरवलं असतं, तर मागणी तत्त्वतः मान्य, पण प्रत्यक्ष कृति नाही, अशा अवस्थेंत हा प्रश्न वर्षानुवर्षे लोंबकळत रहाणं शक्य होतं. कारण तसा तो राहिलाहि होता. कारण नेमक्या कोणत्या जमिनीस पडीक जमीन ठरावायचं हें ठरवण्यांतच सरकारी अधिकाऱ्यांनी महिन्यामागून महिने खर्च केले असते. कांही आकडेवारी त्यांतून तयार झाली असती हें जरी खरं, तरी प्रत्यक्ष भूमिहीनांच्या स्वाधीन ती जमीन होईपर्यंत त्याला अनेक फाटे फुटण्याचीहि शक्यता होती; परंतु भूमिहीनांचा भाकरीचा प्रश्न सोडवला पाहिजे, ही मूलभूत समस्या यशवंतरावांनी एकदा मान्य केल्यानंतर ती समस्या सोडवण्याच्या दिशेनं त्यांनी भराभर पावलं टाकलीं व त्यामुळे भूमिहीनांचा भाकरीचा प्रश्न कांही अंशानं का होईना मार्गस्थ झाला. यशवंतरावांचा हा निर्णय निश्चितच क्रांतिकारी स्वरूपाचा ठरला.

जातवार पद्धतीवर आधारलेली खेड्यांतली समाजरचना नष्ट करून समता, बंधुता, स्वतंत्रता, न्याय अशा नवीन मूल्यांवर आधारित नवं ग्रामीण जीवन महाराष्ट्रांत रुजवण्याचे विचार यशवंतराव आयुष्याच्या प्रारंभींच्या काळांतच मनाशीं बाळगून होते. जातीय बंधनाच्या चक्रव्यूहांत सापडलेली मानवता मुक्त करून नवा माणूस निर्माण करावा, नवं खेडं उभं करावं, नवी समाजरचना निर्माण करावी, असं एक सुंदर खेड्याचं चित्र त्यांच्या कल्पनेंत होतं. समाज आपले प्रश्न एकमेकांच्या जिव्हाळ्यानं, समजुतीनं सोडवण्यासाठी एकत्र बसून निर्णय करूं शकतो असं पंचायतीचं जीवन जगणारं खेडं त्यांना अभिप्रेत असल्यानं, पददलितांच्या संबंधांत जे कांही प्रश्न त्यांच्या कारकीर्दीत त्यांच्यासमोर आले किंवा पूर्वी त्यांच्या अनुभवांत आले होते, त्या सर्व प्रश्नांचे निर्णय त्यांनी तळमळीनं केले. रिपब्लिकन पक्षाशीं व त्या समाजाशीं आपले वैयक्तिक व सरकारी संबंध आपुलकीचे बनवले. या समाजाला सरकारी नोकऱ्यांत योग्य तें स्थान मिळण्याची तरतूदहि या काळांत त्यांनी केली.

मुख्य मंत्री झाल्यानंतर यशवंतरावांच्या प्रशासकीय गुणांच्या अभिव्यक्तीला व्यापक वाव मिळाला. रोज सकाळीं, झोपेंतून जागे झाल्यानंतर आज नवीन काय करायचं यासंबंधी त्यांचा विचार प्रामुख्यानं सुरू होत असे. राज्यकारभाराचा उरक सांभाळून, कार्यक्षमतेला बाध येऊं न देतां तो लोकाभिमुख कसा करतां येईल याच दृष्टीनं त्यांचं चिंतन होऊं लागलं. मुख्य मंत्री होतांच, गुढीपाडव्यास सुट्टी देण्याचा अगदी पहिला निर्णय त्यांनी केला. समाजांतल्या तमाम वर्गानं मुख्य मंत्र्यांच्या या निर्णयाचं बहोत स्वागत केलं. त्या पाडव्याला महाराष्ट्राच्या घराघरांत सुटीच्या आनंदाच्या गुढ्या उभ्या राहिल्या.

यशवंतरावांच्या दुसऱ्या एका निर्णयानं, संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष असंच वेधून घेतलं. हा निर्णय होता, मंत्र्यांच्या निवासस्थानांच्या नांवांत बदल करण्याचा! या निर्णयाचा प्रारंभ त्यांनी स्वतःच्या निवासस्थानापासून केला. मुंबईतल्या मलबारहिलवरील बंगल्यांना शिरोभागी, कोणा तरी साहेबाचं नांव त्या काळांत दिसत असे. स्वतंत्र भारताच्या राज्यकर्त्यांनी, पारतंत्र्याची खूण शिरोधार्य ठेवून त्या बंगल्यांत वास्तव्य करणं हें त्यांच्या मनाला खटकलं. एक दिवस मंत्रिमंडळाची बैठक सुरू असतांना स्वतः मुख्य मंत्र्यांनी — यशवंतरावांनीच — ही व्यथा बोलून दाखवली आणि आपण आपल्या निवासस्थानाचं नांव 'सह्याद्रि' असं निश्चित केलं आहे, असं सहकाऱ्यांना सांगितलं. मलबारहिल नांवाच्या मुंबईतल्या टेकडीवर अशा प्रकारे 'सह्याद्रि'चं वास्तव्य होतांच त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनीहि महाराष्ट्राला अभिमान वाटेल अशा अन्य नांवांचा शोध चालवला आणि हां हां म्हणतां, 'वर्षा', 'मेघदूत', रामटेक', 'अजंठा', 'सेवासदन' अशीं महाराष्ट्राच्या इतिहासाचीं, संस्कृतीचीं चिन्हं मलबारहिलवर झळकूं लागलीं.

राज्य-सरकारच्या नोकरांवर आपला पूर्ण विश्वास असल्याचं सांगूनच कार्यक्षम राज्यकारभाराचं आश्वासन त्यांनी जनतेला दिलेलं होतं. लोकांचं समाधान हीच अखेर कार्यक्षम कारभाराची कसोटी असल्यामुळे सरकारी वरिष्ठ अधिकारी हा राज्ययंत्रणेंतला जो मुख्य घटक त्याची वागणूक कशी असावी, त्यानं कोणतीं पथ्यं पाळावींत याबाबत यशवंतरावांनी कलेक्टरांच्या एका परिषदेंत आपली भूमिका मोकळेपणानं सांगितली होती. जिल्हाधिकारी हा राज्यकारभाराच्या यंत्रणेचा आंस असतो. यशवंतरावांनी या संदर्भात कलेक्टरांना अशी जाणीव दिली की, राज्याला भव्य पुरुषाची उपमा दिली तर कलेक्टर म्हणजे या भव्य पुरुषाचे नुसते डोळे किंवा कान नव्हेत, तर बाहू सुद्धा आहेत. जर त्यांनी चुकीच्या दृष्टीनं कार्य केलं, ऐकण्यासारखं आहे तें ऐकलं नाही किंवा चुकीचं ऐकलं, पहाण्यासारखं आहे तें पाहिलं नाही किंवा चुकीच्या दृष्टिकोनांतून पाहिलं, तर राज्याचं भवितव्य निराशाजनक ठरतं.

अधिकाऱ्यांची वागणूक कशी असावी यासंबंधी ते सांगतात की, समाजवादी किंवा समाजवादी धर्तीच्या समाजांतील आपला आर्थिक किंवा इतर कोणताहि व्यवहार हा व्यक्तिगत लाभाच्या हेतूनं केलेला नसला पाहिजे; तर त्याचा हेतु सर्व समाजाचा

लाभ हा असला पाहिजे. समाजवादी धर्तीची समाजरचना हें राष्ट्रीय धोरण म्हणून एकदा मान्य झाल्यानंतर, समाजांत कमींत कमी विषमता असावी आणि प्रत्येक व्यक्तीला स्वतःचा विकास करून घेण्यास पुरेपूर वाव असला पाहिजे; याचाच अर्थ ' सर्वांना सारखी संधि मिळणं, ' हें महत्वाचं उद्दिष्ट ठरतं. म्हणून कलेक्टरांनी राज्याचीं हीं मूलभूत तत्त्वं समोर ठेवून ज्या ज्या वेळीं त्यांना जिल्ह्यांत एखादा प्रश्न निर्माण होईल किंवा ज्या ज्या वेळीं त्यांना एखाद्या गोष्टीबद्दल शंका वाटूं लागेल त्या त्या वेळीं या मूलभूत तत्त्वांचा त्यांनी विचार करावा.

दिरंगाई ही केवळ कलेक्टरांपुरतीच मर्यादित नसते याची यशवंतरावांना माहिती होती. विभागीय कचेरी, खातेप्रमुखांच्या कचेऱ्या, आणि सचिवालयाच्या पातळीवरहि दिरंगाई होतच असते; परंतु कलेक्टर-कचेरी व त्या खालच्या कचेऱ्या येथील कामाशीं जनतेचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे येथील दिरंगाई लोकांना चांगलीच जाणवते आणि त्यांतून जनतेच्या मनांत कारभाराविषयी चीड निर्माण होते. ही दिरंगाई रहाणार नाही आणि जनतेला चीड व्यक्त करण्याची वेळ येणार नाही या जबाबदारीची जाणीव त्यांनी कलेक्टरांना स्पष्ट शब्दांत करून दिली.

महसूलखातं म्हणजे लाचलुचपतीचं आगर मानलं जातं. लाचलुचपतीबाबत काळजीपूर्वक वागणूक ठेवून कलेक्टरांनी दक्ष राहिलं पाहिजे याची जाणीव देतांना त्यांनी सांगितलं की, लाचलुचपतीला जागाच रहाणार नाही असं वातावरण निर्माण केलं पाहिजे. पोलिस-अधिकाऱ्यांनी लाचलुचपतीचीं प्रकरणं शोधून काढून, लाचलुचपतीस जबाबदार असणारास शिक्षा करणं म्हणजे लाचलुचपतीचं निर्मूलन करणं नव्हे. प्रत्येकानंच ती जिथे जिथे असेल तिथेच तिचं उच्चाटन करण्यासाठी जबाबदारी स्वीकारून कारभारांतील हा मोठा दोष नाहीसा केला पाहिजे.

राज्यकारभारांतले नवीन प्रश्न व कामं समाधानकारक सोडवण्यासाठी योग्य अशी यंत्रणा निर्माण करण्याचं आणि जिल्ह्यांतल्या कारभार-यंत्रणेंत संपूर्ण बदल करण्याचंच धोरण यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत अनुसरलं. याचा परिणाम असा झाला की, सरकारी दिरंगाईच्या किंवा गैरकारभाराच्या भांडवलावर जगणारांना, सरकारला विरोध करण्यासाठी म्हणून निरनिराळीं क्षेत्रं धुंडाळण्यासाठी वणवण करावी लागली आणि तें करूनहि त्यांना हिरमुसलं होऊन स्वस्थ रहावं लागलं.

प्रत्येक जिल्ह्यांत नवीन प्रश्न निर्माण होत राहिल्यानं त्या संदर्भात निरनिराळीं कामंहि तिथे सुरू करण्यांत आलीं होतीं. तरी पण प्रत्येक जिल्ह्याचे प्रश्न नीटपणें समजून घेऊन तेथील जनतेच्या तक्रारींची प्रत्यक्षांत लवकरांत लवकर दाद घेतली जावी आणि सरकारकडून आपल्या मागण्यांची पूर्तता होत आहे असं वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीनं, जिल्ह्यांच्या प्रश्नांकडे लक्ष देण्यासाठी मंत्र्यांना जिल्हे वांटून देण्याचा उपक्रम हा या मुख्य मंत्र्यांनी आपल्या कारकीर्दीत सुरू केलेला उपक्रम आहे. 'जिल्हा-संपर्कमंत्री' असं त्या मंत्र्यास संबोधण्यांत येऊं लागलं. या नवीन उपक्रमामुळे प्रत्येक

जिल्ह्याशीं सरकारचा प्रत्यक्षांत संबंध प्रस्थापित झाला आणि जनतेशीं साक्षात् संपर्क साधण्याचा हेतूहि त्यामुळे सिद्ध झाला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या यशस्वी कार्यावर लोकशाहीचं यश अवलंबून असतं. ग्रामपंचायत हा स्थानिक स्वराज्य संस्थांतील महत्त्वाचा घटक होय. त्या दृष्टीनं राज्यांतल्या सर्व जिल्ह्यांतून यशवंतरावांनी पंचायत-मंडळाची स्थापना या वेळीं केली. खेडेगावांतल्या सर्व विधायक कार्यांच्या बाबतींत ग्रामपंचायत नेहमी आघाडीवर असावी असा सरकारचा हेतु होता. या कार्याला उठाव यावा आणि ग्रामपंचायती जागरूक रहाव्यात या हेतूनं मग दरसाल राज्यामध्ये ग्रामसुधार-सप्ताह सुरू करण्यांत येऊन त्यांतला एक दिवस ग्रामपंचायत-दिन म्हणून पाळण्याची नवी पद्धत अमलांत आणली गेली.

राज्यामध्ये अशा अनेक संस्था आणि संघटना असत की, आर्थिक मदतीअभावीं त्यांची कुचंबणा झालेली असे. या संस्थांना किंवा संघटनांना सरकारी तिजोरींतून आर्थिक मदत करायची तर त्यामध्ये कायदेशीर आर्थिक व्यवहाराच्या अनेक अडचणी निर्माण होतात. यांतून मार्ग काढण्याकरिता म्हणून यशवंतरावांनी महाराष्ट्रांत प्रथमच 'मुख्य मंत्र्यांचा निधि' म्हणून एका वेगळ्या निधीची स्थापना केली; आणि या निधींतून राज्यांतल्या गरजू संघटनांना आणि संस्थांना आर्थिक मदत पोंचवण्याची व्यवस्था रूढ केली. नंतरच्या काळांत महाराष्ट्रांतल्या अनेक संस्थांना, मुख्य मंत्र्यांच्या निधीचा लाभ घेतां आला आणि मदतीअभावीं कुचंबलेल्या संस्थांची भरभराट होऊं शकली, असं आढळून येतं.

प्रथम १९५६ सालीं आणि पुन्हा १९५७ च्या निवडणुकीनंतर यशवंतरावांनी महाद्वैभाषिकाचं सतीचं वाण पत्करलं. त्या काळांत महाराष्ट्रांत संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर अराजक माजलेलं होतं. या अराजकांतून सुराज्य निर्माण करण्याचा त्यांचा कसोशीचा प्रयत्न होता. लोकमताच्या प्रवाहाच्या विरुद्ध ते हात मारत राहिले होते. विचार हेंच त्या वेळीं त्यांचं खरं बळ होतं आणि त्यामुळेच ते तग धरूं शकले. विशाल द्वैभाषिक राबवतांना तर त्यांच्या अंगच्या विशेष गुणांचा प्रकर्षानं प्रत्यय आला. मुत्सद्देगिरी आणि विचार-प्राधान्य हे त्यांच्या ठिकाणचे गुणविशेष नजरेंत भरले. लोकमत त्यांनी नेमकं हेरलं आणि त्याचा त्यांनी कधी अनादर केला नाही, किंवा त्याच्या ते फाजील आहारींहि गेले नाहीत. लोकमत बदलण्याची त्यांनी अहर्निश खटपट केली.

यशवंतरावांनी द्वैभाषिकाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा त्यांच्या पदरीं अपयश बांधण्यासाठी विरोधक टपून होते. त्याअगोदरचे मुख्य मंत्री मोरारजी देसाई यांनी या राज्यांत प्रशासकीय कारभाराची एक वेगळी वहिवाट पाडली होती. त्यांच्याच तालमींत तयार झालेले यशवंतराव, मोरारजींच्याच मार्गानं जाणार असं गृहीत धरून विरोधक खुषींत होते; पण घडलं तें न्यारंच.

यशवंतरावांनी विरोधकांना आपल्या अंगावर चाल करून येण्यासाठी विशेष संधीच मिळूं दिली नाही. द्वैभाषिकांत जे दोन समाज – मराठी व गुजराती – एकत्र

आले होते त्या दोघांनाहि त्यांनी सोनाराच्या काट्यानं न्याय दिल्यानं आमच्यावर अन्याय होत आहे अशी ओरड करण्याला कुणास संधीच ठेवली नाही. राज्यकर्त्यांचा क्रोधाग्नि भडकावून कांही अनुचित घडवण्याचं आणि त्याचा भांडवल म्हणून उपयोग करण्याचं विरोधकांचं हुकमी शस्त्रहि त्यांनी बोथट करून टाकलं. आपण कोणत्या शस्त्रानं लढणार आहोंत याचा त्यांनी विरोधकांना कधी थांगपत्ता लागू दिला नाही.

विधानसभेंतहि विरोधकांना कांही वेगळाच अनुभव आला. सरकारच्या वतीनं पुढे येणाऱ्या प्रत्येक विषयाला विरोधकांचा विरोध हा व्हावाच लागतो. विरोधक त्यासाठी दक्ष होतेच; परंतु लोकहिताची प्रत्येक गोष्ट करण्यापूर्वी विरोधी पक्षांतील प्रमुखांशीं चर्चा करायची, त्यांच्या सूचनांचा आदर करायचा आणि एखाद्या विषयांतर्ली वादंग निर्माण करणारीं स्थळं कमी करून शक्यतों परस्परांच्या विचारानंच विधानसभेंतील कामकाज चालवायचं अशी, सर्वांना विशेषतः विरोधकांना विश्वासांत घेऊन पुढे जाण्याची प्रथा यशवंतरावांनी सुरू केली. परिणामीं विधानसभेंतला विरोधहि फिका ठरला. विरोधाची नांगीच त्यांनी युक्तीनं मोडून काढली. इतकंच नव्हे तर, एकेकाळचे त्यांचे कठोर विरोधक त्यांचे स्नेही बनले. तरी पण या यशाचा त्यांनी स्वतःवर कैफ चढूं दिला नाही. सौजन्यानं, भावना विचाराच्या काबूंत ठेवून, बुद्धि-शक्ति विधायक कार्यासाठीच वापरण्याचं आपलं ब्रीद चालू ठेवलं आणि धिमेपणानं ते पुढेच जात राहिले.

विशाल द्वैभाषिक ते राबवत होते आणि लोकाभिमुख कारभार करून नव्या राज्याबद्दल जनतेच्या मनांत विश्वास निर्माण होईल असा त्यांचा प्रयत्न सुरू होता. तरी पण लोकमताचा विरोधाचा प्रवाह अजून बदलला नव्हता. महाराष्ट्र आणि गुजरात या दोन्ही ठिकाणीं द्वैभाषिकविरोधी चळवळी सुरू होत्या. गुजराती भाई द्वैभाषिकांत अल्पसंख्य होते आणि त्यांना महाराष्ट्र वगळून फक्त मुंबई हवी होती. गुजरातचे जे कुणी मंत्रिमंडळांत होते त्यांच्याकडून गुजरातसाठी अधिक फायदा उपटण्यासाठी ओढाताण सुरू झाल्यानं मंत्रिमंडळांतहि वादाचे प्रसंग निर्माण होऊं पहात होते. अर्थमंत्री जिवराज मेहता आणि बाळासाहेब देसाई यांच्यांत आर्थिक वांटणीवरून अनेकदा वाद झडले. यशवंतराव या सर्वांनाच थोपवून धरत राहिले.

दूरवरचा हिशेब करून आणि सर्व कौशल्य पणास लावून द्वैभाषिक यशस्वी करण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होता. राजकीय जीवनाची बाजी लावून ते काम करत होते. मोरारजींच्या तुलनेनं लोक त्यांना त्याबद्दल धन्यवादहि देत होते; परंतु सतत चार वर्षे विधायक आणि प्रामाणिक प्रयत्न करूनहि द्वैभाषिक यशस्वी होऊं शकत नाही या निर्णयाप्रत आता यशवंतराव येऊन पोंचले होते. ते स्वतः मूळचे संयुक्त महाराष्ट्रवादीच; परंतु लोकसभेनं दिलेला निर्णय आणि श्रेष्ठांची आज्ञा म्हणून त्यांनी द्वैभाषिकाची जबाबदारी स्वीकारली. तें चालवण्याची पराकाष्ठा केली. आपल्या प्रामाणिक प्रयत्नाबद्दल श्रेष्ठांची खात्री पटवली आणि इतकं करूनहि द्वैभाषिक चालणं अशक्य आहे असं वाटलं

त्या वेळीं पंडित नेहरूंना त्यांनी सांगितलं की, आता यापुढे द्वैभाषिक चालवणं अशक्य आहे !

हैदराबादच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत यशवंतरावांनी पंडितजींना हें सांगितलं; आणि पुढे लवकरच मुंबईच्या समुद्रांत द्वैभाषिक विरघळून गेलं. तो इतिहासहि मोठा मनोज्ञ आहे.

संयुक्त महाराष्ट्राचे-स्वस्तिवाचन यशवंतरावांनी हैदराबादला पं. नेहरूंच्या सान्निध्यांत केलं आणि त्यानंतर या प्रश्नाला पडलेल्या रेशमी निरगाठी मग हळूहळू ढिल्या होऊं लागल्या.

बुद्धिबळाच्या डावांत प्याद्यांची हलवाहलव अनुकूल ठरावी आणि डाव जिंकला जावा याला पुष्कळदा योगायोगाचं स्वरूप येतं. दोघेहि भिडू कसून आणि चाणाक्षपणानं, समोरच्या हालचालींचा हिशेब करून खेळी करणारे असतील, तर हा डाव जिंकण्याला महत्त्व अधिक ! संयुक्त महाराष्ट्राच्या खेळींत असंच घडलं. द्वैभाषिक चांगलं चाललं आहे, स्थिर होत आहे, यशवंतराव चांगलं काम करीत आहेत असं वातावरण निर्माण झालेलं असतांनाच द्वैभाषिक मोडलं, त्याच्या विभाजनाला चालना मिळाली आणि महाराष्ट्र राज्य अवतरलं; पण अचंबा वाटणाऱ्या या गोष्टी घडल्या कशा हें उमजल्याखेरीज बुद्धिबळाचा डाव ज्यांनी जिंकला त्यांच्या मुत्सद्देगिरीची, चतुराईची ओळख होणार नाही.

द्वैभाषिकाचा डाव जिंकला म्हणणारे, तें चांगलं चाललं आहे, स्थिर झालं आहे असं म्हणणारे भिडू गुजराती बंधु होते. ही खेळी अशीच सुरू ठेवून एक दिवस मुंबईचा वजीर कोंडींत पकडायचा आणि वाजत-गाजत आपल्या राहुटींत न्यायचा अशी या डावाची अखेरी त्यांना साधायची होती. त्याच रोखानं प्यादीं हलवलीं जात होतीं. तोंडानं मात्र यशवंतरावांचा जयजयकार सुरू होता. १९६२ च्या निवडणुकीपर्यंत द्वैभाषिकच रहावं असा गुजराती मंडळींचा कावा होता.

परंतु सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्याचं पाणी चाखलेले यशवंतराव हेहि कांही कच्च्या गुरूचे चेले नव्हते. किंबहुना पक्के गुरु आणि पक्के चेले मिळून ते एकच होते. गुर्जर-बंधूंना याचा विसर पडला असावा. चव्हाण जागरूक होते.

द्वैभाषिकाचा प्रयोग सुरू झाल्यापासून महाराष्ट्राच्या कारभाराकडे आणि वातावरणाकडे दिल्लीचं बारकाईनं लक्ष होतं. द्वैभाषिक राबवण्यासाठी मुख्य मंत्र्यांना करावी लागणारी यातायात पं. नेहरू पहात होते. मराठवाड्याच्या दौऱ्यांत महाराष्ट्राच्या संतापलेल्या मनाचं दर्शन त्यांना प्रत्यक्षांत घडलं. यशवंतरावांसमवेत मराठवाड्यांत ते ज्या ज्या ठिकाणीं गेले त्या प्रत्येक ठिकाणीं प्रचंड निदर्शनं झालीं आणि 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा घोषणाहि त्यांना ऐकाव्या लागल्या. द्वैभाषिक हें महाराष्ट्रांत स्थिर झालेलं नाही, हें तिथेच त्यांना उमगलं.

प्रतापगडावरील शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या अनावरणास जातांनाहि पंडितजींना महाराष्ट्रांतील विरोधी वातावरणाचं विदारक दर्शन घडलं होतं. प्रतापगडावरील समारंभ यशवंतरावांनी कुशलतेनं, कांहीहि अनिष्ट घडूं न देतां यशस्वी केला हें जरी खरं, तरी समितीनं आयोजित केलेला प्रचंड मोर्चा पहातांना, महाराष्ट्रांतील जनतेनं द्वैभाषिक मानलेलं नाही याबद्दल पंडितजींची खात्रीच झाली असली पाहिजे.

या एकूण वातावरणाचा परिणाम दिल्लीवर होत होता. मराठवाड्याच्या दौऱ्यानंतर पंडितजींनी याविषयी मुख्य मंत्र्यांचा – यशवंतरावांचा विचार जाणून घेण्याचा प्रयत्न केला. पं. नेहरूंनी त्यांना जेव्हा पृच्छा केली तेव्हा प्रथम मोकळेपणानं कांही सांगण्याचं यशवंतरावांनी टाळलं; परंतु पंडितजींनी पुन्हा पृच्छा करतांच यशवंतरावांनी मोकळेपणानं कबुली दिली की, द्वैभाषिक चालवण्यांत आतापर्यंत तरी आपण अयशस्वी झालों आहोंत. सध्याच्याच स्थितींत द्वैभाषिक राबवायचं तर कठोरपणानं लोकांच्या भावना चिरडाव्या लागतील आणि तो मार्ग अनुसरण्यास आपण असमर्थ आहोंत. नेहरूंनी संमति दिल्यास मुख्यमंत्रिपदास सोडचिठ्ठी देण्याचीहि तयारी यशवंतरावांनी या चर्चेच्या वेळीं दर्शवली.

लोकांच्या इच्छेला मान देण्याची भाषा पंडितजीहि मधून मधून बोलत असत; परंतु त्यामुळे कांही गुजराती नेते अस्वस्थ बनले होते. पंडितजींच्या अशा बोलण्यानं चळवळीला जोर चढत आहे अशी त्यांची तक्रार होती. त्यामुळे हैदराबादच्या कॉंग्रेस-अधिवेशनाची संधि साधून, एक गुजराती शिष्टमंडळ पंडितजींना भेटलं आणि द्वैभाषिकाच्या योजनेंत आता केव्हाहि बदल होणार नाही असं पंडितजींनी शेवटचं जाहीर करून टाकावं, असा त्यांनी आग्रह धरला. शिष्टमंडळाचं हें म्हणणं ऐकून पंडितजी संतापले आणि द्वैभाषिक कायमचं माथीं मारण्यास मी कांही हुकूमशहा नाही असं रागानं बोलून त्या शिष्टमंडळाला त्यांनी वाटेला लावलं.

१९५८ सालाच्या अखेरी-अखेरीस पं. नेहरू आणि यशवंतराव यांच्यांत चर्चा झाली आणि द्वैभाषिक चालवण्यांतील आपली असमर्थतता यशवंतरावांनी व्यक्त केली तेव्हाच वस्तुतः द्वैभाषिकाचा निकाल ठरून गेलेला होता. द्वैभाषिक स्थिर करण्याचा प्रशासकीय, राजकीय आणि सामाजिक पातळीवर सर्वतोपरी प्रयत्न करूनहि त्यांत यश येत नाही असं सिद्ध झालं होतं. द्वैभाषिक राज्य म्हणून निश्चितच यश मिळालं होतं, परंतु राजकीयदृष्ट्या मात्र त्याला यश म्हणतां येत नव्हतं. विदर्भ, मराठवाडा, सौराष्ट्र या भागांत भावनात्मक ऐक्य प्रस्थापित करण्यांत त्यांना कांहीसं यश मिळालं होतं इतकंच!

गांधींचे महाराष्ट्रांतील प्रमुख अनुयायी अप्पासाहेब पटवर्धन, थोर विचारवंत आणि महाराष्ट्र कॉंग्रेसचे एका काळचे सेनानी रावसाहेब पटवर्धन, के. एम्. मुनशी यांच्यासारख्यांनी यशवंतरावांच्या कार्याचा मुक्तपणें गौरवहि केला होता. असं असलं तरी राजकीय क्षेत्र शांत झालेलं नव्हतं. विदर्भांत महाविदर्भाची चळवळ, उर्वरित महाराष्ट्रांत संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि गुजरातमध्ये महागुजरात जनता-परिषदेची

चळवळ हें सर्व जिवंत होतं. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राचे एका वेळेचे कट्टर विरोधक स. का. पाटील यांच्यासह अनेकांना या प्रश्नाचा पुनर्विचार होण्याची आवश्यकता वाटूं लागली. द्वैभाषिकाचा पुनर्विचार होण्यास आणि संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यास हीच वेळ योग्य होती. यशवंतरावांनी नेमक्या याच वेळीं पंडितजींसमोर आपलं मनोगत मोकळेपणानं बोलून दाखवलं.

दिल्लींतहि या वेळीं अनुकूल वारं वाहूं लागलं होतं. ढेबरभाई यांच्या जागीं श्रीमती इंदिरा गांधी यांची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदीं निवड झालेली होती. या प्रश्नांत कॉंग्रेस-अध्यक्षांनी रदबदली करावी असा यशवंतरावांनी प्रयत्न सुरू केला. इंदिरा गांधी व चव्हाण यांच्यांत झालेल्या चर्चेत अध्यक्षांची अनुकूलता संपादन करण्यापर्यंत या प्रश्नाची मजल गेली. महाराष्ट्राबद्दल इंदिराजींच्या मनांत सहानुभूति होती. वर्षानुवर्षे हा प्रश्न चिघळत ठेवला गेल्यानं पंडितजींची प्रतिमा त्यामुळे डागळली जात असल्याचं त्यांच्या लक्षांत आलेलं होतं. अखेर चंदीगड येथील कॉंग्रेस-अधिवेशनांत अध्यक्ष इंदिरा गांधी यांनी हा प्रश्न उपस्थित केला आणि या प्रश्नाचा सर्व बाजूंनी अभ्यास करून निर्णय करण्यासाठी म्हणून नऊ सदस्यांची एक समिति नियुक्त करण्यांत आली. या समितीनं पुढे १९६० च्या जानेवारीमध्ये द्वैभाषिकाचं विभाजन करण्यास अनुकूल असा आपला अहवाल दिला. मुंबईसह महाराष्ट्र हें एक राज्य आणि गुजरातचं स्वतंत्र राज्य अशी या समितीची शिफारस होती.

द्वैभाषिक हा कायमचा तोडगा अशी दिल्लीची भूमिका नव्हतीच. समितीचा अहवाल मिळाल्यानंतर इंदिरा गांधी यांनीहि या प्रश्नाचा एकदा सोक्षमोक्ष करण्याचं ठरवलं. पं. नेहरू, पं. पंत यांच्याशीं या संदर्भात त्यांनी चर्चा केली आणि परिणामीं मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण यांना श्रेष्ठांनी एक दिवस दिल्लीला पाचारण केलं. अंतर्गत हालचालींची यशवंतरावांना बित्तंबात माहिती झालेली होती. मोरारजी देसाई हे त्या वेळीं केंद्रीय मंत्रिमंडळांत दाखल झालेले होते. तरी पण त्यांना द्वैभाषिकाच्या विभाजनाचा निर्णय करण्यापर्यंत श्रेष्ठांची चर्चा पोंचली आहे आणि त्यामध्ये यशवंतरावहि सामील आहेत याचा तितकासा थांगपत्ता नव्हता. द्वैभाषिकासंबंधी कांही चर्चा सुरू आहे एवढीच जुजबी माहिती त्यांना मिळाली होती. दिल्लींत त्यांच्या उपस्थितींत झालेल्या बैठकींतच त्यांना या रहस्याचा अखेर उलगडा झाला. पं. नेहरू, पं. पंत, मोरारजी देसाई आणि यशवंतराव या चौघांची दिल्लींत बैठक झाली.

दिल्लींत गेल्यानंतर मोरारजींच्या निवासस्थानींच यशवंतराव मुक्कामाला असत. मोरारजींच्या निवासस्थानांतून ते दोघे जेव्हा या बैठकीसाठी निघाले तेव्हा यशवंत-रावांनी या बैठकीचं प्रयोजन मोरारजींना विदित केलं. द्वैभाषिक राज्य ठीक चाललं असलं, तरी महाराष्ट्र आणि गुजरात यांच्या दरम्यान, आवश्यक तें भावनात्मक ऐक्य अद्याप प्रस्थापित झालेलं नव्हतं. यशवंतरावांच्या मनाची तीच व्यथा होती. पंडितजींनी यासंबंधांत विचारलं, तर हें आपलं मत आपण पंडितजींना स्पष्टपणें सांगणार आहोंत,

अशी कल्पना चव्हाणांनी मोरारजींना बैठकीला पोंचण्यापूर्वीच मोटारींतून जातांना दिली.

परंतु बैठकींत मुंबईचा प्रश्न निघतांच मोरारजींनी आपलं घोडं पुढे दामटण्याचा प्रयत्न केला. द्वैभाषिकाचा कारभार ठीक चालला आहे, चव्हाण चांगलं काम करत आहेत, समितीची शक्ति कमी होत आहे वगैरे समर्थन करून, या प्रश्नाचा आता फेरविचार करण्याचं कांही कारण नाही, असं मोरारजींनी सुचवलं.

द्वैभाषिक निर्मितीनंतर या राज्यांत ज्या पोटनिवडणुका झाल्या होत्या त्यामध्ये काँग्रेसला पराभव पत्करावा लागला होता. महाराष्ट्रांतली किंवा गुजरातमधली चळवळ शमली नव्हती. उलट तिला बळ प्राप्त झालं होतं. पंडितजींनी ही सारी वस्तुस्थिति सांगितली, तरी मोरारजींनी परिस्थिति सुधारल्याचा आग्रहच चालू ठेवला. या वेळेपर्यंत यशवंतराव स्वस्थ होते. त्यांनी चर्चेत भाग घेतला नव्हता. पंडितजी, पंत आणि मोरारजी यांच्यांतच खल सुरू राहिला होता. अखेर 'मुख्य मंत्री म्हणून चव्हाणांचं काय मत आहे,' असं पंडितजींनी विचारलं. प्रत्यक्ष परिस्थितीशीं मुकाबला करणारे म्हणून चव्हाणांचं मत व्यक्त होणं महत्त्वाचं होतं.

यशवंतरावांनी या संधीचा फायदा घेतला आणि सांगितलं की, "राज्य ठीक चाललं आहे, पण लोकमतांत बदल घडलेला नाही. महाराष्ट्र आणि गुजरात यांचं भावनात्मक ऐक्य साध्य झालेलं नाही."

खरं म्हणजे, यशवंतरावांच्या उत्तरानंतर, या प्रश्नाची इतिश्रीच झाली होती. अस्वस्थ बनण्याखेरीज मोरारजींसमोर अन्य कांही उरलं नव्हतं. मोरारजी मुख्य मंत्री असतांना, राज्यासंबंधी त्यांच्याकडून दिल्लीला जें सांगितलं जात असे तेंच खरं मानलं जात असे. अन्य कोणीं कांही सांगितलं तरी राज्याचा प्रमुख जी माहिती देईल ती मानायची असा पंडितजींचा रिवाज होता. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाची आतापर्यंत जी फरफट झाली होती, विविध पर्याय निर्माण होत राहिले होते, त्याचं मूळ मोरारजींनी रवाना केलेल्या पूर्वीच्या अहवालांतच होतं.

काळ बदलला. परिस्थिति बदलली. मुंबईचीं सूत्रं आता राष्ट्रीय वृत्तीच्या व्यवहारी देशभक्ताकडे आलेलीं होतीं. त्यांनी खरीखुरी वस्तुस्थिति बैठकीसमोर ठेवली होती. पंडितजींना तें मत मान्य करावं लागणार होतं. मोरारजींचा राग, लोभ यापेक्षा भाषिक राज्य-पुनर्रचनेच्या रथाचं चाक रुतून बसलं होतं तें बाहेर काढणं देशाच्या ऐक्याच्या दृष्टीनं महत्त्वाचं होतं. यशवंतरावांनी तेंच केलं. संयुक्त महाराष्ट्राचं महायुद्ध यशवंतरावांच्या सारथ्यानं संपावं असाच जणू योग असावा !

१९५८ च्या सप्टेंबरमध्ये अखिल भारतीय काँग्रेसच्या कार्यकारिणींतहि यशवंतरावांची निवड झालेली होती. वर्किंग कमिटीमध्ये महाराष्ट्रांतल्या जनतेच्या भावनांना वाचा फोडण्यासहि त्यांना यामुळे चांगली संधि मिळाली. दिल्लींत उच्च पातळीवर मग द्वैभाषिकाच्या विभाजनाच्या हालचाली सुरू झाल्या आणि ९ डिसेंबर १९५९ ला काँग्रेस

कार्यकारिणीनं त्यावर शिक्कामोर्तब केलं. समितीच्या शिफारशींवर आधारित विभाजनाचीं तत्त्वंहि ठोकळ मानानं ठरवून दिलीं.

दिल्लींतलं हें सर्व सव्यापसव्य होतांच महाराष्ट्र राज्याची प्रत्यक्षांत निर्मिति ही आता दृष्टीच्या टप्प्यांत आली. तरी सुद्धा घटनात्मक तरतुदींच्या चाकोरींतून हा प्रश्न अजून पुढे न्यावा लागणार होता. मुंबई राज्याचं विभाजन करून दोन एकभाषिक राज्यं निर्माण करण्याबाबतचं विधेयक तयार करून विधानसभेची मान्यता त्यासाठी घ्यावी लागणार होती. त्या हालचाली मग सुरू झाल्या आणि ८ मार्च १९६० या दिवशीं मुख्य मंत्र्यांनी त्या आशयाचं पुनर्रचना-विधेयक सभागृहासमोर सादर केलं. या विधेयकावर १८ मार्चपर्यंत सभागृहानं चर्चा केली आणि तें संमत केलं.

१९५९ च्या डिसेंबरमध्ये काँग्रेस-कार्यकारिणीनं दोन स्वतंत्र राज्यं अस्तित्वांत आणण्याच्या तत्त्वास मान्यता दिल्यानंतर राज्यांची विभागणी कशी करायची, त्यांतील आर्थिक तरतुदी, प्रदेश आणि तपशील ठरवण्याबाबतहि बरंच वादंग सुरू झालं. डांग जिल्हा, ठाणें आणि पश्चिम-खानदेश जिल्ह्यांतील जो भाग दोन्ही राज्यांच्या सीमेवर होता त्यांतील प्रदेशाच्या वांटणीवरून बरेच मतभेद निर्माण झाले; परंतु यशवंतरावांनी याबाबत वास्तववादी भूमिका स्वीकारून देवाण-घेवाणीच्या तत्त्वानुसार हा सारा प्रश्न निकालांत काढला.

पुनर्रचना-विधेयकांत अर्थविषयक जी तरतूद करण्यांत आली होती तीनुसार गुजरात राज्यास राजधानी बांधण्यासाठी १० कोटि रुपये आणि १९६०–६१ आणि ६१–६२ या सालीं अनुक्रमे ६०२ लक्ष रुपये व ६१४ लक्ष रुपये दिले जातील असं नमूद करण्यांत आलं होतं. गुजरातसाठी जो महसूलबाबतचा खास राखीव निधि निर्माण करण्यांत येणार होता त्यांतून ६२–६३ सालीं ६१२ लक्ष रुपये, ६३–६४ सालीं ५८५ लक्ष रुपये, ६४–६५ सालीं ५६१ लक्ष रुपये, ६५–६६ सालीं ५२६ लक्ष रुपये, ६६–६७ सालीं ४३३ लक्ष रुपये, ६७–६८ सालीं ३४० लक्ष रुपये आणि ६८–६९ सालीं २०९ लक्ष रुपये अशी रक्कम त्या राज्याला मिळणार होती. द्वैभाषिक राज्याचा कर्जाचा जो भाग होता तें कर्ज नव्या राज्यांत लोकसंख्येच्या प्रमाणांत न वांटतां त्या राज्यांच्या भांडवली खर्चाच्या प्रमाणांत वांटावं, असा निर्णय ठरवण्यांत आला होता.

महाराष्ट्रांत २६ जिल्हे आणि गुजरात राज्यांत १७ जिल्हे अशी ही वांटणी झाली. या राज्यांचं क्षेत्रफळ अनुक्रमे १ लक्ष १९ हजार २०० चौरस मैल आणि ७३ हजार चौरस मैल असं निर्माण झालं. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ३ कोटि १९ लक्ष ७० हजार ६१३ तर गुजरात राज्याची १ कोटि ६२ लक्ष ९४ हजार ५६१ एवढी त्या वेळीं होती. लोकसंख्येचं हें प्रमाण २.१ असं होतं. डांग जिल्हा, ठाणें आणि पश्चिम-खानदेश जिल्ह्यांतलीं कांही खेडीं गुजरातमध्ये गेल्यानं, या निर्णयासंबंधी कांही गोटांत प्रतिकूल मत निर्माण झालं होतं; परंतु हा निर्णय पुरेशा कारणावरून घेण्यांत आला, असा मुख्य मंत्र्यांचा दावा होता. त्यांनी पुढे केलेलीं कारणं अशीं होतीं की, डांग

जिल्ह्यांतल्या लोकलबोर्ड निवडणुका भाषिक प्रश्नावर झाल्या आणि तिथल्या जनतेनं गुजरातच्या बाजूनं मत दिलं. उंबरगाव तालुक्यांतल्या कांही खेड्यांत गुजरातीभाषी बहुसंख्य असल्यामुळे तेथील ग्रामपंचायतींनी गुजरातमध्ये समाविष्ट होण्याची इच्छा दर्शवली व त्यामुळे त्यांचा अंतर्भाव गुजरातमध्ये करण्यांत आला.

पश्चिम-खानदेशमधलीं खेडीं मात्र भाषिक तत्त्वावर गुजरातला देण्यांत आलीं नाहीत. उकाई धरणाची अंमलबजावणी आणि त्याचा कारभार सुकर व्हावा म्हणून तीं खेडीं गुजरातमध्ये समाविष्ट करण्यांत आलीं. नवापूर, नंदूरबार, अक्कलकुवा आणि तळोदें या तालुक्यांचा कांही भाग उकाई धरणाखाली बुडणार होता. या धरणाखाली बुडणाऱ्या प्रदेशाभोवतालचा सुमारे दोन मैलांचा पट्टा ह्या धरणाच्या उभारणीसाठी निराधार होणाऱ्या लोकांची पुनर्वसाहत करण्यासाठी गुजरातला देण्याचं ठरलं. देवाण-घेवाणीच्या तत्त्वावरच हे निर्णय करण्यांत आले होते. समाविष्ट होणारा भाग सोडल्यास, उर्वरित मुंबई राज्याचं स्वरूप तसंच कायम होतं. विधानसभेंत सादर करण्यांत आलेल्या विधेयकानुसार नवं गुजरात राज्य तयार होणार होतं. नवं मुंबई राज्य तयार करण्याचा प्रश्नच नव्हता. बदललेल्या स्वरूपांत मुंबई राज्य हें कायमच होतं.

मुंबई विधानसभेसमोर आलेलं हें विधेयक म्हणजे मुंबई राज्याच्या दृष्टीनं ऐतिहासिक महत्त्वाची व युगप्रवर्तक घटना होती. विधेयक सादर करतांना यशवंतरावांनी त्याच शब्दांत या घटनेचा उल्लेख केला. त्या दिवशींचं त्यांचं भाषण हें आनंद व खेद अशा संमिश्र भावनेनं झालं.

महाराष्ट्र व गुजरात अशा दोन स्वतंत्र राज्यांची निर्मिति होत असल्याबद्दल एका डोळ्यांत आनंदाश्रु होते आणि विभाजन होत असल्याबद्दल दुसऱ्या डोळ्यांत खेद दाटला होता. कांही वर्षे एकत्र काम केल्यानंतर विभक्त होत असल्याबद्दल खेद होणं स्वाभाविकच होतं.

पुनर्रचना-विधेयकावर, यशवंतरावांचं विधानसभेंत जें भाषण झालं त्यांत त्यांनी, या विधेयकाकडे सर्वसमावेशक दृष्टीनं पहाण्याची आणि या प्रश्नाचा सर्व इतिहास लक्षांत घेऊन विचार करण्याची गरज प्रतिपादन केली. त्यांनी सांगितलं की, वैयक्तिकरीत्या विधेयकांतल्या तरतुदी कुणाला आवडतील वा न आवडतील; परंतु या प्रश्नाची कायमची सोडवणूक करतांना आपणांला देवाण-घेवाणीची भूमिका स्वीकारली पाहिजे. कांही नाजूक व गुंतागुंतीच्या प्रकरणीं या पद्धतीनंच निर्णय करण्यांत आले. विभाजनाची क्रिया एकाचे दोन भाग करण्याइतकी सोपी नसून, अनंतकाळपर्यंत शेजारी शेजारी भावाप्रमाणे रहाणाऱ्या दोन भावांना जन्म देणारी ही मानवी क्रिया असल्यानं विधेयकावर विचार करतांना आणि चर्चा करतांना सभागृहानं हाच दृष्टिकोन ठेवावा असं आवाहनहि त्यांनी केलं.

आर्थिक तरतुदी, सीमा-रेषा इत्यादि ज्या गोष्टी विभाजनाच्या वेळीं कटकटी निर्माण करणाऱ्या होत्या, त्या संबंधांत चव्हाण आणि जिवराज मेहता यांच्यांत मध्यस्थी

करून निर्णय करण्याचं काम पूर्वी नियुक्त करण्यांत आलेल्या नऊसदस्य-समितीकडे होतं. डांगचा प्रश्न महाराष्ट्र आणि गुजरात या दोघांच्याहि दृष्टीनं अवघड होता. डांगच्या आदिवासी विभागावर दोघांकडूनहि हक्क सांगितला जात होता. त्यांतून या विभागांतील लोकांची भाषा कोणती याची खात्री करून घेऊन भाषेच्या तत्त्वानुसार या भागाविषयी निर्णय करण्यासाठी केंद्र-सरकारनं एक समितीहि नियुक्त केली. डांगमधील भाषा प्रामुख्यानं मराठीच आहे असा निर्णय या समितीनं दिला आणि केंद्र-सरकारनंहि तो मान्य केला.

परंतु प्रत्यक्ष सीमा निश्चित करण्याचा प्रश्न जेव्हा निर्माण झाला तेव्हा विभाजन नक्की करून, महाराष्ट्र राज्य-निर्मितीवर प्रामुख्यानं लक्ष केंद्रित करायचं, की डांगचं भवितव्य ठरवण्यांत या प्रश्नाचं घोंगडं पुन्हा दीर्घकाळ भिजत ठेवायचं, असा एक मूलभूत प्रश्न यशवंतरावांसमोर उभा राहिला. या प्रश्नावर चर्चा सुरू झाल्या आणि विरोधी पक्षांनीहि तो हातीं घेतला. तथापि मुंबईसह स्वतंत्र महाराष्ट्र राज्य निर्माण करायचं तर ' त्वयार्धं मयार्धं ' तत्त्वाचा अवलंब केल्याशिवाय गत्यंतर नव्हतं. तोच एक व्यवहार्य मार्ग होता. यशवंतराव हे अनुभवी राजकारणी असल्यामुळे त्यांनी या व्यवहार्य मार्गाचा अवलंब करण्याचं ठरवून मुख्य प्रश्नावर लक्ष केंद्रित केलं.

उभय राज्यांत कटुतेचं वातावरण निर्माण न करतां या दोन राज्यांतल्या वांटणीचा प्रश्न शक्य तितक्या लवकर निकालांत निघावा, असा त्यांचा प्रयत्न होता. त्यामध्ये यशवंतरावांनी दानशूराची भूमिका स्वीकारली होती असं नव्हे; परंतु कटुता कमींत कमी निर्माण व्हावी, शेजारधर्महि पाळला जावा आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे मुख्य प्रश्नाला फाटे फुटत न रहातां, दोन राज्यं स्वतंत्रपणें लवकरांत लवकर अस्तित्वांत यावींत हीच त्यांची चिंता होती. त्यामुळेच त्यांनी प्रत्येक वादाच्या प्रश्नांत तडजोड घडवून आणली आणि वांटणीचा प्रमुख प्रश्न संपवला.

हा सर्व उपचार होतांच लोकसभेनं १९६० च्या एप्रिलमध्ये द्वैभाषिकाच्या विभाजनास मान्यता दिली आणि हा प्रश्न अखेर कायमचा निकालांत निघाला.

लोकसभेकडून शिक्कामोर्तब होणार आहे याची यशवंतरावांना माहिती होतीच. हा निर्णय होण्यापूर्वी नुकतीच त्यांची दिल्लींत चर्चाहि झाली होती; परंतु लोकसभेच्या अधिवेशनांत, विभाजनाला केव्हां मान्यता दिली जाणार आहे याची वाच्यता त्यांनी केलेली नव्हती. दिल्लींत विभाजनाचा निर्णय लोकसभेंत झाला त्या दिवशीं, मुंबई विधानसभेचं अधिवेशन सुरू होतं. मुख्य मंत्र्यांसह सर्वजण सभागृहांतच होते. समितीच्या वतीनं 'केसरी'चे संपादक जयंतराव टिळक हे या वेळीं विधानसभा-सदस्य होते. दिल्लींत लोकसभेनं निर्णय करतांच, केसरीचे दिल्लींतील त्या वेळचे प्रतिनिधि द्वा. भ. कर्णिक यांनी हें आनंदाचं वृत्त तारेनं, मुंबईला जयंतराव टिळक यांना कळविलं. टिळक यांना सभागृहांत ही तार मिळतांच ती वाचून त्यांनी तशीच यशवंतरावांकडे पाठवली.

तारेंतील मजकूर वाचून यशवंतरावांनी स्मित केलं. क्षणभर सभागृहांतून ते बाहेर गेले आणि अन्य मार्गानं त्यांनी या वृत्ताची खात्री करून घेतली. लगेच सभागृहांत परत येऊन त्यांनी हें आनंदाचं वृत्त सर्व सभासदांपर्यंत पोंचवलं. महाराष्ट्राचं स्वप्न साकार झालं होतं. सर्वत्र आनंदीआनंद निर्माण झाला होता. यशवंतरावहि मग आपला आनंद शब्दरूप करूं लागले. हा आनंद शब्दानं वर्णन करण्यापलीकडचा होता.

प्रत्येकजण आपला आनंद दुसऱ्याला देत होता आणि दुसऱ्याचा घेत होता. हें सर्व सुरू असतांनाच या आनंदांत आणखी भर घालणारी एक घोषणा मुख्य मंत्र्यांनी केली. म. गांधींच्या वधानंतर महाराष्ट्रांतल्या कांही गावांतून मोठी जाळपोळ झाली होती आणि त्यांत कांही ब्राह्मणांचीं घरं, दुकानं, कारखाने जाळण्यांत आलीं होतीं. पुनर्वसनासाठी या जळित-पीडितांना सरकारनं कर्जरूपानं मदत केली होती; परंतु पुढे जळित-पीडितांकडून कर्जवसुली सुरू झाल्यानं या वर्गाची मोठीच कुचंबणा झाली. वर्षानुवर्षे उभे केलेले संसार बेचिराख झाल्यानंतर त्या राखेंतून ते आता नुकते उभे राहूं लागले होते. त्यामुळे कर्ज परत करणं त्यांच्या शक्तीबाहेरचं झालं होतं. त्यांचा विचार करावा लागणारच होता. महाराष्ट्र राज्य-निर्मितीची आनंदाची संधि साधून यशवंतरावांनी त्या दिवशींच जळित-पीडितांचीं कर्जे माफ करण्यांत आलीं आहेत अशी घोषणा केली आणि जळित-पीडितांचा दुवा मिळवला.

यशवंतरावांच्या या निर्णयाबद्दल पुढे जळित-पीडितांतर्फे सांगलीमध्ये त्यांचा सत्कार करण्यांत आला. या सत्काराच्या वेळीं यशवंतरावांनी या निर्णयामागच्या ज्या भावना व्यक्त केल्या त्या अशा, " कुणावर उपकार करावेत या भावनेनं जळित-पीडितांचीं कर्जे माफ करण्यांत आलेलीं नाहीत, तर समाजांतल्या एका वैचारिक घटकाच्या मनांतली जखम भरून काढण्यास व महाराष्ट्रीय समाजाला आगेकूच करण्यास द्रुतगति प्राप्त होईल या दृष्टीनंच कर्जमाफीचा निर्णय केला गेला आहे."

यशवंतरावांकडून ही घोषणा करून घेण्याची संधीहि जयंतराव टिळक यांनीच त्या दिवशीं साधली. महाराष्ट्र राज्य-निर्मितीसंबंधीचा लोकसभेचा निर्णय सभागृहाला सांगण्यासाठी यशवंतराव सभागृहांत उभे राहून बोलूं लागले त्याच वेळीं, या आनंदाच्या प्रसंगीं जळित-कर्जमाफीची घोषणा करण्याविषयी निरोप लिहून जयंतरावांनी त्यांच्यापर्यंत पोंचवला; आणि क्षणाचाहि विलंब न लावतां यशवंतरावांकडून ती घोषणा झाली. आनंद-निर्मितीची त्या दिवशीं जणू चढाओढच सुरू झाली होती ! जळित-पीडितांपैकी ज्यांची कर्जफेडीचे हप्ते देण्याबद्दल कुचंबणा झाली होती आणि सरकारी तगाद्याला तोंड देणं अशक्य ठरलं होतं अशा कांही पीडितांनी, संपादक आणि आमदार या नात्यानं टिळक यांच्याकडे गाऱ्हाणीं केलेलीं होतीं. संधि साधून त्या दिवशींच त्याचा कायमचा निर्णय करण्याचं त्यांनी ठरवलं आणि यशवंतरावांनीहि त्याचा आदर केला.

जळित-कर्जे माफ करतांना कुणी तरी देणारा राजा आहे व घेणारी कुणी तरी प्रजा आहे अशी भावना न ठेवतां, एक आवश्यक नैसर्गिक पाऊल म्हणून यशवंत-

रावांनी हा निर्णय केला. यशवंतरावांना कांहीजण पत्रं लिहीत असत आणि "तुम्ही छत्रपतींप्रमाणे गो-ब्राह्मणप्रतिपालक होऊं इच्छितां — ब्राह्मणांचं प्रतिपालन केलं असतां गायीला विसरूं नका" असं या पत्रांतून कांहीजण लिहीत असत. ब्राह्मणांचीं कर्जे माफ केलीं, इतरांचं काय, असा सवालच यांतून ध्वनित करण्याचा या पत्रकर्त्यांचा प्रयत्न होता; परंतु नवं राज्य हें गो-ब्राह्मणप्रतिपालक नसून ते सर्वप्रतिपालक आहे, असंच यशवंतरावांचं त्याला उत्तर होतं.

महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांतील जी नवी पिढी पुढे येऊं लागली होती तिच्याजवळ ध्येयवाद होता. रांगड्या शब्दांत ही मंडळी आपला ध्येयवाद बोलून दाखवत असत. पण शहरांतल्या उच्चभ्रू समाजाच्या दृष्टीनं त्यांचे ते रांगडे शब्द म्हणजे टिंगलीचा विषय होत असे. या रांगड्या शब्दांत बोलणाऱ्या ध्येयवादी पिढीला, ब्राह्मण-समाजानं सुधारून घेतलं पाहिजे, हा यशवंतरावांचा आग्रह होता.

१९४८ सालीं ज्या ब्राह्मणांचीं घरंदारं जळालीं, त्यांना कर्जमाफी केल्यानंतर कर्जमाफीच्या अनेक मागण्या यशवंतरावांकडे येऊं लागल्या. त्यांचं कर्ज माफ केलं, आमचंहि करा, अशी ही मागणी होती; परंतु मुख्य मंत्र्यांनी जी कर्जमाफी केली होती ती कर्जमाफीचं धोरण जाहीर करून नव्हे. निवळ आर्थिक मदत करण्याचा हेतूहि त्यामागे नव्हता. प्रसंगोपात्त यशवंतरावांनी ही आपली भूमिका स्पष्ट शब्दांत जनतेला सांगितलीहि !

जळिताच्या प्रकारानं महाराष्ट्राच्या सामाजिक मनावर खोल जखम झालेली होती. एका प्रमुख समाजाच्या मनांत, नको त्या ठिकाणीं आपण आहोंत अशी भावना वाढली होती. राज्य मराठा नाही, तर मराठी आहे, असं यशवंतरावांनी अगोदरच स्पष्ट केलं होतं; परंतु याच संदर्भांत ब्राह्मण-समाजाच्या मनावर झालेली खोल जखम दूर करण्याचा एक प्रयत्न म्हणून त्यांनी ही कर्जमाफीची घोषणा केलेली होती. या एका घोषणेनं मनांतले समज पूर्णपणें नाहीसे होणार होते असंहि नव्हे. यशवंतरावांना त्याचीहि कल्पना होती. तरी पण, महाराष्ट्राची दूरवरची सफर करतांना, त्यामधील अडथळे जास्तींत जास्त दूर करण्याच्या हेतूनं त्यांनी हें घडवलं होतं.

ज्या ब्राह्मण-समाजानं महाराष्ट्रांत बौद्धिक विकासाचं कार्य व कर्तृत्व केलं, तो समाज, कांही एका भावनेनं, कर्तत्वाला पारखा होऊन, सचिंत होऊन बाजूला रहात असलेला पाहून बरं वाटत नाही, असं त्यांनी सांगलीच्या सत्कार-सभेंत बोलून दाखवलं आणि इतिहासांत जेव्हा जेव्हा सर्व थर एकत्र आले तेव्हा तेव्हा ते अटकेपर्यंत पोंचले याची आठवणहि करून दिली. सामाजिक भेद संपल्यावर मतभेद राहिले तरी हरकत नाही, कारण ते बुद्धिप्रामाण्यावर आधारलेले असतील, असंच यशवंतरावांना सांगायचं होतं. पूजा गुणांची, जातीची नव्हे, हा त्याचा अर्थ होता.

विधानसभेंत पुनर्रचना-विधेयक चर्चेला आल्यापासून महाराष्ट्रांत सर्वत्र उत्साहाचं वातावरण निर्माण झालेलं होतं. विधानसभेंतल्या चर्चेमध्ये जिवंतपणा होता. पुनर्रचना

विधेयकास एकूण २३८ दुरुस्ती-सूचना सुचवण्यांत आल्या होत्या. गुजरातच्या वांटणीच्या प्रश्नावर विविध मतं व्यक्त केलीं जात होतीं. दुरुस्त-सूचनांपैकी दहा सूचना सरकारी होत्या. चर्चेच्या वेळीं तेवढ्याच मान्य करण्यांत आल्या आणि बिनसरकारी सूचना मागे घेण्यांत आल्या अथवा नामंजूर करण्यांत आल्या.

सर्वांत महत्त्वाची सूचना मराठीभाषिक राज्याचं नांव 'महाराष्ट्र' ठेवण्यांत यावं ही होती. राज्याला नांव काय द्यायचं याविषयी बऱ्याच उलटसुलट चर्चा सुरू झालेल्या होत्या; परंतु साऱ्यांच्या विचारानं नांव ठरवूं असंच यशवंतराव मत व्यक्त करत होते. नांवाबद्दल आमदारांत मतभेद निर्माण झालेले होते; आणि यशवंतराव योग्य वेळेची वाट पहात थांबले होते. 'मुंबई राज्य', 'महाराष्ट्र राज्य', 'मुंबई-महाराष्ट्र राज्य' या तीन नांवांवर चर्चा सुरू होत्या. मुख्य मंत्र्यांनी अखेर कॉंग्रेस-पक्षांतल्या व विरोधी पक्षांतल्या सदस्यांशीं विचारविनियम करून, मोठ्या खुबीनं 'महाराष्ट्र राज्य' हेंच नांव कायम केलं. विधानसभेंत ही सूचना येतांच एकमतानं ती मान्य करण्यांत आली. 'महाराष्ट्र'च्या ऐवजीं 'मुंबई' हें नांव ठेवलं गेलं असतं, तर पुढच्या काळांत त्यावर वादंग माजून विरोधी पक्षांच्या हातीं तें एक कोलीत मिळाल्यासारखं होणार होतं. यशवंतरावांनी दूरदर्शीपणानं तें टाळलं. सर्वांचं शांतपणानं ऐकून घ्यायचं आणि स्वतंत्र बुद्धीनं निर्णय करायचा हाच यशवंतरावांच्या गुणाचा त्या वेळींहि प्रत्यय आला.

दुसऱ्या एका दुरुस्तीनुसार नागपूर इथे हायकोर्ट बेंच स्थापन करण्याची शिफारस करण्यांत आली. विधेयकावर विधानसभा व विधानपरिषद इथे चर्चा होऊन अखेर १८ मार्चला दोन्ही सभागृहांत विधेयक मंजूर करण्यांत आलं.

द्वैभाषिकाच्या विभाजनाचा प्रश्न आता संपला होता; परंतु महाराष्ट्र-म्हैसूर या सीमा-प्रश्नाची डोकंदुखी वाढलेलीच होती. मतभेदाच्या ठिणग्या उडत होत्या. द्वैभाषिकाचं एक गणित सुटलं, परंतु सीमा-प्रश्नाला अजून तोडगा निघत नव्हता. १७ मार्च १९६० ला हा प्रश्न विधानसभेंत एका ठरावरूपानं चर्चेस निघाला. या चर्चेच्या वेळीं मुंबई सरकारनं हा प्रश्न सुटण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची यशवंतरावांनी जी माहिती सभागृहाला दिली, त्यावरून हा प्रश्नहि चर्चा, वाटाघाटी आणि वितुष्ट निर्माण न होतां सोडवला जावा यासाठी केलेल्या व मिळतं घेण्याच्या प्रयत्नांचा प्रत्यय येतो.

१९५५ सालीं राज्य-पुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध झाला तेव्हापासूनच महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्नाची चर्चा सुरू झालेली होती. या दोन प्रश्नांबाबत जें झोनल कौन्सिल तयार झालं त्यांत मुंबई-म्हैसूरनं चर्चा करावी असं ठरलं. त्यानुसार १९५७ मध्ये मुंबई सरकारतर्फे एक मेमोरँडमहि सादर करण्यांत आला. त्यानंतर त्या वेळचे म्हैसूरचे मुख्य मंत्री निजलिंगप्पा यांच्याशीं पत्रव्यवहार सुरू झाला. याचा अर्थ १९५७ सालींच मुंबई सरकारनं सीमा-प्रश्न हातीं घेतला होता हें उघड आहे. निजलिंगप्पांनी, मुंबई सरकारच्या पत्राला उत्तर देतांना असं सुचवलं की, या सगळ्या प्रश्नांतून कारवार, बेळगाव, निपाणी यांचा प्रश्न सोडून द्यावा आणि बाकीच्या प्रश्नासंबंधी ६० टक्के लोकवस्तीचं

प्रमाण धरून विचार केला जावा. मुंबई सरकारला ही गोष्ट स्वीकारणं अर्थातच शक्य नव्हतं. म्हैसूर सरकारला तसं कळवण्यांतहि आलं. पण इथे थांबून चालणार नव्हतं. प्रश्नाची तड लावून त्याचा निर्णय करणं आवश्यकच होतं.

हा प्रश्न सुटण्यांतली मूळ अडचण अशी की, म्हैसूर सरकारला सीमा-प्रश्नाबाबत जिव्हाळा नव्हता, औत्सुक्य वाटत नव्हतं. १९५६ सालीं राज्यांची पुनर्रचना झाल्यानंतर म्हैसूर राज्याला न्यायानं जें मिळायला हवं होतं त्यापेक्षा दहा टक्के त्यांना जास्तच मिळालं. त्यामुळे हा प्रश्न सोडवण्यासाठी त्या सरकारला त्या वेळीं किंवा पुढेहि जिव्हाळा वाटायचं कारण नव्हतं.

मुंबई सरकारचे हितसंबंध मात्र या प्रश्नांत गुंतलेले राहिले. प्रश्नाशीं संबंधित असणाऱ्या दोन्ही बाजूंचा त्या प्रश्नासंबंधी जिव्हाळा असेल, समझोत्याच्या वातावरणांत कटुतेची भावना निर्माण न होतां तो सुटावा असं उभयतांना वाटत असेल आणि तशी निकड असेल, तरच असे प्रश्न सुटूं शकतात. दुर्दैवानं तशी स्थिति नव्हती. त्यामुळे निजलिंगप्पा यांच्या उत्तरावर चर्चा करण्यांत अर्थ नव्हता. दोन्ही राज्यांच्या मुख्य मंत्र्यांची मुंबईत तरीहि चर्चा झाली. परंतु त्यांतून कांहीहि निष्पन्न झालं नाही; निष्पन्न होण्याची शक्यताहि नव्हती. या चर्चेनंतर दोन्ही राज्यांच्या मुख्य चिटणिसांनी आपसांत चर्चा करावी असं मुंबई सरकारनं सुचवलं. मुंबई राज्याचे मुख्य चिटणीस त्या वेळीं पंजाबी हे होते. सरकारनं त्यांना चर्चेसाठी बंगलोरला पाठवलं. १९५८ च्या मे महिन्यांत ही चर्चा झाली, परंतु त्यांतूनहि कांही निष्पन्न झालं नाही. दरम्यान म्हैसूरच्या मंत्रि-मंडळांत फेरबदल होऊन निजलिंगप्पा दूर केले गेले आणि बी. डी. जत्ती हे मुख्य मंत्री बनले.

महाराष्ट्र सरकारनं, म्हणजेच यशवंतरावांनी जत्ती यांच्याशीं चर्चा सुरू केली, परंतु जत्ती हे निजलिंगप्पा यांच्या पलीकडे उभे होते. सीमेसंबंधीचा वाद हा एक 'मायनर' – किरकोळ प्रश्न आहे, ही भूमिका त्यांनी स्वीकारली. ८ जुलै १९५८ ला त्यांच्याशीं जेव्हा चर्चा सुरू झाली तेव्हा पहिल्या पांच मिनिटांतच त्यांनी एक नामी तोडगा पुढे केला. निपाणी घ्या आणि प्रश्न सोडवून टाका, हा त्यांचा तोडगा ! चर्चेतून प्रश्न पुढे सरकला किती, तर निजलिंगप्पा कांहीच द्यायला तयार नव्हते तिथे जत्ती-महाशय निपाणीवर उदक सोडायला तयार झाले इतकंच !

जत्तींचा हा 'किरकोळ'पणाचा पवित्रा पाहून यशवंतरावांनी त्यांना तिथेच खडसावलं की, " हें पहा, माझ्या सरकारतर्फे तुमच्याकडे मी कांही गावांची भीक मागायला आलेलों नाही. न्यायानं आणि सर्वमान्य तत्त्वांना धरून जो कांही प्रदेश मुंबई राज्यांत समाविष्ट व्हायचा असेल तो घेण्याला आणि त्याच न्यायानं जो प्रदेश म्हैसूर राज्यांत जायचा असेल तो देण्याला मी या ठिकाणीं आलों आहे. तत्त्वाला आणि न्यायाला धरून जीं गावं, जो भाग, म्हैसूर राज्यांत जायला हवा असेल तो तुम्ही घ्या ! "

१९५८ सालीं झालेल्या या चर्चेवरून हा प्रश्न सोडवण्यांत दोघांचे समान दृष्टिकोन नाहीत हें स्पष्ट झालं. हा प्रश्न 'मायनर' आहे असं जत्ती म्हणाले याचा अर्थ मुंबई सरकारनं, आपली मागणी सोडून द्यावी असाच होता.

हा प्रश्न सुटला तर राज्याच्या दक्षिण-सीमेवरील फार मोठ्या जनसमुदायाला न्याय मिळाल्याचं समाधान मिळणार होतं. म्हणून या प्रश्नांत 'स्टेलमेट' – कोंडी निर्माण होऊं नये, तो मोकळा रहावा, असा यशवंतरावांचा प्रयत्न होता. त्यामुळेच हा प्रश्न लवादापुढे न्यावा अशी सूचना आली असतांना, धोका पत्करून लवाद नेमण्याच्या सूचनेला त्यांनी मान्यता दर्शवली. अर्थात् पाटसकर अॅवॉर्डप्रमाणेच या प्रश्नाचा उलगडा व्हावा अशीच भूमिका मुंबई सरकारनं लवादापुढे मांडण्याचं ठरवलं होतं. खुद्द पाटसकर अॅवॉर्ड हाच एका लवादानं दिलेला निकाल होता म्हणूनच लवादाची सूचना सरकारनं तत्त्वरूपानं स्वीकारली होती; परंतु याहि सूचनेला म्हैसूरनं नकार दिला. त्यानंतर दोन्ही बाजूंचे दोन-दोन सदस्य समाविष्ट असणारी एक मध्यस्थ-समिति निर्माण करावी, असं भारत सरकारनं दोन्ही राज्यांना सुचवलं. यशवंतरावांनी तीहि सूचना स्वीकारली; आणि त्यासाठी हरिभाऊ पाटसकर यांचं नांव सुचवलं. पाटसकर हे त्या वेळीं राज्यपाल होते, पण तरीहि त्यांनी या समितींत काम करण्यास मान्यता दिली. म्हैसूरतर्फेहि दोन नांवं सुचवण्यांत आलीं.

या समितीनं झोनल कौन्सिलपुढे आपला अहवाल सादर करावा अशी सुरुवातीची कल्पना होती; परंतु म्हैसूरनं असं सुचविलं की, या दोन्ही मंडळींनी आपापल्या सरकारच्या मुख्य मंत्र्यांकडे अहवाल द्यावा. यशवंतरावांनी त्यालाहि तयारी दर्शवली. चार शहाणी माणसं विचार करतील, तर त्यांना न्याय टाळतां येणार नाही, अशी त्यामागची त्यांची मूळ भावना होती; परंतु या समितीचं काम सुरू होण्यापूर्वी समिती-पुढे ' टर्म्स ऑफ रेफरन्स ' काय असाव्यात याबद्दल वाद माजला.

म्हैसूर सरकारतर्फे असा आग्रह धरण्यांत आला की, या समितीनं जी चर्चा करायची ती 'किरकोळ' ( मायनर ) प्रश्नावरच आपल्याला चर्चा करायची आहे, असं गृहीत धरूनच केली पाहिजे. याचा अर्थ, गाडी मूळ पदावरच गेली होती. त्यामुळे ही भूमिका आपण स्वीकारणार नाही असं यशवंतरावांना सांगावं लागलं. कांहीहि ' टर्म्स ऑफ रेफरन्स ' – मार्गदर्शक तत्त्वं – न देतां समितीनं चर्चा करावी आणि मार्ग सुचवावा यालाहि त्यांनी तयारी दर्शवली. हा प्रश्न 'किरकोळ' आहे असं जोंपर्यंत म्हैसूर सरकार म्हणत नाही तोंपर्यंत त्या गोष्टीलाहि मुंबई सरकारची तयारी होती. या चौघांचा अहवाल भारत सरकारला सादर केल्यानंतर भारत सरकारच त्याचा विचार करणार असेल, तर ' टर्म्स ऑफ रेफरन्स ' नसला तरी चालेल, असं म्हणण्यांत धोका कमी होता. कारण ज्या झोनल कौन्सिलपुढे हा प्रश्न मांडायचा होता तें कौन्सिल नवीन मुंबई राज्य विभाजन-विधेयकानुसार संपुष्टांतच येणार होतं.

या प्रश्नांत त्यानंतरहि अनेक घटना घडत राहिल्या. सीमावर्ती मराठीभाषकांना चिरडून टाकण्यासाठी, म्हैसूर सरकारनं पोलिसांकरवीं मराठी लोकांना मारझोड केली, गोळीबार करून कांहीजणांना ठार मारलं आणि मराठी भाषा त्या राज्यांतून पुसून टाकण्यासाठी अनन्वित प्रकार केले. महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसतर्फे त्या वेळचे अध्यक्ष राजारामबापू पाटील यांनी या अत्याचारांचा अहवाल यशवंतरावांकडे पाठवला आणि त्यांनी तो पं. नेहरूंकडे रवाना केला. महाराष्ट्रांतील समितीच्या वतीनंहि सीमा-भागांतील अत्याचारांबद्दल मुख्य मंत्र्यांकडे आलेला अहवाल त्यांनी दिल्लीला रवाना केला; परंतु प्रश्न सुटला नाही.

सीमा-प्रश्नांतील हा एकूण गुंता आणि या प्रश्नाचं स्वरूप, लोकांच्या समोर सुस्पष्टपणें यावं आणि त्यांतून मुंबई सरकारची भूमिकाहि स्पष्ट व्हावी या हेतूनं यशवंतरावांनी सभागृहाला हा सारा इतिहास एकदा निवेदन केला होता. म्हैसूर सरकारच्या आडमुठेपणामुळे आणि केंद्र-सरकारच्या निष्क्रियतेमुळे या प्रश्नाची सोडवणूक यशवंतराव आपल्या कारकीर्दीत करूं शकले नाहीत, ही वस्तुस्थिति आहे. नंतरच्या काळांत तर म्हैसूरचा आडमुठेपणा वाढतच राहिला, हा इतिहास आहे. महाराष्ट्र राज्य निर्माण होण्यास चौदा वर्षं खर्ची पडलीं. दक्षिणेकडल्या सीमेवरील मराठी प्रदेशाचं म्हैसूरनं गिळलेलं माणिक बाहेर काढण्याची शस्त्रक्रिया पुढे वर्षानुवर्षे सुरू राहिली आहे. द्वैभाषिक राज्याचं विभाजन होत असतांनाच, महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्नाचाहि निर्णय करण्याचा प्रयत्न फलद्रूप होऊं शकला नाही. निर्णय करून घेण्यांत महाराष्ट्राचं नेतृत्व कमी पडलं असं नव्हे. दिल्लीचाच ढामपणा नव्हता. महत्त्वाचे प्रश्न रेंगाळत ठेवण्याचं धोरण सीमा-प्रश्नाबाबतहि अवलंबण्यांत आल्यामुळे वर्षानुवर्षे हा प्रश्न पुढे अनिर्णीत अवस्थेंतच पडून राहिला.

द्वैभाषिक राज्य हें भारतांतील पहिल्या प्रतीचं राज्य होय अशी ख्याति यशवंतरावांनी संपादन केलेलीच होती. हें राज्य चालवण्याचं कार्य अतिकठीण व किचकट होतं. त्यासाठी साडेतीन वर्षे यशवंतरावांना तारेवरची कसरत करावी लागली; परंतु त्यामुळेच साडेतीन वर्षांच्या समाधानकारक राज्यकारभारामुळेच कॉंग्रेस-श्रेष्ठांना महाराष्ट्रांतील जनतेच्या अंतःकरणांतल्या खऱ्या भावनेचा तळ दिसूं शकला. भावनात्मक ऐक्याचं दर्शन दिल्लीवासियांना झालं तेव्हाच द्वैभाषिकाचं विसर्जन कायम ठरलं.

परंतु द्वैभाषिकाचं विसर्जन होणार म्हटल्याबरोबर गुजराती मंडळी अस्वस्थ झाली आणि यशवंतरावांवर त्यांच्याकडून आरोप सुरू झाले. स्वतंत्र विदर्भाचा प्रश्नहि जोरानं पुन्हा पुढे आला. विदर्भाच्या प्रश्नाचं नेतृत्व त्या वेळीं श्रीमती ताई कन्नमवार यांच्याकडे होतं. स्वतः मारोतराव कन्नमवार हे यशवंतरावांच्या मंत्रिमंडळाचे सदस्य, तर त्यांच्या पत्नी या विदर्भ चळवळीच्या प्रमुख, असा हा पेंच होता. श्रीमती कन्नमवार या नागपूर-विभाग कॉंग्रेस-कमिटीच्या अध्यक्षहि होत्या. या परिस्थितींत मुख्य मंत्र्यांचे प्रथमपासून

घट्ट सहकारी म्हटले जाणारे मारोतराव कन्नमवार यांच्याविषयी महाराष्ट्रांतल्या मंडळींना शंकाकुशंकांनी पछाडलं. दुटप्पीपणाचा आरोप त्यांच्यावर सर्रास होऊं लागला.

यशवंतराव मात्र या वेळीं धर्म-संकटांत सापडले. कन्नमवार यांच्यावर आरोप होऊं लागल्यामुळे तेहि अस्वस्थ बनले होते. अखेर आपल्या भूमिकेबद्दल कन्नमवार यांनी यशवंतरावांना एका पत्राद्वारे कळवलं की, " अंगीकृत कार्यांत माझ्या भूमिकेमुळे आपणाला अडथळा येत आहे असं वाटतांच मला मंत्रिपदांतून लगेच मुक्त करावं. मंत्रिपद सोडल्यावरहि विदर्भाच्या प्रश्नाबाबत मी अखेरपर्यंत प्रयत्न करीन व काँग्रेसश्रेष्ठ जो निर्णय करतील तो प्रामाणिकपणें पाळीन. इतकंच नव्हे तर, त्याचा प्रचार करीन ! "

कन्नमवार यांचं पत्र मिळतांच यशवंतरावांनी त्यांना घरीं बोलावलं आणि आपल्याहि भूमिकेचा खुलासा केला. यशवंतरावांच्या मनांत त्यांच्याविषयी शंका नव्हतीच. तेंच त्यांनी बोलून दाखवलं; आणि कुणी कांहीहि म्हणोत, आपल्या कार्यपद्धतीवर माझा दृढ विश्वास आहे, असं सांगून कन्नमवारांना त्यांनी शंका-मुक्त केलं. यशवंतरावांनी हा आपला दृष्टिकोन पुढे कायम ठेवला आणि चंदीगडच्या काँग्रेस-अधिवेशनांत कांही महाराष्ट्रीय मंडळींनी कन्नमवार यांच्याविषयी संशय व्यक्त करतांच त्यांच्याबद्दल गैरसमज करून घेऊं नका, असंच यशवंतरावांनी सांगितलं.

परस्परांमधील प्रेमांत आणि संबंधांत कसल्याहि प्रकारची कटुता निर्माण होणार नाही याबद्दल यशवंतराव नेहमीच दक्ष रहात असत. त्यांचा तो स्वभावच बनला होता. वाटाघाटींनं, धिमेपणानं, प्रेमाच्या संबंधांत बिघाड येऊं न देतां एखादा वादग्रस्त प्रश्न सोडवणं महाकठीण असतं. सर्व सत्ता हातीं असलेला माणूस तर 'एक घाव दोन तुकडे ' करण्यांतच पुरुषार्थ मानत असतो. तसं करणं त्याला सोपं असतं. यशवंतरावांच्या हातांत सर्व सत्ता होती, राजकीय क्षेत्रांत कुशलतेनं शस्त्रक्रिया करण्यांत ते निष्णात होते, पण द्वैभाषिकाच्या सबंध काळांत त्यांनी ज्या शस्त्रक्रिया केल्या त्या कौशल्यपूर्ण ठरल्या.

प्रचंड मानसिक ताण मात्र त्यांना या काळांत सहन करावा लागला. महाराष्ट्र राज्य-निर्मितीच्या या वेदना प्राण कंठाशीं आणणाऱ्या होत्या. कांही गोष्टी मनाप्रमाणे होत नव्हत्या, पण त्यासाठी भांडणं टाळावीं लागत होतीं. कित्येकदा हातातोंडाशीं आलेला घास निसटून जातो की काय, अशीहि परिस्थिति निर्माण होत असे. विघ्नसंतोषी मंडळी टपलेलीच होती. मतभेद निर्माण करायचे आणि त्या खडकावर चर्चेचं तारूं आदळून फुटावं असे त्यांचे प्रयत्न होते. विभाजनांत असा व्यत्यय निर्माण करून १९६२ पर्यंत तें लांबवावं व १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकी झाल्यावरच त्याचा विचार करावा अशी इच्छा करणारी मंडळी आसपास वावरत होती; परंतु यशवंतरावांनी जी नीति अवलंबली त्यामुळे त्या इच्छुकांना संधीच मिळूं शकली नाही. साऱ्या वाटाघाटी त्यांनी अखेरपर्यंत यशस्वी केल्या आणि ऐनजिनसी यश हस्तगत केलं. महाराष्ट्रांतली

काँग्रेस-संघटना आणि प्रशासकीय कारभार या दोन्ही आघाड्यांवर त्यांनी हें यश संपादन केलं. मुख्यमंत्रिपदाचा काटेरी मुगुट स्वीकारल्यापासून सह्याद्रीची मुत्सद्देगिरी आणि समर्थांची उक्ति अंतःकरणांत बाळगूनच त्यांचा सगळा प्रवास झाला.

फड नासोंचि नेदावा। पडिला प्रसंग सावरावा।
अतिवाद न करावा। कोणी एकासी॥

हें समर्थ-सूत्र धरूनच ते महाराष्ट्राच्या निर्मितीच्या क्षणापर्यंत पोंचले. १९६० च्या एप्रिलअखेरीस शिवनेरीवरील सोहळा आणि मुंबईत प्रत्यक्ष नवराज्य-निर्मिति हे यशवंतरावांच्या राजकीय जीवनांतले अमृतमय, अमर असे परम भाग्याचे क्षण आहेत. महाराष्ट्रांतल्या तमाम जनतेकडून आणि भारतीय श्रेष्ठ नेत्यांकडून नेतृत्वाचं प्रशस्तिपत्र याच वेळीं त्यांना मिळून गेलं.

परंतु कर्तृत्वाच्या मोठेपणाचा अन्वयार्थ लावत बसणाऱ्या महाराष्ट्रांतल्या मंडळींनी यांतूनहि वाद निर्माण करण्याची संधि साधली. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश यशवंतरावांनी महाराष्ट्रांत आणला असे त्यांचे अनुयायी म्हणूं लागतांच, दुसऱ्या बाजूला विरोधाचा संचार होणं स्वाभाविकच होतं. तसा तो होण्यांत कोणाला दोषहि देता येणारा नाही. महाराष्ट्र निर्माण होत आहे असं निश्चित झाल्यापासून, हें श्रेय कोणाचं व तें कोणाला किती द्यायचं, याबद्दल महाराष्ट्रांत चढाओढ सुरू झाली होती. संयुक्त महाराष्ट्र समितीनं, महाराष्ट्र राज्य-निर्मितीसाठी प्रचंड चळवळ सुरू करून साऱ्या महाराष्ट्राचं मन जागं केलेलं होतं. सत्ताधारी काँग्रेस-पक्षाच्या धोरणाविरुद्ध प्रत्येक क्षेत्रांत लढा उभा करून तो बव्हंशीं जिंकला होता. त्यामुळे महाराष्ट्र-निर्मितीच्या श्रेयाचा मोठा वांटा हा समितीला द्यावाच लागेल. स्वतः यशवंतरावांनीहि समितीच्या कर्तृत्वाचं यश मोकळेपणानं मान्य केलेलं होतं; परंतु नव्या राज्य-निर्मितीचं सर्व श्रेय स्वतःकडे घेण्यासाठी काँग्रेस-जन आतुर बनले होते. यशवंतरावांचं नेतृत्व महाराष्ट्रांत प्रस्थापित झालेलं होतंच तेव्हा त्यांच्या नेतृत्वाला हें श्रेय देण्यांत त्यांच्यांत मग अहमहमिका सुरू झाली आणि त्यांतून संयुक्त महाराष्ट्राचा 'मंगल कलश' यशवंतरावांनी आणल्याच्या घोषणा सुरू झाल्या. त्यांतूनच मग या श्रेयाच्या मोठेपणाचा अन्वयार्थ लावण्याचा वाद सुरू झाला.

मराठी जनतेनं पक्षाचे, जातीचे, लहानमोठेपणाचे सर्व मतभेद दूर ठेवून संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर एकजूट दाखवली होती आणि खरं श्रेय जनतेचं होतं. स्वतः यशवंतरावांची तीच भावना होती, त्यांनी ती बोलूनहि दाखवली होती. पुनर्रचना-विधेयक, विधानसभेत सादर करतांनाच "हा लोकांचा विजय आहे" असाच त्यांनी नव्या राज्य-निर्मितीचा अर्थ सांगितला. खरं म्हणजे यशवंतरावांनीच सारं श्रेय जनतेला दिल्यानंतर वाद निर्माण होण्याचं कारणच उरत नाही; परंतु वाद सुरू होण्यापूर्वीच तो निकालांत काढण्याइतका महाराष्ट्र लेचापेचा नाही, पूर्वीहि नव्हता आणि अजूनहि नाही. श्रेयाचा वाद सुरूच राहिला.

त्या वादाचे निष्कर्ष कांहीहि असोत; एक गोष्ट मान्य करावी लागते की, महाराष्ट्र राज्याची निर्मिति ज्या वातावरणांत झाली, ज्या पद्धतीनं झाली त्याचं मोठं श्रेय यशवंतरावांना द्यावं लागेल. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला तर महत्त्व आहेच, परंतु ही निर्मिति ज्या पद्धतीनं केली गेली त्या पद्धतीला सर्वांत अधिक महत्त्व आहे. लोकशाही-पद्धतीला अनुसरून आणि भारतीय संदर्भांशीं सुसंगत अशा रीतीनं चर्चा होऊन, वाटाघाटींनी हें राज्य जन्माला आलं. नव्या राज्याला मात्र, त्याच्या जन्मापासूनच अनुकूल वातावरण लाभलं त्याला यशवंतराव चव्हाण यांचं नेतृत्व कारणीभूत होतं. दिल्लीपासून महाराष्ट्रापर्यंत सद्भावनेच्या वातावरणांत त्यांनी हा प्रश्न वैशिष्ट्यपूर्ण रीतीनं सोडवला आणि सर्व शंका, संदेह, अविश्वास यांचं निराकरण केलं आणि महाराष्ट्रांत आत्मविश्वास निर्माण केला. स्वतः हा आत्मविश्वास बाळगूनच यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राची घोषणा करण्यासाठी मग शिवनेरीवर पोंचले.

# २०

भाग्यवती शिवनेरी ! !

२७ एप्रिल १९६०.

सह्याद्रीच्या विविधशक्ति आज शिवनेरीवर सिद्ध होत्या. तीनशे वर्षांपूर्वी मातोश्री जिजाबाईसाहेबांनी श्रीशिवाजीला जन्म दिला त्या वेळीं शिवनेरीवर, सह्याद्रीच्या सर्व शक्तींचं दर्शन असंच एकदा घडलं होतं. आज पुन्हा तसंच दर्शन घडत होतं.

शिवनेरीवर त्या दिवशीं सर्व शक्तींची पूजा झाली. शिवनेरीची पूजा म्हणजे सह्याद्रीची पूजा – मातृभूमीची पूजा, भारतमातेची पूजा. महाराष्ट्र हा सह्याद्रीचीच पूजा करतो; कारण महाराष्ट्राचा जन्म-दाता सह्याद्रीच. हा समर्थ महाराष्ट्र-पिता भारताचा मूलाधार आहे.

महाराष्ट्राचा सह्याद्रि हा हिमालयाइतका विशाल आणि उत्तुंग नाही. त्याचं सौंदर्य अद्वितीय नाही, पण अव्वल दर्जाचं आहे. कैलास हिमालयावर आहे. शंकराचं हें प्रमुख स्थान. हिमालय हा देवतात्मा, तर सह्याद्रि हा वीरात्मा. त्याचा पिंड स्वातंत्र्योन्मुख आणि युद्ध-प्रधान. सह्याद्रीचं माहात्म्य फार थोर. अनंतकाळापासून सह्याद्रीवर सागर धडका मारत आहे, पण तो कोसळलेला नाही. गंगा-यमुनेच्या मैदानांतून अगदी अलीकडे, मोंगलापर्यंत अनेक आक्रमकांनी महाराष्ट्राच्या या सह्याद्रीवर धडका मारल्या, पण सह्याद्रि नमला नाही. मागे सरल्यासारखं भासलं असेल, तर तें अधिक जोरानं उसळी घेण्यासाठी ! प्रतिकारासाठी ! स्वातंत्र्य हाच त्याचा स्थायीभाव असल्यानं धडका मारणारेच कपाळमोक्ष करून घेऊन परत फिरले.

या सह्याद्रीनं महाराष्ट्राच्या भूमीची आणि मनोभूमीचीहि घडण केलेली आहे; महाराष्ट्राचं मन बाह्यतः खडबडीत, पण अंतर्यामीं स्वामीनिष्ठ; बाह्यतः कोरडं, पण अंतर्यामीं वत्सल; आत्मसमर्पणाला सदैव सज्ज ! स्वातंत्र्याच्या रक्षणाकरिता सदैव सिद्ध अशी ही मनोभूमि ! सह्याद्रीनं आपल्या शिरावर शंकराचीं आणि आदिशक्तीचीं मंदिरं उभारू दिलीं. द्वादश ज्योतिर्लिंगांपैकी अधिक संख्येनं ज्योतिर्लिंगं सह्याद्रीच्या माथ्यावरच

आहेत. सह्याद्रीचीं हीं सर्व शिखरं पावित्र्याचीं प्रतीकं आहेत; परंतु राष्ट्राच्या रक्षणासाठी मंदिराहून किल्ले अधिक उभारण्यास सह्याद्रीनं जागा दिली आहे.

छत्रपति शिवरायानं स्वसंपादित सर्व धनाचा विनियोग किल्ल्यांच्या उभारणींत केला. म्हणूनच पुढे महाराष्ट्राच्या स्वातंत्र्याचं रक्षण होऊं शकलं. शिवाजीराजा हा सह्याद्रीचा सुपुत्र. सह्याद्रीच्या प्रेरणेनंच शिवाजीराजानं जागोजाग दुर्ग उभारले, गड-कोट बांधले, मावळ्यांचं – शेतकऱ्यांचं – बहुजन-समाजाचं शौर्य जागं केलं आणि महाराष्ट्राला, हिंदुस्थानला स्वातंत्र्याचा संजीवनी मंत्र दिला. या गड-कोटांची व्यावहारिक उपयुक्तता काळानं, विज्ञानानं नष्ट केली असली, तरी स्वातंत्र्यप्रेरणेचीं हीं प्रतीकं आजहि प्रतिकारशक्ति शाबूत ठेवत आहेत. या प्रतीकांचं माहात्म्य आणि जिजाऊ-शिवराय यांचा शिवनेरीवरील अखंड सुप्त निवास लक्षांत घेतां, नव्या महाराष्ट्र राज्याची, महाराष्ट्राचं स्वतंत्र राज्य स्थापन झाल्याची घोषणा महाराष्ट्राला ऐकवण्यासाठी यापरतं अन्य पवित्र स्थान तें कोणतं ?

महाराष्ट्राचं ऐक्य नैसर्गिक आहे. महाराष्ट्र हा एक संपूर्ण सजीव घटक आहे. या ऐतिहासिक सत्याचं दर्शनच त्या दिवशीं शिवनेरीवर घडलं. हिंदुस्थानच्या शासन-संस्थेंत आणि राष्ट्राच्या सांस्कृतिक, आर्थिक जीवनांत महाराष्ट्राला आता त्याच्या महात्म्याच्या प्रमाणांत स्वतंत्र राज्याचं महत्त्व प्राप्त झालं होतं.

संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला ही घोषणा ऐकण्यासाठी त्या दिवशीं शिवनेरीवर सारा महाराष्ट्र लोटला होता. लोकांचा अथांग सागर पसरला होता. कृष्णथडी, भीमथडी, गंगाथडी सर्व एकत्र मिळाल्या होत्या. शिवाजीनं महाराष्ट्राची राजकीय उंची वाढवली त्या वेळीं रायगडावर असाच मेळावा जमा झाला होता. तीनशे वर्षांनंतर आज तेंच सुरम्य दर्शन शिवनेरीवर घडलं.

शिवनेरी हा जुन्नरच्या परिसरांतला किल्ला. खुद्द जुन्नर या गावालाहि ऐतिहासिक महत्त्व आहे. जुन्नर ही प्राचीन महाराष्ट्र राज्याची राजधानी होती. भीमाशंकरच्या लेण्यांत याचा उलगडा करणारा लेख खोदलेला आहे. जुन्नरभोवतालच्या डोंगरांत सुमारे दीडशे लेणीं आहेत. या लेण्यांमध्ये जे लेख खोदलेले आहेत त्यांवरून जुन्नर शहराचं प्राचीन महत्त्व समजूं शकतं. नव्या महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई शहर हें असून संयुक्त महाराष्ट्राची घोषणा करण्यासाठी जुन्नर-शिवनेरीची निवड निश्चित व्हावी, यामागे ऐतिहासिक सुप्त शक्तींचा कांही धागा असला पाहिजे. राज्यकर्त्यांना या शक्तीनंच इथे खेचून आणलं असलं पाहिजे !

मानवमात्राच्या शक्तीला अखेर मर्यादा या असतातच. शास्त्राच्या साहाय्यानं दृश्य जगावर आणि निसर्गावर प्रसंगीं तो जय मिळवतांना दिसतो. निसर्गाच्या शक्तीचं संवर्धन आणि परिवर्तन करूं शकतो. परंतु अदृश्य जगांतली शक्ति ताब्यांत ठेवून त्यांना राबवण्याची शक्ति संपादन करणं हें त्याला दुरापास्त ठरलं आहे. अदृष्टांतली शक्ति मात्र, मानवमात्राला, त्याचं भवितव्य घडवण्यासाठी राबवून घेत असतात. सह्याद्रीच्या

प्रचंड ढालीवर स्थायिक झालेला सर्वांना अपरान्तापासून (कोकण) विदर्भ-मराठवाड्यापर्यंतच्या सर्व लोकांना शिवनेरीवर या अदृश्य शक्तीनं पाचारण केलं याचा हेतु स्पष्ट होता.

महाराष्ट्रांतल्या कांही रहिवाश्यांना उच्च-गंडानं पछाडलेलं असतं, तर कांहींना न्यूनगंडानं! आपसामध्ये क्षुल्लक संघर्ष आणि भेदभाव करण्यांतच कांहींची शक्ति खर्च होत असते. सह्याद्रि हा महाराष्ट्राच्या ऐक्याचा सूत्रधार असल्यामुळे संयुक्त महाराष्ट्र निर्माण होत असतांना सामान्य, क्षुद्र विकल्प दूर करून महाराष्ट्राच्या नैसर्गिक ऐक्याला मूर्त व संघटित स्वरूप प्राप्त करून देण्यासाठीच सह्याद्रीच्या अदृश्य शक्तीनं, सारा महाराष्ट्र एकजीव करण्यासाठी, त्याला शिवनेरीवर पाचारण केलं असलं पाहिजे. शिवनेरीवर जन्मलेल्या शिवाजीनं, हिंदवी स्वराज्याचा – स्वातंत्र्याचा संकल्प सोडला तेव्हा सह्याद्रीनं हा चमत्कार घडवला होता. शिवाजीचा तोच महाराष्ट्र आता स्वतंत्र राज्य म्हणून अस्तित्वांत येत होता. आता ऐक्याची जरुरी होती. विकासाचा किल्ला लढवायचा होता.

शिवनेरीवर शिवाई – पार्वती – होतीच. सह्याद्रीचा स्वामी शंकर, कडेपठारांचा स्वामी खंडोबा, गंगथडीची महिषासुरमर्दिनी, भीमथडीची तुळजाभवानी, कृष्णथडीची कोल्हापूरची महालक्ष्मी, अपरान्ताचा परशुराम, देश-भागाचा विठोबा आदि सर्व शक्तींचा समन्वय जणू आता शिवनेरीवर झालेला होता. शिंग, तुताऱ्या यांच्या ललकाऱ्या अस्मानाला भिडत राहिल्या. हलगी, ढोल, लेझीम यांच्या नादानं दुमदुमलेलं वातावरण गुलालानं माखून निघालं.

या आनंदोत्सवाचे प्रमुख होते मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण. मुंबईतून 'सह्याद्रि'-मधूनच ते शिवनेरीला पोंचले. मुंबईत प्रमुख अशा निरनिराळ्या धर्मगुरूंचा आशीर्वाद त्यांनी अगोदर घेतला होता. शिवनेरीवर येतांच बालशिवाजी आणि मातोश्री जिजाबाईंचं त्यांनी दर्शन घेतलं, त्यांच्या प्रतिमांचं उद्‌घाटन केलं आणि श्रीशिवछत्रपतींना मुजरा करून मगच नव्या महाराष्ट्र राज्याची घोषणा करण्यासाठी ते सिद्ध झाले.

शिवजन्मानं महाराष्ट्राच्या इतिहासाची जिथे सुरुवात झाली त्याच पवित्र ठिकाणीं विसाव्या शतकांत नव्या महाराष्ट्र राज्याच्या इतिहासाची सुरुवात व्हावी, हा प्रसंग पवित्र आणि अपूर्व होता. या सुवर्ण-दिवशीं नव्या राज्याचे प्रमुख या नात्यानं महाराष्ट्राच्या परमेश्वराला प्रणाम करण्याची आणि श्रीशिवप्रभूंचे आशीर्वाद मिळवण्याची संधि यशवंतरावांना लाभली, हा त्यांच्या जीवनांतला मोठाच योगायोग! अनेक भावनांनी त्या दिवशीं त्यांचं मन भारावून गेलं होतं. याच भावना शिवनेरीवर जमलेल्या अथांग लोकसागराला, किंबहुना साऱ्या महाराष्ट्राला त्यांनी बोलून दाखवल्या. त्यांच्या प्रत्येक शब्दांतून नव्या राज्याच्या महत्त्वाकांक्षा आणि समृद्धीची तळमळ व्यक्त होत राहिली. त्यांनी सांगितलं –

“महाराष्ट्राच्या परमेश्वराला प्रणाम करण्यासाठी आणि सर्वांच्यातर्फे श्रीशिवछत्रपतींचे आशीर्वाद घेण्यासाठी या सुवर्ण-दिनीं मी इथे आलों आहे. युगायुगांतून येणारा हा दिवस आहे. तीनशे वर्षांपूर्वी तो एकदा आला आणि या शिवनेरींत शिवाजीमहाराजांचा जन्म झाला. केवळ एका व्यक्तीचा, एका बालकाचा तो जन्म नव्हता, तर त्या बालकाच्या रूपानं महाराष्ट्राचा नवा इतिहास जन्माला येत होता. शिवजन्मानं हा इतिहास त्या वेळीं गडावर सुरू झाला. त्याच या पवित्र ठिकाणीं विसाव्या शतकांतल्या नव्या महाराष्ट्र राज्याच्या इतिहासास सुरुवात होत आहे, हा अपूर्व योगायोग आहे.

“छत्रपतींच्या जन्मठिकाणीं स्वतंत्र भारताचं निशाण फडकवून महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या मंगलदिनीं भारतानं सुद्धा त्यांना मुजरा केला आहे. महाराष्ट्र-राज्याच्या रूपानं एक नवं कर्तृत्व आज जन्माला येत आहे. तृप्तीचा हा क्षण छत्रपतींच्या पुण्याईनं निर्माण झाला आहे. हा आनंद उपभोगतांना, या आनंदामागोमाग येणाऱ्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आता सिद्ध होऊं या. एक किल्ला जिंकला, आता दुसरा किल्ला जिंकण्यासाठी विकासाची घोडदौड सुरू करूं या. कारण या विकासांतूनच महाराष्ट्राचं भवितव्य आकारास येणार आहे.

“भारतांत चाळीस कोटि लोकांचं राज्य निर्माण झालेलं आहे तें भारतीयांच्या मनांत स्वातंत्र्याचा अभिमान जोंपर्यंत जागृत आहे तोंपर्यंत टिकणार आहे. जसा भारत एकदाच आणि कायमचा निर्माण झाला तसा महाराष्ट्रहि एकदाच निर्माण होत आहे. आतापासून पुढे अनंतकाळपर्यंत महाराष्ट्र भारताशीं समरस होऊन सांगणार आहे की, आमच्या मराठी जीवनांत जें जें कांही चांगलं आहे, मंगल आहे, तें भारताच्या समृद्धीसाठी, संरक्षणासाठी आणि सेवेसाठी आम्ही देणार आहोंत. आम्ही प्रथम भारतीय आणि नंतर महाराष्ट्रीय आहोंत.

“महाराष्ट्रांतील जनतेनं गेल्या चार-पांच वर्षांत महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी अनेक प्रकारांनी आणि मार्गांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी या प्रयत्नांचे दोन कालखंड मानतों. प्रतापगडावर पंडित नेहरूंच्या हस्तें शिवप्रभूंच्या पुतळ्याचं अनावरण होण्यापूर्वीचा एक आणि प्रतापगडापासून शिवनेरीपर्यंतचा दुसरा. पंडित नेहरू ज्या दिवशीं शिवछत्रपतींना प्रणाम करण्यासाठी प्रतापगडावर आले तेव्हापासून माझ्या मतानं या निरगाठीनं बांधलेल्या प्रश्नाचे धागे उकलत गेले. शेवटीं साडेतीन कोटींचा महाराष्ट्र आता एकत्र येत आहे.

“महाराष्ट्र-जीवनाच्या चार परंपरा मला दिसतात. मुक्तेश्वर-ज्ञानेश्वरापासूनची संतांची परंपरा समतेचा, न्यायाचा, बंधुभावाचा संदेश देत असतांना दिसते. दुसरी प्रवृत्ति वीर, पराक्रमी, राजकारणी पुरुषांची आहे. तिचं प्रतीक छत्रपति शिवाजीमहाराज हे आहेत. अन्यायाविरुद्ध दलितांचा कैवार घेऊन लढण्याची तिसरी प्रवृत्ति महात्मा फुले यांनी दिलेली आहे. आणि शेवटीं विद्वानांच्या बुद्धिमत्तेचा वापर देशासाठी करून

त्या मार्गानं वाटेल तो त्याग हसतमुखानं सहन करण्याची राजकारणी प्रवृत्ति लो. टिळकांनी महाराष्ट्राला दिली आहे.

या थोर परंपरेचा वारसा घेऊन महाराष्ट्रास पुढे जायचं आहे. आपला हा जो वारसा आहे त्याची जाणीव ठेवायची आहे. हा वारसा जतन करणं मोठं कठीण आहे. पैशाचा खजिना खर्च करून मोकळा करतां येतो. पण हा वारसा खर्च करतां येत नाही. तो बरोबर घेऊन सदैव पुढे जावं लागतं; पुढच्या जबाबदारीची जाणीव ठेवावी लागते. महाराष्ट्रांतल्या तीन कोटि जनतेच्या मनांत आज शिवनेरी आहे. तिची आठवण झाली नाही असं जागतं मन आज महाराष्ट्रांत सापडणार नाही. त्या सर्वांना या नव्या महाराष्ट्र राज्याचा गाडा चालवायचा आहे. नव्या महाराष्ट्राच्या निर्मिती-करिता आपण आता प्रतिज्ञाबद्ध आहोंत. या आनंदोत्सवाची स्मृति म्हणून या राज्याची जी मुद्रा निश्चित केली आहे, तिच्यावर –

**प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता**
**महाराष्ट्रस्य राज्यस्य मुद्रा भद्राय राजते**

ही शिवाजीमहाराजांनी निवडलेलीं वाक्यंच घेतलीं आहेत. याचा अर्थच हा की, ही राजसत्ता लोककल्याणाकरिता राबणार आहे.

"नवमहाराष्ट्राच्या जन्मवेळची कुंडली महाराष्ट्रापुढे सतत रहाणार आहे. महाराष्ट्रांत आज असलेल्या सामाजिक आणि राजकीय प्रवाहांचा परिणाम महाराष्ट्राच्या भवितव्यावर होणार आहे. आज महाराष्ट्रांत अनेक पक्षोपपक्ष आहेत. ते पक्ष राहिले पाहिजेत. ते राहूं नयेत असं मी म्हणणार नाही. लोकशाहीचं राजकारण चालवण्या-साठी अनेक पक्ष असावे लागतात. पण फार पक्ष असणं हें हितावह नाही. मी तर असं म्हणेन की, पुढचीं अनेक वर्षे, निदान तिसरी पंचवार्षिक योजना पूर्ण होईपर्यंत तरी, पक्षोपपक्षांच्या राजकारणाचा गोंधळ इथे माजूं नये. प्रत्येक पक्षास स्वतःचं असं खास राजकारण असतं. परंतु महाराष्ट्रापुढे फक्त एकच राजकारण आहे आणि तें म्हणजे सर्वांगीण विकास साधण्याचं राजकारण. महाराष्ट्रापुढे असलेल्या मूलभूत सामाजिक व आर्थिक समस्या सोडवण्याच्या दृष्टीनं खटपट करणं तें महाराष्ट्राचं राजकारण होय.

"महाराष्ट्राला बुद्धिमत्तेची व निसर्गाची देणगी आहे, असं आपण म्हणतों. आज-पर्यंत परसत्तेमुळे व भाषिक राज्य नसल्यामुळे या देणगीचा वापर करतां येत नव्हता अशी तक्रार होत होती. आता कोणती तक्रार आपण करणार? महाराष्ट्राच्या कल्या-णाचा सिंहगड तुम्हांला स्वतःच्या कर्तृत्वावर जिंकायचा आहे. संकटं असतील, पण त्यांना सामोरं जाऊन झेलल्याशिवाय तीं संपत नाहीत. त्यांना पाठ दाखवली की तीं अधिकच पाठीशीं लागतात. या संकटांवर मात केली पाहिजे. विकास-कार्याच्या मोहिमे-वर निघालेलों आपण, सिंहगड चढून आलों आहोंत. या गडावरून पळून जाण्याचा प्रयत्न कुणी करणार असतील, तर त्यांना सांगावंसं वाटतं की, 'पळून कुठे जातां? दोर केव्हाच तोडून टाकले आहेत.'

" महाराष्ट्राचं राज्य म्हणजे सामान्य माणसाचे प्रश्न सोडवण्याचं राज्य होय, या दृष्टिकोनांतून या राज्याकडे पहा. महाराष्ट्रापुढे अनेक समस्या आहेत. महाराष्ट्रांतल्या माणसाला प्रश्नाची तीव्रता समजून दिली, तर तो उत्साहानं उठतो; पण कर्तव्याची जाणीव दिली नाही, तर पुन्हा झोपतो. म्हणून त्याला सांगितलं पाहिजे की, ' तूं राजा आहेस. अविकसित, दुष्काळी अशा कडेकपारींनी बनलेल्या सह्याद्रीचा तूं राजा आहेस. ' दुःखांत असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करणं हें राजाचं कार्य आता प्रत्येक मराठी माणसानं केलं पाहिजे. एकेक माणूस, एकेक मूल, हें सावली देणारं झाड आहे असं मानून त्यास खतपाणी घातलं पाहिजे.

" माझ्यापुढील कामाचं मला तीन तऱ्हेनं दर्शन घडत आहे. उद्याच्या महाराष्ट्र राज्याचा कारभार उत्तम, चोख झाला पाहिजे. पंचवार्षिक योजनेचं बाळ, पाळण्यांत पाय दाखवून नवमहाराष्ट्राची ग्वाही देणारं झालं पाहिजे आणि आपण तीन भाऊ अनेक शतकांनंतर प्रथम एकत्र येत आहोंत त्यांचं एकसंध मन तयार झालं पाहिजे. राजकीय, सामाजिक, साहित्यिक सर्वच क्षेत्रांत एकात्मभावनेचा प्रयत्न सर्वांनी करायचा आहे. त्याचबरोबर पुढचीं दहा-पंधरा वर्षं तरी महाराष्ट्रांत औद्योगिक शांतता हवी. संपाची भाषा आपण बंद केली पाहिजे. याचा अर्थ अन्याय, अडचणी मुकाट्यानं सहन कराव्यात असा नव्हे. हक्कासाठी जरूर भांडा; यशवंतरावांशीं भांडा, महाराष्ट्र सरकारशीं भांडा, पण महाराष्ट्राचं राज्य रांगतं आहे तोंवर संपाचं हत्यार वापरतांना महाराष्ट्राचा त्रिवार विचार करा. या राज्याचा कर्णधार असं संबोधून, तुम्ही माझ्याकडून भलत्या अपेक्षा करूं नका. आमचे प्रश्न सुटले नाहीत अशा तक्रारी पावलोपावलीं माझ्याकडे येतील – पण आमच्यापुढे सामान्य जनतेच्या अपेक्षांचं रामायण उभं आहे. त्यांच्या अपेक्षांची पूर्ति करणं हा आपल्या राज्याचा मानबिंदु असेल. म्हणून प्रत्येकानं आपल्या क्षेत्रांत जबाबदारीनं काम केलं पाहिजे.

" महाराष्ट्र राज्याचा उत्सव शिवछत्रपतींच्या जन्मदिवशीं सुरू होत आहे हा एक अपूर्व योगायोग आहे. शिवनेरीच्या माथ्यावर जिजामातोश्री बालशिवाजीला घेऊन उभ्या आहेत. त्यांतलं मर्महि लक्षांत घ्या. जिजामातोश्री शिवनेरीवर आल्या हें या स्थळाचं परम भाग्य. पण त्या आल्या त्या वेळीं त्यांच्या पाठीवर त्यांचेच वडील आणि भाऊ पाठलाग करत घोडदौडीनं येत होते, हा इतिहास आहे. नवमहाराष्ट्राच्या मागे त्याचे मामा आणि आजोबा पाठलाग करत येत आहेत असं होतां कामा नये. सह्याद्रीच्या सान्निध्यांत आज मराठी मन महाराष्ट्राच्या इतिहासानं भरून गेलं आहे. या सर्व जुन्या स्मृतींची पवित्र आठवण करून मी परमेश्वराची प्रार्थना करतों की, देवा, आम्हांला अशी दानत आणि शक्ति दे की, हें महाराष्ट्र राज्य जनतेचं राज्य होईल. तें राज्य लोक-कल्याणाकरिता झटेल आणि भारताच्या नकाशावरील ताऱ्यांत नव्या तेजस्वी ताऱ्याची भर टाकील. "

शिवनेरीवर नवमहाराष्ट्र राज्याचा उत्सव सुरू झाला होता; परंतु महाराष्ट्राच्या साऱ्या तीन कोटि जनतेला या उत्सवाचा प्रत्यक्ष लाभ घेतां येणं शक्य नव्हतं. राज्याच्या सर्व भागांतले लोक प्रातिनिधिक स्वरूपांत आले होते तरीहि ही संख्या कित्येक हजारांवर पोंचली होती. शिवजयंतीचा त्या दिवशींचा उत्सव मात्र महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांत सुरू होता. उत्सवांत लोक दंग झालेले असतांनाच, नव्या महाराष्ट्र राज्याची आणि महाराष्ट्राच्या महत्तमतेची आकाशवाणी त्यांना ऐकायला मिळाली. शिवनेरीवर जे येऊं शकले नव्हते त्यांच्यापर्यंत आपला आवाज, आपल्या भावना पोंचवण्यासाठी यशवंतरावांनी त्या दिवशीं म्हणजे २७ एप्रिललाच आकाशवाणीच्या माध्यमाचा उपयोग करून घेतला होता.

विविधतेनं नटलेलं महाराष्ट्र राज्य पुढच्या तीन दिवसांत आता प्रत्यक्ष अवतरणार होतं. महाराष्ट्राच्या निसर्गाच्या रचनेंत जशी विविधता आहे तशी माणसांत सुद्धा आहे. उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सह्याद्रि यांचीं उत्तुंग शिखरं, त्यांच्या उतरणीवर घनदाट जंगलांनी निर्माण केलेलं हिरवं सौंदर्य, वर्धा-वैनगंगेच्या खोऱ्यांतले जागोजागचे जलाशय आणि मनाला प्रसन्न करणारीं पळसाच्या लाल फुलांनी डंवरलेलीं रानं, पश्चिमसागराचं अथांग दर्शन घडवणारा कोकणचा किनारा, गोदावरीनं समृद्ध व पुनीत केलेली मराठवाड्याची भूमि, तेथील तेजस्वी भूतकाळ आणि संस्कृति, नागपूरच्या परिसरांतील आशिया खंडांत उत्तम ठरलेल्या संत्र्यांच्या बागा, रत्नागिरीकडल्या हापूस आंब्याच्या आमराई, विदर्भ-मराठवाड्याच्या काळ्याभोर जमिनींत फुललेला पांढराशुभ्र कापूस, नगर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा भागांत डोलत असलेले रसदार गोड उसाचे मळे, अशी ही महाराष्ट्राची सुंदर विविधता! यशवंतरावांनी आकाशवाणीवरून या विविधतेचं इतक्या सरतेनं वर्णन केलं की, या विविधतेंत महाराष्ट्रांतल्या जीवनाचं सौंदर्य साठवलेलं असल्याचा त्यांतून पडताळा येत राहिला.

या विविधतेंतहि एकता आहे आणि ती असली पाहिजे असं आवाहन करतांना यशवंतरावांनी सांगितलं, " विविधतेनं जीवनाला जसं सौंदर्य येतं, तसं एकतेंतून जीवनाचं सामर्थ्य प्रतीत होतं. विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम-महाराष्ट्र यांची भाषिक एकता तर आहेच, पण शिवाय लोकांच्या चालीरीति, परंपरा आणि सामाजिक संघटनेचं एकूण स्वरूप हेंहि सारखं आहे.

महाराष्ट्राचा सांस्कृतिक व राजकीय इतिहासच याची साक्ष देतो. प्राचीन काळीं विदर्भ व मराठवाडा हे महाराष्ट्राच्या केंद्रस्थानीं होते. शालिवाहन व चालुक्याची राजधानी मराठवाड्यांतल्या पैठण इथे होती, तर वाकाटक या राजघराण्यानं महाराष्ट्राचा सर्व प्रदेश आपल्या छत्राखाली आणला होता. वाकाटक हे विदर्भाचे राजे होते व त्यांची राजधानी चांद्याजवळ भांदक इथे होती. देवगिरीच्या यादवांच्या काळांत महाराष्ट्राची व मराठी भाषेची विशेष भरभराट झाली. मराठीचे आद्य व श्रेष्ठ कवि मुकुंदराज, ज्ञानेश्वर आणि नामदेव याच काळांत झाले. चक्रधर या महानुभाव-पंथाच्या संस्थापकाचा

एक शिष्य महिंद्र व्यास, यानं सुमारे सातशे वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'लीला-चरित्रां'त महाराष्ट्राचं जें वर्णन केलं आहे तें असं –

साठी पक्ष देश महाराष्ट्र । तेथिचे शिहाणे सुभद्र ।
वेदशास्त्र चातुर्याची पेठू । भरैली तिये देशी ॥

ऐसे ते महाराष्ट्राये सुंदरू । वरी महाराष्ट्रभाषा चतुरू ।
तेहीं वसविले गंगावेरू । क्षेत्र त्र्यंबकूवेन्हीं ॥

पश्चिमे त्र्यंबकूपूर्व सागरवेन्हीं । द्वादशयोजने उभय गंगातीरी ।
ऐसे ते गंगातट महाराष्ट्रीं । वसिजे पुण्यातन ॥

देश म्हणजे खंडमंडळ । जैसे फल्हेठाणापासौनि दक्षिणेसि ।
मऱ्हाठी भाषा जे तुलां ठाइं वर्ते ते एक मंडळ ॥

तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट असे । ऐसे एक खंडमंडळ ।
मग उभय गंगातीर तेहि एक खंडमंडळ । आन तयापासौनि
मेघकर घाट तें एक मंडळ ॥

तयापासौनि आवघे वराड । तेंहि एक मंडळ ।
पर आवघीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे ॥

यापुढच्या काळांत राजकीयदृष्ट्या महाराष्ट्र जरी भंगला, तरी संत-कवींनी महाराष्ट्राची सांस्कृतिक एकता सतत टिकवून ठेवली. संत-कवींच्या कार्याचं हें मर्म आपण ध्यानांत घेतलं पाहिजे. ज्ञानेश्वरापासून तो तुकारामापर्यंत सुमारे चारशे वर्षें संतांनी वारकरी सांप्रदायाच्या द्वारे सामाजिक समतेच्या तत्त्वांचा प्रसार करून सर्व मराठी जनतेचं ऐक्य साधलं. संतांची ही शिकवण महाराष्ट्र कधीहि विसरणार नाही. नव्या महाराष्ट्रांत ही एकता अधिक दृढ केली पाहिजे. महाराष्ट्रांत गेलीं चार-पांच वर्षें राज्य-पुनर्रचनेचा प्रश्न सतत तेवत राहिल्यानं जनतेचं मन विचलित राहिलं; व त्यामुळे विकासकार्याकडे द्यावं तितकं लक्ष जनतेनं दिलं नाही, ही वस्तुस्थिति आहे; परंतु या कार्याची आता हेळसांड होऊं न देतां लोकांनी त्यावर आपलं जास्तींत जास्त लक्ष केंद्रित केलं पाहिजे.

महाराष्ट्र आता एकसंघ होत आहे त्याचं फार मोठं श्रेय विदर्भ व मराठवाड्यांतले नेते व विचारवंत यांनी या दिशेनं केलेल्या प्रयत्नाला आहे, यांत मुळीच शंका नाही. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर हें एकीकरणाचं कार्य संपलं असं मानण्याची चूक कोणी करूं नये.

अनेक अडचणींतून मार्ग काढत असतां महाराष्ट्र राज्याची स्थापना होत आहे. बंधुभावानं आपण एकत्र आलों आहोंत. हा बंधुभाव आपल्याला वाढीस लावायचा आहे. 'पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाल' या कवि विनायकांच्या वचनाप्रमाणे महाराष्ट्राचं भवितव्य उज्ज्वल आहे अशी आपणां सर्वांची श्रद्धा आहे. नव्या भारतांत

आपल्याला नव्या महाराष्ट्राची उभारणी करायची आहे. बुद्धिमान्, प्रामाणिक व कष्टाळू महाराष्ट्र या कामांत मागे पडणार नाही, याबद्दल माझ्या मनांत शंका नाही.

१९५६ सालापासून यशवंतरावांनी साऱ्या महाराष्ट्राचा कोनाकोपरा धुंडाळला होता. हजारो लोकांना भेटून चर्चा, वाटाघाटी केलेल्या होत्या. महाराष्ट्राची जमीन, निसर्ग, इतिहास, संस्कृति, परंपरा, येथील माणसं आणि माती या सर्वांसंबंधी त्यांच्या अंतःकरणांत जिव्हाळा, आपुलकी, प्रेम होतं. भावनेनं भरलेल्या मनानंच ते शिवनेरीवर पोंचले आणि आकाशवाणीवरूनहि बोलले.

शिवजयंतीचा तो दिवस. शिवाजीमहाराजांचं कर्तृत्व, नीति, राजकारण, कारभार, महाराष्ट्राबद्दलची महाराजांच्या मनांतली चिंता, त्यांचं शौर्य, धैर्य, चारित्र्य आणि लोककल्याणाची विधायक दृष्टि यांच्या आठवणींनी महाराष्ट्राचं विचारी मन भरून गेलं होतं. नव्या महाराष्ट्राच्या स्वराज्याची उभारणी करण्यासाठी महाराष्ट्रांतल्या जनतेला महाराजांच्या शासनकार्यांतील विधायक दृष्टीचा, कर्तव्यपरायणतेचा मासला सांगतांना, शिवाजीमहाराजांचे अमात्य रामचंद्र नीलकंठ यांच्या 'आज्ञापत्रां'तल्या एका बहारदार वर्णनाचा उतारा यशवंतरावांनी लोकांना ऐकवला. "तस्करादि अन्यायी यांचें नांव राज्यांत नाहीसें केलें. देशदुर्गादि, सैन्यादि बंद नवेच निर्माण करून एकरूप अव्याहत शासन चालविलें. केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली."

यशवंतरावांनी यासारखे, महाराजांच्या कार्यक्षमतेचे आणि विधायक लोक-कल्याणाची दृष्टि देणारे शब्द उद्धृत केले. त्यामागचा अर्थ, संबंधितांनी, विशेषतः त्यांच्या सरकारांतल्या सहकाऱ्यांनी समजून घ्यावा आणि काळजीकाऱ्यानं चारित्र्याचं जतन त्यांनी करावं असं सांगण्याचाच त्यांचा हेतु असला पाहिजे. महाराष्ट्रहित साध्य करण्यासाठी आपण सर्वांनी दक्ष आणि जागरूक असलं पाहिजे, छत्रपतींचा तो वारसा सांभाळला पाहिजे याचीं आवर्तनं त्यांनी या भाषणांतून केलीं. शिवनेरीवरून परतलेला जनसागर भावनांच्या या लाटा बरोबर घेऊनच गावोगाव पोंचला.

यशवंतरावांचं चित्त आता मुंबईनं वेधून घेतलं, नव-राज्याचा उत्सव शिवनेरीवर त्यांनी सुरू केला. आता मुंबईत पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू नवं राज्य अस्तित्वांत आल्याचं महाराष्ट्राला जाहीर करणार होते. नव्या राज्याच्या उद्घाटनासाठी ते मुद्दाम दिल्लीहून येणार होते. महाराष्ट्राच्या जीवनांतल्या अत्युच्च भाग्याचा, आनंदाचा क्षण आता कांही तासांवर येऊन ठेपला होता. मुंबईतले लक्षावधि लोक त्या आनंद-सागरांत डुंबण्यासाठी आतुर झालेले होते. नव-राज्याच्या उद्घाटनाचा मुहूर्त १ मे १९६० हा होता.

३० एप्रिलच्या रात्रीं १२ वाजून १ मिनिट होतांच मे महिन्याची पहिली तारीख झळकणार असल्यानं उद्घाटनाचा मुहूर्तहि मध्यान्हीचाच निश्चित झालेला होता. हा समारंभ होणार होता मुंबईच्या राजभवनाच्या पटांगणांत. पण तो होता सरकारी समारंभ. जनता-समारंभासाठी स्थान निवडलेलं होतं शिवाजीपार्कचं भव्य मैदान. याच समारंभांत

पं. नेहरूंना महाराष्ट्राचं खरंखुरं दर्शन घडणार होतं, नव-राज्यनिर्मितीच्या भावना पाह्यला मिळणार होत्या.

शिवाजीपार्कवर त्या दिवशीं सर्वत्र आनंदीआनंद पसरला होता. दहा लाखांवर जनसमुदाय शिवाजीपार्कवर लोटला होता. मुंबई शहर सागरानं वेढलेलं असलं, तरी जनसागरानं त्याच्याशीं आज स्पर्धा सुरू केली होती. सर्व जातींचे, धर्मांचे, व्यवसायांचे, गरीब, श्रीमंत, मध्यमवर्गीय, कामगार, उद्योगपति, राजकारणी अशांचा हा दरबार होता. मंगल वाद्यं वाजत होतीं. राष्ट्रीय ध्वज फडफडत होते. सर्वत्र उत्साह आणि आनंद ओसंडला होता.

मुंबईच्या शिवाजीपार्कवरील समारंभ हा जनता-समारंभ होता. नव्या राज्याच्या उद्‌घाटनाचा सरकारी अधिकृत समारंभ हा राजभवनाच्या पटांगणांत मध्यरात्रीं १२ वाजतां झाला. ठीक १२ वाजून १ मिनिटानं पंडितजींनी संयुक्त महाराष्ट्राचं उद्‌घाटन केलं. प्रतीकरूपानं हें उद्‌घाटन झालं.

नव्या महाराष्ट्र राज्याचं, संयुक्त महाराष्ट्राचं प्रतीक – महाराष्ट्राचा नकाशा – तिथे तयार होता. विद्युत्‌दीपांनी चमचमणाऱ्या या नकाशावरील रेशमी आवरण पंडितजींनी स्वहस्तें बाजूला सारतांच उपस्थितांना आणि स्वतः पंडितजींनाहि नवमहाराष्ट्राचं दर्शन घडलं आणि सबंध शामियान्यांत आनंदाच्या लहरी पसरल्या.

राजभवनावरील सारंच वातावरण या वेळीं भावनोत्कटतेनं रोमांचित झालं होतं. समुद्रावरून राजभवनाच्या परिसरांत शिरणाऱ्या वाऱ्याच्या थंड लहरी उपस्थितांना सुखावत होत्या. जगप्रसिद्ध सनईवादक बिसमिल्लाखान यांच्या सनईतून निघणारे मंजुळ स्वर पाहुण्यांचं स्वागत करत होते. महाराष्ट्राचं स्वतंत्र राज्य जन्माला आलं आहे – उठा, जागे व्हा, तयार रहा, असं आवाहन करणारे महाराष्ट्र-गीताचे सूर मागोमाग वातावरणांत पसरले. महाराष्ट्र-कोकिळा लता मंगेशकर यांनी नंतर भूपाळ्या आणि ज्ञानोबारायांचे 'पसायदान' म्हटलं.

कार्यारंभीं आराधना करण्याची परंपरा ही जुनी आहे. परमेश्वराच्या कृपाछत्राखाली आपण सदा असावं हा या आराधनेचा हेतु असतो. महाराष्ट्राचे महान् संत ज्ञानोबाराय यांनी ज्ञानेश्वरी लिहून झाल्यावर समाजाची परिस्थिति, विचार, लोकाचार ह्यांस अनुसरून शेवटीं पसायदान म्हटलं. संयुक्त महाराष्ट्र-निर्मितीचा ग्रंथ आता पुरा झाला होता आणि जनतेच्या हातीं तो आता सुपूर्त होणार होता. राज्यकर्त्यांना या प्रसंगीं ज्ञानोबारायांच्या पसायदानाची आठवण होणं स्वाभाविक होतं. लता मंगेशकर यांची 'पसायदान' म्हणण्यासाठी योजना झालेली होती –

आता विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें।
तोषोनि मज द्यावें। पसायदान हें ॥
जे खळांची व्यंकटी सांडो। तया सत्कर्मीं रति वाढो।
भूतां परस्परें पडो। मैत्र जीवाचें ॥

दुरिताचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जें वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥

लता मंगेशकर यांच्या सुरेल कंठांतून पसायदान स्रवूं लागतांच यशवंतराव तल्लीन होऊन गेले. अंतर्मुख बनून जणू ते उद्याच्या महाराष्ट्राचं चित्रच पहात होते.

ज्ञानदेवांनी आपला ग्रंथ संपवतांना परमेश्वरापाशीं पसायदान म्हणजे हा प्रसाद मागितला – जे वाईट लोक आहेत त्यांची वक्रदृष्टि म्हणजे पापबुद्धि, पापी विचार नाहीसे व्हावे; सत्कृत्यांत त्यांचं मन लागावं, सर्व मनुष्यांत प्रेम वाढावं, जगांतलं अज्ञान नाहीसं व्हावं आणि सदासर्वकाळ ईश्वरभक्तांचा समुदाय, भगवज्जनांच्या मंडळ्या, भूतलावर नांदाव्या.

या समारंभापूर्वी पसायदान म्हणावं ही कल्पना स्फुरली याचं कारण स्पष्ट होतं. दोष पहाण्याची वृत्ति माणसांमध्ये फार असते. कोणा मनुष्य परहिताच्या बुद्धीनं स्वतः त्रास सोसून एखाद्या सत्कार्यास प्रवृत्त होतो. वास्तविक परहितासारखं स्वहित नाही, परहित हेंच खरं स्वहित, याची जाणीव पुन्हा एकदा या शुभ प्रसंगानं, या सत्कार्याच्या वेळीं करून देण्याचा हा प्रयत्न होता. नव्या महाराष्ट्रांत 'जो जें वांछिल तो तें लाहो' अशी स्थिति निर्माण व्हायची तर 'दुरिताचे तिमिर जावो' यासाठी सर्वांनी प्रयत्न करायचे आहेत, यासाठी हें आवाहन होतं.

पसायदान ऐकत असतांना यशवंतरावांच्या नेत्रकडा ओलावल्या. ज्ञानेश्वरां-प्रमाणेच तुकारामबुवांनी –

ऐसे भाग्य कई लाहाता होईन ।
अवघे देखे जन ब्रह्मरूप ॥

असा आशीर्वाद देवापाशीं मागितला होता. तुकारामबुवांच्या अभंगाच्या या ओळी त्या वेळीं यशवंतरावांच्या मनानं गुणगुणल्या असाव्यात.

पं. नेहरू या समारंभास आलेले होते. महाराष्ट्राच्या लाख-लाख जनतेच्यातर्फे त्यांचे आभार मानतांना पसायदानाची प्रार्थना यशवंतरावांनी बोलकी केली. पंडितजींना उद्देशून त्यांनी सांगितलं, "आमच्या जुन्या परंपरांना अनुलक्षून 'दुरिताचे तिमिर जावो' हें वरदान मी मागत आहे. जें अमंगल असेल त्याचा अंधकार दुनियेंतून नाहीसा होवो व सत्याचा विजय होवो, हें तत्त्वज्ञान आणि हे आशीर्वाद महाराष्ट्राला संतांकडून मिळाले आहेत. समानतेचं तत्त्व त्यांनी आम्हांला शिकवलं आहे आणि अन्यायाचा प्रतिकार करायलाहि त्यांनीच शिकवलं आहे.

"देशावर प्रेम करावं आणि स्वराज्य आपला मंत्र मानावा, हा संदेश आम्हांला आमच्या नेत्यांनी दिला आहे. या संदेशाच्या पार्श्वभूमीवर म. गांधींचं कर्तृत्व आणि म. गांधींचं व्यक्तिमत्त्व यांतून आपणां सर्वांना मिळालेला दिव्य संदेश महाराष्ट्र कधीहि विसरणार नाही याची ग्वाही या परम मंगल प्रसंगीं मी आपणांस देऊं इच्छितों.

"महाराष्ट्राचं हें जें राज्य निर्माण झालं तें मराठी जनतेच्या कल्याणाचं काम तर करीलच, परंतु मराठीभाषकांच्याजवळ जें देण्यासारखं आहे, त्यांच्या जीवनामध्ये जें चांगलं आहे, जें उदात्त आहे, त्याचा त्याग जर करायचा असेल, तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करूं. कारण आमचा हा पहिल्यापासून विश्वास आहे की, भारत राहिला तर महाराष्ट्र राहील. भारत मोठा झाला, तर महाराष्ट्र मोठा होईल. भारताचं आणि महाराष्ट्राचं हित जेव्हा एकरूप होतं तेव्हा भारतहि मोठा होतो आणि महाराष्ट्रहि मोठा होतो, हा इतिहास महाराष्ट्राच्या रक्तारक्तांतून भिनलेला आहे.

"भारताचं प्रतीक उंच-उंच शिखरं असलेला बर्फाच्छादित हिमालय आहे, तर दोन-दोनशे, तीन-तीनशे इंच पावसाचा मारा आपल्या डोक्यावर घेणारा काळ्या फत्तराचा सह्याद्रि महाराष्ट्राचं प्रतीक आहे; आणि जर कधी भारताच्या हिमालयावर संकट आलंच तर आपल्या काळ्या फत्तराची छाती हिमालयाच्या रक्षणाकरिता सह्याद्रि उभी करील, असं मी आपणांला आश्वासन देतों."

यशवंतरावांच्या अंतःकरणांतून स्वयंस्फूर्तीनं, नैसर्गिकरीत्या हे शब्द त्या दिवशीं बाहेर पडले खरे, परंतु यशवंतराव हे द्रष्टे पुरुष आहेत असं त्या वाणीनंच पुढे सिद्ध केलं. महाराष्ट्र अस्तित्वांत आल्यानंतर पुढच्या दोनच वर्षांत त्यांना स्वतःलाच हिमालयाच्या संरक्षणाकरिता दिल्लीला धांव घ्यावी लागली. पं. नेहरूंना त्यांच्या हयातींतच यशवंतरावांच्या द्रष्टेपणाचा हा अनुभव आला.

ज्ञानेश्वरांच्या पसायदानानं यशवंतरावांना अंतर्मुख केलं होतं. एका वेगळ्याच क्षितिजाकडे त्यांच्या मनानं झेप घेतली होती. मनाच्या त्याच अवस्थेंत उत्स्फूर्तपणें ते बोलत राहिले. पंडितजींनी आपल्या भाषणांत परिश्रमाच्या घामानं महाराष्ट्र आणि राष्ट्र रक्षण्याचा संदेश दिला होता. पंडितजींनी ज्या क्षणाला हा संदेश दिला त्याच्या पूर्वी तीस वर्षांपासून यशवंतराव, महाराष्ट्रांत परिश्रमाच्या युगधर्माचं यथाशक्ति पालन करत राहिलेले असल्यानं पंडितजींचा तो शब्दरूप संदेश त्यांच्या अंतःकरणाशीं त्या वेळीं भिडला आणि त्यांतूनच महाराष्ट्राच्या वतीनं राष्ट्र-रक्षणासाठी हाक येतांच धांव घेण्याचं आश्वासन त्यांच्या मुखांतून बाहेर पडलं. नवोदित महाराष्ट्र वाढत राहो, त्याचं तेज वाढत राहो, आणि हें तेज भारताच्या आणि मानवाच्या कल्याणासाठी खर्ची पडो अशी प्रार्थना त्याच मनाच्या अवस्थेंत त्यांनी केली. अदृश्य परमेश्वरी शक्तीनं परिसर भारून टाकावा असा अनुभव त्या दिवशीं राजभवनाच्या परिसरांत आला. सर्वत्र उत्साह, आनंद, समाधान निर्माण झालेलं असतांनाच पं. नेहरूंनी नव्या राज्याला आशीर्वाद दिला.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीमध्ये कॉंग्रेसच्या अध्यक्ष इंदिरा गांधी यांचा सिंहाचा वांटा होता. राजभवनामधील समारंभाला त्याहि स्वतः उपस्थित होत्या. त्या वेळीं श्रीप्रकाश हे राज्यपाल होते. राष्ट्रपतींचा शुभेच्छा-संदेश त्यांनीच वाचून दाखवला. इंदिरा गांधींनी महाराष्ट्र राज्य हें सर्व दृष्टींनी महान् ठरेल अशा सदिच्छा व्यक्त केल्या.

राज्याच्या आणि देशाच्या हितासाठी नवं राज्य झटेल आणि राष्ट्र-संरक्षणाच्या कार्यातला आपला वांटा उचलील अशी अपेक्षा व्यक्त करून पं नेहरूंनी आशीर्वाद दिला.

या समारंभाचे यजमान यशवंतराव चव्हाण हे होते. पंतप्रधानांचे आभार त्यांनीच मानायचे होते. आभार मानण्याचा ढंग ठरलेला असतो, शब्दहि ठरलेले असतात; परंतु यशवंतरावांची त्या दिवशींची, त्या क्षणाची मनःस्थिति कांही वेगळीच होती. आभाराचे शब्द त्यांच्या मुखांतून बाहेर पडत होते हें खरं, पण सह्याद्रीच्या शक्तीनं हे शब्द उच्चारण्यासाठी त्या दिवशीं यशवंतरावांच्या माध्यमाचा उपयोग केलेला असावा. कारण त्यांच्या मुखांतून त्या क्षणाला बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दांतून सामर्थ्य प्रतीत होत राहिलं, भविष्यवाणी प्रगट झाली. पुढच्या काळांत ही वाणी संपूर्ण सत्य ठरली, असं इतिहास सांगतो.

आभारप्रदर्शन करतांना पाहुण्यांवर स्तुतिसुमनं उधळण्याची प्रथा प्रसंगानुरूप ठरलेली असते. यशवंतरावांनी पंडितजींच्या भल्या मनाची आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची स्तुति तर केलीच, शिवाय भविष्यवाणीहि ते बोलून गेले. त्या नेमक्या वेळीं ते विचार, ते शब्द कसे स्फुरले, ते शब्द कुठून आले, ते नंतरच्या काळांतहि त्यांना कधीच सांगतां आलेलं नाही. घडलं तें उत्स्फूर्त, बोलले तेंहि उत्स्फूर्त !

सोनियाचा दिवस महाराष्ट्राच्या जीवनांत आज उगवला होता. मध्यरात्रीं पंतप्रधानांच्या हस्तें नवराज्याचं उद्‌घाटन झालं, एकभाषी महाराष्ट्र व त्याचं सरकार अस्तित्वांत आलं.

आणि पंडितजींना लगेच त्याचं दर्शनहि घडलं. मुंबईतला, नव्या राज्याच्या उद्‌घाटनाचा सोहळा संपवून परदेशाच्या यात्रेचं प्रस्थान पंडितजींनी ठेवलेलं होतं. परदेश-यात्रेला निघतांनाच, आकाशांतून पंडितजींना नव्या महाराष्ट्राचं दर्शन घडावं अशी व्यवस्था यशवंतरावांनी केलेली होती. सागरांत लॉंचेसची रचना अशी करण्यांत आली होती की, त्या लॉंचेसमधील दिवट्यांच्या आकारांतून संयुक्त महाराष्ट्राच्या नकाशाचं दर्शन घडावं. पंडितजी रात्री १ वाजतां विमानानं परदेशी जाण्यासाठी निघाले ते नव्या महाराष्ट्राचं दर्शन घेऊनच ! आशीर्वाद त्यांनी अगोदरच दिला होता. नव्या गुजरात राज्याचं उद्‌घाटन पं. रविशंकरमहाराज यांनी केलं. जिवराज मेहता हे गुजरातचे मुख्य मंत्री बनले. 'घनःश्याम सुंदरा' या अमरभूपाळीच्या सुरानं महाराष्ट्र दि. १ मे रोजीं सकाळीं जागा झाला तेव्हा मराठी मन मोहरून गेलं होतं. याच सोनियाच्या दिवशीं यशवंतराव चव्हाण संयुक्त महाराष्ट्राचे मुख्य मंत्री झाल्याचं महाराष्ट्राला ज्ञात झालं. चार वर्षांच्या अवधींत मुख्यमंत्रिपदाची तीन वेळां शपथ घेऊन न्यायाचं व समतेचं राज्य करीन अशी मराठी मनासमोर प्रतिज्ञा करणारे भारतांतले हे पहिलेच मुख्य मंत्री असावेत ! योगायोग अपूर्व खरा !

त्या दिवशीं, १ मे १९६० ला दुपारीं सचिवालयांत नव्या मंत्रिमंडळाचा शपथ-विधि झाला. १२ वाजून ३१ मिनिटांनी यशवंतरावांनीं नव्या राज्याचे मुख्य मंत्री म्हणून

शपथ घेतली. द्वैभाषिकाच्या मंत्रिमंडळांतले गुजराती मंत्री आता गुजरात राज्याचे मंत्री झालेले होते. त्यामुळे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाची त्यांना पुनर्रचना करावी लागली. यशवंतराव हे द्वैभाषिकाचे मुख्य मंत्री होते. नव्या राज्याचे मुख्य मंत्री म्हणूनहि त्यांचीच निवड करण्यांत आली.

शपथविधि-समारंभाच्या वेळीं, यशवंतरावांनी या दिवसाचा उल्लेख ज्ञानेश्वरांना साक्ष ठेवून ' सोनियाचा दिवस ' असा केला. मुख्य मंत्र्यांनी या वेळीं नव्या राज्याला कोणकोणतीं कामं करावीं लागणार आहेत याचा विस्तृत आढावा घेतला आणि हीं सर्व कामं करण्यासाठी मानसिक व इतर दृष्टया कोणती तयारी केली पाहिजे याची उजळणी केली. महाराष्ट्रानं आता एका नव्या कालखंडांत प्रवेश केलेला असल्यामुळे आपल्या आशा व आकांक्षा यांची पूर्तता करून घेण्याचा क्षण आता आला आहे अशी जनतेची स्वाभाविक भावना होती. या संदर्भात, जनतेच्या अपेक्षापूर्तीचा क्षण जवळ आणणं हा महाराष्ट्र राज्याचा मानबिंदु आहे असंच यशवंतरावांनी या वेळीं सांगितलं. शपथविधीच्या या समारंभांत लोकांच्या भावनाच त्यांनी स्वतः बोलून दाखवल्या आणि सहकाऱ्यांचं लक्ष महाराष्ट्रासमोरील प्रचंड कामाकडे वेधलं.

राज्याच्या उद्घाटनाच्या पहिल्या दिवसापासून महाराष्ट्रापुढील आर्थिक व सामाजिक प्रश्नांची उकल करण्याची तयारी आणि त्याची आखणी केलेली असल्याचं त्यांच्या या भाषणांतून ध्वनित झालं. महाराष्ट्रांतील लोकांनी त्यांचा धर्म, जात अगर पक्ष कोणता का असेना, आपण सर्व एकच बांधव आहोंत असं मानलं पाहिजे, असं आवाहन करतांना त्यांनी नवा महाराष्ट्रीय हा केवळ मराठी भाषा बोलणारा नव्हे, तर जो महाराष्ट्रांत रहातो व आपल्या शक्त्यनुसार त्याचं जीवन समृद्ध करतो, असा प्रत्येक माणूस हा महाराष्ट्रीय होय, अशी महाराष्ट्रीय माणसाची व्याख्या नव्यानं सांगितली.

बदलत्या कालमानास सुसंवादी अशी शासनयंत्रणा निर्माण करण्याचं काम यशवंतरावांनी अगोदरच्या काळांत सुरू केलेलंच होतं. समाजवादी पद्धतीचं नियोजन करण्यास ही शासनयंत्रणा मिळती-जुळती राहिली पाहिजे या दृष्टिकोनांतूनच या यंत्रणेची पुनर्रचना कशी केलेली आहे याचा पुनरुच्चार त्यांनी या प्रसंगीं केला. विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि दुष्काळी भाग यांच्या विकासाकडे विशेष लक्ष द्यावं लागणार होतं. या भागाच्या विकासाकडे राज्य-सरकार डोळ्यांत तेल घालून लक्ष देईल आणि त्यांच्या हितसंबंधांची जपणूक केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. सरकारचं धोरण म्हणून त्यांनी जें घोषित केलं त्यावरून मुख्य मंत्र्यांचा राज्याविषयीचा विशाल दृष्टिकोन स्पष्ट झाला.

शिक्षण, शेती, उद्योगधंदे यांबाबत सरकारनं केलेल्या निर्णयांची माहिती दिल्यानंतर यशवंतरावांनी स्वतःच एका प्रतिज्ञेचा उल्लेख केला आणि महाराष्ट्रांतल्या प्रत्येकानं प्रतिज्ञाबद्ध होण्याचं आवाहन केलं. संत ज्ञानेश्वर, छत्रपति शिवाजीमहाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि लो. टिळक या महाराष्ट्राच्या प्रातिनिधिक प्रतीकांनी महाराष्ट्राच्या

संस्कृतीची जोपासना केली आणि तिचा वारसा आपल्या हातीं दिला. हा वारसा, हा अमोल ठेवा, हृदयांत जपून ठेवणं व त्याचा निकाल करणं प्रत्येक मराठी माणसाचं आद्य कर्तव्य ठरतं. मराठीभाषी राज्य स्थापन होत असतांना, देशाची भरभराट करण्याला व त्याची कीर्ति दिगंत पसरवण्याला आपलं शक्तिसर्वस्व देऊं, अशी प्रत्येकानं प्रतिज्ञा केली पाहिजे. महाराष्ट्राची व देशाची सेवा करण्याचं व्रत आपण घेऊं या आणि आपलं ध्येय गाठण्यासाठी शक्ति व बुद्धि दे, अशी परमेश्वराजवळ प्रार्थना करूं या, अशी ही प्रतिज्ञा होती.

नव-राज्यनिर्मितीचा उत्सव संपला. नवं मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलं. कामाची दिशा ठरली. त्यासाठी प्रतिज्ञा झाल्या. व्रतस्थ रहाण्याचंहि ठरलं. राज्याची स्थापना हें साध्य नसून साधन आहे आणि आधुनिक ज्ञानविज्ञानावर अधिष्ठित असा शेती व उद्योगप्रधान समाज स्थापन करणं हें राज्याचं ध्येय असल्याचंहि सांगितलं गेलं. अधिकांचं अधिक हित साध्य करायचं आणि संधि-समानता निर्माण करायची, तर दारिद्र्यामुळे बुद्धि व कर्तृत्व वाया जाऊं नये यासाठी लोकांना आता प्रत्यक्ष कामाला लावण्याची गरज होती. शेती व औद्योगीकरण त्यांतूनच वाढणार होतं.

परंतु या गोष्टी भाषणानं आणि आवाहनानं केवळ साध्य होणाऱ्या नाहीत, याची यशवंतरावांना जाणीव होती. झोपलेला, कर्तव्यविन्मुख झालेला समाज प्रत्यक्ष कामासाठी उभा करायचा, तर नव्या राज्याच्या नव्या विचारांचं सूत्र, प्रत्येकाच्या मनापर्यंत पोंचवण्याची आवश्यकता होती. या गरजेंतूनच मग यशवंतरावांचा महाराष्ट्र-संचार सुरू झाला.

महाराष्ट्र राज्याचा जगन्नाथाचा रथ चालवण्यासाठी सर्वांच्या सहकार्याचा हात लागावा, जीवनाच्या सर्व क्षेत्रांत महाराष्ट्रीय तरुणांनी आघाडीवर असावं, यासाठी महाराष्ट्राच्या मनोभूमीची मशागत करून कर्तृत्वाचं भरघोस पीक काढावं यासाठी त्यांचा हा प्रयत्न होता. देशांतील अधिक प्रगति झालेल्या विभागांच्या बरोबर अविकसित भागांना आणणं व संपूर्ण प्रदेशाचा समतोल विकास साध्य करणं असं महाराष्ट्र राज्याचं धोरण त्यांनी ठरवलं.

राज्याची राजधानी ही औद्योगिकदृष्ट्या पुढारलेली असली, तरी तिच्यालगतचं फार मोठं क्षेत्र अविकसित अवस्थेंत वर्षानुवर्षे राहिलेलं होतं. राज्याच्या एकूण क्षेत्राची परिस्थिति विरोधाभासाची अशी होती. हा विरोधाभास बदलून टाकायचा, तर यासाठी सर्वंकष प्रयत्नांची जरुरी होती. त्या दृष्टीनं राज्य स्थापन होण्याच्या वेळेपासूनच राज्याच्या औद्योगीकरणावर भर देण्यांत आला होता. शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यासाठी, तें क्षेत्र सरकारी मदतीनं खुलं करण्यांत आलं होतं. त्यावरील निर्बंध कमी करण्यांत आले होते. शिक्षण घेतल्यावर मराठी तरुणांनी दुसऱ्याचे उद्योग व कारखाने चालवण्यांत बुद्धि-शक्ति खर्च करण्याऐवजीं स्वतः उद्योगधंद्यांत पडावं आणि स्वतःचे कारखाने चालवावेत यासाठी शिक्षणाचीं दारं त्यांना खुलीं करून देण्यांत आलीं होतीं.

यशवंतराव हें सर्व सांगत राहिले होते. केवळ व्यापाराचा मार्ग न चोखाळतां मराठी माणसांनी मोठ्या उद्योगधंद्यांत प्रवेश करावा असा त्यांचा सल्ला होता. राज्याचं उद्‌घाटन झाल्याच्या पुढच्याच आठवड्यांत मुंबईत 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम' आणि साधना साप्ताहिकातर्फे एक परिसंवाद झाला. या परिसंवादांत मार्गदर्शन करतांना मुख्य मंत्र्यांनी, महाराष्ट्रांतील अपेक्षित भव्य उद्योग-मंदिराची कल्पना बोलून दाखवतांना, हें मंदिर उभारण्यासाठी सरकारकडून मार्गदर्शन, मदत आणि उत्तेजन हवं असेल, अशा सर्व प्रश्नांच्या संबंधित बाजूकडे विचारवंतांनी लक्ष द्यावं आणि सरकारचं लक्ष वेधावं, असं आवाहन केलं. सबंध मानवी समाजाचं कल्याण करण्याचं अंतिम ध्येय गाठण्यासाठी आर्थिक विकास हें, तें ध्येय साध्य करण्याचं एक साधन असल्यामुळे, सामाजिक समस्यांच्या संदर्भांत आर्थिक समस्यांची पहाणी करणं आवश्यक आहे, असं यशवंतरावांचं मत होतं.

देशाच्या अर्थव्यवस्थेंत शेतीबरोबरच कारखानदारीच्या उद्योगधंद्याचं स्थानहि महत्त्वाचं आहे, असं मराठी मनावर बिंबवण्याचा प्रयत्न त्यांनी या काळांत केला. 'शेती की उद्योगधंदे' असा विरोधी द्वंद्व-समास नसून या दोन्हींची सांगड घातली पाहिजे, शेतींतून कच्च्या मालाचं भरपूर उत्पादन करणं, आणि या कच्च्या मालाचं पक्क्या मालांत रूपांतर करणारे उद्योगधंदे सुरू करणं हा विचार त्यांनी समाजाच्या तळापर्यंत पोंचवला. शेती हा ग्रामीण विकासाचा गाभा असल्यामुळे या गाभ्याभोवतीं छोट्या उद्योगधंद्यांची इमारत उभारणं, शेतीला उद्योगधंद्यांची जोड दिल्यानंतर या कार्यक्रमाला गति आणण्यासाठी ग्रामीण विद्युतीकरणाला प्राधान्य देणं, असं या विकास-कार्यक्रमाचं वेळापत्रकहि त्यांनी तयार केलं.

नवं राज्य अस्तित्वांत आल्याच्या दिवसापासून महाराष्ट्राशीं संबंधित विविध विषयांवरील परिसंवाद, शिक्षण, शेती, उद्योग, सहकार, बँका, छोटे उद्योगधंदे, विद्यापीठांचे समारंभ, निरनिराळ्या जातिजमातींच्या परिषदा, विविध पक्षांच्या सर्वपक्षीय सभा, वसंत व्याख्यानमाला, काँग्रेस-पक्षाच्या सभा, शिबिरं, मेळावे, जाहीर सभा, महिला सभा, सांस्कृतिक संमेलनं, नाट्यसंमेलनं, साहित्य-संमेलनं, पत्रकारांच्या शिक्षण-संस्था, सत्कार, संस्थांचीं, शाळांचीं, महाविद्यालयांचीं उद्‌घाटनं व त्यांचे विविध समारंभ अशा, राज्यांतल्या सर्व प्रकारच्या समारंभांतून त्यांचा अव्याहत संचार मग सुरू राहिला.

महाराष्ट्रांतल्या सर्वच क्षेत्रांतील लोकांना नव्या राज्याच्या स्थापनेनंतर विधायक विचार करण्यास व मुत्सद्देगिरी प्रदर्शित करण्यास फार मोठी संधि आणि आव्हान मिळालं आहे, असं विविध विषयांच्या संदर्भांत ते समाजाला पटवत होते. पंचवार्षिक योजनेसाठी करायच्या खर्चाचीं आर्थिक लक्ष्यं सरकारनं गाठलीं तरी प्रत्यक्ष कामाचीं लक्ष्यं गाठण्याबाबत त्या काळांत जनतेची मानसिक तयारी करण्याची गरज होती. यशवंतरावांनी आपल्या दौऱ्यांचा त्यासाठी उपयोग करून घेतला.

सामूहिक विकास-योजना सुरू होत्या, या योजना पूर्ण होण्यासाठी सरकार प्राथमिक गरजांची परिपूर्तीहि करत होतं; परंतु केवळ या सोयी उपलब्ध करून देण्यामुळे योजना शंभर टक्के पूर्ण होत नाहीत असं अनुभवास आलं होतं. या योजनांचा मूळ हेतु लोकांमध्ये विशिष्ट प्रकारची प्रवृत्ति आणि स्वावलंबनाची दृष्टि निर्माण करणं हा असल्यानं तो हेतु सफल होण्यासाठी लोकांचीं मनं तयार करण्याचं मूलभूत कामहि त्यांनी या दौऱ्यांच्या द्वारे साध्य केलं. कुठे ते आर्थिक लोकशाहीचा अर्थ समजावून सांगूं लागले, तर कुठे शेती, सहकार आणि छोटे उद्योगधंदे यांचं महत्त्व प्रतिपादन करूं लागले. बँकेंतलीं, आर्थिक क्षेत्रांतलीं पराक्रमी माणसं राज्याच्या पाठीशीं आहेत तोंपर्यंत त्यांच्या पाठीशीं शासनाच्या वतीनं उभं रहाण्याचं आश्वासन ते निःसंशयपणें देत राहिले.

आर्थिक विकासाचा प्रश्न हा अपक्ष असून, व्यापारी बँकांनीहि सामाजिक उद्दिष्ट समोर ठेवूनच आर्थिक व्यवहाराचं क्षेत्र वाढवण्याची गरज होती. कुठल्या तरी पक्षाला आपलीं मनं वाहिलेलीं माणसं समाजांत सात ते दहा टक्के असतात आणि नव्वद टक्के माणसं हीं अपक्षच असतात. या नव्वद टक्के माणसांना जो काबूत ठेवतो तो पक्ष-प्रमुख ठरतो, असं यशवंतराव हे आपला अनुभव म्हणून सांगत होते, आणि त्या संदर्भातच आर्थिक विकासाची यात्रा ही अपक्ष-यात्रा आहे, असा त्यांचा दावा होता.

राजकारण आणि अर्थकारण यांना कांही तरी एक निश्चित प्रकारचं उद्दिष्ट असावंच लागतं. तसं तें नसेल, तर राजकारण आणि अर्थकारण काम करूं शकत नाही. असं असलं तरी, आर्थिक विकासाच्या प्रयत्नाच्या पाठीमागे कुठली तरी दृष्टि रहाते. पण याला फारसं महत्त्व नाही. चुकीनं कित्येकदा पक्ष-दृष्टि येऊं शकते; परंतु तिला पक्ष-दृष्टि म्हणायचं काय, हा प्रश्न आहे. तिला पक्ष-दृष्टि म्हटलं जाऊं नये असा कांही तज्ज्ञांचा अभिप्राय आहे. यशवंतरावांना तो मान्य असल्याचं दिसतं. म्हणूनच बँकेचं उद्दिष्ट हें खाजगी सावकाराप्रमाणे कांही तरी व्यवहार करायचा एवढंच उद्दिष्ट नव्या परिस्थितींत राहिलेलं नसून कांही नवीन आर्थिक उद्दिष्टंहि बँकांच्या पुढे निर्माण झालीं आहेत असं ते आग्रहानं प्रतिपादन करूं लागले.

मुख्य मंत्री झाल्यापासून 'महाराष्ट्र राज्याचा पहिल्या नंबरचा चाकर' या दृष्टीनं ते मुख्यमंत्रिपदाचा विचार करत असावेत असं आढळतं. कॉंग्रेस-पक्षाचे ते नेते होते, परंतु समाजाची पक्षीय दृष्टीनं विभागणी करूं नये हा विचार राजकीय कार्यकर्त्यांनी प्रामुख्यानं अंगीं बाणवावा यावर त्यांनी भर दिला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीचं काम करायचं तर वादंगापेक्षा ऐक्याचाच पुरस्कार झाला पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. पक्ष असायला त्यांची हरकत नव्हती. मतभेदास थारा मिळूं नये असाहि त्यांचा आग्रह नव्हता; परंतु पक्षांना तात्त्विक बैठक असावी, कल्याण ही अंतिम कसोटी मानण्यांत यावी आणि कसोटी मानून निश्चय पक्का झाला की तो लोकांपुढे निर्भयपणें मांडावा, अशी त्यांची शिकवण होती.

यशवंतराव गोड बोलत, पण सत्य बोलत. सत्य कठोर वाटलं तरी हरकत नाही. जनतेला माणूस पटला, त्याचा विचार पटला, कर्तृत्व उमगलं की जनता आपला राग विसरून जाते असे स्वानुभवाचे त्यांचे बोल होते. कार्यकर्त्यांना हे बोल ते ऐकवत असत. सत्य बोलून समाजाचं भंगलेलं मन सांधण्याची, एकता साध्य करण्याची त्यांची तळमळ होती. मनुष्यबळ ही महाराष्ट्राची सर्वांत मोठी साधनसंपत्ति. या साधनाचा सांधा नियोजनाशीं जुळवला जावा आणि त्याद्वारे महाराष्ट्राचं विकासाचं नवं चित्र निर्माण व्हावं यासाठी त्यांचा हा सारा खटाटोप सुरू होता.

यशवंतरावांना बहुजन-समाजाचे नेते संबोधून महाराष्ट्रांतले कांही उच्चभ्रू खांदे उडवत असत. बहुजन-समाज म्हणून एक विशिष्ट समाजाचा वर्ग या मंडळींच्या मनांत घर करून राहिलेला असे. यशवंतरावांनी एका प्रसंगीं याचीहि दखल घेतली आणि बहुजन-समाज म्हणजे नेमका कोणता समाज, हें बहुजन-समाजाला आणि या तथाकथित उच्चभ्रूंनाहि ऐकवलं. 'ज्यांचीं सुखदुःखं समान आहेत तो बहुजन-समाज' अशी यशवंतरावांनी बहुजन-समाजाची सुटसुटीत व्याख्या केली.

बहुजन-समाज या शब्दाबद्दल यशवंतरावांना मनापासून कधीच प्रेम वाटलं नाही. पण महाराष्ट्राच्या भूगोलाप्रमाणे महाराष्ट्राच्या समाज-जीवनांतहि उंचसखलपणा निर्माण होऊं नये याची त्यांना काळजी होती. महाराष्ट्राच्या समाज-जीवनांतले सर्व थर शहाणे व्हावेत आणि 'अज्ञान' हा शब्द महाराष्ट्राच्या कोशांतून नाहीसा करणं हेंच त्यांनी आपलं सर्वांत मोठं काम मानलं; समाजाला त्यासाठी त्यांनी आवाहन केलं. खेड्यांतल्या माणसांनी कोणाच्या मार्गदर्शनाची वाट पाहूं नये, किंबहुना अशा मार्गदर्शनाची आवश्यकताच रहातां उपयोगी नाही असं वातावरण निर्माण करावं, असं त्यांचं आवाहन असे.

व्यक्ति-पूजा व एकाच माणसाचं नेतृत्व या गोष्टी महाराष्ट्रांत असाव्यात, या कल्पनेच्या ते विरुद्ध होते. निश्चित अशा कार्यक्रमावर आधारलेलं सामुदायिक नेतृत्व त्यांना मान्य होतं. त्या दृष्टीनं शेती, सहकार, उद्योग, शिक्षण आदि विविध क्षेत्रांत सामुदायिक नेतृत्व निर्माण होण्यासाठी त्यांनी प्रोत्साहन दिलं. राजकीय क्षेत्रांतहि नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या जिद्दीच्या कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणांत संधि मिळवून दिल्यानं, महाराष्ट्रांत नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची एक नवी पिढी त्यांतून जन्माला आली.

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या वेळीं आणि त्याहीपूर्वी, महाराष्ट्रांत शेतकरी-कामकरी पक्षाची स्थापना झाल्यानंतर काँग्रेसमधले अनेक तरुण कार्यकर्ते काँग्रेसविरोधी गोटांत गेले होते. हा सगळा विरोधी ओघ काँग्रेसकडे पुन्हा आकर्षित करण्याचं श्रेय यशवंतरावांच्या नेतृत्वालाच द्यावं लागेल. यशवंतरावांचं नवं नेतृत्व पुरोगामी दृष्टिकोनांतून, संपूर्ण महाराष्ट्राचं जीवन बदलून टाकण्याच्या दृष्टीनं निर्णय करत आहे आणि प्रत्यक्षांत धोरणाची अंमलबजावणी केली जात आहे असं दिसतांच, नागरी आणि विशेषतः ग्रामीण भागांतल्या कार्यकर्त्यांमध्ये काँग्रेस-प्रवेशाची जणू चढाओढ सुरू झाली.

समाजसेवेसाठी विचारवंत, महिला, साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ आणि विविध क्षेत्रांत कार्य करणारे कार्यकर्ते या सर्वांनाच महाराष्ट्राचा जगन्नाथाचा रथ पुढे नेण्यासाठी हातभार लावण्याचं त्यांचं आवाहन होतं. ज्ञानी, बुद्धिवान्, विद्वान् यांनी कोणाच्याहि आमंत्रणाची वाट न पाहतां स्वयंस्फूर्तीनं पुढे येऊन आपली ज्ञानगंगा साऱ्या समाजापुढे खुली करावी, ज्ञानी माणसाच्या सेवेची शासनाला गरज आहे यासाठी आवाहन तर त्यांनी केलंच, शिवाय शासनाची भूमिकाहि स्पष्ट केली.

समाजानं आणि शासनानंहि विद्वानांची कदर केली पाहिजे हा दृष्टिकोन मान्य करून ते सांगतात की, "शासन अशी कदर करत नसेल, तर तें शासन पुरोगामी म्हणतां येणार नाही. शासनाकडून जेवढं सहकार्य मिळेल तितकं कार्य करूं अशी कांही विद्वानांची भूमिका असते; परंतु त्यांनी अशी अट न घालतां, ज्ञानाच्या उपासकानं कोणत्याहि शासनाच्या मेहरबानीवर जगतां कामा नये; कदर होत नाही म्हणून बाजूला न रहातां आग्रहानं ते पुढे आले तरच ते खरे ज्ञानवंत, असं मानलं जाईल. सामाजिक परिवर्तन हें ज्ञानी विद्वानांच्या विचारमंथनांतूनच होत असल्यामुळे ज्ञानासाठी ज्ञानाची उपासना करणारांची एक प्रचंड आघाडी महाराष्ट्रांत निर्माण झाली पाहिजे."

नव्यानं निर्माण झालेल्या एकसंधी महाराष्ट्रामागे महाराष्ट्राचं एकजिनसी मत उभं करण्यासाठी, भावनात्मक ऐक्याचा नाजूक प्रश्न स्त्रियांच्या नाजूक हातांनी लवकर सुटूं शकेल, असं त्यांनी एका महिला-सभेंत आपलं मत सांगितलं. राजकारणाच्या आवारांत निर्माण झालेले मतभेद कोर्टाच्या आवारापेक्षा घरांतल्या दिवाणखान्यांत अधिक सुकरतेनं सुटूं शकतील, परंतु यासाठी महिला कार्यकर्त्यांनी अनौपचारिकरीत्या एकत्र येऊन हें काम करायला हवं; सामाजिक मत एकत्र करण्याच्या पुरुष मंडळींच्या प्रयत्नाला स्त्रियांचा हातभार लागण्यानंच तें यशस्वी होईल, असं महिलावर्गाला समजून सांगण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

तमाम जनतेशीं हा संवाद करत असतांना, ते ज्या पक्षाचे मुख्य मंत्री होते त्या कॉंग्रेस-पक्षांतल्या कार्यकर्त्यांना, या काळांत त्यांनी कामासाठी चांगलंच वेठीला धरलं. पक्षाच्या जाहीर सभांपेक्षांहि शिबिराचा उपयोग त्यांनी कार्यकर्त्यांची मानसिक तयारी घडवण्यासाठी प्रामुख्यानं करून घेतला. सत्ता स्थिर होत आहे असं जेव्हा आढळतं तेव्हा सत्ताधाऱ्यांच्या सभोवतीं सकारण वा अकारण घोटाळणाऱ्या, गर्दी करणाऱ्या कार्यकर्त्यांचे संच गावोगावीं तयार होऊं लागतात. पुढारी, मंत्री यांच्या आगमनाच्या वेळीं गर्दी करून आपला चेहरा दाखवणं हेंच पक्षाचं कार्य, अशी त्यांची सोयिस्कर समजूत झालेली असते. राजकीय गुजराण करण्यासाठी कार्यकर्त्यांना तेवढं भांडवल हवं असतं.

हा दोष सर्वस्वीं कार्यकर्त्यांचाच असतो असं नाही, कांही मंत्र्यांनाहि ही गर्दी जमवण्याची चटक लागलेली असते. कांही आढ्यतेखोर मंत्री तर लोकप्रियतेचा देखावा निर्माण करण्यासाठी आपल्या आगमनाच्या वेळीं कार्यकर्त्यांची जास्तींत जास्त गर्दी उभी

करून त्यांच्याकडून पुष्पहारांची उधळण करून घेण्यासाठी खटपटी, लटपटी करण्यांत गुंतलेले असतात. स्वागतासाठी शाळकरी मुलांना वापरून घेण्याचा कांहींचा हव्यास असतो. त्या गावांतले जुने, जाणते, प्रतिष्ठित समजले जाणारे पुढारीहि स्वागताला उपस्थित असले पाहिजेत, असाहि कांहींचा कटाक्ष असतो. आपल्यांतलाच कालचा एक कार्यकर्ता, नशिबानं आज मंत्री बनला म्हणून हारतुरे घेऊन गावच्या वेशीवर त्यांच्यासाठी ताटकळत उभं रहाणं हें जुन्यांच्या मनाला वस्तुतः खटकत असतं. त्यामुळे ते फक्त समारंभाच्या ठिकाणींच उपस्थित रहातात; परंतु स्वागताच्या वेळीं न आल्याबद्दल रागावलेले मंत्री, अशा जुन्या कार्यकर्त्यांची दखल तर घेत नाहीतच, पण पोरासोरांशीं गप्पा करत या जुन्या जाणत्यांवर मधून मधून रागानं दृष्टिक्षेप टाकत रहातात.

अशा प्रकारांना मग, कार्यकर्त्यांच्या शिबिरांत तोंड फुटत असे. पंचवीस-तीस वर्षे काम करत राहिलेल्या या जुन्या कार्यकर्त्यांची यशवंतरावांकडे तक्रार दाखल होई की, कालपरवाच्या कार्यकर्त्यांना तुम्ही मंत्री बनण्याची संधि दिलीत याबद्दल आमची तक्रार नाही; परंतु त्यांच्या गावांतल्या आगमन-प्रसंगीं, अन्य सर्व कामं सोडून, पुष्पहार हातांत घेऊन तासन् तास वेशीवर जाऊन आम्ही उभं रहावं हा काय प्रकार आहे! आणि आम्ही स्वागताला गेलों नाही म्हणून मंत्री आमच्यावर डोळे काढतात! हें आम्ही चालू देणार नाही. आम्हांला याविरुद्ध पवित्रा घ्यावा लागेल!

अनुत्पादक कामासाठी कार्यकर्त्यांनी – मग ते जुने असोत वा नवे असोत – आपला वेळ फुकट दवडणं यशवंतरावांनाहि खटकत असे. शिबिरांत अशी कुणी तक्रार केली की ते मग दिलासा देत असत की, "ठीक आहे, असा फुकट वेळ दवडला जाऊं नये यासाठी, खांद्यावर झेंडा घेऊन तुम्ही निघालांत तर मी तुमच्या पाठीशीं येईन."

जनतेचीं निकडीचीं गाऱ्हाणीं कार्यकर्त्यांनी समजून घ्यावींत, सरकारला सांगावींत, जनतेची खरी निकड आणि शासनाची रास्त अडचण, असा प्रश्न निर्माण झाल्यास शासनाची अडचण जनतेला सांगावी, जनता व सरकार यांच्यांत एकात्मता निर्माण करावी, असं कार्यकर्त्यांना त्यांचं सांगणं असे. कार्यकर्त्यांनी शेती, सहकारी चळवळ, शिक्षण अशीं खातेंवांटप करून घेतलीं, तर त्यांत काम करण्यास त्यांना भरपूर वाव आहे. कार्यकर्त्यांनी मंत्र्यांची स्तुतिस्तोत्रं गाण्याचं कारण नाही. भरीव कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांकडे सरकार आपण होऊन जाईल! यशवंतरावांच्या मुखांतून असा सल्ला बाहेर पडतांच कार्यकर्त्यांकडूनहि त्यांना उत्स्फूर्त दाद मिळत असे.

एकात्मतेचं प्रतीक असलेल्या त्रिमूर्तीप्रमाणे महाराष्ट्राचं जीवन एकजिनसी बनवणं आणि समाज व राज्य यांचा समन्वय साधणं हें कार्य जें नेतृत्व साधील तेंच महाराष्ट्राचं मंगल करील व तें स्थिर होईल, हा सिद्धान्त यशवंतरावांनी त्या काळांत निरनिराळ्या शिबिरांत सांगितला.

संसदीय क्षेत्रांतील साधनसामग्रीचा वापर करून पक्षाचं ध्येय गाठण्याच्या दृष्टीनं वाटचाल ही करावीच लागते; परंतु संघटनात्मक कार्याला अनेक मर्यादा असतात.

मात्र संसदीय शाखेला जें कार्य पार पाडणं अशक्य आहे तें पार पाडण्यासाठी संघटनात्मक शाखेंतल्या कार्यकर्त्यांनी जरूर प्रयत्न करावेत, असं सांगून कार्यकर्त्यांच्या मनांतला गोंधळ त्यांना साफ करावा लागे.

सारं सरकारनं करावं असा एक सर्वसामान्य दृष्टिकोन मूळ धरून असतो. सरकार जें करील तें आपल्या खातीं जमा करणं कार्यकर्त्यांना सोपं ठरत असतं. सत्ताधारी पक्षांतल्या कार्यकर्त्यांचीच केवळ नव्हे, तर 'हें सरकारनं केलं पाहिजे' अशी सातत्यानं मागणी करत राहून विरोधी पक्षांनाहि जगायचं असतं. याबाबतची यशवंतरावांची दृष्टि मात्र साफ होती. विकासाचं काम सरकारला तर करायचं आहेच, पण त्यामध्ये समाजाची, कार्यकर्त्यांचीहि बरोबरीनं भागीदारी असली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. त्यांच्या पक्षांतले जे कोणी सत्तेच्या मागे असत त्यांना त्यांचं असं निक्षून सांगणं होतं की, पक्षाच्या संघटनेंतल्या लोकांनी पक्षाच्या कार्यक्रमांत भागीदारी घेतली म्हणजे आपोआप सत्तेची भागीदारी चालून येते. कार्यकर्त्यांनी डोळसपणें कार्य करावं. आंधळं असूं नये. आंधळा दुनियेंत हिंडूं शकेल, पण आंधळ्याच्या मागे दुनिया जाऊं शकणार नाही, असा त्यांचा कार्यकर्त्यांना व्यवहारी सल्ला होता.

आर्थिक आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा विडा उचलून, क्रांतिकारक पावलं टाकीत यशवंतरावांची भ्रमंती सर्वत्र सुरू राहिली. महाराष्ट्राचं मन प्रफुल्लित झालं होतं. यशवंतरावांचे विचार ऐकून मराठी माणसं जेव्हा जोरानं कामाला लागलीं त्या वेळीं 'लक्ष-लक्ष शून्यांतून कांही श्रेय साकारत आहे' असं वर्णन करण्यासाठी कवींनीहि आपली प्रतिभा खुली केली. यशवंतरावांच्या वाणीनं आणि प्रत्यक्ष कृतीनं महाराष्ट्राला आकार मिळवून देण्याची प्रेरणा व चेतना सर्वत्र निर्माण झाली होती. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळांत महाराष्ट्रांत प्रथमच हें घडलं, ही वस्तुस्थिति होय.

यशवंतरावांचं स्वतःचं जीवन एकारलेलं नसल्यानं आणि त्यांना अनेक विषयांत रस असल्यानं कोणत्याहि मेळाव्यांत ते जावोत, महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा एकजुटीचा, प्रेमाचा, विधायक वृत्तीचा आणि कर्तृत्वाचा संदेश देणं त्यांना सहजगत्या शक्य झालं. शिवछत्रपतींचं पुण्यस्मरण असो, टिळक पुण्यतिथि असो, महाकवि रवींद्रनाथ टागोर यांचा जन्मशताब्दी-महोत्सव असो, किंवा डॉ. आंबेडकरांच्या विचारपरंपरेचा वारसा सांगण्याचा प्रसंग असो, राष्ट्रीय ऐक्याच्या संदर्भांत महाराष्ट्राचा विकास या सूत्राचा पाठपुरावा त्यांनी सातत्यानं केला.

निरनिराळ्या सभांतून, मेळाव्यांतून उत्कट भावनेंतून यशवंतराव जेव्हा बोलत असत त्या वेळीं विद्वानांचीहि त्यांना दाद मिळे. कांही फाजील घमेंडखोर पुस्तकी बुद्धिवादी याला अपवाद असले तर असूं शकतील, इतकंच! नाही तरी सर्वच बुद्धिवादी मनानं मोठे असतात असं नव्हे. त्यांच्या बुद्धीची वाढ झालेली असली, तरी मन क्षुद्रच राहिलेलं असतं. दुसऱ्याचं कर्तृत्व, बुद्धि याचा मोठेपणा मान्य करायचा, तर त्याला स्वतःचं मनहि मोठं असावं लागतं, बनवावं लागतं. मन आणि बुद्धि या दोन्ही ठिकाणीं

विशालता येणं हें देणं ईश्वराचं! यशवंतरावांसारख्या एखाद्यालाच तें मिळून जातं. अशी देणगी मिळालेली व्यक्तीच समाजांतील सर्व थरांबद्दल मानव्याच्या दृष्टिकोनांतून विचार करूं शकते, कृति करूं शकते.

राज्याच्या तिजोरीचा आणि साधनसामग्रीचा उपयोग करतांना कोणत्या कामांना अग्रक्रम द्यायचा यावर अविकसित राज्याच्या सरकार-प्रमुखानं आणि प्रशासकांनी बारकाईनं लक्ष ठेवणं जरूर असतं. साधनसामग्री ही मर्यादित असूं शकते. आर्थिक भार सहन करण्याची तिजोरीची मर्यादाहि ठरलेली असते. अशा वेळीं महत्त्वाच्या प्रश्नांना अग्रक्रम देण्यांत दुर्लक्ष झालं, तर समतोल विकास साध्य करणं कठीण ठरतं. अविकसित राज्यांत दारिद्र्य हें सर्वदूर पसरलेलं असल्यामुळे सरकारला कराच्या रूपानं पैसा उभा करणं हें मोठंच जिकिरीचं ठरतं. राज्याच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनांचे आराखडे तयार होत असतांना नियोजन-विभागाशीं मंत्री आणि नंतर मुख्य मंत्री या नात्यानं यशवंतरावांचा निकटचा संबंध होता. कोणत्या कामांना अग्रक्रम मिळावा यासाठी प्रारंभापासूनच वस्तुनिष्ठ दृष्टिकोन स्वीकारून अग्रक्रमाच्या बाबतींत ते दक्ष होते. शक्तीचा अपव्यय होऊं नये याची काळजी त्यांनी सातत्यानं बाळगली.

राज्यांत जीं साधनं असतील त्या साधनांचा जास्तींत जास्त विकास करून महाराष्ट्र-जीवनाला समृद्ध बनवणं हें त्यांनी आपल्या नियोजनाचं प्रमुख सूत्र तर ठरवलंच, त्याच-बरोबर या प्रयत्नांतून निर्माण होणारी संपत्ति, शक्ति, सामर्थ्य याचा फायदा सर्वसामान्य माणसाला मिळावा यावरहि त्यांचा कटाक्ष राहिला. महाराष्ट्राच्या दृष्टीनं जमीन, शेती आणि मनुष्यबळ हीच यशवंतरावांच्या मतानं प्रमुख साधनसंपत्ति असल्यानं या साधनाचा जास्तींत जास्त उपयोग महाराष्ट्राच्या विकासासाठी करणं यावरच त्या काळांत त्यांना भर द्यावा लागणार होता.

खेड्यापाड्यांत पसरलेल्या आणि जमीनजुमल्याच्या आश्रयानं जीवन कंठणाऱ्या महाराष्ट्रांत शेतीच्या बाबतींत जमिनीची शक्ति मर्यादित आणि पाणीहि मर्यादित. आतापर्यंत या मर्यादित शक्तीचाहि पुरेपूर उपयोग करण्यांत आलेला नव्हता. ही परिस्थिति बदलायची तर त्यासाठी पांच, दहा, पंधरा वर्षे सतत झगडावं लागणार होतं. शेतींत काम करणाऱ्या खेड्यांपाड्यांतल्या माणसांना वर्षांतले तीन-चार महिने शेतींत काम केल्यानंतर घरीं बसून रहाण्याशिवाय गत्यंतर नसतं. त्याला उपयोगी पडेल असं काम मिळण्याची परिस्थिति निर्माण करावी याकडे महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी आजवर आवश्यक तें लक्ष दिलेलं नसल्यामुळे, श्रमासाठी तयार असलेल्या या शक्तीची प्रतिष्ठा वाढली नव्हती.

यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत, सर्वप्रथम मनुष्यबळ जागं होण्यासाठी शिक्षणाची गंगा त्यांच्यापर्यंत पोंचवली. मनुष्यबळाचा नापीक अवस्थेत राहिलेला हा साधनसंपत्तीचा भाग सुपीक करायचा, त्यांच्यांत नवं सामर्थ्य निर्माण करायचं तर शिक्षणाचं चैतन्य त्यांच्यांत निर्माण करणं जरूरच होतं. शेतीचा विकास करण्यासाठी खेड्यांत बिजली

पोंचण्याची जेवढी नितान्त गरज असते तेवढीच किंबहुना अधिक गरज शिक्षणाची विजली पोंचवण्याची मानावी लागते. यशवंतरावांच्या दृष्टिकोनांत हा नेमकेपणा आढळतो.

जमिनीच्या आणि पाण्याच्या मर्यादेच्या पार्श्वभूमीवरच त्यांनी शेतीचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला. कूळकायदा, कमाल जमीन-धारणा कायदा, यांसारखे कायदे झाल्यानं शेतकऱ्यांत नवचैतन्य निर्माण झालेलंच होतं. प्रश्न होता शेतीच्या विकासाचा. शेकडो वर्षे हा प्रश्न अनिर्णीत स्वरूपांतच पडून राहिला असल्यामुळे त्याकडे आवर्जून लक्ष देणं क्रमप्राप्तच होतं. पाण्याची शक्ति मर्यादित असल्यानं, पावसाचं पडणारं पाणी वाहून न जातां जमिनींत साठून राहील आणि मुरेल यासाठी मग त्यांनी, भू-संरक्षणाची, बंडिंगची उपाययोजना कार्यवाहींत आणण्याचा उपाय काढला.

महाराष्ट्रांत त्या वेळीं साडेतीन कोटि एकर जमीनीची अवस्था एखाद्या गळक्या भांड्यासारखी होती. पाणी पडायचं आणि वाहून जायचं! जमीन कोरडी ती कोरडीच!

शेतीच्या आधुनिकीकरणाचा प्रश्नहि असाच आ वासून उभा होता. केवळ शेतीची जमीन वाढवल्यानं आणि पडीक जमीन भूमिहीनांना वांटून त्यांत लागवड करत राहिल्यानं धान्योत्पादनाचा प्रश्न सुटेल हा सिद्धान्त यशवंतरावांना मान्य नव्हता. शेतीच्या आधुनिकीकरणांत राज्यानं प्रगति साध्य करणं हेंच त्यांना अभिप्रेत होतं. आधुनिक पद्धतीनं शेती विकसित करायची तर त्यासाठी धरणं, पाट-बंधारे हा कार्यक्रम हातीं घ्यावा लागणार होता. तसा तो त्यांनी सुरू केला.

महाराष्ट्रांत नद्यांची संख्या पुष्कळ, पण आकारानं त्या लहान. पावसाळ्यांत जें पाणी साठेल त्यावर सात-आठ महिने जमिनीची भूक भागेल अशी भौगोलिक स्थिति. परंतु ही भूक भागवण्यासाठी धरण-योजना तयार होऊं लागतांच, धरणाची जागा बदला म्हणून मागण्या आणि आंदोलनं सुरू होऊं लागलीं. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या बाबतींत लोकांचीं मनं विचलित होणार नाहीत, त्यांच्या मनांत संशय निर्माण होणार नाही असं वातावरण निर्माण करा, अशी मुख्य मंत्र्यांची हाक होती; परंतु विरोधाकरितां विरोध हेंच ज्यांचं राजकारण, ती मंडळी ही सर्वांगीण विकासाची व यासाठी सहकार्य करण्याची हाक ऐकण्याच्या मनःस्थितींत नव्हती. तशी ती मंडळी एरवीहि नसतात. समृद्धीला बांध घालूनच असंतोषासाठी रान मोकळं करतां येतं. अन्यथा राजसंन्यासाची पाळी येते. त्यामुळे या धैर्यधरांना मानापमान नाटकाची तालीम सतत सुरू ठेवणं भाग पडतं. अशीं नाटकं सुरू होतीं. सत्तेची भामिनी मात्र विरोधकां-पासून यामुळे दूर दूर जात राहिली.

आडवे येणारे बांध ओलांडून यशवंतरावांना पलीकडे जाणं आवश्यकच होतं. थांबण्यास आणि स्वतःला व महाराष्ट्राला संपवण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्रिपदाची धुरा खचितच स्वीकारलेली नव्हती. त्यांची अडथळ्याच्या शर्यतींतील धांव सुरूच राहिली. महाराष्ट्राला शेतीसंपन्न करण्यासाठी धरणाच्या योजना तर त्यांनी पुढे रेटल्याच, शिवाय शेतीच्या धंद्याला उद्योगाची जोड मिळावी यासाठी कृषि-उद्योग निर्माण

करण्याची योजना तयार केली. खेडं आणि शहर, खेडं आणि नगर यांमधील कृत्रिम अंतर दूर करणं हा या योजनेचा हेतु असल्याचं ते सांगू लागले.

कृषि-उद्योग या शब्दाचा अर्थ काळाच्या ओघाबरोबर बदलत जाणारा असला, तरी त्याचा मूळ गाभा हा कायमच रहाणार आहे. महाराष्ट्राच्या खेड्यांतील सारा समाज शेतीच्या मूलभूत उद्योगावर जगणार असल्यानं यांतूनच भूमिहीनांच्या प्रश्नांसारख्या अनेक सामाजिक कटकटी आणि तणाव निर्माण होत रहातात. त्या काळांत तर हे तणाव वाढले होते. हा तणाव कमी करायचा तर शेती न करणारा खेड्यांतला जो वर्ग, त्याला शहरामध्ये नेणं आणि काम उपलब्ध करून देणं हाच उपाय ठरतो. नागरीकरण हें यांतूनच वाढत रहातं.

यशवंतरावांची मात्र यासाठी वेगळी योजना होती. ती अशी की, खेड्यामध्ये निवळ शेतीवर आधारलेला जो समाज आहे त्याच्यासाठी कृषि-उद्योग काढण्याचा प्रयत्न झाला तर खेडं हें खेडं रहाणार नाही. परंतु शेतीमधून निर्माण होणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्यांच्यावर औद्योगिक प्रक्रिया करणं म्हणजे कृषि-उद्योग समाज नव्हे.

उत्पादनाचं नवीन तंत्र आणि नवीन विज्ञान निर्माण करणारीं साधनं शेतकऱ्यापर्यंत पोंचणं याला त्यांच्या या योजनेंत महत्त्वाचं स्थान होतं.

शेती हा उद्योग असल्यानं त्यांत या साधनांचा उपयोग तर झालाच पाहिजे, शिवाय त्यांच्या मदतीनं दुसरे धंदे काढतां आले पाहिजेत, मागोमाग खेड्यांत वीज गेली पाहिजे अशी त्यांची कृषि-उद्योगप्रधान अर्थरचनेमागची विचारसरणी होती. आर्थिक विकासाचं सूत्र या सर्व विषयांत गोवलं गेलेलं असल्यानं या सर्वच प्रश्नांचा साकल्यानं विचार करून मार्ग काढण्यासाठी सर्व जनतेला आणि विशेषतः पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी त्यासाठी आवाहन केलं.

महाराष्ट्रांतील जनतेला अंतर्मुख बनवण्यासाठी नागपूरपासून सावंतवाडीपर्यंत महाराष्ट्राच्या सर्व भागांत यशवंतरावांचा संचार सुरू असतांना त्यांचा 'झिंदाबाद' होत होता, तसंच त्यांना 'मुर्दाबाद'हि ऐकावं लागत होतं. सर्वांच्याच मनांतलीं कोळिष्टकं अजून साफ झालेलीं नव्हतीं. यशवंतराव हें सर्व पोटांत साठवत राहिले. मोठमोठे किमती पुष्पहार ज्यांनी घातले त्यांच्याहि ते आधीन झाले नाहीत आणि कुणी मुर्दाबाद म्हणत आहेत म्हणून अस्वस्थ बनले नाहीत. मुर्दाबाद म्हणण्यासाठी का होईना, कांही लोक आपली निवड करत आहेत आणि आठवणीनं मुर्दाबाद म्हणत आहेत याबद्दलहि त्यांच्या मनांत एक प्रकारचं समाधान असावं.

मुख्यमंत्रिपदाची, नेतृत्वाची वाट आजवर रखरखत्या निखाऱ्यावरूनच ते चालत आलेले होते. ज्यांनी पूर्वी मुर्दाबाद ऐकवलं त्यांनीच त्यांना हा विजय मिळवून दिला होता; धिमे राहून त्यांनी मिळवला होता. मराठी भाषेचं राज्य यशस्वी करण्यासाठी, मराठी माणसाच्या मनांत जे ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम आहेत, मनांत मराठी माउली

आहे, शिवाजी, लोकमान्य, म. गांधी यांनी दिलेल्या प्रेरणा आहेत त्या सर्वांना जागे करण्यासाठी स्वतःचं रक्त ते आटवत होते.

स्वतंत्र विदर्भाचा प्रश्न पुन्हा निर्माण करून कांही नागपूरकर मंडळी दंगली माजवत होते. खोटेनाटे आरोप, असभ्य टीका करत होते. यशवंतरावांना मराठ्यांचं राज्य निर्माण करायचं आहे अशा कंड्या उठवण्यांत समाधान मानत होते. यशवंत-रावांनी या संदर्भांत एकदा या मंडळींना खुद्द नागपूरच्या भूमीवर उभं राहून चांगलंच खडसावलं.

नागपूरच्या मंडळींनी थाट घालून यशवंतरावांचा सत्तेचाळिसावा वाढदिवस १२ मार्च १९६१ ला नागपुरांत साजरा केला. सांगलीला त्यापूर्वी वसंतरावदादा पाटील यांनी मोठ्या प्रमाणांत वाढदिवस साजरा केला होता; परंतु तेव्हापासून वाढदिवसाच्या जाहीर समारंभापासून अलिप्त रहाण्याचा निर्णय त्यांनी केला होता. वैयक्तिक सत्कारांत मी फसूं इच्छित नाही असं त्यांनी सांगितलं होतं; परंतु नागपूरकर मित्रांच्या प्रेमामध्ये ते फसले आणि नागपूरला गेले. तो सत्कार स्वीकारतांना प्रेमामुळे फसून चूक करत असल्याचं त्यांनी जागरूकपणानं जाहीररीत्या सांगितलं.

नागपूरच्या या सत्काराच्या भाषणांत त्यांनी आपलं मन मोकळं केलं. स्वतःच्या जीवनाकडे तिऱ्हाईत दृष्टीनं पहाण्याचा प्रयत्न करून जीवनाच्या निरनिराळ्या काल-खंडांत जें घडलं, ज्या प्रेरणा मिळाल्या, ज्यांच्यापासून मिळाल्या आणि त्यांतून काय शिक्षण मिळालं तें सर्व या भाषणांत त्यांनी सांगितलं. नागपूरमध्ये त्या दिवशीं थोडी गडबड झाली होती. त्या गडबडीचाहि उल्लेख केला आणि छोट्या छोट्या घोषणांनी छोट्या छोट्या आग्रहाला बळी पडून, मोठीं माणसं चुकीच्या मार्गानं जातात की काय, याविषयी चिंताहि व्यक्त केली.

कुणाच्या तरी कानांत कांही तरी कुजबूज करून दूषित वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांत कांही मंडळी गुंतलेली असत. या सर्वांना यशवंतरावांनी आव्हान दिलं की, ज्यांना कोणाला बोलायचं असेल त्यानं मैदानांत येऊन बोलावं.

स्वतः मैदानांत उभं राहूनच त्यांनी सांगितलं की, "महाराष्ट्र राज्याच्या मुख्य-मंत्रिपदाची जिम्मेदारी मीं घेतली आहे ती महाराष्ट्र राज्य फोडण्याकरिता नसून तें चालवण्यासाठी घेतलेली आहे. गंगेच्या ओघासारखं मराठी जीवन आता जें एक झालेलं आहे तें कुणाच्या मेहरबानीनं, कुणा चार व्यापाऱ्यांच्या कृतीनं किंवा कुणाची तरी लहर आली म्हणून चाललेलं, असं हें जीवन नाही. नवीन सामर्थ्य निर्माण करण्याकरिता तें प्रयत्नशील आहे. गंगेचा हा ओघ पुढेपुढे जाईल. हें जीवन बंद करण्याची शक्ति अशा अपवित्र गोष्टींनी निर्माण होऊं शकणार नाही. छोट्या गटबाजीला घाबरून किंवा निवडणुकींत काय घडणार आहे हें पाहून काम करणारा माणूस मी नव्हे. मार्ग स्पष्ट आहे. राज्य यशस्वी करायचं आहे. मराठ्यांचं राज्य निर्माण करायचं आहे अशी कुजबूज जे करत आहेत त्यांना नागपूरच्या भूमीवरूनच सांगतों की, ज्या दिवशीं एका

जमातीचं, निवळ एका गटाचं राज्य निर्माण करण्याचा प्रयत्न झाला असं सिद्ध होईल, त्या दिवशीं महाराष्ट्राच्या जनतेसमोर स्वतःची जाहीर चौकशी करून जनता देईल ती शिक्षा पत्करीन, हें व्रत घेऊनच या राज्याची जिम्मेदारी मी पत्करली आहे."

आत्मविश्वासानं यशवंतराव हें सर्व सांगत राहिले. प्रत्यक्ष आचरत राहिले. दिवस पुढे सरकत होते. हां हां म्हणतां राज्यानं पहिलं वर्ष मागे टाकलं. राज्याच्या जीवनांत एक वर्षाचा काळ हा मोठा म्हणतां येणार नसला, तरी या एका वर्षाच्या काळांत, राज्यानं सुरुवातीला दिलेलीं आश्वासनं, अभिवचनं यांची पूर्तता करण्याच्या दिशेनं जे कसोशीनं प्रयत्न केले आणि वैचारिक क्रांति घडवून आणली त्याचं मोजमाप काळाच्या फूटपट्टीनं करण्यापलीकडचं होतं.

या एका वर्षाच्या कालावधीचा आढावा घेतला, तर राज्याच्या सर्वांगीण प्रगतीला केवढा जबरदस्त वेग प्राप्त झालेला होता याचं दर्शन घडूं शकतं. नव्या जीवनाचा नाद मला ऐकूं येत आहे असा कवि कुसुमाग्रजांनी महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या वेळीं काव्यमय आशावाद व्यक्त केला होता. एका वर्षाच्या काळांतच राज्याच्या ग्रामीण जीवनांतून नव्या जीवनाचे प्रतिनाद ऐकूं येऊं लागले होते. राज्य आणि जनता समृद्धीसाठी एक-जीव होत असल्याचीं सुचिन्हं उमटूं लागलीं होतीं.

प्रादेशिक व आर्थिक विषमता दूर करून राज्याची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभी करण्याचं कार्य प्रचंड वेगानं सुरू होतं. खनिज संपत्ति, मनुष्यबळ आणि नैसर्गिक साधनसामग्री यांची समृद्ध देणगी मिळालेल्या कोकण भागाच्या विकासाचे आराखडे नव्यानं तयार झाले होते. शिक्षण, दळणवळण, पाणीपुरवठा इत्यादि बाबतींत मराठ-वाड्याच्या खास गरजांची दखल घेतली गेली होती.

विदर्भांतील विणकर-समाजाची आजवर उपेक्षा झाली होती. या समाजाची स्थिति सुधारण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून विणकरांची एक सूतकताईची सहकारी गिरणी नागपूर इथे सुरू करण्याच्या ५० लाख रुपये खर्चाच्या योजनेला चालना देण्यांत आली होती. लोकांची भाषा ही राज्यकारभाराची भाषा व्हावी यासाठी आवश्यक ती पार्श्वभूमि निर्माण करण्यासाठी भाषा-विभाग नव्यानं जन्माला आला होता. औद्योगी-करण, जमीन-सुधारणा, जलसंपत्तीचा उपयोग, शिक्षणप्रसार आणि सुधारणा, जमीन-धारणा, दलितांचे प्रश्न, लोकशाही विकेंद्रीकरण इत्यादि क्षेत्रांत भराभर क्रांतिकारक पावलं टाकण्यांत आलीं होतीं.

राज्याच्या पहिल्या वर्षाबरोबरच देशाचं नियोजनाचं पहिलं दशक संपणार होतं. देश नियोजनाच्या दुसऱ्या दशकांत आणि महाराष्ट्र राज्य दुसऱ्या वर्षांत आता प्रवेश करणार होतं. गेल्या वर्षभराचा प्रशासकीय कारभार यशवंतरावांनी मोठ्या जिद्दीनं केला. कारभार स्वच्छ आणि वक्तशीर रहाण्यासाठी ज्या गोष्टी करण्याची आवश्यकता असते त्याबाबत यशवंतरावांची भूमिका तडजोडीची कधीच राहिली नाही. प्रशासकीय कारभाराच्या बाबतींत ते मोरारजींचे अनुयायी समजले जात; परंतु यशवंतरावांनी

प्रशासकीय कारभारांत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला होता. प्रशासनांत त्यांनी उत्साहाचं, विश्वासाचं वातावरण तर निर्माण केलंच, शिवाय त्याला व्यवहारी आणि मानवतेचा एक नवा दृष्टिकोन प्राप्त करून दिला. लोकशाही राज्यकारभाराच्या संदर्भात, महाराष्ट्रांतील या पूर्वीच्या राज्यकारभाराच्या पार्श्वभूमीवर यशवंतरावांचं हें कार्य विशेष उठून दिसूं लागलं.

राज्याच्या पहिल्या वर्षाच्या वाटचालींतच यशवंतरावांच्या कर्तृत्वाची प्रतिमा देखणं रूप धारण करून जनतेसमोर उभी राहिली. यशवंतराव हे चिंतनशील आहेत, अनुभवशील आहेत, त्यांच्या भाषणांत साहित्यिक गुण आणि विचारधन हीं दोन्ही आढळतात आणि ते संयमानं व विवेकानं बोलतात असं प्रशस्तिपत्र म. म. दत्तो वामन पोतदार यांनी पुण्याच्या एका सभेंत दिलं. महाराष्ट्रांतल्या लहानमोठ्या कार्यक्रमांना उपस्थित राहून ते विचारधन उधळत होते; परंतु अजून संकटं संपलेलीं नव्हतीं. शेती, उद्योग, सहकार, शिक्षण, कृषि-उद्योग आदि कार्यक्रमांत ते व्यग्र असतांनाच संपूर्ण राज्याला हादरा देणारी एक दुर्दैवी घटना पुण्यांत घडली.

१२ जुलै १९६१ हा तो दिवस. पानशेत धरण आणि मागोमाग खडकवासला धरण कोसळलं आणि त्या प्रचंड पुराचा तडाखा पुणें शहराला बसून शहर धुवून निघालं. या पुरानं शेकडो घरं, घरांतली मालमत्ता धुऊन नेली आणि हजारो लोक अक्षरशः गृहहीन, निर्वासित बनले. अनेकजण प्राणास मुकले. पुणें शहरावर अस्मानी-सुलतानी कोसळली आणि संपूर्ण राज्यासमोर या संकटानं एक मोठं प्रश्नचिन्ह उभं केलं.

मुंबईला सचिवालयांत पानशेत-पुराचं वृत्त समजतांच यशवंतराव तातडीनं पुण्याला पोंचण्यासाठी विमानानं निघाले. मुख्य मंत्र्यांचं विमान पुण्याला पोंचलं आणि शहरावर घिरट्या घालूं लागलं तेव्हा हृदयाचा थरकाप करून सोडणारं पुणें शहराचं दृश्य दिसूं लागलं. डोळ्यांतल्या अश्रूंना आवर घालतच तें दृश्य पहावं लागणार होतं. शेकडो घरं पाण्यांत बुडालीं होतीं. पाण्याचा प्रचंड लोंढा, आडवे येईल त्याला पोटांत घेऊन सुसाट धांवत होता. हजारो लोक गच्चीवर, झाडावर, पर्वतीच्या टेकडीवर उभे राहून पुराचं रौद्र स्वरूप पहात होते. ज्यांचं सर्वस्व गेलं ते आक्रोश करत होते. सर्वत्र घबराट, अस्वस्थता निर्माण झालेली दिसत होती. विमान आकाशांत फिरत राहिलं होतं. विमान जमिनीवर उतरवून, लोकांचं सांत्वन करण्यासाठी, त्यांना मदतीचा हात देण्यासाठी शहरांत पोंचायचं तर पुराच्या पाण्याखाली सर्व रस्ते बुडालेले होते. नदीवरील पूल उखडले गेले होते. विजेचे खांब आणि तारा तुटून वाहून गेल्यामुळे सर्वत्र अंधाराचं साम्राज्य पसरलेलं होतं. लोकांना रहायला घर नाही, प्यायला पाणी नाही, उजेडासाठी वीज नाही, सर्वत्र घबराट आणि गोंधळ असंच सारं वातावरण निर्माण झालं होतं. १२ जुलैचा सबंध दिवस आणि रात्र अशाच अनिश्चिततेच्या आणि गोंधळाच्या अवस्थेंत गेलीं.

या पुरानं केवढं रौद्र स्वरूप धारण केलं होतं तें, पुरामुळे झालेल्या हानीची जी सरकारी अधिकृत आकडेवारी नंतर जाहीर झाली त्यावरून लक्षांत येतं. अर्थात् झालेल्या

हानीचा तो सरकारी अंदाज होता. प्रत्यक्षांत, यापेक्षा अधिक हानि झाली असण्याचीहि शक्यता नाकारतां येणारी नव्हती. लोकांमध्ये तशी कुजबूजहि होती.

पुरामुळे गृहहीन झालेल्या नागरिकांना आश्रयासाठी जागा उपलब्ध करून त्यांच्यासाठी अन्न, पाणी, कपडे, औषधं इत्यादींची तातडीनं व्यवस्था करणं अगत्याचं होतं. पुराचं पाणी ओसरल्यानंतर शहरांत प्रवेश करण्यासाठी मुळा नदीवरील येरवडा भागांतला, बंडगार्डन शेजारचा होळकर पूल हा एकच शिल्लक राहिलेला होता. याच पुलावरून यशवंतराव आणि त्यांच्या समवेत असलेली सरकारी अधिकारी मंडळी यांनी शहरांत प्रवेश केला.

यशवंतरावांनी परिस्थितीचा अंदाज घेतला आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे २० लक्ष रुपये सोपवून तातडीनं मदतकार्य सुरू करण्याचा आदेश दिला. सरकारच्या वतीनं मदतकार्यासाठी म्हणून एक सल्लागार समिति स. गो. बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यांत आली. मदतकार्याची पद्धतशीर आखणी करून प्रत्येक गरजू माणसापर्यंत मदत पोंचेल अशा पद्धतीनं एकूण मदतकार्याची रचना करण्याबाबत आवश्यक त्या सूचना दिल्या.

गृहहीन झालेल्यांसाठी तात्पुरती आणि कायम स्वरूपाची अशी रहाण्याची दुहेरी व्यवस्था करावी लागणार होती. हा प्रश्न सोडवण्यासाठी सैनिकी अधिकारी, मुलकी अधिकारी, सामाजिक संस्था आणि कार्यकर्ते यांच्या सहकार्यानं एक योजना तयार करण्यांत आली. शहरांतल्या नागरिकांसाठी पाणीपुरवठ्याची पर्यायी योजना करणं अगत्याचं होतं. त्यासाठी मग मुळशी धरणांतलं पाणी टाटांकडून उपलब्ध करण्यासाठी धांवपळ सुरू झाली. एक-दोन दिवसांतच ८५ टक्के नागरिकांना प्रत्यक्षांत तें उपलब्धहि करून दिलं गेलं. महापालिका वरिष्ठ अधिकाऱ्यांना या वेळीं या कामाचा जास्तींत जास्त बोजा सहन करावा लागला.

पुराच्या दुसऱ्या दिवशीं पूरग्रस्त भागांत हिंडून यशवंतरावांनी स्वतः शहराच्या हानीची पहाणी केली तेव्हा मदतीची व्याप्ति फार मोठ्या प्रमाणांत वाढवावी लागणार आहे असं त्यांना आढळून आलं. अन्नपुरवठ्यासाठी शेकडो केंद्रं सुरू करावीं लागणार होतीं. धान्यपुरवठा, रॉकेल, पेट्रोल, औषधं आणि रोख मदत हें सर्वच द्यावं लागणार होतं. शहरांतल्या निरनिराळ्या ठिकाणच्या शाळांच्या इमारतींमध्ये हजारो गृहहीन निराश्रित जमा झालेले होते. पुरानं वेढलेला सारा भाग पाण्याबरोबर वाहून आलेला गाळ आणिं ढासळलेलीं घरं यांमुळे चिखलमय बनला होता. कॉलऱ्या-सारखी रोगराई त्यांतून उद्भवण्याची आणि सर्व शहरांत साथ पसरण्याची मोठी धास्ती होती. त्यामुळे सर्वप्रथम पूरग्रस्त भागांत साठलेली घाण, केरकचरा, चिखल काढून टाकून तो भाग स्वच्छ करण्याच्या कामास त्यांनी अग्रक्रम दिला आणि गाळ वाहून नेण्याचं काम लष्कराच्या मदतीनं सुरू केलं. ७५ लष्करी मालमोटारी त्यासाठी सज्ज

करण्यांत आल्या आणि त्याच वेळीं लोकांना कॉलराप्रतिबंधक लस टोचण्याचं कामहि सुरू करून दिलं.

उपलब्ध सरकारी आकड्यानुसार दि. १७ जुलैपर्यंत म्हणजे पुराचं संकट कोसळल्याच्या चौथ्या-पांचव्या दिवसापर्यंत सुमारे ४ लक्ष लोकांना प्रतिबंधक लस टोचण्यांत आली. आश्रितांचा आकडा झपाट्यानं वाढत राहिला होता. संकटानंतरच्या चार-पांच दिवसांत आश्रितांची संख्या २८ हजारांवर पोंचली. निरनिराळ्या ५२ केंद्रांत त्यांची व्यवस्था करण्यांत आली होती. केंद्रांत जमा झालेल्या आश्रितांशिवाय, अन्यत्र रहात असलेल्या आश्रितांची संख्याहि मोठी होती. त्यामुळे मग, केंद्रांत आणि केंद्राबाहेरच्या सर्वच पूरग्रस्तांना मदत देण्याचं धोरण ठरवण्यांत आलं. त्यानुसार हजारो वार कापड, साड्या, चादरी, धोतरं यांचं वांटप सुरू झालं. पहिल्या चार दिवसांत ५०९ कुटुंबांना सुमारे २२ हजार रुपये रोख देण्यांत आले.

यशवंतरावांनी, साऱ्या महाराष्ट्राला आणि देशाला पूरग्रस्तांच्या मदतीसाठी आवाहन करतांच मदतीचा अक्षरशः पाऊस पडला. लगतच्या जिल्ह्यांतून रोज ५० हजार भाकरी तयार होऊन येऊं लागल्या. धान्य, साखरेचीं पोतीं यांची आवक गाड्या भरून होऊं लागली. राज्याच्या वतीनं मदत-निधि सुरू केलाच होता. राज्यपालांनी एक वटहुकूम काढून कॉंटिंजन्सी फंडाची रक्कम ५ कोटींवरून ७ कोटींपर्यंत वाढवली. त्याचबरोबर दि. १८ जुलैपर्यंत मुख्य मंत्र्यांच्या आवाहनानुसार ५ कोटि ४४ लाख रुपये निधि जमा झाला. स्वतः यशवंतरावांनी आपलं एक महिन्याचं संपूर्ण वेतन मदतनिधीसाठी या वेळीं दिलं. त्याचप्रमाणे न्यायमूर्ति व्ही. वाय्. चंद्रचूड यांनीहि आपला महिन्याचा ३५०० रुपये पगार या निधींत जमा केला.

पुण्यावरील आपत्ति ही महाराष्ट्रावरील आपत्ति असल्यानं मुख्य मंत्र्यांनी राज्याची शासनयंत्रणा पुनर्वसनाच्या कामासाठी राबवली. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी पंतप्रधान फंडांतून मदतनिधीसाठी १ लाख रुपये तर पाठविलेच, पण ते स्वतःहि पुण्याला धांवत आले आणि शहराची झालेली हानि पाहिली. या भेटीच्या वेळीं मुख्य मंत्र्यांनी तत्परतेनं जी उपाययोजना केली त्याबद्दल पं. नेहरूंनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले आणि केंद्र-सरकारकडून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी तीन कोटि रुपये मदतीस मान्यता दिली.

पानशेतचं धरण फुटल्यानं पुण्यावर जी आपत्ति कोसळली त्याचा दोष सरकारच्या हलगर्जीपणाला लोकांनी दिला आणि त्याबद्दल महाराष्ट्र सरकारवर टीकेचं काहूर उठलं. या आपत्तीला जे जबाबदार असतील त्यांना शिक्षा झाली पाहिजे आणि या सर्वच घटनेची चौकशी व्हावी, अशी मागणी विधानसभेंत आणि बाहेर समाजाकडूनहि होऊं लागली. मुख्य मंत्र्यांनी या मागणीचा आदर करून वरिष्ठ कोर्टाचे न्यायमूर्ति आर. एस्. बावडेकर यांचं चौकशी-मंडळ नियुक्त केलं. चौकशीचं काम सुरू झालं आणि दुर्दैव असं की, न्या. बावडेकर यांनी स्वतःच आत्महत्या करून घेतली. त्यासरशी

न्या. बावडेकर यांची आत्महत्या हें एक नवीन प्रकरण सुरू होऊन वृत्तपत्रांना आणि लोकांना टीकेसाठी तो एक नवा विषय मिळाला. न्या. बावडेकर यांच्या आत्महत्येमुळे खुद्द यशवंतराव हे व्यथित आणि अस्वस्थ बनले.

पुरानंतरच्या बारा दिवसांतच, बावडेकर-कमिशन नियुक्त केल्याची घोषणा यशवंतरावांनी केली होती. या कमिशननं ११ ऑगस्टपासून चौकशीला सुरुवात केली. चौकशी-कमिशननं, स्वतःच चौकशीची कांही पद्धत निश्चित केलेली होती. सरकारची बाजू काय आहे किंवा विरोधी पक्षांचं म्हणणं काय आहे, हें ऐकण्यांत वेळ न घालवतां या आपत्तीशीं ज्यांचा ज्यांचा संबंध पोंचतो त्या सर्वांचं म्हणणं ऐकूनच निष्कर्ष काढण्याचा कमिशनचा मानस होता. परंतु विरोधी पक्षांना, विशेषतः संयुक्त महाराष्ट्र समितीला आपलं म्हणणं कमिशनपुढे मांडायचं होतं. बावडेकर मात्र त्याला तयार नव्हते.

बावडेकरांनी समितीला नकार दिल्यामुळे समितीनं त्यांच्याविरुद्ध टीकेची मोहीम सुरू केली. त्यामुळे जनतेला या कमिशनकडून न्याय दिला जाणार नाही असं वातावरण तयार झालं. इतकंच नव्हे तर, कमिशनच्या कार्यपद्धतीच्या निषेधार्थ १६ सप्टेंबरला मुंबईत एक सर्वपक्षीय सभाहि आयोजित केली गेली. या बैठकींत कमिशनवर अविश्वास व्यक्त करण्यांत येऊन हें कमिशन रद्द करून नवीन कमिशन नियुक्त करावं अशी मागणीहि करण्यांत आली.

इतकं घडतांच न्या. बावडेकर यांनी यशवंतरावांना पत्र लिहून, या चौकशीच्या जबाबदारींतून आपणांस मुक्त करावं अशी विनंती केली. पानशेत-धरणाच्या प्रमुख इंजिनियरांनी, त्या अपघाताची जी एकूण माहिती तयार करून दिलेली होती, त्यामध्ये राज्य-सरकारच्या अधिकाऱ्यांनी ढवळाढवळ करून कांही फेरबदल केलेले असल्याबद्दल न्या. बावडेकर यांच्या मनांत संशय निर्माण झाला होता.

मुख्य मंत्री चव्हाण हे स्वतः विधानसभेच्या कामांत अतिशय व्यग्र होते. न्या. बावडेकर व चव्हाण यांची भेट त्यामुळे झालेली नव्हती. न्या. बावडेकर यांचं राजीनाम्याचं पत्र मिळतांच सरकारचे मुख्य सचिव मोने यांना, न्या. बावडेकर यांची भेट घेऊन राजीनाम्याबाबत त्यांचं काय म्हणणं आहे तें समजावून घ्या, असं यशवंतरावांनी सांगितलं. त्यानुसार मोने व बावडेकर यांच्या अनेकदा भेटी होऊन चर्चा झाल्या. या भेटींमध्ये न्या. बावडेकर हे बरेच फटकळपणानं बोलले आणि एकदा तर त्यांनी मोने यांच्यावरच गंभीर आरोप केला. कमिशनकडे जे कागदपत्र दिले आहेत त्यांतलीं कांही मूळच्या कागदपत्रांची मोने यांनी अदलाबदल करून त्या ठिकाणीं दुसरीं कागदपत्रं आणून ठेवलीं असा हा आरोप होता. या उभयतांमध्ये खडाजंगीची चर्चा झाली असं नंतरच्या काळांत बरंच बोललं गेलं.

आणि त्यानंतर थोड्याच दिवसांनी ती दुःखद घटना घडली. चारमजली इमारतीच्या एका खिडकींतून न्या. बावडेकर यांनी स्वतःला रस्त्यावर झोकून दिलं आणि जीवनाचा अंत करून घेतला. त्यांनी आत्महत्या केली. आत्महत्येचं वृत्त ऐकतांच

यशवंतरावांना धक्काच बसला, राजीनाम्याचं पत्र आल्यानंतर कामाच्या गर्दीमुळे त्यांना भेटतां आलं नाही याचं तर त्यांना अधिक दुःख झालं.

न्या. बावडेकर यांची आत्महत्या घडतांच विरोधी पक्षाला तें मोठंच भांडवल मिळालं. विधानसभेंत या प्रकरणीं त्यांनी अविश्वासाचा ठरावहि आणला. या ठरावावरील चर्चेच्या वेळीं मुख्य मंत्र्यांनी सर्व वस्तुस्थितीचा सुस्पष्ट खुलासा केला. विरोधी पक्षांनी सरकारवर अनेक गंभीर आरोप केले होते; परंतु या सर्व आरोपांचं यशवंतरावांनी खंडन केलं. कमिशनची नियुक्ति झाल्यापासून न्या. बावडेकर यांना आपण एकदाहि भेटलों नाही किंवा कांही चर्चा केली नाही. त्यांच्या कोणत्या अडचणी होत्या त्याबद्दलहि त्यांनी कधी सांगितलं नाही. कमिशनच्या कामकाजांत कोणत्याहि प्रकारे हस्तक्षेप होऊं द्यायचा नाही याचं कटाक्षानं पालन करण्यांत आलेलं असून, चौकशीबाबत या ना त्या प्रकारे कसलीच अवास्तव उत्सुकता आपण दाखवलेली नाही, असं यशवंतरावांनी सभागृहाला सांगितलं.

विरोधी पक्षांनी न्यायमूर्तीवर जे आरोपांचे प्रहार केले त्यामुळे त्यांच्या मनावर दडपण येण्याची शक्यता होती. तरी पण केवळ संशयाच्या आधीन होऊन न्यायमूर्तीसारखी व्यक्ति, आत्महत्या करूं शकेल काय, की यामागे आणखी कांही गंभीर कारणपरंपरा आहे याचा तपास यशवंतरावांनी मग सुरू ठेवला.

कमिशनकडे दाखल झालेल्या मूळ कागदपत्रांत कांही ढवळाढवळ झाली असावी असा न्या. बावडेकर यांना संशय होता. विरोधी पक्षानं त्याचा पुनरुच्चार केला; परंतु त्याबाबत यशवंतरावांचं उत्तर तयार होतं. त्या सर्व आरोपप्रत्यारोपांची यशवंतरावांनी स्वतः छाननी केलेली होती.

पानशेत धरणाचा प्रश्न विधानसभेंत उपस्थित होणारच होता. त्या वेळीं, विचारण्यांत येणाऱ्या प्रश्नांना उत्तरं देतां यावींत यासाठी समग्र माहितीची निवेदनवजा एक टिप्पणी तयार करण्यांत आलेली होती. न्या. बावडेकर-कमिशनसमोर सादर करण्याच्या कागदाशीं या निवेदनाचा कांहीहि संबंध नव्हता. ते कागद दाखल होणारहि नव्हते. न्या. बावडेकर यांचं राजीनाम्याचं पत्र पोंचतांच कागदपत्राच्या संबंधांत संशयाला कोणतीहि जागा राहूं नये यासाठी आवश्यक त्या गोष्टींचा खुलासा करण्याची सरकारची तयारीहि होती. त्यानुसार धरणाच्या संबंधित सर्व कागदपत्रं न्या. बावडेकर यांच्या स्वाधीन करण्यांत आलीं होतीं, तीं त्यांनी एका कपाटांत ठेवलीं होतीं आणि त्या कपाटाची किल्लीहि त्यांच्या स्वाधीन करण्यांत आली होती.

न्या. बावडेकर यांच्याकडून राजीनाम्याचं पत्र सरकाराकडे जातांच, वृत्तपत्रांत राजीनाम्याची बातमी प्रसिद्ध झाली होती, परंतु त्या राजीनामा-पत्रांतला तपशील मात्र जाहीर झालेला नव्हता. यशवंतरावांकडे याहि खुलाशाची मागणी झाली. सरकारनं त्या पत्रांतला संपूर्ण तपशील जाहीर केल्यानंतर कोणताहि स्वाभिमानी मनुष्य, चौकशीची जबाबदारी स्वीकारण्यास तयार होणं शक्यच नव्हतं. यशवंतरावांनी तोच खुलासा केला

आणि पुढे असंहि स्पष्ट केलं की, चौकशीचं काम सुरळीत सुरू व्हावं असाच सरकारचा प्रयत्न असल्यानं राजीनाम्याचं पत्र कमिशनकडे परत सुपूर्त करण्यांत आलं. त्या पत्रांतला तपशील जाहीर करायचा किंवा काय हें त्यांनीच ठरवावं, असंहि त्यांना सांगण्यांत आलं होतं.

अशा प्रकारे सर्व खुलासे-प्रतिखुलासे झाल्यानंतरहि विरोधी पक्षांनी न्या. बावडेकर यांच्या मृत्यूचा उपयोग राजकीय भांडवलासाठी केला. चव्हाण-सरकारनं न्या. बावडेकर यांचा राजकीय खून केल्याचा गंभीर आरोप करून जाहीर सभा भरवून आरोपांची उतरंड रचली. सरकारविरुद्ध विधानसभेंत आणलेला अविश्वासाचा ठराव हा त्यांतलाच एक टप्पा होता. अर्थात् अविश्वासाचा ठराव संमत होणं शक्यच नव्हतं.

हा सर्व गोंधळ सुरू असतांनाच न्या. वि. अ. नाईक यांचं दुसरं चौकशी-कमिशन नियुक्त करण्यांत आलं. नाईक यांनी रीतसर चौकशी करून सरकारकडे चौकशीचा अहवालहि सादर केला आणि न्या. बावडेकर-प्रकरण संपलं.

पानशेत धरण कोसळून निर्माण झालेलं संकट आणि त्यांतून उद्भवलेली परिस्थिति हें महाराष्ट्र सरकारला आणि प्रामुख्यानं यशवंतरावांना एक अनपेक्षित आव्हानच मिळालं होतं. विकासकार्याचा रथ भरधांव सुटला असतांना त्याच्या मार्गावर हा एक मोठा पर्वत उभा राहिला आणि ओलांडून पुढचं मार्गक्रमण करणं मोठंच जिकिरीचं ठरलं; परंतु चव्हाण यांनी कार्यक्षमतेनं त्यांतूनहि मार्ग काढला.

पानशेत धरणाचं संकट आणि त्यानंतर न्या. बावडेकरांचा मृत्यु या घटना पहातां, कोणत्याहि सरकारची अखेरी यामुळे शक्य होती, परंतु चव्हाणांनी हें संकट पेललं आणि स्वतःच्या आणि पक्षाच्या प्रतिमेला कुठेहि धक्का लागू न देतां त्यांतून ते सहिसलामत बाहेर पडले. त्यांचं हें कर्तृत्व वाखाणण्याजोगं आहे असा चिंतामणराव देशमुख यांनी नंतर अभिप्राय व्यक्त करून चव्हाणांच्या कर्तृत्वाला प्रशस्तिपत्र दिलं तें वाजवी होतं.

पानशेतच्या संकटांतून मार्ग काढत यशवंतराव पुढे चालले होते. आता त्यांना सार्वत्रिक निवडणुकांवर लक्ष केंद्रित करायचं होतं.

१९६२ च्या आरंभींच या निवडणुका होणार होत्या आणि त्यासाठी उमेदवारांच्या निवडीची धामधूम मग सुरू राहिली. ही धामधूम सुरू असतांनाच, यशवंतरावांचे जुने मित्र आणि सहकारी, महाराष्ट्राचे एक पुढारी भाऊसाहेब हिरे यांचं निधन झालं ( ६ ऑक्टोबर १९६१ ). यशवंतरावांना हा मोठा धक्का होता.

१९५२ आणि १९५७ च्या निवडणुकीच्या वेळीं चव्हाण-हिरे या जोडीनं सारा महाराष्ट्र ढवळून काढला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाच्या वेळीं या दोन नेत्यांत कांही बाबतींत कुरबुरी झाल्या असल्या, तरी हिरे यांना यशवंतरावांनी नेते मानलं होतं. निरनिराळ्या ठिकाणीं होणाऱ्या शिबिरांतून स्वतः हिरे हे मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित रहात असत. यशवंतरावांच्या मंत्रिमंडळांत त्यांचा समावेश जरी झालेला नव्हता, तरी या दोघांमध्ये एकमेकांविषयीचा आदर कायम होता आणि सल्लामसलतहि

सुरू राहिली होती. निवडणुका ऐन तोंडावर आल्या असतांना भाऊसाहेबांचा स्वर्गवास घडावा याचं दुःख तर यशवंतरावांना होतंच, पण त्याहीपेक्षा एक हाडाचा नेता आणि महाराष्ट्र राज्याचा सच्चा पुरस्कर्ता, आपला सन्मित्र हरपला याचं दुःख त्यांना अधिक जाणवलं.

यशवंतराव स्वतः या निवडणुकींतले एक उमेदवार होतेच. कराड उत्तर-मतदार-संघ या त्यांच्या पूर्वीच्याच मतदार-संघांतून ते निवडणूक लढवणार होते. महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसचं अध्यक्षपद त्या वेळीं विदर्भाचे नेते गोपाळराव खेडकर यांच्याकडे होतं. १९५७ सालापासूनच प्रदेश-कॉंग्रेस कमिटीच्या रचनेंत आणि कार्यांत यशवंतरावांनी जिवंतपणा आणला होता. पक्ष आणि सरकार यांच्यांत एकसूर रहाण्यासाठी त्यांनी या काळांत विशेष प्रयत्न केले. अनेक नव्या कार्यकर्त्यांना त्यांनी कामाचं नवं क्षेत्र मिळवून दिलं. त्यामुळे निरनिराळ्या पक्षांतले, विशेषतः शेतकरी-कामकरी पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, रिपब्लिकन पक्ष या पक्षांतले अनेक लहानमोठे कार्यकर्ते कॉंग्रेस-प्रवेश करूं लागले.

कॉंग्रेस-प्रवेशाचे त्या वेळीं जाहीर समारंभ घडत होते. प्रजासमाजवादी पक्षांतल्या कांही कार्यकर्त्यांचा कॉंग्रेस-प्रवेशाचा आविर्भाव मात्र वेगळा असे. समाजवादाच्या मार्गानं कॉंग्रेस-पक्षाची वाटचाल सुनियंत्रित करण्यासाठी म्हणून कांहींना कॉंग्रेश-प्रवेश करायचा होता. प्रवेश-समारंभाच्या वेळीं भाषणांतून ही मंडळी तसं वक्तव्यहि करत. जणू कांही यांच्या कॉंग्रेस-प्रवेशामुळेच कॉंग्रेसचं ध्येय-धोरण, वाटचाल जनताभिमुख बनणार होती!

कॉंग्रेसला सज्ञान करण्याचा त्यांचा हा आविर्भाव कॉंग्रेस-अंतर्गत मंडळींना खट-कत असे. अंतर्गत कुजबूज अशी जेव्हा वाढत राहिली तेव्हा यशवंतरावांनी अशाच एका समारंभाचा मोका गाठून कॉंग्रेस-प्रवेश इच्छुकांना आपापल्या जागा दाखवल्या. कॉंग्रेसचं ध्येय-धोरण निश्चित झालेलं आहे, हा जनतेचाच पक्ष आहे, निश्चित ध्येय-धोरणाच्या दिशेनं पक्षाची वाटचाल सुरू आहे तेव्हा भलता आविर्भाव व्यक्त करून कॉंग्रेस-प्रवेश करण्याऐवजीं, कार्यकर्त्यांनी आपापल्या ठिकाणीं पूर्ण विचार करावा आणि मोकळ्या मनानंच कॉंग्रेस-प्रवेश करावा असा हितोपदेश त्यांनी केला.

महाराष्ट्रांतलं एकूण वातावरण त्या काळांत कॉंग्रेसला चांगलंच अनुकूल बनलं होतं. त्यांतच उमेदवारी बहाल करतांना चव्हाण-खेडकर यांनी, निरनिराळ्या जिल्ह्यांतल्या नव्या कार्यकर्त्यांना संधि देण्याचं धोरण अवलंबल्यानं, कार्यकर्त्यांमध्ये आगळाच उत्साह निर्माण झाला आणि नवे कार्यकर्ते नवी फौज घेऊन निवडणुकीच्या कामाला लागले. कॉंग्रेस-पक्षावरील आणि प्रदेश-कॉंग्रेसवरील विशिष्ट लोकांची मक्तेदारी संपवण्याचा प्रारंभ अगोदर सुरू झालेलाच होता; निवडणुकीच्या निमित्तानं मग ठामपणानं त्या दिशेनं निर्णय करण्यांत आले.

महाराष्ट्र विधानसभेच्या २६५ जागांसाठी ही निवडणूक फेब्रुवारी १९६२ मध्ये झाली आणि त्यामध्ये कॉंग्रेसपक्षानं २१४ जागा मिळवून प्रचंड विजय संपादन केला.

त्या अगोदरच्या म्हणजे १९५७ च्या निवडणुकींत या पक्षाचं पानिपत झालं होतं; तोच पक्ष आता महाराष्ट्रांतला सर्वशक्तिमान पक्ष ठरला. पुण्यासारख्या राजकीयदृष्ट्या जागरूक असलेल्या शहरानं, १९५७ च्या निवडणुकींत काँग्रेस-पक्षाला एकहि विजय मिळूं दिलेला नव्हता तिथे आता, विधानसभेच्या आणि लोकसभेच्या निवडणुकींत सर्व विजय काँग्रेसला मिळाला. नामदेवराव मते हे त्या वेळीं पुणें शहर काँग्रेसचे अध्यक्ष होते.

१९५७ सालचं अपयश अशा प्रकारे सर्व महाराष्ट्रांत धुऊन निघालं. यशवंतराव उत्तम प्रशासक म्हणून मान्य झालेलेच होते. या निवडणुकीनं ते बिन्नीचे पक्ष-संघटक ठरले आणि महाराष्ट्रांत व दिल्लींत त्यांचं वजन चांगलंच वाढलं. देशांतल्या श्रेष्ठ नेत्यांच्या मालिकेंत पोंचण्याचा त्यांचा मार्ग आता खुला झाला.

महाराष्ट्रांतल्या सर्व थरांतील जनतेचं अपरंपार प्रेम त्यांनी संपादन केलेलंच होतं. त्याचं प्रत्यंतर नेता-निवडीच्या वेळीं पुन्हा आलं. निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्या-नंतर काँग्रेस-पक्षाचं मंत्रिमंडळ बनवण्याचा प्रश्न पुन्हा निर्माण होतांच काँग्रेसपक्षाच्या आमदारांनी नेतेपदीं यशवंतरावांचीच एकमुखी निवड केली. यशवंतरावांनी मग आपलं नवं मंत्रिमंडळ तयार केलं. १६ मंत्री आणि १४ उपमंत्री या आकाराच्या मंत्रिमंडळाचा लगेच ९ मार्चला शपथविधि झाला आणि राज्याचा कारभार पूर्ववत् सुरू झाला. रस्ता तयार झालेला होता, गाडी किती वेगानं सोडायची एवढाच प्रश्न होता. मंत्रिमंडळांत जुने सहकारीच अधिक संख्येनं असल्यानं आणि त्यांनाहि आपल्याबरोबर धांवण्याचे वस्तुपाठ यशवंतरावांनी दिलेले असल्यानं, ती बाजूहि भक्कम होती.

नवं मंत्रिमंडळ अस्तित्वांत आल्यानंतर तातडीनं १ मे १९६२ ला महाराष्ट्रांत पंचायती राज्याचा कारभार यशवंतरावांनी सुरू केला. पूर्वतयारी अगोदर पूर्ण झाली होती, तरी पण पंचायत राज्यासंबंधीची सरकारची भूमिका लोकांना समजावून सांगून लोकमताचं सहकार्य मिळवण्यासाठी मग पुन्हा त्यांचे ठिकठिकाणीं दौरे सुरू झाले.

राजस्थान आणि आंध्र प्रदेशांत पंचायत राज्याचा प्रयोग सुरू झालेला होता. बलवंतराय मेहता समितीनं पंचायत राज्यासंबंधी कांही शिफारशी केलेल्या होत्या. परंतु महाराष्ट्राची एकूण परिस्थिति लक्षांत घेऊन, राज्याला हितकारक ठरेल अशा पद्धतीनं लोकशाही सत्तेचं विकेंद्रीकरण महाराष्ट्रांत घडून यावं असा यशवंतरावांचा प्रयत्न होता. प्रयोग म्हणून महाराष्ट्रांत सत्तेचं विकेंद्रीकरण त्यांना रूढ करायचं नव्हतं. प्रयोगावस्थेंत तें एकदा लोकांसमोर ठेवलं म्हणजे त्याचे अनुकूल-प्रतिकूल असे दोन्ही परिणाम घडूं शकतात आणि प्रसंगीं प्रयोग बंदहि करावा लागतो. महाराष्ट्राला ही अस्थिर अवस्था भावणारी नव्हती. त्यामुळे लोकशाही सत्तेच्या विकेंद्रीकरणाचं, एक निश्चित धोरण म्हणूनच राबवण्याचा त्यांचा निर्धार होता. राज्यांतल्या विविध भागांतील संबंधितांशीं चर्चा करून तें पक्केपणानं रुजवण्यासाठीच त्यांचे हे दौरे झाले.

राज्याच्या विविध क्षेत्रांतील विकासाला गति मिळण्यासाठी सत्तेचं विकेंद्रीकरण आवश्यक असून तेणेंकरून लोकशाहीचीं मुळं खोलवर रुजण्यास आणि त्यांतून प्रशिक्षित,

कार्यानुभवी अशी ग्रामीण नेतृत्वाची आणखी एक फळी निर्माण होण्यास या धोरणाचा निश्चितच उपयोग होता. विकासकार्यांत निर्माण होणारा लाल फितीचा अडथळा दूर होण्यास तर हा प्रभावी इलाज होताच, शिवाय ग्रामीण जनतेला विकास-कार्यांत प्रत्यक्षांत जागरूकतेनं सहभागी होण्यास त्याचा फार मोठा लाभ अपेक्षित होता. प्रशासकीय कारभाराची वर्षानुवर्षे सुरू असलेली परंपरागत चाकोरी बदलून टाकण्याच्या दृष्टीनं हें एक क्रांतिकारक पाऊल होतं. महाराष्ट्राच्या राजकीय परिस्थितीवर व जीवना-वरहि त्याचे खोलवर परिणाम होणार होते.

महाराष्ट्रांत लोकशाही विकेंद्रीकरण सुरू करत असतांना या धोरणाला अनेक अडचणींतून जावं लागलं. बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीच्या मर्यादेंत राहूनच महाराष्ट्रानं लोकशाही विकेंद्रीकरणाचा आराखडा तयार करावा आणि त्याची अंमल-बजावणी करावी यासाठी मुख्य मंत्र्यांवर त्या काळांत श्रेष्ठांकडून अनेक प्रकारे दडपणं येत राहिलीं. या कामासाठी राज्यपातळीवर जी समिति स्थापन झाली होती, त्या समितीनं लोकशाही विकेंद्रीकरणाचा विविध बाजूंनी अभ्यास करून आराखडा निश्चित केलेला होता. महाराष्ट्राच्या दृष्टीनं त्याचीच अंमलबजावणी इष्ट ठरेल असा यशवंत-रावांचा अभिप्राय होता.

जिल्हा-पातळीवर समर्थ अशी जिल्हा-परिषद अस्तित्वांत आणून जिल्हा-पातळीवरील विकास-कार्याची अंतिम आखणी जिल्हा-परिषदेमार्फतच केली जावी अशी स्थानिक समितीची महत्त्वाची शिफारस होती. पंचायत-समिति गट-पातळीवर रहावी आणि त्या पातळीवरील प्रश्नापुरतंच पंचायत-समितीचं कार्यक्षेत्र मर्यादित रहावं अशी तरतूद त्यामध्ये होती.

विकासाच्या कामासाठी आवश्यक असणारा पैसा पंचायत-समित्यांच्या स्वाधीन असावा आणि पंचायत-समित्यांच्या निवडणुका प्रत्यक्षांत (डायरेक्ट) व्हाव्यात असंहि शिफारशींत नमूद करण्यांत आलं होतं; परंतु या आणि अशा प्रकारच्या अन्य कांही शिफारशी या बलवंतराय मेहता समितीच्या मूळच्या अधिकृत धोरणाशीं विसंगत ठरणाऱ्या असल्यामुळे श्रेष्ठांकडून त्याला विरोध सुरू झाला. वस्तुतः आर्थिक व्यव-हाराच्या संदर्भांत आणि विकासाच्या दृष्टीनंहि महाराष्ट्राचा आराखडा हा सत्तेचं खऱ्या अर्थानं विकेंद्रीकरण साध्य करणारा आणि स्थानिक संस्थांना अधिक अधिकार प्राप्त करून देणारा होता. सरकारनं आपले जास्तींत जास्त अधिकार जिल्हा-परिषदांच्या स्वाधीन करण्याची तयारी दर्शवली होती; परंतु महाराष्ट्रानं जिल्हा-परिषदांना सत्तेंत एवढं महत्त्वाचं स्थान आणि अधिकार देणं योग्य ठरेल काय, याविषयी देशांत निरनिराळ्या भागांतून गंभीर संशय व्यक्त होऊं लागले. स्थानिक समितीच्या शिफारशीनुसार विकास-कार्यक्रमाच्या खर्चाच्या अर्थसंकल्पांतल्या तरतुदींपैकी सुमारे एकतृतीयांश रक्कम जिल्हा परिषदांच्या स्वाधीन होणार होती. तेव्हा हा निर्णय शहाणपणाचा आणि व्यवहार्य ठरेल काय, याबद्दलहि संशय व्यक्त होऊं लागला.

यशवंतरावांनी या संदर्भात मंत्रिमंडळाच्या अनेकदां बैठकी घेऊन, स्थानिक समितीच्या शिफारशी आणि त्याबद्दल व्यक्त होणारे संशय याबाबत प्रदीर्घ चर्चा केली. केंद्रस्थानचे या खात्याचे मंत्री एस. के. डे यांचीहि महाराष्ट्राचं धोरण मान्य करण्यास तयारी नव्हती. महाराष्ट्रानं आपल्या धोरणांत व्यवहार्य बदल करण्याची आवश्यकता प्रतिपादन करण्यासाठी अनेकदा त्यांनी मुंबईस धांव घेतली आणि यशवंतरावांशीं चर्चा केली; परंतु लोकशाही विकेंद्रीकरणाबाबत यशवंतरावांचीं कांही ठाम मतं होतीं.

डे यांच्याशीं त्यांनी पुष्कळ चर्चा केली, परंतु आपल्या मनांतल्या ठाम निर्णयापासून ते रेसभरहि मागे हटले नाहीत. मंत्रिमंडळांतले त्यांचे कांही सहकारी आपल्या खात्याची सत्ता बाहेर जाऊं देण्याबद्दल खळखळ करत होते; परंतु चव्हाण त्या बाबतींत भक्कम होते. मूलभूत धोरणाबाबत तडजोड करण्यास त्यांची तयारी नव्हती. सहकाऱ्यांना त्यांनी समजून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु कांही सहकारी आपला हेका सोडण्यास तयार नाहीत असं आढळतांच यशवंतरावांनी त्यांना स्पष्टच समज दिली की, "लोकशाही विकेंद्रीकरण पूर्णपणें मान्य करण्याची ज्यांची तयारी नाही त्यांना आपला मार्ग मोकळा आहे. मंत्रिमंडळांतून त्यांनी खुशाल बाहेर जावं."

विकासाच्या शासनाचं काम जनतेच्या सहकार्याशिवाय होणं नाही ही यशवंतरावांची धारणा. लोकशाही विकेंद्रीकरणाबाबतच्या खेर-मंत्रिमंडळाच्या प्रतिक्रिया त्यांना माहिती होत्या. त्यांनी त्या जवळून अनुभवल्या होत्या. लोकांच्या हातांत सत्ता देत असतांना त्या सत्तेंतून कांही चुकीच्या गोष्टी घडतात, हें त्यांना मान्य होतं; परंतु त्यासाठी स्थानिक संस्था आणि लोकशाही मोडली पाहिजे हें मान्य करण्याची त्यांची तयारी नव्हती.

पंचायत राज्याच्या चर्चा सुरू झाल्या आणि वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नाचा सर्वांगीण विचार करून शिफारशी करण्यासाठी समिति स्थापन झाली त्या वेळेपासूनच यशवंतरावांचं म्हणणं असं होतं की, लोकशाही विकेंद्रीकरण करतांना हातचं ठेवून कांही करूं नये. जें कांही करायचं तें लोकांवर विश्वास ठेवूनच करायचं. लोक हे विश्वासाला पात्र नाहीत अशी भीति मनांत ठेवून कांही निर्णय न करतां निर्मळ मनानं, त्यांतील धोके लक्षांत घेऊन, लोकांवर विश्वास ठेवूनच निर्णय करावा. मात्र एकदा निर्णय केल्यानंतर त्यानुसार काम सुरू राहील याची दक्षता घ्यावी.

स्थानिक संस्था निश्चितपणें मदत करूं शकतात; परंतु या संस्था ज्यांच्या हातीं सोपवायच्या तीं माणसं, त्यांना कामाकरिता मिळणाऱ्या प्रेरणा, हातांत आलेली यंत्रणा राबवून घेणाऱ्या माणसांचे विचार या गोष्टी अर्थातच महत्त्वाच्या मानल्या पाहिजेत. संस्था चालवण्याची जबाबदारी ज्या माणसांवर पडेल तीं माणसं वृत्तीनं सेवाभावी आणि त्यागी असलीं पाहिजेत. अशा माणसांची महाराष्ट्रांत उणीव आहे किंवा पुढच्या काळांत ही उणीव भासेल असं यशवंतरावांना कधीच वाटलं नाही. या व्यक्तींना काम करण्याची संधि मिळाली पाहिजे एवढाच त्यांचा आग्रह होता आणि त्यामुळेच संधि

देण्याच्या मार्गांत जी आडकाठी येईल ती दूर करण्याची त्यांच्या मनानं तयारी केली होती. त्यामुळेच ही योजना त्यांनी आपल्या मताप्रमाणे सुरू केली.

तत्त्वाशीं तडजोड करण्याचा गुण यशवंतरावांनी आपल्या ठिकाणीं कधीच वाढूं दिला नाही. मंत्र्यांची निवड करतांना आणि त्यांच्याकडे खात्यांची जबाबदारी सोपवतांना, मंत्रिमंडळ हें विविध प्रश्नांवर एकजीव, समानधर्मी राहील याकडे त्यांनी त्याचसाठी कटाक्षानं लक्ष पुरवलं आणि त्यामुळे नव्या राज्याच्या कामाचा बोजा त्यांना पेलतां आला. कोणाच्या दबावानं, त्यांनी मंत्रिमंडळांत नको असलेल्यांचा समावेश होऊं दिलेला नाही. असं सांगितलं जातं की, एका प्रसंगीं स्वतः पंडित जवाहरलाल नेहरू यांनी एका विशिष्ट व्यक्तीचा मंत्रिमंडळांत समावेश करावा असं यशवंतरावांना सुचवलं; परंतु यशवंतरावांनी न कचरतां पंडितजींसमोर अडचणीचा उलगडा केला. नेहरूंनीहि मग आपला आग्रह सोडून दिला. त्या विशिष्ट व्यक्तीचा मंत्रिमंडळांत समावेश झाला नाही.

राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नाबाबत घाईघाईनं मतप्रदर्शन करायचं नाही, परंतु तत्त्वाचा प्रश्न निर्माण झाल्यास, सौम्य शब्दांत, कोणाहि श्रेष्ठाचा मुलाहिजा न ठेवतां किंवा दबून न जातां आपलं मत नोंदवण्याचा यशवंतरावांचा एक विशिष्ट बाणा आहे. अनेकदा त्यांनी तो दाखवला आहे. पं. नेहरूंच्या उपस्थितींत, एखाद्या प्रश्नाबाबत मतभेद व्यक्त करण्याचं धाडस कोणी क्वचितच करत असत. परंतु राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नांच्या चर्चेच्या वेळीं यशवंतरावांनी पं. नेहरूंच्या उपस्थितींत आपला मतभेद व्यक्त केल्याचींहि उदाहरणं आहेत. नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलच्या एका बैठकींत हें घडल्याची नोंद आहे. तिरकस मनानं किंवा वृत्तीनं ते ही भूमिका घेत नाहीत. तत्त्वाबाबत तडजोड नाही हाच बाणा तिथेहि असतो.

हाच बाणा कायम राखून त्यांनी महाराष्ट्राचा राज्यशकट चालवला. पंचायत राज्य आणि जिल्हा-परिषदांची स्थापना हें यशवंतरावांनी आपल्या कारकीर्दीत केलेलं सर्वांत मोठं कार्य आहे. त्या जिल्हा-परिषदांचा कारभार आजअखेर सुरू आहे. जिल्हा-परिषदेच्या कांही कारभाऱ्यांवर नंतरच्या काळांत लाचलुचपतीचे आणि ते आपल्या गटांतल्या लोकांवर मेहरबानी करत असल्याचे आरोप येऊं लागले हें खरं. परंतु हा प्रश्न त्या त्या व्यक्तीच्या स्वभावाशीं निगडित आहे. महाराष्ट्राला ज्या एका विधायक कार्याची दिशा यशवंतरावांनी दाखवून दिली, त्यांतून निर्माण झालेले आणि होणारे फायदे मात्र निर्विवाद आहेत.

जिल्हा-परिषदा आणि पंचायत-समित्या यांच्या द्वारा महाराष्ट्रांत जो नवा पुढारीवर्ग जन्मास आला, त्यामुळे महाराष्ट्राचा राजकीय चेहरा-मोहरा पार बदलून गेला आहे. महाराष्ट्र हें देशांतलं एक स्थिर राज्य असल्याची प्रचीति नंतरच्या काळांत येत राहिली; त्या कर्तृत्वाचं श्रेय यशवंतरावांनी राज्यामध्ये शिक्षण, सहकार, शेती, उद्योगधंदे आणि लोकशाही विकेंद्रीकरण यांसारख्या क्षेत्रांत जो जिवंतपणा निर्माण केला आणि ग्रामीण भागांतल्या जनतेच्या मनीमानसीं विकासाचीं बीजं रुजवलीं त्यालाच दिलं पाहिजे.

१९६० मध्ये स्वतंत्र महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतरावांची लोकप्रियता कळसास पोंचली. कोणी त्यांची तुलना शिवाजीमहाराजांबरोबर करूं लागले, प्रतिशिवाजी म्हणून संबोधूं लागले, परंतु यशवंतराव सावध होते. खोट्या तुलनेनं ते स्वतः फसणारे तर नव्हतेच, पण लोकांनीहि खोट्या तुलनेमध्ये फसूं नये असं त्यांनी एकदा जाहीरपणें सांगितलं. त्यांनी सांगितलं की, "एकच शिवाजीमहाराज होऊन गेले आणि एकच टिळक होऊन गेले. महाराष्ट्राचा इतिहास ज्यांनी घडवला ते शिवाजीमहाराज आता पुन्हा होणार नाहीत. ब्रिटिशांच्या सत्तेखाली दबलेल्या हिंदुस्थानला स्वराज्याचा जन्ममंत्र देणारे लोकमान्य टिळक एकदाच होऊन गेले. ते आता पुन्हा होणार नाहीत. पुन्हा होणार नाहीत याचा अर्थ हिंदुस्थान पुन्हा परतंत्र होणार नाही हा आहे. ज्यांच्यापुढे नतमस्तक व्हावं अशा शिवाजीमहाराज व लोकमान्य टिळक ह्या महान् विभूति आहेत. आपण सारीं छोटीं माणसं आहोंत. १९३० सालानंतर जी मंडळी राजकारण करायला लागली अशा असंख्य कार्यकर्त्यांचा मी एक प्रतिनिधि आहे, शिवाजी नव्हे; प्रतिशिवाजी नव्हे. तेव्हा मला फसवूं नका आणि तुम्हीहि फसूं नका."

यशवंतराव अजून राज्यपातळीवरील नेतेच मानले जात होते. त्यांनी आपल्या गुणांची आणि कर्तृत्वाची झलक दाखवली होती, तरी पण अखिल भारतीय राजकारणांत त्यांची प्रतिमा निर्माण व्हावी अशी संधि आलेली नव्हती; परंतु त्यांचीं पावलं मात्र त्या दिशेनं पडूं लागलीं होतीं. त्यांच्याकडून लोकांच्या अपेक्षाहि वाढत होत्या. दरम्यान लोकप्रियतेची आणि कर्तृत्वाची पावती अखिल भारतीय स्तरावर प्राप्त होण्याची संधि १९६१ च्या भावनगर काँग्रेसमध्ये त्यांना मिळाली.

काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सभासदांची निवडणूक या अधिवेशनांत होणार होती. यशवंतराव हे या निवडणुकींतले एक उमेदवार होते. या निवडणुकीसाठी जें मतदान झालं त्यामध्ये यशवंतरावांना सर्वांत अधिक मतं मिळालीं. एकट्या इंदिरा गांधी यांनाच त्यांच्यापेक्षा अधिक मतं मिळालीं होतीं. या वेळपर्यंत यशवंतरावांची अखिल भारतीय प्रतिमा निर्माण झालेली नसतांनाहि जास्तींत जास्त मतं संपादन करून वर्किंग कमिटीचा सभासद होण्याचं यश त्यांनी संपादन केलं. त्याच वेळीं अनेकांनी असं भविष्य वर्तवलं की, एक ना एक दिवस चव्हाण हे दिल्लींतली श्रेष्ठ जागा पटकावण्याची शक्यता आहे. स्वतः यशवंतराव मात्र दिल्लींतलं असं एखादं वरिष्ठ पद संपादन करावं अशी इच्छा बाळगून नव्हते. महाराष्ट्रांत राहूनच आपलं स्थान भक्कम करावं आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासाचं प्राप्त कर्तव्य करत रहावं अशी त्यांची मनोमन इच्छा होती.

महाराष्ट्रांत त्यांना लोकप्रियता लाभलीच होती. महाराष्ट्र राज्यांतल्या प्रशासनामध्ये आवश्यक त्या सुधारणा झालेल्या आहेत, लाचलुचपतीला आळा बसला आहे, मतभेदांच्या प्रश्नांबाबत बराचसा सलोखा निर्माण झाला आहे, असं आता विरोधी पक्ष आणि समाजांतले अन्य थर मान्य करूं लागले होते. 'देशांतील सर्वोत्तम मुख्य मंत्री'

असा गौरव करण्यासाठी साथी जयप्रकाश नारायण हेहि या वेळीं पुढे सरसावले. वस्तुस्थितीच तशी होती.

यशवंतरावांनी महाराष्ट्रांत काँग्रेसची गेलेली प्रतिष्ठा तर सावरलीच, पण त्याचबरोबर काँग्रेसला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली होती. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकींत भक्कम बहुमत मिळवून काँग्रेस सरकार स्थिर बनवलं होतं आणि विकासाचे कार्यक्रम चढत्या भांजणीनं सुरू ठेवले होते. राज्यानं विविध क्षेत्रांत अग्रेसरत्व प्रस्थापित करण्यासाठी यशवंतरावांनी आपल्या मनाशीं कांही महत्त्वाकांक्षी योजना तयार केल्या होत्या. एक वेगळं स्वप्न ते पहात होते. पुढच्या पांच वर्षांच्या अवधींत महाराष्ट्र राज्य हें अस्सल पुरोगामी आणि समृद्ध राज्य बनवण्याचं चित्र त्यांच्या मनांत तयार झालं होतं. त्यांचं हें स्वप्न महाराष्ट्रांत साक्षात् अवतरलं आहे असं त्यांना पहायचं होतं आणि महाराष्ट्राला व देशाला त्या स्वप्नाचं दर्शन घडवायचं होतं. परंतु ...

परंतु त्याच सालांत, १९६२ मध्ये मोठ्या नाट्यपूर्ण रीतीनं यशवंतरावांना मुंबई सोडून दिल्लीला धांवावं लागलं. देशाच्या संरक्षणाची, जोखमीची जबाबदारी त्यांना स्वीकारावी लागली. संरक्षण-मंत्रिपद सांभाळावं लागलं. सर्वच अनपेक्षित !

महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्रिपदाचीं सूत्रं विदर्भाचे नेते मारोतराव कन्नमवार यांच्या स्वाधीन करून संरक्षणमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारण्यासाठी २० नोव्हेंबर १९६२ ला यशवंतराव दिल्लींत दाखल झाले. यशवंतराव दिल्लींत पोंचले, परंतु ते येण्यापूर्वी संरक्षणखात्यांत फार मोठं रामायण घडून आलं होतं; सारीच उलथापालथ झाली होती. भारतावर चीननं ज्या सीमेवरून हल्ला चढवला होता तिथेहि बरंच कांहीं घडून गेलं होतं. यशवंतरावांना – या नव्या संरक्षण-मंत्र्यांना घडामोडींची पुसटशी देखील कल्पना नव्हती. हातांत कोरी पाटी-पेन्सिल देऊन पं नेहरूंनी या जबाबदारीच्या जागेवर त्यांना स्थानापन्न केलं ! पुरोगामी आणि समृद्ध महाराष्ट्राचं त्यांनी मनाशीं बाळगलेलं स्वप्न मागे अपुरंच राहिलं !

# २१

६ नोव्हेंबर १९६२ !

मुख्य मंत्री यशवंतराव मुंबईमध्ये सचिवालयांत आपलीं नित्याचीं कामं पहाण्यांत दंग होते. दुपारची वेळ. फोन वणवणत होते. मुख्य मंत्र्यांच्या कार्यालयांतल्या फोनला एक मिनिटाचीहि उसंत नसते. अनेकांचीं अनेक कामं, अनेक समस्या ! आणि प्रत्येकालाच मुख्य मंत्र्यांशीं संपर्क साधण्याची निकड. कार्यालयीन धांदल नित्य सुरूच रहाते. महत्त्वाच्या कामाचे फोन मुख्य मंत्र्यांपर्यंत पोंचवायचे, दुय्यम महत्त्वाच्या फोनचं निराकरण सचिव-पातळीवर व्हायचं हेंहि ठरलेलं असे.

एक फोन वणवणला. हा फोन अनपेक्षित होता. नाटकाची नांदी सुरू होण्याची ती जणू घंटाच होती. फोन आला होता दिल्लीहून – पंतप्रधान पंडित नेहरूंचा !

पं. नेहरू फोनवर बोलण्यासाठी थांबले होते. मुख्य मंत्र्यांचे खाजगी सचिव – बहुधा श्रीपाद डोंगरे असावेत – लगबगीनं यशवंतरावांच्या कार्यालयीन खोलींत गेले आणि त्यांनी निरोप सांगितला – " पंतप्रधान तुमच्याशीं बोलण्याकरिता थांबले आहेत – फोन आहे. " सारंच अनपेक्षित ! फोनवरूच मग बोलणं सुरू झालं.

" खोलींत अन्य कुणी आहे ? " – नेहरू.

" होय. चर्चेसाठी कांहीजण आले आहेत. " – चव्हाण.

" जे कोणी असतील त्यांना थोडा वेळ बाहेर थांबण्यास सुचवतां येईल का ? मला तुमच्याशीं कांही खाजगी बोलायचं आहे ! " – नेहरू.

यशवंतरावांना आपली खोली निवान्त करावी लागली. खोलीमध्ये आता ते एकटेच होते.

" हां, कशासंबंधी बोलायचं म्हणालांत ? "– चव्हाण.

" तुम्हांला कांही महत्त्वाचं सांगायचं आहे; आणि त्याबद्दल मला 'हो' किंवा 'नाही' एवढंच उत्तर पाहिजे. हें पहा, तुम्हांला दिल्लीस 'संरक्षणमंत्री' म्हणून यावं

लागणार आहे. त्याबद्दल मला तुमचं मत तावडतोब हवं आहे. मात्र एक लक्षांत असूं द्या, हें सर्व अद्याप निश्चित निर्णयाप्रत पोंचायचं आहे. याची कुणाजवळ वाच्यता होतां उपयोगी नाही. मला सांगा, दिल्लीस यायची इच्छा आहे ? " – नेहरू.

" मी या संबंधांत कांही विचार केलेला नाही. पण मला तुमची दुसरी अट मान्य करणं थोडं कठीण दिसतं. मुंबई सोडून दिल्लीला यायचं तर निदान एका व्यक्तीशीं तरी मला तें बोलावं लागेल. " – चव्हाण.

" कोण एवढी महत्त्वाची ती व्यक्ति आहे ? " – नेहरू.

" माझ्या पत्नीला मला हें सांगावं लागेल " – चव्हाण.

फोनच्या दुसऱ्या टोकाहून मग पं. नेहरूंच्या हसण्याचा आवाज आला.

" आलं, आलं लक्षांत, तुम्हांला तुमच्या पत्नीला हें सांगावं लागेल म्हणतां ... पण लक्षांत असूं द्या, हें अगदी खासगी, गुप्त आहे हं ! " – नेहरू.

" जेव्हा आणि जिथे कुठे माझी आपणांस गरज पडेल तिथे आणि त्या वेळीं मी निश्चित येईन; परंतु माझी तिथे येण्याची गरज आहे का, हें एकदा तुम्हीच कृपा करून मनाशीं पक्कं केलेलं बरं. " – चव्हाण.

" मला, तुम्ही इथे यायला हवे आहांत. थोड्या दिवसांतच नक्की काय तें सांगेन. " – नेहरू.

फोनवरून सुरू असलेलं खाजगी संभाषण संपलं. पं. नेहरूंच्या मंत्रिमंडळांत दाखल होण्याचा सांगावा यशवंतरावांना अशा पद्धतीनं अनपेक्षित आला. द्वैभाषिक निर्मितीच्या वेळीं द्वैभाषिक राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारण्याची हाक नियतीनं यशवंतरावांना अशीच अचानक दिली होती. त्या वेळची परिस्थिति गुंतागुंतीची आणि कांहीशीं अडचणीची अशीच होती; परंतु यशवंतरावांनी त्या हाकेला प्रतिसाद दिला आणि जबाबदारीहि पत्करली.

आताहि पुन्हा तेंच घडणार होतं.

देशाच्या आणीबाणीच्या काळांत, राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ नेत्यानं – पं. नेहरूंनीच यशवंतरावांना दिल्लीला येण्याची हाक दिली होती. सर्वच घटना अनपेक्षित होत्या; परंतु दिल्लीची भूमीच अशी बनलेली आहे की, तिथे बहुतेक घडतं तें अनपेक्षित ! अगदी प्राचीन ऐतिहासिक काळापासून हें सुरू आहे.

दिल्लीनगरीचा पाया घालण्यांत आला त्या वेळची कुंडलीहि तशीच असावी हें एक ऐतिहासिक सत्य दिसतं. या शहरावर वेगवेगळ्या काळांत अनेक आपत्ति कोसळल्या, विपत्ति आल्या. परंतु कुरुक्षेत्र, पानिपत, हस्तिनापूर, दिल्ली या टापूचा ऐतिहासिक ओघ गंगा-सिंधूप्रमाणे अखंड वहात आला आहे. भरतखंडाचा इतिहास आणि भवितव्य घडवणारे बहुतेक सर्व प्रसंग आणि संग्राम याच पुरातन रणभूमीवर होत आले आहेत.

परशुरामानं याच भूमींत मदांध व उन्मत्त लोकांना मारून रक्ताचे पांच डोह या 'स्यमंतपंचकांत' निर्माण केले आणि पुढे याच डोहांची, ऋषींच्या आशीर्वादानं तिथे

पवित्र तीर्थ झालीं. कुरुराजानं इथे महान् तपश्चर्या केली. त्यानं जें पुण्य संपादन केलं, त्यामुळे या स्थळास कुरुक्षेत्र असं पवित्र नांव मिळालं. चांद्रवंशीय व पुरुकुलोत्पन्न हस्तिराजानं प्रसिद्ध हस्तिनापूर हें नगर याच कुरुक्षेत्रांत वसवलं. यासंबंधीचीहि एक पुराणकथा आहे. अत्रिपुत्र सोमऋषि वनांत हिंडत असतांना एका ठिकाणीं एका पक्ष्यानं झपाट्यानं येऊन एका प्रचंड हत्तीला उचलून भरारीसरशी आकाशांत नेल्याचं त्याला दिसलं. तेव्हा ही यशस्वी भूमि म्हणून तिथे त्यानं नगर वसवलं; आणि त्यास हस्तिनापूर असं नांव दिलं. कौरव-पांडवांचे अखेरचे तंटे व अखेरचं महायुद्ध याच नगरांत व एकूण कुरुक्षेत्रांत झालं. कौरव-पांडवांच्या वैरांतून पुढे इंद्रप्रस्थ नांवाचं नवं नगर वसलं. पांडव सर्व संकटांतून निभावून हस्तिनापुराला परत आल्यानंतर उभयतांमधील भाऊबंदकी, सान्निध्यामुळे विकोपास जाऊं नये म्हणून धृतराष्ट्रानं पांडवास अर्ध राज्य तोडून दिलं आणि हस्तिनापूरच्या नैऋत्येस पन्नास मैलांवरील खांडववनांत नवं नगर वसवण्यास अनुमति दिली. तेंच हें इंद्रप्रस्थ ऊर्फ अर्वाचीन दिल्ली !

त्या वेळीं खांडववनांत असुर नांवाच्या जातीची व तक्षक नांवाच्या नाग जातीची मोठी वस्ती होती. खांडववनाच्या एका बाजूचा भाग तोडून रान मोकळं केल्यावर पांडवांनी तिथे आपलं नगर वसवलं व त्याला खांडवप्रस्थ असं नांव दिलं. ही नगरी त्यांनी इतकी शोभिवंत बनवली की, तेथाल रहिवाश्यांना ती इंद्राची अमरावती वाटे. म्हणून त्यांनी मोठ्या अभिमानानं या नगरीस इंद्रप्रस्थ नांव दिलं.

या नगरींत पुढे असुरांचा कुशल शिल्पकार मयासुर यानं कैलासाच्या उत्तरभागांतून, मैनाकपर्वतानजीकच्या बिंदुसरोवराजवळून अतिशय किमती सामग्री आणून भव्य राजवाडा बांधला. या राजवाड्याच्या भिंती, खांब, तट, कमानी या सर्व रत्नांनी मढवल्या होत्या. मयासुरानं अनेक रत्नांनी मढवलेलं कृत्रिम सरोवर तिथे तयार केलं. पांडवांनी या राजवाड्याला 'मयसभा' असंच नांव देऊन मयासुराच्या कलेचं चीज केलं. या इंद्रप्रस्थांत राजसूय व अश्वमेध यज्ञ झाले. महाभारतांतील त्याच्या वर्णनावरून भरतखंडांतील त्या काळच्या वैभवाचा व संपत्तीचा सहज अंदाज करतां येतो; आणि हिंदुस्थानला सुवर्णभूमि नांवानं संबोधलं जातं तें कसं अन्वर्थक होतं हेंहि लक्षांत येतं. दिल्लीचा हा इतिहास पहातांना दिल्ली आणि महाराष्ट्राचा सह्याद्रि यांची तुलना सहजगत्या मनांत येते. सह्याद्रि हा नेहमीच जय आणि पराजयाच्या भावनेपासून मुक्त राहिला. सह्याद्रीला ज्यांनी जिंकलं तो चाल करून येणारा शत्रु कितीहि मोठा असो, तो इथे कधी समर्थ बनला नाही. सह्याद्रीनं अनेकांना मित्र म्हणूनच स्वीकारलं.

दिल्ली ही मात्र मायानगरी आहे असं म्हणतात. दिल्लीच्या मनांतले भाव ओळखणें कठीणच. ही नगरी स्वतःबद्दल एखाद्याच्या मनांत उत्कंठा निर्माण करूनहि अत्यल्प कृपा करते, पण त्याला दुःखी बनवत नाही. दोन्ही हात जोडून सेवा करणाराला मात्र ही नगरी म्हणे असूयेनं कधी कधी जेरबंद करते. अनेक उन्मत्त, अनाचारी राजांना हिनं सिंहासनावरून खाली फेकलं आहे. त्याचप्रमाणे दुर्भागी, अश्रुपूर्ण शोकावस्था

प्राप्त झालेली असतांनाहि आपल्या सौभाग्याच्या तेजानं ते दिवस तिनं दूर केले आहेत. या नगरीनं तटस्थपणानं परस्पर-विरोधी अनुभवांचं दर्शन अनेकदा घडवलं आहे. गंगा व शरयू यांची ही पवित्र भूमि खरी, परंतु ऐतिहासिक काळांत स्वातंत्र्यरक्षणास ती अनेकदा असमर्थ ठरली. सह्याद्रीचं तंत्र वेगळं. कृष्णेच्या तटानं स्वातंत्र्याला नेहमी अभयच दिलं. गुलामी तोडून फेकून दिली.

हिमालयाच्या रक्षणासाठी सह्याद्रि धांवेल असा, महाराष्ट्र निर्मितीच्या वेळीं यशवंतरावांनी 'शब्द' दिला होता. ती वेळ आता आली. पं. नेहरूंचीच हाक आली होती. महाराष्ट्राला अभिमान वाटावा अशीच ही घटना, परंतु त्याच वेळीं सह्याद्रीवर यशवंतरावांचा मुक्काम आणखी कांही काळ घडावा असंहि महाराष्ट्राला वाटणं स्वाभाविक होतं. महाराष्ट्राला त्याची नितान्त गरज होती.

यशवंतरावांनी संरक्षणमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारल्याची घटना ही मोठी नाट्यपूर्ण घटना आहे. १९६२ च्या नोव्हेंबरमध्ये अनपेक्षितरीत्या ते या नव्या आसनावर आरूढ झाले. भारत-चीन दरम्यानच्या सीमा-वादांतून चीननं भारतावर लष्करी आक्रमण केलं, त्यांत भारताला अपमानास्पद पराभव पत्करावा लागला आणि त्यांतून निर्माण झालेल्या गुंतागुंतीच्या परिस्थितींतच चव्हाण हे दिल्लीला पोंचले.

भारत-चीन दरम्यानचा सीमा-वाद हा एक प्रदीर्घ इतिहास आहे. या वादाचीं मुळं खोलवरचीं आहेत. भारतांत ब्रिटिश सत्ता होती त्या काळांतच भारत आणि चीन यांच्यांतली सीमा-रेषा निश्चित करण्यांत ब्रिटिशांना अपयश आलेलं होतं; तेव्हापासूनचा हा वाद आहे. या उभय देशांतल्या सीमेसंबंधांत निरनिराळ्या कालखंडांत घडलेल्या घटनांची एक लांबलचक साखळीच तयार झालेली असून १९६२ च्या हिवाळ्यांत चीननं भारतावर केलेलं आक्रमण म्हणजे या साखळीचाच एक दुवा आहे. त्या अगोदर चीननं १९५९ च्या ऑगस्टमध्ये नेफा-हद्दींत लॉंग्जू या ठिकाणीं पहिल्यांदा कुरापत काढली होती. लडाखमध्ये १९५८ मध्ये चीननं आक्रमण करतांच भारत सरकारनं चीनकडे निषेध-खलिता पाठवला आणि तेव्हापासून दिल्ली-पेकिंग दरम्यान खलिते येत-जात राहिले होते. तरी पण या दोन्ही देशांच्या सरहद्दीवर दोन्ही देशांच्या सैनिकांचे पहारेकरी गस्त घालूं लागले होते. १९६० मध्ये तर भारताच्या सैन्यानं कांहीशी आगेकूच करून कांही ठिकाणीं लष्करी तळ उभारण्यापर्यंत मजल मारली होती.

त्या वेळीं व्ही. कृष्णमेनन हे भारताचे संरक्षणमंत्री होते आणि जनरल थापर हे सरसेनापति होते. भारत-चीन सीमेवरील घटनांबाबत लष्करी अधिकाऱ्यांकडून दिल्लीला पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्याकडे आवश्यक तो तपशील येत राहिला होता. दिल्लींत त्या संदर्भांत उच्चपातळीवरून चर्चाहि सुरू होत्या. १७ नोव्हेंबर १९६१ ला अशीच एक उच्चपातळीवरील बैठक झाली आणि भारत-चीन दरम्यानच्या सीमेवर, विशेषतः लडाख भागांतील लष्करीदृष्ट्या असलेली उणीव भरून काढावी आणि

आघाडीवरील भागांत लष्करानं आपले तळ ठोकावेत, असा निर्णय पं. नेहरूंनी सांगितला.

भारताच्या ' इंटिलिजन्स ब्यूरो 'नं, आघाडीवरील भागांत लष्करी तळ उभारण्याचा आग्रहाचा सल्ला दिलेला होता आणि परराष्ट्रखात्याच्या मंत्रालयानं त्यास दुजोरा दिला होता. भारतानं आगेकूच करण्याचं धोरण अवलंबलं नाही, तर चीन भारताच्या हद्दींत आणखी घुसखोरी करण्याची शक्यता गृहीत धरूनच हा निर्णय करण्यांत आला होता. सरसेनापति थापर आणि लेफ्टनंट जनरल बी. एम्. कौल यांनीहि हा निर्णय मान्य केला. ' फॉरवर्ड पॉलिसी ' म्हणून त्या काळांत हा निर्णय गाजला. या निर्णयाची अंमलबजावणी करतांना, स्वसंरक्षणाचा प्रसंग निर्माण झाल्याखेरीज चीनशीं सशस्त्र चकमक होणार नाही याची प्रामुख्यानं काळजी घ्यावी, अशा सरसेनापतींनी सीमेवरील संबंधित वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या होत्या.

नेफामध्ये चीन आपल्या बाजूला लष्करी तळ उभे करण्यांत गुंतला आहे असं आढळून येतांच भारतानंहि मॅकमोहन रेषेवर लष्करी तळ उभारण्याला सुरुवात केली. भारत ज्या सरहद्दीवर आपला हक्क सांगत होता, त्या सरहद्दीचं परिणामकारक रीतीनं संरक्षण करतां येणं शक्य व्हावं, हाच या निर्णयामागचा प्रमुख हेतु होता. नेफाच्या पश्चिमेला आणि लडाखच्या पूर्वेला अशा रीतीनं १९६१ आणि १९६२ मध्ये आघाडीवरील भागांत असे लष्करी तळ उभारण्याचं काम सुरू राहिलं आणि १९६२ च्या मध्यापर्यंत तर लडाखमध्ये भारताच्या लष्कराचे ४३ नवे तळ उभे ठाकले. भारताच्या या धोरणाबद्दल आणि त्याच्या यशाबद्दल कांही लष्करी अधिकाऱ्यांमध्ये मात्र मतभेद निर्माण झाले होते.

लडाखमध्ये भारतानं केलेल्या आक्रमणाच्या संदर्भात चीननं भारताकडे १९६२ मध्ये कडक निषेध-खलिता पाठवला. त्यावर पंडितजींनी, त्या वर्षीच्या सप्टेंबरमध्ये, पेकिंगला असं सुचविलं की, चीननं आपलं सन्य मागे घ्यावं, भारतहि आपलं सैन्य मागे घेईल. किंबहुना दोन्ही देशांनी संयुक्तपणें सैन्य मागे घेण्याचा निर्णय करणं युक्त ठरेल. या दोन देशांतला सीमा-रेषेचा प्रश्न अनिर्णीत असला तरीहि अक्साइ चीनमधील रस्त्यावरून चीनच्या नागरिकांना वाहतूक करतां येईल, अशी सवलतहि त्यांनी देऊं केली; परंतु पंडितजींनी देऊं केलेली ही सवलत चीननं धुडकावून लावली. आम्ही आमच्या हद्दींत बांधलेल्या रस्त्यावरून वाहतूक करण्याला भारताची संमति हवीच कशाला, असा याबाबत चीनचा पवित्रा होता. इथपासून या दोन्ही देशांच्या संबंधांत तणाव निर्माण झाला.

त्यांतूनच २१ जुलैला या दोन देशांच्या सैनिकांमध्ये चकमक उडाली. चीननं त्यासंबंधीहि निषेध नोंदवला आणि भारताबरोबर युद्ध करण्याची चीनची इच्छा नसून उभयतांनी वाटाघाटींच्या मार्गानंच सीमेचा प्रश्न सोडवावा अशी आपली इच्छा कळवली; परंतु पं. नेहरूंनी चीनच्या या भूमिकेस दि. २६ जुलैला प्रथमदर्शनीं नकार

दर्शवला. चीनकडून निर्माण झालेल्या आक्रमणाच्या आव्हानाला भारत समर्थपणें तोंड देऊं शकेल अशी खात्री करून घेतल्यानंतर सीमा-रेषेविषयी भारत चर्चेच्या व वाटाघाटींच्या मार्गानं जाण्यास तयार असल्याचंहि त्यांनी स्पष्ट केलं.

चीननं कबजा केलेल्या १२ हजार चौरस मैलांच्या क्षेत्रापैकी २५०० चौरस मैलांचं क्षेत्र भारतानं परत मिळवलं आहे, असांहि पं. नेहरूंनी १९६२ च्या ऑगस्टमध्ये राष्ट्राला उद्देशून सांगितलं. त्याचबरोबर आघाडीच्या भागांत भारतानं उभारलेले लष्करी तळ हे कायमचे धोक्यांत असून, चीनकडून त्यांच्यावर मोठ्या प्रमाणांत कोणत्याहि क्षणाला हल्ला होण्याची शक्यता आहे, अशी जाणीवहि त्यांनी देऊन ठेवली; परंतु त्याबद्दल ते निश्चिंत होते. कारण भारतानं पुढची झेप घेण्याचं धाडस करून चीनकडून भारताच्या भूमीवर होणारं आक्रमण थोपवलं होतं.

त्या वर्षाच्या सप्टेंबरच्या ९ तारखेला पं. नेहरू हे कॉमनवेल्थ कॉन्फरन्ससाठी लंडनला रवाना झालेले असतांना, संरक्षणमंत्री कृष्णमेनन आणि त्यांच्या सल्लागारांनी थॉंग-ला या ठाण्यावर चढाई करून तें हस्तगत करण्याचा निर्णय केला; परंतु या चढाईबाबत वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांमध्ये एकमत होऊं शकलं नाही. लेफ्टनंट जनरल उमरावसिंग हे चढाईबाबत उत्सुक नाहीत असं आढळतांच, कृष्णमेनन यांनी मग नेफामधल्या लष्करी हालचाली करण्याच्या संदर्भात कांही आकस्मिक निर्णय केले आणि त्या भागासाठी लेफ्टनंट जनरल कौल यांची प्रमुख म्हणून नियुक्ति केली. पं. नेहरू २ ऑक्टोबरला लंडनहून परतल्यानंतर कृष्णमेनन यांच्या निर्णयास त्यांनी पाठिंबाच दिला.

ले. ज. कौल हे अतिउत्साही अधिकारी होते. मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन वरचं पद हस्तगत करण्याची त्यांच्या मनांत महत्त्वाकांक्षा होती. ले. ज. कौल यांनी नव्या जागेचीं सूत्रं स्वीकारतांच थॉंग-ला हें ठाणं हस्तगत करण्याची आखणी त्यांनी केली. १० ऑक्टोबर हा दिवसहि त्यासाठी निश्चित केला. एका विवक्षित मोक्याच्या जागेचा कबजा घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. परंतु चीनचे लष्करी अधिकारीहि जागे होते. त्यांनी भारताच्या लष्करी ठाण्यांवर निकराचा हल्ला चढवला आणि भारताच्या लष्कराची कोंडी केली. थॉंग-ला ठाणं हस्तगत करणं आणि चीनच्या लष्कराशीं सामना देणं किती कठीण आहे हें ले. ज. कौल यांना उमगलं, किंबहुना तें काम आपल्या आवाक्याबाहेरचं आहे असं लक्षांत आल्यानं त्यांनी दिल्लीला ही वस्तुस्थिति कळवून ते मोकळे झाले. या चकमकींत भारताचे सात जवान कामास आले होते.

नेफांत निर्माण झालेल्या धोक्यामुळे दिल्ली अस्वस्थ बनली. पं नेहरूंनी ११ ऑक्टोबरलाच आपल्या निवासस्थानीं बोलावलेल्या खास बैठकींत या परिस्थितीचा विचार झाला. दरम्यान ले. ज. कौल हे दिल्लीला परतले होते. नेफामधल्या परिस्थितीचा अतिशय निराशाजनक अहवाल त्यांनी दिल्लींत सादर केला. अखेर अनिर्णीत स्वरूपांतच ही बैठक संपवण्यांत आली. पुढे काय करावं याचा निर्णय वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनीच

करावा असं पं. नेहरूंनी सुचवलं. सरसेनापति थापर यांनी मग त्यानुसार दुसऱ्या दिवशीं भारतानं थोला या ठाण्याच्या रोखानं कूच करावी असा सल्ला दिला.

पं. नेहरू हे त्यानंतर सिलोनच्या भेटीसाठी जाणार होते. तीन दिवसांचा त्यांचा हा दौरा होता. पंडितजी सिलोनकडे जायला निघतांच, दिल्लीच्या पालम विमानतळावर पत्रकारांनी त्यांना गाठलं आणि नेफामधल्या भारतीय लष्कराला कांही खास आज्ञा देण्यांत आल्या आहेत काय, अशी पृच्छा केली. "सीमेवरील भारताचा भाग हा मुक्त करा" एवढीच आमची आज्ञा आहे, असं पंडितजींनी उत्तर दिलं आणि "मुक्तीचा दिवस मी निश्चित करूं शकत नाही, तें काम लष्कराचं आहे" अशी पुस्तीहि त्याला जोडली.

दुसऱ्या बाजूला ऑक्टोबरमध्ये चीननं भारताच्या सरहद्दीवर लागोपाठ हल्ले सुरू केले आणि त्या प्रत्येक ठिकाणीं भारताचा पाडाव होत राहिला. नेफाचे लष्करप्रमुख ले. ज. कौल आजारी झाल्यामुळे त्यांनी दिल्लीला तळ ठोकला. कौल हे आजारी होते, तरी त्यांनी आपल्या अधिकाराचीं सूत्रं दुसऱ्या कुणा अधिकाऱ्याच्या हातीं दिली नाहीत. दिल्लींतल्या निवासस्थानीं बसूनच ते लष्कराला हुकूम देत राहिले. २५ ऑक्टोबरपर्यंत त्यामुळे भारताच्या लष्कराची मोठीच शोचनीय अवस्था निर्माण झाली तेव्हा कुठे मे. ज. हरबक्षसिंग यांची कौल यांच्या जागेवर हंगामी नेमणूक करण्यांत आली.

या सर्व परिस्थितीमुळे पं. नेहरू हे कमालीचे निराश बनले. कृष्णमेनन आणि वरिष्ठ लष्करी अधिकारी मात्र अजून उमेद बाळगून होते. असं असलं तरी, चिनी लष्कराकडून भारताचा मोठ्या प्रमाणांत पाडाव होऊं लागतांच कृष्णमेनन यांच्यावर टीका सुरू झाली. मेनन हे पं. नेहरूंची दिशाभूल करत आहेत अशी कॉंग्रेस-पक्षाच्या खासदारांचीच टीका होती. २३ ऑक्टोबरला त्यांनी या टीकेला तोंड फोडलं. परंतु पं. नेहरू हे या टीकेशीं सहमत नव्हते. भारत-चीन सीमेवर निर्माण झालेल्या गंभीर परिस्थितीला कृष्णमेनन हे एकटेच जबाबदार नाहीत असं पंडितजींचं मत होतं. झाल्या-गेल्या गोष्टीची चिकित्सा करण्याची ही वेळहि नव्हे, असं त्यांचं सांगणं होतं. परंतु मेनन यांच्याविरुद्ध देशांत सर्वत्रच टीकेचं काहूर उठल्यामुळे तेहि अस्वस्थ बनले आणि संतापानं त्यांनी संरक्षण-मंत्रिपदाचा राजीनामा ३० ऑक्टोबरला पं. नेहरूंकडे सुपूर्त केला. प्राप्त परिस्थितींत मग पं. नेहरूंनी दुसऱ्या दिवशीं संरक्षणखातं स्वतःच्याच ताब्यांत घेतलं. मेनन यांचा राजीनामा मात्र त्यांनी मंजूर केला नव्हता.

संरक्षणखातं आणि कृष्णमेनन याबाबत त्या काळांत मोठाच पेच निर्माण झाल्यामुळे त्याचा विचार करण्यासाठी 'नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिल' या धोरणात्मक निर्णय ठरवणाऱ्या देशांतल्या सर्वश्रेष्ठ यंत्रणेची दिल्लीला ४ व ५ नोव्हेंबरला बैठक आयोजित करण्यांत आली. देशांतल्या सर्व राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना या बैठकीसाठी पाचारण करण्यांत आलं होतं. ४ नोव्हेंबरच्या संध्याकाळीं पं. नेहरूंनी कांही राज्यांच्या मुख्य मंत्र्यांना भारत-चीन सीमावादाची आणि त्यांतून निर्माण झालेल्या परिस्थतीची चर्चा

करण्यासाठी खास पाचारण केलं. या बैठकीला के. कामराज, संजीव रेड्डी, प्रतापसिंग कैरों, बिजू पटनाईक आणि यशवंतराव चव्हाण हे उपस्थित होते. पंतप्रधानांच्या दिल्लींतल्या 'साऊथ ब्लॉक'मधील कार्यालयांत, त्या दिवशीं रात्रीं उशिरापर्यंत ही चर्चा झाली.

संरक्षणमंत्री कृष्णमेनन यांच्या बाबतींत देशांत जें मत व्यक्त होत राहिलं होतं त्याबाबत या बैठकींत बरीच चर्चा झाली. मेनन यांना मंत्रिमंडळांतून दूर करण्यांत यावं असं नव्हे, परंतु पक्षांतल्या लोकांकडून आणि देशांतल्या जनतेकडून जें मत व्यक्त केलं जात आहे त्याकडे पंतप्रधानांना दुर्लक्ष करतां येणार नाही, असंच या मुख्य मंत्र्यांनी पंडितजींना ऐकवलं.

मुख्य मंत्र्यांकडून हें ऐकतांच पंडितजी कांहीसे विचारमग्न बनले. निर्णय करणं त्यांना अवघड ठरलं. मेनन यांचे निर्णय चुकलेले नाहीत असं प्रथमपक्षीं त्यांनी मुख्य मंत्र्यांना पटवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी त्यांना पुढे असंहि ऐकवलं की, "पहा, एकदा आपण, लोक म्हणतात तें बरोबर आहे असं मानलं आणि त्यांच्या मागणीला शरण गेलों, तर न जाणो, उद्या ते माझ्या राजीनाम्याचीहि मागणी करतील! मला त्याची पर्वा नाही म्हणा, परंतु या पद्धतीनं आपण कुठवर पोंचणार आहोंत?"

बैठकींत बरीच उलटसुलट चर्चा झाली आणि अखेरीस, पंतप्रधानांनी कोणताहि निर्णय केला, तरी मुख्य मंत्री हे त्यांच्याबरोबरच रहातील, एवढाच त्या बैठकीचा निष्कर्ष ठरला. मात्र काँग्रेस-पक्षामध्ये अधिक प्रक्षोभ होणार नाही याची काळजी घेतली जावी असं पं. नेहरूंना सुचवण्यास मुख्य मंत्री विसरले नाहीत.

यशवंतराव आणि कृष्णमेनन यांची दाट मैत्री होती. मेनन यांना मंत्रिमंडळांतून दूर करण्यांत यावं यासाठी त्यांच्या मनाची तयारी नव्हती. मेनन यांच्याबद्दलच्या चव्हाणांच्या मनांतील आदराच्या भावना पंडितजी जाणून होते. मेनन हे मुंबई लोकसभा मतदार-संघांतून निवडणूक लढवत असतांना, पंडितजींना त्यांच्या विजयाबद्दल काळजी होती; परंतु यशवंतरावांनीच त्या वेळीं मेनन यांना विजयी करण्याबद्दलची खात्री पंडितजींना दिली होती.

५ नोव्हेंबरला संध्याकाळीं यशवंतराव दिल्लीहून मुंबईस येण्याला निघाले. त्यांना संरक्षण-फंड जमा करायचा होता आणि त्याहीपेक्षा, चीनच्या आक्रमणामुळे हवालदिल बनलेल्या नागरिकांना दिलासा देऊन त्यांची उमेद टिकवून धरण्याचं काम त्यांच्या समोर होतं. मेनन यांनी राजीनामा सादर केला होता आणि त्यानंतर दोन दिवस पंतप्रधानांनी मुख्य मंत्र्यांशीं चर्चा करून कानोसा घेतला होता. आता कांही तरी अंतिम निर्णय करण्याची गरज होती. लालबहादूर शास्त्री हे पं. नेहरूंच्या खास विश्वासांतले सल्लागार होते. या दोघांनी मग ६ नोव्हेंबरला नव्या संरक्षणमंत्र्याच्या निवडीबाबत खलबत केलं. देशांतले त्या काळांतले केंद्रीय मंत्रिमंडळांतील मंत्री, निरनिराळ्या राज्यांचे मुख्य मंत्री यांची नामावलि तपासतां तपासतां नेहरू-शास्त्रीजी यशवंतराव चव्हाण यांच्यापर्यंत पोंचले आणि तिथेच थांबले. संरक्षणमंत्रिपद चव्हाणांकडे सुपूर्त करण्याबाबत या दोन्ही ज्येष्ठ

नेत्यांचं एकमत झालं होतं आणि म्हणूनच त्या दिवशीं पं. नेहरूंनी तातडीनं मुंबईला फोन करून यशवंतरावांची अनुमति विचारली होती. निश्चित निर्णय अजून व्हायचा होता. यशवंतरावांचा होकार किंवा नकार एवढंच पं. नेहरूंना जाणून घ्यायचं होतं.

दरम्यान ६ नोव्हेंबरलाच संसदीय काँग्रेस-पक्षाच्या कार्यकारिणीची बैठक दिल्लीला महावीर त्यागी यांच्या निवासस्थानीं भरून त्यांनी पं. नेहरूंकडे एक गुप्त खलिता रवाना केला. मेनन यांच्या राजीनाम्याची मागणी करणारं तें पत्र होतं.

गोष्टी आता पुढच्या थराला गेल्या होत्या. दुसऱ्या दिवशीं पक्षाच्या कार्य-कारिणीची बैठक होणार होती. या बैठकीसाठी पं. नेहरूंचं आगमन होईल तेव्हा कोणाहि सभासदानं आदर व्यक्त करण्यासाठी उठून उभं रहायचं नाही, उलट सर्वांनी माना खाली घालून बसून रहायचं आणि पंडितजींनी याबद्दल कांही विचारणा केल्यास महावीर त्यागी यांनीच त्यांना उत्तर द्यायचं, असंहि या मंडळींनी ठरवलं.

दुसऱ्या दिवशीं कार्यकारिणीच्या बैठकींत, मेनन यांचा राजीनामा मागणाऱ्या त्या पत्राबद्दल पं. नेहरूंनी तीव्र नापसंती व्यक्त केली. इतकंच नव्हे तर, मेनन यांच्या बाजूनं त्यांनी समर्थन केलं आणि " तुम्हांला माझं नेतृत्व अमान्य असेल, तर हा घ्या माझा राजीनामा " असं ते संतापानं बोलले.

कार्यकारिणीचे सदस्य शांत होते. नेहरूंनी संतापानं राजीनाम्याची तयारी दर्शवलेली पाहून, " काय, मोतीलाल नेहरू यांचाच पुत्र एवढ्या संतापानं बोलतोय्र काय ? " असं महावीर त्यागी यांनी नेहरूंकडे पाहून एक वाक्य उच्चारलं. त्यागी यांनी मग पुढे अशीहि पुस्ती जोडली की, भारताच्या पूर्व-सीमेवर अगोदरच बाका प्रसंग निर्माण झालेला आहे, अशा स्थितींत राजीनाम्याची धमकी देऊन देशांतर्गत समस्या तुम्हांला निर्माण करायची आहे का ?

हें सर्व बोलून झाल्यावर त्यागी यांनी दिलगिरी व्यक्त केली. पं. नेहरू मात्र या बैठकींत मेनन यांचं समर्थनच करत राहिले. मेनन यांचं एकसारखं समर्थन केलं जात आहे असं पाहून कार्यकारिणींतल्या सभासदांमध्ये चुळबुळ सुरू झाली. त्यागी यांचं बोलून झालं होतं. आता दुसरे एक सभासद पुढे सरसावले आणि त्यांनी नेहरूंना परखडपणें ऐकवलं, " ठीक आहे, आज मेननची पाळी आली आहे, उद्या ती तुमच्यावर येईल ! "

कार्यकारिणीच्या सभासदांचा हा पवित्रा पाहून पं. नेहरूंना मोठाच धक्का बसला. परिणामीं दुसऱ्याच दिवशीं मेनन यांचा राजीनामा स्वीकारण्यांत आला असल्याचं नेहरूंनी जाहीर केलं.

दिल्लींत या उलथापालथी घडत असतांना, इकडे मुंबईंत यशवंतराव मात्र मनाच्या द्विधावस्थेंत सापडले होते. एक प्रामाणिक काँग्रेस-कार्यकर्ता आणि पं. नेहरूंचा अनुयायी म्हणून त्यांनी सुचवलेल्या कामगिरीचा स्वीकार करण्यास त्यांची तयारी होती. परंतु मुंबईचा त्याग करण्यास त्यांच्या मनाची तयारी होत नव्हती. समर्थ मुख्य मंत्री म्हणून

त्यांची प्रतिमा महाराष्ट्रांत निर्माण झालेली होती. उलट दिल्लींतलं राजकीय वातावरण त्यांना नवीन होतं.

पं. नेहरूंनी, फोनवरून बोलतांना खाजगी, गुप्त अशा शब्दांत उल्लेख केलेला असला, तरी त्या संबंधांत पत्नीशीं बोलावं लागेल अशी यशवंतरावांनी सोडवणूक करून घेतलीच होती. त्यानुसार पत्नी सौ. वेणूबाईंचा सल्ला त्यांनी विचारला तेव्हा या नव्या बदलाबद्दल त्यांना फारसा उत्साह, औत्सुक्य नसल्याचंच आढळून आलं. मुंबईंत स्थिर बनलेल्या आयुष्यांत पुन्हा बदल घडवण्याची सौ. वेणूबाईंच्या मनाची तयारी कदाचित् नसावी. यशवंतरावांच्या मातोश्री विठाई याहि आता वृद्ध झाल्या होत्या. त्यांचा एकच पुत्र – यशवंतराव – आता त्यांना उरला होता. यशवंतरावांनी मुंबईत राहून आता आईच्या प्रकृतीची काळजी घ्यावी असंहि सौ. वेणूबाईंना सुचवायचं असावं. एक गोष्ट खरी की, त्या परिस्थितींत यशवंतरावांना निर्णय करणं कठीण ठरलं. दिल्लीची हाक आली म्हणून जायचं, तर वृद्ध मातेला मुंबईत ठेवूनच जावं लागणार होतं. सौ. वेणूबाईंच्या आणि त्यांच्या भावना जणू एकच होत्या.

परंतु आता विचार करायला अवधीच उरला नव्हता. कारण पुढच्या दोन-तीन दिवसांतच पं. नेहरूंचा निरोप त्यांना फोनवरून मिळाला. "ताबडतोब दिल्लीस या!" अन् १० नोव्हेंबरला यशवंतराव दिल्लीला पोंचलेहि. विमानतळावरून ते थेट पंडितजींच्या निवासस्थानींच गेले. पं. नेहरू आणि लालबहादूर शास्त्री त्यांची वाट पहात थांबलेच होते.

या पहिल्या भेटींत यशवंतरावांनी या दोन्ही नेत्यांसमोर आपलं मन मोकळं केलं. पं. नेहरूंनी एक निर्णय करून त्यांच्याबद्दल फार मोठा विश्वास दाखवला होता. यशवंतरावांनी तें कृतज्ञतेनं बोलून दाखवलं आणि त्याचबरोबर, मुंबईत असतांना त्यांच्या मनांत घोळत राहिलेल्या घरगुती समस्याहि निवेदन केल्या.

संरक्षणाच्या प्रश्नाचं आपल्याला कांही ज्ञान नाही आणि देशभक्तीशिवाय अन्य कुठलीहि पात्रता आपल्याजवळ नाही, असंहि त्यांनी पंडितजींच्या नजरेस आणलं.

"संरक्षणविषयक समस्यांचं ज्ञान करून घेण्याला मला कांही काळ खर्च करावा लागणार आहे." – चव्हाण.

"मला त्याची कल्पना आहे; परंतु मला खात्री आहे, तें सर्व तुम्ही लवकरच आत्मसात कराल. मला इथे, राजकीय नेतृत्व देईल असं कुणी हवं आहे. तुम्ही दिल्लीला असणं माझ्या दृष्टीनं आवश्यक आहे." – नेहरू.

"दिल्लीला येण्याची माझी तयारी आहे. मी आजची रात्र दिल्लींत मुक्काम करणार आहे. अन् उद्या मुंबईला परतणार आहे. मला वाटतं, आपण आपल्या निर्णयाबद्दल पुन्हा एकदा विचार केलेला बरा. खरोखरीच मी इथे यायला पाहिजे का, याचा विचार करा अन् मला सांगा. विमानतळाकडे जातांना मी उद्या पुन्हा आपली भेट घेईन आणि मगच मुंबईस जाईन." – चव्हाण.

" आता अधिक विचार करावा असं कांही उरलेलं नाही. संरक्षणमंत्रिपद मी तुम्हाला बहाल करतोय् हें पाहून टी. टी. कृष्णम्माचारी बरेच खवळले आहेत. मीं माझा निर्णय केलेला आहे. " – नेहरू.

संरक्षणखातं यशवंतरावांकडे देण्याचा निर्णय पं. नेहरूंनी केल्यामुळे टी. टी. कृष्णम्माचारी यांची त्या वेळीं फार मोठी निराशा झाली होती. प्राप्त परिस्थितींत तें खातं आपल्या हातीं येईल अशी त्यांची अपेक्षा होती. दुसरे एक मुख्य मंत्री बिजू पटनाईक हेहि संरक्षणमंत्रिपदाची अपेक्षा त्या वेळीं बाळगून होते. पं. नेहरूंनी तेंहि यशवंतरावांना सांगितलं; आणि मीं सर्व विचार करूनच निर्णय केला आहे, तुम्हीं दिल्लींत असायला हवं हा माझा निर्णय पक्का आहे, असंहि पंडितजींनी त्याच बैठकींत मोकळेपणानं सांगून टाकलं.

तरी पण दुसऱ्या दिवशीं यशवंतराव पंडितजींच्या निवासस्थानीं – 'तीनमूर्ति' इथे गेले. लालबहादूर शास्त्रीहि तिथेच होते. नेहरू त्या वेळीं मनाच्या वेगळ्याच अवस्थेंत होते. मनावरील ताण वाढलेला असल्याचं स्पष्ट दिसत होतं.

" अरे, तुम्ही अजून मुंबईला गेला नाहीत ? " यशवंतरावांना पहातांच नेहरू गरजले.

" विचार कसला करतां ? तुम्हांला इथे ताबडतोब परत यायचं आहे " – नेहरू.

बोलण्यासारखं आता यशवंतरावांजवळ कांही उरलंच नव्हतं. निर्णय झाला होता. अधांतरी असं आता कांही राहिलं नव्हतं. चव्हाण मुंबईला परतले ते मनाचा हिय्या करूनच ! अन् मागोमाग १४ नोव्हेंबरला यशवंतराव संरक्षणमंत्री बनल्याचं पं. नेहरूंनी दिल्लींत जाहीरहि केलं.

संरक्षणमंत्रिपदाचीं सूत्रं यशवंतराव चव्हाण यांच्याकडे सुपूर्त केल्याची घोषणा झाली. त्यानंतर तीनच दिवसांनी १७ नोव्हेंबरला चीननं, सहा ब्रिगेडच्या प्रचंड लष्करी बळानिशी नेफा भागांत पुन्हा एकदा जोराची मुसंडी मारली. सेला पास, बोमदि-ला सर करून चीनचं सैन्य आसामच्या टेकड्यांच्या पायथ्यापर्यंत पोंचलं आणि ब्रह्मपुत्रा नदीवरील तेजपूर गिळंकृत करण्याच्या पवित्र्यांत उभं ठाकलं. ब्रह्मदेशाच्या बाजूनं चीननं आणखी एक नवी आघाडी उघडली आणि वालाँगच्या रोखानं कूच करायला सुरुवात केली. भारतीय सैन्यानं या वेळीं प्राणपणानं झुंज दिली, परंतु शत्रुसैन्यापुढे त्यांना माघार घ्यावी लागली. भारताच्या हद्दींत ४० मैल आंत चीननं मुसंडी मारली होती.

वालाँग पडल्याची खबर तर १८ नोव्हेंबरला दिल्लीला पोंचली. त्यासरशीं दिल्ली गडबडली. गंभीर आणि तितक्याच दुःखद घटना एकामागोग एक घडत राहिल्या होत्या. पं. नेहरू सचिंत बनले. देशाचं स्वातंत्र्य टिकवण्याची मूलभूत समस्याच त्यांच्यासमोर निर्माण झाली होती. पं. नेहरूंनी मग अमेरिकेचे तरुण अध्यक्ष केनेडी यांच्याकडे धांव घेतली आणि भारताला हवाई साहाय्याची आवश्यकता असल्याचा संदेश पाठवला. भारतांतलीं मोठीं शहरं आणि औद्योगिक वसाहती, विशेषतः गंगेच्या खोऱ्यांतल्या

शहरांचं आणि औद्योगिक वसाहतींचं रक्षण होण्याच्या दृष्टीनं पं नेहरूंनी प्रे. केनेडी यांचं सहकार्य मागितलं होतं.

त्या काळांत दिल्लींत आणि देशांत सर्वत्र बबराट निर्माण होऊन अफवांचा सुकाळ झाला होता. चीनचं सैन्य तेजपूरचा ताबा घेऊन, दिल्लीवर ५०० छत्रीधारी सैनिक उतरवणार आहे, ले. ज. कौल यांना चीननं युद्धकैदी म्हणून ताब्यांत घेतलं आहे, या आणि अशा प्रकारच्या अनेक अफवांचे ढग जमा झाले होते.

१९ नोव्हेंबरला सरसेनापति थापर हे तेजपूर इथून दिल्लीला परतले आणि दिल्लीला पोंचतांच त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा पंतप्रधान पं. नेहरू यांच्याकडे दिला. थापर हे हंगामी म्हणूनच काम पहात होते. त्यांनी राजीनामा सादर करतांच, पं. नेहरूंनी त्या संदर्भांत राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन् यांच्याशीं चर्चा केली. लष्करासाठी आता नवा सरसेनापति निश्चित करावा लागणार होता. डॉ. राधाकृष्णन् यांनी या चर्चेच्या वेळीं जनरल जे. एन्. चौधरी यांची नियुक्ति त्या जागेवर करण्याविषयी पंडितजींना सुचवलं. इतकं घडतांच पंतप्रधानांनी मग दुसऱ्या दिवशीं लोकसभेंत जाहीर केलं की, सरसेनापति थापर यांना प्रकृतीच्या कारणासाठी रजेवर पाठवण्यांत येत असून सरसेनापति म्हणून त्या जागेचीं सूत्रं जनरल चौधरी हे स्वीकारत आहेत. ले. ज. कौल हेहि मग राजीनामा सादर करून मोकळे झाले.

यशवंतराव चव्हाण हे २० नोव्हेंबरला संध्याकाळीं दिल्लींत पोंचले. त्यापूर्वी सरसेनापतीमध्ये बदल झाला होता. संरक्षणखात्याचे सचीवहि नवे आले होते. संरक्षणमंत्रिपदाचीं सूत्रं हातीं घेण्यासाठी यशवंतराव दिल्लीला पोंचले होते, परंतु दिल्लींत पडद्यामागे झालेला हा बदल आणि भारत-चीन सीमेवरील घटना यांपैकी कशाचीच त्यांना कल्पना नव्हती. त्यानंतरच्या पुढच्या दोन-तीन दिवसांतहि घटना इतक्या झपाट्यानं घडत राहिल्या की, आपण फार लवकर दिल्लीला आलों, असं यशवंतरावांना वाटूं लागलं. महाराष्ट्रांतून निघण्यापूर्वी त्यांना लोकशाही प्रथेचं पालन करणं आवश्यक होतं. विधानसभेचा नवा नेता निवडणं, त्यांच्या हातीं सूत्रं देणं हें तितकंच महत्त्वाचं होतं. हे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतरच ते २० नोव्हेंबरला दिल्लीला पोंचले. महाराष्ट्रांत, मारोतराव कन्नमवार यांच्याकडे मुख्यमंत्रिपदाचीं सूत्रं त्यांनी सुपूर्त केलीं होतीं.

दिल्लींत पोंचतांच विमानतळावरून ते थेट 'तीनमूर्ति' या पं. नेहरूंच्या निवास-स्थानींच गेले. पं. नेहरूंचा आत्मविश्वास दांडगा होता, परंतु त्या दिवशीं ते बरेच सचिंत बनलेले होते. पं. नेहरूंनी मग, दिल्लींत नव्यानं घडलेल्या घटनांची माहिती त्यांना सांगितली आणि, सरसेनापति थापर यांचा राजीनामा कोणत्या परिस्थितींत मान्य करावा लागला याचीहि माहिती दिली. नेफामधील परिस्थितीचीहि त्यांनी कल्पना दिली. चीनचं लष्कर कोणत्याहि क्षणाला, हिमालय उतरून भारताच्या भूमीवर पाय ठेवील अशी त्या वेळची स्थिति होती.

याच सुमारास इंदिरा गांधी यांनी आसाम-सीमेचा दौरा निश्चित केला होता. म्हणून मग यशवंतरावांनी, पं. नेहरूंशीं चर्चा केल्यानंतर लगेचच इंदिरा गांधींशीं चर्चा केली. त्या रात्रीं यशवंतराव दिल्लींतल्या मुक्कामाच्या ठिकाणीं पोंचले ते कांहीशा गोंधळलेल्या मनःस्थितींतच! दिल्लींत मोरारजी देसाई यांच्याकडे मुक्काम करण्याची त्यांची प्रथा असायची. पं. नेहरूंचा निरोप घेऊन निघाल्यावर ते मोरारजींभाईंकडेच गेले. आपलं भवितव्य आणि नवीन जबाबदारी यांच्या विचारांनीच त्या वेळीं त्यांच्या मनांत गर्दी केली होती. ती सारी रात्र अस्वस्थतेंत जावी असाच जणू संकेत असावा. रात्रीं ११ वाजतां बिजू पटनाईक यांचा यशवंतरावांना अचानक फोन आला. पटनाईक यांना त्यांच्याशीं कांही चर्चा करायची होती. त्याप्रमाणे मध्यरात्रीच्या सुमारास पटनाईक येऊन दाखल झाले. पटनाईक यांनी गप्पागोष्टी करतांना संरक्षणविषयक विविध समस्यांची माहिती देण्याचा प्रयत्न केला. 'लष्करी डावपेंच' म्हणून जे म्हणतात त्या बाबतींतहि यशवंतरावांना सज्ञान करावं, असा त्यांचा हेतु होता. चर्चा बराच वेळ सुरू होती; म्हणजे पटनाईक बोलत राहिले होते. बोलतां बोलतां यशवंतरावांना चक्रावून सोडणारा एक प्रश्न मध्येच त्यांनी विचारला.

"तुम्ही दिल्लीला, इतक्या लांबवर आलांत कशाला?"

एवढा प्रश्न विचारूनच ते थांबले नाहीत. त्यांनी पुढे अशीहि खास माहिती सांगितली की, चीनचं सैन्य झपाट्यानं पुढे सरकत आहे, अन् कदाचित् मुंबईला धोका निर्माण होऊन मुंबई हीच युद्धभूमि बनण्याची शक्यता आहे. अशा वेळीं तुम्ही मुंबईतच असलं पाहिजे.

यशवंतराव त्या दिवशीं संध्याकाळींच दिल्लीला पोंचले होते. संरक्षणमंत्री म्हणून अजून त्यांचा शपथविधि व्हायचा होता. पटनाईक यांची अशी समजूत असावी की, चव्हाण हे अजूनहि संरक्षणमंत्री बनण्याचा आपला विचार बदलतील आणि आल्या वाटेनं मुंबईला परत जातील! त्यासाठीच त्यांनी रात्रीं त्यांना गाठलं होतं आणि बरंच कांही ऐकवलंहि होतं.

यशवंतराव हेहि कांही राजकारणांत कच्चे नव्हते. संरक्षणमंत्रिपदाची जबाबदारी स्वीकारून दिल्लीला येण्यास मी राजी नव्हतों, असंच त्यांनी सुरुवातीला पटनाईक यांना सांगितलं. अन् लगोलग अशी चपराकहि दिली की, संरक्षणमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारण्याचा मीं निर्धार केला आहे आणि या आणीबाणीच्या वेळीं राष्ट्राकरिता जेवढं जास्तींत जास्त करतां येईल तेवढं करण्याचा माझा निर्णय आता पक्का झाला आहे, असंच त्यांनी बिजू पटनाईक यांना सुनावलं.

बिचारे पटनाईक! मध्यरात्र होऊन गेली होती. पटनाईकहि मग मुकाटपणें घरीं परतले.

यशवंतरावांना तो संपूर्ण आठवडा घाईगडबडीचा घालवावा लागला होता. दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून जाण्याचं जाहीर झाल्यापासूनच, निरोप-समारंभांची गर्दी

उडाली होती. महाराष्ट्रांतला नेतृत्वाचा प्रश्न मार्गी लावायचा होता. चर्चा, बैठकी, समारंभ सारखे सुरू होते. आता दिल्लींत आल्यापासूनहि अजून त्यांना विश्रांति मिळाली नव्हती. त्यामुळे पटनाईकांना निरोप देतांच पलंगावर ते विश्रांतिसाठी पहुडले.

तो दिवस, आश्चर्याचे एकामागून एक धक्के देण्यासाठीच उगवला असावा. संरक्षण-मंत्रिपदाचीं सूत्रं हातीं घेण्यासाठी दिल्लीला आलेल्या चव्हाणांना एरवीं, पटनाईक-सारख्यांनी मुंबईला परतण्याचा सल्ला कशाला दिला असता! दिल्लीला आल्यापासून सुरू झालेल्या घटनांचा विचार करत करत यशवंतराव झोपेच्या आधीन होतात न होतात तोंच मध्यरात्रीनंतर फोन खणखणूं लागला. हा फोन आला होता प्रेस ट्रस्ट ऑफ इंडियाच्या बातमीदाराकडून आणि त्याला चव्हाणांशींच बोलायचं होतं.

"एक अतिशय महत्त्वाची, तितकीच मजेशीर बातमी आहे, अन् ती फक्त मला तुम्हांलाच सांगायची आहे."

तो बातमीदार फोनवरून बोलत होता.

नव्या संरक्षणमंत्र्यांच्या आगमानाचा मुहूर्त साधून चीनच्या सैनिकांनी आणखी एखादी भयंकर मुसंडी मारली असावी असंच यशवंतरावांच्या मनांत क्षणभर डोकावून गेलं. कांहीशा सचिंतपणानंच त्यांनी या बातमीदाराकडे चौकशी केली अन् बातमीदारानं त्यांना जें ऐकवलं, त्यामुळे तर त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला!

"चीननं युद्धसमाप्ति जाहीर केली आहे अन् तीहि एकतर्फी!"

बातमीदारानं फोनवरून माहिती दिली. दिल्लीला पोंचल्यापासून सुरू झालेल्या नाटकाचा हा उच्चांक-बिंदु होता. भरती आणि ओहोटीच्या क्षणाची एकाच वेळीं अनुभूति देणारी अशी यशवंतरावांच्या जीवनांतली ती संध्याकाळ ठरली. चीननं एकतर्फी युद्धसमाप्ति केल्याचं पं. नेहरू आणि लालबहादूर शास्त्री यांना रात्र उलटून गेल्यावर दुसऱ्या दिवशींच माहिती झालं. तोच हा दिवस, की ज्या दिवशीं यशवंतरावांचा संरक्षणमंत्री म्हणून शपथविधि झाला.

नेफा आणि लडाखच्या युद्धभूमीस समक्ष भेट देऊन आणि तिथल्या युद्धोत्तर परिस्थितीची माहिती घेऊनच यशवंतरावांनी आपल्या संरक्षणमंत्रिपदाच्या कारकीर्दीचा शुभारंभ केला. या दोन्ही आघाड्यांना त्यांनी भेट दिली. काश्मीर आणि राजस्थानच्या सरहद्दीच्या भेटीहि त्यांनी लगोलग पूर्ण केल्या. युद्धाच्या आघाडीवर लढणाऱ्या आणि तिथेच वास्तव्य करणाऱ्या जवानांच्या, त्यांच्या अधिकाऱ्यांच्या हालअपेष्टा प्रत्यक्षांत पहाव्या आणि मुख्यतः त्यांच्यांत आणि संरक्षण-मंत्रालयांत जवळीक निर्माण करावी, हाच त्यांच्या या भेटीचा प्रमुख उद्देश होता.

या दौऱ्याच्या वेळीं ते जवानांच्या प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणीं गेले, त्यांच्यांतच बसले, गप्पागोष्टी केल्या आणि त्यांच्यासमवेतच खाना घेतला. त्या अगोदरच्या कांही घटनांमुळे लष्करी अधिकारी आणि जवान यांच्यांतल्या आत्मविश्वासाला कांहीसा तडा गेला होता. त्यांच्यांत कमालीची निराशा पसरली होती. आपला अवमान होत असल्याची

भावना लष्कराच्या सर्वच थरांत निर्माण झालेली होती. ही सर्व गोंधळाची परिस्थिति बदलून या सर्वांची हिंमत शाबूत राखण्याचा प्रश्न होता.

संरक्षणखात्याच्या समस्या हा विषय यशवंतरावांना नवा होता. देशाचं संरक्षण होण्याच्या दृष्टीनं लष्कराची कितपत तयारी आहे याचा अंदाज घेतां येणंहि त्यांना कठीण होतं. लष्करी डावपेंचाबाबत दिल्लींत कुणी मार्गदर्शन करील, सहकार्य करील तर त्या दृष्टीनं समोर कुणी दिसत नव्हतं. कारण भारतावर चाल करून येण्यामागे चीनचा निश्चित हेतु कोणता होता याचा दिल्लीलाच अजून थांगपत्ता लागलेला नव्हता. युद्ध-समाप्तीनंतर चीननं जीं पावलं टाकलीं त्यामुळे तर सारेच गोंधळून गेले होते. युद्धाच्या त्या धांवपळींत चीनकडून मोठ्या प्रमाणांत रेटा येतांच भारतीय लष्कराची दाणादाण उडाली होती. माघार घेतांना, आपलीं हत्यारं टाकूनच त्यांना पळ काढावा लागला होता. जवानांनी सोडून दिलेल्या या हत्यारांमध्ये कांही अमेरिकेचीं होतीं, कांही रशियाचीं होतीं. रशियन बनावटीचीं कांही चांगल्या स्थितींतील हेलिकॉप्टर्सहि चिन्यांच्या हातीं लागलीं होतीं. परंतु हीं सर्व हत्यारं आणि यंत्रसामग्री चिन्यांनी तपासून पाहिलीं, त्यांतलीं कांही स्वच्छ केलीं आणि परत जातांना भारताच्या भूमीवर होतीं तिथे ठेवूनच ते परत फिरले होते. भारतीय मुत्सद्यांना मग चिन्यांच्या या डावपेंचाचा अर्थ लावण्यांतच बुद्धि खर्च करत बसावं लागलं.

लोकसभेंत यासंबंधी खुलासा करतांना युद्धसमाप्ति जाहीर केल्यानंतरहि चीन त्या दिवशीं, दुसऱ्या दिवशीं, त्या आठवड्यांत, पुढच्या आठवड्यांत कुठले डावपेंच खेळणार आहे याचा आम्ही विचार करत होतों, असं यशवंतरावांनी सांगितलं.

सर्वच परिस्थिति अनिश्चिततेची असल्यामुळे, उत्तर-सीमेवरील हालचालींकडे करडी नजर ठेवणं आणि न जाणो, आक्रमणाचा प्रसंग पुन्हा निर्माण झालाच तर त्याला तोंड देण्यासाठी सिद्ध रहाणं यासाठी मग सरकारी चक्रं फिरत राहिलीं. त्या वेळीं लष्करी शक्तीचा विस्तार करून, आधुनिक शस्त्रास्त्रांनी लष्कर सुसज्ज बनवणं, डोंगरी मुलखांत लढाई करण्यासाठी म्हणून, त्या पद्धतीच्या लढाईचं शिक्षण घेतलेल्या लष्करी तुकड्या अधिक संख्येनं तयार करणं, आधुनिक पद्धतीच्या युद्धांतले डावपेंच खेळण्यांत तरबेज असलेल्या सैन्याच्या तुकड्या सिद्ध ठेवणं, नवी शस्त्रसामग्री, दळणवळणाच्या अत्याधुनिक सोयी लष्करासाठी उपलब्ध करून देणं अशा प्रकारचं मूलभूत स्वरूपाचं काम या नव्या संरक्षणमंत्र्यांना करावं लागणार होतं.

त्या काळांत खुद्द लष्करांत आणि संरक्षण-मंत्रालयांतहि निरनिराळे गट तयार झालेले आहेत असं यशवंतरावांना प्रथमच दर्शन घडलं. मुख्य मंत्री या नात्यानं त्यांनी प्रशासकीय कामाचा अनुभव घेतला होता. परंतु संरक्षण-मंत्रालयाच्या कामाची, कामाच्या पद्धतीची, त्यांतील बारकावे जाणून घेण्याची संधि त्यांना पूर्वी कधी मिळालेली नव्हती. सरकारचीं जीं निरनिराळीं खातीं असतात त्यामध्ये संरक्षणाचं खातं, त्यांतील कामाचं तंत्र, हें कांही वेगळंच असतं. संरक्षणाची म्हणून कांही कामाची, कामाच्या

आखणीची वेगळी पद्धत असते. या कामाचं स्वरूप वेगळं, समस्या वेगळ्या, समस्यांची व्याप्ति वेगळी, तिथली प्रशासकीय भाषा वेगळी आणि प्रशासनाची तऱ्हाहि वेगळी. यशवंतरावांना या सर्वांची माहिती करून घ्यावी लागणार होती. मुख्य म्हणजे संरक्षणाच्या संदर्भांत, आपण आहोंत कुठे, कमतरता काय आहेत, पल्ला किती गाठावा लागणार आहे याची माहिती असणं आवश्यक होतं. त्यासाठी मग त्यांनी कामाची सारी पद्धतच बदलली. रोज सकाळीं ९॥ वाजतां, लष्कराच्या तिन्ही दलांच्या प्रमुखांची बैठक घेऊन त्यांच्याशीं चर्चा करण्याचा उपक्रम त्यांनी सुरू केला. यांच्या या बैठकीला संरक्षणखात्याचे सचिव आणि संरक्षण-उत्पादनखात्याचे सचिव हे दोघे उपस्थित राहूं लागले.

संरक्षण-प्रश्नाविषयी अशी रोज सकाळीं एक तास चर्चा होत राहिल्यानं या नव्या संरक्षणमंत्र्यांना, संरक्षणविषयक नेमक्या समस्या समजण्याच्या दृष्टीनं मोठा लाभ झाला. सीमेवर मोक्याच्या ठिकाणीं जें सैन्य खडं ठेवलं होतं त्यांना त्यांच्या दैनंदिन गरजेच्या वस्तु, दारूगोळा, शस्त्रास्त्रं यांचा पुरवठा होण्यांत कांही अडचणी आहेत का, कुठे काय घडत आहे, संरक्षणखात्यांतर्गत कांही गुंतागुंत आहे का, दैनंदिन व्यवहारांत कुठे कोंडी निर्माण होत आहे का, निर्माण केली जात आहे का, वगैरेसंबंधीचा तपशील या बैठकीमुळे त्यांच्यासमोर मग येऊं लागला.

भारताच्या संरक्षणदलाचं स्वरूप हें ब्रिटिश अमदानींत तयार झालेलं होतं. प्रत्यक्ष लढणाऱ्या जवानांची संख्या मर्यादित आणि बाजारबुणग्यांचा भरणा अधिक अशी कांहीशी स्थिति होती. लष्करांत ज्यांची भरती करण्यांत आलेली होती त्यांना आवश्यक तें प्रशिक्षण देण्याकडेहि दुर्लक्ष झालेलं होतं. १९५७ मध्ये कृष्णमेनन यांनी, संरक्षण-मंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर त्यांनी या पूर्वीच्या अवस्थेंत बदल करण्याचा प्रयत्न केला, परंतु मेनन यांचं तंत्र कांही वेगळं होतं. त्यांचं स्वतःचं असं कांही एक राजकारण असायचं. त्यांच्या स्वभावाची घडणहि वेगळी होती. त्यांच्या त्या स्वभावामुळे आणि निर्णय करण्याच्या पद्धतीमुळे लष्करामध्ये परस्पर अविश्वास, संशय आणि गटबाजी याला अवसर मिळाला होता. मेनन हे स्वतःहि गटबाजीच्या आहारीं गेलेले होते. १९६२ मध्ये चीनचं आक्रमण झालं त्या वेळीं तर या गटबाजीचं उघड उघड प्रदर्शन झालं. असं असलं तरी लष्करांतले जवान आणि त्यांचे अधिकारी यांची जिद्द अंशमात्रहि कमी झालेली नव्हती, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होती. थिमय्या, जनरल चौधरी, ॲडमिरल कटारी, एअर-मार्शल मुखर्जी, एअर-मार्शल अर्जनसिंग यांसारखे ज्येष्ठ लष्करी अधिकारी हे जगांतल्या कोणत्याहि राष्ट्रांतल्या अधिकाऱ्याच्या तोडीचे, कांकणभर सरसच होते.

कृष्णमेनन यांनी, भारताच्या संरक्षणविषयक प्रश्नांचा मात्र अभ्यास केलेला होता आणि उणिवा भरून काढण्यासाठी अभिमानास्पद असे निर्णयहि केले होते. भारतीय

लष्करासाठी विमानं आणि रणगाडे बनवण्याचा निर्णय हा कृष्णमेनन यांनीच केलेला आहे. मिग–२१ हीं विमानं, सेमी ॲटॉमिक रायफल्स, रणगाडे आदींचं उत्पादन सुरू करण्याचं काम त्यांनी आपल्या कारकीर्दीतच सुरू केलं. यांपैकी रणगाड्यांचं उत्पादन मात्र बराच काळ रेंगाळत राहिलं होतं. संरक्षण-विभागाच्या निरनिराळ्या खात्यांमधील सहकार्याचा अभाव आणि एकूण संशयाचं वातावरण हें याचं प्रमुख कारण होतं.

त्यामुळे लष्कराच्या अधिकाऱ्यांमधील चुरस, एकमेकांचा द्वेष करण्याचं वातावरण नाहीसं करून संरक्षणदल एकजीव बनवणं यावरच यशवंतरावांना प्रारंभींचे कांही महिने, आपलं लक्ष केंद्रित करावं लागलं. ते या कामांत गुंतले असतांनाच, संरक्षणमंत्री म्हणून त्यांच्या अधिकाराचाच प्रश्न या वेळीं निर्माण झाला; आणि खरे संरक्षणमंत्री कोण याची पंतप्रधानांकडून खात्री करून घ्यावी लागली. भारताचे संरक्षणमंत्री म्हणून त्यांचा शपथविधि झाला होता हें खरं, परंतु त्या खात्याचे एकमेव मंत्री या नात्यानं, निर्णय करण्याचा त्यांचा मार्ग बिजू पटनाईक यांनी अडवून धरल्यानं या काळांत यशवंत-रावांना वेगळीच एक डोकेदुखी सुरू झाली.

बिजू पटनाईक हे त्या वेळीं ओरिसा राज्याचे मुख्य मंत्री होते. परंतु केंद्रीय संरक्षण-मंत्रालयाच्या कारभारांतहि ते हस्तक्षेप करत असत. या खात्याचे आपण कुणी प्रमुख आहोंत अशा ढंगानंच ते निर्णय करत असत. केंद्र-सरकारनं याबाबत चव्हाण यांना कधीहि कल्पना दिली नव्हती किंवा त्यांच्याकडे संरक्षणखात्याची कांही कामगिरी सोपवली असल्याची माहिती दिलेली नव्हती. पंतप्रधान पं. नेहरूंचा बिजू पटनाईक यांच्यावर लोभ होता. पटनाईक यांचं मन दुखावण्याला ते तयार नव्हते. पटनाईक यांची चव्हाणांचे सल्लागार म्हणून त्यांनी नियुक्ति केली होती; परंतु पटनाईक हे मात्र स्वतःला संरक्षणमंत्रीच समजूं लागले होते, तशी त्यांची वागणूक सुरू होती.

मी स्वतः खरा संरक्षणमंत्री आहे, असा त्यांचा एकूण पवित्रा होता आणि लोकांनाहि ते तसंच सांगत असत. पटनाईक यांचा हा पवित्रा पाहून यशवंतराव अस्वस्थ बनले. मनांतून ते चांगलेच संतापले. कारण पटनाईक हे जे उद्योग करत, त्यामुळे यशवंतरावांची स्थिति चमत्कारिक होऊं लागली होती. अखेर त्यांनी मग एक दिवस हें गाऱ्हाणं पंतप्रधान पं. नेहरू यांच्यापर्यंत पोंचवलं. "मुंबईहून आपण मला इथे संरक्षणमंत्री म्हणून बोलावलं, परंतु त्या खात्याचं मंत्रिपद आपण मला पूर्णत्वानं दिलेलं नाही," अशी यशवंतरावांनी पंडितजींना स्पष्टपणें आपली व्यथा सांगितली.

पंडितजींचा स्वभाव असा होता की, जीं माणसं त्यांना आवडत, त्यांच्याबद्दल मनांत ते कमालीचं प्रेम बाळगत असत. पटनाईक हे त्यांपैकी एक होते. पंडितजींनी संरक्षणखातं आपल्याकडे घेतलं त्या वेळीं एक मदतनीस म्हणून बिजू पटनाईक यांना त्यांनी जवळ केलं होतं. यशवंतरावांच्या भेटींत पं. नेहरूंनी हें सर्व सांगितल्यानं, त्या वेळीं तरी यशवंतरावांना गप्प बसण्याशिवाय गत्यंतर उरलं नाही.

यशवंतराव तिथून परतले खरे, परंतु संरक्षणखात्याच्या कारभारांत जे अवास्तव हस्तक्षेप वडत राहिले होते त्यामुळे ते पुन्हा अस्वस्थ बनले आणि त्यांनी मग पंडितजींना एक खरमरीत पत्र लिहूनच वस्तुस्थितीची कल्पना दिली.

चव्हाणांचं पत्र वाचून पंडितजी आश्चर्यचकित झाले. त्यांनी त्या संदर्भात मग चव्हाणांना बोलावलं आणि आपलं मन मोकळं केलं. संरक्षणाच्या प्रश्नाविषयी पटनाईक यांनी कांही विचार केला होता आणि त्यांच्या कांही विशिष्ट कल्पना होत्या. त्यांचा उपयोग करून घ्यावा असं पंडितजींना वाटलं म्हणून त्यांनी पटनाईक यांना संरक्षण-मंत्रालयांत थारा दिला होता; परंतु नव्यानं निर्माण झालेली परिस्थिति लक्षांत घेऊन पंडितजींनी यशवंतरावांना मोकळ्या मनानं सांगितलं की, " संरक्षणमंत्री तुम्हीच आहांत, आणि तुम्हीं पत्र वगैरे मला पाठवलं आहे हें विसरून जा. " यशवंतरावांनी रागानं लिहिलेलं तें पत्र मग पंडितजींनी त्यांच्यासमोरच फाडून टाकलं.

संरक्षणमंत्री म्हणून आता यशवंतरावांचा मार्ग खऱ्या अर्थानं मोकळा झाला आणि त्यांनी मग भराभर निर्णय करून त्यांची अंमलबजावणी करण्यास प्रारंभ केला. संरक्षणविषयक समस्यांचा सखोल अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या समित्या स्थापन झालेल्याच होत्या. संरक्षणाच्या संदर्भात देशांतल्या लोकांच्या मनांत जागृति निर्माण व्हावी, आणि समस्या सोडवण्याच्या कामीं लोकांचा सहभाग निर्माण व्हावा याच दृष्टीनं या समित्या स्थापन करण्यांत आल्या होत्या. कारण देशांतली जनता आणि संरक्षणखातं, लष्करांतील जवान, अधिकारी यांच्यांत कांही संपर्कच उरलेला नव्हता. यशवंतरावांना ही परिस्थिति बदलायची होती. देशाचं संरक्षणविषयक धोरण हें केवळ लष्करी हालचालीपुरतं मर्यादित न रहातां हें धोरण देशाचं राजकारण, अर्थ-कारण याच्याशींहि तें संबंधित असलं पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. निरनिराळ्या वस्तूंचं उत्पादन करणारं देशांतलं जें औद्योगिक क्षेत्र आहे त्याचा लष्करासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाशीं संबंध जोडला जावा आणि संरक्षणदलाविषयीची आपली जबाबदारी पार पाडण्याची जाणीव लोकांच्या मनांत निर्माण करण्यावर म्हणूनच त्यांनी भर दिला.

१९६३ साल हें भारतीय लष्कराच्या दृष्टीनं अत्यंत संतप्त हालचालींनी भरलेलं वर्ष ठरलं. संरक्षणाच्या तयारीसाठी अनेकविध योजना कागदावर सिद्ध होत्या, परंतु प्रत्यक्षांत मात्र ८०० कोटींपैकी ६०० कोटि रुपयेच, विकासाच्या कामावर खर्ची पडले होते. चीनच्या आक्रमणामुळे कामाचं सारं वेळापत्रक उद्ध्वस्त झालं होतं. पुढच्या वर्षी म्हणजे १९६४ सालांत मग सरकारनं संरक्षणविषयक गरजांची एक दीर्घकाळ सुरू रहाणारी योजना तयार केली. संरक्षण-मंत्रालयानं त्यासाठी संरक्षणखात्याची म्हणून एक पंचवार्षिक योजना तयार केली. ५ हजार कोटि रुपये खर्चाची ही संपूर्ण योजना होती. २३ मार्च १९६४ ला संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी मग ही योजना लोक-सभेसमोर ठेवली.

या पंचवार्षिक योजनेमध्ये, आधुनिक पद्धतीच्या शस्त्रास्त्रांनी सज्ज असं ८ लक्ष २५ हजार संख्येचं संरक्षणदल सिद्ध करणं, ४५ स्क्वाड्रनचं सर्व तयारीनिशी हवाईदल उभं करणं, नाविकदलांतील जुनीं जहाजं रद्द करून नवीं अत्याधुनिक जहाजं खरेदी करणं त्याचप्रमाणे प्रचंड शक्तीच्या पाणबुड्यांचा ( सबमरिन्स ) संग्रह ठेवणं, देशाच्या सर्व दिशांच्या सरहद्दीवरील रस्त्यांच्या आणि दळणवळणाच्या सोयींमध्ये सुधारणा आणि वाढ करणं, शस्त्रं आणि अस्त्रं यांच्या उत्पादनांत आवश्यक ती वाढ करणं आणि जवानांसाठी प्रशिक्षण, त्यांच्यासाठी दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा साठा आणि संरक्षणाच्या संदर्भांत निश्चित करण्यांत आलेल्या रकमेचा विनियोग सुनियंत्रित करणं, अशा प्रकारची ही भव्य योजना यशवंतरावांनी लोकसभेसमोर सादर केली. त्यांनी आपल्या खात्याच्या योजनेच्या संदर्भांत संसदेंत जें प्रभावी समर्थन केलं त्याचं, त्या काळांत राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रांनी मनापासून स्वागतच केलं.

दरम्यानच्या काळांत, नेफामध्ये स्वीकाराव्या लागलेल्या पराभवाची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी सरकारनं ब्रिगेडियर पी. एस्. भगत आणि मेजर-जनरल हिंडरसन ब्रुक्स यांचं एक चौकशी-कमिशन नेमलं. या पराभवाला कोणत्या व्यक्ति जबाबदार आहेत यापेक्षाहि, भारतीय लष्करांतील कोणती परिस्थिति पराभवाला कारणीभूत ठरली याचा शोध घेण्याचं काम या चौकशी-समितीनं प्रामुख्यानं करावं, अशी सरकारची अपेक्षा होती. या चौकशींतून जे निष्कर्ष निघाले त्यामध्ये युद्ध-आघाडीवरील हालचालींबाबत सरकारला आपलं राजकीय धोरण निश्चित करण्यांतच अपयश आलं असल्याचं चौकशी-कमिशनचं मत असल्याबद्दल नंतरच्या काळांत बोललं जाऊं लागलं. परंतु चौकशी-कमिशनचा अहवाल हा सरकारचा खास गुप्त अहवाल असल्यानं, लोकांसमोर तो कधीच येऊं शकला नाही.

संरक्षणखात्याच्या संदर्भांत त्या काळांत उलटसुलट टीका सुरू होत्या, परंतु या खात्याचा संपूर्ण चेहरा-मोहरा बदलण्यावरच यशवंतरावांनी आपलं सर्व लक्ष केंद्रित केलं होतं. यशवंतरावांना भारताच्या संरक्षण-समस्यांचा आवाका अद्याप आलेला नाही अशी टीका कोणी करूं लागले होते, तर कोणी संरक्षणाच्या संदर्भांत नव्या संरक्षण-मंत्र्यानं कांहीहि नवीन केलेलं नाही असं सांगत होते. लोकसभेमध्ये संरक्षणाच्या प्रश्नाचं ते समर्थन करत होते, तरी पण या समस्या सोडवण्याच्या बाबतींत संरक्षणमंत्र्यांच्या ठिकाणींच पुरेसा आत्मविश्वास निर्माण झालेला नाही असाहि कोणी अर्थ लावत होते.

संरक्षण हा कांही पुस्तकी अभ्यासाचा विषय नसून संरक्षण-मंत्रालयानं तयार केलेल्या टिप्पणी वाचून या विषयाचं ज्ञान आत्मसात करतां येणारं नाही, तर लष्कराचे जे निरनिराळे विभाग असतात, त्यांच्या शक्तीचं, कार्यक्षमतेचं, लष्करी डावपेंच वापरण्याच्या तंत्राचं व्यवहारी ज्ञान त्यासाठी आत्मसात करावं लागतं, असा टीकेचा एकूण रोख होता. यशवंतराव ही टीका समजून घेत होते. त्याच वेळीं संरक्षणखात्याच्या कारभारांतील बारकावे आणि तंत्र शिकून घेण्याचाहि त्यांनी प्रयत्न सुरू ठेवला होता.

या नव्या संरक्षणमंत्र्याला कुणी कोणताहि सल्ला द्यावा असं सुरू होतं; परंतु यशवंतराव सावध होते. ज्यांना त्यांच्या स्वभावाची पारख नव्हती त्यांना, यशवंतरावांची प्रगति अतिशय मंदगतीनं सुरू आहे असं वाटत असे. परंतु आपण कोंडींत पकडले जाणार नाही यासाठी ते जागरूक होते. सहजासहजीं त्यांची फरफट कुणाला करतां येईल अशी शक्यता नव्हती.

संरक्षण-मंत्रालयाच्या कारभाराची आपल्या मनाजोगती, सुस्थिर अशी योजना आणि त्याची अंमलबजावणी सुरू केल्यावर आणि संरक्षणविषयक उत्पादनवाढीसाठी आवश्यक तें वातावरण निर्माण केल्यानंतर यशवंतरावांनी, संरक्षणासाठी आवश्यक असलेल्या वस्तु पाश्चात्त्य देशांकडून संपादन करण्याकडे आपलं लक्ष केंद्रित केलं. अमेरिका, इंग्लंड, रशिया आणि अन्य मित्र-राष्ट्र यांच्याकडून युद्धकाळांत भारतानं कांही संरक्षण-सामग्री मिळवली होती. अर्थात् त्या युद्धकाळीं अमेरिका आणि ब्रिटन यांनी हात राखूनच मदत दिली होती. युद्धसमाप्तीनंतर तर या राष्ट्रांनी मदतीचा हात आणखी आखडता घेतला होता. इतकंच नव्हे तर, भारताची संरक्षणविषयक गरज तरी किती आहे याचा अभ्यास करण्याचा घाट त्यांनी घातला. तरी पण चर्चा सुरू होत्या.

त्यांतूनच मग, अमेरिकेचे सरक्षणखात्याचे सचिव रॉबर्ट मॅकनामारा यांच्या निमंत्रणावरून यशवंतरावांनी अमेरिकेच्या भेटीसाठी प्रस्थान ठेवलं. त्या अगोदर अमेरिकेचे या विषयांतले तज्ज्ञ आणि भारतीय तज्ज्ञ यांच्यांतील चर्चा आणि भेटी-गाठी यामुळे अनुकूल वातावरण तयार झालेलंच होतं; शिवाय चव्हाण हे अमेरिकेंत पोंचण्यापूर्वी संरक्षण-मंत्रालयांतील कांही जबाबदार अधिकाऱ्यांचं एक शिष्टमंडळ अमेरिकेला एक आठवडा अगोदरच जाऊन दाखल झालं होतं. संरक्षणखात्याचे सचिव पी. व्ही. आर. राव आणि एअर-मार्शल अर्जनसिंग हेहि तिथे पोंचले होते.

यशवंतराव अमेरिकेंत पोंचले त्यापूर्वीच्या आठवड्यांत बंगलोरच्या हिंदुस्थान एरोनॉटिक कारखान्यांत तयार झालेलं एच् एफ्–२४ हें अत्यंत प्रभावी, वेगवान, बॉंबफेकी विमान भारतीय हवाईदलाकडे जमा झालं होतं. या नव्या शक्तिमान विमान-बनावटीच्या तांत्रिक कौशल्याचा, यशवंतरावांनी मुक्तकंठानं गौरव केला आणि भारतांतले तंत्रज्ञ हे आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील तंत्रज्ञांच्या तोडीस तोड असल्याचंच आता सिद्ध झालं आहे, असा अभिप्रायहि व्यक्त केला. जर्मन तंत्रज्ञ डॉ. कुर्ट टंक यांच्या सहकार्यानं हें नवं शक्तिशाली विमान तयार झालेलं होतं.

अमेरिकेच्या भेटींत मात्र यशवंतरावांना वेगळाच अनुभव आला, कांही वेगळंच ऐकावं लागलं. तिथे ज्या चर्चा झाल्या आणि अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांनी, सरकारनं जो हितोपदेश केला त्यावरून, अत्याधुनिक स्वरूपाची शस्त्रसामग्री, भारताला देण्याची अमेरिकेची तयारी नाही हें लक्षांत येण्यास त्यांना वेळ लागला नाही. संरक्षणविषयक मदत भारताला कोणत्या प्रकारे आणि कशी करतां येईल याचा मार्ग शोधण्याऐवजीं अमेरिकेकडून अशी मदत कां संपादन करूं नये, याचीं कारणं ऐकवण्यांत त्यांनी यशवंतरावांचा

वेळ खर्च केला. अमेरिकेची नकाराची भूमिका घट्ट होती. अमेरिकेनं एफ्–१०४ हीं लढाऊ विमानं पाकिस्तानला दिलीं होतीं. भारताच्या संग्रहीं मिग–२१ हीं विमानं होतीं, परंतु भारतालाहि एफ्–१०४ जातीचीं विमानं मिळावींत अशी मागणी करण्यासाठी संरक्षणमंत्री तिकडे गेले होते. त्या दौऱ्यांत तर ही मागणी पदरांत पाडून घेणं साध्य झालं नाहीच, परंतु पुढे दोन वर्षे यासंबंधांत चर्चा सुरू राहूनहि भारताला अनुकूल निर्णय अमेरिकेकडून मिळाला नाही. फिलिप्स टालबोट हे अमेरिकेच्या बाजूनं या प्रश्नांत मध्यस्थी करत होते; परंतु या गृहस्थांचा कांही उपयोग होईल आणि ते आपली मध्यस्थी यशस्वी करतील, यासंबंधी भारताचे संरक्षणमंत्री फारशी आशा बाळगून नव्हते.

रशियाच्या मदतीनं मिग–२१ जातीच्या विमानांचं उत्पादन भारतानं सुरू केलं असल्यानं अमेरिका नाराज होती. भारतासारख्या अविकसित देशाला, मिग विमानाच्या उत्पादनाचा खर्च पेलणारा नाही असा अमेरिकेचा दावा होता. भारताचं नाविकदल सुसज्ज बनवण्याच्या दृष्टीनंहि अमेरिकेची टाळाटाळ सुरू होती. भारतानं संरक्षणाच्या बाबतींत अमेरिकेवर जास्तींत जास्त अवलंबून रहावं असाच त्यांचा दृष्टिकोन होता. अनेकदा चर्चा, वाटाघाटी होऊनहि, त्यांतून कांहीहि विधायक निर्माण होत नाही असं लक्षांत येतांच, अमेरिकेच्या सरकारनं, भारताला अत्याधुनिक बनावटीची शस्त्रसामग्री देण्याचा प्रश्न ज्या पद्धतीनं हाताळला, त्याबद्दल मग यशवंतरावांनी, डीन रस्क यांच्याजवळ तीव्र नापसंती व्यक्त केली.

पंधरा दिवस चर्चा सुरू होती; परंतु त्यांतून कांही अनुकूल असं निष्पन्न होत नव्हतं. म्हणून अखेरच्या क्षणीं मग, यशवंतरावांनी अमेरिकेचे प्रेसिडेंट जॉन्सन यांच्याशीं चर्चा करण्याचं ठरवलं. ही चर्चा २८ मे रोजीं होण्याचं ठरलं. यशवंतराव त्या वेळीं लॉस एंजल्समध्ये आठवडाअखेरच्या विश्रांतीसाठी म्हणून गेले होते. या दौऱ्यांतच ते कोलोरॅडो येथील अमेरिकेची हवाई अकादमी पहाण्यासाठी म्हणून गेले. अकादमीची पहाणी करून दुसऱ्या दिवशीं ते वॉशिंग्टनला पोंचणार होते. प्रे. जॉन्सन यांची भेट निश्चित झाली होती.

कोलोरॅडोमधली ती रात्र मोठी अशुभ ठरली. यशवंतराव गाढ झोपेंत असतांना रात्रीं २ वाजतां त्यांच्या खोलींतला फोन खणखणूं लागला. यशवंतराव कांहीसे त्रासले होते. मध्यरात्रीनंतर एवढ्या उशिरा, कोलोरॅडोसारख्या परक्या ठिकाणीं आपल्याला एकसारखा फोन करणारा हा कोण असावा याचं त्यांना कोडं पडलं. परंतु फोनची घंटा एकसारखी घणघणत राहिल्यानं अखेर त्यांनी फोन कानाला लावला. फोन वॉशिंग्टनहून आला होता. फिलिप्स टालबोट हेच फोनवर बोलत होते.

फिलिप्स टालबोट यांच्या तोंडचे शब्द यशवंतरावांनी ऐकले मात्र, त्यांना धक्काच बसला! पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांचं भारतांत देहावसान झालं होतं. टालबोट यांनी ती धक्का देणारी, दुःखद घटना यशवंतरावांना फोनवरून सांगितली.

पं. नेहरूंचं देहावसान झाल्याचं ऐकलं मात्र, "मला तावडतोब भारताकडे निघायला हवं" – यशवंतरावांनी टालबोट यांना सांगितलं.

"मला त्याची कल्पना होतीच; मी त्यासाठी व्यवस्था करत आहे." टालबोट उत्तरले.

पंडितजींच्या अंत्ययात्रेला हजर रहाण्यासाठी अमेरिकेचे एक वरिष्ठ अधिकारी भारताकडे निघणार आहेत आणि यशवंतरावांनी त्यांच्यासमवेतच भारतांत पोंचावं असंहि टालबोट यांनी सुचवलं. एवढं सांगूनच ते थांबले नाहीत, तर यशवंतरावांना वॉशिंग्टनला वेळेवर पोंचतां यावं यासाठी एक अतिशय वेगवान असं जेट विमान तयार ठेवलं. उरलेली संपूर्ण रात्र मग, त्या विमानानं उड्डाण करून यशवंतराव वॉशिंग्टनला नेमक्या वेळीं पोंचले. डीन रस्क हे भारताकडे निघण्याच्या तयारींतच होते. त्यांच्या-समवेत मग, चव्हाणहि दिल्लीला पोंचण्यासाठी निघाले. प्रे. जॉन्सन यांची भेट या आकस्मिक घटनेमुळे त्यांना रद्द करावी लागली. अमेरिकेनं अशा प्रकारे, भारताला मदत करण्याच्या संदर्भांत महिन्यांमागून महिने चर्चा करण्यांत खर्च केले आणि शेवटीं मामुली स्वरुपाची मदत देऊं केली.

यशवंतरावांनी – संरक्षणमंत्र्यांनी – रशियाला भेट द्यावी यासाठी रशियाच्या संरक्षणमंत्र्यांकडून सांगितलं जात होतं. सोविएत रशियाचे उपपंतप्रधान कोसिजिन हे नेहरूंच्या अंत्ययात्रेला आलेले असतांना दिल्लीच्या मुक्कामांत त्यांनीहि रशियाच्या आमंत्रणाची त्यांना आठवण करून दिली. भारताच्या संरक्षणविषयक गरजेकडे रशियाचं लक्ष होतं आणि त्या दृष्टीनं मिग–२१ विमानाचं उत्पादन भारतांत सुरू व्हावं यासाठी रशियानं आवश्यक तें सहकार्य दिलं होतं. कोसिजिन यांनी रशियाच्या भेटीचा पुनरुच्चार करतांच यशवंतरावांनी रशिया-भेटीचा कार्यक्रम निश्चित केला.

पं. नेहरूंच्या देहावसानानंतर आता भारतांत पंतप्रधानपद हें लालबहादूर शास्त्री यांच्याकडे आलं होतं. रशियाला निघण्यापूर्वी मग यशवंतरावांनी, रशियाबरोबर करायच्या चर्चेच्या संदर्भांत कांही महत्त्वाच्या मुद्यांविषयी शास्त्रीजींशीं खल केला. अमेरिकेच्या भेटींत, अमेरिकेकडून भारताच्या नाविकदलासाठी पाणबुड्या मिळवण्याची आशा दुरावलीच होती. रशिया मात्र भारतासाठी सबमरिन्स देण्यास तयार आहे अशी यशवंतरावांची माहिती होती. नाविकदलांत अत्याधुनिक पाणबुड्या असणं हें राष्ट्राच्या दृष्टीनं प्रतिष्ठेचं मानलं जात असे. परंतु रशियाची त्यासाठी मदत घेण्यापूर्वी पंतप्रधान शास्त्रीजींकडून त्यासाठी अनुमति दिली जाणं आवश्यक होतं. या उभयतां-मध्ये जेव्हा चर्चा झाली त्या वेळीं या व्यवहाराबाबत शास्त्रीजींच्या मनाची तयारी झालेली नाही, असं चव्हाण यांच्या लक्षांत आलं. भारताच्या नाविकदलासाठी रशिया-कडून वस्तु खरेदी करण्याबाबत यशवंतरावांनी वचनबद्ध राहूं नये असाच सल्ला शास्त्रीजींनी या चर्चेच्या वेळीं दिला.

यशवंतरावांनी त्याच वर्षी म्हणजे १९६४ मध्ये २८ ऑगस्टला रशियाच्या दौऱ्याचं प्रस्थान ठेवलं. त्यांचा हा दौरा दोन आठवड्यांचा होता. रशियाच्या सरकारनं चव्हाणांना या दौऱ्यांत रशियाचे नाविकतळ, पाणबुड्या इत्यादि सर्व दाखवलीं आणि माहिती दिली. फिनलंडचे आखात, याल्टा, सेवस्टापोल, काळा समुद्र येथील नाविक-तळांचं निरीक्षण त्यांना या दौऱ्यांत करतां आलं. रशियन बनावटीच्या पाणबुड्या भारतानं आपल्या नाविकदलांत समाविष्ट कराव्यात असा रशियाचा प्रयत्न होता. त्यांनी तसा आग्रह केला. परंतु यशवंतरावांवर वचनबद्ध न होण्याचं बंधन होतं त्यामुळे या दौऱ्यांत त्यांना, पेट्रोलवर चालणारी कांही जहाजं खरेदी करण्यापुरतीच चर्चा मर्यादित करावी लागली. रशियाचे संरक्षणमंत्री मालिनोव्हस्की यांच्याशींच त्यांची प्रामुख्यानं चर्चा झाली.

या दौऱ्यांत यशवंतरावांना रशियाचे पंतप्रधान निकिता क्रुश्चेव्ह यांच्याशींहि चर्चा करण्याची संधि मिळाली. चव्हाणांचं त्यांनी मोठं हार्दिक स्वागत केलं. त्यांची ही भेट आणि चर्चा, यशवंतरावांच्या दृष्टीनं संस्मरणीय अशीच झाली. निकिता क्रुश्चेव्ह यांच्या मनांतील भारतासंबंधीच्या मित्रभावाचं दर्शन त्यांना या वेळीं घडलं. निकिता क्रुश्चेव्ह यांची अतिशय स्पष्टवक्ते म्हणून ख्याति होती. विविध घटनांची त्यांच्या संग्रहीं तपशीलवार माहितीहि असायची.

रशियाकडून कांही कर्ज मिळवावं असा भारताचा प्रयत्न होता; परंतु त्या संबंधीचा करार करण्यांत, रशियाकडून त्या संबंधांत ज्या अटी घालण्यांत आल्या होत्या त्यांचा अडथळा निर्माण झाला होता. रशियन सरकारचे अधिकारी, अटी कमी करण्यास तयार नव्हते; किंबहुना त्याबाबत ते आग्रही बनले होते. निकिता क्रुश्चेव्ह यांच्याशीं चर्चा करतांना यशवंतरावांनी हा प्रश्न उपस्थित केला आणि आश्चर्य असं की, क्रुश्चेव्ह यांनी, या कर्जावरील व्याजाचा दर कमी करण्यासंबंधी ताबडतोब अनुमति दर्शवली!

यशवंतरावांनी नंतर रशियाच्या संरक्षणमंत्र्यांच्या भेटीच्या वेळीं क्रुश्चेव्ह यांचा मानस सांगितला तेव्हा ते आश्चर्यचकित झाले. "क्रुश्चेव्ह असा निर्णय कसा करूं शकतील?" असाच उलटा प्रश्न मालिनोव्हस्की यांनी यशवंतरावांना विचारला. याचा अर्थ, परंपरा बाजूस सारूनच क्रुश्चेव्ह यांनी निर्णय केला होता हें उघड होतं. क्रुश्चेव्ह यांनी या चर्चेच्या वेळीं भारताच्या संरक्षणविषयक गरजांसंबंधी तर चर्चा केलीच, शिवाय कांही जागतिक महत्त्वाच्या समस्यासंबंधीहि ते यशवंतरावांशीं बोलले. चीननं भारतावर केलेल्या आक्रमणाबद्दल क्रुश्चेव्ह यांची प्रतिक्रिया रागाचीच होती. चीन-संबंधांत ते आणखीहि बरेच बोलले, परंतु तें बोलून झाल्यावर त्यांनी यशवंतरावांना अशी सूचना दिली की, "भारत हा आमचा मित्र आहे म्हणून एवढ्या मोकळेपणानं मी बोललों. परंतु याचा उच्चार कुठे करूं नका, एरवीं चीन त्याचा गैरफायदा उठवील."

चव्हाण आणि क्रुश्चेव्ह यांच्या या दौऱ्यांत एकूण तीन बैठकी झाल्या. अखेरची त्यांची भेट मॉस्कोच्या विमानतळावरील एका खास दालनांत झाली. या सर्व चर्चेतून यशवंतरावांना रशियाच्या सरकारबद्दल कांही वेगळंच दर्शन घडलं. रशिया हा भारताचा

मित्र असून, कसलाहि आडपडदा न ठेवतां भारताला मदत करण्याची रशियाची तयारी आहे अशीच त्यांच्या मनांत स्वाभाविक प्रतिक्रिया निर्माण झाली आणि त्या समाधानांतच ते भारताला परतले. रशियाची ही भेट आणखी एका घटनेमुळे यशवंतरावांच्या मनांत निरंतरची राहिली. रशियाचा यशस्वी दौरा करून ते भारतांत परतले आणि पुढच्याच महिन्यांत म्हणजे ऑक्टोबरमध्ये पंतप्रधानपदावरून क्रुश्चेव्ह यांना दूर करण्यांत आलं! रशियाच्या पंतप्रधानपदांत नजीकच्या काळांत कांही बदल घडायचा आहे याची पुसटशी देखील कल्पना यशवंतरावांना रशियांतल्या मुक्कामांत आलेली नव्हती!

रशियाच्या दौऱ्याचं फलित यशवंतरावांनी मग, भारतांतील आपल्या मंत्रि-मंडळांतील सहकाऱ्यांना निवेदन केलं. ११ सप्टेंबर १९६४ ला त्यांनी रशियाबरोबर झालेल्या कराराचीहि माहिती दिली. तरी पण भारतानं रशियाकडून नाविकदलासाठी सहकार्य घ्यावं यासाठी लालबहादूर शास्त्री यांचा निर्णय अजून होत नव्हता. चव्हाण यांनी त्यासाठी ब्रिटनशीं सल्लामसलत करावी असंच त्यांनी सुचवलं. अखेर १९६४ च्या नोव्हेंबरमध्ये चव्हाण हे ब्रिटनला गेले. मजूर-सरकारचे हॅरॉल्ड विल्सन हे त्या वेळीं पंतप्रधान होते. भारताला संरक्षणविषयक मदत मिळावी यासाठी तिथे बरींच खलबतं झालीं, परंतु ब्रिटन त्या बाबतींत कोणत्याहि प्रकारे वचनबद्ध होण्यास तयार नव्हतं. भारताची गरज समजावून घेणं यावर त्यांनी या चर्चेत विशेष भर दिला. क्लेमंट ॲटली यांनी चव्हाण यांना खाना दिला आणि प्रदीर्घ चर्चा केली. हॅरॉल्ड विल्सन, माउंटबॅटन या सर्वांशीं चर्चा झाली, परंतु त्यातून कांहीच निष्पन्न होत नाही असं लक्षांत येतांच, चव्हाण यांनी माउंटबॅटन यांना निर्वाणीचं असं सांगितलं की, भारताचं नाविकदल विकसित करण्याची गरज समजावून घेऊन, त्या दृष्टीनं निर्णय करण्याला ब्रिटनला माझ्या दृष्टीनं ही अखेरची संधि आहे. ब्रिटन हें भारताच्या मदतीस अनुकूल बनणार नसेल, तर शस्त्रास्त्राच्या खुल्या बाजारांतून, मिळतील तिथून शस्त्रास्त्रं खरेदी करण्याशिवाय भारताला गत्यंतर उरणार नाही. त्यावर माउन्टबॅटन यांनी मदतीचा सहानुभूतीनं विचार करण्याचं आश्वासन दिलं हें खरं; परंतु प्रत्यक्षांत विशेष कांही हातीं लागलं नाही.

ब्रिटनच्या नाविक दलाचे प्रमुख भारताला मदत करण्याविषयी उत्सुक नव्हते. त्यांच्याशीं चर्चा सुरू असतांना त्यांनी ब्रिटनकडील जुन्यापुराण्या पाणबुड्या आणि युद्ध-नौका देण्याची फक्त तयारी दर्शवली आणि याच प्रश्नावर हा सौदा निकालांत निघाला. कांही किरकोळ खरेदी करूनच यशवंतरावांना परतावं लागलं.

अमेरिका आणि ब्रिटनचे दौरे त्या अर्थानं निष्फळ ठरल्यामुळे भारत सरकारला मग, संरक्षणविषयक सिद्धता करण्यासाठी वेगळा विचार करणं क्रमप्राप्तच ठरलं. पाश्चात्त्य देशांनी भारताला मदत करण्याची आश्वासनं दिलीं होतीं, परंतु अमेरिका आणि ब्रिटन यांनी तीं पूर्ण केलीं नव्हतीं.

अमेरिका आणि ब्रिटन यांच्या मदतीचा आढावा घेतांना संरक्षणमंत्र्यांना असं आढळून आलं की, १९६२ च्या ऑक्टोबरपासून १९६५ च्या सप्टेंबरपर्यंत अमेरिकेनं फक्त ३६·१३ कोटींचं म्हणजे आश्वासनाच्या ४५ टक्के साहाय्य केलं होतं. ब्रिटनकडून ३६ कोटि रुपये किमतीचीं शस्त्रास्त्रं मिळणार होतीं, परंतु त्यांनी फक्त २२·१ कोटींचाच वायदा पूर्ण केला होता. सोविएत रशियाकडून मात्र १९६५ च्या अखेरीपर्यंत १०० कोटींचं साहाय्य झालं होतं. यांपैकी मिग–२१ विमानाच्या प्रकल्पासाठीच ६० कोटि रुपये होते.

शस्त्रास्त्राच्या शोधासाठी यशवंतरावांना परदेशच्या दौऱ्यांत त्या राष्ट्रांकडून जी वागणूक मिळाली, अनुभव मिळाला त्यामुळे भारताला परराष्ट्र-संबंधाबाबत पुनर्विचार करण्याची आवश्यकता वाटूं लागली. परिणामीं परराष्ट्र-व्यवहार आणि परस्पर-संबंध यांची दिशाच नंतरच्या काळांत बदलली गेली. यशवंतराव संरक्षणमंत्री होण्यापूर्वी म्हणजे कृष्णमेनन संरक्षणमंत्री होते त्या काळापासूनच दिल्ली-मॉस्को दरम्यान मैत्रीचे संबंध प्रस्थापित झालेले होते. अमेरिका व ब्रिटन यांच्याशीं सुरू राहिलेल्या वाटाघाटी निष्फळ ठरल्यानंतर भारताला मग, दिल्ली-मॉस्कोच्या दरम्यान अधिक मैत्रीच्या संबंधाचा विचार करावा लागला. दरम्यानच्या काळांत पाकिस्तानला अमेरिकेकडून शस्त्रास्त्रांचा पुरवठा सातत्यानं सुरू झाला होता. म्हणून मग, नितान्त गरजेच्या पोटीं दिल्ली-मॉस्को संबंध अधिक घनिष्ट बनणं क्रमप्राप्त ठरलं आणि ते तसे निर्माण झालेहि. यशवंतरावांच्या संरक्षणमंत्रिपदाच्या कारकीर्दीतील हा निर्णय ऐतिहासिक महत्त्वाचा ठरला.

संरक्षण-मंत्रालय आणि एकूण लष्करी यंत्रणा यांचा संपूर्ण मुखवटा बदलण्याचं आणि त्यामध्ये अधिक इष्ट असे फेरबदल साध्य करण्याचं काम करण्यांत यशवंतरावांनी विशिष्ट असा पल्ला गाठला होता, तरी पण त्यांच्या अंगच्या गुणांचं आणि कारभार-कुशलतेचं दर्शन खऱ्या अर्थानं भारत-पाकिस्तान युद्धाच्या प्रसंगीं १९६५ सालांत सबंध देशाला आणि जगांतल्या विविध राष्ट्रांना प्रथमच घडलं.

संरक्षणखात्याचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर १९६२ सालापासून त्यांनी जागरूक राहून अहोरात्र काम केलं होतं. भारताच्या लष्करी दलांत आणि त्याच्या सामर्थ्यांत इष्ट ते बदल घडत राहिले असल्याचं चित्र देशासमोर होतं. लष्करी सामर्थ्याबद्दल आता आत्मविश्वास निर्माण झालेला होता. त्यामुळे पाकिस्ताननं १९६५ मध्ये आक्रमण करतांच भारत तें आक्रमण सर्व सामर्थ्यानिशी परतवून लावील असा लोकांच्या मनांत विश्वास होता. लष्करामधील अधिकाऱ्यांना प्रोत्साहन देण्याचं आणि जवानांशीं संवाद करून त्यांच्याशीं संपर्क ठेवण्याचं कसब या संरक्षणमंत्र्यांनी आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभापासूनच दाखवलं होतं. त्यामुळे यशवंतराव हे साऱ्या लष्कराचा, अभिमानाचा विषय ठरले होते. आपली सर्व शक्ति त्यांच्या पाठीशीं उभी करण्याची जिद्द अधिकाऱ्यांत आणि जवानांमध्ये निर्माण झालेली होती. १९६५ च्या लढाईच्या वेळीं याचा प्रत्यय देशाला आला.

संरक्षणविषयक कोणत्याहि प्रश्नावर चर्चा करण्यासाठी सरसेनापति जनरल चौधरी यांना संरक्षणमंत्र्यांचे दरवाजे खुले होते. राजकीय आणि सरकारच्या धोरणाच्या मर्यादेंत राहून कोणताहि निर्णय करण्यास सरसेनापतींना संरक्षणमंत्र्यांची मुभा होती. संरक्षणविषयक मूलभूत समस्या समजून घेण्यासाठी यशवंतराव नेहमीच उत्सुक असत आणि त्यांच्यापर्यंत ज्या समस्या पोंचल्या त्यांचं गांभीर्य त्यांनी कधीच कमी लेखलं नाही. संरक्षण-मंत्रालय आणि लष्कराचं प्रमुख कार्यालय यांमध्ये सातत्यानं दुवा राहील अशाच पद्धतीनं त्यांनी कारभाराची आखणी केली होती. लष्कराच्या प्रमुख अधिकाऱ्यांबरोबर होणाऱ्या चर्चेच्या वेळीं तातडीनं एखादा निर्णय करण्याचा प्रसंग निर्माण होत असे. संरक्षणमंत्री तसा तोंडीं निर्णय करतहि असत; परंतु असा एखादा तोंडीं किंवा अनौपचारिकरीत्या निर्णय दिल्यानंतर तो निर्णय त्यांनी पुन्हा कधी बदलला नाही. दिलेल्या निर्णयाशींच ते ठाम रहात असत. हा आपला, हा परका अशी वागणूक लष्करी अधिकाऱ्यांना त्यांच्याकडून कधी दिली गेली नाही. भारत-पाकिस्तानच्या युद्धाच्या वेळींहि जनरल चौधरी यांना यशवंतरावांकडून सातत्यानं प्रोत्साहनच मिळत राहिलं होतं. १९६२ मध्ये लष्करामध्ये निर्माण झालेल्या परिस्थितीच्या संदर्भात हा बदल वैशिष्ट्यपूर्ण ठरला.

भारत-पाकिस्तानच्या दरम्यान १९४७ पासूनच कुरापती सुरू झालेल्या होत्या. काश्मीरच्या प्रश्नावरून १९४७–४८ मध्येच या दोन राष्ट्रांत मोठं युद्ध होण्याचा प्रसंग पाकिस्ताननं निर्माण केला होता. परंतु त्या वेळीं पाश्चात्त्य राष्ट्रांनी, विशेषतः ब्रिटन आणि अमेरिका यांनी दबाव आणून दोन्ही राष्ट्रांना युद्धाच्या पवित्र्यापासून बाजूला केलं होतं. भारताच्या फाळणीच्या वेळीं, पाकिस्तानच्या तुलनेनं भारताकडे लष्करी बळ अधिक जमा झालेलं असल्यानं पाकिस्तानची ती एक डोकेदुखी होती. भारताकडून पाकिस्तानवर कोणत्याहि क्षणीं आक्रमण होण्याची धास्ती पाकिस्तानला त्यामुळे वाटत राहिली होती. परंतु जॉन फास्टर डल्लस यांच्या आग्रहानुसार अमेरिकेनं १९५४ पासून पाकिस्तानला मोठ्या प्रमाणांत शस्त्रास्त्रांची मदत देण्यास सुरुवात केली. परिणामीं पाकिस्तानची मुजोरी वाढत राहिली.

या दोन देशांतल्या संबंधांत नंतरच्या काळांत सातत्यानं तणाव निर्माण होऊं लागला होता. चीनकडून धोका निर्माण झालेलाच होता आणि पाकिस्तानहि भारतीय हद्दींत घूसखोरी करून मधून मधून कुरापती काढण्यांत गुंतलं होतं. १९६५ च्या मार्चमध्ये आयूबखान यांनी चीनची वारी केली. या दौऱ्यांत चीनकडून पाकिस्तानला फार जबरदस्त प्रोत्साहन दिलं गेलं. २७ मार्चला रावळपिंडीमध्ये या दोन्ही राष्ट्रांत एक करारहि घडून आला. हा करार म्हणजे भारताला अन्य राष्ट्रांपासून अलग पाडण्यासाठी ज्या युक्त्या योजल्या जात होत्या, त्यांतलाच एक भाग होता. आर्थिक मदतीचा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा पूर अमेरिकेकडून पाकिस्तानकडे वहात राहिला होता. चीननं तर त्याही-पुढे मजल मारून पाकिस्तानशीं राजनैतिक आणि लष्करी संबंधहि प्रस्थापित केले.

पाकिस्तानला समर्थ बनवण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत या घटना घडत होत्या. तरी पण भारताला रशियातर्फे मिळणाऱ्या मदतीमुळे पाकिस्तानची चिंता कमी झाली नव्हती; उलट ती वाढली होती. मुत्सद्देगिरीचा डाव म्हणून मग पाकिस्ताननं रशियाशीं मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याच्या हालचाली सुरू केल्या. भारत-रशिया मैत्री दृढ बनलेली असल्यामुळे, पाकिस्तान हें मैत्रीच्या आमिषानं आपल्या पंखाखाली येत असेल, तर रशियाचा त्याला विरोध असण्याचं कारण नव्हतं. ४ एप्रिल १९६५ ला मग, आयुब-खान यांनी भुट्टोला बरोबर घेऊन रशियाचा सहा दिवसांचा दौरा केला. या दौऱ्यानंतर रशियानं पाकिस्तानला नागरी दळणवळणाच्या सोयीसाठी म्हणून १५ कोटि रुपये मदत देऊं केली. इतकं घडतांच रशियालाहि आपण आपल्या दावणीला बांधल्याचं समाधान पाकिस्तानच्या नेत्यांना लाभलं आणि भारतावर निश्चित विजय मिळवण्याच्या कल्पनेंत ते रममाण झाले.

रशिया-पाकिस्तान मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाल्याबद्दल भारत मात्र सचिंत बनला नव्हता, परंतु अमेरिकेकडून पाकिस्तानला जो प्रचंड शस्त्रसंभार मिळत होता त्याबद्दल आणि पाकिस्तान-चीन अशी गट्टी जमल्याबद्दलची भारताला खरी चिंता होती. अमेरिकेनं पाकिस्तानला पॅटन रणगाड्यांचा फार मोठा पुरवठा केला होता. आणि हे पॅटन रणगाडे पंजाबमधून दिल्लीकडे जाणारा ग्रँड ट्रंक रोड उद्‌ध्वस्त करण्याला समर्थ होते.

युद्धासाठी कुरापत काढण्यास पाकिस्तान टपून आहे याची कल्पना १९६५ च्या प्रारंभींच्या काळांतच भारत सरकारला आली होती. कच्छच्या रणामध्ये त्या वर्षाच्या जानेवारींतच पाकिस्ताननं भारताच्या हद्दींत मैल-दीड मैल आक्रमण केलं असल्याचं आढळून आलं. त्या वेळीं तिथे कांही चकमकीहि उडाल्या. परंतु पुढचे दोन महिने राजनैतिक पातळीवर दिल्ली-रावळपिंडी दरम्यान थंडें युद्ध सुरू राहिलं. दरम्यान ९ एप्रिलला पाकिस्ताननं काश्मीर-हद्दींत युद्धबंदी-रेषेचा भंग करून पुढे चाल करण्याचा प्रयत्न केला. सीमेचं रक्षण करणाऱ्या भारतीय पोलिस-ठाण्यावर त्यांनी हल्लेहि चढवले. परंतु हा पहिला हल्ला भारताच्या पोलिसांनी परतून लावला. त्यानंतरहि पुढे पाकिस्तानकडून हल्ले सुरू होतांच भारताच्या लष्कराला ठाम पवित्रा घ्यावा लागला, पाकिस्ताननं ताबा केलेलं भारताचं एक ठाणंहि लष्करानं हस्तगत केलं. कच्छच्या रणामध्ये दहा-पंधरा दिवस अशा कुरापती घडत राहिल्या होत्या. परंतु २४ एप्रिलला पाकिस्ताननं फार मोठ्या लष्करी शक्तिनिशी कच्छवर हल्ला चढवला.

तोफखान्याचा भडिमार करून पाकिस्तानच्या लष्करानं भारताची त्या भागांतलीं कांही लष्करी ठाणीं उद्‌ध्वस्त केलीं. भारताच्या हद्दींत लांबपर्यंत शत्रु-सैन्यानं मुसंडी मारली आणि त्या लढाईत भारतीय लष्कराला आपलीं कांही ठाणीं सोडून माघार घ्यावी लागली. नव्यानं निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे मग दिल्लींत चिंतेचं वातावरण पसरलं. कच्छच्या रणामध्ये पाकिस्ताननं अघोषित युद्ध पुकारलं आहे, असंच तेव्हा दिल्लींतून घोषित करण्यांत आलं.

इतकं घडतांच संरक्षणमंत्री चव्हाण यांनी भारतीय लष्कराला तयार रहाण्याचा आदेश दिला. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनीहि कच्छच्या रणांत पाकिस्ताननं केलेल्या आक्रमणाची गंभीर दखल घेतली आणि २८ एप्रिलला लोकसभेंत त्या संदर्भात एक निवेदनहि केलं. शास्त्रीजींनी या वेळीं पाकिस्तानला कडवा इशाराच दिला की, पाकिस्तान आपली आक्रमणाची भूमिका अशीच कायम ठेवणार असेल, तर भारताला लष्करी डाव-पेंचाबाबत वेगळे निर्णय करावे लागतील आणि योग्य वाटेल त्या पद्धतीनं लष्करी बळाचा उपयोग करावा लागेल. पाकिस्ताननं कच्छच्या रणामध्ये आक्रमण केलं होतं, परंतु त्याचा बदला घेण्यासाठी पंजाबच्या ८०० मैल लांबीच्या सरहद्दीवरील कोणतंहि ठिकाण भारताला प्रतिकारासाठी निवडावं लागेल. याचा अर्थ प्रसंग निर्माण झाल्यास भारत सर्वशक्तिनिशी आक्रमकांशीं मुकाबला करण्यास सिद्ध आहे, असंच शास्त्रीजींनी स्पष्ट केलं.

शास्त्रीजींची घोषणा होऊन संरक्षणमंत्र्यांचा आदेश मिळतांच भारताच्या ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी संरक्षणाची आणि प्रसंग निर्माण झाल्यास आक्रमणासाठी पुढे सरकण्याची जय्यत तयारी केली. भारतीय लष्कराच्या हालचाली वेगानं सुरू होतांच, भारतानं दुसरी युद्धआघाडी उघडली आहे, असा कांगावा पाकिस्ताननं सुरू केला आणि ब्रिटन व अमेरिका यांनी तर, भारतानं युद्धाचं क्षेत्र वाढवूं नये यासाठी दबाब आणण्याला प्रारंभ केला. आक्रमणांतून निर्माण झालेला वाद मिटावा यासाठी ब्रिटनचे पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांनी एक तात्पुरती योजनाच पुढे केली.

पंतप्रधान शास्त्री हे मुळांतले थंड प्रकृतीचे. या दोन देशांच्या वादांत कांही सन्माननीय तडजोड निघत असेल, तर त्याला त्यांची तयारीच होती. युद्धाचं क्षेत्र वाढावं असं त्यांचं मत नव्हतंच. म्हणून मग त्यांनी हॅरॉल्ड विल्सन यांच्या तडजोडीच्या सूचनेला अनुकूल असाच प्रतिसाद दिला. कच्छच्या रणासंबंधीचा वाद संपवावा अशीच त्यांची इच्छा होती. यासंबंधीच्या चर्चा पुढे होत राहिल्या, परंतु शास्त्रीजी आणि आयूबखान यांची लंडनला कॉमनवेल्थ कॉन्फरन्सच्या ठिकाणीं १७ जूनला भेट होऊन समोरासमोर चर्चा झाल्यानंतरच तडजोडीच्या प्रश्नाला गति मिळाली आणि पुढे ३० जूनला युद्धसमाप्तीबद्दलचा करार होऊन १ जुलैपासून प्रत्यक्षांत युद्धसमाप्ति अमलांत आली. दोघांनी आपापलीं सैन्यं मागं घ्यावींत, कच्छमधील सीमेसंबंधीचा निर्णय करण्यासाठी एक ट्रायब्यूनल नियुक्त करावं या भारतानं पुढे केलेल्या अटींनाहि या करारांत स्थान देण्यांत आलं. पाकिस्तानला मात्र या करारानुसार कांजरकोटचा ताबा सोडावा लागणार होता. भारताला या सर्व व्यवहारामध्ये २०० चौरस मैलांचा भाग गमवावा लागला.

कच्छच्या बाबतींत एका बाजूला अशा वाटाघाटी सुरू होत्या आणि त्याच वेळीं पाकिस्ताननं काश्मीरमध्ये युद्धबंदी-रेषेचा भंग करण्याच्या प्रक्षोभक हालचाली सुरू ठेवल्या होत्या. त्या वर्षाच्या मे महिन्यांत युद्धबंदी-रेषेचा भंग करण्याचे ३३९ प्रकार पाकिस्तानकडून घडल्याबद्दल भारत सरकारनं तक्रार केली होती. भारत-लडाख दरम्यान

श्रीनगर-लेह राष्ट्रीय मार्गावर पाकिस्ताननं त्या महिन्यांत सोळा वेळा आक्रमण करून लडाखची रसद तोडण्याचा प्रयत्न केला होता. अखेर भारतीय सैन्यानं १७ मे रोजीं कारगिलजवळचीं पाकिस्तानचीं तीन टेहळणी-नाकीं ताब्यांत घेतलीं. कारण या टेहळणी-नाक्यांचा उपयोगच लडाखच्या रोखानं जाणारी रसद अडकवण्यासाठी केला जात होता. पाकिस्ताननं मग भारताच्या या पवित्र्याबद्दल यूनोकडे निषेध नोंदवला.

भारत-लेह दरम्यानचा मार्ग, वाहतुकीसाठी खुला राहील आणि या मार्गाचं रक्षण केलं जाईल असं यूनोच्या पहाणी-पथकानं आश्वासन दिल्यानंतरच भारतानं आपल्या ताब्यांतली तीन टेहळणी-नाकीं पुढे मुक्त केलीं. परंतु तरीहि पाकिस्तानचा खोडसाळपणा थांबला नाही. भारतानं तीं तीन नाकीं मुक्त करतांच युद्धबंदी-रेषेचा भंग करण्याचे प्रकार पाकिस्ताननं पुन्हा सुरू केले, आणि ते क्रमाक्रमानं वाढत राहिले.

यूनोच्या लष्करी पहाणी-पथकाचे प्रमुख जनरल आर. एच्. निमो यांनी १९६५ च्या जानेवारीपासून जूनपर्यंत युद्धबंदी-रेषेचा भंग करण्याचे २,२३९ प्रकार दोन्ही बाजूंनी घडल्याची नोंद करून ठेवली आहे. यूनोचे सरचिटणीस ऊ-थांट यांना त्यांनी तसा अहवालच पाठवलेला असून त्यामध्ये पाकिस्तानच्या बाजूनं अधिक घटना घडल्या असल्याचंहि स्पष्ट केलं आहे.

भारत-पाकिस्तान दरम्यान युद्धबंदी-रेषेचा भंग आणि पाकिस्तानच्या लष्करी कुरापती हें सातत्यानं सुरू राहिल्यानं भारतांतलं लोकमत संतप्त बनलं. भारतानं पाकच्या सरहद्दीवर लष्करी कारवाई जलद गतीनं करावी अशीच लोकांची मागणी होऊं लागली. या संदर्भात यशवंतरावांचं मत असं होतं की, पाकिस्तानचं आक्रमण समर्थपणें थोपवून शिवाय आगेकूच करण्याइतका भारत समर्थ आहे याची पाकिस्तानला प्रचीति आल्या-शिवाय, त्या राष्ट्राचे आक्रमणाचे उद्योग थांबणार नाहीत.

कच्छच्या बाबतींत युद्धबंदीचा करार झाल्यानंतर पाकिस्तानच्या वृत्तींत बदल घडेल आणि शांततेचं वातावरण निर्माण होईल, अशी भारत सरकारची कल्पना होती. गंभीर स्वरूपाच्या लष्करी हालचाली करण्याचे मनसुबे पाकिस्तानकडून होणार नाहीत असंहि वाटत होतं; परंतु भारताच्या या कल्पनेला धक्का बसला होता. भारतामध्ये घूसखोर पाठवून गनिमी काव्यानं हल्ले चढवण्याची योजना पाकिस्ताननं १९६५ च्या मेमध्येच शिजवली होती. आणि या योजनेनुसार त्या वर्षाच्या ऑगस्टमध्ये घूसखोरांची पहिली तुकडी काश्मीरमध्ये मोठ्या संख्येनं उतरली. गनिमांनी काश्मीरचा ताबा घ्यायचा आणि ताबा मिळतांच क्रांतिकारकांनी आझाद काश्मीरचा प्रशासकीय कारभार सुरू करायचा अशी एक धाडशी योजनाहि रावळपिंडीनं तयार केली होती. ऑगस्टच्या ९ तारखेला पाकिस्ताननं तसं एक वृत्तहि जाहीर करून टाकलं. काश्मीरमध्ये त्यासाठी एक गुप्त आकाशवाणी-केंद्र उभारलं आणि काश्मीरच्या जनतेनं गनिमांना सहकार्य द्यावं असा प्रचारहि आकाशवाणी-केंद्रावरून सुरू केला. दक्षिण-भारतीय, शीख, रजपूत यांना फितवण्यासाठीहि हें प्रचार-केंद्र राबवलं जात होतं.

मात्र या कृत्याशीं पाकिस्तानचा कांही संबंध नाही असंहि भासवण्यांत येत होतं. काश्मीरमधील मुजाहिदांना पाकिस्तानचं सहकार्य असून अल्ला त्यांच्या पाठीशीं आहे असा प्रचाराचा एकूण रोख होता.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांत संरक्षणमंत्री यशवंतराव हे विजगापट्टमच्या नौदल-केंद्राची पहाणी करण्यासाठी गेले होते; परंतु ते विजगापट्टमला पोंचतात न पोंचतात तोंच त्यांना दिल्लीला ताबडतोब परतण्याचा संदेश मिळाला. पंतप्रधान शास्त्रीजींनीच त्यांना ताबडतोब परत येण्यास सुचवलं होतं. या वेळपर्यंत पाकिस्तानी घूसखोर भारताच्या हद्दींत घुसले होते.

देशासमोर आता गनिमी काव्याच्या युद्धाचं नवं आव्हान उभं होतं. ९ ऑगस्टपर्यंत ३ हजार गनीम युद्धबंदी-रेषा ओलांडून भारताच्या हद्दींत पोंचले होते. काश्मीरमधील पूंछजवळच्या मंडी गावावर त्यांनी कबजा केला होता. मंडीवर चार दिवस त्यांचाच कबजा होता. मग मात्र भारताच्या लष्करानं त्वरा करून बारामुल्ला या गावाजवळ रात्रीच्या वेळीं मोठ्या संख्येनं गनीम पकडले. ८ ऑगस्टला श्रीनगरपर्यंत मजल करून, श्रीनगरमध्ये ८ ऑगस्टला होणाऱ्या निदर्शनांत सामील होण्याचा गनिमांचा डाव होता. शेख अब्दुल्ला यांची काश्मीरच्या पंतप्रधानपदावरून हकालपट्टी करून त्यांना अटक केली त्याला त्या दिवशीं एक वर्ष पूर्ण होणार होतं आणि त्यानिमित्तच श्रीनगरमध्ये निदर्शनं व्हायचीं होतीं.

काश्मीरमध्ये जास्तींत जास्त गोंधळाची परिस्थिति निर्माण करून, त्या वेळचं जी. एम्. सादिकचं सरकार उद्ध्वस्त करण्याचं कार्य या गनिमांवर सोपवण्यांत आलं होतं. परंतु भारत सरकार जागं होतं. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांतच ७५ टक्के गनीम पकडून भारताच्या पोलिसांनी आणि सैनिकांनी गनिमांचा डाव उधळून लावला. काश्मीरच्या जनतेचं सहकार्य मिळवण्यांत आणि त्यांना बंडांत ओढण्याच्या कामांतहि गनिमांना अपयश आलं होतं. कारण एक तर हे गनीम पंजाबी होते आणि काश्मीरच्या जनतेनं गनिमांना साहाय्य करावं असा या दोघांमध्ये कांही धार्मिक लागाबांधाहि नव्हता. या भागांतल्या पश्चिम-टोकांतील मुसलमान हे वांशिक व सामाजिकदृष्ट्या पंजाबी मुसलमानांच्या जवळचे. त्यामुळे तें टोक ( छांब-अखनूर ) सहजगत्या ताब्यांत घेतां येणं पाकिस्तानला शक्य होतं; परंतु गनिमी काव्याच्या लढाईत यश संपादन करायचं, तर त्यासाठी स्थानिक जनतेचं फार मोठं पाठबळ उपलब्ध व्हावं लागतं; आणि तसं तर तें इथे मुळीच नव्हतं.

ही वस्तुस्थिति असली तरी या गनिमी काव्याच्या आव्हानाची भारत सरकारला गंभीर दखल घेणं क्रमप्राप्तच होतं. यशवंतराव विजगापट्टमहून तातडीनं परतल्यानंतर शास्त्रीजींच्या निवासस्थानींच केंद्रीय मंत्रिमंडळानं, या नव्या परिस्थितीबाबत चार तास खल केला. गनिमांच्या कृतीला प्रतिटोला कसा द्यायचा याचीच या चार तासांत चर्चा झाली. पाकिस्तानकडून ज्या कुरापती काढल्या जात होत्या त्या संदर्भांत

पंतप्रधान, संरक्षणमंत्री आणि लष्कर-प्रमुख यांनी एकत्रित चर्चा करून जुलैमध्येच वस्तुतः कांही निर्णय केले होते. जुलैच्या मध्यावर या संदर्भातलं धोरणहि निश्चित झालेलं होतं. पाकिस्तानचे गनीम इथे पोंचण्यापूर्वीच हा निर्णय झालेला होता. दिल्लीला त्या काळांत नेतृत्वाचा समसमा संयोग झालेला होता. लालबहादूर शास्त्रींचं उत्तम नेतृत्व देशाला लाभलेलं होतं. महत्त्वाच्या प्रश्नाबाबत ते अचूक निर्णय करत आणि केलेल्या निर्णयाशीं बट्ट चिकटून रहात असत. संरक्षणमंत्र्यांना त्यांचं कमालीचं सहकार्य होतं आणि संरक्षणमंत्र्यांनी – यशवंतरावांनी त्यांना आपल्या सर्व निष्ठा वाहिल्या होत्या.

पाकिस्तानसंबंधांत त्यांच्या चर्चा होत असत. अमुक एका ठिकाणीं आपण कांही कृति केली, तर त्यावर पाकिस्तानची कोणती प्रतिक्रिया होईल, असा शास्त्रींचा प्रश्न असे. या संदर्भात मग पाकिस्तान कोणतं कोणतं धाडस करूं शकेल याचीहि चर्चा या दोघांमध्ये होत असे. भारतावर चाल करण्यासाठी पाकिस्तानचे कोणकोणते पर्याय असूं शकतील, १९४७ मध्ये हल्ला केला तसा तो काश्मीरवर हल्ला करील, की छांबवर चाल करील, अशा विविध पर्यायांचा विचार या चर्चेच्या वेळीं करून, आपली प्रतिक्रिया कोणती असावी याचं उत्तरहि ठरवून ठेवत असत. या दोघांचं त्या संबंधांतलं उत्तर असं तयार झालेलं होतं की, पाकिस्तानचा हल्ला कोणत्याहि दिशेनं होवो, आपली चाल मात्र पंजाबच्या रोखानंच झाली पाहिजे. या उत्तराच्या अनुषंगानं तशी योजनाहि सिद्ध करून ठेवण्यांत आली होती.

वस्तुतः पाकिस्तानचा कट उधळून लावणं एवढं मर्यादित लष्करी ध्येय डोळ्यांपुढे ठेवून भारताचे सैनिक अहोरात्र पहारा करीत होते. परंतु या एकूण कटामध्ये पाकिस्तानचा खरा अपेक्षाभंग काश्मिरी जनतेनं केला. काश्मीर-खोऱ्यांत गनिमांच्या साहाय्यानं अपेक्षित उठावणी होत नाही असं ध्यानांत आल्यामुळे पाकिस्तानला युद्धाचं वेळापत्रकच अनपेक्षितपणें बदलावं लागलं. उठावणी झाल्यावर त्यांना छांब-अखनूर भागांत मुसंडी मारायची होती. पण अपेक्षित यश हस्तगत करण्यासाठी, पहिला रोख बदलून घूसखोरांना दिलासा देण्यासाठी अखेर छांब भागांत मुसंडी मारणं पाकिस्तानला भाग पडलं.

पाकिस्तानच्या कटाचा पूर्व-सुगावा भारत सरकारला लागलेला होता. त्यामुळे पाकिस्तानचे पुढचे पवित्रे कसे पडतील याचा अंदाज बांधून कोणत्या पवित्र्यावर कोणता उतारा करायचा यांच्या विविध योजना व पर्यायी योजना आखल्या गेल्या होत्या.

गनिमांची घूसखोरी सुरू झाल्यापासून भारतांत मात्र सर्वत्र अस्वस्थता निर्माण झाली होती. लोकसभेंत आणि वृत्तपत्रांतून त्यासंबंधी तीव्र प्रतिक्रिया उमटूं लागल्या. केंद्रीय मंत्रिमंडळांतल्या कांही मंत्र्यांना आणि ज्येष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना भारताच्या बाजूची संरक्षण-सिद्धतेची, प्रति-आक्रमणाच्या तयारीची माहिती होती हें खरं, परंतु सर्वसामान्य जनता मात्र चिंताग्रस्त बनली होती. नेफामध्ये पत्करलेला पराभव लोकांच्या स्मरणांत अद्याप टिकून होता आणि भारताच्या लष्कराबद्दल, अधिकाऱ्यांच्या कर्तृत्वाबद्दल लोक साशंक होते. स्वतः कृष्णमेनन यांना सुद्धा पाकिस्तानच्या आक्रमणाची

धास्ती निर्माण झाली होती आणि त्यांनी ती चव्हाण यांना खाजगतांत बोलूनहि दाखवली.

ही सर्व परिस्थिति लक्षांत घेतां, देशांतल्या जनतेचं मनोधैर्य शाबूत राखण्याच्या दृष्टीनं आणि घूसखोर गनिमांचा बंदोबस्त करण्यासाठी म्हणून तातडीनं कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली. स्वतः संरक्षणमंत्री आणि त्यांचे सल्लागार हेहि आता याच निर्णयाशीं पोंचले होते. आक्रमकांना थोपवण्याचा प्रभावी मार्ग म्हणून शत्रूच्या हद्दींतल्या लष्करी तळावर प्रभावी धडक देणंच आवश्यक ठरलं होतं. त्या दृष्टीनं मग चव्हाण यांनी कारगिल आणि उरि विभागांतल्या युद्धबंदी-रेषा भागाला ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यांत भेट देऊन पहाणी केली आणि तिथल्या पहाणीनंतर, सरहद्दीचं कडक रक्षण करण्याविषयी लष्कराला त्यांनी जरूर त्या सूचना देऊन त्यांना आवश्यक ते अधिकारहि दिले. त्यानुसार १५ ऑगस्टलाच भारतीय सैन्यानं युद्धबंदी-रेषा पार करून कारगिल भागांतली तीन प्रमुख ठाणीं हस्तगत करण्यापर्यंत मजल मारली.

पाकिस्तानचं लष्करहि स्वस्थ राहिलेलं नव्हतं. त्यांनीहि युद्धबंदी-रेषा ओलांडून जम्मू क्षेत्रांतील भीमबार भागांत प्रवेश मिळवला होता. इतकं घडतांच भारताच्या सैन्यानं टिथवाल विभागांत समर्थपणानं धडक देऊन युद्धबंदी-रेषेच्या वायव्य-भागांतली दोन अतिशय मोक्याचीं ठाणीं जिंकून घूसखोरांचा प्रमुख मार्गच बंद करून टाकला. भारताच्या लष्करानं पाकिस्तानच्या हद्दींत पांच मैल आंत असलेलं हाजी-पीर-पास हें एक महत्त्वाचं ठाणंहि मोठ्या शौर्यानं हस्तगत केलं. यशवंतरावांनी मग संसदेसमोर निर्वाळा दिला की, भारताच्या लष्करानं चढाईचं धोरण स्वीकारून त्यामध्ये चांगलं यश संपादन केलं आहे. हाजी-पीर-पासचा कब्जा केलेला असल्यानं, शत्रुसैन्याचा लष्करी हालचाली करण्याचा महत्त्वाचा मार्गच रोखला गेला आहे. भारताच्या लष्कराकडून एवढ्या प्रचंड प्रमाणांत तडाखा दिला जाईल याची पाकिस्तानला कल्पना नव्हती; परंतु हाजी-पीर-पासमधील पराभवाचा धक्का पाकिस्तानला चांगलाच जाणवला. या पराभवाचा बदला घ्यायचा तर त्यांना प्रचंड बळानिशी भारतावर चाल करून यावं लागणार होतं. अर्थात् पाकिस्ताननं कुरापती काढण्याला प्रारंभ केला तो युद्धाच्या खुमखुमीनंच केला होता. पराभवाचा फटका बसतांच त्यांनी या संधीचा फायदा घेण्याचं ठरवलं आणि पूर्वयोजनेनुसार एका संपूर्ण ब्रिगेडच्या सामर्थ्यानिशी पाकिस्तानचं लष्कर चाल करून निघालं. काश्मीरमध्ये गनीम पाठवून पाकिस्ताननं सुरू केलेल्या चकमकींना त्यामुळे आता उघड उघड या दोन देशांमधील युद्धाचं स्वरूप प्राप्त होण्याची परिस्थिति निर्माण झाली – नव्हे प्रत्यक्ष युद्धच सुरू झालं.

कारण काश्मीरच्या दक्षिण-भागांत, भीमबार-छांब हद्दींत आंतरराष्ट्रीय आघाडी ओलांडून १ सप्टेंबरला पाकिस्तानचे रणगाडे प्रत्यक्षांत दाखल झाले आणि त्यांनी हल्ला चढवला. सुमारे एक तासभर पाकिस्तानी रणगाडे आग ओकत राहिले. युद्धबंदी-रेषा ओलांडूनहि अशाच प्रकारचा हल्ला पाकच्या सैन्यानं चढवला. छांबच्या उत्तरेच्या

बाजूनं, जम्मूकडे जाणाऱ्या मार्गावर जोराचे हल्ले चढवून पाकिस्ताननं युद्धाची अशी पहिली सलामी दिली. ही चढाई एवढी जोरदार आणि समर्थ होती की, पाकिस्तानच्या दोन ब्रिगेडस् त्यामध्ये सामील झाल्या होत्या. एका ब्रिगेडमध्ये ३ हजार सैनिक होते आणि १०० रणगाड्यांच्या आधारानं हें सैन्य आगेकूच करत होतं. या १०० रणगाड्यांत अमेरिकन बनावटीचे प्रचंड शक्तीचे ७० रणगाडे होते. पाकिस्तानची ही चढाई यशस्वी झाली असती तर जम्मू आणि काश्मीर हे भारतापासून अलग पडण्याची शक्यता होती, आणि तसं घडलं असतं तर भारताचे काश्मीरमधील हजारो सैनिक अलग पडले असते, कोंडींत सापडले असते. चढाईच्या पहिल्या दिवशीं भारतीय लष्करानं १ हजार सैन्यासह शत्रुसैन्याशीं प्राणपणानं मुकाबला करण्याची शर्थ केली, परंतु शत्रूच्या प्रचंड शक्तीनं त्यांना सहा मैल मागे रेटलं. चढाईच्या पहिल्या दिवशीं तरी पाकच्याच गळ्यांत विजयश्रीनं माळ घातली.

छांब विभागांत तर त्या दिवशीं भारतीय लष्कराचं फार मोठं नुकसान झालं. ही युद्धभूमि भारताच्या सैन्याला अतिशय गैरसोयीची होती. त्या ठिकाणीं मोठ्या प्रमाणांत दारूगोळा ओतूनहि विशेष प्रगति साध्य करतां आली नव्हती. पाकिस्तानची मात्र सतत आगेकूच सुरू होती. प्रत्यक्ष युद्धभूमीवरील कमांडर हरबक्षसिंग यांनी मग दिल्लीला सरसेनापति चौधरी यांच्याशीं दूरध्वनीवरून संपर्क साधला आणि पाकिस्तानचं जबरदस्त आक्रमण थोपवायचं, तर हवाईदलानं धडक घेण्याची निकड प्रतिपादन केली.

ही वेळ अशी आणीबाणीची होती की, पाकिस्तानचे पॅटन रणगाडे जम्मूच्या रोखानं आग ओकत निघाले होते. कमांडर हरबक्षसिंग यांचा संदेश मिळाला ती वेळ दुपारीं चारची होती. हवाईदलाला या लढाईत झेप घ्यायची, तर त्यासंबंधीचा निर्णय करण्यास फार वेळ जाऊं देण्यास अवसर नव्हता. कारण सूर्यास्त होऊन काश्मीरवर अंधाराचं साम्राज्य प्रस्थापित झालं असतं आणि पाकिस्तानच्या पॅटन रणगाड्यांना झपाट्यानं आगेकूच करण्यास चांगलाच अवसर मिळाला असता. परिणामीं जम्मूवर कबजा मिळवणं त्यांना सहज शक्य होतं. हा धोका टाळायचा तर हवाईदलानं आकाशांत झेप घेण्यासंबंधीचा निर्णय कांही मिनिटांतच करावा लागणार होता.

कमांडर हरबक्षसिंग यांचा संदेश आला तेव्हा हवाईदलाचे प्रमुख तिथेच होते. सरसेनापति चौधरी यांनी तातडी करून मग या दोघांनी चर्चा केली आणि ते संरक्षण-मंत्र्यांची आज्ञा घेण्यासाठी त्यांच्यासमोर दाखल झाले.

यशवंतरावांनी छांब विभागांतील गंभीर परिस्थिति समजावून घेतली. पाकिस्ताननं मोठ्या धूर्तपणें कट तयार केला होता. काश्मीरचा प्रश्न शस्त्रबळावर सोडवण्यासाठी पाकिस्तानचा आटापिटा सुरू झालेला होता. जम्मू आणि काश्मीरचा लचका तोडण्यासाठी तो टपून होता. गनिमांना अगोदर पुढे पाठवून 'मावो'च्या युद्धनीतीचा अवलंब पाकिस्ताननं केला होता, परंतु मावोचं शहाणपण मात्र त्यांच्याजवळ नव्हतं. शत्रूला

दूरगामी धोरणांत सतत आव्हान द्यावं, पण डावपेंचांत मात्र त्याचा आदर करत रहावं, हें मावोतंत्र – मावो-युद्धनीति पाकिस्ताननं कधीच आत्मसात केली नाही.

छांबमधील पाकिस्तानी मुसंडीचा शक्यतों त्याच भागांत प्रतिकार करण्याचा प्रयत्न भारतीय सैन्यानं केला, परंतु पाकिस्तान एवढ्या प्रचंड तयारीनिशी आलं होतं की, त्या ठिकाणीं त्याचा बीमोड करण्यासाठी तितकाच कणखर निर्णय करण्याची आवश्यकता होती. सरसेनापति आणि हवाईदलाचे प्रमुख यांनी हेंच संरक्षणमंत्र्यांच्या नजरेस आणलं. पॅटन रणगाड्यांची दौड थोपवायची तर भारताला आता हवाईदलाचा निर्णय करावा लागणार होता. सरसेनापतींना त्यासाठी संरक्षणमंत्र्यांची अनुमति हवी होती.

हवाई चढाई करणं याचा अर्थ भारतानं आंतरराष्ट्रीय युद्धांत झेप घेणं असा होता. आंतरराष्ट्रीयदृष्ट्याहि त्यामुळे या निर्णयाला महत्त्व होतं. यशवंतरावांना त्यासाठी अर्थातच पंतप्रधानांशीं चर्चा करूनच हा ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय करावा लागणार होता. परंतु वेळ अशी येऊन ठेपली की, उलटसुलट चर्चा आणि वाटाघाटी यासाठी अवसरच उरला नव्हता. पॅटन रणगाडे तिकडे पुढे सरकत होते आणि सूर्य अस्तास चालला होता. सायंकाळचा अंधार पडण्यापूर्वी जें कांही करायचं तें करावं लागणार होतं. कारण ती अचूक वेळ हुकली असती, तर काश्मीरवर बाका प्रसंग गुदरून तें भारतापासून तोडलं जाण्याची शक्यता दृष्टीच्या टप्प्यांत होती.

निर्णय करण्याचा क्षण आता आला होता. "आता या क्षणालाच हा निर्णय करायला हवा का?" – यशवंतरावांचा एक प्रश्न.

"हवाईहल्ला करण्याची हीच आता नेमकी वेळ आहे." – सरसेनापति.

"ठीक आहे, द्या धडक." – चव्हाण.

निर्णय झाला. पंतप्रधानांशीं सल्लामसलत करायला वेळच नव्हता. यशवंतरावांनी स्वतःच्या जबाबदारीवरच तो ऐतिहासिक निर्णय केला. त्या लढाईचा इतिहास असं सांगतो की, यशवंतरावांनी एका क्षणांत दिलेल्या त्या निर्णयानं, भारत हा आंतरराष्ट्रीय युद्धांत फेकला गेला. तोच हा निर्णय, की ज्यामुळे काश्मीर वांचलं आणि पाकिस्तानला भारताच्या युद्धनीतीचं दर्शन घडलं.

भारताचं हवाईदल सज्ज होतं. संरक्षणमंत्र्यांची आज्ञा मिळतांच क्षणार्धांत विमानं झेपावलीं आणि त्यांनी आपलं ईप्सित साध्य केलं. पॅटन रणगाडे जम्मूच्या रोखानं आग ओकत चालले होते. भारतीय लष्करी विमानांनी, त्या रणगाड्यांवर, तोफखान्यांवर निकराचा हल्ला चढवला आणि त्यांचा मार्ग उद्ध्वस्त करून त्यांची आगेकूच रोखली. यशवंतरावांनी आज्ञा केल्यापासून अर्ध्या तासांत, सूर्य मावळण्यापूर्वी हा पराक्रम घडून आला. सरसेनापतींनी या पराक्रमाचं महत्त्व मग संरक्षणमंत्र्यांपर्यंत पोंचवलं. ते आपल्या कार्यालयांत सचिंत बसूनच होते.

यशवंतरावांनी हवाईहल्ल्यासंबंधी केलेला निर्णय अर्ध्या तासानंतर पंतप्रधान शास्त्रींना निवेदन केला. हे दोघे नेते त्या वेळीं मनोमन एकजीव बनले होते. खेमकरण

यशवंतरावांचा निर्णय शास्त्रीजींनी मग उचलून धरला आणि पुढच्या काळांत, लोकसभेंतहि त्याचं त्यांनी समर्थनच केलं.

भारताच्या हवाईदलानं, त्यांना नेमून दिलेली कामगिरी चोखपणानं बजावली हें खरं; परंतु पाकिस्तानचं हवाईदलहि झोपलेलं नव्हतं. किंबहुना भारताकडून हवाईहल्ला होण्याचा अडाखा पाकनं बांधला होता. त्यामुळे भारताचीं लष्करी विमानं पॅटन रणगाड्यांवर घोंगावूं लागतांच पाकच्या हवाईदलानंहि झेप घेतली. पहिल्या दिवशीं त्या हवाई लढाईत, परिणामीं भारताला आपलीं चार विमानं गमवावीं लागलीं. युद्धाचं स्वरूप जोंपर्यंत गनिमांच्या कटकटीपुरतं मर्यादित होतं तोंपर्यंत त्या युद्धांत विमानदलाची मदत भारतानं घेणं सयुक्तिक नव्हतं. भारतानं आपली हवाईदलाची सज्जता करून ठेवलेलीच होती. परंतु प्रश्न होता त्यासाठी क्षण निर्माण होण्याचा! पाकिस्तानचे रणगाडे आंतरराष्ट्रीय सीमा-रेषा ओलांडण्याचं धाडस करून प्रत्यक्ष काश्मीरच्या – भारताच्या – भूमीवर उतरतांच, नेमका तो क्षण सरसेनापतींनी पकडला आणि संरक्षणमंत्र्यांच्या अनुमतीनं हवाईदलाचा उपयोग करण्याचा हेतु तडीस नेला.

भारतानं हवाईहल्ला करून पॅटन रणगाडे उद्‌ध्वस्त करतांच पाकिस्तानचे नेते संतप्त बनले. झुल्फिकारअल्ली भुट्टो यांनी आपला जिभेचा पट्टा सोडून भारताच्या संरक्षण-मंत्र्यांची शाब्दिक हेटाळणीहि केली. यशवंतरावांनी छांबमधील भारताच्या शौर्याची माहिती लोकसभेंत निवेदन केली होती त्यामुळे तर भुट्टोंचं पित्त अधिकच खवळलं. पाकिस्ताननं युद्धाचं क्षेत्र विस्तृत बनवल्याबद्दल चव्हाणांनी त्यांना दोष दिला होता. भारताचे संरक्षणमंत्री, पाकिस्तानवर लांडग्यासारखे तुटून पडले असले, तरी पाकिस्तान म्हणजे कांही शेळी-मेंढी नव्हे, याची जाण संरक्षणमंत्र्यांनी ठेवावी अशी भुट्टो यांची दर्पोक्ति होती.

पाकिस्तानला आपल्या लष्करी सामर्थ्याचा अभिमान होता. सप्टेंबरच्या ३ व ४ तारखेला त्यांनी भारतीय हद्दींत जोराची मुसंडी मारण्यांतहि यश मिळवलं होतं. शक्तिशाली अशा सेबरजेट विमानांचा वापर त्यांनी केला होता. भारतानं मात्र, स्थानिक बनावटीचीं, आकारानं लहान असलेल्या नॅट विमानांचाच उपयोग केला. परंतु भारताच्या या 'नॅट'नी ' लहान मूर्ति पण थोर कीर्ति ' अशी बेमालूम कामगिरी बजावून सेबरजेट-सारख्या महान् शक्तीच्या विमानांचा फडशा पाडला.

हें घडलं तरी पाकिस्तानची राक्षसी महत्त्वाकांक्षा संपली नव्हती. अखनूरच्या रोखानं, पाकच्या सैन्यानं सुमारे २० मैलांची आघाडी मिळवली होती. ५ सप्टेंबरला तर जुरियन या खेड्याचा कब्जा करून, तें आता अखनूरच्या टप्प्यांत पोंचलं होतं. अखनूरचा भाग कब्जांत घेतला की त्यांचं काम होणार होतं. काश्मीरमधील सैन्याचा आणि भारताचा संबंध तोडणं हें त्यांचं उद्दिष्ट होतं. अशा प्रकारे सेनेचा संबंध तुटला की जम्मू-काश्मीर मुक्त केल्याची घोषणा करण्यास त्यांना संधि मिळणार होती. काश्मीरमध्ये ज्या हेतूनं घूसखोर पाठवले होते तो हेतु साध्य होण्याची वेळ निकट

आली आहे असंच स्वप्न पाकचे लष्करी अधिकारी पाहूं लागले होते. पाकचा लष्कर-प्रमुख जनरल मुसा यानं तर, पाकच्या सैनिकांना चिथावण्यासाठी त्यांना सांगितलं की, "पहा, तुम्हीं आता भारताला चावा घेतला आहे. तुम्हांला आता, भारताचा संपूर्ण पाडाव करण्यासाठी ही कैची आवळावी लागेल. भारताचा पराभव तुम्ही निश्चित करणार आहांत. अल्ला तुमच्या पाठीशीं आहे."

दरम्यान चीनचे परराष्ट्रमंत्री चेन-यी यांनी ४ सप्टेंबरला कराचीला धांव घेतली, भुट्टोशीं दिवसभर चर्चा केली आणि भारताचा पाकिस्तानवरील हल्ला परतवून लावण्यासाठी चीनचं साहाय्य देण्याचं आश्वासन देऊन ते परत गेले.

चीन-पाकिस्तानची अशी हातमिळवणी झाल्यामुळे या युद्धाला मग गहिरा रंग प्राप्त झाला. युद्धाची व्याप्ति वाढत राहिल्यानं राष्ट्रसंघाचे प्रमुख ऊ-थांट हेहि अस्वस्थ बनले होते आणि युद्धाची व्याप्ति वाढूं नये यासाठी दोघांनाहि परावृत्त करण्यासाठी त्यांचा प्रयत्न सुरू होता. परंतु त्यांचं कांही ऐकावं अशा मनःस्थितींत भारत आणि पाकिस्तान दोघेहि नव्हते. चीन-पाकिस्तान सांधा जुळल्यामुळे भारतांत मात्र गडबड उडाली होती. पाकिस्तानच्या जबरदस्त युद्धपिपासूपणाबद्दल लोकांकडून आणि वृत्तपत्रांतून संतप्त प्रतिक्रिया उमटूं लागल्या. भारत सरकार आणि संरक्षणमंत्री यांना आता लोकमताची दखल घ्यावीच लागणार होती.

पाकिस्ताननं आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडली होती आणि भारताच्या भूमीचा कांही मैलपर्यंत कबजा केला होता. काश्मीरचं स्वातंत्र्य धोक्यांत आलं होतं. पाकिस्तानचं लष्कर अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह पुढे झेपावत राहिलं होतं. भारताच्या मुत्सद्देगिरीची कसोटी लागण्याचीच वेळ येऊन ठेपली होती. विचार करायलाहि फारशी फुरसत नव्हती. परंतु तातडीनं निर्णय मात्र करावा लागणार होता. पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री यांना आता पुन्हा एकदा ऐतिहासिक निर्णय करावा लागणार होता. दिल्लींत धांवपळ उडाली होती. वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांशीं खलबत सुरू होतं. आणि त्यांतूनच अखेर भारतानं स्वसंरक्षणार्थ कारवाई करण्याचा तो निर्णय केला. ६ सप्टेंबरला त्या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होतांच पाकचा सारा कटच उद्ध्वस्त झाला. ज्या सामर्थ्याच्या जोरावर पाकिस्तान आक्रमण करण्याला उद्युक्त झालं तें सामर्थ्यहि या एका निर्णयामुळे लुळं-पांगळं होऊन पडलं. विद्युत्-वेगानं भारतानं आपलीं उद्दिष्टं साध्य केल्यानं या युद्धाचं सारं स्वरूपच बदललं.

हा निर्णय होता लाहोरवर लष्करी दबाव आणण्याचा आणि लाहोरच्या रोखानं, समर्थपणानं आणि झपाट्यानं चाल करून जाण्याचा! निर्णय होताच भारताच्या सैन्यानं पंजाबमधील गुरुदासपूर, अमृतसर आणि फिरोजपूर अशा तीन बाजूंनी लाहोरवर टाच रोवली आणि गरुडभरारीनं झेप घेतली.

भारताच्या सैन्यानं, पंजाबमध्ये युद्धाची दुसरी आघाडी उघडून लाहोरच्या दिशेनं मुसंडी मारली आहे असं यशवंतरावांनी ६ सप्टेंबरला लोकसभेंत घोषित करतांच

लोकसभेनं टाळ्यांचा कडकडाट करून या निर्णयाचं स्वागत केलं. त्या निर्णयानं आणि लष्करानं दाखवलेल्या मर्दमुकीनं साऱ्या देशांतच एक प्रकारचं चैतन्य निर्माण झालं. भारताच्या सैन्यानं आता भक्कम असा आक्रमक पवित्रा घेतला होता. स्वातंत्र्यानंतर भारतीय जनतेला त्याचं प्रथमच दर्शन घडलं होतं. त्यापूर्वी १९६२ च्या नेफाच्या लढाईत आणि नंतर पाकिस्तानशीं झालेल्या कच्छच्या रणांतील लढाईत देशाला असं दृश्य दिसलं नव्हतं. लष्कराच्या आक्रमक पवित्र्यामुळे मग देशांत अभिमानाचं आणि आत्मविश्वासाचं चैतन्य सर्वत्र निर्माण झालं.

लाहोरच्या रोखानं उघडलेल्या आघाडीचं उद्दिष्टहि स्पष्ट होतं. लाहोरचं संरक्षण करणाऱ्या इचोगिल कॅनॉलचा कब्जा हें तें उद्दिष्ट होतं; आणि त्याच रोखानं गुरुदासपूर अमृतसर आणि फिरोजपूर आघाड्यांची आगेकूच होत राहिली. ४७ मैल लांब, १५ फूट खोल आणि १४० फूट रुंदीचा इचोगिल कालवा म्हणजे लाहोर शहराभोवतालचा दुर्लंघ्य असा खंदकच आहे. कांही ठिकाणीं हा कालवा लाहोरपासून ९ मैल अंतरावरून वाहतो, तर कांही ठिकाणीं हें अंतर तीन मैलांचंच आहे. या कालव्याच्या पूर्व-किनाऱ्यापर्यंत धडक मारण्याचं उद्दिष्ट भारताच्या सैन्याला ठरवून देण्यांत आलं होतं. लाहोरची तीन बाजूंनी कोंडी केल्यानं, पाकच्या लष्कराचं सारं लक्ष लाहोरच्या रक्षणावरच कॅंद्रित होणार होतं. पाकच्या उद्दाम युद्धखोरीला पायबंद बसायचा आणि त्या सैन्याची भारताच्या रोखानं सुरू असलेली धांव गोठवायची, तर भारताच्या सैन्याला आपलं उद्दिष्ट पूर्ण करावं लागणारच होतं. त्याचबरोबर छांबमध्ये सियालकोटचा ताबा करून पाकिस्तानचं आणखी एक आक्रमक केंद्र नेस्तनाबूत करणं हें दुसरं उद्दिष्ट ठरवण्यांत आलं होतं.

त्यानुसार ७ सप्टेंबरलाच छांबमधील सैन्यानं सियालकोटच्या रोखानं चाल केली. त्यासरशी पाकिस्तानला अखनूरच्या रोखानं उघडलेली आघाडी थांबवून, सियालकोटच्या रक्षणासाठी धांव घ्यावी लागली. परिणामीं काश्मीर गिळंकृत करण्याचं पाकचं स्वप्न उद्‌ध्वस्त झालं.

भारतानं लाहोरच्या रोखानं मुसंडी घेतांच आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत मात्र कमालीची चिंता निर्माण होऊन धांवपळ उडाली. ब्रिटन, इराण, तुर्कस्तान, इंडोनेशिया यांनी तर भारताच्या निषेधाचा आवाज उठवला. रशिया मात्र सावध होता. त्यांनी आपली समतोल प्रतिक्रियाच व्यक्त केली. पाकिस्तानवर चाल करून जातांच भारताचा निषेध करण्यासाठी सरसावलेलं ब्रिटन, पाकिस्ताननं सरळ सरळ आक्रमण केलं तेव्हा मात्र मूग गिळून स्वस्थ होतं. ब्रिटनच्या या वृत्तीबद्दल भारतांत मात्र सर्वत्र संताप निर्माण झाला.

पंजाबमध्ये आघाडी उघडून, लाहोरवर चाल करून जाण्याच्या भारताच्या मुत्सद्देगिरीनं पाकिस्तान मात्र पार गडबडून गेलं. त्यांच्या तें ध्यानींमनींहि नव्हतं. भारताच्या लष्करानं आपलं सर्व सामर्थ्य पंजाबमध्ये उभं करून, दिल्लीला पोंचण्याचं पाकिस्तानचं स्वप्न धुळीला मिळवलं. इचोगिल कॅनॉलच्या काठावरील डोंगराई (अमृतसर विभाग)

खेमकरण, (फिरोजपूर विभाग) आणि बर्की (गुरुदासपूर विभाग) इथपर्यंत भारताच्या सैन्यानं आघाडी मारून लाहोरची तिन्ही बाजूंनी कोंडी करण्यांत यश संपादन केलं.

खेमकरण भागांत तर भारताच्या सैन्यानं अतुलनीय असा पराक्रम केला. पाकिस्ताननं २२५ पॅटन रणगाड्याच्या सामर्थ्यानिशी भारताच्या रोखानं हल्ला चढवला होता. ३० चौरस मैलांचं क्षेत्र पॅटन रणगाड्यांनी व्यापलं होतं. रणगाड्यांच्या चढाईचं खास प्रशिक्षण घेतलेलं पाकिस्तानचं हें पहिल्या प्रतीचं सैन्यदल होतं. रणगाड्यांचं भारताचं सामर्थ्य मात्र तोकडं होतं. पाकिस्ताननं रणांगणांत आणलेल्या रणगाड्यांच्या तुलनेनं हें प्रमाण ४ : १ असं होतं. पॅटन रणगाड्यांनी भारताच्या हद्दींत १५ मैलांपर्यंत भूमीचा कबजाहि केला होता. परंतु भारताच्या सैन्यानं गनिमी काव्याचा वापर करून या अजस्र पॅटन रणगाड्यांचा धुव्वा उडवला. इतकंच नव्हे तर, ९७ पॅटन रणगाड्यांचा ताबा घेतला. 'पॅटन रणगाड्यांची स्मशानभूमि' असंच मग खेमकरणला संबोधण्यांत येऊं लागलं. शेवटीं लाहोरचा बचाव करण्यासाठी, पाकिस्तानच्या सैन्याला इचोगिल कॅनॉल-वरील पूल उडवून देऊनच आपल्या जिवाचा आणि लाहोरचा बचाव करावा लागला. सियालकोटमध्येहि रणगाड्यांच्या लढाईची अशीच धुमःश्चक्री झाली.

पंजाबमध्ये ही धुमःश्चक्री सुरू असतांना पाकिस्ताननं विमानांतून बॉंबफेक करून भारताच्या हद्दींतील कांही नागरी भाग उद्ध्वस्त करण्याचाहि प्रयत्न केला. भारताच्या हद्दींत घुसून विमानं पाडण्याचा उपक्रमहि त्यांनी केला. गुजरातचे मुख्य मंत्री बलवंतराय मेहता हे विमानांतून चालले असतांना एक दिवस पाकच्या हल्ल्याला बळी पडले; परंतु पाकिस्तानचा रोख प्रामुख्यानं भारताच्या लष्करी तळावर होता. युद्धसमाप्ति होण्याच्या आदल्या दिवशीं मात्र अमृतसर नजीकच्या चिराटा या नागरी भागावर बॉंब टाकून तो भाग उद्ध्वस्त करण्याचा पाकच्या बॉंबफेक्या विमानांनी प्रयत्न केला.

सप्टेंबरच्या १ तारखेला खऱ्या अर्थानं लढाईला तोंड लागलं आणि या युद्धाचा शेवट २३ सप्टेंबरला पाकिस्तानच्या पराभवानं झाला. त्याच दिवशीं युद्धसमाप्तीची घोषणा दोन्ही बाजूंनी झाली. अमेरिका, ब्रिटन आणि रशिया यांच्या दबावामुळेच अखेर हें युद्ध थांबलं. युद्धसमाप्तीनंतर मात्र बरंच कांही बोललं जाऊं लागलं. युद्ध-समाप्ति स्वीकारण्याबाबत शास्त्रीजी आणि चव्हाण यांच्यांत मतभेद होते असंहि दर्शवण्याचा प्रयत्न झाला.

वस्तुतः असं कांही घडलेलं नव्हतं असा खुलासा नंतर स्वतः यशवंतरावांनीच केला. राष्ट्रसंघानं युद्धबंदीसंबंधीचा ठराव ६ सप्टेंबरला केला होता. शास्त्रीजींना तो मान्य होता आणि शास्त्रीजींना त्या संदर्भांत यशवंतरावांचा पाठिंबाच होता. यशवंतरावांची या संदर्भातील भूमिका एवढीच होती की, युद्ध कांही आपण पुकारलेलं नाही; परंतु युद्ध सुरू झाल्यानंतर त्याचा निर्णय करण्याची हुकमाचीं पानं आपल्या हातांत आल्या-नंतर, पाकिस्ताननं, शांततेचं निश्चित आश्वासन दिल्याखेरीज त्याला कैचींतून मुक्त करण्यांत हशील नाही. युद्धसमाप्ति कधी होते यासाठी भारत मोठा आतुर आहे अशी

या देशाची प्रतिमा निर्माण होणंहि योग्य नव्हे. युद्धसमाप्ति केव्हा स्वीकारायची या वेळेला तर महत्त्व आहेच, शिवाय ती कोणत्या परिस्थितींत स्वीकारायची यासंबंधीच्या तात्त्विक विचारावर कदाचित् मतभेद असूं शकतील. मंत्रिमंडळांत युद्धसमाप्ति स्वीकारण्याबाबत कांही तीव्र मतभेद आहेत किंवा त्या संदर्भांत कांही बाजू निर्माण झाल्या आहेत असं मुळीच नाही. भारत कांही अशांतता निर्माण करत आहे असा दोष कोणाला चिकटवतां येऊं नये एवढाच प्रयत्न आहे.

युद्धसमाप्तीनंतर पुढच्याच आठवड्यांत मग यशवंतरावांनी पंजाब आघाडीचा दौरा करून, लष्करी अधिकारी, विशेषतः जवान आणि 'नॅट'चे वैमानिक यांना धन्यवाद दिले. त्यांच्यासमवेत लेफ्टनंट जनरल कॅंडेथ हे होते. युद्धाच्या या संपूर्ण काळांत कांही किरकोळ मतभेद वगळतां सैन्यदलाच्या सर्व अधिकाऱ्यांनी एकजुटीनं आणि एकजीव बनूनच आपापली जबाबदारी पार पाडली. सरसेनापति चौधरी आणि एअर-मार्शल अर्जनसिंग यांनी, पाकिस्तानचे हल्ले परतवण्यांत आणि आक्रमक पवित्रा स्वीकारण्यांत कमालीचं शौर्य प्रगट केलं. या दोन्ही अधिकाऱ्यांनी, विशेषतः अर्जनसिंग यांनी, जवानांचं मनोधैर्य शाबूत राखण्याचं फार मोठं काम केलं.

युद्धसमाप्ति झाली त्या वेळीं पाकिस्तानचा ७४० चौरस मैलांचा मुलूख भारतानं जिंकला होता. भारताच्या २१० चौरस मैल क्षेत्रावर पाकिस्तानचा ताबा होता. या युद्धांत पाकिस्तानला फार मोठं नुकसान सोसावं लागलं. खेमकरण आणि सियालकोट या दोन ठिकाणच्या युद्धांत त्यांना दारुण पराभव पत्करावा लागला. युद्ध-समाप्तीनंतर आयूबखान यांनी पाकिस्तानच्या लष्करांतील जनरलच्या हुद्यावरील ११ अधिकारी आणि कर्नलच्या हुद्यावरील ३० अधिकारी यांना सेवानिवृत्त केलं, यावरूनच पाकिस्तानची या युद्धानं काय अवस्था निर्माण केली असेल याची कल्पना येऊं शकते. भारतालाहि छांब, खेमकरण, वाघासेक्टर या भागांतील लढाईत मोठं नुकसान सहन करावं लागलं; परंतु एकूण हिशेब पहातां, युद्धसमाप्ति ही भारतापेक्षा पाकिस्तानलाच वरदान ठरली.

युद्धसमाप्ति अंमलांत आली तरी या दोन देशांमध्ये शांततेचं वातावरण निर्माण झालेलं नव्हतं. या दोन राष्ट्रांत समझोता करून शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न रशियाचे पंतप्रधान कोसिजिन यांनी, प्रत्यक्ष युद्धसमाप्तीपूर्वी सप्टेंबरच्या मध्यावरच सुरू केले होते. त्यासाठी दोन्ही देशांच्या प्रमुखांना त्यांनी ताश्कंदला येण्याचं पाचारण केलं होतं. अखेरीस युद्धसमाप्तीनंतर, पुढे ४ जानेवारी १९६६ ला, शास्त्रीजी आणि आयूबखान यांना चर्चेसाठी ताश्कंदला एकत्र आणण्यांत कोसिजिन यांना यश आलं. या चर्चेच्या वेळीं संरक्षणमंत्री यशवंतराव हेहि शास्त्रीजींसमवेत ताश्कंदला चर्चेसाठी गेले होते.

ताश्कंदमध्ये शास्त्रीजींच्या बरोबरीनं यशवंतरावांनी चर्चेंत भाग घेतला. संरक्षणाच्या आणि लष्करी प्रश्नाच्या संदर्भांत शास्त्रीजींना आवश्यक तो सल्ला देण्याचं महत्त्वाचं कार्य

त्यांनी या वाटाघाटींच्या वेळीं केलं. ताश्कंदमधील चर्चेच्या वेळीं यशवंतराव सातत्यानं शास्त्रीजींच्या सान्निध्यांतच होते.

या चर्चेमध्ये काश्मीर-प्रश्नाविषयीची चर्चा उपस्थित केली जाऊं नये असा शास्त्रीजींचा आग्रह होता, तर आयूबखान यांना राजकीयदृष्ट्या, काश्मीरच्या प्रश्नाचा निकाल या चर्चेमध्येच करायचा होता. त्यामुळे तिथल्या वाटाघाटींत कांहीसा पेंच निर्माण झाला. परंतु या दोन्ही राष्ट्रांच्या दरम्यान शांतता निर्माण होण्याचा प्रश्न सर्वांत अधिक महत्त्वाचा होता. अखेरीस रशियाचे पंतप्रधान कोसिजिन यांच्या मुत्सद्देगिरीच्या मध्यस्थीमुळे आणि त्यांनी स्वीकारलेल्या तडजोडीच्या भूमिकेमुळे १० जानेवारीस, भारत-पाकिस्तान दरम्यानच्या मुख्य प्रश्नासंबंधांत सलोखा घडवण्यांत त्यांनी यश संपादन केलं.

ताश्कंदच्या वाटाघाटींमध्ये सलोख्याच्या ज्या अटी उभयतांनी मान्य केल्या आणि जें संयुक्त पत्रक काढण्यांत आलं त्यानुसार २५ फेब्रुवारी १९६६ पूर्वी दोन्ही देशांनी आपापलं सैन्य ५ ऑगस्ट १९६५ ला ज्या ठिकाणीं होतं तिथपर्यंत मागे घ्यावं, दोन्ही देशांनी युद्धबंदीच्या अटींचं आणि युद्धबंदी-रेषेचं पालन करावं, दोन्ही देशांनी आपापसांत राजनैतिक संबंध प्रस्थापित करावेत आणि आर्थिक व सांस्कृतिक संबंध पूर्ववत् सुरू ठेवावेत अशी तडजोड निश्चित झाली.

या सर्व वाटाघाटींच्या वेळीं यशवंतरावांनी भारताचे संरक्षणमंत्री म्हणून तर भूमिका बजावलीच, परंतु त्यापेक्षाहि भारताच्या पंतप्रधानांचे एक विश्वासू सहकारी आणि व्यवहारी मध्यस्थ या नात्यानं त्यांची प्रतिमा अधिक उठावदार अशी निर्माण झाली.

ताश्कंदमध्ये वाटाघाटी झाल्या, दोन्ही देशांच्या प्रमुखांच्या स्वाक्षरीनं संयुक्त पत्रक निघालं आणि भारत-पाकिस्तान यांच्यांतील उभं वैर तात्कालिक स्वरूपांत का होईना, कमी करण्यांत, आशिया खंडांतील या भागांत शांतता निर्माण करण्यांत रशियाच्या मध्यस्थीला यश आलं, इथपर्यंत सर्व गोष्टी सुरळीत पार पडल्या.

परंतु युद्धसमाप्तीबरोबरच भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनाचीहि समाप्ति होईल, शत्रु-राष्ट्राशीं शांततेचा सलोखा करत असतांना ते स्वतःच चिरशांततेंत विलीन होतील याची कुणालाहि कल्पना नव्हती. तथापि नियतीचा न्याय कांही वेगळाच !

शांतता-करारावर सह्या झाल्यावर शास्त्रीजींनी पाहुण्यांसमवेत रात्रीं खाना घेतला आणि विश्रांतीसाठी ते आपल्या दालनांत पोंचले. १० जानेवारीची ती रात्र. शास्त्रीजी विश्रांति घेत होते. दुसऱ्या दिवशीं त्यांना भारताच्या राजधानीकडे – दिल्लीकडे निघायचं होतं. परंतु काळाच्या मनांत कांही निराळंच होतं. त्यांना आपल्या साम्राज्यांत घेऊन जाण्यासाठी काळ त्यांच्या दालनांत अगोदरच पोंचला होता आणि नेमक्या क्षणाची वाट पहात थांबला होता. तो विवक्षित क्षण येतांच काळानं त्यांना अलगद उचललं ! हृदयविकाराचा झटका येण्याचं निमित्त ! !

शास्त्रीजींच्या समवेत यशवंतरावहि तास्कंदमध्ये त्या वेळीं होते. शास्त्रीजींच्या दालनापासून थोड्याफार अंतरावरील दुसऱ्या दालनांत ते रात्रीच्या वेळीं विश्रांति घेत होते. शास्त्रीजी अस्वस्थ आहेत असं त्यांना समजतांच ते शास्त्रीजींच्या दालनांत कांही मिनिटांतच पोंचले. परंतु तोंपर्यंत सारं संपलं होतं. काळानं आपला हेतु साधला होता. शास्त्रीजींच्या निष्प्राण पार्थिव देहाचंच दर्शन यशवंतरावांना झालं.

घनघोर युद्धांत शत्रूवर विजय मिळवणारे शास्त्रीजी काळावर मात्र विजय मिळवूं शकले नाहीत. आजवर कुणालाच तो मिळवतां आलेला नाही !

शास्त्रीजींचं देहावसान, भारताच्या बाहेर, रशियांत तास्कंदमध्ये व्हावं असंच त्यांच्या ललाटावर लिहिलं गेलं असल्यास न कळे ! पण तसं आता घडलं होतं. साऱ्या जगालाच त्यामुळे धक्का बसला. भारत आणि भारतांतील जनता तर दुःखावेगानं कोसळली. या जनतेला आता शास्त्रीजींच्या पार्थिव देहाचंच दर्शन घ्यावं लागणार होतं.

शास्त्रीजींचा पार्थिव देह विमानांत ठेवून मग यशवंतराव भारतांत परतले. त्यांचा जिवाभावाचा मित्र, आणि ज्यांच्या सहवासांत, स्नेहभावानं, आत्मीयतेनं राष्ट्रासाठी काम केलं असा 'माणूस' असलेला भारताचा सुपुत्र हरपला होता. युद्धांतल्या विजयाचा आनंद शास्त्रीजी आपल्याबरोबर घेऊन गेले होते. मागे राहिल्या फक्त आठवणी ! भारतीयांना आता त्यावरच अश्रु ढाळावे लागणार होते.

भारताचे समर्थ संरक्षणमंत्री म्हणून यशवंतरावांची प्रतिमा या युद्धाच्या निकालानं उजळ बनली होती आणि त्यांना अमाप लोकप्रियता लाभली होती. लष्करांतले अधिकारी आणि जवान यांचं नेतृत्व त्यांनी ज्या आपुलकीनं केलं त्यामुळे यशवंतरावांबद्दल त्या सर्वांच्या अंतःकरणांत सार्थ अभिमानाच्या भावना होत्या. युद्धसमाप्तीनंतर लष्करांतील जवानांसाठी अधिकाधिक सुखसोयी निर्माण करून देण्याचा आणि त्यांच्या हातीं अत्याधुनिक शस्त्रास्त्रं देण्याचा निर्णय त्यांनी केल्यामुळे तर जवानांच्या मनांत या संरक्षणमंत्र्याबद्दलचा जिव्हाळा पराकोटीचा वाढला.

लष्करांतील अधिकारी आणि जवान या सर्वांनीच युद्धकाळांत पराक्रमाची शर्थ केली होती, लष्करी डावपेंचांचं आणि राष्ट्रप्रेमाचं दर्शन घडवलं होतं. त्याबद्दल यशवंतरावांचं मनहि त्यांच्याविषयीच्या अभिमानानं भरून गेलं होतं. संरक्षणमंत्री या नात्यानं यशवंतरावांनी समग्र भारतांत सतत दौरे करून भारतीय लष्कराबद्दल लोकांमध्ये अभिमान निर्माण केला होता. प्रत्यक्ष युद्ध सुरू असतांना तर या सर्व जवानांच्या मनांत त्यांनी धर्मनिरपेक्षतेचं बीज रुजवलं. भारतीय जवानांचं राष्ट्रप्रेम आणि प्रामाणिकपणा हा संशयातीत असून या देशांत लष्कराकडून बंड होण्याची कदापि शक्यता नाही, असा यशवंतरावांनी ठाम विश्वासच व्यक्त केलेला आहे.

पंडित नेहरूंच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन १९६२ च्या नोव्हेंबरमध्ये यशवंतराव दिल्लीला दाखल झाले आणि त्यांनी संरक्षणमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारलीं तो काळ देशाच्या दृष्टीनं आणीबाणीचा, संकटानं व्यापलेला असा होता. देशभक्तीशिवाय आपली

अन्य कुठलीहि पात्रता नाही असं त्यांनी, नेहरूंना नम्रपणानं सांगितलं होतं. परंतु पं. नेहरूंनी विश्वासानं ती जबाबदारी सोपवितांच ते दिल्लींत दाखल झाले होते. आणि दिल्लीला पोंचल्यावर प्रारंभींच्या कांही महिन्यांत दिल्लीला ज्या घडामोडी झाल्या त्यामुळे मात्र ते बेचैन बनले होते.

परंतु संरक्षणखात्याच्या कारभारांत, यंत्रणेंत आणि प्रत्यक्ष लष्करामध्येहि आपण कांही इष्ट असे बदल घडवूं शकतों, वातावरणांत बदल करूं शकतों असं तिथे प्रत्यक्ष काम करतांना जेव्हां अनुभवास येऊं लागलं त्या वेळीं मात्र त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास निर्माण झाला; त्यांचं मन स्थिर बनलं आणि त्यामुळे त्यांच्या हातून राष्ट्राला अभिमान वाटावा अशी सेवा घडली. देशाचं संरक्षण तर त्यांनी केलंच, पण त्याचबरोबर सेना आणि समाज यांमधील अंतर सांधणारा आणि सेना आणि समाज यांमध्ये सामरस्य निर्माण करणारा, ते दुवा ठरले.

संरक्षणमंत्री म्हणून जबाबदारीनं काम करतांनाच त्यांना भारताच्या आत्म्याचं दर्शन घडलं आणि भारतालाहि यशवंतरावांच्या हिमतीचा, कर्तृत्वाचा आणि राष्ट्रनिष्ठेबद्दलचा शोध लागला. संरक्षणखात्यांत यशवंतरावांनी चार वर्षे अहोरात्र व्यतीत केलीं; आणि १९६६ च्या नोव्हेंबरमध्ये, राष्ट्राची गरज म्हणून अधिक महत्त्वाच्या कामाचीं सूत्रं – गृहमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारण्याचा प्रसंग निर्माण झाला तेव्हा, जवानांची व आपली आता प्रत्यक्ष ताटातूट होणार म्हणून त्यांचं मन वियोगाच्या, दुःखाच्या भावनेनं भरून गेलं.

यशवंतराव हे भावनाप्रधान आहेत. संरक्षणखात्यांतील त्या चार वर्षांनी त्यांच्या राष्ट्रीय व्यक्तिमत्त्वांत मोलाची भर घातली होती. संरक्षणमंत्रालयाचा त्यांनी निरोप घेतला तो असा भरल्या मनानंच!

# २२

शांततेचा करार करून यशवंतराव दिल्लीला परतले तेव्हा त्या वेळचे गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांनी शास्त्रीजींच्या पश्चात् त्यांचीं पंतप्रधानपदाचीं सूत्रं हंगामी स्वरूपांत स्वीकारलीं होतीं. हंगामी पंतप्रधान म्हणून त्यांचा शपथविधि झाला होता तरी पंतप्रधानपदाच्या गादीचे आपणच आता खरे वारस आहोंत अशी त्यांची मनोमन भावना निर्माण झाली होती.

परंतु त्याच वेळीं पंतप्रधानपदावर मोरारजी देसाई हेहि डोळा ठेवून आहेत याची त्यांना कल्पना नसावी. पं नेहरूंच्या देहावसानानंतर मोरारजींची संधि हुकली होती. त्यामुळे आता ते हें सर्वोच्चपद हस्तगत करण्यासाठी टपून होते. त्यांना ही संधि हातची घालवायची नव्हती. त्यामुळे पंतप्रधानपदासाठी त्यांनी आपली उमेदवारी जाहीर केली.

के. कामराज हे त्या वेळीं अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. शास्त्रीजींच्या निधनाचं वर्तमान येतांच त्यांनी भावी पंतप्रधानपदाच्या संदर्भात विचारविनिमय सुरूहि केला होता. मद्रासमध्येच त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना चर्चेसाठी बोलावलं होतं.

पंतप्रधानपद हें इंदिरा गांधी यांच्याकडे सोपवावं असं मत कामराज यांनी आपल्या सहकाऱ्यांना सांगूनहि ठेवलं होतं. तसा पुढेमागे कांही प्रसंग निर्माण झाल्यास इंदिरा गांधी यांना पंतप्रधानपदावरून दूर करण्यास विशेष कष्ट पडणार नाहीत, असा कामराज यांचा इंदिरा गांधींची निवड करण्यामागील हेतु होता.

पंतप्रधानपदासाठी त्या वेळीं इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण आणि मोरारजी देसाई या नांवांची चर्चा मग होत राहिली. यशवंतरावांची प्रतिमा त्या वेळीं खूपच उंचावली होती; परंतु कामराज यांची अशी समजूत झाली होती की, यशवंतराव चव्हाण हे पोलादी पुरुष असून, कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सल्ल्याचा ते सर्वकाळ

आदर करतीलच असं नव्हे. तरी पण, महाराष्ट्राचे त्या वेळचे मुख्य मंत्री वसंतराव नाईक यांनी आपल्या मनानं चव्हाण यांची पंतप्रधानपदासाठी निवड केली होती. तें घडवण्यासाठी इतरांचं साहाय्य मिळवण्याचाहि त्यांनी मनापासून प्रयत्न सुरू ठेवला.

दरम्यान या निवडणुकींतले दोन प्रतिस्पर्धी, इंदिरा गांधी आणि यशवंतराव यांच्यांत आपसांत चर्चा होऊन दिलजमाई झाली. यशवंतरावांनी त्यांना आपली भूमिका स्पष्टपणें, मोकळ्या मनानं सांगितली की, पंतप्रधान बनण्याची तुमची इच्छा असेल आणि अन्य नेते मंडळी त्या बाबतींत सहकार्य देत असतील, पाठिंबा देणार असतील, तर मी स्वतः या निवडणुकीच्या मैदानांतून बाजूला आहे असं निश्चित समजा. इतकंच नव्हे तर, माझीं सर्व मतं तुम्हांलाच मिळतील. इंदिरा गांधी यांनी हें सर्व ऐकलं आणि त्या शांत राहिल्या. या चर्चेच्या वेळीं त्यांनी, यशवंतरावांप्रमाणे आपली स्वतःची भूमिका सांगितली नाही किंवा यशवंतराव ती निवडणूक लढवणार असतील, तर आपलाहि हाच पवित्रा राहील, असा शब्द उच्चारला नाही.

यशवंतरावांचा आपल्याला संपूर्ण पाठिंबा आहे याची मात्र इंदिराजींना खात्री झाली आणि त्यांनी तसं पत्रकारांना सांगितलंहि. आम्ही दोघे एकमेकांच्या विचारानंच पावलं टाकीत आहोंत असंहि त्यांनी स्पष्ट केलं. एक गोष्ट मात्र स्पष्ट होती की, यशवंतरावांचा सर्वतोपरी पाठिंबा मिळाल्यानं इंदिराजींचा मार्ग आता बराचसा मोकळा झाला होता. सिंडिकेट काँग्रेसचे नेते मात्र, विशेषतः अतुल्य घोष यांचा इंदिराजींना मुळीच पाठिंबा नव्हता. कामराज यांनी मात्र या वेळीं मोठीच कामगिरी बजावली. सिंडिकेटमधल्या नेत्यांचा विरोध असूनहि संसदीय काँग्रेस-पक्षाचा आणि निरनिराळ्या राज्यांतल्या काँग्रेसच्या मुख्य मंत्र्यांचा पाठिंबा त्यांनी इंदिरा गांधींच्या पाठीशीं उभा करण्यांत यश मिळवलं.

पंतप्रधानपदाच्या वारसाच्या या चढाओढींत सर्व मुख्य मंत्र्यांनी मोठीच महत्त्वाची कामगिरी बजावली. त्या सर्वांनी अनौपचारिक बैठक घेऊन आपला संपूर्ण पाठिंबा इंदिरा गांधी यांनाच देण्याचा निर्णय केला. मोरारजींनीहि पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न सुरू ठेवलाच होता. अखेर प्रत्यक्षांत जेव्हा मतदान झालं त्या वेळीं इंदिरा गांधी यांनाच प्रचंड बहुमत प्राप्त झालं आणि बहुसंख्याकांच्या सहकार्यानं इंदिरा गांधीच पंतप्रधानपदीं आरूढ झाल्या.

पंतप्रधानपद हस्तगत करतांच पहिल्याच फेरींत इंदिरा गांधी यांनी आपला स्वतंत्र बाणा सिद्ध केला. केंद्रीय मंत्रिमंडळाचा त्यांनी जो संच तयार केला त्यामुळे कामराज हे कांहीसे अस्वस्थ बनले. इंदिरा गांधी यांनी केंद्रीय मंत्रिमंडळांत नव्या रक्ताला प्रवेश दिला होता. यशवंतराव चव्हाण, सी. सुब्रह्मण्यम्, अशोक मेहता यांचाहि त्यांत समावेश होता. इंदिराजी आणि कामराज यांच्यांत पुढच्या काळांतहि, प्रसंगा-प्रसंगानं, इंदिराजींनी केलेल्या कांही महत्त्वाच्या निर्णयामुळे मतभेद रुंदावतच राहिले.

पंतप्रधानपदाच्या त्या निवडणुकीच्या वेळीं यशवंतरावांनी मात्र फार मोठ्या जोखमीची आणि महत्त्वाची भूमिका बजावली हें सत्य होय. या जबाबदारींतून मोकळं होतांच त्यांनी संरक्षण-मंत्रालयाच्या दैनंदिन कामाला वाहून घेतलं.

परंतु नाट्यपूर्ण घटना घडणं हा यशवंतरावांच्या जीवनाचा विशेष आहे. संरक्षण-मंत्रालयांतलं त्यांचं काम सुरळीतपणानं सुरू असतांनाच एक दिवस त्यांना तें सोडून केंद्रीय गृहखात्याची जबाबदारी स्वीकारावी लागली. राष्ट्राच्या जीवनांत आणीबाणीचा क्षण निर्माण झाला आणि पोलादी मनगटानं परिस्थितीशीं सामना करण्याची वेळ प्राप्त झाली की त्या कामाची जबाबदारी यशवंतरावांकडे आल्याचीं उदाहरणं स्वातंत्र्योत्तर काळांत एकामागोमाग एक घडलीं आहेत. आताहि तेंच घडलं.

यशवंतराव त्या वेळीं कोचीनला, नाविकदलाचीं प्रात्यक्षिकं पहाण्यासाठी म्हणून निघाले होते. कोचीनच्या मार्गावर त्यांचा मुंबईत एक दिवस मुक्काम ठरला होता. त्यानुसार ते मुंबईत आले आणि त्याच रात्रीं त्यांची प्रकृति अचानक गंभीर बनली. इतकी की, तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांच्यावर तातडीनं शस्त्रक्रिया करावी लागणार होती. अल्सरचा प्रादुर्भाव झाल्यामुळे त्याच रात्रीं मग त्यांच्या पोटावर शस्त्रक्रिया करण्यांत आली.

विश्रांतीसाठी त्यांना आता मुंबईत थांबणंच क्रमप्राप्त होतं. त्यांची विश्रांति सुरू होती, परंतु दर पांच वर्षांनी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका समोर आल्या होत्या. त्यासाठी महाराष्ट्रांतल्या उमेदवारांची निवड करायची होती. मुंबईतल्या नरीमन पॉइंटवरील 'रिव्हिएरा' या त्यांच्या निवासस्थानीं ते विश्रांति घेत असल्यामुळे महाराष्ट्र प्रदेश-कॉंग्रेसनं मग त्याच ठिकाणीं बैठक जमवली. उमेदवार निवडीचं हें काम ८ नोव्हेंबर-पर्यंत सुरू होतं. यशवंतराव हे उमेदवार-निवडीच्या कामांत व्यग्र असतांनाच दिल्लीहून त्यांना एक संदेश मिळाला. गृहमंत्रिपदाची जबाबदारी यशवंतरावांनी स्वीकारावी असा पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा मानस असल्याचा हा संदेश होता.

संरक्षणमंत्रिपद स्वीकारण्याचा संदेश पूर्वी त्यांना असाच फोनवरून मुंबईत मिळाला होता. आता चार वर्षांनंतर, गृहमंत्रिपद स्वीकारण्याबाबतहि तसंच घडलं. या दोन्ही घटनांमधील साम्य मोठं विलक्षण आहे. संरक्षणमंत्रिपद यशवंतरावांनी सांभाळावं अशी खुद्द पंतप्रधान पं. नेहरूंची इच्छा असूनहि, त्या वेळीं टी. टी. कृष्णम्माचारी आणि बिजू पटनाईक यांनी त्यास खो घालण्याचा प्रयत्न केला. आताहि पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा मानस स्पष्ट असतांहि स. का. पाटील यांनी हें घडण्यास कट्टर विरोध दर्शवला, तर पंतप्रधानांना कामराज यांची समजूत पटवून त्यांचा विरोध शांत करावा लागला.

त्यापूर्वी गृहमंत्रिपदावर गुलझारीलाल नंदा हे होते. यशवंतराव मुंबईत विश्रांति घेत असतांनाच दिल्लींत तिकडे, गोवधबंदीच्या मागणीचं निमित्त पुढे करून हजारों साधूंनी ७ नोव्हेंबर १९६६ या दिवशीं लोकसभा-भवनासमोर अतिशय उग्र अशीं

निदर्शनं केलीं. साधूंच्या उग्र निदर्शनांनी दिल्लीचं दैनंदिन जीवनच उद्ध्वस्त करून सोडलं. साधूंच्या त्या आततायीपणानं साऱ्या राष्ट्रालाच धक्का बसला.

गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांना त्या वेळची परिस्थिति नीटपणानं, समर्थपणानं हाताळतां आली नाही असं मग सर्वत्र काहूर उठलं. निरनिराळ्या राजकीय पक्षांनी तर नंदा यांच्या रोखानं टीकेची आघाडी उघडली. कायदा आणि सुव्यवस्था शाबूत ठेवण्याची जबाबदारी गृहमंत्री या नात्यानं गुलझारीलाल नंदा यांची होती; परंतु उग्र निदर्शनांचा बनाव यशस्वी होतांच नंदा यांची परिस्थिति चमत्कारिक बनली. संसदीय काँग्रेस-पक्षाच्या बैठकींत तर त्याबद्दल तीव्र प्रतिक्रिया उमटली आणि काँग्रेस-खासदारांनी, नंदांची हकालपट्टी करण्याचीच मागणी केली. लोकसभा-भवनासमोर झालेल्या निदर्शनाच्या वेळीं आणि त्यापूर्वी, सीमा-प्रश्नाच्या वेळीं, कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची प्राथमिक जबाबदारी पाळण्यांतहि नंदा हे अपयशी ठरले आहेत, असा खासदारांचा त्यांच्यावर आरोप होता.

या बैठकीला स्वतः पंतप्रधान इंदिरा गांधी उपस्थित होत्या. परंतु त्यांनी नंदांची बाजू सावरून धरली नाहीं किंवा समर्थनहि केलं नाही. इंदिरा गांधी यांनी मौन पाळल्याबद्दल मग नंदा संतापले आणि पंतप्रधानांनी आपल्याला बैठकींत पाठिंबा दिला नाही म्हणून रागावून त्यांनी गृहमंत्रिपदाचा राजीनामाच सादर केला. इंदिरा गांधींनीहि मग शांतपणें पण तावडतोब नंदांच्या राजीनाम्याचा स्वीकार करून त्यांना मुक्त केलं.

गृहमंत्रिपदाची जागा अशा प्रकारे रिकामी होतांच, त्या पदावर डोळा ठेवून मग, काँग्रेसमधल्या नेत्यांची धांवपळ सुरू झाली. पंतप्रधानांनी मात्र ही जागा चव्हाण यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय पक्का केला होता. दिल्लींत हीं सर्व खलबतं सुरू असतांनाच इंदिरा गांधींच्या विरोधी गटांतील लोकांनी यशवंतरावांना मुंबईत गाठलं आणि त्यांनी दिल्लींतल्या घडामोडींची माहिती सांगितली. गृहमंत्रिपदाचा स्वीकार करण्याची घटना यशवंतरावांना आश्चर्यांत टाकणारीच होती. परंतु त्यांनी त्या जागेच्या सूत्रांचा प्रत्यक्ष स्वीकार करीपर्यंत बरंच रामायण घडून गेलं.

स. का. पाटील हे याबाबत इंदिरा गांधींच्या विरोधांत सर्वप्रथम उभे राहिले. चव्हाण यांच्याकडे गृहमंत्रिपद सुपूर्त केल्यास पाटील हे राजीनामा देणार असल्याच्या वार्ताहि वृत्तपत्रांतून झळकूं लागल्या. पाटील हे त्या वेळीं रेल्वे-मंत्री होते. स. का. पाटील हेच गृहमंत्रिपदाला योग्य आहेत असं संसदीय काँग्रेस-पक्षांतल्या कांही सदस्यांचं मत असल्याचंहि या वेळीं जाहीर झालं. स्वतः पाटील हे, गृहमंत्रिपद मिळवण्यासाठी उत्सुक बनले होते. अशा स्थितींत चव्हाण यांनाच तें पद पंतप्रधान देणार असतील, तर पाटील हे त्यांतून मोठी समस्या निर्माण करतील असंहि सांगितलं गेलं.

इंदिरा गांधी यांनी मात्र काँग्रेस-अध्यक्ष कामराज यांना, चव्हाणांची निवड केली असल्याबद्दल निर्णय स्पष्टपणें सांगितला. त्याचबरोबर अर्थमंत्री सचिन चौधरी आणि व्यापारमंत्री मनुभाई शहा या दोघांनाहि मंत्रिमंडळांतून वगळण्याचा आपला मनोदय

सांगितला. गृहमंत्रिपद यशवंतरावांच्या स्वाधीन कां करूं नये याची स. का. पाटील यांची कारणमीमांसा अशी होती की, महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्नासारखे जे उलटसुलट बाजूचे गुंतागुंतीचे प्रश्न आहेत ते त्यांनी हाताळणं बरं नव्हे. वस्तुतः यशवंतराव हे महाराष्ट्रांत मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सांभाळत असतांनाच त्यांनी, महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्नाबाबत सन्मान्य तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता; आणि हा प्रश्न आता तर मेहेरचंद-महाजन कमिशनकडे सोपवण्यांत आला होता. गोवें-प्रश्नाचा निर्णयहि सार्वत्रिक मतदानानं करावा असा निर्णय झाला होता. स. का. पाटील यांना हें सर्व माहिती होतं; तरी पण विरोधाकरिता विरोध करायचा, तर त्यांना असा कांही दुय्यम स्वरूपाचा प्रश्न निर्माण करण्याखेरीज गत्यंतर उरलं नव्हतं.

उलटसुलट चर्चा होत राहिल्या असतांनाच पंतप्रधानांनी एक आठवड्यानंतर गृहमंत्रिपदासाठी यशवंतराव चव्हाण यांची निवड निश्चित केली असल्याची घोषणा केली आणि १४ नोव्हेंबर १९६६ ला यशवंतरावांनी या नव्या पदाचीं सूत्रं आपल्याकडे घेतलीं. याबरोबरच केंद्रीय मंत्रिमंडळांत आणखीहि कांही बदल घडले. चव्हाणांकडील संरक्षणखातं स्वर्णसिंग यांच्याकडे, तर त्यांच्याकडील परराष्ट्र-व्यवहारखातं एम्. सी. छगला यांना देण्यांत आलं; आणि छगला यांच्याकडील शिक्षणखातं फक्रुद्दीन अलिअहंमद यांच्याकडे सुपूर्त करण्यांत आलं.

यशवंतरावांच्या या नव्या नियुक्तीबद्दलच्या निर्णयाचा देशांतल्या वृत्तपत्रांनी मग मनसोक्त गौरवच केला. गृहमंत्रिपदाच्या जागेसाठी चव्हाण हेच एकमेव योग्य असे नेते आहेत, असा वृत्तपत्रांचा अभिप्राय होता.

१९६६ च्या नोव्हेंबरमध्ये यशवंतराव गृहमंत्री बनले तो काळ मोठा आणीबाणीचा होता. सरकारसमोर अनेकविध समस्या गंभीर स्वरूपांत उभ्या होत्या. सरकारला कोणा परक्या राष्ट्रानं आव्हान दिलं होतं किंवा सरकारची अर्थव्यवस्था कोलमडली होती असं नव्हतं; परंतु देशांतर्गत परस्पर-द्वेष, असहकार, ज्येष्ठ नेत्यांमधला धरसोडपणा अशा प्रकारची अंतर्गत धुसफूस कमालीची वाढली होती. स्वातंत्र्योत्तर इतिहासांत १९६६ साल हें तसं पाहिलं तर कसोटीचं वर्ष, किंबहुना ' काळं वर्ष ' म्हणूनच नोंद झालेलं आहे. या सालांत राजकीय पातळीवर सर्वत्र गोंधळ, संशय निर्माण झाला होता, तर धार्मिकदृष्ट्या हिंदूंनी आपल्या धार्मिक वेडाचाराचं पुनरुज्जीवन करण्यासाठी एक फार मोठा कट शिजवला होता. राष्ट्राची एकात्मता टिकून रहाण्यास आणि राष्ट्रप्रेम शाबूत राखण्यासाठी कांही सारासार विचार शिल्लक ठेवण्याचंच आव्हान मिळालं होतं.

गोवधबंदी अमलांत आणावी यासाठी साधूंनी केलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी आणि सरकारनं गोवधबंदीचा कायदा करावा याच्या मागणीसाठी पुरीचे जगद्गुरु श्रीशंकराचार्य यांनी दिल्लीला यमुनेच्या काठीं उपोषण सुरू केलं होतं. पंजाबच्या प्रश्नाचा निकाल लावून घेण्यासाठी संत फत्तेसिंह आणि त्यांच्या सात भक्तांनी उपोषण सुरू करून अग्निकुंडांत उडी टाकून आत्मार्पण करण्याची धमकी दिली होती आणि

संयुक्त समाजवादी पक्षाच्या प्रोत्साहनानं देशांत त्याच वेळीं विद्यार्थ्यांनी धुमाकूळ माजवला होता.

कायदा आणि सुव्यवस्था पालनाची देशांत आणीबाणीची परिस्थिति निर्माण झालेली असतांना आणि सरकारला मोठं आव्हान मिळालं असतांना, नेमक्या त्याच परिस्थितींत यशवंतरावांकडे गृहमंत्रिपद आलं होतं.

गृहमंत्री म्हणून, दोन दिवसांनंतर ते जेव्हा लोकसभेंत दाखल झाले तेव्हा संतापलेल्या खासदारांना तोंड देण्याची त्यांच्यावर पाळी आली. १८ नोव्हेंबरला चव्हाण यांनी विद्यार्थ्यांच्या लोकसभेवरील मोर्चाच्या संदर्भात एक निवेदन केलं होतं. त्यामुळे संतापलेल्या खासदारांनी लोकसभेंत आरडाओरड सुरू केली.

वस्तुतः यशवंतरावांनी गृहमंत्रिपद स्वीकारण्यापूर्वीच विद्यार्थ्यांची चळवळ सुरू झालेली होती. उत्तर-प्रदेश, मध्य-प्रदेश, बिहार इथे चळवळीनं उग्र स्वरूप धारण केल्यानं पोलिसांनी कडक उपाय योजले होते. पोलिसांनी विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना, प्राचार्यांना बेदम मारहाण केली, वर्गातल्या फर्निचरची पोलिसांनी मोडतोड केली आणि प्रयोगशाळें-तलीं उपकरणं फोडून टाकलीं वगैरे स्वरूपाच्या उलटसुलट तक्रारी येत राहिल्या होत्या. कॉंग्रेस-कार्यकारिणीच्या बैठकींत या परिस्थितीच्या संदर्भात ऑक्टोबर १९६६ मध्येच विचार होऊन तीव्र चिंता व्यक्त करण्यांत आली होती. पंतप्रधानांनी स्वतःच विद्यार्थ्यांच्या चळवळीबाबत एक निवेदन कार्यकारिणीला दिलं होतं आणि या सर्वच प्रश्नाचा विचार एका समितीकडे सोपवला होता.

यशवंतराव गृहमंत्री बनल्याच्या चौथ्याच दिवशीं विद्यार्थ्यांच्या प्रचंड निदर्शनाचं आव्हान त्यांना मिळालं. हीं निदर्शनं लोकसभेसमोर व्हायचीं होतीं. १८ नोव्हेंबर हा दिवसहि त्यासाठी मुक्रर झाला होता आणि या निदर्शनाचं स्वरूप राष्ट्रीय ठरवण्यांत आलं होतं. याचा अर्थ देशांतले सर्व भागांतले विद्यार्थी निदर्शनांत सामील होण्यास सज्ज बनले होते. संयुक्त समाजवादी पक्षाच्याच समाजवादी युवजन-सभेनं हा सारा घाट घातला होता.

या निदर्शनांना तोंड देण्याची तयारी मग सरकारनं केली आणि दिल्लींत १४४ कलम पुकारून सभा-मिरवणुकांवर बंदी घातली. डॉ. राममनोहर लोहिया यांना १७ नोव्हेंबरलाच पोलिसांनी अटक करून त्यांना गजांआड केलं. मोर्चाच्या दिवशीं म्हणजे १८ नोव्हेंबरला दिल्लीची सर्व बाजूंनी कोंडी करण्यांत आली. सर्वत्र पोलिसांचं साम्राज्य सुरू झालं. मोक्याच्या ठिकाणीं हत्यारबंद पोलिसांची गस्त सुरू राहिली. रेल्वे स्टेशन, प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसगाड्यांचीं स्थानकं, लोकसभाभवनाचा परिसर आणि अन्य सर्व महत्त्वाच्या ठिकाणीं कडक पोलिसबंदोबस्त ठेवण्यांत आला. निदर्शनांत आणि मोर्चात भाग घेण्यासाठी फार मोठ्या संख्येनं विद्यार्थी दिल्लीला जमा होतील अशी सर्वसाधारण अपेक्षा होती, त्यामुळे विद्यार्थ्यांची दिल्लीच्या बाहेरच नाकेबंदी करण्याची योजनाहि सिद्ध झाली. दिल्लींतल्या शाळा, महाविद्यालयं हीं बंद ठेवण्यांत आलीं आणि

दिल्ली विद्यापीठाच्या आवाराचा ताबा पोलिसांनी घेतला. सरकारनं सर्व बाजूंनी बंदोबस्ताची अशी तयारी करून अखेर प्रचंड प्रमाणांत करण्यांत येणाऱ्या निदर्शनांचा बेत हाणून पाडला.

निदर्शनांतून निर्माण होणारी गंभीर परिस्थिति यशवंतरावांनी अशा प्रकारे रोखली तरी पण त्यामुळे विद्यार्थ्यांमधील असंतोषाला यामुळे उतार पडणार नव्हता. हें जाणून मग यशवंतरावांनी, या असंतोषाच्या मुळाशीं जाऊन कारणांचा शोध घेण्याचं ठरवलं.

देशांत विकासाचं काम सुरू असून या कामांत विद्यार्थ्यांच्या विधायक शक्तीचा उपयोग करणं शक्य व्हावं यासाठी या तरुण पिढीसमोर विधायक कामांचा कांही आराखडा ठेवून ती शक्ति या कामाकडे वळण्यासाठी जें जें कांही करतां येणं शक्य आहे त्याचा अवलंब करावा असं यशवंतरावांचं मत होतं. त्यांनी ते आपल्या सहकाऱ्यांनाहि सांगितलं. देशाचे नेते आणि विद्यार्थी यांच्यांत सतत संवाद घडेल अशी एखादी यंत्रणा निर्माण व्हावी असं मत तर त्यांनी व्यक्त केलंच, शिवाय नव्या पिढीमध्ये असंतोष निर्माण होण्यास प्रचलित सामाजिक व आर्थिक परिस्थितीहि कारणीभूत असून या असंतोषाला एकटा भारत जबाबदार नसून जागतिक परिस्थितीचाच हा परिपाक आहे, असं या असंतोषाचं विश्लेषणहि त्यांनी केलं. यशवंतरावांचा या प्रश्नाकडे पहाण्याचा दृष्टिकोन अर्थातच मानव्याचा होता.

विद्यार्थ्यांमधील असंतोषाच्या मागोमाग, एक आठवड्यानं लोकसभेंत आणखी एक वादळ उठलं. गोवधबंदी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी दिल्लींतल्या यमुनेच्या तीरावरील एका मंदिरांत उपोषणासाठी पुरीचे जगद्गुरु श्रीशंकराचार्य ठाण मांडून बसले होते. सरकारनं प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याखाली त्यांना अटक करून त्यांची उचलबांगडी केली. लोकसभेंत विरोधी खासदारांनी मग हा प्रश्न धसास लावला.

धार्मिक दृष्टिकोनांतून, हिंदु संघटकांनी गोवधबंदीची मागणी चालू ठेवलीच होती. मधून मधून त्यासाठी आवाजहि उठवला जात असे. परंतु उत्तर-भारतामध्ये जनसंघ हा शक्तिशाली पक्ष म्हणून उभा ठाकतांच, गोवधबंदीच्या मागणीला मग आक्रमक स्वरूप प्राप्त झालं.

गृहमंत्री यशवंतरावांची या संदर्भातील माहिती आणि मत स्वच्छ होतं. गोवधबंदीच्या आंदोलनामागे, जनसंघानं आपली सर्व शक्ति उभी केलेली असून, आगामी सार्वत्रिक निवडणुकीचं राजकारण समोर ठेवूनच, विशेषतः देशांत धार्मिकतेची हवा तापवली जात आहे, असंच त्यांचं मत होतं. निवडणुकांपूर्वी, देशांत जातीय तणाव वाढवण्याचा निःसंशय हा डाव आहे अशी त्यांची माहिती होती. गोवधबंदीच्या मागणीसाठी तात्कालिक स्वरूपाचा जातीय तणाव निर्माण होणं हें वेगळं; परंतु ज्या पद्धतीनं हें आंदोलन सुरू करण्यांत आलं होतं आणि तें सतत वाढत रहावं यासाठी ज्या मार्गांचा अवलंब करण्यांत येत होता त्यावरून त्यामागचा सुप्त हेतु हा खोलवर पोंचणारा आणि जातीय तणाव निर्माण करण्याचा होता हें सरकारला उमजलं होतं.

साधु लोकांनी ७ नोव्हेंबरला लोकसभेसमोर या मागणीसाठी निदर्शनं केल्यानंतर या आंदोलनाची इतिश्री झाली होती. सरकारपर्यंत मागणी पोंचवण्याचा हेतु साध्य झाला होता; परंतु धर्ममार्तंडांना आणि त्यांच्या पुढाऱ्यांना हा प्रश्न तेवत ठेवणं जरूर होतं. त्यामुळे त्यांनी जगद्गुरु शंकराचार्यांना प्राणांतिक उपोषणासाठी उद्युक्त करून हिंदु समाजाच्या भावनांना प्रदीप्त केलं.

जगद्गुरु शंकराचार्यांच्या उपोषणामुळे वातावरणाला एकदम कलाटणी मिळून तें अधिक तप्त होत राहिलं. या परिस्थितीचा, सरकारला विचार करावाच लागणार होता. यशवंतरावांनी, आपल्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून परिस्थितीचा अंदाज घेतला तेव्हां शंकराचार्यांच्या उपोषणामुळे लोक प्रक्षुब्ध बनत असून न जाणो, त्यांतून जातीय दंगल पेटण्याची शक्यता असल्याचा निष्कर्ष निघाला. हें टाळण्यासाठी त्यांनी वेगळ्याच मार्गाचा अवलंब करण्याचा निर्णय केला.

सबंध देशाला जातीय वणव्यांत होरपळून निघण्यासाठी संधि देणं योग्य नव्हतं. म्हणून मग एक दिवस श्रीशंकराचार्यांना दिल्लीहून हलवण्यांत येऊन अत्यंत गुप्त रीतीनं, पाँडेचेरीला नेण्यांत आलं; तिथे त्यांना थोडे दिवस ठेवण्यांत आलं आणि नंतर पुरी इथे त्यांना सुखरूप पोंचवून त्यांची मुक्तता करण्यांत आली. दिल्लीहून शंकराचार्यांना जेव्हा विमानांतून नेण्यांत आलं तेव्हां आपण कुठे चाललों आहोंत हें त्यांना उमगलंच नाही. पाँडेचेरीहून पुरीस पोंचल्यानंतरहि शंकराचार्यांनी उपोषण चालू ठेवणार असल्याबद्दलच घोषणा केली; परंतु ते आता आपल्या आश्रमांत राहून उपोषण करणार असल्यामुळे त्याची जबाबदारी सरकारवर उरलेली नव्हती.

श्रीशंकराचार्यांना झालेली अटक आणि त्यांचं स्थलांतर याचा जनसंघाला कमालीचा धक्का बसला. शंकराचार्यांबद्दल हिंदु समाजांत वसत असलेल्या धार्मिक श्रद्धेच्या जोरावर, अटक आणि स्थानबद्धतेच्या कचाट्यांत न अडकतां, देशांत सरकारविरोधी वातावरण निर्माण करण्याचा हेतु साध्य होईल असा धार्मिक नेत्यांचा कयास होता. परंतु गृहमंत्र्यांनी त्यांचाहि भ्रमनिरास घडवला.

परंतु यामुळे मूळ प्रश्न संपणार नव्हता. या आंदोलनाच्या पाठीशीं देशांतले कांही बडे भांडवलदार होते. आंदोलनासाठी त्यांच्याकडून आर्थिक मदत दिली जात होती. गोवधबंदीचा प्रचार ते प्रामाणिकपणानं करत होते. परंतु गोवधबंदी कायद्यानं करायची तर त्या संबंधी सर्वांगीण विचार करूनच धोरण निश्चित करावं लागणार होतं. भारताच्या धर्मनिरपेक्षतेच्या धोरणाला ज्यामुळे छेद जाईल असं धोरण ठरवून चालणार नव्हतं. या संदर्भात मग, गृहमंत्री आणि पंतप्रधान यांनी या प्रश्नाचा राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोनांतून विचार केला; आणि या प्रश्नाचा निर्णय करण्याच्या दृष्टीनं मंत्रि-मंडळानं एक कमिशन नेमल्याचं जाहीर केलं.

गोवधबंदीच्या समस्येतून यशवंतराव मोकळे होतात न होताच तोंच, त्यांच्या कारकीर्दीच्या पहिल्याच महिन्यांत अकाली दलाचे नेते संत फत्तेसिंग यांच्या

आत्मसमर्पणाची समस्या त्यांच्यासमोर उभी ठाकली. चंदीगड शहरावर पंजाबचा हक्क असून हरियानांतील पंजाबीभाषी भाग हा पंजाबमध्ये सामील करून घेण्यासाठी म्हणून अकाली दलाच्या नेत्यांनी प्राणाची बाजी लावली होती. त्याच्या अगोदरहि संत फत्तेसिंग यांनी आत्मसमर्पणाची, सरकारला दोन वेळा धमकी दिलेली होती. १७ डिसेंबर १९६० ला त्यांनी प्राणांतिक उपोषणहि केलं होतं.

त्यानंतर १० सप्टेंबर १९६५ ला त्यांनी पुन्हा उपोषण सुरू केलं आणि जगलों-वांचलों तर पंधरा दिवसांनंतर अमृतसरच्या सुवर्ण-मंदिरांत, अग्निकुंडांत उडी घेऊन आत्मार्पण करण्याची धमकी दिली. दरम्यान भारत-पाकिस्तान चकमकी सुरू झाल्यानं हें आत्मार्पण मागे पडलं. परंतु त्या वेळचे गृहमंत्री गुलझारीलाल नंदा, यांनी लोकसभेचे सभापति सरदार हुकमसिंग यांच्या नेतृत्वाखाली, या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक संसदीय समिति नियुक्त केली. या समितीनं आपला अहवाल सादर केल्यानंतर, सर्व सोपस्कार होऊन पंजाबी सुभा अस्तित्वांत आला. संत फत्तेसिंग यांनी मग त्या निर्णया-बद्दल समाधानहि व्यक्त केलं. पंजाबी सुभ्याच्या रचनेबद्दल मात्र त्यांनी पूर्ण समाधान व्यक्त केलं नाही.

संत फत्तेसिंग यांनी नंतर राजकारणांतून निवृत्त झाल्याचं आणि धार्मिक प्रचारास वाहून घेतल्याचंहि जाहीर केलं. परंतु त्यांच्या भोवतालच्या कांही महत्त्वाकांक्षी मंडळींनी अकाली दलाच्या स्वार्थासाठी त्यांना पुन्हा राजकारणांत ओढलं आणि त्यांतूनच त्यांनी १७ डिसेंबर १९६६ ला उपोषण सुरू करून २७ डिसेंबरला आत्मार्पण करण्याची धमकी दिली. अकाली दलाचे आणखी सात सदस्यहि त्याच वेळीं आत्मार्पण करणार होते. संत फत्तेसिंग यांच्याबरोबर २४ तास अगोदर ते आत्मार्पण करणार होते.

संत फत्तेसिंग यांची आत्महत्या घडूं नये यासाठी साथी जयप्रकाश नारायण यांनीहि त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु सर्व चर्चा आणि वाटाघाटी निष्फळ ठरल्या. तोंपर्यंत डिसेंबरची २६ तारीख उजाडली होती.

सर्व वाटाघाटी निष्फळ ठरल्या होत्या आणि अग्निकुंडांत आत्मार्पण करण्याचा तो क्षण आता जवळ आला होता. २६ डिसेंबरला दुपारीं ४ वाजतां संत फत्तेसिंग यांच्या सात साथीदारांनी, सुवर्ण-मंदिरांतल्या पाण्याच्या तलावांत स्नान केलं. सुवर्ण-मंदिराच्या आवारांत, अग्निकुंड धगधगलं होतं. स्नानानंतर अखेरची प्रार्थना करायची आणि आत्मार्पण करायचं यासाठी सर्व सिद्धता झाली होती. सारं वातावरण गंभीर बनलं होतं.

परंतु अकस्मात्, दुपारीं ३–३० वाजतां लोकसभेचे सभापति सरदार हुकमसिंग हे अकाली दलाच्या कांही नेत्यांसमवेत सुवर्ण-मंदिरांत दाखल झाले आणि त्यांनी संत फत्तेसिंग आणि त्यांचे सहकारी यांच्याशीं अंतिम वाटाघाटी सुरू केल्या. दुपारीं चारचा ठोका पडायला किंचितसा अवकाश होता. आता काय घडतं याकडे सारेजण, डोळ्यांत प्राण साठवून पहात राहिले होते. अन् तेवढ्यांत चर्चेत काय घडलं कुणास ठाऊक,

संत फत्तेसिंग यांच्या सहकाऱ्यांनी, आत्मार्पण आता होणार नाही असं अचानक जाहीर केलं! थोड्या वेळानंतर आणखी एक घोषणा लोकांनी ऐकली की, आत्मार्पणाचा विचार पुढे ढकलला आहे! सारंच अपेक्षित आणि अनपेक्षित घडलं.

अकाली दलाच्या कार्यकारिणीची मग बैठक झाली आणि दुपारीं ५ वाजतां त्यांनी जाहीर केलं की, सरदार हुकमसिंग यांच्याकडून अद्याप कांही गोष्टींचा खुलासा व्हायचाय् तो झाला की, अकाली दलासमोर तो ठेवला जाईल. शेवटीं सरदारसाहेबांचं म्हणणं त्यांनी मान्य केलं आणि मागोमाग संत फत्तेसिंग यांनीहि उपोषणाची समाप्ति केली. त्यांच्या सात साथीदारांनी मग आत्मार्पणाची प्रतिज्ञा मागे घेतली.

अमृतसरमध्ये हें जें सर्व घडलं त्यामध्ये अनेक गमती-जमती झाल्या. अमृतसरला निघण्यापूर्वी सरदार हुकमसिंग आणि गृहमंत्री यशवंतराव यांच्यांत चर्चा झाली होती. या चर्चेमध्ये यशवंतराव, या प्रश्नाच्या संदर्भात कोणत्याहि प्रकारे वचनबद्ध झाले नाहीत, परंतु या ना त्या प्रकारे, आत्मार्पणाचा दुःखद प्रसंग टाळा असंच त्यांनी सांगितलं होतं.

अमृतसरला पोंचल्यावर सरदार हुकमसिंग आणि संत फत्तेसिंग यांच्यांमधील चर्चेची पहिली फेरी झाल्यानंतर ते सर्किट हाऊसवर रवाना झाले आणि तिथे मग, पंजाबचे मुख्य मंत्री ग्यानी गुरुमुखसिंग मुसाफिर यांच्याशीं चर्चा केली. संत फत्तेसिंग यांना कांही मुद्द्यांबाबत स्पष्टीकरण हवं होतं.

दिल्लींत चव्हाण यांच्याशीं संपर्क साधून मुख्य मंत्र्यांनी तें स्पष्टीकरण करून घ्यावं असा मग तोडगा निघाला. त्याच संध्याकाळीं ग्यानी गुरुमुखसिंग मुसाफिर यांनी यशवंतरावांशीं टेलिफोनवरून दिल्लीस संपर्क साधला आणि संत फत्तेसिंग यांच्या उपोषणामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या संदर्भात केंद्र-सरकारनं एक कमिशन नियुक्त करावं असं सुचवलं. यशवंतरावांनी त्यावर, यासंबंधी विचार करणं शक्य आहे, पण त्यासंबंधांत मी आताच कांही ठामपणानं सांगूं शकणार नाही किंवा वचन देऊं शकणार नाही, हेंहि स्पष्ट केलं. कसलाहि आडपडदा न ठेवतां त्यांनी हें सांगितलं होतं.

परंतु अमृतसरमध्ये यशवंतरावांच्या मताचा अर्थ कसा लावला गेला असेल तो असो; नंतरच्या दहाच मिनिटांत, दिल्लीला बातमी येऊन धडकली की, सरकारनं संत फत्तेसिंग यांच्या मागणीस मान्यता दिल्यानं, संत फत्तेसिंग यांनी उपोषणाची समाप्ति केली आहे!

पी. टी. आय्. च्या टेलीप्रिंटरवरून आलेलं हें वृत्त वाचून यशवंतरावांच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. एवढ्या तडकाफडकी घटना घडल्या आहेत त्या अर्थी कांही तरी समजुतीचा घोटाळा झाला असला पाहिजे हें निश्चित, असंच यशवंतरावांचं मन सांगूं लागलं. अस्वस्थ मनानं त्यांनी लगेचच पंजाबच्या मुख्य मंत्र्यांशीं संपर्क साधला आणि "नेमकं काय घडलं" अशी विचारणा केली. त्यावर "मी समक्ष येऊनच सांगतों" एवढंच मुख्य मंत्र्यांनी सांगितलं.

दुसऱ्या दिवशीं मुख्य मंत्री ग्यानी गुरुमुखसिंग मुसाफिर यशवंतरावांना भेटले.

" फोनवर तुम्हांला मीं जें सांगितलं तें तुम्ही बरोबर ऐकलंत ना ? " – यशवंतरावांनी मुख्य मंत्र्यांना विचारलं.

" तुमचं म्हणणं मी नीटपणानं ऐकलं ... पण त्यांना सांगतांना दुसरंच सांगितलं – खोटं सांगितलं " – मुख्य मंत्री. शिखांचं म्हणून जें कांही राजकारण असतं त्यामध्ये असं करावं लागतं असा खुलासाहि मुख्य मंत्र्यांनी केला आणि संत फत्तेसिंग यांनी आता उपोषणाची समाप्ति केलेली असून, आता त्या वाटेला ते जाणार नाहीत असा निर्वाळाहि दिला.

मुख्य मंत्र्यांसारख्या जबाबदार असामीकडून असं कांही घडेल याची कल्पनाहि यशवंतरावांच्या मनाला शिवली नव्हती. मुसाफिर यांना त्यांनी तसं बोलूनहि दाखवलं. यशवंतरावांना त्यांनी तसं खोटं बोलणं मान्य नव्हतं. त्यांना तें आवडलं नव्हतं म्हणून " तुम्ही कशासाठी हें केलंत ? " असं मुसाफिरांना विचारलं.

" मीं केलंय खरं, तुम्हांला आता माझं जें कांही करायचं तें करा. मला हवं तर फाशी द्या ... परंतु पंजाबला मी एका फार मोठ्या संकटांतनं वांचवलं आहे, हें मात्र खरं. " मुसाफिर यांनी एका दमांत यशवंतरावांना ऐकवलं.

प्राप्त परिस्थितींत मुसाफिर यांना एवढंच करतां येणं शक्य असावं, असा मग यशवंतरावांनी त्यापासून बोध घेतला. सरदार हुकमसिंग यांनाहि दोषी धरण्यांत अर्थ नव्हता. सरकारनं मागण्या मान्य केल्या आहेत असं मुसाफिर यांनी सांगितलं होतं, त्यामुळे पुढची जबाबदारी आता त्यांची होती. परंतु पंजाबचं प्रकरण तूर्तास मिटलं होतं.

गृहमंत्रालयांत पोंचल्यापासूनचा पहिला संपूर्ण महिना हा असा, एकामागून एक घटनांनी आव्हान देणारा ठरला. विद्यार्थ्यांचा दिल्लींतला मोर्चा, जगद्गुरु शंकराचार्यांचं उपोषण आणि संत फत्तेसिंग यांची आत्मार्पणाची प्रतिज्ञा या तीन आव्हानांना यशवंतरावांनी ज्या शर्थीनं आणि मुत्सद्देगिरीनं तोंड दिलं त्यामुळे त्यांची पक्षांतली आणि सरकारमधली प्रतिमा कमालीची तेजस्वी बनली. लोकसभेच्या दोन्ही सभागृहांत त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचं एक आगळंच दर्शन घडवलं होतं – देशांतल्या जबाबदार वृत्तपत्रांनी त्या संदर्भात त्यांची स्तुतीच केली. त्या पहिल्या महिन्यांतली परिस्थिति इतकी स्फोटक होती की, अन्य एखाद्या अगदी 'सीझण्ड' मंत्र्याच्याहि चिंध्या उडण्याची शक्यता होती. परंतु यशवंतरावांनी अतिशय शांतपणानं, समतोल राखून, खुबीनं पण समजूतदारपणानं सर्व परिस्थिति काबूंत ठेवली आणि या किंवा त्या बाजूनं कोणालाहि किंचितहि खळखळ करण्यास वाव ठेवला नाही.

यशवंतरावांना, गृहमंत्रिपदाच्या आपल्या संपूर्ण कारकीर्दीत राष्ट्रीय महत्त्वाच्या अनेक समस्या हाताळून निर्णय करावे लागले. साऱ्या देशाचं लक्ष त्या काळांत गृहमंत्रालय आणि तिथे होणारे निर्णय याकडे खिळून राहिलं होतं. पत्रकार आणि लोक यांच्याकडून गृहमंत्रालयानं केलेल्या प्रत्येक निर्णयाची कसून छाननी केली जात होती.

गृहमंत्रालयाकडून असे पुष्कळ निर्णय केले जातात की, लोकांना त्याची गंध-वार्ताहि नसते. लोकांच्या नजरेसमोर सहसा हे निर्णय येत नाहीत; परंतु देशाचं दैनंदिन जीवन सुरळीत रहावं यासाठी कांही निर्णय करणं गृहमंत्रालयाला क्रमप्राप्त ठरत असतं. राष्ट्राचं सर्व प्रकारचं संरक्षण होण्याच्या दृष्टीनं तें आवश्यकहि असतं. गृहमंत्रालयाची व्याप्ति आणि विविध विभागांच्या स्वतःच्या जबाबदाऱ्या या प्रचंड असतात, त्याचबरोबर शेजारच्या राष्ट्रांतून कोणी आपल्या राष्ट्रांत घूसखोरी करत आहेत काय, देशांत येणारे परदेशी प्रवासी कांही उद्योग करत आहेत काय, कुठे कांही अनिष्ट, बीभत्स घडत आहे काय, अशी सर्वच गोष्टींवर या मंत्रालयाला देखरेख ठेवावी लागते. यशवंतरावांच्या कारकीर्दीत त्यांचं या सर्वच बारीकसारीक गोष्टींवर लक्ष होतं असं आढळतं. या सर्व गोष्टींपेक्षाहि, राज्या-राज्यांतल्या राजकीय घडामोडी, त्याचबरोबर केंद्राच्या ठिकाणच्या घडामोडी यांवर सातत्यानं लक्ष ठेवून, सरकारचं सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्ट साध्य होण्याच्या दृष्टीनं आवश्यक तें वातावरण शिल्लक राहील याकडे खास लक्ष देण्याचं काम गृहमंत्र्यांना प्रामुख्यानं करावं लागतं. गृहमंत्र्यांची ती जबाबदारीच असते.

यशवंतरावांनी गृहमंत्रिपद स्वीकारल्यानंतर पुढच्या कांही महिन्यांतच त्यांना सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं देशांत सर्वत्र शांततेनं, सुरळीत मतदान होईल आणि लोकांना आपला मतदानाचा हक्क बजावतां येईल यावर लक्ष केंद्रित करावं लागलं. १९६७ च्या फेब्रुवारीमध्ये सार्वत्रिक निवडणुकींतलं मतदान होणार होतं. देशांत त्या वेळीं जातीय तणावाची परिस्थिति निर्माण होऊं लागली होती, किंबहुना तशी ती तयार केली जात होती. त्या निवडणुकींत कॉंग्रेस-पक्षाला भरघोस यश मिळेल अशी त्यांची कल्पना होती. परंतु निवडणुकीनंतर देशांत जें चित्र निर्माण झालं त्यानं कांही मूलभूत गंभीर समस्याच जन्माला आल्या.

भारताची चौथी सार्वत्रिक निवडणूक फेब्रुवारी १९६७ मध्ये झाली आणि निवडणुकीचे जे निकाल बाहेर आले त्यांतून देशाचं राजकीय चित्रच एका रात्रींत बदलून गेलं. देशाच्या संघराज्यालाच आव्हान निर्माण झालं. देशांतील एकूण सोळा राज्यांपैकी फक्त सात राज्यांत कॉंग्रेसचं आसन टिकून राहिलं होतं. त्या निवडणुकींत केंद्रीय मंत्रि-मंडळांतील पांच मंत्री, आणि निरनिराळ्या राज्यांतील चार मुख्य मंत्री पराभूत झाले होते. अखिल भारतीय कॉंग्रेसचे अध्यक्ष खुद्द के. कामराज आणि कॉंग्रेस-कार्यकारिणीचे दोन सदस्य यांनाच पराभव पत्करावा लागला होता.

जनसंघानं त्या वेळीं देशांत हिंदुत्वाचं पुनरुज्जीवन करण्याच्या घोषणा करून एक वेगळं वातावरण निर्माण केलं आणि बिहार, मध्य-प्रदेश, राजस्थान, उत्तर-प्रदेश आणि दिल्ली या ठिकाणीं आपली शक्ति मोठ्या प्रमाणांत वाढवली. गुजरात, ओरिसा, राज-स्थान, मद्रास आणि म्हैसूर या राज्यांत स्वतंत्र पक्षानं चांगलंच मूळ धरलं. पंजाबमध्ये तर अकाली हा प्रादेशिक पातळीवरील पक्ष सरकार स्थापन करण्याइतका बलिष्ठ बनला. मद्रास विधानसभेंत द्रविड मुन्नेत्र कळघम या दुसऱ्या एका प्रादेशिक पातळीवरील

पक्षानं, निश्चित स्वरूपाचं बहुमत मिळवलं. पूर्व-बंगाल आणि केरळमध्ये डाव्या कम्युनिस्टांनी (मार्क्सिस्ट) विरोधी पक्षांशीं समझोता करून सरकार बनवण्याइतकं बहुमत प्रस्थापित केलं. याचा अर्थ देशांतल्या बहुतेक राज्यांतली सत्ता आता उजव्या गटाच्या हातांत केंद्रित झाली होती. काँग्रेस-पक्षाला हा मोठा धक्का ठरला होता. लोकसभेंतील काँग्रेसच्या जागा कांही प्रमाणांत कमी होतील असं गृहीत धरलं गेलं होतं; परंतु मद्रास, उत्तर-प्रदेश आणि बिहार येथील निवडणुकींत काँग्रेस-पक्षाला फार मोठा टोला बसला आणि केरळमध्ये तर काँग्रेस धुऊन निघाली.

निरनिराळ्या राज्यांतल्या विधानसभांमध्ये काँग्रेस-पक्षाची पिछेहाट झाली होती. तरी पण सुदैवानं, केंद्रस्थानीं, लोकसभेंत मात्र या पक्षानं आपलं बहुमत टिकवण्यापर्यंत मजल मारली होती; परंतु हें बहुमत सुद्धा मामुली स्वरूपाचं होतं. लोकसभेच्या ५२१ जागांपैकी २७३ जागा काँग्रेसनं मिळवून फक्त १३ संख्येनं बहुमत प्रस्थापित केलं होतं. गुजरात, आंध्र प्रदेश, म्हैसूर आणि महाराष्ट्र या राज्यांनीच त्या वेळीं केंद्रस्थानची सरकारची बाजू सावरली. दक्षिण-सातारा मतदारसंघांतून यशवंतराव विजयी होऊन ते पुन्हा दिल्लींत दाखल झाले होते.

या निवडणुकीनंतर इंदिरा गांधी यांची पुन्हा नेतेपदीं निवड होऊन त्यांचं नवं मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलं आणि त्यामध्येहि यशवंतरावांकडे गृहमंत्रिपदाचीच जबाबदारी सोपवण्यांत आली.

परिस्थितींत आता बदल घडला होता. काँग्रेसची आतापर्यंतची ‘ करीन ती पूर्व ’ ही स्थिति संपली होती आणि नऊ राज्यांत विरोधी पक्षांचीं सरकारं अस्तित्वांत येऊन राज्यकारभार करूं लागलीं होतीं. त्या प्रत्येकाची कारभाराची तऱ्हा वेगळी होती. कारण प्रत्येकाचा राजकीय पिंड, तत्त्वज्ञान, ध्येय हें वेगळं होतं. देशाच्या एका टोकाला केरळमध्ये कम्युनिस्ट सरकार, तर दुसऱ्या टोकाला, ओरिसामध्ये, पुराणमतवादी स्वतंत्र पक्षाचं सरकार, मध्यावर कुठे अकाली दल, तर कुठे डी. एम्. के. अशी सारी गोंधळाची परिस्थिति होती.

यांतून पुढच्या काळांत यशवंतरावांसमोर, केंद्र व राज्य-सरकारमधील संबंधांचा प्रश्न कांही विरोधी मुख्य मंत्र्यांनी निर्माण केला. संघ-राज्यामध्ये अशी स्थिति निर्माण होणं हें कित्येकदा क्रमप्राप्त ठरत असलं तरी मतभेद निर्माण होऊनहि केंद्र आणि राज्य-सरकार यांनी राष्ट्राच्या स्थैर्याच्या दृष्टीनं, सहकार्याच्या भावनेनं कारभार केला पाहिजे, असं यशवंतरावांचं मत होतं. केंद्राकडून राज्य-सरकारांना सहकार्य दिलं जावं अशीच पंतप्रधानांचीहि वैचारिक बैठक होती. केंद्र व राज्य संबंधावरील चर्चा त्या वेळीं बराच काळ होत राहिली आणि गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांना विधायक भूमिका स्वीकारून निर्णय करावे लागले. विरोधकांनी आपल्या ताब्यांतील राज्यांत कोंडी निर्माण करायची आणि यशवंतरावांनी युक्ति-प्रयुक्तीनं ती कोंडी फोडून काढायची, असं अनेकदा घडलं.

सत्तेसाठी हपापलेल्या आमदारांमध्ये त्या काळांत, पक्ष बदलण्याची लाट निर्माण झाली होती. यशवंतरावांनी त्याचं वर्णन एकदा आयाराम-गयाराम असं केलं. ही लागण सर्वच पक्षांत झालेली होती. सत्ताधारी काँग्रेस-पक्षहि त्याला अपवाद नव्हता. पुढे पुढे तर ही साथ इतकी पसरली की, कांही राज्यांमध्ये सरकार स्थिर रहाणं मुष्किल ठरलं. आज या पक्षांत तर उद्या त्या पक्षांत, अशी आमदारांची ये-जा होऊं लागली. आणि एक वेळ अशी निर्माण झाली की, संपूर्ण उत्तर-भारतांत पक्षांचं अस्तित्वच संपुष्टांत आल्यानं पंजाब, हरियाना, उत्तर-प्रदेश, बिहार आणि पूर्व-बंगाल या उत्तर-भारताच्या संपूर्ण पट्ट्यांत राष्ट्रपतींची राजवट सुरू करणं क्रमप्राप्त ठरलं. त्या परिस्थितींत गृहमंत्री या नात्यानं यशवंतराव चव्हाण यांची राजवटच संपूर्ण उत्तर-भारतांत सुरू झाली. त्या प्रत्येक राज्यांतील प्रशासकीय आणि राजकीय प्रश्नांशीं झुंज घेऊन त्याचा निर्णय करण्याची जबाबदारी यशवंतरावांची होती. जबाबदारीचं मोठं ओझं त्या काळांत त्यांच्यावर येऊन पडलं आणि त्यांनी तें समर्थपणानं पेललं.

पक्षाशीं दगाबाजी करण्याची वृत्ति निवडून आलेल्या आमदारांमध्ये कशी आणि किती वाढली आहे यासंबंधी यशवंतरावांनी या वेळीं देशांतील आकडेवारीच जमा केली. कारण या वृत्तीमुळे १९६७ च्या मार्चपासून १९६८ च्या जूनपर्यंतच्या काळांत बरीच राज्य-सरकारं कोसळलीं होतीं. पूर्वीच्या काळांतहि आमदार पक्ष बदलत असत; परंतु विरोधी पक्षांतून सत्ताधारी काँग्रेस-पक्षांत प्रवेश करण्यापुरतंच प्रामुख्यानं तें मर्यादित होतं. १९६२ ते १९६७ या काळांत पक्ष-बदलीचा प्रवाह उलटा सुरू झाला होता आणि १९६७ च्या निवडणुकीनंतर तर आमदारांचा तो एक धंदाच होऊन बसला होता. यशवंतरावांनी याबाबत जी आकडेवारी जमा केली होती त्यानुसार निवडणुकीनंतरच्या पहिल्या सव्वा वर्षांत निवडून आलेल्या ५०० आमदारांनी आपापल्या पक्षांना दगा दिला होता. त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट एवढीच होती की, हें फक्त राज्यपातळीवर घडत राहिलं होतं. लोकसभेपर्यंत तो उपद्रव पोंचला नव्हता!

यशवंतरावांना त्या काळांत राज्यपालांची नियुक्ति हा एक प्रश्न डोकेदुखीचा बनला. गृहमंत्रिपद स्वीकारल्यानंतरच्या पहिल्या सहा महिन्यांतच राज्यपालांचं काम करण्यासाठी योग्य अशा व्यक्तीची निवड करण्याचा प्रश्न उद्भवला. नव्यानं दहा राज्यपालांची नेमणूक करायची होती. राज्यपालपदीं ज्याची नियुक्ति करायची त्याचं व्यक्तिमत्त्व, समाजांतलं त्याचं स्थान, त्याची शैक्षणिक पात्रता, त्याची प्रशासकीय कुवत इत्यादि गोष्टी तपासून मगच निर्णय करावा लागतो. यशवंतरावांनी त्यासाठी कांही व्यक्तींकडे संधान बांधलं, परंतु त्यांतील पुष्कळजणांनी राज्यपाल म्हणून काम करण्याची तयारी नसल्याचंच सांगितलं. राज्यपालांची नियुक्ति करतांना त्या राज्याच्या मुख्य मंत्र्यांशीं विचारविनिमय करूनच निर्णय करावा लागतो. बिहार राज्यासाठी नित्यानंद कानुनगो यांची नियुक्ति झाल्यानंतर त्यांतून बराच वाद निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. त्या ठिकाणीं विरोधी पक्षाचं सरकार अस्तित्वांत आलं होतं. त्यामुळे सरकारनं, कानुनगो यांचा राज्यपाल

म्हणून स्वीकार करण्यास नकार दर्शवला. लोकसभेंतल्या विरोधी खासदारांनी मग गृहमंत्र्यांना धारेवर धरलं. विरोधी पक्षाचीं सरकारं असलेल्या अन्य सात राज्यांतल्या राज्यपालांची नियुक्ति बिनबोभाट झाली होती. परंतु खासदारांनी बिहारचा प्रश्न उपस्थित केला तेव्हा बिहारचे मुख्य मंत्रीच आपल्या सहकाऱ्यांना या संदर्भात विश्वासांत घेण्याच्या बाबतींत असमर्थ ठरलेले असून, त्यांच्याशीं अनेकदा विचारविनिमय करूनच कानुनगो यांची नियुक्ती झालेली आहे, असं यशवंतरावांनी सांगतांच विरोधी खासदार थंड झाले. अखेर कानुनगो यांनाच राज्यपाल म्हणून स्वीकारण्याला बिहारच्या मुख्य मंत्र्यांना त्यांनी भाग पाडलं.

यशवंतरावांना आपल्या कारकीर्दीत महाराष्ट्र-म्हैसूर, पंजाब-हरियाना आणि आसाम-नागालँड या राज्यांतील सीमा-प्रश्नाच्या तंट्यालाहि तोंड द्यावं लागलं. महाराष्ट्र-म्हैसूर दरम्यानचा सीमा-तंटा हा यशवंतराव गृहमंत्री होण्याअगोदरचा – तेरा वर्षांचा जुना तंटा होता. गोविंद वल्लभ पंत, लालबहादूर शास्त्री आणि गुलझारीलाल नंदा या त्या अगोदरच्या तीन गृहमंत्र्यांना या प्रश्नांत तडजोड करण्यांत अपयश प्राप्त झालं होतं. या दोन्ही राज्यांतील आपल्या काँग्रेसपक्षीय सहकाऱ्यांना नाराज करण्याचं पूर्वीच्या गृहमंत्र्यांनी टाळलं व त्यामुळे हा प्रश्न तसाच लोंबकळत राहिला.

यशवंतरावांनी गृहमंत्रिपद स्वीकारल्यानंतर या प्रश्नाचा निर्णय करण्याचं काम पंतप्रधानांकडेच सोपवलं. गृहमंत्री या नात्यानं यशवंतरावांनी महाराष्ट्राची बाजू घेऊन दबाव निर्माण केला अशी टीका करण्याला कोणास अवसर राहूं नये आणि त्रयस्थ-पणानं या तंट्याचा निर्णय व्हावा असाच त्यामागचा त्यांचा दृष्टिकोन होता. परंतु तरीहि तो प्रश्न रेंगाळत राहिला आणि १९६९ सालीं काँग्रेसमधील दुफळीनंतर तर या प्रश्नाचं स्वरूपच बदललं. दुफळीनंतर महाराष्ट्रांत इंदिरा काँग्रेस आणि म्हैसूरमध्ये संघटना काँग्रेस असं चित्रं निर्माण झाल्यानं या तंट्याचा निकाल आणखी लांबला. यशवंतराव गृहमंत्रि-पदांतून मुक्त होईपर्यंत तरी या तंट्याचा निर्णय होऊं शकला नाही आणि पुढेहि वर्षानुवर्षे तो अनिर्णीतच राहिला.

पंजाब-हरियाना या राज्यांतील तंटा मात्र यशवंतरावांनी हिकमतीनं सोडवला. आसाम-नागालँडचा वाद योग्य अशा वातावरणांत निकाली काढणं कांहीसं अवघड होतं. या वादाच्या चर्चेच्या वेळीं कांही पेंच निर्माण केले गेले. परंतु या डोंगरी मुलखां-तील निरनिराळ्या गटांतील नेत्यांची समजूत काढण्यांत यशवंतरावांनी महिन्यांमागून महिने खर्च केले आणि त्यांनी स्वतः निश्चित केलेल्या योजनेनुसार या तंट्याचा निर्णय करण्यांत त्यांनी यश मिळवलं. मेघालय या नव्या राज्याचा जन्म त्याच वेळीं झाला.

आंध्र प्रदेशामधील स्वतंत्र तेलंगणाची वावटळहि यशवंतरावांच्या कारकीर्दीतच जोर करून उठली होती. १९६९ च्या जानेवारीमध्ये हैदराबादमधील विद्यार्थ्यांनी त्यासाठी आंदोलन सुरू केलं आणि हां हां म्हणतां तें सर्वत्र पसरलं. हैदराबादसह तेलंगण या स्वतंत्र राज्याची निर्मिति व्हावी अशी एका गटाची मागणी होती, तर

दुसरा गट, राष्ट्रपतींच्या १९५८ च्या हुकमाप्रमाणे तेलंगणाच्या हितसंबंधांचं पूर्णपणानं रक्षण व्हावं अशी मागणी करत होता. हें आंदोलन १९६९ पर्यंत सुरू होतं.

या प्रश्नाची सोडवणूक राजकीय दृष्टिकोनांतून केली पाहिजे असा आग्रह डॉ. चेन्ना रेड्डी आणि कोंडा लक्ष्मण बापूजी यांनी धरला होता. यशवंतराव यांची भूमिका भाषिक राज्य अस्तित्वांत येणं अपरिहार्यच आहे अशी होती. भाषिक राज्यांची निर्मिति ही एक आवश्यक गरज म्हणून त्यांनी मानलं होतं. परंतु हें वडवण्यासाठी भाषिक राज्य-पुनर्रचनेचा आणखी एक डाव देशांत सुरू करूं देण्यास त्यांची तयारी नव्हती. त्या अगोदरच्या भाषिक राज्य-पुनर्रचनेच्या समस्येंतून निर्माण झालेलीं कडू फळं त्यांनी चाखलेलीं होतीं. त्यामुळे देशांत याच प्रश्नानं पुन्हा थैमान घालावं अशी परिस्थिति निर्माण होऊं देण्यास त्यांची संमति मिळणं अशक्य होतं.

परंतु या संदर्भात त्यांनी आपली भूमिका मात्र स्पष्ट केली की, राज्यांतले जे अविकसित भाग असतात त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक समस्यांकडे राज्यानं जुजबी स्वरूपाचं लक्ष देऊन चालणार नाही. राज्यपातळीवरील किंवा केंद्रस्थानच्या राजकारणाच्या ओढाताणीचा परिणाम जर राज्यांतील अविकसित भागांकडे दुर्लक्ष होण्यांत आणि त्याचा परिणाम त्या राज्यांत असंतोष निर्माण होण्यांत घडणार असेल, तर तें मात्र चालू देतां उपयोगी नाही.

तेलंगणाच्या तंट्याबाबत आणि अन्य आंतरराज्यविषयक प्रश्नांविषयी वाद मिटवण्याच्या मार्गाचा शोध सुरू असतांना त्याच काळांत यशवंतरावांनी लोकसभेंत जी विविध विधेयकं सादर केलीं त्यावरच मग लोकसभेमध्ये वादळी चर्चा होत राहिली. ऑफिसियल लँग्वेज (दुरुस्ती) बिल, अन्-लॉ-फुल ॲक्टिव्हिटीज (दुरुस्ती) बिल, भाषणस्वातंत्र्य आणि उच्चारस्वातंत्र्य यांवर बंधन घालण्यासाठी सरकारला आवश्यक ते अधिकार प्राप्त करून देणारं घटना-दुरुस्तीचं विधेयक आणि अन्य अनेक विधयकं त्यांनी लोकसभेला सादर केलीं.

हीं सर्व विधेयकं आणि दुरुस्त्या यावर स्वाभाविकच विरोधी पक्षाच्या खासदारांनी झोड उठवली आणि शेकडो दुरुस्त्या सुचवल्या. १९६७ हें संपूर्ण वर्ष यशवंतरावांना लोकसभेंत खिळून पडल्यासारखं झालं. दिवसांतला सारा वेळ त्यांना तिथेच थांबावं लागत असे. विधेयकं सादर करणं आणि त्यावरील प्रश्नांना, उपप्रश्नांना उत्तरं देणं हें काम त्यांनाच करावं लागे. विषय वेगळे, त्यामुळे प्रत्येकाचे प्रश्न वेगळे, मात्र उत्तरं देणारे एकच, अशी स्थिति होती. प्रत्येक प्रश्नाचा प्रारंभ गृहमंत्र्यांना पुकारूनच केला जात असे. देशांत कुठे कांही अनिष्ट घडलं असेल, तर आयत्या वेळचे प्रश्न म्हणूनहि प्रश्नांच्या फैरी सुरू होत असत.

असं असलं तरी १९६७ हें संपूर्ण वर्ष, हें गृहमंत्र्यांच्या कर्तृत्वाचं वर्ष ठरलं. या एक वर्षाच्या काळांत यशवंतराव हे दमदार आणि आत्मविश्वाससंपन्न असे नेते आणि

तरबेज संसदपटू असल्याचं दर्शन देशाला घडलं. एकामागोमाग एक कर्तृत्वाचीं शिखरं ओलांडीत त्यांची प्रतिमा उज्ज्वल बनत राहिली.

लोकसभेंत जे वादविवाद होत असत त्या वेळीं सत्ताधारी पक्षाच्या आसनावरून यशवंतरावांनाच त्या काळांत त्या वादविवादाशीं सामना करावा लागला. गृहखात्याच्या संदर्भातील चर्चेच्या वेळीं, ते प्रत्येक प्रश्नाचं उत्तर, आत्मविश्वासानं आणि बिनतोड देत असत. यशवंतरावांना वक्तृत्वाची जन्मजात देणगी असली तरी आपल्या वक्तृत्वांत पाश्चात्त्य धर्तीचा इंग्रजीचा फुलोरा निर्माण करत न रहातां ते ठामपणानं बोलतात, एखादी अवघड आणि गुंतागुंतीच्या त्रासदायक समस्येच्या संदर्भांत बोलतांना ते विशिष्ट पद्धतीच्या भाषाशैलीचा वापर करून, विशिष्ट आवाजांत बोलतात आणि बोलतांना वेळेचं भान ठेवतात असंच त्यांच्या यशाचं रहस्य म्हणून वृत्तपत्रांनी जनतेपर्यंत पोंचवलं.

लोकसभेचीं कांही अधिवेशनं तर 'चव्हाण अधिवेशनं' म्हणूनच गाजलीं. वृत्तपत्रांनीच तो अभिप्राय व्यक्त केला. १९६२ मध्ये संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव संसदेंत दाखल झाले त्या वेळीं क्वचित्, प्रसंगानुरूपच ते बोलत असत. ते कांहीशा लाजरेपणानंच वावरत आहेत, त्यांच्या ठिकाणीं आत्मविश्वास दृढ झालेला नाही, अशीच त्यांच्या संबंधीची प्रतिमा खासदारांच्या मनांत निर्माण झाली होती. परंतु गृहमंत्री म्हणून जेव्हा ते संसदेंत उभे ठाकले तेव्हा सत्ताधारी पक्षाचे समर्थ वक्ते, समर्थ प्रवक्ते म्हणून त्यांनी नांवलौकिक संपादन केला.

गृहखात्याचं मंत्रिपद स्वीकारलं त्या वेळीं आपल्याला केंद्राच्या ठिकाणचं आणि देशांतल्या निरनिराळ्या राज्यांच्या संबंधांत कांही पट्टीचं राजकारण करावं लागणार आहे याची त्यांना कल्पनाहि नव्हती.

परंतु १९६७ ते १९६९ या काळांत देशांत जातीय दंगलींची भयंकर लाट उसळल्यानं, गृहमंत्रालयासमोर कायदा आणि सुव्यवस्थेची एक मोठीच समस्या निर्माण झाली. बिहारमध्ये रांची इथे दंगल सुरू होऊन प्रथम ठिणगी पडली आणि देशाच्या निरनिराळ्या भागांत हें लोण पसरत राहिलं.

१९६७ च्या ऑगस्टमध्ये रांचीमध्ये एक आठवडाभर सुरू राहिलेल्या जातीय दंगलींत १५५ लोक प्राणास मुकले. मुस्लिमांच्या विरोधी, उर्दूविरोधी कांही पत्रकं वांटलीं गेलीं आणि हें दंगलीचं एक कारण ठरलं. दंगल पसरत जातांच स्वतः यशवंतराव तिकडे धांवले आणि बिहारच्या मंत्र्यांशीं चर्चा करून, शांतता प्रस्थापित होण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत त्यांना देऊं केली. केंद्रीय राखीव पोलिस हे तर सज्ज ठेवण्यांत आलेच; शिवाय प्रसंग निर्माण झाल्यास लष्कराची मदतहि उपलब्ध करण्याची व्यवस्था करण्यांत आली. यशवंतरावांचा दंगलग्रस्त भागांतील दौरा आणि कडक कारवाईची व्यवस्था होतांच रांचीमधील दंगलीस उतार पडला.

परंतु मागोमाग श्रीनगर इथे वातावरण तंग झालं. श्रीनगरमधील परमेश्वरीदेवी ही एक हिंदु मुलगी आणि प्रवीण अख्तर हा मुस्लिम तरुण यांच्या विवाहांतून हें

जातीय प्रकरण महिनाभर तापत राहिलं. अखेर यशवंतरावांना त्यासाठी काश्मीरला धांव ध्यावी लागली. काश्मीरच्या दौऱ्यांत, तेथील मंत्री आणि निरनिराळ्या धर्मांचे नेते, यांच्याशीं चर्चा, विचारविनिमय केल्यानंतरच त्या ठिकाणीं शांतता प्रस्थापित झाली.

रांची आणि श्रीनगर इथला जातीय तणाव कमी होतो न होतो तोंच सप्टेंबरमध्ये उत्तर-प्रदेशांत जैनपूर आणि सुचेतपूर इथे, तसंच त्याच महिन्यांत महाराष्ट्रांत अहमदनगर, सोलापूर आणि मालेगाव इथे जातीय दंगली उसळल्या. लोकसभेंत मग या प्रश्नाला तोंड फुटलं. या सर्व ठिकाणच्या जातीय दंगलीमागे, राजकीय पुढाऱ्यांचा हात होता आणि कायदा व सुव्यवस्था शाबूत ठेवण्याची ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी असते, त्यांतील कांही अधिकारीहि, जातीय भावनेच्या आहारीं गेलेले असल्याची सरकारची माहिती होती. एक गोष्ट मात्र खरी की, १९६७ मध्ये आंध्र, बिहार आणि उत्तर-प्रदेश या राज्यांत जातीय दंगलींनी उच्चांक गाठला.

पुढच्या वर्षीतहि हें लोण पसरत राहिलं आणि १९६८ मध्ये मिरत, करीमगाव, अलाहाबाद, केरळ, आणि म्हैसूर असे कांही भाग जे जातीय दंगलीपासून अलिप्त होते तिथेहि हा वणवा पसरला. त्या वर्षी उत्तर-प्रदेश, आसाम, बिहार आणि पूर्व-बंगाल या राज्यांत जातीय दंगलींनी कहर माजवला. जातीय दंगली काबूंत आणण्याच्या कामीं राज्य-सरकारं आणि राज्यांतील नेते हे अपयशी ठरले. जातीय दंगली माजवण्यामागे गुंडांचा हात आहे असेच निष्कर्ष पुढाऱ्यांनी आणि बुद्धिवाद्यांनी काढले. दंगलीमध्ये गुंडांचा हात होता ही जरी वस्तुस्थिति होती, तरी पण केवळ त्यांच्यामुळे दंगलींचा वणवा भडकला नव्हता. राजकारणी मंडळींचा त्यामध्ये प्रामुख्यानं हात होता. किंबहुना देशांत सर्वत्र अशांततेचं वातावरण निर्माण करण्याच्या हेतूनं जाणूनबुजून जातीय दंगलींची योजना तयार करण्यांत आलेली होती.

१९६९ च्या सप्टेंबरमध्ये, गुजरातमध्ये अहमदाबादला दहा दिवस दंगल घडवून एक वेगळाच उच्चांक गाठण्यांत आला. अहमदाबादच्या दंगलींत ५०३ लोक ठार झाले आणि चार ते पांच कोटींची मालमत्ता भस्मसात झाली. १९६९ साल हें स्वतंत्र भारताच्या इतिहासांतील जातीय दंगलींनी भरलेलं असं वर्ष ठरलं. गृहमंत्रालयाच्या दप्तरांत, त्या वर्षाच्या जातीय दंगलींची जी नोंद झालेली आहे त्यानुसार त्या वर्षी देशांत जातीय दंगलींचे एकूण ५१९ प्रकार घडले असल्याचं नमूद आहे. त्या अगोदरच्या वर्षापेक्षा दंगलींचं प्रमाण हें या वर्षी ५० टक्क्यांनी वाढलं. गुजरात, बिहार, पूर्व-बंगाल, मध्यप्रदेश, केरळ, ओरिसा आणि उत्तर-प्रदेश या राज्यांना त्याची सर्वांत अधिक झळ बसली.

या सर्व ठिकाणच्या जातीय दंगलीमागे जातीयवादी राजकीय पक्षांची एक विशिष्ट वृत्ति होती असं या सर्व घटनांचं विश्लेषण यशवंतरावांनी त्या वेळीं केलेलं आहे. देशांत जातीय तणाव निर्माण करून तो वाढवत ठेवण्यास जनसंघ हा प्रामुख्यानं जबाबदार असल्याचंहि त्यांनी सांगितलं. मुस्लिम धर्माचे लोक हे राष्ट्रद्रोही आहेत किंवा कमी

राष्ट्रवादी आहेत, असा प्रचार जनसंघीयांनी सुरू ठेवला होता आणि मुस्लिमांचं भारतीकरण करावं यासाठी आघाडी उघडली होती. यशवंतरावांनी लोकसभेंतील चर्चेच्या वेळीं या वृत्तीचा परखडपणें समाचार घेतला. जनसंघाचे नेते बलराज मधोक यांनी 'भारतीकरण' या विषयावर एक पुस्तक लिहिलं होतं. त्याचाहि उल्लेख यशवंतरावांनी केला आणि हा सारा प्रकार, इतिहासाचे विकृत चित्र निर्माण करण्याचा व्यर्थ प्रयत्न असल्याचं सांगितलं.

देशांतील जातीय दंगली अजूनहि शमल्या नव्हत्या. १९७० च्या मेमध्ये महाराष्ट्रांत भिवंडी आणि जळगांव या ठिकाणीं दंगल माजली. यशवंतरावांनी या दोन्ही गावांना भेट देऊन परिस्थितीची पहाणी केली. नंतरच्या काळांत तर देशांत ज्या ज्या ठिकाणीं जातीय दंगली झाल्या त्या सर्वच राज्यांत त्यांनी दौरे केले. केंद्रीय मंत्र्यानं, अशा कामासाठी दौरा करण्याचं त्या वेळीं प्रथमच घडलं.

जातीय दंगलीप्रमाणेच यशवंतरावांना आपल्या कारकीर्दीत आणखी एका समस्येला तोंड द्यावं लागलं. जातीयवादी भयंकर वृत्तीप्रमाणेच त्या काळांत, प्रांतवादाचं आणि भाषिकवादाचं भूत उठलं होतं. आसाम, बंगाल, ओरिसा आणि महाराष्ट्र या ठिकाणीं ह्या प्रांतवादांतून दंगली उसळल्या. महाराष्ट्रांत त्या काळांत शिवसेनेनं एक आगळीच चळवळ सुरू केली. 'महाराष्ट्र हा फक्त महाराष्ट्रीय लोकांचा' अशी त्यांची घोषणा होती आणि नोकऱ्या असोत किंवा अन्य कोणत्या सोयी-सवलती असोत, त्या महाराष्ट्रांतील लोकांनाच अग्रहक्कानं मिळाल्या पाहिजेत या मागणीसाठी त्यांनी चळवळ आरंभली. या चळवळीला पुढे विकृत स्वरूप प्राप्त करून देऊन त्यांनी लुटालूट, जाळपोळ आदि मार्गांचा अवलंब केला.

इतकं घडतांच यशवंतरावांनी शिवसेनेच्या या प्रादेशिक, प्रांतीय वृत्तीवर कडाडून हल्ला चढवला. शिवसेनेवर उघडपणानं टीका करणारे, यशवंतराव हेच पहिले काँग्रेस-पक्षीय नेते होत. शिवसेनेची चळवळ ही हुकूमशाही वृत्तीची द्योतक आहे, असंच त्यांनी सांगितलं.

मुंबईतल्या एका सभेंत यशवंतरावांनी शिवसेनेवर झोड उठवलीच, शिवाय लोकसभेंतहि आपली भूमिका स्पष्ट केली आणि महाराष्ट्र सरकार किंवा महाराष्ट्र काँग्रेस यांच्यापैकी कोणाचाहि शिवसेनेच्या हुकूमशाहीला आधार नाही, हेंहि स्पष्ट केलं. भिवंडी आणि कल्याण येथील जातीय दंगलींना शिवसेनाच जबाबदार असल्याचं त्यांनी पुढे मुंबईतल्या एका जाहीर सभेंत स्पष्टपणें सांगितलं. भारताच्या मूलभूत भूमिकेशीं विसंगत आणि मानवतेच्या मूल्यांशींच शिवसेनेचा हा पवित्रा विरोधी आहे असं त्यांचं मत होतं.

यशवंतरावांच्या टीकाकारांनी दिल्लींत त्या काळांत एक वेगळीच कुजबूज सुरू ठवली होती. यशवंतराव हे शिवसेनेचे पाठीराखे आहेत अशी ती कुजबूज होती. शिवसेनेच्या प्रवृत्तीचे ते कट्टर विरोधक आहेत याची मुंबईतील लोकांना चांगली जाण

होती; परंतु यशवंतरावांची दिल्लींतली प्रतिष्ठा आणि स्थान हें ज्यांना खुपत होतं त्यांनी त्यांची बदनामी करण्यासाठी म्हणून अशा खोट्या प्रचाराचा आश्रय घेतला होता. शिवसेनेच्या संदर्भांत त्यांनी जाहीर सभांतून जे विचार व्यक्त केले होते किंवा शिवसेना-प्रमुख यशवंतरावांच्यासंबंधी जाहीर सभांतून जे बोलत होते ते सर्व, यशवंतरावांचा दृष्टिकोन सिद्ध करण्यास वस्तुतः पुरेसं होतं; परंतु पत्रकारांनीहि त्या काळांत यशवंतरावांवर अन्याय केला. शिवसेनेच्या विरोधी ते ज्या ज्या वेळीं बोलले ते पत्रकारांनी महत्त्वाचं मानलं नाही, परंतु लोकसभेमध्ये, शिवसेनेच्या संदर्भांत यशवंतरावांवर टीका करणारं जें बोललं गेलं त्याला मात्र पत्रकारांनी प्रमुख स्थान दिलं. यशवंतरावांचं हें दुर्दैव म्हटलं पाहिजे!

गृहमंत्री या नात्यानं, देशांत यशवंतरावांची प्रतिमा पोलादी पुरुष अशी जरी निर्माण झालेली होती, तरी पण ते स्वतः मात्र मनांतून समाधानी नव्हते. यशवंतरावांचा मूळचा पिंड हा वैचारिक असल्यानं, देशांत असंतोषाचं, गोंधळाचं वातावरण जें निर्माण होत रहातं त्याच्या कारणांचा मूलभूत शोध घेतला पाहिजे, असं त्यांचं मन त्यांना सांगूं लागलं. असंतोष निर्माण झाला, दंगल झाली किंवा एखादी चळवळ सुरू झाली, तर केवळ कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या कामापुरतंच त्यांना आपलं लक्ष केंद्रित करतां येणं शक्य नव्हतं; तो त्यांचा पिंड नव्हता. त्या अर्थानं विचार केला, तर यशवंतरावांसारख्या वैचारिक नेत्याच्या कामाचं क्षेत्र गृहमंत्रालय हें नव्हतंच! गृहमंत्रालयांत काम करतांना मनाचा एक वेगळाच पिंड बनवावा लागतो. यशवंतरावांचा मनःपिंड हा प्रत्येक घटनेकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनांतून पहाण्याचा आणि त्याचं विश्लेषण करण्याचा असाच बनलेला असल्यानं, गृहमंत्री म्हणून काम करतांना हा दृष्टिकोन बदलणं त्यांना कठीण होतं. त्यामुळे देशांत घडून गेलेल्या आणि घडणाऱ्या प्रत्येक घटनेची मीमांसा त्यांनी आपल्या मनाशीं कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून तर केलीच, शिवाय त्याच्या सामाजिक परिणामांचा विचारहि त्यांनी केला. प्रत्येक प्रश्नाच्या मुळाशीं जी सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची कारणपरंपरा होती त्याचा शोध त्यांनी घेतला आणि त्यांतून निघालेल्या निष्कर्षांवर त्यांनी आपलं धोरण ठरवलं आणि तें राबवलं.

यशवंतरावांना या पद्धतीनं अभ्यास करण्याची गरज भासली याचं कारण उघड होतं. पूर्व-बंगालमध्ये १९६७ मध्येच शेतीच्या प्रश्नावरून नक्षलवाद्यांनी आंदोलन आरंभलं होतं. डाव्या कम्युनिस्टांनी या आंदोलनाचं मार्गदर्शन १९६६ पासून सुरू ठेवलं होतं. १९६७ च्या निवडणुकीनंतर डाव्या कम्युनिस्ट पक्षानं हें भयंकर आंदोलन प्रत्यक्ष सुरू करण्याचा निर्णय केला. या निवडणुकीनंतर कॉंग्रेस सरकारच पूर्व बंगालमध्ये सत्तेवर येईल अशी त्यांची अटकळ होती; परंतु आश्चर्य असं घडलं होतं की, त्या निवडणुकीच्या निकालानं, डाव्या कम्युनिस्ट पक्षाचाच तिथल्या सरकारांत वांटा निर्माण झाला होता. तरी पण कलकत्त्यांतील डाव्या कम्युनिस्ट पक्षांतल्या नेत्यांच्या मनाविरुद्ध जाऊन दार्जिलिंग जिल्ह्यांतील सिलीगुरी भागांत नक्षलवाद्यांनी उठाव केला. अति

डाव्यांच्या या आंदोलनानं त्या काळांत 'नक्षलाइट' असा एक नवा शब्दच शब्दकोशांत दाखल केला. नक्षलवाद्यांनी चीनशीं जवळीक साधली होती आणि त्यांच्या दंगलीचं, चळवळीचं तंत्रहि चिनी पद्धतीचंच होतं. भारताच्या सीमा-भागांत त्यांनी ती चळवळ वाढवल्यानं त्याला मग राजकीय महत्त्व प्राप्त झालं.

१९६७ मध्ये नक्षलवाद्यांच्या चळवळीला सशस्त्र बंडाचं स्वरूप प्राप्त झालं होतं. ज्या भागांत ही चळवळ सुरू होती तिथे भूमिहीन शेतकरी, आदिवासी यांचीच वस्ती अधिक होती. त्या भागांतले जमीनदार या लोकांना शेतीसाठी लागणारं बीं-बियाणं, बैल, अवजारं, पोटाला अन्न वगैरे देत असत; परंतु शेतांत तयार झालेलं पीक मात्र स्वतः घेऊन जात असत. ७० टक्के तयार पीक हें जमीनदारच नेत असत. नक्षलवाद्यांनी हा प्रश्न हातांत घेतला आणि जमिनदारांकडील जमिनी काढून घेऊन त्यांनी त्या भूमिहीन शेतकऱ्यांना वांटण्याला सुरुवात केली.

त्यांतून २ मार्च १९६७ ला पहिली ठिणगी पडली. याच दिवशीं पूर्व-बंगालमध्ये डावे कम्युनिस्ट सत्तेवर आले होते. मे महिन्यांत या चळवळीनं उग्र रूप धारण केलं. पोलिस आणि भूमिहीन शेत-मजूर यांच्यांत चकमकी सुरू झाल्या आणि पहिल्याच दिवशीं एक पोलिस व सात आदिवासी ठार झाले. एवढं घडतांच त्या भागांतील कायदा आणि सुव्यवस्थाच संपुष्टांत आली आणि सर्वत्र अनागोंदीचं साम्राज्य सुरू झालं.

त्या पुढच्या दोन महिन्यांत तर पूर्व-बंगालचे मुख्य मंत्री अजय मुखर्जी यांनीच असमर्थतता प्रगट केली. अति डाव्यांनी आता दहशतीचं साम्राज्य सुरू केलं होतं आणि दहशतीनं, गुंडगिरीनं भल्याभल्यांना शरणागति पत्करायला लावली जात होती. नक्षलबारीमध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झालेला असल्याचं यशवंतरावांनीहि नंतर लोकसभेंत सांगितलं आणि कुठल्याहि परिस्थितींत सरकार ही बंडाळी काबूंत आणील असं आश्वासन दिलं.

एक मात्र खरं की, जातीय दंगलीच्या वणव्यांतून बाहेर पडलेले यशवंतराव आता नक्षलाइटच्या वणव्यांत सापडले होते. मावत्से-तुंग यांच्या प्रोत्साहनानं देशांत क्रांति घडवून आणण्यासाठी नक्षलवाद्यांचे डावपेंच सुरू झाले होते. यशवंतरावांनी याचीहि जाणीव लोकसभेला करून दिली. पुढच्या काळांत तर यशवंतरावांचे बोलच खरे ठरले. कारण १९६८ च्या शेवटीं शेवटीं या क्रांतिकारी गटानं, आपली क्रांति यशस्वी करण्याच्या हेतूनं, देशांतल्या त्यांना सोयिस्कर अशा आठ राज्यांत, गनिमीकाव्याचं शिक्षण देण्यासाठी म्हणून कांही केंद्रं निर्माण करण्याची योजना तयार केली.

नक्षलवाद्यांची चळवळ एका विशिष्ट पद्धतीनं वाढत राहिल्याचं आढळून येतांच यशवंतरावांनी मग वेगळ्या पद्धतीनं मुकाबला करायचं ठरवलं. केवळ पोलिसांच्या शक्तीनं आणि साहाय्यानं या चळवळीचा बीमोड करण्याचं कार्य आतापर्यंत सुरू होतं; परंतु यशवंतरावांचं मत, हा मार्ग अपुरा आहे असं होतं. या चळवळीचं कारण मुळांतून उपटून काढायचं तर राजकीयदृष्ट्या त्यांच्याशीं सामना करायला पाहिजे आणि लोकांच्या

समोर ज्या सामाजिक आणि आर्थिक समस्या निर्माण झालेल्या आहेत त्या संदंभात उपाययोजना करण्याच्या दृष्टीनं मार्ग काढला पाहिजे, असं मत यशवंतरावांनी गृहमंत्रालयाच्या अनौपचारिक सल्लागार समितीमध्ये व्यक्त केलं. समाजांतल्या एखाद्या वर्गाची होणारी गळचेपी दूर करण्यासाठी, योग्य मार्गानं कोणी चळवळ उभारली तर, ती दडपून टाकावी असं सरकारचं मत नाही; परंतु देशांत सशस्त्र उठाव करून क्रांति घडवून आणण्याचा कोणी विचार करत असतील तर मात्र सरकार तें चालू देणार नाही अशीहि आपली ठाम भूमिका त्यांनी लोकसभेंत स्पष्ट केली.

यशवंतरावांनी लगोलग त्या दृष्टीनं पावलं टाकण्यास प्रारंभ केला. नक्षलवाद्यांच्या संपूर्ण चळवळीचाच अभ्यास त्यांनी आरंभला. या बाबतींत त्यांचा दृष्टिकोन मूलभूत स्वरूपाचा होता. नक्षलवादी भागांतील लोकांच्या सामाजिक व आर्थिक समस्या सोडवण्याच्या कामीं राज्य-सरकार अपयशी ठरलं होतं. वस्तुतः तें काम राज्य-सरकारचं होतं. परंतु केंद्र सरकारला आता त्याकडे एक राष्ट्रीय प्रश्न म्हणून लक्ष द्यावं लागणार होतं. त्या समस्यांतून मार्ग काढण्यासाठी केंद्र-सरकार कोणती आणि कशी मदत करूं शकेल हें पहावं लागणार होतं. हें करायचं तर, गृहमंत्र्यांसमोर राजकीय आणि कायदेशीर असे दोन्ही प्रकारचे पेंच होते. नक्षलवादी चळवळीवर बंदी घालायची तर त्यासाठी केंद्राला आणि राज्य-सरकारला आवश्यक तो कायदेशीर अधिकार नव्हता. एखादी राजकीय संघटना, संघ-राज्यांतून फुटून निघण्याचा प्रचार करत असेल तरच त्या संघटनेवर बंदी घालतां येते, अशी घटनात्मक तरतूद असल्यानं, ती एक कायदेशीर अडचण होती. सरकारला ते अधिकार नाहीत असं यशवंतरावांचं मत होतं. राज्य-सरकारनं, प्रतिबंधक स्थानबद्धता कायद्याचा किंवा भारतीय दंडविधान कायद्याचा, नाही तर फौजदारी गुन्हेविषयक कायद्याचा आधार घेऊन कृति करावी, असं यशवंतरावांचं सांगणं होतं.

सरकार या दृष्टीनं विचार करत असतांनाच क्रांतिकारी गटामध्येच मतभेदानं मूळ धरलं आणि ते क्रमाक्रमानं वाढत राहिलं. डाव्या कम्युनिस्ट नेत्यांना प्रतिगाम्यांचे हस्तक समजलं जाऊं लागलं. पेकिंग नभोवाणीवरूनहि डाव्या कम्युनिस्टांमधील नेत्यांची बदनामी सुरू झाली; आणि १९६९ च्या मे दिनानिमित्त कलकत्त्याला झालेल्या बैठकींत कनु संन्याल यांनी आणखी एक तिसरा कम्युनिस्ट पक्ष स्थापन करण्यांत आल्याचं जाहीर केलं.

नक्षलवाद्यांचे उद्योग आता देशाच्या निरनिराळ्या भागांत पसरले होते. चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचं नेतृत्व त्यांनी मान्य केलं होतं. चीनकडून मोठ्या प्रमाणांत मदत दिली जाईल, अशी त्यांना उमेद होती; परंतु तसं घडलं असतं तर, भारतांतल्या क्रांतिकारक गटाला बाहेरच्या देशांतून, चीनमधून मदत केल्यानं, नक्षलवाद्यांचं भारतीय क्रांतिकारकांचं

म्हणून जें स्वरूप होतं तें बदलून जाणार होतं. चीननं तो विचार करून क्रांतिकारकांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे मदत पाठवली नाही.

तरी पण नक्षलवाद्यांनी विविध मार्गांनी गुंडगिरी, दडपशाही वाढवण्यात कुचराई केली नाही. कलकत्त्यांत त्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांची मदत घेतली. बेकार कामगारांना वेठीस धरलं आणि शहरांतील विवक्षित भाग निवडून अनागोंदी माजवली. १९७० च्या अखेरीपर्यंत पोलिसांनी १७०० नक्षलाइट्सना अटक केली होती; तरी पण चळवळ मात्र अणुमात्रहि कमी झालेली नव्हती. नक्षलवाद्यांनी पोलिस-चौक्या, शाळा, रेल्वे-स्टेशनं, महाविद्यालयं यांवर त्या काळांत तुफान हल्ले चढवले. त्याचबरोबर कांहींना व्यक्तिगत ठार केलं. पूर्व-बंगालमधील डाव्या कम्युनिस्टांचे कांही नेतेहि त्यांचे भक्ष्य ठरले. उजव्या कम्युनिस्टांपैकी मात्र कुणी नक्षलाइट्सच्या हल्ल्याला त्या काळांत बळी पडले नव्हते. उजव्या विचारसरणीचे, प्रतिगामी, जनसंघीय किंवा कॉंग्रेसमधील कोणालाहि त्यांनी स्पर्श केला नाही. लोकांना त्याचंहि आश्चर्य वाटलं.

कॉंग्रेसपैकी गृहमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यावर नक्षलवाद्यांनी टीकेची झोड उठवली. इतकंच नव्हे तर, त्यांना दमदाट्या करण्यापर्यंत मजल मारली. १९६९ च्या फेब्रुवारीमध्ये त्यांनी दिल्लीमध्ये तांबड्या रंगाची पोस्टर्स सर्वत्र चिकटवली होती. कनु संन्याल आणि जंगल संथाल यांची तावडतोब मुक्ति करा आणि हें घडणार नसेल, तर जनरल ओडवायर याचं जें घडलं तें भोगण्यास तयार रहा, असा चव्हाणांना उद्देशून या पोस्टर्सवरील मजकूर तयार केला होता.

नक्षलवाद्यांनी हें आव्हान दिल्यानंतर यशवंतरावांनी त्या संदभात विचारविनिमय करण्यासाठी म्हणून लोकसभेंतील विरोधी पक्षांच्या नेत्यांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. या आव्हानाला कसं तोंड द्यायचं यासंबंधी त्यांना त्यांच्याशीं सल्लामसलत करायची होती; परंतु आश्चर्य असं की, या बैठकीला हजर रहाण्याचं विरोधी नेत्यांनी टाळलं. त्यांच्यापैकी कोणीहि आले नाहीत. याचा अर्थ, या विरोधी नेत्यांची नक्षलाइट्सच्या कृतीला संमति होती असा नव्हे; परंतु नक्षलाइट्सचं पारिपत्य करण्याचा पवित्रा आपण स्वीकारला, तर कदाचित् आपल्या कार्यकर्त्यांमधून त्याची उलटी प्रतिक्रिया उमटेल अशी भीति त्यांना वाटली. त्यामुळे मग यशवंतरावांना एकट्यालाच त्या प्रसंगाशीं सामना करावा लागला.

नक्षलवाद्यांची त्या काळांतली चळवळ म्हणजे एक ऐतिहासिक आव्हान होतं. सशस्त्र क्रांति घडवण्याच्या दृष्टीनं भारतांत अनुकूल वातावरण निर्माण झालेलं आहे अशी या क्रांतिकारकांची समजूत होती. आणि या समस्येला तोंड कसं द्यायचं हा सरकारपुढे, विशेषतः गृहमंत्रालयासमोर प्रश्न निर्माण झाला होता. नक्षलवाद्यांनी चळवळीसाठी ग्रामीण क्षेत्र निवडलं होतं. माओनं चीनमध्ये प्रथम अशीच, ग्रामीण

भागांत चळवळ सुरू केली होती. माओचं तंत्र आणि त्याचंच तत्त्वज्ञान नक्षलाइट्सनी स्वीकारलेलं होतं.

भारताची सीमा जिथे आंतरराष्ट्रीय सीमेशीं भिडते असंच क्षेत्रं त्यांनी, क्रांतीच्या हाल्चालीसाठी निवडलं होतं. एका बाजूला नेपाळ, दुसऱ्या बाजूला पाकिस्तान आणि शेजारींच चीनची हद्द, अशी ही मोक्याची जागा होती. चीनमध्ये शस्त्रास्त्रांची आयात चोरट्या मार्गानं करून देशांत क्रांतीची हवा निर्माण करण्याचीं स्वप्नं ते पहात होते. परंतु अशा प्रकारे क्रांति घडवून आणण्याच्या संदर्भात त्यांना त्यांची आवश्यक ती प्रतिमा कधीच निर्माण करतां आली नाही. तरी पण नक्षलवाद्यांची चळवळ आणि त्यांनी निर्माण केलेली समस्या मात्र पुढच्या काळांतहि कायमच राहिली. चळवळीचा जोर कमी करण्यासाठी सरकारनं कडक उपाययोजना केली आणि त्यामुळे चळवळीचा, क्रांतीचा जोम ओसरला हें खरं; परंतु अशा प्रकारच्या चळवळी ज्या परिस्थितींत जन्म घेतात ती परिस्थिति बदलून टाकणं आणि असंतोषाचीं कारणं नाहीशीं करणं हाच त्यावरील खरा उपाय होय, असंच यशवंतरावांचं मत व्यक्त होत राहिलं. कॉंग्रेसनं पुरोगामी कार्यक्रमांचा अंगीकार केला पाहिजे असं मत त्यासाठीच सांगितलं जाऊं लागलं.

कॉंग्रेसनं वचनपूर्तीचं राजकारण सुरू करून पक्ष आणि जनता यांतील अंतर कमी करावं आणि लोकांना पुरोगामी कार्यक्रमांत सामील करून घ्यावं, यासाठी सहाव्या दशकाच्या मध्यावर कांही पुरोगामी विचाराच्या कॉंग्रेस-जनांनी त्यामुळेच आवाज उठवण्याला सुरुवात केली. कॉंग्रेसनं जें धोरण मान्य केलेलं होतं त्याची अंमलबजावणी अतिशय संथपणानं होत राहिल्यामुळे, कॉंग्रेस-अंतर्गत कांहीजण नाराज बनले होते. यशवंतरावांचा या पुरोगामी विचाराला पाठिंबाच होता. १९६७ च्या निवडणुकींत कॉंग्रेसचा दारुण पराभव झाला होता. त्यानंतर दिल्ली इथे झालेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनांत या गटानं चांगलाच आवाज उठवला. पंतप्रधानांसह सर्व वरिष्ठ कॉंग्रेस-नेते, निवडणुकींतील पराभवानं सचिंत बनलेले होते. या अधिवेशनांत मग त्यांतूनच एक दहा कलमी आर्थिक कार्यक्रम तयार झाला. बहुसंख्य कॉंग्रेस-जनांनी त्याचं पुरोगामी कार्यक्रम म्हणून स्वागत केलं.

भारतांत जे संस्थानिक होते त्या सर्वांचा तनखा आणि खास सवलती रद्द करण्यांत याव्यात असं त्या दहा कलमी कार्यक्रमांत समाविष्ट करण्यांत आलेलं होतं. संस्थानिकांच्या खास सवलती रद्द करण्यांत याव्यात याला कॉंग्रेस-कार्यकारिणीचा पाठिंबाच होता. त्याला महाराष्ट्रांतले कॉंग्रेस-खासदार मोहन धारिया यांनी संस्थानिकांचे तनखे रद्द करावेत अशी एक दुरुस्ती सुचवली. ही दुरुस्ती-सूचना, अधिवेशन संपतां संपतां फक्त सतरा मतं मिळून संमत झाली. विरोधी मतं चारच होतीं. लोकशाहीच्या कल्पनेशीं विसंगत असलेल्या, तनखा आणि त्याचबरोबर खास सवलती या दोन्ही गोष्टी बंद कराव्यात यासाठी या ठरावांत सरकारला आवाहन करण्यांत आलं होतं. दिल्लीच्या या

अधिवेशनाला काँग्रेसच्या एकूण ७५५ सदस्यांपैकी अ. भा. काँग्रेसचे ३१५ सदस्य उपस्थित होते.

महाराष्ट्रामध्ये संस्थानिकांचं प्राबल्य तुलनेनं कमी. दैनंदिन राजकारणापासूनहि ही राजे मंडळी कांहीशी अलिप्त असल्यानं, १९६७ निवडणुकीच्या प्रचारांत यशवंतरावांनी संस्थानिकांच्या प्रश्नावर भर दिला नव्हता. परंतु निवडणुकीनंतरच्या काळांत मात्र सामाजिक न्याय प्रस्थापित होण्याच्या दृष्टीनं, संस्थानिकांना दिले जाणारे तनखे आणि विशेष सवलती, यासंबंधीचा विचार त्यांनी केला.

राजे लोकांना जे अधिकार प्राप्त झालेले होते त्याचा आणि त्यांना मिळणाऱ्या तनख्यांचा उपयोग ते केवळ खाजगी चैनीसाठी करत असत. सामाजिक न्यायाच्या दृष्टीनं तें खटकणारं होतं. त्यामुळे अ. भा. काँग्रेस-अधिवेशनामध्ये, तनखे रद्द करण्यासंबंधीची दुरुस्ती येतांच ती संमत करून घेण्याच्या दृष्टीनं, महत्त्वाच्या हालचाली त्यांनी केल्या.

काँग्रेस-अधिवेशनांत ही दुरुस्ती संमत झाली, परंतु त्यामुळे कांही काँग्रेस-जनांचं पित्त खवळलं. कांहींनी त्याला विरोध केला. ही दुरुस्ती अल्पशा, किरकोळ मतानं संमत झालेली आहे असं मत व्यक्त करण्याला त्यांनी प्रारंभ केला. स. का. पाटील यांनी तर या प्रकाराचं वर्णन 'शुद्ध वेडेपणा' अशा शब्दांत केलं. मोरारजी देसाई यांनी त्यास 'विश्वासघात' म्हणून संबोधलं. त्यानंतर पुढच्या काळांत, तनखे बंद करावेत, बंद करूं नयेत, अशा उलटसुलट चर्चा काँग्रेस-अंतर्गत सुरू झाल्या. कांही केंद्रीय मंत्र्यांची भावना, हा दुरुस्तीसह संमत झालेला ठराव आपल्यावर लादला जात आहे अशी होती; तर तनखे बंद करण्याची मागणी करणारा ठराव हा काँग्रेस-अधिवेशनांत दर्जेदारपणानं आणि लोकशाही प्रथेचा रीतसर अवलंब करूनच संमत व्हायला हवा होता, असं पंतप्रधानांचं मत होतं.

अखेरीस हा प्रश्न, पुन्हा जबलपूर येथील काँग्रेस-अधिवेशनासमोर चर्चेसाठी आला आणि या अधिवेशनानं, मूळ दुरुस्ती-ठरावावर शिक्कामोर्तब केलं. त्यामुळे दहा कलमी कार्यक्रमांतील तो एक आता मान्यकार्यक्रम ठरला.

लोकसभेंत हा प्रश्न चर्चेला निघाला तेव्हा डाव्या विचारसरणीच्या सर्व खासदारांनी आणि कांही काँग्रेसच्या खासदारांनीहि त्यास पाठिंबाच दिला. या प्रश्नाच्या लोकसभेंतील चर्चेमुळे यशवंतरावांना, या संबंधांतला सरकारचा दृष्टिकोन स्पष्ट करण्याला चांगलीच संधि मिळाली आणि त्याचा त्यांनी उत्तम उपयोग करून घेतला. तनखे आणि सवलती बंद करण्याला ज्यांचा विरोध होता त्या जनसंघ,

स्वतंत्र पक्ष आणि संस्थानिक यांचा उल्लेख करून त्यांनी सांगितलं की, हा विरोध म्हणजे प्रतिगामी वृत्तीचा एक ठळक नमुनाच आहे.

या चर्चेच्या वेळीं जनसंघाचे खासदार बलराज मधोक यांनी पंतप्रधान इंदिरा गांधींना दोष चिकटवण्याचा प्रयत्न केला, त्यांनी सांगितलं की, पं. जवाहरलाल नेहरू यांच्या कन्या या पलीकडे, इंदिरा गांधी यांच्याजवळ पंतप्रधानपदाची जागा स्वीकारण्यासाठी अन्य कुठलीहि पात्रता नाही. आणि या परिस्थितींत माजी संस्थानिकांचे वारसा-हक्क, तनखे आणि सवलती मात्र त्या बंद करूं पहात आहेत. पंतप्रधानांनी स्वतःबद्दलची ही टीका शांतपणानं ऐकून घेतली; परंतु गृहमंत्री यशवंतराव चव्हाण मात्र मधोक यांना निरुत्तर करण्यासाठी हिरीरीने पुढे सरसावले. त्यांनी सांगितलं की, इंदिराजींनी या सभागृहाच्या नेत्या आणि देशाच्या नेत्या म्हणून आपलं स्थान हक्कानं संपादन केलेलं आहे. संस्थानिकांप्रमाणे वारसा-हक्कानं त्यानी हें स्थान मिळवलं नसून देशांतल्या जनतेनं त्यांना तें दिलेलं आहे.

राज्यसभेंतल्या चर्चेच्या वेळींहि यशवंतरावांनी परखडपणें विश्लेषण केलं. त्यांनी सांगितलं की, कायदा सर्व माणसांना सारखं मानतो. महागाई-भत्त्यासह महिना १५० रुपये मिळवणारा कारकून आणि करमुक्त असे लक्षावधि रुपये मिळवणारा संस्थानिक हे दोघे सारखेच मानायचे काय ? चर्चेच्या वेळीं कांही खासदारांनी सरकारनं पूर्वी संस्थानिकांना दिलेल्या वचनानं स्मरण करून दिलं होतं. या टीकाकारांचा समाचार घेतांना चव्हाणांनी त्यांना असा सवाल केला की, लोकांना काम देण्याचं, शिक्षण आणि चांगलं रहाणीमान मिळवून देण्याचंहि सरकारनं वचन दिलेलं आहे. त्या वचनाचं काय ? सरकारचा या बाबतींतला निर्णय स्पष्ट आहे आणि बरोबरहि आहे.

या प्रश्नाबाबत संस्थानिकांशीं चर्चा करावी असा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळानं १९६७ च्या सप्टेंबरमध्ये केला. तनखे ताबडतोब बंद करावेत असं सर्वसाधारणतः मंत्रिमंडळाचं मत होतं. त्याचबरोबर दुसरं मत असं होतं की, तनखे पूर्णपणानं एकदम रद्द न करतां तें काम टप्प्याटप्प्यानं करावं. यशवंतरावांच्या मतानं हा प्रश्न निकालांत काढण्याचे दोनच पर्याय होते. एक म्हणजे राष्ट्रपतींनी त्यासंबंधीचा अंमलबजावणी करण्याचा निर्णय करणं किंवा दुसरा, घटनेंत त्या आशयाची दुरुस्ती करणं. घटनेंत दुरुस्ती करून घेण्यास गृहमंत्रालयाचा विरोध असण्याचं कारणच नव्हतं; परंतु त्याचबरोबर ताबडतोब अंमलबजावणी करण्यास यशवंतरावांची तयारी होती. हा प्रश्न लोकसभेपुढे नेण्यापेक्षाहि घटनामान्य असे जे दुसरे मार्ग उपलब्ध होते त्याचा वापर कां केला जाऊं नये, असा त्या बाबतींत त्यांचा सवाल होता.

यशवंतरावांचं हें वैयक्तिक मत असलं तरी ते मंत्रिमंडळाच्या निर्णयाला ते बांधलेले होते. परंतु काँग्रेसमधल्या कांही हितसंबंधियांनी यशवंतरावांच्या या भूमिकेचा विकृत मनोवृत्तीनं अर्थ लावला. काँग्रेस-पक्षांत गोंधळ निर्माण व्हावा या हेतूनंच यशवंतराव हें सर्व करत आहेत असं कांही जण कुजबुजत होते, तर इंदिरा गांधींच्या गटाविरुद्ध यशवंतरावांनी ही भूमिका मुद्दाम स्वीकारली आहे, असा साक्षात्कार कांही जणांना झाला. अर्थात् हा सारा असत्य प्रचार होता. यशवंतरावांची बदनामी करण्यासाठी म्हणूनच केवळ कांही जणांनी असं विकृत स्वरूप दिलं होतं हें उघड आहे.

पंतप्रधानांनी ऑक्टोबर १९६७ मध्ये या प्रश्नांबाबत संस्थानिकांशीं चर्चा व वाटाघाटी करण्याला संमति दिल्यानंतर यशवंतरावांनी संस्थानिकांशीं पुढल्या काळांत एकूण पांच वेळा वाटाघाटी केल्या. उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांनीहि चर्चा केली; परंतु त्यांतून एकमत निर्माण झालं नाही.

संस्थानं विलीन करण्याच्या वेळीं सरदार पटेल यांनी १९४८ मध्ये जी कठोर भूमिका स्वीकारली होती, तीच आता यशवंतराव चव्हाण यांनी तनखे व सवलती रद्द करण्याच्या संदर्भांत स्वीकारली आहे अशी राजे-महाराजे यांची टीका होती. सरदार पटेल हे त्या वेळीं गृहमंत्री होते. आता तें पद यशवंतरावांकडे आलं होतं. राजे-महाराजांच्या त्या वेळच्या आणि आताच्या प्रवृत्तींत मात्र कांही फरक पडलेला नव्हता.

यशवंतरावांना त्या काळांत दुहेरी काम करावं लागलं. एका बाजूला राजे-महाराजे यांची समजूत काढण्याचं काम ते करत होते आणि त्याच वेळीं, मूळ प्रश्नाबाबत मंत्रिमंडळाचा निर्णय पक्का करण्यासाठी, मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर त्यांना निवेदनं, टिप्पणी सादर कराव्या लागत होत्या. मंत्रिमंडळासमोर त्यांनी अशा प्रकारे आपली भूमिका आणि संस्थानिकांची भूमिका सादर केली. अखेरीस हा प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळानं एक आराखडा तयार केला आणि त्याच्या मर्यादेंत राहूनच पुढच्या कामाची मग आखणी झाली.

राजे-महाराजे यांच्याशीं चर्चा सुरू असतांना केंद्रीय मंत्रिमंडळांतहि या प्रश्नावरून तट निर्माण झालेले होते. त्यांतील एका गटानं यशवंतरावांविरुद्ध कुजबूज सुरू केली की, संस्थानिकांना गृहमंत्र्यांशीं चर्चा करण्यांत रस वाटत नाही. त्यांचं ते ऐकणारहि नाहीत. त्यावर या प्रश्नाच्या आधारानं, आपल्याला स्वतःचं असं कांही व्यक्तिमत्त्व तयार करायचं आहे किंवा आणखी कांही साध्य करायचंय् असं नसून, तनखे व सवलती रद्द करणं एवढंच काम माझ्यासमोर आहे, असं यशवंतरावांनी सहकाऱ्यांना

पटवण्याचा प्रयत्न केला. इतकंच नव्हे, तर या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी संस्थानिकांशीं वाटाघाटी करण्याला कोणी तयार असतील त्यांचं मी स्वागतच करीन, असंहि सांगितलं. पंतप्रधान किंवा उपपंतप्रधान यांनी या वाटाघाटी कराव्यात अशी यशवंतरावांची सूचना होती. मोरारजीभाईंना त्यांच्याशीं बोलणीं करायचीं असतील, तर तीं त्यांनी सुरू करावींत असं यशवंतरावांनी सुचवतांच पंतप्रधानांनी मोरारजींची अनुमती विचारली आणि मोरारजींनीहि अनुमती दिली. मोरारजी देसाई यांनीहि त्यानुसार संस्थानिकांशीं चर्चा केली, पण त्यांत त्यांनाहि यश आलं नाही.

तनखे रद्द करून सवलती काढून घ्यायच्या, तर आता घटनेंत तशी दुरुस्ती करण्याशिवाय गत्यंतर उरलं नव्हतं. सरकारनं त्यानुसार एक दुरुस्ती-विधेयकहि तयार केलं. हें विधेयक तयार झालं, परंतु अर्थसंकल्पीय अधिवेशनांतच हें विधेयक लोकसभेसमोर सादर करावं किंवा काय, की तत्पूर्वी एक अखेरचा प्रयत्न म्हणून संस्थानिकांशीं पुन्हा एकदा बोलणीं करावींत असा एक विचार ऐन वेळीं पंतप्रधानांपुढे आला.

यशवंतराव त्यामुळे मोठेच कैचींत सांपडले. विधेयक तयार होतं आणि सादर करण्याला कांही मिनिटांचा अवधि होता. त्या क्षणाला विधेयक सादर झालं नसतं तर त्याचीहि उलटी प्रतिक्रिया निर्माण होण्याची शक्यता होती. विधेयक सादर करायचं की नाही, याचा निर्णय करण्याची वेळ आता निघून गेली होती. अखेर तें विधेयक सादर करण्याची मान्यता पंतप्रधानांनी त्यांना दिली. आणि १८ मे १९७० ला लोकसभेंत तें विधेयक त्यांनी सादर केलं.

योगायोग असा की, गृहमंत्री या नात्यानं यशवंतरावांनी सादर केलेलं घटनादुरुस्तीचं हें विधेयक लोकसभेंत त्या वर्षाच्या सप्टेंबरमध्ये चर्चेला आलं त्या वेळीं यशवंतराव तिथे गृहमंत्री म्हणून उपस्थित नव्हते. दरम्यानच्या काळांत त्यांच्याकडे अर्थमंत्रिपदाचीं सूत्रं आलीं होती. पंतप्रधानांनी गृहखातं स्वतःकडे घेतलेलं असल्यानं, त्यांनाच मग या विधेयकाचं समर्थन करावं लागलं. यशवतरावांवर आता लोकसभेंतल्या त्या चर्चेंत भाग घेण्याची जबाबदारी नव्हती. तरी पण पंतप्रधान इंदिरा गांधी आणि लोकसभा कॉंग्रेस-पक्षाचे प्रमुख के. रघुरामय्या यांनी विनंती केल्यामुळे, चर्चेच्या शेवटीं शेवटीं यशवंतरावांनी विधेयकावर भाष्य केलं. १९६७ पासून त्यांनी या प्रश्नाशीं मुकाबला केला होता. लोकसभेंत त्यांनी या प्रश्नानं निर्माण केलेला इतिहास सांगितला आणि तनखे रद्द करणं व सवलती काढून घेणं ही काळाची गरज आहे, असं ठामपणानं सांगितलं.

या चर्चेतील त्यांचं भाषण संसदीय कामकाजांतील एक नमुनेदार भाषण म्हणून प्रसिद्ध आहे.

लोकसभेनं २ सप्टेंबर १९७० ला या विधेयकावर ३३९ मतांनी शिक्कामोर्तब केलं. विधेयकाला १५४ खासदारांनी विरोध दर्शवला. हेंच विधेयक ४ सप्टेंबरला राज्यसभेसमोर सादर झालं. या विधेयकास स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ यांचा विरोध होता. राज्यसभेंत ५ सप्टेंबरला या विधेयकावर मतदान झालं. विधेयक संमत होण्यासाठी उपस्थित खासदारांपैकी दोनतृतीयांश खासदारांनी, विधेयकाच्या बाजूनं मतदान करण्याची गरज होती. परंतु या मतदानामध्ये विधेयकाच्या बाजूनं १४९ आणि विरोधी ७५ असं मतदान होऊन, विधेयक संमत होण्यासाठी सभागृहांतील ज्या दोनतृतीयांश मतांची गरज होती त्यामध्ये केवळ एकतृतीयांश मतं कमी पडलीं आणि विधेयक नामंजूर ठरलं.

हें दुरुस्त-विधेयक लोकसभेंत सादर करायचं ठरल्यानंतर मध्यंतरींच्या काळांत कॉंग्रेस-अंतर्गत बऱ्याच घडामोडी घडून गेल्या होत्या. विधेयक सादर करण्याचा निर्णय झाला त्या वेळीं कॉंग्रेस-पक्षांत ती ऐतिहासिक दुफळी झालेली नव्हती. परंतु विधेयक चर्चेला आलं त्या काळांत दुफळी झाली होती. राज्यसभेंतील मतदानावर प्रामुख्यानं त्याचा परिणाम घडला. कारण पूर्वीचे कॉंग्रेसच्या बाकावर बसणारे कांही खासदार आता संघटना कॉंग्रेसच्या बाकावर बसूं लागले होते. परिणामीं घटनेंत नमूद केल्याप्रमाणे कॉंग्रेसला उपस्थितांपैकी दोनतृतीयांश मतांचं मताधिक्य संपादन करतां आलं नाही. हितसंबंधी आणि प्रतिगामी गट एका बाजूला आणि पुरोगामी विचाराचे पक्ष दुसऱ्या बाजूला, असं उघड उघड चित्र त्यांतून निर्माण झालं.

राज्यसभेंत विधेयक नामंजूर होतांच राष्ट्रपतींनी घटनेच्या ३६६ (२२) कलमानुसार एक आज्ञा काढून संस्थानिकांची मान्यता काढून घेतल्यानंतर पुढे हें प्रकरण सर्वोच्च न्यायालयांत दाखल झालं आणि तिथेहि १५ डिसेंबर १९७० ला सर्वोच्च न्यायालयाच्या अकरा न्यायमूर्तींसमोर या विधेयकाची चिकित्सा झाल्यानंतर, नऊ विरुद्ध दोन अशा बहुमतानं, न्यायमूर्तींनी राष्ट्रपतींची ती आज्ञा बेकायदा ठरवली आणि त्यामुळे संस्थानिकांना अभय मिळालं. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे सरकार मात्र कोंडींत सापडलं. सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या निकालाची नोंद सरकारला घ्यावीच लागली. पंतप्रधानांनी मग लोकसभेंतच तसं सांगितलं आणि यावर उपाय म्हणून लोकसभेच्या निवडणुका घेऊन, नव्या लोकसभेसमोर पुन्हा हें विधेयक सादर करून संमत करून

घेणं हा उपायहि सांगितला. यशवंतरावांच्या दृष्टीनं त्या वेळीं तरी शर्यतीचा निकाल लागला होता; डाव हुकला होता. तरी पण या प्रश्नाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा शब्द हाच अखेरचा शब्द नसून राष्ट्रांतील जनतेचा शब्द हाच अखेरचा शब्द ठरणार होता.

यशवंतरावांची गृहमंत्रिपदाची कारकीर्द ही अनेक कारणांनी संस्मरणीय ठरली. त्यांच्या हातीं प्रचंड सत्ता होती, परंतु त्या सत्तेचा उपयोग त्यांनी पुरोगामी आर्थिक व सामाजिक उद्दिष्टांची परिपूर्ति करण्यासाठी प्रामुख्यानं केला. देशांत अगदी कठीण, आणीबाणीची परिस्थिति निर्माण झालेली असतांनाहि मूळ उद्दिष्टांवरील त्यांचं लक्ष कधीच विचलित झालं नाही. गृहमंत्री म्हणून त्यांची तीन वर्षे आठ महिने कारकीर्द झाली. परंतु या अल्प काळांतहि त्यांच्यासमोर अनेक नवीं आव्हानं उभीं राहिलीं. त्या काळांत सरकारला आर्थिक, सामाजिक, राजकीय असे जे धक्के बसले ते सर्व गृहमंत्री या नात्यानं यशवंतरावांनी पचवले. सरकारचा त्यांतून त्यांनी बचाव तर केलाच, शिवाय देशांतल्या लोकशाहीचंहि प्रामुख्यानं संरक्षण केलं. गृहमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द त्याच दृष्टीनं संस्मरणीय ठरली.

# २३

यशवंतरावांनी केंद्रीय मंत्रिमंडळांतील जबाबदार मंत्री म्हणून १९६२ पासून आपल्या कारकीर्दीला प्रारंभ केल्यापासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा अनेकानेक समस्यांशीं त्यांना सामना करावा लागला. त्याचबरोबर काँग्रेस-पक्ष शाबूत राखून स्वातंत्र्योत्तर काळांतील देशासमोरच्या आव्हानांना हा पक्ष समर्थपणें सामोरा जाईल आणि काँग्रेसनं स्वीकारलेलं लोकशाही समाजवादाचं धोरण प्रत्यक्षांत अवतरण्यासाठी पक्षानं गतिमान राहून वास्तवतेचा अंगीकार करावा यासाठी त्यांनी आपली मुत्सद्देगिरी अनेकदा पणाला लावलेली आढळते.

काँग्रेस-पक्षाचं धोरण निश्चित करण्याचं काम पक्षाची कार्यकारिणी करत असते. काँग्रेस-कार्यकारिणी ही पक्षाची सर्वोच्च समिति. १९५८ सालीं यशवंतराव कार्यकारिणीचे सदस्य म्हणून निवडले गेले. कार्यकारिणीचे ते सदस्य होते तरी १९६२ मध्य दिल्लींत संरक्षणमंत्रिपदावर रुजूं झाल्यानंतर त्यांनी स्वतःला दिल्लींतल्या गटबाजीच्या राजकारणापासून अलिप्तच ठेवलं. गृहमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर मात्र ते राजकीय वादविवादाच्या भोवऱ्यांत सापडले; आणि पुढच्या दहा वर्षांच्या काळांत, काँग्रेसचं नवं धोरण निश्चित करण्याच्या कामांतच केवळ नव्हे, तर पक्षांतर्गत मतभेद मिटविण्याच्या संदभातहि त्यांना अतिशय महत्त्वाची हालचाल करावी लागली – भूमिका स्वीकारावी लागली.

या सर्व काळामध्ये पक्षांतर्गत निर्माण झालेले मुख्य मतभेद हे अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष आणि पंतप्रधान यांच्यांतील संबंधाचे होते; तसेच पक्षाचा संघटनात्मक

विभाग आणि पक्षाचा संसदीय विभाग यांच्यामधील होते. १९६९ मध्ये अखिल भारतीय कॉंग्रेसमध्ये घडून आलेली दुफळी म्हणजे या दोन बाजूंमधील एकवाक्यतेचा अभाव किंवा वैचारिक विसंगति याचाच परिणाम होय. त्याचबरोबर कॉंग्रेस-अंतर्गत रूढिप्रिय गट आणि पुरोगामी विचाराचा गट या दोन्हीमध्ये ध्येयवादासंबंधांतील ठिसूळपणा सातत्यानं वाढत राहिला होता.

पक्षांतर्गत मतभेदाचं बीजारोपण हें तसं जुनं म्हणजे १९४६ मध्ये पहिलं कॉंग्रेस-सरकार स्थापन केलं त्या वेळींच झालेलं होतं. भारत स्वतंत्र झाला त्या वेळीं, १९४७ मध्ये पं. नेहरू हे कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. पंतप्रधानपद त्यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. सरकार-दरबारांतील जागेचा स्वीकार करत असतांना पक्षाच्या नेत्यानं पक्षाच्या प्रमुख पदाच्या जबाबदारींतून मुक्त होण्याच्या परंपरेनुसारच त्यांनी हा निर्णय केला. त्यांची कॉंग्रेस-अध्यक्षपदाची जबाबदारी मग आचार्य कृपलानी यांनी स्वीकारली.

पंतप्रधानपदावर पं. नेहरू आणि कॉंग्रेस-अध्यक्षपदीं आचार्य कृपलानी अशी स्थिति निर्माण होतांच, कॉंग्रेस-अंतर्गत सत्तास्पर्धेनं मूळ धरलं. हे दोन्ही नेते ज्येष्ठ! कॉंग्रेसची वाटचाल कशी असावी याबाबत पं. नेहरूंचे स्वतःचे कांही विचार होते. निश्चित स्वरूपाचं ध्येय होतं. त्यामुळे संघटनात्मक गोष्टींवरहि त्यांचं बारकाईनं लक्ष असे; प्रसंगीं ते त्यांत हस्तक्षेपहि करत; परंतु त्यामुळे आचार्य कृपलानी दुखावले गेले. कारण संघटनेंतील सत्तेच्या प्रमुखस्थानीं ते होते. अखेर या दोघांमधील मतभेद विकोपाला गेल्यानं, कृपलानी यांनी अध्यक्षपदाचा त्याग केला. नंतर १९५१ मध्ये पुरुषोत्तमदास टंडन कॉंग्रेसचे अध्यक्ष झाल्यानंतरहि हे मतभेद कमी झाले नाहीत. उलट ते वाढतच राहिले. पंतप्रधान आणि त्यांचं मंत्रिमंडळ हे पक्ष-संघटनेला जबाबदार असून पक्षानं वेळोवेळीं ठरवून दिलेल्या धोरणानुसार, त्या चौकटींत राहूनच काम केलं पाहिजे आणि त्या धोरणाची अंमलबजावणी केली पाहिजे, असा टंडन यांचा आग्रह होता. हे वाद घडत राहिले आणि त्यांतूनच एक दिवस पं. नेहरूंनी मोठ्या नाट्यपूर्ण रीतीनं कॉंग्रेस-कार्यकारिणीचा आणि कॉंग्रेस निवडणूक-समितीचा राजीनामा दिला. दरम्यान संसदीय कॉंग्रेस-पक्षाच्या २७९ पैकी २३४ सदस्यांनी पं. नेहरूंच्या नेतृत्वावर आपला विश्वास व्यक्त केला. त्यासरशी टंडन यांनी राजीनामा दिला; आणि पक्षाचं अध्यक्षपद पुन्हा पं. नेहरूंनी आपल्याकडे घेतलं. पक्ष आणि सरकार यांचे निर्विवाद नेते असं स्थान पं. नेहरूंना मिळतांच, पक्षाची संघटना आणि सरकार यांच्यांतील मतभेदांना अत्यल्प वाव उरला. पुढच्या काळांत तर कॉंग्रेस-अध्यक्षांची निवड पं. नेहरूंच्या मान्यतेनंच होत राहिली. त्यांची शारीरिक प्रकृति चीन युद्धानंतर मात्र ढासळली.

पं. नेहरूंची प्रकृति ढासळल्यामुळे कॉंग्रेसचे नेते अस्वस्थ बनले होतेच, शिवाय १९६३ च्या मेमध्ये अमरोहा, राजकोट आणि फरुकाबाद येथील लोकसभेच्या

पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेस-उमेदवारांचा पराभव करून आचार्य कृपलानी, डॉ. राममनोहर लोहिया आणि एम. आर. मसानी हे नेहरू-सरकारचे कट्टर टीकाकार यशस्वी झाल्यामुळे तर त्या नेत्यांना जबरदस्त धक्का बसला. काँग्रेस-प्रतिमा डागळली असल्याचंच हें लक्षण होतं. लोकहि त्यामुळे अस्वस्थ बनले. या बदलत्या परिस्थितीचा विचार करून, लोकांना धीर देण्यासाठी कांही तरी मार्ग शोधून काढण्याची गरज भासूं लागली. दरम्यान अ. भा. काँग्रेसच्या ८० सदस्यांनी, काँग्रेसचं खास अधिवेशन घेण्याची मागणी कार्यकारी मंडळाकडे केली; आणि त्यानुसार त्या वर्षाच्या ९ व १० ऑगस्टला अ. भा. काँग्रेसचं खास अधिवेशन भरवण्यांत येऊन, पोटनिवडणुकींतील पराभवाची मीमांसा करण्यांत आली. सभासदांच्या मागणीवरून भरवण्यांत आलेलं काँग्रेसचं हें पहिलंच अधिवेशन होय.

याच अधिवेशनांत सुप्रसिद्ध 'कामराज-प्लॅन' जन्माला आला. कामराज हे त्या वेळीं मद्रासचे मुख्य मंत्री होते. सरकारमध्ये काँग्रेस-पक्षाचे जे आघाडीचे नेते होते त्यांनी मंत्रिपदाचा त्याग करून काँग्रेस-संघटनेच्या कामाला वाहून घ्यावं अशी ही योजना होती. अ. भा. काँग्रेसनं नंतर पं. नेहरूंनीहि कामराज-योजनेला मान्यता दिली. या योजनेनुसार, अधिवेशनानंतर पुढच्या कांही आठवड्यांतच मोरारजी देसाई, लालबहादूर शास्त्री, जगजीवनराम आणि स. का. पाटील या केंद्रीय मंत्र्यांनी, तसेच स्वतः कामराज, ओरिसाचे मुख्य मंत्री बिजू पटनाईक आणि जम्मू-काश्मीरचे मुख्य मंत्री बक्षी गुलाम महंमद यांनी राजीनामे दिले.

काँग्रेस-पक्षांतर्गत सुरू असलेल्या या उलथापालथीकडे विरोधकांचं बारकाईनं लक्ष होतं. सत्ताधारी पक्ष आता समर्थ राहिलेला नाही असं पाहून, मग त्यांनी १६ ऑगस्ट १९६३ ला नेहरू सरकारविरुद्ध अविश्वासदर्शक ठराव लोकसभेत आणला. स्वातंत्र्योत्तर १६ वर्षांच्या काळांत हें प्रथमच घडलं होतं. हा ठराव नापास झाला हें खरं, परंतु काँग्रेस-पक्ष हा आता अभंग राहिलेला नाही आणि पं. नेहरू हेहि राष्ट्राचे सर्वेसर्वा उरलेले नाहीत, असं या ठरावाद्वारे विरोधकांनी दाखवून दिलं.

कामराज-योजनेच्या आधारानं ज्यांना मंत्रिमंडळांतून दूर करण्यांत आलेलं होतं त्यांच्यापैकी स. का. पाटील हे तर कामराज-योजनेला विरोध करण्यासाठी पुढे सरसावले. मोरारजी देसाई हेहि दुखावले गेले होते. कामराज-योजनेचा बनाव हा केवळ आपल्याला दूर करण्यासांठीच झालेला नसून इंदिरा गांधी यांना पंतप्रधान बनवण्याचा मार्ग निष्कंटक करण्यासाठी तयार झालेली ही योजना आहे, अशी त्यांची टीका होती. कामराज-योजनेमुळे काँग्रेसची संघटनात्मक बाजू भक्कम बनली, त्याचबरोबर काँग्रेस-अध्यक्षांचं महत्त्वहि वाढलं. मोरारजी देसाई आणि लालबहादूर शास्त्री हे दोघेहि आता, मंत्रिमंडळांतून बाहेर आलेले असल्यामुळे स्वाभाविकच, काँग्रेस-अध्यक्ष म्हणून या दोघांच्या नांवांची चर्चा सुरू झाली.

याच वर्षी म्हणजे १९६३ च्या ऑक्टोबरमध्ये 'सिंडिकेट' या नांवानं ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेस-अंतर्गत गटाचा जन्म झाला. मोरारजी देसाई हे स्वभावानं कडक, कर्मठ आणि रूढीला चिकटून बसणारे असल्यामुळे, त्यांना पक्षाचं अध्यक्षपद बहाल करण्याबाबत काँग्रेसच्या नेत्यांमध्ये दुमत होतं. कामराज, एस्. निजलिंगप्पा, एन्. संजीव रेड्डी, अतुल्य घोष आणि म्हैसूरचे श्रीनिवास मलिहा यांची मग ऑक्टोबरमध्ये तिरुपतीला बैठक घेऊन, भावी काँग्रेस-अध्यक्षाबद्दल खल केला. स. का. पाटील हे तिरुपतीच्या बैठकीला गेले नाहीत, परंतु त्यांचा या पांच जणांना पाठिंबा होता. या बैठकींतून जें अनौपचारिक गट-नेतृत्व तयार झालं त्यालाच पुढच्या काळांत सिंडिकेट म्हणून संबोधलं जाऊं लागलं. या पांच जणांनी काँग्रेस-अध्यक्षपदासाठी लालबहादूर शास्त्री यांचं नांव निश्चित केलं आणि या ना त्या कारणासाठी, शास्त्रीजींनी अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार दर्शवला, तर मग त्या जागेवर कामराज यांची निवड करण्याचं निश्चित करण्यांत आलं. शास्त्रीजींचं नेतृत्व हें पक्षाच्या दृष्टीनं स्थिर ठरणारं नेतृत्व होतं आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्येहि गटबाजीला वाव उरणार नव्हता. त्याचसाठी अध्यक्षपदासाठी शास्त्रीजींचा पुरस्कार करण्यांत आला होता. परंतु अध्यक्षपदासाठी मोरारजींशीं सामना करण्याचा प्रसंग जाणून शास्त्रीजींनी स्वतःच तें पद स्वीकारण्याला नकार दर्शवला. त्यामुळे २० नोव्हेंबर १९६३ ला सिंडिकेटच्या पाठिंब्यानं आणि पं. नेहरूंच्या आशीर्वादानं कामराज हे अध्यक्षपदावर आरूढ झाले.

कामराज यांच्या अध्यक्षतेखाली पुढच्या कांही आठवड्यांत जयपूरला काँग्रेस-अधिवेशन झालं. या अधिवेशनांत सिंडिकेटवाल्यांनी एक ठराव संमत करून घेतला. अधिवेशनानं संमत केलेला ठराव दिसायला तसा निरुपद्रवी होता. 'पंतप्रधानांनी काँग्रेस-अध्यक्षांशीं नियमितपणें सल्लामसलत करावी' एवढंच त्या ठरावाद्वारे पंतप्रधानांना सुचवण्यांत आलं होतं; परंतु त्याचा अर्थ, पंतप्रधानांच्या हातीं केंद्रित झालेल्या सत्तेचं, वेगळ्या पद्धतीनं वांटप केलं गेलं आहे आणि पं. नेहरू हे काँग्रेसचे एकमेव नेते आता उरलेले नाहीत हें जगाला दाखवण्याचाच तो प्रकार होता.

पं. नेहरूहि आता थकले होते. भुवनेश्वर काँग्रेसनंतर पंडितजींना अर्धांगवायूचा झटका येऊन त्यांच्या शरीराची डावी बाजू निकामी झाली आणि पुढे तर २७ मे रोजीं त्यांचं देहावसानच झालं. पं. नेहरूंच्या निधनानंतर एका तासाच्या अवधींतच, त्यांच्या वारसाचीं खलबतं सुरू झालीं आणि कामराज व त्यांचा सिंडिकेट-गट यांनी मिळून मुत्सद्देगिरीनं पावलं टाकून आणि यशवंतरावांचं संपूर्ण साहाय्य घेऊन मोरारजींना बाजूला टाकलं आणि लालबहादूर शास्त्री यांना पंतप्रधानपदीं आरूढ केलं. काँग्रेस-मधील के. डी. माळवीय यांच्या डाव्या विचारसरणीच्या गटानं, प्रथम मोरारजींना पाठिंबा देण्याचा उद्योग केला, पण नंतर हा गट इंदिरा गांधींच्या बाजूचा झाला. इंदिरा गांधी यांना सिंडिकेटचा पाठिंबा नव्हता, तसा तो गुलझारीलाल नंदा यांनाहि

नव्हता. बिजू पटनाईक, डी. संजीवय्या, मोहनलाल सुखाडिया यांनी मोरारजींना पाठिंबा दिला, तर बाबू जगजीवनराम हे स्वतःच पंतप्रधानपद हस्तगत करण्यासाठी हालचाली करत राहिले होते.

परंतु कामराज यांनी वारस निश्चित करण्याचं काम नाट्यपूर्ण रीतीनं पार पाडून, मोरारजींना खड्यासारखं वगळऊं आणि शास्त्रीजींचा मार्ग निर्वेध बनवला; संसदीय काँग्रेस-पक्षाच्या बैठकींत, नेतेपदासाठीं शास्त्रीजींचं नांव सुचवण्याची मोरारजींची स्वतःची इच्छा होती; परंतु मोरारजींना तो मान मिळाल्याचं समाधानहि लाभूं देण्यांत आलं नाही. हंगामी पंतप्रधान म्हणून गुलझारीलाल नंदा हे काम पहात होते तेव्हा शास्त्रीजींच्या नांवाची सूचना त्यांनीच करावी असा बूट निघाला आणि मोरारजींना बाजूला ढकलण्यांत आलं. २ जून १९६४ ला संसदीय काँग्रेस-पक्षाची कामराज यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन अखेर शास्त्रीजींची एकमतानं नेतेपदीं निवड झाली.

शास्त्रीजींच्या निधनानंतर इंदिरा गांधी यांच्याकडे पंतप्रधानपद आलं आणि परिस्थितींत झपाट्यानं बदल होत गेला. १९६७ च्या निवडणुकींत सिंडिकेटची सद्दी संपुष्टांत आली. कामराज, अतुल्य घोष, स. का. पाटील या सिंडिकेटमधील मुखंडांचा या निवडणुकींत पराभव झाला. हें घडतांच सिंडिकेटची शक्ति छिन्नविछिन्न झाली.

सिंडिकेटचं महत्त्व कमी होतांच, काँग्रेस-अध्यक्षांचं महत्त्वहि कमी झालं. पक्ष आणि सरकार या दोन्ही ठिकाणची सत्ता इंदिरा गांधी यांच्या हातीं केंद्रित होत असल्याचं लक्षांत येतांच कामराज अस्वस्थ बनले. त्यांना हें घडूं द्यायचं नव्हतं म्हणून १९६७ मध्येहि काँग्रेसचं अध्यक्षपद स्वतःच्या हातांत ठेवण्यासाठीच त्यांनी डावपेंच सुरू केले. इंदिरा गांधी यांना हें मान्य नव्हतं. त्यामुळे त्यांनी एस्. निजलिंगप्पा यांना अध्यक्षपदासाठी पाठिंबा देण्याचं ठरवलं. त्याप्रमाणे त्यांची अध्यक्षपदीं निवडहि झाली, परंतु पुढे लवकरच या दोघांमध्ये वैचारिक बेबनाव निर्माण झाला.

निजलिंगप्पा यांनी अशी भूमिका स्वीकारली की, पंतप्रधान आणि त्यांचे सहकारी हे काँग्रेस-कार्यकारिणीला जबाबदार असून, कार्यकारिणीला उत्तर देण्यासाठी ते बांधलेले आहेत. उलट इंदिरा गांधी यांची भूमिका अशी की, प्राप्त परिस्थितींत काँग्रेस-संघटनेला, लोकांशीं संपर्क तर ठेवावाच लागतोच, शिवाय म. गांधींच्या शिकवणुकीप्रमाणे पक्षानं विधायक कामाचा अंगीकार करण्याची गरज असून युवक-संघटना, महिला-संघटना अशा वेगवेगळ्या संघटनांच्या द्वारा लोकसेवेचं काम करावं. सरकार आणि संघटना यांच्यांत मतभेद असण्याचं कांही कारण नाही.

काँग्रेस-पक्षांत निर्माण झालेल्या मतभेदांना जुलै १९६९ च्या बंगलोरमधील काँग्रेस-अधिवेशनानंतर चांगलीच धार आली आणि परिणामीं त्याच वर्षीच्या नोव्हेंबरमध्ये काँग्रेस सरळ सरळ दोन गटांत दुभंगली. या अधिवेशनांत निजलिंगप्पा यांचा गट आणि

सिंडिकेट अल्प मतांत गेले आणि इंदिरा गांधी यांनी अधिवेशनांत आणि संसदीय कॉंग्रेस-पक्षांतहि बहुमत प्रस्थापित केलं.

कॉंग्रेस-दुभंगल्यानंतर नव्या कॉंग्रेस-अध्यक्षाच्या निवडीचा प्रश्न निर्माण झाला त्या वेळीं फक्रुद्दीन अलि अहंमद यांनी इंदिरा गांधींनी अध्यक्षपद स्वतःकडे घ्यावं असा आग्रह धरला. जगजीवनराम यांनीहि त्याला दुजोरा दिला; परंतु इंदिरा गांधी यांनी आपल्या मनाचा थांगपत्ता लागू दिला नाही. त्यांनी त्या वेळीं यशवंतरावांचा सल्ला घेऊन त्यांचं मत काढून घेण्याचा प्रयत्न केला. पंतप्रधानपद आणि कॉंग्रेस-अध्यक्षपद या दोन्ही जागा एकाच व्यक्तीच्या हातीं राहून संघटना आणि सरकार या दोन्ही ठिकाणचे प्रश्न एकानंच हाताळणं योग्य ठरणार नाही, असं यशवंतरावांचं मत होतं. त्यांनी त्याप्रमाणे इंदिरा गांधी यांना सांगितलंहि. परिणामीं जगजीवनराम यांनी कॉंग्रेसचं अध्यक्षपद स्वीकारावं यासाठी त्यांना तयार करण्यांत आलं आणि मग जगजीवनराम नव्या कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले. त्याच वेळीं त्यांचं मंत्रिपदहि कायम ठेवण्यांत आलं.

निजलिंगप्पा बाजूला होऊन जगजीवनराम कॉंग्रेस-अध्यक्ष झाले असले, तरी पंतप्रधान आणि कॉंग्रेस-अध्यक्ष यांच्यांतील श्रेष्ठ-कनिष्ठतेचा पं. नेहरूंच्या काळापासून सुरू झालेला वाद संपलेला नव्हता. परंतु यशवंतराव हे या वादापासून दूर राहिले. जगजीवनराम आणि संघटना कॉंग्रेसचे नेते कामराज यांची ऑगस्ट १९७० मध्ये एक बैठक झाल्यापासून इंदिरा गांधी सावध बनल्या होत्या.

मार्च १९७१ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळीं जगजीवनराम हेच कॉंग्रेसचे अध्यक्ष होते; परंतु निवडणूक-प्रचाराचीं सर्व सूत्रं, इतकंच नव्हे तर, अखिल भारतीय कॉंग्रेसच्या कार्यालयाचीं सर्व सूत्रं इंदिरा गांधींनी आपल्याकडे घेतलीं. उमाशंकर दीक्षित हे पंतप्रधानांच्या खास विश्वासांतले असल्यानं, कार्यालयीन कारभारांत त्यांचं वर्चस्व राहिलं. त्या निवडणुकीच्या वेळीं बिहारमधील उमेदवार निश्चित करण्यावरून पंतप्रधान आणि अध्यक्ष यांच्यांत कांही बेबनाव निर्माण झाला.

अखेर निवडणुका संपल्यानंतर जगजीवनराम यांच्यापुढे वेगळाच पेंच निर्माण झाला. जगजीवनराम यांना अध्यक्ष म्हणून काम करायचं असेल, तर त्यांना मंत्रिमंडळांत रहातां येणार नाही, असा हा पेंच होता. शेवटीं जगजीवनराम यांनी अध्यक्षपदाचा त्याग तर केलाच, शिवाय मंत्रिमंडळापासूनहि दूर रहाण्याची तयारी दर्शवली. जगजीवनराम अध्यक्षपदावरून खाली उतरले आणि इंदिरा गांधींच्या विश्वासांतले डी. संजीवय्या हे अध्यक्षस्थानीं विराजमान झाले.

पंतप्रधान आणि कॉंग्रेस-अध्यक्ष यांच्यांतील सत्तेबाबतचा श्रेष्ठ-कनिष्ठतेचा वाद, पक्षाच्या ध्येय-धोरणाविषयीचे तीव्र मतभेद यांतूनच कॉंग्रेस अखेर दुभंगली. बंगलोर

अधिवेशनाच्या वेळीं घडलेल्या घटना या नव्यानं घडल्या असल्या तरी या दुफळीची मुळे १९५२–६३ च्या परिस्थितींत दडलेलीं आहेत. कॉंग्रेसचीं आर्थिक आणि राजकीय धोरणं कोणतीं असावींत यांतूनच वेळोवेळीं खरा वाद झालेला आढळतो.

आवडी येथील कॉंग्रेस-अधिवेशनांत कॉंग्रेसनं १९५५ मध्ये समाजवादी समाज-रचनेचं ध्येय-धोरण मान्य केल्यानंतर भुवनेश्वरच्या १९६४ मधील अधिवेशनांत आणि १९६७ च्या दिल्लींमधील अधिवेशनांत चर्चा होऊन दहा कलमी आर्थिक कार्यक्रम तयार होण्यापर्यंत मजल गेली असली तरी, या साऱ्या धोरणांची अंमलबजावणी घडण्याच्या दृष्टीनं प्रत्यक्षांत कांही प्रगति साध्य झालेली नव्हती. किंबहुना दहा कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू होतांच पक्षांतर्गत मतभेदांचं वातावरण बदललं गेलं. समाजवादाच्या केवळ चर्चा होत राहिल्या.

अखेर १९६९ च्या फरिदाबाद-अधिवेशनांत, राजकीय ठरावावरील भाषणांत यशवंतरावांनी या प्रश्नाला तोंड फोडलं. या अधिवेशनांत आर्थिक कार्यक्रम, संघटनात्मक प्रश्न आणि राजकीय समस्या या तीन विषयांवर गटवार चर्चा करून, या चर्चेतून तयार होणारे निष्कर्ष, अधिवेशनासमोर मांडण्यासाठी तीन पॅनल्स तयार करण्यांत आलीं होतीं. राजकीय समस्येसंबंधी चर्चा करणाऱ्या पॅनलचे चेअरमन यशवंतराव चव्हाण होते. आश्चर्य असं की, या तीन पॅनल्सपैकी फक्त यशवंतरावांनीच आपला अहवाल अधिवेशनासमोर सादर केला. आर्थिक प्रश्नाची चर्चा करणारं जें पॅनल होतं त्याचे चेअरमन मोरारजी देसाई हे होते. त्या पॅनलमधील सदस्यांनी चर्चेच्या वेळीं, मोरारजींवरच कठोर टीका केली. परिणामीं त्या पॅनलचा अहवाल तयार होऊं शकला नाही आणि तिसऱ्या पॅनलचं काय घडलं हें कधीच उजेडांत आलं नाही. अधिवेशनांत फक्त राजकीय परिस्थितीसंबंधीचा ठरावच संमत करण्यांत आला.

यशवंतरावांनी फरिदाबाद अधिवेशनांत या ठरावावर भाषण करतांना जें प्रदीर्घ भाष्य केलं त्यामध्ये देशांत त्या अगोदरच्या दोन-तीन वर्षांत घडलेल्या विविध घटनांचं सविस्तर विश्लेषण केलं. १९६७ च्या निवडणुका, १९६९ मधील मुदतपूर्व निवडणुका यांचा अन्वयार्थ त्यांनी सांगितला आणि मुदतपूर्व निवडणुकांचं पृथक्करण करतांना त्याच्या अनुषंगानं राष्ट्राच्या राजकीय विचारसरणींत वाढूं लागलेल्या नव्या प्रवाहांचाहि समाचार घेतला. त्या काळांत ध्रुवीकरणाची भाषा बोलली जात होती. आपण उजवा गट बनवण्याचा प्रयत्न करूं या, असं कोणी सांगत होतं, तर आपण जनसंघाला अधिक जवळचे आहोंत असं कुणी भासवत होते. डाव्या पक्षाशीं सख्य साधण्याचा प्रयत्न करूं या, असा आग्रह धरणारेहि कांही होते. त्याच्याहि पुढे जाऊन कॉंग्रेसच्या विघटनेची भाकितं करणारे कांही होते. या भविष्यवादी लोकांचं म्हणणं होतं की, ७२ सालच्या निवडणुकींत केंद्रांतहि कॉंग्रेस मताधिक्य गमावण्याची शक्यता असल्यानं आतापासूनच आपण संयुक्त सरकारचा विचार करायला प्रारंभ करायला हवा.

यशवंतरावांनी देशामधील हा राजकीय आराखडा अधिवेशनासमोर जसांच्या तसा उभा केला आणि प्रत्येक पक्षाच्या ध्येय-धोरणाचं सुस्पष्ट चित्र मांडून ध्रुवीकरणाची, संयुक्त आघाडीची ही बडबड अगदीच अवास्तव, असमंजसपणाची आहे, असं आपलं मत स्पष्टपणें सांगितलं.

फरिदाबाद काँग्रेस-अधिवेशनांत यशवंतरावांनी राजकीय परिस्थितीचं केलेलं विश्लेषण हें अभ्यासपूर्ण आणि नेमकं वर्मावर बोट ठेवणारं होतं. राजकीय परिस्थितीचं विवेचन केल्यानंतर त्या ठरावांत त्यांनी असं नमूद केलं होतं की, "आपण फुटीरपणाच्या राजकारणाचा विचार करतां कामा नये, निंदेच्या दृष्टीनंहि राजकारणाचा विचार करूं नये, वैयक्तिक टीका करून शीलावर शितोडे उडवण्याचंहि धोरण ठेवूं नये. सुनिश्चित अभिवचनं देऊन त्यासाठी जनसेवेला जीवन वाहून घेण्याच्या राजकारणाच्याच दृष्टीनं विचार करण्याचा प्रयत्न आपण करूं या. आपण हें करूं, तर आपला देश व लोकशाही समाजवाद स्वतःचं संरक्षण स्वतःच करूं शकतील याविषयी मला मुळीच शंका नाही."

या अधिवेशनांत काँग्रेस-अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी आपल्या भाषणांत जे विचार व्यक्त केले त्यामुळे मात्र काँग्रेसमधील आघाडीच्या सर्वच नेत्यांना कमालीचा धक्का बसला. काँग्रेसच्या मूलभूत ध्येय-धोरणाच्या विचारालाच त्यांनी सुरुंग लावला; आणि त्यामुळे काँग्रेस-पक्षातील ज्येष्ठ नेते, किंबहुना स्वतः काँग्रेस-अध्यक्ष हेच ध्येय-धोरणाबाबत घट्ट नाहीत, त्यांच्यांतच ठिसूळपणा आहे, अशी या पक्षाची प्रतिमा लोकांसमोर निर्माण झाली.

निजलिंगप्पा यांचा हा पवित्रा म्हणजे काँग्रेस-अंतर्गत दोन परस्पर-विरोधी विचारांचा, ध्येय-धोरणाचा आग्रह धरणारे गट अस्तित्वांत आहेत याचा पुरावाच होता. पक्षांतर्गत दोन विचारांचे लोक असले तरी, काँग्रेसमध्ये मात्र त्यांनी शक्यतों एकत्रित राहून, पक्षांत राहून कार्य करावं, अशी यशवंतरावांची भूमिका होती – तसा प्रयत्न होता.

निजलिंगप्पा यांना पाठिंबा देणारा समविचारांचा एक गट काँग्रेसमध्ये त्या वेळीं अस्तित्वांत होता. यशवंतरावांचा या विचारसरणीला विरोध होता. देशाच्या जीवनांत परिवर्तन घडवून आणण्याची जबाबदारी इतिहासानं काँग्रेस-पक्षाकडे सोपवली असून तें परिवर्तन घडवून आणण्यासाठी काँग्रेस-पक्ष हें प्रमुख साधन आहे, असा यशवंतरावांचा दावा होता. या पक्षाचं धोरण कांहीसं डाव्या विचारसरणीकडे झुकणारं असावं आणि भावी काळांतहि तें तसं राहिलं पाहिजे; किंबहुना पुरोगामी राष्ट्रीय पक्षानं प्राप्त परिस्थितींत या धोरणाचा अवलंब करणं अपरिहार्य आहे, असं त्यांचं मत होतं. या संदर्भात निजलिंगप्पा यांनी अधिवेशनांत व्यक्त केलेली विचारसरणी त्यांना मान्य करणं शक्यच नव्हतं.

धोरणात्मकदृष्ट्या त्यांचं असं मत असलं तरीहि काँग्रेस-पक्षांतील सर्वांनी एकत्रं राहून एकदिलानं देशाचं काम केल्यास पक्षामध्ये दुफळी निर्माण होण्याचं टळेल, अशी त्यांची भावना होती. काँग्रेस-पक्षांत नजीकच्या काळांत दुफळी निर्माण होणार आहे याची कल्पनाहि त्यांना नव्हती. पंतप्रधान इंदिरा गांधींचंहि तेंच निदान होतं. स्वतः इंदिरा गांधी यांनीच निजलिंगप्पा यांच्याकडे पक्षाच्या अध्यक्षपदाचीं सूत्रं सोपवलीं होतीं आणि निजलिंगप्पा यांच्या पाठिराख्यांना काँग्रेस-कार्यकारिणींतहि समाविष्ट करून घेतलं होतं. इंदिरा गांधी या स्वतःहि बारा वर्षांहून अधिक काळ, कार्यकारिणीच्या सदस्या होत्या आणि त्यांना निजलिंगप्पा यांची विचारसरणी माहिती होती; परंतु फरिदाबादच्या अधिवेशनामध्ये इतक्या टोकाला जाऊन पक्षाच्या ध्येय-धोरणासंबंधांत, निजलिंगप्पा वक्तव्य करणार आहेत याचा तर्कहि त्या करूं शकल्या नव्हत्या. निजलिंगप्पा यांना पाठिंबा देण्यांत इंदिरा गांधी यांचा हेतु काँग्रेसमधील विविध विचारसरणीच्या नेत्यांना शक्य तर एकत्रित राखावं हाच होता. असं करणं आवश्यक आहे असं यशवंतरावांचंहि मत होतं. त्यांचं म्हणणं पक्षाच्या ध्येयाच्या संदर्भात मतभेद असणं ही एक बाजू झाली; परंतु काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाच्या, निरनिराळ्या राज्यांतील मान्य नेत्यांचा पाठिंबा, पक्षाचा कार्यक्रम आणि धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यकच ठरतो. कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या मार्गाबद्दल फार तर मतभेद असूं शकतो. परंतु मूळ भूमिकेला सर्वांचा पाठिंबा असावाच लागतो. पक्षामध्ये परस्पर-विरोधी भूमिका स्वीकारणारे कांहीजण होते, परंतु ते एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी आहेत अशा दृष्टीनं यशवंतराव या गटांकडे पहात नव्हते.

पक्षांत जे दोन गट निर्माण झालेले होते त्यांतील एक गट काँग्रेसला उजव्या विचारसरणीकडे खेचण्याचा प्रयत्न करत होता आणि दुसऱ्या गटाचा प्रयत्न काँग्रेसला डाव्या विचारसरणीला बांधण्याचा होता. यशवंतरावांचे या दोन्ही गटांशीं चांगले संबंध होते आणि त्यामुळे या दोघांनाहि एकत्र करण्यासाठी ते पराकाष्ठेचा प्रयत्न करत होते. काँग्रेसच्या ध्येयाबद्दल यशवंतरावांचं मन स्वच्छ होतं. पक्षानं ज्या नव्या पुरोगामी धोरणाचा स्वीकार केलेला होता त्याकडे संशयानं पहाणारा एक गट होता. पुरोगामी धोरण मान्य असूनहि, त्याच्या अंमलबजावणीसाठी 'आस्ते कदम' वाटचाल करावी असं या गटाचं मत होतं. यशवंतरावांना ही 'आस्ते कदम' वाटचाल मंजूर नव्हती.

या दोन्ही गटांत मध्यस्थी करून त्यांना सांधण्याचा आणि काँग्रेस अभंग राखण्याचा प्रयत्न त्या काळांत यशवंतरावांनी अहमहमिकेनं केला. या दोन्ही गटांशीं त्यासाठी त्यांना सख्य ठेवून काम करावं लागलं. फरिदाबाद, बंगलोर इथल्या अधिवेशनांत आणि नंतर १९६९च्या ऑगस्टमध्ये जो एकत्रीकरणाचा ठराव चर्चेसाठी आणला गेला त्या वेळींहि यशवंतरावांनी केलेली धांवपळ ही काँग्रेसमधील एकोपा टिकवण्यासाठीच होती. काँग्रेसच्या कांही नेत्यांनी, पंतप्रधानांची पक्षांतून हकालपट्टी करण्याचा घाट घातला. त्या

वेळीं यशवंतराव आणि त्यांच्यासारख्या समान विचाराच्या नेत्यांनी ही कृति रोखण्याचा जो प्रयत्न केला, त्यामागे काँग्रेस-पक्षाला दुफळीपासून वांचवणं हाच हेतु होता. या नेत्यांचं आवाहन, निजलिंगप्पा-गटाच्या नेत्यांनी मानलं असतं, तर कदाचित् काँग्रेस दुभंगलीहि नसती.

काँग्रेस-अंतर्गत या दोन गटांशीं यशवंतरावांचे आपुलकीचे संबंध होते हे खरं, परंतु दुर्दैव असं की, १९६९ च्या जुलैंत भारताच्या राष्ट्रपतिपदासाठी उमेदवार निश्चित करण्याचा प्रश्न आणि त्या संदर्भांत नंतरच्या काळांत घडलेल्या घटना, यामुळे यशवंतरावांचा या दोन्ही गटांशीं असलेल्या संबंधांत कमालीचा व्यत्यय आला. काँग्रेस-पक्ष दोन गटांत विभागला जाऊं नये यासाठी त्यांनी प्रामाणिकपणें प्रयत्न केले, परंतु कांही जणांनी त्याचा भलताच चुकीचा अर्थ लावला. यशवंतरावांचे विचार या सर्व प्रकरणांत डळमळीत आहेत अशी कुजबूज कांहींनी सुरू केली, तर कांहींनी ते कुंपणावर बसून आहेत असं सांगण्याला प्रारंभ केला. परंतु फरिदाबाद काँग्रेस-अधिवेशनानंतर ज्या क्रमानं घटना घडत गेल्या त्यांची तपासणी केली म्हणजे पक्षांतर्गत रस्सीखेचीमुळे पक्ष दुभंगण्याच्या निर्णयापर्यंत गोष्टी कशा पोंचल्या याचं चित्र स्वच्छपणें दिसूं लागतं; आणि या सर्व परिस्थितींत यशवंतरावांनी स्वीकारलेल्या भूमिकेचाहि खुलासा होऊं शकतो.

फरिदाबाद काँग्रेसनंतरच्या आठवडाभरांत राष्ट्रपति डॉ. झाकीर हुसेन यांचं ३ मे १९६९ ला निधन झालं. वराहगिरी व्यंकटगिरी हे त्या वेळीं उपराष्ट्रपति होते. हंगामी राष्ट्रपति म्हणून त्यांचाच शपथविधि झाला; आणि नंतर पुढच्या एक-दोन दिवसांत नव्या राष्ट्रपतींच्या संदर्भांत वावड्या उठूं लागल्या. निजलिंगप्पा हेच त्या वेळीं काँग्रेसचे अध्यक्ष होते आणि त्यांनी युरोपचा दौरा आयोजित केला होता. नव्या राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निश्चित करण्याच्या हालचाली सुरू होतांच त्यांनी युरोपचा दौरा पुढे ढकलल्याचं जाहीर केलं. कारण त्यांना दिल्लीमध्ये थांबून राष्ट्रपतिपदासाठी कोणाची निवड करावी यासाठी काँग्रेसमधील मताचा अंदाज घ्यावा लागणार होता. परंतु नंतरच्या दोनच दिवसांत त्यांनी युरोपला जाणार असल्याचं जाहीर केलं. ते मेच्या शेवटच्या आठवड्यांत दौऱ्यावर निघणार होते.

दरम्यान त्यांनी व्ही. व्ही. गिरी यांची भेट घेतली आणि डॉ. झाकीर हुसेन यांच्या निधनामुळे रिकाम्या झालेल्या पदासाठी कराव्या लागणाऱ्या निवडीसंबंधांत चर्चा केली. गिरी यांनी त्यांना पूर्वीच्या निर्णयाचं स्मरण करून दिलं. राष्ट्रपतींचं निधन झालं, तर उपराष्ट्रपति म्हणून काम करणारास ती जागा देण्याची प्रथा त्यापूर्वी सुरू झाली होती. याचा अर्थ गिरी यांचीच राष्ट्रपतिपद स्वतःला मिळावं अशी इच्छा होती. निजलिंगप्पा यांनीहि या चर्चेच्या वेळीं गिरी यांना आपला पाठिंबा दर्शवला आणि राष्ट्रपतिपदासाठी त्यांनी निवडणूक लढवावी, आपला संपूर्ण पाठिंबा राहील, असं आश्वासनहि दिलं.

राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीनंतर हें प्रकरण जेव्हा सर्वोच्च न्यायालयांत नेण्यांत आलं त्या वेळीं गिरी यांनी सादर केलेल्या पुराव्यांतच या घटनेचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. २१ एप्रिल १९७० ला हा पुरावा सर्वोच्च न्यायालयासमोर दाखल झाला· राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निश्चित करण्याबाबत "माझा शब्द हा अखेरचा शब्द असून तुम्ही तें आता सर्व माझ्यावर सोपवा" असं निःसंदिग्ध आश्वासन निजलिंगप्पा यांनी आपणास दिलं होतं. निवडणुकीची अंतिम फेरी जिंकायची तर तोंपर्यंत गिरी यांनी आपली वागणूक कशी ठेवावी याचेहि धडे निजलिंगप्पा यांनी त्यांना दिले होते. डोळे असून पहायचं नाही, कान असून ऐकायचं नाही आणि तोंड असून बोलायचं नाही, या वागणुकीचं निदर्शक म्हणून माकडाचीं चित्रं तयार करण्यांत आलेलीं आहेत. म. गांधींच्या काळापासून तीं प्रचलित आहेत. तीं चित्रं मीं आपल्या टेबलावर ठेवलेलीं आहेत असं त्यांनी गिरी यांना सांगितलं आणि सर्व कांही ठीकठाक होईल, असं भरघोस आश्वासनहि दिलं. गिरी यांनी सर्वोच्च न्यायालयांत दाखल केलेल्या पुराव्यांत या सर्वाचा उल्लेख केलेला आहे.

गिरी हे स्वतःहि भूतानच्या दौऱ्यावर जाणार होते. तो दौरा त्यांनी रद्द केला आणि ते दिल्लीलाच राहिले. दरम्यान राष्ट्रपतिपदासाठी, एखाद्या ज्येष्ठ काँग्रेस-नेत्याची निवड करण्यासाठी म्हणून पक्षांतर्गत चर्चा सुरू झाल्या. १९७२ च्या सार्वत्रिक निवडणुका नजीक आलेल्या होत्या आणि मागचा अनुभव लक्षांत घेऊन काँग्रेसला हुकमी बहुमत मिळण्याबद्दल कांहींना संशयानं घेरलं होतं. त्यामुळे स्वच्छ प्रतिमा असलेल्या कार्यक्षम नेत्याची, राष्ट्रपतिपदासाठी निवड करणं युक्त ठरेल असा या एकूण चर्चेचा सूर होता.

यशवंतरावांनी या प्रश्नाचा गंभीर विचार केला नव्हता; कारण तशी कांही तातडी निर्माण झालेली नव्हती. दरम्यान डॉ. झाकीर हुसेन यांच्या निधनानंतर एक आठवड्यानं पंतप्रधान इंदिरा गांधी आणि यशवंतराव यांच्या भेटीमध्ये हा विषय चर्चेत निघाला तेव्हा इंदिरा गांधींनी यशवंतरावांचं मत विचारलं. यशवंतरावांनी याविषयी निश्चित स्वरूपाचा विचार केलेला नव्हता. तेंच त्यांनी इंदिराजींना सांगितलं; परंतु या प्रश्नाकडे काळजीपूर्वक लक्ष मात्र द्यायला पाहिजे असं आपलं मत व्यक्त केलं. तथापि राष्ट्रपतींच्या पश्चात्, उपराष्ट्रपतींना तें पद बहाल करण्याच्या प्रथेचा पुनर्विचार करण्याची गरज आहे असं मात्र त्यांना वाटत असावं. इंदिरा गांधी यांनी या चर्चेच्या वेळीं आपलं मत व्यक्त केलं नव्हतं किंवा आपला त्याबाबतचा दृष्टिकोनहि स्पष्ट केला नव्हता; परंतु गिरी यांनाच उमेदवारी देण्याबाबत इंदिराजी उत्सुक नाहीत अशी या चर्चेनंतर यशवंत-रावांची स्वाभाविक समजूत झाली. राष्ट्रपतिपदासाठी कोण उमेदवार असावा याबाबत या दोघांनीहि आपलं मत या वेळेपर्यंत निश्चित बनवलेलं नव्हतं.

दरम्यान मध्य-प्रदेशचे शेठ गोविंददास यांनी बाबू जगजीवनराम यांच्या नांवाची राष्ट्रपतिपदासाठी सूचना केली. बाबूजी हे त्या वेळीं अन्नधान्यखात्याचे मंत्री होते. जगजीवनराम हे हरिजन-नेते, यापेक्षाहि ते राष्ट्रीय स्तरावरील मान्य नेते या दृष्टीनं, शेठ गोविंददास यांची सूचना यशवंतरावांनी वाजवी मानली. के. के. शहा आदि त्यांच्या मित्रांशीं चर्चा करतांनाहि त्यांनी आपल्या या मताचा उल्लेख केला आणि त्या दृष्टीनं वातावरण निर्माण केलं, तर बाबूजींबद्दलची सूचना मूळ धरूं शकेल असं मत व्यक्त केलं.

कामराज आणि पंतप्रधान यांनी १७ मे रोजीं या प्रश्नावर चर्चा केली. कामराज यांनी या वेळीं संजीव रेड्डी यांचं नांव उच्चारूनच आपली निवड सांगितली. त्याच दिवशीं संजीव रेड्डी यांनीहि पंतप्रधानांची भेट घेतली. त्यांना आता यशवंतरावांचा पाठिंबा मिळवायचा होता. त्याच दिवशींच्या संध्याकाळीं, त्यांनी यशवंतरावांना फोन करून आपण भेटीसाठी येत असल्याचं सांगितलं. भेटीच्या उद्देशाची कांही कल्पना नसल्यामुळे व स्पीकरचा दर्जा ध्यानांत घेऊन, " तुम्ही कशाला येतां, वेळ सांगा, मीच येतों " असं यशवंतरावांनी त्यांना सुचवलं. परंतु मला स्वतःसंबंधी कांही चर्चा करायची असल्यानं मीच येईन, असं रेड्डी यांनी सांगितलं आणि दुसऱ्या दिवशीं सकाळींच त्या दोघांची चर्चा झाली.

" राष्ट्रपतिपदासाठी मी उत्सुक आहे काय, हें पंतप्रधानांना जाणून घ्यायचं होतं. आणि आमच्या चर्चेमध्ये मी निवडणूक लढवावी असं त्यांनी सूचित केलं आहे " असं रेड्डी यांनी यशवंतरावांना सांगितलं.

यापुढचा चर्चेचा टप्पा आणखी महत्त्वाचा ठरला. इंदिरा गांधी या ५ जूनला अफगाणिस्तानच्या पांच दिवसांच्या दौऱ्यावर जाणार होत्या. दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी त्यांनी उपपंतप्रधान मोरारजी देसाई, निजलिंगप्पा, यशवंतराव, कामराज, जगजीवनराम, स्वर्णसिंग, अन्य काँग्रेस-नेते आणि कांही राज्यांचे मुख्य मंत्री यांच्याशीं राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीसंबंधी अलग अलग चर्चा केली. या चर्चेत निश्चित निर्णय कांही झाला नाही, परंतु जूनच्या मध्यापर्यंत याचा निर्णय एवढंच करावा ठरलं. त्या जूनमध्ये काँग्रेसचे नेते आणि मंत्री हे परदेशच्या दौऱ्यावर जाणार होते. निजलिंगप्पा यांनी युरोपच्या दौऱ्याचं प्रस्थान ठेवलं होतं.

युरोपच्या दौऱ्यावरून परतल्यावर निजलिंगप्पा यांनी १९ जूनला काँग्रेस-कार्यकारिणीची बैठक या प्रश्नाचा निकाल लावून घेण्यासाठी आयोजित केली. त्या बैठकीच्या-अगोदर दिल्लींतलं राजकीय वातावरण बरंच ढवळलं गेलं होतं. काँग्रेस संसदीय पक्षाचीहि बैठक बोलवायचे मनसुबे तयार झाले होते. निजलिंगप्पा, कामराज, स. का. पाटील आणि त्यांच्या भोवतीच्या कांही काँग्रेस-नेत्यांनी राष्ट्रपतिपदासाठी योग्यायोग्यतेचा निकाल देणाऱ्या, विश्वासू अशाच उमेदवाराची निवड व्हावी यासाठी लटपटी सुरू केल्या

होत्या. थोडक्यांत म्हणजे त्यांना सिंडिकेटचा उमेदवार निश्चित करून हवा होता. त्यांच्या पैकी सर्वांना नसली तरी बऱ्याच जणांना संजीव रेड्डी यांची उमेदवारी मान्य होती. खरं म्हणजे मोरारजी, निजलिंगप्पा, कामराज हे स्वतःच तें पद मिळवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून होते. त्यामुळे प्रसंग असा निर्माण झाला होता की, ज्यांनी उमेदवाराची निवड करायची ते स्वतःच उमेदवाराला मिळवून देण्याचं पद स्वतःकडे घेण्याचा विचार सुस्पष्टपणें करत होते.

पंतप्रधानांच्या गोटामध्ये, उमेदवारी कोणाला द्यावी यासंबंधीचा निर्णय निश्चित झाला नव्हता. कामराज यांनी आपलं नेहमीचं, 'सर्वांची संमति' अजमावण्याचं तंत्र सुरू केलं होतं. वस्तुतः त्यांनी सर्वांच्या संमतीचा अंदाज घ्यावा असा कुठलाहि अधिकार त्यांना आता उरलेला नव्हता. परंतु तरीहि त्यांनी आपलं तंत्र हाताळण्याला सुरुवात केली. त्याच तंत्राचा अवलंब करून ते १७ जूनला यशवंतरावांच्या निवासस्थानीं दाखल झाले.

या दोघांमध्ये झालेल्या चर्चेत कुठल्याहि स्थितींत 'गिरी नाही' असं कामराज यांनी यशवंतरावांना सांगितलं. तसं पाहिलं तर, संजीव रेड्डी हे या जागेसाठी योग्य ठरतील, परंतु मी अजून माझा निर्णय पक्का केलेला नाही, अशी पुस्तीहि कामराज यांनी पुढे जोडली.

कॉंग्रेस-कार्यकारिणीच्या बैठकीच्या अगोदर म्हणजे १७ व १८ जूनला दिल्लीला वरिष्ठ पातळीवर चर्चा आणि खलबतं यांचा सुकाळ झाला होता. ही बैठक १९ जूनला व्हायची होती. त्या अगोदर इंदिरा गांधी व गिरी यांच्यांत चर्चा झाली. या चर्चेमध्ये गिरी यांनी आपली पूर्वीचीच इच्छा पुन्हा एकदा बोलून दाखवली आणि निजलिंगप्पा यांच्याशीं झालेला संवादहि सांगितला. इंदिरा गांधी यांनी मात्र त्यांना वचन दिलं नाही किंवा गिरी यांनी आशेवर रहावं असंहि कांही त्यांच्या बोलण्यांतून ध्वनित झालं नाही. निरनिराळ्या पक्षांच्या मतांचा त्या अंदाज घेत आहेत, एवढंच गिरी यांना उमजलं. सिंडिकेटमधील नेते आणि निरनिराळ्या राज्यांतील कॉंग्रेसचे मुख्य मंत्री यांच्याशीं त्या चर्चा करत राहिल्या.

पंतप्रधानांनी १८ जूनला संध्याकाळीं एक बैठक बोलावली आणि या बैठकीला येण्याविषयी यशवंतरावांना सुचवलं. यशवंतराव पंतप्रधानांच्या निवासस्थानीं त्यानुसार गेले. त्यापूर्वी तिथे जगजीवनराम, स्वर्णसिंग आणि फक्रुद्दीन अलि अहंमद पोंचले होते आणि उमेदवारीच्या संदर्भात त्यांची चर्चा सुरू झाली होती. जगजीवनराम यांनी या वेळीं त्यांच्या आणि संजीव रेड्डी यांच्या भेटींतली चर्चा आणि यशवंतरावांपाशीं कामराज यांनी केलेली चर्चा सांगितली. संजीव रेड्डी चर्चा करून गेल्याचंहि त्यांनी पंतप्रधानांपर्यंत पोंचवलं.

पंतप्रधानांचं म्हणणं असं होतं की, माझा स्वतःचा असा कोणताहि उमेदवार नाही, परंतु विरोधी पक्षांनाहि मान्य होईल अशा उमेदवाराची निवड काँग्रेसनं करावी राजकीय हिकमतीनं किंवा उमेदवार-निवडीच्या नेहमीच्या पद्धतीनं आपला उमेदवार निश्चित करणं त्यांना मान्य नव्हतं. अशामुळे विरोधी पक्षांचे संबंध दुरावतील आणि काँग्रेस-अंतर्गत फाटाफुटीला वाव मिळेल, असं त्यांना वाटत होतं.

त्यानंतर इंदिराजी २३ जूनला जपानच्या दौऱ्यावर रवाना झाल्या. पंतप्रधान परदेशी जातांच सिंडिकेटवाल्यांनी संजीव रेड्डी यांना पाठिंबा मिळवण्याच्या कामाला आवेशानं प्रारंभ केला; दरम्यान इंदिराजींनी ठरल्याप्रमाणे जपानचा दौरा तर पूर्ण केलाच शिवाय इंडोनेशियाची भेट संपवून ३ जुलैला त्या भारतांत परतल्या.

पंतप्रधानांचं दिल्लीच्या पालम विमानतळावर आगमन होतांच, "गिरी यांच्या-संबंधीचा तुमचा आग्रह कायम आहे का," असं त्यांना पत्रकारांनी विचारलं. मुळीच नाही" असं त्यांनी उत्तर दिलं. माझा कुणाबद्दलहि हट्ट नाही आणि कोण उमेदवार बनणार आहे याची मला कांहीच कल्पना नाही, असंहि त्यांनी सांगून टाकलं.

दिल्लीला सुरू झालेलं उमेदवार-निवडीचं हें नाटक अखेर एक दिवस बंगलोरच्या रंगमंचावर पोंचलं. जुलै १० पासून बंगलोरला काँग्रेसचं तीन दिवसांचं अधिवेशन होणार होतं. निजलिंगप्पा आणि त्यांचे साथीदार यांनी आता रेड्डींची उमेदवारी निश्चित करण्याची तयारी केली होती.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशीं इंदिराजी मंडपांत उपस्थित राहिल्या नाहीत. त्यांची प्रकृति नादुरुस्त होती तथापि काँग्रेस-कार्यकारिणींत झालेल्या चर्चेच्या अनुरोधानं त्यांनी पक्षाच्या आर्थिक धोरणाविषयी एक टिप्पणी मात्र तयार करून पाठवली होती. त्याचप्रमाणे काँग्रेसमध्ये आमूलाग्र सुधारणा घडावी या मताच्या गटांतील कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय अर्थविषयक धोरणासंबंधीचा एक आराखडा कार्यकारिणीकडे पाठवून पक्षाच्या मूळ ठरावांत त्याचा समावेश करावा असं सुचवलं होतं. काँग्रेसमधील 'तरुण तुर्क' या नांवानं ओळखले जाणारे चंद्रशेखर, मोहन धारिया, कृष्णकांत, आर. के. सिन्हा आणि चंद्रजित यादव यांचा हा गट होता. पंतप्रधानांनीं आपल्या टिप्पणीमध्ये प्रमुख बँकांचं राष्ट्रीयीकरण, औद्योगिक क्षेत्रांतील मक्तेदारी मोडून काढण्यासाठी औद्योगिक परवाना-पद्धतीच्या धोरणांत क्रांतिकारक बदल, नफ्यामध्ये कामगारांचा हिस्सा, कच्च्या मालाच्या निर्यातीचं राष्ट्रीयीकरण, जमीन-सुधारणा कायद्याची कडक अंमलबजावणी इत्यादि महत्त्वाच्या धोरणात्मक विषयासंबंधीचा उल्लेख केलेला होता.

काँग्रेस-कार्यकारिणीच्या बैठकींत फक्रुद्दीन अलि अहंमद यांनी ही टिप्पणी, सर-चिटणीस सादिकअली यांच्याकडे सुपूर्त केली. कार्यकारिणींत या टिप्पणीवर प्रथम चर्चा व्हावी यासाठी पंतप्रधानांनी ही टिप्पणी पाठवली होती. कार्यकारिणींत त्या वेळीं

सी. सुब्रह्मण्यम् यांनी तयार केलेल्या आर्थिक विषयावरील ठरावाची चर्चा सुरू होती. पंतप्रधानांनी पाठवलेल्या टिप्पणीवर विचार करून ती मान्य करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असं अध्यक्ष निजलिंगप्पा यांचं मत होतं. पंतप्रधानांनी ही टिप्पणी, अध्यक्षांच्या किंवा अन्य कोणा पदाधिकाऱ्याच्या नांवानं पाठवलेली नसल्यानं ती दाखल करून घेण्याचं कारण नाही, अशी भूमिका त्यांनी स्वीकारली.

पंतप्रधानांची ती टिप्पणी जशीच्या तशी स्वीकारावी असं मत कांही सदस्यांनी व्यक्त केलं, तर कांहींनी विरोध दर्शवला. बँकांचं राष्ट्रीयीकरण मान्य करायचं तर पक्षाला तडा जाईल, असं स. का. पाटील यांनी सांगितलं. ही टिप्पणी सरकारकडे अंमलबजावणीसाठी पाठवावी अशी इच्छा कामराज व अतुल्य घोष यांनी व्यक्त केली. या चर्चेच्या शेवटीं या टिप्पणीच्या आधारानं, सर्वांना मान्य होईल असा ठराव तयार करावा, असं ठरवण्यांत आलं. त्यानुसार दुसरा संपूर्ण दिवस यशवंतरावांनी पंतप्रधान इंदिरा गांधी, मोरारजी देसाई आणि अन्य सहकारी यांच्याशीं चर्चा करून ठरावाचा मसुदा तयार केला. इंदिरा गांधी यांच्या टिप्पणींतील नव्या आर्थिक धोरणाचा समावेश तर या ठरावांत त्यांनी केलाच, त्याचबरोबर कार्यकारिणीनं त्यामध्ये जे दोष-दिग्दर्शन केलं होतं आणि त्यांतल्या ज्या भागाला विरोध दर्शवला होता त्यांतूनहि त्यांनी मोठ्या कुशलतेनं मार्ग काढला होता. बँकांचं राष्ट्रीयीकरण करण्यासारख्या प्रश्नावर सिंडिकेट आणि पंतप्रधान यांच्यांत जाहीरपणानं समोरासमोर वादाला तोंड लागू नये यासाठी हा सारा प्रयत्न होता. ११ जुलैच्या बैठकींत अखेर या ठरावाला सर्वांनी एकमतानं मान्यता दिली.

कार्यकारिणीची बैठक त्या दिवशीं ११ जुलैला सायंकाळपर्यंत सुरू होती. बैठक संपतां संपतां निजलिंगप्पा यांनी घाई-गडबडीनं, सेंट्रल कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीची घोषणा केली. ही बैठक दुसऱ्या दिवशीं, दुपारच्या जेवणाच्या सुट्टीच्या वेळांत घेण्यांत येईल, असंहि त्यांनी सांगितलं. राष्ट्रपतिपदाचा उमेदवार निश्चित करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यांत आली होती.

निजलिंगप्पा यांनी पार्लमेंटरी बोर्डाची बैठक घेण्याची हिकमत केली आणि तिथपासूनच बंगलोरमधील नाटकाची रंगत वाढत गेली. कार्यकारिणीची बैठक संपवून एक एक सभासद बाहेर पडत होते, तेवढ्यांत इंदिरा गांधी यांनी यशवंतरावांना बोलावलं आणि "जेवणानंतर काय करणार आहांत, आपल्याला थोडा वेळ भेटलं पाहिजे," अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली.

"मी मोकळाच आहे." – यशवंतरावांनी सांगितलं.

त्यांची प्रकृति कांहीशी ठीक नव्हती म्हणून मग ते राजभवनवर आपल्या मुक्कामाच्या ठिकाणीं गेले. त्यांनी भोजन केलं तोंवर इंदिराजींचा निरोप त्यांना मिळाला

म्हणून मग ते तातडीनं त्यांच्याकडे गेले. फक्रुद्दीन अलि अहंमद हे तिथेच बसले होते. गिरी किंवा जगजीवनराम यांच्या उमेदवारीसंबंधांत इंदिराजींनी विषय काढतांच याबाबत कामराज आणि मोरारजीभाई यांच्याशीं आपण चर्चा करावी, असं यशवंतरावांनी त्यांना सुचवलं.

अधिवेशनांतील १२ जुलैचा अर्धा दिवस आर्थिक ठरावावरील चर्चेत गेला. मोरारजींनी या ठरावावर गैरलागू भाषण करतांच यशवंतरावांनी २५ मिनिटं कणखरपणानं भाषण करून मोरारजींचा चुकीचा दृष्टिकोन अधिवेशनासमोर उघडा केला. बंगलोर अधिवेशनांतील त्यांचं हें भाषण चांगलंच गाजलं.

दुपारीं एक वाजतां पार्लमेंटरी बोर्डाची बैठक होणार होती. यशवंतरावांना आता त्या बैठकीचे वेध लागले. बैठकीला जात असतांनाच, महाराष्ट्राचे मुख्य मंत्री वसंतराव नाईक त्यांना भेटले. आता होणाऱ्या बैठकींत इंदिरा गांधी या जगजीवनराम यांचं उमेदवारीसाठी नांव सुचवणार आहेत असं नाईक यांनी त्यांना सांगितलं. नाईक व जगजीवनराम यांची त्या दिवशीं सकाळीं भेट झाली होती. त्या वेळीं जगजीवनराम यांनी ही माहिती नाइकांना दिली आणि चव्हाण यांच्यापर्यंत तें पोंचवा असंहि सांगितलं होतं.

जगजीवनराम यांची उमेदवारी पुढे करून ती एकमतानं मान्य करून घेण्याच्या दृष्टीनं आता बराच उशीर झाला होता. यशवंतरावांनी नाईकांना परिस्थितीची कल्पना दिली. जगजीवनराम यांची राष्ट्रपतिपदासाठी निवड होणार असेल, तर ती एक उत्तम घटना ठरेल, असंच यशवंतरावांचं मत होतं.

दरम्यान फक्रुद्दीन अलि अहंमद यांनीहि यशवंतरावांना सभामंडपांत गाठलं. या दोघांतील चर्चेच्या वेळीं सेंट्रल पार्लमेंटरी बोर्डाची बैठक कांही काळ लांबणीवर टाकावी, असं यशवंतरावांनी त्यांना सुचवलं. संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीला पाठिंबा देण्याच्या संदर्भात आपण आता वचनबद्ध असून ऐन वेळीं निर्णय फिरवणं कठीण आहे याचीहि कल्पना त्यांनी दिली.

"परंतु इंदिरा गांधी यांना जगजीवनराम यांचं नांव सुचवायचं आहे." – फक्रुद्दीन अलि अहंमद.

"पंतप्रधानांची तशी इच्छा असेल तर हरकत नाही; परंतु आता इथे होणारी पार्लमेंटरी बोर्डाची बैठक लांबणीवर टाकण्याच्या दृष्टीनं, पंतप्रधानांना तुम्ही कां नाही तयार करत ? तसं झालं तर दिल्लीला आपण चर्चा करूं आणि तसा निर्णय करूं." – चव्हाण.

पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकींतील चर्चेत या मुद्यावर उघड उघड वाद माजवण्यापेक्षा, ती बैठकच पुढे ढकलणं श्रेयस्कर, अशी हें सुचवण्यामागील यशवंतरावांची भूमिका

होती. अहंमद यांनी पंतप्रधानांकडे जावं आणि बैठक लांबवण्याच्या दृष्टीनं त्यांना विनंती करावी त्यांना तें पटवावं असं वस्तुतः यशवंतरावांनी सुचवलं होतं.

बैठक सुरू होण्यास १५ मिनिटांचा अवधि शिल्लक होता. तेवढ्यांत पंतप्रधानांनी यशवंतरावांना पुन्हा बोलावलं. यशवंतराव त्यांच्या खोलींत पोंचले तेव्हा फक्रुद्दीन अलि अहंमद तिथे होतेच. या चर्चेमध्ये यशवंतरावांनी बैठक लांबणीवर टाकण्याविषयीचं आपलं मत स्वतःच पंतप्रधानांना सांगितलं.

बैठकीचा क्षण जवळ आला होता. पंतप्रधान आणि यशवंतराव यांच्यांतील या चर्चेनंतर पुढच्याच मिनिटाला बैठक सुरू झाली. तीमध्ये मोरारजी देसाई यांनी संजीव रेड्डी यांचं नांव सुचवलं आणि स. का. पाटील यांनी त्यास अनुमोदन दिलं. राष्ट्रपति-पदाच्या उमेदवारासंबंधांत, राष्ट्राच्या मताचा अंदाज घेण्याला मला कांही काळ लागेल.

दोन उमेदवारांचीं नांवं पुढे आल्यानं बोर्डाच्या सदस्यांनी उघड मतदान करण्याचा निर्णय केला आणि त्यानुसार कामराज, स. का. पाटील, चव्हाण आणि मोरारजी देसाई यांनी रेड्डी यांच्या बाजूनं मतदानासाठी हात वर केले. जगजीवनराम आणि निजलिंगप्पा यांनी मतदानांत भाग घेतला नाही. अखेर रेड्डी यांना चार तर बाबूजींना दोन मतं मिळून रेड्डी यांच्या उमेदवारीवर काँग्रेस-पक्षानं शिक्कामोर्तब केलं.

प्रत्यक्ष मतदानानं हा निर्णय झालेला असला, तरी सुद्धा उमेदवाराचं नांव जाहीर करण्यापूर्वी निजलिंगप्पा यांनी इंदिरा गांधी यांच्याशीं चर्चा करावी आणि मगच नांव जाहीर करावं असंहि या बैठकींत ठरलं. काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाच्या सदस्यांनी हा जो निर्णय केला आहे त्याची गंभीर प्रतिक्रिया उमटेल, असा इशारा इंदिराजींनी तिथेच सर्वांना दिला; परंतु निजलिंगप्पा यांनी इंदिराजींशीं याबाबत चर्चा करण्याची पर्वा न करतां, उमेदवाराचं नांव अधिकृतपणें जाहीर करून टाकलं.

बंगलोरमध्ये संजीव रेड्डी यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर पुढच्या दोन तासांत गिरी यांनी दिल्लीमध्ये आपली उमेदवारी अपक्ष उमेदवार म्हणून जाहीर केली पंतप्रधानांनी त्यांचं नांव न सुचवल्याबद्दल गिरी मनांतून दुखावले होते.

बंगलोरमधील या घटनेनं अधिवेशनाला आलेले सदस्य अस्वस्थ बनले. कांही मनांतून सुखावले होते तर कांही संतप्त बनले होते. काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डानं, ज्या पद्धतीनं ( मतदान करून ) उमेदवारीचा निर्णय केला होता त्यांनी तो तसा न करतां उमेदवारीचा प्रश्न अधिवेशनासमोर आणायला हवा होता अस मत कांही जणांनी व्यक्त केलं तर बोर्डानं केलेल्या निर्णयाशीं पडेल ती किंमत देऊन चिकटून राहिलं पाहिजे असं कांहीजण सांगू लागले. वस्तुतः बोर्डानं एखादा निर्णय केला तर काँग्रेसच्या घटनेप्रमाणे तोच निर्णय मानला जातो. अ. भा. काँग्रेसला त्याबाबत बोर्डाला सवाल विचारण्याचा अधिकार रहात नाही.

बंगलोरमध्ये राष्ट्रपतिपदाच्या उमेदवारीबाबत हें सर्व रामायण घडलं; परंतु काँग्रेसमध्ये तें प्रथमच घडत होतं असं नाही. पंतप्रधानांच्या इच्छेविरुद्ध काँग्रेसमधील-श्रेष्ठांनी आपल्या मर्जीनुसार यापूर्वीहि निर्णय केले होते. स्वातंत्र्यानंतर अगदी पहिल्या राष्ट्रपतींच्या निवडीपासून हें सुरू झालं होतं. त्या वेळीं पं. नेहरूंची इच्छा सी. राजगोपालाचारी यांच्याकडे पहिलं राष्ट्रपतिपद द्यावं अशी होती. सी. राजगोपालाचारी हे पहिले भारतीय गव्हर्नर-जनरल होते. त्या दृष्टीनं राष्ट्रपतिपदाचा पहिला मान त्यांना मिळावा ही पं. नेहरूंची वाजवी इच्छा; परंतु त्या वेळच्या काँग्रेस-नेत्यांनी तें घडूं दिलं नाही. पुढे १९५७ मध्ये, डॉ. राजेंद्रप्रसाद यांची राष्ट्रपतिपदाची जागा डॉ. राधाकृष्णन् यांना द्यावी अशी पं. नेहरूंची इच्छा होती; परंतु मौलाना आझाद यांच्यासह अन्य काँग्रेस-श्रेष्ठांनी त्याला मोडता घातला आणि डॉ. राधाकृष्णन् यांना दूर ठेवलं. परंतु त्या वेळीं पंतप्रधान आणि काँग्रेस-नेते यांच्यांत समोरासमोर असा कसलाहि झगडा झाला नाही. अर्थात् याचं कारण पं. नेहरूंचं भव्य व्यक्तिमत्त्व हें होतं. सहजासहजीं त्यांच्या-वर हल्ला करण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती.

इंदिरा गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वांतहि कमालीचं आकर्षण आहे. पक्षाच्या नेत्यां-बाबत त्यांची भूमिका ही पं. नेहरूंपेक्षा नेहमींच निश्चयात्मक स्वरूपाची राहिली. डॉ. राधाकृष्णन् हे राष्ट्रपति असतांना १९६७ मध्ये त्यांची मुदत वाढवून द्यावी, असा आग्रह कामराज यांनी धरला तेव्हा इंदिराजींनी तें मानलं नाही आणि डॉ. झाकीर हुसेन यांच्याकडे राष्ट्रपतिपद त्यांनी सोपवलं.

परंतु बंगलोरमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला याचं कारण सिंडिकेटच्या ताकतीचा त्यांना नीटसा अंदाज करतां आला नाही. आपल्याला अलग पाडण्याइतकं सिंडिकेटनं सामर्थ्य जमा केलं आहे याची त्यांना कल्पना आली नाही. बैठक सुरू होण्याच्या अगोदर कांही तास जरी त्यांनी हालचाल केली असती, तरी तें पुरेसं ठरणार होतं.

रेड्डी यांची उमेदवारी पक्षानं निश्चित केल्यामुळे इंदिराजी मात्र बऱ्याच अस्वस्थ बनल्या. हा निर्णय करण्यांत पंतप्रधानांची जाणूनबुजून कोंडी करण्याचा आणि देशाच्या पंतप्रधान म्हणून त्यांच्या सर्वश्रेष्ठ अधिकारालाच आव्हान देण्याचा हा एक उद्योग होता. त्यामुळे त्या संतप्त होणं स्वाभाविक होतं.

उमेदवार निश्चित झाल्याचं जाहीर झाल्यानंतर १४ जुलैला पत्रकारांनी या घटने-संबंधांत इंदिराजींची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न केला. पत्रकार-परिषदेंत यासंबंधी त्यांना कांही प्रश्न विचारण्यांत आले –

"काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाच्या सदस्यांपैकी, कोणाच्या विचारांत, ऐनवेळीं बदल घडून येईल असा आपला कयास होता काय ?" – पत्रकार.

"तें मला माहीत नाही. कोणाचा काय विचार आहे हें कोणी मला अगोदर सांगितलं नव्हतं." – इंदिराजी.

"यशवंतरावांच्या मतदानाबद्दल तुम्हांला काय म्हणाचंय् ?" – पत्रकार.

"तें तुम्ही त्यांनाच विचारा." – इंदिराजी.

"पार्लमेंटरी बोर्डातील बहुसंख्य सभासदांचा रेड्डी यांना पाठिंबा आहे याची तुम्हांला दिल्लीहून निघण्यापूर्वी कल्पना नव्हती का ?" – पत्रकार.

"माफ करा, लोकांच्या शब्दांवर मी विश्वास ठेवतें. ते मला जेव्हा कांही शब्द देतात, सांगतात तेव्हा त्यांचं तें सांगणं खरं नसतं असा विचार करणं मला जड जातं." – इंदिराजी.

"कुणाला पाठिंबा द्यायचाय् किंवा कुणाचं नांव तुम्हांला सुचवायचंय्, यासंबंधांत बोर्डाच्या सभासदांना विश्वासांत घेऊन मोकळेपणानं तुम्ही कधी कांही सांगितलं नाही, असं बोर्डातील सदस्यांचं म्हणणं आहे. तुम्हीच जर त्यांच्यावर विश्वास दाखवून मोकळेपणानं कांही सांगितलं नाही तर त्यांनी काय करावं ? ते आपलं मन तुमच्यासाठी कसं मोकळं ठेवणार ?" – पत्रकार.

"फार खोलांत जाऊन चर्चा करण्यांत कांही अर्थ नाही असं मला वाटतं. प्रसंगा-प्रसंगानं, बोर्डातील सदस्यांचं मत समजावून घेण्याचा मी प्रयत्न केला आणि सल्लामसलतहि केली. परंतु कोणाच्या इच्छेविरुद्ध या ठिकाणीं विशिष्ट उमेदवाराचीच निवड केली जाईल असं मला वाटलं नव्हतं." – इंदिराजी.

यशवंतरावांची आणि पंतप्रधानांची या प्रश्नाच्या चर्चेसाठी १८ जूनला भेट झाली होती. त्यानंतर बंगलोरला प्रत्यक्ष हा सामना होईपर्यंत बऱ्याच हालचाली सुरू होत्या. यशवंतरावांची चूक घडली असेल तर ती एवढीच की, १८ जूननंतर त्यांनी पंतप्रधानांशीं उमेदवारीसंबंधी चर्चा केली नव्हती. पंतप्रधानांना त्यांनी बंगलोरच्या अल्पकालीन भेटीमध्ये आपलं मत सांगितलं आणि बोर्डाची बैठक लांबणीवर टाकण्याची गळ घातली हें खरं, परंतु आपण स्वतः कुणाला पाठिंबा देणार आहोंत हें यशवंतरावांनी स्पष्टपणानं सांगायला हवं होतं अशी टीका मग सुरू झाली.

बंगलोरच्या अधिवेशनांत यशवंतरावांनी मध्यस्थी करून त्या ऐतिहासिक आर्थिक ठरावाबाबत तडजोड घडवून आणली होती. उमेदवारीच्या प्रश्नांतहि आपण तडजोड घडवूं अशी त्यांना उमेद होती. त्यासाठी म्हणून बंगलोरमध्ये होणारी बोर्डाची बैठक लांबणीवर टाकणं हा त्यांनी उपाय सुचवला होता. ती बैठक बंगलोरमध्ये झाली नसती तर दिल्लीच्या निवान्त वातावरणांत, कदाचित् गोष्टी कांही वेगळ्याच घडण्याची शक्यता त्यांना वाटत होती.

काँग्रेस-अंतर्गत वातावरण आता संशयानं भरलं होतं आणि त्याला बरींच नागमोडीं वळणं प्राप्त झालीं होतीं. त्या परिस्थितींत आपण आपलीं मतं, स्वतःपुरतींच मर्यादित ठेवावींत असं यशवंतरावांना वाटणं शक्य होतं. कारण त्यांचे अन्य सहकारी आणि खुद्द पंतप्रधान यांनी त्याच हिकमतीचा अवलंब केला होता. रेड्डींच्या उमेदवारीबाबत त्यांनी निजलिंगप्पा यांच्याशीं कधीहि चर्चा केली नव्हती किंवा स्वतः निजलिंगप्पा यांनीहि यशवंतरावांच्या भेटींत रेड्डी यांच्या उमेदवारीचा उल्लेख केला नव्हता. जूनमध्ये दिल्लींत झालेल्या काँग्रेस-कार्यकारिणीच्या बैठकीच्या वेळीं मात्र कामराज यांनी केलेल्या चर्चेच्या वेळीं, रेड्डींच्या उमेदवारीबद्दल अनुकूल अभिप्राय व्यक्त केला होता. त्या बैठकीच्या बाहेर मात्र त्यांनी रेड्डींच्या नांवाचा कुणाजवळ चुकून सुद्धा उल्लेख केला नव्हता. कामराज यांनीच निजलिंगप्पा यांना यशवंतरावांची अनुकूलता कळवली असली पाहिजे; कारण पंतप्रधानांशीं झालेल्या चर्चेमध्ये काँग्रेस-अध्यक्षांनी यशवंतरावांच्या त्या मताचा उल्लेख केला होता.

संजीव रेड्डी यांची उमेदवारी निश्चित केल्यापासून काँग्रेस-जनांत मात्र बरीच खळबळ उडाली होती. या घटनेच्या परिणामाच्या विचारानं सर्वजण धास्तावले होते. पंतप्रधानांनी मात्र आपल्या मनांतली खळबळ कधी उघड दिसू दिली नाही. अतिशय शांतपणानं त्यांनी आपल्या डावपेंचाची आखणी सुरू ठेवली. बंगलोरहून परततांच त्यांनी गिरी यांच्याशीं चर्चा केली आणि पुढच्या डावपेंचाची त्यांना कांहीशी कल्पना दिली.

इंदिरा गांधी यांनी मात्र त्यानंतर भराभर निर्णय करण्यास प्रारंभ केला. १६ जुलैलाच त्यांनी अर्थमंत्री मोरारजी देसाई यांना अर्थमंत्रिपदाच्या जबाबदारींतून मुक्त केलं आणि तें खातं स्वतःकडे घेतलं. हें घडतांच मोरारजीभाईंनी या निर्णयाच्या निषेधार्थ राजीनामा दिला. मोरारजीभाईंनी उपपंतप्रधानपदाच्या जागेवर रहावं आणि त्यांना वाटेल तें खातं त्यांनी स्वीकारावं यासाठी इंदिराजींनी प्रयत्न केला; परंतु मोरारजींनी त्याला नकार दिला. त्यापूर्वी लालबहादूर शास्त्रींच्या कारकीर्दीत मोरारजींनी आपली भूमिका अशीच एकदा बठवली होती. शास्त्रींच्या मंत्रिमंडळांत मोरारजींचं स्थान असावं यासाठी त्या वेळीं यशवंतरावांनी बराच प्रयत्न केला होता, मध्यस्थी केली होती. परंतु मोरारजींचा आग्रह, आपल्याला मंत्रिमंडळांत क्रमांक दोनचं स्थान मिळावं असा होता. गुलझारीलाल नंदा हे हंगामी पंतप्रधान झालेले असल्यानं यांचा खरं म्हणजे क्रमांक दोनवर हक्क होता. म्हणून मग शास्त्रीजींनी क्रमांक तीन हा मोरारजींसाठी देऊं केला; परंतु त्या वेळीं त्यांनी तें नाकारलं होतं.

दिल्लीला त्या वेळीं यशवंतरावांची स्थिति मात्र मोठी नाजूक बनली होती. कारण राजकारणाच्या आखाड्यांत, काँग्रेस-श्रेष्ठांनी दरम्यानच्या काळांत डावपेंचांत आघाडी

राखली नसती, तर मोरारजीनंतर यशवंतरावांच्या स्थानालाच धक्का पोंचण्याची स्थिति निर्माण झाली होती. सिंडिकेटनं दरम्यान नव्या नाटकाचीच नांदी सुरू केली. संसदीय कॉंग्रेस-पक्षाच्या बैठकींत पंतप्रधानांविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याच्या कारवाया त्यांनी सुरू केल्या; आणि या नाटकाचा पूर्वरंग नीटपणानं वठवला जावा यासाठी यशवंतरावांनी मंत्रिपदाचा राजीनामा स्वतःच द्यावा यासाठी सिंडिकेटनं त्यांच्यामागे तगादा लावला.

कॉंग्रेसमधील भांडखोर-गटाच्या तुलनेंत यशवंतरावांची प्रतिमा अगदी स्वच्छ होती; परंतु दोन्ही गटांशीं त्यांचे संबंध घनिष्ट होते. सिंडिकेटबरोबर ते कधीच राहिले नव्हते. परंतु त्या वेळीं परिस्थिति अशी निर्माण झाली की, ना सिंडिकेट, ना पंत-प्रधानांचा गट, कोणीच त्यांना विश्वासांत घेत नव्हतं. वस्तुतः यशवंतरावांच्या आणि सिंडिकेटच्या विचारसरणींत कांहीच साम्य नव्हतं. सिंडिकेटच्या गोटांत सामील व्हायचं, तर तसा निर्णय त्यांना केव्हाहि करतां येणं शक्य होतं; परंतु तसा निर्णय करायचा, तर त्यांना स्वतःलाच आत्मवंचना पत्करावी लागणार होती.

मोरारजींना दूर केलं त्याच्या दुसऱ्या दिवशीं त्यांनी मनाच्या त्या अवस्थेंतहि पंतप्रधानांची भेट घेतली आणि मोरारजींशीं त्यांनी एकदा मोकळेपणानं चर्चा करावी असं सुचवलं. दोघांमधील मतभेद कमी करावेत, वातावरण शांत करावं यासाठी त्यांनी ही धांवपळ केली होती. यशवंतरावांच्या त्या सूचनेचा पंतप्रधानांनी आदर केला आणि मोरारजींशीं चर्चा करण्याची तयारी दर्शवली; परंतु ही चर्चा विनाअट व्हावी, अर्थखातं पुन्हा त्यांच्याकडे सुपूर्त करण्याच्या अटीवर ही चर्चा होऊं नये, असं इंदिराजींनी आपलं मत व्यक्त केलं. बंगलोरमध्ये कॉंग्रेस-अधिवेशनांत जें आर्थिक धोरण ठरलं, त्याची अंमलबजावणी करण्याची आपण जबाबदारी स्वीकारलेली असल्यानं त्या संदर्भात, अर्थखातं हें आता मोरारजींच्या अखत्यारींत राहूं देण्यास पंतप्रधानांची तयारी नव्हती.

मोरारजीभाई स्वतः मात्र संतापले होते. कॉंग्रेस-अंतर्गत सुरू झालेल्या सत्ता-स्पर्धेत, पंतप्रधानांनी आपला बळी घेतला यासंबंधी त्यांची खात्री झाली होती. स्वतः यशवंतराव या सर्व परिस्थितींतून सामोपचाराचा मार्ग शोधत राहिले होते. पक्षांतील दोन्ही गटांत समझोता घडवून आणण्यासाठी त्यांच्या भेटीगाठी सुरू राहिल्या; परंतु त्याबाबतहि अनेकांनी त्यांच्या बाबतींत गैरसमज करून घेतले आणि मग दोन्ही बाजूंनी त्यांच्यावर टीकेची झोड सुरू झाली.

याहि परिस्थितींत यशवंतराव आणि पंतप्रधान यांच्यांत अंतर निर्माण झालेलं नव्हतं ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट होती. पंतप्रधान आता बंगलोरच्या अधिवेशनांत निश्चित झालेल्या कार्यक्रमाचा तातडीनं पाठलाग करण्याच्या मनःस्थितींत

होत्या. १८ जुलैला त्यांनी यशवंतरावांना पाचारण केलं आणि देशांतील चौदा प्रमुख बँकांचं राष्ट्रीयीकरण करण्याच्या दृष्टीनं तावडतोब निर्णय करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. इतकंच नव्हे तर त्यासाठी जो वटहुकूम काढावा लागणार होता त्याची तयारी त्यांनी सुरू केली होती. त्या नियोजित वटहुकमाचा सारांशहि त्यांनी यशवंतरावांच्या हातीं दिला. या दोघांची भेट झाली त्यानंतर पुढच्या कांही तासांतच केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक व्हायची होती. त्या बैठकीपूर्वीच पतप्रधानांनी यशवंतरावांशीं हें हितगुज केलं. बँकांचं राष्ट्रीयीकरण करण्याच्या त्या निर्णयाला यशवंतरावांनी तिथेच आपला संपूर्ण पाठिंबा असल्याचं सांगितलं.

त्याच दिवशीं काँग्रेस-अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी काँग्रेसच्या नेत्यांची एक बैठक आयोजित केली होती. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर यशवंतराव लगेच त्या बैठकीला गेले. बँकांचं राष्ट्रीयीकरण करण्यांत आल्यासंबंधीचा वटहुकूम कांही क्षणांतच जाहीर होत असून पंतप्रधानांच्या या गतिमान आणि खंबीर धोरणाला माझा संपूर्ण पाठिंबा आहे, या कार्यक्रमापासून मी दूर राहूंच शकत नाही, अशी आपली भूमिकाहि त्यांनी काँग्रेस-नेत्यांना स्पष्ट केली. आपल्या भूमिकेबद्दल कुणाच्या मनांत गोंधळ निर्माण होऊं नये यासाठी त्यांनी हा स्पष्ट खुलासा केला. मोरारजींना मंत्रिमंडळांतून दूर करण्याच्या कृतीबद्दल ते जरी खूष नव्हते, तरी पण आपण स्वतः मंत्रिपदाचा राजीनामा देणार नाही हेंहि नेत्यांना सांगून ते मोकळे झाले. त्याच रात्रीं मग बँकांचं राष्ट्रीयीकरण करण्यांत आल्याबद्दलचा वटहुकूम जाहीर झाला.

पंतप्रधानांनी केलेल्या या खंबीर निर्णयाचं यशवंतरावांनी मोठ्या उत्साहानं स्वागत केलं. सिंडिकेटच्या कांहीं नेत्यांनीहि बिचकत बिचकत या निर्णयाचं स्वागत केलं. परंतु हा निर्णय करण्यासाठी पंतप्रधानांनी जो मुहूर्त साधला होता त्याबद्दल सिंडिकेटवाल्यांना संशयानं घेरलं. त्यामागे राजकीय डावाचा त्यांना संशय होता. त्यामुळे वटहुकूम जाहीर होतांच सिंडिकेटमधील ज्येष्ठांनी बैठक जमवली. मोरारजी देसाई यांची हकालपट्टी आणि बँकांचं राष्ट्रीयीकरण यांतून निर्माण झालेल्या समस्यांचा खल करण्याच्या उद्देशानं ही बैठक झाली. बैठकीला निजलिंगप्पा, स. का. पाटील, कामराज, अतुल्य घोष, वीरेंद्र पाटील, आणि डॉ. रामसुभगसिंग हे नेते जमा झाले आणि त्यांनी खंबीरपणानं, पंतप्रधानांच्या विरुद्ध आघाडी निर्माण करण्याचा निर्णय केला; परंतु पंतप्रधानांनी जे निर्णय केले होते त्याच्याशीं मुकाबला करण्यासाठी नेमकं काय करावं आणि तें कसं घडवावं याचा निर्णय करणं मात्र त्यांना कठीण ठरलं.

त्यानंतर पुढच्या दोनच दिवसांत संसदीय काँग्रेस-पक्षाच्या बैठकींत इंदिराजींनी खासदारांना जाणीव करून दिली की, पक्षानं मान्य केलेल्या महत्त्वाच्या धोरणाचा अंगीकार आपल्याला करावाच लागणार आहे. त्याबाबत माझ्यावर कुणालाहि कसलंहि बंधन घालण्यास अवसर दिला जाणार नाही. मी स्वीकारलेलं धोरण पक्षाला अमान्य

असेल आणि पंतप्रधानपदाचा मी त्यासाठी त्याग करावा असं पक्षाचं मत असेल, तर तें मी आनंदानं मान्य करीन अशी आपली भूमिकाहि त्यांनी सांगितली.

पक्षांत धोरणविषयक एकवाक्यता रहावी असाच त्यांचा प्रयत्न होता. परंतु सिंडिकेटच्या हालचालींचीहि माहिती त्यांच्या संग्रहीं होती. त्यामुळे 'पडद्यामागे कोणत्या हालचाली चालू आहेत याची मला कल्पना आहे' अशी जाणीवहि त्यांनी करून दिली. याचा स्पष्ट अर्थ हा होता की, सिंडिकेटकडून त्यांचा रस्ता अडवून धरण्याचे जे उद्योग सुरू होते त्यावर मात करण्याची त्यांची तयारी होती.

त्यानंतर २१ जुलैला कॉंग्रेस-कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीपूर्वी पंत-प्रधानांनी चव्हाण आणि अन्य ज्येष्ठ सहकाऱ्यांशीं अगोदर चर्चा केली आणि कार्य-कारिणींत पक्षाच्या ज्येष्ठांनी कांही पेंच निर्माण केल्यास मंत्रिमंडळांतील सर्वांनी त्या-विरुद्ध संघटितपणें उभं ठाकलं पाहिजे असं सुचवलं; परंतु त्या दिवशींची कार्यकारिणीची बैठक शिथिल, सुस्तीच्या वातावरणांतच संपली. पक्षांतर्गत निर्माण झालेल्या मतभेदां-संबंधी कुणी कांही शब्दहि उच्चारला नाही. उलट अपोलो-११ या उपग्रहाच्या अंतराळ-वीरांनी उड्डाणामध्ये मिळवलेल्या यशाचं कौतुक करण्यांतच त्यांनी वेळ दवडला. नाही म्हणायला, इंदिरा गांधी आणि निजलिंगप्पा यांनी एकत्र बसून मोरारजींच्या राजी-नाम्यांतून निर्माण झालेल्या परिस्थितीचा, आपापला इतमाम राखून खल करावा, एवढं ठरवलं.

सिंडिकेटशीं मिळतं-जुळतं घ्यावं अशी इंदिराजींना मुळीच घाई नव्हती. बंगलोर-मध्ये सिंडिकेटनं त्यांचा चांगलाच पाणउतारा केला होता. राष्ट्रपतिपदाची निवडणूक होईपर्यंतच्या काळांत लढाऊ पवित्रा स्वीकारण्यासाठी पक्षाचे ज्येष्ठ-श्रेष्ठ मात्र आतुर बनलेले होते, तर यशवंतराव हे त्यांनी दिलेल्या वचनांतून कसं मुक्त होतां येईल यासाठी प्रयत्नशील होते. इंदिरा गांधी यांच्या पुरोगामी धोरणाला आपला संपूर्ण पाठिंबा द्यायचा आणि त्याच वेळीं सिंडिकेटशी क्षणैक स्वरूपाचे निर्माण झालेले संबंध चालू ठेवायचे, याचा समतोल राखणं त्यांना कठीण झालं होतं.

अखेर २२ जुलैला इंदिराजींनी, संजीव रेड्डी यांच्या उमेदवारी-अर्जावर मान्यतेची स्वाक्षरी केली. कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकींत सर्वांच्या उपस्थितींतच ही सही झाली. त्याच बैठकींत उपराष्ट्रपतिपदासाठी कॉंग्रेसनं, गोपालस्वरूप पाठक यांची उमेदवारी मान्य केली. निजलिंगप्पा हे संसदीय कॉंग्रेस-पक्षाचे सदस्य नव्हते. तरीहि त्यांना संसदीय पक्षाच्या बैठकीसाठी निमंत्रण द्यावं आणि त्यांनी रेड्डींना पाठिंबा देण्याच्या संदर्भात सभासदांना आवाहन करावं, असंहि बैठकींत ठरवण्यांत आलं. बऱ्याच ओढाताणीनंतर या बैठकीचा दिवस मग एकदाचा निश्चित झाला. पंतप्रधान आणि निजलिंगप्पा या दोघांच्याहि गटांतील लोकांना त्यासाठी बरीच धांवपळ करावी लागली होती. या दोन्ही गटांत कमालीचे मतभेद निर्माण झालेले असतांनाहि, अशी

संयुक्त बैठकीपर्यंत मजल गेली याचा अर्थ, पुढच्या काळांत आता गोष्टी हळूहळू सुरळीत घडूं लागतील अशी त्या वेळीं यशवंतरावांची समजूत झाली; परंतु नंतरच्या काळांतहि पंतप्रधान आणि काँग्रेस-नेते यांच्यांतील मूलभूत मतभेद वाढततच राहिले.

पक्षाच्या संघटनेमध्ये काँग्रेस-कार्यकारिणी श्रेष्ठ की पंतप्रधान श्रेष्ठ, हा मुख्य वाद होता. परंतु पक्षाचं धोरण ठरवण्याबाबत आणि ते राबवण्याबाबत कार्यकारिणीच ठिसूळपणा, निरनिराळ्या पक्षांतील राजकीय गुंतागुंत आणि त्यांतून काँग्रेस-अंतर्गत निर्माण झालेले तणाव, ओढाताण यांमुळे नेमकी कशाची निवड करायची हें मोठं कठीण ठरलं. स्वतंत्र आणि जनसंघ हे दोन पक्ष सिंडिकेटला जवळचे वाटत होते, तर उजवे कम्युनिस्ट आणि द्रविड मुन्नेत्र कळहम् हे इंदिरा गांधींच्या गटाला पाठिंबा देण्याच्या पवित्र्यांत होते.

राष्ट्रपतिपदाची निवडणूक नजीक येऊन ठेपतांच पक्षोपपक्षांतील हालचालींना जोर चढला. जनसंघ, स्वतंत्र आणि भारतीय क्रांतिदल यांनी मधेच राष्ट्रपतिपदासाठी चिंतामणराव देशमुखयांची उमेदवारी पुढें केली. परंतु या पक्षांतील बऱ्याच जणांचा कल सिंडिकेटकडे म्हणजेच रेड्डींकडे असल्यानं देशमुख यांना विजयी करणं अवघड आहे, असं लवकरच त्यांच्या लक्षांत आलं. रेड्डींना विजयी करायचं, तर पंतप्रधानांचा पाठिंबा असल्याशिवाय हें घडणार नाही याची निजलिंगप्पा यांचीहि आता खात्री झाली होती. इंदिराजींनी रेड्डींच्या उमेदवारी-अर्जावर स्वाक्षरी केली होती हें खरं, परंतु त्यानंतर त्यांनी कमालीचा थंडपणा धारण केला होता. त्यामुळे निजलिंगप्पा आणि त्यांचे सहकारी यांनी काँग्रेस-उमेदवारासाठी अन्य पक्षांची मदत घेण्याचं ठरवलं.

ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यांतच मग निजलिंगप्पा यांनी, इंदिराजींना अंधारांत ठेवून, जनसंघाचे अध्यक्ष अटलबिहारी वाजपेयी यांची भेट घेतली. स्वतंत्र पक्षाचे अध्यक्ष एम्. आर. मसानी यांना न्याहारीसाठी बोलावून त्यांच्याशीं आणि डाह्याभाई पटेल, एन्. दांडेकर यांच्याशीं चर्चा केली. काश्मीरचे नेते बक्षी गुलाम महंमद यांनाहि त्यांनी गाठलं.

दरम्यानच्या काळांत काँग्रेस-अंतर्गत दोन्ही गटांतील अति उत्साही लोकांनी एकमेकांविरुद्ध टीकेची आघाडी उघडली. श्रीमती तारकेश्वरी सिन्हा या मोरारजींच्या प्रवक्त्या. त्यांनी मुंबईच्या 'करंट' साप्ताहिकांत, इंदिरा गांधींवर कठोर टीका करणारा एक लेख लिहिला. या लेखावरच मग वादळ सुरू झालं. संजीव रेड्डी यांना सर्वांचा पाठिंबा मिळण्यासाठी म्हणून ६ ऑगस्टला, संसदीय काँग्रेस-पक्षाची बैठक सुरू होतांच, कांही सभासदांनी, तारकेश्वरी सिन्हा यांनी लिहिलेल्या लेखाबद्दल अध्यक्षांनी शिस्तभंगाची कोणती कारवाई केली आहे, असा सवाल विचारला. वस्तुतः हा प्रश्न विचारला जातांच निजलिंगप्पा यांनी त्या लेखाबद्दल नापसंती व्यक्त करायला हवी होती. परंतु तें न करतां त्या लेखासंबंधांत माझ्याकडे कुणी लेखी तक्रार केली तर पाहूं, त्याचा

विचार करूं, असं गुळमुळीत उत्तर देऊन त्यांनी प्रश्न बाजूला सारला. त्यासरशी सभेंत गोंधळ उडाला आणि पक्षांतर्गत पुन्हा तणाव वाढला.

संसदीय काँग्रेस-पक्षाच्या बैठकींतील त्या घटनेनंतर आपल्याविरुद्ध आता एक टोळीच तयार झालेली आहे, अशी पंतप्रधानांची खात्री झाली. त्याच रात्रीं किंवा दुसऱ्या दिवशीं मग त्यांनी संजीव रेड्डी यांच्या निवडणुकीला विरोध करण्याचं ठरवलं असलं पाहिजे.

संसदीय काँग्रेस-पक्षाच्या बैठकींतील विरोध पाहून सिंडिकेटचे नेतेहि चपापले. आपल्या उमेदवाराला आता भरघोस पाठिंबा मिळण्याची शक्यता उरलेली नाही याचं दर्शन त्यांना या बैठकींतच घडलं होतं. काँग्रेसचे खासदार पक्षाच्या उमेदवारालाच मतदान करतील याची शाश्वति उरली नाही त्यामुळे पंतप्रधानांनीच आता रेड्डी यांना पाठिंबादर्शक पत्रक जाहीर करावं असा निजलिंगप्पा यांनी व्यूह रचला.

परंतु निजलिंगप्पा यांचा हा डाव पंतप्रधानांनी सिद्ध होऊं दिला नाही. त्याचं कारणहि स्पष्ट होतं. पंतप्रधानांनी मतदारांसाठी लेखी आवाहन करणं याचा अर्थ मतदारांवर दबाव आणल्यासारखं घडणार होतं. डॉ. झाकीर हुसेन यांच्या निवडणुकीच्या वेळीं पंतप्रधानांनी तसं आवाहन केलंहि होतं; परंतु त्या संदर्भात विरोधी पक्षाचे खासदार मधु लिमये यांनी हरकत घेऊन तें प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोंचवलं होतं. त्यामुळे या वेळीं पंतप्रधान स्वस्थ राहिल्या. परंतु काँग्रेसच्या गोटांत मात्र वेगळंच वातावरण निर्माण झालं. रेड्डी यांना पंतप्रधानांचा पाठिंबा नाही अशी समजूत सरसकट निर्माण झाल्यानं काँग्रेस-खासदारांच्या गोटांतून रेड्डींबद्दल टीका ऐकूं येऊं लागली. संसदीय काँग्रेस-पक्षाच्या कार्यालयांतील अधिकाऱ्यांनी तर इंदिराजींना भेटून निवडणुकीच्या मतदानांत फाटाफूट होण्याची लक्षणं दिसूं लागलीं असून तसं घडलं आणि काँग्रेसचे उमेदवार पराभूत झाले तर पक्ष दुभंगण्याची भीति आहे अशी माहिती त्यांना दिली. परंतु या निवडणुकीनंतर सरकार कोसळवण्यासाठी डाव रचले जात असल्याबद्दलचा संशय इंदिराजींनी व्यक्त करतांच परिस्थितीला आणखी निराळंच वळण लागलं. अर्जुन अरोरा आणि दुसरे एक तरुण तुर्क खासदार यांनी त्यानंतर आपण काँग्रेस-उमेदवाराला मत देणार नसून गिरी यांना मतदान करणार आहोंत अशी जाहीर आरोळी ठोकली – काँग्रेसश्रेष्ठांविरुद्ध बंडाचं निशाण फडकवलं. दुसरे एक खासदार शशिभूषण यांनी तर निजलिंगप्पा यांच्याकडून मतदानाच्या बाबतींत मोकळीकच मिळवली.

या सर्व घडामोडी सुरू असतांनाच ११ ऑगस्टला रात्रीं पंतप्रधानांच्या निवासस्थानीं जगजीवनराम फक्रुद्दीन अलि अहंमद आणि बंगालचे पुढारी सिद्धार्थ शंकर रे यांची बैठक होऊन काँग्रेस-अंतर्गत निर्माण झालेल्या असंतोषाचा आणि सिंडिकेटच्या पवित्र्याचा गंभीरपणानं विचार करण्यांत आला. त्यांतूनच मग निवडणुकीच्या वेळीं मतदानासाठी सर्वांना स्वातंत्र्य असावं अशी मागणी करणारं एक पत्र जगजीवनराम

आणि फक्रुद्दीन अलि अहमद यांच्या सहीनं निजलिंगप्पा यांच्याकडे रवाना करण्यांत आलं. याच पत्रांत त्यांना असा सवाल विचारण्यांत आला की, जनसंघ स्वतंत्र यांसारखे जे पक्ष पंतप्रधानांना हटविण्याची मागणी करत आहेत त्यांच्याशीं काँग्रेस-अध्यक्ष हे चर्चा कशी करूं शकतात ?

निजलिंगप्पा यांचं यावर उत्तर असं मिळालं की, निवडणुकांच्या वेळीं सर्वच मतदारांशीं आपणांस संपर्क ठेवावा लागतो. त्याच्याहि पुढे त्यांचं म्हणणं असं की, विरोधकांचा पाठिंबा मिळवण्याचा हेतु, काँग्रेस-पक्षांत कांही फाटाफूट अपेक्षित आहे म्हणून नव्हे, तर निवडणुकीबाबत दक्ष राहिलं पाहिजे म्हणूनच विरोधकांशीं चर्चा करण्यांत आली आहे. काँग्रेसमध्ये कांही दुफळी निर्माण झाली आहे किंवा नजीकच्या काळांत तशी ती होईल असं वाटत नाही.

या सर्व गोंधळाच्या, राजकीयदृष्ट्या अनिश्चिततेच्या आणि पक्षनिष्ठेला तडा गेलेल्या वातावरणांत यशवंतरावांचं मन संदिग्ध अवस्थेत हेलकावे खात राहिलं होतं. त्यांतच १२ ऑगस्टला कामराज यांनी यशवंतरावांना बोलावून घेतलं आणि त्यांचा रेड्डींना पाठिंबा मिळवण्याच्या संदर्भात बोलणीं केलीं. यशवंतरावांनी रेड्डींना आपला पाठिंबा असल्याचं त्यांना सांगितलं; परंतु त्याचबरोबर काँग्रेसमधील दोन्ही गटांनी यासाठी एकत्र राहून दुफळी टाळण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. यशवंतरावांनी त्याच दिवशीं इंदिरा गांधी यांचीहि भेट घेतली आणि रेड्डी यांना दिलेलं आपलं वचन कायम असल्याचं स्पष्ट केलं. त्याचबरोबर पक्षांतर्गत निर्माण झालेला तंटा नाहीसा होण्याच्या दृष्टीनं कांही मार्ग शोधून काढा, असंहि त्यांनी इंदिराजींना सुचवलं.

परंतु या निवडणुकीनंतर पंतप्रधानपदावरून आपल्याला हुसकून लावण्याचा सिंडिकेटचा पक्का निर्णय झालेला आहे याबद्दल इंदिराजींची खात्री झाली होती. त्यांनी मग १३ ऑगस्टला निजलिंगप्पांना एक पत्र लिहून, काँग्रेस-अध्यक्षांनी जनसंघ आणि स्वतंत्र पक्षांशीं संधान बांधल्यानं, निरनिराळ्या राज्यांतील काँग्रेस-आमदारांमध्ये कमालीची चीड निर्माण झालेली असून, पक्षानं संजीव रेड्डी यांच्या उमेदवारीला दिलेल्या मान्यतेला आता कांही अर्थ उरलेला नाही असं कळवून टाकलं.

त्यानंतरहि या दोघांमध्ये पत्रापत्री होत राहिली. १५–१६ ऑगस्टच्या पत्रांत तर मतदारांना या निवडणुकींत कुणाला मतदान करायचं यासंबंधी मोकळीक असावी अशी मागणी पंतप्रधानांनीच केली. निजलिंगप्पांनी या मागणीबाबत खेद व्यक्त केला. पंतप्रधानांना पाठवलेल्या उत्तरांत त्यांनी असंहि नमूद केलं की, पंतप्रधानांनी आपल्या पक्षातर्फे निश्चित केलेली उमेदवारी मान्य करून उमेदवारी-अर्जावर सूचक म्हणून स्वाक्षरी केल्यानंतर, त्यांनीच विरोधी उमेदवाराला पाठिंबा दिल्याचं उदाहरण इतिहासांत कधी घडलेलं नाही.

पक्षांतर्गत अशी ही झटापट सुरू असतांनाच १६ ऑगस्ट हा राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा दिवस उगवला आणि त्या दिवशीं दिल्लींतील लोकसभाभवनांतील सेंट्रल हॉलमध्ये आणि अन्य १७ राज्यांत मतदान पार पडलं.

मतदान संपतांच निरनिराळ्या राज्यांतील मतदान जाणून घेण्यासाठी निजलिंगप्पा व्यग्र बनले. सिंडिकेटच्या कार्यालयांत त्या संध्याकाळीं, आनंदाचं वातावरण पसरलं होतं. ' आम्हीं जिंकली ' हाच त्यांच्या चेहऱ्यावरील भाव होता. सायंकाळीं ६ वाजतां तर निजलिंगप्पा यांनी पुढचे बेत आखण्याच्या दृष्टीनं मोरारजी देसाई, स. का. पाटील, अतुल्य घोष, कामराज आणि चव्हाण यांना एका खास बैठकीसाठी पाचारण केलं; परंतु यशवंतराव या बैठकीसाठी उपस्थित राहिले नाहीत.

मोरारजी देसाई बैठकीच्या ठिकाणीं मोठ्या खुषींत आले आणि 'आपण जिंकणार ' असं आल्याबरोबर सांगून आपला हर्ष व्यक्त केला. याच बैठकींत एक भयंकर निर्णय करण्यांत आला. जगजीवनराम आणि फक्रुद्दीन अलि अहंमद यांनी सिंडिकेटच्या मतानुसार कॉंग्रेस-अध्यक्षांना या निवडणुकीच्या संदर्भांत प्रतिकार केला होता. त्याबद्दल त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विचार या बैठकींत झाला. चर्चेच्या वेळीं शिस्तभंगाची कारवाई करण्याच्या निर्णयाबद्दल मतभेद झाले हें खरं, तरी पण या गुन्ह्याबद्दल कांही तरी कडक कारवाई करावी याबद्दल सिंडिकेटमध्ये दुमत नव्हतं.

पक्षांतील जुन्या आणि जाणत्या नेत्यांनी एकत्र बसून चर्चा करावी, एकमेकांना समजून घ्यावं आणि हा प्रश्न संपवून टाकावा, असा यशवंतरावांचा दृष्टिकोन होता. दरम्यान पंतप्रधानांचे पाठीराखे आणि तरुण तुर्क यांनी त्याच दिवशीं मध्यरात्रीं एक बैठक घेऊन पक्षांतर्गत निर्माण झालेलं संकट कसं टाळतां येईल याचा विचार केला. पक्षांतील सर्वसामान्य कार्यकर्त्यांची इच्छा, समजूतदारपणानं उभयपक्षीं समझोता घडून यावा अशी होती. परंतु तथाकथित कॉंग्रेस 'हायकमांड' आणि पंतप्रधान, हे मात्र एकत्र बसून विचारविनिमय करण्याच्या मनस्थितींत उरले नव्हते. एकमेकांबद्दल कमालीचा अविश्वास निर्माण झालेला होता.

पक्षांतर्गत दुफळी टाळावी यासाठी यशवंतरावांचा प्रयत्न सुरूच होता. १७ ऑगस्टला कामराज यांनी त्यांची भेट घेतली आणि निजलिंगप्पा यांनी आयोजित केलेल्या बैठकीला त्यांनी उपस्थित रहावं यासाठी आग्रह धरला. चव्हाण यांनी सिंडिकेटच्या भजनीं लागावं यासाठी सिंडिकेटमधील नेते, कामराज यांच्यामार्फत यशवंतरावांशीं लाडीगोडी करत आहेत, अशी एक अफवा त्या वेळीं कुणी तरी सोडून दिली होती. संसदीय कॉंग्रेस-पक्षाचे नेते म्हणून यशवंतरावांना निवडण्याची सिंडिकेटची तयारी आहे, चव्हाणांनी खंबीर भूमिका स्वीकारावी, असंहि कामराज यांनी त्यांना सांगितलं आहे, अशीहि एक अफवा होती.

कामराज यांनी काँग्रेसच्या आणि सरकारच्या भवितव्याबद्दल यशवंतरावांशीं चर्चा केली होती. परंतु सिंडिकेटनं कांही कारवाई करण्यासाठी, कृति करण्यासाठी पाऊल उचललं, तर त्याच्याशीं आपण सहमत होणार नाही, वचनबद्ध रहाणार नाही, असं यशवंतरावांनी त्यांना स्पष्टच बजावलं होतं. सत्ता म्हणजेच सर्वस्व, अशी सिंडिकेट-च्या नेत्यांची भूमिका होती आणि सामाजिक बदलाचं साधन या दृष्टीनं ते सत्तेकडे पहात नव्हते. त्यामुळे सिंडिकेटच्या कुठल्याच कृतीवर यशवंतरावांचा विश्वास उरला नव्हता.

निजलिंगप्पा यांना अध्यक्षपदावरून हुसकून लावण्यासाठी म्हणून अ. भा. काँग्रेसचं अधिवेशन भरवावं अशी हालचाल पंतप्रधानांच्या गोटांत सुरू झाली होती. या संदर्भात यशवंतरावांनी १८ ऑगस्टला इंदिराजींची भेट घेऊन चर्चा केली आणि अधिवेशन भरवण्याचा विचार रद्द करावा असं सुचवलं. काँग्रेस-अध्यक्ष आणि नेते यांच्याशीं चर्चा करण्यासंबंधीहि त्यांनी सुचवलं. पंतप्रधानांनी यशवंतरावांच्या सूचनेला अनुकूल प्रतिसादहि दिला.

परंतु या चर्चेचा सारांशनिजलिंगप्पा यांना सांगून त्यांनी शिस्तभंगाची कारवाई करण्याचं स्थगित करावं असं त्यांना सुचवलं; त्या वेळीं त्यांनी अनुकूल प्रतिसाद दिला नाही. त्यांची दुराग्रही आणि ताठर भूमिका पाहून यशवंतराव मात्र निराश बनले. राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकींत रेड्डी हेच विजयी होणार या घमेंडींत निजलिंगप्पा बोलत होते.

मतदानानंतरचे चार दिवस अशा प्रकारे पक्षांतर्गत ओढाताण सुरू राहिली होती. अखेर २० ऑगस्टला या निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन वराहगिरी व्यंकटगिरी हे विजयी झाले. रेड्डींच्या आणि त्यांच्या मतांतील अंतर तसं कमी होतं पण रेड्डी पराभूत ठरले होते. या निवडणुकीमुळे सिंडिकेटचे पाठीराखे खवळले आणि दुसऱ्याच दिवशीं ७० काँग्रेस-खासदारांनी निजलिंगप्पांना भेटून पंतप्रधान इंदिराजी जगजीवनराम आणि फक्रुद्दीन अलि अहंमद यांची पक्षांतून हकालपट्टी करावी अशी मागणी केली. त्या निवडणुकींतील काँग्रेस-उमेदवाराच्या पराभवास हे सर्वजण कारणीभूत आहेत असा त्यांचा आरोप होता. शिस्तभंगाची कारवाई करण्याबाबत निजलिंगप्पा हे आतुर बनलेलेच होते. त्यामुळे त्यांना अधिक कांही समजून सांगण्याची गरजच नव्हती. कामराज आणि मोरारजी देसाई यांची त्यांना तशी फूस होतीच.

दुसऱ्या गोटांत मात्र निराळंच कांही घडत होतं. पंतप्रधानांच्या पाठीराख्यांनी २४८ काँग्रेस-खासदारांनी२३ ऑगस्टला काँग्रेसचे माजी अध्यक्ष डी. संजीवय्या यांच्या निवासस्थानीं एक बैठक घेऊन इंदिरा गांधींच्या नेतृत्वास आपला पाठिंबा व्यक्त केला. पंतप्रधानांनी काँग्रेसला नवी दिशा दाखवून पक्षाची उंची वाढवली आहे आणि सामाजिक

व आर्थिक कार्यक्रमाच्या दृष्टीनं पक्ष आणि जनता यांतील अंतर कमी केलं आहे, असं मत या बैठकींतील ठरावांत व्यक्त करण्यांत आलं.

गिरी विजयी झाल्यानंतर मात्र पक्षांतर्गत समोरासमोर सुरू झालेल्या ओढाताणीमुळे दोन्ही गोटांत अस्वस्थता माजली होती. पक्ष दुभंगण्याची धास्ती सर्वांनाच वाटूं लागली होती; परंतु पक्षांतील ऐक्य टिकवण्यापेक्षा पक्षांत शिस्त निर्माण करण्याच्या काळजीनंच सिंडिकेटला पोखरलं होतं. त्यांतूनच मग पंतप्रधान आणि त्यांचे दोन सहकारी जगजीवनराम व फक्रुद्दीन अलि अहंमद यांच्याविरुद्ध करायच्या कारवाईचं स्वरूप कोणतं असावं याची चर्चा करण्यासाठी निजलिंगप्पा यांनी २५ ऑगस्टला कार्यकारिणीची बैठक आयोजित केली.

प्रक्षोभक वातावरणांतच ही बैठक त्या दिवशीं सुरू झाली. पंतप्रधानांविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई करण्यांत येणार, असेच अंदाज अगोदर व्यक्त होत राहिले होते. निजलिंगप्पा यांचं प्राथमिक स्वरूपाचं बोलणं सुरू होऊन आता मुख्य विषयावर चर्चा सुरू होणार तोंच यशवतराव पुढे सरसावले. सभासदांना उद्देशून त्यांनी आवाहन केलं की, आपण एवढ्या संकटाच्या परिस्थितींतून गेल्यानंतर, आता तरी निदान सर्वांनी एकत्र यावं यासाठी मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यशवंतरावांनी हें आवाहन केलं खरं, पण एकत्र येण्याचा मार्ग काढायचा तयारींत होते. त्यांनी ठरावाचा एक मसुदाच तयार ठेवला होता. कार्यकारिणीसमोर तोंच त्यांनी वाचून दाखवला.

या ठरावांत कोणाला बोट शिरकवतां येईल अशी त्यांत जागाच ठेवण्यांत आली नव्हती. स. का. पाटील यांनी सुद्धा 'ठराव ठीक आहे' असं म्हटलं, परंतु लगेच एक पुस्ती जोडली की, कॉंग्रेस-अध्यक्षांनी जनसंघ आणि स्वतंत्र पक्ष यांच्याशीं चर्चा केल्याबद्दल जे दोषारोप केले गेले आहेत त्याचा कार्यकारिणीनं परामर्श घेतला पाहिजे. कांही सदस्यांनी लगेच या सूचनेला उचलून धरलं. त्यावर चर्चा होऊन अखेरीस विरोधी पक्षाशीं चर्चा करण्यामागे अध्यक्षांचा कांही खास हेतु नव्हता असं गृहीत धरून, त्यांना मग दोषमुक्त ठरवण्यांत आलं. त्यानंतर यशवंतरावांनी सादर केलेल्या ठरावांत किरकोळ एक-दोन शब्दांचा बदल करून त्यासहि एकमतानं मान्यता देण्यांत आली.

ठराव संमत होतांच यशवंतरावांनी निःश्वास सोडला. पक्षाच्या ऐक्यावर निर्माण झालेलं एक भयंकर संकट परतवतां आलं याचं त्यांना समाधान वाटत होतं. परंतु नंतरच्या काळांत ज्या घटना घडत गेल्या त्यांनी मात्र यशवंतरावांचं तें समाधान चुकीचं होतं हेंच सिद्ध केलं. एक गोष्ट मात्र खरी की, चव्हाणांच्या त्या ठरावाचं इंदिराजींनी स्वागत केलं. त्यांनी अशी प्रतिक्रिया व्यक्त केली की, कॉंग्रेस-पक्ष आपापसांत तडजोड करण्याला समर्थ असून, सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या, पक्षाकडून ज्या अपेक्षा आहेत त्या यापुढच्या काळांतहि आता प्रतिबिंबित होत रहातील. आता सर्व संपलं. दोन गटांत

निर्माण झालेला तात्कालिक झगडा चव्हाणांच्या मध्यस्थीच्या आणि शांतता-ठरावानं आता थांबला आहे.

पक्षामध्ये आता ज्यामुळे दुरावा निर्माण होईल असं कुणी कांही बोलूं नये किंवा कृति करूं नये असं निजलिंगप्पा यांनी कार्यकारिणीच्या त्या बैठकींत सांगितलं होतं. कारण जी कांहीं टीका करायची होती, पंतप्रधानांना दोषी ठरवायचं होतं, त्यांना हुकूमशहा म्हणायचं होतं, तें या बैठकींत निजलिंगप्पा आणि स. का. पाटील यांनी अगोदरच बोलून घेतलं होतं.

राष्ट्रपतिपदाची निवडणूक संपल्यानंतर यशवंतरावांवरील वचनपूर्तीचं तें ओझं आता निघून गेलं होतं. आणि आता ते निःसंदिग्धपणें पंतप्रधानांच्या पाठीशीं उभे राहिले होते तरी सुद्धा यशवंतरावांनी त्या अगोदरच्या काळांत, पक्षाचं ऐक्य संकटांत असतांना, जें कार्य केलं आणि भूमिका स्वीकारली त्याबद्दल अजूनहि कोणी टीकाकार त्यांना सवाल करत राहिले होते आणि 'कुंपणावर बसणारे' म्हणून बोट दाखवत होते. चव्हाणांची स्थिति मात्र त्या काळांत एकाकी पडल्यासारखी झाली होती. मनांतून ते दुःखी होते.

पंतप्रधान आणि त्यांचे दोन सहकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंग करण्याची कृति यशवंतरावांच्या मध्यस्थीमुळे तूर्तास बाजूला पडली होती, तरी त्यामुळे यशवंतरावांच्या मध्यस्थाच्या भूमिकेला पूर्णविराम मिळाला होता असं नव्हे; कारण सिंडिकेटचा आक्रमक पवित्रा अजून कायम होता. कार्यकारिणीनं ऐक्याच्या ठरावाला मान्यता दिली होती, पण त्यामुळेच सिंडिकेटच्या नेत्यांचं पित्त खवळलं होतं आणि या ठरावाला सुरुंग कसा लावतां येईल यासाठी ते संधि शोधत होते; आणि पंतप्रधानांच्या नियोजित तामिळनाडूच्या दौऱ्यानं त्यांना ही संधि मिळवून दिली.

कामराज आणि सुब्रह्मण्यम् यांच्यांत त्या वेळीं बेबनाव निर्माण झाला होता सुब्रह्मण्यम् हे आपल्या विरुद्ध काँग्रेस-कार्यकर्त्यांना फितवतात आणि आपल्याला अलग पाडण्याचा उद्योग करतात, असा कामराज यांचा आक्षेप होता. तो राग मनांत ठेवून पंतप्रधानांसाठी तामिळनाडूच्या दौऱ्याची केलेली व्यवस्था उधळून लावण्याचा पवित्रा त्यांनी घेतला. कारण या दौऱ्याची व्यवस्था सुब्रह्मण्यम् यांनी पुढाकार घेऊन केलेली होती. या दोघांमधील मतभेद इतके विकोपाला गेले की, पंतप्रधानांच्या त्या नियोजित दौऱ्याच्या कांही दिवस अगोदरच सुब्रह्मण्यम् यांनी प्रदेश-काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. सिंडिकेटच्या नेत्यांवर विशेषतः कामराज यांच्यावर त्यांनी कठोर टीका केली. कामराज यांच्या मनांतील पंतप्रधानांसंबंधीच्या प्रतिकूल मताला आता मत्सराचं स्वरूप प्राप्त झालं आहे, असा त्यांचा स्पष्ट आरोप होता.

नजीकच्या काळांत अन्यत्र जे भयंकर स्फोट होणार होते त्याची रंगीत तालीमच जणू कांही मद्रासमध्ये सुरू झाली होती. उत्तर-प्रदेशमध्येहि मुख्य मंत्री सी. बी. गुप्ता

आणि कमलापति त्रिपाठी यांच्यांत चकमकी सुरू झाल्या होत्या. गुप्ता हे सिंडिकेटप्रणीत मुख्य मंत्री होते. अन्य राज्यांतूनहि प्रतिहल्ला चढवण्याची तयारी होत असल्याची चिन्हं उमटूं लागलीं होतीं.

त्यामुळे यशवंतरावांनी पुन्हा निजलिंगप्पा यांची भेट घेऊन पक्षांतर्गत थंडें युद्ध थांबण्यासाठी आणि एकमेकांच्या मनांतील संशय दूर होण्यासाठी कार्यकारिणीची आणि अ. भा. कॉंग्रेसची बैठक बोलवावी असं सुचवलं. निजलिंगप्पा यांच्या मनांत कदाचित् त्या वेळीं दुसरंच कांही शिजत असेल, पण चव्हाणांना त्यांनी त्यासाठी मान्यता दिली; परंतु पुढे कदाचित् त्यांच्या सहकाऱ्यांनी, त्यांच्या मनांत संशय निर्माण करून दिलेला असावा की, न जाणो कार्यकारिणींत आणि अधिवेशनांत पंतप्रधानांचा गट मात करून अध्यक्षांनाच हुसकून लावून देण्याची शक्यता आहे! तरी पण निजलिंगप्पा यांनी कार्यकारिणीच्या बैठकीसाठी ऑक्टोबरमधील एक दिवस निश्चित केला. परंतु त्यांनीच तो दिवस गैरसोयीचा म्हणून रद्द करून दुसरा दिवसहि निश्चित केला आणि अगदी शेवटच्या क्षणीं त्यांतहि बदल केला.

याचा अर्थ सत्तेच्या लढाईसाठी दोन्ही गट आता नव्यानं समोरासमोर उभे ठाकण्याचा प्रसंग निर्माण करण्याच्या तयारीला लागले होते. सुब्रह्मण्यम् यांनी तामिळनाडू प्रदेश-कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर त्यांचं कॉंग्रेस-कार्यकारिणीचं आणि अ. भा. कॉंग्रेसचं सदस्यत्व रद्द झालेलं आहे, असा पवित्रा सिंडिकेटनं स्वीकारून त्यांना कार्यकारिणींतून दूर करण्याचा निर्णय लवकरच केला जाणार आहे याचा कानोसा, पंतप्रधानांच्या गोटाला लागला होता. या संदर्भात पंतप्रधानांच्या गोटांतील प्रमुख नेत्यांची बैठक होऊन निजलिंगप्पा यांचा डाव कसा हाणून पाडतां येईल याची चर्चा झाली. पंतप्रधानांच्या खास अंतर्गत गोटांत त्या वेळीं जगजीवनराम, फक्रुद्दीन अलि अहंमद, सरदार स्वर्णसिंग हे तर होतेच, शिवाय विशेष प्रसंग निर्माण झाल्यास यशवंतराव, दिनेशसिंग, उमाशंकर दीक्षित आणि सी. सुब्रह्मण्यम् यांचीहि उपस्थिति असायची. ९ ऑक्टोबरला या नेत्यांनी तीन तास चर्चा करून आपल्या प्रतिडावाची आखणी केली.

त्यानुसार इंदिरा गांधी, यशवंतराव, जगजीवनराम फक्रुद्दीन अलि अहंमद आणि सरदार स्वर्णसिंग यांच्या सहीनं, ९ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीनंतर निजलिंगप्पा यांच्याकडे एक खलिता रवाना झाला. सी. सुब्रह्मण्यम् यांना कार्यकारिणींतून आणि कमलापति त्रिपाठी वगैरे अन्य नेत्यांना संघटनेंतील त्यांच्या जागेवरून दूर करण्याच्या अध्यक्षांच्य एकतर्फी निर्णयासंबंधांत त्यांना खलित्यांत इशारा देण्यांत आला होता. कार्यकारिणीनं ऐक्याचा जो ठराव संमत केला होता त्याची अंमलबजावणी होण्याच्या कामीं, अध्यक्षांच्या या कृतीनं अडथळा निर्माण होणार असल्यानं, या प्रश्नाचा विचार करण्यासाठी १५ ऑक्टोबरला कार्यकारिणीची बैठक आणि मागोमाग अखिल

भारतीय काँग्रेसचं खास अधिवेशन १५ नोव्हेंबरपूर्वी घेण्यांत यावं, असं सुचवण्यांत आलं होतं.

परंतु निजलिंगप्पा यांनी या खलित्याचा, संघटनेंतील ऐक्याच्या दृष्टीनं विचार न करतां, उलट एक खरमरीत उत्तर पाठवलं की, " सुब्रह्मण्यम् यांना मी अद्याप कांहीहि कळवलेलं नाही. संघटनेंतील जबाबदार सहकाऱ्यांनी उच्छृंखलपणानं असले आरोप करूं नयेत. "

निजलिंगप्पांकडून हें उत्तर मिळतांच पंतप्रधानांच्या गोटांत काँग्रेस-पक्षाच्या अध्यक्षाची नव्यानं निवडणूक करण्यासाठी म्हणून, अ. भा. काँग्रेस-सदस्यांचा पाठिंबा गोळा करण्यासाठी वेगानं हालचाली सुरू झाल्या. फक्रुद्दीन अलि अहमद, जगजीवनराम आणि उमाशंकर दीक्षित यांनी या कामीं पुढाकार घेतला. त्यासाठी जें आवाहन करण्यां आलं त्या पत्रकावर यशवंतरावांचीहि स्वाक्षरी होती. १९६९ च्या डिसेंबरमध्येच नव्या अध्यक्षांची निवड त्यांना करायची होती. त्यासाठी खास अधिवेशनाची जी मागणी करण्यांत आली त्यावर अ. भा. काँग्रेसच्या ७०५ प्रतिनिधींपैकी पंतप्रधानांच्या बाजूनं ४०५ प्रतिनिधींनी पाठिंबा दिला.

पंतप्रधानांच्या गोटांतून देण्यांत आलेल्या या अगदी अनपेक्षित तडाख्यानं सिंडिकेटवाले चक्रावून गेले. ' संघटनेंत मी कुठे उभा आहे आणि माझी काय अवस्था आहे, हें माझं मलाच कळेनासं झालं आहे ' अशी प्रतिक्रिया निजलिंगप्पा यांनी या संदर्भांत बंगलोर इथे २१ ऑक्टोबरला व्यक्त केली. कामराज, संजीव रेड्डी, निजलिंगप्पा यांनी बंगलोरमध्ये या नव्यानं निर्माण झालेल्या परिस्थितीचा खल केला; परंतु काँग्रेसच्या बहुसंख्य प्रतिनिधींनी दिलेल्या आव्हानाला कसं तोंड द्यावं यासाठी डाव-प्रतिडावाची आखणी करणं त्यांना जमलं नाही.

पक्षांतर्गत सुरू झालेल्या सत्तेच्या राजकारणांतील पडसाद आता दिल्लीबाहेर निरनिराळ्या राज्यांच्या राजधानींतून आणि जिल्हा-पातळीपर्यंत उमटूं लागले. संघटना आणि सरकार या दोन्ही ठिकाणीं सारा विस्कळितपणा निर्माण झाला होता. निजलिंगप्पा यांना बडतर्फ करून पक्षाचीं सूत्रं ताब्यांत घेण्यावरच पंतप्रधानांच्या गोटानं सारं लक्ष केंद्रित केलं होतं. काँग्रेसचे मुख्य मंत्रीहि, दुफळीच्या वातावरणानं धास्तावले होते. त्यांच्यांतील वीरेंद्र पाटील आणि हितेंद्र देसाई यांनी दोन्ही गटांत मध्यस्थी करून समझोता करण्याचा प्रयत्न केला. परंतु कामराज वगळतां सिंडिकेटच्या टोळींतील अन्य कुणालाहि लोकप्रियतेचा आधार नाही हें आता सर्वांना उमजलं होतं. निजलिंगप्पा हे काळाच्या उलट पावलं टाकणारे, प्रतिगामी गृहस्थ असून सत्तेच्या ईर्षेनं झपाटलेल्या सिंडिकेटमधील दुष्ट बुद्धीच्या वृद्धांच्या घोळक्यांत बंदिवान होऊन पडलेले आहेत, असंच पंतप्रधानांच्या गोटांत मानलं जात होतं.

अशा वातावरणांतच १ नोव्हेंबर १९६९ ला निजलिंगप्पांनी कार्यकारिणीची बैठक बोलावली. बैठकींत कोणती भूमिका स्वीकारावी यासंबंधांत सिंडिकेटच्या नेत्यांत गोंधळ होता. कार्यकारिणींत दोघांची ताकत समान असल्यानं, त्याचा फायदा घेऊन सुब्रह्मण्यम यांना कार्यकारिणींतून दूर करण्याच्या प्रश्नाचा निकाल लावावा असं कामराज यांनी सुचवलं होतं. त्याचबरोबर इंदिरा गांधी चव्हाण जगजीवनराम आणि फक्रुद्दीन अील अहंमद यांना पक्षातून काढून टाकण्यांत आल्याचंहि त्यांना जाहीर करून घ्यायचं होतं. कार्यकारिणीच्या बैठकीपूर्वी मग सिंडिकेट-गोटांत त्या दृष्टीनं जोरानं हालचाली सुरू झाल्या. आणि २८ ऑक्टोबरला निजलिंगप्पा यांनी इंदिराजींना एक सहापानी पत्र लिहून पक्ष-विरोधी कारवाया करून पक्षांत दुफळी माजवण्याच्या प्रयत्नाबद्दल त्यांना दोष दिला. त्याचबरोबर कार्यकारिणीच्या बैठकीच्या आदल्या दिवशींच अध्यक्षांनी एक फतवा काढून सुब्रह्मण्यम् फक्रुद्दीन अलि अहंमद आणि शंकरदयाळ शर्मा या तिघांचं कार्यकारिणीचं सदस्यत्व रद्द करून टाकलं. या सगळ्या कटामागे कामराज यांचा हात आहे याबद्दल बहुसंख्य काँग्रेस-खासदारांची खात्रीच होती. कारण सुब्रह्मण्यम् यांना कार्यकारिणीच्य. त्या बैठकीसाठी सदस्य म्हणून निमंत्रण देण्यांत आलं होतं आणि बैठकीपूर्वी १२ तास अगोदर आता त्यांचं सदस्यत्व रद्द करण्यांत आलं होतं.

अंतर्गत मतभेदाचा आता अगदी कडेलोट झाला. त्यामुळे इंदिरा गांधी चव्हाण आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी त्या बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय केला आणि त्याच दिवशीं म्हणजे १ नोव्हेंबर१९६९ ला पंतप्रधानांच्या निवासस्थानीं – १ सफदरजंग रोड – इथेच एक वेगळी बैठक आयोजित केली. अ. भा. काँग्रेसची बैठक स्वतंत्रपणें बोलवावी आणि नवीन अध्यक्षांची निवडहि करावी असा निर्णय या बैठकींत करण्यांत आला. त्याच वेळीं निजलिंगप्पा आणि त्यांचे सहकारी यांची बैठक ७ जंतरमंतर रोडवरील पक्षाच्या कार्यालयांत झाली आणि अशा प्रकारे काँग्रेस-पक्षाच्या कार्यकारिणीची उभड उभड छकलं पडून दोन बाजूला दोन कार्यकारिणी अस्तित्वांत आल्या. पक्षाच्या नेत्यांचीहि आता उभड दोन छकलं झालीं. पंतप्रधानांच्या बाजूला त्या वेळीं चव्हाण जगजीवनराम फक्रुद्दीन अलि अहंमद ब्रह्मानंद रेड्डी मोहनलाल सुखाडिया वसंतराव नाईक सुब्रह्मण्यम् उमाशंकर दीक्षित आणि डॉ. शंकरदयाळ शर्मा हे ठामपणानं उभे राहिले.

कार्यकारिणींतून तिघांना हुसकून लावून सिंडिकेटनं राजकारण अगदी खालच्या पातळीवर पोंचवल्यानं यशवंतरावांच्या रागाचा पारा चढला होता. डावपेंचाची पद्धतशीर आखणी करून कार्यकारिणींत कृत्रिम रीतीनं आपलं बहुमत प्रस्थापित करण्याचा निजलिंगप्पा यांनी पक्षांतून दूर करण्याच्या आज्ञा ज्यांच्या संदर्भात काढल्या होत्या त्या मागे घ्याव्यात आणि कार्यकारिणीची बैठक पुढे ढकलावी असं त्यांना सुचवण्यांत आल होतं; परंतु तें न जुमानतां, कार्यकारिणीची बैठक घेण्याचा अट्टाहास त्यांनी कायम

ठेवल्यानं, त्या दिवशीं अलग अलग ठिकाणीं या बैठकी झाल्या. दोघांचीहि संख्या सम-समान म्हणजे प्रत्येकी दहा अशीच होती. केरळ प्रदेश-कॉंग्रेसचे अध्यक्ष अब्राहम यांनी दुटप्पीपणा करून दोन्ही ठिकाणच्या बैठकीस ते उपस्थित राहिले. खरं म्हणजे मनानं आणि राजकारणाच्या दृष्टीनंहि ते सिंडिकेटच्याच मताचे होते.

निजलिंगप्पा यांच्या अध्यक्षतेखाली त्यानंतर २ नोव्हेंबरला त्यांच्या कार्यकारिणीची बैठक झाली. त्या वेळीं इंदिरा गांधी यांना कॉंग्रेस-पक्षांतून काढून टाकण्याचा आग्रह सिंडिकेटवाल्यांनी धरला, परंतु हा निर्णय तातडीनं करण्याच्या विचारापासून त्यांना परावृत्त करण्यांत कांहींना यश मिळालं आणि तो निर्णय लांबणीवर पडला. उलट या बैठकींत संमत करण्यांत आलेल्या ठरावांत, पक्षांतील शिस्त आणि ऐक्य राखण्याच्या दृष्टीनं झालं गेलं बाजूला ठेवून पंतप्रधानांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपलीं पावलं बदलावींत, असं त्यांना आवाहन करण्यांत आलं.

दोन स्वतंत्र कार्यकारिणी अस्तित्वांत आलेल्या असतांना सुद्धा राजस्थान, काश्मीर, मध्यप्रदेश, आसाम, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, उत्तर-प्रदेश आणि त्रिपुरा या राज्याच्या मुख्य मंत्र्यांनी कॉंग्रेसला दुफळीपासून वांचवण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. या सर्वांनी यशवंतरावांची भेट घेतली आणि पक्षाला संकटांतून वाचवण्यासाठी त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा, सदिच्छेचा वापर करावा असा आग्रह धरला. दोन्ही गटांत समझोता निर्माण करण्याच्या दृष्टीनं त्यांनी एक मसुदाहि तयार केला. त्यानुसार फक्रुद्दीन अलि [illegible] आणि सुब्रह्मण्यम् यांच्यासंबंधी केलेला निर्णय मागे घेण्याची तयारी सिंडिकेटनं दर्शवली, परंतु डॉ. शर्मा यांच्यासंबंधीचा निर्णय कायम राहील असं स्पष्ट केलं. या बाबतींत निजलिंगप्पा यांचं म्हणणं असं होतं की, कार्यकारिणींतील ज्या तिघां-विरुद्ध कारवाई करण्यांत आलेली आहे ती मागे घ्यावी, असा जर पंतप्रधानांचा गट आग्रह धरणार असेल तर पंतप्रधानांनी मोरारजी देसाई आणि ज्या अन्य मंत्र्यांना मंत्रिमंडळांतून दूर केलं आहे त्यांचा परत मंत्रिमंडळांत समावेश करण्यांत आला पाहिजे, असा माझा, पक्षाचा अध्यक्ष म्हणून आग्रह राहील!

त्यानंतरच्या काळांत पंतप्रधान आणि निजलिंगप्पा यांच्यांत पत्रांची लढाई जुंपली. २८ ऑक्टोबरला एक प्रदीर्घ पत्र पाठवून निजलिंगप्पा यांनी इंदिराजींना दुखावलं होतंच; त्यांतच भर म्हणून की काय, आणखी पत्रापत्री सुरू झाली. पंतप्रधानांनीहि अध्यक्षांना खरमरीत पत्र लिहून त्यांनी केलेल्या आरोपांचा समाचार घेतला. या दोघां-मध्ये अशा प्रकारे वैयक्तिक स्वरूपांत कमालीचा कडवटपणा निर्माण झालेला होता तरी सुद्धा वीरेंद्र पाटील आणि के. सी. अब्राहम यांनी समझोत्याचा आणखी एक प्रयत्न म्हणून या दोघांनी एकत्रित अशी एक भोजनाची बैठक जमवून आणली. निजलिंगप्पा हे शाकाहारी असल्यानं, पंतप्रधानांनी त्यांच्यासाठी खास शाकाहारी भोजनाची

व्यवस्थाहि केली. परंतु भोजन संपण्यापूर्वीच या दोघांमधील चर्चेची इतिश्री झाली आता बोलण्यासारखं कांही उरलंच नव्हतं.

या चर्चेत नेमकं काय घडलं याचं सर्व वृत्त बाहेर आलेलं नव्हतं. त्यामुळे निजलिंगप्पा यांनी ता. १२ नोव्हेंबरला आपल्या कार्यकारिणीची बैठक बोलावली तेव्हा सी. बी. गुप्ता, हितेंद्र देसाई आणि अन्य कांही मुख्य मंत्र्यांनी तडजोडीसाठी म्हणून आणखी एक नवा मसुदा तयार केला. या मसुद्यासंबंधी दोन्ही गटांत सामान्यतः एकमत झालं होतं. परंतु प्रत्यक्ष बैठक सुरू होतांच पंतप्रधानांवर केलेले आरोप मागे घेतले गेले तरच समझोता शक्य आहे, असा एक निरोप बैठकीच्या ठिकाणीं पोंचला. सिंडिकेट-गटाची त्याला तयारी नव्हती, परंतु पंतप्रधानांचा गट, त्वयार्धं मयार्धं करण्याच्या भूमिकेला मान्यता देईल अशी किंचित् आशा हा गट बाळगून होता.

यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांचा, अजूनहि उघड सामना होऊं नये यासाठी प्रयत्न सुरूच होता. पंतप्रधानांच्या निवासस्थानीं कार्यकारिणीच्या बैठकीसाठी सर्व नेते एकत्र आले होते. तिथूनच नाईक यांनी स. का. पाटील यांच्याशीं दूरध्वनिवरून संपर्क साधला. पाटील हेहि सिंडिकेट-गटाच्या कार्यकारिणीच्या बैठकींत गुंतले होते. नाईक यांनी त्यांना जें सांगितलं त्याबद्दल त्यांनी त्यांच्या गटाशीं बोलणीं केलीं आणि नाईक यांना उलटा निरोप दिला की, पंतप्रधानांच्या गटाशीं सहमत होण्याची वेळ आता निघून गेली आहे. १२ नोव्हेंबर १९६९ ची ती दुपारची एकची वेळ होती. निजलिंगप्पांच्या कार्यकारिणीनं अखेर पंतप्रधानांना कॉंग्रेसमधून काढून टाकण्याचा निर्णय केला ! आणि गांधी-नेहरूंची कॉंग्रेस शेवटीं एकदाची दुभंगली ! अ. भा. कॉंग्रेसपासून प्रदेश-कॉंग्रेसपर्यंत आणि जिल्हा कॉंग्रेसपर्यंत सर्व देशांत दोन-दोन कॉंग्रेस-कमिट्या निर्माण झाल्या. संसदीय कॉंग्रेस-पक्षाचेहि दोन तुकडे झाले.

इंदिरा गांधी यांनी १३ नोव्हेंबरला संसदीय कॉंग्रेस-पक्षाची बैठक बोलावली. यशवंतरावांनी याच बैठकींत पंतप्रधानांच्या नेतृत्वावर संपूर्ण विश्वास व्यक्त करणारा ठराव सादर केला. इंदिराजींना कॉंग्रेसमधून काढून टाकण्याच्या कृतीचं वर्णन त्यांनी, ही कृति बेइमानीपणाच्या स्वरूपाची आणि कायद्याच्या दृष्टीनं व्यर्थ ठरणारी आहे, असं केलं. यशवंतरावांनी पंतप्रधानांच्या नेतृत्वावर आम्हां सर्वांचा विश्वास आहे असं घोषित करतांच सर्व उपस्थितांनी त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यासरशी 'आमचीच कॉंग्रेस ही खरी कॉंग्रेस आहे,' असं त्यांनी घोषित केलं. यापुढे आपल्याला संकटकाळाशीं झुंज द्यायची असल्यानं, सर्वांकडून पक्षाच्या कार्यक्रमाशीं आणि नेत्याशीं प्रामाणिक रहाण्याची आवश्यकताहि प्रतिपादन केली.

कॉंग्रेस-पक्ष आता पुरता दुभंगला होता. १६ नोव्हेंबरला लोकसभेंतच त्याचं दर्शन घडलं. निजलिंगप्पांचा पाठीराखा असलेला कॉंग्रेस-अंतर्गत साठ खासदारांचा गट

त्या दिवशीं वेगळा झाला आणि या गटानं डॉ. रामसुभगसिंग यांना आपला नेता निवडलं. डॉ. रामसुभगसिंग यांना त्या अगोदर पंधरा दिवसांपूर्वीच मंत्रिमंडळांतून कमी करण्यांत आलं होतं. १७ नोव्हेंबरला तर काँग्रेस-खासदारांचा गट लोकसभेंतील विरोधी गटाच्या बाजूला सामील झाला आणि त्यांनी विरोधी मतदानहि केलं.

त्यानंतर निरनिराळ्या राज्यांतील प्रदेश-काँग्रेस-नेत्यांना आपल्या बाजूला वळवण्याची चढाओढ या दोन गटांत सुरू झाली. २२ नोव्हेंबरला, अ. भा. काँग्रेसची खास बोलावण्यांत आलेली बैठक झाली. त्या वेळीं ७०५ निवडून आलेल्या सदस्यांपैकी ४०० आणि नियुक्त केलेल्या ९४ पैकी ५२ सदस्य, पंतप्रधानांना पाठिंबा देण्यांसाठी उपस्थित राहिले. याच बैठकींत मग निजलिंगप्पांना काँग्रेस-अध्यपदावरून दूर करून त्या जागेवर सी. सुब्रह्मण्यम् यांची हंगामी अध्यक्ष म्हणून निवड करण्यांत आली. संसदीय काँग्रेस-पक्षांत आणि अ. भा. काँग्रेसमध्येहि अशा प्रकारे इंदिरा गांधी यांनी आपलं निर्विवाद बहुमत प्रस्थापित केलं.

सिंडिकेट काँग्रेस तरीहि संपलेली नव्हती. देशांत अन्यत्र त्यांना पाठिंबा होताच. म्हैसूर आणि गुजरात काँग्रेस-कमिटी व या दोन्ही राज्यांतील सरकारचा त्यांनाच पाठिंबा होता. सिंडिकेटनं मग आपलं खुलं अधिवेशन डिसेंबरला अहमदाबादला आयोजित केलं. त्यानंतर एकै आठवड्यानं, मुंबईला सत्ताधारी काँग्रेसचं जें अधिवेशन झालं त्यापेक्षा अहमदाबादच्या काँग्रेसला लोक अधिक संख्येनं हजर होते; परंतु सिंडिकेडला आपलीं मुळं खोलवर कधीहि रुजवतां आलीं नाहीत.

सिंडिकेटबद्दल यशवंतरावांचं असं स्पष्ट मत होतं की, या काँग्रेसला जनतेचा पाठिंबा नाही आणि त्यांना तो मिळवतांहि येणार नाही. एक तर सर्व प्रतिगामी त्या ठिकाणीं एकत्र आलेले होते आणि त्यांच्यापैकी, कामराज वगळतां कोणामध्ये पुरोगामी दृष्टि नव्हती. कामराजांबद्दल मात्र नेहमीच एक कोडं निर्माण झालेलं असायचं. त्यांच्याशीं चर्चा करतांना किंवा ते आपलं मत व्यक्त करतांना नेहमी पुरोगामी ध्येय-धोरणालाच पाठिंबा देत असत; परंतु प्रत्यक्ष कृतीची वेळ आली की, ते अतुल्य घोष आणि त्यांचे मित्र यांच्याबरोबर रहात असत.

काँग्रेसमध्ये दुफळी होऊनहि पंतप्रधानांच्या गटाला बहुमत मिळालं होतं, तरी यशवंतरावांची पक्षाच्या भवितव्याबद्दलची चिंता कमी झाली नाही. काँग्रेससाठी राष्ट्रीय पातळीवर अधिकांत अधिक पाठिंबा संपादन करण्यावरच त्यांनी भर दिला. कारण आता ध्रुवीकरणाचे, निरनिराळे राजकीय गट एकत्र येण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झालं होतं. कांही झालं तरी, सत्ताधारी काँग्रेसला आता संघटना काँग्रेसशीं कांहीहि कर्तव्य उरलेलं नाही, असं यशवंतरावांचं मत होतं. सुरुवातीच्या काळांत तरी तशीच परिस्थिति होती. सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळींच सगळे डावपेंच पुढे येण्याची

शक्यता गृहीत धरण्यांत येत होती. सत्ताधारी कॉंग्रेसला लोकप्रिय बनवण्याचं काम त्यांच्या दृष्टीनं सोपं नव्हतं. तरी पण दरम्यानच्या काळांत झालेल्या पोट-निवडणुकांमध्ये सत्ताधारी कॉंग्रेसला अनुकूल वातावरण लाभलं. त्यामुळे वारं कोणत्या दिशेनं वाहत आहे हें कांहीसं स्पष्ट झालं. वाऱ्याची हीच दिशा कायम रहाणार आहे, की त्यांत कांही बदल घडणार, हें आता आगामी निवडणुकांवर अवलंबून होतं.

# २४

काँग्रेस दुभंगली आणि मागोमाग, मंत्रिमंडळांत फेरबदल घडणार असल्याबद्दचे तर्क सुरू झाले. पार्लमेंटच्या लॉबीमध्ये आणि वृत्तपत्रांतून कांही महिनेपर्यंत हे अंदाज व्यक्त होत राहिले; परंतु १९७० च्या मेपर्यंत कांही घडलं नाही. त्या वर्षाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन मेमध्ये संपल्यानंतर मात्र पंतप्रधानांनी त्या रोखानं हालचाली करण्याला प्रारंभ केला.

मोरारजींकडून अर्थखातं काढून घेऊन पंतप्रधानांनी तें स्वतःकडे घेतलं होतं. एक वर्षभर त्यांनी या खात्याचा कारभार पाहिला, परंतु कारभारासाठी त्यांना अधिक वेळ देतां आला नव्हता किंवा पुरेसं लक्षहि देतां आलं नव्हतं. जूनमध्ये त्यांनी मंत्रिमंडळांतील आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांशीं, मंत्रिमंडळाच्या खातेबदलाविषयी बोलणीं सुरू केलीं.

मोरारजींकडून अर्थखातं स्वतःकडे घेण्यामागे पंतप्रधानांचा हेतु स्पष्ट होता. बंगलोरच्या अधिवेशनांत अर्थविषयक त्यांनी एक टिप्पणी सादर केली होती. यशवंतरावांनी त्या विषयांवरील ठराव तयार केला होता आणि अधिवेशनांत तो संमतहि झाला होता. पक्षाच्या ध्येय-धोरणाच्या अंमलबजावणीचा आता सवाल होता आणि त्या संदर्भात प्रतिगामी मोरारजींकडून तें घडणं शक्य नव्हतं. म्हणूनच पंतप्रधानांनी तें खातं स्वतःकडे घेतलं होतं. पंतप्रधान या नात्यानं इंदिराजींवर अन्य कामांचीहि मोठी जबाबदारी असल्यानं, एक वर्षाच्या अनुभवानंतर पक्षाच्या पुरोगामी ध्येय-धोरणाचा प्रामाणिक पाठपुरावा करणाऱ्या मंत्र्यांकडेच अर्थखातं सोपवण्याची निकड त्यांना भासू लागली.

पंतप्रधानांनी मग त्या संदर्भात यशवंतरावांशीं चर्चा सुरू केली. यशवंतरावांकडे त्या वेळीं गृहखातं होतं. गृहखात्यासारख्या प्रतिष्ठेच्या आणि संवेदनाक्षम खात्याचा त्याग करण्याला यशवंतरावांचं मन राजी नसावं. दरम्यान पुढच्या वर्षा-दीड वर्षावर सार्वत्रिक निवडणुका येऊन ठेपल्या होत्या. गृहखात्यांतून बाहेर पडूं नये यासाठी यशवंतरावांच्या

दृष्टीनं तोंहि एक महत्त्वाचं कारण असूं शकेल. त्यांनी हें सर्व पंतप्रधानांना सांगितलं, परंतु पंतप्रधानांच्या समोर अर्थविषयक धोरणाला गति देण्याचा प्रश्न होता. या संदर्भात त्यांनी यशवंतरावांशीं तीन वेळा चर्चा केली. मंत्र्यांच्या खाते-बदलाबद्दल त्या काळांत अनेक वावड्या उठत होत्या आणि अन्वयार्थहि लावले जात होते.

परंतु गृहखातं आणि अर्थखातं यांतील बदलाबाबत पंतप्रधानांची भूमिकाच वेगळी होती. यशवंतरावांकडील गृहखातं काढून घेऊन तें अन्य कुणाला तरी द्यायचं असा इथे प्रश्न नव्हता. त्या दोघांमध्येच ही अदलाबदल घडायची होती. पंतप्रधानांनी तेंहि यशवंतरावांना सांगितलं आणि त्यांची त्यासाठी संमति मिळवण्यांत यश संपादन केलं. यशवंतरावांनी या बदलाला मान्यता देतांच २६ जून १९७० ला मंत्रिमंडळाच्या खातें-वाटपांत, पंतप्रधानांनी महत्त्वाचा आणि मोठा बदल जाहीर केला. अर्थखातं त्यांनी यशवंतरावांकडे सोपवलं आणि त्यांच्याकडील गृहखातं स्वतःकडे घेतलं. इतर खात्यांच्या मंत्र्यांतहि महत्त्वाचे बदल त्या वेळीं घडले. जगजीवनराम यांच्याकडे संरक्षण, परराष्ट्र-व्यवहारखातं सरदार स्वर्णसिंग यांच्याकडे, तर अन्नखातं फक्रुद्दीन अलि अहंमद यांच्याकडे, असा हा महत्त्वाचा बदल घडला.

यशवंतरावांकडे आता देशाचं अर्थखातं आणि अर्थमंत्रिपदाचं काम आलं, पण त्याचबरोबर त्यांच्या समोर एक नवं आव्हानच आता उभं राहिलं. देशाचा अर्थशास्त्रविषयक दृष्टिकोन कोणता असावा यासंबंधी त्यांनी यापूर्वी पक्षाच्या व्यास-पीठावर अनेकदा विवेचन केलं होतं, पुरोगामी धोरणाचा आग्रह धरला होता. किंबहुना १९६८ सालच्या फरिदाबादच्या काँग्रेस-अधिवेशनापासून यशवंतराव हे काँग्रेस-पक्षाचे, अर्थशास्त्रविषयक धोरणाचे मुख्य प्रवक्तेच मानले जात होते. १९६९ च्या बंगलोर अधिवेशनांतील अर्थविषयक ठरावाचा मसुदा त्यांनीच तयार केला होता. त्याच सालीं मुंबईच्या अधिवेशनांतहि या विषयावरील ठराव त्यांनीच सादर केला होता. १९७० सालीं पाटणा येथील अधिवेशनांतहि या विषयावर ठराव सादर करून नव्या अर्थविषयक धोरणांतून काय साध्य करायचं आहे याचं प्रतिपादन समर्थपणें केलं होतं. पाटणा अधिवेशनांत त्यांनी अस्खलित हिंदींत भाषण करून वक्तृत्वाची आणि प्रतिपाद्य विषयाच्या समथनाची एक वेगळीच झलक दाखवली होती. यशवंतराव गृहखात्याचा कारभार पहात होते तरी सुद्धा त्या काळांतहि अर्थविषयक प्रश्नाकडे बारकाईनं लक्ष देऊन आपले व्यापक विचार व्यक्त करण्याची संधि त्यांनी कधी सोडली नाही.

परंतु देशाच्या जीवनांत १९७० च्या मध्यावर कांहीशीं चमत्कारिक परिस्थिति निर्माण झाली होती. अर्थखात्याची धुरा सांभाळण्याच्या दृष्टीनं तो मोठा अनुकूल काळ जसा नव्हता तसा अतिशय वाईट असाहि नव्हता. एक गोष्ट खरी की, देशाच्या आर्थिक स्थितीला त्या काळांत निरनिराळ्या बाजूंनी एकसारखे धक्के बसत होते. देशांतलं औद्योगिक उत्पादन वाढवून आर्थिक स्थिति सुधारायची, तर कच्च्या मालाची फार मोठी कमतरता निर्माण झालेली होती. या आघाडीवर अगदी भयाण परिस्थिति

निर्माण झाली होती असं नव्हे, परंतु प्रगतीची घोडदौड सुरू ठेवतां येईल अशीहि स्थिति नव्हती. देशाच्या जीवनांत मध्यंतरींचा एक काळ असा निर्माण झाला होता की, औद्योगिक आणि शेतीचं उत्पादन घसरगुंडीला लागलं होतं आणि देशांतील जनतेला जगवण्यासाठी 'पीएल् ४८०' खाली अमेरिकेकडून धान्याची मोठ्या प्रमाणांत आयात करण्याचा प्रसंग निर्माण झाला होता. किंबहुना 'पीएल् ४८०' खालील आयात हें एक कायमचं लक्षण बनलं असल्याचं दिसूं लागलं होतं; परंतु सुदैवानं १९७० च्या शेती-हंगामानं देशाला हात दिल्यानं कांहीसं आशादायक वातावरण निर्माण झालं. औद्योगिक क्षेत्रांतील प्रगति मंद गतीनंच सुरू होती, परंतु प्रगति रोखण्यासाठी निर्माण झालेले बंध मोडून पडले होते आणि खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रांतील उद्योगांमध्ये प्रगति साध्य होऊं शकेल यासाठी पाया तयार झाला होता.

आर्थिक क्षेत्रांत अशा प्रकारे निरनिराळ्या मार्गांनं प्रगति सुरू झाली होती, तरी १९७० सालांत या क्षेत्रांत तणाव वाढला होता. अर्थखात्याचीं सूत्रं स्वीकारल्यानंतर यशवंतरावांसमोर सर्वप्रथम महागाईचा भयानक प्रश्न उभा राहिला. वाढलेल्या आणि वाढणाऱ्या किमतीची दखल त्यांना घ्यावीच लागणार होती. ५ ऑगस्टच्या लोकसभेंतील निवेदनांत त्यांनी तसं स्पष्टहि केलं. किंमतवाढीचा परिणाम समाजांतील सर्वच थरावर, विशेषतः गरिबांच्या जीवनावर अतिशय अनिष्ट होत असल्यानं कुठल्याहि सरकारला या परिस्थितीपुढे नमून चालणार नाही; महागाई रोखावीच लागेल अशी त्यांनी आपली ठाम भूमिका सांगितली. औद्योगिक कच्च्या मालाची कमतरता असल्यानं, घाऊक बाजारपेठेंतील किमतीचा निर्देशांक वाढला असल्याचं त्यांना मान्यच होतं. तरी सुद्धा सर्व वस्तूंचे भाव मर्यादेंत रहावेत यासाठी सरकार सातत्यानं, किमतीविषयीच्या परिस्थितीचा आढावा घेत राहील, असं त्यांनी लोकसभेला आश्वासन दिलं.

देशांतील जनतेला दैनंदिन वांटप करण्यासाठी आणि सरकारजवळ राखीव साठा शिल्लक रहाण्याच्या दृष्टीनं १९७०–७१ सालासाठी एकूण १०·७ दशलक्ष टन अन्न-धान्याची आयात करावी लागणार असल्याचं तज्ज्ञांचं मत होतं.

लेव्ही पद्धतीनं सरकारी गुदामांत देशांत जो धान्य-साठा व्हायचा त्यांत ३·५ दश-लक्ष टन धान्य कमी जमा झालं होतं. याव्यतिरिक्त अन्य पैसा मिळवून देणाऱ्या पिकांचं उत्पादनहि १९७० सालीं कमी आलं. कापूस, गळिताचीं धान्यं आणि ज्यूट या पिकांत तर सर्वांत अधिक घट निर्माण झाली होती. साकल्यानं याचा परिणाम कारखान्यांतील उत्पादन घटण्यांत आणि निर्यातींतहि घट होण्यांत झाला. किमती मात्र भरमसाट वाढल्या.

त्यामुळे किमती समपातळीवर आणून महागाई रोखण्यावरच यशवंतरावांना प्रथम लक्ष केंद्रित करावं लागलं. किमती समपातळींत राखण्याचा प्रश्न अन्य गोष्टींशीं संबंधित होता. एक तर कारखाने आणि शेती यांतील उत्पादन वाढणं आवश्यक होतं आणि त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंतील भारतीय रुपयाच्या मूल्याचा प्रश्नहि याच्याशीं निगडित होता.

आयात मालावरील जकातीचा किंवा सरकारी वसुलीचा प्रश्न अशा अन्य कांही समस्यांपेक्षा किमती रोखण्याचा, महागाई कमी करण्याच्या कामाला अग्रक्रम देण्याइतका हा प्रश्न महत्त्वाचा आहे, अशी अर्थमंत्र्यांची भूमिका होती. त्यामुळे अर्थविषयक कुठलाहि निर्णय करतांना त्याचा जास्तींत जास्त लोकांवर विशेषतः समाजांतल्या दुर्बल घटकांवर कोणता आणि कसा परिणाम घडून येणार आहे हा दृष्टिकोन बाळगूनच त्यांनी निर्णय करण्याचं ठरवलं. सरकारनं त्या काळांत बँकेच्या व्याजाच्या दरांत केलेली एक टक्का वाढ, 'क्रेडिट कीझ,' कापूस, तेल वगैरेसारख्या वस्तूंवर बँकेकडून दिल्या जाणाऱ्या रकमांवर नियंत्रण वगैरेसारखीं उपाययोजना सुरू केल्यानं त्या वर्षाच्या मार्च-अखेरीपर्यंत, किंमतवाढीला आळा बसण्यास मदत झाली. त्या पूर्वीच्या वर्षी याच काळांत किमतीचा निर्देशांक ७ टक्क्यांनी वाढला होता तो या उपाययोजनेमुळे ४ टक्क्यांवर थांबला.

जीवनावश्यक वस्तूंच्या किमती रोखणंहि एक महत्त्वाची समस्या यशवंतरावांसमोर होतीच; शिवाय आणखीहि कांही मूलभूत समस्यांना त्यांना उत्तरं द्यावीं लागणार होतीं. सुशिक्षित बेकारांचा प्रश्न ही एक त्यांतील गंभीर समस्या होती. परंतु यशवंतरावांच्या मतें शहरांतील बेकारी आणि ग्रामीण भागांतील अशिक्षितांची बेकारी, असा हा दुहेरी प्रश्न होता. या दोन ठिकाणच्या समस्या सोडवण्याकरिता, नोकऱ्या उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं विस्तृत स्वरूपाचा कार्यक्रमच त्यांना तयार करावा लागणार होता. १९५१ मध्ये पंचवार्षिक योजनांचं युग सुरू झाल्यापासून १९७० अखेरपर्यंत देशांत ३२ दशलक्ष लोकांना नोकरीची उपलब्धता करून देण्यांत आली होती; परंतु या काळांतील ३५ दशलक्षांचा कमीपणाचा ( बॅक लॉग ) मागचा शिलकी भाग भरून काढायचा होता. १९७५ पर्यंत सुशिक्षित बेकारांची संख्या ५ लाखांवर आणि ग्रामीण भागांतील बेकारांची संख्या २५ लाखांवर पोंचेल अशी आकडेवारीहि त्या काळांत तयार झालेली होती.

बेकारीच्या संदर्भात ग्रामीण भागांतील बेकारीपेक्षा शहरांतील बेकारीचा धोका पुस्तकी विद्वानांना अधिक गंभीर वाटत होता. यशवंतरावांचं त्या संदर्भातलं मत स्वच्छ होतं. ग्रामीण भागांतील बेकारीबद्दल तिथली मंडळी त्या वेळीं आवाज उठवत नव्हती हें खरं; ते लोक संघटितहि नव्हते. त्या संदर्भात शहरांतील सुशिक्षितांच्या बेकारीकडे अग्रक्रमानं लक्ष देण्यासारखी परिस्थिति होती. कारण शहरांतील लोक संघटित होते आणि आपल्या मागण्यांसाठी त्यांना केव्हाहि स्फोटक परिस्थिति निर्माण करतां येणं शक्य होतं, तेवढी त्यांची कुवत होती. परंतु यशवंतरावांचं म्हणणं असं की, शहरांतील सुशिक्षित बेकार ग्रामीण भागांत जातील आणि तिथल्या बेकारांना सुधारित जीवनमानाचे धडे देऊं लागतील, परिस्थिति बदलून घेण्यासाठी त्यांना संघटित करतील, तर ग्रामीण भागांतहि स्फोटक परिस्थिति निर्माण होण्याला वेळ लागणार नाही.

यशवंतरावांचा अर्थविषयक मूलभूत दृष्टिकोन हा सर्वांगीण होता. आर्थिक विकासामागे सामाजिक शक्ति काम करत असतात त्याचप्रमाणे राजकीय प्रश्नहि त्यामध्ये

मिसळलेले असतात; त्यामुळे आर्थिक विकास म्हणजे केवळ आर्थिक विकासाच्या तंत्रांचा अभ्यास नव्हे; सामाजिक, राजकीय व आर्थिक अशा सर्वांगीण भूमिकेवरूनच त्याचा अभ्यास केला पाहिजे, अशी त्यांची मूलभूत विचारसरणी होती.

अर्थखात्याचीं सूत्रं त्यांनी नव्यानं स्वीकारलेलीं होतीं तरी, आर्थिक प्रश्नाविषयीचा अभ्यास पूर्वी केला होता आणि त्यामध्ये सातत्यहि राखलं होतं. स्वातंत्र्यपूर्व काळापासून, सामाजिक स्थितीचा त्यांनी जो अनुभव घेतला होता, त्यांतून आर्थिक प्रश्नाकडे पहातांना त्यांच्यांतील 'माणूस' जागा असणं स्वाभाविक होतं. त्यामुळे आर्थिक प्रश्नाविषयी विचार करतांना, त्यांतील समस्या सत्वर सोडवायच्या म्हणून केवळ सिद्धान्त किंवा तत्त्वं यांचाच विचार करून बोलण्यापेक्षा त्या समस्यांच्या तपशिलांत शिरणं त्यांनी आवश्यक मानलं. आर्थिक प्रश्नाचीं उत्तरं केवळ शास्त्री किंवा शास्त्रज्ञ यांनीच द्यावींत हें त्यांना मंजूर नव्हतं. त्यामुळेच मूलभूत राजकारण, सामाजिक व आर्थिक विचारसरणींतील मौलिक आशय यापासून तरुणांना किंवा तरुण विद्यार्थ्यांना वंचित करतां येणार नाही; कारण तरुणांविना देशाला भवितव्य नाही याची जाणीव सत्ताधारी पक्षानं ठेवली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता.

अर्थकारणाचा विचार करतांना अर्थमंत्र्यांनी त्या काळांत अधिक लोकांना कामधंदा कसा मिळवून द्यावा, हेंच सूत्र आपल्या आर्थिक विकासाच्या सूत्रांतील महत्त्वाचं सूत्र असलं पाहिजे असा निर्णय केला. मूलभूत सूत्रानुसार छोट्या उद्योगधंद्यांच्या वाढीवर अधिक भर देणं, खेड्यांतला आणि एकूण ग्रामीण भागांतला जो कुशल-निमकुशल कारागीरवर्ग असतो त्यांना उद्योग उपलब्ध करून देणं, बेकारांची संख्या कमी करण्याच्या संदर्भात शिक्षणाच्या पुनर्रचनेचा विचार करून सामान्य माणसांच्या वाढलेल्या आशा-अपेक्षांची दखल घेणं, असा सर्वांगीण विचार त्यांनी सुरू केला.

जनतेशीं तादात्म्य साधण्याच्या मूलभूत नियमांचा आश्रय करून आणि बहुजनसमाजाचा आधार पुनरुज्जीवित करूनच देशाला समृद्धीचे दिवस दाखवतां येतील या विचारावर त्यांची श्रद्धा होती. त्यामुळे देशाच्या पुनर्रचनेसाठी जें जें कांही करायचं त्यामध्ये सर्व वर्गांना, सर्व थरांना भाग घेण्याची संधि मिळेल यासाठी ते सातत्यानं प्रयत्नशील राहिलेले आढळतात. समाजांत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेंत एक घटक समृद्धीकडे जातो आणि दुसरा दारिद्र्याच्या दिशेनं वाटचाल करतो. हें दृश्य आत्मघातकीपणाचं असल्यानं, या संदर्भात देशांतील हरितक्रांति, औद्योगिक क्रांति, नागरीकरण या प्रश्नांचा अभ्यास करूनच आर्थिकविषयक क्षेत्रांत निर्माण झालेल्या आणि दैनंदिन निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा शोध घेण्याचं काम त्यांनी या काळांत केलं.

आर्थिक विकासाचा मागोवा घेत असतांना देशानं एका विशिष्ट दिशेनं झेप घ्यावी यासाठी अर्थमंत्र्यांनी एक विशिष्ट पवित्रा स्वीकारला असल्याचं दर्शन जनतेला सातत्यानं होत राहिलं. पंतप्रधानांनी देशांत 'गरिबी हटाव'ची घोषणा केली होती. ही घोषणा प्रामुख्यानं देशाच्या आर्थिक विकासाच्या संबंधित असल्यानं राज्यकर्त्यांच्या

आर्थिक धोरणाची दिशा, अडचणींतून सुटण्यासाठी त्यांना खेळावे लागलेले डावपेंच आणि मुख्य म्हणजे अर्थकारणाचा पवित्रा या गोष्टींना स्वाभाविकच महत्त्व प्राप्त झालं होतं. समस्या आणि यशवंतराव यांचं सख्य तसं जुनं असून संकटांतूनच पुढे जाण्याची हातोटी त्यांनी अनेकदा सिद्ध केलेली आहे. अर्थखात्याचा कारभार करतांना त्यांना एकामागून एक अशाच समस्या ओलांडाव्या लागल्या.

आर्थिक विकासासाठी आपल्यासमोर त्यांनी एका दशकाचा टप्पा ठेवला होता. त्या संदर्भांत त्यांच्यासमोर, समाजांतील वेगवेगळ्या घटकांतील उत्पन्न व संपत्ति यांच्यांतील तफावत कमी कशी करायची हें एक मोठं प्रश्नचिन्ह होतं. हें प्रश्नचिन्ह कमी करायचं, तर त्याबाबत त्यांना कोणतीहि ठोकळेबाज किंवा सैद्धांतिक भूमिका घेऊन चालणार नव्हतं. त्यांनी अधिक वास्तववादी भूमिका स्वीकारण्यावरच भर दिला. कारण समाजांत एका बाजूला ऐश्वर्याचीं, वैभवाचीं शिखरं निर्माण झालेलीं दिसत होतीं, तर दुसऱ्या बाजूला दैन्याचं, गरिबीचं विदारक दृश्य दिसत होतं. त्यामुळे निर्धन बहुजन-समाज, लहान लहान शेतकरी, औद्योगिक क्षेत्रांतील कामगारवर्ग आणि देशांतील मध्यमवर्गीतील तरुण यांच्या महत्त्वाकांक्षेशीं आपण तादात्म्य साधणार आहोंत का, आणि त्या दृष्टिकोनांतून कार्यक्रमाची आखणी करणार आहोंत का, हा त्यांचा आपल्या पक्षाला सवाल होता.

उत्पन्न आणि संपत्ति यांच्यांतील विषमता केवळ शहरांतच अस्तित्वांत होती असं नव्हे. हरितक्रांतीमुळे खेड्यांतहि ती प्रत्ययाला येऊं लागली होती. त्यांतून कांही राजकीय आणि सामाजिक गुंतागुंतीचे प्रश्नहि निर्माण होऊं लागले होते. भारतांतच नव्हे, तर मोठ्या प्रमाणांत औद्योगीकरण झालेल्या युरोपमधील कांही राष्ट्रांमध्ये देखील हीच परिस्थिति असल्यानं आर्थिक विकास हा केवळ आर्थिक प्रश्न म्हणून न अभ्यासतां त्याचे सामाजिक व राजकीय परिणामहि अर्थमंत्र्यांनी विचारांत घेतले. श्रीमंत शेतकरी आणि गरीब शेतकरी यांचाहि विचार त्यांनी याच दृष्टिकोनांतून केला आणि जमीन-सुधारणा व जमिनीवरील कालमर्यादा या विचाराचाहि पाठपुरावा केला.

खेड्यांतील अर्थव्यवस्थेंत कांही गंभीर दोष निर्माण झालेले होते. कारण खेड्यांत ज्या विकास-योजना राबवल्या गेल्या त्याचा खरा फायदा सधन शेतकऱ्यांच्याच पदरांत पडला. छोटे शेतकरी आणि शेत-मजूर हा वर्ग जवळ जवळ उपेक्षितच राहिला. यशवंतरावांच्या नजरेंतून ही वस्तुस्थिति सुटणं शक्य नव्हतं. समृद्धीचा फायदा आपल्याला मिळत नाही ही भावना छोटा शेतकरी आणि शेत-मजूर यांच्यांत निर्माण झाली आणि वाढत राहिली, तर त्यांच्यांत वैफल्य वाढेल आणि त्यांतून पुढच्या कांही वर्षांत स्फोटक परिस्थिति निर्माण होईल हा धोका त्यांना स्पष्ट दिसत होता. पूर्व-बंगालमधील स्फोटक परिस्थितीचा अभ्यास यशवंतरावांनी गृहमंत्रिपदाच्या कारकीर्दींत केलेलाच होता. त्यामुळे जमीन-सुधारणा आणि जमिनीवरील कमाल मर्यादा याचा विचार क्रमप्राप्त आहे

या निर्णयाप्रत ते पोंचले. अर्थात् हा विचार सैद्धांतिक भूमिकेंतून न करतां निरनिराळ्या राज्यांतील जमिनीची वेगवेगळी स्थिति लक्षांत घेऊन आणि कुटुंब हाच घटक धरून या प्रश्नाचा विचार करण्याचं त्यांनी आवाहन केलं.

आर्थिक धोरण ठरवतांना या अर्थमंत्र्यांनी देशांतील गरीब माणसांचं जीवनमान उंचावण्यासाठी उत्पादनवाढ आणि राष्ट्रीय संपत्तीचा विकास यांवरच सतत भर दिला. ' गरिबी हटाव 'ची घोषणा झाल्यानंतर या कार्यक्रमानं यश हस्तगत करण्यासाठी राष्ट्रीय संपत्तीची वाढ करणं आवश्यकच होतं. राष्ट्रीय संपत्तीची वाढ न करतां केवळ संपत्तीच्या विभाजनाची चर्चा ही व्यर्थ होती. त्यामुळे राष्ट्रीय संपत्ति वाढवतांना काम, बचत, किंवा भांडवल-संचय आणि भांडवल-गुंतवणूक याला आवश्यक त्या प्रेरक शक्ति निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रामध्ये नियोजनाची प्रक्रिया ही अनेक वर्षे चालू रहाणारी असल्यानं लक्षावधि गरीब लोकांना अधिक काम करण्यास, अधिक भांडवल-संचय करण्यास व अधिक गुंतवणूक करण्यास प्रेरणा मिळेल यासाठी त्यांनी पोटतिडकीनं धोरणाची आखणी केली. केवळ वरिष्ठवर्ग, मध्यमवर्ग, खालचा वर्ग, गरीबवर्ग यांनी कितीहि त्याग केले तरीहि कमी उत्पन्न, कमी बचत, कमी भांडवल-गुंतवणूक व उत्पादनक्षमता या वर्तुळांतून देशाला बाहेर पडण्यासाठी आवश्यक त्या प्रेरणा दिल्याच पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. त्याचबरोबर आर्थिक विकासाचा आणि तात्कालिक व दूरगामी स्वरूपाचा विचार करत असतांना, आर्थिक विकासांतून समाजांतील लोक-शाही शक्ति बलवान बनवण्याचं भानहि त्यांनी ठेवलं होतं. लोकशाहीची घटनामान्य मूल्यं आर्थिक विकासांतून देश सामर्थ्यसंपन्न बनवण्याचा दृष्टिकोन कायम राखण्यानंच, आर्थिक विकासाला कांही अर्थवत्ता प्राप्त होईल, तो प्रयत्न अर्थपूर्ण ठरेल, यावर यशवंतरावांचा ठाम विश्वास होता. देशांतील लोकशाही ही गरिबी हटवण्याचा प्रयत्न करत असल्यानं, देशांतील प्रश्न हे केवळ आर्थिक विकासाचेच प्रयत्न नसून, लोकशाही-मूल्यं टिकवण्याचं बीजहि यशवंतरावांच्या आर्थिक धोरणांत अनुस्युत होतं. आर्थिक विकासाच्या कामांत करोडो लोकांचा सहभाग असला पाहिजे असा त्यांचा आग्रह होता तो त्यामुळेच होय. यशवंतरावांच्या मनांतील हे विचार पुढे १९७५–७६ सालच्या आणीबाणीच्या काळांत, बव्हंशीं प्रत्यक्षांत उतरले आणि त्यांना ज्या वर्तुळाचा भेद अपेक्षित होता तो घडून गेला.

यशवंतरावांकडे अर्थखातं आल्यानंतर त्यांनी, भारताला परदेशांतून मिळणाऱ्या मदतीच्या प्रश्नाकडेहि आपलं लक्ष केंद्रित केलं. पंचवार्षिक योजनांचा कार्यक्रम राबवण्याच्या कामीं, परदेशी मदतीचा भाग योजनेच्या खर्चाच्या एकपंचमांशइतका असायचा. उर्वरित रकमेची तरतूद हा देशांतर्गत व्यवस्थेचा भाग होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेसाठी परदेशाची मदत फक्त ५ टक्के घेण्यांत आली होती; परंतु तिसऱ्या पंच-वार्षिक योजनेच्या काळांत हें प्रमाण २४ टक्यांवर पोंचलं होतं. चौथ्या योजनेसाठी हें प्रमाण १८ टक्के राहील असा अंदाज तयार झाला होता.

भारताचा विकास हा केवळ परराष्ट्राकडून त्यासाठी दिल्या जाणाऱ्या मदतींतूनच व्हावा असा यशवंतरावांचा हटवादी दृष्टिकोन नव्हता. दरम्यान पहिल्या पंचवार्षिक योजनेनंतरच्या काळांत पुढच्या दोन दशकांत, भारताला आवश्यक असणाऱ्या मदतीचं स्वरूपहि बदललं होतं. त्यामुळे धनवान देशाकडून किंवा तेथील संस्थांकडून एखाद्या विशिष्ट प्रकल्पासाठीच मदत घेण्याच्या पद्धतींत बदल करून, सर्वसंग्राहक स्वरूपाची मदत कशी मिळवतां येईल याचा त्यांनी विचार केला.

'पीएल् ४८०'मधून निर्माण झालेल्या निधीचा प्रश्न आर्थिकदृष्ट्या त्या वेळीं बराच गुंतागुंतीचा बनलेला होता. अमेरिकेशीं पूर्वी झालेल्या करारानुसार या व्यवहारांतील पैशाचा संचय फार मोठ्या प्रमाणांत झालेला होता. आणि खास तारण म्हणून गुंतवून ठेवलेल्या ह्या संपत्तीचा विनियोग अमेरिका आणि भारत सरकार यांच्या परस्पर-संमतीनंच केला जावा अशी त्यामध्ये अट होती. याचा अर्थ अर्थशास्त्राच्या दृष्टीनं ही सर्व संपत्ति भारताच्या दृष्टीनं निष्क्रिय स्वरूपांत पडून राहिलेली होती. उभय सरकारांत 'पीएल् ४८० 'चा करार झाला त्यां वेळची परिस्थिति आणि आताची परिस्थिति यांमध्ये जमीन-अस्मानाचा फरक पडला होता. त्यामुळे या साठून पडलेल्या प्रचंड रकमेचा प्रश्न आता गुंतागुंतीचा आणि अधिक अवघड असा बनला. या प्रश्नाची समाधानकारक सोडवणूक होऊं शकली नाही, तर हा प्रश्न निरंतरचा भारताची डोकेदुखी वाढवणारा प्रश्न ठरेल, असं यशवंतरावांचं मत होतं.

या प्रश्नासंबंधी विचार करत असतांना यशवंतराव शेवटीं या निर्णयाप्रत पोंचले की, ही संपत्ति अशा पद्धतीनं किती काळ साठवून ठेवायची यासंबंधी कांही कालमर्यादा निश्चित करण्याची गरज आहे. त्या कालमर्यादेनंतर मात्र तो पैसा कर्ज म्हणून शिल्लक न ठेवतां टप्प्या-टप्प्यानं, तो जमेच्या बाजूला धरला गेला पाहिजे. त्याचप्रमाणे या पैशाचा विनियोगहि समाधानकारक रीतीनं व्हायला हवा. जेणेंकरून या संपत्तीमुळे भारताच्या अर्थकारणावर दबाव निर्माण होणार नाही, चलनवाढीला वाव मिळणार नाही किंवा आर्थिक समतोल ढासळणार नाही याचीहि काळजी घ्यावी लागेल. 'पीएल् ४८०' करारानुसार भारतांत साठून पडलेल्या पैशांतून भारतांतील अमेरिकेच्या परराष्ट्रीय वकिलातीच्या खर्चासाठी कांही पैसा खर्च केला जात असे. ही स्थिति बेमुदत स्वरूपांत ठेवायची काय, याचा विचार करण्यासारखी परिस्थिति निर्माण झाली होती. या सर्वच प्रश्नांचा साकल्यानं निर्णय यशवंतरावांना करावा लागणार होता.

प्रमुख बँकांचं राष्ट्रीयीकरण झालं होतं आणि संस्थानिकांचे तनखे रद्द करण्यांत आले होते. परंतु हे निर्णय म्हणजे भारताची आर्थिक वाटचाल कोणत्या दिशेनं सुरू झाली आहे याची ती केवळ झलक होती. संपत्तीचा उपयोग जास्तींत जास्त लोकांना करून देणं शक्य व्हावं आणि ऐतं बसून संपत्तीचा संचय करण्याला संधि शिल्लक राहूं नये, हा या निर्णयामागील हेतु होता. यशवंतरावांनी २४ मार्च १९७१ ला लोकसभेंत सादर केलेला अर्थसंकल्प हा आर्थिक वाटचालीच्या या नव्या दिशेचा निर्देशक ठरला.

या अर्थसंकल्पांत त्यांनी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यावर आणि आर्थिक विकासावर तर प्रामुख्यानं भर दिलाच शिवाय आर्थिक विकासासाठी अधिक प्रेरणा मिळत रहावी, संपत्तीचा संचय करून निर्माण झालेली आर्थिक सत्ता आणि उत्पन्नांतील विषमता, दरी कमी व्हावी, वाऊक प्रमाणांत लोकांना कामधंदा मिळावा आणि वस्तूंच्या किमतीचा समतोल राखण्याच्या कामीं निर्माण होणारा दबाव नाहीसा व्हावा, असे कांही प्रमुख उद्देश समोर ठेवूनच हा अर्थसंकल्प त्यांनी तयार केला होता.

देशांत गरिबीविरुद्ध युद्ध सुरू झालेलं असल्यानं रणमैदानावरील युद्धप्रसंगीं ज्या हिरीरीनं शौर्य प्रगट करावं लागतं त्याच हिरीरीनं देशांतील सर्व जनतेला, गरिबीविरुद्धच्या लढाईत सहभागी होतां आलं पाहिजे, ही देशाची अर्थविषयक धोरणाची दिशा असावी, असंच यशवंतरावांचं मत होतं.

या धोरणाच्या अनुषंगानं, अविकसित भागांत विविध उद्योग सुरू होण्याच्या दृष्टीनं, उद्योजकांना सवलतीनं मदत देण्याचं काम सुरू करण्यांत आलं. उद्योगासाठी देण्यांत येणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर ८ टक्के होता, तो ७ टक्के करण्यांत येऊन, त्या दरानं भारतीय उद्योग-विकास बँकेतर्फे निरनिराळ्या उद्योगांना कर्जे उपलब्ध करून देण्यांत आलीं. मात्र या उद्योगपतींनी नवे उद्योग सुरू करण्यासाठी मागासलेल्या जिल्ह्यांची निवड करावी अशी अट घालण्यांत आली. कर्जाच्या परतफेडीसाठीहि मुदतींत सवलती देण्यांत आल्या. उद्योगासाठी नवीन परवाने देण्याच्या बाबतींत मक्तेदार उद्योगपतींच्या बाबतींत कांही बंधनें घालण्यांत येऊन परवाने देण्याच्या नव्या धोरणानुसार मध्यम व लहान लहान उद्योजकांना सढळपणानं परवाने देण्याचं धोरण अवलंबण्यांत आलं.

आर्थिक धोरण यशस्वी व्हायचं तर, ज्यांना या धोरणाचा लाभ व्हावा अशी अपेक्षा असते त्या लोकांचं सर्वतोपरी साहाय्य त्यासाठी मिळणं आवश्यकच असतं. सरकारची आर्थिक धोरणं हीं असमंजसपणाची आणि कित्येकदा राजकारणांतील गरज समोर ठेवून, एखाद्या प्रश्नांतून तात्पुरती सोडवणूक करून घेण्यासाठीच ठरवलीं जातात, असा अनेकदा आरोप केला जातो. यशवंतरावांचं त्यावर म्हणणं असं की, कोणत्याहि सरकारला आपलं धोरण ठरवतांना राजकारणाच्या विचारापासून दूर रहातां येणार नाही. परंतु सरकारचीं धोरणं हीं केवळ राजकीय हेतूनंच ठरवलीं जातात हें खरं नव्हे. सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीची ऐतिहासिक पार्श्वभूमि, विकासाचं काम करतांना कुणालाहि विसरतां येणार नाही. अर्थात् राजकीय विचार हाहि कमी महत्त्वाचा मानतां येणार नाही.

आर्थिक विकासाच्या संदर्भांत सरकारची कोणती भूमिका असावी याबाबतहि यशवंतरावांचे विचार स्पष्ट होते. त्यांचं म्हणणं असं की, लोकशाही पद्धतींत, लोकांच्या आशा-आकांक्षा या अंतर्भूत असल्याचं गृहीत धरावंच लागतं. त्यामुळे समाजांतला जो दुर्लक्षित भाग असेल त्यांच्या गरजांकडे लक्ष देण्याची जबाबदारी सरकारनं स्वीकारलीच पाहिजे; आणि त्यांच्यापर्यंत राष्ट्रीय उत्पन्नांतील वांटा पोंचेल असं पाहिलं पाहिजे. हें

करायचं तर समाजांतल्या श्रीमंतवर्गाकडून बचत-रूपानं, कर-रूपानं पैसा जमा करून राष्ट्रीय खजिन्यांत त्याची भर घालत रहाणं क्रमप्राप्त ठरतं. कारण राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ झाल्याशिवाय आणि सरकारच्या खजिन्यांत भर पडत राहिल्याशिवाय सरकारला आपलीं प्राप्त कर्तव्यं पूर्ण करतां येणार नाहीत.

यशवंतरावांचा हा दृष्टिकोन सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या त्यांच्या तळमळीचा द्योतकच आहे. अर्थशास्त्राचा आणि धोरणविषयक पद्धतीचा विचार ते उच्च पातळीवरून करतांना आढळतील, परंतु त्या धोरणाची कार्यवाही करण्याची वेळ येते तेव्हा जमिनीवर उभं राहून व्यवहारी पातळीवरूनच त्याची अंमलबजावणी ते सुरू करतात. राज्यकारभाराची प्रत्यक्ष व्यवहाराशीं सांगड घालण्याचा त्यांचा सदा-सर्वकाळ प्रयत्न राहिला. अर्थमंत्र्यांसमोर, किंबहुना भारत सरकारसमोरच देशांतील दारिद्र्य नाहीसं करण्याचं फार मोठं आव्हान आहे याची जाणीव यशवंतरावांनी आपल्या अर्थमंत्रिपदाच्या कारकीर्दीत सातत्यानं ठेवलेली होती. १९७१ च्या निवड-णुकीच्या वेळीं कॉंग्रेसनं 'गरिबी हटाव'ची घोषणा करून एका नव्या कामाचा प्रारंभ केला होता आणि लोकांना त्यांचं जीवन बदलून टाकण्याचं आश्वासन दिलं होतं. अर्थमंत्र्यांनी आपल्या कारकीर्दीत या आश्वासन-पूर्तीसाठी अर्थविषयक धोरणाची दिशा बदलली आणि तें राबवण्याचा कसोशीनं प्रयत्न केला.

अर्थमंत्रिपदाच्या कारकीर्दीत यशवंतरावांनी अर्थविषयक आंतरराष्ट्रीय प्रश्नाच्या सोडवणुकीसाठीहि अनेकदा परदेशचे दौरे केले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांतील चलनाच्या व्यव-हारासंबंधीच्या प्रश्नाचा विचार करून त्याच्या व्यवहाराच्या पद्धतींत बदल सुचविण्यासाठी आणि अर्थविषयक तत्सम प्रश्नांचा विचार करण्यासाठी तयार झालेल्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील वीस राष्ट्रांच्या कमिटीचे यशवंतराव हे प्रतिनिधि होते. या कमिटीच्या ज्या सहा बैठकी झाल्या, या सर्व बैठकांना ते उपस्थित राहिले. भारत, बांगला देश आणि श्रीलंका या तिघांच्या वतीनं त्यांची या कमिटीवर निवड झाली होती. निवडलेले प्रतिनिधि हे आपल्या देशाचे अर्थमंत्री आणि सेंट्रल बँकेचे गव्हर्नर प्रतिनिधि या नात्यानं या कमिटीच्या कामकाजांत भाग घेत असत.

या कमिटीचं कामकाज सुरू असतांनाच विकसनशील २४ राष्ट्रांनी आपला एक गट स्थापन करून अर्थविषयक विविध प्रश्नांच्या संदर्भात, समान आणि एकसंध भूमिका स्वीकारून सर्वच विकसनशील राष्ट्रांच्या समस्यांसंबंधी विचार सुसंगत राखण्याबाबत नमुनेदार असं कार्य केलं. २४ सप्टेंबर १९७२ ला यशवंतरावांनी या गटासमोर सर्वप्रथम आपले विचार व्यक्त केले. त्यानंतर वीस प्रतिनिधींच्या बैठकींत चलनविषयक व्यवहाराच्या बदलाच्या संदर्भात २३ मार्च १९७३ ला मार्गदर्शन केलं. १९७३ च्या जुलै आणि सप्टेंबरमध्ये या कमिटीच्या आणि २४ विकसनशील राष्ट्रांच्या ज्या बैठकी झाल्या त्या प्रत्येक बैठकींत त्यांनी पुढाकार घेतला होता. या बैठकीमधील कामकाजाच्या प्रगती-संबंधी त्यांनी ६ एप्रिल १९७३ ला लोकसभेसमोर, विकसनशील राष्ट्रांचे अर्थविषयक

प्रश्न सोडवण्यासाठी भारतानं स्वीकारलेल्या भूमिकेचं विस्तृत निवेदन केलं. कमिटीच्या बैठकीसाठी सप्टेंबर १९७४ अखेरपर्यंत म्हणजे त्यांच्याकडे अर्थमंत्रिपदाचीं सूत्रं होतीं तोंपर्यंत यशवंतरावांचे या कार्यासाठी परदेशचे दौरे सुरू राहिले.

अर्थमंत्रिपदाचीं सूत्रं स्वीकारल्यापासून, त्यांच्या कल्पनेंतील अर्थविषयक धोरणाचा पाठपुरावा त्यांनी सातत्यानं केला आणि राष्ट्राचा आर्थिक विकास घडून येण्याच्या कामीं मोलाची भर घातली. त्यांनी ठरवून दिलेल्या धोरणानंच देशाची अर्थविषयक वाटचाल मग भावी काळांत सुरू राहिली. त्यांच्यापूर्वी अर्थतज्ज्ञ अर्थमंत्र्यांनी अर्थखात्याचा कारभार केला होता; परंतु अर्थखात्याचा चेहरा-मोहरा बदलून अर्थविषयक सुसंगत धोरण राबवण्याचं विधायक कार्य यशवंतरावांनी या खात्याच्या आपल्या चार वर्षांच्या कारकीर्दीत केलं. अर्थखात्याचा कारभार सातत्यानं चार वर्षं सुरळीत चालवणारे यशवंतराव हे त्या खात्याला लाभलेले पहिलेच मंत्री असावेत.

यशवंतराव अर्थखात्याच्या धोरणाला नवं वळण लावून आर्थिक विकास साध्य करण्याच्या कामांत गुंतलेले होते; परंतु त्याच वेळीं सार्वत्रिक निवडणुकांच्या विचारांनी त्यांच्या मनांत गर्दी जमवली. या मुदतपूर्व निवडणुका प्रत्यक्षांत १९७१ च्या मार्चमध्ये झाल्या, परंतु त्यापूर्वी सात महिन्यांपासून यशवंतराव मुदतपूर्व निवडणुकांचा विचार करण्यांत गुंतलेले होते. वस्तुतः १९७२ मध्ये रीतसर निवडणुका होणारच होत्या.

मुदतपूर्व निवडणुकांसंबंधीचं त्यांचं गणित वेगळं होतं. १९७० च्या ऑगस्टमध्येच आपल्या सहकाऱ्यांशीं चर्चा करतांना निवडणुका लवकरांत लवकर घ्याव्यात असं त्यांनी आपलं मत सांगितलं. कॉंग्रेसनं आता वेळ न गमावतां, निवडणुकांना सामोरं जावं असं त्यांनी सप्टेंबरमध्ये पंतप्रधानांनाहि सुचवलं; परंतु त्या वेळीं पंतप्रधानांचे सल्लागार आणि कॉंग्रेसचे अध्यक्ष जगजीवनराम हे मुदतपूर्व निवडणुका व्हाव्यात यासाठी अनुकूल नव्हते. दरम्यान मुदतपूर्व निवडणुका घेण्याची जलदी करावी या यशवंतरावांच्या भूमिकेचा नेहमी-प्रमाणे विपर्यस्त अर्थ लावण्यांतहि कांहींनी आपलं बुद्धिकौशल्य प्रगट करण्यास सुरुवात केली. मुदतपूर्व निवडणुका घ्यायला सांगण्यामागे, यशवंतरावांना राजकारणावर कबजा करावयाचा असून, त्यासाठी ते हा एक सापळा तयार करीत आहेत असा अर्थ कोणी सांगूं लागलं.

इंदिरा गांधी यांनी, मुदतपूर्व निवडणुकांसंबंधांत अनुकूल किंवा प्रतिकूल प्रतिक्रिया व्यक्त केली नाही; परंतु लोकसभा आणि विधानसभा यांच्या पोटनिवडणुकांचे निकाल त्या बारकाईनं न्याहाळत राहिल्या. निर्णय करण्यापूर्वी, देशांत वारं कोणत्या दिशेनं वहातंय् हें त्यांना अजमावयाचं होतं. कॉंग्रेसमध्ये दुफळी झाल्यानंतर नऊ पोटनिवडणुका घ्याव्या लागल्या. इंदिरा-कॉंग्रेसनं यांतील सात निवडणुका लढवल्या आणि पांच जिंकल्या. निजलिंगप्पा-कॉंग्रेसला एकहि जागा मिळाली नाही. पंजाब, महाराष्ट्र, मध्य-प्रदेश आणि केरळ या राज्यांत या निवडणुका झाल्या होत्या.

या सर्व निवडणुकांमध्ये काँग्रेसचं चित्र ठळकपणानं उमटलं होतं. यशवंतरावांचं म्हणणं, वारं कोणत्या दिशेनं वहातंय् त्याची ही खूण आहे. निवडणुका लवकर घेण्याच्या मागे त्यांचा विशिष्ट दृष्टिकोन होता. सरकारनं बँकांचं राष्ट्रीयीकरण केलं होतं; संस्थानिकांचे तनखे रद्द केले होते. जनतेमध्ये वेगळं वातावरण निर्माण झालं होतं. जनतेनं सरकारचा हा निर्णय मनानं स्वीकारला होता. या बदलत्या वातावरणाचा लाभ काँग्रेसनं घ्यावा अशी यशवंतरावांची भूमिका होती.

काँग्रेसच्या दुफळीनंतर १९७० मध्ये लोकसभेंतलं वातावरणहि बदललं होतं. बँकांचं राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे आणि सरकारनं डाव्या गटाशीं केलेली हातमिळवणी यांवर लोकसभेंत उजव्या गटाकडून रोज कडक टीका केली जात होती. सरकारनं आर्थिकदृष्टया पुरोगामी निर्णय करून त्याच्या अंमलबजावणीसाठी अधिक कडक धोरण अवलंबलं पाहिजे, म्हणून डावा गटहि सरकारवर टीका करीत होता.

देशांत त्यापूर्वीच्या एक-दोन वर्षांत ज्या राजकीय घटना घडल्या होत्या आणि घटनेची छाननी करून जो कायदेशीर अर्थ लावला जात होता, त्यामुळे सर्वत्र असहायतेचं वातावरण निर्माण झालं होतं आणि तें वाढत होतं. या सर्वच बाबतींत आपण नव्यानं लोकमताचा आदेश मिळवावा असं यशवंतरावांचं मत होतं. त्याचबरोबर सरकारला आता अन्य पक्षावर अवलंबून रहाण्याशिवाय आणि त्यांच्याशीं सल्लामसलत करण्याशिवाय गत्यंतर उरलेलं नाही अशी समजूत लोकांमध्ये वाढत रहाणं योग्य नव्हतं. यापेक्षाहि आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे निवडणुका लांबणीवर टाकून उजव्या शक्तीला संघटित होण्याला वेळ मिळवून देणं काँग्रेसच्या दृष्टीनं योग्य ठरणारं नव्हतं. यशवंतरावांच्या मतानं मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा निर्णय करण्यास परिस्थितीचं हें आव्हान पुरेसं होतं.

परिस्थितीचं त्यांचं हें निदान कसं वास्तव होतं याचं दर्शन नजीकच्या काळांतच घडलं. कारण डिसेंबर १९६९ च्या डिसेंबरमध्ये मोरारजी देसाई, निजलिंगप्पा, संजीव रेड्डी आणि आणि स. का. पाटील यांनी स्वतंत्र पक्ष आणि जनसंघ यांच्याबरोबर निवडणूक-समझोता करण्याविषयी वाटाघाटी सुरू केल्या. संघटना काँग्रेसमधील तरुण गटाच्या विरोधामुळेच हा बनाव सिद्धीस जाऊं शकला नाही; परंतु सरकारचा पराभव करण्यासाठी जिद्दीस पेटलेले मोरारजी यांनी निरनिराळ्या पक्षांशीं निवडणूक-समझोता करण्याचे प्रयत्न सोडले नव्हते. त्यांनी जनसंघाचे नेते बलराज मधोक आणि स्वतंत्र पक्षाचे एम्. आर. मसानी यांच्याशीं संधान बांधलं आणि समझोत्याचा बनाव अखेरीस सिद्धीस नेला. त्याहीपुढे जाऊन समविचाराच्या विरोधी पक्षांनी एकत्र यावं यासाठी आवाहन करण्यांत आलं होतं. सरकारला खाली खेचायचं तर बडी आघाडी निर्माण करावी लागणार होती.

बडी आघाडी जन्मास येणार असा रंग दिसूं लागतांच, यशवंतरावांना सर्वप्रथम त्यांतला धोका जाणवला आणि या आघाडीवर आघाडी मिळवायची, तर निवडणुका नव्यानं जाहीर करणं हाच एक उपाय होऊं शकतो, असं यशवंतरावांचं ठाम मत बनलं.

महाराष्ट्र प्रदेश-काँग्रेसच्या ३ जुलैला झालेल्या कार्यकारिणीच्या एका ठरावाद्वारें मग कार्यकर्त्यांना या परिस्थितीची जाणीव करून देण्यांत आली. संघटना काँग्रेस, जनसंघ आणि स्वतंत्र यांच्या अपवित्र युतीशीं सामना करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सिद्ध रहावं असं या ठरावांत नमूद करण्यांत आलं होतं. यशवंतराव हे या कार्यकारिणीच्या बैठकीला उपस्थित होते. विरोधी पक्षांची ही युति नक्षलाइटसनी केलेल्या उद्योगापेक्षांहि अधिक धोक्याची आहे याची जाणीव त्यांनी या बैठकींत बोलतांना दिली.

अखेरीस १९७० च्या डिसेंबरमधील लोकसभेचं हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी लोकसभा बरखास्त करण्याचा आणि मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा निर्णय पंतप्रधानांनी केला. या निर्णयासंबंधी सर्वत्र चर्चा सुरू झाल्या, परंतु पंतप्रधानांनी विरोधी पक्षांना आणि आपल्या पक्षांतील सहकाऱ्यांनाहि, निवडणुकांच्या वेळेचा थांगपत्ता लागू दिला नाही. डिसेंबरच्या तिसऱ्या आठवड्यांत काँग्रेस-कार्यकारिणीनं सरकारला नव्यानं निवडणुका घेण्याचा आदेश दिला तेव्हाच सर्वांना हा निर्णय समजला. सरकारनं त्यानुसार राष्ट्रपतींना कळवतांच राष्ट्रपतींनी २७ डिसेंबरला लोकसभा बरखास्त करून मुदतपूर्व निवडणुका मार्च १९७१ मध्ये होतील असं जाहीर केलं. राष्ट्रपतींची ही घोषणा ऐकतांच विरोधी पक्षांना भयंकर धक्का बसला. राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त करूं नये यासाठी त्यांच्यांतील कांहींनी अगोदर प्रयत्न केले होते, परंतु त्यांत त्यांना यश आलं नव्हतं.

निवडणुकीचा कार्यक्रम निश्चित झाला. परंतु काँग्रेस-पक्षानं उमेदवाराची यादी मात्र पुढे जानेवारीच्या अखेरीस जाहीर केली. कांही उमेदवारांचीं नांवं तर फेब्रुवारींत जाहीर केलीं. अन्य विरोधी पक्षांच्या उमेदवाराच्या याद्या अगोदरच जाहीर झाल्या होत्या. संघटना काँग्रेसनं मग या निवडणुकींत व्यत्यय निर्माण करण्याच्या हेतूनं काँग्रेसच्या निवडणूक-चिन्हाचा वाद उकरून काढून सर्वोच्च न्यायालयापर्यंत धांव घेतली. काँग्रेसनं त्यामुळे पक्षाच्या बैलजोडीच्या चिन्हांत बदल केला आणि आठवडाभरांत 'गाय-वासरूं' हें चिन्ह निश्चित करून त्याचाच प्रचार सुरू केला.

या निवडणूक-प्रचाराच्या दौऱ्यांत यशवंतरावांनी लोकांना दोन मूलभूत विचारांवर लक्ष केंद्रित करण्याचं आवाहन केलं. त्यांनी सांगितलं की, देशांतल्या बहुसंख्य लोकांची स्थिति ज्यामुळे सुधारेल असा काँग्रेसचा कार्यक्रम मतदारांपुढे आहे आणि दुसरा, देशांत संस्थानिक असावेत, सर्व क्षेत्राची मक्तेदारी रहावी आणि देशाचा विचार प्रतिगामी भूमिकेंतूनच करावा असा एक कार्यक्रम आहे. मतदारांनी यांतल्या कोणत्या कार्यक्रमाची निवड करायची हें या निवडणुकीचं आव्हान आहे. दिल्लींतल्या कॅनॉट सर्कसवर झालेल्या निवडणूक-प्रचाराच्या सभेंत त्यांनी इंदिरा गांधींच्या नेतृत्वाचं महत्त्व सांगितलं आणि हुकूमशहा म्हणून त्यांच्यावर करण्यांत येणाऱ्या टीकेचा समाचार घेतला. त्यांनी सांगितलं की, त्या हुकूमशहा असत्या तर, चौदा महिने मुदत शिल्लक असतांना लोकसभा अगोदरच बरखास्त करून आपल्या पुरोगामी धोरणासाठी, लोकांची

मान्यता मिळवण्यासाठी निवडणुकीच्या फंदांत त्या पडल्या नसत्या. हुकूमशहा हा आपल्या हेतूच्या सिद्धीसाठी हातांत बंदूक घेऊनच उभा रहातो. लोकांकडे जाऊन त्यांची मान्यता मिळवण्यासाठी त्यांना आवाहन करण्याच्या मार्गाचा अवलंब करत नसतो.

या निवडणुकांमध्ये देशांत स्थिर स्वरूपाचं मध्यवर्ती सरकार अस्तित्वांत आणण्याचं आवाहन मतदारांना सर्वत्र करण्यांत आलं. किंबहुना मुदतपूर्व निवडणुकांचा तोच प्रमुख हेतु होता. महाराष्ट्रांतील कॉंग्रेस-पक्ष हा स्थिर आणि भक्कम पवित्र्यांत उभा होता. या निवडणुकांत लोकसभेच्या ४४ जागांपैकी महाराष्ट्र कॉंग्रेसनं ४३ जागा जिंकल्या. स्वतः यशवंतराव हे सातारा मतदार-संघांतून विरोधी उमेदवारापेक्षा १ लक्ष ७१ हजार मतं अधिक मिळवून विजयी झाले.

या निवडणुकांच्या वेळीं महाराष्ट्रांत शिवसेनेनं कॉंग्रेसला आव्हान दिलं होतं. मुंबईतील निवडणूक-प्रचाराच्या यशवंतरावांच्या सभा उधळून लावण्याचाहि शिवसेनेनं प्रयत्न केला. किंबहुना त्यांच्यासमोर शिवसेना झिंदाबाद आणि 'चव्हाण चले जाव' अशा घोषणा केल्या. निवडणुकांनंतर सेना-प्रमुख बाळ ठाकरे यांनी तर, यशवंतरावांची मुंबईतील शिवाजी पार्कवर सभा होऊं दिली जाणार नाही अशी दमदाटीच केली; परंतु शिवसेनेचं हें आव्हान स्वीकारून यशवंतराव खास विमानानं दिल्लीहून मुंबईला आले आणि निवडणूक-विजयाच्या शिवाजी पार्कवरील सभेला हजर राहिले. शिवसेनेनं या सभेवर बहिष्कार घाला, असं जनतेला आवाहन केलं होतं; परंतु या सभेला तीन लाखांवर लोक उपस्थित राहिले आणि ही एक ऐतिहासिक सभा ठरली.

१९७१ च्या या मुदतपूर्व निवडणुकांत कॉंग्रेसनं भरघोस यश संपादन केलं. लोकसभेंतील जनसंघाचे पूर्वी ३५ खासदार होते ते निवडणुकांनंतर २२ शिल्लक राहिले. स्वतंत्र पक्षाची संख्या ४४ वरून ८ पर्यंत खाली घसरली, तर संयुक्त समाजवादी पक्ष २३ वरून ३ पर्यंत घसरला. प्र. स. पक्षाला या निवडणुकांत फक्त २ जागा मिळाल्या. अशा प्रकारे बड्या आघाडीचा त्रिफळा उडाला. कम्युनिस्ट मार्क्सिस्टनी मात्र १९ वरून २५ पर्यंत आघाडी मारली. उजव्या कम्युनिस्ट पक्षास २३ जागा मिळाल्या. संघटना कॉंग्रेस पक्ष हा या निवडणुकींत प्रमुख विरोधी पक्ष म्हणून उभा राहिला होता. परंतु या पक्षाची निवडणुकींत कमालीची घसरगुंडी होऊन लोकसभेंतील पांचव्या क्रमांकाचा हा पक्ष ठरला.

या निवडणुकांतल्या निकालासंबंधी यशवंतरावांनी असं विवेचन केलं की, आघाडी निर्माण झाली होती, परंतु ही एक नकारात्मक राजकारण करणारी आघाडी आहे, असाच त्याचा अर्थ लोकांना अभिप्रेत होता. या निवडणुकांपूर्वीच्या दोन वर्षांत ज्या विविध घटना घडल्या होत्या त्यामुळे सर्वत्र एक प्रकारची निराशा निर्माण झाली होती. या निवडणुकांच्या निमित्तानं कॉंग्रेसनं जो कार्यक्रम जाहीर केला, त्यामुळे देशाला एक नवी दिशा दाखवली, 'गरिबी हटाव'ची घोषणा केली. त्यामुळे लोकांच्या आशा पल्लवीत झाल्या आणि कॉंग्रेसच्या नेत्यांच्या आर्थिक पुरोगामी धोरणामुळे लोकांच्या मनांत विश्वास निर्माण होऊन त्यांनी कॉंग्रेस-नेतृत्वाला पाठिंबा देण्याचं मनोमन ठरवलं. पंतप्रधान

इंदिरा गांधी यांचं नेतृत्व हें लोकांच्या आशा-आकांक्षा फलद्रूप करणारं एक प्रतीक ठरलं. या निवडणुकांत प्रचंड विजय संपादन केल्यानंतर इंदिरा-सरकारचं नव मंत्रिमंडळ अस्तित्वांत आलं. केंद्र-सरकार आता स्थिर बनलं होतं; परंतु सरकारसमोर महागाईची आणि बेकारी निवारणाची मोठी समस्या उभी होती; परंतु त्यापेक्षाहि गंभीर प्रश्न आर्थिक विषमतेचा आणि सर्वदूर पसरलेल्या दारिद्र्याचा होता. अर्थमंत्री यशवंतरावांना या प्रश्नांची सोडवणूक करण्यावर लक्ष केंद्रित करावं लागणारच होतं. लोकांच्या ज्या आशा-आकांक्षा वाढल्या होत्या, त्या केवळ राजकारणी नेत्यांनी त्यांना दिलेल्या आश्वासनामुळेच वाढलेल्या आहेत असं नसून, आधुनिक काळांतील जीवनमानाचा तो एक परिणाम असल्यानं, त्यांतून मनांत निराशा दाटणं हें स्वाभाविक ठरतं; परंतु ही निराशा नाहीशी करण्याचा प्रयत्न करावाच लागेल असं यशवंतरावांचं आवाहन होतं. त्याच दृष्टिकोनांतून त्यांची अर्थमंत्रिपदाची कारकीर्द या निवडणुकांनंतर सुरू राहिली. त्यांच्या कारकीर्दीतच त्यांनी विमा-धंद्याचं राष्ट्रीयीकरण करण्याचा एक महत्त्वाचा निर्णय केला. आर्थिक क्षेत्रांत दूरवर परिणाम घडवणारा हा एक ऐतिहासिक निर्णय ठरला. त्याचप्रमाणे समाजांतील दुर्बल घटक, सामान्य माणूस, त्याचं जीवन सुधारण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रांतील बँका या परिणामकारक साधन व्हाव्यात यासाठीहि महत्त्वाचे निर्णय केले. त्यामुळे व्यवहारी अर्थमंत्री म्हणून त्यांची प्रतिमा देशासमोर आणि परदेशांतहि निर्माण झाली.

# २५

यशवंतराव अर्थखात्याचा कारभार पहात असतांनाच १९७४ च्या मध्यावर त्यांना अचानक नव्या आव्हानाला सामोरं जावं लागलं. केंद्रीय मंत्रिमंडळांत खात्यांची अदला-बदल करण्याची परिस्थिति निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी तो निर्णय करतांच यशवंतरावांशीं त्यांनी चर्चा सुरू केली. यशवंतरावांकडे पुन्हा संरक्षणखातं सोपवलं जाणार अशा चर्चा त्या काळांत बाहेर सुरू झाल्या होत्या. जगजीवनराम हे त्या वेळीं संरक्षणमंत्री होते.

पंतप्रधान आणि यशवंतराव यांच्यांत खातें-बदलासंबंधांत चर्चा झाल्यानंतर, यशवंतरावांनी परराष्ट्र-व्यवहारखात्याची जबाबदारी स्वीकारली आणि ११ ऑक्टोबर १९७४ ला त्यांनी या नव्या खात्याचीं सूत्रं स्वतःकडे घेतली.

१९६२ सालीं यशवंतराव दिल्लीला दाखल झाल्यापासून त्यांनी संरक्षण, गृह आणि अर्थ या खात्यांमध्ये जें काम केलं, जो अनुभव घेतला, त्या अनुभवाचाच भाग म्हणजे या नव्या खात्याची जबाबदारी होती. मात्र या नव्या खात्याचा कारभार करतांना त्यांना तत्त्वांची आणि धोरणाच्या क्षेत्रांतील अंमलबजावणी आता करावी लागणार होती.

विविध समस्यांचा मूलभूत विचार करण्याची सवय ही यशवंतरावांनी आपल्या मनाला लावून घेतलेली जुनी सवय आहे. वाचणं आणि विचार करणं याचा त्यांना कधीच कंटाळा नसतो. परराष्ट्र-व्यवहारखात्यांत आता त्यांना तेंच करावं लागणार होतं. त्या दृष्टीनं त्यांना नव्यानं मिळालेलं काम हें त्यांच्या आवडीचंच काम ठरलं. जगांतील मुत्सद्यांशीं होण्याऱ्या गाठीभेटी, चर्चा करण्याचा अनुभव हा एका अर्थानं कसोटीचा आणि मनाला उत्तेजित करणारा, प्रसन्न करणारा अनुभव असतो. संरक्षणमंत्री असल्या-पासून यशवंतरावांनी असे अनुभव अनेकदा घेतलेले होते. त्यामुळे परराष्ट्रखातं स्वीकारल्या दिवसापासूनच त्यांनी कामास प्रारंभ केला. दिल्लींत पोंचल्यापासून चढत्या श्रेणीनं यशवंतराव आता परराष्ट्रखात्यांत दाखल झालेले होते. या खात्याच्या कारभाराच्या

अनुभवाबद्दल पुढे सहा महिन्यानंतर जाहीरपणें बोलतांना वाई येथील जाहीर सॆभत त्यांनी सांगितलं की, दहा-बारा वर्षं जें काम केलं त्याच अनुभवाचा भाग म्हणून हे नवं काम असलं, तरी तत्त्वांचा आणि धोरणांच्या क्षेत्रांत आता प्रामुख्यानं कराव्या लागणाऱ्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा हा भाग आहे.

भारताचं परराष्ट्रीय धोरण हें पं. नेहरूंच्या कारकीर्दीतच निश्चित झालेलं आहे. अलिप्ततेचं धोरण म्हणून भारताचं धोरण सर्वश्रुत आहे. यशवंतरावांचा या कामांतला अनुभव असा की, भारताच्या परराष्ट्र-नीतीबद्दलच्या धोरणानं जगांत आता चांगलं मूळ धरलं आहे. जागतिक लष्करी गटबाजीपासून अलिप्त राहून देशहिताच्या दृष्टीनं स्वतंत्र निर्णय घेण्याचं धोरण पं. नेहरूंनी पुरस्कारलं त्या वेळीं उलटसुलट टीका होत राहिल्या होत्या. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय तंटे हे तडजोडीच्या मार्गानं सुटावेत असा त्या वेळीं भारतीय नेत्यांचा कळकळीचा प्रयत्न होता. यशवंतराव आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत या धोरणाचा सातत्यानं, हिरीरीनं अवलंब करत आहेत. अलिप्तता ही केवळ कांही देशाची मर्यादित शक्ति न रहातां परराष्ट्रीय धोरणाची ती एक चळवळ बनावी असा यशवंतरावांचा प्रयत्न असून त्याला क्रमाक्रमानं मूर्त स्वरूप येऊं लागलं आहे.

पं. नेहरूंनी अलिप्तता-धोरणाचा पुरस्कार केला तेव्हा त्यांनी थंड्या युद्धाच्या संदर्भांत हें सांगितलेलं नव्हतं. पण त्याचा गाजावाजा मात्र तसा झाला; परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर जगांत जे विचारप्रवाह व नव्या शक्ति निर्माण होत राहिल्या होत्या त्याचं त्यांनी अचूक निदान केलं होतं आणि त्याची परिणति त्यांच्या अलिप्तता-धोरणांत झाली होती. जसजसा काळ गेला त्या प्रमाणांत पं. नेहरूंच्या व त्यांच्या पाठीराख्यांच्या विचाराला सगळीकडून साथ मिळत गेली आणि आता तर थंड्या युद्धाचा काळ जाऊन सामंजस्याचा काळ आला असल्याचं सर्वत्र बोललं जाऊं लागलं आहे. अलिप्त राष्ट्रांनी केलेले निर्णय हे संयुक्त राष्ट्रसंघाच्या सभेंत मान्य करावे लागतात असाच अनुभव संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिवेशनांत प्रकर्षानं येत राहिला ही अलिप्ततेच्या धोरणाच्या यशाची मोठी साक्ष आहे. सध्या शंभरावर राष्ट्रं या धोरणाचे सभासद असून, कांही देश तर पं. नेहरूंनाच या धोरणाचे उद्गाते मानतात. अलिप्तता तत्त्व मानणाऱ्या राष्ट्रांच्या निरनिराळ्या परिषदा होतात. त्या वेळीं अलिप्तता तत्त्व मानणाऱ्या राष्ट्रांच्या जोडीला बसण्यासाठी 'आमच्या देशाला सभासद करून घ्या' अशी मागणी आता पुढे येत राहिली आहे.

भारताला या संदर्भांत जागतिक क्षेत्रांत फार मोठं काम करतां येण्यासारखं आहे, असं यशवंतरावांना वाटतं. विविध देशांच्या भेटीमध्ये त्यांना तें जाणवत आहे. विकसनशील राष्ट्रांसमोर त्यांच्या देशांतर्गत विकासाचे विविध प्रश्न उभे आहेत. विकासाच्या स्पर्धेत बड्या राष्ट्रांच्या जोडीला बसण्याची प्रत्येकाला ईर्षा आहे. विकास साध्य करून जीवनमान सुखी व्हायचं, तर विकासाच्या रथाला अडथळा प्राप्त होणार नाही, असंच जागतिक वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता, विकसनशील देशांना

वाटत आहे. हें वातावरण निर्माण करण्याच्या कामीं यशवंतरावांचे प्रयत्न सुरू असून, हळूहळू भारताच्या परराष्ट्र-व्यवहारखात्याचा तो एक विशेष ठरत आहे. परराष्ट्र-व्यवहारखात्याचं काम करतांना, आजकालच्या राजकीय चातुर्यामध्ये, परराष्ट्र-संबंध हे निवळ राजकीय मुत्सद्देगिरीपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, असं यशवंत-रावांचं मत तयार झालेलं आहे. ते सांगतात की, परराष्ट्र-धोरणामध्ये आर्थिक धोरणाचा आशय वाढलेला असून तो आणखी वाढत रहाणार आहे. विकासासाठी लागणारं तंत्रज्ञान हस्तगत करणं, उद्योगधंद्यांसाठी कच्चा माल मिळवणं, देशांत तयार झालेल्या मालाला परदेशी बाजारपेठा मिळवणं आणि त्यांतून आवश्यक तें परकी चलन प्राप्त करणं, विविध स्वरूपाच्या ज्या आर्थिक संघटना उभ्या राहिल्या आहेत त्यांच्याशीं संबंध प्रस्थापित करणं आणि मुख्य म्हणजे या सर्वांची देशांत जाण निर्माण करणं, हा परराष्ट्र-धोरणाचा व आर्थिक धोरणाचा भाग बनला आहे. याचा अर्थ यशवंतराव हे परराष्ट्र-व्यवहार-खात्याचे मंत्री असले तरी संबंधित अन्य खात्याला पूरक असं सर्व कार्य त्यांना करावं लागत आहे. पूर्वानुभवाची भरगच्च शिदोरी पाठीशीं असल्यानं, या जबाबदाऱ्या यशवंतराव सराइतपणें पार पाडत आहेत.

विकसनशील देशांना अर्थविषयक क्षेत्रांत परस्परांशीं सहकार्य करून एकमेकांना शक्ति देण्याची सध्याच्या काळांत फार मोठी गरज आहे. भारतानं गेल्या वीस-पंचवीस वर्षांच्या काळांत जी औद्योगिक प्रगति साध्य केली त्यामुळे या बाबतींत भारताला पुष्कळ कार्य करतां येण्यासारखं आहे अशी विकसनशील राष्ट्रांची भावना असून, त्याच भूमिकेंतून भारताच्या परराष्ट्रखात्याकडून त्यांच्या कांही अपेक्षा आहेत. यशवंरावांना त्याची चांगली जाण आहे. कारण आर्थिक धोरण ठरवण्याची शक्ति असलेल्या आंतरराष्ट्रीय अर्थ-संस्था राजकीय धोरणांत एका रात्रींत बदल घडवूं शकतात, असा त्यांना अर्थमंत्री म्हणून काम करतांना अनुभव आलेला आहे. चलन-संकटाचा अनुभव त्यांनी घेतलेला आहे. त्यामुळे अविकसित राष्ट्रांचे प्रश्न ते वेगळ्या सहानुभूतीनं समजावून घेऊं शकतात.

प्रत्येक राष्ट्रांतील अंतर्गत विषमता व राष्ट्रा-राष्ट्राची विषमता दूर करण्यासाठी व्यापार, उद्योगधंदे या आर्थिक क्षेत्रांतील कार्यपद्धतींत मूलभूत फरक करून दुनियेंतील संपत्तीची पुनर्वाटणी मानवी विकासासाठी झाली पाहिजे असा प्राथमिक स्वरूपाचा प्रश्न जगापुढे अग्रहक्कानं निर्माण झाला असलेल्या काळांत यशवंतराव परराष्ट्र-व्यवहारखात्याचा कारभार सांभाळीत आहेत, हा एक विलक्षण योगायोग म्हणावा लागतो. मानवी विकासाच्या ध्येयानं प्रेरित होऊनच त्यांची आजवरची राजकारणांतली वाटचाल झालेली आहे. महाराष्ट्रांत असतांना आणि राष्ट्राच्या पातळीवर दिल्लींत पोंचल्यानंतरहि त्यांची याच ध्येयानं वाटचाल सुरू राहिली. आता तर त्यांना विश्व-पातळीवर त्यासाठी काम करावं लागत आहे. जगापुढे मानवी विकासाचा हा जो प्रश्न निर्माण झालेला आहे त्या प्रश्नाच्या उत्तरावर आणि त्याच्या अंमलबजावणीवरच जागतिक शांतता आणि एका अर्थानं मानवाचं भवितव्य अवलंबून आहे, याबद्दल यशवंतरावांच्या मनांत संशय नाही.

विकसनशील राष्ट्रांशीं याच दृष्टिकोनांतून ते चर्चा, वाटाघाटी करत राहिले आणि देवाणघेवाणीचे करार घडवून आणले. परराष्ट्र-नीतिसंबंधांत तत्त्वनिष्ठ, पण व्यवहारी धोरण भारताच्या नेतृत्वानं स्वीकारलं असल्यानं, विकसनशील राष्ट्रांच्या मनांत त्यानं मूळ धरलं आहे. त्याची जोपासना आणि वाढ यशवंतराव करत राहिले आहेत.

परराष्ट्र-व्यवहारखात्याचीं सूत्रं यशवंतरावांनी ११ ऑक्टोबर १९७४ ला स्वीकारल्यानंतर त्यांच्या परदेश-दौऱ्यांचा प्रारंभ पुढच्याच महिन्यांत सिलोनच्या – श्रीलंका-भेटीपासून झाला. १७ नोव्हेंबरला ते श्रीलंका भेटीसाठी रवाना झाले. २० नोव्हेंबरपर्यंत त्यांचा हा पहिला दौरा समाप्त झाला. त्याच वर्षी ३ डिसेंबर ते १० डिसेंबरपर्यंत त्यांनी बांगला देशाला भेट देऊन चर्चा केल्या. श्रीलंका आणि बांगला देश हीं दोन्ही भारताच्या लगतचीं राष्ट्रं. या दोन्ही राष्ट्रांमधील मैत्री राजनैतिक पातळीवर घट्ट बनणं महत्त्वाचं होतं. पहिल्या दोन महिन्यांतच त्यांनी या कामास गति दिली.

त्यानंतर पुढच्याच महिन्यांत, १९७५ च्या जानेवारीमध्ये युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो यांच्याशीं चर्चा करण्यासाठी १९ जानेवारीला ते युगोस्लाव्हियाच्या दौऱ्यावर रवाना झाले. २४ जानेवारीपर्यंत त्यांचा हा दौरा झाला. मार्शल टिटो हे पाश्चिमात्य जगांतले एक समर्थ राजकारणी मुत्सद्दी मानले जातात.

संपूर्ण १९७५ सालांत त्यांनी आठ वेळा परदेशांचे दौरे करून जगांतल्या मुत्सद्यांशीं विविध प्रश्नांच्या संदर्भांत वाटाघाटी केल्या. युगोस्लाव्हियाच्या भेटीनंतर १४ मार्चला ते गियाना, क्यूबाच्या दौऱ्यावर गेले. दोन आठवडे त्यांचा हा दौरा झाला. त्याच्या पुढच्या महिन्यांत ते जमेका, मेक्सिको इकडे २७ एप्रिलला रवाना झाले. या दोन ठिकाणच्या भेटीगाठी आणि चर्चा १४ मेपर्यंत सुरू राहिल्या. तेथून परत येतांच लगेच २७ मे रोजीं ते लेबॅनॉन, इजिप्तच्या भेटीसाठी गेले. पेरू-अमेरिकेचा त्यांचा दौरा असाच दोन आठवड्यांचा झाला. १८ ऑगस्टला ते 'पेरू'कडे रवाना झाले आणि २ सप्टेंबरला परतले; परंतु लगेच त्याच महिन्यांत २८ सप्टेंबरला ते युरोप-अमेरिकेच्या दौऱ्यावर पुन्हा रवाना झाले. त्या वर्षातल्या अखेरच्या तीन महिन्यांत त्यांनी अफगाणिस्तान, इराक, कुवेत, बहारिन, फ्रान्स या देशांना भेटी देऊन तेथील मुत्सद्यांशीं चर्चा केली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीला उपस्थित राहून त्यांनी भारताची बाजू समर्थपणें मांडली.

१९७६ मधील त्यांचं देशाटन नेपाळच्या दौऱ्यापासून सुरू झालं. १९ जानेवारी १९७६ ला त्यांनी नेपाळ-भेटीचं प्रस्थान ठेवलं आणि २२ जानेवारीपर्यंत नेपाळमधील मुत्सद्दी, नेपाळ-नरेश यांच्याशीं चर्चा केल्या. त्यानंतर या वर्षात त्यांनी ३१ मार्चला तुर्कस्तानला भेट देऊन मध्यपूर्वेतील राष्ट्रांशीं मैत्रीचे संबंध जोडण्याच्या कार्यास जोराची चालना दिली. १९७६ च्या मेअखेरीला त्यांनी अल्जेरियाचा दौरा पूर्ण केला. हें सारं देशाटन करतांना भारताच्या राजकीय संबंधाबरोबरच आर्थिक, उद्योग व व्यापारविषयक तसेच सांस्कृतिक संबंध हे वर्धिष्णु रहातील यासाठी त्यांना वेगवेगळ्या पातळीवर चर्चा कराव्या लागल्या, स्नेह निर्माण करावा लागला. या साऱ्या आंतरराष्ट्रीय व्यवहारांतून

यशवंतरावांनी भारताची आणि भारताच्या नेतृत्वाची एक आगळी, समर्थ प्रतिमा जागतिक राजकारणांत निर्माण केली.

विकसनशील राष्ट्रांच्या प्रश्नाबाबत सहानुभूतीचे दृष्टिकोन ठेवणारे यशवंतराव विकसित राष्ट्रांच्या व्यवहारांत आणि वागण्यांत, भारताच्या दृष्टीनं अनुकूल बदल घडावा यासाठी तर विशेष प्रयत्नशील राहिले. भारत-अमेरिका, भारत-रशिया, भारत व मध्यपूर्वेतील राष्ट्रं, भारत-पाकिस्तान, भारत-बांगला देश आणि भारत-चीन यांच्यातील राजनैतिक संबंध सुधारावेत आणि ते दीर्घकाळ टिकून रहावेत यासाठी अलिप्ततेचं आपलं धोरण कायम ठेवून ते वेगळ्या मुत्सद्देगिरीनं पावलं टाकत आहेत, असं आढळतं. अलिप्ततावादाप्रमाणेच शेजारी राष्ट्राशीं हार्दिक संबंध निर्माण करून समाजवादी देशांशीं सहकार्य करणं हें आजच्या जागतिक प्रश्नांचा उलगडा होण्याच्या दृष्टीनं महत्त्वाची परराष्ट्र-नीति ठरली आहे. अविकसित देशाशीं राजनैतिक आणि आर्थिक सहकार्य राखणं आणि साम्राज्यशाही, वसाहतवादी धोरणाविरुद्ध जी शक्ति असेल तिच्याशीं भागीदार असणं देशाच्या परराष्ट्र-नीतिमध्ये अनुस्यूत आहे. कारण जगांत शांतता नांदली पाहिजे हें भारताच्या परराष्ट्र-नीतीचं एक महत्त्वाचं सूत्र आहे.

पिंग-पाँग खेळाडूंबरोबर चीनचे अधिकारी भारतांत आलेले असतांना भारताशीं संबंध सुधारण्यास चीन तयार असल्याचं मत व्यक्त झालं होतं. परंतु भारताला चीनशीं मैत्रीचे संबंध हवे होते ते राजनैतिक पातळीवर निर्माण व्हायला हवे होते. खेळाच्या नव्हे.

चीनबरोबर मैत्री राखण्याचे विचार भारतानं पूर्वीच मान्य केलेले आहेत. चीननं १९६२ सालीं भारतावर आक्रमण केल्यानंतर हे विचार मागे पडले होते; परंतु जागतिक नव्या परिस्थितीच्या संदर्भात, या उभय देशांतील मैत्रीला उजाळा देण्याची गरज लक्षांत घेऊन भारताच्या नेतृत्वानं त्या दिशेनं अलीकडेच सुरुवात केली आणि चीनकडूनहि त्याला आता प्रतिसाद मिळूं लागल्याचीं चिन्हं दिसूं लागलीं आहेत. भारत व चीन यांचे राजदूतावास एकमेकांच्या देशांत असल्यानं प्रत्यक्ष बोलणीं व अनुभव यावर भर द्यावा असं भारत सरकारचं या बाबतींत धोरण राहिलं. सुरुवातीला चीनकडून त्याला प्रतिसाद मिळाला नाही; परंतु स्वाभिमान राखून आणि राष्ट्रीय हितसंबंधांची जागरूकता ठेवून, भारताचं नेतृत्व प्रयत्नशील राहिलं. चीनकडून त्याला आता प्रतिसाद मिळत आहे.

यशवंतराव १९६२ सालीं दिल्लीला पोंचले ते चीनशीं युद्धभूमीवर सामना करण्यासाठी! एक तपानंतर आता यशवंतरावांच्याच हातानं, या दोन देशांच्या मैत्रीची निरगाठ बसावी, अशी नियतीची योजना असल्यास नकळे! कांही अनुकूल घडण्याची प्रक्रिया मात्र सुरू झाली आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी यांचीं पावलं त्या दृष्टीनं, मुत्सद्दीपणानं, स्वाभिमान शाबूत राखून पडूं लागलीं आहेत. यशवंतरावांची त्यांना दर्जेदार साथ आहे. राष्ट्राच्या आणि व्यक्तीच्या जीवनांत योगायोग म्हणतात तो हाच असावा.

परिशिष्ट

# व्यक्तिदर्शन

## - १ -

यशवंतरावांचं व्यक्तिदर्शन हा अभ्यासाचा एक स्वतंत्र विषय आहे. त्यांचं व्यक्तिरूप, सवयी व आवडीनिवडी, त्यांचं सर्वसामान्य वागणं, त्यांची वाणी, तत्त्वज्ञान, त्यांचा व्यवहार, विशिष्ट गुण, स्वभाव आणि राष्ट्रभक्ति, देशनिष्ठा या प्रत्येकाचा कांही एक विशेष त्यांच्या ठिकाणीं आढळतो.

यशवंतरावांची शरीरयष्टि फार उंच आणि धिप्पाड अशी नाही. बांधा मध्यम प्रकारचा – फार स्थूल नाही अन् सडपातळहि नाही असा. रंग सावळा, रुंद चेहरेपट्टी, भव्य कपाळ, जबडा मोठा, नाक कांहीसं मोठं, रुंद जिवणी, पांढरे शुभ्र दात आणि भुवयाच्या खाली लकलकणारे चमकदार टपोरे डोळे, असं त्यांचं उत्तमांग दिसतं.

मुखावर एक प्रकारचं तेज आणि त्यावर सतत खेळत असणारं मंदस्मित, कांही वेळेस गांभीर्य, यांमुळे प्रत्येक माणसावर त्यांची सहज छाप पडते. वयाच्या बेचाळीस-चव्वेचाळीस वर्षांपर्यंत त्यांचं शरीर बाटदार आणि मध्यमवर्गीतील शेतकऱ्याप्रमाणे सडसडीत असंच होतं. आखाड्यांत कुस्ती खेळणारांची, कुस्ती सुटल्यानंतर शरीरयष्टि अशीच बहुशः बनते. ते हाडकुळे नव्हते तसे फार भरदारहि नव्हते. १९४६ नंतर मुंबईला येऊन स्थिर झाल्यानंतरच थोडं पोट सुटलं आणि प्रशस्त दिसूं लागले. त्यापूर्वी ते घरांतल्या लोकांचे आणि मित्रांचेहि 'यशवंत' होते. पुढच्या काळांत 'यशवंतराव' बनले.

यशवंतरावांना छानछोकीचे कपडे वापरण्याचा शौक कधीच नव्हता. प्रारंभींच्या काळांत साधा अंगरखा, धोतर आणि पटका असाच त्यांचा पेहराव असे. पुढे महाविद्यालयांत जाऊं लागल्यानंतर पटक्याची जागा टोपीनं घेतली आणि धोतराऐवजीं चोळणा आला. परंतु बूट, नेकटॉय, सूट अशा बांधीव पेहरावांत त्यांनी स्वतःला क्वचितच बांधून घेतलं. मुंबईत आल्यानंतर आणि पुढे दिल्लीला पोंचल्यानंतरहि, पांढरं स्वच्छ

खादीचं धोतर, सैलसा खादीचा पांढरा किंवा सिल्कचा अंगरखा आणि पांढरीशुभ्र अणकुचीदार खादीची टोपी, जाकीट हाच पोषाख कायम राहिला. परदेशांतील प्रवासांत किंवा दिल्लींतल्या थंडींत, तंग तुमान आणि अचकन ते वापरूं लागले, परंतु त्यांतहि डामडौल आणि भपका यापासून ते दूरच राहिले. साधेच परंतु स्वच्छ व नीटनेटके कपडे हा त्यांचा पोषाखाचा आदर्श राहिला आहे.

शरीररचनेप्रमाणे पोषाखाचाहि मनावर परिणाम होत असतो. भपकेबाज नाही, पण नीटनेटका पोषाख आणि टोपीची विशिष्ट ठेवण या गोष्टी पहाणाराचं मन आकर्षून घेतात. यशवंतरावांचा पोषाख नीटनेटका, त्याच्या जोडीला विशाल व अंतर्भेदी डोळे आणि चेहऱ्यावरील एकूण मर्मग्राही तेजस्विता यांमुळे त्यांचं व्यक्तिमत्त्व उठून दिसतं. महाराष्ट्रांत पुढे पुढे तर त्यांच्या कपड्यांची आणि टोपीची नक्कल सुरू झाली.

यशवंतरावांची घरची रहाणीहि साधी असते. त्यांत खानदानीपणाचा थाट नाही. आपल्याकडे जे कोणी येतील त्यांना, त्यांच्याकडे बरोबरीच्या आसनावर स्थान दिलं जातं आणि ते स्वतः कोणाकडे गेल्यास, प्रसंगीं सतरंजीवर बसण्यासहि अनमान करत नाहीत.

यशवंतरावांनी आपली दिनचर्या साधीच आखलेली दिसते. सकाळीं नऊ वाजण्यापूर्वी प्रातर्विधीपासून न्याहारीपर्यंतचं सर्व उरकलेलं असतं; आणि नंतर भेटीगाठी, चर्चा, सल्लामसलत हे कार्यक्रम सुरू होतात. दररोज सकाळीं प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्रांतून 'आज नवीन काय!' याचा मागोवा घेण्याचं आणि मनाशीं त्याचीं उत्तरं तयार करण्याचं कामहि सुरू रहातं. महाराष्ट्रांत मुख्य मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळतांना तर, वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या घटना बारकाईनं पहाण्याचा त्यांचा परिपाठ होता. आपल्या एखाद्या निर्णयानं समाजांत कोणा व्यक्तीवर, घटकावर अन्याय तर झालेला नाही ना, याची त्यांना चिंता असे; आणि वृत्तपत्रांतून तसं कांही दर्शन घडलं तर त्या अन्यायाचं निराकरण करण्यासाठी त्याचा ते उपयोग करून घेत असत. देशांत आणि जगांत दैनंदिन होणाऱ्या घडामोडींचा अभ्यास हा त्यांच्या दिनचर्येचा एक भाग बनलेला असतो.

त्यांच्या दिनक्रमांत मंत्रिपदाच्या जबाबदारीच्या कामासाठी सर्वांत अधिक वेळ त्यांना द्यावा लागतो. राजधानींत मुक्काम असेल त्या दिवशीं सकाळीं दहा ते दुपारीं एक आणि नंतर तीन ते सायंकाळीं सात वाजेपर्यंत, आपल्या कार्यालयांत बसून काम करणं, चर्चा करणं, निर्णय करणं हें नित्याचं काम सुरू रहातं. जागृत आणि कामाच्या दृष्टीनं चोख असं मंत्रालय, अशीच त्यांच्या स्वाधीन असलेल्या मंत्रालयाची ख्याति त्यामुळे निर्माण झालेली आहे.

जनतेच्या उन्नतीला आवश्यक असणारे आणि सदैव उपकारक होणारे उपाय स्फुरतील त्यांचा आपल्या लोकांना उपदेश आणि राज्ययंत्रणेद्वारे प्रयोग करत रहाणं हें त्यांनी आपल्या जीविताचं एकमेव इतिकर्तव्य मानलं आहे. धंदेवाईक राजकारणी हे लोकहितापेक्षा कित्येकदा स्वार्थाकडे लक्ष ठेवून असतात. यशवंतरावांनी आपल्या

दिनक्रमाला धंदेवाईक राजकारणाचं स्वरूप कधीच प्राप्त होऊं दिलं नाही. राजकारणाचे ते गाढे अभ्यासक बनले, पण राजकारणाचा धंदा करण्याचं कटाक्षानं टाळलं. राजनिष्ठा, लोकनिष्ठा स्वार्थी बनूं दिली नाही. मंत्रालयांत काम करतांना किंवा खाजगी विचार-विनिमय, सल्लामसलत करतांना उच्च विचारांची आणि लोकहिताच्या धोरणाची बैठक कायम राहील असंच दैनंदिन जीवनांतलं बोलणं, करणं आणि वागणं त्यांनी ठेवल्यानं देशांत कोणताहि प्रश्न उपस्थित होवो, यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा त्या संदर्भात उमटत राहिलेला आढळतो.

मंत्रालयांतील वेळेव्यतिरिक्त यशवंतरावांच्या निवासस्थानीं सल्ला विचारण्यासाठी, क्वचित् प्रसंगीं सल्ला देण्यासाठी येणारांचीहि नेहमीच गर्दी आढळते. भेटायला येणारे सर्वच, केवळ राजकारणाच्या चर्चेसाठी येतात असं नाही. आपल्या खाजगी जीवनांतील प्रश्नांचा, तक्रारींचा निकाल करून घेण्यासाठी, सुखदुःखाच्या गोष्टी करण्यासाठी स्त्री-पुरुष, युवक त्यांच्याकडे मोठ्या आशेनं येतात आणि यशवंतरावहि त्यांना सल्ला देतांना आढळतात.

राजकारणांतले आणि पक्ष-संघटनेंतले प्रश्न घेऊन येणारे पुष्कळ असतात. पण त्याचबरोबर कोणी साहित्यिक, कवि आपलं साहित्य, काव्य-ग्रंथ देण्यासाठी येतो आणि पुढच्या योजनांचा प्रस्ताव करून जात असतो. कोणी उद्योगपति, ठीक चाललं आहे असे सुखाचे शब्द ऐकवण्यासाठी, तर कोणी सरकारी धोरणांतील विसंगती आणि व्यावसायिक अडचणी ऐकवण्यासाठी आलेला असतो. लहानमोठे शेतकरी आणि सहकारी क्षेत्रांतील मंडळी विविध प्रकारच्या साहाय्याच्या अपेक्षेनं आलेले असतात, तर शिक्षणक्षेत्रांतला कोणी शैक्षणिक चर्चेसाठी उपस्थित होतो. मधूनच एखाद्या गायक-वादक कलाकाराला, नाटककाराला यशवंतरावांनी आपली कला ऐकावी, पहावी असं वाटतं. कुणाला मुलाचं, मुलीचं लग्न जुळलं हें सांगायचं असतं, तर कुणाला तें मोडलं म्हणून तक्रार नोंदवायची असते. कुणाला नोकरी हवी असते, कुणाचा व्यापार तोट्यांत गेलेला असतो. कुणाच्या घरीं आजारपण शिरलेलं असतं, तर कुणाचा कुटुंबियांकडून छळ सुरू झालेला असतो, भाऊबंदकी माजलेली असते. कुणाच्या अंगाशीं कांही लचांड आलेलं असतं, तर कुणाच्या घरांत वडिलांच्या, भावाच्या, पत्नीच्या वागण्याची तऱ्हा बिघडलेली असते. सार्वजनिक क्षेत्रांत काम करणारा कुणी संस्थेसाठी आर्थिक गाळांत रुतलेला असतो, तर कुणा व्यावसायिकाच्या डोक्यावर कर्जाचा डोंगर उभा असतो.

अशा एक ना दोन, शेकडो कटकटी ऐकणं असा त्यांचा दिनक्रम सुरू राहून त्यासाठी तासन् तास खर्च होत असतात. कोणत्या दिवशीं काय लचांड येईल हें ठरलेलं नसल्यानं, ठराविक दिनचर्याच सुरळीतपणें पार पाडणं हें नेहमीच शक्य होतं असं नाही. स्वतःच कांही झेंगटीं उत्पन्न करायचीं आणि तीं निस्तरीत बसायचं असा कांहींचा स्वभाव असतो. परंतु बाहेर निर्माण झालेलीं झेंगटींच यशवंतरावांच्या मागे एवढीं लागलेलीं असतात की, स्वतः एखादं झेंगट निर्माण करावं असा त्यांचा मनःपिंडहि नाही.

तरी पण त्यांच्या भाषणांतून, निवेदनांतून किंवा एखाद्या निर्णयांतून कृत्रिमपणानं एखादं झेंगट जन्म घेत रहातं आणि तें निस्तरण्याची त्यांच्यावर वेळ येते. दिनचर्येत हाहि एक भाग असतोच. हें सर्व पाहिलं म्हणजे यशवंतराव आपला दिवस कसा घालवतात हें सांगणं एका दृष्टीनं सोपं असलं, तरी दुसऱ्या दृष्टीनं तें सांगणं अवघड आहे. एक गोष्ट मात्र सत्य आहे की, सकाळीं जागं झाल्यापासून तों रात्रीं झोपेपर्यंत, इतकंच नव्हे तर, चोवीस तास त्यांना फुरसतीचा स्वस्थपणा असा क्वचितच मिळतो. कारण रात्रीं झोपल्यानंतर सुद्धा, महत्त्वाच्या कामाचा एखादा फोन घणघणतो आणि गुप्त खलबतासाठी तयार व्हावं लागतं.

लोकहिताचं कार्य आघाडीवर राहून करणाऱ्या नेत्याला किती आणि कशा अनंत यातना भोगाव्या लागतात याचं यशवंतराव हें एक प्रतीक आहे. अविश्वास, अवमान, फितुरी, निंदा, निराशा, टीका आदि अनेक प्रसंगांतूनच त्यांचं प्रारंभापासूनचं जीवन पुढे जात राहिलं.

यशवंतरावांबाबत केवळ शत्रूंचाच गैरसमज होतो असं नव्हे, चांगले मित्र म्हणवणाऱ्यांचाहि गैरसमज होतो. यशवंतरावांवर आजवर समजुतीनं आणि गैरसमजुतीनं ज्या कठोर टीका झाल्या त्या टीकेनं अन्य एखाद्या राजकारणांतील माणसाचा चोळामोळा होऊन गेला असता. अर्थात् या टीकेचा मनावर परिणाम न होण्याइतकं यशवंतरावांचं मन कठोर आहे असं नव्हे, किंवा टीका त्यांच्या कानाला ऐकूं येत नाही असंहि नव्हे; परंतु त्यांनी टीका सहन केली याचं कारण त्यांचं जबरदस्त आत्मसंयमन होय. स्वतःवर होणाऱ्या टीकेचा उपयोग त्यांनी क्षमाशीलता वाढवण्याकडेच केलेला आढळतो. वृत्तपत्रांतून किंवा सभांमधून ज्या ज्या वेळीं त्यांच्यावर टीकेचे प्रहार झाले त्या प्रत्येक वेळीं त्यांनी त्या टीकेंतून एखादा नवा विचार, नवा मुद्दा शोधण्याचा प्रयत्न केला. टीका माणसाला मार्गदर्शक ठरते आणि त्यांतून त्याला स्वतःची सुधारणा घडवतां येते, हाच त्यांचा सिद्धान्त आहे. कित्येकदा कोणी टीकापटु समक्ष त्यांच्या तोंडावर टीका करतो, दुराग्रहानं कांही सांगत रहातो, पण अशा वेळीं, "तुम्ही म्हणतां अशीहि एक बाजू असूं शकते" असं अगदी मृदु शब्दांत त्याच्याशीं बोलून आणि त्याचं सर्व ऐकून घेऊन त्याला ते वाटेला लावतात. आत्मसंयमनामुळेच त्यांना हें शक्य होत असलं पाहिजे. राजकीय नेत्यांच्या तुलनेंत त्यांचा हा स्वभाव कांही वेगळंच सांगून जातो. त्यांच्या कांही मित्रांनी सार्वजनिक सभेंतहि त्यांना अनेकदा कोपरखळ्या दिल्या आहेत. टीका केल्या, परंतु हसतमुखानं, विनोद-बुद्धीनं त्यांनी ते प्रत्येक वेळीं गट्ट केलं. बाळासाहेब भारदे यांचं भाषण आणि त्या ठिकाणीं यशवंतरावांची उपस्थिति असे प्रसंग अनेकदा आले. बाळासाहेब कोपरखळ्या देण्यांत पटाईत. त्यांच्यां शाब्दिक कोट्या सुरू झाल्या की श्रोते तल्लीन बनतात. यशवंतरावांना उद्देशून त्यांच्या कोपरखळ्या सुरू झाल्या की, समोरच्या श्रोत्यांच्या हास्यकल्लोळांत यशवंतरावहि सामील होतात, असं दृश्य महाराष्ट्रांतल्या श्रोत्यांनी अनेकदा अनुभवलं आहे.

ह. रा. महाजनी हे यशवंतरावांवर अनेकदा जाहीर टीका करत. संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या वेळीं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व मालोजीराजे नाईक-निंबाळकर यांच्या उपस्थितींत यशवंतरावांची आणि ह. रा. महाजनी यांची एक बैठक झाली. संयुक्त महाराष्ट्र लढ्याच्या वेळीं यशवंतरावांना महाजनींचं सहकार्य हवं होतं. आम्हांला आता मदत करा, आमचाहि तुम्हांला उपयोग होईल, असंहि चव्हाणांनी त्यांना सांगितलं; परंतु नंतरच्या काळांत यशवंतरावांवर स्वार्थीपणाचे आरोप करणारे पांच-सहा लेख महाजनी यांनी अतिशय कठोर शब्दांत लिहिले. महाजनी हे यशवंतरावांबद्दल खाजगी बोलण्यांतहि टीका करत. यावर महाजनींना क्षमा कां करतां, असा प्रश्न यशवंतरावांना त्यांच्या मित्रांकडून विचारला जाऊं लागला. त्यावर यशवंतरावांनी मोठं मार्मिक उत्तर दिलं. त्यांनी मित्रांना सांगितलं, सत्ता ही खाजगी कारणासाठी वापरावी अशासाठी नाही. सर्वांनीच हें व्रत कायम पाळलं पाहिजे.

महाजनींचे कठोर टीकेचे लेख वाचल्यानंतर एक दिवस यशवंतरावांनी महाजनींना फोन केला. ते दोघे जुने मित्रच होते. महाजनींची फोनवर भेट होतांच "तुम्ही आता लढाऊ पवित्रा घेतला आहे." एवढं एकच वाक्य यशवंतराव बोलले आणि त्यांनी फोन खाली ठेवला. हे आणि असे अनेक प्रसंग यशवंतरावांच्या अंगीं असलेल्या आत्मसंयमनाचं दर्शनच घडवतात.

सतत चाळीस-पंचेचाळीस वर्षे कोणत्या ना कोणत्या उपयुक्त कार्यांत सर्वकाळ मन गढून गेलेले असे हे नेते आहेत. खाजगी किंवा घरगुती कामासाठी मोकळा वेळ त्यांना क्वचित् मिळतो. देशाचा संसार चालवण्यांतच आयुष्याची सार्थकता त्यांनी मानली आहे. समवयस्क किंवा समानशील मित्रांच्या बैठकींत गप्पा आणि हास्यविनोद यांत जो कांही वेळ केव्हा तरी घालवला जात असेल, तेवढाच काय तो मोकळा वेळ म्हणायचा! यशवंतराव चेहऱ्यावर गंभीर दिसतात. ही गंभीरता पाहून हे गृहस्थ अरसिक असावेत, विनोदाचं आणि हसण्याचं त्यांच्याशीं वाकडं असावं असंहि कुणाला वाटतं; परंतु त्यांच्या गुणांचं खरं दर्शन, मोकळेपणानं गप्पा करतांना आणि मित्रांच्या मेळाव्यांत रमले असतांना घडतं. व्याख्यानांतहि त्याची ते चुणूक देतात. जाहीर व्याख्यानांतूनहि ते मनमोकळेपणानं बोलतात. चेहऱ्यानं गंभीर दिसत असले तरी अंगांत विनोदहि भरपूर आहे. विनोदाचा प्रसंग चटकन् ओळखण्याचा चाणाक्षपणाहि आहे. कित्येकदा खळखळून हसतांना आणि हसवतांनाहि आढळतात. समवयस्कांच्या आणि साहित्यिकांच्या संगतींत जेव्हा गप्पा सुरू होतात त्या वेळीं हें लक्षांत येतं. यशवंतरावांचं वाचन अमर्यादित आहे. अवलोकन भरपूर आहे. देशांतल्या आणि परदेशांतल्या नाना लोकांशीं नाना संबंध आल्यामुळे त्यांची अनुभवाची सामग्री काठोकाठ भरलेली आहे. त्यामुळे त्यांच्याशीं चर्चा करतांना संवादाला मोठा रंग येत रहातो. एखादा मुद्दा पटवण्यासाठी अनेकविध दाखले त्यांच्या तोंडांतून बाहेर येतात आणि साध्या साध्या गप्पाहि मेजवानी ठरते. ते विनोद ऐकतील, क्वचित् स्वतःहि

करतील, पण त्यांत कुणाची कुचेष्टा असणार नाही किंवा कुणा व्यक्तीचा निंदाव्यंजक उल्लेख येणार नाही. समोर बसून गप्पा करणारालाहि, त्यासाठी त्यांच्याकडून प्रोत्साहन मिळत नाही. राजकारणांत सातत्यानं वावरणारांच्या दृष्टीनं हें विशेष म्हणावं लागेल.

यशवंतराव हे जन्मतःच कांही गुण घेऊन आलेले असावेत. ते अनेकावधानी आहेत. अभ्यास, वाचन, मनन, हें सारखं सुरूच असतं. त्यांचं निरीक्षणहि जबरदस्त आहे. त्यांच्या ठिकाणीं जन्मतः असलेल्या गुणांवर या साऱ्यांचे संस्कार झाल्यानं मूळ गुण अधिक तेजस्वी व कार्यक्षम बनण्यास मदत झाली. महाविद्यालयांत असतांना ते मोठे हुषार विद्यार्थी म्हणून गणले जात होते असं नाही. परंतु महाविद्यालयांत असतांना किंबहुना त्याहीपूर्वी, माध्यमिक शाळेंत असतांना आणि तुरुंगवासाच्या काळांत अन्य विषयांच्या वाचनाचे परिश्रम घेऊन त्यांनी जें ज्ञान हस्तगत केलं त्यामुळे नंतरच्या काळांत विविध विषयांत त्यांना ज्ञातेपण मिळवतां आलं.

वाचनाची त्यांना स्वाभाविक आवड आहे. तरी पण राजकारणाबाहेरच्या लोकांचे विचार ऐकण्यांतहि त्यांना कंटाळा नाही. विद्वान् माणसं तर त्यांना आवडतातच, परंतु विद्वानापेक्षाहि एखादा सामान्य, अडाणी माणूस हा त्यांना अधिक आवडतो. गरिबांकडे श्रीमंतांपेक्षा त्यांचं अधिक लक्ष असतं. एकमेकांवर निष्कपट प्रेम करावं याचं दर्शन ते स्वतःच्या वागणुकींतूनच कित्येकदा घडवतात. निष्कपट प्रेम करायला शिकणं हें समाजावर, राष्ट्रावर प्रेम करायला शिकण्याची पहिली पायरी आहे असा त्यांचा सिद्धान्त आहे.

यशवंतरावांचं व्यक्तिमत्त्व त्यांच्या अंतर्भेदी डोळ्यांमध्ये आणि त्यांच्या विलक्षण वाणीमध्ये व्यक्त होतं. त्यांच्या पहाण्यांत आणि बोलण्यांत एक विशिष्ट प्रकारची मोहिनी आहे. त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत आल्यावर आणि त्यांचं भाषण ऐकल्यावर त्यांच्याशीं विरोध करणारीं पुष्कळ माणसं त्यांना वश झालेलीं आहेत. ज्यांच्याशीं बोलायचं, मग तें खाजगी असो वा जाहीर असो, त्यांच्या भाषेंत ते जेव्हा बोलूं लागतात तेव्हा ऐकणाराच्या तें आजन्म लक्षांत रहातं.

अडाणी शेतकरी, विद्वान् शास्त्री-पंडित, आधुनिक सुधारक किंवा सनातनी, इंग्रजी शिकलेले किंवा न शिकलेले तरुण-तरुणी, महिला, कलावंत, व्यापारी, नोकरदार, डॉक्टर, इंजिनियर, राजकारणी, मुत्सद्दी, साहित्यिक, अर्थतज्ज्ञ, समाजधुरीण यांपैकी कुणाशींहि बोलायचं असो, यशवंतराव हे त्यांच्या त्यांच्या भाषेंत बोलतात. त्यामुळे प्रत्येकजण त्यांचं म्हणणं प्रसन्नपणानं ऐकत रहातो. राष्ट्रप्रेमाचं, देशभक्तीचं आणि कार्यकर्त्यांच्या वागणुकीचं स्पष्टीकरण करतांना तर त्यांच्या वाणीला स्फुरण चढतं आणि उत्तम प्रकारचे दृष्टान्त ते सहजपणानं बोलून जातात. देशाचं, पक्षाचं श्रेष्ठत्व, महत्त्व वर्णन करतांना तर त्यांची वाणी अधिकच तेजस्वी आणि गंभीर बनते.

त्यांचं भाषण तसं सहजमधुर असतं. मनुष्याला प्रेमानं आपल्याकडे वळवण्याची कला त्यांना जशी अवगत आहे, तद्वत् एखाद्या वाह्याताला खडसावून ताळ्यावर

आणण्याची कलाहि त्यांच्यापाशीं भरपूर आहे. भाषा सोपी, वाक्यं लहान, कृत्रिमतेचा अभाव यांमुळे त्यांचं बोलणं ऐकणाराच्या हृदयाशीं जाऊन भिडतं. जीवनाचे अनंत नमुने त्यांनी पाहिलेले असल्यानं सामान्य माणसांचीं सुखदुःखं, त्यांच्या भावना, वासना आणि अडचणी यांची त्यांना पूर्ण कल्पना असते. त्यामुळे सामान्यांच्या जीवनाचं, त्यांच्या अवस्थांचं ते वास्तव बोलूं लागतात तेव्हा त्यांची भाषा अंतःकरणाचा ठाव घेते आणि ऐकणारा त्यांचा होऊन जातो.

यशवंतरावांची प्रतिभा सदासर्वकाळ जागीच असते. त्यामुळे ते बोलतात त्या प्रत्येक वेळीं कांही निराळं वाटूं लागतं. अर्थात् हें सर्व त्यांना सहजासहजीं प्राप्त झालेलं नाही. ज्ञानार्जन अव्याहत सुरू राहिल्याचा हा परिणाम आहे. सर्व प्रकारच्या ग्रंथांचं – तो सुबोध असो वा दुर्बोध असो – त्यांचं सतत वाचन सुरू असतं. लोकांनी यावं, मसलत करावी, नव्या कार्याचा खल करावा, आखणी करावी आणि नित्य-नव्या कामांत गढून रहावं हा त्यांचा स्वभाव बनलेला असून या गोष्टी त्यांना त्रासदायक वाटत नाहीत. याचं कारण अनेकावधानता हें आहे.

दिवसभर आणि रात्रीं उशिरापर्यंत निरनिराळ्या लोकांशीं ते चर्चा करत रहातात; परंतु एखाद्या ग्रंथाचं वाचन करत करत झोपायचं हाहि दिनक्रमांतलाच एक भाग बनलेला आहे. ग्रंथ वाचल्यानंतर मनाशीं विवेचन करून त्याचा सारांश काढण्याचीहि त्यांनी सवय लावून घेतली आहे. त्यामुळे त्यांच्या बोलण्यांतून व्यासंगाचा प्रत्यय येतो. उत्तम वक्तृत्व, उत्कृष्ट रसिकता आणि तर्कनिष्ठ बुद्धि यांमुळे कोणतंहि प्रमेय नवीन तऱ्हेनं मांडणं त्यांना साध्य होतं. सहजपणा आणि अर्थवत्ता हे त्यांच्या वाणीचे मुख्य धर्म होत. रुमालावर शिंपडलेलं अत्तर उडून गेलं तरी मागे सुगंध दरवळत रहावा तसं त्यांच्या भाषणानंतर घडतं. भाषण करून यशवंतराव निघून गेलेले असतात, परंतु त्यांच्या विचारांचा सुगंध मागे टिकून रहातो. त्यांच्या विचारांत आणि भाषेंत एक प्रकारचा नैसर्गिक भव्यपणा आढळतो. त्यांत क्षुद्रपणा असत नाही. श्रोत्याच्या हृदयापर्यंत पोंचून त्याला प्रसन्न करून सोडण्यांत भाषेचा पल्लेदारपणा तर आढळतोच, पण बुद्धि-वैभवहि दिसतं.

त्यांच्या वाणीचा आणखी एक विशेष गुण म्हणजे त्यांच्या मुखांतून कधीहि अपशब्द बाहेर पडत नाही. स्वतःचा बडेजाव सांगितला जात नाही. यशवंतराव मत्स-रानं, द्वेषानं पेटलेले आहेत असं त्यांची जीभ कधी दाखवत नाही. त्यांनी राग, लोभ, मद, मत्सर गिळला आहे असं मात्र नव्हे, पण संयमानं या विकारांना त्यांनी इष्ट असं वळण मात्र लावलं आहे. असं नसतं तर दुसऱ्याची मनसोक्त प्रशंसा त्यांच्या वाणींतून प्रगट होणं अशक्य होतं. कुणी एखादं हलकं-फुलकं सामान्य काम केलेलं असो, त्याची प्रशंसा करून त्याला अधिक काम करण्याला उत्तेजन देण्याची वृत्ति निरहंकारी माणसाच्या ठिकाणींच असूं शकते.

– इतिहासाचें एक पान । ४७३

अपयशाच्या आणि निराशेच्या अंधारांत चाचपडत कोणी यशवंतरावांपर्यंत पोंचला तर त्याला केवळ शब्दानं ते निराशेंतून बाहेर काढतील, निदान त्याला निराशेंत बुडूं देणार नाहीत, याचं कारणहि उघड आहे. त्यांनी स्वतः अनेकदा निराशेच्या निबिड अंधकारांतून आयुष्याचा प्रवास केलेला आहे. परंतु कोणत्याहि घडीचा अतिशय कठोर असा अनुभव त्यांना निराशेंत दडपून टाकूं शकला नाही. त्यांनी आपली दृष्टि प्राप्त परिस्थितीच्या आणि प्राप्त काळाच्या पलीकडे ठेवल्यानं, दृष्टीची गति पल्लेदार राखल्यामुळेच निराशा त्यांना रोखूं शकली नाही. निराशेंत बुडालेला त्यांच्याकडे जेव्हा कोणी येतो, त्या वेळीं त्याला अशीच पलीकडची दृष्टि प्राप्त करून देत रहातात. संकटांना, अडचणींनाहि अंत हा असतोच. धिमेपणानं, धीरानं संकटं स्वीकारलीं आणि प्राप्त कर्तव्य करत राहिलं तर संकटांचा अंत लवकर घडवून आणतां येतो, हा अनुभव सामाजिक आणि राजकीय आयुष्याच्या वाटचालींत त्यांच्या संग्रहीं भरपूर जमा झालेला आहे.

संकटानं अनेकजण बावरून जातात. यशवंतराव कधी बावरले नाहीत. संकटांना सामोरं जाऊन, स्वीकृत कर्तव्य करत रहाण्याचा गुण त्यांच्या ठिकाणीं नसता, तर ते देशाचे श्रेष्ठ नेते ठरले नसते. संकटानं आणि निराशेनं खचून जाऊं नये असं सांगतांना यशवंतराव नेहमी लो. टिळकांच्या एका वाक्याची आठवण करून देतात. ती आठवण त्यांनी आपल्या मनांत सतत ताजी ठेवली असली पाहिजे. लो. टिळक हे चिरोल-केस हरले त्या वेळीं, या निकालामुळे लोकमान्य मनानं खचले आहेत असा प्रचार सुरू झाला; परंतु लोकमान्यांनी त्याचा इन्कार केला. त्यांनी सांगितलं, "आकाश जरी कोसळलं तरी त्या कोसळलेल्या आकाशावर पाय रोवून त्याचा उपयोग मी करून घेईन, पण घाबरणार नाही."

या संदर्भात यशवंतराव सांगतात की, संकटामध्ये सापडलेल्या कुठल्याहि देशाच्या नेत्यानं लोकमान्यांचं हें सांगणं आपलं ध्येयवाक्य मानावं, बावरलेल्या मानवतेला सुखाकडे नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक माणसानं आपल्या हृदयावर कोरून ठेवावं, इतकं हें घोषवाक्य थोर आहे. कोणत्याहि लहान-मोठ्या संकटांत यशवंतराव स्वतः कां बावरले नाहीत अथवा बावरत नाहीत त्याचं इंगीत या त्यांच्या मननामध्ये सापडतं.

यशवंतराव ज्या काळापासून लोकसंग्राहक बनले तेव्हापासून त्यांना लोकमान्यांचं हें घोषवाक्य प्रेरणा देत राहिलं आहे. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वांत आशावादित्व आहे. ते स्वतः लोकसंग्राहक आहेत. ते स्वतःच निराश बनते, तर त्यांना इतरांना प्रेरणा देतां आली नसती. यशवंतराव हे प्रथमपासून सर्वसामान्य लोकांसाठीच काम करत आले असून हें काम करतांना त्यांना प्रतिकाराचे तीव्र आघात वेळोवेळीं सोसावे लागले आणि तरीहि ते आशावादी राहिले.

विविध विचारांच्या कर्तृत्ववान् माणसांचा सहवास हा यशवंतरावांचं व्यक्तिमत्त्व घडवण्यास पुष्कळच उपयुक्त ठरला आहे. वृत्ति शांत व गंभीर राखून आपल्या कार्यक्षेत्रांत अनेक कर्त्या माणसांना त्यांनी सामावून घेतलं. शुद्ध विचारांचाच त्यांनी

सातत्यानं पाठपुरावा केला. अशुद्ध विचार स्वभावांत शिरूं दिले नाहीत. अनेकांनी त्यांच्यावर टीका केली, शिवीगाळ केली, हेत्वारोप केले, दगडफेक केली, तरी लोकनेत्याला आवश्यक असलेली मनाची शांतता त्यांनी ढळूं दिली नाही.

योजकता हा त्यांचा सर्वांत मोठा गुण होय. यशवंतराव श्रेष्ठ नेते बनतांक्षणींच किती तरी माणसं त्यांच्या जवळ आलीं. त्यांत जशी सच्छिल होतीं तशी सामान्य प्रतीचींहि होतीं. यशवंतरावांनी अशा अनेक सामान्य लोकांना जवळ केलं. या लोकांच्या सान्निध्यामुळे त्यांना टीकाहि सहन करावी लागली, अमुक अमुक माणसाला यशवंतराव कसा काय थारा देतात, असा प्रश्न लोक आपापसांत विचारत. या कोड्याचा अर्थ अनेकांनी लावण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना त्याचं समाधानकारक उत्तर कधी काढतां आलं नाही. राजकीय किंवा पक्षीय यश संपादन करण्यासाठी अगदी सामान्य मंडळींना ते हाताशीं धरतात असं आपलं सोयिस्कर उत्तरच त्यांतून अनेकांनी काढलं.

यशवंतरावांच्या स्वभावाची घडण आणि वृत्ति, लोकांकडे पहाण्याचा आणि त्यांना समजून घेण्याचा त्यांचा दृष्टिकोन ज्यांना समजला त्यांनाच त्यांच्या या कृतीचं उत्तर सापडण्याची शक्यता आहे. यशवंतरावांनी अशा कांही सामान्य दिसणाऱ्या लोकांना थारा दिला असेलहि, पण असा थारा दिल्यानंतर त्यांनी त्यांची कधी अवहेलना केली नाही. त्यांचे गुण आणि अवगुण दोन्ही पारखले आणि त्यांच्यासाठी एखाद्या कामाची, कार्याची योजना केली. ज्यांना कुचकामी किंवा सामान्य असं संबोधलं गेलं त्यांच्यांतील जे यशवंतरावांच्या सहवासांत आले आणि त्यांना योजून दिलेल्या कार्याला त्यांनी वाहून घेतलं ते पावन झाले; विधायक काम करूं लागले. अशीं अनेक उदाहरणं देतां येतील. यशवंतरावांचा योग्य वेळीं सहवास आणि मार्गदर्शन न मिळतं, तर त्या लोकांचं आयुष्य कायमचं बरबाद होण्याची शक्यता होती. अनेकांचं आयुष्यहि त्यांनी बरबाद केलं असतं !

मनुष्य मुळांत वाईट नसतो. परिस्थितीमुळे तो सामान्य किंवा कुचकामी, प्रसंगीं उपद्व्यापी बनतो. प्रसंगीं बेफामहि होतो. तो मुळांत धाडसी असूं शकतो, चांगला विचार करूं शकतो, प्रामाणिक असूं शकतो, विधायक कार्यहि करूं शकतो; परंतु त्यासाठी त्याला योग्य संधि मिळण्याची गरज असते. वाल्याचा वाल्मीकि होऊं शकतो अशी कथा सर्रास सांगितली जाते. पण कथा सांगणारे, एखाद्या वाल्याला वाल्मीकि बनण्यासाठी मार्गदर्शनाची संधि मिळवून देण्याची गरज असते हें विसरतात; किंबहुना त्याला निरंतरचा वाल्या ठरवून त्याची समाजांत अवहेलनाच करत रहातात. विद्वानांना आणि बुद्धिमानांना साहाय्य करण्यासाठी सर्वच पुढे सरसावतात; परंतु सारा समाज हा बुद्धिमानांचा असत नाही. समाजांत वाल्मीकि असतो तसा वाल्याहि असतो. वाल्मीकीची पूजा करतांना, वाल्याचा वाल्मीकि कसा होईल आणि सारा समाज सुखी कसा होईल याकडेच जो लोकनेता असेल त्याला प्रामुख्यानं लक्ष द्यायचं असतं. किंबहुना हेंच कार्य सर्वाधिक महत्त्वाचं ठरतं.

यशवंतरावांनी हा दृष्टिकोन स्वीकारून, समाजांत एका बाजूला पडलेल्या परंतु कर्तृत्व दाखवण्याचे गुण अंगीं असलेल्यांना जवळ बोलावलं, स्वतःच जे जवळ आले त्यांना दिलासा दिला आणि कामाला लावलं. यांतील कांहीजण पुढच्या काळांत लाखो रुपयांची व्यापारी किंवा औद्योगिक उलाढाल करण्यांत समर्थ आणि तरबेज बनल्याचीं उदाहरणं मिळूं शकतील. ग्रामीण भागाचा कायापालट करण्यांत आणि उत्पादनवाढीच्या कामांत यांतील कांहींनी उच्चांक प्रस्थापित केलेलाहि आढळतो. यशवंतरावांनी त्यांना हाताशीं धरून चढाओढ लावली ती अधिक चांगलं काम कोण करतो याची !

यशवंतरावांचं या मंडळींबाबतचं विवेचन असं की, ताकतवान मनुष्य एकलकोंडा राहील, समाज त्याच्याकडे नेहमीच विकृत दृष्टीनं पाहील, तर त्या मनुष्याच्या डोक्यांत सूडाचे विचारतरंग प्रभावी बनतात. सबंध समाजावर सूड उगवणं त्याच्या शक्तीबाहेरचं असलं तरी, संधि मिळेल त्यानुसार वैयक्तिक स्वरूपांत तो सूडाची इच्छा पूर्ण करून घेतो. कालांतरानं त्याला ती चटक लागते आणि सामाजिकदृष्ट्या मोठा उपद्रव तो निर्माण करूं शकतो. पण उपद्रवी बनायचं झालं तरी त्याला माणसं जोडावीं लागतात, विश्वासाचं वातावरण निर्माण करावं लागतं, सहकाऱ्यांशीं प्रामाणिक रहावं लागतं, आणि सदासर्वकाळ जागरूकहि असावं लागतं. त्याच्या ठिकाणीं हे गुण नैसर्गिकरीत्या असूं शकतात. त्यांचाच तो वेगळ्या कामासाठी वेगळ्या हेतूनं उपयोग करत रहातो; परंतु अशा एखाद्याला माणसांत आणलं, त्याला सहानुभूति दर्शवली, चांगल्या कामाचे फायदे समजावून दिले आणि सुखाचा मूलमंत्र सांगितला तर त्याच्या ठिकाणचे नैसर्गिक गुण चांगल्या कामासाठी विकसित होऊं शकतात.

समाजांत राहून काम करण्याची संधि दिली तर अशा वेळीं सामाजिक मताचं दडपण त्याच्यावर रहातं. आपल्या प्रत्येक कृतीकडे समाजाचं लक्ष आहे याच्या जाणिवेनंहि त्याच्या वागण्यांत आणि कृतींत इष्ट तो बदल होऊं शकतो. क्वचित् प्रसंगीं असंहि घडूं शकतं की, एखाद्याला संधि देऊनहि तो सुधारूं शकत नाही ! पण अशा वेळीं लोकच त्याला उचलून बाजूला फेकूं शकतात. लोकशाहींत तर निश्चितपणानं हें घडूं शकतं. लोकनेत्याला मग अशा माणसाचं पारिपत्य करण्यासाठी वेगळं कांही करावं लागत नाही. लोकनेत्याचा दरवाजा अशा माणसासाठी लोकच बंद करतात.

संपूर्ण विश्वास टाकण्यांत क्वचित् प्रसंगीं धोका संभवतो; परंतु त्या धोक्याची भीति सतत मनांत बाळगून आणि सर्वांकडेच संशयानं बघत राहून लोकनेत्याला काम करतां येणं आणि लोकांकडून काम करून घेणं अशक्य ठरतं. लोकांनी आपल्या तंत्रानं वागावं याकडे लोकनेत्याला लक्ष ठेवावं लागतंच. परंतु आपल्यावर सक्ती होत आहे अशी भावना लोकांच्या मनांत निर्माण होऊं न देणं यासाठीहि जपावं लागतं. त्याचबरोबर तो नेता स्वतःहि दुसऱ्याच्या तावडींत सापडणार नाही यासाठी त्याला दक्ष रहावं लागतं. होतकरू तरुण हेरून कामाला लावायचीं, तर अशीं कांही पथ्यं पाळावीं लागतातच.

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा एक विशेष आहे की, मध्यमवर्गीतील, पदवीधर, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ यांना तर त्यांनी विविध क्षेत्रांत संधि मिळवून दिलीच, पण त्याचबरोबर सामान्य वर्गातील तरुणांनाहि उत्तेजित करून त्यांना आधुनिक परिवर्तनाच्या काळाच्या मैदानांत आणून उभं केलं. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागांतील शेती, उद्योग, सहकार, शिक्षण आदि क्षेत्रांतील नेतृत्व हें समाजाच्या अशाच सामान्य थरांतून निर्माण झालेलं असून या लोकांनी विकासाचीं भव्य-दिव्य मंदिरं उभीं केलीं आहेत. लोक-हिताचं यशवंतरावांना जबरदस्त व्यसन असून जन्मभर याचाच पसारा त्यांनी मांडला.

शरीराप्रमाणे त्यांच्या विचाराचा बांधाहि रुंद आहे. लहानपणीं त्यांनी थोडाफार व्यायाम केला असेल, तालीम केली असेल, पण पुढच्या काळांत लोकहित आणि ज्ञानार्जन यांशिवाय अन्य कांही केलं नाही. राजकारण, तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र, इतिहास, कथा, काव्यं, कादंबऱ्या, चरित्रं अशीं पुस्तकांमागे पुस्तकं उघडणं हा त्यांचा नित्याचा छंद. माध्यमिक शाळेतील शिक्षणाच्या काळापासूनच त्यांना वाचनाचा छंद लागला. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या अगोदरच, पाश्चात्त्य देशांतील श्रेष्ठ ग्रंथकारांचे ग्रंथ त्यांनी वाचून काढले. पुढे १९३० पासून ज्या ज्या वेळीं त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली, ती शिक्षा भोगतांना तुरुंगामध्येहि त्यांचं विविध विषयांवरील वाचन सुरू राहिलं.

त्या वेळीं यशवंतरावांचं वय अवघं अठरा वर्षांचं होतं. कारागृहांत असतांना त्यांनी जें चौफेर वाचन केलं त्या ग्रंथांची यादी उपलब्ध आहे. तात्विक राजकारण, हिंदी संस्थानिकांचा प्रश्न, सार्वभौमत्वाचं तत्त्वज्ञान, विविध राष्ट्रांचे इतिहास, विविध ऐति-हासिक व्यक्तींचीं चरित्रं-आत्मचरित्रं, फ्रान्स-जर्मनी युद्धाचा इतिहास, रशियाचे सोविएत-विषयक राजकीय तत्त्व-ग्रंथ, शस्त्रसंधीविषयक ग्रंथ, कामगार-चळवळी, कार्ल मार्क्सचे ग्रंथ, प्रखर राष्ट्रवाद, महायुद्धविषयक ग्रंथ, रशियन क्रांति, युरोपचा विस्तारवाद, ब्रिटिश वर्चस्वाचा काळ, मराठ्यांचा इतिहास, अनिर्बंध व्यापार, वसाहतवाद, मानवतावाद यांविषयीचे ग्रंथ, राष्ट्राराष्ट्रांतील स्पर्धा कथन करणारे ग्रंथ, फ्रान्सची क्रांति व नेपोलियन, जर्मनी व बिस्मार्क, ब्रिटिशांचा लष्करी परंपरेचा इतिहास इत्यादि विषयांच्या ग्रंथांचं सखोल वाचन तर त्यांनी केलंच, शिवाय भारताचा दारिद्र्यविषयक प्रश्न, अन्नविषयक धोरण, आरोग्याचा प्रश्न, शेतीचा प्रश्न या विषयांवरील ग्रंथांचंहि वाचन केलं.

यशवंतरावांनी त्या काळांत लोकसंख्यावाढीच्या प्रश्नाचाहि अभ्यास केलेला आढळतो. कारागृहांत असतांनाच त्यांनी 'पाप्युलेशन प्रॉब्लेम ऑफ इंडिया' हा पी. के. वॅटल यांचा ग्रंथ वाचला. त्या वेळीं कुचिन स्की यांचाहि या विषयावरील 'मेझरमेंट ऑफ पॉप्युलेशन ग्रोथ' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला होता त्याचं व 'प्रॉब्लेम ऑफ ओव्हर पॉप्युलेशन ॲण्ड प्रॉडक्शन' हा पी. जे. थॉमस यांच्या ग्रंथाचंहि त्यांनी आलोडन केलं.

'वर्ल्ड पॉप्युलेशन' या विषयावरील 'कार आणि सॉंडर्स' या लेखकद्वयांनी लिहिलेला ग्रंथहि त्यांनी वाचला. त्याचबरोबर रशिया, अमेरिका, जर्मनी, इंग्लंड, जपान

आणि भारत या राष्ट्रांतील लोकसंख्यावाढीचा तुलनात्मक अभ्यास करत असतांना जन्ममृत्यूचं प्रमाण, कोणत्या देशांत कसं आहे याचीहि आकडेवारी त्यांनी जमा केली.

जागतिक मंदीचा तो काळ होता. त्या संदर्भात त्यांनी ' दि ग्रेट डिप्रेशन ' या एल्. रॉबिन्सच्या ग्रंथांतील विचारांचा अभ्यास केला. त्याचबरोबर ' इरिगेशन इन इंडिया ', ' ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टिक्स ऑफ इंडिया ', ' रिव्ह्यू ऑफ ॲग्रिकल्चरल आपरेशन्स इन् इंडिया ' असे कांही ग्रंथ आणि अहवाल यांचाहि त्यांनी अभ्यास केला. ' इकॉनॉमिक्स प्रॉब्लेम्स ऑफ मॉडर्न इंडिया ' या ग्रंथाचं संपादन त्या काळांत राधाकमल मुखर्जी यांनी केलेलं होतं. यशवंतरावांनी या विषयाचंहि वाचन केलं.

शेती आणि सामाजिक बाबींचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे म्हणून नोंद करून ठेवलेल्या ग्रंथांची यादी पहातांना त्यांत ' मेझरमेंट ऑफ सोशल फिनामिना ' ( ले. बाऊले ), ह्यूमन जिऑग्रफी ( ले. ब्रुन्हे ), ' प्रिन्सिपल्स ऑफ रूरल इकॉनॉमिक्स ' ( ले. कॉर्व्हर ) आणि ' प्रिन्सिपल्स ऑफ ह्यूमन जिऑग्रफी ' ( ले. कुशिंग हंटिंग्टन ), ' चायनीज फॉर्म इकॉनॉमी ' ( ले. ब्यूक ) या ग्रंथांची आणि ग्रंथकारांची नामावलि नजरेंत भरते.

यशवंतरावांनी त्या लहान वयांतहि जातीयवादाच्या प्रश्नाचा अभ्यास केलेला आढळतो. कारागृहांत असतांना त्यांनी ' कास्ट सिस्टिम ॲण्ड इटस् इकॉनॉमिक आस्पेक्टस् ' हा एडवर्ड ब्लँट यांचा ग्रंथ वाचून पूर्ण केला. त्या काळांत येरवडा कारागृहांत काँग्रेसचे जे नेते होते त्यांच्याशींहि त्यांनी विविध विषयांवर संवाद करून त्यांतील नोंदीहि संग्रहीत केल्या. बाळासाहेब खेर, नूरीसाहेब, हॅरिस, अबिदअली, मोरारजी, युसुफ मेहेरअली अशा कांही मान्यवरांना त्या वेळीं ब्रिटिशांनी कारागृहांत ठेवलं होतं. या सर्वांशीं चर्चा करण्याचा आणि त्यांच्या आपसांत होणाऱ्या चर्चा ऐकण्याचा लाभ यशवंतरावांना झाला.

माध्यमिक शाळेंतून तुरुंगांत गेलेला जेमतेम सतरा-अठरा वर्षे वयाचा हा विद्यार्थी त्या काळांत एवढं चौफेर वाचन करतो यावर कदाचित् कुणाचा विश्वास बसणार नाही. परंतु त्यांनी तें वाचन केलं होतं हें त्यांच्या संग्रही असलेल्या कारागृहांतील लिखित नोंदीवरून दिसतं. इतर विषयांबरोबर, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अहवालांचंहि त्यांनी त्या काळांत वाचन केलं.

यशवंतरावांनी महाविद्यालयांत शिकत असतांना, इतिहास आणि अर्थशास्त्र हा विषय बी. ए. परीक्षेच्या वेळीं घेतला होता. त्या वेळीं ते राजकीय क्षेत्रांतील कामांत गढून गेले होते. परंतु या विषयावरील अनेक महत्त्वाच्या ग्रंथांचा अभ्यास पूर्वायुष्यांत त्यांनी केलेला होता. कारागृहांत त्यांना 'ब' वर्ग मिळाला होता आणि त्या वेळचा त्यांचा बंदीक्रमांक २०६७६ होता याचीहि नोंद त्यांच्या संग्रहीं असलेल्या वहींत आढळते. राजकारणांत सत्तेच्या स्थानावर आल्यानंतरहि म्हणजे १९४६ ते १९५६ या काळांत त्यांनी वाचनाचं क्षेत्र आणखी वाढवलं.

दुसरं महायुद्ध संपलं आणि युद्धावर आधारित प्रचंड वाङ्मय उपलब्ध होऊं लागतांच, त्या ग्रंथांचं त्यांनी आलोडन केलं. विन्स्टन चर्चिल यांचे 'वॉर मेमॉयर्स' हे सारे ग्रंथ त्या काळांतच त्यांनी अभ्यासून पूर्ण केले. सुमारे दहा वर्षे ते सतत युद्ध-साहित्यच वाचत होते. 'सबूमरीन वॉर', केन म्युटिनीलिखित 'रन् डीप, रन् फास्ट' यांसारख्या युद्धावरील कादंबऱ्या, त्याचप्रमाणे 'कंपॅरिटिव्ह मिलिटरी स्ट्रॅटिजी' या-सारखे ग्रंथहि वाचून पूर्ण केले. हॅरॉल्ड लास्की यांचा अमेरिकेसंबंधांत एक अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध झाला होता. त्याचप्रमाणे जॉन गुंथर यांची 'इन्साइड युरप', 'इन्साइड रशिया' अशी एक विविध देशांची सर्वांगीण माहिती देणारी ग्रंथ-मालिका त्या वेळीं प्रकाशांत येत राहिली होती. 'स्टोरी ऑफ फिलॉसफी', टॉयन बीचे 'ए स्टडी ऑफ हिस्टरी' आदि ग्रंथहि प्रकाशांत आलेले होते. हे सर्व ग्रंथ यशवंतराव वाचत होते.

ब्रिटनमध्ये त्या काळांत मजूर-सरकार अस्तित्वांत आलेलं असल्यानं या सरकारच्या-वतीनं, मजूर-सरकारच्या धोरणविषयक साहित्याचा पूर दाटला होता. यशवंतरावांनी त्याचा तर अभ्यास केलाच, पण विशेषतः मजूर सरकारचा 'प्लॅनिंग' – नियोजनविषयक दृष्टिकोन विशद करणारं जें साहित्य त्या काळांत प्रसिद्ध झालं त्याचा त्यांनी बारकाईनं अभ्यास केला. कम्युनिस्ट देशांतील प्लॅनिंगचीहि त्यांनी माहिती करून घेतली. या जाडजूड साहित्याबरोबरच इंग्रजींतून प्रसिद्ध होणारं हलकं-फुलकं साहित्य, विशेषतः रहस्यकथा वाचनाचं जणू त्यांना व्यसनच जडलं. १९४६ ते १९४९ या काळांत पीटर चिने या लेखकाच्या रहस्यकथांनी त्या काळांतल्या तरुणांना वेडावून सोडलं होतं. पीटर चिने यांच्या बहुतेक रहस्यकथांचं वाचन त्या वेळीं यशवंतरावांनी केलं. चिनी प्राचीन युद्धशास्त्रज्ञ सुंझू याचाहि ग्रंथ त्यांनी वाचला.

इंग्रजींतून प्रसिद्ध होणाऱ्या साहित्याबरोबरच मराठी साहित्यहि त्यांनी भरपूर वाचलं. हरिभाऊ आपटे, नाथमाधव यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या, साहित्यसम्राट् न. चिं. केळकर, आचार्य जावडेकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वामन मल्हार जोशी, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, आचार्य अत्रे, वि. द. घाटे, कवि यशवंत आदींचं साहित्य, काव्य तर त्यांच्या वाचनांत होतंच, शिवाय त्या काळांत नव्यानं पुढे आलेले श्री. ना. पेंडसे, विंदा करंदीकर, ग. दि. माडगूळकर, पु. ल. देशपांडे, वसंत बापट, मंगेश पाडगावकर आदींच्या कादंबऱ्या, कथा, काव्य, यांचांहि त्यांनी मनमुराद वाचन केलं.

मुंबई आणि दिल्ली येथील निवासस्थानांतील यशवंतरावांच्या घरगुती ग्रंथालयांतील ग्रंथसंपत्ति पहातांना देशांतील आणि जगांतील अनेक थोर थोर ग्रंथ-लेखकांचं दर्शन तिथे सहजगत्या घडतं. यशवंतरावांचे असे किती तरी मित्र आहेत की, त्यांच्या वाचनांत एखादा उत्कृष्ट ग्रंथ आला, तर वाचून संपतांच तो ग्रंथ ते यशवंतरावांच्या हातीं देतात. यशवंतराव आणि त्यांचे कांही विद्वान् वाचक मित्र यांच्यांत जणू असा एक अलिखित

करारच झालेला आहे की, उत्तम दर्जाचा ग्रंथ मित्रांनी खरेदी करायचा, वाचायचा आणि तो यशवंतरावांना द्यायचा. ग्रंथांची किंमत मात्र यशवंतरावांनी द्यायची.

परदेशाच्या दौऱ्यांतहि नव्यानं प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट ग्रंथांची खरेदी हा एक त्यांचा छंद बनला. त्यामुळे इंग्रजी, हिंदी, मराठी, गुजराती इत्यादि भाषेंतल्या एकाहून एक सरस ग्रंथांनी त्यांचं ग्रंथालय समृद्ध बनलं आहे.

वाई येथील विश्वकोश ग्रंथालयाला त्यांनी एकदा भेट दिली. अनेकदा ते अशा भेटी देत असतात. अशाच एका भेटीच्या वेळीं त्यांनी या ग्रंथालयांत 'वर्ल्ड आर्ट एन्-सायक्लोपीडिया'चे पंधरा खंड पाहिले. बारकाईनं त्यांनी या ग्रंथांचं निरीक्षण केलं आणि हे ग्रंथ कुठे उपलब्ध होतात याविषयी ग्रंथालयाकडे चौकशी केली. यशवंतराव तिथेच थांबले नाहीत, तर या पंधरा खंडांची भर आपल्या ग्रंथालयांत घातली. नवीन ग्रंथांचं वाचन आणि त्यांचा संग्रह याचं त्यांना असं जबरदस्त व्यसन आहे.

राजकारण, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान, कथा, काव्य, इतिहास इत्यादि विषयांवरील ग्रंथ त्यांच्या बैठकीच्या, विश्रांतीच्या ठिकाणीं, जेवणाच्या ठिकाणीं तर आढळतीलच, शिवाय त्यांच्या निवासस्थानीं जिथे कुठे कपाट दिसेल तें पुस्तकांनी भरलेलं आहे असं खुशाल समजावं.

पंचवीस-तीस वर्षांहून अधिक काळ ज्यांना रोज सरकारी रुक्ष फायलींच्या वाचनांत घालवावा लागला आहे, त्या गृहस्थांना लोकहिताच्या नव्या नव्या कल्पना कशा सुचतात आणि त्यांचा बौद्धिक पाठलाग कसा सुरू रहातो हें वरवर आणि त्याच्या बाह्य देखाव्याकडे पाहून समजणारं नाही. त्यांच्या अवतीभोवतीं असलेले ग्रंथ आणि त्या ग्रंथाचे लेखक पाहिले म्हणजे मगच त्यांच्या बुद्धिवैभवाचं आकलन होऊं शकतं. यशवंत-राव कोणते ग्रंथ वाचतात किंवा पूर्वी त्यांनी वाचलेले आहेत हें एखाद्या कपाटांतील ग्रंथ आपण पहातांक्षणींच समजतं. या कपाटांतून आपापलं बुद्धिवैभव घेऊन हारीनं बसलेले अनेक लेखक तिथे आढळतील.

जेव्हा केव्हा वेळ सापडेल तेव्हा, प्रवासांत, आठवड्याच्या सुटीच्या वेळीं, दुपारीं, वाचणं हीच संवय त्यांनी मनाला लावून घेतली, वाचणं आणि त्याची टिपणं काढणं हा आणखी एक छंद. निरनिराळ्या ग्रंथांमधील महत्त्वाच्या विचारांची नोंद असलेल्या अनेक वह्या त्यांच्या संग्रहीं असतात. यशवंतरावांनी अमुक एक ग्रंथ वाचला आहे किंवा कसे हें, तो ग्रंथ उघडतांच समजतं. कारण वाचलेल्या ग्रंथाच्या पानापानांवर त्यांच्या खुणा असतात आणि शेजारीं समासाच्या जागेंत कांही लिहिलेलं आढळतं. परिच्छेदामागून परिच्छेद अधोरेखित केलेले असतात. वाचायचं आणि तें पचवायचं असा हा उपक्रम अव्याहत सुरू रहातो.

यशवंतरावांचं मन हें कवीचं मन आहे. तरुण वयांत त्यांनी बरीच काव्यरचना केलेली आहे. थोडंफार निबंध-लेखनहि केलेलं आहे. माणसानं कवि बनण्याचं एक वय असतं. तारुण्यांत असतांना प्रत्येकजण कमी-अधिक प्रमाणांत कवि असतोच. या मनाच्या अवस्थेंतून प्रत्येकाला जावंच लागतं. कांहीजण कवि-कल्पना शब्दांकित करतात, कांही करूं शकत नाहीत, इतकंच !

वय लहान असल्यापासूनच, यशवंतरावांचा मनःपिंड राजकारणानं घडविलेला असल्यामुळे त्यांच्याकडून प्रारंभीच्या काळांतील काव्य-रचनेवर राजकीय जागृतीची छाया पडणं स्वाभाविक होतं. स्वातंत्र्य-चळवळीच्या काळांत त्यांनी, अनुष्टुप छंदांत अशाच सुमारे चारशे कविता रचल्या. शिक्षणासाठी शहरांत गेलेला खेड्यांतील एक तरुण शहरांत सुरू असलेल्या स्वातंत्र्य-आंदोलनानं भारावलेला असतो. हा तरुण सुटीमध्ये जेव्हा आपल्या खेडेगावीं परत येतो त्या वेळीं खेड्यांतील निद्रिस्त वातावरण पाहून त्याच्या मनाला धक्का बसतो. स्वातंत्र्याची आणि स्वातंत्र्य-आंदोलनाची कल्पना यत्किंचितहि खेडुतापर्यंत पोंचलेली नसते. हा तरुण मग त्या मनाच्या निराश अवस्थेंत घरांतून बाहेर पडतो. गावाबाहेर लांब एका टेकडीवर बसून विचार करूं लागतो. खेडुतांमध्ये स्वातंत्र्याची जागृति कशी करतां येईल या चिंतेनं त्याचं मन ग्रासलेलं असतं आणि मनाच्या त्या अवस्थेंत जमा झालेले विचार तो काव्यरूप बनवतो. उठा, जागे व्हा!, असा संदेश तो आपल्या गावकऱ्यांना देतो, असा हा काव्य-विषय आहे.

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचं 'कमला काव्य' १९३२ सालीं त्यांनी तुरुंगांत असतांना वाचलं होतं; समजून घेतलं होतं. आचार्य भागवत यांनी तें काव्य तुरुंगांतील तरुणांना समजावून सांगितलं होतं. तें ऐकत असतांना तरुण यशवंतरावांना मिळालेली प्रेरणा पुढे या विषयाच्या निमित्तानं काव्यरूप बनली. नंतरच्या काळांत त्यांनी निबंध, कथा आणि अन्य साहित्यहि लिहिलं.

काव्य-लेखनाच्या वयाप्रमाणे, कथा-कादंबरी लेखनाचंहि एक वय असतं. अशा त्या वयांत, तरुण यशवंतरावांनी कादंबरीसाठीहि एका विषयाची निवड केली होती. कादंबरीचं लिखाण सुरू केलं, पण कादंबरी पूर्ण होऊन वाचकांपर्यंत पोंचण्याची संधि त्या कादंबरीला कधी मिळालीच नाही. जीवनाची गाडी राजकारणाच्या रुळावरून भरधांव धांवूं लागतांच ती कादंबरी मधल्या स्टेशनवर 'क्लोकरूम'मध्ये तशीच कुठे तरी पडून राहिली.

वयाचीं साठ वर्षे उलटल्यानंतर आता आपण कांही लिहावं असे विचार त्यांच्या मनांत येणं स्वाभाविक आहे. तीस-चाळीस वर्षांचं अखंड वाचन आणि अभ्यास यांतून निर्माण झालेली परिपक्वता ते अक्षरबद्ध करतील, तर वाचकांना अव्वल दर्जाचं

साहित्य आणि विचार वाचल्याचं समाधान त्यांतून निश्चितच मिळेल. थोडी विश्रांति घ्यावी, वाचावं आणि लिहावं असं त्यांच्या मनांत पुष्कळ वेळा येतं, परंतु तशी संधि क्वचितच मिळते.

उत्कृष्ट वक्ता म्हणून त्यांनी नैपुण्य संपादन केलेलंच आहे. हें नैपुण्य त्यांनी पूर्वी, अगदी तरुण वयांत संपादन केलेलं आहे. १९३० सालीं कराडला विद्यार्थी असतांना, पुण्यांतील वक्तृत्वस्पर्धेत त्यांनी भाग घेतला होता. 'खेड्याचा विकास' हा त्यांच्या वक्तृत्वाचा विषय होता. हा विषय पुणेकर शहरवासियांना मोठ्या बहारीनं समजावून सांगतांच श्रोते आणि परीक्षकहि भारावले. शहरी मंडळींना विद्यार्थी यशवंत चव्हाण यांचं बोलणं जिवंत वाटलं. वक्तृत्वाचं १५० रुपयांचं पारितोषिक, परीक्षकांनी या विद्यार्थ्याला देऊन त्याच वेळीं वक्तृत्वकलेवर शिक्कामोर्तब केलं. वक्तृत्वस्पर्धेतील हा वक्ता पुढच्या काळांत विराट सभांतून भाषण करून प्रतिपक्षाला चकित करण्याचं चातुर्य दाखवील याची कल्पनाहि त्या वेळीं कोणास आलेली नसेल; परंतु नंतर तें घडलं.

श्रोत्यांच्या भावनांना आवाहन करण्याचं आणि वैचारिक प्रतिपादनानं श्रोत्यांना जिंकण्याचं, दोन्ही प्रकारचं कौशल्य त्यांनी आत्मसात केलं आहे. प्रमाणबद्ध आणि आटोपशीर हें त्यांच्या वक्तृत्वाचं आणखी एक वैशिष्ट्य. महाराष्ट्रांतील आणि देशांतील नामांकित वक्त्यांत त्यांनी आता स्थान मिळवलं आहे.

वाणीप्रमाणेच त्यांच्या लेखणीचा विलासहि कौतुकास्पद आहे. त्यांना लिहायला क्वचितच फुरसद मिळते, परंतु जेव्हा केव्हा लिहितात तेव्हा त्यांची लेखणी उत्कृष्ट दर्जाचं साहित्य प्रसवते. ते राजकारणधुरंधर आहेत, परंतु कला आणि साहित्य यांचं त्यांना जबरदस्त आकर्षण आहे, त्यांचं भाषण जसं कधी पडत नाही त्याचप्रमाणे त्यांचा फसलेला लेखहि कधी वाचायला मिळत नाही. यशवंतरावांच्या लेखणीबद्दल सुप्रसिद्ध साहित्यिक ना. सी. फडके यांनी एका लेखांत लिहिलं आहे की, "भावनेनं ओथंबलेलं, प्रभावी भाषेनं नटलेलं लेखन जी लेखणी करूं शकते ती साधीसुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातांत शोभावी अशीच ती आहे. यशवंतरावांच्या लिखाणाचा आस्वाद जेव्हा जेव्हा मी घेतों तेव्हा तेव्हा माझ्या मनांत येतं, यशवंत-रावांच्या रूपानं महाराष्ट्राला आणि भारताला एक पहिल्या दर्जाचा नेता मिळाला खरा, परंतु त्यांच्यावर पडलेल्या नेतेपणाच्या ओझ्यामुळे यशवंतरावांच्या ठिकाणीं जो श्रेष्ठ साहित्यिक आहे त्याचं पूर्ण कर्तृत्व प्रगट होत नाही, ही खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. असं जरी असलं तरी भावी काळांत त्यांच्यावरच प्रचंड साहित्य निर्माण होईल, याबद्दल मला तिळमात्र शंका नाही."

फडके यांनी भाकीत केल्याप्रमाणे यशवंतराव चव्हाण यांच्यावर साहित्यनिर्मिति होत राहिली आहे. त्यांनी स्वतः लिहिलेलं साहित्य मात्र अद्याप विशेषत्वानं प्रकाशांत आलेलं नाही. तरी पण साहित्यनिर्मितीची इच्छा ते बाळगून आहेत. साठीनंतर त्यांचं वाचन, कांही लिहिण्यासाठी म्हणून सुरू राहिलं आहे. त्यांनी आपल्या मनाशीं लेखनाचा

जो आराखडा तयार केलेला असेल त्यासाठीं मुद्दाम कांही ग्रंथांचं वाचन आणि ग्रंथांचा संग्रह त्यांच्या दास्तानीं रुजू होत असावा. प्राचीन आणि अर्वाचीन ग्रंथकारांचे ग्रंथ त्यांनी वाचल्यानंतर त्यांनी या ग्रंथकारांचं जीवन समजून घेण्याचा प्रयत्न केला. लेखकांचीं आत्मचरित्रं हेंच त्याचं माध्यम असल्यानं अनेक पाश्चात्त्य, पौर्वात्य ग्रंथकारांचीं व नेत्यांचीं आत्मचरित्रं ते वाचत असतात. ग्रंथ समजला, पण ग्रंथकार समजावा हा त्यामागचा हेतु. वाचलं, मनन केलं आणि सांगितलं या टप्प्यानंतर, वाचलं, चिंतन केलं आणि लिहिलं ही या टप्प्याची वाटचाल म्हटली पाहिजे. हा टप्पा पार झाला तर राजकारणी यशवंतरावांचं साहित्यिक व्यक्तिमत्त्व देशांतल्या आणि जगांतल्या वाचकांसमोर निरंतरचं राहूं शकेल. प्रश्न आहे काँग्रेस-पक्षाची आणि सत्तेची जबाबदारी सांभाळत असतांना यासाठी सवड मिळण्याचा ! परंतु त्याचाहि विचार यशवंतरावांनी पूर्ण केलेला असला पाहिजे. सत्तेंत राहून काम करणाराला हा विचारहि कधी तरी करावाच लागतो.

१९४६ मध्ये यशवंतराव पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून मुंबईत दाखल झालेले असले, तरी १९५२ मध्ये त्यांच्याकडे मंत्रिपद आल्यानंतरच खऱ्या अर्थानं त्यांचं सत्तेंत पदार्पण झालं. मनुष्य एकदा सत्तेंत आला, सत्ताधीश बनला की पुष्कळदा त्याचा सारा नूर बदलून जातो. कारण सत्ता ही वस्तु अशी आहे की, ती केंद्रित बनते. अधिकाधिक सत्ता ताब्यांत घेण्याचा प्रयत्न सुरू होतो. द्वेष, स्पर्धा, जातीचे, मोठेपणाचे संस्कार, हितसंबंध हे सर्व सत्ताधीशांच्या ठिकाणीं गोळा होत रहातात. सत्तेंत काम करणारा माणूस, कोणत्या विचारानं तो तिथे आला आहे याला वस्तुतः महत्त्व असतं. त्याला आपल्या मर्यादांची जाणीव ठेवावी लागते. आपल्या स्वभावाची एक विशिष्ट घडण घडवावी लागते. त्याकरिता कांही पथ्यंहि पाळावीं लागतात; परंतु पुष्कळांना हें भान रहात नाही.

यशवंतराव पंचवीस-तीस वर्षे सातत्यानं सत्तेंत असतांना, आणि एकाहून एक सरस सत्तास्थानं भूषवीत असतांना त्यांनी कांही पथ्यं पाळलीं का, आणि तशीं पाळलीं असतील किंवा नसतील, तर ते त्यामध्ये किती यशस्वी वा अयशस्वी ठरले, हें तपासणं आवश्यक ठरतं. हें तपासायचं तर ते सत्तेंत नसतांना त्यांच्या प्रेरणा कोणत्या होत्या आणि सत्तेंत आल्यानंतर त्या प्रेरणांची जपणूक त्यांनी कसोशीनं केलेली आहे का, याच्या निर्णयावरूनच पथ्यं पाळण्यांत यशस्वी ठरले आहेत की काय, याचं उत्तर मिळूं शकेल.

यशवंतराव प्रारंभींच्या काळांत, अगदी तरुण वयांतच राजकीय चळवळींत दाखल झाले. मोठ्या शक्तिमान् घराण्यांतून, घरांतून किंवा राजकारणाची परंपरा असलेल्या कुटुंबांतून ते आलेले नाहीत. चळवळींत असतांना सामान्य थरांतील माणसांचं सहकार्य घेऊनच त्यांना काम करावं लागलं. चळवळीला उठाव यायचा तर मोठं मनुष्यबळ जतन करावंच लागतं. माणसं मिळवणं आणि टिकवणं हें पथ्यं ज्याला पाळतां आलं तोच चळवळीचं नेतृत्व करूं शकतो, चळवळीला जोर प्राप्त करून देऊं शकतो ! कुणी विरोधी

असतील तर त्यांना प्रेमानं जिंकावं लागतं. आपल्या कांही चुकांमुळे विरोध निर्माण होत आहे काय, आणि तसा तो होत असेल तर, चूक सुधारून विरोध नाहीसा होऊं शकेल काय, निदान तो पातळ करतां येईल का, याकडेहि लक्ष ठेवणं आवश्यक असतं.

चळवळींत काम करत असतांना यशवंतराव या बाबतींत सावध असलेले आढळतात. प्रारंभींच्या काळांत सातारा जिल्ह्यांतील स्वातंत्र्य-चळवळीचं नेतृत्व त्यांच्याकडे आलं आणि त्यांनी तें टिकवलं यांतच लोकसंग्रह करण्याच्या आणि तो टिकवण्याच्या त्यांच्या अंगच्या गुणांचा प्रत्यय येतो. स्वातंत्र्य कशाकरिता, याचा अभ्यास करून आणि समजून घेऊन जाणीवपूर्वक ते चळवळींत दाखल झालेले असल्यानं त्यांच्या प्रेरणा निश्चित होत्या. त्या प्रेरणांची पाठराखण त्यांनी चळवळींत असतांना स्वतः कटाक्षानं केली. बरोबरीच्या लोकांमध्ये त्या प्रेरणा त्यांनी रुजवल्या आणि तीं माणसं जवळ ठेवलीं.

चळवळीच्या पायवाटेनं वाटचाल करत ते सत्तेच्या महालापर्यंत पोंचले ते मूळच्या प्रेरणा बरोबर घेऊनच! सत्तेंत यायचं व रहायचं तर लोकमताचं साहाय्य असावंच लागतं. लोकशाहीमध्ये लोकमताच्या साहाय्यानं सत्ता मिळवणं हें सोपं असतं; परंतु कारस्थानं न करतां सत्ता टिकवणं आणि ती टिकणं हें अवघड असतं.

यशवंतराव लोकांच्या साहाय्यानं सत्तेंत पोंचले पण तिथे ते टिकले ते मात्र कामांतल्या अनुभवाच्या शिदोरीवर. आयुष्यांत मनुष्याला अनुभव हाच मोठा गुरु असतो. अनुभव माणसाला बरंच कांही शिकवतात. चळवळींत प्रवेश करण्याच्या अगोदरपासून यशवंतरावांना सामाजिक परिस्थितीचे अनेकविध अनुभव आले होते. त्यांची कौटुंबिक परिस्थिति अगदीच बेताची असल्यामुळे त्या परिस्थितीनं त्यांना लहानपणीं आणि पुढे शैक्षणिक काळांतहि पुष्कळ धडे दिले होते. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत काम करतांना तर पावलोपावलीं तऱ्हेतऱ्हेच्या अनुभवाशिवाय अन्य कांही घडतच नव्हतं. सामाजिक जाणिवेच्या प्रेरणा घट्ट होण्यास हे अनुभवच कारणीभूत ठरले. लहान माणसांतच ते वाढले आणि लहानांनीच त्यांना सत्ता मिळवून दिलेली असल्यामुळे सत्तेंत असतांना लहानांसाठी आपण काय करतों याचं भान त्यांना कायम राहिलं.

१९५२ पासून सत्तेच्या खुर्चीवर ते प्रत्यक्ष बसल्यानंतर, दिवसभर काम करतांना लहानांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून आपण कांही केलं का, याची बोच त्यांच्या मनांत सतत राहिली. आपल्या जुन्या प्रेरणा काय होत्या आणि सत्तेंत आल्यानंतर त्या शाबूत राहिल्या आहेत का, याचा अंतर्मुख होऊन विचार करणारा हा नेता त्यामुळेच सत्तेंत टिकला आणि लहानांसाठी कार्य करूं शकला.

यशवंतराव महाराष्ट्रांत मुख्य मंत्री झाले, पण वादांतून त्यांच्याकडे मुख्यमंत्रिपद आलेलं होतं. मुख्य मंत्री कुणी व्हायचं याचा कॉंग्रेसपक्षांतच वाद होता. त्यामुळे मुख्यमंत्रिपद स्वीकारतांच ज्यांचा त्यांना विरोध होता त्या लोकांना जवळ करण्यावर लक्ष केंद्रित करावं लागलं. यशवंतरावांना ज्यांनी घडवलं ती मंडळी, सत्तेच्या वेळीं दूर राहून

चालणारं नव्हतं. सत्तेवर स्थिर व्हायचं आणि सत्तेचा वापर सामाजिक स्वास्थ्यासाठी करायचा तर, सर्व पातळीवर विचाराची देवाण-घेवाण खुलेपणानं करतां येईल, असंच वातावरण असलं पाहिजे.

यशवंतराव हे सत्तेच्या प्रारंभींच्या काळांत महाराष्ट्रांत वादग्रस्त ठरले, तसे दिल्लीला आल्यानंतरहि वादांत सापडले. राजकारणांत वाद हे अपरिहार्यच असतात; परंतु सत्तेंतील प्रमुख व्यक्ति वादग्रस्त ठरते त्याच वेळीं त्यांच्या अंगच्या गुणांची कसोटी लागून जाते. सत्तेंतील व्यक्तीला विविध प्रश्नांबद्दल निर्णय करावे लागतात. यशवंतरावांनी असे पुष्कळ निर्णय केले. त्यांतील कांही निर्णय लोकांच्या दृष्टीनं चुकलेहि असतील, परंतु आपल्या निर्णयाबद्दल यशवंतरावांना कधी पश्चात्ताप झाला नाही. निर्णय करतांना मूळ प्रेरणांशीं आणि स्वतःशीं प्रतारणा करून त्यांनी कधी निर्णय केले नाहीत.

यशवंतराव हे सभोवतीं वादळ घोंगावत असतांनाहि शांत असतात त्याचं रहस्य हें आहे. त्यांची नेहमीची शांत वृत्ति पाहून त्यांना 'स्थितप्रज्ञ' म्हणवून घेणं मात्र मान्य नाही. बुद्धि विशाल असतांना त्या जोरावर त्यांनी अहंकार दाखवला असता तरी ते त्यांना कदाचित् शोभून दिसलं असतं. पण त्यांच्या ठिकाणीं विनयाचं प्राबल्य असून वास्तववादी विद्वत्ता आणि विनय, सौजन्य यांमुळे बुद्धिमंतांपासून तो सामान्यांपर्यंत सर्वेचजण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे आकर्षित होतात असं आढळतं. याच्या जोडीला आदराची भावनाहि असते.

ते स्वतः बुद्धिमान् असले तरी बरोबरीच्या मंडळींबरोबर राहून विचारांची देवाण-घेवाण करण्याला त्यांची नेहमीच तयारी असते. त्यांचे विचार वास्तववादी असतात, परंतु तरीहि ते विचार अनुभवाच्या आणि तर्काच्या मुशींत घालून तावूनसुलाखून घेण्याचीहि त्यांची सिद्धता असते. राजकीय क्षेत्रांत त्यांनी प्रसंगोपात अनन्यसाधारण विजय संपादन केलेला असला, तरी स्वतःचा मोठेपणा वाढवण्यासाठी नाटकीपणा, दिखाऊपणा यापासून कटाक्षानं ते लांब राहिले. मोठेपणावर शिक्कामोर्तब करून घेण्यासाठी किंवा स्तुति करून घेण्यासाठी वृत्तपत्रांकडे उठसूट धांवहि घेतली नाही. त्यांचा मोठेपणा टिपण्यासाठी वृत्तपत्रांनाच त्यांचा पाठलाग करावा लागला. पत्रक-पुढारी किंवा घोषणा-पुढारी बनण्यापासून ते अलिप्तच राहिले; असं असूनहि महाराष्ट्रांतल्या आणि देशांतल्या ज्या पिढीनं त्यांना नेते म्हणून स्वीकारलं, मानलं, ती पिढी समजूतदार आणि शहाणी समजली पाहिजे. यशवंतरावांच्या विचाराची आणि कृतीची महनीयता चिरस्थायी असल्यामुळे भावी पिढीच्या मनांतहि त्यांचं नेतेपण दीर्घकाल रहाणारं आहे.

यशवंतरावांनी, सत्तेमध्ये सामील झाले त्या दिवसापासून 'आपण सत्तेंत नसलों तर' हा विचार कायमचाच मनांत बाळगला असला पाहिजे. सत्तेंत राहून काम करणाराला केव्हा तरी हा विचार करावाच लागतो की, उद्या आपण सत्तेंत नाही, तर काय? मित्रांच्या चर्चेंत एकदा खुद्द यशवंतरावांनाच त्यांच्या मित्रांनी हा प्रश्न विचारला. या प्रश्नानंतर झालेला संवाद हा मोठा बोलका आहे.

"कां हो, समजा, उद्या तुम्ही सत्तेंत नाही असं घडलं, तर नेमकं काय कराल ?" – मित्र.

"सत्तेंत आज आहे आणि उद्या नाही असं गृहीत धरूनच काम करावं लागतं. बराच काळ सत्तेवर रहाणं ही अपवादात्मक परिस्थिति आहे. सत्ता नाही असाहि क्षण येतोच केव्हा केव्हा! त्या बाबतींत सत्तेवर राहूं नये असा जाणूनबुजून निर्णयहि घ्यावा लागतो. असा निर्णय घ्यावा लागेल तेव्हा काय करीन असा प्रश्न अशा वेळीं मनांत येणं साहजिक ठरतं; परंतु माझ्या मनाला या प्रश्नानं कधीच त्रास झालेला नाही, याचं कारण आहे. जेव्हा सत्ता नव्हती, सत्तेच्या ठिकाणीं आपण बसणार आहोंत याची कल्पनाहि नव्हती, तेव्हापासूनच मी माझी कामाची दिशा निश्चित केलेली आहे.

"सत्तेंत नसतांना आणि असतांनाहि त्या दिशेनं काम पुढे नेण्याचा प्रयत्न आहे. सत्तेंत असतांना शासकीय क्षेत्रांत काम करावं लागतं. पण सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांतहि पुष्कळ करतां येण्यासारखं आहे. या क्षेत्रांत साध्य करण्याचं जें माझं स्वप्न होतं त्यापासून अजून आम्ही पुष्कळ लांब आहोंत. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांत करतां येईल असं पुष्कळ काम अजून शिल्लक आहे. जाति-जातींमधील तेढी, स्पर्धा लोकशाहींत वाढत आहेत. महत्त्वाकांक्षी माणसं त्याचा खेळ करत आहेत. मागासलेल्या वर्गाचा प्रश्न अजूनहि सुटलेला नाही. या क्षेत्रांत माझ्यासारख्याला पुष्कळ काम करतां येण्यासारखं आहे. सत्तेंत नसेन त्या वेळीं असंच कांही काम करीन. हां, सत्तेंत नसल्यानं कांही बाबतींत दुर्बलता येईल, शक्ति कमी पडेल, साधनं व माणसं अशा वेळीं कमी होतात. पण लोकांची थोडीफार मला मान्यता आहे त्याचा उपयोग करून सामान्यांचं स्थान उंचावेल, जातींमधील तेढी कमी होतील, यासाठी लोकांच्या मदतीनं मला काम करतां येईल." – चव्हाण.

"सत्ता आणि सामाजिक, शैक्षणिक कार्य यांमध्ये तुमच्या मनांत अग्रक्रम कोणत्या गोष्टीला आहे ?" – मित्र.

"आज मी सत्तेवर आहे. त्यामुळे मी या प्रश्नाचं कांही उत्तर दिलं, तर तें वास्तव ठरणार नाही. सत्ता कोणत्या कार्यासाठी अग्रक्रमानं वापरावी असा एक प्रश्न होऊं शकतो व त्याला माझं उत्तर निश्चयानं मिळेल की, ती सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी वापरावी. तुमच्या मनांत उभा राहिलेला प्रश्न मला असा दिसतो की, अनपेक्षितरीत्या सत्तेबाहेर जावं लागलं तर काय ? ही परिस्थिति गृहीत धरूनच चालावं लागतं. मी तुम्हांला एवढंच सांगूं शकेन, त्याहि परिस्थितींत माझ्या मनाची समतोलता राहील याबद्दल माझी निःसंशय खात्री आहे." – चव्हाण.

"एकदा सत्तेच्या बाहेर गेल्यानंतर राजकारणाची तुमची संगत साहजिकच सुटेल, नाही का ?" – मित्र.

"तसं नाही. सत्तेंतून बाजूला गेल्यानंतर राजकारणांतून बाजूला होईन असा याचा अर्थ नाही. राजकारणातून बाजूला – हें होणं नाही. परंतु मला कांही व्हायचंय्,

स्वतःकरिता कांही मागावं अशी मनाची स्थिति नाही. कांही व्हायचंय् म्हणून राजकारणांत रहायचंय् असंहि नाही. आयुष्यांत मला भरपूर दान मिळालं आहे. माझ्या पक्षानं, नेत्यांनी, जनतेनं कमी दिलं आहे अशी भावना मुळीच नाही." – चव्हाण.

"सत्तेवर येण्यापूर्वी, आपण कामाची कांही दिशा निश्चित केलेली होती असं म्हणतां – पण ही दिशा निश्चित कोणती होती ? आणि सत्तेत आल्यानंतर त्या दिशेनं जाण्यांत यश कितपत आलं ?" – मित्र.

"माझ्यापुढे सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्ट प्रथमपासूनच होतं. समाजाची आर्थिक दुरवस्था मीं पाहिली होती, अनुभवली होती. त्यामुळे सत्तेत आल्यानंतर त्याच ध्येयासाठी सत्ता वापरण्याचा प्रयत्न करणं स्वाभाविक होतं. मनापुढे ती दिशा निश्चित होती. आता यामध्ये पूर्णपणें यशस्वीच झालों असा दावा करणं योग्य नव्हे; परंतु सामाजिक व आर्थिक स्थिति सुधारण्याचा विचार समाजाच्या खालच्या थरापर्यंत पोंचवण्याचा प्रयत्न करूं शकलों, त्यासाठी जेवढी संधि उपलब्ध करून देतां येणं शक्य होतं तेवढी देऊं शकलों; एवढ्या मर्यादेपर्यंत यशस्वीततेचा दावा करतां येणं शक्य आहे. महाराष्ट्रांत असतांना त्यासाठी जे प्रयत्न केले, निर्णय केले त्याचा इष्ट परिणाम समाज-जीवनावर झाला आहे, असं मात्र म्हणतां येईल." – चव्हाण.

"या साऱ्या प्रयत्नांत, सामाजिक आणि राजकीय सुधारणांचा मेळ घालण्याची आपली अपेक्षा होती काय ?" – मित्र.

"सामाजिक सुधारणा अगोदर की राजकीय अगोदर, याचा वाद एके काळीं बराच निर्माण झाला होता, वाढलाहि होता. आमची पिढी जेव्हा या क्षेत्रांत उतरली तेव्हा, खरं म्हणजे या वादाचा कांही संदर्भ राहिलेला नव्हता. हें भांडण मुळांतच गैरलागू (Irrelevant) होतं असं आमच्या पिढीचं मत होतं.

"सामाजिक, राजकीय आणि आर्थिक प्रश्न हे वस्तुतः एकाच प्रश्नाचीं विविध रूपं आहेत. एकाचा परिणाम दुसऱ्यावर आणि दुसऱ्यावरून पहिल्याची परीक्षा, अशी ही सांगड आहे. सर्व मिळून एकच काम आहे. याच दृष्टिकोनांतून आमची पिढी काम करूं लागली. सामाजिक आणि राजकीय सुधारणा या विचारांत एक मूलभूत फरक निश्चित होता हें मान्य करावं लागतं; परंतु आमच्या वेळीं त्याचा संदर्भ तितकासा उरलेला नव्हता. त्यामुळे या दोन्ही विचारांच्या दृष्टीनं एक विशिष्ट टप्पा आम्हांला गाठतां आला. सामाजिक विषमता नाहीशी करण्याचा विचार सामाजिक सुधारणेमध्ये प्रमुख होता. त्या दृष्टीनंहि आमच्या पिढीनं काम केलं. अर्थात् हा विचार खालपर्यंत पोंचला का, याचं उत्तर कांहीसं निराशाजनक आहे, पण अधिक संघटितपणें प्रयत्नशील रहावं लागेल." – चव्हाण.

"सत्तेत राहून हें सर्व काम करत असतांना, तुम्ही मंडळींनी विरोधी पक्षांना विश्वासांत घेतलं नाही, विरोधी पक्षांना वाढूं दिलं नाही, असा एक आरोप तुमच्यावर

केला जातो. विरोधी पक्ष कसा असावा, निदान त्याचं अस्तित्व तरी असावं की नसावं? तुमचं काय मत आहे ?" – मित्र.

"मी माझ्यापुरतं असं म्हणेन की, विरोधी पक्षाच्या सद्हेतूबद्दल (Bonafides) संशय न ठेवतां त्यांच्याशीं संवाद करत रहायचं असं पथ्य मीं पाळलं. विरोधी पक्ष कसा असावा हें सांगणं मात्र अवघड आहे, आणि विरोधी पक्षांना आम्ही वाढूं देत नाही या आरोपांत कांही अर्थ नाही. आम्ही त्यांची वाढ कशी करणार ?

"आम्ही विरोधी पक्षांची वाढ करायची म्हणजे आम्ही सत्तेचा दुरुपयोग करत राहिलं पाहिजे. चुकीचीं धोरणं ठरवलीं पाहिजेत आणि त्यांचीच अंमलबजावणी करत राहिलं पाहिजे. म्हणजे मग आम्ही त्यांना वाढण्यास संधि दिली असं होईल. विरोधी पक्षांनी वस्तुतः आपल्या कामांनी वाढलं पाहिजे. कामांतूनच त्यांनी वाढावं. लोकशाहींत विरोधी पक्षांची गरज कुणाला नाकारतां येणार नाही. मी स्वतः विरोधी पक्षांशीं वागतांना एक नीति ठरवली. ती अशी की, त्यांच्या ज्या श्रद्धा असतील, सद्हेतु असेल त्यावर विश्वास ठेवायचा; त्यांची टीका रास्त असेल, तर आपण आपल्यामध्ये दुरुस्ती केली पाहिजे. याच दृष्टिकोनांतून विरोधी पक्षांशीं अनेकदा मी सहकार्यानं काम केलं. त्यांच्यांतील पुष्कळांना पुढे ठेवून, ते पुढे असलेले पाहून काम केलं. त्यामुळे विरोधकांबद्दलची आदराची भावना कमी झाली नाही. जे विरोधी पक्षांत नव्हते, पण समाजक्षेत्रांत श्रद्धेनं आदर्श काम करणारे होते त्यांनाहि समोर ठेवून मी काम केलं.

"सत्ता हातीं आल्यानंतर राजकीय आणि सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रांत मेळ घालण्याचं काम कमीअधिक प्रमाणांत यामुळे करतां आलं. विरोधी पक्षांतीलच नव्हे, तर खुद्द काँग्रेस-पक्षांतहि जे माझ्याबरोबर नव्हते, या ना त्या कारणासाठी दुःखी-कष्टी होते, ते प्रत्यक्षांत सामना करण्यासाठी विरोधात उभे ठाकले नव्हते, तरीहि मीं त्यांना मैत्रीनंच वागवलं. राज्य रागानं चालवतां येत नाही अशीच माझी श्रद्धा राहिली." – चव्हाण.

कार्यपरत्वें निर्माण होणाऱ्या गरजेमुळे श्रद्धा किंवा निष्ठा संपादन करणारे नेते पुष्कळ असूं शकतात; परंतु अशा नेत्यांच्या ठिकाणीं निष्ठा आणि नैतिक गुणांचा समन्वय क्वचितच आढळतो. ज्यांच्या ठिकाणीं हा समन्वय झालेला असतो आणि आवश्यकतेमुळे नव्हे, तर निष्ठा ही स्वतंत्रपणें ज्यानं संपादन केलेली असते, तोच मनुष्य आदर्श ठरतो, तरुणांचा स्फूर्तिदाता आणि मार्गदर्शक बनतो.

ज्यानं नेतृत्व करायचं त्याची स्वतःचीच आपल्या तत्त्वज्ञानावर निष्ठा असण्याची आणि आचार, विचार आणि उच्चार यांमध्ये संगति राहील याची त्यानं दक्षता घेण्याची गरज असते. मनुष्य जेव्हा सत्ताधीश बनतो त्या वेळीं लौकिक अर्थानं प्रतिष्ठा, वैभव, मानसन्मान या गोष्टी त्याच्या वांट्याला येतात. त्याचबरोबर समज-गैरसमज, टीका, मानसिक यातना अशा काटेरी मुलखांतूनहि त्याचा प्रवास सुरू रहातो. मित्रांचाहि एक वेगळाच वर्ग भोवतीं जमा होऊं लागतो. जेव्हा लढा सुरू असतो त्या

वेळीं जमा होणारे लोक हे एकमेकांचे सच्चे मित्र असूं शकतात. सत्तेच्या काळांतले बरेच मित्र नकली निघतात. राजकारणाचा तो स्वभावहि असेल; परंतु नेत्याची कसोटी अशाच वेळीं लागून जाते. अवतींभवतीं संघर्ष सुरू असतांनाहि तर्कशुद्ध विचारांचा पाठपुरावा, विषमतेला विरोध व समतेचा पुरस्कार यांची सोबत विवेकी नेताच कायम ठेवूं शकतो. उलट सत्तेच्या राजकारणाची बैठक त्यानं आपल्या मनांत तयार होऊं दिली, तर राजकारणांतील दुटप्पीपणाचं बोट त्याला धरावं लागतं. अशा वेळीं त्याचीं पावलं राजकारणांतल्या आणि सत्तेमधील यशापासून दूर दूर पडूं लागतात.

यशवंतरावांची एकूण राजकीय वाटचाल पाहिली, तर विचारांत सरळपणा व नेमकेपणा राखून खुल्या पण निश्चयी मनानं ध्येयाकडे जाणाऱ्या वाटेनं ते चालत आहेत असं दिसतं. सत्ता ही ध्येयाकरिता वापरायची हें एक आणि निर्णय अत्यंत निर्धारानं करावेत, पण अंमलबजावणी मानवी सहानुभूतीनं करावी – त्यांत सत्तेचा आवेश असूं नये, असं त्यांचं तत्त्वज्ञान बनलं आहे.

यशवंतराव हे उपजत पुढारी भासतात. आपल्या अनुयायांच्यावर त्यांचं बंधूप्रमाणे प्रेम असतं. कडक शिस्तीचे ते भोक्ते नाहीत हें खरं, पण कोणतीहि गैरवागणूक ते चालूं देतील असं नव्हे. योग्य मार्गदर्शन करण्यासाठी लागणारा सारासार विचार, धोरण, युक्ति, जवळची वाट, सहानुभूति वगैरे सर्व गुणांची शिदोरी त्यांनी जवळ बांधून ठेवलेली असावी. चळवळींत किंवा सत्तेंत असतांनाहि ज्या माणसाला त्यांनी एकदा जवळ केला त्याचं त्यांनी सर्व सोसलं; त्याच्यामुळे होणारे अपमान, टीका हें सर्व हसत हसत स्वीकारलं, सोसलं. त्यामुळेच त्यांचा मनुष्य सहसा त्यांना सोडून जाण्याचं औद्धत्य दाखवत नाही. शिवाजी, टिळक, गांधी, नेहरू, इत्यादि मागच्या लोकांनी जें जें चांगलं आणि उपयुक्त करून ठेवलेलं आहे तें जतन करून त्यामध्ये चांगल्या नव्याची भर घालावी आणि प्रत्येकानं आपलं जीवन रसमय बनवावं, असंच त्यांनी अनुयायांना अखंड सांगितलं आहे.

जीवनाला उंची व व्यापकता आणून प्रत्येकानं सुखानं आपलं जीवन जगावं आणि राष्ट्राचं जीवन उंच व सुखी बनवावं हेंच त्यांचं जीवनविषयक तत्त्वज्ञान राहिलं. जीवनामध्ये जें उच्च, प्रौढ, अभिजात, भव्य व उदात्त आहे त्याची आवड त्यांनी स्वतः बाळगली असून इतरांमध्येहि ती आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. एखाद्या सामान्य माणसानंहि त्यांच्या या गुणांचा अभ्यास केला, तर त्याला स्वतःचं जीवन सुखी करण्याची गुरूकिल्ली सापडली असं होईल आणि राष्ट्राचं जीवन सुखी करण्यासाठी त्याचा हातभार लागू शकेल.

– इतिहासाचें एक पान

यशवंतराव हे प्रथम महाराष्ट्राचे आणि नंतर राष्ट्राचे नेते बनले. महाराष्ट्राचं मन तसं चिकित्सक. कोणाच्या सत्तेवर किंवा संपत्तीवर भाळणारं नव्हे. तरीहि महाराष्ट्रानं या नेत्यावर प्रेम केलं आणि प्रेम करण्यासाठी देशाला एक नेता मिळवून दिला. याचं कारण यशवंतराव सत्तेत होते हें नव्हे. त्यांच्या अंगचे गुण त्याला कारण आहेत.

उपेक्षितांच्या अंतरंगाची जाण असलेला राजकीय नेता म्हणून त्यांना मिळालेली लोकप्रियता ही त्यांच्या सत्तेच्या लोकप्रियतेपेक्षा फार मोठी आहे. महाराष्ट्राला, मराठी मनाला त्यागाचं, सेवेचं असलेलं वेड हें जुनं आहे. लहानपणापासूनच यशवंतराव या वेडांत सहभागी झाले. दुःखितांच्या अंतकरणांत डोकावण्याचा छंद त्यांनी मनाला लावून घेतला. त्यामुळे लोकप्रियता त्यांच्याकडे चालून आली. आणि यशवंतराव जेवढे केवढे मोठे झाले त्यापेक्षा ते अधिक मोठे व्हावेत, महत्पदावर आरूढ व्हावेत असं मराठी मनाला तीव्रतेनं वाटत राहिलं. अनेकदा त्यांचं राजकारण विवाद्य बनलं, प्रसंगविशेषीं त्यांनी घेतलेले पवित्रे मराठी मनाला पटले नाहीत, तरी पण सर्वच थरांतील लोकांचं त्यांच्याविषयीचं प्रेम, आस्था, आदर कमी झाला नाही याचं कारणहि दुःखितांचे अश्रु पुसण्याच्या त्यांच्या वृत्तींत आहे. यशवंतरावांना हा गुण त्यांच्या मातेपासून – अक्कांपासून मिळाला आणि सौ. वेणूताईच्या – त्यांच्या पत्नीच्या साहचर्यांत तो वाढतच राहिला. चव्हाण-दांपत्य हा तसा समसमा संयोग म्हणावा लागेल.

यशवंतरावांच्या घराला – संसाराला – बरींच वर्षे सुखाचा स्पर्श झालेलाच नाही. वडिलांनी दारिद्र्यांत आणि अर्धपोटी अवस्थेंतच जगाचा निरोप घेतला आणि मग मुलांना जगवण्यासाठी, वाढवण्यासाठी आईनं हाडाचीं काडं केलीं. दिवसभर कष्ट करावेत तेव्हा संध्याकाळीं चूल पेटायची! स्वतः अक्का – यशवंतरावांच्या मातोश्री या परिस्थितीनं दुब्रळ्या असल्या तरी मनानं बळकट होत्या. कष्टानं मिळवून आणलं तरच धान्य घरीं यायचं आणि तेंच अन्न मुलांना द्यायचं, अशी स्थिति असली तरी जेवण-वेळेला कुणी घरीं आलं तर घासांतला अर्धा घास त्याला दिल्याशिवाय अक्कांना चैन पडत नसे. परिस्थिति पाहून येणारा कुणी नको म्हणाला, तर अक्का रागवायच्या. एक तीळ सात जणांनी खावा याचा अक्कांच्या वागण्यांतून प्रत्यय येई.

चव्हाणांच्या कुटुंबांत जें होतं तेंच गावांतील शेकडो कुटुंबांत त्या काळांत होतं. सारेच गरीब. चव्हाण-कुटुंबांत जें अधिक होतं तें म्हणजे अक्कांच्या मनाचा मोठेपणा. धर्मराजानं कुंतीला एकदा प्रश्न विचारला होता की, "जगांत मोठं व्हायचं असेल तर काय करावं?" कुंतीनं त्यावर उत्तर दिलं की, "मन थोडं मोठं कर." चव्हाणांच्या कुटुंबांत खरी श्रीमंती ही मनाचीच होती. आईनं ती मुलांना शिकवली. मनाचा कोतेपणा हा अनेक दुःखांचं मूळ असूं शकतो याचे धडे आईनं यशवंतरावांना प्रत्यक्ष दिले

नसतीलहि. तसे शाब्दिक धडे देण्याइतकी यशवंतरावांची आई शिक्षित नव्हती. शाळेची ओळखहि त्यांना नव्हती. परंतु आईच्या कृतींतून, यशवंतरावांनी ते धडे गिरवले. परिस्थितीनं गांगरून जायचं नाही हा पहिला धडा, लहानपणींच आईपासून ते शिकले. नकळत त्यांच्यांत जिद्द निर्माण केली. मुलं दुबळीं आहेत याची अक्कांना नेहमी खंत वाटत असे. त्यांना कुणी भक्कम पाठीराखा नाही म्हणून त्यांचं मन तुटत असे. पण त्यांनी तसं कधी भासू दिलं नाही. मुलं परावलंबी होणार नाहीत याची काळजी मात्र त्यांनी घेतली. परिस्थितीचं कुंपण चारहि बाजूंनी होतं आणि या कुंपणांतून बाहेर पडण्यासाठी यशवंतरावांचं मन उसळी घेत होतं; परंतु पिंजऱ्यांत कोंडलेल्या पक्ष्यासारखं, जागच्या जागीं फडफड करण्यापलीकडे गत्यंतर नव्हतं. आधार होता तो फक्त आईचा.

अक्का – त्यांचं नांव विठाई – या देवराष्ट्राच्या सगुण मातीचे गुण घेऊन वाढलेल्या, साध्याभोळ्या, श्रद्धाळु, धार्मिक आणि वृत्तीनं सरळ असलेल्या माता. आयुष्यांत त्यांच्या वांट्याला दुःखच फार आलं आणि तरीहि त्या सोशिक राहिल्या. त्यांनी आयुष्यांत कुणाचा राग केला नाही, खरखर केली नाही. संपत्तीनं नसल्या तरी संस्कारानं श्रीमंत. हीच श्रीमंती त्यांनी यशवंतरावांना दिली. 'ईश्वर आपल्या पाठीशीं आहे' ही या मातेची निष्ठा. या निष्ठेनं त्यांनी जीवनभर संकटांशीं सामना केला. हिंमत सोडूं नये असा मुलांना उपदेश करतांना अक्का एक ओवी म्हणत असत – "नका बाळांनो डगमगू । चंद्रसूर्यावरील जाईल ढगू."

आईचा हा संदेश यशवंतरावांच्या मनींमानसीं चांगलाच रुजला. संकटं आलीं तरी ज्या वाटेनं तीं येतात त्याच वाटेनं तीं निघूनहि जातात, हा धडा आईच्या सान्निध्यांत लहानपणापासूनच गिरवला गेलेला असल्यानं, यशवंतराव पुढे कोणत्याहि संकटांत सटपटले नाहीत.

कराड येथील मारुतीबुवांच्या मठांत अक्का रामायण ऐकण्यासाठी जात असत. त्या वेळीं धाकट्या यशवंतालाहि बरोबर नेत असत. मठामध्ये नाशिककरबुवा हे प्रख्यात पुराणिक मोठ्या रसाळपणानं रामायणांतील एक एक प्रसंग श्रोत्यांना ऐकवत. रामायणाच्या कथेमधील सर्व ऋषिमुनि, देव, स्त्रिया यांचं वर्णन बुवा मोठं झोकदार करत आणि जगांत वागतांना, कोसळणाऱ्या संकटांवर मात करण्यासाठी कांही उपदेश नकळत त्यांच्या विवेचनांतून श्रोत्यांना मिळत असे. संसारांत राहून शुद्ध चारित्र्यानं व कर्तव्यनिष्ठेनं स्त्री-जीवनाचे आदर्श निर्माण करणाऱ्या स्त्रियांचा जो वर्ग रामायणांत वर्णिला आहे तो ऐकतांना अक्का समरस होऊन जात. रामायणांतल्या त्या संस्कारांचा परिणाम अक्कांच्या मनावर अखंड राहिला. त्यामुळे गरिबीचं आयुष्य कंठतांना जेव्हा संकटं कोसळलीं त्या वेळीं प्रथम त्या बावरल्या, गांगरल्या, दुःखी झाल्या; तरी पण नंतर त्यांनी स्वतःला सावरलं आणि एखाद्या असामान्य स्त्रीनं जी आदर्श प्रतिक्रिया अशा संकट-प्रसंगांत दिली असती तीच अक्कांनी आपल्या मुलांना दिली.

यशवंतराव राष्ट्रीय चळवळींत सामील झाल्यानंतर त्यांना स्वतःला तर संकटांशीं झुंझावं लागलंच, शिवाय कुटुंबांतील सर्वांनाच त्याची झळ बसूं लागली. त्यामुळे सर्वांचीं मनं बेचैन होणं स्वाभाविक होतं; परंतु त्या परिस्थितींतहि अक्कांनी यशवंतरावांना मागे खेचलं नाही.

आयुष्यांतील बरींच वर्षं दुःखांत काढूनहि अक्का या दिलाच्या दिलदार राहिल्या. दुःखाशीं सोबत करतांना दिलाचा दिलदारपणा रहाणं हें देणं देवाचं असावं लागतं. अक्कांचं सारं जीवनच दीपज्योतीसारखं होतं. स्वतः जळत रहायचं आणि इतरांना प्रकाश दाखवायचा ! अक्कांच्या दीपज्योतीच्या प्रकाशांतच यशवंतरावांच्या जीवनाची वाटचाल सुरू राहिली.

धर्मनिरपेक्षतेचं बाळकडू यशवंतरावांना तरुण वयांत अक्कांच्या सान्निध्यांतच मिळालं. चव्हाणांच्या घरीं सर्व जाति-धर्मांचे मित्र जमा होत असत. त्यांत मराठे होते, ब्राह्मण होते, मुसलमान होते, हरिजन होते आणि इतर जाति-जमातींचेहि होते. या सर्वांबद्दलच अक्कांच्या मनांत आपुलकी असायची, मातृभाव असायचा. अशाच एका प्रसंगानं अक्कांच्या मातृभावाची कसोटी लागून गेली.

यशवंतराव त्या वेळीं मॅट्रिकच्या वर्गांत शिकत होते. सामाजिक सुधारणेबाबत देशांत, विशेषतः महाराष्ट्रांत या काळांत बरंच कांही बोललं जात होतं. हरिजन चळवळ, अस्पृश्योद्धाराचा विचार जोर करून उठला होता. कराडांतल्या तरुणांना या चळवळीनं आकृष्ट करून घेतलं. चव्हाणांच्या घरांत, मित्रमंडळींमध्ये त्या संबंधांत खल सुरू असायचा. यशवंरावांचा एक हरिजन मित्र उथळे हाहि त्यांमध्ये असे. सारेच वर्गमित्र. या मित्रांच्या डोक्यांत एक दिवस हरिजनांसाठी, हरिजन-वसतींत 'नाईट स्कूल' सुरू करण्याचा विचार आला. विशीच्या वयांतलीं हीं सारीं मुलं ! डोक्यांत येईल तें करायचं असं तें वय. नाईट स्कूलचा विचार मनांत येतांच मुलांनी जुळणी सुरू केली आणि त्यांतूनच हरिजनांसाठी शाळेला जन्म दिला.

सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांत कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे हे त्या काळांत आघाडीवर होते. अस्पृश्यतेचा प्रश्न महर्षि शिंदे यांच्यापुढे आला तेव्हा त्यांनी मानवतावादी दृष्टिकोनांतून व समाजशास्त्रज्ञ या नात्यानं हा प्रश्न तपासला व आपलीं जीवनमूल्यं निश्चित केलीं होतीं. महर्षि शिंदे हे विलक्षण व्यक्तिमत्त्वाचे गृहस्थ होते. अस्पृश्योद्धाराकरिता विचारांच्या दृष्टीनं प्रयत्न करणारे पाहिले प्रवर्तक महात्मा ज्योतिराव फुले होते; परंतु या प्रश्नाला संघटितरीत्या तोंड दिलं पाहिजे असा प्रयत्न करण्यासाठी एक संस्था उभी करावी असा प्रयत्न करणारे महाराष्ट्रामध्ये विठ्ठल रामजी शिंदे हे पहिले गृहस्थ होते. बुद्धिनिष्ठ, ध्येयनिष्ठ, सेवानिष्ठ, कर्तृत्ववान्, प्रतिभावान्, आणि पराक्रमी अशा या लोकविलक्षण माणसाच्या हस्तें आणि त्यांच्याच आशीर्वादानं कराडच्या हरिजन-वस्तीमध्ये नाईट स्कूल सुरू करायचं असं सर्व मित्रमंडळींनी ठरवलं आणि

विठ्ठल रामजी शिंदे यांना पुण्याहून कराडला आणण्याची कामगिरी या मित्रांनी यशवंतरावांवरच सोपवली.

योगायोग असा की, महर्षि शिंदे यांच्या सान्निध्यांत पोंचण्याचं भाग्य यशवंतरावांना, त्यांच्या अगदी तरुण वयांत, विसीच्या आसपास असतांनाच लाभलं. अगदी अनोळखीपणानं ते त्यांच्याकडे गेले आणि अस्पृश्योद्धाराच्या कामाकरिता तुम्हीं आलं पाहिजे असा बालहट्ट त्यांनी धरला. हरिजन-वस्तींत नाईट स्कूल काढण्याची कल्पनाहि तरुण यशवंतानं त्यांना सांगितली. विठ्ठल रामजींनी प्रथम नाही म्हणून सांगितलं, पण पुन्हा म्हणाले, थांब मला तुझ्याशीं बोलूं दे. दहा-बारा तास असेच त्यांच्या संगतींत गेले.

विठ्ठल रामजींनी यशवंताची जणू त्या वेळीं उलटतपासणीच घेतली आणि शेवटीं येण्याचं मान्य केलं. या उलटतपासणीच्या वेळीं विठ्ठल रामजींच्या कांही अटी आहेत असं यशवंताच्या लक्षांत आलं. प्रश्नोत्तरामध्ये त्यांतल्या प्रमुख अटींची कल्पना विठ्ठल रामजींनी दिली होती. ' सर्व अटी पाळूं ' असं तरुण यशवंतानं त्यांना उत्तरहि दिलं होतं. विठ्ठल रामजींनी या तरुणाला विचारलं –

" कराडांत आल्यावर मी रहाणार कुठे ? " – शिंदे.

" माझ्या घरींच उतरवणार आहे. " – चव्हाण.

" घरच्या माणसांची संमति घेतली आहेस ? " – शिंदे.

" हो. " – चव्हाण.

" माझ्याबरोबर जेवणाच्या पंगतीला हरिजनाला आणावं लागेल. घरचे लोक मान्यता देतील ? " – शिंदे.

" हो. " – चव्हाणांचा पुन्हा होकार.

" घरीं कोण कोण आहे ? त्यांना विचारलं आहेस ? " – शिंदे.

" आई, थोरले बंधु आहेत; पण ते नाही म्हणणार नाहीत. सर्व जातींचे माझे मित्र घरीं येतात. आईची त्याबद्दल कधी तक्रार नसते. " – चव्हाण.

" हरिजनांची पंगत तुझ्या घरीं कधी झाली आहे का ? " – शिंदे.

" आपल्याबरोबर ही पंगत होईल याची मला खात्री आहे. " – चव्हाण.

विठ्ठल रामजींचा होकार घेऊन यशवंतराव कराडला परतले. एक मोठी लढाईच त्यांनी जिंकली होती. ठरल्याप्रमाणे विठ्ठल रामजी पुण्याहून रेल्वेनं कराडला आले आणि स्टेशनवरून टांग्यानं गावांत पोंचले. एवढा मोठा माणूस आमंत्रण स्वीकारून आला होता, परंतु त्यांच्यासाठी गाडीची व्यवस्था करावी अशी कुणाचीच ताकद नव्हती. कराडांत ते त्या वेळीं पायींच हिंडले. हरिजनवाड्यांतहि चालतच गेले आणि ' नाईट स्कूल 'चं उद्‌घाटन केलं. कराडच्या बुधवार पेठेंत, त्या वेळच्या महारवाड्यांत हें ' नाईट स्कूल ' या मुलांनी सुरू केलं होतं.

विठ्ठल रामजींच्या कराडांतील मुक्कामांत अक्कांच्या दिलदारपणाचं, मनाच्या मोठेपणाचं जें दर्शन घडलं तें यशवंतरावांच्या मनावर कायमचं कोरलं गेलं. पुण्यांत तरुण यशवंताशीं झालेली चर्चा आणि ती प्रमुख अट विठ्ठल रामजींनी जेव्हा अक्कांना ऐकवली तेव्हा ती माऊली म्हणाली, "त्यांत काय, मला सारीं मुलं सारखींच! कसली आलीय् जातपात!"

शिंदे यांचा कराडांतला मुक्काम मोठा बहारीचा झाला. चव्हाणांच्या घरीं हरिजनांसह पंगत झाली. मोकळ्या मनानं शिंदे यांनी आपले विचार सांगितले. या थोर पुरुषाच्या थोडंफार निकट येण्याची संधि तरुणांना मिळाली. यशवंतरावांच्या जीवनामध्ये तर एक प्रकारची संस्कारसंपन्नता प्राप्त झाली. माता आणि पुत्र विचारानं, संस्कारानं कसे एकजीव बनले होते त्याचंच दर्शन या प्रसंगानं घडून गेलं. या तरुण वयांत मनावर झालेले संस्कार यशवंतरावांच्या ठिकाणीं पक्के रुजले. त्यांच्या पुढील कार्यावरूनहि हेंच आढळून येतं.

महाराष्ट्राचे मुख्य मंत्री या नात्यानं, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर यशवंतराव कार्य करूं लागले त्या वेळीं किंबहुना त्याअगोदरच सत्तेंत आल्यापासून हरिजनांच्या प्रश्नांकडे आपुलकीनं, जिव्हाळ्यानं ते लक्ष देऊं लागले होते; परंतु राजकारणी मंडळींनी त्यांच्यावर आरोप केले की, हरिजनांना जवळ करण्यांत यशवंतरावांचा राजकीय डाव आहे. हा आरोप अर्थातच निवडणुकीच्या राजकारणाला अनुलक्षून होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये महाराष्ट्रांतला रिपब्लिकन पक्ष कॉंग्रेसच्या विरोधांत होता. तेव्हा हा विरोध नाहीसा करून त्यांचं सहकार्य मिळवण्यासाठी म्हणून यशवंतराव पावलं टाकत आहेत असा त्या आरोपाचा मथितार्थ होता.

कॉंग्रेस-रिपब्लिकन पक्षांचा समझोता यशवंतरावांनी घडवून आणला हें खरं. परंतु हा निर्णय राजकीय कारणाकरिता केला आहे, हा आरोप यशवंतरावांनी अमान्य केला. त्याची कारणमीमांसाहि त्यांनी त्या वेळीं केली. त्यांनी असं स्पष्ट केलं की, हा निर्णय केला याच्यामागे इतिहास आहे. निर्णय राजकीय कारणाकरिता केला किंवा निवडणुकांच्या संदर्भात हा एक तात्पुरता डाव आहे, हें खरं नाही. या प्रश्नामागचं आपलं मानसिक दुःख बऱ्याच वर्षांचं आहे. स्वातंत्र्य-चळवळींत काम करतांना आम्हांला एक कायमचं दुःख होतं की, सामाजिक न्याय, सामाजिक समता यासाठी आम्ही लढत आहोंत, असा आमचा दावा असतांना, डॉ. आंबेडकर यांच्यासारखा बुद्धिमान् आणि महात्मा फुले यांचं प्रतीक असलेला हा नेता या चळवळीपासून दूर आहे! अर्थात् याला राजकीय कारणंहि होतीं; पण ते दूर राहिले हें खरं. दुःख याचं होतं की, महात्मा फुले यांचे संस्कार मनावर असलेलीं आम्ही माणसं, डॉ. आंबेडकर यांना चळवळींत सामील करून घेत नाही! गावांतला एक भाग स्वातंत्र्य-चळवळीच्या पलीकडेच असायचा. त्यांच्यापर्यंत हाक पोंचत नव्हती. अपुरेपणाची ही मोठी दरी नाहीशी करावी या एकमेव जाणिवेनं या समाजाला जवळ घेण्याची आवश्यकता आहे.

यशवंतराव सत्तेंत आल्यानंतर हरिजन मंडळी त्यांच्या संपर्कात येत राहिली आणि यशवंतरावहि आपण त्यांच्यापैकीच एक, या भावनेनं त्यांच्या प्रश्नांकडे पाहूं लागले. काँग्रेसपक्षीयांच्या सद्‌हेतूबद्दलच हरिजनांच्या मनांत संशय होता. परंतु त्यांचे नेते आणि स्वतः यशवंतराव यांच्यांत जेव्हा संवाद सुरू झाला, विचारांचं दळणवळण निर्माण झालं, यशवंतराव आपल्या प्रश्नांचा सहानुभूतीनं विचार करत आहेत असं त्यांना आढळलं, त्या वेळीं ही मंडळी त्यांना आपल्यांतलाच एक असं मानूं लागलीं.

यशवंतरावांना त्यांच्याशीं कांही सौदा करायचा नव्हता. त्यांनी आपली ही भूमिका सुरुवातीलाच स्पष्ट केली की, "काँग्रेस-पक्ष हा जनतेचा पक्ष असं म्हणणारे आम्ही कार्यकर्ते. रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते हेहि जनतेचेच कार्यकर्ते; परंतु सत्तेंत असलेल्या काँग्रेस-कार्यकर्त्यांनी, सत्तेंत असतांना, हरिजनांबद्दल जिव्हाळ्यानं, मैत्रीनं, समजूतदारपणानं काम केलं, तर झिरपत झिरपत हें सर्व समाजापर्यंत पोंचेल आणि सामाजिक विषमतेची दरी तेवढ्या प्रमाणांत कमी होईल. सामाजिक विषमता कमी होण्याची खरी कसोटी गाव हें आहे. अस्पृश्येतर मंडळी मुंबईसारख्या शहरांत कशी वागतात हें तर महत्त्वाचं आहेच, पण या प्रश्नाचं मूळ 'गाव' हें आहे. तिथली विषमता दूर करण्याचा प्रयत्न सातत्यानं केला पाहिजे आणि त्याचा पडताळा दैनंदिन आचरणांत यायला पाहिजे."

महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर यशवंतरावांनी या प्रश्नाकडे आवर्जून लक्ष दिलं याला पूर्वीचा एक प्रसंग कारणीभूत होता. १९३८ च्या सुमारास बी. ए. उत्तीर्ण झाल्यानंतर यशवंतराव पुण्याला आले होते. काँग्रेसचं पहिलं मंत्रिमंडळ त्या वेळीं अस्तित्वांत येऊन बाळासाहेब खेर हे मुख्य मंत्री बनले होते. पुण्यांतल्या कौन्सिलहॉलमध्ये त्या वेळीं विधानसभेच्या बैठकी होत असत. एके दिवशीं हरिजनांनी महार-वतनाविरुद्ध मोर्चा काढण्याचं ठरवलं. मोर्चा घेऊन ही मंडळी कौन्सिलहॉलवर गेली. यशवंतरावांची श्रद्धा मनानं हरिजनांच्या बाजूला असल्यामुळे मोर्चा पहाण्यासाठी म्हणून तेहि त्या दिवशीं कौन्सिलहॉलवर गेले. मोर्चा आल्यानंतर मुख्य मंत्री खेर हे मोर्चाला भेटण्यासाठी आले आणि 'पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा' अशा शब्दांत त्यांनी हरिजनांचं स्वागत केलं.

पुंडलिक, परब्रह्म वगैरे वगैरे शब्द बाळासाहेब खेर यांनी उच्चारले हें सर्व ठीक होतं. परंतु हरिजनांच्या मूळ प्रश्नाचा ज्या सहानुभूतीनं, आपुलकीनं विचार करायचा होता तो तसाच राहिला. यशवंतरावांच्या मनांत त्या वेळेपासूनच ही गोष्ट खटकत राहिली. संयुक्त महाराष्ट्र घडला आणि महाराष्ट्राचा नवा चेहरा निर्माण करायचा, भंगलेलीं मनं सांधायचीं, मूर्ति दुरुस्त करायची या कामास त्यांनी प्रारंभ करतांच त्यांचे जुने संस्कार, विचार, काम करूं लागले आणि त्यांतूनच रिपब्लिकन पक्षाला जवळ करून, त्यांना सत्तेंत भागीदारी देऊन प्रतिष्ठा मिळवून देण्याचे निर्णय त्यांनी केले.

विरोधकांनी त्याचा अर्थ 'राजकीय डाव' असा करणं हें त्यांच्या दृष्टीनं सोयीचं होतं; परंतु यशवंतरावांवर लहानपणापासून झालेल्या संस्काराचा तो निर्णय होता हेंहि

तितकंच खरं. तसं नसतं तर, जिल्हा-परिषदा स्थापन झाल्यानंतर पुढे तीन-चार वर्षांनंतर त्यांनी जो एक विचार बोलून दाखवला तो तसा दाखवला नसता. पुणें जिल्हा-परिषदेच्याच एका समारंभांत बोलतांना त्यांनी जिल्हा-परिषदांना अशी जाणीव दिली की, विकासाच्या शासनाचं काम जनतेंत जाऊन करण्याची जबाबदारी ही जिल्हा-परिषदांची आहे. समाजांतील सर्व थरांना जिल्हा-परिषदांमार्फत होणाऱ्या विकासाच्या कामांचा लाभ मिळाला पाहिजे. परंतु एखाद्या गावांत मी जेव्हा आजहि प्रवेश करतों तेव्हा गावाबाहेर मला पूर्वीचाच महारवाडा दिसतो. महारवाडा हा महारवाड्याच्या स्थितींत जोंपर्यंत गावाबाहेर आहे तोंपर्यंत महाराष्ट्रांत जिल्हा-परिषदांचं काम सुरू आहे आणि गावापर्यंत तें पोंचलं आहे असं म्हणतां येणार नाही.

वयाच्या विसाव्या वर्षांत, महर्षि शिंदे आणि मातोश्री यांच्या सहवासांत मनावर झालेले संस्कारच अशा प्रकारे प्रसंगीं बोलके होतात आणि संधि मिळतांच कृतीहि करूं लागतात. यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वांत जों जों खोलवर डोकवावं तों तों संस्कारांचा बगीचा असा टप्प्या-टप्प्यावर फुललेलाच दिसतो.

या बगीचाची लागवड त्यांच्या मातोश्रींच्या हातानं प्रामुख्यानं झाली. संस्कारांचं बीजारोपण त्यांनी केलं. प्रेमाचं सिंचन केलं आणि अविचारांचे तण माजणार नाही याची काळजी घेतली. अक्का नशीबवान तर खऱ्याच. उत्तर आयुष्यांत नशिबानं त्यांना साथ दिली. त्यांची कूस धन्य ठरली. त्यांचा बाळ यशवंत हा मंत्री, मुख्य मंत्री, देशाचा संरक्षणमंत्री झाल्याचं त्यांनी पाहिलं; परंतु या सगळ्याचा अर्थ आपला मुलगा कुणी तरी मोठा झाला एवढंच त्यांना उमजलं !

देवराष्ट्र गावांतील साधीभोळी अक्का वृद्धापकाळीं, मुंबईत अवाढव्य शहरांत पोंचली, 'सह्याद्रि'सारख्या महालांत राहिली, पण त्या साऱ्या ऐश्वर्याचा भौतिक अर्थ अक्कांना कधीच कळला नाही. अक्का या अखेरपर्यंत साध्याभोळ्या अक्काच राहिल्या. स्वतंत्र भारतांतील मान-पान, मोठेपणा, ऐश्वर्य यांचा त्यांच्या मनाला कधी स्पर्शच झाला नाही. देवराष्ट्र, कराड गावचा एखादा माणूस आणि मुंबईची कोणी भली मोठी असामी त्यांना सारखीच होती. मातेच्या ममतेनंच त्यांनी सर्वांकडे पाहिलं.

अक्कांच्या साध्याभोळ्या मनाची प्रचीति एकदा कराड मुक्कामीं आली. यशवंतराव त्या वेळीं मुख्य मंत्री बनून मुंबईत कारभार पहात होते; आणि अक्का, मोठी सून व लहान नातवंडं यांच्यासह कराडला होत्या. श्रीप्रकाश हे त्या वेळीं मुंबई राज्याचे राज्यपाल होते. कराडजवळ कोयना प्रकल्पाचं काम सुरू असल्यामुळे राज्यपालांनी कोयनेला भेट देण्याचा एक कार्यक्रम मुक्रर केला. यशवंतरावांची आणि श्रीप्रकाश यांची मसलत झाली आणि कार्यक्रम निश्चित झाला. मुंबईत 'सह्याद्रीं'त वास्तव्य करून असलेल्या यशवंतरावांचं कराडमधील घर पहावं आणि त्यांच्या मातोश्रींना भेटावं असं श्रीप्रकाश यांनी ठरवलं.

परंतु ठरल्याप्रमाणे कोयना-भेटीसाठी निघण्याच्या वेळीं यशवंतरावांना मुंबईत कांही महत्त्वाचं काम निघाल्यानं त्यांना श्रीप्रकाश यांच्यासमवेतची कोयना-भेट रद्द करावी लागली. श्रीप्रकाश यांना जेव्हा तें समजलं त्या वेळीं ते मोठे निराश झाले. त्यांची कोयना-भेट होणार होती, परंतु यशवंतरावांच्या कराडमधील घराची भेट रद्द करावी लागणार होती. त्यांनी तसं यशवंतरावांना सांगितलंहि. परंतु यशवंतरावांनी त्यांना उलट प्रोत्साहन दिलं की, माझ्या घरीं जरूर जा, मातोश्री तिथेच आहेत. त्यांचीहि भेट होईल.

कोयना-भेट संपवून मग श्रीप्रकाश हे ठरल्याप्रमाणे कराडला यशवंतरावांच्या घरीं गले. घरीं अक्का होत्या, त्यांचा भाचा शामराव पवार हे होते. नातु होते. शामरावांनी राज्यपालांसाठी चहाची वगैरे व्यवस्था केली. राज्यपाल घरीं पोंचले, चहा घेतला, तें छोटंसं माळवदी घर पाहिलं, अक्कांना कुशल विचारलं. राज्यपालांची भेट म्हटल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांचा ताफा हजरच होता.

राज्यपाल थोडा वेळ थांबल्यानंतर परत जाण्यासाठी निघाले तेव्हा अक्का बसल्या होत्या त्यांच्यासमोर गेले आणि नमस्कार करून आशीर्वाद मागितला. अक्कांनी आशीर्वाद दिला आणि त्याच वेळीं, कंबरेला खोवलेला लहानसा बटवा काढून, त्यांतील आठ आणे, राज्यपाल श्रीप्रकाश यांच्या हातावर ठेवले !

अक्कांनी बटव्यांत हात घातला तेव्हा जवळच उभा असलेला त्यांचा भाचा शामराव मात्र मनांतून चरकला. मुलं कुठे गावाला निघालीं की हातांत आणा-दोन आणे त्या ठेवत असत. शामरावला तें माहिती होतं. त्यांनी अक्कांना थांबवण्याचा प्रयत्न केला, परंतु अक्कांनी त्यालाच दटावलं. म्हणाल्या, "मुंबईला लांबपर्यंत जायचंय्, असं दे, मुलांना खाऊ घेऊन जातील." आणि अक्कांनी श्रीप्रकाशांना आठ आणे दिले. श्रीप्रकाश यांनीहि त्याचा अत्यंत आदरानं स्वीकार केला आणि पुन्हा एकदा नमस्कार केला. अशा या अक्का ! मनानं भोळ्या, निर्व्याज प्रेम करणाऱ्या, सर्वांकडे मातेच्या मनानं पहाणाऱ्या ! सागरोबाच्या कृपेनं त्यांनी 'यशवंत'ला जन्म दिला, जन्मभर प्रेमाश्रूंनी न्हाऊं घातला, त्याच्या जीवनाचा बगीचा फुलवला. फळाफुलाला आलेला पाहिला आणि आपल्या सुनेच्या हातीं, सौ. वेणूताईच्या हातीं त्या बागेची जोपासना करण्याचं सोपवून त्या निघून गेल्या.

जीवनाची अखेरी 'यशवंत'च्या मांडीवर मान ठेवूनच व्हावी अशी या श्रद्धाळु माउलीची इच्छा होती; परंतु नियतीची योजना तशी नव्हती. मुख्यमंत्रिपद सोडून यशवंतराव मुंबईहून दिल्लीला जाण्यास निघाले तेव्हा त्यांनी अक्कांचा आशीर्वाद घेतला. आशीर्वाद देतांना "मी तर आता थकले ... अन् तूं आता लांब निघालास ... अखेरीच्या वेळीं माझ्याजवळ ... " असंच कांहीसं ती माऊली भरल्या नेत्रानं म्हणाली.

यशवंतराव दिल्लीला आले आणि पुढे पाकिस्तानबरोबरचे युद्धाचे ढग जमले. अक्का मुंबईत आजारी होत्या, पण यशवंतराव युद्धाच्या कामांत व्यग्र होते. दिल्ली सोडतां येणं

शक्य नव्हतं. आणि एक दिवस दिल्लींतला त्यांचा फोन रात्रीं खणखणला. अक्का ... यशवंतरावांना अखेर अंत्यदर्शनच घडलं. १९ ऑगस्ट १९६५ या दिवशीं अक्का समाधानानं सागरोबाकडे गेल्या.

अक्कांच्या अस्थि यशवंतरावांनी मग अलाहाबादला जाऊन गंगार्पण केल्या. त्या वेळीं सागरोबाकडे – महादेवाकडे गेलेल्या अक्कांचं दर्शन त्यांना पुन्हा एकदा घडलं. गंगेच्या रूपानं ... अखेरचं ! त्यांनी मनावर घडवलेले संस्कार तेवढे मागे राहिले.

अक्का गेल्या, पण जातांना आपल्या मनाच्या मोठेपणाचं भांडार आपल्या सुनेजवळ, सौ. वेणूताईजवळ रितं करून गेल्या. त्यांच्या मनाचा, मानवी व्यवहाराचा मोठेपणा यशवंतरावांनी अगोदर संग्रहीत केलेलाच होता. उरलासुरला विशेषतः संसारी व्यवहाराच्या मनाचा मोठेपणा अक्कांनी सौ. वेणूताईच्या स्वाधीन केला.

फलटण येथील मोरे यांच्या सुखी घरांतून १९४२ च्या जून महिन्यांत सौ. वेणूताईंनी चव्हाणांच्या घरांत सून म्हणून गृहप्रवेश केला होता. तरुण यशवंतराव हे त्या काळांत वारे प्यालेले देशभक्त होते. पत्नी सौ. वेणूताई कराडांत घरीं होत्या, पण यशवंतरावांचं घर हें संपूर्ण सातारा जिल्हा होतं. चर्चा, खलबतं, सभा, सायकल, मोटार-सायकलवरून या गावाहून त्या गावाला जाणं-येणं हा रोजचा खाक्या. उरल्यासुरल्या वेळांत वाचन, टीका-टिप्पणी.

विवाहापूर्वी यशवंतराव नुकतेच वकील झाले होते, पण वकिली-धंद्याकडे पहायला फुरसत नव्हती. यशवंतरावांचा संसार हा देशभक्ताचा संसार होता. स्वातंत्र्यपूर्व काळांतील देशभक्तांच्या संसाराचा प्रमुख आधार म्हणजे त्याग. घरांत संपत्ति असायची ती विचारांची. सौ. वेणूताईंनी देशभक्ताच्या संसारांत प्रवेश केला होता, परिस्थितीच्या पूर्ण जाणिवेनंच केलेला होता; परंतु वैचारिक जाणीव वेगळी आणि त्या वस्तुस्थितीचा जीवनांत प्रत्यक्ष अनुभव घेणं वेगळं. डोंगर दुरून साजरे दिसतात. मनाला आनंद देतात; पण डोंगर चढून शिखर गाठायचं तर दमछाक होते, घामानं ओलंचिंब व्हावं लागतं. तेंच सौ. वेणूताईच्या बाबतींत घडलं.

जून महिन्यांत विवाह होऊन वेणूताई सौभाग्यवती झाल्या आणि त्याच वर्षाच्या ऑगस्टपासून, विवाहानंतर दोन-अडीच महिन्यांतच देशभक्ताच्या संसाराचा चढ चढून जाण्याचे जिकिरीचे दिवस सुरू झाले. 'छोडो भारत'च्या चळवळींत सौ. वेणूताईचं सौभाग्य गुरफटलं. हळूहळू वावटळ वाढत राहिली आणि यशवंतराव अदृश्य झाले. कुठे तरी रानोमाळ, दरी-डोंगरांत या गावांतून त्या गावांत यशवंतराव फिरत राहिले होते. सुखरूप आहेत, हें आईला आणि पत्नीला समजावं एवढ्यापुरतं केव्हा तरी गुपचूप घरीं येऊन जात तेवढाच काय तो दिलासा.

विवाहानंतरचीं दहा वर्षे सौ. वेणूताईंनी कौटुंबिक संकटांशीं सामना करण्यांतच घालवलीं. थोरले दीर गणपतराव यांचा तुरुंगवास, यशवंतरावांचा भूमिगत संचार, नंतर गणपतरावांचं गंभीर आजारपण, स्वतः सौ. वेणूताईचा तितकाच गंभीर आजार,

जाऊबाईंचं आजारपण, गणपतरावांचीं घरांत चार लहान मुलं, सासूबाई वृद्धत्वाकडे वळलेल्या, आर्थिक दुरवस्था या सर्वांतून त्यांची संसारी वाटचाल सुरू राहिली. सर्व प्रकारच्या संकटांनी जणू कांही त्यांचंच घर मुक्कामासाठी निवडलं होतं. संसारांतूनच केवळ नव्हे, तर या जगांतून मनानं उडून जावं अशा मानसिक आणि शारीरीक यातनांचा तो काळ! अग्निपरीक्षेचा काळ! सर्वच साध्वी स्त्रियांना अनाकलनीय परिस्थितीच्या दिव्यांतून तावूनसुलाखून काढायचं असा जणू नियतीचा संकेतच असावा. सौ. वेणूताई नियतीच्या या कसोटीला पूर्णपणें उतरल्या. ही कसोटी दुहेरी होती. संसाराची आणि पतीच्या देशभक्तीला साथ देण्याची !

देशभक्त आणि नेते यशवंतराव यांना सौ. वेणूताईंनी मोठी दर्जेदार साथ अखंडपणें दिली आहे. यशवंतरावांच्या कर्तृत्वांत, संस्कारांत त्यांच्या मातोश्रींचा जेवढा महत्त्वाचा वांटा आहे, तितकाच मोठा वांटा पत्नी सौ. वेणूताईंचा आहे. चव्हाणांच्या कुटुंबांत प्रवेश केल्यापासून त्यांनी अत्यंत अडचणीचे, संकटाचे दिवस पाहिले तसे अत्यंत सुखाचे दिवसहि पाहिले. परंतु या दोन्ही अवस्थेंत सौ. वेणूताई समतोल मनानं खंबीर राहिल्या. मनुष्यस्वभावाची त्यांना उत्तम पारख. त्यांना कशाचा मोह नाही. मोठेपणा मिरवण्याची हौस नाही, इच्छा नाही, त्याचं आकर्षणहि नाही. घरांत रोज राजकारण सुरू असलं तरी राजकारणांतली परिभाषा कधी बोलणार नाहीत. देशभक्ताचा संसारच करत असल्यामुळे परिस्थितीचा अंदाज मात्र अचूक. यशवंतरावांच्या – पतीच्या जीवनाशीं समरस होऊन, एकरूप होऊन, पण पाठीमागे राहून दर्जेदारपणानं संसार करणाऱ्या आदर्श गृहिणी, अशीच त्यांची प्रतिमा त्यांनी निर्माण केलेली आहे.

त्यांचं दैनंदिन जीवन बाहेरून दिसतं; परंतु आंतरजीवनाचा मामला वेगळा असतो. मन कांही रचना करत असतं, मोडतोडहि करत असतं. प्रत्येक माणसाच्या अंतरंगांत हा खेळ सुरूच असतो. परंतु आंतल्या जीवनाचा खेळ कांही कांही वेळा बाहेरच्या जीवनांत दिसतो. अर्थात् त्यालाहि मर्यादा असते. मनाच्या सर्वच हालचाली दिसत नाहीत. त्या जाणून घ्याव्या लागतात.

यशवंतरावांच्या त्या दर्जेदार सहचारिणी आहेत. सल्लागारहि आहेत, यशवंतरावांचे सर्व गुण, सर्व दोष माहिती असलेल्या त्या एकमेव आहेत. यशवंतरावांच्या मनाचे व्यवहार त्या जाणतात, परंतु त्यांच्या स्वतःच्या मनाचा थांगपत्ता इतरांना लागेल याची शाश्वति नसते. प्रकृति हा एक त्यांचा मोठा प्रश्न आहे. त्यांचं मन यशवंतरावांना स्वतःच समजून घ्यावं लागतं. सौ. वेणूताईंकडून कधी कसल्या दुःखाची वाच्यता होणं कठीण. जीवनांत त्यांनी खूप सहन केलं आहे. आपल्या पतीनंहि पुष्कळ सहन केलं आहे आणि करावं लागत आहे याची त्यांना जाण आहे. त्यामुळे आपल्या दुःखाचा उच्चार करून त्यांत भर घालण्याचं त्यांनी नेहमीच टाळलं. या दांपत्याला परमनप्रवेशाची विद्या मात्र अवगत असली पाहिजे. कशाचा उच्चार न करतां ते एकमेकांना

तर मनोमन जाणतातच. शिवाय समोरच्या अन्य माणसाच्या मनांतील भाव-भावनेचा, हालचालींचा मागोवा घेण्याचं या उभयतांचं कसब मोठं आहे.

दीर आणि जाऊबाई निवर्तल्यानंतर त्यांच्या सर्व लहान मुलांचं संगोपन सौ. वेणूबाई आणि अक्का – त्यांच्या सासूबाई – यांनीच केलं. त्यांचं शिक्षण केलं, लग्नकार्ये केलीं, संसार उभे करून दिले आणि मातेच्या ममतेनं देखरेखहि केली. गणपतरावांच्या मुलांचा आणि ज्ञानोबाचे मुलगे प्रताप, शिवाजी यांचा सांभाळ त्यांनीच केला. सौ. वेणूताईंनी १९४७ सालीं एका अपत्याला जन्म दिला, परंतु तें बालक अल्पायुषी ठरलं. पुढच्या काळांत त्यांची स्वतःचीच प्रकृति ढासळली. परंतु मनांतली आईची माया त्यांनी दिराच्या मुलांना दिली. दिल्लींतलं वेणूबाईंचं निवासस्थान मुला-बाळांनी भरलेलं असतं. त्यांच्या नातेवाईकांचीं मुलं असतील, सेवकांचीं असतील. पण त्यांच्यासाठी घराचे सारे दरवाजे खुले असतात. घरांत येणारीं मोठीं माणसं अदबीनं, अंग चोरून येतात-जातात. परंतु मुलांच्या आट्यापाट्या मात्र अखंड सुरू रहातात. सौ. वेणूताईंच्या अवतींभवतीं बागडतांना मुलांना कांही परकं वाटत नाही. दुसऱ्याच्या सुखांत आपलं सुख मानण्यासाठी मन मोठं असावं लागतं हेंच खरं. दुसऱ्याचं सुख पहाण्यांतच खरं समाधान असतं हें तिथला परिवार पाहिला म्हणजे लक्षांत येतं.

यशवंतरावांचा वृक्ष बहरला याचं फार मोठं श्रेय त्यांच्या मातोश्रींप्रमाणे त्यांच्या पत्नीला – सौ. वेणूताईंनाहि आहे. आपला संसार त्यांनी नेटका केलाच, परमार्थ आणि विवेकहि साध्य केला, शिवाय जवळचे नातेवाईक, सेवक यांच्या संसाराची आणि सुखा-समाधानाचीहि आपुलकीनं, पण दर्जेदारपणा कायम राखून काळजी वाहिली. सौ. वेणूताई स्वतः धार्मिक वृत्तीच्या, श्रद्धाळु आहेत. पूजा-प्रार्थना-दर्शन यांत त्या आनंद मानतात. पण हें सर्व बंद खोलींत – देवघरांत असतं. परिस्थिति, मग ती राजकीय असो वा संसारी – अचूक अंदाज हें त्यांचं वैशिष्ट्य आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी १९६२ सालीं यशवंतरावांना फोनवरून दिल्लीला येण्याविषयी खाजगी आणि अत्यंत गुप्त मनोदय व्यक्त केल्यानंतर यशवंतरावांनी त्याबद्दल सौ. वेणूताईंचा सल्ला घेतला. त्यांनी कोणता सल्ला दिला हें अर्थात् त्या दोघांनाच माहिती असणार; परंतु सौ. वेणूताई या यशवंतरावांच्या सल्लागारहि आहेत एवढंच ही घटना दर्शवते.

यशवंतराव राजकारणांत मनानं खंबीर, पण संसारकारणांत मनानं हळवे आहेत. कुणाबरोबर घरगुती चर्चा करतांना सौ. वेणूताईंचा उल्लेख निघाला तर त्यांचं मन गलबलतं. ते एवढंच सांगतात, 'त्यांनी फार सहन केलं – मागे राहून दर्जेदार साथ दिली. बस्स !' उभयतांमधील असा हा सुखद ओलावा.

यशवंतरावांचं व्यक्तिमत्त्व सातत्यानं फुलत राहील याची चिंता वाहणारी आणि त्यांच्या संगतींत सतत असणारी आणखी एक दर्जेदार व्यक्ति – शक्ति म्हणजे श्रीपाद डोंगरे. बहुतेक वेळा दृश्य स्वरूपांत तर कधी अदृश्यपणें ते वावरतात.

डोंगरे हे यशवंतरावांचे खाजगी चिटणीस; परंतु हा फक्त हुद्दा आहे. यशवंतरावांच्या जीवनांत डोंगरे हे खाजगी चिटणीसपदाच्या पलीकडे आणखी आंत, त्यांच्या अंतःकरणापर्यंत पोंचलेले गृहस्थ आहेत. मंत्री आणि नोकर असा संबंध ओलांडून त्या पलीकडे ते पोंचले ते विश्वास, निरलसता, निर्लोभी स्वभाव आणि माणसांची, त्यांच्या स्वभावाची, हेतूची अचूक पारख या गुणांमुळेच होय!

मुंबइ विशाल द्वैभाषिक राज्याचं मुख्यमंत्रिपद १९५६ मध्ये यशवंतरावांनी स्वीकारलं; आणि डोंगरे हे त्यांच्याकडे खाजगी चिटणीस म्हणून रुजू झाले. त्या वेळीं हें मुख्यमंत्रिपद फक्त सहा महिन्यांपुरतंच होतं. कारण १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुका लगोलग होणार होत्या. यशवंतराव त्या वेळीं 'सह्याद्रि'वर रहाण्यासाठी गेलेले होते. डोंगरे हे रुजू होतांच यशवंतरावांनी त्यांना 'सह्याद्रि'मध्येच मुक्कामासाठी येण्यास सांगितलं. मुख्य मंत्र्यांची आज्ञा त्यांना मान्य होती. यशवंतराव, एकदा जवळ केलेल्या माणसाला सोडत नाहीत हें त्यांना माहिती होतं; आणि घडलंहि तसंच!

१९५६ सालीं यशवंतराव व डोंगरे एकत्र आले ते पुढे कायमच एकजीव बनून राहिले. मुंबई सोडून यशवंतराव दिल्लीला पोंचले. डोंगरेहि दिल्लीमध्ये दाखल झाले. माणसाला सोडायचं नाही ही यशवंतरावांच्या बाबतींत वस्तुस्थिति आहे. डोंगरे हे तर त्यांचे खाजगी चिटणीस. पण अन्य काम पहाणारे, खांडेकर, जोशी ही मंडळीहि मुंबईपासून दिल्लीपर्यंत त्यांच्याबरोबर राहिली आहेत. मंत्र्यांचे सेक्रेटरी म्हणून जे आय्. ए. एस्. दर्जाचे अधिकारी वेळोवेळीं रुजू झाले त्यांना मात्र नियमाप्रमाणे ठराविक मुदतीनंतर सरकार नेमून देईल त्या जागेवर जावं लागलं. ब्रह्मे, व्ही. प्रभाकर, माणेकजी, प्रधान, केळकर, गोडबोले, उपासनी असे कांही सेक्रेटरी यशवंतरावांच्या मंत्रिपदाच्या कारकीर्दीत त्यांच्याकडे रुजू होऊन गेले. हे सर्व आपापल्या परीनं आता नांवलौकिकास चढले आहेत. परराष्ट्र-व्यवहारखात्याचीं सूत्रं त्यांनी स्वीकारलीं त्या वेळीं शरद काळे हे त्यांच्याकडे सेक्रेटरी म्हणून रुजू झाले. सरकारी नियमानुसार ज्यांना अन्यत्र जावं लागलं ते अधिकारी वगळतां यशवंतरावांचा अन्य सेवकवर्ग, अगदी शिपायापर्यंत कायमचाच राहिला. सहवासांत आलेल्या माणसाला सोडायचं नाही हें व्रत कायमच राहिलेलं आढळतं. त्यांच्याकडे असलेला शेख सरवार इस्माइल हा तरुणहि ते मंत्री असल्यापासून त्यांच्याबरोबर आहे.

या सर्वांमध्ये डोंगरे हे मात्र स्वतः यशवंतरावांचं जीवन आणि त्यांचं एकूण कुटुंब यांची छाया बनलेले आहेत. कोणत्याहि अडीअडचणींत ते यशवंतरावांच्या पाठीशीं भाऊ या नात्यानं उभे असलेले आढळतात. परस्परांचा एकमेकांवर जबरदस्त विश्वास. यशवंतरावांचा स्वभाव, त्यांच्यांतील गुण, दोष, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची प्रकृति, आजार, मनांतले व्यापार यांची सौ. वेणूताई यांच्याव्यतिरिक्त संपूर्ण माहिती असलेले गृहस्थ म्हणजे श्रीपाद डोंगरे!

यशवंतरावांच्या सान्निध्यांत राजकीय, सामाजिक आणि अन्य विविध क्षेत्रांतील माणसांचा ओघ अव्याहत सुरूच असतो. परंतु कुणाचा स्वभाव कसा आहे, फरक काय आहे, कोणत्यां माणसाचे संबंध कसे आहेत, कोण कसा आहे याची यच्चयावत् माहिती डोंगरे यांच्या संग्रहीं असतेच. माणसांना सांभाळण्याचं काम ते यशवंतरावांच्या संगतींत राहून १९५६ पासून अव्याहत करत आहेत. दिल्लींतले आणि देशाच्या निरनिराळ्या राज्यांतले अनेकजण यशवंतरावांना भेटत असतात. कुणाचा हेतु सुप्त, तर कुणाचा उघड. परंतु यांतील बहुतेकांची नाडी डोंगरे यांना माहिती असते. मंत्र्यांचं भेटण्याचं वेळापत्रक त्यानुसारच तयार होतं. सहसा भेटीसाठी ते कुणास नाकारणार नाहीत. परंतु भेटीसाठी बंगल्यावर येऊनहि फक्त डोंगरे यांच्याशीं बोलूनच त्यांतील कांहीजण परत जातात!

मंत्र्यांची भेट होणार नाही अशा हुकमी आवाजांत ते कुणाला ऐकवणार नाहीत. पण कोणाची धांवती भेट, उभ्या-उभ्या भेट, निवान्त भेट याचं गणितहि केलेलं असतं. भेट नाकारल्याच्या निराशेनं कुणी परतणार नाही याची तर काळजी असतेच, पण इतरहि अवधान कायम असतं. डोंगरे हे जर पुढेमागे कधी यशवंतरावांचं चरित्र लिहितील, आठवणी निवेदन करतील तर यशवंतरावांनी स्वतः आत्मचरित्र लिहिण्यांत आणि त्यांत नितान्त एकरूपताच आढळेल. परंतु, तूर्तास हें होणं नाही. यशवंतराव स्वतः जसे घट्ट ओठाचे नेते तसेच श्रीपाद डोंगरे! माणसं दोन, पण मन एक. मंत्र्याच्या हातीं सत्ता असते आणि सभोंवतालची मंडळी ही त्या सत्तेच्या सान्निध्यांत असतात. सत्तेचा दुर्गुण सर्वांवरच परिणाम घडवून आणूं शकतो. परंतु ज्याच्या हातीं खऱ्या अर्थानं सत्ता असते, त्याला ती कशासाठी, कोणत्या हेतूसाठी वापरायची, सत्तेचा उपयोग सामाजिक कल्याणासाठीच करायचा असा विवेक पाळतां आला, तर सत्तेच्या सान्निध्यांत असणारावरहि तीच प्रतिमा उमटते. सत्तेचा रथ मग योग्य दिशेनं वाटचाल करत रहातो. परंतु असं घडायचं तर समसमा संयोग होण्याची गरज असते. चव्हाण व डोंगरे हा असाच समसमा संयोग आहे.

डोंगरे पाठीमागे असतात, छाया बनून चालत असतात; परंतु ज्यांची छाया बनायचं आणि चालत रहायचं ती व्यक्ति निकोप राहील, मोठी होईल याचीहि काळजी करावीच लागते. डोंगरे ते करत राहिले; आणि लोकांना असं दिसलं की, व्यक्ति मोठी झाली आणि छायाहि मोठी ठरली. डोंगरे यांच्याबद्दल यशवंतरावांना कुणीं विचारलं

तर ते सांगतात – ‘भावासारखे आहेत.’ एवढंच! व्यक्तिमत्त्वांतला असा हा ऋणानुबंध – दृष्ट लागण्यासारखा!

यशवंतराव तरुण वयापासून त्यागाचं जीवन जगले आणि मगच राष्ट्रासाठी त्याग करण्याची शिकवण त्यांनी इतरांना दिली. संपत्ति, सत्ता आणि कीर्ति या तीन शक्ति जगांतील मोठमोठ्या कर्तबगार पुरुषांना वश करण्यांत यशस्वी ठरतात, पण यशवंतरावांनी फाजील वासनेचं बीज मुळांतच खुडून टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांच्या ते कधी आधीनं झाले नाहीत.

यशवंतरावांना प्रवासाची आवड प्रथमपासूनच असल्यानं प्रारंभींच्या काळांत तालुका आणि जिल्ह्याच्या क्षेत्रापुरता त्यांनी प्रवास चालू ठेवला. पुढे पुढे हें क्षेत्र अन्य जिल्ह्यापर्यंत आणि नंतर संपूर्ण मुंबई राज्यापर्यंत पसरलं. दिल्लीला संरक्षणमंत्रिपदावर दाखल झाल्यापासून संपूर्ण भारत-भ्रमण सुरू झालं आणि लवकरच त्यांनी जागतिक प्रवासासाठीहि प्रस्थान ठेवलं. पुढे तर दिल्लींतल्या मुक्कामांत त्यांची संपूर्ण पृथ्वीप्रदक्षिणा झाली. या सर्व प्रवासामध्ये त्यांना तत्कालीन समाज-जीवन उत्तम रीतीनं पाहायला सापडलं. मुळांत त्यांची दृष्टि मूलगामी, व्यापक आणि सूक्ष्म असल्यानं निरनिराळ्या राष्ट्रांतील जनतेची अवस्था लक्षांत येण्याला त्यांना वेळ लागला नाही.

समाजांतील श्रीमंत, पुढारी, सत्ताधारी यांच्यांतील अनेकजण स्वार्थी व विषय-लोलुप बनलेले आहेत हेंहि त्यांनी पाहिलं आणि गरीब, अडाणी, सामान्य जनताहि पाहिली. त्यामुळे ते जातील तिथे गरीब व मध्यम स्थितींतल्या लोकांमध्ये अधिक मिसळले.

सर्वसामान्य लोकांकडे पहाण्याचा दृष्टिकोन त्यांनी असा ठेवला की, राजकारणांत आपण मोठे झालों, परंतु एका मनुष्यानं मोठं होऊन, पूर्णत्वाला जाऊन देशापुढचे प्रश्न सुटणारे नाहीत. त्यासाठी पुष्कळांनी मोठं व्हायला पाहिजे. निदान थोडं तरी मोठं बनलं पाहिजे. राजकारणांत, उद्योगांत, सहकारांत आणि अन्य विविध क्षेत्रांत अनेकांना त्यांनी या दृष्टिकोनांतून संधि उपलब्ध करून दिली. सहसा कोणाच्या गुणाचा कधी अव्हेर केला नाही. सान्निध्यांत आलेल्या प्रत्येकाला सुधारण्याचाच प्रयत्न केला. प्रत्येकाशीं संभाषण करून त्याला समाधान प्राप्त करून देण्यांत त्यांचीं वर्षोमागून वर्षे खर्ची पडलीं. अनेकांशीं त्यांनी व्यक्तिगत संबंध जोडला. तत्त्व कितीहि उच्च असलं तरी त्याची कसोटी त्या तत्त्वाच्या आचरणांतच लागते ही त्यांची भूमिका असल्यानं त्यांच्याकडे येणारे कुणी बुद्धिमान् तरुण असोत किंवा अडाणी, गरीब शेतकरी असोत, त्यांच्या दैनंदिन जीवनांत राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रप्रेम उतरलं पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

अक्षरशः हजारो लोक त्यांच्या संगतींत आले; परंतु मनुष्य एकदा भेटला तरी, त्याला पुन्हा पहातांच त्याला ते बरोबर नांवानं हाक मारतात आणि कुशल विचारतात. ऐकणाराहि त्यामुळे चकित होतो. एवढा मोठा माणूस, पण त्यानं आपलं नांव लक्षांत ठेवलं याचा आनंद अशा वेळीं त्या माणसाच्या मनांत जन्मभर टिकतो. आयुष्यभर त्यांनी

राष्ट्राचं अखंड चिंतन केलं आणि लोकांकडून तसं चिंतन करून घेण्याचा प्रयत्न केला. हें काम करत असतांना समाजांतील अनेक व्यक्तींकडून त्यांना त्रास सहन करावा लागला. कुणीं उपेक्षा केली, अवहेलना केली, कुणी त्यांच्या विचारांना तुच्छ समजले, तर कुणी विरोधाकरिता विरोध करीत राहिले. एका बाजूला अवास्तव स्तुति, तर एका बाजूला भरमसाट निंदा, असंहि सुरू राहिलं. राजकीय डावपेंचांत त्यांना कुणीं लबाड ठरवलं तर कुणीं सत्तालोलुप म्हटलं. म्हटलं तर आहे, म्हटलं तर नाही, अशा अधांतरीपणानं कुंपणावर बसून राजकारण करतात, असा आरोपहि कुणीं त्यांच्यावर केला. कुणीं दुरून त्यांच्याविषयी विनाकारण गैरसमज करून घेतला; परंतु प्रत्यक्ष परिचय होऊन निकट संबंध आला की यांच्याविषयी अनेकांचं मत बदलून गेलं.

असं असलं तरी या सर्व प्रकारच्या लोकांशीं यशवंतरावांचं स्वतःचं वागणं प्रेमळपणाचं आणि उदारतेचं राहिलं. स्तुति करणाराला खास प्रेमानं वागवलं असंहि नाही आणि भयंकर निंदा करणाराला कायमचा दूर ठेवला असंहि नाही. एखाद्या निंदकानं त्यांच्यावर जहरी टीकास्त्र सोडलं तरी ते अविचलित राहिले.

मुंबइत मुख्य मंत्री असतांना किंवा नंतर दिल्लीला गृहखात्याची जबाबदारी स्वीकारल्यावर समोरासमोर अनेकांनी वाग्बाण सोडून, त्यांना घायाळ करण्याचा प्रयत्न केला, परंतु अविचलित राहून ते वाग्बाण अगदी मृदु हातानं त्यांनी विरोधकांवरच परतवले आणि घायाळ होण्याची वेळ अखेर त्यांच्यावरच आली. वैयक्तिक शाब्दिक हल्ले होतात तेव्हा ते स्वस्थ रहातात; परंतु राष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आला किंवा राष्ट्राला अपायकारक असं कुणी कांही बोलूं लागला, तर मात्र यशवंतराव खवळून उठल्याशिवाय राहिले नाहीत. अशा वेळीं त्यांचं भाषासामर्थ्य, वादपटुत्व, विलक्षण राष्ट्रनिष्ठा याचीच प्रचीति ऐकणाराला येते.

देशासाठी, समाजाच्या भल्यासाठी, विरोधकांचे आर्जव करण्याची वेळ आली तरी त्यांनी मागेपुढे पाहिलं नाही. अनेकदा त्यांनी विरोधकांच्या गोटांत त्यांच्या पुढाऱ्यांकडे स्वतःच अनाहूतपणानं जाऊन सामाजिक स्वास्थ्य टिकवण्याचा प्रयत्न केल्याचीं उदाहरणं आहेत.

मुंबईला हुतात्मा स्मारकाच्या उद्‌घाटनास उपस्थित राहून एकदा विरोधकांना त्यांनी आश्चर्यचकित केलं. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळींत, मुंबईतील गोळीबारांत ज्यांना ठार करण्यांत आलं, त्यांचं एक स्मारक फ्लोराफाऊंटनच्या ठिकाणीं समितीच्या नेत्यांनी उभारलं. या स्मारकास उपस्थित रहाण्यासाठी त्यांना निमंत्रणपत्र अशा वेळीं पोंचवण्यांत आलं की, त्यासंबंधी विचार करण्यास फारसा अवधीच उरूं नये. पत्र पोंचलं त्यानंतर कांही क्षणांनीच उद्‌घाटनाचा कार्यक्रम व्हायचा होता.

क्षणाचाहि विलंब न लावतां यशवंतराव निघाले आणि फ्लोराफाऊंटनवरील समारंभाच्या ठिकाणीं दाखल झाले. त्यांना अचानक आलेले पहातांच सारेच चपापले.

यशवंतराव उपस्थित न रहाते, तर विरोधकांना टीकेसाठी तें भांडवल मिळणार होतं. प्रश्न महाराष्ट्राच्या भावनेचा होता; परंतु यशवंतरावांनी मुख्यमंत्रिपदाचा मोठेपणा, समारंभास उपस्थित रहाण्याच्या पद्धति वगैरे सर्व बाजूस ठेवून, स्वतः तिथे उपस्थित झाल्यानं विरोधकांची अपेक्षित भांडवलाची हवाच निघून गेली. समाजाच्या हिताचं जें जें कांही घडणार असेल त्यासाठी मानपान, प्रतिष्ठा, सत्ता या गोष्टी बाजूला ठेवून समाजहितालाच प्राथम्य देण्याच्या स्वभावामुळेच हें घडूं शकतं. झाल्या-गेल्याचा विसर आणि पुढच्याचा विचार, हा एक त्यांच्या स्वभावाचा विशेष आढळतो. जी गोष्ट होऊनच गेली तिच्याबद्दल चर्वितचर्वण करत बसण्यापेक्षा पुढे काय करावं याचा विचार करणंच ते पसंत करतात.

विविध भल्या गुणांचा संग्रह आणि त्यांची जोपासना करत रहाणाऱ्या या नेत्याला आपल्या सवयी आणि आवडीनिवडी सांभाळण्याच्या किंवा सोडण्याच्या बाबतींतहि आयुष्यभर कसरतीच कराव्या लागल्या.

राजकारणाच्या धकाधकींत सतत त्यांना वावरावं लागत असलं तरी त्यांचे कांही छंद आहेत. मनाला विरंगुळा देण्याचा माणसाचा प्रयत्न असतो, कांही विसावा म्हणूनहि तो हवा असतो.

यशवंतरावांचं कराडमधील घर हें कृष्णा-कोयनेच्या प्रीति-संगमाच्या सान्निध्यांत आहे. प्रीति-संगमावर बसून निवांतपणा मिळवावा, प्रीति-संगमांत डुंबावं असा लहानपणचा त्यांचा छंद पुढच्या काळांतहि मनांत डोकावत राहिला. नदीची भुरळ त्यांच्या मनांतून कधीच कमी झाली नाही. ते भारत-भ्रमण करूं लागले आणि पृथ्वीपर्यटनासाठी जात राहिले तरीहि, त्यांच्या मनांतली नदीची भुरळ कायमच राहिली आणि देशांतल्या व जगांतल्या मोठमोठ्या नद्यांच्या सान्निध्यांत उभं राहून तिथल्या निसर्गशोभेचा आनंद त्यांनी मिळवला.

काव्यानंदाचा त्यांचा असाच एक लहानपणापासूनचा छंद आहे. स्वतः काव्यं रचायचीं आणि कवींनी रचलेलीं काव्यं वाचण्यांत दंग होऊन जायचं, हा क्रम त्यांनी पुढच्या काळांतहि सुरू ठेवला. विद्यार्थिदशेंत असतांना, मेळ्यासाठी त्यांनी काव्यं रचलीं. लहानपणीं कराडांत त्यांनी भजनाचे अनेक फड जमवले. लोकनाट्याची मौज लुटली, कुस्त्या केल्या, कुस्त्यांचे फड पाहिले, क्रिकेटच्या टेस्ट मॅचेस पहाण्यांत दंग झाले आणि जुनीं नाटकं पाहून बालगंधर्व, केशवराव दाते, नानासाहेब फाटक यांच्यासारख्या कसलेल्या नटांच्या भूमिका आणि त्यांतलं कौशल्य मनांत साठवलं.

नाटकं पहाण्याचा आणि संगीताच्या मैफली ऐकण्याचा त्यांचा छंद हा पुढेहि कायम राहिला. मुंबईत, पुण्यांत आणि दिल्लींत नाटक पहाण्यासाठी आवर्जून वेळ काढण्याची खटपट त्यांनी केली. त्याचप्रमाणे लंडन, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, पॅरिस अशा पाश्चात्त्य जगांतील मोठ्या शहरांची सहल करतांनाहि इंग्रजी नाटकं पहाण्याची आणि त्यांतलं संगीत ऐकण्याची संधि साधली. मोठमोठ्या कलाकारांचं गायन ऐकणं म्हणजे

जीवनांतील आनंदाचा त्यांनी उच्चांक मानला. बडे गुलामअली खाँसाहेब, पं. भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, ज्योत्स्ना भोळे ह्यांच्यासारख्या सुप्रसिद्ध कलाकारांच्या गायनाच्या मैफली त्यांनी अनेकदा ऐकल्या.

कांही तरी नवं शोधावं व जें सापडेल त्यांत रस घ्यावा, अशा वृत्तीनं जीवन जगण्याचा त्यांचा प्रयत्न असल्यानं, जीवनांतील वास्तवता लक्षांत घेण्याचाच त्यांचा सतत ध्यास राहिला. यशवंतराव फुरसतीच्या वेळीं साहित्याची गोडी चाखतात, पुस्तकांत मन रमवतात, पण ही झाली एकांतांतील करमणूक. समाजांत किंवा मित्रांच्या संगतींत बसून होणारी करमणूक, मिळणारा आनंद कांही औरच असतो. असे कांही क्षणहि ते साधतात.

संस्कृतचं अध्ययन करावं असं विद्यार्थिदशेंत असतांना त्यांच्या मनानं घेतलं. कराडच्या टिळक हायस्कूलमधील गुरूजनांच्या सान्निध्यांत त्यामध्ये त्यांनी कांहीशी प्रगतीहि साध्य केली. त्याच काळांत त्यांनी कालिदासाचं 'मेघदूत' हें काव्य मुखोद्गत केलं. विद्यार्थ्यांमध्ये त्या वेळीं पाठांतराच्या चढाओढी लागत असत. चढाओढीसाठी त्या काळांत पाठांतर केल्याचा लाभ यशवंतरावांना पुढच्या काळांत झाला. त्यांची साहित्याची, वाचनाची आवड कायम राहिली.

## - ५ -

यशवंतराव हे कृष्णाकाठचे रहिवासी. त्यांच्या खाण्याच्या आवडीहि कृष्णाकाठच्याच! ज्वारीची भाकरी आणि कांदे-वांग्याची भाजी हें त्यांचं आवडतं जेवण. पूर्वी त्यांना तिखट कालवण फार आवडत असे. भरपूर तिखट खाणारे, पण स्वभावानं गोड अशी विसंगति त्यांत कुणाला आढळेल; परंतु खाण्यांतील तिखट पदार्थांचा स्वभावाशीं संबंध असतोच असं नाही. भरपूर गोड खाणारेहि तिखट स्वभावाचे असूं शकतात. यशवंतरावांना गोडाचा शौक एकूण कमीच. ते मांसाहारहि करतात. तिखट असला तर उत्तमच. भात हा आवडीचा आणखी एक पदार्थ.

मुंबईत असतांना चहा पीत असत. दिल्लीला आल्यापासून चहाची जागा कॉफीनं घेतली. लहानपणीं त्यांनी तालमींतल्या व्यायामाचा शौक केला. राजकारणाच्या धकाधकींत पूर्णपणें अडकल्यानंतर चालणं एवढाच व्यायाम राहिला. चालण्याच्या व्यायामासाठीहि मोकळेपणानं बाहेर कुठे फिरायला जाणं हें त्यांना अडचणीचं ठरतं. त्यामुळे घराचं आवार हेंच चालण्याचं ठिकाण ते निवडतात. दिल्लीला कांही वेळेला, घरांतच चालण्याचा आणि त्यासारखाच अन्य व्यायाम ते घेतात.

यशवंतराव श्रद्धावान् तर खरेच, पण देवभोळे नव्हेत. मातोश्री अक्का या देवभक्त होत्या. त्यांचे ते संस्कार मुलावरहि झाले. अक्कांनी त्यांना आपल्याबरोबर निरनिराळ्या

मंदिरांत नेलं, कथा-पुराणं ऐकवलीं. पंढरपूरला नेऊन श्रीविठ्ठलाच्या पायावर घातलं. पाटणजवळच्या कुलदेवतेच्या – भैरोबाच्या दर्शनासाठीहि ते गेले. प्रतापगडावर श्रीभवानीच्या आशीर्वादासाठी उभयतां पतिपत्नी प्रतिवर्षी जातात. तुळजापूरची भवानी, शिखर शिंगणापूरचा शंभुमहादेव यांचंहि दर्शन घेतात.

असं असलं तरी प्रत्यक्ष देव म्हणून कांही आहे यापेक्षाहि निसर्गाच्या अज्ञात, अदृश्य शक्तीवर त्यांचा विश्वास आहे. त्याहीपेक्षा माणुसकीवर, मानवतेवर सर्वांत अधिक विश्वास आहे. ऐन तारुण्यांतल्या काळांत म्हणजे वयाच्या चाळीस वर्षांपर्यंत देवदेवतार्चनापासून ते कांहीसे बाजूलाच होते. त्या वेळीं अन्य व्यवधानंच अधिक होतीं; परंतु नंतरच्या काळांत स्थिरता येत राहिली तसं श्रद्धेकडे मन वळलं. निसर्गाच्या अज्ञात शक्ति समजून घेण्याचा माणसाचा प्रयत्न असतोच. अनेक गोष्टींचा संदर्भ समजत नाही, अन्वयार्थ लावतां येत नाही, तिथे श्रद्धेचा प्रश्न उभा रहातो आणि त्यांतूनच प्रार्थनेची बुद्धि निर्माण होते. श्रद्धेतूनच प्रार्थनेचा जन्म होतो. दिवसांतले असे कांही क्षण यशवंतराव प्रार्थनेंत व्यतीत करतात.

यशवंतरावांची श्रद्धा मात्र कर्तृत्व निर्माण करण्याच्या सामर्थ्यावर आहे. माता-पित्यांच्या प्रतिमेला वंदन हा एक रोजचा उपक्रम आहे. माणसाला गुरु अनेक असतात; परंतु माता हाच मनुष्याचा पहिला गुरु. माता-पित्यांना त्यांच्या मनांत अग्रस्थान आहे. म. गांधींची तसबीर हें यशवंतरावांचं दुसरं श्रद्धा-स्थान!

गांधीवादाचा आणि गांधींनी सांगितलेल्या तत्त्वांचा प्रत्यक्ष कृतीनं पुरस्कार करणारा जो वर्ग निर्माण झाला त्यामध्ये यशवंतरावांचं स्थान श्रेष्ठ दर्जाचं आहे. गांधीवादाचीं, सामाजिक स्वास्थ्याचीं, सामाजिक विषमता कमी करण्याचीं तत्त्वं त्यांनी आपल्या आचार-विचारांतून आणि कृतींतून समाजापर्यंत पोंचवण्याचा प्रयत्न केला. स्वदेशीची निष्ठा दृढमूल करण्यासाठी महात्माजींनी स्वतःपासून सूतकताईचा आणि त्याच सुताचे कपडे अंगावर वापरण्याचा उपक्रम सुरू केला. त्या काळांत त्याची आवश्यकताहि होती. यशवंतरावांनी यांतील स्वदेशनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा हा महत्त्वाचा विचार आत्मसात केला आणि तो आपल्या वाणीच्या आणि कृतीच्या द्वारे सर्वदूर पोंचवण्याचा प्रयत्न केला. गांधीवादाचं अवडंबर त्यांनी कधी माजवलं नाही; परंतु विचारानं, व्यवहारानं आणि कृतीनं ते स्वतः गांधीवादी म्हणून जगले आणि बरोबरीच्या लोकांना, तरुण पिढीलाहि गांधीवादाची कृति करण्याचे धडे दिले.

भारतीय लोकशाहींत टिळक-गोखल्यांच्या पिढीनंतरच्या ५० वर्षांत यशवंतरावांच्या रूपानं नेतृत्वाच्या एका नव्या पिढीनं जन्म घेतला. पहिल्या पिढीनं बहुजनांच्या हिताचं बौद्धिक व मानसिक दृष्ट्या चिंतन केलं होतं. पण यशवंतरावांची पिढी ही बहुजनांच्या दुःखाचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेली पिढी असल्यामुळे या पिढीनं बहुजनांच्या हिताची बौद्धिक जाणीव तर ठेवलीच, पण यापुढे जाऊन सत्तेच्या राजकारणांत प्रवेश

केल्यानंतर समाजक्रांतीचं उद्दिष्ट या पिढीनं प्रमुख मानलं आणि सत्तेचा सामाजिक हेतु दृष्टीआड होऊं दिला नाही.

सत्ता-स्पर्धेच्या राजकारणांत नेत्याला प्रसंगीं डावपेंचाचा अंगीकार करावाच लागतो. यशवंतराव हे डावपेंचापासून दूर रहाणं शक्यच नव्हतं. परंतु सामाजिक हेतूच्या सिद्धीसाठीच ते डावपेंच खेळले हें त्यांच्या राजकारणाचं आणि राजकीय नेतृत्वाचं वैशिष्ट्य होय. यशवंतरावांनी बुद्धिमानांशीं शब्दछल करण्याचं टाळलं नाही; परंतु ते सहेतुक राजकारणी असल्यानं मध्यममार्ग पत्करून अखेर तडजोड साधण्याची संधि त्यांनी सहसा दवडली नाही. प्रसंगीं त्यांनी माघार घेतली, बाजूला झाले. परंतु ज्या ज्या वेळीं त्यांनी अशा मार्गाचा अवलंब केला त्या प्रत्येक वेळीं त्यांचं राजकीय ध्येयदृष्टीचं वेगळं दर्शन घडलं आणि अधिक जोमानं ते पुढेच झेपावले. यशवंतराव हे सदासर्वकाळ 'सावध' असलेले नेते असं नेहमीच मानलं गेलं आहे. साहस केव्हा करायचं आणि परिस्थितीच्या चक्रव्यूहाचा भेद करण्यासाठी त्या चक्रव्यूहांत प्रत्यक्ष केव्हा शिरायचं यासंबंधीचं त्यांचं गणित मनाशीं पक्कं झालेलं असतं.

कालानुरूप देशाच्या, समाजाच्या हिताचं रक्षण होईल असं धोरण स्वीकारणं आणि तें अमलांत आणणं या एकाच कर्तव्याला यशवंतरावांनी स्वतःला बांधून घेतलेलं आहे. सामाजिक आणि राजकीय मूल्यं कालसापेक्ष असतात. तीं बदलणारीं असतात असं त्यांचं निश्चित मत असून त्या दृष्टीनं ते स्वतःला 'प्रॅग्मॅटिस्ट' ( Pragmatist ) मानतात.

सामान्य जनांच्या व्यवहारी विचारसरणीशीं यशवंतरावांच्या विचारसरणीची सांगड जमून गेलेली असून, त्यांच्या कृतींतून, निर्णयांतून स्वीकारलेल्या विशिष्ट पवित्र्यांतून त्यांची झेप पुढेच जात राहिली आहे. लोकहिताची निखळ प्रेरणा असणारा, सर्जनशील, कुशल संघटक आणि प्रखर राष्ट्रवादी नेता अशीच त्यांची प्रतिमा तयार झालेली दिसते.

यशवंतराव हे लोकशाहीवादी आहेत, चतुर राजकारणी आहेत; परंतु यापेक्षाहि लोकशाहीच्या रक्षणासाठी, काँग्रेसच्या राष्ट्रवादी पुनर्घटनेसाठी स्वतःला वाहून घेणारे प्रभावी राष्ट्रवादी आहेत. जातिनिरपेक्ष, धर्मनिरपेक्ष असं सामाजिक ऐक्याचं नवं पर्व निर्माण करून समाजांत समता, बंधुता, स्नेहभाव वाढवण्याचा भारतीय राष्ट्रवाद त्यांना अभिप्रेत आहे. भारतीय राष्ट्रवादाच्या आव्हानांचा विचार त्यांच्यासमोर सतत उभा असलेला आढळतो. राष्ट्रवाद ही त्यांच्या जीवनांतील प्रभावशाली प्रेरणा असून त्या बळावरच राजकारणांतील, समाजकारणांतील अनेकविध अडचणींवर त्यांनी कब्जा मिळवला.

राजकारणांत आणि सत्तेंत उच्च पदावर असलेल्या यशवंतरावांनी, समाजवादाच्या प्रस्थापनेसाठी, त्याची कार्यवाही जलद गतीनं होण्यासाठी स्पष्ट भूमिका घ्यावी आणि ती भूमिका वेळोवेळीं निर्भीडपणानं सांगत राहून राजकारणाला इष्ट वळण द्यावं, अशी

अनेकांची अपेक्षा असते. काँग्रेसमधील जहाल गटाची तरुण मंडळी वेळोवेळीं जाहीर-पणानं तशी अपेक्षाहि व्यक्त करतात. कार्यकर्त्यांची सभा किंवा शिबिर अशा ठिकाणीं, त्यांचे सहकारी म्हणवणारे ही अपेक्षा व्यक्त करतांना प्रसंगीं त्यांच्यावर टीकाहि करत. हा तुमचा नेता डरपोक आहे असं म्हणण्यापर्यंत कांहींची मजल जाते.

परंतु यशवंतराव या टीकेनं अस्वस्थ होत नाहीत. टीका करणारांचा हेतु बहुसंख्य कार्यकर्त्यांच्या परिचयाचा असल्यामुळे त्यांनाहि यशवंतराव कधी डरपोक वाटले नाहीत. केव्हा बोलायचं, काय बोलायचं आणि कसं बोलायचं यासंबंधीचं किंबहुना केव्हा बोलायचं नाही याचं यशवंतरावांचं गणित ठरलेलं असतं.

कार्यकर्त्यांनाच त्यांनी अशाच एका शिबिराची संधि साधून सांगितलं की, "मी कमी बोलतों असा माझा दोष सांगितला जातो. जे हें सांगतात त्यांच्या दृष्टीनं तें सत्यहि असण्याची शक्यता आहे; परंतु राजकारणांत आणि समाजकारणांत मीं एक व्रत म्हणून पाळलं आहे की, कामाशिवाय बोलायचं नाही आणि बोलण्यासारखं असेल तर त्यासाठी कुणाची परवानगी घेण्यासाठी थांबायचं नाही. उठसूट बोलत रहाणं मला जमत नाही. कदाचित् तो माझा दोषहि असूं शकेल." महाराष्ट्रांत अगदी अलीकडे १९७५ च्या जानेवारीमध्ये बोर्डी या गावीं काँग्रेसच्या शिबिरांत त्यांनी आपली ही भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली होती.

त्यापूर्वीच्या अशाच एका शिबिरांत त्यांनी आपल्या स्वभावाचं दर्शन घडवलं होतं. दिल्लीमध्ये राजकारणांतील वाद आणि चढाओढी, शह-प्रतिशह या गोष्टी नेहमीच सुरू असतात. या वादांमध्ये यशवंतरावांनी हिरीरीनं भाग घ्यावा असं कांहींनी या शिबिरांत सुचवलं आणि वादांत भाग न घेतां यशवंतराव मागे रहातात त्यामुळे दिल्लींत महाराष्ट्राची प्रतिमा उठून दिसत नाही, असा आरोपहि केला.

त्या वक्त्याचं संपूर्ण भाषण होईपर्यंत यशवंतराव स्वस्थ होते. शेवटीं समारोपाच्या वेळीं पक्षाचं ध्येय-धोरण, कार्यक्रम, कार्यकर्त्यांकडून अपेक्षा वगैरेसंबंधी विवेचन करत करत यशवंतराव या वादाच्या मुद्द्यापर्यंत पोंचले. दिल्लींतल्या वादांत यशवंतरावांनी पुढाकारानं भाग घ्यावा असं त्यांना सुचवलं गेलं होतं. या संदर्भात आपल्या नेत्याची भूमिका ऐक-ण्यास कार्यकर्तेहि उत्सुक होते. वृत्तपत्रांतून दिल्लीचं जें वृत्त येत असे त्यामध्ये दिल्लींतल्या एखाद्या वादासंबंधी यशवंतरावांचं मत काय आहे याची कार्यकर्त्यांना माहिती मिळत नसे. त्यामुळे आता प्रत्यक्ष काय सांगतात हें ऐकण्यासाठी सर्वचजण उत्सुक होते. त्यांनी आपल्या भाषणांत दिल्लीच्या वादाचा उल्लेख करतांच सर्वजण सावरून बसले; परंतु यशवंतरावांनी जें सांगितलं तें ऐकल्यानंतर सूचना करणाराचा चेहरा साफ पडला.

"दिल्लीला मी जो गेलों तो वाद खेळण्यासाठी किंवा वाद वाढवण्यासाठी गेलों नाही," असा प्रारंभ करून यशवंतरावांनी सांगितलं, "देशाच्या ज्येष्ठ नेत्यांनी, पं. नेहरूंनी काम करण्यासाठी मला दिल्लीला बोलावलं म्हणून मी दिल्लीला पोंचलों. त्यांनी नेमून दिलेलं काम, सर्व शक्तिनिशी, प्रामाणिकपणें करत रहाणं हेंच मी माझं कर्तव्य

मानतों. परंतु वाद खेळण्याची मला माहिती नाही किंवा ते खेळतां येत नाहीत असं नव्हे. मी वादग्रस्त ठरावं अशी वेळ जेव्हा येईल तेव्हा त्यासंबंधी विचार करतां येईल. वाद करण्याची वेळ येईल तेव्हा वाद करूं का म्हणून विचारण्यासाठी, आता ज्यांनी सूचना केली त्यांच्याकडे जाणार नाही हें मात्र निश्चित !"

राजकारणांत असे कांही बुडबुडे असतात की, स्वतः कर्तृत्वशून्य, परंतु एखादा वाद उभा करून संघटनेचा खेळखंडोबा करण्यांत पटाईत ! कुणाला तरी डहाळ्यावर चढवून एखादं विधान करायला लावायचं, दुसऱ्याला हाताशीं धरून मग वृत्तपत्राद्वारे पहिल्याच्या पाठींत रट्टा घालायचा आणि परस्परांत जुंपली की आपला स्वार्थ साधून घ्यायचा ! परंतु यशवंतरावांनी आपल्या राजकीय आयुष्यांत अशांपैकी कुणाची मात्रा चालू दिली नाही. अनेकांनी त्यांना कोंडींत पकडण्याचा प्रयत्न केला, परंतु राजकारणाच्या मांडवांतून यशवंतराव हे वर्षानुवर्षे चालत राहिलेले असल्यामुळे त्यांनी हा उपसर्ग आपल्यापर्यंत पोंचूं दिला नाही. वाद करणारेच अखेर वाद करत निघून गेले. लोकसेवेची यशवंतरावांची वाटचाल मात्र कायम राहिली.

राजकारण करतांना वादापासून ते अगदी अलिप्तच राहिले असं नव्हे, हिरीरीनं त्यांनी प्रसंगीं वादविवाद केले; परंतु देशाच्या स्वास्थ्याच्या संदर्भांत, धोरणाच्या संदर्भांत आणि लोकशाही समाजवाद प्रस्थापित करण्याच्या कार्यक्रमाच्या संदर्भांत जेव्हा पक्षांतर्गत किंवा बाहेर वाद निर्माण झाले, अशा वेळींच एका निश्चित भूमिकेचा पाठपुरावा करण्यासाठी ते वादविवादाच्या रिंगणांत उभे ठाकले, अन्यथा ते कार्यमग्नच राहिले.

सतत प्रवास आणि प्रवास नसेल तेव्हा मंत्रालयांत बसून दररोज आठ-दहा तास फायली पहाण्याचं आणि निर्णय करण्याचं काम, याशिवाय पक्षाच्या बैठकी, मंत्रिमंडळाच्या बैठकी, पंतप्रधानांबरोबर चर्चा, भेटीसाठी येणारे खासदार, आमदार, मंत्री, परदेशी पाहुणे, विविध विषयांचे तज्ज्ञ आणि सहज भेटायला म्हणून येणारे, या सर्वांशीं चर्चा, असा हा उद्योग यशवंतराव वर्षानुवर्षे करत आहेत. हें सर्व करण्यासाठी त्यांचा उत्साह कसा टिकून रहातो याचं अनेकांना कोडं पडतं.

या दैनंदिन कामांव्यतिरिक्त त्यांच्याकडे येणारीं शेकडो पत्रं आणि त्यांना उत्तरं हें एक अवाढव्य काम सुरू असतं. मंगलकार्यांचीं निमंत्रणं, वाढदिवस, वास्तुशांत, बारशीं, पायाभरणी, रौप्यमहोत्सवापासून सुवर्णमहोत्सवापर्यंत आणि शताब्दीचे उत्सव, स्वातंत्र्यदिन, गणराज्य-दिनाच्या शुभेच्छा, खाजगी कामं, नोकरी, बदली आणि बढती, सरकारी दप्तरीं अडकलेलीं प्रकरणं, शुभकार्यासाठी संदेश, पक्षांतल्या कुरबुरी, सार्वजनिक क्षेत्रांतल्या तक्रारी, एक ना दोन, शेकडो प्रकारचीं पत्रं पोस्टमन घरीं आणून टाकतो. यशवंतरावांचं वैशिष्ट्य हें की, प्रत्येक पत्र ते वाचतात आणि त्याचं उत्तरहि तयार करतात. त्यांनी सांगितलेलीं उत्तरं लिहून घेणं आणि टाईप करून तीं रवाना करणं हें काम दोन माणसांना पुरतं. पत्र पाठवणारांचा असाहि एक वर्ग आहे की, तो देशांत एखादी दुःखद घटना घडली, तर यशवंतरावांना पत्र लिहून आपलं दुःख व्यक्त करतो. तें दुःख संबंधितांच्या

जवळच्या माणसाला कळवा असंहि लोक सुचवतात. मराठी पत्र-लेखक यामध्ये अधिक. त्यांना हिंदी किंवा इंग्रजी लिहिणं जमत नाही, त्यामुळे आपल्या पत्राचं हिंदी किंवा इंग्रजींत भाषांतर करून ते त्यांनी संबंधितांकडे पाठवावं अशी इच्छा ते दर्शवतात.

यशवंतरावांकडे येणारीं पत्रं भारताच्या सर्व भागांतून आणि परदेशांतून येत असतात. याशिवाय आपल्या भावना व्यक्त करणारा कवि आणि कवयत्रींचा फार मोठा वर्ग आहे. मराठी, हिंदी, उर्दू, संस्कृत, इंग्रजी, गुजराथी अशी ज्याला जी सोयिस्कर भाषा असेल त्या भाषेंत केलेलीं काव्यं यशवंतरावांकडे येत असतात. कांही कवींचा उत्साह इतका दांडगा असतो की, ते खंडकाव्यच रचतात आणि काव्याची संपूर्ण वही पाठवतात.

हीं सर्व काव्यं यशवंतरावांसंबंधीच लिहिलेलीं असतात. काव्यं रचणारांत शास्त्री-पंडित, संगीतकार, प्राध्यापक, शिक्षक, कार्यकर्ते, कार्यकर्त्या, वृद्ध स्त्रिया, कॉलेज-कन्यका, तरुण कवि, नव-कवि, प्रथितयश कवि, शिकलेले, न शिकलेले, पण जमेल तसं काव्य करणारे, अशा सर्वांचा भरणा असतो. कांही मराठी शाहीर तीन-चार चौकांचा पोवाडा तयार करून पाठवतात, तर कुणी लावण्या! हिंदी कवि, आर्या, गझल, कव्वाली या घाटणीचीं काव्यं पाठवतात, तर संस्कृततज्ञ शास्त्री-पंडित आपल्या भावना श्लोकबद्ध करतात. अशी कांही हजार काव्यं त्यांच्या संग्रहीं आहेत.

या काव्यांचे विषयहि विविध असू शकतात. महाराष्ट्रांतून प्रत्येक सणाला शुभेच्छा व्यक्त होतात. राखीपौर्णिमा, दसरा, दिवाळी, भाऊबीज, सक्रांतीचा तिळगुळ हे सण तर हमखास असतातच; शिवाय यशवंतरावांच्या जीवनांत उत्कट प्रसंग निर्माण होतो, शुभ घटना घडते, वाढदिवस साजरा होतो, ते मर्दुमकी गाजवतात, भाषणांतून, लेखनांतून उत्तम विचार व्यक्त करतात, जबाबदारीच्या जागेवर त्यांची योजना होते असे विविध प्रसंग काव्यविषय होऊन ते यशवंतरावांकडे रुजू होतात. मराठी कवींमध्ये असाहि एक वर्ग आहे की, यशवंतरावांच्याबद्दल तो देवाला, देवीला नवस करत असतो. काव्यरूप बनलेला हा नवसहि यशवंतरावांपर्यंत पोंचतो.

यांतील पुष्कळ कवि-कवयत्री असे आहेत की, त्यांनी त्यांचा जो काव्य-विषय– यशवंतराव यांना जन्मांत क्वचितच पाहिलं असेल. त्यांच्या कर्तृत्वावर आणि व्यक्तिमत्त्वावर मात्र ते संतुष्ट असावेत. गेलीं कांही वर्षं यशवंतरावांकडे आलेल्या काव्यांची संख्या एवढी जबरदस्त आहे की, त्यांचा एक प्रचंड साठाच बनला आहे. तीन हजारांवर लहान-मोठीं काव्यं त्यांच्या संग्रहीं आहेतच.

यशवंतरावांनी मात्र हे सर्व वाचण्याचा आणि समजून घेण्याचा कंटाळा कधीच केला नाही. हिंदी काव्य-लेखकांपैकी अनेकांचं हस्ताक्षर आणि लिपी बारकाईनंच वाचावं लागतं. पण त्यांना तें त्रासदायक वाटत नाही. स्वतः वाचतात आणि कवीला त्याची पोंचहि पाठवतात. यशवंतरावांना या सर्व व्यापाबद्दल विचारलं तर ते सांगतील, देशांतील, परदेशांतील ज्ञात, अज्ञात व्यक्तींचीं मला येणारीं हीं पत्रं, काव्यं आणि त्यांत

व्यक्त होणाऱ्या भावना हें सर्व माझी स्फूर्ति, माझी उमेद, उत्साह सतेज ठेवणारे स्रोत आहेत. लोकांचीं येणारीं पत्रं, काव्यं वाचलीं, त्यांच्या भावनांशीं समरस झालं म्हणजे माझं अवसान दुप्पट वाढतं. अज्ञात माणसं जें पत्ररूपानं बोलतात त्यांच्यासाठी, त्यांच्यासारख्या असंख्य जिवांसाठी आपला देह झिजतो आहे, याचं मला अनिर्वचनीय समाधान वाटतं.

यशवंतराव सतत कार्यमग्न राहिले ते या ज्ञात आणि अज्ञातांच्या त्यांच्यावरील श्रद्धेमुळे, विश्वासामुळे होय.

१९६२ सालीं चीननं आणि पुढे १९६५ सालीं पाकिस्ताननं भारतावर आक्रमण केलं, त्या वेळीं तीं आक्रमणं परतवून लावण्यासाठी भारतीयांमध्ये आवेश निर्माण व्हावा, राष्ट्रनिष्ठा जागी व्हावी या हेतूनं निरनिराळ्या भाषेंतील अनेक कवि-कवयित्री यांनी वीर-काव्यं रचलीं. जाहीर कार्यक्रमांत, आकाशवाणीवरून हीं काव्यं अखंड निनादत राहिलीं, आणि त्यांचा इष्ट असाच परिणाम झाला.

यशवंतराव त्या वेळीं संरक्षणमंत्री बनून दिल्लीला दाखल झाले होते. ही घटनाच अनेक कवींना काव्यविषय ठरली. देशांतल्या कवींनी संरक्षणमंत्र्यांवर मग काव्यांचा पाऊस पाडला. अनेकांनी वीर-काव्यांची भेट पाठवली. त्यांचा हेतु वैचारिक चेतावणी देण्याचा आणि देशाची प्रतिष्ठा जोपासली जावी हा होता. आम्ही दीन, दुबळे, शांतीचे भाट आहोंत, परंतु सिंहाची शिकार करायची, तर शस्त्र धारदार पाहिजे असं त्यांतील कांहींना सुचवायचं होतं.

दिल्लीचे धनेशचंद्र चतुर्वेदी यांनी यशवंतरावांना लिहिलं आहे की,

हमारा विश्वास है कि अपने प्रातःस्मरणीय पूर्व पुरुषोंके समान ही चव्हाण वीरका जयघोष और नेतृत्व, इस देशके सोते हुए पुरुषार्थ को जगाकर उचित दिशा देने में समर्थ है।

कैथावाचे ( जि. इटावा ) कविरत्न भगीरथ भास्कर यांनी लिहिलं –

वही किल्ला, वही दिल्ली, वही वीर चौहान।
वही चंद्रकवि आज भी, मारि शत्रु मैदान।
यशवंतराव तूं सिंह है, हाथशक्ति तलवार।
युग-प्रहरी तू राष्ट्रका, करो देश उद्धार।
वहाँ मान, गौरव वहाँ, वही स्वर्ग का वास।
वीरों का जाँ रक्तसे, लिखा जात इतिहास॥

मुजफ्फरपूरचे ( बिहार ) कवि मुखलालसिंह चौहान हे यशवंतरावांना कधी भेटलेले नव्हते, त्यांना पाहिलंहि नव्हतं; परंतु यशवंतरावांच्या कर्तृत्वाबद्दल या कवीच्या मनांत विश्वास निर्माण झाला आणि त्यांनी तो काव्यांत गुंफून कळवला. त्यांनी लिहिलं –

यह कौन ? कहाँ का वीर ? कौन रे गर्जन हमे सुनाया।
शस्त्र नहीं करमें फीरभी आतंक अजब है छाया।
वंश वीर क्षत्रिय पुंगवका, वहि चतुर 'चौहान'।
एन मन में है उमङ्ग रहा रे देशभक्ति की शान॥

यशवंतराव संरक्षणमंत्री झाल्याचं जाहीर होतांच देशाच्या संरक्षणाबद्दल लोकांना खात्री वाटू लागली. या संदर्भात बच्छराज व्यास यांनी ज्या काव्यपंक्ति लिहिल्या त्यांत त्यांनी या भावना व्यक्त केल्या. यशवंतरावांना 'शुभास्ते पंथाना' सदिच्छा व्यक्त करतांना ते लिहितात –

तुम आज त्याग महाराष्ट्र-धुरा भारत संरक्षण हितजाना।
है यही प्रार्थना ईश्वरसे 'यशवंत' 'सफल' ही कहलाना॥

'नया जीवन' नांवाच्या कवीनं तर शत्रूला इशाराच दिला. त्यांनी लिहिलं –

ये मेनन नहीं है, ये चव्हाण है।
ये 'स्पीकर' नही है, ये एक आन है॥
'हटो, और हटो,' इसका नारा नहीं।
'बढो और बढो,' इसकी यह शान है॥
लड़ेगा जो इससे, वो पिस जाएगा।
अड़ेगा जो इससे, वो पिट जाएगा॥
कोई जा के कह दो, ये अयुब से।
अड़ेगा जो इससे, वो मिट जाएगा॥

संगीताचार्य छोटेलाल 'मजहर' यांनी यशवंतराव आजारी असल्याचं समजतांच त्यांना स्वास्थ्य मिळावं आणि ते लवकर बरे व्हावेत यासाठी परमेश्वराची अशी प्रार्थना केली की –

शुद्ध हृदय से आज आप से।
विनती करता हूँ भगवान॥
शीघ्र स्वस्थ हो चौहान।
हो प्रसन्न यद दो वरदान॥
यह है सच्चा भक्त देश का।
दीन जनों का प्यारा है॥
ऐसे जनका संकट हरना।
यह कर्तव्य तुम्हारा है॥

हैदराबाद येथील मीरा गुणारी या कवयत्रीनं आपला दांडगा विश्वास काव्यरूपानं व्यक्त केला आहे की –

यशवंतासम असतां नेता उरीं कशाची खंत
आम्ही होणारच जयवंत ।

भोपाळचे कवि वंश गोपाळसिंह चौहान यांनी यशवंतरावांना नववर्ष-भेट म्हणून शतशत प्रणामाची एक काव्यमालिका पाठवली. ते स्वतःला 'गीतानन्दन' असं म्हणवतात. त्यांनी असं काव्य रचलं –

जिनके जीवना का प्रतिक्षण सदा भरा शुचि ललित ललाम।
जिनकी वाणी की मधुराई अभी छोडति आठो याम ।।
जिनका शुभचरितामृत पीकर तन भूला मन पाया धाम।
श्री चव्हाण की सेवा में गीतानन्दन का शतशत प्रणाम ।।
यशवंत बलवंत गुणवंत दिगंत अखंड अकल कलाधारी।
जिसकी क्षमतासे प्रेरित होकर भारत भाग्य जगा भारी ।।
वैरी को मुह तोड जिसने उसे दिखाया अपना काम।
श्री चव्हाण की सेवामें गीतानन्दन का शतशत प्रणाम ।।

यशवंतरावांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी शेकडो कवि पुढे सरसावले हें खरं; परंतु त्यांच्याकडे काव्य पाठवून त्याचं मूल्य मागणारेहि कांही कवि त्यांच्या या संग्रहांत नमूद आहेत. लखनौचा शामबिहारी नांवाचा एक तरुण कवि महाविद्यालयांत शिक्षण घेत होता. त्यानं 'जवानों की याद' हें एक काव्य यशवंतरावांना पाठवलं आणि सोबत एक पत्रहि पाठवलं. शिक्षण पूर्ण करण्यासाठी मी माझ्या गीताची विक्री करत आहे असं त्यानं स्वच्छ कळवलं. त्यानी पत्रांत लिहिलं –

"गीत लिखकर बेचना, मेरे अध्ययन का प्रमुख साधन है। अतएव, श्रीमान्, आज जो भी किमत इस गीत की लगाये, उसे मनिऑर्डर द्वारा भेज दे। ताकि मेरा अध्ययन जारी रह सके और भविष्यमें मैं भी अपने वतन के लिए मरमिट सकूं ।।"

देशांतील महिला यशवंतरावांना बंधुसमान मानतात आणि त्यांना 'राखी' पाठवतात. दूरदूरच्या या भगिनी बंधूच्या हातांत राखी बांधल्याचा आनंद, त्यांच्या काव्यरूप राखी पाठवूनहि व्यक्त करतात. एका भगिनीनं त्यांच्याकडे 'भारत माता की राखी' पाठवली – आणि या राखिचा स्वीकार करा, अशी विनंती केली.

राखी भेजूँ आज मै, यशवन्तराव के पास।
राखी तू स्वीकारकर, मुझे वीर की आस ।।

अशा आहेत या भगिनींच्या भावना. महाराष्ट्रांतून तर अशा शेकडो काव्यरूप राख्या त्यांच्याकडे प्रतिवर्षी पोंचत असतात. भगिनींच्या बंधूप्रेमाचा हा जिव्हाळा यशवंतरावांना अंतर्मुख बनवतो आणि त्यांतून ते बंधु-भगिनींच्या हाकेला ओ देण्यासाठी सदैव सिद्ध रहातात.

महाराष्ट्रांतील कवि, कवयत्री, शाहीर, लावणीकार, इत्यादींनी यशवंतरावांची आठवण प्रत्येक शुभ प्रसंगाच्या वेळीं ठेवलेली असून काव्यरूपानं त्यांनी ती त्यांच्याकडे पोंचवलेली आढळते. कांही असहाय स्त्रियांच्या वतीनं भाऊबिजेची ओवाळणी पाठवतांना महाराष्ट्र-भगिनी म्हणतात –

वंश उजळिला, टिळा लाविला, कर्तव्यपूर्तीचा ज्यांनी।
अशा व्यक्तीला बंधु म्हणोनि, हिंदु स्त्रियांनो ओवाळू या प्रेमानी ॥

सह्याद्रीला पिता मानणाऱ्या एका भगिनीनं – कवयत्रीनं – सह्याद्रींतून अमृत-दुग्धपान स्त्रवतं अशी कल्पना करून तिला माताहि कल्पिलं आहे. या वीरमातेचा पुत्र तिनं यशवंतरावांना मानलं असून ती सांगते की –

तव गुणाने सदैव राहिल तेवत भारतज्योति।

एक रामभक्त रामाच्या पायाजवळ आपल्या नेत्यासाठी अशी मागणी करतात की –

असेचि माझे सुचिर मागणे राम-पदाला।
यशवंता, तव सुयशाचा हो जगीं बोलबाला ॥

दुसरे एक मराठी कवि म्हणतात –

शरीरसौष्ठव, वस्त्र पांढरें।
नाही कशाचे काळेंबेरें ॥
सदैव राहील ताठ मान।
अमुचा नेता चंद्रहार ॥

यशवंतरावांच्या स्वभावाचं, गुणांचं संकीर्तन करण्याच्या ओघांत कांही कवींनी आपल्या प्रतिभेला मुक्तपणानं वाट करून दिली आहे.

एक कवि म्हणतात –

तुमच्या रूपें सौजन्याला आला आकार।
तुमच्या योगे अस्मिता जणु झाली साकार ॥
तुम्हामुळे हा छाति फुगवुनि उभाच सह्यगिरी।
धवल यशाचा तुरा खोविला विधिनें तुमच्या शिरीं ॥

दुसरें कवि त्याहीपुढे जाऊन सांगतात –

सांप्रत काळीं लोकमान्य तूं।
धैर्य धीरांच्या संगति ॥
पुढचे पाऊल पुढे येऊं दे।
भारतभूची ही भूमी ॥

राग कधी तो लोभ तुला ना ।
स्वार्थ नसे की परनिंदा ॥
बहुजन कार्या सदैव रमतो ।
राष्ट्रहिताचा ज्या धंदा ॥

आणखी एक कवि सांगतात –

ज्ञानेशांची भक्ति वसते तुझ्याच वाणींत ।
श्रीटिळकांची शक्ति नांदते तुझ्याच करणींत ॥

एका भगिनीला सुचलेली कल्पना तिनं अशी काव्यबद्ध केली –

यशवंत नाम परि मला गमे हा ।
यशोदीप जणु पाजळलेला ॥
दिपावलीच्या मंगल समयीं ।
हिंद भूमिने स्वकरे ज्याला ॥
महाराष्ट्राची मान उंचवा ।
देशाची तुम्ही शान वाढवा ॥

अशा आशयाची समूहगीतेंहि कोणीं त्यांना अर्पण केलीं आहेत; परंतु महाराष्ट्रांतल्या एका अशिक्षित महिलेनं जनतेला केलेलं आवाहन मनाचा ठाव घेणारं आहे. ही महिला वृद्ध आहे, खेड्यांत रहाणारी आहे, अशिक्षित आहे, तिला लिहितां येत नाही, पण काव्याची तिला दैवी देणगी असली पाहिजे. दुसऱ्याकडून तिनं पत्र लिहून घेतलं असून, त्या पत्रावर तिनं आपला आंगठा उठवला आहे. मनांतल्या भावनाहि तिनं दुसऱ्याला सांगितल्या आणि त्यानं त्या कागदावर उतरून यशवंतरावांकडे पाठवल्या. पत्रांत या महिलेनं यशवंतरावांचा उल्लेख ' चिरंजीव यशवंत ' असाच केला आहे. या महिलेनं जनतेला आणि यशवंतरावांना, दोघांनाहि प्रेमाचा इशारा दिला आहे. ती सांगते –

बंधु भगिनींनो, माझी विनंति ऐका जरा ।
यशवंत चव्हाणाला तुम्ही जतन हो करा ॥

आणि यशवंतरावांना उद्देशून ती सांगते –

यशवंतराव चव्हाण, तुम्ही नका वागूं बाळ ।
टपले वाघावरी, दुष्टाची दोन्ही बाळं ॥
सांगे मी तुझी विठाई, भाबड्या मनाची ।
म्हणून धाडते सांगावा तुला माझ्या लेकरा रे ॥

यशवंतरावांच्या मातोश्री विठाई यांच्या ठिकाणीं ती स्वतःला मानते आणि आईच्या ममतेनं म्हणते की, सांभाळ !

अशा हजारो कवींनी यशवंतरावांविषयीच्या आपल्या भावभावना काव्यांतून व्यक्त केल्या आहेतच. आता आधुनिक वाल्मीकि म्हणून मानले जाणारे महाराष्ट्रांतील कविवर्य ग. दि. माडगूळकर यांनी आपल्या भावना काव्यांतून कशा व्यक्त केल्या आहेत त्या पहा –

कोटि मुखांनी आशिर्वच दे महाराष्ट्र माता
औक्षवंत व्हा, विजयवंत व्हा, प्रियतम यशवंता !

तुमच्या लेखीं नगरी नगरी देवराष्ट्र होई
घराघरांतून उभ्या ठाकल्या वरद विठाबाई
'स्वस्ति' वांछितो जनपुरुषोत्तम, उंचावुनि हातां – ॥ १ ॥

सह्याद्रीच्या शिखरीं उठती स्वायंभव नाद
सातपुड्याच्या कड्यांत घुमती त्याचे पडसाद
'अजातशत्रू' आज लाभला अम्हां राष्ट्रनेता ! ॥ २ ॥

शिवस्मृतीची शाल अर्पिती, लोक लोकमान्यां,
टिळकपणाचा तिलक लाविती तुम्हां नागकन्या,
प्रतिपच्चंद्रापरी वाढु द्या अशीच जय गाथा – ॥ ३ ॥

लोकशाहिचे तुम्ही पेशवे, सेवेचे स्वामी
तुमच्या मागे राहो जनता नित्य पुरोगामी
समर्थ होवो महाराष्ट्र हा भारत-भूमि-त्राता – ॥ ४ ॥

यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्य मंत्री असतांना भारताचे संरक्षणमंत्री म्हणून त्यांना दिल्लीला जावं लागलं. त्या वेळीं पुण्यांतील प्रचंड सभेंत त्यांना निरोप देण्यांत आला. त्या वेळीं महाराष्ट्र-कवि यशवंत यांनी ही काव्य-रचना केली. कऱ्हाडला कृष्णा आणि कोयना या नद्यांचा प्रीति-संगम आहे. यशवंतराव हे कऱ्हाडचे म्हणजे कृष्णाकाठचे. दिल्लीला संरक्षणमंत्री म्हणून त्यांनी जाणं म्हणजे कृष्णा-यमुनेचाच संगम झाला, असं कवि यशवंतांनी मानलं आणि खालील गीत लिहिलं –

पहा हा अपूर्व संगम किती
कृष्णा मिळालि यमुनेप्रती

परचक्र अशुभ साउली
यमुनेच्या पडली जळीं
साह्यार्थ निघे गिरि-सह्य-सुता ही
ओढवल्या संकटीं ॥ कृष्णा० ॥

कालियाच की हा चिनी
ये हिमाद्रि ओलांडुनी
ही मूर्त सावळी त्या निपटाया
ठाके यमुना-तटीं ॥ कृष्णा० ॥

ही कृष्णा भगवी ध्वजा
ही शौर्ये स्फुरते भुजा
उसळल्या जळांतुनि जिच्या धृति मति
दख्खनच्या दौलती ॥ कृष्णा० ॥

त्या कृष्णा काठावरी
जीं पिकें शाळु बाजरी
तार्टेहि तयांचीं बघून भाले
होति मनीं हिंपुटी ॥ कृष्णा० ॥

ही मर्दांची जन्मदा
ही दुर्गा खल दुर्मदा
उचलून बेलभंडार उफाळे
मराठमोळा सती ॥ कृष्णा० ॥

ही ज्वलंत कल्लोलिनी
कळिकाळा दरडावणी
ही निंघे बद्धकटिं कालिंदीच्या
पाठराखणीप्रती ॥ कृष्णा० ॥

कवि यशवंतांनी यशवंतरावांना उद्देशून एक 'स्नेहभावांजलि' लिहिली आहे. या स्नेहभावांजलीचा रोख 'अत्युचीपदिं थोरही बिघडतो हा बोल आहे खरा' या सुभाषिताकडे या भावांजलीचा रोख आहे; त्यालाहि हें व्यक्तिमत्त्व अपवाद आहे, असा यांतील भावार्थ आहे. कवि यशवंत लिहितात –

रसिकतेस येथे औदार्यालंकृती
कसल्याहि झापडी इथे न त्याली मती
दिलखुलासपण बिंबले इथे लोचनीं
घेतली विवेकाकडुनि आणि शिकवणी
शालीनपणा पतिदेवचि सत्तेप्रती
[ मग केवि थोर ते उच्चपदीं बिघडती ? ]
हो, समूर्त झाले असे येथ सौहार्द
ज्यामुळे सह्य परिवार-जनांते दर्द

मिळतसे दिलासा येथे तेजोहता
अन्तराय नाही येथे स्नेहांकिता

कृष्णा नि कोयना यांच्या चिरसंगमीं –
डुंबले, तयांची गुणवन्तांना हमी
की " प्रेमभरें जरि रमाल निज उद्यमीं
तरि यशोवैभवा पडेल काहि न कमी "
हे जीवित म्हणजे साक्षात् संदेश हा
कोणासहि प्रत्यय येइल याचा पहा

हा महाराष्ट्र बलवंत असावा सदा
रगडून पदतळीं येणाऱ्या आपदा
इतिहासा याच्या नवीन तेजस्विता –
लाभुनी, ठरावा सखाचि हा भारता
ही अंतर्यामीं बाळगुनी लालसा –
वर्ततो, पहा त्या इथे महा-मानसा

" विश्ववंद्य आहे भारतीय संस्कृति
गातात अशी जरि दिग्ललना आरती
आरतीमधे त्या गुंगुनि जाऊनि परि
मूडपून पडावें काय खाटल्यावरी ?
अवतरतीं नूतन युगामागुनी युगें
स्वीकारिल त्यांचीं आव्हानें तो तगे
तरि सांभाळावें कोठवरी कुंपणा !
अंबरासारखी असीमता अंगणा
हो, आणायाची उरीं ज्योत चेतवा
तरि संस्कृतिला लाभेल तजेला नवा "

ही कळकळ येथे मूर्तिमंत ठाकली
तिज समर्पितो ही स्नेहादर-अंजली

लोकशाहीमध्ये सामान्य थरांतून राजकीय आणि सामाजिक नेतृत्व कसं विकसित होऊं शकतं याचा यशवंतरावांचं नेतृत्व हा एक आदर्श नमुना आहे. यशवंतरावांची पिढी ही बहुजनांच्या दुःखाचा अनुभव घेतलेली पिढी आहे. बहुजनांच्या हिताची केवळ बौद्धिक जाणीव ठेवूनच ही पिढी थांबली नाही, तर समाज-क्रांतीचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या पिढीनं सत्तेच्या राजकारणाकडे लक्ष दिलं. सत्तेमध्ये प्रवेश करून ती

सत्ता सामाजिक भल्यासाठी वापरण्याचा एक वेगळा आदर्शच या पिढीनं देशासमोर निर्माण केला. सत्तेचा सामाजिक हेतु ही पिढी कधी विसरली नाही.

यशवंतराव कृष्णाकाठचे. कृष्णाकाठच्या मातींतच त्यांचा जीवन-वृक्ष अंकुरला, बहरला. कृष्णामाई अवखळ नाही, स्वतः संथ वाहते आणि इतर भगिनींनाहि पोटांत घेऊन संथ बनवते. संथपणानं जाणाऱ्या कृष्णामाईच्या प्रवाहानं महाराष्ट्रांत मात्र समृद्धीची कहाणी निर्माण केलेली आहे. घरांघरांतून ती कहाणी गायली जात आहे.

विठाईनं – अक्कांनी ही कहाणी काव्यमय केली आहे –

**कृष्णा म्हणे कोयनेला । अवखळ तुझे पाणी ।**
**आपण दोघी बहिणी । संथ जाऊ माझ्यावाणी ।।**

यशवंतरावांनी समृद्धीच्या या लोक-कहाणींतूनच जीवन-स्फूर्ति घेतली आणि सामान्यांपर्यंत त्या स्फूर्तीचं देणं भरभरून वांटलं. हातचं कांही राखून ठेवलं नाही. गेलं अर्धशतक ते संथपणानं ही वाट चालत आहेत. नियतीनं त्यांच्यावर अखंड सावली धरली आहे. जनसामान्यांची प्र-गति घडवून आणण्यासाठी ही देवदत्त वाटचाल सुरूच रहावी, असं त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य सुहृदांना वाटणं स्वाभाविक आहे.



# उल्लेख-सूचि


अ

अकाली दल – ३८७–३८९, ३९१, ३९२
अकोला-करार – १४६
ॲटली, क्लेमंट – १०६, ३६१
१८५७ चें स्वातंत्र्य युद्ध – ७९
ॲड्व्हायसरी प्लॅनिंग बोर्ड – २५६
अत्रे, आचार्य प्र. के. – ९५ ते ४७९
अन्‌-लॉ-फुल ॲक्टिव्हिटीज (दुरुस्ती) बिल – ३९५
अमृतसर कॉंग्रेस अधिवेशन – १९ ते ३७३
अमेरिका – ५९ ते ४७७
अर्जुनसिंग, एअर-मार्शल – ३५३, ३५७, ३७६
अविश्वासदर्शक ठराव (नेहरू सरकार-विरुद्ध) – ४२१
असफअल्ली, अरुणा – ७७
असहकार-मोहीम – २० ते ३७
अहमदाबाद – १५७ ते २२८
अहमदाबाद कॉंग्रेस-अधिवेशन – ३०, ४४६
अळतेकर, गणपतराव – ४२, ६६, १५३
आगरकर-टिळक वाद – १६
आझाद, मौलाना – ३१ ते ४२७
आंध्र – १०६ ते ४४४
आंबेडकर, डॉ. बाबासाहेब – ८४ ते ४९४
आयूबखान – ३६३ ते ३७७
आवडी कॉंग्रेस-अधिवेशन (१९५५) – ४१५
आशिया – ३७७
आसाम – ३९७, ३९८, ४४४
आसाम-नागालॅंड सीमा-प्रश्न – ३९४
ओड्वायर, जनरल – १९, ४०२
ओरिसा-राज्य – ३५४ ते ३९८
औद्योगिक वसाहत योजना – २५६ ते ३४९
औरंगाबाद विभाग डेव्हलपमेंट कौन्सिल – १८२

इ

इंग्लंड – ५३ ते ४७७
इंजिनिरिंग कॉलेज – २५५, २५६
इंदिरा-कॉंग्रेस – ३९४, ४५७
इस्लामपूर तुरुंग – ७४
इस्लामपूर मोर्चा – ७१

उ

उजवा कम्युनिस्ट पक्ष – २०० ते ४६०
उत्तर प्रदेश – १९५ ते ४४४
ऊ थांट (यूनो) – ३६६, ३७३
एकबोटे, दामुअण्णा – ४३

क

कच्छ – ११९ ते ३७४
कटारी, ॲडमिरल – ३५३

कन्नमवार, मारोतराव सा. – १४३ ते ३४९
कमाल जमीन-धारणा कायदा – ३२१
कम्युनिझम – ५३
कम्युनिस्ट पक्ष – ११२ ते ३९२
करबंदी-चळवळ – ३०
करंबेळकर, शंकरराव – ८०, २७०
कराड तुरुंग – ७४
कराड नगरपालिका – ३५, ८०
' करेंगे या मरेंगे ' ( घोषणा ) – ६६, ६७
कर्नाटक – १०५ ते १२५
कलकत्ता – ४०१, ४०२
कळंबे गुरुजी – २४
काँग्रेसचें खास अधिवेशन ( ९, १० ऑगस्ट १९६३ ) – ४१०
काँग्रेस-भवन ( पुणें ) – ५६, २२५
काँग्रेस समाजवादी पक्ष – ४६, ९६
कांबळे, बी. सी. – २०१
कॉमनवेल्थ कॉन्फरन्स ( लंडन ) – ३४३, ३६५
कामराज, के. – ३४५ ते ४४६
' कामराज-प्लॅन ' – ४१०
काश्मीर – ९९ ते ४४४
कासेगावकर, लक्ष्मणराव – ६७
काळा समुद्र नाविक तळ – ३६०
काळे, बाबुराव व सौ. लीला – २७
किडवाई, रफी अहमद – २११–१४
किसन वीर – ४३, ६८, ७६, १३२
किसान-मजदूर पक्ष – २०७
कुंझरू, डॉ. हृदयनाथ – १११
कुंटे, द. का. – १०१ ते १७७
कुंडल ( कौंडिण्यपूर ) – १, २, ७७
कुंभार, रत्नाप्पा – १५१
कुसुमाग्रज ( कवि ) – ३२४
कूपर, धनजीशहा – ४६, १६८
कूळ-कायदा – २६२, ३२१
कृपलानी, आचार्य – ४०९, ४१०
कृषि-उद्योगप्रधान अर्थरचना – ३२२
कृष्णम्माचारी, टी. टी. – ३४८, ३८२
केनेडी, प्रेसिडेंट – ३४८, ३४९
केरळ – १९६ ते ४५७
'केसरी' (पुणें) – १५, ३३, १४९, २८९
केळकर, न. चिं. – ४७९
कैरों, प्रतापसिंग – ३४५
कोकण – १४७ ते ३२४
कोचीन नाविक दल – ३८२
कोठारी, वा. रा. – १४२
कोणेगावकर – ७८
कोतवाल-कुटुंब – ७१
कोतवाल, बाबूराव – ६९, ७०, ८०
कोयना जलविद्युत् योजना – २६६, ४९६
कोरे, तात्यासाहेब – ६७
कोलते, डॉ. वि. भि. – २५४
कोलोरॅडो हवाई अकादमी – ३५८
कोसिजिन ( रशि. पंतप्रधान ) – ३५९ ते ३७७
कौन्सिल हॉल ( पुणें ) – ४९५
कौन्सिल हॉल ( मुंबई ) – १२६–२८
कौल, बी. एम्. ( लेफ्टनंट जनरल ) – ३४२–३४४, ३४९
क्रिप्स ( योजना ) – ६०, ६२, ६४
क्रुश्चेव्ह, निकिता (रशियाचे पंतप्रधान) – ३६०, ३६१

## ख

खडकवासला धरण – ३२५
खंडोबा ( दैवत ) – ३०१
खाडिलकर, र. के. – ९५ ते २००
खिलाफत चळवळ – १९, २०

खेडकर, गोपाळराव – १५१ ते ३३१
खेर, बाळासाहेब – ५६ ते ४९५

ग

गफारखान, अब्दुल – ५८
गरोठ ( इंदूर राज्य ) – २५, २६
'गरिबी हटाव' (घोषणा) – ४५१ ते ४६०
गाडगीळ, काकासाहेब – ५६ ते २४१
गाडगीळ, डॉ. धनंजयराव – १११ ते २६५
गांधी, इंदिरा – १४९ ते ४६२
गांधी, महात्माजी – १८ ते ५०७
गायकवाड, खासदार दादासाहेब – २७८
गाय-वासरू ( निवडणूक-चिन्ह ) – ४५९
गिरी, व्ही. व्ही. – ४१८ ते ४३८
गुजरात – १०५ ते २८६
गुजरात राज्य – १९७ ते ४४६
गुप्ता, सी. बी. – ४४१ ते ४४५
गुरुदासपूर – ३७३ ते ३७५
गुलाम सय्यद्दीन – ९३
गोखले, नाम० गो. कृ. – १५ ते ५०७
गोखले, बाबूराव – ३४, ४२, ६७, ८२
गोरे, ना. ग. – ३८ ते २४१
गोवंडे गुरुजी ( देवराष्ट्र ) – २३
गोवधबंदी-आंदोलन – ३८२ ते ३८७
गोवालिया टँक मैदान ( मुंबई ) – ६६
गोवें-प्रश्न – ३८४
ग्रामपंचायत-दिन – २८१
ग्राम-राज्य – ७७
ग्रामसुधार-सप्ताह – २८१·
ग्रेट-ब्रिटन – १५ ते ४७७

घ

घटना-समिति – ६०, १००, १०६
घाटगे, दाजीबा – ३, ४, ७, ८, १०, ११
घाटगे, परशुराम – ६८, ६९
घाटे, वि. द. – १८५ ते ४७९
घारपुरे, प्रिं. द. रा. – १११ ते १८४
घोरपडे, बाबासाहेब – ९८
घोष, अतुल्य – ३८१ ते ४४६

च

चक्रधर – ३०५
चँग-कै-शेक – ५९, ६०
चंदीगड कॉंग्रेस-अधिवेशन – १९७ ते २९६
चंदेले, छन्नूसिंग – १५१
चंद्रचूड, व्ही. वाय्. ( न्या. ) – ३२७
चरणकर, बाबूराव – ७२
चरेगावकर, व्यंकटराव – ७८
चर्चिल – ५९, ६०
'चलेजाव' आंदोलन (१९४२) – २७, ६२, ६६, ६८, ७६, ८१, ८३, ८८
'चव्हाण-अधिवेशनें' ( लोकसभा )–३९६
चव्हाण, आनंदराव – १८४
चव्हाण कुटुंब – ५ ते ४९०
चव्हाण, गणपतराव – ३ ते ५००
'चव्हाण चले जाव' ( घोषणा : शिवसेना ) – ४६०
चव्हाण, बळवंतराव – ३ ते ८९
चव्हाण, विठाबाई ( विठाई : अक्का ) – ३ ते ५१६
चव्हाण, वेणूबाई – २७ ते ५०२
चव्हाण, ज्ञानोबा – ३ ते ५००
चालुक्य – २, ३०५
चिटणीस, एम्. बी. – २५४
चिटणीस पार्क ( नागपूर ) – २३३
चितळे, विष्णुपंत ५२, १४२, १७७, २५०
चिपळूणकर, सीतारामपंत – १४
चीन – ५४ ते ५१२

चीनचा कम्युनिस्ट पक्ष – ४०१
चैन-यी ( चीन परराष्ट्रमंत्री ) – ४७३
चौधरी, जनरल जे. एन्. – ३४९ ते ३७६
चौधरी, सचिन – ३८३
चौपाटी ( मुंबई ) – १२०, १२६–१२८, १४८–१५०
चौहान, देवीसिंग – १५९, १८२

छ

छागला, महंमदअली करीम (न्या.) – २२२ ते ३८४
छांब-अखनूर – ३६७ ते ३७६
' छोडो भारत ' घोषणा – ६६ ते ४९८

ज

जगजीवनराम – १७५ ते ४६२
जतिनदास ( क्रांतिकारक ) – ३३, ३४
जत्ती, बी. डी. – २९३
' जनता कर्फ्यू ' – १५७, १८५, २३७
जनसंघ – १९९ ते ४६०
जपान – ५८ ते ४७७
जबलपूर कॉंग्रेस-अधिवेशन – ४०४
जम्मू – ३६९–७२, २११
जयपूर कॉंग्रेस-अधिवेशन – १०७ ते ४१२
जयप्रकाश नारायण – ३८ ते ३८८
जर्मनी – १५, ५३, ५८, ५९, ४७७
जल-साधनसामग्री संशोधन विभाग ( सर्कल ) – २६४
जवळकर – २४
जातीय दंगे – ३१ ते ४००
जाधव, तुळशीदास – ९४ ते १९२
जाधव, भास्करराव – १८, २४
जॉन्सन ( अमे. प्रेसि. ) – ३५८, ३५९
जालियनवाला बाग – १९
जावडेकर, आचार्य – ६७ ते ४७९
जिजाबाई, मातोश्री – २९९, ३०१,३०४
जिल्हा संपर्क मंत्री – २८०
जीना, बॅरिस्टर – ५७–५९, ६१, ६४
जेधे, केशवराव – २२ ते २४०
जोशी, एस्. एम्. – ३८ ते २६७
जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री – ३३ ते ४७५

झ

झकिर हुसेन, डॉ. – ९३ ते ४३५
झकेरिया, डॉ. रफिक – १९०
झोनल कौन्सिल – २९२, २९४

ट

टंडन, पुरुषोत्तमदास – ४१०
' टाइम्स ऑफ इंडिया ' ( मुंबई ) – १४९
टागोर, रवींद्रनाथ – २७२, ३१९
टाटा – ३२६
टालबोट, फिलिप्स – ३५८, ३५९
टिळक-जन्मशताब्दी – १५४, १८५
टिळक, जयंत श्रीधर – १४२ ते २९०
टिळक, लोकमान्य – १५ ते ५०७
टिळक-स्मारक-मंदिर ( पुणे ) – १४१
टिळक-स्वराज्य-निधि – ३०
टिळक हायस्कूल ( कराड ) – ११ ते ५०
टेनन्सी लॉ – ९४

ठ

ठाकरे, एस्. एम्. – १३५, १३६
ठाकरे, बाळ – ४६०
ठाणे तुरुंग –.५६

ड

डल्लस, जॉन फास्टर – ३६३
डांगेप्रणीत कम्युनिस्ट पक्ष – २००
डांगे, श्री. अ. – १११ ते २०५
डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेजेस – २७३
डावे कम्युनिस्ट ( मार्क्सिस्ट ) – ३०१ ते ४६०
डुबल गल्ली ( कराड : चव्हाण-निवास-स्थान ) – ६९
डुबल, बाबूराव – २५
डे, एस्. के. – ३३४
डेव्हलपमेंट कौन्सिल्स – १८२
डोंगरकेरी, एस्. आर. – २५४
डोगराई – ३७४
डोंगरे, श्रीपाद – ८६, ८७, ३३८, ५०१, ५०२

ढ

ढेबरभाई – ११३ ते २८५

त

तपासे, गणपतराव – ६७ ते १७७
तमाशा-बोर्ड – ८७
' तरुण तुर्क ' गट – ४२३ ते ४३८
तांबे आरोग्यभवन ( मुंबई ) – ९८–१००
तामिळनाड्ड – ४४०
ताश्कंद – ३७६–७८
'तीनमूर्ति' ( दिल्ली ) ३४८, ३४९
तुकडेबंदी-तुकडेजोड कायदा – २६२
तुकाराममहाराज – ३०६, ३०९, ३२२
तुमपल्लीवार, एम्. डी. – १५१
तुर्कस्थान – १९, ३७४
तुल्ला, व्ही. आर. – १९०
तेलंगण – ३९४, ३९५
त्यागी, महावीर – ३४६
त्रिपुरा कॉंग्रेस-अधिवेशन – ४४०
त्रिपुरा राज्य – ४४४
त्रिराज्य-योजना – ११४ ते १९५
त्रिसदस्य-समिति – १०७

थ

थापर, जनरल – ३४१ ते ३४९

द

दाभाडी-प्रबंध – १०२
दार-कमिशन – १०७
दिल्ली कॉंग्रेस-अधिवेशन ( १९६७ ) – ४०३, ४०४, ४१५
दिवा-दासगांव रेल्वे – २७४
दीक्षित, उमाशंकर – ४१४, ४४१–४३
देव, शंकरराव – ४५ ते २०८
देवकीनंदन नारायण – १११ ते १९२
देवगिरीकर, त्र्यं. र. – १११ ते १८३
देवराष्ट्र ( सातारा : यशवंतराव-जन्मग्राम ) – १, ३, ७, ८, १०, ११, १८, २३, १७२, ४९१, ४९६
देशपांडे, गो. ह. – १५२ ते १९३
देशपांडे, तात्यासाहेब – ५६
देशपांडे, पु. ल. – २७०, ४७९
देशमुख, काशिनाथ – ४३ ते ७३
देशमुख, के. जी. – २६५
देशमुख, दत्ता – ९४ ते २६५
देशमुख, पी. के. – ११९ ते १६०
देशमुख, बी. डी. – ९२, १२५
देशमुख, रामराव – ११८, १३६, १६०
देशमुख, सी. डी. – ११५ ते ४३४
देसाई, अमूल – १२८
देसाई, ठाकूरभाई – १९५, १९७

देसाई, दाजीबा – १३६, १८४, २००
देसाई, बाळासाहेब – १२८ ते २८२
देसाई, मोरारजीभाई – ८३ ते ४७८
देसाई, हितेंद्र – ४४२, ४४५
देहेजिया – १९८
दोंदे, आचार्य – १३६, २००
दोशी, माणिकचंद – ६९
द्रविड मुन्नेत्र कळघम (डी. एम्. के.) – ३९१, ३९२, ४३४
द्विवेदी (हेडमास्तर, टिळक हायस्कूल, कराड) – २४, ३४

ध

धर्माधिकारी, दादा – १४७, १६२
धाडीगांवकर, सीताराम – १५०
धारिया, का. शं. – १३५
धारिया, मोहन – ४०३, ४२३, ४३८
ध्रुवीकरण (राजकीय) – ४१५, ४४६

न

नंदा, गुलझारीलाल – ३८० ते ४३०
नरवणे, डॉ. – १११ ते २०५
नरेंद्रदेव, आचार्य – ३८, ६६
नरे-पार्क (मुंबई) – १२१
नर्सिंग कॉलेज (पहिलें) – २७४
नवबौद्ध-दीक्षा-भूमि स्मारक – २७६
'नवाकाळ' (मुंबई) – ३३
नॅशनल डिफेन्स अकादमी – २५५
नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिल – ३३५, ३४४
'नक्षलाइट' – ३९९ ते ४५९
नाईक-कमिशन (पानशेत-चौकशी) – ३३०
नाईक, वसंतराव – ११९ ते ४४५
नाईक, न्या. वि. अ. – ३३०
नाईक-निंबाळकर – ९२ ते ४७१
नाईट स्कूल (कराडची हरिजन वसती) – ४९२, ४९३
नागपूर-करार – २४६
नागपूर कॉँग्रेस अधिवेशन – २९
नागपूर महापालिका – २०२
नागपूर विभाग डेव्हलपमेंट कौन्सिल – १८२
नामदेवमहाराज – ३०५
नाशिक-तुरुंग – ५६, १३७
निजलिंगप्पा – २९२ ते ४५८
निमो, जनरल आर. एच्. – ३६६
नेत्रपेढी (पहिली) – २७४
नेफा – ३४१ ते ३७४
नेहरू-आत्मचरित्र – ३१, ४१, ४७
नेहरू-घोषणा (रावी तीरावर : ३१–१२–१९२९) – ३२
नेहरू, पं. जवाहरलाल – ३१ ते ५०९
नेहरू, मोतीलाल – ३१, ३४६
नौशेर, भरूचा – १२८, १७७

प

पगडी, सेतुमाधवराव – २५४
पंजाब – ३२ ते ४५७
पंजाब-हत्याकांड – १९
पंजाब-हरियाना सीमा-प्रश्न – ३९४
पंजाबी सुभा (शिखांची मागणी) – १४४, १९३, ३८८
पटनाईक, बिजू – ३४८, ३५०, ३५१, ३५४, ३५५, ३८३, ४११, ४१२
पटवर्धन, अच्युतराव – ३८ ते ७७
पटवर्धन, अप्पासाहेब – २८४
पटवर्धन, रावसाहेब – १४० ते २८४
पटेल, डाह्याभाई – ४३४

पटेल, सरदार वल्लभभाई – ४५, ५४, ५६, ६३, ६६, ८४, १०७, १०८, १७१, ४०६
पटेल, विठ्ठलभाई – १७१
पट्टाभिसीतारामय्या – १०६, १०७
पंडित, जी. एन्. – २६५
पंड्या, उमाशंकर – ७१
पणिक्कर, डॉ. के. एम्. – १११
पंत, पं. गोविंद वल्लभ – ५४ ते ३९४
पत्री सरकार ( प्रति-सरकार ) – ७६ ते ८३
परांजपे, रँग्लर र. पु. – ११८, ११९, १८५
पवार, केशवराव – २४०
पवार, व्यंकटराव – ४३ ते ११८
पवार, शामराव – ८८, ८९, ४८९
'पसायदान' – ३०८, ३०९
पळनीटकर, एस्. एम. ( न्या. ) – २५४
पाकिस्तान – ५८ ते ५१२
पागे, वि. स. – ६६ ते १९२
पांचाळ, वाडिलाल – १५०
पाटकर, एस्. जी. – १२६
पाटणा काँग्रेस-अधिवेशन ( १९७० ) – ४४८
पाटसकर-अवॉर्ड – २९४
पाटसकर, हरिभाऊ – ११३ ते २९४
पाटील, आत्माराम – ४० ते १८४
पाटील, उद्धवराव – १८४, २०४
पाटील, के. डी. – ६५ ते ८२
पाटील, चंद्रोजी – ६६, ७१
पाटील, बॅ. जी. डी. – १२८
पाटील, नाना – ४३ ते १८४
पाटील, पंढरीनाथ – २५
पाटील, पी. डी. – २३०
पाटील, बी. एल्. – २०२
पाटील, कर्मवीर भाऊराव – १८, १८६
पाटील, रा. कृ. १३६
पाटील, राजारामबापू – २०६, २९५
पाटील, वसंतरावदादा – ६६ ते ३२३
पाटील, वीरेंद्र – ४३२, ४४२, ४४४
पाटील, व्ही. एन्. – १८४
पाटील, स. का. – ११० ते ४५८
पाठक, गोपालस्वरूप – ४३३
पाठक, दत्तोपंत ( शिक्षक ) – २३
पांडु मास्तर ( येडें-निपाणी ) – ४३, ७१, ७२, ७६
पानबाजार ( मुंबई – यशवंतराव निवास-स्थान ) – ६७
पानशेत-धरण – ३२५, ३२८–३३०
पारस थर्मल पॉवर स्टेशन (विदर्भ) – २६६
पार्लमेंटरी बोर्ड (सं. म. समिति-नियुक्त) – २००
पार्लमेंटरी सेक्रेटरी – ८३ ते ४८२
पालम विमानतळ (दिल्ली) – ३४४, ४२३
'पीएल् ४८०' करार – ४४९, ४५४
पुणें महापालिका – १८६, २००, २०२, २०४
पुणें विभाग डेव्हलपमेंट कौन्सिल – १८२
पुरोगामी राष्ट्रीय पक्ष – ४१७
पूरग्रस्त पुणें ( १२–७–६१ ) – ३२५
पूर्णा प्रकल्प – २६६
पूर्व-बंगाल – ३९१ ते ४५२
पेकिंग – ३४१, ३४२
पेंडसे, लालजी – १३८, २०२
पेंढरकर, य. दि. ( राजकवि यशवंत ) – २७० ते ५१८
वेंढरकर, सदाशिव – ६८, ७२
पोट्टु सीतारामल्लू – १०८
पोतदार, म. म. दत्तो वामन – ३२५
प्रजा समाजवादी पक्ष – १३५ ते ४६०

प्रतापगड (शिवपुतळा-अनावरण) – १८२–१९०, २८४, ३०२
प्रतापसिंग, सरदार – ६६
प्रतिबंधक स्थानबद्धता कायदा – ३८६, ४०१
प्रतिशिवाजी (खोट्या तुलनेला रोखठोक उत्तर) – ३३६

फ

फक्रुद्दीन अलि अहंमद – ३८४ ते ४४८
फडके, प्रो. ना. सी. – ४१ ते ४८२
फत्तेसिंग, संत – ३८४, ३८७–९०
फरिदाबाद काँग्रेस-अधिवेशन (१९६९)– ४१५–१८, ४४८
फॅसिझम – ५१, ५३
फाजलअली, न्या. – १११ – ११३
फाजलअली-कमिशन – १०५ ते १४६
फायनान्स कमिशन (गुजरात व महाराष्ट्र)– १९७
फिरोजपूर – ३७३–७५
फुले, महात्मा ज्योतिबा – १६ ते ४९४
फैजपूर काँग्रेस अधिवेशन – ४७, ४८
फौजदारी गुन्हेविषयक कायदा – ४०१
फ्रान्स – ५३, ५८, ४७७
फ्लोरा फाउंटन (मुंबई) – १२७, १२८, ५०४

ब

बंगलोर – १३५, २९३
बंगलोर काँग्रेस-अधिवेशन – ४१३ ते ४४८
बंगाल – ३३, ४३५
बडी आबाडी (विरोधी पक्षांची) – ४५८, ४६०
बंडू मास्तर (देवराष्ट्र) – २३
बडोदें संस्थान – ६५, ७३
बर्वे, स. गो. – १९८, २६५, ३२६
बलवंतराय मेहता समिति – २६६, ३३२, ३३३
बसू, आनंद मोहन – १४
बक्षी गुलाम महंमद – ४११, ४१४
बागल, माधवराव – १३३, १८४
बांगला – ४५५, ४६५
बानर्जी, डब्ल्यू. सी. – १४
बानर्जी, सुरेंद्रनाथ – १४
बापट, सेनापति – १२२ ते १८४
बाबू जगतनारायणलाल – ६०
बॉंबे इन्फिरिअर व्हिलेज अबॉलिशन ॲक्ट, १९५८ – २७७
बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन (मुंबई) – १४
बॉंबे स्टेट फायनान्सिअल कॉर्पोरेशन–२५७
बार्डोली – ३०
बावडेकर, न्या. आर. एस्. ३२७–३०
बावडेकर-कमिशन – ३२७–३०
बाळकृष्ण, डॉ. – ४१, ४२
बिंदु, दिगंबरराव – १६५, १६६
बियाणी, ब्रिजलाल – १५९ ते १९५
बिहार – ३८५, ३९१–९४, ३९६, ३९७, ४१४
बिळासकर पाटील – ७३
बेझंट, ॲनी – १५
बेडेकर, एस्. के. – २६५
'बेळगाव-कारवार-निपाणीसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' (घोषणा) – १४८
बोगावत – १५२
बोर्ड ऑफ ट्रेड (ग्रेट ब्रिटन) – २५६
बोल्शेव्हिक पक्ष – १९९
बोस, सुभाषचंद्र – ३० ते ४४०

ब्रह्मदेश ( बर्मा ) – ६०, ६२, ३४८
ब्राह्मण-ब्राह्मणेतर-वाद – २२ ते १८४
ब्रिटिश इंडिया असोसिएशन – १४
ब्रिटिश सरकारचा जाहीरनामा – १९
ब्रुक्स, हिंडरसन ( मे. जन. ) –३५६

भ

भगत, ब्रिगेडियर पी. एस्. – ३५६
भगत-ब्रुक्स चौकशी कमिशन – ३५६
भगतसिंग, सरदार – ३२, ३३
भट्टाचार्य, पी. सी. – १९७
भंडारे, आर. डी. – १३५, २०४
भरूचा, डॉ. – ८७
भारत-चीन सीमावाद – ३४१–४४, ३४९
भारत-पाक युद्धबंदी-रेषा – ३६९, ३६६, ३७७
भारत-पाकिस्तान युद्ध ( १९६५ ) – ३६२, ३६३
भारतीय क्रांतिदल – ४३४
भावनगर काँग्रेस-अधिवेशन ( १९६१ ) – ३३६
भावे, आचार्य विनोबा – १४२ ते १९३
भाषिक राज्यपुनर्रचना – १०५ ते ३९५
भीमाशंकर लेणीं – ३००
भुट्टो, झुल्फिकारअली – ३६४ ते ३७३
भुवनेश्वर काँग्रेस-अधिवेशन (१९६४) – ४१२, ४१५
भोसले, सुमित्राराजे ( राजमाता ) – १८३

म

मॅक्नामारा, रॉबर्ट ( अमेरिकन संरक्षण-खातें सचिव ) – ३५७
मॅक्मोहन रेषा – २०६, ३४२
मंगेशकर, लता – ३०८, ३०९
मजदूर-किसानपक्ष – १९९
मंडालें – १५, १९
मते, नामदेवराव – ३३२
मद्रास – १४, ६०, १०७, १०८
मद्रास काँग्रेस-अधिवेशन ( १९२७ ) – ३२
मद्रास राज्य – ३८०, ३९१, ३९२, ३९४, ४४०
मध्यपूर्व – २२३, ४६५
मध्यप्रदेश – ११९ ते ४५७
मध्यप्रदेश व हैदराबाद रेव्हेन्यू बोर्ड – २२९
मनमोहन राजवाडा ( फलटण ) – १३०
मराठवाडा – ११८ तें ३२४
मराठवाडा विद्यापीठ – १९१, २५४
मराठवाडा सांस्कृतिक मंडळ – २७४
‘ मराठा दैनिक ’ (मुंबई) – १७९, २०३
मराठ्यांचें राज्य – ३२३
मलबार-हिल ( मुंबई : मंत्री निवासस्थानें ) – २७९
मलाया – ६२
मल्लिकार्जुन डोंगर – ७१
मसानी, एम्. आर. ४१०, ४३४, ४५८
महागुजरात जनता परिषद – १५८ ते २८४
महागुजरात राज्य – १९५, २३७
महागुजरात समिति – ११२ ते १७५
महाजन-सभा ( मद्रास ) – १४
महाजनी, ह. रा. – ४३ ते ४७१
महात्मा गांधी स्मारक इस्पितळ – २७४
महात्मा फुले मंडई ( पुणें ) – २३८
महापालिका मजदूर युनियन – २०३
महाराष्ट्र मागणी-दिन – १२०
महाराष्ट्र-म्हैसूर सीमा-प्रश्न – १५३ते३९४
महाराष्ट्र राज्य – १९७ ते ४९५
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ – २७१–७३

महालक्ष्मी ( कोल्हापूर ) – ३०१
महाविदर्भ-राज्य – ११३ ते २८४
माऊंट बॅटन, लॉर्ड – १०६, ३६१
'माओ'-युद्धनीति – ३७०, ३७१
' माझी जन्मठेप ' ( सावरकर ) – ५२
माडखोलकर, ग. त्र्यं. – १०६, २७२, ४७९
माडगूळकर, ग. दि. – ४१९, ५१७
मॉडर्न हायस्कूल ( पुणें ) – ८९
माणेकशा ( होमगार्ड-संघटना ) – ८६
मार्क्स, कार्ल – ४८, ५१, ५२, ५४, १०१, ४७७
मालवीय, के. डी. – ४१२
मालिनोव्हस्की ( रशियन संरक्षणमंत्री ) – ३६०
मावत्से-तुंग – ४००, ४०२
मॉस्को – ३६०, ३६२
मिरजकर, एस्. एस्. – १२१, १२३, १२६, १३६, २०४
मिरज मिशन हॉस्पिटल – २७, ८०–८२, ८७–८९, ९८
मिराशी, वा. वि. २७३
मुकुंदराज – ३०५
मुक्तेश्वर – ३०२
मुखर्जी, एअर-मार्शल – ३५३
मुखर्जी, श्यामाप्रसाद – ५८
मुन्शी, कन्हय्यालाल – ५६ ते २८४
मुंबई कॉंग्रेस अधिवेशन (१९१५) – १५
मुंबई कॉंग्रेस अधिवेशन (१९४२) – ६४, ६५
मुंबई कॉंग्रेस-अधिवेशन ( १९५६ ) – १४८, १५०
मुंबई कॉंग्रेस-अधिवेशन (१९६९)–४४८
मुंबई महापालिका – १२० ते २०६
मुंबई-महाराष्ट्र-राज्य – २९२
मुंबई राज्य – १९८ ते २९५
मुंबई राज्य इरिगेशन बोर्ड (पाटबंधारे मंडळ) – २६४, २६५
मुंबई राज्य फायनान्सिअल कार्पो. – २३१
मुंबई रेव्हेन्यू ट्रायब्यूनल बेंच – २२९
मुंबई विभाग डेव्हलपमेंट कौन्सिल – १८२
मुसाफिर, ग्यानी गुरुमुखसिंग – ३८९, ३९०
मुस्लिम लीग – १९, ५७, ६०
मुळशी धरण – ३२६
मेघालय ( नवें राज्य ) – ३९४
मे-दिन ( १९६९ ) – ४१०
मेनन, व्ही. कृष्ण – २५५ ते ३६८
मेहता, अशोक – १५६, २०१, ३८१
मेहता, जिवराज – ८३ ते ३११
मेहता, सर फिरोजशहा – १४, १५, १७१
मेहता, बळवंतराय – २६६, ३७५
मेहता, वैकुंठलाल – १६१
मेहताब, हरेकृष्ण – १४० ते २२२
मेहेरअल्ली, युसुफ – ३८, ४७८
मेहेरचंद-महाजन कमिशन – ३८४
मैमनसिंग तुरुंग – ३१
मोने ( मुख्य सचिव, महाराष्ट्र ) – ३२८
मोपल्यांचें बंड – ३०
मोरे, शंकरराव – ५६ ते २४७
मोहिते, यशवंतराव – १८४
मोहिते, शंकरराव – २६५
म्हैसूर राज्य – २२९ ते ४४६

य

यार्दी, एम्. आर. – १९७, १९८
यार्दी, वामनराव – १५१

याज्ञिक, इंदुलाल – १५८
युरोप – १४ ते ४७७
यूनो – ३६६
येरवडा तुरुंग (पुणें) – ३५, ५६


र

रंगाचारी (अर्थखात्याचे सचिव) – १९८
रॅडिकल कॉंग्रेस-जन मेळावा – ४७ ते ५०
रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष – ५३
रणखांबे, अमृतराव – ९८
रयत शिक्षण संस्था – १८
रविशंकर महाराज (पं.) – ३११
रशियन क्रांति – ५०, ५१
रस्क, डीन – ३५८, ३५९
राऊत, भाऊसाहेब – ९४ ते १३६
राघवाचारी, सी. – १४
राजकोट विभाग डेव्हलपमेंट कौन्सिल – १८२, २५७
राजगुरु (क्रांतिकारक) – ३२
राजगोपालाचारी, चक्रवर्ती (राजाजी) – ५४, ६०, ६१, ४२७
राजभवन (मुंबई) – ३०७, ३०८, ३१०
राजवाडे, इतिहासाचार्य – २
राजस्थान – २२४ ते ४४४
राजहंस, नारायणराव (बालगंधर्व) – २७०, ५०५
राजाराम कॉलेज (कोल्हापूर) – ४१
राजेंद्रप्रसाद, डॉ. – ४२७
राज्यसभा – १४७, ४०५, ४०७, ४०८
राणे, शि. रं. – ९८, १४८
राधाकृष्णन्, डॉ. एस्. (राष्ट्रपति) – २५५, ३४९, ४२७
रानडे, न्या. महादेव गोविंद – १४ ते १४६
रामसुभगसिंग, डॉ. – ४३२, ४४६
रॉय-गट-परिषद (तासगाव : १९३८) – ४८, ४९
रॉय, मानवेंद्रनाथ (एम्. एन्.) – ३१, ४७–५५, ५७, ५८, ९६
रावळपिंडी करार (पाक-चीन) – ३६३
रावळपिंडी योजना – ३६६
राष्ट्रपतींची राजवट – १२९
राष्ट्रसंघ – ३७३, ३७५, ४६३
राष्ट्रीय स्वयंसेवक संघ – ५८, ९८
रिपब्लिकन पक्ष – १११ ते ४९५
रूझव्हेल्ट, प्रेसिडेंट – ५९
रेड्डी, एन्. संजीव – ३४५, ४११–४५८
रेड्डी, डॉ. चेन्ना – ३९५
रेड्डी, ब्रह्मानंद – ४४३
रेव्होल्युशनरी कम्युनिस्ट पक्ष – १९९
रेसकोर्स मैदान (पुणें) – १५४
रौलट बिल – १९


ल

लंका (श्रीलंका) – १७४, ४५४
लजपतराय, लाला – ३२
लंडन – ३१, ३४३, ३६५, ५०५
लँड मॉर्गेज बँक – २६
लडाख – ३४१, ३४२, ३५१, ३६५
लॉ कॉलेज (पुणें) – ५५
लाल किल्ला (दिल्ली) – ६२
लाल निशाण गट – १९९, २०१
लालबहादूर शास्त्री – १४४ ते ४३०
लास्की, हेरॉल्ड – ४७९
लाहोर – ३२, ३३, ३७३–७५
लाहोर कट खटला – ३३
लाहोर कॉंग्रेस-अधिवेशन (१९२९)–३२
लिमये, मधु – ४३५
लिमये, राघुअण्णा – ४३ ते ७०

लिमये, शिरुभाऊ – ३८, ७७
'लीळा चरित्र' – ३०६
लेनिन – ४९, ५२, ५४
लोककला-लोकनाट्य – ८६, ५०५
लोकशाही विकेंद्रीकरण – २२८ ते ३३५
लोकसभा – १३४ ते ४६०
लोकसाहित्य व लोकसंस्कृति संमेलन (पुणें : १९६१) – २७४
लोकहितवादी – १७
लोमटे, बंडोपंत – ६९
लोहिया, डॉ. राममनोहर – ६६ ते ४१०


## व


'वचनपूर्तीचें राजकारण' (यशवंतरावांचा ठराव) – ४१६
वडूज कचेरी मोर्चा – ६८–७१
'वंदे मातरम्' (घोषणा) – ३४
वर्तक, भाऊसाहेब – ९२, १५१
वर्धा – ६२–६६
वऱ्हाड – ११८, २२०
वसंत व्याख्यानमाला – ३१४
वाइल्ड लाइफ प्रिझर्व्हेशन – २१८
वाकाटक – २२३ ते ३०५
वाघ, काकासाहेब – ९२
वाजपेयी, अटलबिहारी – ४३४
वाटवे, भय्याशास्त्री – ४९
वॉशिंग्टन – ३५८, ३५९, ५०५
विजगापट्टम-नौदल-केंद्र – ३६७
विजापूर तुरुंग – ७४, ७८, ८०
विठोबा (श्रीविठ्ठल-पंढरपूर) – ३०१, ५०७
विदर्भ – ११७ ते ३३७
विद्यार्थी कृति-समिति (गुजरात) – १५७
विद्यार्थी मोर्चा (दिल्ली) – ३८५, ३९०
विनायक (कवि) – ३०६
विमा-राष्ट्रीयीकरण – ४६१
विल्सन, हॅरोल्ड (ब्रि. पंतप्रधान) – ३६१, ३६५
विशाल द्वैभाषिक – ११४ ते ५०१
विशाल म्हैसूर राज्य – २२४
'विश्वकोश' कार्यालय (वाई) – २७३
'विश्वकोश' ग्रंथालय (वाई) – ४८०
वैशंपायन, एस्. के. – २५४
व्यास, बच्छराज – ५१३
व्हॉइसरॉयला निर्वाणीचा संदेश (गांधीजींचा : १–२–१९२२) – ३०
व्ही. ईश्वरन् – १९७, १९८


## श


(श्री)शंकराचार्य जगद्गुरु (पुरी) – ३८४, ३८६, ३८७, ३९०
शनिवारवाडा (पुणें) – ७९, १५४, १८५
शहा, के. के. – १५०, १९७, ४२०
शहा, पोपटलाल – १७७
शहा, मनुभाई – ३८३
शामबिहारी (कवि) – ५१४
शारदाश्रम (बोर्डी) – ८९
शाहूमहाराज, राजर्षि छत्रपति (कोल्हापूर) – १७, १८, ३९, ५२, १७२
शिंदे, अण्णासाहेब (कें. मंत्री) – २६५
शिंदे, महर्षि विठ्ठल रामजी – १७ ते ४९६
शिरोडे स्टेशन जळित प्रकरण – ७०, ७१
शिरोळे, भाऊसाहेब २०४
शिवजयंति-उत्सव – २२, ३४
शिवनेरी (नवराज्य-निर्मिति-सोहळा) – २९७–३०५, ३०७
शिवसेना – ३९८, ३९९, ४६०
शिव-स्मारक समिति – १८२, १८६
शिवाजी एज्यु. सोसायटी (कराड) – ८०

शिवाजी पार्क ( मुंबई ) – ३०७, ३०८, ४६०
शिवाजीमहाराज, छत्रपति ( शिवराय ) – १८२ ते ४८९
शिवाजी विद्यापीठ – २५५
शेख अबदुल्ला – ३६६
शेंडे, बापूराव – ७०
शेडयुल्डकास्ट फेडरेशन – १९९, २०१, २०२, २४१
शेणोलीकर ( शिक्षक ) – २४
शेतकरी कामकरी पक्ष – ९५ ते ३६१
श्रीनगर – ३६७
श्रीप्रकाश ( राज्यपाल ) – १९४ ते ४९७

## स

संघवी, रतिलाल – १५०
सचिवालय ( मुंबई ) – २२९, ३११
संजीवय्या, डी. – ४१२, ४१४, ४३८
सणस, बाबूराव – १७७ ते २४०
सत्यशोधक समाज – १७ ते १८५
समर्थ रामदास – २९७, ३२२
समाजवादी पक्ष – ३८ ते २०२
संयुक्त आघाडी – ४१५
संयुक्त महाराष्ट्र – १०५ ते ५०४
संयुक्त महाराष्ट्र कृति-समिति – १२७, १३६
संयुक्त महाराष्ट्र–दिन – १३६
'संयुक्त महाराष्ट्र पत्रिका' – १४९
संयुक्त महाराष्ट्र परिषद – १०६ ते १९९
संयुक्त महाराष्ट्रवादी कॉंग्रेसजन – १९९
संयुक्त महाराष्ट्र समिति – १३८ ते ३२८
संयुक्त समाजवादी पक्ष – ३८५, ४६०
सरदेसाई, एस्. जी. १२१
सरदेसाई, गो. स. ( रियासतकार ) – १८६
सर्वोच्च न्यायालय – ४०८ ते ४५९
सर्वोच्च बँक व प्राथमिक संस्था – २५९
सविनय कायदेभंग चळवळ – ३०, ३२, ३४
संस्थानिक-तनखा-प्रश्न – ४०३–४०८, ४५४, ४५८
'सह्याद्रि' ( मलबार हिलवरील वास्तव्य-स्थान ) – ४९६, ५०१
सागरोबा – १ ते ४९८
सातारा सैनिकी स्कूल – २५५
साम्राज्यांतर्गत स्वराज्य-कल्पना – ३२
सायमन-कमिशन – ३२
सावंत, पी. के. – ९४ ते १९०
सावनेरकर, बाबासाहेब – १६० ते १९७
सावरकर, तात्याराव ( वि. दा. ) – ५२ ते ४८१
साहित्य संमेलन ( बेळगाव ) – १०६
'सिंडिकेट' ( कॉंग्रेस-अंतर्गत गट ) – ४११–४१३
सिंडिकेट कॉंग्रेस ( संघटना कॉंग्रेस ) – ३८१ ते ४६०
सिंधाण – २२३
सिंहासने, गौरीहर – ४० ते ७८
सुब्रह्मण्यम्, सी. – ३८१ ते ४४६
सुवर्ण-मंदिर ( अमृतसर ) – ३८८, ३८९
सेंट्रल कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्ड – ४२४–२८
सोनहिरा – १, २, ११
सोमण, भाऊसाहेब – ४२ ते ६७
सोरटी सोमनाथ – १, १७२
सोव्हिएट रशिया – ३१ ते ४७७
सौराष्ट्र – ११२ ते २८४
स्वतंत्र पक्ष – २४१ ते ४६०
स्वर्णसिंग, सरदार – ३८४, ४२१, ४२२, ४४१, ४४८
स्वातंत्र्य-आंदोलन ( १९४२ ) – ७०, ७९
स्वामी रामानंदतीर्थ – ६६ ते १६२

ह

'हरिजन' – ५८, ६४
हरियाना – ३८८, ३९३
हॅरिस – ४७८
हिंदुमहासभा – ५८, ९८, १९९
हिंदु-मुसलमान ऐक्य परिषद – ३१
हिमालय – २९९, ३१०, ३४१
हिरे, भाऊसाहेब – ९४ ते ३३१
हिंसा-अहिंसा-वादं – ३१
हुकूमसिंग, सरदार (लोकसभा-सभापति) – ३८८–९०
हुतात्मा-स्मारक (फ्लोराफाउंटन, मुंबई) – ५०४
हैदराबाद – ९९ ते ३९४
हैदराबाद कॉंग्रेस अधिवेशन (१९५८) – १९२, १९४, १९५, २८३, २८४



'वाटचाल'

देवराष्ट्र



मुंबई 'सह्याद्रि'



१ रेसकोर्स रोड नवी दिल्ली

# चव्हाण कुटुंबीय






मातोश्री श्रीमती अक्का (विठाई) आणि यशवंतराव



श्रीमती राधाबाई कोतवाल (भगिनी)



बळवंतराव चव्हाण (वडील)
ज्ञानोबा चव्हाण (बंधू)
गणपतराव चव्हाण (बंधू)



मसलत

पंतप्रधान इंदिरा गांधी - यशवंतराव





संरक्षणमंत्री यशवंतराव :
शपथविधी
पं. जवाहरलाल नेहरू
राष्ट्रपति डॉ. राधाकृष्णन
गुलझारीलाल नंदा

.....



श्रीपाद डोंगरे
(सचिव)



जिव्हाळा :
राष्ट्रपती फक्रुद्दीन अलि अहमद
यशवंतराव



यशवंतराव - मार्शल टिटो
(युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष)

# अव्वल मुत्सद्दी राजकारणी

यशवंतराव-ए.ग्रोमिको
(सोविएत रशियाचे परराष्ट्रमंत्री)





यशवंतराव - किसिंजर
(अमेरिका)



संयुक्त राष्ट्रसंघात (यूनो) चर्चा - विचार विनिमय






एक जाहिर सभा

15



पत्रकार, वृत्तपत्रांतील लेख आणि अन्य स्फुट लेखन,
आकाशवाणीवरील श्रुतिका आदि साहित्यामुळे
श्री. रामभाऊ जोशी हे सर्वश्रुत आहेत.
श्री यशवंतराव चव्हाण यांचें चरित्र
त्यांना जाणीवपूर्वक लिहितां आलें तें
त्या दोघांमधील निकटवर्ती स्नेहभावामुळे.
सहजसुलभ भाषेमुळे या साऱ्या चरित्र-लेखनांत
जिव्हाळा आणि जिवंतपणा भरून राहिला आहे.
यशवंतरावांच्या बालपणापासूनच्या जीवनांतील
व्यक्तिगत, कौटुंबिक आणि राजकारणांतील
अनेकविध घटना त्यांनी विवेचक पद्धतीने
कथन केल्या आहेत. वहागीने रेखाटलेलें व्यक्तिदर्शन
हें या चरित्र-ग्रंथाचें एक आगळें वैशिष्ट्य ठरावें,
असा हा वर्तमान इतिहासाचा मागोवा घेणारा
विवेचक पण लालित्यपूर्ण चरित्र-ग्रंथ
असंख्य वाचकांची निःसंशय दाद मिळवील.